Rare section

मराठी भाषेचा

सरस्वती कोश

P155,3:4k
G0.2.2
231579

Rare section



# य

**य** मराठी व्यंजनमालेंतील सव्वीसावें व्यंजन.

**य** [ ' ही ' चा अपभ्रंश ] **श० यो० अ०** सुद्धां; देखील; उ० तोच आला म्ह० तो सुद्धां आला.

**यकसखुर्नापणा** [ **फा०** यक् (एक)+सखुन् ( शब्द )+**म०** पणा ( प्रत्यय ) ] **पु०** एक वचनीपणा; वचन किं० करार न मोडणें हा गुण.

**यःकश्चन, यःकश्चित्** [ **सं०** ] **पु०** कोणी तरी सामान्य माणूस.

**यकीन** [ **अ०** ] **वि०** निश्चित; खात्रीचा.

**यकृत** [ **सं०** ] **न०** पित्ताशय किं० त्याचें फुगणें हा रोग.

**यगानगत** [ **फा०** ] **स्त्री०** सख्य; ऐक्य.

**यच्चयावत्** [ **सं०**यत्+च+यावत्=जें आणि जितकें ] **वि०** सर्व; दरोबस्त.

**यजणें** [ **सं०** यज् ] **स० क्रि०** ( यज्ञ इ० विधि ) करणें. [भूमि.

**यजन** [ **सं०** ] **न०** १ हवन. २ यज्ञ. ३यज्ञ-

**यजमान** [ **सं०** ] **पु०** १ ऋत्विजांकरवीं यज्ञ करविणारा. २ ( **मराठींत** )धनी; मालक;स्वामी. ३ ( **मराठींत** ) कोणा स्त्रीचा पति; उ०तुमच्या यजमानांना उद्यां सुट्टी असली तर मी त्यांना भेटावयास येणार आहें. ४ ज्याच्या घरीं लग्न, मुंज, श्राद्ध, श्रावणी, पूजा, इ० चा संकल्प सांगावयाला कोणी ठरलेला भिक्षुक, उपाध्या, इ० जातो तो त्याचा यजमान. ꣸ **यजमानघर न०** ज्याच्या घरीं जोशी, उपाध्या,इ०अर्थ ४ चीं कृत्यें करतो त्याचें तें यजमानघर. **यजमानकृत्य न०** ठरलेल्या यजमानाचें ठरलेला उपाध्या जें धर्मकृत्य करतो तें. **यजमानीण, यजमानिनी, यजमानपत्नी स्त्री०** १ आपल्या यजमानाची बायको. २ आपली धनीण; आपण जिचे नोकर ती आपली यजमानीण. **यजमानी स्त्री०** ( **शूद्रांत** )जिच्या तंत्रानें किं०हुकमतीनें किं० सूचनांप्रमाणें कुटुंबांत जेवणाखाण इ० कृत्यें केलीं जातात ती स्त्री.

**यजित** [ **सं०** 'अजित' (न जिंकलेला)]**वि०** जिंकलेला. **न०** पराभव. ꣸**यजितपत्र न०** आजिक्यपत्र; ह्या इसमानें अमुक विषयांत,कलेंत, वादांत, किं० कुस्तींत जय मिळविला आहे अशा अर्थाची सनद, पत्र,इ०. हा शब्द अशिक्षितांत रूढ आहे. **यजित जाणें** आपण पराभव पावलों असें कबूल करणें. **टीप**,–अकरणरूपी किं०अकरणार्थी प्रयोग: उ० मी कोणाला कशाला यजित जाईन ? उ० मी तुझ्यासारख्या लुंग्यासुंग्याला यजित जाणारा माणूस नाहीं.

**यजीद (–त–) खत** [ **फा०** आझाद्=मुक्त; खत=कागद ] **न०** सोडचिठ्ठी.

**यजुस्** [ **सं०** ] **न०** १ यज्ञमंत्र. २ अध्वर्यु. ३ यजुर्वेद. ꣸ **यजुर्वेद पु०** चार वेदांपैकीं दुसरा. **यजुर्वेदी, यजुःशाखी पु०** यजुर्वेदाचें अध्ययन करणारा ब्राह्मण.

**यजू, यज्जु** [ **सं०** यजुस् ] **पु०** यजुःशाखी. **टीप**,–' झज्जू' म्ह० यजुःशाखी ब्राह्मण (टवाळकीत ).

**यज्वा** [ **सं०** यज्वन् ] **पु०** १ यथाविधि यज्ञ करणारा. २ यजमान.

**यंता** [ **सं०** यन्तृ ] **पु०** नियामक; आवरणारा. २ रथाचा सारथि. ३ हत्तीचा महात.

**यति** [ **सं०** ] **पु०** तपस्वी; संन्यासी; जितेन्द्रिय. **स्त्री०** १ थांबणूक;अडथळा.२ नियंत्रणा.३ गाण्यांत किं०श्लोकांत थांबण्याची किं०विरामाची जागा; उ० मंदाक्रान्ता वृत्तांत चवथ्या अक्षरावर, आणि नंतर पुढच्या सहाव्या अक्षरावर, आणि पादान्तीं यति असते.

**यत्किंचित्**[ **सं०** ]**वि०**अगदीं थोडा,अत्यल्प. **क्रि० वि०** अगदीं थोड्या प्रमाणांत.

**यत्न** [ **सं०** ] **पु०** १ कांहीं कार्यासाठीं खटपट किं० मेहनत. २ कष्ट; श्रम. ꣸ **यत्नतः क्रि० वि०** प्रयत्नानें; खटपटीनें; प्रयत्न केला असतां. **यत्नसाध्य वि०** प्रयत्नानें मिळण्याजोगें. **यत्नवाद पु०** यत्नानें सर्व कांहीं प्राप्त होतें असें मत याच्या व्यावर्तकत्वें ' दैववाद '. **यत्नवादी पु०** प्रयत्न केल्यानें मनोरथ सफळ होतात अशा मताचा मनुष्य. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' दैववादी ' **यत्नवान् वि०** यत्न करणारा; झटणारा; दीर्घोद्योगी. **यत्नासन्न** वि०प्रयत्नानें प्राप्त झालेला.

**यंत्र** [ सं० ] न० १ कांहीं पदार्थ बनविण्यासाठीं किं० कांहीं कार्य घडवून आणण्यासाठीं अनेक अवयवांच्या यथायोग्य संयोगानें जो पदार्थ साधन म्हणून रचिलेला असतो तो; उ० सिंगरचें शिवण्याचें यन्त्र सर्वोत्कृष्ट म्हणून गणलें जातें. २ धातूचा पत्रा,–ज्यावर देवतेची आकृति किं० मंत्राक्षरें कोरलेलीं असतात आणि जो कांहीं इष्ट हेतु साधण्यासाठीं पूजिला जातो किं० गळ्यांत किं०मणगटांत बांधला जातो तो. ३ ग्रहणादिकांचे काल ठरविण्यासाठीं ज्योतिष इ० विषयाचीं कोष्टकें रचिलेलीं असतात तीं प्रत्येक. ❀ **यंत्रमंत्र, यंत्रतंत्र** न० ए० व० कांहीं इष्ट गोष्ट घडवून आणण्यासाठीं केलेल्या युक्त्या, हिकमती, खलबतें, इ० समुच्चयानें ( रचणें, चालविणें, इ० ). **यंत्री** वि० यंत्रानें बनविलेला. **यांत्रिक** वि० १ यंत्रें करणारा. २ यंत्रानें केलेला. **यंत्रशास्त्र** न० यंत्रें करणें, तीं दुरुस्त करणें, पदार्थांच्या स्थितिगतिसंबंधाचे तीं नियम ठरविणें, इ० विषयाचें शास्त्र.

**यत्र** [ सं० ] क्रि० वि० जेथें; ज्या स्थळीं. ❀ **यत्रयत्र** क्रि० वि० जेथें जेथें. **यत्रकुत्राचित्, यत्रकुत्रापि** [ सं० ] क्रि० वि० कोठें तरी; कोठें ना कोठें तरी.

**यंत्रित** [ सं० ] वि० जखडलेला; बांधलेला; दाबांत ठेविलेला.

**यथा** [ सं० ] क्रि० वि० १ ज्याप्रमाणें; जसें; ज्या रीतीनें. **यथायथा** क्रि० वि० बेतास बात; अत्यल्प; कसेंबसें. **यथानुपूर्वक** क्रि० वि० क्रमानुसार; क्रमाप्रमाणें. **यथार्थ** वि० खरें; सत्याला धरून असलेलें; बरोबर; योग्य. **यथार्ह** वि० योग्यतेप्रमाणें असलेलें. **यथावकाश** क्रि० वि० १ सवडीप्रमाणें; जागा किं० वेळ असेल त्याप्रमाणें. २ योग्य स्थलीं किं० काळीं. **यथेच्छ, यथेष्ट** क्रि० वि० १ इच्छेप्रमाणें; हावें तितकें; मनमुराद; खूप; पुष्कळ. २ स्वच्छंदानें; अनियंत्रितपणें. **यथोक्त** वि० पूर्वीं सांगितलेलें. क्रि० वि० योग्य क्रम अनुसरून. **यथाकथंचित्** कसें तरी; भारी कष्टानें. वि० (**मराठींत**) कसाबसा; कामचलाऊ. **यथाकाम** क्रि० वि० १ मर्जीप्रमाणें; इच्छेप्रमाणें. २ तृप्ति होण्या इतक्या परिमाणांत. **यथाकाल, यथाकाळीं** क्रि० वि० योग्य समयीं. **यथाक्रम (–में, –क्रमानें )** क्रि० वि० योग्य क्रमाप्रमाणें. **यथातथ्य** न० खरें; जसें आहे तसें. **यथातथा** क्रि० वि० १ कोणेत्या तरी रीतीनें; जमेल तसें. २ बेताबातानें. **यथान्याय** क्रि० वि० न्यायाला अनुसरून; शिस्तीप्रमाणें. **यथाबुद्धि, यथामति** क्रि० वि० आपल्या अकलेप्रमाणें; आपली बुद्धि किं० मति खर्चून. **यथाभाग, यथाभागशः** क्रि० वि० १ आपआपल्या हिश्शाप्रमाणें; नेमिल्याप्रमाणें; ठरवून ठेविल्याप्रमाणें. २ योग्य ठिकाणीं. **यथावत्, यथायुक्त** वि० योग्य; नियमाला धरून असलेलें. **यथाविधि** क्रि० वि० योग्य सरणीला धरून. **यथाशक्ति** क्रि० वि० पूर्ण शक्ति खर्चून. क्रि० वि० १ योग्य रीतीनें. २ नियमानुसार. ३ बिनचूक. **यथाश्रुत, यथाश्रुति** क्रि० वि० वेदोक्त रीतीनें. **यथासंख्य** न० ( **साहित्य** ) कांहीं एका जातीच्या कांहीं वस्तु कांहीं क्रमानें घेऊन त्या वस्तूंशीं दुसऱ्या एका जातीच्या तितक्याच वस्तूंचा त्याच क्रमानें अन्वय केलेला असल्यास म्हणजे संबंध जोडून दाखविलेला असल्यास होतो तो अलंकार; उ० जटा, वल्क, धनू त्याच्या शिरीं, देहीं, करीं असे ( रा० प० सर्ग १०; श्लोक ११ ); येथें जटा शिरीं, वल्क देहीं, आणि धनू करीं, असा अन्वय. विशेष तपशील आमचे ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **यथास्थित** क्रि० वि० जसें होतें तसें. वि० पूर्वींप्रमाणें असलेलें; योग्य प्रकारचें. **यथासांग** क्रि० वि० अंगें किं० उपांगें न सोडतां; पूर्णत्वानें; शास्त्रोक्त रीतीनें. **यथास्थानीं** क्रि० वि० योग्य ठिकाणीं; ज्याचें जें स्थळ त्या स्थळीं. **यथाकथा** क्रि० वि० मोठ्या शिकस्तीनें; पराकाष्ठेनें. **यथाजात** वि० जसा जन्मला तसा अज्ञान म्ह० **मूर्ख**. **यथासंभव** क्रि० वि० १ शक्य असेल त्याप्रमाणें. २ कदाचित. ३ आपल्या शक्तीप्रमाणें.

**यद्** [ सं० ] **सर्वनाम** जो, जी, जें, इ०. ❀ **यच्चयावत्, यच्चावत्** वि० जे आणि जितके ते आणि तितके; दरोबस्त; सर्व; झाडून सर्व. **यद्भविष्य** वि० जें व्हावयाचे असेल तें होओ, मी कांहीं करणार नाहीं, असें म्हणून स्वस्थ बसणारा; इष्ट मिळविण्यासाठीं किं० अनिष्ट निवा-

रण्यासाठीं मी कांहीं खटपट करणार नाहीं असें म्हणून हातपाय न हालवितां स्वस्थ बसणारा; दैववादी. **यदपि उभयान्वयी अ०** जरी. **यदर्थ, यदर्थी उभयान्वयी अ०** ज्या अर्थी. **यत्किंचित् वि०** १ क्षुल्लक. २ अत्यल्प. **यद्वा उभयान्वयी अ०** किंवा. **यःपलाय न०** पळून जाणें; पोबारा करणें.

**यंदा क्रि० वि०** चालू सालीं. **यंदाच्या वर्षी (किं० सालीं)** चालू वर्षांत.

**यदा [सं०] क्रि० वि०** १ जेव्हां; ज्या काळीं. २ ज्या अर्थी. ❀ **यदाकदाचित् क्रि० वि०** जर प्रसंगानुसार; जर कदाचित्.

**यदि [सं०] उ० अ०** जर. ❀ **यद्यपि, यद्यपिचेत् उ० अ०** जरी.

**यदीय [सं०] वि०** ज्याचा, ज्याची, इ०.

**यदृच्छा [सं०] स्त्री०** १ स्वच्छंदीपणा. २ सहजपणा. ३ दैवयोग. ❀ **यदृच्छाशब्द पु०** विशेषनाम (व्याकरणांत). **यदृच्छालाभ पु०** अनायासें किंवा आकस्मिक रीतीनें झालेला लाभ.

**यब्धा [सं० यभ्** ] **पु०** मैथुनांत गुंतलेला.

**यम [सं०] पु०** १ आवरणें. २ ताबा. ३ आत्मसंयमन करणारा. ४ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि, हे जे योगाचे आठ प्रकार त्यांतील पहिला,–ज्यांत अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह, हीं पांच येतात. मागें 'अष्ट' मध्यें 'अष्टविधसमाधि' पहा. ४ शरीरसाधनापेक्ष नित्यकर्म. ५ मृत्यूची देवता. ६ प्राण्यांस दुष्कर्मांबद्दल यातना देणारी देवता. ७ कठोर हृदयाचा माणूस. ८ **(ज्योतिष)** शनि. **यम पु० अ० व०** १ आवळे जावळे. २ अश्विनीकुमार. ३ नकुळ आणि सहदेव,–पांच पांडवांपैकीं कनिष्ठ दोन. ❀ **यमराज, यमाजीपंत, यमाजीभास्कर, यमाजीबाजी** यम,–मृत्यूची देवता. **यमभगिनी, यमस्वसा, यमानुजा स्त्री०** यमुना नदी. **यमदंष्ट्रा स्त्री० अ० व०** रोगाचे दिवस,–आश्विन वद्य अष्टमी ते कार्तिक वद्य अमावास्येपर्यंतचा काळ. **यमाच्या दाढेंत क्रि० वि०** मोठ्या संकटांत. **यमादिशा स्त्री०** दक्षिण दिशा. **यमदूत पु०** कावळा. **पु० अ० व०** माणसांना ओढून आणावयासाठीं यमानें भूलोकीं पाठविलेले दूत. **यमद्वितीया स्त्री०** कार्तिक शुद्ध द्वितीया; भाऊबीज हा दिवस. **यमपट पु०, यमपट्टिका स्त्री०** यमपुरीच्या देखाव्यांचा पडदा किंवा चित्रपट. **यमवाहन न०** रेडा. **यमाचा पाहुणा पु०** महापातकी. **यमव्रत न०** निष्पक्षपातीपणा. **यमकुंड न०** तुरुंग; कैदखाना.

**यमक [सं०] न०** १ मल्लयुद्धांतील एक पवित्रा. २ दोन चरणांच्या शेवटीं तेंच अक्षर आलें असतां किंवा तींच अक्षरें त्याच क्रमानें आणि भिन्न अर्थांनीं आलीं असतां अलंकार होतो. यमकाचें वर्गीकरण आणि उदाहरणें आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. ❀ **यमकाला यमक न०** जशास तसें; फिटंफाट.

**यमन [सं०] न०** १ दाब; नियंत्रणा. २ थांबविणें. ३ विश्रांति. ४ व्यवस्था. **पु०** १ यम,–मृत्यूची देवता. २ **(संगीतांत)** कल्याण रागाचा एक प्रकार. **यमनबिलावर, यमनीबिलावर पु० (संगीतांत)** बिलावर रागाचा एक प्रकार.

**यमल [सं०] पु०** आवळ्या जावळ्यां मुलांपैकीं एक.

**यमुनी [सं० यमुना] स्त्री०** अंगठीवर कोंदणांत बसवावयाचा काळा खडा,–ज्यावर सोनेरी अक्षरें काढतात तो. हा यमुनेमध्यें सापडतो. 'यमुनेचा खडा' ह्याच अर्थी.

**यलम्मा [कानडी] स्त्री०** रेणुका,–परशुरामाची आई किंवा तिची उपासक स्त्री.

**यव [सं०] पु०** १ जव; सातू. २ जवाइतकें वजन,–सहा मोहोऱ्या. ३ बोटावरील यवाची आकृति. ४ इंद्रजव. ❀ **यवमध्य न०** चांद्रायण प्रायश्चित्ताचा एक प्रकार. **यवक्षार पु०** जवखार. **यवोदक न०** श्राद्धविधींत करतात तें यव घातलेलें पाणी. दुसरें जें पाणी तें 'तिलोदक.'

**यवन [सं०] पु०** १ ग्रीसचा रहिवासी. २ कोणीही अनार्य,–मुसलमान इ०. **यवनाचार्य पु०** रमल विद्या शिकण्यासाठीं जो बाटून मुसलमान झाला तो ब्राह्मण. **यवनानी स्त्री०** देवनागरी लिपीहून कोणतीही भिन्न लिपि.

**यश [सं० यशस्] न०** १ कीर्ति. २ कार्यसिद्धि; कार्याची सफलता. ३ स्तुति. ४ सुदैव.

ॐ यशालाभास येणें आपण पोसलेला माणूस, जनावर, इ० किं० आपण ज्याबद्दल फार झीज सोशिली आहे किं० कष्ट केले आहेत असा धंदा इ० रंगारूपास येऊन फलद्रूप किं० लाभदायक होऊं लागणें. **यशअपयश** न० ए० व० कार्यसिद्धि किं० कार्यनाश; चांगला किंवा वाईट शेवट; उ० आपण इमानानें कर्तव्य करावें, यशअपयश येणें हें ईश्वरेच्छेवर. **यशस्कर** वि० यश देणारें. **यशस्वान्** वि० ज्याची कीर्ति झाली आहे असा. **यशस्वी** [ सं० यशस्विन् ] वि० ज्याचें कार्य सफल झालें आहे असा; ज्याचा इष्ट हेतु साध्य झाला आहे असा; परीक्षेंत जो उतरला आहे असा; ज्याचा प्रयत्न सफल झाला असा; ज्याचें पर्यवसान इच्छिल्याप्रमाणें झालें आहे असें(काम,खटपट,इ०). **यशोधन** न० यश हेंच कोणी धन. पु० यश हेंच आहे धन ज्याचें असा ( मनुष्य ). **कोणे-काच्या हाताला यश असणें** त्याणें अंगावर घेतलेलें प्रत्येक काम किं० केलेला प्रत्येक प्रयत्न सदैव सिद्धीस जात असणें. **तो तुम्हाला यश देणार नाहीं** तो तुमच्याशीं हम-खाशीनें कृतघ्न होईल; तो तुमच्याशीं निमक-हरामी करील; तो तुमच्याशीं भांडून किं० तुम्हाला शिव्या देऊन जाईल.

**यष्टि,यष्टिका**[सं०] स्त्री०१काठी; छडी.२गदा. ३ हार. ॐ **यष्टिमधु, यष्टिमधुक** न० ज्येष्ठ मध.

**यहतियात** [ अ० इहतियात ] स्त्री०काळजी; तजवीज; बंदोबस्त.

**यहसान** [ अ० इहसान ] न० कृपा;उपकार. ॐ **यहसानभंद** वि० कृतघ्न.

**यक्ष** [ सं० ] पु० १ देवयोनिविशेष. २ पिशाचभेद. ३ कुबेर. ॐ **यक्षावास, यक्षतरु** पु० वटवृक्ष. **यक्षाधिप** पु० कुबेर. **यक्षकर्दम** पु० केशर, अगरु, कापूर, आणि कस्तूरी, यांचें समभाग मिश्रण,-अंगाला लावण्यासाठीं करतात तें. **यक्षधूप** पु० १ राळ,-एक ज्वालाग्राही पदार्थ. २ टर्पिण तेल. **यक्षराज** पु० कुबेर. **यक्ष-रात्रि** स्त्री० दिवाळी. **यक्षवित्त** वि० कृपण. **यक्षिणी** स्त्री० १ यक्ष जातीची स्त्री. २ यक्षाची पत्नी. ३ कुबेराची पत्नी. ४ पिशाची.५ अद्भुत परिणाम घडवून आणणारी देवता. **यक्षिणीची कांडी** स्त्री० १ जी कांडी (काठी) हातांत धरून यक्षिणी फिरविते आणि कांहीं अद्भुत प्रकार घडवून आणते ती ( फिरणें ). यक्षिणीनें कांडी फिरविणें, यक्षिणीची कांडी फिरणें, असे प्रयोग होतात. २ अद्भुत चमत्कार घडवून आणणारी आणि लोकांच्या निदर्शनास न आलेली कांहीं युक्ति, हिकमत, इ०( फिरणें ). **यक्षिणीनें कांडी फिरविणें,**किं० **यक्षिणीची कांडी फिरणें** आपणाला ठाऊक नाहीं अशी कांहीं तरी युक्ति योजण्यांत आलेली असणें.

**यक्ष्मा** [ सं० यक्ष्म, यक्ष्मन् ) पु० क्षयरोग.

**यज्ञ** [ सं० ] पु० १ होम; अग्नींत आहुति देणें. २ पूजा; धर्मकृत्य. ॐ **यज्ञांग** पु०१ उंबर; खैर. २ यज्ञाचा भाग. **यज्ञोपवीत** न० जानवें. **यज्ञकाल** पु० पौर्णिमा आणि अमावस्या. **यज्ञपुरुष** पु० विष्णु. **यज्ञवराह** पु० विष्णूचा आदिवराह हा अवतार.**यज्ञवल्ली** स्त्री०सोमलता. **यज्ञसूत्र** न० जानवें. **यज्ञसेन** पु० द्रुपद राजा. **यज्ञपशु** पु०यज्ञांत बळी म्हणून मारावयाचा पशु. **यज्ञकुंड** न०यज्ञांत आहुति टाकण्यासाठीं केलेला खळगा.**यज्ञनारायण** पु०अग्निदेवता.**यज्ञमुख** पु० अग्नि. **यज्ञशाला** स्त्री० यज्ञ करावयाची ठरलेली जागा. **यज्ञवृक्ष** पु० समिधा इ० ज्या द्वारें यज्ञो-पयोगी जे पिंपळ, पळस, औदुंबर, रुई,शमी, खैर, आणि आघाडा, ते वृक्ष.

**यज्ञिय** [ सं० ] वि०१ यज्ञासंबंधी. २ यज्ञास योग्य. ३ पवित्र. ४ पूज्य. पु० १ देव. २ द्वापर युग. ३ उंबर. न० यज्ञोपयोगी सामग्री.

**या** [ फा० ] **उभयान्वयी** अ० अथवा; किंवा; किंवा दुसऱ्या पक्षीं. **उद्गारवाचक** अ० हे ! अरे ! उ० या खुदा ( अरे देवा ).

**याकुती** [ हिं० ] स्त्री० भांगेचा रांधा करून एक मादक द्रव्य करतात तें.

**याकूत** [ अ० ] पु०एक तांबड्या रंगाचें रत्न.

**याग** [ सं०] पु० यज्ञ; होम. ॐ **यागी** पु० होम किं० यज्ञ करणारा.

**याचक** [ सं० ] पु० १ भिक्षेकरी; भिकारी. २ नम्रपणानें कांहीं वस्तु मागणारा किं० कांहीं वस्तूबद्दल प्रार्थना करणारा. [ विनाविणें.

**याचणें**[ सं० याच् ]स० क्रि०मागणें;प्रार्थिणें;

**याचन** न०, **याचना** स्त्री० [सं०]१ प्रार्थना; विनंती. २ भीक मागणें.

**यांचा** [ सं० ] स्त्री० १ प्रार्थना; विनंती. २ भीक.

**याचित** [ सं० ] वि० १प्रार्थिलेला ( माणूस, पदार्थ ). २ मागितलेली ( वस्तु ).

**याचिता** [ सं० याचितृ ] पु० १ मागणारा; प्रार्थिणारा. २ भिकारी.

**याजक** [ सं० ] पु० १ धनादिलाभार्थ यज्ञ चालविणारा उपाध्याय. २ ऋत्विज.

**याजन** [ सं० ] न० धनादिलाभांसाठीं दुसऱ्याकरतां यज्ञ चालविणें.

**याजुष** [ सं० ] वि० यजुःशाखी (ब्राह्मण).

**यात, याति** [ सं० जाति ] स्त्री० ब्राह्मण, मराठा, इ० ज्या जाति त्या प्रत्येक. ❀ **याता-याती** स्त्री० जात, गोत, इ० चा विचार.

**यात** [ सं० ] वि० १ गेलेला. २ अतिक्रान्त ( काळ, देश ). ❀ **यातायात** स्त्री० १ येरझारा; हेलपाटे. २ कष्ट; श्रम.

**यातन** [ सं० ] न० १ फेड; प्रतिकार. २ सूड.

**यातना** [ सं० ] स्त्री० १ तीव्र दुःख; असह्य वेदना. २ नरकांत सोसावी लागते ती पीडा.

**यात्रा** [ सं० ] स्त्री० १ प्रवास. २ फिरणें. ३ मोहीम; स्वारी. ४ तीर्थाटन; पुण्यक्षेत्रांस जाणें किं० येथें धर्मविधि ( करणें ). ५ यात्रेकरूंचा समुदाय. ६ नियमित समयीं होणारा उत्सव. ७ जत्रा. ८ एकाद्या पवित्र म्हणून गणलेल्या स्थानाप्रत जाणें, तेथील धार्मिक किं० लौकिक विधि करणें, आणि तेथून परत आपल्या गांवाला येणें, या सर्व गोष्टींचा समुच्चय. **टीप,**– एकाद्या गांवीं प्रसंगविशेषीं किं० वर्षांतील कांहीं विशिष्ट दिवशीं कांहीं विशिष्ट उद्देशानें जो बाजार भरतो त्याला 'जत्रा' म्हणतात. ९ मिरवणूक. १० चारितार्थ; निर्वाह. ११व्यर्थ हेलपटा. १२ग्रामान्तरास जाणें. ❀ **यात्राइब्बी** स्त्री० यात्रेकऱ्यानें दिलेल्या देणग्या ज्यांत घालावयाच्या ती पेटी, पात्र, इ०. **यात्रेकरू, यात्रेकरी** पु० यात्रेसाठीं निघालेला किं० आलेला किं० गेलेला माणूस.

**याथाकाम्य** [ सं० ] न० स्वैर वर्तन.

**याथातथ्य** [ सं० ] न० १ सत्य. २योग्यमार्ग.

**याथात्म्य** [ सं० ] न० तत्त्व; स्वरूप; वस्तु-स्थिति.

**याथार्थ्य** [ सं० ] न० १ सत्य. २ उचितपणा; योग्यपणा; औचित्य. ❀ **याथार्थिक** वि० १ खरा. २ न्यायी; निःपक्षपाती. ३ जुळणारा; संवादी; अनुरूप.

**याद, यादी** [ फा० ] स्त्री० १ स्मरण; आठवण. २स्मरणार्थ केलेलें टिपण. ❀**यादगिरी, यादगारी** स्त्री० १ स्मरण. २स्मरण किं० आठवण करून देणारी वस्तु. **टीप,**–चिठ्ठी, यादी, एकाद्या माणसाची स्वदस्तूरची सही किं० दुसरा कोण-ताही पदार्थ,–जो पाहिला असतां एकाद्या वस्तूची किं० माणसाची आठवण होते त्या पदार्थाला 'यादगिरी' म्हणतात. **यादबूद** स्त्री० स्मरण करून देणारी कांहीं वस्तु, चिठ्ठी, टांचण, टिपण, इ०. **यादवान** न० कोणा माणसाच्या जन्माचा समय, ग्रहांची स्थिति, इ० चें टिपण. **याददास्त, यादवस्त, यादहस्त** स्त्री० सूची; टिपण. **यादबूद** स्त्री० निश्चित यादी; ठराव.

**यादव** [ सं० ] पु० १ यदूचा वंशज. २ कृष्ण.

**यादवी** [ सं० ] स्त्री० १ कुंती. २ सुभद्रा. ३ दुर्गा. ४ ( **मराठींत** ) १ भाऊबंधकीचा तंटा. २ मारामारी.

**यादी** वर ' याद ' पहा.

**यादृच्छिक** [ सं० ] वि० १ स्वेच्छेचें. २ स्वेच्छाचारी. ३ सहजगत्या होणारें किं० झालेलें. ४ केवळ दैवयोगानें घडलेलें.

**यादृश** [ सं० ] वि० जसा; जसला; ज्या प्रकारचा.

**यान** [सं०] न० १ जाणें. २ प्रवास. ३ चाल करून किं० स्वारी करून जाणें; मोहीम; चढा-वाचें धोरण. ४ मिरवणूक. ५गाडी, रथ, पालखी, मेणा, इ० वाहन.

**यापन** [ सं० ] न० १ घालविणें ( काल, समय ). २ हाकलून देणें. ३ रोग बरा करणें. ४ विलंब. ❀ **कालयापन** न० १ वेळ घालविणें. २ उशीर करणें. ३ व्यर्थ काळ दवडणें.

**याबू** [ फा० ] पु० लहान घोड्याची एक जात.

**याम** [ **सं०** ] **पु०** १ दाब; नियंत्रणा; निग्रह. २ प्रहर हा कालावधि. ꙮ **यामघोष पु०** १तास; घड्याळ. २ कोंबडा. **यामद्वय न०** १ दोन प्रहरांचा अवधि. २ सूर्योदयानंतरचा दोन प्रहरांचा अवधि. **यामार्ध न०** एक अशुभ समयविशेष; वारपरत्वें नित्य एक अर्धाप्रहरपर्यंत दुर्मुहूर्त पडत असतो तो.

**यामिका, यामिनी स्त्री०** रात्र. ꙮ **यामिनीपति पु०** चंद्र. **यामिनीचर पु०** १ घुबड. २ राक्षस.

**याम्य** [ **सं०** ] **वि०** १ यमाचें. २ दक्षिणदिशेकडचें. ꙮ **याम्या स्त्री०** दक्षिण दिशा. **याम्योत्तरवृत्त न०** विषुवाच्या लंबवृत्तांना 'याम्योत्तरवृत्त' म्हणतात, आणि क्रांतिवृत्ताच्या लंबवृत्तांना 'शरवृत्तें' म्हणतात. हें कोणतेंही वृत्त ज्या खस्थ पदार्थांतून जातें त्याला त्या खस्थाचें 'याम्योत्तरवृत्त' किं० 'शरवृत्त' म्हणतात. याम्योत्तराचा जो विषुवाशीं पात होतो त्याला 'याम्योत्तरवृत्तपात' म्हणतात आणि शरवृत्ताचा जो क्रांतिवृत्ताशीं पात होतो त्याला 'शरपात' म्हणतात. ज्या गमनमार्गांतून वार्षिक गतीनें भूगोल सूर्याभोंवती फिरतो किं० सूर्य भूगोलाभोंवतीं समोरच्या राशींतून फिरतो असें दिसतें, त्या गमनमार्गाला 'क्रांतिवृत्त' म्हणतात. क्रांतिवृत्ताच्या पातळीला विषुवाची पातळी ज्या रेषेंत छेदिते ती 'संपातरेषा' होय. संपातरेषेच्या दोन टोकांना 'संपात' किं० 'संपातबिंदु' म्हणतात. क्रांतिवृत्तांतून फिरणारा सूर्य ज्या संपातांतून विषुवाच्या उत्तरेस जातो तो 'उत्तरायणपात' किं० 'वसंतारंभपात' होय. आणि ज्या संपातांतून विषुवाच्या दक्षिणेस जातो तो 'दक्षिणायनपात' किं० 'शरदारंभपात' होय. गोलाच्या अक्षाशीं काटकोन करणारें जें वृत्त तें 'लंबवृत्त.' ज्या महावृत्ताची पातळी भूगोलाच्या अक्षाशीं लंबरूप असते त्याला 'विषुव' किं० 'नाडी वृत्त' म्हणतात. गोलाला मध्यांतून जाणाऱ्या सरळ पातळीनें कापिलें तर तेथें गोलाच्या एवढ्याच त्रिज्येचें वर्तुळ होतें. ह्या वर्तुळाला गोलाचें 'महावृत्त' म्हणतात. गोलाला मध्याखेरीज इतर ठिकाणीं सरळ पातळीनें कापिलें तर तेथें गोलाच्या पेक्षा लहान त्रिज्येचें वर्तुळ होतें, ह्या वर्तुळाला गोलाचें 'लघुवृत्त' म्हणतात.

**यायी** [ **सं०** यायिन् ] **वि०** १ जाणारा (**समासान्तीं**); उ० ग्रामयायी म्ह० गांवास जाणारा; गांवाला जावयास निघालेला. २ (**मराठींत**) प्रवासी वाटसरू. ३ (**मराठींत**) जो एकाद्या गांवीं कारणपरत्वें आला आहे आणि जो तेथें कायमचा राहाणारा नव्हे तो. ४(**मराठींत**) प्रसंगानें घडलेली कांहीं गोष्ट; मध्येंच उपस्थित झालेली कांहीं गोष्ट.

**यार** [ **फा०** ] **पु०** १ दोस्त; स्नेही. २ जार. ३ हत्तीबरोबर चालणारा भालाईत. ꙮ **यारी स्त्री०** १ दोस्ती. २ मदत ( देणें ). ३ गलबतावरील अवजारें चढविण्याच्या दोऱ्या समुच्चयानें. ४ ओझें उचलण्याचें यंत्रविशेष.

**यारदा, यारदी वि०** १ लहान आकाराचा (घोडा); तट्टू. २ निरुपयोगी किं० कुचकामाचा ( माणूस, जनावर ). ३ ठेंगणा असून बळकट ( घोडा ); बट.

**यारदी पु०** १देशपांड्याचा गुमास्ता. २देशपांड्याचा मदतनीस. ३ वतनांची देखरेख करणारा. ꙮ **यारदी स्त्री०** देशपांड्याच्या गुमास्त्याचा अधिकार, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र.

**यारी** वर 'यार' मध्यें पहा.

**यावत्** [ **सं०** ] **वि०** १ जितकें, जेवढें; उ० तुम्ही पुण्यास गेलां तर यावत् अपेक्षित तावत् द्रव्य तुम्हाला श्रीमंत देतील. २ सर्व; उ० आज ह्या गांवांतील यावत् माणसें पाटलाच्या घरीं जेवावयास आलीं होतीं; उ० यावज्जन्म किं० यावज्जीव म्ह० जन्मभर किं० सर्वजन्म. **अ०** मध्यंतरीं; पर्यंत; जों पावेतों; उ० अद्ययावत् (आजपर्यंत ); उ० त्याची माझी यावत् मैत्री आहे तावत् माझें काम करून घेतलें पाहिजे; उ० यावत् नदी लागे तावत् मी तुम्हास पोंचवावयास येईन. **टीप,**— 'यावत्' चा जबाबदार सर्व अर्थीं 'तावद्' हा आहे. ꙮ**यावदर्थ वि०** जरूर तितकेंच द्रव्य घेणारा किं० मागणारा. **यावत्तावत् वि०** जितकें पाहिजे तितकेंच; कमी नाहीं आणि अधिक नाहीं इतकें.

क्रि० वि० १ बेताबातानें; काटकसरीनें.२ चिक्कूपणानें.

**यावनाल**[सं०]पु०जोंधळा,—ज्याच्या भाकरी करतात. ॐ **यावनालकण** देखील क्रि० वि० अत्यल्प परिमाण मुद्धां; उ० मजपासून तुला यावनालकण देखील मदत होणार नाहीं. टीप,—नेहमीं अकरणरूपी प्रयोग.

**यावनी** [ सं० ] वि०यवनासंबंधी;यवनांचा; उ० न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि. मागें ' यवन ' पहा.

**याज्ञिक** [ सं० ] वि० यज्ञासंबंधाचा. पु० १ यज्ञ करणारा. २ याजक. ३ अग्निहोत्री. ४ लांब पात्याचा दर्भ. ४ पिंपळ,पलाश,खैर. ॐ**याज्ञिकी** स्त्री० १ याज्ञिकांचें कर्तव्य. २ लग्न, मुंज, इ० धर्मविधींचा संकल्प सांगण्याचें कर्म किं० धंदा. या अर्थी ' याज्ञिक्य ' न० सुद्धां.

**यिव** स्त्री० मारलेल्या बोकड इ० जनावराचा मानेकडचा भाग.कुकडी हा जनावराच्या ढुंगणाकडचा भाग. ॐ **यिवकुकडी** स्त्री० ए० व० मारलेल्या बोकडाचा मानेकडचा भाग आणि ढुंगणाकडचा भाग,—जो पूर्वीच्या काळीं महाराच्या मेहतरास हक्क म्हणून द्यावा लागत असे.

**युक्त** [ सं० ] वि० १ जोडलेलें; सांधलेलें; सहित. २ सज्ज, सिद्ध ( धनुष्य इ० ).३ योग्य; बाजवी; न्याय्य; उचित. ४ व्रतस्थ; कांहीं नियम पाळणारा. ५ योगाभ्यासी. पु० योगी. ॐ **युक्तमना** [ सं०युक्तमनस् ] वि० एकाग्र आहे चित्त ज्याचें असा. **युक्तरूप** वि० १ फार योग्य. २ अनुरूप. ३ लायक. **युक्ताहारविहार** वि०,खाणें, पिणें, करमणूक, इ० बाबतींत योग्य मर्यादा पाळणारा.

**युक्ति** [ सं० ] स्त्री० १ एकीकरण; बेरीज.२ उचितपणा; योग्यपणा. ३ योजना;उपाय;इलाज. ४ खुबी; हिकमत. ॐ **युक्तिप्रयुक्ति** स्त्री०ए०व० नाना प्रकारच्या युक्त्या समुच्चयानें; कोणची नाहीं कोणची तरी युक्ति; हरप्रयत्न. **युक्तिवान्, युक्तिबाज** वि० युक्त्या योजण्यांत किं० लढविण्यांत पटाईत. **युक्त्या** वि० लबाड; लुच्चा.

**युग** [ सं० ] पु०, न० जूं; जोकड न० १ जोडी. २ कृत, त्रेता, द्वापर, आणि कलि, हे चार कालावधि प्रत्येक. ॐ **युगधर्म** पु०,**युगमाहात्म्य** न०त्या त्या काळाचा प्रभाव.**युगान्त,युगावधि** पु०जगाचा अंतः;प्रलय. **युगबाहु** वि० लांब लांब आहेत बाहु ज्याचे असा ( माणूस ). **युगपत्** क्रि०वि० एकदम; एके काळीं. **युगानुयुग** क्रि० वि० अनेक युगांमागून अनेक युगांच्या अवधींत.

**युगत, युगूत, जुगत** [ सं० युक्ति ] स्त्री० युक्ति. वर ' युक्ति ' पहा. ह्या शब्दांचा उपयोग विनोदांत केला जातो.

**युगल, युगलक** [ सं० ] न० जोडी ( दोन पदार्थांची ). ' युगुल, ' ' युगूळ ' हीं मराठींतील अपभ्रष्ट रूपें.

**युग्म** [ सं० ] न० १ जोडी; दोन. २ संयोग. ३ नद्यांचा संगम. ४ जोडणें; पतिपत्नींची जोडी. ५ ( ज्योतिष ) मिथुन रास.

**युत** [ सं० ] वि० १ जोडलेलें. २ युक्त; सहित. ३ चार हात ही लांबी.

**युति** [ सं० ] स्त्री० १ एकी. २ जोडण्याची क्रिया.३(ज्योतिष )ग्रहांचें एका दक्षिणोत्तर रेषेंत येणें. ४ ( गणित ) बेरीज.

**युद्ध** [ सं० ] न० शत्रूशीं किं० प्रतिपक्ष्याशीं झगडा,—ज्याच्या पोटांत अनेक लढाया, वेढे, खंड, तहाचीं बोलणीं, इ० असतात. लढाई ही एकाच प्रसंगाची झटापट. संस्कृत शब्दांत ' युद्ध ' चा अर्थ लढाई किं० झटापट असा असतो; उ० मल्लयुद्ध, कुकुटयुद्ध, मेषयुद्ध, गदायुद्ध, मन्मथयुद्ध ,इ०. [ धर्म.

**युधिष्ठिर** [ सं० ] पु०पांच पांडवांतील ज्येष्ठ;

**युयु** उद्गारवाचक अ० कुत्र्याला जवळ बोलावण्याचा शब्द.

**युवति, युवती** [ सं० ] स्त्री० १ तरुण स्त्री. २ मादी. ३ ( ज्योतिष ) कन्यारास.

**युवराज** खालीं ' युवा ' मध्यें पहा.

**युवा** [ सं० युवन् ] पु० तरुण मनुष्य. ॐ **युवराज** पु० राजाचा ज्येष्ठ पुत्र,—जो पुढें राज्याचा अधिकारी व्हावयाचा असतो.

**युष्मद्** [ सं० ] **सर्वनाम** द्वितीय म्हणजे मध्यम पुरुषाच्या सर्वनामाचें हें मूळ रूप. ॐ

**युष्मदीय** वि० तुमचें. **युष्मादृश** वि० तुमच्या-सारखें. **युष्मादिक** [ सं० युष्मदादिक ] तुम्ही (उपहासांत).

**यू** वर ' युयु ' पहा.

**यूथ** [ सं० ] पु० सजातीय प्राण्यांचा समुदाय किं० कळप. ☸ **यूथनाथ, यूथप** पु० १ म्होरक्या; अग्रणी. २ हत्तींच्या कळपाचा पुढारी.

**यूथिका** [ सं० ] स्त्री० जुई. ह्या अर्थी ' यूथी ' सुद्धां. २ एक समवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत र, न, भ, र, हे गण येतात.

**यूप** [ सं० ] पु० १ यज्ञाचा पशु बांधण्याचा खांब. २ जयस्तंभ.

**येऊन जाऊन** [ म० येणें + जाणें ] क्रि० वि० १ राहातां राहातां; सरते शेवटीं; अखेरीस; फक्त; उ० सारा जंगम माल गेला आतां येऊन जाऊन घर राहिलें आहे; तें गेलें म्हणजे तो तुकोबा पुरता कंगाल होईल. २ मधून मधून येत; उ० मी येथें नेहेमीं राहात नाहीं, येऊन जाऊन असतों.

**येक** [ सं० एक ] वि० एक ( अशिक्षितांत प्रयोग ). मागें ' एक ' पहा.

**येकजहती** स्त्री० स्नेह; मैत्री.

**येखलास, येखलासनामा, येखलासी** मागें ' इखलास, ' ' इखलासनामा, ' ' इखलासी ' पहा.

**येजा** [ म० येणें+जाणें ] स्त्री० १ येण्या-जाण्याची क्रिया; वेरझारा. २ रिकामे हेलपाटे. ' जाये ' ह्याच अर्थी. मागें ' जाये ' पहा.

**येडें** न० लिंगाईत लोक जंगम गुरूला देतात तो खाद्यांचा नजराणा.

**येणी** [ म० येणें ] स्त्री० १ गंजिफांच्या खेळांत राजाचें पान ज्याच्या जवळ असतें त्याचा हक्क. २ दुसऱ्याकडून यावयाची जी तलफ ती.

**येणें** अ० क्रि० १ दूरच्या काळापासून किं० स्थळापासून जवळच्या काळीं किं० स्थळीं प्राप्त होणें; ठेपणें. २ दृग्गोचर होणें; दृश्य होणें; दिसूं लागणें. ३ उपस्थित किं० विद्यमान होणें. ४ कांहीं क्रिया कोणेकाला करणें शक्य असणें किं० करणें भाग पडणें. ५ कांहीं प्रसंग किं० स्थिति कोणेकावर पडणें किं० गुदरणें. ६ उद्भूत होणें; उगवणें; उत्पन्न होणें. ७ एकादी वस्तु वजनांत, मापांत, किं० किमतींत भरणें किं० ठरणें; उ० हा तांब्या शेरभर येईल; उ० तो गांव येथून तीन कोश येईल. ८ सिद्ध होणें; परिणत होणें; केलें जाणें; उ० आजची वेणी चांगली आली नाहीं. ९ अवगत किं० ज्ञात किं० परिचित असणें; उ० मला तामिल भाषा येत नाहीं. **टीप,–**' येणें ' ह्या क्रियापदाचे अर्थ ' तां, ' ' ईत, ' ' आवयास ' ह्या प्रत्ययान्त धातूंपुढें कसे होतात तें पुढील वाक्प्रचारांवरून कळून येईल. वडील सावकारी करीत आले तशीच आम्ही करीत आहों म्ह० वडिलांचा सावकारी करण्याचा जो क्रम किं० परिपाठ होता त्याप्रमाणें आम्ही सावकारी करीत आहों. हें काम मला करतां येईल म्ह० तें माझ्या आटोक्यांतलें आहे; तें मला शक्य आहे; तें मी करूं शकेन. तें पत्र मागाहून लिहितां येईल म्ह० तें मागाहून लिहिलें तरी चालेल; तें मागाहून लिहूं. ☸ **वळणास येणें** एकाद्याच्या कबज्यांत जाऊन त्याची आज्ञा पाळावयास सिद्ध किं० तत्पर असणें किं० होणें. **ताळ्यावर येणें** चुकीचा मार्ग सोडून पुन्हा योग्य मार्ग धरणें. **वठणीस येणें** १ पुन्हा आज्ञाधारक होणें. २ पुन्हा योग्य मार्गानें चालूं लागणें. **गुणास येणें** फलद्रूप होणें. **डोळ्याला पाणी येणें** अश्रूंनीं डोळे भरणें; रडें येणें. **हुकी येणें** अनावर इच्छा उत्पन्न होणें. **पणांत येणें** वयांत येणें; प्रौढ दशेला येऊन पोचणें. **संपुष्टांत येणें** संक्षिप्त होणें; अल्पतर होणें; संपत येणें; संपण्याच्या पंथास लागलेलें असणें. **कोणेकाला कोणेकाची सर येणें** त्याला त्याची योग्यता प्राप्त होणें; तो त्याच्या बरोबरीचा होणें; त्याला त्याचें महत्त्व किं० योग्यता प्राप्त होणें. **मी येतों** मी तुमचा निरोप घेतों; मला जावयाला परवानगी द्या.

**येणें जाणें** न० ए० व० १ जाण्यायेण्याचा परिपाठ; घरोबा. २ पैशाचे व्यवहार,–पैसे देणें, पैसे घेणें, इ० रूप व्यवहार. **येतां जातां** क्रि० वि० १ मधून मधून. २ सर्व काळ. ३ वारंवार येत आणि जात असल्यानें; वारंवार गांठी भेटी घडल्यानें **येताजाता** पु० ए० व० जो कोणी या

रस्त्यानें येईल किं० जाईल तो,-वाटसरू इ०. **येतापाया पु०** वैभवाचा काळ,-ज्यांत आपल्याला पैसे, नफा, इ० विपुल प्रमाणांत मिळत असतात. **येतेकरी पु०** १ कोणहि येणारा माणूस. २ ज्याला कोणतीही विद्या, कला, इ० लवकर येते म्ह० साध्य होते असा मनुष्य.

**येथें,येथचा,येथला,येथपर्यंत,येथवर,येथपावेतों**,इ० मागें ' एथें, ' एथचा, ' इ० पहा.

**येणें** [ म० येणें ] **न०** लोकांकडून आपणास यावयाची रक्कम किं० पैसा किं० कांहीं पदार्थ.

**येर, येरू सर्वनाम** दुसरा; तो. **येरी स्त्री०. येरें न०.** ꣸ **येरयेर वि०** परस्पर; एकमेक. **येरयेरां क्रि० वि०** एकमेकांत;एकमेकांशीं;आपसांत.

**येरजार, येरझार,येरधार,वेरझार**[म०येरे+जारे] **स्त्री०** १ जाण्यायेण्याची खेप. २ रिकामा हेलपाटा. ३ वारंवार जाणें आणि येणें. **येरजांवई पु०**जांवयाचा भाऊ (थट्टेंत). मागें ' पाणी ' मध्यें ' पाणजांवई ' पहा.

**येरंड, येलदोडा** इ० मागें ' ए ' अक्षरांत ' एरंड, " एलदोडा, ' इ० पहा.

**येरवाळीं** [ म० वेळेवारीं ] **क्रि० वि०**योग्य वेळीं; लवकरच; फार उशीर न होतां किं० न करतां ( अक्षितांत रूढ ).

**येवतणें स० क्रि०** छळणें; सतावणें; गांजणें.

**येवा** [ म० येणें ] **पु०** १ येणें. २ आपणाकडे यावयाची म्ह० आपणास मिळावयाची रकम किं० रकमा समुच्चयानें. ३ नफा; मिळकत; प्राप्ति. ४ बरोबरी; सर; उ० उदंड खाल्ला मेवा तरी येईना अर्ध भाकरीचा येवा. ५ शरीराचा बांधेसूददणा;चेहेऱ्याचा उठावदारपणा; गोडस आकृति. ६ अनुरूपता; उ० काळ्या माणसाला मोत्याच्या दागिन्यांचा येवा असतो. ꣸ **येवाजावा** [ म० येणें+जाणें ] **पु०** कोणेकाच्या घरी वारंवार जाणेंयेणें किं० जाण्यायेण्याचा परिपाठ; घरोबा. **येवादेवा** [ म० येणें+देणें] **स्त्री०** देण्याघेण्याचा व्यवहार.

**येसान, येहसान** [ अ० इहसान् ] **न०**कृपा; उपकार; मेहेरबानीची कांहीं गोष्ट किं० कृति.

**योग** [ सं० ] **पु०** १ जुळणी; जोडणें; मिलाफ. २ संयोग; संबंध; सांनिध्य. ३ स्पर्श. ४ कांहीं पदार्थ कांहीं कामीं लावणें किं० वापरणें किं० योजणें. ५ कांहीं कामाची रीति, पद्धति, किं० सरणी; क्रम. ६ उपाय, साधन; युक्ति. ७ जारणमारण; जादूटोणा. ८ व्यासंग. ९ सज्ज होणें किं० सज्ज करणें. १० घोडा, बैल, इ० गाडी इ०स जोडणें किं० जुंपणें. ११ अभ्यास; ध्यान; ध्यानाभ्यास. १२ समाधि; चित्तवृत्तीचा निरोध. १३ ईश्वरप्राप्तीचा उपाय; उ० कर्मयोग, ज्ञानयोग भक्तियोग. १४ निष्ठा; एकाग्रता; उपासना. १५ ईश्वरी सामर्थ्य. १६ ईश्वरी संकल्प. १७ दैवाची योजना; उ० तिला ऋतु प्राप्त व्हावा आणि तिचा पति मरावा हा मोठा दुःसह योग होय. १८ समाधिशास्त्र. १९ जीवात्मा आणि परमात्मा ह्यांचें ऐक्य. २० कार्यकुशलता. २१ तत्त्वज्ञान. २२ व्युत्पत्ति; व्युत्पत्तिमूलक अर्थ. २३ सूत्र; नियम; कायदा. २४ ( **गणित** ) बेरीज. २५ ( **ज्योतिष**) विशिष्ट ग्रह, तिथि, वार, इ० एकत्र येणें. २६ ग्रहांचें एका दाक्षिणोत्तर रेषेंत येणें; युति. २७ नक्षत्रांतील मुख्य तारा. २८ संधी; प्रसंग. २९ अनुष्ठान; आचरणें. ३० परस्परावलंबित्व. ३१ नवीन द्रव्यादि मिळविणें. मिळविलेल्याचें रक्षण करणें ह्याला ' क्षेम ' म्हणतात. ३२ अनुरूपता. ꣸ **योगेश्वर पु०** १ श्रेष्ठ योगी. २ जादूगार. ३ वेताळ. ४ शंकर. **योगक्षेम पु० ए० व०, न० ए० व०** १ योग किं० म्ह० इष्ट वस्तु मिळविणें. क्षेम म्ह० मिळविलेल्या वस्तूचें रक्षण करणें. कोणेकाचें योगक्षेम चालविणें म्ह० त्याला पाहिजे असेल तें त्याला मिळवून देणें आणि नंतर त्याच्या रक्षणाची काळजी वाहाणें; त्याच्या संबंधाची सर्व प्रकारची जबाबदारी आपल्याकडे घेणें. **क्रि०** वाहाणें, पाहाणें, चालविणें, इ०. २ चरितार्थ. **योगचक्षु** [ सं० योगचक्षुस् ] **पु०** ब्राह्मण. **योगतारा पु०, स्त्री०** नक्षत्रांतील मुख्य तारा. **योगनिद्रा स्त्री०** १ अर्धवट निद्रा आणि अर्धवट जागृति अशी स्थिति. २ युगाच्या अंतीं विष्णूची झोंप. **योगनिद्रा, योगमाया स्त्री०** ईश्वराची मायाशक्ति. **योगरूढ वि०** व्युत्पत्तीनें आणि रूढीनें जो अर्थाचा वाचक असा( शब्द );उ० पंकज म्ह०(चिखलांत जन्मलेलें) कमल. **योगबल न०** १ अलौकिक शक्ति. २ जादूची शक्ति. **योगराज पु०** १ योगांत निष्णात

मनुष्य. २ एक औषधी कृति. **योगवासिष्ठ न०** योगाच्या ध्यानानें मोक्ष मिळविण्याच्या साधनांचा विचार ज्यांत केला आहे असा एक ग्रंथ. **योगसमाधि पु०** ध्यानांत आत्म्याचा लय. **योगसार पु०** सर्व रोगांवर लागू पडणारें औषध. **योगसूत्र न०** पतंजलीचीं योगसाधनासंबंधाचीं सूत्रें प्रत्येक. **योगसेवा स्त्री०** ध्यानस्थ बसणें. **योगायोग पु०** १ दैवगति; अनपेक्षित अशी घडलेली कांहीं गोष्ट. २ अनुकूल काळ आणि प्रतिकूल काळ. **योगिनी स्त्री०** १ जोगिण. २ डाकीण. **योगी पु०** योगसाधन करणारा. २ प्राणनिरोधादिकांच्या द्वारानें ज्याला योग साध्य झाला असा.

**योग्य** [ सं० ] वि० १ उचित; साजेसें. २ पात्र; समर्थ; लायक. ३ उपयुक्त. ꙮ **योग्यता स्त्री०** १ अनुरूपता. २ दर्जा; मोठेपणा. ३ लायकी. ४ हुशारी.

**योजक** [ सं० ] वि० १ जोडणारा. २ उपयोग करणारा. ३ व्यवस्था करणारा.

**योजणूक** [ म० योजणें ] स्त्री० योजणें; योजण्याची क्रिया; योजना. पुढें ' योजना ' पहा.

**योजणें** [ सं० युज् ] स० क्रि० १ ( कोणेकाला ) कोणेक कामी नेमणें किं० स्थापिणें. २ कांहीं कामीं उपयोगांत आणणें. ३ ( घोडा, बैल, इ० ) गाडी, नांगर, इ०ना जुंपणें. ४ (कांहीं पदार्थ) कोणेक पदार्थाशीं कांहीं कामासांठीं जोडणें किं० संबद्ध करणें. ५ ठरावणें; निश्चित करणें. ६ ( युक्ति, इलाज ) शोधून काढून कांहीं कार्यार्थ लावणें.

**योजन** [ सं० ] न० १ जोडणें. २ कामास लावणें. ३ उपयोगांत आणणें. ४ अर्थ लावणें. ह्या चारी अर्थीं ' योजना ' सुद्धां. ५ चार कोश हें अंतर.

**योजना** [ सं० ] स्त्री० १ वर ' योजन ' चे पहिले चार अर्थ पहा. २ युक्ति; हिकमत. ३ मांडणी.

**योजित** [ सं० ] वि० १ योजलेला; ठरविलेला; उपयोगांत आणलेला. २ मनानें ठरविलेला. ३ जोडलेला.

**योज्य** [ सं० ] वि० १ योजण्यास योग्य. २ जींत कांहीं रक्कम मिळवावयाची अशी (संख्या).

**योद्धा** [ सं० योद्धृ ] पु० लढाई करणारा; वीर.

**योनि** [ सं० ] स्त्री० १ स्त्रियांचें जननेन्द्रिय. २ उत्पत्तिस्थान. ३ कारण; आदिकारण. ४ प्राण्याची जात किं० प्राण्याचा वर्ग; उ० मनुष्ययोनि, व्याघ्रयोनि, इ०. ꙮ **योनिसंकर पु०** व्यभिचारानें जातींत होते ती भेसळ. **योनिसंबंध पु०** विवाहद्वारा दोन माणसें किं० कुटुंबें यांचा परस्परसंबंध. ह्या अर्थीं ' यौनसंबंध ' सुद्धां. **योनिचतुष्टय न०** जरायुज, अंडज, स्वेदज, आणि उद्भिज्ज, असे जे उत्पत्तिस्थानावरून प्राणी आणि वृक्ष ह्या पदार्थांचे चार वर्ग ते.


**योषा** [ सं० ] स्त्री० १ तरुण स्त्री. २ स्त्री.

**यौगपद्य** [ सं० ] वि० एकाच समयीं असणें किं० होणें किं० घडणें; समकालीनता.

**यौगिक** [ सं० ] वि० १ उपयुक्त. २ योग्य. ३ नेहेमांचें. ४ ( व्याकरण ) व्युत्पत्तीवरून निघणारा किं० ठरलेला ( अर्थ ). ५ योगासंबंधाचें.

**यौवन** [ सं० ] न० तारुण्य; ऐन उमेदीचें वय. ꙮ **यौवनकंटक पु०** मुरमाची पुळी.

**यौवराज्य** [ सं० ] न० युवराजाची पदवी किं० कारभार. मागें ' युवराज ' पहा.



# र

**र** मराठी व्यंजनमालेतील सत्तावीसावें व्यंजन.

**र** [ म० ' रडणें ' चें पाहिलें अक्षर ] **स्त्री०** रडणें; रोदन. ॐ**र करणें** रडणें. **रचा पाढा गाणें, रचें गाणें करणें, रचें गाणें लावणें,** इ० रडणें.

**रंक** [ सं० ] **वि०** १ कंजूष. २ मतिमंद. ३ मूर्ख. **पु०** १ भणंग; भिकारी; क्षुद्र. २समाजांतील अगदीं हलक्या दर्जाचा माणूस. [ तेंत).

**रकटा पु०** चिंधी. **रकटें न०** वस्त्र ( तुच्छ-

**रकत, रगत, रघत** पुढें ' रक्त ' पहा.

**रकबा** [ अ० रक्बह् ] **पु०** गांवाखालची जमीन; गांवकीचा प्रदेश किं० टापू.

**रकम, रक्कम** [ अ० रक्म् ] **स्त्री०** १ कांहीं कार्याकडे नियोजित जें द्रव्याचें परिमाण तें. २ हिशेबाची एक बाब किं० एक कलम. ३ कांहीं कामाकडे योजावयाचें कोणत्याही पदार्थाचे परिमाण. ४ लेख; पत्रिका. ॐ **रकमेस येणें** १ कोणी मनुष्य सुरळीतपणें किं० व्यवस्थित रीतीनें वागूं लागणें किं० व्यवहार करूं लागणें. २ पूर्वींची उच्छृंखल वृत्ति सोडून चांगल्या प्रकारें (मनुष्य, पशु ) वागूं लागणें. ३आटोक्यांत किं० नियंत्रणेंत येणें; व्यवस्थित होणें; नियमबद्ध होणें; मार्गास लागणें; सुरळीतपणें चालूं लागणें. **रकमेस आणणें** व्यवस्थित, सुरळीत, किं० नियमबद्ध करणें. **रकमबंद, रकमवार वि०** कलमवार. **रकमाला पु०** तपशिलवार यादी किं० मोजदाद. **रकमी वि०** निश्चित; ठराविक (जमीनीचा सारा इ० ).

**रकाना** [ फा० रकानाह् ] **पु०** लिहावयाच्या कागदाचे लिहिण्याच्या सोयीसाठीं पाडलेले उभे विभाग प्रत्येक; पुस्तक, वर्तमानपत्र, इ० च्या पानाचे उभे विभाग प्रत्येक. ॐ **रकान्यास येणें** कागदावर नमूद करण्याच्या लायकीचा किं० महत्त्वाचा होणें किं० असणें. **रकान्यास आणणें** महत्त्वास, योग्यतेस, किं० रंगारूपास आणणें.

**रकार** [ म० ' रडणें ' चें पाहिलें अक्षर ] **पु०** १ रडणें; रडगाणें; पिरपीर. २ कांहीं कार्याचा नाश; कामाची नासाडी किं० बिघाड (करणें, होणें).

**रक्त** [ सं० ] **वि०** १ रंगविलेलें. २ तांबडा. ३ आसक्त; प्रेमबद्ध. **न०** प्राण्याच्या अंगांतील तांबडें पाणी; रुधिर. ॐ**रक्त पाडणें** मंत्रादि योगानें कोणेकाच्या अंगांतून रक्त वहावयास लावणें. **अंगाला रक्त लावून घायाळांत शिरणें** लढाईत शौर्याचीं कृत्यें न करतां मागें राहणें आणि आपण पराक्रमाचीं कृत्यें केलीं आणि आपणास जखमा झाल्या हें दाखविण्यासाठीं अंगाला रक्त फासणें; कुचराईनें काम करून झटून काम केल्याची बढाई मारणें. **रक्ताचें पाणी करणें** कांहीं कामीं पराकाष्ठेचे कष्ट सोसणें. **रक्तओढ स्त्री०** रक्तमिश्रित मल ( गुदावाटें पडलेला ). **रक्तकंठ पु०** कोकिळ पक्षी. **रक्तचंचु स्त्री०** साळुंकी. **रक्तचंदन न०** ज्याचें लाकूड तांबडें असतें असा वृक्षविषेश. **रक्तप्रमेह पु०** शिश्नद्वारा रक्त पडणें हा रोग. **रक्तपात पु०** मारामारींत एकमेकांना जखमा करून रक्त वाहाविणें किं० वाहविलेलें रक्त. **रक्तपीति, रक्तपिति स्त्री०** एक कुष्टरोगविशेष. **रक्तपित्त न०** नाक, तोंड, गुद, इ० द्वारा रक्त पडून ज्वर इ० येणें हा रोग. **रक्तबीज पु०** ढेकूण. **रक्तबंबाळ, रक्तबोंबाळ वि०** १ रक्तानें माखलेला किं० लडबडलेला. २ ज्यांतून रक्त वाहात आहे असा. **रक्तवान् पु०** १ शाई करून विकणारा. २ मोठ्या कुटुंबात पत्रावळी करून जेवणारांसाठीं मांडणारा. **रक्तस्राव पु०** १रक्त वाहणें. २वाहलेलें रक्त. **रक्तांबर वि०** १भगवीं वस्त्रें नेसलेला (यति). २रक्तानें भरलेला किं० माखलेला. **रक्तांबील (–ळ), रक्तमोंबळा, रक्तबोंबाळ, रक्तबंबाळ वि०** रक्तानें माखलेला किं० लडबडलेला.

**रक्तावणें, रक्ताळणें** [म० रक्त ] **अ० क्रि०** १ ( जखम, गळूं, पोत, इ० तून ) रक्त वाहात असणें किं० वाहूं लागणें. २ रक्तानें माखलेला असणें ( कपडा, अंग, इ० ). [ तांबडा रंग.

**रक्तिमा** [ सं० रक्तिमन् ] **पु०** तांबूसपणा;

**रखडणें अ० क्रि०** १(कांहीं कार्य) सुरळीतपणें न चालतां त्यांत मधून मधून विघ्नें येत राहाणें. २( कोणी मनुष्य ) कांहीं ध्येय गांठूं पहात असतां मधून मधून त्याला विघ्नें येऊन तो कुंठित होणें. ३ ( कोणी मनुष्य ) प्रगति न होतां एके ठिकाणीं आडकून राहाणें. ४ कष्टांत दिवस

काढणें. ५ खितपत पडणें. ६ रेंगाळत राहाणें.

**रखमंडळ** [ म० राख+सं०मंडल ] न० जेथें राख पसरलेली आहे अशी जागा; राखेचें थारळें.

**रखरख** स्त्री० १ विस्तव, सूर्य, दिवा, इ० ची आंच. २ भूक, तहान, इ० ची वेदना, किं० इ०नीं लागलेला शोष.

**रखरखणें** अ०क्रि०१(प्राण्यानें)तान्हेलें होणें.२ ( ऊन्ह, आग्रे ) तीव्र ताप देणारें होणें किं०असणें.

**रखरखाट** [ म० रखरख ] पु० परमावधीस पोंचलेली रखरख. वर ' रखरख ' पहा.

**रखरखीत** वि० १ अति तीव्र (ऊन्ह, विस्तव, तिखट खाद्य किं० पेय ). २ शुष्क ( जमीन ). ३ ३ वाळलेलें ( झाड, जंगल). [करी.

**रखवालदार** [ सं० रक्षग;हिं० ]पु० पहारे-

**रखवाली** [ सं० रक्षण; हिं० ] स्त्री० रक्षण करणें; निगा राखणें; राखण; पाहारा.

**रखा, रख्खा** [ सं० रक्षा ] स्त्री० राख ( विस्तवाची ).

**रखाकणें** अ० क्रि० वर ' रखरखणें ' पहा.

**रखेली** [ म० राखणें ] स्त्री० विषयवासनेच्या शमनासाठीं पगार देऊन किं० फुकट ठेवलेली स्त्री; राख.

**रग** [ फा० रग्=धमनी ] स्त्री० १ धमनी; स्नायु. २ अंगचें खरें किं० कल्पित शारीरिक किं० बौद्धिक जें सामर्थ्य त्याच्या योगानें उत्पन्न होतो तो गर्व, ताठा, उन्माद, किं० मस्ती ( येणें, बाळगणें ). ३ शारीरिक किं० मानसिक कष्ट सहन करण्याची कोणेकाची ताकद. ४ गळूं, फोड, इ० चा ठणका( शमणें,लागणें ). ५एकाच संस्थानांत गात्र किं० शरीर फार वेळ असल्यानें स्नायूंना बसतो तो ताण किं० लागतो तो ठणका ( लागणें ). ६ सावकार, सरकार,इ० नीं केलेला तगादा. ७ ( कामाची ) घाई, नेट. ८ ( पाऊस, वावटळ, ऊन्ह, इ० चा ) जोर. ※ **कोणेकाची रग जिरविणें** त्याची खोडकी मोडणें; त्याच्या उद्दामपणाला प्रतिबंध करणें; त्याला शासन करून त्याचा ताठा नाहींसा करणें; त्याचा नक्षा उतरणें.

**रंग** [ सं० रंग; हिं० रंग्; फा० रंग् ] पु०१ केवळ चक्षुरिन्द्रियानें जाणतां येतो असा पदार्थाच्या ठायीं असतो जो पांढरेपणा,तांबडेपणा,इ० धर्म तो; वर्ण ( तांबडा, पिवळा, हिरवा, इ० ). २ पदार्थाला तांबडा, काळा, इ० वर्ण देण्याचें कोणतेंही द्रव्य. ३ विवाह, शिमगा, इ० प्रसंगीं एकमेकांच्या अंगावर केशर इ० चें रंगित पाणी टाकतात तें किं० तें टाकण्याचा समारंभ.३सभागृह; सभामंडप. ४ नृत्यस्थान. ५ नाटकगृह. ६ तालीमबाजांचा आखाडा. ७ प्रेक्षकांचा किं० श्रोत्यांचा समुदाय. ८रणभूमि.९खेळ; क्रीडा;नृत्य. १० गाणें, बजावणें,नृत्य,कसरत, कुस्ती, कथा,इ० मध्यें असलेला चित्त एकाग्र किं० तल्लीन करणारा गुण किं० त्या गुणामुळें उत्पन्न होणारा आनंद, मजा, गंमत, किं० शोभा ( येणें, भरणें, चढणें ). ११ उत्कर्ष; वैभवाची स्थिति; उ० संसार रंगास येणें; उ० सदोबाची बाग रंगास येत चालली आहे. १२ संभव; शक्यता; उ० आज पाऊस पडण्याचा रंग दिसत नाहीं; उ० रामभाऊ दुखण्यांतून बरा होण्याचा रंग दिसूं लागला आहे. १३ स्वरूप; वस्तुस्थिति; एकंदर देखावा; उ० व्याहीबोवांचा रंग दिसेल त्याप्रमाणें बोलणें करा. १४ खेळावयाच्या सोंगट्यांतील जे चार रंग त्यांतील प्रत्येक रंगाच्या चार चार सोंगट्यां समुच्चयानें. १५ संधी; योग्य समय; उ० त्याच्या घरांत तीन माणसें आजारी आहेत, जलशाची गोष्ट काढण्याचा रंग हा नव्हे. ※ **टीप,-** ' रंग ' शब्दघटित संस्कृतांतील, फारशींतील, हिंदुस्तानींतील, आणि मराठींतील वाक्प्रचार पुढें देतों. **रंग राखणें** सभ्यपणाचें अतिक्रमण न करणें किं० न होऊं देणें. **रंगास चढणें, रंगास येणें** १ ( कांहीं रंगित पदार्थ ) दिवा, प्रकाश, धुणें, घासणें, इ० च्या योगानें अधिक सुंदर किं० चटकदार दिसणें. २ अधिक चित्ताकर्षक, मोहक, किं० मनोहर होणें. **रंगास येणें** १ शक्य किं० संभवनीय होणें. २ कांहीं चिन्ह, लक्षण, किं० देखावा यावरून आजमावलेली स्थिति; उ० हा रोगी राम म्हणावयाच्या रंगास आला आहे उ० हा खोडकर पोरगा मार खाण्याच्या रंगास आला आहे. **रंगारूपास** ( किं० **रंगास** ) **येणें** ( किं० **चढणें** ) उत्कर्षाची स्थिति पावणें; वैभवास चढणें; खुलून दिसणें; विकास पावणें **रंगाची मोट बांधणें** (किं० **रंग राखणें** )वैभवा

दुरळून न जातां सभ्य आणि सौम्य वर्तन कायम ठेवणें. आपल्या प्रतिपक्ष्यावर वादांत किं० कांहीं कामांत आपण सरशी मिळविली असतां आपण दिलदारीनें त्याच्याशीं वागणें, त्या सरशीच्या जोरावर त्याच्याशीं कठोरपणा न करणें किं० त्याला न हिणविणें, किं० त्याला अधिक पेचांत ढकलण्याचा प्रयत्न न करणें. **रंगाच्या मोटा बांधूं नयेत** प्रतिपक्ष्याला अत्यन्त निर्दयपणें नामोहरम करूं नये; उ० त्याणें मी चुकलों असें कबूल केलें तें बस झालें, आतां रंगाच्या मोटा बांधीत बसूं नका. **कोणकानें रंगांत येणें** त्याणें एकाद्या विषयसुखाच्या आस्वादनांत तल्लीन होऊन इतर विषयाचेकडे त्याचें भान न राहाणें. **रंगाचा भंग करणें** आनंदाचा विरस करणें. **रंगडाव** पु०, **रंगबाजी** स्त्री० गंजिफा खेळण्याचा एक प्रकार. **रंगदार** वि० १ मनोहर आहे रंग ज्याचा असा (पदार्थ,-फूल, वस्त्र, इ०). २ रंगेल (माणूस). ३ रंगित. **रंगदेवता** स्त्री० गाणेंबजावणें, कथा, पुराण, प्रवचन, व्याख्यान, इ० कांस जिच्या प्रसादानें रंग येतो म्हणजे आनंददायकपणा येतो अशी एक कल्पित देवता. **रंगपंचमी** स्त्री० फाल्गुन वद्य पंचमी,-ज्या दिवशीं पुरुष एकमेकांच्या अंगावर केशर इ० चें रंगित पाणी उडवितात. **रंगबहार** पु० १ थाटमाट किं० थाटमाटाचा देखावा. २ नाना प्रकारच्या करमणुकी किं० त्या जेथें चालतात तें ठिकाण. **रंगभूमि** स्त्री० १ नाटकगृह. २ कुस्त्या इ० करण्याच्या आणि पाहाण्याच्या सोयीचें ठिकाण. **रंगमंडप** पु० कुस्त्या, गाणेंबजावणें, कथा, पुराण, इ० साठीं मांडव घालून तात्पुरती जी निवाऱ्याची जागा करतात ती. **रंगमाळ** स्त्री० रंगित कागदांच्या तुकड्यांच्या किं० बेगडीच्या तुकड्यांच्या माळा मिरवणुकांत उंच बांबूंवरून लोंबत सोडलेल्या असतात त्या प्रत्येक. **रंगमहाल** पु० विलासासासाठीं श्रीमंत लोकांच्या वाड्यांत जें दालन सामानसुमानांनीं शृंगारलेलें असतें तें. **रंगमूर्ति** स्त्री० १ कीर्तन, गायन, इ० कांत रंग उत्पन्न होतो ज्या दर्दी श्रोते किं० प्रेक्षक यांच्यामुळें ते प्रत्येक. २ भिन्न भिन्न संस्थानांतील कृष्णाच्या ज्या मूर्ति त्या प्रत्येक. **रंगलूट** स्त्री० गंजिफांच्या डावांत सर्वच खेळाडूंचीं पानें एकाच रंगाचीं पडलीं तर तो हुकूम फुकट जातो आणि पानें सर्वांनीं लुटून घ्यावीं असा जो प्रकार तो. **रंगमोड** पु० आनंदांत विरजण पाडणारी कोणतीही गोष्ट. **रंगराग, रागरंग** पु० कांहीं चिन्हें किं० लक्षणें इ० कांवरून कांहीं गोष्टीची स्थिति किं० माणसाची वृत्ति जी अटकळींत येते ती; उ० पावसाचा रंगराग पाहून घराच्या बाहेर पडा; उ० त्या सरदाराचा रागरंग पाहून माझ्या बढतीची गोष्ट काढा. **रंगरूप** न० चालू झालेल्या कामाची विशिष्ट समयीची स्थिति. **रंगारूपास येणें** चालू झालेलें काम बऱ्याच समाधानकारक पल्ल्यास येणें किं० त्याची बरीचशी प्रगति झालेली दृष्टोत्पत्तीस येणें. **रंगरेज** पु० वस्त्रांस रंग देण्याचा धंदा करणारा; रंगारी. **रंगलाल** पु० विलासी आणि रंगेल माणूस. **रंगवल्ली** स्त्री० कुंकू, हळद, इ० रंगाच्या चूर्णांनीं जमीनिवर देव, झाडें, पशु, पक्षि, इ० चे केलेले देखावे. **रांगोळी** [सं० रंगवल्ली] स्त्री० १ शिरगोळ्याचें चूर्ण,-ज्याणें जमीनिवर नानाप्रकारच्या आकृति काढतात. २ ह्या चूर्णानें काढलेल्या आकृति समुच्चयानें. जेवणाच्या पंक्तींत ज्या साधनानें ह्या चूर्णाचे पट्टे काढतात त्याला 'रांगोळें' न० असा शब्द आहे. **रंगशाला** स्त्री० १ नाटकगृह. २ नाटकांत वेगळ्या वेगळ्या भूमिका करणारे लोक जेथें अंगास रंग लावणें, वस्त्रें पेहेरणें, इ० रूप तयारी करतात ती जागा. **रंगांगण** न०, **रंगसभा** स्त्री० नाच, तमाशे, कुस्त्या, गाणेंबजावणें, इ० करमणुकी जेथें होतात तें स्थळ. **रंगशिला, रंगशीळ** स्त्री० पंढरपूरच्या विठोबाच्या देवळांतील मोठी शिळा,-जीवर भक्त नाचतात. **रंगाई** स्त्री० वस्त्रें रंगविणें, भिंतींवर चित्रें काढणें, इ० बद्दल कारागिरास दिलेली मजूरी. **रंगारी** पु० वस्त्रें रंगवून उपजीविका करणारा. **रंगारी हिरडा** पु० हिरड्याची एक जात. यालाच 'जंगली हिरडा,' 'चांभार हिरडा' अशीं अन्य नांवें आहेत. बाळहिरडा, सुरवारी हिरडा, ह्या हिरड्याच्या अन्य जाति. **रंगिला, रंगेल, रंगेला,**

**रंगेली, रंगी** वि० हौसी, रसिक, आनंदी; नाच, तमाशे, गाणेंबजावणें, इ० चा शोकीन. **रंगाची तालीम** स्त्री० समागृहांत नाटक इ० प्रयोग करावयाच्या पूर्वी नटलोक खाजगी स्वरूपाचें जें नाटक करून थोड्याशा मित्रमंडळीस दाखवितात तें किं० तो प्रयोग. **रंगडी, रंगडीढंगडी, रंगडी-धंगडी** स्त्री० लटपटीखटपटी, डावपेच, कावे. **रंगढंग** पु० १ लटपट; कावा ( करणें, मांडणें ). २ वस्तूचें रूप किं० देखावा. ३ स्वच्छंदी आंचरण. **रंगनाथ** पु० भिन्न भिन्न संस्थानांतील कृष्णाच्या ज्या धातूंच्या मूर्ति त्या प्रत्येक. मागें ' रंगमूर्ति ' अर्थ २ पहा. **श्रीरंग** पु० कृष्ण. **रंगामेज** पु० १ चितारी. २ ठग; लुच्चा. **रंगामेजी** स्त्री० १ चित्रकला. २ दांभिकपणा. वि० लुच्चा; कपटी; कुटिल. **रंगी, रंगित** वि०रंगविलेला.

**रगटा** पु०,**रगटें** न०मागें'रकटा,"रकटें' पहा.

**रगड**[म०रगडणें]वि० विपुल; पुष्कळ; जितकें हावें तितकें,किंबहुना त्याहून अधिक.स्त्री०चंगळ; वैपुल्य; हावें तितकें किंबहुना त्याहूनही अधिक परिमाण.

**रगडणी** [ म० रगडणें ] स्त्री० १ रगडण्याची क्रिया. खालीं ' रगडणें ' पहा. २मागावर विणलें जात असलेल्या वस्त्राचा जो भाग विणून झाला आहे तो जीवर गुंडाळला जातो ती तुळई.

**रगडणें** [ हिं० ] स० क्रि० १ (कांहीं पदार्थ) चेपणें; दडपणें; जोरानें चोळणें. २ ( दुखत किं० ठणकत असलेलें अंग किं० गात्र ) आराम वाटण्यासाठीं चोळणें किं० चेपणें. ३ ( खाद्य पदार्थ) खाऊन गट्ट करून टाकणें. ४( दुसऱ्याचा पदार्थ) दांडगाईनें किं० जबरदस्तीनें घेऊन जाणें *** रगडपट्टी** स्त्री० १ दांडग्या हातानें कांहीं काम करणें किं० केलेलें काम. २ वैपुल्य; पुष्कळ परिमाण **रगडमल्ल** पु० दांडगेश्वर; अवाढव्य; बेढब ( माणूस, पदार्थ ). **रगडून** क्रि० वि० १ विपुल प्रमाणांत; खूप; पुष्कळ. २ जोरानें; सर्व बळ खर्चून. **रगड्या** वि० दांडगाईनें काम करणारा. **रगडमल्ली** स्त्री०१ दांडगाईनें केलेलें काम. २ आडमुठेपणाचें, असभ्यपणाचें, किं० वात्रटपणाचें दुसऱ्याशीं केलेलें वर्तन.

**रगडा** [ म० रगडणें ] पु० १ दाटी; गर्दी.२ असह्य किं० भारभूत काम; कामाचा भार; कामाची जोखमीची जबाबदारी.***रगडाझगडा** पु० वर 'रगडा' सर्व अर्थी पहा.

**रंगण** [ सं० रणांगण ] न० १ मंडल; वर्तुलाकार वाट किं०प्रदेश.२ खेळाची जागा. ३भोंवरा खेळतांना करून घेतात तें वर्तुळ. *** रंगणांत येणें** प्रतिस्पर्ध्याशीं लढावयाला सिद्ध होणें. **रंगणटोला** पु० रंगणांत भोंवऱ्यानें मारलेला तडाका.

**रंगणें** [ म० रंग ] अ० क्रि० १काहीं आनंद, करमणूक, उद्योग, इ० मध्यें गढून जाणें किं० तल्लीन होणें. २ ( वस्त्र इ० ) रंगानें युक्त होणें; रंगीत होणें; विशिष्ट रंगाचें होणें.

**रगत** [ म० रक्त,सं० रक्त]न०मागें'रक्त'पहा. *** रगतरोटी** स्त्री०१सैन्यातील नोकरी. २ लढाईत शौर्याचीं कृत्यें केल्याबद्दल राजाकडून जी जमीन वीराला दिली जाते ती. [ पहा.

**रगबा** पु० गांवाखालची जमीन. मागें 'रकबा'

**रंगरेज** [ फा० ] पु० रंगारी.

**रंगावणें**[म०रंगणें'चें प्रयोजक]स०क्रि०विशिष्ट रंगानें ( वस्त्रादि ) युक्त करणें; उ० हें पागोटें विटलें तें रंगवून आणलें पाहिजे. २ चपराक मारून ( कोणेकाचा गाल ) तांबडा करणें; उ० दोन थोबाडींत मारून तुझा गाल रंगविला पाहिजे म्हणजे तू ताळ्यावर येशील. ३ ( कोणेकाच्या गालावर चपराक ) मारणें; उ० तुझ्या मुस्कटांत दोन चपराका रंगविल्याशिवाय तू कबूल होणार नाहींस. टीप.—येथें ' चपराक ' हें कर्म अध्याहृत ठेविलें तरी चालतें.

**रगाटणी** स्त्री० फणींतून ओविलेले ताण्याचे तंतु ज्या काठीला बांधतात ती.

**रगाडा** पु०, **रगाडी** स्त्री० १ गर्दी; दाटी. २ कामाचा भार; कामांचा नेट. ३ वैपुल्य; पुष्कळ परिमाण. ४ उंसाचा रस काढण्याचा चरक ५ पाट्यावर वरवंट्यानें मारलेला घसरा.

**रंगामेजी** [ फा० ] स्त्री० रंगरेघोटी, आरसे, झुंबरें, हांड्या, तसबिरा, इ० नीं दिवाणखाना सुशोभित करणें.

**रग्या** [ म० रग ] वि० १ उद्दाम, आडदांड. २ आवेशी; हिम्मतदार. [ पहा.

**रघत** न० 'रक्त'चें अपभ्रष्ट रूप.मागें' रक्त ,

**रघस** स्त्री० शेत नांगरल्यानंतर डिखळें फोडावयाचें आउत.

**रंघळणें** स० क्रि० १ फरपटावीत नेणें; फरां फरां ओढणें. २ ( धोतर इ० ) वापरून गुधडणें; उ० हें धोतर दोन दिवस रंघळून नंतर परटाकडे धा म्हणजे पांढरें शुभ्र होऊन येईल.

**रंघळणें** अ० क्रि० रेंगाळणें; मागें पडणें.

**रच** [ म० रचणें ] पु० रचना; रचाई. २ रचण्याची क्रिया. ३ जें रचलें तें. ४ रचून केलेला ढीग किं० केलेली रास.

**रचणें** [ सं० रच् ] अ० क्रि० १ मांडणें; व्यवस्थित रूपांत ठेवणें. २ ( पदार्थ ) एकावर एक ठेवणें किं० पदार्थाच्या एका थरावर दुसरा, दुसऱ्या थरावर तिसरा, अशा प्रकारें त्याची रास करणें. ३ उभें करणें. ४ शब्दांची आणि विचारांची योग्य प्रकारें मांडणी करून ( ग्रंथ, श्लोक, इ० ) निर्माण करणें. ४ ( कादंबरी, गोष्ट, बनावट हकीगत, इ० ) आपल्या कल्पनेनें नवीन बनावणें.

**रचना** [ सं० ] स्त्री० १ मांडणी. २ बनविणें. ३ घर, मांडव, भिंत, गवताची गंजी, इ० ची उभारणी. ४ कल्पनेनें निर्माण केलेली कांहीं वस्तु, गोष्ट, इ०. ५ ग्रंथ, श्लोक, मसलत, कुभांड, इ० चा संगीन प्रकारची जुळणी. ६ घटना; जुळणी; उ० शरीराची रचना सर्व शस्त्रवैद्यांस ठाऊक असावी लागते. ७ हार, दागिना, यंत्र, इ० चे अवयव विशिष्ट प्रकारें जुळवून त्यांची काहीं विशिष्ट प्रकारें केलेली जुळणी. ८ मांडणें, बनविणें, उभारणें, निर्मिणें, जुळविणें, घडविणें, गुंफणें, इ० क्रियांनीं झालेला किं० अस्तित्वांत आलेला पदार्थ.

**रचाई** [ म० रचणें ] स्त्री० रचण्याची क्रिया किं० सरणी किं० तेणेंकरून सिद्ध झालेला पदार्थ किं० ह्या सिद्धतेसाठीं घ्यावें लागलेलें द्रव्य.

**रचित** [ सं० ] वि० रचिलेलें.

**रज** [ सं० रजस् ] न० १ धुळीचा कण. २ फुलांतील परागाचा कण. ३ सोने इ० चा एक एक बारीक कण. ४ मनुष्याचे जे तीन गुण त्यांतील दुसरा. ते तीन गुण सत्त्व, रजस्, आणि तमस्. ५ स्त्रियांचा मासिक विटाळ. टीप,—मराठींत ' रज ' शब्द बहुधा पु० योजला जातो. ❀ **रजोदर्शन** न० १ मुलीला न्हाण येणें ( होणें ). २ स्त्रीचें विटाळशी बसणें. **रजाचा गज करणें** १ कांहीं हकीगत फुगवून किं० अतिशयोक्ति करून सांगणें. २ एकाद्या गोष्टीला नसतें महत्त्व देणें. **रजोगुण** पु० ' रज ' शब्दाचा अर्थ ४ मध्यें सांगितलेला जो गुण तो. ह्या गुणानें विशिष्ट जो मनुष्य तो रजोगुणी. **रजस्वला स्त्री** विटाळशी स्त्री.

**रजई, रजाई** [ फा० रज़ाई ] स्त्री० कापडाच्या खोळींत कापसाचा पातळ थर घालून टांके मारून जो थंडीच्या निवारणार्थ पांघरावयास करतात तो पदार्थ; दुलई; लेप.

**रजक** [ सं० ] पु० १ परीट. २ चितारी.

**रंजक** [ सं० ] वि० १ रंगविणारा. २ करमणूक करणारा. पु० १ रंगारी. २ चितारी. ३ उत्तेजक पदार्थ. ❀ **मनोरंजक** वि० मन रंजविणारा; चित्तवेधक.

**रंजक, रंजूक** [ हिं० ] स्त्री० १ बंदुकीच्या कान्यावर घालतात ती दारू ( भरणें, देणे ). २ फटाकडा, चिचुंदरी, इ० ची वात. ३ सुरुंग पेटावेण्यासाठीं जी दारूची ओळ करतात ती. ❀ **रंजक पिणें** बंदुकीच्या कान्यावरची दारू बार न होतां जळून जाणें. **कोणेकाला रंजक देणें** ( किं० **पाजणें** किं० **भरणें** ) १ त्याला कांहीं काम करा-करावयाला भर देणें किं० उठविणें किं० चेतविणें. २ त्याची कोणा माणसांशीं कलागत लावून देणें. **रंजक उडणें** ( किं० **झडणें** ) कज्जा किं० भांडण एकदम आणि जोरानें सुरू होणें. **रंजकदान** न०, **रंजकदानी** स्त्री० बंदुकीच्या कान्यावर ठेवावयाच्या दारूचें बारदान.

**रंजगंज** [ म० गंज ] पु० १ कीट; मळ; तांब; गंज; बुरशी. २ विपत्ति; त्रास.

**रंजणें** [ सं० रंज ] अ० क्रि० कांहीं वस्तूच्या किं० विषयाच्या अवलोकनांत, मननांत, वाचनांत, श्रवणांत, किं० आस्वादनांत तल्लीन किं० आनंदित होणें. **रंजणें गंजणें** [ म० रंजगंज ] अ० क्रि० रंजगंजानें युक्त होणें. मागें ' रंजगंज ' पहा. ❀ **रंजलागंजला** वि० पीडिलेला; त्रासलेला विपन्न; हतभाग्य.

**रजत** [ सं० ] न० चांदी किं० रुपें हा धातु. ❀ **रजताद्रि** पु० कैलास हा पर्वत.

**रंजन** [ सं० ] न० १ करमणूक; मौज. २

रंगविणें. ३ सुखविणें; खूष किं० आनंदित करणें

**रजनी, रजनि** [ सं० ] स्त्री० रात्र. ॐ **रजनीचर** पुं० राक्षस. **रजनीनाथ** पु० चंद्र. **रजनीमुख** न० सायंकाळ; प्रदोषकाल.

**रजपज** [ म० रज ] स्त्री० मोजकेपणा; मितपणा; मितता; फारही नाहीं आणि अल्पही नाहीं असें पदार्थांचें परिमाण. ॐ**रजपजचा, रजापजाचा** वि० बेताबाताचा ; फारही नाहीं आणि थोडाही नाहीं असा किं० इतका.

**रजपूत** [ सं० राजपुत्र ] पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**रजब, रज्जब** [ अ० ] पु०मुसलमानी वर्षाचा सातवा महिना.

**रजवली** (-ली ), **रदबदली** स्त्री० कोणेकाबद्दल कोणेकापाशीं केलेली विनंती, प्रार्थना, किं० भाकणूक ( करणें ).

**रजा** [ अ० रिझा ] स्त्री० १ परवानगी; अनुज्ञा; मोकळीक. २ कांहीं काळ नोकराला नोकरीवर न येण्याची यजमानानें दिलेली परवानगी किं० मुभा ( देणें ). ३ नियमित सरणीनें चालेलल्या कामांत विश्रांतीसाठीं किं० करमणुकीसाठीं किं० अन्य उद्देशानें काम बंद ठेवणें किं० हा बंद ठेवण्याचा काळ. ४ हाकालपट्टी; घालवून लावणें; काढून टाकणें ( देणें ). ॐ **रजाचिट्ठी** (-ट्टी ) स्त्री० अनुज्ञा, परवानगी, किं० हाकालपट्टी ज्या कागदावर लिहिलेली किं० नोंदलेली असते तो कागद. **रजातलब** [ अ० रिझा+तलब् ( बोलावणें ) ] स्त्री० १ यजमानाच्या हुकमाप्रमाणें नोकरानें वागणें किं० वागण्याची कबूली किं० वागण्यांत तत्परता. **कोणेकाच्या रजातलबेंत राहाणें** पूर्णपणें त्याच्या आज्ञेत राहाणें. **रजावंती** (-दी-) नें क्रि० वि० परवानगीनें; संमतीनें; अनुज्ञेनें; मर्जीप्रमाणें. **रजावंद, रजामंद** वि० कबूल; खूष; संतुष्ट. **रजावंती** (-दी), **रजामंदी** स्त्री० १ संमती; खुषी; कबूली; मान्यता. २समजूत.

**रंजित** [ सं० रज् ] वि०१ ज्याचें रंजन झालें तो; आनंदित; ज्याची करमणूक झाली आहे तो. २ रंगलेला किं०रंगविलेला ( कपडा इ० पदार्थ ).

**रजी** [ सं० रजस् ] स्त्री० धूळ; मळ; कीट; गंज. [ त्रास.

**रंजी** [ फा० रंजिष् ] स्त्री० वैताग; कंटाळा;

**रंजी** [ फा० रंजिष् ] स्त्री० त्रास; कंटाळा; वैताग. **रंजीस** वि० त्रस्त; जर्जर; त्रासलेला; विपन्न ( येणें ); उ० ह्या कारस्थ्याच्या पायीं मी मारी रंजीस आलों आहें.

**रंजूक** स्त्री० मागें ' रंजक ' [ हिं० ] पहा.

**रजोगुण, रजोगुणी, रजोदर्शन** मागें ' रज ' [ सं० ] मध्यें पहा.

**रज्जब** मागें ' रजब ' पहा.

**रज्जु** [ सं० ] स्त्री० १ दोर; दोरी; राजू. २ केशांची वेणी. ३ लगाम.

**रंझणें** मागें ' रंजणें ' [ सं० ] पहा.

**रझळणें** अ० क्रि० सुरळीतपणें काम न होतां मध्यें मध्यें खोळंबा होऊन तें काम रखडत चालल्यामुळें तें ( करणारा ) जर्जर होणें किं० त्रस्त होणें.

**रट** वि० पुढें ' रठ ' पहा.

**रटणें** [ सं० रट् ] अ० क्रि० १ ( बेडूक ) ओरडणें. २ ( मूल ) एकदम किंचाळून रडणें. ३ बडबड करणें.

**रटांरट, रटांरटां** क्रि० वि० बुडबुडे येऊन आणि आवाज करून ( भात, पाणी, इ० ) कढणें.

**रटाळ्या, रटेल** वि० १ जाडी, ओबडधोबड, अगडबंब ( माणूस, पशु, पदार्थ ). १ दांडगेपणानें काम करणारा.

**रट्ट, रठ** पु० दाटी; गर्दी. २ जाडी भाकरी किं० पोळी. ३ कोणताही जाडी, लठ्ठ, ओबडधोबड, किं० बेढब, माणूस, पशु, किं० पदार्थ. ४ राकट किं० कणखर माणूस.

**रट्टा, रट्ट्या** पु० १ तडाखा; प्रहार ( मारणें, लगावणें ). २ ( कामाचा ) नेट किं० ओझें ( पडणें, बसणें ). ३ गर्दीत घुसणें ( मारणें ). वि० ओबडधोबड, जाडी, बेढब ( माणूस, पशु, पदार्थ ).

**रठ, रंठ** वि० १ ठणक ( लाकूड, सुपारी, पेरू, इ० फळ, किं०जमीन इ० ). २वर्णोच्चार सुलभपणें जिला करतां येत नाहीं अशी ( जीभ ). ३ कणखर किं० कष्टाळू ( मनुष्य, पशु, गात्र ). ४ खरखरीत (सूत, त्वचा, पान, कागद, इ० ).

**रट्ट पु०** महाराष्ट्रांतील प्राचीन काळची एक जाति किं० त्या जातीचा कोणी माणूस.

**रड [ म० रडणें ] स्त्री०** १ एकसारखें रडत राहाण्याची क्रिया; उ० ह्या मुलाला सकाळपासून रड लागली आहे. २ तकरार, पिरपीर ( लावणें, चालविणें ). ३ कमतरता; उणेपणा; असमाधानकारक स्थिति ( पाऊस, अभ्यास, परीक्षा, इ० मध्यें ). ® **रडकथा, रडकहाणी स्त्री०, रडगाणें न०** १ विपत्तीची हकीगत. २ कंटाळवाणी आणि लांबलचक हकीगत ( किं० वृत्तान्त. ३ पिरपीर; तकरार. **रडीस येणें ( किं० जाणें )** खेळ इ० मध्यें पराभव झाल्याकारणानें चिडून रडण्याच्या बेतांत असणें. **रडकुंडा (-डी) वि०** रडण्याच्या बेतांत असलेला. **रडकुंडी स्त्री०** रडण्याची मनाची स्थिति. **रडकुंडीस येणें** रडण्याच्या बेतांत असणें ( काम, पराभव, दुःख, इ० मुळें ).

**रडका [ म० रडणें ] वि०** १ सदा रडत असणारें ( मूल ). २ सदा तकरार करणारा. ३ ज्याच्या हातून कोणतेंच काम चांगलें होत नाहीं किं० तडीस जात नाहीं असा. ४ रडतांना होतो तसा (आवाज,चर्या). ५टवटवीत,उत्साहयुक्त,किं० प्रसन्न नाहा चेहेरा, भाषण, काम, इ० ज्याचें असा.६ कंटाळवाणें ( भाषण इ० ). रडका स्त्री०, रडकें न०. ® **रडकी सूरत स्त्री०** प्रेक्षकाला जी पाहून आनंद वाटत नाहीं अशी मुद्रा.

**रंडका [ सं० रंडा ] वि०** १ ज्याची बायको मेली आहे असा ( पुरुष ). जिचा नवरा मेला आहे अशा स्त्रीस ' रंडकी ' असा शब्द आहे. २ जेथें जें असावयास पाहिजे तें तेथे ज्याला किं० ज्यांत किं०ज्यावर नाहीं असें; ओकें.३लाभरहित ( धंदा ). ४ निरुपयोगी. ® **रंडका अमल पु०** नामर्दपणाची शासनपद्धति; ज्यांत चोर, लुटारू, बदमाष, इ० ना भीति वाटत नाहीं असें राज्य. **रंडकीमुंडकी स्त्री०** १ जिचें वपन झालेलें आहे अशी विधवा. २ दुर्वर्तनी स्त्री; व्यभिचारिणी ( शिवी देतांना ). **रंडगोलक पु०** विधवेच्या जारकर्मापासून उत्पन्न झालेल्या जातचा माणूस. **टीप**,-पति जिवंत असतां जारकर्मापासून रूसि झालेला पुत्र ' कुंड; ' विधवेचा पुत्र ' गोलक ' किं० ' गोळक ' किं० ' रंडगोलक. '

**रडकुंडी** वर ' रड ' मध्यें पहा.

**रडखडणें, रखडणें अ० क्रि०** धडपडत चालणें; कंटाळ्यानें, कष्टानें, किं० त्रासानें चालणें.

**रडणें [ सं० रुद ] अ० क्रि०** १शोक करणें;रोदन करणे. २ नष्ट होणें;बंद पडणे;अनादरानें बाजूला ढकलला जाणें; उ० चार दिवस पाटीलबोवांचा आश्रय होता तोही रडला, आतां गोदोबाला भाकच मागितली पाहिजे;उ० बक्षिशी रडो,रजू पगार तर द्याल कीं नाहीं ? नुकसान होणें; उ० तूं नोकरी सोडलास तर त्यांत माझें काय रडतें ? ४ असणें, होणें ( वेतागांत किं० निंदेत ); उ० दोन वर्षे मामलत रडत होती तेव्हां आमच्या मुलानें आम्हाला काय दिलें तें तुम्हीं पाहिलें-तच, आतां मामलत गेली, आतां काय देणार फतऱ्या ? ५ निंदणें, निर्भर्त्सणें; उ० मी त्याला नाही दोष देत,मी आपल्या देवाला रडतो. **स० क्रि०** चालविणें, करणें ( निंदेत ); उ० दोन वर्षे तूं दुकान रडलास तेवढे बस्स झालें.® **रडतखडत, रडतरडत, रडतपडत, रडतकसत क्रि० वि०** मोठ्या कष्टानें; निरुत्साहीपणानें; इच्छेविरुद्ध. **कोणेकाचें रडतगोत्र असणें** तो नेभळा, बिनकर्तबगारीचा, किं० उत्साहरहित असणे. **रडत घोडें न०, रडताराऊत पु०, रडतराव पु०** लोकांच्या सक्तीनें आणि स्वताची इच्छा नसतां कांहीं काम करणारा. **रडतलक्षुमी, रडतपार्वती स्त्री०** जी कोणतेंही काम मनापासून करीत नाहीं आणि दुसऱ्याच्या सक्तीनें करीत असते अशी स्त्री. **रडतोंडा (-ड्या ) पु०** १ रडक्या तोंडाचा माणूस. २ उत्साहानें कोणतेंही काम न करणारा माणूस. **रडपंचक न०** आपला अशक्तपणा, कर्तृत्वशून्यता, इ० च्या सबबी समुच्चयानें किं० अशा सबबी सांगून कांहीं काम अंगाबाहेर लोटणें किं० लोटण्याचा प्रयत्न. **रडवा वि०** १ कोणतेंही काम करण्याची ज्याच्या अंगीं धमक नाहीं असा. २ खिन्न, उदासीन. ३ रडण्याची चर्या ज्याच्या तोंडावर आहे असा. **रडारोई स्त्री०** रडण्याचा आक्रोश.

**रडविणें** [म० ' रडणें ' चें प्रयोजक] स०क्रि० १ रडावयास लावणें. २ कोणेकाला रडावयास येईल इतकें त्यास छळणें, गांजणें, किं० उपद्रविणें. ३ दुःखकारक प्रसंगाच्या वर्णनानें किं० देखाव्यानें कोणेकाला डोळ्यांतून अश्रु गाळावयास लावणें. ४ आनंदाचा प्रसंग, पाऊस, वारा, रोग, थंडी, ऊन्ह, इ० नीं ( शेत, रचनाविशेष, इ० ) विध्वंसिणें किं० ( त्यांच्या रंगाचा ) भंग करणें.

**रंडा** [ सं० ] स्त्री० १ विधवा. २ स्त्रीला शिवी म्हणून तिला 'रंडा' म्हणतात. ❀ **रंडागीत** न० बदसूर गायन, पठन, भाषण, किं० वाचन. **रंडापंडित** पु० दांडगी आणि शिवराळ स्त्री. **रंडापति** पु० १ रांड किं० रखेली ज्याणें बाळगिली आहे असा पुरुष. २ रांडबाज पुरुष. ३ कुटण्या. ४ पुचाट, कर्तृत्वशून्य, किं० लेचापेचा असा मनुष्य.

**रडी, रड्डी, रंडी** स्त्री० खोटें खेळणें; लबाडीचा खेळ ( घेणें, खाणें ). ❀ **रड्डीस येणें, रंडीस येणें** आपल्यावर डाव लागल्यामुळें चिरडीस जाणें. **रंडीखोर, रडीवाल, रंडीवाल, रड्डीखोर, रड्डीवाल** वि० खेळामध्यें खोटें खेळण्याकडे प्रवृत्त किं० चिरडीस जाण्याच्या स्वभावाचा.

**रंडी** [ सं० रंडा ] स्त्री० १ वेश्या. २ नर्तकी. ३ गंजिफांतील जी नादार ती. ❀ **रंडीबाज** वि० रांडांच्या नादीं लागलेला. **रंडुला** पु० १ बायकांचा नादी. २ कर्तृत्वशून्य.

**रडुरडु** [ म० रडणें ] न०, स्त्री० रडण्याची पिरपिर.

**रडें, रडूं** [ म० रडणें ] न० १ रडण्याची क्रिया. २ रडण्याचा आवेग ( येणें, कोसळणें ).

**रंडेय** [ म० रंडा ] पु० रांडेच्या पोटचा मुलगा.

**रड्डी** [ म० रडणें ] स्त्री० खोटा किं० लबाडीचा खेळ. वर ' रडी ' सर्व अर्थी पहा.

**रड्या** [ म० रडणें ] वि० १ सर्वदा रडणारा किं० चिडणारा माणूस. २ कर्तृत्वशून्य आणि उत्साहरहित माणूस; मंद; कामाला संथ, सुस्त, किं० आळशी.

**रण** [ सं० ] न० १ लढाई. २ युद्धाची किं० लढाईची जागा. ३ तंटा; आवेशाचें भांडण; जोराजोराचा वादविवाद. ❀ **रणशिर** न०, **रणधुरा** स्त्री० लढाईची अघाडी. **रणपाईत** पु० योद्धा. **रणकंदन (–ळ )** न०, **रणखंदाळी** स्त्री० १ तुमुल युद्ध. २ दाणादाण; नाश. **रणकुदळ** वि० १ भांडरा; भांडकुदळ. २ अगडबंब आणि बेघाट शरीराचा माणूस. **रणखुंदळ** स्त्री०, **रणखुंदळा** पु० १ लढाईच्या वेळची गडबड, आवेश, किं० गर्दी. २ कोणत्याही प्रसंगाची गडबड, घाई, किं० गोंधळ. **रणधीर, रणगंभीर** वि० युद्धात न डगमगणारा. **रणघाई** स्त्री० १ जोराचा किं० नेटाचा प्रयत्न. २ परमावधीची घाई. **रणघाल्या** वि० कामांत चिकित्सा करीत बसणारा; कामात हरकती आणीत बसणारा; कामात उरक न पाडतां काम गोंधळविणारा. **रणतुंबळ** न० घनघोर लढाई. **रणतुरा** पु० युद्धात विजयी झाल्याचें चिन्ह म्हणून पागोट्यांत खोवितात तो तुरा. **रणधुमाळी** स्त्री० युद्धाची गडबड; लढाईच्या प्रसंगाची गर्दी, गडबड, घाई, किं० धांदल. **रणनवरा** पु० १ लढाईत शत्रूवर जय मिळविल्याकारणानें ज्याला कोणत्याही प्रसंगीं रस्त्यांतून चालतांना पुढें वाद्यांचा ताफा बाळगण्याचा हक्क प्राप्त झाला आहे असा वीर. २ शूर आणि उत्साही वीर. ३ उत्साही पुढारी किं० म्होरक्या. ४ कामांत चलाख आणि तल्लख माणूस. **रणबहिरी** [ सं० रणभेरी ] वि० रणांत शूर; मोठा लढवय्या. **रणबावरा** वि० १ लढण्यास उत्सुक. २ मारामारीस सदा सिद्ध. ३ कोणत्याही कामीं फाजील उत्सुक. **रणफंदी** पु० लढवय्या. **रणभूमि** स्त्री० युद्धभूमि. **रणबोका** पु० अगडबंब माणूस, पशु, तुळई, इ०. **रणभेरी** स्त्री० युद्धांत वाजवितात ती नौबत. **रणमंडल** न० १ एक प्रकारचा व्यूह. २ लढाईची भूमि. **रणमोहरें** न० रणांत वाजवावयाचीं वाद्यें प्रत्येक. **रणरंग** पु० १ युद्धाचा भयंकर देखावा. २ युद्धाच्या वेळची गडबड किं० गोंधळ. **रणांगण, रणक्षेत्र** न० लढाईचें मैदान. **रणरंगधीर** वि० युद्धभूमीवर शौर्याचे आणि साहसाचे पराक्रम करणारा. **रणहलकी (–गी)** स्त्री० लढाईत वाजवितात तें एक वाद्यविशेष. **रणगाडा** पु० तोफ इ० जड ओझें वाहून नेण्याचा मोठा गाडा.

**रणरण** स्त्री० १ ऊन्ह, विस्तव, मशाल, इ० चा असह्य प्रकाश किं० ताप. २ मध्यान्हीच्या

सूर्याचा ताप. ꣸ **रणरण करणें** ( विस्तव, सूर्य, किं० ज्वरांने अंग, इ० ) अति ऊन किं० कढत झालेलें असणें किं० त्यांची प्रखर उष्णता असह्य होणें.

**रणरणणें** अ० क्रि० ( सूर्य किं० हवा किं० आकाश ) तप्त होऊन असह्य वाटणें; उ० आज हवा भारी रणरणते आहे. ह्या क्रियापदाचा भावकर्तरी प्रयोगही होतो; उ० आज फार रणरणत आहे.

**रणरणीत** वि० अति कडक किं० प्रखर ( सूर्य, ऊन्ह, अग्नि, दुपार, इ० ). ꣸ **रणरणीत उन्हाळा** पु० उन्हाळ्याचा मध्य,—जेव्हां हवेंत अति असह्य उष्मा असतो. **रणरणीत दुपार** स्त्री० ऐन दुपार; भर दुपार किं० मध्यान्ह समय.

**रत** [ सं० ] वि० १ आनंदित. २ तल्लीन; निमग्न; तत्पर. न० १ करमणूक. २ मैथुन.

**रतणें** [ सं० रम्; रत; म० रत ] अ० क्रि० १ रमणें; आनंदित होणें. २ मैथुनांत आसक्त होणें.

**रतन** [ सं० रत्न ] न० रत्न, हिरा, माणिक, इ०. ꣸ **रतनकुंड** न०, **रतनकूप** पु०, न० उत्तम पोसलेला, पिकलेला, आणि तेजस्वी आंबा, पेरु, इ० फळ. **रतनजोत** स्त्री० १ डोळ्यांस थंडावा आणणारें एक औषध. २ अट्टल लुच्चा. ३ वेंदूची कांडी. **रतनपारखी** पु० रत्नांची परीक्षा करणारा. **रतनबाव** स्त्री० पाण्याचा प्रवाह वळवून पाणी साचविण्यासाठीं बाग इ० मध्यें केलेला खळगा.

**रतल, रत्तल** [ अ० रत्ल् ] पु० एक वजनाचें परिमाण; अर्धा शेर.

**रताळी** [ सं० रक्तालु ] स्त्री० उपवासाचे दिवशीं खावयाचा जो एक कंद आहे त्याची वेली. **रताळें, रताळूं** न० ह्या वेलीचा कंद.

**रति** [ सं० ] स्त्री० १ आनंद; सुख. २ आसक्ति; नाद; छंद. ३ प्रीति; प्रेम. ४ विषयसुख. ५ मैथुन. ६ मन्मथाची पत्नी. ७ शृंगाररसाचा स्थायीभाव. ꣸ **रतिपति** पु० मदन.

**रती** [ सं० रक्तिका=गुंज ] स्त्री० गुंज,—हिरे, मोतीं, इ० वजन करण्याचें एक बीज. ꣸ **रतीमात्र** क्रि० वि० यत्किंचित् सुद्धां. **दैवाची रती** स्त्री० सुदैव.

**रतीब** [ अ० रातिब् ] पु० १ पौष्टिक अन्न, खाद्य, इ०,—जें घोडे, हत्ती, इ० ना देतात तें किं० त्याचें एका वेळेचें परिमाण. २ दूध, शेण, इ० रोज पुरविण्याबद्दलचा नियम किं० अशा नियमानें पुरविलेलें त्या त्या पदार्थाचें परिमाण; उ० तुम्ही दुधाचा तीन पावशेर रतीब लावा. ३ खावपेय इ० चें नियमानें ठरविलेलें परिमाण.

**रत्तल** मागें ' रतल ' पहा.

**रत्न** [ सं० ] न० १ हिरा, माणीक, पाच, इ० मूल्यवान् पदार्थ. २ कोणेक जातींतील, समुदायातील, किं० वर्गातील रत्नाप्रमाणें उत्तम व्यक्ति; उ० पुत्ररत्न, कन्यारत्न, अश्वरत्न; उ० हा मुलगा माझ्या वर्गांत रत्न आहे. ३ समुद्राचें मंथन करून त्यांतून देवदानवांनीं काढले ते चवदा पदार्थ प्रत्येक. मागें ' चौदा ' मध्यें पहा. **रत्नखचित, रत्नजडित** वि० जडावाचें हिरे, माणकें, इ० कोंदणांत बसवून सुशोभित केलेलें (सिंहासन इ०). **रत्नाकर, रत्ननिधि** पु० समुद्र. **रत्नाकर** पु० रामेश्वरापासून आलीकडील पश्चिमेच्या अंगचा समुद्र. **रत्नकंदल** पु० पोवळें. **रत्नगर्भा** स्त्री० पृथ्वी. **रत्नसानु** पु० मेरु पर्वत. **रत्नसू** स्त्री० पृथ्वी. **रत्नदीप** पु० प्रकाश देणारें एक रत्न,—जें पाताळांत असतें अशी समजूत आहे. **रत्नपारखी** पु० मोतीं, हिरे, इ० ची परीक्षा करणें किं० त्यांच्या किमती ठरविणें इ० कामीं निष्णात माणूस. **रत्नाकर आळविणें काम न पार पडल्यामुळें हिरमुष्ट होऊन बसणें. टीप,**— समुद्रावर सेतु बांधतांना राम समुद्रास आळवीत बसला यावरून या वाक्प्रचाराची उत्पत्ति.

**रत्नी** [ म० रत्न ] स्त्री० माकडाच्या खेळांत माकडीला दिलेली असते ती पदवी. वि० नाचणी ह्या धान्याची एक जात.

**रथ** [ सं० ] पु० राजा, देवाची मूर्ति, इ० ची मिरवणूक ज्या गाडींत निघते ती गाडी. ꣸ **रथांग** न० १ चाक. २ विष्णूचें सुदर्शन चक्र. पु० चक्रवाक पक्षी. **रथकार** पु० सुतार. **रथगुप्ति** स्त्री० रथाचें चिलखत. **रथयात्रा** स्त्री० देवाच्या मूर्तीची रथांतून मिरवणूक. **रथसप्तमी** स्त्री० माघ शुद्ध सप्तमी ही तिथि. **रथी** [ सं० रथिन् ] पु० रथांत बसून लढणारा योद्धा. **रथोद्धता** स्त्री० एक समवृत्त.

ह्याच्या प्रत्येक चरणांत र, न, र, हे गण असून पुढें एक लघु आणि एक गुरु अक्षर असतें.

**रथी, रथिक** [ सं० रथिन्, रथिक ] पु० १ रथाचा मालक. २ रथांत बसून लढणारा वीर. ३ चक्रवाक पक्षी.

**रथ्य** [ सं० ] पु० गाडीचा घोडा.

**रथ्या** [ सं० ] स्त्री० १ राजमार्ग. २ रस्ता. ३ रथांचा समूह. ४ चवाठा.

**रंद** पु०, स्त्री० गळूं, फोड, इ० तून निघतो तो रक्तामिश्रित पू.

**रद** [ सं० ] पु० दांत. ❀ **रदायुध** पु० रानडुकर. **रदच्छद** पु० ओठ.

**रद, रद्द** [ अ० रद्द ] स्त्री० १ परतविणें. २ फेड ( कर्जाची ). वि० १ नामंजूर. २ खोडलेलें. ❀**रद्दकर्ज** न० कर्जाची फेड; फेडून टाकलेलें कर्ज.

**रदन** [ सं० ] पु० दांत. ❀ **रदनच्छद** पु० ओठ.

**रदबदल, रदबदली** [ फा० रद् बद्ल् ] स्त्री० कोणेकानें दुसऱ्याबद्दल कोणेकाला घातलेली भीड किं० खर्चिलेलें वजन ( करणें ).

**रंदा, रंदागोल** पु० पुढें रंधा, '' रंधागोल '' पहा.

**रदाल्या, रदाळ्या** मागें ' रटाल्या ' पहा.

**रद्द** मागें ' रद, ' ' रद्द ' पहा.

**रद्दी** [ फा० रद्दी ] वि० त्याज्य; कवडीमोल; टाकाऊ. स्त्री० टाकाऊ किं० निरुपयोगी कागद.

**रंध** पु०, स्त्री० रक्तमिश्रित पू.

**रंधणें** [ म० रंधा; सं० रध् ] स० क्रि० रंधा नांवाचें जें सुताराचें हत्यार त्याणें (लाकूड) तासून गुळगुळीत किं० साफ करणें.

**रंधन** [ सं० ] न० १ नाश; पीडा. २ रांधणें किं० शिजविणें ही क्रिया.

**रंधप, रांधप** [ म० रांधणें; सं० रंध् ] न० शिजवून तयार करणें किं० जें तयार केलें तें. ❀ **रंधपी, रांधपी** पु० स्वयंपाकी.

**रधवणें, रधविणें** पुढें ' रुधवणें, ' ' रुधविणें ' पहा.

**रंधा** [ फा० रंदाह् ] पु० लाकूड साफ आणि गुळगुळीत करण्याचें सुताराचें एक हत्यार. ❀ **रंधागोल** पु० लाकडाच्या फळीच्या कडांना विशिष्ट आकार देण्याचें सुताराचें एक हत्यार. **रंधागोलची** स्त्री० लाकडाच्या फळी, गज, रिपा, इ० च्या कडांना विशिष्ट आकार देणें ही क्रिया ( करणें ).

**रंध्र** [ सं० ] न० १ भेग; चीर. २ भगदाड. २ डोंगरांतील गुहा. ३ व्यंग; उणीव. ४ (लाक्षणिक) नाजूक भाग; मर्म; वर्म. ❀ **रंध्रान्वेषण** न० कोणेकाचे दोष हुडकून काढणें.

**रप, रपका, रपाटा** पु० आवाज होईल अशा प्रकारें मारलेला तडाका.

**रपटा** पु० गूळ, चिंच, इ० पदार्थ ज्यांत कोळला किं० कुसकरला आहे असें पाणी.

**रपाटखान** पु० बेढब आणि फार मोठा असा पदार्थ, माणूस, किं० पशु.

**रपाटणें, रपटणें** स० क्रि० घाईनें, जोरानें, दांडगाईनें, किं० आवेशानें ( कोणतीही क्रिया ) करणें किं० उरकून घेणें.

**रपाटा** पु० १ रट्टा; तडाखा. २ फार मोठा आणि बेढब असा कोणताही पदार्थ. ३ घाईनें किं० आवेशानें केलेलें काम ( मारणें ).

**रपाटून** [ म० रपाटणें ] क्रि०वि० १ जोरानें; आवेशानें. २ पूर्णपणें; बाकी न ठेवतां.

**रपाट्या** [ म० रपाटणें ] पु० घाईनें, जोरानें, आवेशानें, किं० दांडग्या हातानें कोणतेंही काम करणारा.

**रपेट** [ हिं० ] स्त्री० १ नियमितपणें व्यायामासाठीं चालणें किं० घोड्यावर बसून जाणें; सहल. २ अशा प्रकारें आक्रमिलेला किं० आक्रमावयाचा प्रदेश. [ दोस्ती.

**रफक** [ अ० रुफ्क् ] पु० स्नेह; मेहेरबानगी;

**रफत** [ फा० रफतन्=जाणें; रफ्त्=चाल ] १ चाल; परिपाठ; शिरस्ता. २ जाण्यायेण्याचा परिपाठ; घरोबा; दळणवळण. ३ व्यासंग; सवय.

**रफरफ** स्त्री० पूर्ण विध्वंस किं० नासाडी ( काम, धंदा, संसार, इ० ची ).

**रफा** [ अ० रफाअ ] पु० १ विचका; बिघाड; चिवडा; ढिवचाडिवच; उ० काय भाताचा अगदीं रफा करून टाकलास तरी ! २ निराकरण. ❀ **रफातफा, रफादफा** पु० अव्यवस्था;

खिचडी; घालमेल;नासाडी. **रफातफा, रफादफा, रफेद्फे** [ अ० रफअद्फअ ] **स्त्री०** १ कर्जाची फेड. २ कामाचा निकाल किं० उरक किं० सुरळीत मांडणी; व्यवस्था; विल्हेवाट. **वि०** व्यवस्थित केलेलें; निकालांत काढलेलें. **रफेखलश** [ अ० रफ्‌ईखलिष ] **पु०** वैराचें निराकरण. **रफेशर** [ अ० रफ् इ शर्‌; शर्‌=वाईटपणा ] **पु०** वैराचें निराकरण.

**रफाकत, रफीकत** [ अ० रिफाकत ] **स्त्री०** स्नेह; सख्य; मैत्री.

**रफायत, रफाहियत** [ अ० रफाहत; रफाहीयत ] **स्त्री०** वैभवदशा; उत्कर्ष; भरभराट.

**रफीअलकदर** [ अ० रफीउल्कद्र ] **वि०** उच्च दर्जाचा.

**रफीक** [ अ० ] **पु०** स्नेही; दोस्त.

**रफू** [ फा० ] **पु०, स्त्री०** १ वस्त्राचें भोक बुझविण्यासाठीं त्यांत सूत, रेशीम, लोकर, इ० चे तंतु तुणणें किं० असा तुणलेला वस्त्राचा भाग. २ नवें गवत घालून गवती छपराची केलेली दागदुजी. ꙳ **रफूकरी, रफूगार पु०** वस्त्र रफू करणारा.

**रबक** [ फा० रबाब् ] **न०** एक तंतुवाद्य.

**रबका पु०** १ रट्टा; तडाका. २ कोणताही अवाढव्य आणि बेढब पदार्थ.

**रबडगा पु०** १ कामाची घाई. २ कामाचा पुष्कळपणा.

**रबडणें अ० क्रि०** कामानें कष्ट करणें किं० [ सोसणें.

**रबडा पु०** चिकट आणि दाट पदार्थ,—चिखल, भात, गूळ, इ०. [ पदार्थ.

**रबर न०** निःसत्त्व आणि भरभरीत खाद्य

**रबर** [ इं० ] **न०** एका झाडचा चीक,—ज्याच्या अंगीं स्थितिस्थापकपणाचा गुण असतो.

**रबाब** [ फा० ] **न०** एक प्रकारचें तंतुवाद्य.

**रबाब, रुबाब** [ अ० रुअब ] **पु०** १ धाक; दरारा. २ प्रेक्षकाच्या मनांत भीतियुक्त आदर उत्पन्न करण्याचा कोणेकाच्या चेहेऱ्यांत असतो तो गुण. ꙳ **रुबाबदार वि०** १ प्रेक्षकाच्या मनांत आदर आणि भीति उत्पन्न करणारा ( चेहेरा ). २ चेहेऱ्याचा डौलदारपणा.

**रबिता** मागें ' राबता ' पहा.

**रबिलाखर** [ अ० रबी उल् आखिर ] मुसलमानी वर्षाचा चवथा महिना.

**रबिलावल, रबीलोवल** [ अ० रबी उल् अव्वल ] **पु०** मुसलमानी वर्षाचा तिसरा महिना.

**रबी, रुब्बी** [ अ० रबीई=वसंत ऋतु ] **स्त्री०** गहूं, शाळू, इ० पिकें,—जीं पावसाळ्याच्या अखेरीस पेरून वसंत ऋतूंत कापतात. मागें ' खरीफ ' पहा.

**रबुका पु०** मागें ' रबका ' पहा.

**रबूक वि०** १ खूप मोठा, प्रचंड ( माणूस, पशु, घर, पदार्थ ). २ अत्यन्त विपुल ( पाणी, पीक, आबे, इ० ).

**रबेत, रबेद, रबेता, रबेदा** [ अ० रबत ] **पु०** १ जोराचा रट्टा किं० तडाका. २ परिपाठ; सवय; राबता. ३ परिपाठामुळें प्राप्त झालेली सफाई; पूर्ण परिचय.

**रबेत, रबेद वि०** खूप मोठा; प्रचंड.

**रंभा** [ सं० ] **स्त्री०** केळीचें झाड. २ एक अप्सरा. ३ पार्वती. ४ वेश्या. ५ इंबरडा. ६ कोणीही रथूळ, कुरूप, किं० अव्यवस्थितपणें लुगडें नेसलेली आणि पिंजारलेल्या केशांची स्त्री किं० विशेषतः मुलगी. ꙳ **रंभातृतीया स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध तृतीया किं० त्या तिथीचें व्रतविशेष. **रंभापुतळी स्त्री०** खुरपें हें हत्यार.

**रमजान** [ अ० रम्झान् ] **पु०** मुसलमानी वर्षाचा नववा महिना. या महिन्यांत मुसलमान दिवसा रोजा म्ह० उपवास करतात.

**रमढोल वि०** बेडौल आणि मोठें.

**रमण** [ सं० ] **वि०** १ सुखविणारा; प्रिय. २ मोहक;सुंदर. **पु०** १ नवरा. २ जार. ३ मन्मथ. **रमणी स्त्री०** १ तरुण सुंदर स्त्री. २ पत्नी. ३ स्त्री. **रमण न०** १ खेळणें. २ विषयविलास. ३ कामकेली; कामक्रीडा; मैथुन.

**रमणा** [ म० रमणें ] १ लोकांना फिरावयासाठीं किं० आरामांत बसावयासाठीं केलेली बाग,—खाजगी किं० सार्वजनिक. २ दक्षिणा घ्यावयाला आलेल्या ब्राह्मणांना व्यवस्थित रीतीनें बसावयासाठीं केलेलें पटांगण. पेशव्यांचा

रमणा पर्वताच्या पायथ्यास होता तेथें आज रान माजलें आहे. ३ ब्राह्मणांना दक्षिणा वाटणें किं० तदर्थ खर्चलेली पैशाची रकम. ४ अनेक मंडळींनीं गोंधळ किं० गोंगाट ( माजविणें ). [ इ० ).

**रमणीक** [ म० रमण ] वि० रमणीय ( स्थल

**रमणीय** [ सं० ] वि० मनोहर; सुंदर, सुखावह.

**रमणूक** [ म० रमणें ] स्त्री० १ चैनीखातर चालणें किं० हिंडणें किं० भटकणें. २ कोणत्याही प्रकारची करमणूक.

**रमणें** [ सं० रम् ] अ० क्रि० १ कांहीं आनंदायक किं० सुखावह विषयांत तल्लीन होणें. २ रिकामपणांत वेळ गमावणें. ३ रेंगाळत चालणें किं० जाणें. ४ कर्तव्य टाकून मधून मधून रिकामें बसणें. ४ कोणा माणसाशीं सुखदायक संभाषणांत किं० खेळण्यांत वेळ घालविणें. ५ पुरुषानें स्त्रीशीं किं० स्त्रीनें पुरुषाशीं मैथुनार्थ जुळणें. **रमतरमत, रमतेरमते** क्रि० वि० स्वस्थपणें, घाई न करतां विशेष तसदी न घेतां किं० कष्ट न करतां (काम करणें, इ० ). **रमताराम** पु० भटक्या,-विशेषतः तीर्थें पहात पहात हिंडणारा गोसावी.

**रममान, रममाण** [ सं० ] वि० रमलेला; तल्लीन; आनंदित.

**रमराट** [ म० राम+राष्ट्र ] पु० ओंगळ, किं० घाणेरड्या पदार्थांची रास.

**रमल** [ अ० रम्ल् ] न० वाळूवर ( किं० कागदावर ) रेषा काढून भविष्य वर्तविण्याची विद्या. ही जिब्राईलनें दानियलला शिकविली. ॐ **रमली** पु० ही विद्या जाणणारा किं० ह्या विद्येनें भाकितें सांगणारा माणूस.

**रमाविणें** [ म० ' रमणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ सुखविणें; आनंदविणें. २ ( कोणेकाचें ) मनोरंजन करणें. ३ ( कोणेकाची ) कांहीं गोष्टींत चित्तवृत्ति आसक्त करणें. ४ ( मुलाला ) खेळविणें.

**रमा** [ सं० ] स्त्री० १ पत्नी. २ लक्ष्मी,-विष्णूची पत्नी. ३ संपत्ति किं० संपत्तीची देवता. ४ शोभा; कांति. ॐ **रमापति, रमाकांत** पु० विष्णु.

**रमारम, रमारमी** स्त्री० १ खर्च आणि फायदा यांची बरोबरी; नफा नाहीं आणि नुकसान नाहीं अशी स्थिति. २ जितकें पाहिजे तितकेंच ( खाद्य, पेय, कापड, पैसा, इ० चें ) परिमाण; कमी न व्हावें आणि अधिकही न व्हावें इतकें परिमाण; उ० पांच शेरांच्या लाडवांत रमारमी होईल.

**रमूज** [ अ० रमुझ् ] स्त्री० करमणूक; गमत; मौज; खेळ; क्रीडा.

**रम्य** [ सं० ] वि० सुखकर; मनोहर; आनंददायक.

**रयत, रय्यत** [ अ० रईयत् ] स्त्री० १ प्रजाजन,-राजाच्या संबंधांत. २ जमीनीच्या मालकाचें शेत करणारा. ॐ **रयत भाग** पु० जमिन करणाऱ्याला मिळतो तो उत्पन्नाची भाग. **रयतवारी** स्त्री० प्रत्येक कुळाशीं सरकारनें स्वतंत्रपणें साऱ्याचा ठराव करण्याची पद्धति. **रयतानी, रयानी** स्त्री० मालकाच्या शेतावर काम करणारे गडी समुच्चयानें. **रयतावा** पु० १ शेतावर काम करणारे गडी समुच्चयानें किं० त्यांचीं कामें, स्थिति, इ०, किं० त्यांचेंवर बसविलेला सारा.

**रया** [ अ० ' रईयत् ' चें अ० व० रआया ] स्त्री० प्रजा; शेतकरी वर्ग.

**रया** स्त्री० १ किंमत; योग्यता; मान; उ० गवताला जी रया तीहि तुला नाहीं. २ तेज; कांति; चटकदारी; शोभा; उ० ह्या लुगड्याची रया गेली, आतां तें बोहारणीला देऊन टाक; उ० त्या दुखणेकऱ्याच्या तोंडावर कांहीं रया राहिली नाहीं.

**रया, रयात, रयायत** [ अ० रिआयत ] स्त्री० १ कीव; क्षमा; माफी; सूट. २ अदब; मर्द; मुरवत.

**रयानी** वर ' रयत ' मध्यें ' रयतानी ' पहा.

**रर** [ म० ' रडणें ' चें ' र ' हें प्रथमाक्षर ] स्त्री० १ रडणें; पिरपीर; रडगाणें ( करणें ). २ कांहीं काम करण्यांत मंदपणा किं० मंदगति ( करणें ); उ० आमचा मुलगा रर करीत म्याट्रिक्युलेशन तर पास झाला.

**रव** [ सं० ] पु० आवाज; ध्वनि; गुणगुणाट. गोंगाट.

**रव** स्त्री०, **रवण** स्त्री०, न० [ फा० रफ़्तन्=जाणें; रव्=रस्ता ] १ रस्ता. २ परिपाठ;

शिरस्ता; चाल; रूढि. ३ अनुक्रम. ४ मुंग्यांची एका दिशेनें चाललेली ओळ.

**रवका** [ म० रवा ] पु० गोटा, गोळा ( गूळ, चिखल, इ०चा ).

**रवखंदळ** [ म० रवणें+खंदळणें ] स्त्री०,न० १ पराभव; बोऱ्या ( होणें, उडणें, ). २ धक्काबुक्की; मारामारी. ३ सैन्याची शत्रूनें केलेली कत्तल.

**रंवखळ, रंवखळा, रंवखाळा, रंवखळणें** पुढें ' रंवदळ, ' ' रंवदळणें ' पहा.

**रवखांब** [ म० रवी+खांब ] पु० मजल्याची उंची वाढविण्यासाठीं किं० छपर उंच करण्यासाठीं भिंतीच्या गर्भात जे खांब बसवितात ते प्रत्येक. पुढें ' रवी ' पहा.

**रंवटळ, रंवटळा, रंवटळणें** इ० पुढें 'रंवदळ ' ' रंवदळणें ' पहा.

**रवण** स्त्री०, न० वर ' रव ' स्त्री०, ' रवण ' स्त्री०, न० पहा. [ पहा

**रवणदिवली** इ० पुढें ' रोवणदिवली ' इ०

**रंवथ, रवंथ** [ सं० रोमंथ ] पु०, न० आपलें खाद्य प्रथम अर्धवट चावून तें गिळून पोटांत घालून नंतर तें सोयीच्या वेळीं पुन्हा तोंडांत आणून पूर्णपणें चावण्याची गायी, म्हशी, इ०ची क्रिया(करणें).

**रंवथणें, रवंथणें** [ सं० रोमंथ ] अ० क्रि० पशूचे रंवथ करणें. वर ' रवंथ ' पहा.

**रंवदळ** स्त्री०, **रंवदळा, रंवदाळा** पु०[ म० रंवदळणें ] पाणी, चिखल, गवत, इ० तुडाविणें, डिवचणें, किं०कुसकरणें ही क्रिया, किं०ह्या क्रियेनें झालेली पदार्थाचीअव्यवस्था, नासाडी, किं०दुर्दशा ( घालणें, करणें, पडणें, होणें ).

**रंवदळणें, रंवदाळणें** स० क्रि० तुडविणें, डिवचणें, कुसकरणें, ढवळणें ( नासाडी होईल अशा प्रकारें ).

**रंवधें** [ सं० रोमंथ; म० रंवथ ] न० उष्टें खरकटें, माज्यांचा डेखें, केळ्यांच्या सालीं, इ० मनुष्यास उपयोगी न पडणारे जे उच्छिष्ट भाग गायी. म्हशी, इ० ना खाऊं घालतात ते समुच्चयान.

**रवरव** [ सं० ' रौरव' ( एक नरक )चा अपभ्रंश ]रौरव नरक. ꠰ **रवरवनरकवास** पु०अत्यंत असह्य स्थिति किं० परिस्थिति.

**रवरव** क्रि० वि० खूप प्रमाणांत ( नासक्या अन्नांत किडे पडणें ).

**रवरव, रिवरिव** स्त्री० अक्कलकारा पिंपळी, इ० पदार्थ तोंडांत गेल्यानें जी जीभ, गाल, इ० नावेदना होते ती ( सुटणें ). २ विंचू, गांधीलमाशी, इ०च्या दंशाची ठुसठुस.

**रवरवणें** अ० क्रि०( अक्कलकारा, पिंपळी, इ० पदार्थ ) गाल, जीभ, यांना झोंबणें.

**रवरवी** स्त्री० एक झाड,—ज्याचें फूल तोंडांत घातलें असतां जीभ, गाल, यांना असंख्य ठिकाणीं झोंबतें. [ ठसा.

**रवळणें** न० सोनाराचा कांहीं एका कामाचा

**रवळनाथाचें कूळ** [ म० रवळनाथ (शूद्रांचा एक देव)+कूळ(ऋणको किं०नांकेर शेतकरी)]न० आज मिळवावें आणि आज खावें, शिल्कीस कांहीं न पडावें, इतका गरीब माणूस.

**रवळा, रवळी** पुढें ' रोवळा , ' ' रोवळी ' पहा.

**रवा** [ हिं० ] पु० वाळू, बंदुकीची दारू, साखर, इ० चा कण. २ मध किं० कढविलेलें तूप इ० न डिवचतां ठेवून दिलें असतां त्यांत उत्पन्न होतात ज्या जाडी जाडी गोळ्या त्या प्रत्येक किं० समुच्चयानें. ३ गुळाचा खडा. ४ गुळाची ढेप. ५ सोनें चांदी, इ०चा बारीक रज, कण, किं०तुकडा. ६ कणेकडाच्या किं० चाकाच्या मादल्याला किं० तुंब्याला आणि परिघाला जोडणाऱ्या रिपा प्रत्येक. ह्या रिपांना ' रवेकड ' असेंही म्हणतात ७ रंगविलेलें हळकुंड,—गंध, कुंकू; इ० साठीं. ८ गूळ, साखर, इ० चा खडा किं० गोळा. ९सोनाराच्या ' पेरांची आवटी' भांवाच्या ठसांतील खळगा,— ज्यांत सोनें, चांदी, इ०चा पातळ पत्रा ठोकला असतां त्यांत निमगोल फुगा उत्पन्न होतो. १० कणिक, तांदुळाचें पीठ, इ० तील बारीक अंश काढून घेतला असतां जो जाडी अंश राहातो तो. ꠰ **रवा काढणें** वर पांचव्या अर्थाचा रवा तापलेल्या तेलांतून हातानें बाहेर काढणें हा दिव्याचा प्रकार-**रवेकड** [ म० रवा+काष्ठ] न० वर ' रवा ' अर्थ ६ पहा.

**रवानगी, रवानगीचिठ्ठी** पुढें' रवाना' मध्यें पहा.

**रवाना** [फा० रफ्तन्=जाणें; रवानाह् ]**वि०** १ गेलेला. २ जावयास निघालेला( करणें, होणें). ॐ**रवानगी** [ फा० ] **स्त्री०** १ पाठविणें; पाठवणूक; निरोप देणें ( करणें ). २ हाकलून देणें; हाकालपट्टी.३ बाहेर पाठविलेला माल.**रवानगी चिठ्ठी स्त्री०, रवाना पु०** परवाना; परवानगी.

**रवांरास्त** [ फा० रवान् +रास्त ] **वि०** चालू, वहिवाट, शिरस्ता, किं० कायदा यांना धरून असलेला ( कागद, नाणें, इ० ).

**रवांसुदगी** [ फा० रवान् ( चालू ) शुद् ( झाला )+गी ( प्रत्यय ) ] **स्त्री०** १ सरकारशीं झालेले रोखे, करार, सरकारी हुकुम किं० दिलेले परवाने ज्या कागदावर नोंदले जातात तो कागद. २ पावती.

**रवाळ स्त्री०, रवाळणें न०** सोनाराचा एका विशिष्ट कामाचा ठसा.

**रवाळ** [ म० रवा-] **वि०** जाड्या कणांच्या रूपांत असलेलें,म्ह०कणदार(तूप,मध,साखर,इ०).

**रवि** [ सं० ] **पु०** सूर्य. ॐ **रविकांत,रविग्रावा**[सं०ग्रावन्=धोंडा]**पु०**ज्यांत सूर्याचें किरण एका बिंदूंत केंद्रीभूत होऊन विस्तव पडतो असा एक दगड. **रविमंडल न०** सूर्याचें बिंब. **रवितनय, रविपुत्र पु०** १ शनि हा ग्रह. २ यम. ३ सुग्रीव. ४ कर्ण. ५ वैवस्वत मनु. **रवितनया, रविकन्या स्त्री०** यमुना नदी. **रविवार, रविवासर पु०** आठवड्याचा एक दिवस,–शनिवाराच्या पुढचा आणि सोमवाराच्या आधींचा. **रविसंक्रमण न०** १ सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें. २ सूर्याचें मकर राशींत जाणें. ह्या दिवशीं तीळ आणि साखर ( किं० गूळ ) ह्यांचें मिश्रण एकमेकांस देऊन ' तीळगूळ घ्या आणि गोड बोला ' असें म्हणतात.

**रवी स्त्री०** १ दही इ० घुसळण्याचें एक साधन. २ घराचा मजला किं० छपर उंच करावयाचें असतां भिंतीच्या पोटांत जे लहान लहान खांब घालतात ते प्रत्येक ( देणें ). ३ घराच्या तुळयांवरच इंद्रकट दिलें असतां मांडावळ ठेंगणी होते म्हणून त्या तुळयांवर जे दीड दोन हात उंचीचे खांब दऊन उंचीकडचा भाग वाढवितात ते प्रत्येक. मागें ' इंद्र ' मध्यें ' इंद्रकट ' पहा. ४ पखालींत वरून पाणी भरतांना तोंड उघडें राहावें म्हणून बांबूच्या काठ्या एकमेकींस बांधून जें नळकाडें केलेलें असतें तें.

**रवेस, रवेश** [ फा० रविष् ] **पु०, स्त्री०** चाल; रीती; परिपाठ.

**रवैया पु०** पखालींत पाणी भरण्यासाठीं जें वर तोंड केलेलें असतें तें पाणी भरतांना उघडें राहावें म्हणून कामट्यांची जी लांबोडी रचना केलेली असते ती ( घालणें ). वर ' रवी ' चा अर्थ ४ पहा.

**रसना, रशना** [ सं० ] **स्त्री०** १ दोरी. २ लगाम. ३ कंबरपट्टा. ४ तोंडांतील जीभ.

**रश्मि** [ सं० ] **पु०** १ दोरी. २ लगाम. ३ किरण. ॐ **रश्मिमान्, रश्मिमाली** [सं० रश्मिमालिन् ] **पु०** सूर्य.

**रस** [ सं० ] **पु०** १ जिव्हेनें खारट, तुरट, गोड, इ० जो पदार्थांचा धर्म समजतो तो; चव; रुचि. हे धर्म सहा आहेत. २ पान, फूल, फळ, इ० तील पातळ अंश. ३ पाणी. ४ ऊस चरकांत घालून पिळून काढला असतां जें गोड पाणी त्यांतून निघतें तें. ५ आवड; इच्छा. ६ प्रीति; प्रेम; अनुराग. ७ शृंगार. ८ आनंद; सुख. ९ ( **साहित्य** ) अंतःकरणाच्या वृत्तीचें कांहीं कारणानें उद्दीपन होतें आणि ह्या उद्दीपित झालेल्या वृत्तीच्या अनुभवानें किं० अवलोकनानें अनुरूप विचार प्रकट करण्याची प्रेरणा होते तिला रस म्हणतात. रस नऊ आहेत. शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बभित्स, रौद्र, आणि शांत. १०पदार्थाचें सत्त्व किं० सार. ११ शरीरांतील रक्त इ० द्रव पदार्थ. १२ अन्नाचें रक्त व्हावयाच्या पूर्वीचें रूपांतर. १३ पुरुषाचें वीर्य किं० रेत.१४ पारा. १५ दूध. १६ झाडाचा चीक. १७ गंधक. १८ भाषण, कथा, इ० तील गोडी किं० आकर्षण करण्याचा गुण. १९ व्यवहार, व्यापार, इ० तील मोहकपणा. २० सोनें, चांदी, इ० ची अग्निसंयोगानें झालेली द्रवरूप स्थिति. ॐ **रसायन** [ सं० रस+अयन ] **न०** पारा, गंधक, इ० चा रांधा इ० करून जो मात्रा इ० पदार्थ वैद्यलोक करतात तो. **रसायनी औषध न०** खनिज औषध. **रसायनशास्त्र न०**

पदार्थांचे गुणधर्म ठरविणें, भिन्नभिन्न पदार्थांच्या संयोगापासून नवीन पदार्थ काय होतात हें पाहाणें, त्याचा उपयोग काय होईल हें पाहाणें, इ० संबंधाचें शास्त्र. **रसात्मक** वि० १ चवदार. २ रुचकर. ३ सदभिरुचीसंबंधाचा. ४ ज्यानें अंतःकरणाच्या वृत्तींचें उद्दीपन होऊन श्रोत्याला आनंद होतो असें ( काव्य ). **रसाब्ध** पु० टरपिन तेल. **रसाभास** पु० काव्य, नाटक, भाषण, इ० चे ठायीं प्रवर्तमान जो शृंगारादि रस असतो तो पुरता व्हावयाच्या अगोदर वेगळ्या रसाचें त्यांत संक्रमण झाल्याकारणानें होते जी रसाची दुर्दशा ती. **रसायनाकर्षण** न० दोन किं० अधिक मूलतत्त्वांस एकत्र करून नवा पदार्थ उत्पन्न करणारी शक्ति. **रसेंद्र** पु० १ पारा. २ परीस. **रसोन, रसोनक** पु० लसूण. **रसकर्पूर, रसकापूर** पु० एक औषधोपयोगी पदार्थ. **रसज्ञ** वि० दर्दी; मार्मिक; वस्तूची खुबी जाणणारा. **रसज्ञता** स्त्री०, **रसज्ञतावात, रसज्ञानवात** पु० वात, पित्त, आणि कफ, ह्या तीहांपैकीं वातामध्यें बिघाड होऊन चव किं० रुचि ह्यांच्या ज्ञानाशिवाय इतर ज्ञान लोपतें ही विकृति. **रसज्ञता** स्त्री० मार्मिकपणा; दर्दीपणा. **रसांजन** १ जस्ताचें फूल. २ अंजनविशेष; पितळ तापवितांना निघणारें किटण. ३ दारू हळदीचा अष्टमांश काढा आणि सममाग शेळीचें दूध हीं एकत्र आटवून केलेलें अंजन. **रसप्रबंध** पु० काव्य, नाटक, इ० रचना. **रसशास्त्र** न० १ किमया. २ रसायनशास्त्र (वर पहा). **रससिंदूर, रसशेंदूर** न० पारा, गंधक, आणि नवसागर, यांचें रसायनविशेष. **रसभंग** पु० १ वर अर्थ९ च्या रसाचा अपकर्ष करणारी कांहींही गोष्ट. २ सुखाच्या प्रसंगीं कांहीं दुःखकारक गोष्ट घडून आल्यानें होतो तो हिरमोड किं० निराशा. **रसभरित** वि० १ रसाळ (आंबा इ० ). २ चटकदार, आनंददायक, रंगेल (भाषण). **रसभरू** वि० ज्यांत पुष्कळ रस आहे असा ( आंबा, ऊस, इ० ). **रसभोजन** न० आंब्यांचा रस ज्यांत मुख्य खाद्य आहे असें ब्राह्मण किं० मित्रमंडळी यांना दिलेली मेजवानी. **रसरंग** [ सं० रस+रंग ] पु० मकरसंक्रांतीच्या दिवशीं गूळ आणि कुंकूं हीं द्रव्यें दोन पात्रांत घालून सुवासिनी एकमेकांना किं० ब्राह्मणाला देतात तें दान. **रसरशीत** वि० पुष्कळ रस ज्यांत आहे असा ( आंबा इ० ). खालीं ' रसरशीत ' स्वतंत्र शब्द पहा. **रसवंती** [ सं० रसवती ] स्त्री० १ भाषण. २ वक्तृत्व. ३ जीभ. ४ एक वनस्पती. **रसविक्रय** पु० तेल, लोणी, दहीं, मसाला, साखर, मीठ, इ० पदार्थांची विक्री. **रससिद्धि** स्त्री० किमया. **रसिक** वि० १ मर्मज्ञ; दर्दी. २ थट्टा, विनोद, इ० करून आपलें आणि लोकांचें रंजन करण्याच्या स्वभावाचा ( मनुष्य ).

**रसकणें** [ म० रस ] अ० क्रि० मन रंजविणाऱ्या उद्योगांत गुंतलेलें असणें.

**रसकस** [ म० रस+कस ] पु० कौमार्याचा बहर ( येणें, जाणें ),

**रसकस** स्त्री० १ बोलाचाली; भांडण (चालविणें ). २ ताप येण्याच्या पूर्वी अंग मोडून येणें, ( येणें, वाटणें ). ३ अंगावर येतात ते शहारे.

**रसकसणें** अ० क्रि० १ तापाच्या पूर्वी (अंग) मोडून येणें. २ भांडणें; एकेरीवर येणें.

**रसखुंटणा** पु० सोनें, चांदी, इ० चे तुकडे पाडण्याची छन्नी.

**रसघस** स्त्री० घासाघीस; जिकीर; पिरपिर. ( लावणें, मांडणें, करणें ).

**रसद, रस्त, रसूद** [ फा० रसद् ] स्त्री० १ मामलतदारानें एकादा परगणा मक्त्यानें किं० खंडानें घेतला असतां त्याला सरकारांत जी रकम आगाऊ भरावी लागते ती. २ गांवचा किं० प्रांताचा कमावीसदार, महालकरी, इ० अधिकारी रयतेपासून पैसा घेऊन सरकारांत भरतात तो. ३ सैन्याच्या उपयोगासाठीं साठविलेलें किं० पाठविलेलें धान्य, दारूगोळा, तंबू, जनावरें, इ० सामान वगैरे. ४ बाहेर लढावयाला पाठविलेल्या सैन्याबरोबरचा खजीना. ५ पेढीवाल्यानें आपला गुमास्ता, मुनीम, किं० पातीदार यांचे कडे पाठविलेला पैसा. ६ सैन्याबरोबर जाणारें सामानसुमान, जनावरें, बाजारबुणगें, इ०. ७ माणसें, जनावरें. इ० चा चाललेला तांडा. ❀ **रसदभरणा** पु० १ मामलती संबंधानें सरकारांत जी रसद भरली जाते ती. २ सैन्याच्या उपयोगासाठीं दारूगोळा, धान्य, कपडे, जनावरें, इ० जी सामग्री तिचा पुरवठा किं० ती पुरविणें.

**रसदी** वि० सरकारास अमुक रकम द्यावी अशा शर्तीवर मक्त्यानें घेतलेला ( गांव इ० ).

**रसना** [ सं० ] स्त्री० १ जीभ. २ लगाम. ३ दोरी. ४ कंबरपट्टा. ५ करगोटा. ह्या सर्व अर्थी ' रशना ' सुद्धां. मागें ' रशना ' पहा. ※ **रसनेंद्रिय** न० जीभ,–चव घेण्याचा आणि बोलण्याचा मुखांतील अवयव. [ओझें.

**रसपें** न० धान्य इ० चें गाढवावर लादलेलें

**रसबाळी,रसबेळी, रसबेळ** स्त्री० एक प्रकारची केळ. **रसबाळें, रसबेळें** तिचें फळ.

**रसरशीत, रसरसीत** वि० १ रसानें भरलेला ( आंबा इ० फळ ). २ ऐन ज्वानींत आलेला ( पुरुष इ० ). ३ जळजळीत ( निखारा, अग्नि ).

**रसरसणें** अ० क्रि० १ रसानें ( फळ ) भरलेलें असणें. २( अग्नि ) प्रज्वलित झालेला असणें. ३ ( डोळे, अंग ) तापलेलें असणें ४ तारुण्याच्या उमेदीनें आणि सामर्थ्यानें ( मनुष्य, पशु ) युक्त झालेला असणें. ४ ( देदी, गळूं, इ० ची ) पूर्ण वाढ झालेली असणें. ५ ऋतुविशेषांत ( फळें, शेंगा, इ० ) वैपुल्यानें उत्पन्न होणें.

**रसवडी** स्त्री० हरभऱ्याच्या पिठांत तिखटमीठ इ० घालून केलेलें एक खाद्य.

**रसवंती, रसवती** [ सं० रसवती ] स्त्री० १ वक्तृत्व. २ जीभ. ३ एक झुडूप. ४ स्वयंपाक करण्याचें कौशल्य किं० खुबी. मागें ' रस ' मध्यें " रसवंती ' पहा.

**रसा** [ सं० रस ] स्त्री० मसाले घालून तोंडीं लावावयाला केलेलें पाणी.

**रसा** [ सं० ] स्त्री० १ पृथ्वी. २ जीभ. ३ वाणी; भाषण. ※ **रसातल** न० सात पातालांपैकीं एक. खालीं ' रसातल ' स्वतंत्रपणें पहा.

**रसांजन** न० मागें 'रस' मध्यें 'रसांजन' पहा.

**रसाणें** न० प्रज्वलित निखारे किं० अग्नि.

**रसातल** [ सं० ] न० सप्त पातालांपैकीं एक. मागें ' रसा ' मध्यें पहा. ※ **रसातलास जाणें** अ० क्रि० नाश पावणें; विध्वस्त होणें; नामशेष होणें. **रसातलास पोंचविणें** स० क्रि० विध्वस्त करून टाकणें; बुडवून टाकणें; नामशेष करणें.

**रसानगी** स्त्री० दुसऱ्याच्या मुखानें किं० चिठ्ठीनें दिलेली परवानगी.

**रसाल,रसाळ** [ सं० रसाल ] पु० आंब्याचें झाड. **रसाल, रसाळ** वि० १ रसभरित (आंबा इ०). २ आनंदविणारें, रंगेलपणाचें, किं० विनोदी ( भाषण, वाणी ). **रसाळ** वि० ज्यांत रस पुष्कळ आहे अशी ( शिजविलेली भाजी ).

**रसासणें** अ० क्रि० १(अग्नि) प्रज्वलित होणें. २ तापांत ( अंग ) अति तापलेलें असणें.

**रसाळ** वर ' रसाल ' पहा.

**रसाळी** स्त्री० उसांचा रस काढण्याच्या चरकाचे नवरा आणि नवरी हे अवयव ज्या दोन तक्त्यांत फिरतात त्यांपैकीं खालचा तक्ता.

**रसिक** [ सं० ] वि० १ चवदार; रुचकर. २ काव्य, नाटक, भाषण, इ० तील मर्म जाणणारा; मर्मज्ञ; दर्दी. ३ रंगेल; कामुक.

**रसीद** [ फा० ] स्त्री० पावती; पोंच.

**रसुली** स्त्री० घोड्याच्या पायावर खुराजवळ उत्पन्न होतात तीं टेंगळें किं० गळवें प्रत्येक.

**रसूम** [ अ० रस्म् ए० व० चाल; **रसूम** अ० व० चाली ] पु० जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांना हक्क म्हणून जें द्यावयाचें तें.

**रस्त** स्त्री० मागें ' रसद ' पहा.

**रस्ता** [ फा० रस्ताह् ] पु० मार्ग; वाट. ※ **रस्तेबंदी** स्त्री० रस्ते नवीन करणें किं० जुनें रस्तें दुरुस्त करणें किं० त्या संबंधाचें कोणतेंही काम. **रस्तोंरस्तीं** क्रि० वि० प्रत्येक रस्त्यांत किं० रस्त्यावर. [ खंड; जाडी दोरी.

**रस्सा** [ हिं० रस्सा; सं० रश्मि ] पु० दोर-

**रस्सी** [ हिं० रस्सी, सं० रश्मि ] स्त्री० दोरी; सुतळी.

**रह, रहा** [ फा० राह्=रस्ता ] स्त्री० १ वाट; रस्ता. २ तऱ्हा; रीत. ३ चाल; परिपाठ. ४ कोणेकाचा वर्तनक्रम. ※ **रहादार** पु० १ वाटसरू; मुसाफर. २ मालाची वाहतूक करणारा. ३ मार्गरक्षक,–मांग, रामोशी, इ०. **रहदारी** स्त्री० कोणेका रस्त्यानें जाण्यायेण्याची वहिवाट किं० रस्त्यानें जाणारे येणारे लोक, जनावरें, गाड्या, इ० समुच्चयानें. **रहदारीची जकात** स्त्री० विशिष्ट रस्त्यानें जाणाऱ्या गाड्या, जनावरें, माल, इ० वर सरकारनें बसविलेला कर. **रहगुजरी** पु० १ वाटसरू; फिरस्ता. २ वाटसरूंची वर्दळ.

**रहारीत** स्त्री० चालरीती. **रहारास्त** वि० सरळ, यथायोग्य, उचित, सभ्याचारास अनुसरून असलेलें ( भाषण, वर्तन, काम, इ० ). **रहाळ** स्त्री०, पु०, **रहाळी** स्त्री० १ दृढ परिचय; घरोबा; दळणवळण. २ कांहीं कामाची सरणी किं० परिपाटी. ३ जाणाऱ्या येणाऱ्या माणसें, गाड्या, जनावरें, इ० ची वर्दळ. **रहासाळी, रहसाळी** स्त्री० प्रेमाचा घरोबा किं० दळणवळण किं० परिचय. [( कवितेत ).

**रहंवर** [ सं० रथवर ] पु० उत्तम रथ

**रहवास** [ म० राहाणें+वास ] पु० १ परिपाठ किं० सवय किं० यांच्या योगानें प्राप्त झालेली सफाई. २ कोणेक स्थळीं कोणेकाचें राहाणें किं० वसति. ह्या अर्थी 'रहिवास' सुद्धां. ३ दळणवळण; व्यवहार. ४ रिवाज; परिपाठ. ꣸ **रहवासी, रहिवासी** पु० कोणेक स्थळीं कायमचा राहाणारा.

**रहसाळी** [ सं० रहस्य ] स्त्री० प्रेमाचा घरोबा; मैत्रीचा संबंध; दृढ मैत्री.

**रहस्य** [ सं० ] न० १ गुप्त गोष्ट; मर्म. २ अंतस्थ बातमी. ३ गुरुमुखानेंच मिळणारी विद्या किं० कला. ४ उपनिषद्. ५ लोकांच्या लक्ष्यांत सहज न येणारी वस्तूच्या ठायींची कांहीं खुबी. ६ दोन माणसांचा एकमेकांनीं एकमेकाना आपल्या गुप्त गोष्टी सांगण्याइतक्या पल्ल्यापर्यंतचा स्नेहसंबंध. ७ भाषणांतील खुबी, गूढ अर्थ, किं० मुद्दा; भाषणाचा कटाक्ष किं० धोरण. ८ फायदेशीरपणा; आकर्षक गुण; उ० तंबाखूच्या धंद्यांत आतां कांहीं रहस्य राहिलें नाहीं. ꣸ **रहस्यस्थान, रहःस्थल** [ सं० रहस्+स्थल] न० गुप्त जागा किं० ठिकाण.

**रहा** वर ' रह ' पहा.

**रहाकळ, राहकळ** न०, स्त्री० १ भ्यालेल्या किं० घाबरलेल्या गुरांढोरांचें सैरावैरा पळत सुटणें. २ भांडणाऱ्या किं० मारामारी करणाऱ्यांची दंगल.

**रहाट, राहाट** [ सं० अर ( चाकाच्या आऱ्या ) + घट्ट ( रचना ); हिं० रहट् ] पु० विहिरींतून पाणी काढणें, कापूस, लोंकर, इ० चें सूत काढणें, दोरी वळणें, इ० कामें करण्याचीं जीं चाकाच्या वर्तुलाकार गतीनें फिरणारीं यंत्रें तीं प्रत्येक. हीं यंत्रें भिन्न कामीं भिन्न प्रकारचीं असतात. ꣸ **रहाट गाडगें** न० १ विहीर, तळें, नदी, इ० तून पाणी उंचावर नेण्याचें मातीचे किं० धातूचें मोघे यांची माळ ज्यावरून लोंबत सोडलेली असते असें माणसानें किं० जनावरानें फिरवावयाचें यंत्र. **रहाटवड** स्त्री० ह्या यंत्राला लागणारे वांसे, कामट्या, दोऱ्या, मोघे, इ०. **रहाटगाडगें** न० ( लाक्षणिक )उत्कर्ष अपकर्ष, चढ उतार, जन्ममरण, हानि लाभ, यांची परंपरा जी आजार, जीवनयात्रा, इ० मध्यें चाललेली असते ती. **रहाटपाळणा** पु० जत्रेमध्यें मुलांना बसावयासाठीं चार पाळणें अनेक वेळां उंचावर जाऊन खालीं उतरून पुन्हा वर जाणारे ज्या रचनेंत केलेले असतात ती. **रहाटवणी** [ म० रहाट +पाणी ] न० राहाटगाडग्यानें शेंदून काढलेलें पाणी,-नदीचें वाहून आणलेलें पाणी याच्या व्यावर्तकत्वें. **रहाटागर** [ म० रहाट+अगार(घर,जागा)] रहाटगाडग्याच्या पाण्यावर केलेला मळा, शेत, बाग, इ०. **रहाट्या** पु० १ रहाटगाडगें फिरविणारा मनुष्य किं० पशु. २ सोंगट्या इ० मध्यें दोन्ही बाजूस खेळणारा गडी. ३ सामाजिक किं० धार्मिक बाबत, इ० मध्यें एकदा एक पक्ष, नंतर दुसरा पक्ष, नंतर तिसरा पक्ष, अशा प्रकारें राजकारण स्वीकारणारा चंचल बुद्धीचा माणूस; दोहों मांडवाचा वऱ्हाडी. ४ संस्था, पेढी, इ० चा चालक. ५ विवाहादि प्रसंगी कांहीं द्रव्य न घेतां खटपट करणारा माणूस. ६ वेठबेगारीसाठीं पकडलेला माणूस. **रहाटी** स्त्री० लहान पाकरहाट. खालीं ' रहाटी ' स्वतंत्र प्रतीक पहा.

**रहाटणें** [ म० रहाट ] अ० क्रि० अभ्यास, सवय, किं० परिपाठ, यांच्यामुळें ( कोणी माणूस) कांहीं कामांत परिचित होणें किं० रुळणें किं० तें काम करण्याची त्याला हातोटी साधणें किं० त्याला सफाई प्राप्त होणें.

**रहाटी** [ म० रहाट ] स्त्री० १ माणसानें पायांनीं चालवावयाचें रहाटगाडगें. २ पूर्वीपासून चालत आलेला प्रघात, रूढि, किं० परिपाठ. ३ कोणेकाची दररोजच्या कर्तव्यांची सरणी. ४ कोणेकाचा वर्तनक्रम. ५ संस्था, पेढी, कारखाना.

इ० तील कामकाजाची सरणी. ६ आंबा, बाभळी, सुरमाड, इ० झाडांची निबिड राई. ७ चिखल; चिखलाचें डबकें.

**रहाड, रहाडी** स्त्री० १ होळीच्या उत्सवांत ज्या चिखल, राख, इ० च्या खळग्यांत पोरें नाचतात तो. २ जमीन, रस्ता, इ० वरचा चिख-,—ज्यावरून चालतांना पाय निसरतो. ३ चिखल ( सामान्यतः ). ४ गूळ, कुजकीं फळें किं० भाज्या, यांचा ढीग.

**रहाडी** स्त्री० कल्पकाची एक पातळ जात.

**रहाण** नं० १ कोण्या माणसाला वश करून आपल्या बाजूस आणण्यासाठीं भुताला त्याचेकडे पाठविणें हा समारंभ ( घालणें, माजविणें ). २ मृत मनुष्याबद्दल विलाप करण्याचा कल्कलाट.

**रहाणी, राहणी, राहाणी** [म० रहाणें, राहणें, राहाणें ] स्त्री० कोणेकाचा राहाण्याचा प्रकार, परिपाठ, शिरस्ता, इ०.

**रहाणें, राहणें, राहाणें** अ० क्रि० १ मनुष्य, पशु, पदार्थ, इ० नीं विशिष्ट स्थळीं, विशिष्ट स्थितींत, किं० विशिष्ट सरणींत स्थिर होणें किं० असणें; उ० मी हल्लीं पुण्यास राहातों; उ० तो कंजूषपणानें राहातो; उ० गोविंदराव एका बेळच्या जेवणावर राहातात. २ समावणें; समाविष्ट होणें; मावणें; उ० ह्या भांड्यांत शेरभर तूप राहाणार नाहीं. ३ थांबणें; बंद होणें; बंद पडणें; उ० पाऊस आतां राहिला; उ० माझ्या गळ्याचा ठणका राहिला. ४ रहित होणें; तहकूब केलें जाणें; उ० यंदा रामूचें लग्न व्हावयाचें होतें पण तें राहिलें. ५ अपूर्ण किं० अर्धवट स्थितींत टाकलें किं० सोडलें जाणें; उ० तो आल्यामुळें तांदूळ निवडण्याचें माझें काम राहिलें. ६ शिल्लक किं० शिलकीस पडणें; खर्च न होतां उरणें; उ० पंक्तीत लाडू वाटून पन्नास राहिले; उ० प्रपंच भागवून ब्यांकेंत घालावयाला या महिन्यास माझ्या पगारांतून बत्तीस रुपये राहिले. ७ कांहीं करण्यापासून निवृत्त किं० पराङ्मुख होणें; उ० तूं त्याला शिवी दिलीस तर तो तुझ्या मुसकटांत चार लगावल्याशिवाय राहाणार नाहीं. ८ कांहीं काम करावयासाठीं नोकर, मदतनीस, किं० सहागार, ह्या नात्यानें कोणेक स्थळीं किं० कोणेकापाशीं असणें; उ० सीताबाई कालपासून आमच्या येथें स्वयंपाकाला राहिल्या. टीप:— 'राहाणें' ह्या क्रियापदाचे कांहीं वाक्प्रचार खाली देतों. **राहून राहून** क्रि० वि० वारंवार; पुनः पुनः; मधून मधून; उ० विठूला राहून राहून वेडाचे झटके येतात; उ० शारदाबाईच्या डोळ्यांना मृत पुत्राबद्दल राहून राहून पाणी येतें; उ० वनभोजनाच्या प्रसंगीं आम्हाला राहून राहून तुमची आठवण होत होती. टीप—'राहिले' ह्याचा उद्गारवाचक अव्ययाप्रमाणें संभाषणांत उपयोग केला जातो. त्याचा अर्थ 'बरें तें असो!' ''माझें म्हणणें मी परत घेतों'' 'तें आपण सोडून देऊं!' इ०. **राहातां राहाणें** अनेक कामीं खर्च होऊन कांहीं बाकी उरणें. **राहतें घर** न० ज्या घरांत कोणेकाचें वास्तव्य असतें तें,—गांवांतील त्याच्या मालकीचीं असलेलीं जीं इतर घरें त्यांच्या व्यावर्तकत्वें.

**रहाळ** स्त्री० विशिष्ट प्रांत, परगणा, टापू, मुलूख इ०; उ० पुणें रहाळ, नाशीक रहाळ, रत्नागिरी रहाळ, इ०.

**रहाळणें** [ म० रहा, रहाळ ] अ० क्रि० १ परिचित होणें; घरोब्याच्या संबंधानें कोणेकाशीं जुळणें. २ कांहीं कामांत सफाई मिळविणें किं० वहिवाटणें.

**रहाळसाळ, रहाळसहाळ** [ म० रहाळणें +शाळ ( शाला ) ] वि० १ चारचौघांत मिसळणें, मोकळ्या मनानें बोलणें, थट्टामस्करी करणें, इ० ज्याला आवडतें असा. २ मोकळ्या मनानें केलेलें ( भाषण, संभाषण, वाद, इ० ). ३ सभ्य, संभावितपणाचें ( वर्तन ).

**रहित** [ सं० ] वि० १ सोडलेला; वर्जिलेला; उ० गुणरहित म्ह० गुणांनीं सोडलेला किं० ज्याच्या अंगीं कांहीं गुण नाहींत असा; ह्याच सरणीनें सत्त्वरहित, धैर्यरहित, इ०. २ बंद केलेला; थांबविलेला किं० रद्द केलेला. पुढें 'रहीत' पहा.

**रहिवास** [म० राहणें+वास ] पु० वास्तव्य; राहाणें; वसति. ❀ **रहिवासी** वि० कोणेक स्थळीं वसति करून राहणारा.

**रहिवासणें** [ म० राहणें+वसणें ] अ० क्रि० राहाणें; कोणेक स्थळीं वसति; वसति करून असणें.

**रहिवासी** वि० वर ' रहिवास ' मध्यें पहा.

**रही** [ फा० राह्=रस्ता ] स्त्री० मुंग्या इ०ची चालत असलेली रांग; रघ; ओळ.

**रहीत** [ सं० रहित ] वि० १ बंद केलेला; थांबविलेला; रद्द केलेला. २ शिल्लक राहिलेला; मागचा पुढें ओढलेला (खर्च, हिशेब, रक्कम, इ०).

**रहू** पु० पेरण्यासाठीं भिजवून मोड आणलेलें धान्य. पुढें ' रोहू ' पहा.

**रहोपहो** पु० पुढें ' रोहोपोहो ' पहा.

**रळफळ** स्त्री० १ अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा; गुंतागुंत. २ अस्वस्थपणा; अशांतता. ३ कुरबुर; तंटाबखेडा; पिरपिर.

**रळी** स्त्री० १ खेळांत लबाडी किं० खोटेपणा. २ खेळांत चिरडीस जाणें ( खाणें, जाणें, घेणें, खेळणें ).

**रळी** स्त्री० १ प्रेमानें किं० लडिवाळपणानें मुलानें किं० कोण्या माणसानें आईबापांशी किं० दुसऱ्या कोणापाशीं केलेली आग्रहाची विनंती किं० मागणी ( घेणें ); उ० माझ्या नातीनें जिनगरी बाहुली बद्दल कालपासून रळी घेतली आहे; उ० आईबाप मुलांची रळी पुरवितात; उ० माझ्या पुढें तुझी रळी चालणार नाही. २ कुचके भाषण, वक्रोक्ति, व्याजोक्ति, इ०चा कोणेकावर भडिमार.

**रक्षक** [ सं० ] वि० १ रक्षण करणारा. २ पालक. ३ पहारेकरी. [ठेवणें.

**रक्षण** [ सं० ] न० संभाळणें; संगोपन, जपून

**रक्षणें, रक्षिणें** [ सं० रक्ष् ] स० क्रि० जतन करून ठेवणें; राखणें; शाबूत ठेवणें. ॐ **कोणाला रक्षरक्ष होणें** मला बचावा, मला बचावा, असें म्हणण्याइतक्या विपन्नावस्थेस त्याणे येणें.

**रक्षा** [ सं० ] स्त्री० १ रक्षण; जोपासना. २ सुरक्षितपणा. ३ मंत्राचा ताईत. ४ श्रावणी पौर्णिमेला हातांत बांधतात ती राखी. ५ राख; भस्म. ६ लाख. ७ भुतांखेतांच्या निवारणासाठीं मनगटांत बांधतात तो मंतरलेला दोरा किं० ताईत. ८ प्रसूत स्त्री आणि तिचें मूल यांच्या गळ्यांत ईडापीडा टाळण्यासाठीं सहाव्या दिवशीं सटीची पुजा करून तिला वाहून बांधतात ते दोरे. ९ राख; रखेली; ठेविलेली रांड. ॐ **रक्षागृह** न० बाळंतिणीची खोली. **रक्षाबंधन** न० श्रावणी पौर्णिमेस हातांत राखी बांधणें हा विधि.

**रक्षिक** [ सं० ] पु० १ पालक. २ पहारेकरी.

**रक्षिका** स्त्री० १ मंत्राचा ताईत. २ रक्षिणारी स्त्री.

**रक्षित** [ सं० ] वि० रक्षिलेलें; संभाळून ठेविलेलें.

**रक्षी** [ सं० रक्षिन् ] पु० १ संरक्षक; पालक. २ पहारेकरी; रखवालदार.

**रक्ष्य** [ सं० ] वि० १ रक्षिण्यास योग्य. २ जें जतन करणें जरूर आहे असें.

**राई** [ सं० राजिका=काळी मोहोरी ] स्त्री० मोहोरी हें बीज,–फोडणी, पोटीस, इ० च्या उपयोगाचें. ॐ **राईचा पर्वत करणें** लहान काम, प्रकरण, गोष्ट, इ० ला मोठें रूप देऊन सांगणें; फुगवून किं० अतिशयोक्ति करून सांगणें.

**राई** [ सं० राजि=ओळ ] स्त्री० आंबे इ० च्या झाडांचा निबिड समुदाय; उ० आंबराई.

**राईभोग, रायभोग** पु० तांदुळाची एक जात.

**राउटी, राहुटी, रावटी** स्त्री० प्रवासांत जें तात्पुरतें राहाण्यासाठीं कापडाचें घर उभारतात तें.

**राऊत** [ म० राव+दूत ] पु० १ घोडेस्वार. २ मांग जातीच्या इसमास देतात ती बहुमानाची पदवी; उ० विठू राऊत.

**राऊळ** [ म० राव+कुळ ] न० १ राजवाडा. २ मोठा वाडा. ३ देऊळ. ॐ **देऊळ राऊळ** न० देऊळ इ० पवित्र स्थळ.

**राऊळ** पु० भैरोबाची सेवा करणारी शूद्रांची एक जाति किं० त्या जातीचा कोणीही इसम. कोष्ट्यांच्या मागासाठीं ते फण्या, कुंचे, इ० पदार्थ करतात.

**राकट, रांकट** [ म० रानवट ] वि० मजबूत असून कष्ट सोसावयाला समर्थ ( माणूस, पशु ). ॐ **राकटाई** स्त्री० कष्ट सोसण्याची ताकद.

**राख** [ सं० रक्षा ] स्त्री० गोवरी, लाकूड, कोळसा, इ० जळून गेल्यावर अवशिष्ट राहातो जो त्यांचा पांढुरका अवशेष; भस्म; राखुंडी. राखेच्या गोळ्याला ' ढेपसा ' म्हणतात. ॐ **राखामंडल, राखमंडल** न० १ राखेचा ढिगारा. २ राख इतस्ततः पसलेली असल्यामुळें विशोभित झालेली जागा. **राखरांगोळी** स्त्री० ए० व० नासाडी; पूर्ण विध्वस; सत्यानाश. **राखवड, राखाड,**

**राखाडी स्त्री०** १ राखेचा ढीग. २ राखेमुळें विशोभित झालेली जागा. **राखाडी स्त्री०** राख. **राखांदुळी स्त्री०** मुतांखेतांनीं बाळंतिणीच्या खोलींत न यावें म्हणून तिच्या खोलीच्या बाहेर दाराशीं राखेचें भांडें ठेविलेलें असतें तें.

**राख** [ म० राखणें ] **स्त्री०** पैसे देऊन किंवा फुकट कोणेकानें स्वताच्याच उपभोगार्थ ठेविलेली रांड.

**राखडी स्त्री०** स्त्रियांचा डोकीत घालावयाचा एक दागिना.

**राखण** [ सं० रक्ष्; म० राखणें ] **स्त्री०** १ रक्षण; जतन करण्याची क्रिया; हरएक प्रकारच्या उपद्रवांपासून कांहीं वस्तु, मनुष्य, जनावर, इ० चें संरक्षण करण्याची क्रिया. २ पहारा करावयासाठीं ठेविलेला गडी. ह्या अर्थी **पु०,स्त्री०**.३ पहाऱ्यासाठीं ठेविलेल्या माणसास देतात तो पगार. ४ गांवच्या मुतांखेतांनीं आपणास उपद्रव देऊं नये म्हणून दर महिन्यास किंवा दर वर्षास त्यांना नारळ इ० जें अर्पण करतात तें. ५ टोळधाड, पटकी, उंदीर, रोग, इ० कांपासून माणसें, जनावरें, शेतें, इ० ना उपद्रव होऊं नये म्हणून मंत्र, तंत्र, नवस, इ० उपायांनीं बंदोबस्त करतात तो ( लावणें, करणें, लागणें ). ६ संसारांत अवश्य लागणारे जे पैसे, तांदूळ, इ० पदार्थ त्यांचें थोडथोडे परिमाण,—जें अत्यन्त अडचणीच्या वेळीं मात्र उपयोगांत आणावयाचें म्हणून बाजूस काढून ठेविलेलें असतें तें; उ० माझ्या पेटींत मी राखण म्हणून तीन रुपये ठेवीत असतों; उ० साळूबाई ताह्मणकर हिच्या घरांत पावशेर तूप राखण ठेविलेलें असावयाचेंच;उ०सगळे दाणे खर्चू नका, घरास राखण म्हणून दोन पायल्या तरी ठेवून द्या. ६ अत्यंत कुरूप म्हातारी,—जिच्या अंगीं घरांतील मुली आणि बायका ह्यांचें भुतांखेतांपासून निवारण करण्याचें सामर्थ्य असतें अशी अडाण्यांची समजूत असते. ॐ **राखण लागणें** लांबणीवर पडणें; उ० तूं आपले सदरे तुकाराम शिंप्याकडे शिवावयास दिले आहेस ना ? आतां सहा महिन्यांची राखण लागली ( ह्म० सहा महिने तो तुला सदरे शिवून देणार नाहीं ). **राखणकरी, राखणदार, राखणा, राखणेकरी, राखणाईत पु०** १ पहारा करावयास ठेविलेली गडी. २ गुरें राखणारा; गुराखी. **राखणावळ, राखावळ स्त्री०** १ संभाळणें; जतन करणें. २ घर इ० वर देखरेख किंवा ह्या देखरेखीबद्दल गड्याला दिलला पैसा. ३ गुरें ढोरें राखणें किंवा ह्या बद्दल दिलेला पैसा. **राखणी स्त्री०** राखणें, संभाळणें, किंवा जतन करणें हें काम किंवा ह्या कामाबद्दल दिलेला पैसा.

**राखणें** [ सं० रक्ष् ] **स० क्रि०** १ रक्षिणें; संरक्षिणें; जतन करून ठेवणें. २ न खर्चतां ठेवणें; पूर्णपणें उपयोगांत न आणणें; शिलक ठेवणें;राहूं देणें; उरविणें. ३ अंगांतील शक्ति किंवा वादांत आपल्या बाजूचे मुद्दे सगळे एकदम प्रतिपक्ष्याविरुद्ध न योजतां शक्ति आणि कांहीं कांहीं मुद्दे शिलक राहूं देणें. ४मारणें,खाणें,चालणें,पिणें,इ० मध्यें अतिरेक न करणें; उ० हात राखून मुलाला मारावें. ५ हौसेसाठीं ( केस, मिशा, शेंडी, मुलांचीं झुलपें,घेरा,इ०)विशिष्ट आकारांत ठेवणें. ६संभाळणें;जोपासणें;उ०राखील त्याचें घर आणि खपेल त्याचें शेत. ७ ( रखेली किंवा जार ) पैसे देऊन किंवा फुकट उपभोगार्थ ठेवणें. ८ संकल्पांत, योजनेंत, किंवा बेतांत समाविष्ट करणें; उ० ही भिंत इतकी रुंद राखण्याचें कांहीं कारण नव्हतें; उ० हा अंगरखा तूं घेरांत फार राखलास म्हणून बाह्या तोकड्या झाल्या. ॐ **राखणावळ,राखणेकरी** इ० मागें ' राखण ' मध्यें पहा.

**राखले** [ म० राखणें; गुजराथी राखले ] **स्त्री०** हुंडी विकत घेणाराची पत, ऐपत, स्थिति, लौकिक, इ०; उ० त्या हुंडीमध्यें माझी राखले घातली होती.

**राखी** [ सं० रक्षा ] **स्त्री०** श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं हातांत बांधतात दोरा. मागें ' रक्षा ' पहा. ॐ **राखीपाडवा पु०, राखी प्रतिपदा स्त्री०** श्रावणी पौर्णिमेच्या पुढची तिथि. **राखी पुनव, राखी पौर्णिमा स्त्री०** श्रावण महिन्यांतील पौर्णिमा.

**राखील** [ म० राखणें ] **वि०** १ ठेविलेलें किंवा बाळगलेलें ( माकड, राघू, कुत्रा, इ० ). २ बाळगिलेली ( रांड, रखेली ); बाळगलेला

( जार ). स्त्री० गुरें चारण्याबद्दल गुराख्यास दिलेलें द्रव्य.

**राखीसमुख** [ सं० राक्षस+संमुख ] स्त्री०, न० राक्षसांची दिशा,-म्हणजे दक्षिण दिशा ( अशिक्षितांत ). क्रि० वि० दक्षिणेकडे ( अशितांत ). ह्याच अर्थी ' राखेस मोहरा ' हा शब्द अशिक्षितांत आहे. गंगामोहरा (-री ),गंगमोहरा (-री ) क्रि० वि० गोदावरीकडे म्ह० उत्तर दिशेस. गोदावरी आणि कृष्णा ह्या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत ह्या सर्व शब्दांची रूढि अशिक्षितांत आहे. **राखेसमोहरा (-री )** क्रि० वि० दक्षिण दिशेकडे.

**राखुंडा, राखोंडा** [ म० राख+उंडा(गोळा)] पु० १ राखेचा ढीग. २ राख टाकावयाचा खळगा.

**राखुंडा** वि० १ जन्मतः ज्याचा वरचा ओठ चिरलेला आहे असा ( माणूस ). २ मिशा यावयाचें वय झालेलें असून ज्याला मिशा आलेल्या नाहींत असा ( पुरुष ).

**राखुंडी, राखोंडी** [ सं० रक्षा; म० राख+उंडी ] स्त्री० १ गोवरी जळून तांबडी लाल झाली असतां ती पाण्यानें विझविली म्हणजे जो गोटा किं० खडा होतो तो. हिचें चूर्ण दांत घासावयास घेतात. २ ( लाक्षणिक ) जळून काळा झालेला भात, भाकरी, इ० खाद्य.

**राखूळ** [ म०राखणें ] स्त्री० गुरें चरणीसाठीं गुराख्याकडे पाठविणें किं० त्याबद्दल द्यावयाचा पैसा.

**राखोंडा** पु० वर ' राखुंडा ' पहा.

**राखोंडा, राखोडा** [ म० राख ] वि० राखेसारखी किं० रूक्ष, दिसूळ ( जमीन, मुरूम, इ० ).

**राखोंडा, रावखंडा** वि० जेथें जो भाग, अवयव, पदार्थ, किं० संस्कार असावयास किं० व्हावयास पाहिजे तेथें तो नसल्यानें किं० न केला गेल्याकारणानें येते ती विरूपता किं० येतो विशोभितपणा; बांगड्यावांचून स्त्रियांचें मनगट, कौलावांचून छप्पर, मिशांवाचून ओठ, इ०.

**राखोंडी** स्त्री० वर ' राखुंडी ' पहा.

**राखांडें, रावखंडें** न० १ जन्मतः विदर्ण असा ओठ. २ जेथें जो पदार्थ असावयाचा तेथें तो सर्व भागीं नसल्याकारणानें होतो तो विशोभितपणा; उ० सारें माजघर सारवून शेण पुरलें नाहीं म्हणून हा कोपरा तसाच राहूं दिला त्यामुळें रावखंडें दिसतें; उ० सारें कौलारू शाकारून कौलें कमी आलीं म्हणून चार रांगा शाकारणीं न होतां तशाच राहिल्या म्हणून राखेंडें दिसतें.

**राखोळ, राखोळी** [ म० राखणें ] स्त्री० चरावयास गुरें पाठविणें किं० ह्या कामाबद्दल गुराख्याला जें देय देतात तें. वर ' राखूळ ' पहा.

**राखोळा** [ म० राखणें ] पु० पाठराखणीस पाठविलेला मनुष्य. मागें ' पाठ ' मध्यें ' पाठराखणा ' पहा.

**राखोळा** वि० ज्याच्या ओठांत जन्मापासून कांहीं ऐब आहे असा.

**राख्या** [ म० राखणें ] पु० स्त्रीनें विषयवासनेच्या तृप्तीसाठीं बाळगलेला पुरुष.

**राग** [ सं० ] पु० १ रंग देणें. २ रंग; पदार्थास तांबडा, पिवळा, इ० रंग देण्याचें कांहीं द्रव्य,-केशर, हळकुंड, इ०. ३ अंगावर केशर इ० ची उटी. ४ तांबडा रंग. ५ तांबडेपणा. ६ आसक्ति; प्रेम; अनुराग. ७ क्रोध; कोप. ८ मत्सर, ९ सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणांपैकीं रज हा गुण. १० ( संगीत ) षड्ज, ऋषभ, गंधार, मल्हार, पंचम, धैवत, आणि निषाद, हे जे सात स्वर त्यांची परस्परांच्या सापेक्षत्वानें कर्णमधुर रचना. ॐ **रागास येणें ( किं० चढणें, भरणें, पेटणें )** रागावणें; क्रोधाविष्ट होणें. **एकाद्याला राग आणणें** त्याला कोपविणें; त्याला खिजविणें. **राग गिळणें** अतिशय राग आलेला असतां तो प्रयत्नानें आवरून धरणें. **एकाद्याचा राग करणें** तो दृष्टीस पडला किं० त्याची गोष्ट निघाली म्हणजे रागावणें; त्याच्या संबंधानें कंटाळा दाखविणें. **कोणेकाच्या नाकावर राग असणें ( किं० ठेविलेला असणें )** क्षुल्लक कारणावरून रागावण्याकडे त्याची प्रवृत्ति असणें; जरा कांहीं कारण झालें कीं तो रागावत असणें. **कोणेकाचा कोणेकाला राग येणें** कांहीं कारणावरून तो त्याच्यावर रागावणें. **कोणेकाला रागें भरणें** कठोर शब्दांनीं त्याला ताडन करणें,-त्याच्या कांहीं कृत्याबद्दल आपली

नापसंती दर्शविण्यासाठीं. **रागीं भरून घेणें** १ दुसऱ्याला आपला राग येईल असें कांहीं करणें. २ कोणेकाविरुद्ध आपला राग यथेच्छ प्रकट करून सोडणें. **रागाच्या हातीं देणें** रागाच्या लहरींत कांहीं वस्तु अनादरणें किं० टाकून देणें. **कोणेकाचा राग मानणें** त्याच्यावर रागावणें. **रागानें कोणेकानें हिरवें पिवळें होणें** परमावधीच्या रागाची मुद्रा त्याच्या तोंडावर दिसणें. **अति रागा भिक मागा** ज्याला अतिशय राग येतो त्याला भिक्षा मागण्याची पाळी येते; फार रागिटपणानें आपलें नुकसान होतें. **राग खाई आपणास आणि संतोष खाई दुसऱ्यास** रागानें आपलें नुकसान होतें आणि आपल्या शांतवृत्तीनें दुसरा मनुष्य आपणावर प्रेम करतो ( किं० आपणाला अनुकूल किं० वश होतो ). **रागमाला, रागमालिका, रागमाळा, रागमाळिका** स्त्री० १ अनेक रागांचे थोडथोडे अंश घेऊन केलेला असतो जो गीतविशेष तो. २ असलें गाणें ज्याला किल्ली दिल्यानें किं०जें फिरविल्यानें ऐकाविलें जातें असें एक यंत्र. **रागरंग** पु० ए० व० मागें ' रंग ' मध्यें पहा. **रागिणी** स्त्री० १ ( संगीतांत ) रागाचा गौणभेद; गायनांतील मिश्ररांग किं० पोटराग. २ अनुरक्त जारिणी. **रागिष्ट, रागीट** वि० १ क्षुल्लक कारणांवरून फार कोपणारा. २ अत्यंत तीव्र कोप ज्याला येतो असा. **रागी** [ सं०रागिन् ] वि०१ रंगलेलें. २ रागद्वेषांनीं युक्त. ३ आसक्त. ४ कामुक. ५ रांडबाज. **रागीसांडी** वि० विषयासक्त.

**रांग** स्त्री० पंक्ति; ओळ; मालिका; हारी.

**रांगडा** [ हिं० ] पु० १ गुजराथ आणि मेवाड ह्यांच्या दरम्यानचा देश किं० तेथील रहिवासी. २ ( लाक्षणिक ) रासवट, असभ्य, किं० अडाणी चालीरीतींचा मनुष्य.

**रांगण** न० कुंभाराच्या भट्टींतील राख.

**रांगणी** स्त्री० जींवर मध्यापासून कडेपर्यंत खोल खोल रेघा आहेत अशी निमगोल शिंप. वसंतपूजेच्या प्रसंगीं ब्राह्मणांच्या हातांवर गंध चोपडून ह्या शिंपीनें रेघा करतात.

**रांगणें** [ सं० रिंग्=रांगणें ] अ०क्रि०(लहान मुलानें ) गुडघे आणि हात यांवर भार घालून सरकत जाणें.

**रागवणें, रागावणें** [ म० राग ] अ० क्रि० कोपणें; संतापणें; ०ला राग येणें.

**रांगसारांगूस** [ म० रांगणें ] स्त्री० एकादें चिरकाळच्या परिचयानें प्रिय असलेलें स्थळ सोडून जाण्याचा प्रसंग आला असतां खोट्या सबबी पुढें करून मनुष्यानें तेथेंच रेंगाळत किं० घोटाळत राहाणें.

**रांगा** पु० समुद्राच्या ज्या प्रदेशांत विशिष्ट समयीं कोणत्याच दिशेकडून वारा वाहात नाहीं तें.

**रागी** स्त्री० नाचणा किं० नाचणी ज्याला म्हणतात तें धान्य.

**रागेणें, रागेजणें** [ म० राग ] अ० क्रि० रागावणें; संतापणें; चरफडणें.

**रांगोळी** [ सं० रंग+वल्ली (किं० आवलि) ] स्त्री० १ शिरगोळ्याचें किं० कुपा दगडाचें चूर्ण. २ ह्या चूर्णानें जमीनीवर काढलेले पट्टे किं० आकृति समुच्चयानें. ३ भाताचीं टरफलें जाळून पांढरी पूड अर्थ २ च्या आकृति काढण्यासाठीं योजतात ती.꠸ **रांगोळें** न० अर्थ १ आणि ३ चें चूर्ण छिद्रांतून गळण्यासाठीं ज्या नळकांड्यांत जमीनीवर पट्टे ओढतांना भरतात तें नळकांडें.

**राघव** [ सं० ] पु० १ एक महामत्स्यविशेष. राघव आणि तिमिंगिल हे दोन मासे एकमेकांना पकडण्यासाठीं एकमेकांच्या पाठीस लागलेले असून सर्व पृथ्वी भोंवतीं ते फेऱ्या करीत असतात आणि त्यांची गांठ पडेल तेव्हां ही पृथ्वी उलथून तिचा नाश व्हावयाचा आहे अशी अडाण्यांची समजत आहे. २ सूर्यवंशाच्या रघूच्या कुळांतील कोणीही पुरुष,–विशेषतः रामचंद्र. ३ समुद्र,–ज्याला रघुवंशीय राजांनीं एवढें विस्तीर्ण रूप दिलें.

**रांघळणें** स० क्रि० ( कांहीं पदार्थ ) ओढीत किं०फरपटीत नेणें.

**राघावळ** स्त्री० १ निळीची एक जात. २ एक प्रकारचें तांबड्या रंगाचें लुगडें. ह्या अर्थी ' राजावळ ' सुद्धां. ꠸ **राघावळी** वि० १ राघा-

बळ ह्या जातीच्या निळीनें रंगविलेलें ( लुगडें, इ० वस्त्र ). २ राघावळ ह्या रंगाचें.

**राघावळी** स्त्री० घोड्याच्या पाठीवर घालतात ती जाळीदार झालर.

**राघू, राघो** पु० १ पोपट ह्या पक्षी. २ हदग्याच्या फुलांतील हिरव्या रंगाचा केशर. ३ ( शृंगारी लावणींत ) नायक; प्रियकर.

**राघोडा** पु० कर्जाऊ घेतलेल्या रकमेवर पैसा किं० पैशाच्या रूपानें व्याज न देतां त्या पैशाच्या किमतीचा ऊस, धान्य, म्हशींचें दूध, इ० देणें किं० ही देण्याची चाल; उ० बाजरी राघोडा कबूल करून मी सावकाराचे पंचवीस रुपये घेतले आहेत. मागें ' काढा ' पहा.

**राजअंबीर** [ म० राजा+अ० अंबीर, अमीर ( थोर सरदार ) ] पु० १ गंभीर स्वभावाचा नायक ( लावणी, पोवाडा, इ० तील शब्द ). २ भव्य, विशाल, झोकदार ( माणूस, देश, वर्तन, पोशाख, इ० ).

**राजकडी** स्त्री० एक प्रकारचें कर्णभूषण.

**राजकारण** [ सं० राजन्+कारण ] न० पुढें '.राजन् ' मध्यें पहा.

**राजकी** [ सं० राजन् ] वि० १ राजासंबंधाचें किं० राज्यासंबंधाचें. २ जुलमी. देवकी म्ह० प्रजेचें हित करण्याच्या बुद्धीनें केलेला किं० चालविलेला.

**राजकीय** [ सं० राजन् ] वि० १ राजासंबंधाचा. २ राज्यसरणीसंबंधाचा, राज्यव्यवस्थेतील.

**राजकेळ (-ळी )** स्त्री० एक प्रकारची केळ. राजकेळें न० ह्या केळीचें फळ किं० केळें.

**राजगादी** [ स० राजन्+म० गादी ] स्त्री० राजाचें सिंहासन.

**राजगिरा** पु० एक तृणविशेष किं० त्याचें [ बीज.

**राजगोंड** स्त्री० शहरांतील किं० गांवांतील मोठा रस्ता.

**राजगोंडा** पु० पालखीच्या दांड्याला लोंबत सोडलेला आणि बसणाऱ्यानें हातांत धरावयाचा गोंडा.

**राजघोस** स्त्री० देवी इ० स्वप्नोगावर ज्याच्या पानांचा काढा देतात असा एक वेल.

**राजघोळ** स्त्री० घोळ नांवाच्या शाकभाजीची एक जात.

**राजटिटवी** स्त्री० पिवळ्या रंगाची एका जातीची टिटवी.

**रांजण** पु० मातीचें उभ्या आकाराचें एक [ पात्र.

**राजण, रांजण (-णी )** [ सं० राजादन ] स्त्री० पियाल, चार, किं० खिरणी ह्या नांवाचे झाड.

**राजण, रांजण (-णी )** स्त्री० नित्याचे ओथ- ग्याचे तांदूळ ज्या मडक्यांत ठेविलेले असतात ते मडकें. ओथरा काढणें, भरणें इ० प्रयोगांत मात्र ह्याचा उपयोग होतो. मागें ' ओथरा ' पहा.

**रांजणवाडी, रांझणवाडी** स्त्री० ज्यानें डोळ्याच्या पापणीस येते ती पुटकुळी.

**रांजणी** [ म० रांजण ] स्त्री० १ आकारविशेषाचा मातीचा डेरा. २ रोजच्या उपयोगासाठीं घ्यावयाचे तांदूळ ठेवण्याचा डेरा. मागें ' रांजण, ' ' रांजणी ' पहा.

**राजणें** [ सं० राज् ] अ० क्रि० शोभणें; सुंदर, भव्य, किं० थाटदार दिसणें ( कवितेंत ).

**राजतुरा** पु० एक फुलझाड.

**राजदरबार** [ सं० राजन्+फा० दरबार ] पु० न्याय, अन्याय, खंडदंड, इ० चा विचार करण्याची राजा आणि त्याचे सल्लागार यांची जागा.

**राजन्य** [ सं० ] पु० १ क्षत्रिय. २ राजपुत्र.

**राजपसंत (-द )** [ सं० राजन्; म० राजा; फा० पसंत ] वि० राजाला आवडेल असें म्ह० अत्युत्तम, सर्वोत्कृष्ट, किं० श्रेष्ठ दर्जाचें.

**राजपिंडा (-बिंडा )** [ सं० राजन्+पिंड ] वि० सुंदर, देखणा ( माणूस ).

**राजबनसी** [ सं० राजन्+वंश+ई (प्रत्यय); राजवंशी ] वि० १ राजाच्या वंशांतील. २ वरिष्ठ दर्जाचा किं० योग्यतेचा.

**राजबाबती** [ सं० राजन्; म० राजा; अ० बाब् ] स्त्री० चौथ ह्या कराचा राजाचा भाग.

**राजबीध** [ सं० राजन्+वीथि ( रस्ता ) ] स्त्री० शहरांतील मोठा रस्ता.

**राजमोहरा** [ सं० राजन्; म० राजा; फा० मुहरा ] पु० १ फार शाहाणा, धूर्त, शूर, किं० विद्वान् माणूस. २ अप्रतिम सुंदर आणि गोंडस माणूस.

**राजरा** [ म० राजेश्वरी ] **स्त्री**० अ० व० देवीच्या रूपा सात मूर्ति एका तबकांत घालून देवीच्या संबंधाचा विधि करतात त्या. [ पहा.

**राजरुशी, राजरोशी** खालीं 'राजरोस'मध्यें

**राजरूस, राजरोस, राजरोश (-ष)** [ फा० रोझई रौशन् ] **क्रि० वि०** उघडपणें; संकोच किं० भीति न धरतां. ॐ **राजरुशी, राजरोशी (-षी) स्त्री**० उघडपणा; अनियंत्रितपणा; मोकळीक.

**राजलव्हा पु**० उथळ पाण्यांत चालून भक्ष्य मिळविणारा एक पक्षी.

**राजवटा पु**०, **राजवट (-टी) स्त्री**० [ म० राज्य + वाट ] **स्त्री**० १ कोणेकाचा अमल, व्यवस्था, किं० कारकीर्द. २ कोणेकाच्या वैभवाचा काल. ३ चाल; रीति; परिपाठ; क्रम.

**राजवटा** [ म० राजा+वाट ] **पु**० राजमार्ग; रहदारीचा रस्ता.

**राजस** [ सं० ] **वि**० १ रजोगुणानें युक्त; रजोगुण ज्यांत फार असा. २ विषयासक्त. ३ सुकुमार असून सुंदर. ॐ **राजसवाणा वि**० सुंदर आणि गोंडस.

**राजसी** [ म० राजा + सा, असा ] **वि**० भव्य; डौलदार. ॐ **राजसी उपचार पु**० सौम्य औषध.

**राजहंबीर** मागें ' राजअंबीर ' पहा.

**राजा** [ सं० राजन् ] **पु**० १ एकाद्या देशाचा अधिपति किं० सत्ताधारी. २ एका विशिष्ट गुणानें श्रेष्ठ असा माणूस किं० पदार्थ; उ० आम्हाला जो नोकर मिळतो तो आळशांचा राजा मिळतो. ३ ज्याला कोणी बोलणारा, नियंत्रिणारा, किं० जबाबदार धरणारा नाहीं असा माणूस; उ० मी हालांत दिवस काढतों, तूं राजा आहेस. ४ ज्या ग्रहाचे वारीं संवत्सर प्रतिपदा पडते तो ग्रह त्या संवत्सराचा. ५ एकाद्या संस्थेचीं सूत्रें ज्याच्या हातीं असतात तो त्या संस्थेचा राजा; कोणत्याही कारभाराचा मुख्य चालक. ६ एकाद्या घटनेंतील महत्त्वाचा अवयव किं० अंश. **टीप,–** ' राजा ' हा शब्द संस्कृत समासांत पूर्व पद किं० अन्त्य पद असतां तो ' राज ' हें रूप धारण करतो. असे सामासिक शब्द जे मराठींत संस्कृतांतून आले आहेत ते पुढें देतों. ॐ**राजाधिराज, राजेंद्र पु**० सार्वभौम राजा. **राजाधिष्ठान न**० राजाची राजधानी. **राजाहि पु**० दुतोंडें. **राजर्षि पु**० तपस्वी क्षत्रिय. **राजकार्य न**० राज्याचा कारभार. **राजकुल न**० १ राजघराणें. २ राजाचा दरबार. ३ न्यायमंदिर. ४ राजवाडा. **राजगुह्य न**० अत्यन्त श्रेष्ठ गुह्य किं० रहस्य. **राजचिन्ह न**० १ राजाचें छत्र, चामर, इ०. २ चलनी नाण्यावरील शिक्का. **राजदंत पु**० वरच्या कवळींतील पुढचे दोन दांत प्रत्येक. **राजदूत पु**० राजाचा वकील. **राजदेय न**० राजाला उत्पन्नांतील द्यावयाचा हिस्सा; कर. **राजदौवारिक पु**० १ द्वारपाल. २ राजदूत. **राजधान, राजधानक न**० **राजधानी, राजधानिका स्त्री**० राजाचें राज्यकारभार पहावयाचें किं० राहावयाचें शहर. **राजधान्य न**० राजभोग; सावा. **राजधुरा स्त्री**० १ राज्यकारभार. २ राज्याची जबाबदारी. **राजनीति स्त्री**० राजव्यवहाराचें शास्त्र. **राजनील न**० पाचमणि. **राजपत्नी स्त्री**० राणी. **राजपथ पु**० १ राजमार्ग. २ हमरस्ता; रहदारीचा रस्ता. ३ जी सरणी साधी किं० ज्या सरणीनें वागलें असतां किं० कांहीं काम केलें असतां कोणी आपणास रागें भरणार नाहीं किं० आपणास कांहीं अडथळे येणार नाहींत अशी सरणी. **राजपुत्र पु**० १ राजाचा मुलगा. २ क्षत्रिय. ३ ( ज्योतिष ) बुध हा ग्रह. **राजपुत्री स्त्री**० राजाची मुलगी. **राजभृत्य, राजसेवक, राजपुरुष पु**० राजानें कांहीं कामीं अधिकार ज्याला दिला आहे असा. **राजमार्ग पु**० १ चाळीस हात रुंदीचा रस्ता. २ सोपा मार्ग. ३ ज्यांत कांहीं अडचण नाहीं किं० जो अनुसरला असतां कोणी आपणास निंदिणार नाहीं अशी सरणी, उपाय, वर्तन, इ०. वर 'राजपथ' पहा. **राजयक्ष्मा** [ सं० राजयक्ष्मन् ] **पु**० क्षयरोग. **राजयोग पु**० ( ज्योतिष ) १ राज्यपद मिळवून देणारा पत्रिकेंतील ग्रहयोग. २ ईश्वरध्यानाचा एक प्रकार. **राजराज पु**० १ कुबेर. २ सार्वभौम राजा. **राजशास्त्र न**० राजनीति; राजकारण. **राजश्री स्त्री**० १ राजाचें वैभव. २ राजाच्या वैभवानें युक्त असा पुरुष. ३ विचित्र, तऱ्हेवाईक, किं० छांदिष्ट माणूस ( सलगीनें ). ४ कोणीही

पुरुष, मुलगा, किं० गृहस्थ ( शर्ट्टत किं० उपहासांत).राजश्रिया विराजित[सं०]वि० राजाच्या वैभवानें संपन्न,–पत्राच्या सुरवातीस लिहावयाच्या मायन्यांत हे शब्द योजतात. राजसूय पु० सार्वभौम राजानें करावयाचा यज्ञ. राजहंस पु० अंग शुभ्र असून चोंच आणि पाय तांबडे ज्याचे असा हंस. तीर्थराज पु० श्रेष्ठ तीर्थ. मृगराज पु० सिंह. राजांगण न०१श्रीमंत लोकांच्या घरापुढें जें मोठें आणि मोकळें पटांगण असतें तें. २ चौसोपी घरांत मधोमध असतें तें अंगण. ह्या अर्थी 'राजांगणें' सुद्धां. राजाभिषेक पु० राजाला राजपदीं बसविण्याचा विधि. राजाज्ञा स्त्री० १ राजानें चालू केलेला हुकूम. २ राजानें कोणेकास केलेला हुकूम. ३ ( लाक्षणिक ) अनुल्लंघनीय असें जें विधिवचन तें. पु० राजाच्या अष्ट प्रधानांव्यतिरिक्त जो प्रधान तो. राजावर्त पु० हलक्या जातीचा हिरा. राजतेज न० चेहऱ्याचा भव्यपणा किं० तेजस्वीपणा. राजत्व न० राजाचा अधिकार, वैभव, किं० स्थिति.राजपंचक न० पांच अशुभ मुहूर्तांपैकीं एक. चौरपंचक, अग्निपंचक, मृत्युपंचक, राजपंचक, आणि हानिपंचक, हे पांच अशुभ मुहूर्त फलज्योतिषांत सांगितले आहेत. यांत अनुक्रमें चोरांपासून, अग्नीपासून, मृत्यूपासून, राजापासून, आणि पाऊस, टोळ,कोल्हे, इ० प्राण्यांपासून हानि होते. मागें ' चौरपंचक ' पहा. राजेरजवाडे पु० अ० व० राजे, सरदार, संस्थानिक, इ०.

राजाळू न० अळवाची एक जात.

राजि, राजी [सं०]स्त्री० पंक्ति; ओळ; रांग; हारी.

राजी [ अ० राझी ] वि० १ कबूल; मान्य; पसंत. २ खूष; आनंदित. राजीनाराजी स्त्री० १ सुखदुःखाची स्थिति. २ संकट. राजीनामा पु० १ कबुलायत; कैफीयत. २ बेत करारपत्र. ३ आपल्या खुशीनें नोकरी सोडणें (देणें,गुदरणें). राजीरजावंतीनें, राजीखुषीनें क्रि० वि० पूर्ण संमतीनें; आपल्या स्वतःच्या इच्छेनें; दुसऱ्याची सक्ती नसतां ( खतें, दस्तऐवज, इ० त येणारा हा शब्द आहे ).

राजीक [ म० राजा ] न० १ राजानें रयतेवर केलेला जुलूम, अन्याय, इ०. देवीक न० देवांच्या अवकृपेपासून झालेली हानि. २ परचक्रापासून झालेली हानि. ३ राजाची शासनपद्धति.

राजील, राजिल[सं०] पु०सर्पविशेष; दुतोंडें.

राजीव [ सं० ] पु०, न० १ मत्स्यविशेष. २ सारस पक्षी. न० कमळ. ॐ राजीवनयना स्त्री० कमळासारखे डोळे आहेत जिचे अशी स्त्री.

राजू [ सं० रज्जु ] स्त्री० दोरी, चऱ्हाट.

राजेळ, राजेळी स्त्री० केळीची एक जात. राजेळें न० ह्या केळीचें फळ किं० केळें.

राज्य [ सं० ] न० १ शासनपद्धति. २ विशिष्ट लोकसमाजाला नियंत्रणांत ठेवण्याची सरणी; उ० प्रजासत्ताक राज्य, एका राजाचें राज्य,इ०.३ आपल्याच देशाच्या लोकांच्या अनुमतीनें, मुख्यत्वें आपल्याच देशाच्या लोकांच्या कल्याणासाठीं स्थापण्यांत आलेली शासनपद्धति. अशा शासनपद्धतीला ' स्वराज्य ' म्हणतात; उ० स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक आहे. ४ देश. ५ वर्चस्व; स्वामित्व; कोणेकाचा वैभवकाल. ६ कांहीं प्रचार, चाल, इ० ची अबाधित रहाटी. ॐ राज्यक्रान्ति स्त्री० एक शासनसरणी एकदम उलटून तिच्या जागीं दुसरी स्थापित होणें.राज्यांग न० राजा, प्रधान,मित्र,खजिना, देश, किल्ला, आणि सैन्य, ह्या सात गोष्टी प्रत्येक. राज्यतंत्र न०, राज्यधुरा स्त्री० राज्य चालविण्याची जबाबदारी; राज्यकारभार. राज्याभिषेक पु० सिंहासनावर राजाला केलेला अभिषेक. राज्यासन न० सिंहासन. राज्योपचार पु० सरकारी अधिकाऱ्याचें कृत्य.

रांझण न० आकारविशेषाचें मातीचें भांडें.

रांझण, रांझणवाडी, रांझणी स्त्री० उष्ण विकृतिमुळें डोळ्याच्या पापणीवर येते ती पुटकुळी.

राट मागें ' रहाट ' पहा.

राठ वि० टणक; कणखर; स्पर्शेंद्रियाला खरखरीत. मृदु, कोमल, नाजूक, मऊ,याच्या उलट.

राड स्त्री० १ चिखल. २ होळीच्या उत्सवांत चिखलाची खळी करतात ती.३ गढूळ म्ह० केरकचरा ज्यांत पडला आहे असें ( पाणी ).

**रांड** [सं० रंडा] **स्त्री०** १ विधवा (ग्राम्यांच्या भाषेत ). २ पैसे मिळविण्यासाठीं देहविक्रय करणारी स्त्री; वेश्या. ३ स्त्री(शिवी देतांना).४(लाक्षणिक ) पुचाट किं०कर्तृत्वशून्य असा माणूस. ५ दासी. ६ नासलेला, कुजलेला, किं० सडलेला कोणताही पदार्थ; उ० यंदा शेतें चांगलीं पिकलीं होतीं पण बांध फुटल्यामुळें आंत पाणी शिरून सारी राड झाली. **॰रांडेहून रांड स्त्री०** १ अत्यन्त पुचाट किं० नेभळा माणूस. २ अत्यंत भितरा माणूस. **रांडकारभार पु०, रांडअमल न०** १ घरांत किं० संसारांत पुरुषाला कोणी विचारीत नाहीं आणि स्त्रियांच्याच इच्छेने सर्व गोष्टी चालतात अशी सरणी. २ नांवाचा राजा असून पुढारलेले लोक किं० मंत्री यांच्याच तंत्रानें चाललेली शासनपद्धति. **रांडक वि०** वैधव्य पावलेली( स्त्री). **रांडका पु०** ज्याची बायको मेली असा पुरुष; विधुर, ( अशिक्षितांत रूढि ). **रांडकी, रंडकी स्त्री०** विधवा (तुच्छतेनें किं०अनुकंपेनें). **रांडखांड स्त्री०** भांडतांना अडाणी स्त्रिया एकमेकींना हा शब्द शिवी म्हणून योजतात. **रांडगळा पु०** पुरुषाचा बायकी आवाज. **रांडगा वि०** रांडबाज( पुरुष ). **रांडगांठ स्त्री०** मागें ' पुरुष ' मध्यें ' पुरुषगांठ,' 'बाईलगांठ,' 'रांडगांठ,' हे शब्द पहा. **रांडगाणें, रांडगाऱ्हाणें न०** नामर्दपणाची पिरपिर किं० तकरार ( गाणें, सांगणें ). **रांडतगादा पु०** सौम्यपणाचा तगादा (कुणब्यांच्या भाषेंत). असा तगादा करणाऱ्या शिपायाला कुणबी लोक ' पिठ्या शिपायी ' म्हणतात. लाथाबुक्या मारून तगादा करणाराला ते ' कणक्या शिपायी' म्हणतात. **रांडपाटा पु०** वैधव्य (कपाळीं येणें, मिळणें, भोगणें, इ० ). **रांडपिसा, रांडबाज वि०** रांडांच्या नादीं लागलेला. **रांडपिसें न०** रांडबाजी. **रांडपोर न० ए० व०** १ गांवांतलि दरोबस्त लोक,–पुरुष, स्त्रिया, पोरें; उ० ह्या दिंडींत गांवांतील रांडपोर सामील झाले होतें. २ आपली बायको आणि मुलें ह्यांचा समुच्चय; उ० मी एकटा कोठेंही राहीन पण माझ्या मागें रांडपोरांचें लचांड आहे. ३ रांडेचें किं० विधवेचें अपत्य. ४ आपल्या रखेलीचें अपत्य. **रांडभाड स्त्री०** विधवा ( अशिक्षितांत ). **रांडभांडण न०** १ बायका बायकांचें भांडण. २ भिकार, क्षुल्लक, किं० नुकसानीची बाबत किं० काम. **रांडभाषण न०** नामर्दपणाचें भाषण. **रांडमस्ती स्त्री०** १ पति मेल्यानंतर नियंत्रणेंत ठेवणारें मनुष्य कोणी नसल्यानें स्त्रीस येते ती धमकदारी, काटकपणा, अरेरावी, किं० मगरूरी. २ नियंता कोणी नसल्यानें मुलांच्या अंगांत येतो तो उमेटपणा, किं० असभ्यपणा. **रांडमाणूस न०** स्त्री,–जी दुर्बल असते ( अनुकंपेंत ). २ कर्तृत्वहीन माणूस. **रांडमामी स्त्री०** विधवा ( अनुकंपेंत ). **रांडमांस न०** कांहीं काम न करतां बसून राहिल्याकारणानें किं० जबाबदारी न वाहावी लागल्याकारणानें अंगावर जो लठ्ठपणा येतो तो. **रांडमुंड स्त्री०** वपन झालेली विधवा ( शिवी देतांना किं० अनुकंपेंत ). **रांडरांडी स्त्री०** १ विधवा. २ गांवांतलि पुरुष, स्त्रिया, पोरें, समुच्चयानें; गांवांतील कोणीही माणूस न वगळतां सर्व. **रांडरागोळी स्त्री०** रांडबाजी. **रांडरूं न०** १ रांड ( तुच्छतेंत ). २ विधवा ( तुच्छतेंत ). ३ कोणीही स्त्री ( शिवी देतांना ). **रांडरोट (–टा) पु०** स्त्रीस वैधव्य आलें असतां तिच्या चरितार्थासाठीं जे पैसे तिच्या नांवानें ठेविलेले असतात ते. **रांडलेक पु०** कोणीही पुरुष ( शिवींत ). **रांडव वि०** १ वैधव्य पावलेली (स्त्री ). २ ज्याची बायको मेली आहे असा ( पुरुष ). **रांडवडा पु०** १ ज्या घरांत बायकांचें प्राबल्य असतें असें घर ( निंदेंत ). २ रांड्या, रांडा, इ० शिव्या भरपूर देऊन चालविलेलें भांडण. **रांडवला पु०** वर ' रांडवडा ' द्वितीयार्थी पहा. **रांडवाटा पु०** वैधव्य हा प्राप्त झालेला भोग ( येणें ). **रांडव्यसन न०** रांडांच्या नादीं लागणें हा दुर्गुण. **रांडसांड स्त्री०** विधवा ( तुच्छतेंत किं० अनुकंपेंत ). **रांडसांध स्त्री०** विधवा स्त्री घरांत एकीकडे ज्या सांधीत म्ह० कोपऱ्यांत बसते तो कोपरा. **रांडसांधीस बसणें** पुरुषाला योग्य जीं कर्तव्यें ( व्यापार, शेतकी, विद्या, इ० ) तीं न करतां बायकांप्रमाणें घरांत बसून काळ घालविणाऱ्या पुरुषाला ह्या वाक्प्रचारानें निर्भर्त्सितात. **रांडापोरें न० अ० व०** १ समाजांतील हीन,

दनि, दुबळीं अशीं माणसें. २ पैसा न मिळविणारीं माणसें,–ज्यांची काळजी कर्त्या पुरुषानें करावयाची असते. **रांडारोंटा** **पु०** अनाथ स्त्रिया किं० विधवा ह्यांना दळण कांडण, धुणीं, पाणी भरणें, इ० करावीं लागतात तीं घरांतील हलकीं कामें समुच्चयानें. **रांडोळी** **स्त्री०** विधवा ( अनुकंपेंत ). **रांड्या** **वि०** १ बायकांत मिसळणारा पुरुष. २ स्त्रीलंपट. ३ नामर्द ( पुरुष ). ४स्वस्त्रीलंपट; जो आपल्या बायकोच्या तंत्रानें चालतो असा ( पुरुष ). **रांड्याराघोजी** **पु०** वर ' रांड्या ' अर्थ १ पहा. **रांड्यारावजी आणि बोडक्या भावजी, रांडेराघोजी आणि बोडके भावजी** **पु०** बायकांत मिसळून त्यांच्याशीं गप्पा मारणारा पुरुष. **रांढरूं** वर ' रांडरूं ' पहा. **रांडारांड** **स्त्री०** १ अत्यन्त हीन, दीन, दरिद्री आणि अनाथ अशी विधवा. २ नामर्द किं० कर्तृत्वशून्य पुरुष ( निंदेंत ). ३ अत्यन्त अनाथ आणि दारिद्री माणूस.

**रांडवणें** [म० रांड ] **अ० क्रि०** विधवा होणें; वैधव्य पावणें.

**राडा** **पु०** १ माणसांची अतोनात दाटी किं० गर्दी ( घालणें, पडणें ). २ पाणी सांडल्यामुळें रस्त्यांत किं० घरांत झालेला चिखल. ३ मनुष्य मेलें असतां घरांतील माणसांचा होतो तो आक्रोश (होणें, पडणें).

**रांडावणें** [ म० रांड ] **अ० क्रि०** १ वैधव्य पावणें. २ ( काम, धंदा, व्यापार,सावकारी,इ०) अपकर्षाच्या स्थितिप्रत पावणें; ढासळणें; बसणें.

**राण** [ म० रान ] **न०** रान, जंगल ( अडाण्यांचा शब्द ). पुढें ' रान ' पहा.

**राणवसा, राणिवसा, राणीवसा** [म०राणी +वास ] **पु०** राजाचा किं० बड्या माणसाचा जनानखाना.

**राणा** [ हिं० ] **पु०** १ राजा. २ संमानानें कोणा पुरुषास हा शब्द लावितात. ३ लहान मूल ( प्रेमांत ).

**राणी** [ सं० राज्ञी; हिं० ] **स्त्री०** १ राजाची स्त्री किं० पत्नी. २ राज्य चालविणारी स्त्री ( सधवा किं० विधवा ). ॐ **राणीराऊत** **पु०**, **राणराउताणी, राणीरावताणी** **स्त्री०** थोर दर्ज्यांच्या स्त्रिया समुच्चयानें किं० थोर दर्जाचे पुरुष समुच्चयानें; उ० तो भारी उन्मत्त आणि मगरूर आहे, जणों काय त्याच्या घरीं राणी राऊत पाणी भरतो ( किं० राणीरावताणी पाणी भरते ). [ राज्यसुख.

**राणिव** [ म० राणा ] **स्त्री०** १ राज्य. २

**रात** [ सं० रात्रि;म० रात्र ] **स्त्री०** सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ; रात्र. ॐ **रातकिडा, रात्रकिडा** **पु०** रात्रीं किर्र असा आवाज करणारा एक किडा. **रातबिरात** **स्त्री०** १ रात्रीचा समय,–ज्यांत साप, धोका, दरोडा, इ० चा विशेष संभव असतो. २ ( लाक्षणिक ) कठिण समय; अडचणीची स्थिति; उ० रातबिरात आहे, चार पैसे बाळगून ठेविलेले असावेत; उ० धान्य साठवून ठेवा, रातीबिरातीं उपयोगीं पडेल. ' रातबिरात ' ह्याचा **क्रि० वि०** प्रमाणेही उपयोग केला जातो. रातबिरात म्ह० अडचणीच्या प्रसंगीं.

**रात** [ सं० रक्त=तांबडा ] **पु०** डोळ्यांचा तांबडेपणा ही विकृति.

**रातंजन, रातांजन** **पु०**, **न०** एक वृक्ष.

**रातड** [ सं० रक्त=तांबडा ] **वि०** तांबूस वर्णाचा ( तांदूळ, जोंधळा, फळ, इ० ).

**रातडी** [ सं० रक्त=तांबडा ] **स्त्री०** तांबूस वर्णाच्या जोंधळ्याची एक जात.

**रातणें** [ सं० रत, रक्त ] **अ० क्रि०** १ रममाण होणें. २ कामक्रीडेमध्यें ( स्त्रीनें )पुरुषाशीं किं० (पुरुषानें) स्त्रीशीं गुंतलेलें असणें.

**रातनबाव, रतनबाव** **स्त्री०** नदी, पाट, ओढा, इ० वाहत्या पाण्याच्या प्रवाहांतील पाणी वाटेंत साठविण्यासाठीं केलेला खळगा.

**रातब** **पु०** मागें ' रतीब ' पहा.

**रातंबा, रातांबा** [ सं० रक्त=तांबडा ] **पु०** रातंबी ह्या झाडाचें फळ. ह्या फळाच्या सालींना 'आमसोल' किं० 'आमसूल' म्हणतात. ह्याच्या बीयांच्या तेलाला 'रातांबेल' म्हणतात. ॐ **रातंबे पिकणें** उन्हांत धावणें, चालणें, खेळणें, इ० मुळें गाल तांबडे होणें.

**रातंबी, रातांबी** [ सं० रक्त=तांबडा ] **स्त्री०**

एक झाड. ह्याचीं फळें तांबडीं असतात. वर ‘ रातंबा ’ पहा.

**रातंबेल, रातांबेल** [ म० रातंबा, रातांबा ] न० रातांब्याचें तेल. वर ‘रातंबा’ मध्यें पहा.

**रातवा**[म०रात]पु०१रात्रीचा समय;रात्रीचा अवधि;रात्रीचा प्रादुर्भाव ( पडणें,होणें ).२ रात्रीं पडलेला पाऊस. ४ रात्रीची घोड्यावरून करविलेली रपेट;घोड्याला रात्रीं फिरवावयास नेणें; उ०घोड्याला रातवा देत जा म्हणजे तो बुझेनासा होईल. ❀ **आलीकडे सात दिवस पावसानें रातवा धरला आहे** तो सात दिवस रात्रीं पडूं लागला आहे. **मी रातवा घेऊन चिंचवडास निघालों** रात्र संपावयाच्या अगोदर म्ह० सूर्योदयापूर्वीं मी निघालों. **रातव्याचा रुपाया** पु० नवरीच्या घरीं आलेला नवरामुलगा लग्नाच्या दिवशीं उपाध्याला देतो तो रुपाया.

**राता** [ सं० रक्त ] वि० १ काळसर तांबडा ( तांदूळ, फळ, कंद, इ० ). २ लालसर ( डोळे ). पु० एका जातीचा तांदूळ.

**रातांजन** पु०, न० एक झाड.

**रातांधळा** [ म० रात ( रात्र ) + अंधळा ] वि० रात्रीं ज्याला दिसत नाहीं किं० स्पष्ट दिसत नाहीं असा ( मनुष्य इ० ). **रातांधळें** न० रात्रीं न दिसणें किं० स्पष्ट न दिसणें ही विकृति.

**रातांबा, रातांबी, रातांबें, रातांबेल** मागें ‘ रातंबा,’ ‘ रातंबी,’ ‘ रातंबें,’ ‘ रातंबेल,’ पहा.

**रातावणें** [ म०रात; सं० रात्रि ] भावकर्तरि क्रि०रात्र पडूं लागणें; रात्र सुरू होऊं लागणें;उ० रातावण्याच्या अगोदर तुम्ही प्रवास सुरू करा.

**राताळी, रताळी** [ सं० रक्तालु ] स्त्री० उपासाला खातात त्या कंदविशेषाचा वेल. **राताळूं, रताळें** न० ह्या वेलाचा कंद.

**रातिवळा** [म०रात ]पु०गुरांना रात्रीं खावयाला त्यांच्यापुढें टाकिलेली वैरण.

**राती** [ सं० रात्रि ] स्त्री० रात्र ( कवितेंत ).

**रातोत्पळ** [ सं० रक्तोत्पल ] न० तांबडें कमल.

**रातोरात** [ म० रात+रात ] क्रि० वि० १ रात्रींच; रात्र असतां सुद्धां; रात्र मनांत न आणतां त्वरेनें; सबंध रातभर; उ० मी हें व्याख्यान रातोरात जागून लिहून काढलें. २ रात्र सरावयाच्या अगोदर; उ० आतांच नीघ म्हणजे रातोरात तूं आळंदीस पोचशील. ❀ **रातोरातीं** क्रि० वि० ऐन रात्रीच्या समयीं.

**रात्र** [ सं० रात्रि ] स्त्री० सूर्य मावळल्यापासून पुन्हा सूर्य उगवेपर्यंतचा काळ. ❀ **रात्रभर** क्रि० वि० सर्व रात्रीच्या वेळीं. **रात्र ओरडणें** १ रातकिड्याचें ओरडणें सुरू होणें किं० सुरू झालेलें असणें. २ रात्र सुरू झालेली असणें. **कोणेकाला रात्र वैऱ्याची जाणें** रात्र अत्यन्त दुःखांत किं० चिंतेंत जाणें. **मरती रात्र** स्त्री० ऐन रात्रीचा समय,—जेव्हां शपथ खरीच आणि प्रामाणिकपणाचीच घेतली जाते; उ० मी मरत्या रात्रीस तुला शपथ घेऊन सांगतों कीं ते पैसे मी घेतले नाहींत. **रात्रकिडा** पु० रात्रीं अत्यन्त कर्कश ओरडणारा एक क्षुद्र कीट,—ज्याला ‘राळ’ म्हणतात. **रात्रंदिवस, रात्रंदीस** क्रि० वि० रात्रीं आणि दिवसां; सर्व काळ. **रात्रांध** वि० ज्याला रात्रीं दिसत नाहीं किं० स्पष्ट दिसत नाहीं असा.

**रात्रि** [ सं० ] स्त्री० सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ. ❀ **रात्रिबितीं** क्रि०वि०रात्रीच्या समयीं. **रात्रौ** [सं०‘ रात्रि ’च्या सप्तमीचें ए०व० ] रात्रीं; रात्रीच्या समयीं. **रात्र्यंध** न० रात्रीं न दिसणें; रातांधळें. **रात्रिचर, रात्रिंचर** पु० १ चोर. २ पिशाच. ३ राक्षस. ४ गस्तवाला. **रात्रिजागर** पु० १ कुत्रा. २ डांस; चिलट.

**राद्धान्त** [ सं० ] पु० सिद्धान्त; निर्णय.

**रांधण (-न ), रान्ह, रान्हें** [ सं० रंधन= रांधणें=शिजविणें ] न० १ शिजविणें; भाजणें. २ भाकरी, पोळ्या, इ० भाजावयाचा मातीचा तवा.

**रांधणें** [ सं० रध्=शिजविणें ] स० क्रि० भाजणें किं० शिजविणें. अ० क्रि० स्वयंपाक करणें. ❀ **नाचतां येईना अंगण वाकडें,रांधतां येईना ओलां लाकडें** मागें ‘नाचणें’ मध्यें पहा. **सारी रात्र जागली आणि शेंगावांगी ( किं० शेणवांगी ) रांधलीं** खूप वेळ खर्चून कांहीं

निरुपयोगी पदार्थ निर्माण करणाराची टवाळकी करतांना हें वाक्य योजतात. **रांधतें घर** न० स्वयंपाक घर. **रांधा, वाढा, उष्टीं काढा** रांधणें, वाढणें, आणि उष्टीं काढणें, ह्या क्रियांची अनेक वेळां किं० एकसारखी आवृत्ति ( खाणावळ, लग्नीनघर, इ० च्या वर्णनांत ).

**रांधप** [म०रांधणें]न० १ रांधण्याची क्रिया.२ रांधून सिद्ध केलेला पदार्थ किं०सिद्ध केलेले पदार्थ समुच्चयानें. **रांधपी** पु० रांधणारा. **रांधपीण** स्त्री० स्वयंपाक करणारी स्त्री. **रांधवणी** [ म० रांधणें+पाणी ] न० ज्यांत खरकटी मांडा किं० खरकटे हात धुतले आहेत असें पाणी.

**रांधा** [ म० रांधणें ] पु० १ शिजवून किं० भाजून केलेलें मिश्रण.२शिजवून भाजून काढण्यासाठीं केलेलें मिश्रण. ३ वैद्य लोकांचें भट्टींत घालून भाजणें किं० शिजविणें ह्या साठीं तयार केलेले मिश्रण किं० भट्टींत तयार झालेला पदार्थ. ३ स्वयंपाक.

**राधा** [ सं० ] स्त्री० १ कर्णाची पालक माता,-अधिरथाची पत्नी. २ कृष्णाची आवडती स्त्री. ३ तमाशांत स्त्रीचें सोंग घेतलेला पोऱ्या; नाच्यापोऱ्या. ॐ **राधाई मावशी** स्त्री० गारोडी लोक वाजवितात त्या पुंगीच्या टोकावर हालत असते ती लाकडी किं०चिध्यांची बाहुली. **राधाष्टमी** स्त्री० आश्विन महिन्याच्या कृष्णपक्षांतील अष्टमी. हा राधेच्या जन्माचा दिवस. **राधेय** पु० राधेचा पुत्र कर्ण.

**रान** [ सं० अरण्य ] न० १ स्वच्छंदानें किं० आपोआप उगवलेल्या झाडांनीं व्यापिलेला प्रदेश; जंगल. २ मळा, शेत, बाग, इ० मध्यें नको तें गवत, झुडपें,इ० जीं उगवलेलीं असतात तीं समुच्चयानें. ३ मनुष्यानें मुद्दाम लाविलेलीं जीं नारळी, पोफळी, इ० झाडें त्यांचा समुदाय; उ० समुद्रकांठीं नारळीचें रान असतें.४कोणताही पदार्थ विपुल प्रमाणांत जेथें होतो, असतो, पिकतो,किं० आढळतो तो प्रदेश त्या पदार्थासंबंधानें; उ० वाळूचें रान, विंचवांचें रान, सापांचें रान, इ०. ५ देश, प्रदेश,-प्राण्यांचे वसतीस योग्य किं० अयोग्य ह्या दृष्टीनें; उ०घाटी माणसास कोंकणचे रान मानवत नाहीं; उ० कोंकणच्या रानच्या माणसांचे डोळे घारे आणि पिचके असावयाचेच. ६ ( भूमीच्या वरच्या थराची घटना किं० रचना सांगावयाची असतां मागल्या शब्दाच्या साहचर्यानें ) प्रदेश; उ० माळरान, खडकरान, काळें रान, चिकण रान, दगडरान, इ०. **टीप**,-'रान' शब्द कांहीं शब्दांच्या पूर्वी आला असतां तो पुढील विशेषणरूप अर्थ दाखवितो.रानातील, रानांत आढळणारें,-नागरिक नव्हे असें,विचित्र, तन्हेवाईक, छांदिष्ट, इ०; उ० रानडुकर, रानमांजर, रानकेळ, रानमाणूस, रानपडवळ, रान मूग, रानभांबा, इ०. ह्या जातीचे कांहीं शब्द ह्याच प्रतीकांत शेवटीं आम्ही देऊं. ॐ **रान काढणें** १ रानाचा प्रदेश झाडें तोडून लागवडीच्या उपयोगांत आणणें. २ कल्कलाट करून वन्य पशूंना त्यांच्या वसतिस्थानांतून उठवून भीतीनें सैरावैरा पळावयास लावणें,-शिकारी माणसांच्या सोयीसाठीं. ३ रानांत हिंडून कोठें काय आहे हें पाहाणें. **रान खवळणें** अ० क्रि० वन्य पशु भयानें सैरावैरा पळूं लागणें. **कोणेकाचें रान खवळणें** भूक, राग,कामविकार, इ० भावनांनीं तो बेफाम होणें किं० पीडित होणें. **रान घेणें** १ (गुरांनीं) रानांत चरावयास किं० भटकावयास जाणें.२ अव्यवस्थितपणें किं० स्वच्छंदानें वागूं लागणें. ३ वादांत विषयांतर करणें. **कोणेकानें रान बदलणें** ( किं० **रान सोडणें** किं० **रान पारखें करणें**)१ त्यानें पहिलें ध्येय, उद्देश, किं० बेत सोडून देणें. २ त्यानें वादाचा मुद्दा बदलणें. **रान मारणें** आपणाला अनुकूल परिस्थिति लाच भरून करून घेणें. **रान हाकणें** वर 'रान काढणें' अर्थ २ पहा. **रानांत शिरणें** ( किं० **आडरानांत सिरणें** ) मुद्दाम वाकड्या मार्गानें जाऊं लागणें ( वादांत किं०संभाषणांत ); भलत्याच सरणीनें संभाषण किं० वाद चालविणें. **आडरानांत पडणें** मित्र, हितचिंतक, इ० पासून वियुक्त होणें; असहाय स्थितींत पडणें. **रिकाम्या रानीं** व्यर्थ; कांहीं लाभ किं० लाभाची आशा नसतां ( काम करणें, राहाणें, बसणें, इ० ). **रानकट** वि० असभ्य किं० ग्राम्य चालीरीतींचा ( माणूस ). **रानकरी** पु० जगलांत राहाणारा. **रानकाळ्या** पु०आपआपल्या निवास-

स्थानीं लपून बसलेल्या वन्य पशूंना पारध्याच्या सोयीसाठीं उठवून सैरावैरा पळावयास लावण्या-साठीं योजलेला माणूस. **रानकापशी** स्त्री० काप-शांची एक जात. इतर जाति देवकापशी इ०. **रानखरडा** पु० जमीनीची मोजणी, मापणी, इ० सर्वेशाचा त्याचें जमीनीवर बसून केलेला आराखडा म्हणजे कच्चा खरडा. **रानगट** वि० १ भाषण, वर्तन, इ०कांत असभ्य. २ रानांत होणारा, उगवणारा, स्वैर वाढणारा, इ०. **रानगोवरी** स्त्री० रानांत पडलेलें शेण,– माणसानें गोवरीच्या रूपांत न थापलेलें. **रानचा राजा** पु० भिल्ल किंवा कातकरी जातीचा इसम. **रानजेवण** न० झाडाखालीं गमतीखातर स्वयंपाक करून किं० गांवांतून खाद्यें नेऊन रानांत जेवलेलें जेवण; वनभोजन. **रानटी** वि० १ असभ्य. २ रानांत उगवणारें किं० आढळणारें. **रानदांडगा** वि० अत्यन्त असभ्य, धीट, किं० अडदांड. **रानदांडगे** पु० अ० व० चोर, दर-वडेखोर, वाघ, इ० ना पळवून लावण्यासाठीं काठ्या, कोयते, खुरपीं, इ० आयुधें घेऊन निघालेले शेतकरी इ०. **रानपाळ** वि० भातशेताला फारशी चांगली नव्हे अशी ( जमीन. ) **रान-पिंपळ** पु० पारोसा पिंपळ ह्या नांवाचा एक वृक्ष. **रानभरू, रानभरी** वि० १ जंगलांत पळून गेलेलें ( माणूस, जनावर ). २ बायकोमुलें सोडून वैनांत भटकणारा माणूस. **रानभरी (-रू) होणें** १ रस्ता चुकणें; भलत्याच मार्गानें जाणें. २ भांबावणें; घाबरणें. **रानमाणूस** न० १ एका जातीचें माकड. २ असभ्य चालीरीतींचा माणूस. **रानरावताण** न०, **रानरावताणी** स्त्री० [ म० रान+राऊत ]घोड्यावर बसून एकाद्या गांवांवर चाल करून जाऊन लुटालूट करणारे दरवडेखोर, भामटे, इ० नीं केलेली लुटालूट, नासाडी, जाळपोळ, इ०. पुढें ' रावताण ' पहा. **रानवट** वि० १ लागवडींत न आणिलो गेलेली (जमीन). २ आपोआप रुजलेलीं किं० वाढलेलीं ( झाडें ). ३ असभ्य चालीरीतींचा ( माणूस ). **रानवत** [ म० रान+पत्र ( पान ) ] न० कुडा, केंजळ, इ० झाडाचें पान; ( केळीचें पान, पळसाचें पान, इ० जीं नेहेमच्या उपयोगांतलीं पानें त्याच्या व्यावर्तकत्वें ). **रानवन** [ म० रान +वन ] न० ए० व० मनुष्यें, गुरेंढोरें, इ० जेथें बहुधा जात नाहींत असें जंगल किं० असा जंगली प्रदेश. **रानवा** पु० ओसाड प्रदेश. **कोणेकाला रानवाळूक चारणें ( किं० खाऊं घालणें )** त्याला धोंडें मारणें. **रानवाळूक** न० धोंडा ( थट्टेंत). **रानशेणी** स्त्री० गुरांचें रानांत पडलेलें शेण,–जें जागच्या जागीं वाळतें आणि ज्याचा सरपण म्हणून उपयोग केला जातो. **त्याला रान-शेणीचें पीठ समजतें** त्याला कांहीं समजत नाहीं. **रानसठवी** स्त्री० सठवी देवी. **रानाळूं** न० एक प्रकारचें अळूं. **रानोमाळ** क्रि० वि० इतस्ततः किं० अव्यास्थित रीतीनें( पसरणें, टाकणें, धावत सुटणें, निघून जाणें, इ० ). **रान्या** वि० १ रानवट; रानांत होणारा, राहणारा किं० वाढणारा. २ असभ्य चालीरीतींचा( माणूस ).

**रान्ह, रान्हें** न० एक प्रकारचा अनेक छिद्रें असलेला मातीचा तवा,–रोठ, भाकरी, इ० भाजावयाच्या कामाचा.

**राप, रांप** पु० १ केळफूल, केळ, केळीचें पान, केळें, बाभळ, इ० फुलें, फळें, लाकूड, इ०च्या अंगच्या द्रवांत जो तुरटपणा असतो तो,– ज्याचें वस्त्र, कातडें, इ० वर काळे डाग पडतात. २ पोफळें ज्यांत शिजविलीं आहेत असें पाणी,– जें कोकणांत लाकडी सामानास शोभेसाठीं फास-तात. स्त्री० १ पावसाळी हवा. २ सतत पडत असलेला पाऊस. ह्या अर्थी ' रापेचा पाऊस ' पु० सुद्धां.

**रापणें, रांपणें** [ म० राप, रांप ] अ० क्रि० १ तुरट फळ, पान, झाडाची साल, लोखंड, इ० च्या संसर्गानें ( पदार्थ ) काळा होणें किं० ( त्याचेवर ) काळे डाग उत्पन्न होणें. २ (लोणचें इ०) खारांत चांगलें मुरणें किं० ( आंब्याच्या फोडी इ० मध्यें ) खाराचें पाणी भिनणें किं० शिरणें. ३ ( आंबे, केळीं, इ० फळें ) आढीमध्यें उबेनें पिकणें किं० पिकूं लागणें. ४ ( क्षार, रंग, इ० ) पदार्थविशेषांत शिरणें किं० भिनणें. ५ ( ताप, गरमीचें किं० अन्य रोगाचें विष )अंगांत भिनणें. ६ ( बातमी ) गांवांत सर्वांस कळणें किं० जगजाहीर होणें. ७( आजारांतून नुकताच

उठलेला मनुष्य ) टवटवीत किं० सतेज दिसूं लागणें. ८ सैन्य, दरवडेखोर लोक, इ० नीं (मुलूख) व्यापून कबज्यांत ठेवणें. ९ शेत इ० मध्यें ( गवत, रान, इ० ) उगवून त्यांत फैलावणें. १० शास्त्र, कला, विद्या, इ० मध्यें (कोणी मनुष्यानें ) परिचित, अभ्यस्त, किं० वहिवाटलेलें होणें.

**रांपणें स० क्रि०** १ ( पोट, गळूं, आंबा,इ० फळ )चेपून आणि चाचपून पाहणें किं०तपासणें. २ ( आट्यापाट्यांच्या खेळांत ) मुयदंड ही रेषा खेळाडूंना न ओलांडून देण्यासाठीं( तिच्यावर ) एका गड्यानें उभें राहून पहारा करीत असणें.

**रांपणें अ० क्रि०** अंधेरांत चांचपडत चालणें.

**रांपणें न०, रांपा पु०** पोफळें इ० फळांचीं कवचें सोलून काढण्याचें एक हत्यार.

**रांपी** [ **हिं०** ] **स्त्री०** १ कातडें कमावणाऱ्यांचें एक साधनविशेष. २ पोफळें इ० सोलण्याचें एक साधन.

**रांफ, रांफेचा पाऊस** वर ' रांप ' ' रांपेचा पाऊस ' पहा.

**राब स्त्री०** १ काकवीपेक्षां किंचित् दाट जो उसाचा रांधा करतात तो. २ कोणेक स्थळीं किं० वाटेनें किं० सरणीनें जाण्यायेण्याचा, बसण्याउठण्याचा,किं० कांहीं काम करण्याचा जो परिपाठ, चाल, किं० क्रम तो ( घालणें, पडणें ). ३ वर्दळ; दळणवळण. ४ केरकचरा, गवत, कडबा, काटक्याकुटक्या, इ० चा ढीग किं० पसारा. ५ साखर, पीठ, इ०पाण्यांत घालून केलेलें तोंडीं-लावणें. ६ आजारी माणसासाठीं केलेलें विशेषप्रकारचें पेय. ७ केरकचरा, काटक्याकुटक्या, इ० पृष्ठभागावर पसरून भाजलेली जमीन किं० अशा भाजलेल्या शेतजमिनीवर केलेलें पीक. ८ तूप, तेल, इ० ची बेरी किं० गाळ. **राबाचें पाणी न०** १ पारोसें पाणी.२ फारच डिचमळलेलें किं० ढवळलेलें पाणी.

**राबड** [ **म०** राबणें ] **स्त्री०** १ काम किं० कष्टाचें काम. २ चिखल; चिखलट जमीन.

**राबडणें** [ **म०** ' राबणें ' चें एक रूप ] **अ० क्रि०** कांहीं कष्टाच्या कामांत गुंतलेलें असणें.

**रांबड, रांबडा, रांबडकी** पुढें ' रांबाड ' ' **रांबाडकी** ' पहा.

**राबडी** [ **म०** राब ] **स्त्री०** १ दूध तापवून आणि आटवून त्यांत साखर, वेलदोडे,इ० घालून करतात तें खाद्य. २ दाट चिखल. ३ गुळाची थिरबिटी; पातळ झालेला गूळ.

**राबणी, राबणूक** [**म०** राबणें] **स्त्री०**१ जमीनीची हरएक प्रकारें केलेली मशागत. २ जाण्यायेण्याची--रहदारी; वर्दळ. ३ कांहीं कामाचा परिचय किं० वहिवाट.

**राबणें,रांबणें अ०क्रि०**१कांहीं कामांत गुंतलेलें राहून त्या कामावर मेहेनत घेण;कांहीं कामीं कष्ट सोसणें; खपणें; उ० पंचवीस माणसें महिनाभर राबलीं तेव्हां हा बांध रंगारूपास आला. २ कोणेक रस्त्यानें किं० कोणेक स्थळीं ( मनुष्यें, गुरें, इ० नीं ) जाण्यायेण्याचा परिपाठ ठेवणें किं० वसति करणें किं० राहाणें; उ० त्या भुताटकीच्या घरांत हल्लीं कोणी राबत नाहीं. ३ विशिष्ट प्रकारची वर्तनसरणी अवलंबिणें. ४ एकाद्या कामीं परिचित होणें. ५ ( गुरूं, माणूस, विद्यार्थी, इ० ) कळप, भोंवतालचीं माणसें, शाळा, इ० मध्यें परिचित होणें.६(रस्ता)वर्दळीनें किं० रहदारीनें मळणें किं० साफ होणें. **स० क्रि०** ( शेताची ) मशागत करणें; उ० आम्ही घरींच दहा बिघे शेत राबतों. ꣸ **राबेल तो चाबेल** कष्ट करील त्याला खावयाला मिळेल. **राव राबतात तेथें देव कांपतात** राजांच्या किं० समर्थांच्या करणीला देव सुद्धां बावरतात.

**रांबणावळ** [**म०** रांबणें] **स्त्री०** नवीन विकत घेतलेली गाय, म्हैस, इ० ना कळपांत जाऊन चरावयाची संवय करण्यासाठीं गुराख्याला देतात तो पैसा.

**राबता** [ **म०** राबणें ] **पु०**१वर्दळ; रहदारी. २ कांहीं कामाचा किं० घडामोडीचा परिपाठ. ३ महार इ० वर लादलेली वेठबिगार किं० ह्या वेठबगारीच्या मोबदला दिलेला किं०घेतलेला पैसा. **राबता, राबत्या पु०** वेठबिगारीसाठीं कामाला लाविलेला महार.

**राबरी स्त्री०** पुरता न कढविलेला उसाचा रस; काकवी.

**राबस, रामस वि०** १ भरभरीत किं० खरखरीत किं० नि:सत्त्व ( नागली, कांग, कुळीथ, राळे, सावा, इ० धान्यें ). २ फारसें रुचकर नव्हे असें ( काहीं खाद्य ). ३ ओंगळ, अव्यवस्थित, किळसवाणें ( खाणें किं० जेवणें ).

**रांबाड, रांबड**[**म**०राबणें,रांबणें]**वि**०स्वच्छंदीपणानें वागणारा किं० भटकणारा; स्वैरवर्तनी. ॐ **रांबाडकी स्त्री०** स्वच्छंदी वर्तन.

**राभस** वर ' राबस ' पहा.

**राम** [ **सं०** ] **पु०** १ पति; रमण. २ दशरथाचा पुत्र. परशुराम, दाशरथि राम, आणि बलराम, असे तीन राम पुराणांत सांगितलेले आहेत. ३ ( भिक्षुकांच्या भाषेंत ) एक रुपाया; रुपायाचें नाणें. ४ (वरील अर्थावरून साहजिकपणें ) ठसठशीतपणा; सामर्थ्य; ताकद; जोर; उ० ह्या उपरण्यांत आतां कांहीं राम राहिला नाहीं(म्ह०वापर सहन करण्याची ताकद राहिली नाहीं).मागें 'चकार,' 'चकारी,' 'पकार',हे शब्द पहा. 'राम ' हा शब्द पूर्वपदीं येऊन जे साधित शब्द होतात त्यांत ' राम ' चा अर्थ जोराचा, खूप मोठा, आवेशाचा, असा होतो; उ० रामरट्टा, रामरगाडा, रामटोला, इ०. अशा शब्दांपैकीं कांहीं ह्या प्रतीकांत आम्ही देणार आहों. **राम म्हणणें** १ मरणें. २ मोडणें, तुटणें, फाटणें; उ० त्या पेटीनें राम म्हटला. **टीप**,–मरणसमयीं 'राम' हें नांव उच्चारलें असतां उत्तम गति प्राप्त होते अशा समजुतीवरून राम म्हणणें म्ह० मरणें असा अर्थ झाला. नंतर पुढें मोडणें, तुटणें, फाटणें, विध्वस्त होणें, असें अर्थ झाले. **राम होणें** मरणें. **रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति** रामाचें कल्याण होओ किं०रावणाचेंही कल्याण होओ !आम्हाला दोन्ही गोष्टी सारख्याच. कांहीं गोष्टींविषयीं बेपर्वाई किं० तिऱ्हाईतपणा किं०तटस्थपणा वरील वाक्यानें दाखविला जातो. **रामकली(-ळी) स्त्री०** एक रागिणी. **रामकाटी, रामकाठी स्त्री०** बाभळीची एक जात. हिला 'पुळाटी ' 'रामबाभळ' अशींही नांवें आहेत. **रामकाठी वि०** पांढरी रेशमी किनारी ज्याला आहे असें (धोतर, लुगडें, इ०). **रामकुंड न०** गोदावरींत किं० दुसऱ्या कोणत्याही नदींत मृताच्या अस्थि टाकणें किं० स्नान करणें इ० च्या उपयोगाचें कुंड किं० टाकें. **रामगोळा पु०** ताकांत कालविलेल्या लाहीपिठाचा गोळा. रामनवमीच्या उपासाला असला गोळा खाण्याची चाल आहे. **रामचंद्र पु०** १ दशरथाचा पुत्र राम. २ विष्णूच्या दशावतारांपैकीं एक. **रामाचें नांव न०** बिलकूल कांहीं नाहीं; उ० आमच्या आपत्काळीं पाषाणकर मंडळींनीं आम्हाला मदत केली अशी तुमची समजूत आहे काय ? छे:! रामाचें नांव ! ( म्ह० त्यांनीं मुळींच मदत केली नाहीं ). **रामबाण औषध न०** हटकून गुण करणारें औषध. **टीप**,–रामाचा बाण कधीं फुकट जात नसे आणि तो लक्ष्याचा वेध करावयाला चुकत नसे, ह्यावरून वरील शब्दाची उत्पत्ति. **रामराज्य न०** १ अत्यन्त सुखाचें राज्य. २ कोणतीही गोष्ट करण्याची पूर्ण मोकळीक; आपण काहींही केलें तरी आपणाला रागें भरणारें कोणी माणूस नाहीं अशी स्थिति किं० परिस्थिति; उ० तीन दिवस आई आणि बाबा गांवाला गेले होते तेव्हां मुलांनीं रामराज्य चालविलें होतें. **रामचर्चा स्त्री०** मुळींच, अगदीं देखील, बिलकूल( अकरणरूपी प्रयोगांत बोलणें, सांगणें, इ० क्रियापदांच्या साहचर्यें );उ०ती तुम्हाला कितीही सांगो पण मी त्याला रामचर्चा एक अक्षरही बोललों नाहीं. **रामचर्चा करूं नको** एक अक्षर सुद्धां बोलूं नको; ब्र काढूं नको; चकार शब्द काढूं नको. **रामजन्म न०** रामाचा जन्म किं० ह्या जन्माचा दिवस ( चैत्र शुद्ध नवमी ) किं० ह्या प्रसंगाचा दरवर्षी करतात तो उत्सव. **रामनवमी, रामजयन्ती स्त्री०** चैत्र शुद्ध नवमीस रामाच्या जन्माचा करतात तो उत्सव. **रामटोला पु०** १ दांडूनें विटीला मारलेला पहिला तडाखा. २ काठी, बुक्की, इ० नी मारलेला रट्टा. ३ खूप जाडी भाकरी किं० पोळी. ४ कोणताही बेढब आणि नेहेमीपेक्षां मोठा पदार्थ. **रामदास पु०** १ एक साधुपुरुष,–ज्याणें दासबोध हा ग्रंथ लिहिला. २ ( भिक्षुकांच्या भाषेंत) एक आणा. **रामदासी वि०** रामदासानें स्थापिलेल्या पंथाचा. **रामदूत पु०** १ माकड. २ वानर. **रामनगरी राघू पु०** पंखांवर तांबडे ठिपके अस-

लेला एका जातीचा राघू. **रामनांवी** वि०'राम' हा शब्द जींवर कोरलेला किं० वठविलेला आहे अशी ( आंगठी इ० ). **रामपत्री** स्त्री० मायपत्री. **रामटेकी** वि० रामटेकगांवचें ( विड्याचें पान ). **रामपहारा, रामपाहरा, रामपाहारा** पु० सूर्योदयानंतरचे पहिले तीन तास हा अवधि,-खोटें बोलण्याला अत्यन्त निषिद्ध. **रामपात्र** न० पाणी प्यावयाचें धातूचें आकारविशेषाचें लहान पात्र. **रामप्रतिज्ञा** स्त्री० निश्चित वचन. **रामफळ, रामफळी** स्त्री० शिताफळीच्या जातीचें एक झाड. **रामफळ** न०ह्या झाडाचें फळ.**रामरगाडा, रामरगाडा** पु० माणसें, कामें, चिंता, इ० चा असह्य अतिरेक किं० पसारा किं० पुष्कळपणा. **रामरट्टा** पु० १ खूप जोराचा रट्टा किं० तडाखा ( देणें, दाखविणें ).२धंद्याची किं०कामाची असह्य जोखीम किं० जबाबदारी. ३ दाटी; गर्दी; निबिडपणा. **रामरक्षा** स्त्री० १ दाशरथि रामाचें एक स्तोत्रविशेष. २ ह्या स्तोत्रानें मंतरून समर्थ केलेली राख. ३ ( थट्टेंत ) लाह्यांचें पीठ. ४ बाळंतलिंबाच्या पानांचा भारा. **रामराम** पु० मराठे लोक एकमेकांना करतात तो नमस्कार. **रामरामी** स्त्री० १ ( मराठ्यांत ) एकमेकांनीं एकमेकांस केलेले रामराम. २ केवळ तोंडओळख म्ह० नुसता रामराम करण्याइतकीच ओळख किं० घसड. **रामवचन** न० खरें भाषण; सत्य भाक. **रामाचें नांव** न० मागें ' रामचर्चा ' पहा. **रामाचें राज्य** न० वर ' रामराज्य ' पहा. **रामानुज** पु० विष्णुभक्तांचा एक पंथ स्थापिणारा आचार्य किं० ह्या आचार्यांचा अनुयायी. **रामायण** न० दाशरथी रामाचें चरित्र ज्यांत गायिलें आहे असा वाल्मीकि ऋषीनें रचिलेला ग्रंथ. २ दाशरथी रामाचा इतिहास किं० चरित्र. ३ कोणतीही लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत. ४ अव्यवस्था; घालमेल; गोंधळ; उ० ह्या पोरानें चिरगुटांचे रामायण करून टाकलें. **ताकापुरतें रामायण** न० मागें ' ताक ' मध्यें पहा. **रामेश्वर** पु० शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. मागें ' ज्योति ' मध्यें ' ज्योतिर्लिंग ' पहा.

**रामणें** अ० क्रि० मागें ' रांवणें ' पहा.

**रामा** [ सं० ] स्त्री० १ स्त्री. २ सुंदर स्त्री.

**रामाटा (-ट्या ),रामेठा** पु०, **रामेटी** स्त्री० एक जंगली झाड. त्याचें फूल पिवळें असतें.

**रामोसी, रामोशी** पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**राय, राया** [ सं० राजन्; न० राजा ] पु० १ राजा. २ पुरुषाच्या नांवापुढें जोडावयाचा प्रेमाचा किं० आदराचा शब्द; उ० गोविंदराय. ※ **रायभुलावण** स्त्री० बड्या लोकांनाही भुलविणारी स्त्री; सुंदरी; परी. **रायराजेंद्र** पु० ( लावण्यांत ) कोणीही बडा माणूस. **रायविनोदी** पु० बहुरूपी; खुषमस्कऱ्या.

**राय** [ हिं० ] स्त्री० १ मत; निर्णय. २ उपदेश; सल्ला. [ बानी.

**रायत** [ अ० रआयत ] स्त्री० कृपा; मेहेर-

**रायतें** न० मोहोरी, मीठ,इ० पदार्थांचें तोंडीं लावण्यासाठीं केलेलें मिश्रण.

**रायभोग** पु० तांदुळाची एक जात.

**रायवळ** [ म० राई + आवली ] वि० १ साग, शिसू, खैर, फणस, ह्या झाडांशिवाय इतर झाडांचें ( लाकूड,-इमारत, लाकडी सामान, इ० च्या रचनेसंबंधांत बोलतांना ). २ जंगली(आंबा, आंवळा, इ० फळासंबंधानें बोलतांना ).

**रायात** [ अ० रआयत ] स्त्री० कृपा; मेहेरबानी.

**राव** [ सं० राजन्; म० राय ] पु० १ राजा. २ पुरुषाच्या नांवापुढें योजावयाचा बहुमानाचा हा शब्द आहे; उ० गोविंदराव, मल्हारराव, इ०. ३ एखाद्या संस्थेचा किं० पेढीचा मालक किं० मुख्य व्यवस्थापक. ४ मराठ्यांची एक पोट जात किं० त्या जातीचा कोणी इसम. ५ ( थट्टेंत किं० उपहासांत ) कोणीही मनुष्य; उ० आम्ही सर्व लोक वनभोजनाला जमलों पण हे राव येईन म्हणून आले नाहीत. ६ दांडगा, उद्धट, किं० बढाईखोर माणूस. ※ **रावकी** स्त्री० १ रावाचा हुद्दा, दर्जा, किं० मोठेपणा. २मोठेपणा; वैभव. **राव नेणे सुकाळ दुकाळ** श्रीमंताला सर्व काळ खावयास प्यावयास मुबलक मिळतें म्हणून त्यांना गरीब लोकांची दुःस्थिति ही काय वस्तु आहे हें कळूं शकत नाहीं. **राव करीत नाहीं तें गांव करतो** अनेक लोकांच्या

पकोप्थानें जें काम होऊं शकतें तें पैसा, अधिकार,इ० च्या जोरानें देखील होऊं शकत नाहीं. **रावाचा रंक होणें** वैभवाच्या स्थानापासून च्युत होऊन सामान्य माणसाच्या दर्ज्यांस पोंचणें ( दैवाच्या विलसितांसंबंधानें बोलतांना ). **राव खालीं आले** रावसाहेब घोड्यावरून पडले. **टीप,**–श्रीमंत माणसासंबंधानें किं० अधिकाऱ्यांसंबंधानें बोलतांना लोक भयानें सौम्य भाषा वापरतात आणि हलक्या किं० सामान्य माणसासंबंधानें बोलतांना कर्कश भाषा वापरतात. **राव घोड्याखालीं आले** राव मेला. **रावरंक पु०** श्रीमंत माणूस आणि गरीब माणूस; उ० साधूला रावरंक सारखेच.

**रावखंडा** मागें ' राखुंडा ' पहा.

**रावटी[हिं०]स्त्री०**प्रवासांत तात्पुरत्या वसतीसाठीं जें वस्त्राचें घर उभारतात तें; लहान तंबू.

**रावण [ सं० ] पु०** १ शत्रूस रडावयास लावणारा. २ लंकेचा राजा,–ज्याला रामानें युद्धांत मारिलें. ३ कोणीही बेढब आणि अगडबंब शरीराचा माणूस, पशु, बोका, इ०. ✿ **रावणराज्य न०** राज्य, सभा, संस्था, इ० तील अंदाधुंदी, अव्यवस्था, अन्यायी कारभार, इ०. **रावणवेला स्त्री०** स्वारीवर, प्रवासास, किं० युद्धासाठीं बाहेर पडण्यास शुभ समय. **रावणाचा लेक पु०** उद्धट, **मग्रूर, किं०** असभ्य माणूस. **रावणाची लंका जळणें** कानांचीं भोकें बोटांनीं बंद केलीं असतां भासतो तो आवाज सुरू होणें. **रावण माजणें ( किं० मातणें किं० होणें )** उद्धट वर्तन करणें. **रावणाची वाजंत्री स्त्री०** डांसांची गुणगुण. **रावणाची खाई स्त्री०**जेथें कितीही मोठ्या प्रमाणांत पदार्थ आणले तरी कमताईच भासते असा ( संसार, व्यापार, खादाडाचें पोट, इ० ).

**रावणी [ म० रावणें ] स्त्री०** कातडें कमावण्याच्या उपयोगाचा खळगा.

**रावणी[म०राव]स्त्री०**विनवणी;प्रार्थना.प्रयोग नेहेमीं अ० व०.✿ **कोणेकाच्या रावण्या करणें** त्याचीं आर्जवें करणें;त्याला प्रार्थिणें किं०विनविणें.

**रावताण न०,रावताणी स्त्री० [म० राऊत]** मागें ' रान ' मध्यें ' रानरावताण ' ' रानरावताणी, ' हे शब्द पहा.

**रावरंक [ म० राव+रंक ] पु०** मागें 'राव' मध्यें ' रावरंक ' पहा.

**रावस, रांवस पु०** खाऱ्या पाण्यांतील एक तांबूस वर्णाचा मासा.

**रावा पु०** दळलेली हळद.

**रावा पु०** पोपट किं० राघू हा पक्षी. ✿ **रावामुख न०** पोपटासारखें तोंड,–घोड्याचें एक अशुभ लक्षण.

**रावा [ म० रावखंडा ] वि०** मागें ' रावखंडा ' पहा. [ शेष.

**रांवेरी, रावेरी स्त्री०** तांबड्या रंगाचें वस्त्रवि-

**राव्हटी स्त्री०** मागें ' रावटी ' पहा.

**राशा [ म० रास=ढीग ] वि०** १ मध्यम प्रतीचा; साधारण दर्जाचा. २ षंढ; नपुंसक. नामर्द; कमकुवत; कर्तृत्वशून्य ( माणूस ).

**राशि, रास [ सं० ] स्त्री०** १ ढीग; समूह. २ तारात्रचक्राचे मेष, वृषभ, इ० जे बारा भाग ते प्रत्येक. ३ ( **गणितांत** ) त्रैराशिक, पंचराशिक, इ० तील जीं परिमाणें तीं प्रत्येक. ४ ( **गणितांत** ) संख्या; परिमाण; गुण्य, गुणक, भाज्य, भाजक, मिळवणीची रकम, इ०. ५ संचय; साठा; उ० पापराशि, पुण्यराशि, तपोराशि, इ०. पुण्यराशि म्ह० मूर्तिमंत पुण्य म्ह० अत्यन्त पुण्यवान् माणूस. ६ पदार्थांची मध्यम प्रत किं० कनिष्ठ प्रत; उत्तम प्रतीचा नव्हे असा पदार्थ;उ० हे राशींतले तांदूळ आहेत, ते तुम्हाला चालणार नाहींत. ७ बट्ट परिमाण; एकंदर आंकडा, रकम, किं० बेरीज. ८ निवडणें, पाखडणें, इ० संस्कार करावयाच्या अगोदरच्या स्थितींतील धान्य. ९ चांगला वाईट अशी निवड न करतां केलेला ढीग किं० समूह. १० बैलांनीं एकदा कणसें तुडवून निघतें तें धान्य. ह्याला ' पहिलें मदन ' असेंही म्हणतात. मागें ' मदन ' पहा. ✿ **राशिपुंजीस येणें** निवळ नफा उरून तो भांडवलांत भरतसि पडणें किं० शिल्कीस पडणें. **राशीवर क्रि० वि०** कणसें झोडपण्याच्या खळ्यावर. **एकाद्याच्या राशीस बसणें ( किं० लागणें )** त्याची पिच्छा पुरविणें;त्याच्या पाठीस लागणें;त्याला छळणें किं० सतावून सोडणें. **राशिकूट,रासकूट न०** वधूवरांच्या

जन्मसमयींच्या राशि जोडीनें किं० त्या जोडी-वरून निघणारें वधूवरांचें सख्य किं० वैर. **राशि-घटित, रासघटीत न०** वधूवरांच्या जन्मराशींवरून निघणारें सख्यरूपी किं० वैररूपी फळ. **राशिचक्र न०** मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, आणि मनि, ह्या बारा शींचें चक्र. **राशिनाम, रासनाम, रासनांव** न [illegible] रास पाहून मुलाचें ठेवितात तें नांव. **राशिभोग पु०** ग्रहाचा एका राशींतील गमनकाल. **राशी वि०** १ राशींतलि, म्हणजे निव-डणें, पाखडणें, सडणें, इ० अगोदरच्या स्थितींतील ( धान्य, इ० ). २ फार उंची नव्हे किं० निंची नव्हे असा म्ह० मध्यम प्रतीचा किं० योग्यतेचा. ३ षंढ; नपुंसक. **रासपुजा, रासभरणें, रासमाथां (-माथ्यास)** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

**राष्ट्र** [ **सं०**] **न०** १ राज्य. २ एका विवक्षित सरणीनें ज्यावर अमल चालला आहे किं० जेथें विवक्षित शासनपद्धति सुरू आहे असा खूप मोठा जनसमूह किं० देश. ३ प्रांत; देश. ४ एकाद्या देशांतील लोक समुच्चयानें. ५ एके ठिकाणीं जम-लेलीं पुष्कळ माणसें, मुंग्या, माशा, इ० समुच्च-यानें. **राष्ट्रीय, राष्ट्रिय वि०** १ राष्ट्रासंबंधाचा. २ ज्यांत राष्ट्राचें हित आहे असें. ३ ज्यांत किं० जेणें करून आपलें राष्ट्र किं० आपला देश ह्यांना यत्किंचित् बाधक न होतां लोकांच्या उच्च मनोवृत्तींना पूर्ण अवसर मिळतो असें ( शिक्षण, शाळा, निशाण, ग्रंथ, इ० ). ४ राष्ट्रांतील सर्व लोकांना ज्याचा अभिमान वाटतो असा (पुरुष, निशाण, रामायणभारतादि ग्रंथ). **राष्ट्रिय सभा स्त्री०** हिंदुस्तानच्या सर्व जनतेच्या प्रतिनिधींची इ० स० १८८५ सालीं स्थापण्यांत आलेली सभा.

**राष्ट्राण, राष्टाण** [ **सं०** राष्ट्र; **म०** राष्ट्र ] **न०** १ अव्यवस्थितपणें इतस्ततः पसरलेले पदार्थ समुच्चयानें. २ सामानासुमानाचा, चिरगुटांचा, किं० कांहीं कामांत जरूर अशा साधनसामग्रीचा पसारा ( पडणें, घालणें ).

**राष्णा, रास्ना** [ **सं०** रास्ना ] **स्त्री०, पु०** कोलिंदण; मुंगुस वेल.

**रास** [ **सं०** राशि] **स्त्री०** मागें ' राशि ' पहा.

**रास** [ **अ०** रास्= डोकें ] **पु०** ( घोड्याची गणती करतांना ) व्यक्ति; उ० घोडे रास दहा ( म्ह० दहा घोडे ). याच सरणीनें गायी, बैल, म्हशी, रेडे सर दहा( म्ह० दहा गायी इ० ). उंट नफर पंधरा ( म्ह० पंधरा उंट ). हत्ती नग बारा ( म्ह० बारा हत्ती ).

**रास** [ **सं०** ] **पु०** १ गलबला. २ आवाज; ध्वनि. ३ गवळ्यांचें वर्तुळाकार म्ह० फेर धरून नृत्य. ४ उत्सव. ※ **रासक्रीडा स्त्री०** कृष्ण आणि गोपी यांचें नृत्य. **रासनाहुणें, रासन्हाणें न०, रासन्हाणी स्त्री०**[ **सं०** रास+स्नान ] लग्नाच्या समारंभांत वरपक्षाकडील स्त्रियांना वधूपक्षाकडून स्नानें घालणें, बांगड्या भरणें, इ० चा केला जातो तो सत्कार.

**रास** [ **फा०** रास्त=सरळ, खरें] **वि०** सरळ, वाकडें नव्हे असें ( कपडा शिवावयासाठीं काप-डाचे तुकडे पाडतांना शिंपी लोकांत प्रयोग ).

**रासकरदन** [ **अ०** रास्=डोकें+**फा०** कर्दन् =करणें ] **न०** एकादा दागिना, भांडें, इ० मोडून नवा दागिना, भांडें, इ० घडविलें असतां जुना पदार्थ खर्चीत दाखविणें आणि नवा पदार्थ जमेंत दाखविणें हा जमाखर्च लिहिण्याचा प्रकार.

**रासकूट, रासघटित, रासनाम (-नांव)** मागें ' राशि ' मध्यें पहा.

**रासणी** [ **म०** रास ] **स्त्री०** बैलांच्या जोतां-तील म्होरक्या बैल.

**रासना** [ **सं०** रास्ना ] **स्त्री०** एक औषधो-पयोगी झाड किं० त्याचें मूळ. मागें ' राष्णा ' पहा.

**रासनी स्त्री०** बी पेरल्यावर तें झाकून टाक-ण्याचें शेतकामांतलि एक आउत. ※ **रासन्या पु०** हें आऊत चालविणारा गडी.

**रासपुजा** [ **म०** रास+ **सं०** पूजा] **स्त्री०** झोडपून काढलेल्या धान्याची पूजा.

**रासभ** [ **सं०** ] **पु०** गाढव हा चतुष्पाद प्राणी. **रासभी स्त्री०** गाढवी.

**रासभरणें** [ **म०** रास+भरणें ] **न०** झोड-पलेलें धान्य सळ्यांवर रास करून ठेवणें.

**रासमाथां, रासमाथ्यास** [ **म०** रास +

माथा ( डोकें ) ] क्रि० वि० धान्य झोडपून त्याची रास केल्यावर ( सावकाराशीं शेतकरी उसने पैसे मी कधीं फेडीन हें सांगतांना ); उ० मला तुम्ही आज पंचवीस रुपये द्या,हरभऱ्याच्या रासमाथां(किं०रासमाथ्यास) मी ते सव्याज फेडीन.

**रासवट** [ म० रास ] वि० मध्यम प्रतीचा; बोजड; फारसा उंची, सुंदर, किं० मोहक नव्हे असा ( माणूस, पदार्थ ).

**रासवटा, रासोटा** [ म० रास+ठाय ] पु० खळ्यांतून धान्य घरीं आणल्यावर खळ्यांत जें उरलें सुरलें धान्य असतें तें,–जें महाराला हक्क म्हणून द्यावयाचें असतें.

**रासोत्सव** [ सं० रास+उत्सव ] पु० मागे ' रास ' मध्यें ' रासक्रीडा ' पहा.

**रास्त, रास्ती** [ फा० रास्त् ] वि० १ खरा. २ न्याय्य; वाजवी.३ प्रामाणिक( भाषण, माणूस, वर्तन,इ० ). ४ चोख;तंतोतंत ( वजन, माप ).※ **रास्तकौली** स्त्री० खरेपणा; खरें बोलण्याचा गुण; सत्यवक्तेपणा. **रास्तगो** [ फा० रास्त (खरें) +गुफ्तन् ( बोलणें ) ] वि० खरें बोलणारा. **रास्तगोई** स्त्री० खरें भाषण. **रास्तमामलगी** स्त्री० न्याय्य वर्तन; सचोटीची वर्तणूक. **रास्तरवी** [ फा० रास्त ( सरळ )+रफ्तन् (जाणें) ] स्त्री० सरळपणा; सरळपणाचें वर्तन. **रास्ती माप** न० खरें माप,–बोटधरणी माप, हातधरणी माप, इ० च्या व्यावर्तकत्वें. मागें ' बोटधरणी ' पहा.

**रास्ता** पु० लुगड्यांचा एक प्रकार.

**रास्ना** [सं०] स्त्री० कोलिंदण; मुंगुसवेल.

**राहकळ** स्त्री०, न० १ गुरें, माणसें, इ० ची भयामुळें झालेली दाणादाण किं० धावपळ. २ माणसांचें हमरीतुमरीवर येऊन भांडण.

**राहटणें** इ०मागें ' रहाटणें ' इ० पहा.

**राह, रहा** [ फा० राह् ] स्त्री० मार्ग; रस्ता. मागें ' रहा ' पहा. ※ **राहदार** पु० १मार्गदर्शक. २ नाकेवाला.

**राहणें** मागें ' रहाणें ' पहा.

**राहळ** मागें ' रहाळ ' पहा.

**राहित्य** [ सं० ] न०शून्यपणा;नसणें; अभाव; उ० द्रव्यराहित्य इ०.

**राहु** [ सं० ] पु० ( ज्योतिष ) नवग्रहांतील आठवा. ※ **राहुग्रसन** न० ग्रहण. **राहुरत्न** न० गोमेद हा मणि. **राहूसारखें कोणेकाच्या मागें लागणें, कोणेकाचा राहुकेतु प्रमाणें पाठ घेणें** त्याचा पिच्छा पुरविणें; त्याचा नाश करण्याची संधी मिळण्यासाठीं टपून बसणें. **टीप**,–राहु आणि केतु ह्या नांवाचे दोन दैत्य असून ते सूर्य आणि चंद्र यांना संधी साधतांच ग्रासतात म्हणजे खाऊन टाकतात; तेणेंकरून सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण हे प्रकार होतात अशी समजूत असे.

**राहुटी, राहोटी, रावटी** स्त्री० वस्त्राचें बनविलेलें तात्पुरतें वसतिगृह.

**राळ** [ सं० राल ] स्त्री० १ सालईचा चीक किं० डीक; हा त्वरित पेट घेतो. २ फजीती; बोऱ्या (उडणें). ※ **पदार्थाची राळ होणें** त्याची नासाडी, दुर्दशा, किं० विध्वंस होणें.

**राळ** स्त्री० एक क्षुद्र कीट,–जो रात्रीं किर्र असा ओरडतो.

**राळवण** खालीं ' राळा ' मध्यें पहा.

**राळसाळ** खालीं ' राळा ' मध्यें पहा.

**राळा** पु० एक धान्य. ※ **राळवण** (–न ) न० राळा ह्या धान्याचीं ताटें समुच्चयानें. न०, स्त्री० १ नासाडी; दुर्दशा. २ कष्टाच्या कामानें आलेला थकवा किं० शीण. ※ **कोणेकाच्या जिवाचें राळवण होणें** तो कामानें मेटाकुटीस येणें; तो कामामुळें जर्जर होणें. **राळसाळ** वि० गदळ किं० टाकाऊ भाग.

**राक्षसी** वि० खालीं ' राक्षस ' मध्यें पहा.

**राक्षस** [सं०] पु०१ देव, मनुष्य, यांची स्पर्धा करणारी तामस प्रकृतीची एक प्राण्यांची आहे तींतील एक व्यक्ति. २ कोणीही उग्र स्वभावाचा किं० तापट माणूस. ३ फार खादाड. ※ **राक्षसगण** पु० भरणी, कृत्तिका, आश्लेषा, मघा,चित्रा, विशाखा, ज्येष्ठा, मूळ, आणि शततारका, ह्या नऊ नक्षत्रांवर जो जन्मला त्याचा गण. मागें ' देव ' मध्यें ' देवगण ' पहा. **राक्षसमुखी** वि० दक्षिणेकडे तोंड करून असलेला. **राक्षसमोहरा, राक्षसमोरा, राक्षस**

मोहरी क्रि० वि० दक्षिणेकडे तोंड करून. राखेस मोहरा क्रि० वि० दक्षिणेकडे तोंड करून. गंगमोहरा (-री ), गंगामोहरा (-री ) उत्तरेकडे. मागें ' राखेसमोहरा ' पहा. राक्षसविवाह पु० जबरदस्तीनें कन्या पळवून नेऊन तिच्याशीं केलेला विवाह. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टविवाहविधि ' पहा. राक्षसवेळ स्त्री० सूर्यास्त आणि रात्र यांचा दरम्यानचा काळ; तिन्ही सांजांची वेळ. राक्षसान्न न० बाजरी, उडीद, मसूर, राळा, मिरची, इ० चें तामस अन्न. राक्षसी, राक्षसीण स्त्री० राक्षस जातीची स्त्री. त्या घरांत राक्षसणी पीठ कांडतात तें घर ओसाड आणि भयाण आहे. राक्षसी, राक्षशी वि० १ राक्षसाच्या संबंधाचा. २ राक्षसालाच शोभेल असें. ३ भयंकर; क्रूर; कठोर. राक्षसी अवतार, राक्षसाचा अवतार पु० अत्यंत क्रूर किं० भयंकर माणूस. राक्षसी उपाय ( किं० उपचार ) पु० क्रूर, कठोर, किं० अघोरी इलाज. राक्षसी झोप स्त्री० फारच दीर्घ काळपर्यंत घेतलेली झोप. राक्षसी धान्य न० बाजरी हें धान्य, -जें हेमाडपंतानें लंकेंतून आणलें असें समजलें जातें. राक्षसी मुलूख पु० नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेश. उत्तरेकडच्या मुलखाला ' देवमुलूख ' म्हणतात. राक्षसी संपत्ति स्त्री० मागें ' आसुर ' मध्यें ' आसुरी संपत् ' पहा.

रिकब, रिकवी, रिकाबी [ अ० रिकाब् ] स्त्री० घोड्यावर चढतांना पायाला आधार म्हणून आणि वर बसल्यावर पाय टेकावा म्हणून दोन बाजूंस ज्या दोन कड्या लोंबत सोडलेल्या असतात त्या प्रत्येक. पुढें ' रिकिबी ' पहा.

रिकविणें [ सं० रिच् ] स० क्रि० १ (भांडें इ० ) रिकामें करणें. २ बारदानांत ( पदार्थ ) कोंबून कोंबून भरणें.

रिकांडी स्त्री० कोष्टयाच्या धोट्यांतील सूत गुंडाळलेली कांडी.

रिकामका इ० खालीं ' रिकामा ' मध्यें [पहा.

रिकामा [ सं० रिक्त ] वि० १ ज्यांत कांहीं नाहीं असें ( बारदान, घर, खोली, इ० ). २ पुराव्यानें, प्रमाणानें, उदाहरणानें, वगैरे ज्याची सत्यता किं० यथार्थता सिद्ध करण्यांत आलेली नाहीं किं० सिद्ध करून देतां येत नाहीं असा म्ह० निराधार ( वाद, विधान, हकीगत, इ० ). ३ ज्यांत तथ्यांश नाहीं असा. ४ ज्या जागेवरचा अधिकारी किं० काम करणारा गैरहजर आहे किं० अद्यापि नेमण्यांत आलेला नाहीं किं० रजेवर गेलेला आहे अशी ( अमलदार, अधिकारी, इ० ची जागा ). ५ निरर्थक; निष्फळ; निष्प्रयोजन ( दगदग, पायपिटी, चौकशी, बोलणें, ढंग, इ० ). ६ ज्याला कांहीं नोकरी, उद्योग, धंदा, इ० नाहीं असा; उ० रिकामा न्हावी भिंतीला(किं० कुडाला) तुंबड्या लावी. ७ एकटा; उ० मी तुला घेऊन जाणार, मी रिकामा जाणार नाहीं. ८ कोणाच्याही मालकीचा नसलेला ( देश, मुलूख ); उ० आर्यांना दंडकारण्याचा प्रदेश रिकामा सापडला. ॐ रिकामटेकडा, रिकामटवळा, रिकामचोट वि० निरुद्योगी; निष्फळ ( निंदेंत ). रिकामा वेळ पु० फुरसुतीचा काळ; उ० मी रिकाम्या वेळांत सूत काढतों. रिकाम्या रानीं क्रि० वि० विनाकारण; फळाची आशा किं० संभव नसतां. रिकाम्या हातानें जरूर अशी वस्तु बरोबर न घेतां; आणावयाची वस्तु न आणतां; न्यावयाची वस्तु न नेतां. रिकाम्या चेष्टा स्त्री० निष्फळ खटपट. रिकामका वि० रिकामा; निरुद्योगी; व्यर्थ. रिकामटी, रिकामणूक स्त्री० फुरसुत; रिकामा वेळ. रिकामपण न०, रिकामपणा पु० फुरसत; कांहीं विशेष कामानें गुंतलेला नाहीं असा कोणेकाचा वेळ. रिकाम चावडी स्त्री० निरुद्योगी माणसांची बसावयाची किं० गप्पा मारावयास जमण्याची जागा ।किं० अड्डा. रिकामा ताठा पु० पोकळ डौल किं० बढाई; उ० नाकीं नाहीं कांटा आणि रिकामा ताठा.

रिकिबी, रिकीब, रिकेबी [ अ० रिकाब् ] स्त्री० घोड्यावर चढतांना किं० घोड्यावर बसलें असतां पायाला आधार म्हणून ज्या दोन कड्या खोगिराच्या दोन बाजूंस लोंबत सोडिलेल्या असतात त्या प्रत्येक. मागें ' रिकबी ' पहा. ॐ दररिकेबीस क्रि० वि० १ पुनः पुनः; वारंवार ( कांहीं वाईट गोष्ट करणें ). २ प्रत्येक स्वारींत किं० मोहिमींत किं० खेपेंत. रिकीबदाल पु० तंगास रिकीबी बांधावयाच्या दोन दोऱ्या प्रत्येक.

रिक्त [ सं० ] वि० १ रिकामा. २ हीन;

दीन; दरिद्री. ॐ **रिक्तहस्त, रिक्तपाणि वि०** राजा, साधु, देव, बाळंतीण, इ०च्या भेटीस जावयाचें असतां कांहीं तरी नजराणा ( फळें, विड्याचीं पानें इ० पदार्थ )ज्याणें बरोबर घेतला नाहीं असा. **रिक्त भाषण न०** पोकळ बढाईचें, निराधार, किंवा निष्फळ असे बोलणें. **रिक्ता स्त्री०** चतुर्थी, नवमी, आणि चतुर्दशी, ह्या तिथि प्रत्येक. **रिक्तकोष्ठ न०** आंतील अन्नांश किंवा मलांश नाहींसा झाल्यामुळें रिकामा झालेला पोटाचा कोठा.

**रिंगण [ सं० ] न०** १ मुलांचें रांगणें. २ घसरणें. ३ धर्म, जात, इ० पासून च्युत होणें.

**रिंगणा स्त्री०** खांबाच्या माथ्यावर आणि तात्याच्या खालीं असते ती तुळई किंवा कडी.

**रिंगणी [ हिं० रींगनी ] स्त्री०** वांग्याच्या वर्गांतील एक कांटेरी वनस्पति. **रिंगणें न०** १ह्या वनस्पतीचें फळ. २ मुलांचें एक आकारविशेषाचें खेळणें.

**रिगणें, रिघणें अ० क्रि०** १ प्रविष्ट होणें; शिरणें. २ जावयाला निघणें; प्रस्थित होणें. ३ ( झाडाच्या मुळांनीं ) जमीनींत घुसणें.

**रिगाव** खालीं ' रिघाव ' पहा.

**रिंगी स्त्री०** रिठ्याचें झाड.

**रिघणें** वर ' रिगणें ' पहा.

**रिघाव (–वा ), रिगाव (–वा ) [ म० रिगणें, रिघणें ] पु०** प्रवेश, शिरकाव ( बळानें किंवा युक्तीनें ). [ दमादमानें.

**रिघे रिघे क्रि० वि०** हळूं हळूं; संथपणें;

**रिचवणें, रिचावणें [ सं० रिच् ] अ० क्रि०** १ ढासळून पडणें; उ० उतरंड नीट रच, नाहीं तर सारीं भांडीं रिचवतील. २ जोरानें किंवा वेगानें ( पाऊस, झाडांचीं पानें किंवा फळें, पोत्यांतील धान्य, जखमेंतून रक्त, इ० ) गळणें, बाहेर पडणें, वाहणें, किंवा उसळणें. ३ मनुष्याच्या तोंडांतून किंवा गुदांतून ( पोटांतील ) अजीर्णांश जोरानें बाहेर पडणें. ४ ( मनुष्याला ) जोराचा रेच किंवा वांति होणें. ५ ( मनुष्य ) घोड्यावरून पडणें ( विनोदांत ).

**रिचविणें [ सं० रिच् ] स० क्रि०** १( कांहीं पदार्थ ) बारदानांत कोंबून कोंबून किंवा ठासून भरणें. २ ( पदार्थ ) काळजीपूर्वक रचून किंवा मांडून ठेवणें. ३ ( पदार्थ ) बाजूस सारणें किंवा फेकून देणें किंवा नजरेआड करणें. ४ आंतील पदार्थ बाहेर टाकून किंवा ओतून ( बारदान ) रिकामें करणें. [ पहा.

**रिजणें, रिजाऊ** पुढें ' रिझणें, ' ' रिझाऊ '

**रिजाला [ अ० रिजालाह् ] वि०** नीच; हलकट; पाजी; अधम.

**रिझक** पुढें ' रिझाक ' पहा.

**रिझणें [ हिं० रीझना; सं० रंज् ] अ० क्रि०** संतुष्ट किंवा आनंदित होणें; कांहीं करमणुकीच्या वाचनादि व्यापारांत निमग्न होणें.

**रिझविणें [ म० ' रिझणें ' चें प्रयोजक ] स० क्रि०** १ करमणुकीच्या विषयांत ( कोणेकाला ) गुंतवून त्याला आनंदित करणें. २ (मन) करमणुकींत गुंतविणें. ३ रमविणें; रंजविणें. ४ मन औदासीन्यविरहित करणें.

**रिझाऊ [ म० रिझविणें ] वि०** मनोहर; मोहक; सुंदर ( भाषण, रूप, गाणें, मनुष्य, इ० ).

**रिझाक [ हिं० ] वि०** प्रिय, लाडका ( लावण्या, पोवाडे, इ० तील शब्द ).

**रिझाला** वर 'रिजाला' पहा.

**रिठा पु०, रिंठी स्त्री० [ सं० रिष्ट ]** एक झाड किंवा त्याचें फळ. ह्या फळाला फेस असून अंग, वस्त्र, इ० स्वच्छ करण्याकडे साबणाप्रमाणें ह्याचा उपयोग केला जातो. ॐ **रिंठें न०** वरील झाडाचें फळ.

**रिणकर, रिणकरी** मागें ' ऋण ' मध्यें ' ऋणकरी ' पहा. **रिणको [सं० ऋण] पु०** कर्ज घेणारा.

**रिता [ सं० रिक्त ] वि०** रिकामा; पोकळ; जेथें जें असावयास पाहिजे किंवा जेथें जें होतें तेथें तें नसलेला; ओका; उ० आंतील पाणी ओतून टाकून हें भांडें रितें कर; उ० बांगड्यावांचून मनगट रितें दिसतें; उ० येथें सामान उतरून घेऊन मी खटारा रिता परत पाठविला. ॐ **रिताभरला क्रि० वि०** कांहीं झालें तरी; ह्या प्रकारें किंवा त्या प्रकारें; कोणत्याही प्रकारें किंवा बाजूनें; उ० मी तुला काम सांगितलें होतें त्याचा रिता भरला जाब मला तूं कांहीं तरी द्यावयाला

पाहिजे होता. हें क्रि० वि० लिंगवचनाप्रमाणें फिरतें.

**रिताड** [ म० रिता ] **स्त्री०** १ दुसऱ्या ठिकाणाहून वाहून आणलेला माल एकाद्या ठिकाणीं टाकून परत रिकाम्या चाललेल्या ( गाड्या, गलबतें, किं०बैल, इ० जनावरें ).२ वर पाण्याच्या राहाटाचें पाणी ओतून खालीं पाणी भरावयासाठीं उतरत असलेले लोटे समुच्चयानें. याच्या उलट ' भरताड.' ३ अन्नाच्या अभावीं झालेला पोटाचा रिकामेपणा.

**रिद्धि** मागें ' ऋद्धि ' पहा.

**रिपरिप स्त्री०** पिरपीर; चरफड; लहान लहान थेंबांच्या रूपानें सावकाश पडणारा पाऊस.

**रिपार, रिपाड** [ म० रीप ] **पु०, न०** छपराचें ओंबण.

**रिपु** [ सं० ] **पु०** शत्रु. ॐ **रिपुंजय वि०** शत्रूवर ज्याणें जय मिळविला आहे असा किं० जय मिळविण्याच्या सामर्थ्याचा. **षड्रिपु पु०** काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे सहा मनोविकार.

**रियासत (-द )** [ हिं० ] **स्त्री०** १ राज्य. २ राज्यसरणी; शासनपद्धति. ३ कोणेक राजघराण्याचा किं० देशाचा कोणेक देशावर जो अमल तो किं० ह्या अमलाचा कालावधि.

**रिवरिवणें अ० क्रि०** ( अक्कलकारा, अद्रूक, सुरण, इ० पदार्थ ) जीभ, गाल, घसा, इ० ना झोंबत किं० बोचत असणें.

**रिवाज** [ अ० ] **पु०** चाल; रीति; सरणी; परिपाठ; वहिवाट.

**रिसालदार इ०** खालीं 'रिसाला' मध्यें पहा.

**रिसाला** [ अ० रिसाला ] **पु०** १ घोडदळ. २ घोडदळाची तुकडी. ३ युद्धाच्या उपयोगाचीं हत्यारें इ० ची सामग्री. ॐ **रिसालदार पु०** घोडदळावरील अधिकारी किं० अमलदार. **रिसालदारी स्त्री०** रिसालदाराचें कर्तव्य, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र.

**री स्त्री०** १ गवयाच्या गाण्याचा सूर,-जो त्याचा मदतनीस लांबवितो तो ( देणें, धरणें, ओढणें ). २ गायनांतील सप्त स्वरांपैकीं दुसरा. ते स्वर सा, री, ग, म, प, ध, आणि नी, हे होत. ॐ **कोणेकाची री ओढणें** कोणा समर्थानें केलेल्या कांहीं विधानाचें समर्थन करणें,-तें विधान शहाण्यासारखें आहे किं० मूर्खासारखें आहे ह्याचा विचार न करतां.

**रीग, रीघ** [ म०रिगणें, रिघणें] **स्त्री०** १प्रवेश करण्याची किं० घुसण्याची सोय किं० शक्यता ( असणें,नसणें,मिळणें,होणें ). २ वाव, अवकाश.

**रीज, रीझ** [ हिं० रीझाह्; सं० रंज् ] **स्त्री०** १ करमणूक; आनंद; दुःखमय विचारांपासून व्यावर्तन. २ आवड; अभिरुचि. ॐ **रीजबूज, रीझबूझ स्त्री०** आवड; करमणूक.

**रीण** [ सं० ऋण ] **न०** मागें ' ऋण ' पहा.

**रीत** [ सं० रीति ] **स्त्री०** पुढें ' रीति' पहा.

**रीति** [ सं० रीति ] **स्त्री०** १ पद्धति; प्रकार; सरणी; वहिवाट. २ चाल; शिस्त; शिरस्ता. ३ सभ्यपणाची मर्यादा किं० शिस्त. ४ ( **साहित्य**) भाषेची शैली. वैदर्भी, पांचाली,लाटी,गौडी, इ० भाषाशैलीचे प्रकार प्राचीन आलंकारिकांनीं केलेले होते. ॐ **रीतिस्थिति स्त्री०ए व०** चाली रीति; वर्तनाची एकंदर सरणी. **टीप,**-'रीत ' हेंही रूप व्यवहारांत आहे. **रीतभात स्त्री०** वर्तनाची सरणी. **रीतरवेस** [ **म०** रीत+**फा०** रवस् ] **स्त्री०** १ वर्तनाची पद्धति. २ सभ्यपणाची वर्तणूक; चारचौघांत वागण्याची कोणेकाची सभ्य सरणी.

**रीप स्त्री०** १ लाकडाची पातळ पट्टी. २ २ ओंबणासाठीं लाकडाच्या ज्या पातळ पट्ट्या करवतून केलेल्या असतात त्या प्रत्येक.

**रीस, रींस** [ सं० ऋक्ष] **पु०, न०** १आस्वल हा जंगली पशु. २ असभ्य चालीरीतींचा मनुष्य. ३ गलिच्छ, मळकट, किं० अव्यवस्थितपणें अंगावर कपडे धारण करणारा मनुष्य.

**रीस** [सं० रोष; हिं० रीस] **स्त्री०** १ घुस्सा; राग; चीड. २ वीट.

**रुइटी, रुई** [ हिं० रुवी ] **स्त्री०** एक झाड. ह्याच्या बोंडांतील बीजांना बारीक, नाजूक, आणि हलके तंतु असतात ते वाऱ्यावर उडत उडत खूप उंच आणि लांब जातात. मुलें त्यांना 'म्हातऱ्या' म्हणतात. ॐ **रुई फुली वि०** रुईच्या फुलासारखी नक्षी ज्यांत विणली आहे असा

( लुगडें, धोतर, इ० चा कांठ ).

**रुई,** [ हिं० ] **स्त्री०** पिंजलेला कापूस.

**रुई, रुही, रोही स्त्री०** नीलगाय हा प्राणी.

**रुई** [ फा० रूय्, रव् ] **स्त्री०** १ वर्तनाची सरणी. २ योग्य वर्तन. ॐ **रुईचा वि०** १क्रमानें किं० ओघानें प्राप्त झालेली( गोष्ट, प्रकार इ० ). २सभ्यपणाचें ( वर्तन ). **रुईस येणें** क्रमानें किं० न्यायानें किं० ओघानें( कांहीं गोष्ट )करणें जरूर होणें किं०प्राप्त होणें.

**रुकशांग स्त्री०** आंब्याच्या झाडावर उगवणारें एक प्रकारचें बांडगूळ.

**रुकसत** पुढें ' रुखसत ' पहा.

**रुका, रुक्का पु०** १ आण्याचा बारावा भाग. २ जमीनीच्या विस्ताराचें एक परिमाण .हें भिन्न प्रांतांत भिन्न आहे.

**रुकार पु०**१ संमति; अनुमोदन (देणें,मिळणें). २ कागद तपासून घेतल्याची निशाणी ' रु ' हें अक्षर जें कागदावर तपासणारा मनुष्य लिहितो तें.

**रुकारणें** [ **म०** रुकार ] **स० क्रि०** ( कांहीं गोष्ट ) मान्य करणें; ( कांहीं गोष्टीला ) संमति देणें किं० दर्शविणें; स्वीकारणें; पथकरणें.

**रुक्का** मागें ' रुका ' पहा.

**रुख** [ **सं०** वृक्ष ] **पु०** वृक्ष; झाड.

**रुखय** [ **सं०** वृक्ष; **म०**रुख(झाड)]**स्त्री०**बहुधा झाडावर वसति करून राहाणारा एक प्रकारचा साप.

**रुखरुख स्त्री०** वादामध्यें योग्य वेळीं योग्य उत्तर देणें शक्य असतां तें न सुचल्यामुळें आपला पराभव झाला असतां वाटतो विषाद किं०मनाला लागते ती चुटपूट; आपल्या हातून कर्तव्य योग्य प्रकारें न बजावलें गेल्यामुळें मनाला वाटतें तें दुःख; कुस्तीमध्यें प्रतिपक्ष्यावर अमुक पेच घातला असता तर त्याला चित करतां आलें असतें ह्या विचारानें वाटतो तो खेद.

**रुखवत** [ **सं०** वृक्ष+पत्र ] **न०** नवरामुलगा वधूच्या घराकडे यावयास निघतो तेव्हां वधूपक्षाकडून त्याला समारंभपूर्वक जें भोजन येतें तें.

**रुखसत** [ **अ०** ] **स्त्री०** १ जाण्यास दिलेली परवानगी;निरोप ( देणें ). २ हाकलपट्टी (देणें). **वि०**१ निरोप ज्याला देण्यांत आला आहे असा. २ हाकलून दिलेला.

**रुखाडी (–ड्या ), रुख्या, रुखी** [ **सं०**वृक्ष, **म०** रुख ] **वि०** झाडावर चढण्यांत पटाईत किं० वहिवाटलेली.

**रुखाडूं** [ **म०** रुख; **सं०** वृक्ष ] **न०**ताडाच्या झाडावर चढणारा इसम पायांना जो पट्टा आडकावितो तो पट्टा.

**रुखाळूं** [**म०** रुख ( झाड )+अळूं]**न०** वृक्षावर उगवणारें अळवा सारखें एक झाड.

**रुगरदा, रुगार्दा** [ **हिं०; म०** रू=कापूस ] कापूस आंत भरून केलेली ( उशी,गिरदी, इ०).

**रुंगाळणें अ० क्रि०** रोड किं० किडकिडीत होणें; वाळणें.

**रुंगाळा पु०** किडकिडीतपणा; रोडपणा; कृशता. **वि०** किडकिडीत; रोड; कृश.

**रुचक** [ **सं०** रुचक=दांत ] **न०**दांताचें हाड.

**रुचकर** [ **म०** रुचि; **सं०** रुचि] **वि०** चवेला चांगलें किं० मिष्ट ( खाद्य, पेय ).

**रुचणें** [ **सं०** रुच् ] **अ० क्रि०** १ आवडणें. २ मान्य किं० संमत असणें; पटणें.

**रुचि** [ **सं०** ] **स्त्री०** १ तेज; कांति. २ शोभा; सौन्दर्य. ३ दिवा, सूर्य, इ० चें किरण. ४ चव. ५ इच्छा; आवड. ६ भूक; क्षुधा. ॐ **रुचिकर, रुचकर वि०** १ चवदार, मिष्ट ( खाद्य, पेय ). २ क्षुधा उत्पन्न करणारें ( हिंगाष्टक इ० औषध ). **रुचीक वि०**१ गोड; स्वादिष्ट;मिष्ट. २ मनोरंजक.

**रुचिर** [ **सं०** ] **वि०** १ सुंदर. २ तेजस्वी. ३ चवदार; स्वादिष्ट; मधुर.

**रुचीक** [ **म०** रुई+चीक ] **पु०** रुईच्या झाडाचा चीक.

**रुच्य** [**सं०**] **वि०** १ मिष्ट; स्वादिष्ट; रुचकर. २ मनोरंजक; रमविणारें. **न०** पाचक पदार्थ ( हिंगाष्टक इ० ).

**रुजणें** [ **सं०**रुह् ] **अ० क्रि०** १ वृक्ष, बी, इ० जमीनींत जीव धरून वाढीस लागणें; (वृक्ष,बीज, इ०ना ) अंकुर फुटणें. २ ( **लाक्षणिक** ) दुसऱ्यानें केलेला बोध, उपदेश, इ० ) मनांत ठसणें किं० फलद्रूप होणें.

**रुजवट** [ **म०** रुजणें ] **वि०** रुजलेलें, अंकुर फुटलेलें ( झाड, बीज ).

**रुजवण** [ **म०** रुजणें ] **न०** पेरलेलें बीज;फुटलेला अंकुर.

**रुजामा** [ **फा०** रुवी+जामाह् ] **पु०** १ज्यांत कापसाचा पातळ थर भरलेला आहे असा अंगरखा. २ कापसाचा पातळ थर घालून केलेली बिछाईत.

**रुंजी स्त्री०** १ फुलें, फळें, इ०च्या भोंवतीं माशांचा गुणगुणाट. २ खबुतरें, पारवे, इ० पक्ष्यांचें घुमणें किं० कूकू असें ओरडणें.

**रुजुवात, रुजवात** [ **अ०** रुजूअत्, रुजअ ] **स्त्री०** १ ताडून पाहाणें;दोन कागद,दोन नकला; दोन विधानें, इ० परस्परांशीं मिळतीं आहेत किं० नाहींत हें तुलना करून पाहाणें किं० ठरविणें ( करणें, पाहाणें, घेणें ).२ यादी बरहुकूम पदार्थ, नांवें, इ० आहेत किं० नाहींत हें तपासणें. ( घेणें ). ३ प्रत्यय; अनुभव; समक्षता ( येणें ).

**रुजू** [ **अ०** रुजूअ ] **वि०** १ तयार; सिद्ध; सज्ज. २ हजर असलेला; हजर झालेला; कामावर स्थापिलेला. ३ कबूल केलेला किं०झालेला; मान्य; संमत. ४ खरा, योग्य किं० वाजवी म्हणून पथकरलेला किं० मान्य केलेला. ॐ **रुजू घेणें** ताडून पाहाणें. **रुजुगुदस्त, रुजूगुदस्त वि०**१चालू सालीं मान्य किं० कबूल केलेला किं० संमत असलेला. २ गुदस्त वहिवाटीस रुजू असलेला (व्यवहार ). **रुजूमु (-मो-) काबला पु०** दोन माणसांचीं विधानें किं० हकीगती ताडून पाहाण्यासाठीं किं० त्यांतील खरेखोटेपणाचा निर्णय करण्यासाठीं त्या दोघांना एके ठिकाणीं आणणें किं० उभें करणें किं० त्यांचीं समक्षता घडवून आणणें.

**रुझणें, रुझवण** वर ' रुजणें, '' रुजवण' पहा.

**रुंझी स्त्री०** वर ' रुंजी ' पहा.

**रुटका पु०** बिघ्यापेक्षां लहान असें एक जमीनीच्या मापणीचें परिमाण. ॐ **रुटकेबंदी स्त्री०** रुटका ह्या मापानें जमीन मोजून ठरविलेला सारा.

**रुडुखुडु, रुडुगुडु, रुडुखडु, रुडुघुडु, रुडुघुट क्रि० वि०** मंद गतीनें; संथपणें; क्रमाक्रमानें. ॐ **रुडुखुडु करणें** किरकोळ कामें करणें; उ० मी रुडुखुडु करून प्रपंच भागवितों.

**रुंड** [ **सं०** ] **न०** ज्याचें मुंडकें म्ह० डोकें तोडण्यांत आलें आहे असें शरीर.

**रुंढ, रुंढी स्त्री०** उचला. मागें 'उचला' पहा.

**रुढणें** [ **सं०** रूढ; **म०** होणें ] **अ० क्रि०** ( बातमी, वदंता ) लोकांत पसरणें.

**रुणा पु०** चिंता; हुरहुर; झुरणी ( घेणें, लागणें ).

**रुतण (-न )** [ **म०** रुतणें ] **स्त्री०** जेथें चालतांना पाय, गाडीचीं चाकें, इ० रुतून बसतात अशी जागा.

**रुतणें अ० क्रि०** १ कांटा, खडा, इ० बोचणें किं० आंत शिरून बसणें. २ चिखल, दलदल, इ० मध्यें ( गाडी, पाय, इ० ) खोल जाऊन अडकणें; रुपून बसणें.

**रुतु** मागें ' ऋतु ' पहा.

**रुतबा** [ **अ०** रुतबाह ] **पु०** दर्जा; पदवी; अधिकाराचें स्थान; मरतबा.

**रुंद वि०** १ कांहीं क्षेत्रफळाची परस्परांशीं काटकोनांत घेतलेलीं विस्ताराचीं जीं दोन परिमाणें त्यांपैकीं लहान जें परिमाण तें; उ० हें दालन पंचवीस हात लांब आणि बारा हात रुंद आहे. २पदार्थाच्या दोन परिमाणांपैकीं आखूड जें परिमाण तें नेहमीं पेक्षां मोठें आहे ज्याचें असा ( पदार्थ ); उ० तुझें पाऊल चिवळ आहे, माझें पाऊल रुंद आहे. ॐ **रुंदट (-ड ) वि०** जरासें रुंद; किंचित् रुंद. **रुंदी स्त्री०** क्षेत्राचीं जीं दोन परिमाणें त्यांपैकीं जें आखूड तें किं० ह्या आखूड परिमाणानें ठरलेली जी मोजदाद ती. **रुंदावा पु०** रुंदपणा. **रुंदेला, रुंदाट (-ड) वि०** रुंद घडणीचा किं० आकाराचा.

**रुंदावणें** [**म०**रुंद]**अ०क्रि०**रुंद होणें.**स०क्रि०** [ रुंद करणें.

**रुदित** [ **सं०** ] **न०** रडणें; विलाप; आक्रोश.

**रुद्ध** [ **सं०** ] **वि०** १ अडविलेलें;बंद केलेलें. बंद पाडलेलें. २थांबविलेलें.३वेष्टिलेलें; गराडलेलें.

**रुद्र** [**सं**] **पु०** १ शंकर. २ शंकराच्या अकरा अवतारांपैकीं एक. ३ अकरा ही संख्या. ४ तापट माणूस. ॐ **रुद्रगांठ स्त्री०** लुगडें, दोरवा, इ० वस्त्रें विणतांना चौकडी सारखीं चिन्हें जीं विणलेलीं असतात तीं प्रत्येक. **रुद्रगांठी वि०** रुंद्र-

गांठी ज्याच्या विर्णीत आहेत असें ( लुगडें इ० ). **रुद्रपिशाच पु०** १ काशींत मेलेला प्राणी काशींत केलेल्या पापाबद्दल जो पिशाचदेह धारण करतो तो. २ तापट स्वभावाचा माणूस. **रुद्रभूमि स्त्री०** स्मशान; मसणवटी. **रुद्रवात स्त्री०** अकरा सुतांची करतात ती वात,-देवापुढें जाळण्यासाठीं. **रुद्रवीणा पु०** वीणा म्हणून जें तंतुवाद्य आहे त्यांतील एक प्रकार. **रुद्रावतार** फार क्रोध आल्यानें भयंकर झालेलें कोणेंकाचें जें रूप तें किं० क्रोधामुळें भयंकर दिसणारा माणूस. **रुद्राक्ष पु०** एक वृक्षविशेष किं० त्याचें फळ. ह्या फळाच्या जपमाळा इ० करतात.

**रुधणें, रुंधणें** [ **सं०** रुध् ] **अ० क्रि०** १ थांबणें; अडकून पडणें; थांबविलें जाणें. २(रस्ता, वाट, इ०) माणसें, गाड्या, इ० च्या दाटीमुळें अडणें किं० त्यांतून जाणें कठिण किं० अशक्य होणें. ३ (घर, खोली, इ०) सामानानें भरगच्च भरलेलें असणें. **स०क्रि०**१ आडविणें; बंद पाडणें; थांबविणें. २ व्यापून टाकणें; भरून काढणें.

**रुधणें** मागें ' रुजणें ' पहा.

**रुधिर** [ **सं०** ] **वि०** तांबडा. **पु०** मंगळ हा ग्रह. **न०** प्राण्याच्या शरीरांतील रक्त. ◈ **रुधिराशन पु०** राक्षस. **रुधिरोद्गारी पु०**साठ संवत्सरांतील सत्तावन्नावा संवत्सर.

**रुपटका, रुपडा पु०, रुपडी, रुपटकी स्त्री०** रुपाया ( तिरस्कारांत ).

**रुपडें, रूपडें** [ **सं०** रूप ] **न०** रूप ( प्रेमांत किं० तिरस्कारांत ).

**रुपण, रुतण** [ **म०** रुपणें, रुतणें ] **न०** भुसभुशित जागा; दलदलीची जागा.

**रुपणें, रुतणें अ० क्रि०** १ दलदलींत किं० भुसभुशीत जागेंत खचणें किं० खोल जाणें. २ बोचणें; खुपणें.

**रुपया, रुपाया, रुपा** [ **म०** रुपें ] **पु०** सोळा आणे किंमतीचें चांदीचें नाणें. भिक्षुकांच्या भाषेंत राम=रुपाया; सीता=आधेली; लक्ष्मण=पावली; भरत=चवली; रामदास=आणा. ◈ **रुपायाची मान मोडणें** १ रुपायाचें नाणें देऊन त्या किंमतीचीं चवल्या, पावल्या, इ० लहान नाणीं घेणें. २ काहीं क्षुल्लक पदार्थ विकत घ्यावयासाठीं रुपाया हें मोठें नाणें देऊन चवल्या, पावल्या इ० बारकीं नाणीं बाकीच्या पैशाबद्दल घेणें.

**रुपा वि०** अंग पांढरें असून त्यावर काळे किं० तांबडे ठिपके असलेला ( बैल, गाय, इ० पशु ). **पु०** रुपाया हें नाणें.

**रुपुस्त** [ **फा०** रू (तोंड)+पुश्त(पाठ)] **स्त्री०** गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

**रुपें** [ **सं०** रौप्य ] **न०** चांदी हा धातु. ◈ **रुप्याचे डोळे पु० अ० व०** निस्तेज डोळे ( आजाऱ्यांचे किं० मरणोन्मुख माणसाचे ). **रुपेरी वि०** रुपें ह्या धातूचा बनविलेला किं० बनविल्यासारखा दिसणारा किं० चांदीचा मुलामा दिलेला ( दागिना इ० पदार्थ ). **रुपेरी कांटा पु०** बाभळीचा कांटा. **रुपेशाई लोखंड न०** एक प्रकारचें लोखंड. हें शिकेशाई लोखंडाहून कमी दर्जाचें असतें. **रुपेरी बिडी स्त्री०** दिसण्यांत वैभवशाली पण वस्तुतः गुलामगिरीची स्थिति. **राजसेवेची रुपेरी बिडी स्त्री०** सरकारी नोकरी,-जी कितीही मोठ्या अधिकारांची असली तरी वस्तुतः दास्यरूपच असते.

**रुबकार** [ **फा०** रू ( तोंड )+बह ( पुढें ) +कार ] **क्रि० वि०** समक्ष; समोर; पुढें. २ सलक्ष्य; तन्मयतेनें. ३ काळजीपूर्वक. **स्त्री०** समक्षता; प्रत्यक्ष गांठ ( करणें. )

**रुबरु, रुबरू, रुबेरूब** [ **फा०** रूबरू=तोंडासमोर तोंड ] **क्रि० वि०** समोरासमोर तोंडें करून. **वि०** लवकरच येणारा किं० होणारा किं० जवळ येऊन ठेपलेला.

**रुमणी, रुम्हणी स्त्री०, रुमणें, रुम्हणें न०** नांगर इ० आउत हाकतेसमयीं नांगर इ० चा हातांत धरतात तो अवयव. ◈ **रुमणबाक पु०** शेतांतील बाक किं० कोस.

**रुमाल** [ **फा०** रू ( तोंड )+मालीदन् ( पुसणें )] **पु०** १ तोंड पुसण्याचें लहानसें फडकें. २ कोणत्याही कामाचें चौकोनी वस्त्र,-कागदपत्रें बांधणें, अंग पुसणें, हात पुसणें, इ०. ३ डोकीला बांधावयाचें मोठें चौकोनी वस्त्र. ४ कागदपत्रांचें दफतर. ५ राजा इ० बड्या गृहस्थावर वारावयाचें रेशमी वस्त्र (फिरविणें, उडविणें). ६ शत्रूला आपण शरण येत आहों असें कळवि-

ण्यासाठीं वाऱ्यावर उडवितात तें वस्त्र. ७ देशपांड्या किं० कुलकरणी यांना बक्षीस दिलेली जमीन ( जमीन देतांना सरकारी दफतर किं० कागदपत्रांचा रुमाल त्यांचे हवालीं करतात ह्या चालीवरून ). ꠸ **रुमाली स्त्री०** १ तालमींतील मुद्गल किं० जोडी डोकीभोंवतीं फिरविण्याचा एक प्रकार. २ एक प्रकारचें खबूतर. **रुमाली गज पु०** कापड इ० मोजावयाचा चवदा तसूंचा गज. जमीन मापणीचा गज सोळा तसूंचा असून त्याला ' रेशमी गज ' म्हणतात. **रुमाली घडी स्त्री०** खणाची तिकोनी घडी. **रुमाली पाटी स्त्री०** दोन तीन पायल्या धान्य जीत राहूं शकतें अशी बांबूची पाटी किं० हारा.

**रुमामस्तकी, रुमेमस्तकी स्त्री०** एक औषधोपयोगी चीक.

**रुयात** [ **फा०** रू ( तोंड ) + रिआयत् ( आदर ) ] **स्त्री०**कोणेकाला दाखविलेला आदर, संमान, किं० पूज्यभाव.

**रुशवत, रिशवत** [ **फा०** रुष्वत्=लाच ] **स्त्री०** लाच;लाचलुचपत.

**रुष्ट** [ **सं०** ] **वि०** रागावलेला; रुसलेला; नाखूष झालेला.

**रुसकत, रुस्कत** मागें ' रुकसत, ' ' रुखसत ' [ पहा.

**रुसका** [ **म०** रुसणें ]**वि०** वारंवार रुसणारा; क्षुल्लक कारणावरून रुसून बसण्याच्या स्वभावाचा ( मनुष्य ).

**रुसणें** [ **सं०** रुष् ] **अ० क्रि०**कोणेकानें कांहीं गोष्ट केली ती आपणास न आवडल्यामुळें (आपण) रागावणें किं० (आपणास) घुस्सा येणें. ꠸ **रुसणें फुगणें अ० क्रि०** रागावणें आणि चरफडणें किं० घुम्यासारखें बसणें; उ० विहीणींच्या रुसण्याफुगण्याबद्दल आम्हाला हुंड्याशिवाय आणखी शंभर रुपये द्यावे लागले. **रुसवा पु०** घुस्सा; रुसण्याची क्रिया. **रुसवा फुगवा पु० ए० व०** रुसणें आणि घुम्यासारखें बसणें.

**रुसविणें** [ **म०** ' रुसणें ' चें प्रयोजक ] **स० क्रि०** ( कोणेकाला न आवडणारी अशी कांहीं गोष्ट करून त्याला ) राग किं० घुस्सा आणणें.

**रुसूम** [ **अ०** ' रस्म् ' ( चाल, रीति ) चें **अ० व०** रसूम् ( चाली, रीति ) ] **पु०** १ देशमुख आणि देशपांड्या ह्यांना जमीनीच्या उत्पन्नापैकीं द्यावयाचा भाग.२हक्क म्हणून कोणेकाला जें कांहीं द्यावयाचें तें देय.

**रुस्तुम** [ **फा०** रुस्तुम् हा ' शाहनामी ' नांवाच्या काव्यांतील एक वीरपुरुष होता ] **पु०** शूर पुरुष. ꠸ **रुस्तुमी स्त्री०** शौर्य; अचाट पराक्रमाचें कांहीं कृत्य.

**रुह** [ **सं०** रुह्=वाढणें, रुजणें ] **वि०** उत्पन्न होणारा, वाढणारा, उगवणारा. ह्याचा उपयोग संस्कृत उपपद तत्पुरुष समासांत उत्तरपदीं होतो. उ० कररुह=नख; शिरोरुह=केश; महीरुह=झाड.

**रुही, रोही स्त्री०** नीलगाय हा प्राणी.

**रुळणें अ० क्रि०** १ अंगावर ( धारण केलेला हार, माळ, इ०) झोकांत किं० वैभवानें हालत असणें. २ डोकीवर ( केश ) वाऱ्यानें भुरुभुरु हालत असणें. ३ एकाद्या कामांत किं० नोकरीवर किं० कांहीं मंडळींत ( कोणेकानें ) अभ्यस्त किं० परिचित होणें. ४(वस्त्र, दागिना, इ०)वापरण्यानें चोळवटणें. ५ एकाद्या विषयांत, शास्त्रांत किं० कलेंत ( कोणेकाला ) सराव किं० सफाई प्राप्त होऊन त्याची त्यांत प्रगति होणें किं० होऊं लागणें.

**रुळलेला**[ **म०**रुळणें ] **वि०**वहिवाटलेला; परिचित; वापरल्यानें सोयीचा किं० सुखकारक झालेला; ज्याच्या अंगवळणीं कांहीं गोष्ट पडली आहे असा; एकाद्या शास्त्रांत किं० कलेंत किं० कामांत वहिवाटलेला.

**रुळें न०** स्त्रियांच्या पायाच्या बोट्यावर घालावयाचा एक दागिना. पुढें ' रूळ ' पहा.

**रू** [ **हिं०** रुवी, रुई ] **पु०** पिंजलेला कापूस.

**रू** [ **फा०** ] **न०**१ तोंड. २ गंजिफीची दर्शनी बाजू. ꠸ **रूबरू, रोबरो क्रि०वि०** समोर; पुढें; समक्षांत. **रूबरू, उरूबरू स्त्री०** भांडण; बोलाचाली; बाचाबाची.

**रूं न०** डोक्यांतला फोड; खवडा. **रुवें न० अ० व०** खवडे.

**रूख** [ **सं०** वृक्ष ] **पु०** १ झाड, वृक्ष. २ पाण्याच्या रहाटाच्या कणेकडाचीं टोकें ज्या दोन आडव्या लाकडांवर टेकलेलीं असतात तीं

लाकडें प्रत्येक. ३ शाखारहित झाड. ४ झाडाची बुंधा. ५ पुढें 'रोख' पहा.

**रूढ** [ सं० ] वि० १ उगवलेला; उत्पन्न झालेला. २ वृद्धिंगत. ३ प्रचारांत किं० चालू असलेला. ४ समाजांत चालू असलेला. ५ जाहीर असलेला. ६ शब्दाचा सर्व लोकांनीं पथकरलेला ( अर्थ ). व्युत्पत्तिवरून ठरलेला आणि सर्व लोकांनीं पथकरलेला जो अर्थ तो योगरूढ अर्थ. व्युत्पत्तीवरून निघणारा जो अर्थ तो यौगिक अर्थ.

**रूढविणें** [ म० रूढ ] स० क्रि० १ जाहीर करणें. २ प्रचारांत आणणें.

**रूढि** [सं०] स्त्री० १ वाढ. २ उत्पत्ति. ३ प्रसार; फैलाव; प्रसिद्धि. ४ चाल; वहिवाट; शिरस्ता; संप्रदाय. ५ कीर्ति. ६ ( **साहित्य** ) केवळ लोकांच्या संकेतावरून ठरलेला अर्थ.

. **रूदार** [ हिं० ] वि० पिंजलेल्या कापसाचा पातळ थर ज्यांत भरला असा आहे अंगरखा, दुलई, इ०.

**रूप** [ सं० ] न० १ आकार; आकृति. २ बाह्य देखावा. ३ चेहेरा; मुद्रा. ४ ( **न्याय** ) नेत्रानें दिसणारे पदार्थाचे जे रंग आणि आकार हे धर्म ते. ५ पदार्थाचा आरसा; पाणी, इ० मध्यें दिसणारा देखावा. ६ ( **व्याकरण** ) प्रत्यय लावल्यावर धातु, नामें, इ० च्या पासून नवीन सिद्ध होतो तो शब्द; उ० 'राम' ह्याचें तृतीयेच्या एकवचनाचें रूप 'रामानें' असें होतें. ७ ( **गणित** )एक परिमाण दुसऱ्या परिमाणांत नेलें असतां त्याचा होतो बदल;उ०आडीच रुपायांचें आण्यांचें रूप चाळीस आणे. ८ सौन्दर्य; शोभादायक गुण; उ० विनय हें स्त्रीचें रूप होय. ९ कांहीं कामाचा श्रेयस्कर किं०प्रशंसनीय परिणाम; उ० कृतघ्नाची नोकरी करण्याचें रूप होत नाहीं. १० पदार्थाचा मूळ धर्म. ११ ( **मराठी व्याकरणांत** ) क्रियेचा मूळचा अर्थ किं० त्या मूळच्या अर्थाच्या उलट अर्थ दाखविण्यासाठीं जो फेरफार केला जातो तो; उ० तो करति हें करणरूप; तो करणार नाहीं हें अकरण रूप. १२ तादात्म्य. १३ ( **गणित** ) एक ह्या संख्येची संज्ञा. १४ अव्यक्त गणितांत व्यक्त संख्येची संज्ञा. १५( **वैद्यक** ) निदानाचा दुसरा प्रकार. १६ चंगकांचन गंजिफांतलि सातवा रंग. ह्या अर्थी पु०. ॐ **रूपरंग पु० ए० व०** बाह्य देखावा; सामान्य स्वरूप. **रूपी वि०** रूप घेतलेला; उ० राज्यरूपी वृक्ष म्ह० राज्याचें रूप घेतलेला वृक्ष किं० राज्य हाच वृक्ष. **रंगारूपास येणें** फलद्रूप, वैभवशाली, सुखावह, सर्वांग सुंदर, किं० परिपूर्ण होणें; उ० माझा कारखाना रंगारूपास यावयाला आणखी सहा महिने पाहिजेत. **रूपरेषा स्त्री०** १ पदार्थाचा आराखडा. २ बाह्य देखावा. ३ घाट; अंगलट; घटना; बांधा. **रूपवान् वि०** सुंदर. **रूपस वि०** सुंदर; नटिनेटकें. **न०** सौंदर्य. **रूपावलि स्त्री०** नामें, सर्वनामें, इ० च्या सर्व विभक्तींचीं सर्व रूपें ज्यांत दिलीं आहेत असें पुस्तक. **रूपान्तर न०** १ दुसरें रूप. २ कादंबरी, नाटक, इ० मध्यें कांहीं फेरफार करून नवीन बनविलेली कादंबरी, नाटक, इ०. **रूपरत्नपरीक्षा स्त्री०** हिरे, मोतीं, नाणी, इ० ची परीक्षा,-चौसष्ट कलांपैकीं एक. **रूपाजीवा स्त्री०** वेश्या.

**रूपक** [ सं० ] न० ( **साहित्य** ) प्रकृत आणि अप्रकृत, म्हणजे उपमेय आणि उपमान, ह्यांच्यांत अभेद किं० एकत्व आहे जसें गृहीत धरून जें विधान केलेलें असतें त्याला रूपक म्हणतात; उ० कोपाग्नि म्ह० कोपरूपी अग्नि.येथें कोपावर अग्नित्वाचा आरोप केला आहे.रूपकाचे विविध प्रकार, उदाहरणें, इ० आमचे 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा.

**रूप्य** [ सं० ] न० रुपें हा धातु; चांदी.

**रूबरू, रूबुरू** [ फा० ] स्त्री० प्रत्यक्ष भेट; गांठ. क्रि० वि० समोरासमोर; समक्षासमक्ष.

**रूभरी** [ हिं० रू ( कापूस )+भरणें ] वि० ज्यांत कापसाचा पिंजलेला पातळ थर भरला आहे असा ( अंगरखा, लेप, इ० ).

**रूय, रूई** स्त्री० १ पिंजलेला कापूस. २ एक झुडूप. ह्याच्या बोंडांत कापसासारखे असंख्य तंतु असतात.

**रूळ पु०** स्त्रियांचें पायांत घालण्याचें एक भूषण. मागें 'रुळें' पहा.

**रूळ** [ इ० रुलर् ] पु० कागदावर सरळ रेषा

आखावयाचा दंडगोल असा लाकूड इ० चा तुकडा.

**रूळ** [ इ० रोलर् ] पु० रस्त्यावरची खडी चेपून रस्ता सपाट करण्याचें साधन किं० यंत्र.

**रूक्ष** [ सं० ] वि० १ कठिण; टणक. २ खर बडीत; खरखरीत. ३ आर्द्रता किं० स्निग्धता ज्याला किं० ज्यांत नाहीं असा. ४ निर्दय, कठोर, किं० प्रेमरहित ( वर्तन, भाषण ). ५ कोरडी ( हवा, वारा ). ६ रखरखीत किं० कडक ( ऊन्ह ).

**रे** [ सं० ] उ० **वा०अ० हे** ! उ० रे मुला, ती खिडकी झाक. ह्या शब्दाचा उपयोग **पु० ए० व०** होतो.

**रेकणें अ० क्रि०** १ ( म्हैस, रेडा, इ० नीं ) ओरडणें. २ घोगऱ्या आवाजानें बोलणें. ३ चरफडणें; पिरपिरणें; असंतुष्टपणानें ओरडणें.

**रेकला** [ हिं० **रहक**ला] **पु०** १ एक प्रकारची गाडी. २ पेरलेलें बी झाकून टाकण्याचें शेतकऱ्याचें एक आउत. ३ सुरंग लावून खडक फोडण्याचें एक साधन.

**रेख्ता** [ **फा०** रेखूतह्]पु० हिंदुस्तानी भाषेंतील एक प्रकारचें गीत.

**रेटखणें**,**रेखाटणें**[**म०** 'रेखणें'चें एक रूप]**स० क्रि०**१(कागद, भिंत, इ०वर) कांहीं चित्र, आकृति, शब्द इ० काढणें. २ ( कागद, भिंत, इ० वर) अव्यवस्थितपणें रेघा काढणें किं० रेघा काढून विरूप करणें.

**रेखणें** [म० रेखा] **स० क्रि०** ( कागद, भिंत, जमीन, इ० वर ) रेघा किं० रेघोट्या काढणें. २ ( चित्र, कांहीं आकृति ) भिंत, कागद, इ० वर रेघांच्या रूपानें काढणें. ३ घासून ( भिंत, दगड, इ० ) गुळगुळीत करणें. ४ मनांत ( देव, साधु, इ० ची प्रतिमा किं० मूर्ति ) ठसवून घेणें किं० कल्पिणें. ५ अंग, कपाळ, इ० वर ( गंध इ० ) रेघांच्या रूपानें चिन्हित करणें. ६ वस्त्राच्या (नुण्या किं० डोईच्या केशांच्या पट्ट्या) चापून चोपून बसविणें. ꙮ **रेखला वि०** नटिनेटका प्रमाणबद्ध.

**रेखा** [ सं० ] **स्त्री०** १ रेघ; रेषा. २ काढलेलें चित्र किं० आकृति. ३ लंका आणि मेरू यांना जोडणारी दक्षिणोत्तर रेषा. ४ रांग; पंक्ति; ओळ. ५ हात, बोटें, इ० वर जन्मजात चिन्हें असतात तीं. ꙮ **रेखांश पु०** स्थलविशेषाचें ठराविक बिंदूच्या पूर्वेस किं० पश्चिमेस जें अंतर तें. **रेखांतर न०** अर्थ ३ च्या रेखेपासून पूर्वपश्चिम अंतर. **रेखागणित** भूमिति क्षेत्रमापनाचें शास्त्र.

**रेंगडी स्त्री०** गात्राला येतो तो पेटका ( वळणें ).

**रेंगणें** [ सं० रिंख्, रिंग् ] **अ० क्रि०** १ ( मुलानें ) रांगणें. २ आळसानें किं० मंद गतीनें किं० अनुत्साहानें कांहीं काम करीत राहाणें.

**रेंगळ स्त्री०** वैपुल्य; समृद्धि.

**रेंगळणें**, **रेंगाळणें** [**म०** रेंगणें' चें एक रूप] **अ० क्रि०** १ मागें राहाणें किं० मागें पडणें. २ आळसानें किं० मंदगतीनें काम करीत राहाणें. ३ अति दमणें किं० श्रांत होणें.

**रेघ** [ सं० रेखा ] **स्त्री०** १ रेषा; ओळ. २ कांहीं आकृतीची मर्यादा. ३ कपाळावरील केश न्हाव्याकडून चिमट्यानें उपटवून महिरपीच्या आकाराची जी आकृति हौसी लोक कपाळावर करवितात ती. ꙮ **कोणकाला रेघ ओढून देणें** त्याच्या वर्तनाला शिस्त लावून देणें; त्याला वर्तनाचे नियम घालून देणें. **रेघेरूपास आणणें** कांहीं धंदा किं० काम किं० कोणी मनुष्य ह्यांना उत्कर्षाच्या स्थितीस पोंचविणें किं० त्यांना वैभवशाली करणें. **रेघरूप न० ए० व०** १ पदार्थाची घटना किं० आकारमान. २ पदार्थाचें स्वरूप. ३ कामधंदा इ० ची वैभवाची स्थिति.

**रेंघळणें अ० क्रि०** १ आळसानें किं० मंदगतीनें ( काम, धंदा, माणूस, इ० ) चालणें किं० चालत राहाणें. २ मागें पडणें. ३ आजारांत खितपत पडणें. ४ घसरत चालणें. ५ नाना प्रकारचीं विघ्नें येऊन ( कांहीं काम ) आडखळत चालणें.

**रेघाळणें** [ **म०** रेघ ] मागें ' रेखाटणें ' पहा.

**रेघोटी** [ **म०** रेघ ] **स्त्री०** रेघ; रेषा.

**रेघोतळी स्त्री०** दागिना किं० भांडें यांच्या नक्षीच्या नाजूक रेषा उमटविण्याचें किं० ओरखडून काढण्याचें सोनाराचें एक हत्यार. अशा रेघेला ' छटकारा ' किं० ' गुजरणी ' म्हणतात.

मागें 'छटकारा' आणि 'गुजरणी' हे शब्द पहा.

**रेच** [सं० रिच्=रिकामें करणें, देऊन टाकणें] पु० १ मनुष्य जेवावयाला बसलेला असतां कोणी भरल्या पायांचा मनुष्य तेथें आला किं० त्या जेवणाराला कोणाची दृष्टि *लागली* तर त्याची अन्नावर एकदम अरुचि उत्पन्न व्हावी, मळमळूं लागावें किं० वांति व्हावी असा जो प्रकार होतो तो ( भरणें, उतरणें, लागणें, करणें ). २ कोणेकाला आलेला किं० झालेला गर्व; ताठा; अभिमान ( उतरणें, मोडणें, जिरविणें, ह्याच क्रियापदांच्या साहचर्यानें ). ३ कोणेकाच्या पाठींत किं० एकाद्या गात्रांत शीत्यादि कारणांनीं उत्पन्न होतो तो ताठपणा ( मोडणें, उतरणें, भरणें ). ४ गुदद्वारें झालेलें जोराचें मलविसर्जन ( होणें ). ❀ **कोणेकाचा रेच मोडणें** ( किं०**उतरणें** ) १ त्याची खोड मोडणें; त्याच्या गर्वाचा परिहार करणें. २ चेपून, रगडून, चोळून, किं० बुक्क्या मारून त्याच्या गात्राचा ताठपणा नाहींसा करणें. **रेचक** न०गुदद्वारें जोरानें मलविसर्जन करणारें कांहीं औषध ( घेणें, लागू पडणें ).

**रेचन** [ सं० ] न० जोराचें गुदद्वारें मलविसर्जन.

**रेचित** [ सं ] वि० रिकामें केलेलें.

**रेज** [सं० रजस्; म० रज्] पु० सोनें, चांदी, इ० धातूचा कण. ❀ **रेजगण, रेजगाण** पु०, न० दागिने, नाणीं, भांडीं, इ० चे तुकडे, कण, इ० समुच्चयानें; चोळी, अंगरखा, इ० कपडे बेतल्यावर जे कापडाचे निरुपयोगी तुकडे राहातात ते समुच्चयानें.

**रेजगी** [ फा० रेझ्गी] स्त्री०१फोडलेल्या किं० तासलेल्या लाकडाचे तुकडे, खंड, ढलप्या, इ० समुच्चयानें.२ किरकोळ नाणीं समुच्चयानें;मोड.

**रेंजणें** स० क्रि० आदरबुद्धीनें किं० पूज्यभावानें लेखणें किं० गणणें किं० मानणें ( निषेधीं प्रयोग ); उ० जो बापाला रेंजीत नाहीं तो चुलत्याला काय रेंजणार ?

**रेजा** [ फा० रेजाह्=कापडाचा तुकडा ] पु० १ कापडाचा तुकडो. २ तुळई इ० चा तुकडा; खंड;ढलपी. ३ खेळावयाच्या फाशांवरील पगडा. ❀ **रेजाबाकी** स्त्री० वस्त्र, बेगमीचें धान्य, इ० चा तुकडा किं० अवशेष.

**रेजिम** [ पोर्च्युगीझ ] न० कागदाच्या पांचशे बंदांचा गठ्ठा.

**रेट** [ म० रेटणें ] न० जाडी भाकरी.

**रेट** [ म० रेटणें ] स्त्री०, पु० १ गर्दी; दाटी; खेचाखेच ( करणें, बसणें, होणें ). २ पदार्थ पुढें सरकावण्यासाठीं त्याला मागून लाविलेला जोर किं० नेट ( लावणें, देणें. )

**रेटणी** [ म० रेटणें ] स्त्री० रेटण्याची क्रिया. पुढें 'रेटणें' पहा.

**रेटणें** स० क्रि०१ (पदार्थाला) पुढें जाण्याची गति देणें.२मागून दाब घालणें.३खुपसणें;ढकलणें. ४ ( कांहीं अनिष्ट ) प्रतिकार करून थांबविणें. ५ ( कठिण काम ) नेटानें पार पाडणें. ६ ( धंदा, नोकरी,काम,इ०) विघ्नें न जुमानतां चालविणें.७ ( खाद्य ) अधाशीपणानें खाऊन टाकणें.८ संकटाच्या स्थितींत ( दिवस, काळ ) काढणें किं० कंठिणें. ❀ **रेटून जाबसाल करणें** कोणाची भीडमुरवत न ठेवतां आपलें म्हणणें स्पष्टपणें सांगणें. **रेटून** क्रि० वि० १ जोरानें; आवेशानें; २ मोठ्या प्रमाणांत.

**रेटणें** अ० क्रि० १ सरकणें; स्थानभ्रष्ट होणें. २ ( धान्यें, पाणी, इ० ) विपुल होणें किं० पिकणें.

**रेटा** [ म० रेटणें ] पु० धक्का; नेट; जोर.

**रेटाई** [ म० रेटणें ] स्त्री० १ रेटण्याची किं० ढकलण्याची क्रिया ( करणें ). २ संकटें, विघ्नें, इ० कडे दुर्लक्ष्य करून किं० त्यांना न जुमानतां काम चालू ठेवण्याची क्रिया.

**रेटूक** [ म० रेटणें ] न०जाडी भाकरी,पोळी, पापड, इ० ( तुच्छतेंत ).

**रेड** [ हिं० रेल् ] स्त्री० आंबे, फणस, धान्यें, इ० चें वैपुल्य; समृद्धि ( होणें, पडणें ).

**रेडका** [ म० रेडा ] पु० १ रेडा; टोणगा. २ तडकणीसाठीं गोणी, पोतें, इ० वर घातलेला दोरीचा फास. ३ एक प्रकारची गाडी.

**रेडकूं, रेडूक** [ म० रेडा ] न० १ म्हशींचें अपत्य. २ म्हैस ( तुच्छतेनें ).

पु० १ म्हैस [illegible]

जातीचा पुरुष. २ बटवा नांवाची पिशवी उघडण्याच्या ज्या दोन दोऱ्या त्या प्रत्येक. ॐ **रेड्यापाड्यांची झुंज आणि झाडांचें मरण** दोन समर्थांच्या भांडणांत गरीबगुरीबांचा विनाकारण चुराडा होतो.

**रेडी स्त्री०** म्हैस हा दूध देणारा पशु.

**रेंडू पु०** एक प्रकारची गाडी; रेडका.

**रेडूक न०** वर 'रेडकूं' पहा.

**रेगवी स्त्री०** खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

**रेणु [ सं० ] पु०, स्त्री० १** धूळ. २ फुलांतील पराग.

**रेणें न०** गवत, कडबा, इ० जें अजूनपि खाऊं लागलें नाहीं, जें केवळ मातेच्याच दुधावर आहे अशा वासरूं, रेडकूं, इ० अपत्यांची विष्ठा. **रेणणें अ० क्रि०** ( अशी विष्ठा रेडकूं, वासरूं, इ० नीं ) विसर्जिणें. [ धातु.

**रेत [ सं० रेत, रेतस् ] न०** पुरुषाचें वीर्य;

**रेत, रती [ सं० रेत=वाळू, रेती ] स्त्री०** वाळू, रेती. ॐ **रेतदाणी(-नी) स्त्री०** लिहिलेल्या कागदावर घालावयाची वाळू ज्या आकारविशेषाच्या भांड्यांत ठेविलेली असते तें भांडें; वाळूदाणी.

**रेती स्त्री०** वर, 'रेत', ' रेती ' पहा.

**रेंद स्त्री०, रेंदा पु० १** घर, गुरांचा गोठा, इ० तील केरकचरा किं० गदळ. २ चिखल. ३ तेल, तूप, इ० च्या बारदानांतील गाळ. ४ जखम, गळू, इ० तील दाट पू, रक्त, इ०. ५ शेणाची रास. **रेंद पु०** पिण्याच्या दारूची भट्टी. ह्या अर्थी 'रेंदसरा' पु० सुद्धां. **रेंद न०, पु०** मक्ता. ॐ **कोणेकाचा रेंदा काढणें** त्याला झोडपून काढणें. **रेंदकरी पु०** मक्तेदार. **रेंदवणी न०** गदळ पाणी. **रेंद वि०** आळशी; सुस्त.

**रेंदावणें [ म० रेंदा ] अ० क्रि० १** ( पाणी इ० ) गढूळ होणें. २ ( गळूं इ० मध्यें पू ) सांचणें किं० (तें) पुवानें डबडबणें. **रेंदाविणें स० क्रि०** ( पाणी इ० ) गढूळ करणें.

**रेप स्त्री०** तापांत अंगांत उठते ती शिणिक. **रेपा स्त्री० अ० व० १** तापांत अंगांत उठतात त्या शिणका किं० कळा ( येणें ). २ आमांशामुळें पोटांत उठतात त्या वेदना.

**रेप स्त्री० १** मोठा दगड. २ अगडबंब माणूस,



पशु, फळ, इ०. **स्त्री०, पु०** दाट चिखल. ॐ **रेपांवर रेप घालणें** ( किं० **बसविणें** )आधाशीपणानें खाद्य पोटांत घालणें ( म्ह० खाणें ).

**रेपणें [ म० रेप=चिखल ] अ० क्रि०** कांहीं हालचाल न करतां सुस्तपणानें बसणें.

**रेफ [ सं० ] पु० १** र हें अक्षर. २ अक्षराच्या डोक्यावरचें 'र' चें अर्धवर्तुळाकृति चिन्ह; उ० अर्क. ॐ **द्विरेफ पु०** भ्रमर; भुंगा.

**रेब स्त्री० १** चिखल. २ समुद्र खवळला म्हणजे कांठावर जो लोण्यासारखा मृदु गाळ येतो तो.

**रेंबट स्त्री०** रमत गमत किं० सुस्तपणें कांहीं काम करणें. ॐ **रेंबट कहाणी स्त्री०** कंटाळवाणी हकीगत ( लावणें, मांडणें, इ० ). ॐ **रेंबट्या पु०** मंदपणें किं० सुस्तपणें काम करणारा.

**रेबटणें स० क्रि०** ( पदार्थाला ) तेल, तूप, चिखल, इ० चोपडणें.

**रेंबटणें, रोंबटणें स० क्रि० १** खुपसणें; शिरकावणें. २ चेपणें.

**रेबटी स्त्री०** खालीं 'रेबडी ' पहा.

**रेबड स्त्री० १** चिखल, शेण, गू, ओला केरकचरा, इ० चा कोणेक स्थळीं असलेला ढीग किं० पसारा. २ रक्तमिश्रित पू.

**रेबडणें अ० क्रि०** चिखल, शेण, गू, शेंबूड, रक्त, इ० नीं (जमीन, अंग, नाक, इ०) बरबटलेलें असणें किं० होणें. **स० क्रि०** (रस्ता, जमीन, अंग, इ०) चिखल, शेण, गू, इ० नीं बरबटविणें किं० माखणें.

**रेबडी, रेबटी स्त्री० १** पातळ गूळ; थेंबां थेंबांनीं ठिपकत असलेला गूळ. २ फार पिकलेला फणस, आंबा, इ० तील थिलथिलीत गीर.

**रेभ स्त्री०** भिंत, जमीन, इ० तील भेग, फट, किं० चीर.

**रेंभट** इ० वर ' रेंबट ' इ० पहा.

**रेमटणें, रोंबटणें स० क्रि० १** चेपणें; दाबणें. २ खुपसणें; शिरकावणें.

**रेम्या, रेमेडोक्या वि० १** मदड; मूर्ख; बुद्धिहीन. २ संथपणानें काम करणारा.

**रे रे स्त्री० १** पिरपीर; रड. २ अति संथपणानें किं० मंदगतीनें कांहीं काम करण्याचा प्रकार.

**रे रे स्त्री०** कोणेकाला दरडावणें ( करणें ). **इ० वा० अ०** हाय हाय ! अरेरे !

**रेल [ हिं० ] स्त्री०** १ वैपुल्य; समृद्धि. २ ओढ्याच्या पाण्याचा एकदम आलेला लोंढा ( येणें ). ३ बारीक वाळू किं० रेती. ꙮ **रेलचेल स्त्री०** अवळपवळ पुरण्याइतकें कोणेक पदार्थाचें वैपुल्य; समृद्धि.

**रेलणें अ० क्रि०** १ ( भिंत, खांब, इ०) योग्य रचना, मांडणी, उभारणी, इ० पासून सरकणें, कलणें, किं० झुकणें. २ ढासळणें; घसरणें.३ गळून पडणें.

**रेव स्त्री०** १ बारीक वाळू किं० रेती.२ साखर, दळलेलें पीठ, इ० तील कचकच. **न०** आकाशांत लांबलचक पांढऱ्या ढगाचे पट्टे वर्षा वर्षा पसरलेले दिसतात ते समुच्चयानें किं० तशा पट्टयांनीं व्याप्त असें आकाश ( निघणे, पसरणें, चढणें, इ०).ꙮ**रेवट, रेवठील वि०**वाळूची (जमिन);जेथे पुष्कळ खडे आहेत अशी ( जमिन ). **रेवठा, रेवडा पु०** वाळूचा ढीग किं० डोंगर. **रेवसळ वि०** वाळू किं० बारीक खडे इ० जींत फार अशी ( जमीन ); रेताड; रेताळ.

**रेवचिनी** इ० पुढें ' रेवाचिनी ' पहा.

**रेवडा स्त्री०**१ कांबळें, घोंगडें, इ० च्या दशांना पीळ भरून केलेल्या बारीक बारीक दोऱ्या समुच्चयानें. २ कांबळें, घोंगडें, इ०च्या दशांच्या मूल प्रदेशीं रंगीत सूत, रेशीम, इ० चा भरलेला एक दोन बोटें रुंदीचा पट्टा.

**रेवडी [ हिं० ] स्त्री०** १गुळाच्या किं०साखरेच्या पाकाच्या थापट्या करून त्यांवर तीळ चिकटावून करतात तो मुलांना द्यावयाचा खाऊ. २ कोणेकाचा उडविलेला बोऱ्या किं० फजिता.

**रेवण, रेवणी [ म०रेव ]स्त्री०**१ किल्ल्याच्या तटाच्या बाहेर किं० खंदकाच्या बाहेर करतात ती उतरती जमीन,-तोफेच्या गोळ्यापासून बचाव होण्यासाठीं. २ क्रमानें उतरती होत गेलेली जमीन. ३ चिखलट किं० रेताड जमीन,-जीवरून चालणारी गाडी, माणूस, पशु, इ० आंत रुततात.

**रेवणें अ० क्रि०** १ ( भिंत, खांब, इ०) कलणें किं० खचणें. २ ढासळणें. ३(विहीर, खड्डा, इ०) ओहोरणें किं० भरून येणें. ४ (कांहीं रोग, औषधाचा गुण, इ० नीं)कोणेकाच्या अंगीं मुरणें किं० भिनणें. ५ (भूत, पिशाच, इ० नीं ) कोणेकाच्या अंगांत शिरून तेथे राहाणें. **स० क्रि०** ( खड्डा, विहीर, र० मध्यें ) माती इ० घालून भरून काढणें.

**रेवती [ सं० ] स्त्री०** १ सत्तावीसावें नक्षत्र. २ बलरामाची बायको. ३ एक फूल. ४ ( भिक्षुकांच्या भाषेंत ) अर्धा रुपाया; आधेली. ꙮ **कांहा कामाला रेवती नक्षत्र लागणें** ते रेंगाळत चालणें; अनेक विघ्नें येऊन तें मंद गतीनें चालत राहाणें.

**रेवस न०, रेवाचिनी स्त्री० [ फा० रेवंदूचीनी ] न०** एका झाडाचा चीक. हा औषधाच्या उपयोगाचा असतो. ह्या चिकाचा दुधांत घालून रांधा करतात त्याला ' रेवाचिनीचा शिरा ' म्हणतात. ह्या रांध्याच्या कांड्या केलेल्या असतात. ह्या शिऱ्याला ' रेवंदसार ' असाही शब्द आहे.

**रेवा पु०** १ वाळू, रेती. २ धान्य, साखर, पीठ, इ० तील कचकच. ३ गाळ; रेंदा. ४ ढगांचा दाट समुदाय. ५ पांढऱ्या ढगांचे आकाशांत लांबच लांब पसरलेले पट्टे समुच्चयानें. ६ नर्मदा नदी.

**रेवाज** मागें ' रिवाज ' पहा.

**रेवाळ, रेवाळें [ म० रेव ] न०** १ वाळू; रेती. २ धान्य, पीठ, साखर, इ० तील कचकच. ३ आकाशांत जमलेल्या पांढऱ्या ढगांचे पट्टे समुच्चयाने ( जमणें, धरणें, विरणें, इ० ).

**रेवाळ [ म० रेव ] वि०** रेतीनें युक्त; ज्यांत कचकच फार आहे असे ( पीठ, साखर, धान्य, इ० ).

**रेवापेवीं, रेवापेवां [ म० रेव+पेंव ] क्रि० वि०** १ उधळणें, सांडणें, नासणें, कुजणें, इ० क्रियांमुळे ( पदार्थांची नासधूस वरणें, होणें, इ० ). २ कांहीं खाद्य पदार्थांचा वीट आला असतां ( तो ताटांत इकडे तिकडे सारणें ).

**रेशमी** इ० खाला ' रेशीम ' मध्यें पहा.

**रेशीम [ फा० रेशम् ] न०** एका जातीच्या किड्यानें आपल्या पोटांतून काढलेला तंतु. ꙮ

**रेशमी** वि० १ रेशीम नांवाच्या तंतूचा बनविलेला किं० त्या तंतूसारखा मऊ किं० गुळगुळीत. **रेशीमकांठी** वि० कांठाला रेशमाची काडी किं० रेषा ज्याच्या विणांत आहे असें ( लुगडें, धोतर, खण, इ० ). **रेशमी गज** पु० जमीन मोजण्याचा गज. हा अठरा तसू लांबीचा असे. मागें ' रुमाली गज ' पहा. **रेशमी किडा, रेशमाचा किडा** पु० ज्या किड्याच्या पोटांतून रेशीम हा तंतु निघतो तो किडा. **रेशमी नारिंग** न० पातळ सालीचें नारिंग हें फळ. **रेशमाची गांठ** स्त्री० अभेद्य संबंध ( लग्न, शत्रुत्व, मित्रत्व, इ०संबंधानें बोलतांना ).

**रेषा** [ सं० ] स्त्री० १ रेघ; ओळ. २ आंबा इ० फळांतील तंतु. ❀ **कोणेकाला रेषा ओढून** ( किं० **काढून** ) **देणें** त्याच्या वर्तनाला शिस्त घालणें किं० लावणें. **कोणेकाची रेषा उमटणें** (किं० **उपटणें**)त्याचें दैव अकस्मात् अनुकूल होणें; कारण लक्ष्यात न येतां त्याचा उत्कर्ष होऊं लागणें. **कोणेकाच्या गांडातील रेषा उपटणें** याचा अर्थ वरीलप्रमाणेंच.

**रेस** [पोर्तुगीज] पु० आण्याचा पंचविसावा अंश. ❀ **रेसभर** क्रि० वि० यत्किंचित्, अगदीं सुद्धां ( ढळणें, सरकणें ). **टीप**,–प्रयोग बहुधा निषेधरूप.

**रेहकला, रेहेकला** पु० एक प्रकारची गाडी. मागें ' रेकला ' पहा.

**रेळा** [ म० रेळणें ] पु० पाणी, रंग, तेल, रक्त, पू, इ० चा ओघळ. [ पहा.

**रैयत, रैयतावा** मागें ' रयत, ' ' रयतावा '

**रोक** पुढें ' रोख ' पहा.

**रोकड** [ सं० रोक=रोखीनें केलेली खरेदी ] स्त्री०१ प्रत्यक्ष नाण्याच्या रूपांत असलेला पैसा. २ सोने, चांदी, हिरे, मोती, इ० प्रत्यक्ष किं० दागिन्यांच्या रूपांतील,–ज्यांच्या विक्रीपासून ताबडतोब नाण्याच्या रूपांत पैसा मिळूं शकतो.

**रोकडा** [ म० रोकड ] वि० १ नाण्याच्या रूपांत असलेला पैसा किं० असलेलें द्रव्य किं० संपत्ति. २ कोणेकाला ताबडतोब दिलेला (जबाब) किं० मारलेला ( रट्टा ) किं० केलेली ( शिक्षा ). ३ स्पष्ट, असंदिग्ध ( ज्ञान, माहिती ). ४ विषयाचें तत्काळ ग्रहण करणारी (बुद्धि). क्रि० वि० ( लिंगवचनांप्रमाणें फिरणारें ) तत्काळ, ताबडतोब, सबुरी न करतां; उ० त्याच्या वाटेस कोणी गेलें तर तो रोकडी चपराक त्याला लगावतो. ❀ **रोकडी हुंडी** स्त्री० दर्शनी हुंडी. मागें ' दर्शन ' मध्यें ' दर्शनी हुंडी ' पहा. **रोकडा मृत्यु** पु० तात्कालिक प्राप्त झालेलें आणि जिवंतपणाची लवमात्र धुगधुगी न राहातां आलेलें मरण. **रोकडोबा** पु० अशिक्षितांचा एक देव,–जो नवसाला ताबडतोब पावतो. **रोकड्या** पु० सराफाची किं० व्यापाऱ्याची पैशाची थैली वाहाणारा त्याचा नोकर.

**रोकवणी** न०विटाळाच्या निरनासाठी केलेल्या स्नानाचा शेवटचा डोक्यावर ओतून घेतलेल्या तांब्या.

**रोख** [ सं० रोक=जेव्हांच्या तेव्हांच किंमत देऊन केलेली खरेदी ] वि० १ नाण्यांच्या रूपांत असलेली (कोणेकाची संपत्ति).२ विकत घेतलेल्या किं०दिलेल्या पदार्थाची जेव्हांच्या तेव्हांच दिलेली किं० घेतलेली ( किंमत ). ३ स्पष्ट शब्दांत किं० कोणाची भीडभाड न धरतां दिलेले ( उत्तर ) किं० सांगितलेलें ( मत ). **टीप**,–वरील तीन्ही अर्थी ' रोखठोक ' हाही शब्द आहे. ❀ **रोख विक्री** स्त्री० १ विकलेल्या मालाबद्दल दुकानदाराला मिळालेली किंमत,–'उधार किंमत'याच्या व्यावर्तकत्वें; उ० आज दुकानावर पन्नास रुपये रोख विक्री आली. २ जेव्हांच्या तेव्हांच किंमत घेऊन माल विकणें ही रुरणी किं० हा शिरस्ता. **रोखारोखीं** क्रि० वि० ताबडतोब रोख किंमत देऊन. **रोखठोक** वि० स्पष्ट शब्दांत सांगितलेलें ( मत ), केलेली ( शिक्षा ), दिलेला ( जबाब ). क्रि० वि० १ स्पष्टपणें; असंदिग्ध रीतीनें. २ जेव्हांच्या तेव्हां.

**रोख** [ फा० रुख् ] पु० १ कल; झोक; गमनाची दिशा; धोरण. २ भाषणाचा स्पष्ट सांगितलेला किं० मुख्य ठेविलेला मुद्दा किं०कटाक्ष.

**रोखणी** [ म० रोखणें ] स्त्री० १ सुताराचें एक हत्यार; रंधा. २ रोखण्याची क्रिया. खालीं ' रोखणें ' पहा.

**रोखणें स०** क्रि० १ ( लाकूड इ० ) रंधा मारून साफ किं० गुळगुळीत करणें. २( बंदूक, तोफ, दृष्टि, बाण, इ० ) पदार्थविशेषाकडे नेम धरून वळविणें. ॐ **रोखून पाहाणें** टवकारून पाहाणें; पदार्थविशेषाकडे मुद्दाम नजर वळविणें. **रोखारोखी** स्त्री० समक्ष भेट.

**रोखा** [ अ० रुक्आह् ] पु० १ दस्तऐवज. २ हुकमाचें पत्र. ३ मागणीचें पत्र. ४ करारनामा.

**रोखी** [ म० रोख ] स्त्री० १ ताबडतोब किंमत देऊन किं० घेऊन केलेली खरेदी किं० विक्री. २ नाणें, पैसा, इ० समुच्चयानें.

**रोग** [ सं० ] पु० १ शरीरप्रकृतींत उत्पन्न झालेला कांहीं बिघाड. २ पदार्थांचा अपायकारक भाग किं० अंश. ३ अपायकारक कोणतीही वस्तु, माणूस, इ०. ॐ **रोगाड्या, रोगाळ्या** वि० कांहीं रोग जडल्यामुळें क्षीण झालेला ( मनुष्य ). **रोगट, रोगगेला, रोरिष्ट, रोगेला** वि० सदा आजारी. **रोगग्राम** पु० शरीर,–जें रोगाला सदैव पात्र असतें. **रोगमल्ल** पु० रोगांनीं सदा ग्रस्त मनुष्य ( विनोदांत ). **रोगराई** स्त्री० १ गांवांत रोगांचा प्रादुर्भाव, रोगांचे प्रकार, रोगांनीं लोकांची पछाडणूक, इ०, किं०इ० संबंधाची वार्ता. २पदार्थांतील अपायकारक अंश. **रोगवणी** [ म० रोग+पाणी] न० १ बस्ती, पोथ, इ० उपायांनीं शरीराच्या मुखादिद्वारांतून रोगाला बरोबर घेऊन बाहेर पडतें तें पाणी किं० तो द्रवपदार्थ. २ शिजविणें. धुणें, इ० उपायांनीं पदार्थांतील अपायकारक द्रव बाहेर पडतो तो. ३आश्लेषांतील पाऊस,–जो धान्यादिंस अपायकारक असतो. **रोगी** वि० १ रोगानें जर्जर. २ अपायकारक.

**रोगटणें** [ म० रोग ] अ० क्रि० रोगानें ग्रस्त [ होणें.

**रोगण** [ फा० रोघन्=तेल ] न० लोखंड, लाकूड, इ० वर गंज न चढावा, कीड न लागावी, तकाकी यावी, इत्यादर्थ तेल, राळ, मेण, इ० चें लावितात तें मिश्रण.

**रोगणें, रोघणें** [ म० रोग ]अ० क्रि० १रोगानें ग्रस्त होणें. २ अंगांत शिरलेल्या कांहीं रोगानें दिवसें दिवस क्षीण होत जाणें.

**रोगिण** [म० रोग] स्त्री० देवीची भक्त स्त्री. ( अशा स्त्रिया सदैव रोगानें ग्रस्त असतात).

**रोगेणें** [ म० रोग ] अ० क्रि० अंगीं मुरलेल्या कांहीं रोगामुळें दिवसें दिवस ( मनुष्य ) क्षीण होत जाणें.

**रोचक** [ सं० ] वि० १ चकचकीत करणारा. २ आवडतें; प्रिय; मनाजोगें. ३क्षुधावर्धक (हिंगाष्टक इ० ). न० पादेलोण. पु० काचकाम किं० नकली दागिना करणारा कारागीर.

**रोचणें** स० क्रि० खुपसणें; बोचणें; आंत ढकलणें. अ० क्रि० आंत शिरणें; घुसणें.

**रोचन** [ सं० ] पु० १ पाचक पदार्थ (हिंगाष्टक, पादेलोण, इ० ). २ 'गोरोचन' चा अपभ्रंश. न० आवड उत्पन्न करणें;सुखविणें. **रोचना** स्त्री० १ सुंदर स्त्री. २ गोरोचन. ३ वंशलोचन. ४ रमणीयता; सुखकरपणा.

**रोचिस्** [ सं० ] न० १ उजेड, प्रकाश. २ २ तेज. ॐ **रोचिष्णु** वि० १ तेजस्वी;कांतिमान्. २ क्षुधावर्धक.

**रोज** [ फा० ] पु० १ दिवस. २एका दिवसाची मजुरी. ३ तगादा करावयाला आलेला जो सरकारचा किं०सावकाराचा मनुष्य त्याला रोजच्या रोज द्यावा लागतो तो भत्ता. क्रि० वि० प्रत्येक दिवशीं. **रोज उठून** क्रि०वि०प्रत्येक दिवशीं;अखंड क्रमानें. **रोजकरी** पु०रोजावर ठरविलेला मजूर किं० गडी. **रोजकीर्द** स्त्री०१दररोज होणाऱ्या जमा आणि होणारे खर्च किं० त्यांच्या नोंदणीची चोपडी. २ आपला आणि आपल्या कुटुंबाचा नित्याचा जो खर्च तो. **रोजखरडा** पु० संसार, संस्था, व्यवहार, इ० संबंधाचा प्रति दिवसाचा कच्चा जमाखर्च इ० ज्यावर लिहितात तो कागद. **रोजगार** पु० कोणेकाचा उद्योग, धंदा, इ० रूप चरितार्थाचें साधन. **रोजगारी, रोजगारशीर** वि० ज्याला शेतकीच्या व्यतिरिक्त कांहीं उद्योग, धंदा, नोकरी, इ० चरितार्थाचें साधन आहे असा. **रोजगुजारा** पु० चरितार्थ. **रोजगुदस्त (–स्तां)** क्रि० वि० काल्च्या दिवशीं. **रोजच्या रोज** क्रि०वि०दररोज; प्रति दिवशीं. **रोजदार** पु० रोजाच्या बोलीनें कामाला लाविलेला गडी. **रोजनामा** पु०, **रोजनिशी, रोजवारी** स्त्री०आजकाय काय कामें झालीं इ०हकीगत रोजच्या रोज जींत लिहितात ती वही. **रोजमरा, रोजमुरा,** पु० मजुरी; मुशा-

हिरा. रोजवहा पु० एका दिवसाचा हिशेब. रोजिनदार पु० रोजच्या कामाची मजुरी मध्याकाळीं देऊन टाकावयाची अशा बोलीनें कामावर नेमिलेला गडी. रोजारोजी स्त्री० आज मिळवावें आणि आज खावें अशी आयुष्यक्रमाची सरणी. रोजिना क्रि० वि० दररोज; प्रत्यहीं. पु० दिवसाचें वेतन किं० मजुरी. रोजी स्त्री० १ कुटुंबाचा किं० कोणा माणसाचा दररोजचा खर्च. २ एका दिवसाचें कोणेकाचें वेतन किं० मजुरी. ३ दूध, पैसा, शिधा, इ० जें कोणेकाला रोज नियमानें मिळतें तें. ४ मोहोरमांत फकीरांना देतात तो पैसा इ०.

रोजा [ फा० ] पु० रमझान महिन्यांत मुसल्मान लोक जो सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत करतात तो उपास.

रोजा [ अ० रोझा ] पु० १ बाग. २ दर्गा; समाधिमंदिर.

रोट, रोटगा [ हिं० ] पु० कणकेची जाडी थापलेली भाकरी.

रोटा [ हिं० ] पु० १ पाव हे गव्हाचें खाद्य. २ अन्न; पोटापाण्याची तजवीज.

रोटी [ हिं० ] स्त्री० १ भाकरी. २ पोळी. ❀ रोटीबेटी व्यवहार पु० एकत्र बसून जेवणें, आणि एकमेकांत लग्नाचे संबंध करणें हा परिपाठ.

रोठा पु० १ पक्की झाल्यावर झाडावरून काढलेली सुपारी २न शिजवितां केलेली सुपारी; उ० श्रीवर्धनी रोठा. टीप,-ह्या दोन्ही अर्थी ' रोठी सुपारी ' असाही शब्द आहे.

रोड, रोडका, रोडगा वि० १ अंगांत मांस थोडें असल्या कारणानें ज्याचीं हाडें बाहेर उठून दिसतात असा ( मनुष्य, पशु ); कृश; किडकिडित. २ वाळून गेलेलें ( झाड, पीक, इ० ). रोडा, रोडगेला, रोडग्या, वि० कृश; किडकिडीत. रोडमल्ल पु० कृश मनुष्य ( विनोदांत ).

रोडकी स्त्री० एक पक्षिविशेष.

रोडगा, रोटगा [ म० रोट ] पु० १ कणकेची जाडी भाकरी. २ जोंधळे, बाजरी, इ० च्या पिठाची खूप जाडी भाकरी ( निंदेंत ). ३ कोणताही जाडी आणि बेढब पदार्थ.

रोडणें, रोडावणें [ म० रोड ] अ० क्रि० कृश होणें. ' रोडेणें, ' ' रोडेजणे ' हीं रूपें ह्याच अर्थी कवितेंत येतात.

रोडा [ हिं० ] पु० कौल, वीट, इ० चा [ तुकडा.

रोडावणें [ म० रोड ] अ० क्रि० ( मनुष्य, पशु ) कृश किं० किडकिडीत होणें. २ ( झाड, पीक ) वाळणें किं० वठणें.

रोडी [ म० रोडा ] स्त्री० दगड, विटा, कौलें, इ० चे तुकडे समुच्चयानें.

रोणदिवी स्त्री० पुढें ' रोवणदिवी ' पहा.

रोंत, रोंतणें, रोंथ, रोंथणें पुढें ' रोवंथ, ' ' रोवंथणें ' पहा.

रोती [ हिं० ] वि० रडकी किं० रडवी ( मुद्रा, चर्या ).

रोदन [ सं० ] न० रडणें; विलाप करणें.

रोदा [ फा० ] पु० बकऱ्याच्या आंतड्याची तांत,-जी तंतुवाद्यांच्या कामीं योजली जाते.

रोध [ सं० ] पु० १ आडविणें; कोंडणें. २ हरकत; गतीचा कुंठितपणा. ३थांबणूक किं० थांबवणूक; प्रतिबंध; नियंत्रणा. ४धरण; बांध. ५वेढा.

रोधणें [ सं० रुध् ] स० क्रि० १ बंद पाडणें. २ विघ्नित करणें. ३ कुंठित करणें. ४ गराडणें; वेढणें.

रोप, रोपडें, रोपटें न०, रोपा, रोपटा पु०[ सं० रोप ] १ लहान झाड,-नुकतेंच उगवलेलें. २ एके ठिकाणाहून उपटून दुसरे ठिकाणीं लाविलेलें किं० लावावयाचें कोंवळें झाड. रोपटा पु० रोप लावण्याठीं भाजून तयार केलेली जमीन. ❀ रोपदळ न० १ नारळी, पोफळी, इ० च्या कोंवळ्या झाडांचा समुदाय. २नारळी, पोफळी, इ० चे रोपे प्रत्येक,-दुसरीकडे लावण्याला योग्य अशा दृष्टीनें.

रोप [ सं० ] पु० १ उभारणें. २ झाड एके ठिकाणाहून उपटून दुसरे ठिकाणीं लावणें किं० असें लाविलेलें झाड. ३लागवड. ४ बाण, तीर.

रोपण [ सं० ] न० १ स्थापणें. २ कोंवळें झाड जमीनींत लावणें ( करणें ). ३ जखम, व्रण, इ० बरा करणें. ४जखम, व्रण, इ० बरें करण्याचें मलम इ०.

रोपणें [ सं० रुह्=उगवणें; म० रोप ] स० क्रि० १ झाड इ० जमीनींत लावणें. २ कोणा

मनुष्याला अधिकार इ० वर नेमणें किं० स्थापिणें. २ खुपसणें, भोसकणें.

**रोपा** पु० वर ' रोप ' पहा.

**रोपीटोपो** [ म० टोपी ] वि० लहान (मूल). ( लडिवाळपणांत ह्याचा प्रयोग होतो ).

**रोब, रोआब** [ अ० रु अब् ] पु० धाक, दरारा. [ बोचणें.

**रोंबटणें, रोमटणें** स० क्रि० खुपसणें, ढकलणें,

**रोबरो** मागें ' रूबरू ' पहा.

**रोंबें** न०, **रोंबी** स्त्री० शरीरांतून नासकें रक्त काढून टाकण्यासाठीं लावितात ती तुंबडी ( लावणें ).

**रोम** [ सं० रोमन्=केश ] न० १शरीरावरील केश. २ पक्ष्याचे पांस किं० पर. ॐ**रोमांच** पु० हर्ष इ० मुळें शरीरावरील केश उभे राहाणें. **रोमाली, रोमावली, रोमराजी, रोमलता** स्त्री० मनुष्याच्या पोटापासून बेंबीपर्यंतचे केश. **रोमोद्गम, रोमोद्भेद, रोमविकार, रोमविभेद** पु०रोमांच. **रोमकूप** पु० रोमरंध्र. **रोमगुच्छ** पु० चंवरी. **रोमहर्ष** पु० रोमांच.**रोमहर्षण** वि० शरीरावरील केश जेणेकरून ताठ होऊन उभे राहातात असा ( देखावा, हकीगत, इ० ). न० रोमांच.**रोमरंध्र** न०१शरीरावरचे केश ज्या खळग्यांतून उगवतात त्या खळग्या प्रत्येक. २ शरीराच्या त्वचेंतील सूक्ष्म छिद्रें,-ज्यांतून घाम बाहेर पडतो. **रोमरंध्रीं,रोमरोमीं, रोमागाणिक, रोमागाणित** क्रि० वि० केशाकेशांत किं० हाडीं मासीं (कांहीं गुण,खोड,ज्ञान,मस्ती,इ०भिनलेली असणें).**रोमरक्षा** स्त्री०,**रोमरक्षा व्यतिपात** पु० अल्पस्वल्प लाभ, प्राप्ति, इ०. निषेधार्थी प्रयोग. उ० त्याची संगति तूं सोड, त्याच्या संगतीपासून तुला काय रोमरक्षा आहेत ? ( म्हणजे त्याच्या संगतीपासून तुला कांहींही लाभ होणार नाहीं ). 'रोमरक्षा'हा शब्द बहुधा अ०व०योजतात' रोमरक्षाव्यतिपात' हा ए० व० योजतात.

**रोमणदिवा** पुढें ' रोवणदिवा ' पहा.

**रोमणबाक, रोमणी**,इ० मागें ' रुमणबाक ' पहा.

**रोमंथ** [ सं० ] पु० सरासरी चावून गिळलेलें गवत इ० जें बैल, गायी, इ० पुन्हा तोंडांत ओढून घेऊन त्याचें स्वस्थपणें करतात तें चर्वण.

**रोमें** न० शरीरांतील नासकें रक्त काढून टाकण्यासाठीं लावितात ती तुंबडी.

**रोम्हणबाक, रोम्हणी** इ० मागें' रुमणबाक, ' ' रुमणी ' इ० पहा.

**रोराण** न० १ पशु, पक्षी, इ० चा कलकलाट. २ घुशींचा कर्कश शब्द. ३ पोरें, माणसें, इ० नें मोठमोठ्यानें बोलणें, ओरडणें,हसणें, भांडणें, इ० चा कलकलाट किं० गोंगाट.

**रोरेणें** अ० क्रि० ( घूस ) ओरडणें.

**रोरों** स्त्री० १ घुशीच्या ओरडण्याचा शब्द. २ वाऱ्यावर उडणाऱ्या झाडांच्या पानांचा किं० पक्ष्यांचा आवाज.

**रोव** [ सं० रुह् ] पु० १झाडाचा कोंब किं० अंकुर. २ बाळदशेंतील झाड. ३ भिजत घातलेले पावटे, हरभरे, मटक्या, इ० ना फुटलेले मोड प्रत्येक किं०मोड फुटलेले पावटे प्रत्येक.

**रोवणें** [ म० रोवणें ] स्त्री० १ जमीनीच्या पृष्ठभागाचा भुसभुशीतपणा.२ ढासळलेला नदीचा धक्का, टेकडीची कड, बांधाची बाजू, इ०. ३ अनेक ठिकाणीं खुंटे, मेखा, इ० तंबू इ० साठीं ठोकून नंतर ते उपटून काढल्यावर सच्छिद्र झालेला भूपृष्ठ. ॐ **रोवणादिवली, रोवणादिवी** स्त्री०, **रोवणादिवा** पु०१ वर तेलवातीसाठी परडें असून खालीं ज्याला जमीनींत रोवून बसविण्यासाठीं निमुळतें लांब टोक असतें असा प्रकाशासाठीं केलेला संसारोपयोगी पदार्थ.२(लाक्षणिक) कांहीं काम न करतां खुंटासारखा उभा राहिलेला पुरुष ( रोमणदिवा ) किं० उभी राहिलेली स्त्री ( रोमणदिवी किं० रोमणदिवली ).

**रोवणें** [ सं० रुह् ] स० क्रि०१(खांब,झाड, मेख, इ० ) जमीन, भिंत, मध्यें उभें पुरणें. २ खुपसणें; ढकलणें. अ० क्रि० ( सुई, बोट, खिळा, कांटा, इ० ) अंग, डोळा, जमीन, पाय, इ० मध्यें शिरणें किं० घुसणें.

**रोवंथ** [ सं० रोमंथ ] पु० मागें 'रंवथ' पहा.

**रोवंथणें** [ म० रोवंथ ] स० क्रि० गाय,बैल, इ० नीं पूर्वीं अर्धवट चावून गिळलेलें ( गवत इ०)

पुन्हा तोंडांत ओढून तें पूर्णपणें चावीत आणि चघळीत बसणें.

**रोवळणें** [ म० रोवळी ] स० क्रि० ( चिरलेली भाजी, शिजावयास घालावयाचे तांदूळ, इ० ) रोवळींत घालून धुणें. खालीं ' रोवळी ' पहा.

**रोवळा** पु० कैली खंडीच्या षष्ठांशाइतकें धान्यादींचें परिमाण. [ पहा.

**रोवळा** पु० मोठी रोवळी. खालीं ' रोवळी'

**रोवळी** स्त्री० तांदूळ, भाजी, इ० पदार्थ धुवावयाचें जें बांबूच्या पातींचें किं० धातूंच्या पत्र्याचें सच्छिद्र भांडें केलेलें असतें तें.

**रोशन** [ फा० रोषन् ] वि० १ स्पष्ट; ज्याचा खुलासा झाला आहे असा. २ जाहीर; सर्वविश्रुत. ꕥ **रोशनाई, रोशनी** स्त्री० दिवे, बत्त्या, इ० ची कोणेक स्थळ प्रकाशित करण्यासाठीं केलेली मांडणी किं० रचना; दीपोत्सव. २ दिव्यांच्या लखलखाट. ३ अनेक विद्वान माणसें, अनेक प्रकारच्या रंगीबेरंगी पोशाखाचीं माणसें, प्रांताप्रांतांच्या रिवाजांप्रमाणें पोशाख केलेलीं माणसें कांहीं प्रसंगानें एके ठिकाणीं जमल्यानें येते ती अपूर्व शोभा. ४ अनेक रंगांच्या फुलांनीं बाग इ० स येते ती शोभा. ५ कोणत्याही कारणानें स्थलविशेषास आलेली रमणीयता किं० शोभा. **रोशन नाईक** पु० प्रकाशासाठीं मशाल पेटवून ती हातांत धरून मिरवणूक किं० कोणी माणूस यांच्यापुढें चालतो तो मनुष्य; मशालजी.

**रोशें** न० एक प्रकारचें गवत.त्याच्या तेलाला ' रोशेल ' किं० ' रोहशेल ' म्हणतात.

**रोष** [ सं० ] पु० क्रोध; धुस्सा. ꕥ **रोषाविष्ट, रोषाक्रान्त** वि० रागावलेला; क्रुद्ध.

**रोषण** [ सं० ] वि० रागीट; तापट स्वभावाचा.

**रोष्णाई, रोसनाई** वर ' रोशन ' मध्यें ' रोशनाई ' पहा.

**रोह** [ सं० ] पु० मोड फुटलेले हरभरे, वाटाणे, इ० प्रत्येक किं० त्यांना फुटलेले मोड प्रत्येक.

**रोहक, रोहंक** [ म० रोख ] पु० मनाची प्रवृत्ति; कल.

**रोहकणें** [ म० ' रोखणें ' चें एक रूप ] स० क्रि० १ रोधणें; थांबविणें; कुंठित करणें. २ कबज्यांत घेऊन ( घर, गांव, देश, इ० ) व्यापून टाकणें.

**रोहटी, रोहिटी** [ सं० रुह्; म० रोहं ] स्त्री० धान्य पेरल्यानंतर प्रथमतः जे अंकुर दिसतात ते समुच्चयानें.

**रोहशेल** वर ' रोशें ' मध्यें पहा.

**रोहिणी** [ सं० ] स्त्री० १ सत्तावीस नक्षत्रांपैकीं चवथें नक्षत्र. २ नऊ वर्षे वयाची कन्या. ३ गंडमाळा. ४ वीज. ५ तांबडी गाय. ६ कोणत्याही रंगाची गाय. ꕥ **रोहिणीपति, रोहिणीरमण** पु० चंद्र. **रोहिणी शकट** पु० शटकाच्या आकाराचे जे रोहिणी नक्षत्राचे तारे ते किं० त्यांची मांडणी. **रोहिणीसुत** पु० बुध हा ग्रह.

**रोहित** [ सं० ] वि० तांबडा. पु० १ तांबडा रंग. २ एक मासा; राही. न० १ रक्त. २ केशर. ꕥ **रोहिताश्व** पु० अग्नि.

**रोही** [ सं० रोहित ] स्त्री० १ एक मत्स्य किं० मासा. २ एक प्रकारचा हरिण; नीलगाय. ह्या अर्थी ' रोहें ' न० सुद्धां.

**रोहोपोहो** [ म० राहणें+पोहणें ] पु० १ दळणवळण; घरोब्याचा व्यवहार. २ परिचय.

**रोळ** पु० क्रम; वहिवाट; प्रचार; रूढि.

**रौदळणें, रौदाळणें, रौदळा** मागें ' रंवदळणें, ' ' रंवदळा ' पहा.

**रौद्र** [ सं० ] वि० १ भयंकर. २ उग्र. ३ तामसी; रागीट. ४ रुद्रासंबंधाचा. पु० १ शिवाचा भक्त; शैव. २ क्रोध. ३ ( **साहित्य** ) भयानक हा रस.

**रौप्य** [ सं ] न० रुपें किं० चांदी हा धातु. ꕥ **रौप्यमुद्रा** स्त्री० १ चांदीचें नाणें. २ रुपाया हें नाणें.

**रौरव** [ सं० ] पु० एक नरकविशेष.

**रौरव, रौरवी** मागें ' रवरव, ' ' रवरवी ' पहा.

**रौक्ष** [ सं० ] न० रूक्षपणा. मागें ' रूक्ष ' पहा.

**र्‍याऱ्या** स्त्री०, पु० मुलांची पिरपीर, किरकीर, किं० तरफड.

# ल

**ल** मराठी व्यंजनमालेंतील 'ल' हें अठ्ठाविसावें व्यंजन आहे.

**लईलूट, लयलूट** [ म० लई ( पुष्कळ )+लूट ] स्त्री० पदार्थांची समृद्धि किं० वैपुल्य.

**लककन्, लककिनीं, लकदिशीं** क्रि० वि० १ एकदम प्रकाशाचें किरण पाडून. २ एका क्षणांत.

**लकटणें, लगटणें** [ सं० लग् ] अ० क्रि० १ चिकटणें; बिलगणें; शेजारीं जाणें किं० असणें. २ झाडावर ( फुलें, फळें, इ० ) विपुल लागलेलीं किं० आलेलीं असणें. ३ ( झाड ) फळें, फुलें, पानें, इ०नीं समृद्ध झालेलें असणें. ४ ( कांहीं गोष्ट, समय, इ० ) जवळ येऊन ठेपणें. स० क्रि० १ ( एक पदार्थ ) दुसऱ्या पदार्थाशीं भिडावणें किं० त्याच्या शेजारीं ठेवणें. २ मिसळणें; मिश्रित करणें. ३ रेटणें; ढकलणें; सारणें; सरकावणें.

**लकड** [ म० लाकूड ] स्त्री० १ अतिशय उंच वाढलेला माड, ताड, सुरमाड, पोफळी, इ०वृक्ष. २ किडकिडीत आणि उंच असा माणूस. ॐ**लकडकोट, लकडीकोट** पु० लाकडाची तटबंदी; खांब, वासे, तक्ते, इ० चा केलेला कठडा किं० बंदिस्ती. **लकडखाना** पु० सर्पणाचीं किं०इमारत कामाचीं लाकडें ठेवण्याची किं० साठविण्याची वखार. **लकडदिवी** वि० उंच आणि किडकिडीत मनुष्य. **लकडवाला** पु० सर्पणाचीं किं० इमारतीचीं लाकडें विकणारा व्यापारी. **लकडीपूल** पु० १ लाकडाचा पूल. २ पुणें शहरांत नारायण पेठेंतून नदी ओलांडून भांबुरड्यास जावयाचा पेशव्यांनीं बांधलेला पूल. **लकडी पेंठी** स्त्री० शिमग्याच्या सणांतील होळींत जाळण्याकरितां मुलें घरोघर लाकडें, गोवऱ्या, इ० सर्पण मागतात तें.

**लकडणें** वर 'लकटणें' पहा.

**लकडा** [ हिं० ] पु० १ कांहीं कामाचा आपल्या मागें लागलेला तगादा किं० नेट. २जरूर आणि नेमलेल्या वेळांत केलें पाहिजे असें जें कांहीं काम किं० कर्तव्य त्याचेबद्दल मनाला लागलेली असते ती चिंता. ३ मोठें लाकूड; सोट. ४ रोड झालेला माणूस; किं० रोडपणाची स्थिति; उ० तापानें त्याचा लकडा वळून गेला. ५ शुष्क लाकूड किं० झाडाचा बुंधा. ॐ **लकड्या** वि० उंच आणि किडकिडीत ( मनुष्य ).

**लकडी** [ हिं० ] स्त्री० १ गुळाचा अति टणक आणि चिकट असा पाक. २काठी; लाकूड. ३ जोंधळ्याची एक जात. ॐ **लकडीवांचून मकडी वठत नाहीं** कडक उपाय योजल्याशिवाय आडदांड माणसाला ताळ्यावर आणतां येत नाहीं. मकडी म्ह० माकड.

**लकतऱ्या** [ फा०लत्त् ] स्त्री०अ० व० लुगडें, धोतर, बंडी, इ० वर फार वापरल्यामुळें त्याच्या चिध्या होतात त्या किं० त्यांना जीर्णपणाची स्थिति प्राप्त होते ती ( होणें, निघणें ). **लकतर** न० १ फाटकें वस्त्र. २ चिंधी; वाभाडा.

**लकपक, लखपक** वि० नीटनेटका; घासून, पुसून, धुऊन स्वच्छ झालेला किं० स्वच्छ केलेला ( मनुष्य, पदार्थ ).

**लकब** [ अ० ] स्त्री०१ बोलणें, चालणें,हसणें, खोकणें, शिंकणें, इ० क्रिया करतांना जी कोणेकाची विशिष्ट तऱ्हा किं० चाल ती; बोलण्यांत एकादा विशिष्ट शब्द किं०रचना अनेकवार योजण्याची जी कोणेकाची चाल ती. २ कोणेकाला लागलेली कांहीं वाईट खोड किं० ढब.

**लकलकणें** अ० क्रि० चकचकणें; चमकणें.

**लकलकाट** पु० दिवे, बत्त्या, आरास, इ०च्या योगानें स्थलविशेषीं झालेला चकचकाट किं०भरपूर प्रकाश.

**लकलकीत** वि० १ चकचकीत; तेजस्वी; प्रकाशित. २ स्वच्छ; निर्मळ. ३अंगावरचे दागदागिने,वस्त्रें,सामानसुमान,इ०च्या अभावामुळें उघडा, ओका, विरूप झालेला ( मनुष्य, घर, गाव,इ० ); उ० चोरांनीं आमचें घर लुटलें, आतां आम्ही लकलकीत झालों; उ० येथील झाडें तोडून ही जागा आम्ही लकलकीत केली.

**लंका** [ सं० ] स्त्री० १ रावणाची राजधानी. २ सिलोन हें बेट. ३ नळे, चंद्रज्योती,फुलबाज्या, इ० अतिषबाजीचे पदार्थ एकदम पेटविण्यासाठीं

त्यांची करतात ती रचना किं० मांडणी. ॐ **लंकेची पार्वती स्त्री०** १ जिच्या अंगावर एकही दागिना नाहीं अशी सवाशीण म्ह० सौभाग्यवती स्त्री. **टीप,**–लंकेंत सोन्याची समृद्धि आहे परंतु पार्वती (शंकराची स्त्री)लंकेंत गेली तरी तिला त्या सोन्याचे दागिने करून अंगावर धारण करतां येत नाहींत, कारण ती बैरागी देवाची पत्नी. २ ( लक्षणेनें ) खोगीर नसलेला आणि रोडका घोडा. **लंकेंत सोन्याच्या विटा स्त्री० अ० व०** १ आपणाला जिचा उपयोग होऊं शकत नाहीं अशी वस्तु विपुल असली किं० तुटपुंजी असली तरी आपणाला सारखीच. **एकाद्यानें लंका लुटणें** कांहीं धंदा, समर्थाचा आश्रय, इ० मुळें कोणेकानें खूप पैसा किं० संपत्ति मिळविणें. **लंकालूट स्त्री०** पैसा, धान्य, इ० ची कोणेकाला झालेली किं० मिळालेली समृद्धि. **लंकोदय पु०** ग्रह, रास, इ०चा लंकेंत उदय किं० उदयाचा समय. लंकेंतून पहिला रेखांश हिंदू ज्योतिष्यांनीं कल्पिलेला आहे.

**लकाकणें अ० क्रि०** चकचकणें; झळकणें.

**लकार** [ म० ' ल ' हें अक्षर ] **पु०** १ ल हें अक्षर. २ ल ह्या अक्षरानें सुरू होणारा शब्द ( लबाड, लुच्च्या, लफंगा ) ज्याचें वर्णन करतांना योजावा लागला असा माणूस. ॐ **लकार विल्हा पु०** लुच्चे, लबाड, लफंगे, अशा लोकांचा वर्ग; उ० तो गोविंदराव लकार विल्ह्यांतला आहे, त्याची संगति तूं धरूं नको. **लकारविल्हा, लकारविल्हे वि०** लबाड; लुचा. **लकारी स्त्री०** लबाडी; लुचेगिरी. **लबाडी लकारी स्त्री०** अनेक प्रकारची भामटेगिरी, लुच्चेगिरी, किं० लफंगेगिरी.

**लकारी** [म० लाख] **पु०** १ लाखेच्या बांगड्या कगण्या, इ० करभूषणें करणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**लकिरी** १ पुढें ' लकेरी ' पहा. २ लाखेचा रंग करणारा.

**लकीर** [ हिं० ] **स्त्री०** रेघ; ओळ; पट्टा.

**लकीलक्क वि०** स्वच्छ; नीटनेटका.

**लकेर, लकेरी स्त्री०** १ तेज;चकाकी;तकाकी. २ प्रकाशाचे किरण. ३ गायनांतील तान. ४ एकाद्या वस्तूंत एकादा रंग, चव, झाक, स्वर, इ० चा अल्प प्रमाणांत अनुभवास येत असलेला प्रादुर्भाव ( मारणें ); झील; छटा; उ० ह्या लुगड्यांत निळ्या रंगाची लकेर मारते; उ० त्याच्या बोलण्यांत कानडी सुराची लकेर मारते. ५ लुगडें, धोतर, इ० च्या कांठांतील रेशीम, कलाबतू, इ० ची काडी किं० रेघ किं० धारी.

**लकेरी पु०** लाखेच्या बांगड्या, बिलवर, इ० करणारा किं० रंग करणारा. वर लकारी पहा.

**लक्कलक्ख न०** १ आकस्मिक प्रकाशाचा किरण. २ अंगांत आकस्मिक उठलेली कळ. ३ मनाला एकाएकीं बसलेला धक्का. **वि०** १ स्वच्छ; चकचकीत; अगदीं निर्धूत किं० कफलक. **क्रि० वि०** स्पष्टपणें. [ पहा.

**लकड, लकडकोट,** इ० मागे ' लवड ' इ०

**लखपचोतरी (–ऱ्या), लखपंचोत्तऱ्या** [ म० लाख(लक्ष)+पंच, पांच+उत्तर+ई ( प्रत्यय ) ] **वि०** १ ज्याणें एक लाख गोष्टी सांगितल्या तरी त्यांतल्या फार तर पांच खऱ्या असावयाच्या असा ( माणूस ); अट्टल थापवाज. २ दिसण्यांत भपकेदार पण निःसत्त्व, निर्बल, किं० निर्वीर्य. **टीप,**– ह्या अर्थी ' लाख ' ( रंग करावयाचें एक द्रव्य ) असा अर्थ घेतला तरी चालेल.

**लखपति** [ **सं०** लक्ष+पति] **पु०** लाख रुपये किं० लाख रुपायांचा ऐवज ज्याचेपाशीं आहे असा मनुष्य; अति श्रीमंत; लक्षाधीश.

**लखलखणें अ० क्रि०** चमकणें; चकचकणें.

**लखलाभ** [ **म०** लख ( लक्ष )+लाभ ( फायदा ) ] **पु०** लाख रुपायांच्या किमतीची म्ह० अत्यंत मूल्यवान् अशी कांहीं वस्तु किं० गोष्ट किं० घडलेला प्रकार; उ० आपण आम्हाला प्रत्यक्ष कांहीं दिलें नाहीं तरी आपली भेट झाली हाच आम्ही लखलाभ समजतो. **टीप,**– गिऱ्हाइकानें कांहीं पदार्थ विकत घेतला असतां त्याचे हवालीं तो पदार्थ करतांना दुकानदार त्याला आपली सदिच्छा पुढील वाक्यानें दर्शवितो; ' हा कंठा ( किं० शालजोडी किं० दागिना ) मी तुम्हाला विकला तो तुम्हाला लखलाभ असो म्ह० तो तुम्हाला सुखकर ( किं० शुभदायक ) होओ !

**लखलोट, लखलूट, लखालूट, लखालोट,** [म० लाख+लुटणें, लोटणें ] **वि०** विपुल;अघळ-पघळ. **क्रि० वि०** प्रशस्तपणें; वैपुल्यानें. **स्त्री०** वैपुल्य;समृद्धि. ह्या अर्थी'लखलोट' पु०सुद्धां आहे.

**लखाकी(-खी) स्त्री०**चकाकी; तेज; झगझग.

**लखेरा** [ **म०** लाख; **हिं०** लखेरा ] **पु०** लाखेच्या बांगड्या, रंग, इ० करणारा.

**लखोटा, लाखोटा पु०** बंद केलेल पत्र. पुढें 'लाखोटा' पहा.

**लग** [ **म०** लागणें; **सं०** लग् ] **स्त्री०** घराचें माजघर, पडवी, इ० च्या खांबांच्या रांगेच्या माथ्यावर जे लांब आडवें चौरस लाकूड बसविलेलें असतें तें. **पु०, स्त्री०** मोडलेला किं० तुटलेला भाग, अवयव, किं० गात्र मुख्य पदार्थाला ज्या अत्यल्प तंतु, स्नायु, इ० च्या आधारानें जुळलेल्या स्थितांत असतें किं० लोंबत राहातें तो तंतु, स्नायु, इ०; उ० ही फांदी वावटळीच्या जोरानें मोडली ती लगीनें लोंबत राहिली आहे. **स्त्री०** १ दोन भूभागांना जोडणारा जमीनीचा पट्टा; संयोगी भूमि. २ संबंध; घरोब्याचें नातें. ३ कांठ; कड; उ० डोंगराच्या लगीवरून चालूं नको, पडशील; उ० टेबलाच्या लगीशीं दिवा ठेवूं नको. ४ कागद, कापड, इ० च्या कडेशीं रिकामी सोडलेली जागा; उ० लगीला शिवण भिडवूं नको; उ० लगीवर लिहूं नको. ॐ **तो गोविंदरावाच्या लगीं आहे** तो त्याच्या तंत्रानें वागतो; तो त्याच्याशीं सख्य करून राहिला आहे.

**लंग** [ **फा०** ] **वि०** लंगडा; उ० तैमूरलंग.

**लंग** [ **सं०** लंघ् ] **वि०** उपवास; आजार, काळजी, इ० कारणानें अशक्त किं०रोड झालेला.

**लग, लंग** [**म०**लागणें;किं० लंग (लंगडा)] **पु०** अनेक रकान्यांच्या कोष्टकांत आंकडे भरावयाचे असतां ज्या सदरांत कांहीं वस्तूचें नांव नाहीं तेथें 'लग' किं० 'लंग' हा शब्द कारकून लोक लिहितात आणि पुढें रकान्यांत शून्य (०) लिहितात.

**लगट** [ **सं०** लग् ] **स्त्री०** १ पाठलाग. २ कोणेकाला लाविलेला जोराचा नेट किं०तगादा. ३ कोणेकाच्या अंगाशीं चिकटून बसणें. ४ दाट घरोबा. ५ नेटाचा प्रयत्न. ६ कांहीं कामावर केलेले अखंड परिश्रम. ७ कोणेकाला दृष्टीआड न होऊं देतां त्याच्या मागोमाग जाणें.

**लगटणें** [ **सं०** लग् ] **अ० क्रि०, स० क्रि०** मागें 'लकटणें' पहा.

**लगड स्त्री०** १ सोनें, चांदी, इ० धातूंची कांब किं० वीट. २ जनावराच्या पाठीवर पाण्याचीं भांडीं ठेवण्याची लाकडाची किं० लोखंडाची रचना; माकण. [ क्रिया.

**लंगडणी** [ **म०** लंगडणें ] **स्त्री०** लंगडण्याची

**लंगडणें** [ **फा०** लंग् ( लंगडा ); **हिं०** लंगडना ] **अ० क्रि०** पायांत निसर्गतः कांहीं व्यंग असल्याकारणानें किं० पायाला कांहीं दुखापत झालेली असल्यामुळें ( मनुष्य, पशु, इ० नीं ) वाकडें किं० बेढब प्रकारें चालणें.

**लगडत (-थ-) गड स्त्री०** १ सामग्री पुरेशी नसतांना किं० फुरसत नसल्यामुळें कसेंबसें केलेलें कांहीं काम किं० तें काम करण्यांत केलेली लगबग किं० घाई; उ० पाऊसकाळ जवळ येऊन ठेपला होता म्हणून लगडतगड करून एकदाचें घर बांधून मी मोकळा झालों. २ कांहीं कामासाठीं योजलेल्या नाना प्रकारच्या युक्त्या,लटपटी, इ०. **क्रि० वि०** कसेंबसें; घाईघाईनें; फारशी काळजी न घेतां ( कांहीं काम करणें ).

**लंगडा** [ **सं०** लंग=लंगडणें; **फा०** लंग्=लंगडा ] **वि०** १ पायानें अधू किं० व्यंग (माणूस, पशु ). २ कोणत्याही कारणानें व्यंग किं० सदोष असें ( कोणतेंही गात्र ). ३ कांहीं साधनसामग्री कमी असल्याकारणानें अर्धवट स्थितींत राहिलेलें ( काम ). ४ एक पाय मोडलेला असल्यामुळें उपयोगांत न आणतां येण्याजोगा ( पलंग,तिवई, खुर्ची, इ० ). ॐ **लंगडशाई, लंगडशाही स्त्री०** १ लंगडत चालणें. २ मुलांचा एक खेळ. यांत एका पायावरच चालावयाचें असतें. ४ लंगडा मनुष्य. **लंगडुद्दीन, लंगडदीन पु०** लंगडा माणूस ( थट्टेंत ).

**लंगणं** वर 'लंगडणें' पहा.

**लंगणें** [ **सं०** लंघ्=अन्न न खाणें ] **अ० क्रि०** आजार, उपोषण, कष्ट, चिंता, इ० कारणामुळें ( कोणेकानें ) अशक्त होणें.

**लगत** [ म० लागणें ] **क्रि० वि०,श०यो०अ०** १ शेजारी; सांनिध्यास; जवळ; चिकटून; उ० पाषाण गांवाजवळ ( किं० गांवाच्या लगत ) नदी आहे. २ शेजारास; शेजारी; पाठोपाठ; एका मागून एक अशा क्रमानें; एकाला एक लागून; उ० एथून लगत तीन शेतें आमचीं आहेत; उ० गोपाळरावांना लगत तीन पत्रें पाठविलीं तेव्हां ते आले. **स्त्री०** १ सांनिध्य; शेजार; उ० ह्या गांवाला नदीची लगत आहे म्हणून येथें थंडी फार आहे. २ नात्यामुळें किं० मैत्रीमुळें जो जवळपणा किं० घरोबा किं० प्रेमभाव उत्पन्न झालेला असतो तो. ३ संगत; सहवास; उ० हा सरकारचा हेर आहे; याच्याशी फारशी लगत ठेवणें धोक्याचें आहे. ⊛ **लगत मजकूर पु०** मध्यें खंड न पडतां म्हणजे मुख्य पत्राला जोडून जो ज्यादा मजकूर लिहिलेला असतो तो. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' तुटक मजकूर. ' **लगत लाखोटा पु०** १ हुंडीपत्र इ० चा मजकूर आंत लिहून त्याच हुंडापत्र इ० स चिकटवून पाठावतात जो त्या कागदाचा लखोटा तो. २ पत्र ज्या कागदावर लिहिलेलें आहे त्याचाच कांहीं भाग वळवून आंतील मजकूर बाहेरून न दिसेल अशा प्रकारें त्या कागदाचा केलेला लखोटा. **लगत हुंडी स्त्री०** हुंडीच्या कागदालाच चिकटविलेलें हुंडीच्या सोबतचें पत्र.

**लगता** [म० लागणें] **पु०** १ देश किं० पदार्थ यांचें एकमेकांस चिकटून असणें; शेजार. २ एका देशास किं० गांवास चिकटून असलेला दुसरा देश किं० गांव ⊛ **लगता जाब पु०** लगतलखोटा किं० त्याच लाखोट्यांत त्याच हुंडीसंबंधी लिहिलेला जाब. **लगता लाखोटा पु०** वर ' लगत ' मध्यें ' लगत लाखोटा ' पहा. **लगता लोळ पु०** १ नेसलेलें धोतर, लुगडें, अंगांत घातलेला डगला, इ० चा जमीन झाडणारा घोळ (लावणें, लागणें). २ लांबच लांब शेत, किं० शेतांची रांग, कुंपण, वई, झाडांची पंक्ति, इ०. ३ कोणकाचे आश्रित, नोकर, इ० चा परिवार किं० घोळका. **लगताळ स्त्री०, पु०** लटांबर; माळका; घोळका ( लागणें, लावणें ). **लगताळा (-ळ्या) वि०** १ तगादा करीत बसणारा उपद्रवी ( माणूस ). २ चालतांना ज्याचें धोतर, अंगरखा, इ० जमीन झाडीत असतें असा ( माणूस ).

**लगती** [ म० लगत ] **वि०** दोन कुटुंबांत लग्नाचा संबंध झाल्यानें इकडचा कोणी माणूस तिकडच्या कोणा माणसाचा संबंधी किं० आप्त होतो तो.

**लगदन न०** मांस, पिठाचा गोळा, इ० तून हातांनीं किं० तोंडानें किं० सांडशीनें तोडून काढलेला गोळा ( घेणें, तोडणें, काढणें ).

**लगदा पु०** १ चुना, पीठ, चिखल, इ० चा गोळा. २ चिकट झालेल्या भाताचा किं० गूळ इ० चा गोळा. ३ सोनें, चांदी, इ० च्या मणि इ० च्या पोटांत घालतात ती किं० घातलेली लाख. ४ बांगड्यांवर चढवितात तें लाखेचें लुकण किं० अशा लुकणाची बांगडी. ५ कागद, केश, सुतें, इ० ची गुंतागुंत किं० अव्यवस्था.

**लगधग स्त्री०** लगबग; घाई(काम करण्यांत). ⊛ **लगधग्या वि०** कांहीं काम करण्यांत चटपटींत किं० चपळ किं० तल्लख; काम लवकर करून संपविणारा.

**लगन** ' लग्न ' चा अपभ्रंश. पुढें ' लग्न ' पहा.

**लगपूज** मागें ' लग ' ' लंग ' पहा.

**लगफग क्रि० वि०** फडफड असा आवाज करून ( निशाण, धोतर, लुगडें, अंगरखा, इ० वाऱ्यानें हालणें ).

**लगबग स्त्री०** १ घाई; त्वरा. २ काम करतांना धांदल किं० गोंधळ.

**लगबगां क्रि० वि०** घाईनें; त्वरेनें.

**लगबगून क्रि० वि०** घाईनें; त्वरेनें.

**लंगर** [ फा० ] **पु०** १ गलबताचा नांगर. २ लोखंडाचा सांखळदंड. ३ अवजड किं० अवाढव्य असा कोणताही पदार्थ ( गोठ, सरी, सांखळी, खांब, तुळई, इ० ). ४ चुना, पोहे, इ० कुटण्याचें साधन ( टेकूवर फिरणाऱ्या जाडी लाकडाच्या तुळईच्या रूपांतील ). ५ मोहोरम ह्या मुसलमानांच्या सणांत फकीरांना वाटतात तो शिधा इ०. ⊛ **लंगरखानी वि०** १ फारच मोठा ( परिवार, सरजाम, कारभार, इ० ). २ आडमुठ्या माणसांचा ( जमाव ). **लंगरदोर पु०** नाडी दोर. **लंगरहाडाचा वि०** मजबूत बांध्याचा

किं० हाडापेरांचा ( माणूस, पशु, इ० ). **लंगरी काम न० ( लक्षणेनें )** मजबूत हाडापेरांचा माणूस किं० पशु

**लगर स्त्री०** मोतीं, फुलें, मणि, इ० चा सर किं० माळ. **वि०** आडदांड, आडमुठा ( मनुष्य ).

**लगलग क्रि वि०** घाईघाईनें; जल्दीनें; झपाट्यानें.

**लगाविणें** पुढें ' लगाविणे ' पहा.

**लगा [ म० लागणे ] पु० १** टेका; आश्रय; आधार. २ संबंध ( नातें, एक गांव, एक संस्था, इ० मुळें असलेला ). ३ वशीला. ४ लाग. पुढें ' लाग ' पहा. ॐ **लगाबांधा पु० १** कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेला संबंध. २ आश्रय; टेका; पाठिंबा; वशिला. ३ दैव; नशीब; पूर्व जन्मींच्या कृत कर्मांचा परिणाम,-जो ह्या जन्मीं भोगास येतो; उ० लगाबांधा असतो तशतशा गोष्टी घडतात.

**लगाम [ फा० लिगाम् ] पु०, स्त्री० १** घोड्याला ताब्यांत ठेवण्यासाठीं त्याच्या तोंडाच्या खालच्या आणि वरच्या जबड्यांच्या मध्यें घालावयाची सळई किं० कडी. २ ही कडी आणि तिला दोन बाजूंस लाविलेल्या वाद्या किं० दोऱ्या. ३ **( लाक्षणिक )** आटोका; नियंत्रणा; ताबा; उ० मी कोणाच्या लगामीं राहणारा मनुष्य नाहीं. ॐ **लगामी वि०** अधीन; परतंत्र.

**लगाव [ हिं० ] पु०** बंदूक, तोफ, गोफण, इ० चा मारा कोणेक पदार्थावर करण्याची सोय किं० शक्यता; नेम; उ० ह्या तोफेचा लगाव त्या बुरजावर आहे.

**लगावणें,लगाविणें [ म० ' लागणें ' चें एक प्रकारचें प्रयोजक ] स० क्रि०** ( काठी, चपराक, तडाखा, इ० ) कोणेकाला मारणें. ॐ **शिव्या लगावणें** शिव्यांचा कोणेकावर भडीमार करणें.

**लगी [ हिं० ] स्त्री० १** बड्या माणसाच्या पुढें जरीच्या फडक्यांचीं निशाणें चालवितात ती प्रत्येक. २ घर इ० च्या बांधणींत रांगेंत उभे केलेल्या खांबांच्या रांगेच्या माथ्यावर बसविलेलें लाकूड. मागें ' लग ' पहा.

**लगीन [ म० लग्न ] न०** लग्न, विवाह ( अशिक्षितांत रूढि ). पुढें ' लग्न ' पहा.

**लंगूट** पुढें ' लंगोटी ' पहा.

**लगुंडा** पुढें ' लगोंडा ' पहा.

**लगे [ म० लागणें ] उ० वा० अ०** भले खाशी ! शाबास ! ( उत्तेजनार्थ योजावयाचा शब्द ). ॐ **लगेढोल [ हिं०** ढोलक्याला काठी लागतांच **] क्रि० वि०** त्वरेनें; घाईनें; एका दमांत; उत्साहानें; चपळतेनें. **स्त्री०** त्वरा; घाई; लगबग. **टीप,**-कोल्हाट्या उड्या मारणाऱ्या किं० कवाइतीचीं कामें करणाऱ्या पोरांना उत्तेजन देण्यासाठीं तमासगीर ' लगेढोल ' हा शब्द अनेक वेळां जल्दीनें उच्चारून आपलें ढोलकें वडवीत असतो, यावरून वरीलप्रमाणें वाक्प्रचार उत्पन्न झाले आहेत. **लगेतगेकरून क्रि० वि०** घाईघाईनें; लगबगीनें. **लगेघूम क्रि० वि०** लगबगीनें; घाईनें; सर्व शक्ति वेचून. **लगेलगे स्त्री०** घाई; त्वरा. **क्रि० वि०** घाईनें; जल्दीनें; लगबगीनें. **लगे हात क्रि० वि० १** त्याच दमांत; त्याच कामाबरोबर; उ० तुम्ही बाजारांत जातांच आहां, तसेच लगे हात पुढें चार पावलें जाऊन वंडोपतांना मला भेटून जाण्यास सांगा. २ ताबडतोब; विलंब न होऊं देतां; उ० तो चोर गांठोडें घेऊन पळून जात होता तोच कोतवालाच्या शिपायानें त्याला लगे हात पकडलें.

**लंगोट, लंगोटा पु०** तालमीचीं कामें करतांना किं० कुस्त्या खेळतांना जें आकारविशेषाचें शिवलेलें फडकें गुह्येंद्रियें झाकण्यासाठीं मल्ल कमरेशीं बांधतात तें. **लंगोटी स्त्री० १** मुंज झालेला मुलगा गुह्येंद्रियें झाकण्यासाठीं करगोट्याशीं नेसतो तो फडक्याचा तुकडा. २ लांबलचक फडकें, शेत, घर, इ०. ॐ **लंगोटपेच पु०** कुस्तींतील एक पेच. **लंगोटबंद पु०** नुसती लंगोटी नेसणारा कुळवाडी, कामकरी, इ०. २ स्त्रीसंग ज्याणें वर्ज केला आहे असा पुरुष. **लंगोटीयार पु०** लंगोटी नेसण्याच्या वयापासूनचा मित्र किं० सोबती; बालमित्र.

**लगोंडा पु० १** केश, पानें, इ० एकाला एक चिकटून किं० गुंतून होतो तो गोळा. २ गूळ, चिखल, डांक, रक्त, पीठ, इ० चा गोळा.

**लगोरी स्त्री० १** लाकूड, दगड, इ० चे वाटोळे लहान लहान तुकडे ज्यांची उतरंड करून मुले खेळतात ते प्रत्येक. २ वस्त्रालाच चिकटलेली

वस्त्राची लोंबती चिंधी. **लगोऱ्या स्त्री० अ० व०** अर्थ १ मधील खेळ ( खेळणें ).

**लगोलग, लगोलाग** [ म०लागणें+लागणें ] **क्रि० वि०** ताबडतोब; विलंब न होऊं देतां; पाठोपाठ.

**लग्न [सं०] वि०** १ चिकटलेलें. २ आडकलेलें. ३ गुंतलेलें. ४ तल्लीन; तत्पर. ५ आसक्त; अनुरक्त; **न० १ (ज्योतिष)** राशीचा उदय. **२ (ज्योतिष)** राशीच्या उदयावरून ठरविलेला काळ. ३ **( ज्योतिष )** क्रान्तिवृत्त आणि क्षितिज यांचा छेदबिन्दु. ४ ( **मराठांत** ) विवाह ( लागणें, होणें, मोडणें, ठरणें, इ० ). **टीप**,–' लग्न ' बद्दल अशिक्षित लोक ' लगन, ' ' लगीन ' म्हणतात. ॐ **लग्नाची बायको स्त्री०** धर्माच्या विधीनें जी कोणेकाची पत्नी झाली ती. याच्या व्यावर्तकत्वें ' रांड, ' ' रखेली, ' इ०. **लग्नाचा नवरा पु०** धर्माच्या विधीनें जो कोण्या स्त्रीचा पति झाला तो. याच्या व्यावर्तकत्वें ' जार ' इ०. **लग्न नाहणें** लग्नाच्या समारंभांत विधिपूर्वक किं० सोहळ्याचें स्नान करणें. **लग्नकुंडली स्त्री०** विवाक्षित काळच्या लग्नाचा अंक पहिल्या कोष्टकांत मांडून तदनुरोधानें इतर राशींचे अंक जीत मांडलेले असतात अशी राशिचक्राची कुंडली; माणसाच्या जन्माच्या दिवशीं सूर्योदयापासून जन्मसमयापर्यंत जितक्या घटका झाल्या असतील त्यांच्या हिशेबानें जी राशि पूर्वेकडे उदय पावली असेल ती कोष्टकांत प्रथम स्थानीं मांडून पुढें बारा स्थानांत राशि आणि त्या त्या राशींचे ग्रह तेथें लिहून करतात तें कोष्टक. **लग्नगोष्टी स्त्री० अ० व०** १ कोणा मुलाचें किं० मुलीचें लग्न जुळविणें चाललेलें असतां त्या लग्नाला अनुकूलच अशा ज्या गोष्टी कोणी बोलतो त्या. **टीप**,–कोणाचें लग्न जुळत असतां सत्य अशा देखील गोष्टी बोलल्यानें जर हें लग्न मोडण्याचा संभव असला तर त्या बोलूं नयेत, अनुकूल असतील त्याच गोष्टी बोलाव्यात, अशी सर्वांचीच इच्छा असते. २ कोणाचें कल्याण होण्याचा समय प्राप्त झाला असतां त्याला प्रतिकूल गोष्टी न बोलतां अनुकूल तेवढ्याच ज्या कोणी गोष्टी बोलतो त्या. ३ खोट्या प्रेमाच्या गोष्टी. **लग्नघटका स्त्री०** १ लग्नाचा समय,–जोशानें काढलेला. २ हा समय मोजण्यासाठीं पाण्यांत तरंगत सोडतात तें सच्छिद्र पात्र. ३ कोणत्यांही कामांतलि ऐन महत्त्वाचा किं० आणीबाणीचा समय,–ज्या समयीं कांहीं चूक होणें अत्यन्त अनिष्ट असतें. **लग्नचुडा स्त्री०** लग्नाच्या विधींत नवऱ्यामुलीला भरतात त्या नव्या बांगड्या. **लग्नटका, लग्नटक्का पु०** लग्नावर सरकारचा कर. **लग्नचिटी स्त्री०** लग्नाचें आमंत्रण करावयाचें पत्र. **लग्नटाप स्त्री०** लग्नाला योग्य अशा मुहूर्तांची यादी. **लग्नतीथ, लग्नतिथि स्त्री०** लग्नाला योग्य जी तिथि ती. **लग्नथर पु०, न०** लग्नासाठीं विकत घेतलेलें कापडचोपड. **लग्ननक्षत्र न०** लग्नाला योग्य जें दिवसनक्षत्र तें. **लग्नपत्रिका स्त्री०** लग्नाचा मुहूर्त ज्या कागदावर लिहून ठेविलेला असतो आणि ज्याची विवाहाच्या वेळीं पूजा करतात तो कागद. **लग्नमंडप पु०** लग्नाच्या सोहाळ्यासाठीं घातलेला मांडव. **लग्नमास पु०** लग्नाच्या विधीला विहित जे मार्गशीर्षादि महिने ते प्रत्येक. **लग्नमुहूर्त पु०** १ लग्नाला योग्य जो मुहूर्त तो. २ लग्न, मुंज, इ० शुभ कार्य. **लग्नशिष्टाई स्त्री०** लग्न जुळवून आणण्याचे कामीं जी खटपट, मध्यस्थी, किं० बोलणें कोणी मनुष्य करतो ती. **लग्नशुद्धि स्त्री०** कोणतेंही कार्य करावयाला ग्रहादींची जी अनुकूलता असावी लागते ती. **लग्नसराई स्त्री०** लग्नें करावयाला मार्गशीर्षापासून ज्येष्ठापर्यंत जो अवधि तो. **लग्नसाडा पु०** लग्नाचे वेळीं वधूपक्षाकडून वराच्या आईस देण्यांत येतें तें लुगडें. कित्येक प्रान्तांत वराकडून वधूस देण्यांत येतें त्या लुगड्यासहीं ' लग्नसाडा ' म्हणतात. **लग्नसोहळा पु०** लग्नाचा विधि, त्या विधीसंबंधाच्या मेजवान्या, उत्सव, इ० समुच्चयानें. **लग्नाऊ वि०** लग्नाच्या प्रसंगीं देणें, घेणें, नेसणें, पांघरणें, इ० ला योग्य असें ( लुगडें, खण, शालजोडी, इ० वस्त्र. ) **लग्नाक्षता स्त्री० अ० व०** लग्न लागतेसमयीं वधू आणि वर एकमेकांवर टाकतात त्या अक्षता,–कुंकुममिश्रित तांदूळ. **लगिन्या बैल [ म० लगीन, लग्न + बैल ] पु०** उत्सर्ग करून मोकळा सोडलेला बैल.

**लग्नक** [सं० ] पु० जामीन राहिलेला माणूस.

**लग्न्या** पु० जुगारांतील एक पारिभाषिक शब्द.

**लंघणें** [सं० लंघ] अ० क्रि० आजार, उपवास, चिंता, इ० मुळें थकणें किं० रोडावणें किं० अशक्त होणें. स० क्रि० १ ( नियम, आज्ञा, सरणी, इ० ) मोडून विरुद्ध आचरण करणें. २ ( दिवस, काळ, इ० ) घालविणें किं० अतिक्रान्त करणें. ॐ लंघले लांपले पु० अ० व० दमलेले आणि भागलेले लोक; आजारी लोक; म्हातारे कोतारे लोक.

**लंघन** [ सं० ] न० १ उडी मारणें. २ उडणें ( पक्ष्यानें ). ३ ( समुद्र, नदी, मर्यादा ) ओलांडणें. ४ ( आज्ञा ) मोडणें. ५ उपेक्षा; अनादर; तिरस्कार. ६ उपोषण; मुळींच कांहीं न खाणे. ७ ( स्त्रीवर ) बलात्कार.

**लघळ, लघाळ** वि० १ आपला दर्जा किं० पाहिरी मनांत न आणतां मोठ्या माणसाशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणारा असभ्य (माणूस). २ पुन्हा पुन्हा तिरस्कार केला तरी निलज्जपणानें बोलावयाला येतो तो; कोडगा. ३ अर्थहीन किं० फाजीलपणें आणि पुष्कळ बोलणारा. वरील तीन्ही प्रकारच्या गुणाच्या स्त्रीस 'लघळ भवानी,' 'लघाळ बाई,' 'लघाळ मावशी,' असे शब्द आहेत. ॐ लघाळकी स्त्री० वाचळपणा; बडबड.

**लघाळ** स्त्री० १ चिरगुटें, माणसे, मुंग्या, इ० ची रांग वि० पंक्ति किं० ओळ ( लागणें, लावणें ). २ भाषणांतील मुद्दे, विधाने, इ० ची परंपरा ( विशेषतः टाळाटाळीच्या प्रसंगाची ). ३ लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत.

**लघिमा** [सं० लघिमन्] पु० १ वजनांत हलकेपणा. २ मनाचा कोतेपणा; अनुदार स्वभाव. ३ अष्टसिद्धींपैकीं तिसरी,–हावें तितकें हलकें होण्याचें सामर्थ्य. मागें 'अणिमा' मध्यें ह्या अष्ट सिद्धि पहा.

**लघिष्ट** [ सं० ] वि० अत्यन्त हलका.

**लघु** [ सं० ] वि० १ ( वजनानें ) हलका. २ ( संख्येनें किं० परिमाणानें किं० योग्यतेनें ) कमी; थोडें; अल्प. ३ संक्षिप्त; उ० लघुव्याकरण; लघुकौमुदी. ४ अधम; नीच; क्षुद्रक. ५ जलद; वेगवान्; चपळ. ६ ( आकारानें ) लहान. ७ सहज पचणारा ( आहार ). ८ रमणीय; सुंदर; उ० लघुदर्शन. ९ ऱ्हस्व ( स्वर ). ॐ लघुकोन पु० काटकोनाहून म्ह० नव्वद अंशाहून लहान किं० कमी कोन. लघुशंका स्त्री० मुत्रविसर्जन; मुतणें. लघवी, लघवी स्त्री० मुतणें. लघुलेखन न० वक्त्याच्या मुखांतून निघालेलीं वाक्यें भाषणाच्याच वेगानें कांहीं विशिष्ट चिन्हांनीं लिहून घेणें. अशा लेखकांस 'लघुलेखक' म्हणतात. लघुत्व न० कमीपणा; हलकेपणा. लघुभोजन न० थोडासा फराळ. लघुमूत्र न० आपोआप लघवी गळणें हा विकार.

**लचक** [ हिं० ] स्त्री० पाय, कंबर, इ० तील शीर स्थानापासून चळल्यामुळें होते जी विकृति ती ( भरणें ).

**लचकणें** [ हिं० लचकना ] अ० क्रि० १ एकाद्या गात्राच्या शिरा स्थानापासून चळून ( तें गात्र ) नेहेमींसारखें चलनवलन करण्यास असमर्थ होणें. २ एकदम उसळून उठणें.

**लचका** पु० १ मांस, पीठ, चिखल, इ० चा बोटांनीं किं० दांतांनीं किं० सांडशीनें तोडून काढलेला गोळा. २ आवड; नाद; छंद ( लागणें ). ३ एकदम बसलेला ताण किं० धक्का ( बसणें ).

**लचकुटा, लतकुटा** [ म० लाथ+कुटणें ] निलज्ज, लोचट; कोडगा.

**लचेंड, लचांड** न०, **लचेंडी, लचांडी** स्त्री० भानगड; पेच; शुष्ककाष्ठ; आपणाला न टाळतां येण्याजोगें आपल्या पाठीस लागलेलें अप्रिय असें कांहीं काम, कोणी माणूस, किं० कांहीं जबाबदारी. ॐ लचांडखोर, लचेंडखोर लचेंडी, लचांडी वि० १ भलभलत्या भानगडी उपस्थित करण्याच्या स्वभावाचा. २ लुच्चा; भामटा.

**लचणें** अ० क्रि० १ खचणें; दबणें. २ हार जाणें. ॐ लचला लवंगला वि० १ दमला भागलेला; फार काम, कष्ट, जबाबदारी, आजार, इ० कारणांमुळें जो जर्जर किं० पीडित झाला आहे असा. २ व्यापार, सावकारी, धंदा, इ० पुढें चालू ठेवण्याला असमर्थ झालेला.

**लचाड, लचाळ** वि० १ वटवट करण्याच्या स्वभावाचा. २ इकडच्या गोष्टी तिकडे सांगणारा; चहाडखोर.

**लजत, लज्जत** [ **अ०** लझ्झत् ] **स्त्री०** १ रुचि; गोडी; आस्वाद. २ एकाद्या गोष्टीचा लागलेला नाद; चटक. ३ खुमारी; मर्म; खुबी. ४एका जातीचा रंग, रुचि, स्वर, भाषा, देखावा, इ० मध्यें दुसऱ्या जातीचा रंग, रुचि, स्वर, भाषा, देखावा, इ० ची जी अंधुक प्रतीति होते ती किं० अनुभव येतो तो (मारणें); उ०त्याच्या बोलण्यांत कानडी स्वराची लजत मारते. ॐ **लजतदार, लज्जतदार** वि० रुचकर; स्वादिष्ट.

**लजिती फजिती** [ **म०** फजिती ] **स्त्री०** बोऱ्या; फजितवाडा; दुर्वेडी ( उडणें,उडविणें ).

**लज्जा** [ **सं०** ] **स्त्री०** १ लाज; शरम. २ विनय; मर्यादशीलपणा. ॐ **लज्जावह, लज्जाकर** वि० लाजिरवाणी ( कांहीं गोष्ट ). **लज्जायमान** वि० लाजलेले;शरमलेला; लज्जित. **लज्जालु पु०, स्त्री०** लाजाळू नावाची वनस्पति,–स्पर्श झाल्याबरोबर हिचीं पानें मिटतात. **लज्जाहोम पु०**' लाजाहोम' चें अशुद्ध रूप–विवाहांत होमांत लाह्यांची आहुति देण्याचा विधि.

**लट स्त्री०** केश, सूत, इ० चा गुंतागुंत. **पु०** काठी; सोटा.

**लटक** [ **हिं०** ] **स्त्री०** १ गाणें, बोलणें, चालणें, इ० मध्यें जी कोणेकाची तऱ्हा ती. २ कांहीं खोडी किं० व्यसन किं० दुर्वर्तनाचा कोणेकाचा प्रकार. **पु०** खोडसाळ किं० दुष्ट मनुष्य.

**लटकणें** [ **हिं०** लटक्ना ] **अ० क्रि०** १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या आधारानें लोंबत राहाणें. २ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं संबद्ध होणें किं० जुडून राहाणें. ॐ **लटकत चालणें** नखऱ्यानें ठमकत चालणें.

**लटकविणें, लटकाविणें**[**म०**'लटकणें'चें प्रयोजक ] **स० क्रि०** १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या आधारावर लोंबत सोडणें. २ चिकटावणें; जोडणें; संबद्धकरणें.

**लटका, लटिका, लटिक वि०** १ खोटा; असत्य; सत्याचा ज्याला आधार नाहीं असा (आरोप, विधान ). २ लबाडीचा, अप्रामाणिक (माप, वजन, तराजू ). ३ निष्फळ, व्यर्थ (दगदग, हेलपाटा ). ४ विनाकारण; उगीच्या उगीच,उ० मी अपराध केला नसतां मला लटक्या शिक्षा कां देतां ? . ५ संवेदना ज्यांत नाहीं असें ( गात्र ); बधिर. ६ हालचाल करावयाला असमर्थ (पावलें, बोटें, हात, इ०).ॐ **लटीकवाद पु०**१खोटेपणा किं० खोटेपणा केल्याचा आरोप.२ अमुक गोष्ट करतों असें वचन देऊन ती न करण्याचें पाप.**लटका ताठा पु०** पोकळ बढाई; उ०नाकांत नाहीं कांटा ( म्ह०नथ,मुरकें, इ० )आणि लटका ताठा **लटकाफटका, लटकालांडा वि०** खोटा; लबाडीचा; अप्रामाणिकपणाचा. **लटकुरा, लटकोरा वि०** लबाडीचा; लुच्चेगिरीचा.

**लटकाविणें** [ **म०** ' लटकणें ' चें प्रयोजक ] **स० क्रि०** १ ( काहीं पदार्थ ) कांहीं आधारावरून लोंबत सोडणें; ( एक पदार्थ ) दुसऱ्या पदार्थाशीं जोडणे किं० संबद्ध करणें. २ ( दागिना, वस्त्र, इ० ) ऐटीनें धारण करणें. ३ ( दुसऱ्याच्या मालकीचा पदार्थ ) खाकोटीस मारून किं० खिशांत घालून पळवून नेणें.

**लटपट स्त्री०** १ बोलाचाली; भांडण; तंटा. २घाबरेपणाची स्थिति; गोंधळणूक; घाबरगुंडी.३ आधार किं० सांधा मोडल्यामुळें पदार्थाची होते ती दुर्दशा किं०खिळखिळीतपणाची अवस्था. ४ तळखपणाची हालचाल. ५ युक्ति; हिकमत. कावा; उ० हा मक्ता मिळविण्यासाठीं मीं काय काय लटपटी केल्या त्या माझ्या मलाच ठाऊक. ॐ **लटपटपंची स्त्री०** १ बढाई; उर्मटपणाचें किं० बाष्कळ भाषण ( करणें ). २ घाबरगुंडी (उडणें). ३ पोपटाला शिकवितात त्या वाक्याचा हा पहिला शब्द आहे ह्या वरून तें वाक्य. तें वाक्य असें,–लटपटपंजी, चतुरिकि जान, पढो पार्वती श्री भगवान्.

**लटपटणें** [**म०** लटपट] **अ० क्रि०** १ आधार, आश्रय, किं० सांधा कमजोर झाल्यामुळें किं० ढासळल्यामुळें किं० मोडल्यामुळें ( खांब, खुंटी, इ० ) हालूं लागणें. २ ( काम, बेत, कारभार, युक्ति, वक्तृत्व, व्यूह, इ० ) निष्फळ किं० व्यर्थ होणें. ३ ढासळणें; कोसळून पडणें; स्थानभ्रष्ट होणें. ४दुसऱ्याची वरचढ शक्ति,विद्वत्ता,वक्तृत्व, मुत्सुद्देगिरी, इ० मुळें कोणेकानें दबणें, लज्जित

होणें, किं० निरुत्साह होणें; उ० मी मी म्हणणारे पुणेंकर शास्त्री काशीकर शास्त्र्यापुढें लटपटले.

**लटपटीत** [ म० लटपटणें ] **वि०** १ खिळखिळा किं० पक्का न बसलेला ( खिळा, खुंटी, इ० ). २ अनिश्चित; संदिग्ध.३ अशक्त, कमजोर ( मुद्दे, प्रमाणें ). ४ अझून पक्का न ठरलेला(बेत, योजना ). ५ हंगामी; कायमचा नव्हे असा.

**लटंबर, लटांबर न०** १ पुष्कळ माणसें, गाड्या, घोडे, इ० चा समुदाय जो कोणा बड्या माणसाच्या स्वारींत किं० प्रवासांत किं० कोठें जाण्यायेण्याच्या प्रसंगीं असतो तो. २ ज्यांचीं आपणास अडगळ वाटते अशा पदार्थ माणसें, इ० चा आपणाबरोबरचा पसारा. ३ नेसलेलें धोतर, लुगडें, अंगांत घातलेला अंगरखा, इ०चा घोळ,–ज्यापासून आपल्याला उपद्रव होतो तो. ४ परिवार; लवाजमा.

**लटरफटर न०** किरकोळ सामानसुमान,पदार्थ, इ० समुच्चयानें.

**लटलटणें अ० क्रि०** १ हालणें; हादरणें. २ वाऱ्यावर (वस्त्र इ०) फडफडणें.३ (पदार्थाचे भाग) नीट बसविलेले किं० सांधलेले नसल्याकारणानें ते हालत असणें. ४ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुडणें. ५ ( मोती, हिरा, इ० ) चकचकणें. ६ ( चेहेरा, अंगकान्ति, इ० ) तेजस्वी दिसणें किं० उठून दिसणें.

**लटांबर (–ळ )** वर ' लटंबर ' पहा.

**लटारणा वि०** विरूप किं० विशोभित दिसण्याइतका मोठा ( पदार्थ, माणूस, पशु ); अगडबंब.

**लटिका, लटीका** वर ' लटका ' पहा.

**लटिंगा पु०** सुमारें दोन आडीच हात लांब, जाडी, आणि वाटोळा असा सोटा.

**लटुपटू, लटुफटु, लटुबटु इ०** पुढें ' लुटपुटु ' इ० पहा.

**लटोरा वि०** लठ्ठ, जाडा,(मनुष्य,पशु,पदार्थ). **पु०** १ खूप जाडी काठी; सोटा, सोडगा. २ लाकडाचा जाडी तुकडा किं० खंड. ३ एक प्रकारचा जोंधळा. ॐ **लटोरें पडवळ न०** पडवळाची एक जात.

**लठुंगा, लठ्ठुंगा वि०** लठ्ठ, जाडी, आणि मजबूत ( माणूस, पशु, पदार्थ).

**लठ्ठ** [ **हिं०** लठाह् ] **पु०** १ सोटा; जाडी काठी. २ सर्पणाचें जाडी लाकूड. **वि०** विशोभित दिसण्याइतका जाडी ( माणूस, पशु, पदार्थ, दागिना, इ० ). **टीप,–लठ्ठा, लठ्ठ, लठ्ठ्या** हे वरील तन्ही अर्थांचेच शब्द आहेत.ॐ**लठ्ठनिरंजन पु०** खूप मोठ्या अंगाचा पण अशिक्षित असा पुरुष.**लठ्ठभारती,लठ्ठंभारती वि०**१ विरूप दिसण्याइतका मोठा (माणूस,पशु,पदार्थ).२अंगानें लठ्ठ पण कुचकामाचा माणूस. **लठ्ठाई स्त्री०** दांडगाई. **लठ्ठामिश्र, लठ्ठाश्रम, लठ्ठेश्वर, लठ्ठबगाळ्या वि०** शरीरानें लठ्ठ पण निरक्षर आणि असभ्य माणूस. **लठ्ठालठ्ठी स्त्री०** मारामारी.

**लठ्ठुंगा** वर ' लठुंगा ' पहा.

**लड स्त्री०** १ पानांचा भारा. २ मोती, फुलें, इ०चा सर. ३ रेशीम, लोकर, सूत, कलाबतू,इ० ची गुंडाळी.

**लंड** [ **फा०** लन्द्=पुरुषाचें शिश्न ] **पु०** १ पुरुषाचें शिश्न. २ लुच्चा किं० लबाड किं० कावेबाज माणूस; ठक. ३ द्वाड किं० उपद्रवी माणूस किं० पोर.

**लंड वि०** लांडा; तोकडा. २ बोथट. ॐ **लंडपुच्छ वि०** ज्याची शेपूट तुटली आहे किं० तोडली आहे असा ( कुत्रा, गाय, बैल, इ० ). **पु०** मुलांच्या टोळीचा नायक किं० म्होरक्या ( उपहासांत ). **लंडभारती पु०** १ सर्वदा नग्न असतो तो गोसावी. २ सर्वदा नागवा असा मुलगा. ३नुसती लंगोटी घातलेला धिप्पाड कुणबी.

**लडथड** [म०लडणें] **स्त्री०** १ भानगड; गुंतागुंत. २ भानगडीचा किं० गुंतागुंतीचा व्यवहार. ३घोटाळा. ४ निकालास न लागलेली बाबत. ॐ **लडथड्या वि०** १ भानगडी उपस्थित करणारा ( माणूस ). २ भांडखोर. ३ व्यवहार, धंदा, इ० मध्यें पैशासाठीं नानाप्रकारच्या युक्त्या किं० कावे करणारा.

**लडदू, लडधू वि०** लठ्ठ,जाडी,आणि भक्कम.

**लडबड, लडफड स्त्री०** १पदार्थांच्या वेगळ्या वेगळ्या भागांचे सांधे कमजोर झाल्यामुळें । निखळल्यामुळें त्या भागांचा होतो जो शि

ल्पणा किं० निमकळीतपणा तो. २ कपड्याच्या घेराचें किं० उपरणें, लुगडें, धोतर, इ० च्या सोग्यांचें वाऱ्यावर हालणें. ३ धांदल, गोंधळ. ४ गुंतागुंत; अव्यवस्थितपणा. ५ कोणेकानें दुसऱ्याच्या कामांत अगांतुकीनें शिरणें. **क्रि० वि०** अव्यवस्थितपणें; हेलकावे खाऊन. ❀ **लडबड-लाळ्या वि०** दांडगेश्वर आणि उर्मट.

**लडवडणें, लुडबुडणें अ० क्रि०** १ दुसऱ्यानें आपणास बोलावलेलें नसतां त्याच्या कामांत पडणें. २ हेलकावे खाणें.

**लडा पु०** बोकड; एडका.

**लंडा [ म० लंड ] वि०** १ लुच्चा. २ उद्धट; उर्मट. ❀ **लंडाई पु०** १ लुच्चेगिरी. २ उद्धटपणा.

**लडिवाळ [ म० लाड ] पु०** १ कोणी कोणेकावर करतों तें प्रेम किं०ती ममता.२लाड. **वि०** १ आवडता; प्रिय. २ प्रेमाचें ( भाषण ).

**लडी स्त्री०** १ बकरी. २ मोतीं, फुलें, इ० चा सर.

**लंडी स्त्री०** १ भित्रा; पुचाट; नामर्द. २ खोटेंपणाचें खेळणें.

**लड्डु, लड्डुक[सं०]पु०** १ लाडू(एक पक्वान्न).२ ( चिखल, शेण, इ० चा ) गोळा.

**लढ स्त्री०, पु०, लढी [ हिं० ]** मोतीं, फुलें, इ० चा सर. **स्त्री०** १ समुद्राच्या लाटांनीं कांठावर टाकलेला गाळ किं० केरकचरा. २ नदीच्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला केरकचरा. **लढ स्त्री०** गुंतागुंत.

**लढण [ हिं० लढ्ना ] अ० क्रि०** १ कोणेकाशीं झुंजणें किं० युद्ध किं० मारामारी करणें. २ कोणेकाशीं स्पर्धा करणें. ३ झाडांवर ( फुलें, फळें, कणसें, इ० ) एकमेकांना लगटून पुष्कळ प्रमाणांत आलेलीं असणें. ४ बरोबरीचा होणें किं० असणें किं० ठरणें; उ० हें पागोटें त्या पागोट्याशीं लढणार नाहीं. ❀ **एकाद्या वस्तूवर लढून पडणें** ती मिळविण्याचा उत्सुकतेनें प्रयत्न करणें; तिच्या नादीं लागणें.

**लढत [ म० लढणें ] स्त्री०** लढाई;मारमारी. २ चढाओढ.

**लढवई, लढवाई [ हिं० ] वि०** १ वीराला साजेसें. २ लढाईच्या कामीं उपयोगी पडणारें ( हत्यार, घोडा, गाडी इ० ).

**लढवय्या [ हिं० ] पु०** १ लढाईंत पटाईत माणूस; लढणारा शूर गडी.

**लढविणें [ म० ' लढणें ' चें प्रयोजक ] स० क्रि०** १ (एका माणसास) दुसऱ्याशीं लढावयास लावणें. २ ( दोन माणसांत ) कलह किं० भांडण चेतविणें. ३ (एक वस्तु) दुसऱ्या वस्तूशीं ताडून पाहणें; उ० हें लुगडें त्या लुगड्याशीं लढवून पाहिलें पण लढत नाहीं. ४(कांहीं युक्ति,योजना, हिकमत, इ० ) कांहीं कार्यार्थ योजणें किं० चालीवणें. ५ ( किल्ला, गांव, इ० ) शत्रूच्या हल्ल्यापासून राखण्याचा प्रयत्न करणें किं० शत्रूच्या ताब्यांत न जावें म्हणून खटपट करणें.

**लढा [ म० लढणें ] पु०** १ वाद; तंटा. २ वादाची किं० तंट्याची बाबद. ४ प्रतिबंध; हरकत; अडथळा. ५ गतीचा कुंठितपणा. ६ गति कुंठित करणारी कोणतीही गोष्ट ( लागणें ). ७ गुंतागुंत; घोटाळा. ८ गुंतागुंतीची स्थिति. ९ दारूगोळा इ० वाहून अन्यत्र न्यावयाचा खटारा.

**लढाई [ हिं०; म० लढणें ] स्त्री०** १ युद्धांतील एका समयाची झटापट. २ भांडण; तंटा. ३ वर्चस्व मिळविण्याच्या बाबतीत चढाओढ; स्पर्धा. ❀ **लढाई जिंकणें** वादांत, कुस्तींत, किं० भांडणांत यश मिळविणें; विजयी ठरणें. **लढाई मारणें** लढाईंत यश मिळविणें.

**लढाऊ [ म० लढणें ] वि०** लढण्याच्या कामीं उपयुक्त; लढण्यांत योजावयाचें.

**लढ्या [म०] पु०** समुद्राच्या लाटांनीं किं० वाहत्या पाण्याच्या प्रवाहानें कांठावर आलेला जो गाळ किं० केरकचरा तो किं० त्याचा ढीग.

**लत [ हिं० ] स्त्री०** १ कांहीं वाईट खोड किं० व्यसन. २ बट्टा; कलंक; कालिमा; उ० मी आपल्या वर्चस्वास लत लागूं देणारा मनुष्य नाहीं.

**लतकुटा, लतकुटार, लतकुठा, लतकोडगा, लतगाढव लतखोर, लतखोरा [ म०लाथ+कुटणें, कोडगा, गाढव ] वि०** निर्लज्ज; बेशरम.

**लतखोरा [म०लाथ,लात] पु०** दाराच्या दुहेरी चौकटींच्या रचनेंतील आंतल्या चौकटीचें खालचें म्ह० जमीनी सरपट असलेलें लाकूड.

**लता [ सं० ] स्त्री०** वेल; वेली. ❀ **लतागृह,**

न०, **लतामंडप** पु० ज्याच्या सर्व बाजूंवर वेली चढवून आच्छादित केला आहे असा मांडव.

**लताडणी, लताडणें** खालीं ' लथाडणी, ' ' लथाडणें ' पहा.

**लतावणें, लटावणें** [ हिं० लत्=खोड ] अ० क्रि० दुर्मार्गाला लागणें किं० लागलेलें असणें.

**लता** स्त्री०, **लत्ता** पु० [ म० लगता=शेजार ] शेजारचा प्रदेश.

**लतरबाळ्या** [ फा० लत्र् =फाटकें वस्त्र; चिंधी ] स्त्री० अ० व० १ अनेक जागीं फाटलेले लुगडें, धोतर, अंगरखा, इ०. २ चिंध्या; फाटके तुटके कपडे किं० वस्त्रें.

**लता** स्त्री० पायाच्या तळव्यानें केलेला प्रहार; लाथ.

**लत्ती** [फा० लत्र=फाटकें वस्त्र ] स्त्री० १ चिंधी. २ फाटून लोंबत असलेला वस्त्राचा भाग. ॐ **लत्या-बत्त्या** स्त्री० अ० व० पेहेरलेल्या किं० पेहेरावयाच्या वस्त्राच्या किं० कपड्याच्या लोंबत असलेल्या चिंध्या.

**लथडणी, लथाडणी, लाथाडणी** [ म० लात, लाथ ] स्त्री० १ लाथेनें मारणे. २ लाथ मारून उडवून देणें. ३ झिडकारणी. ४ नापसंत म्हणून अव्हेरणें.

**लथडणें, लथाडणें** [ हिं० लथड्ना ] अ० क्रि० (चिखल, शेण, गू, इ०नीं) अंग, वस्त्र, भांडें, इ० लडबडलेलें किं० बरबटलेलें किं० माखलेलें असणें.

**लथडणें, लथाडणें, लाथाडणें** [ म० लाथ ] स० क्रि० १ लाथेनें मारणें किं० लाथ मारून उडवून देणें. २ झिडकारणें; अव्हेरणें; नापसंत म्हणून दूर लोटणें किं० टाकून देणें. ३ ( काम, कारभार, मसलत, इ० चा) विचका किं० दुर्दशा करण.

**लदाव** [ हिं० ] पु० १ कमान रचावयाची असता घुमटाच्या आकाराचा जो पोकळ भाग असतो त्यावर विटा, दगड, इ० रचतां याव्यात म्हणून जी लाकडाची तात्पुरती कमान मांडतात ती. २ भिंत इ० तील कमानीखालीं पोकळ जागा न राखतां जी कायमचीच रचाई केलेली असते ती.

**लद्दा** पु० केश, सुतें, गुंतवळ, कागद, इ० चा गुंतागुंतीमुळें झालेला गोळा किं० गठ्ठा.

**लपका, लबका** पु० चिखल, शेण, पीठ, इ० चा गोळा.

**लपंगा** इ० पुढें ' लफंगा ' इ० पहा.

**लंपट** [ सं० ] वि० १ छावरा; अधाशी. २ आसक्त. ३ कामविकारानें आसक्त झालेला (पुरुष) किं० आसक्त झालेली (स्त्री). ४ सईल किं० खिळखिळा झालेला ( खिळा, खुंटी, इ० ). ह्या अर्थी ' लापट ' हा शब्द अधिक प्रचलित आहे.

**लपटणें** पुढें ' लपेटणे ' पहा.

**लपंडाव** पु०, **लपंडाई** स्त्री० [ म० लपणें + डाव ] १ एकानें लपावें, दुसऱ्यानें त्यास शोधून काढावें, इ० रूप मुलाचा एक खेळ ( खेळणें ). २ सरकारचा, सावकाराचा, किं० दुसऱ्या कोणाचा तगादेदार आला असतां त्याचेपासून तोंड चुकवून लपून बसणे किं० पळून जाणे हें कृत्य ( खेळणें, चालविणें ).

**लपण, लपणी** [ म० लपणें ] स्त्री० १ लपण्याची किं० दडून बसण्याची क्रिया. २ लपून किं० दडून बसण्याच्या सोयीची जागा.

**लपणें** [ सं० लुप् ] अ० क्रि० १ दडून बसणें. २ न दिसेसा होणें किं० असणें. ३ तुळई, खांब, जोतें, इ० खचणें, वाकणें, किं० दबणें. ह्या अर्थी ' लप खाणे ' असाही प्रयोग आहे. ॐ **लपन-छपन, लप्पंछप्प** न० लपून किं० दडून बसणे ही क्रिया. **लपूनछपून, लपतछपत** क्रि० वि० १ लपत लपत. २ गुप्तपणानें.

**लपविणें** [ म० ' लपणें ' चें प्रयाजक ] स० क्रि० १ दडवून किं० झाकून ठेवणें. २ न दिसेल अशा प्रकारें ठेवणें. ३ ( मनांतील विचार, बेत, इ० ) प्रकट न होऊं देणें.

**लपांगा (-ग्या )** पुढें ' लफंगा ' पहा.

**लपेट** [हिं०] पु०, स्त्री० १ कापड, कातडें, कागद, इ० चें आवरण किं० आच्छादन. २ परिघ; मर्यादा. ३ वाऱ्याचा किं० थंडीचा झटका मनुष्यास बाधतो तो. ४ पटकी इ० साथीचा रोग. ५ भाषणांतील डावपेच किं० दुटप्पीपणा ( मारणें ). ॐ **लपेटीखालीं नेणें** भाषणांत खुबीदारपणानें कांही गोष्ट दुसऱ्याच्या लक्ष्यांत न येईल अशा प्रकारें लपवून ठेवणें किं० खोटी

गोष्ट खुबीनें खरी अशी भासविणें किं० आपल्यांतील व्यंगें उघडकीस न येतील अशा सफाईनें बोलणें.

**लपेटणें** [ हिं० लपेटना ] स० क्रि० १ गुंडाळणें. २ डोकें, कंबर, इ० भोंवतीं ( वस्त्र इ० ) गुंडाळणें. ३ ( डोकें, कंबर, इ० ) वस्त्र इ० नीं गुंडाळणें किं० आच्छादणें. ॐ **लपेटून नेणे** वर ' लपेट ' मध्यें ' लपेटाखालीं नेणें ' पहा.

**लपेटा** [ म० लपेटणें ] पु० १ पदार्थांवर केलेलें कागद, कातडें, चिखल, इ० चें आवरण किं० आच्छादन. २ कलाबतूच्या तंतूनें किं० तारेनें मढविलेल्या बांगड्या.

**लपेटी** [ हिं० लपेट ] स्त्री० १आपला मतलब प्रकट न होऊं देतां वकील, मुत्सुद्दी,इ० ची बोलण्याची खुबी. २ लबाडीचा व्यवहार.

**लपोट (-ड-) शंख, लपोडशंख, लबोडशिंग** पु० बोलण्यांत अघळपघळ, धमकदारीचीं, आणि आवेशाचीं भाषणें करणारा पण ज्याच्या हातून कांहाच कार्य होत नाहीं असा मनुष्य; थापबाज; क्रियेवीण वाचाळ.

**लप्प छप्प** [ म० लपणें + छपणें ] न० बढाईचें किं० अरेरावीचें भाषण. २ टाळाटाळीचें भाषण. ३ खोटया सबबी. ४थापबाजी.

**लप्फा** [ हिं० लपा ] पु० १ शेला,पागोटें, इ० ना असतो तो मोठा जरीचा पदर.२ झाडाचें खोड चौरस करावयाचें असतां चारी बाजूंचे निमगोल तक्ते अरकसून काढतात ते प्रत्येक. ३ खांबाला किं० तुळईला मजबुतीसाठीं दिलेला जोड. ४ फळीला मजबुतीसाठीं ठोकलेलें आडवें लाकूड. या अर्थी ' लफ्फा 'सुद्धां.५ स्त्रियांचें एक कंठभूषण. ॐ **लफ्फेदार** वि० ज्याला मोठा जरीचा पदर आहे असा ( शेला, पागोटें, इ० ).

**लफंगा, लफंग्या, लफांगा, लफांग्या** वि० थापबाजी करून लोकांजवळून पैसे उपटणारा, पैसे आज देतों उद्या देतों म्हणून लोकांना लांबणीवर टकलणारा, आबरूची चाड नसलेला, निर्लज्ज ( माणूस ).

**लफंग, लफांग, लफांगें,** न० १ लचांड; शुक्काष्ठ; पेच.२ ज्यांत नुकसान होण्याचा संभव आहे असा धाडसानें कोणेकानें केलेला व्यवहार, व्यापार, धंदा, इ०.

**लफडें** न०,**लफडा** पु० १ लचांड; शुष्ककाष्ठ. २ शुष्क वाटाघाट. ३ कांहीं त्रासदायक काम.

**लफणें** वर ' लपणें ' पहा.

**लफलफणें** अ० क्रि० लठ्ठ गात्र, कास,पोट, इ० शिथिलपणामुळें हालत असणें किं० हेलकावे खात असणें.

**लफा, लफेदार** वर ' लप्फा, , ' लप्फेदार ' [ पहा.

**लब** स्त्री० निरोप नेणें,आणणें,इ० रूप काम, किं० प्रसंगवशात् उपस्थित झालेले काम किं० त्यासाठीं घातलेले हेलपाटे किं० केलेल्या येरझारा ( करणें, मारणें ). ॐ **लबेचा** वि० अशीं कामें करण्यासाठीं ठेविलेला ( नोकर,कारकून, इ० ). **लबेशाई, लबई** स्त्री० निरोप नेणें, आणणें, इ० रूप काम.

**लब** [ फा० ] स्त्री० १ ओठ. २ नदी,समुद्र, इ० चा कांठ.

**लब** [ म० लबणें ] स्त्री० १ वाकणें; खचणें. २ खांब, तुळई इ० चा बाक;वाक; खच (खाणें).

**लंब** [ सं० ] वि० १ लोंबणारा. २ मोठें; विशाल; विस्तृत. ३ उंच; लांब. पु० १ लोंबणें; लोंबत राहाणें. २ आश्रय; आश्रयाचें स्थान; आधार. ३ ( **भूमिति** ) एका रेषेवर काटकोनांत उभी असलेली रेषा. ४ (**ज्योतिष**) खमध्य आणि पृथ्वी ह्यांच्यामधील अंतर.ॐ **लंबकर्ण** पु० गाढव. **लंबोदर** पु० १ गणपति. २ खादाड माणूस. ३ ढेरपोट्या. ४पुरुषाचें शिश्न आणि वृषण जोडानें. **लंबासन** न० योगांतील एक आसन.

**लबई** स्त्री० निरोप नेणें, आणणें इ० रूप काम. वर ' लब ' मध्यें हा शब्द पहा.

**लंबक** [ सं० ] वि० लोंबणारा. पु० १ वर ' लंब ' चे अर्थ ३ आणि ४ पहा. २ गवंड्याचा ओळंबा.

**लबक** [म० लबणें] स्त्री० लांब ताणून बांधलेली दोरी किं०लांब वांसा ह्यांना अंगच्या भारानें येतो तो बाक ( येणें, खाणें ).

**लबक** स्त्री० १ बोलणें, चालणें, हसणें,इ० मध्यें जी कोणकाची कांहीं विशिष्ट तऱ्हा असते ती. मागें 'लकब' पहा.२ वाईट नाद किं० खोड. ३ तऱ्हा; पद्धति.

**लवकणें** अ० क्रि० १ भारामुळें दोरी, तुळई, इ० खालीं ओथंबणें. २ ( उभा असलेला माणूस,

पदार्थ, इ०) पुढें कलणें किं० झुकणें किं० वाकणें.

**लबका, लपका** पु० चिखल, शेण, गू, मांस, इ० चा गोळा.

**लंबच्यड, लंबचेड, लंबछोड** वि० विरूप किं० बेढब दिसण्याइतका उंच किं० लांब (मनुष्य, खांब, झाड, तुळई, इ० ).

**लंब छडी** स्त्री० लांब पल्ल्याची तोफ.

**लंबण, लंबणभाऊ** पुढें ' लंबाण ' 'लंबाणभाऊ ' पहा.

**लंबन** [ सं०] न० १ लोंबणें. २ ( **ज्योतिष**) एकच ग्रह इ० दोन स्थलांपासून पाहिला असतां त्यांच्या दर्शनांत होतो भेद.

**लंबमान** [ सं० ] वि० लोंबत असलेला.

**लंबायमान** [सं०]वि०१लांबच लांब.२लोंबत असलेला.

**लंबराण** न० जड पोतें इ० माल जहाजांत लादतांना किं० लादलेला माल वर शेंदून काढतांना योजतात ती दोरी.

**लबलब** स्त्री० १ जिभेची जल्दीची हालचाल.२ कोणत्याही गात्राची हेलकावे खाण्याची स्थिति.

**लबलबीत** वि०जें अर्धवट घट्ट आणि अर्धवट पातळ आहे असें ( शेण, चिखल, पीठ, इ० ).

**लंबा** [ सं० लंब ] वि० १ लांबवर पसरलेला. २ लांब आणि रुंद ( कांहीं पदार्थ ). ३ मूर्च्छा, मरण, इ० नीं ग्रासलेला. ४ मृत;नष्ट; उ० पटकीनें एका दिवसांत तीनशे माणूस या एवढ्याशा गांवांत लंबे झाले. ५ हताश; निर्बल. ६ जमीनदोस्त झालेला. ७विध्वस्त.**॰कोणकाची लंबेलंबे करणें** १ त्याला पूर्णपणें पराजित करणें. २ त्याचें पूर्णपणें पारिपत्य करणें.

**लंबाटा (-ट्या )** [ म० लांब ] वि० विशोभित दिसण्या इतका लांब किं० उंच ( माणूस, खांब, तुळई, इ० ).

**लंबाडा (-ड्या)** [ म० लांब ] वि० विरूप दिसण्याइतका लांब किं० उंच( माणूस, पदार्थ ).

**लबाड** वि० १ खोटा. २ खोटें बोलणारा. ३ अप्रामाणिक. ४ लुच्चा. ५ व्यभिचारिणी ( बायकांचा शब्द ) ॰ **तो लबाडवांचून नव्हे** अझून सुद्धां तो लबाडच आहे. **लबाडी, लबाडकी** स्त्री० खोटेपणा; खोटेपणाचें कांहीं कृत्य.. **लबाडलाताड (-ळ ), लबाडलचाड** वि० खोटा; लुच्चा; अप्रामाणिक. **लबाडी** स्त्री० १ ओझ्याला बांधलेली दोरी घट्ट करण्यासाठीं त्या दोरींत जें लाकूड घालून त्या दोरीला पीळ घालून दोरी घट्ट करतात तें लाकूड. २ दोरी ओढतांना त्या दोरीचें टोक ज्या लाकडाला दोन तीन वेळां गुंडाळलेलें असतें तें लाकूड. ३ ओंवण इ० च्या वांशांच्या टोकांत जें लाकूड बसविलेलें असतें तें.

**लंबाण** पु० एका प्रांतांतील धान्य, मीठ, इ० पदार्थ बैल इ० च्या पाठीवर लादून दुसऱ्या प्रांतांत विकावयासाठीं नेणाऱ्या लोकांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. न० लंबाणांचा तांडा किं० टोळी,–वाट चालत असलेली किं० वाटेंत मुक्कामाला उतरलेली. ॰ **लंबाणभाऊ** पु०लंबाण जातीचा माणूस(आदरानें बोलावयाचें असतां).**लंबाणी** वि०लंबाणा संबंधाचा(पोशाख, तांडा, भाषा, इ० ).

**लंबाणभाऊ** [ म० लंब+भाऊ ]पु० विरूप दिसण्याइतका उंच माणूस.

**लंबी** [ सं० लंब; म० लांब ] स्त्री० लांबी,– घर, शेत, रस्ता, इ० ची. ॰**लंबा ताणणें**( किं० **लावणें, लागणें,** इ० ) आरामासाठीं किं० निजतांना किं० आळसानें हात पाय ताणून उताणें पडणें.

**लबूद** [ म० लुब्ध ] वि० एकाद्या विषयांत किं० व्यसनांत आसक्त झालेला ( अशिक्षितांत रूढि ).

**लंबे** [ म० लांब; सं० लंब ] वि० टीप,– पुढील दोन्ही अर्थीं या विशेषणाचें रूप पालटत नाहीं १ लांब; खूपच लांब; लांबलचक. २ चीत; पराजित.स्त्री० फजीती; बोऱ्या (करणें, होणें).३ पराभव. ॰ **कोणेकाची लंबेलंबे करणें** त्याचा पूर्ण पराभव करणें किं० फजिता उडविणें.

**लबेद** वि० १ लठ्ठ; फोपशा( माणूस,पशु ). २ मजबूत; भक्कम.

**लबेदा** [ हिं० ] पु० १ कोणेकाचा परिवार किं० खटलें.२ कांहीं कामाच्या साधनसामग्रीचा

पसारा; अस्ताव्यस्त पसरलेलें सामानसुमान. ३ कोणेकाचा प्रवासांतील बायकामुलें, नोकर, घोडीं, गाड्या, इ० रूप पसारा.

**लबेशाई** [ म० लंब् ] **स्त्री०** निरोप नेणें, आणणें, इ० रूप काम किं० नोकरी; उ० लबेशाइंचा गडी, माणूस, इ०. वर ' लब ' पहा.

**लबोड** वर 'लबाड' पहा. हा अशिक्षितांत रूढ शब्द आहे. ＊ **लबोडशंख, लबोडशिंग पु०** थापबाज माणूस; नुसत्या लंब्या लंब्या गोष्टी बोलणारा पण खरोखरीं कांहींही काम न करणारा; क्रियेवीण वाचाळ.

**लंबोदर** वर ' लंब ' मध्यें पहा.

**लब्ध** [सं०] **वि०** १ मिळालेलें; प्राप्त झालेलें. २ लब्धप्रतिष्ठित. याच प्रतीकांत पुढें ' लब्ध प्रतिष्ठित ' पहा. ह्या अर्थी ' लब्ध्या ' सुद्धां. ३ शब्द, वाक्य, इ० पासून निघालेला ( अर्थ ). ＊ **लब्धकाम वि०** ज्याचा मनोरथ सफल झाला आहे असा; जें पाहिजे होतें ते ज्याला मिळाले आहे असा. **लब्धानुज्ञ वि०** सोडमुंज ज्याची झाली आहे असा ( मुलगा ). **लब्धचेत** [सं० लब्ध+चेतस्] **वि०** शुद्धीवर आलेला; मूर्च्छेतून उठलेला. **लब्धवर्ण वि०** १ विद्वान्. २ प्रख्यात. **लब्धश्रुत वि०** बहुश्रुत ( माणूस ). **लब्धप्रतिष्ठ, लब्धप्रतिष्ठित वि०** आपण कोणी मोठे किं० विद्वान् किं० कर्तबगार आहों अशी स्वताची ज्याणें समजूत करून घेतली आहे असा मूर्ख ( माणूस ); बढाईखोर. **लब्धप्रतिष्ठा स्त्री०** प्रौढि; पोकळ गर्व.

**लब्धि** [ सं० ] **स्त्री०** १ प्राप्ति. २ नफा. ३ भागाकार.

**लब्ध्या** मागें ' लब्ध ' मध्यें ' लब्धप्रतिष्ठित ' [ पहा.

**लब्भेशाई, लब्भाशाई, लब्भूशाई स्त्री०** १ खोटें, लबाडीचें, किं० अप्रामाणिकपणाचें काम, बोलणें, वर्तन. २ क्रियेवांचून वाचालता. **वि०** १ लबाड, लुच्चा. २ बाताड्या, थापबाज. ह्या दोन्ही अर्थी 'लब्भेचाट्टू,' ' लब्भाचाट्टू ' सुद्धां.

**लभ्य** [ सं० ] **वि०** १ मिळण्याजोगा. २ योग्य; न्याय्य. ＊ **लभ्यांश पु०** फायदा; फायदेशीर बाबत.

**लमाण, लमाणभाऊ, लमाणी** वर 'लंबाण,' ' लंबाणभाऊ,' ' लंबाणी ' पहा.

**लय** [ सं० ] १ लपणें; नाहींसें होणें. २ नाश; विध्वंस. ३ जगाच्या अंताचा समय; जगाचा अंतकाळ. ४ गायन, वादन, आणि नर्तन, यांच्यांतलि ऐक्य ( समनकालीन विराम ). ५ चित्ताची एकाद्या विषयाकडे एकाग्रता,—जी झाल्यामुळें अन्य गोष्टींवरून चित्താचें व्यावर्तन होतें. ६ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थांत एकरूप होणें. ७ मृदंग, वीणा, इ० चें वादन थांबल्यावर कांहीं काळ जो बारीक नाद होत राहातो तो. ८ संगीतांतील विराम. ९ द्रव्यादि पदार्थ खर्चल्यामुळें त्याची होते ती निःशेषता.

**लय, लई वि०** पुष्कळ; विपुल. **क्रि० वि०** खूप; फार; उ० लई उंच, लई मोठा, इ०. हे शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत. **लयलूट स्त्री०** वैपुल्य; पुरून उरण्याइतकें पदार्थांचें प्रमाण.

**ललकारणी स्त्री०** १ मोठ्यानें मारलेली हाक. २ मोठ्या स्वरांतील गाणें.

**ललकारणें अ० क्रि०** मोठ्यानें बोलणें किं० हाक मारणें किं० गाणें. **स० क्रि०** १ ( कोणेकाला) मोठ्यानें हाक मारून बोलावणें. २ (गीत, पद, इ० ) मोठ्यानें गाणें.

**ललकारी स्त्री०** १ आरोळी. २ कोणेकाला मारलेली हाक. ३ मोठ्या स्वरांत गायन.

**ललत पु०** मध्यरात्रीनंतर गावयाचा एक राग.

**ललना** [ सं० ] **स्त्री०** १ कोणीही स्त्री. २ विलासी स्त्री.

**ललाट**[सं०]**न०** १ कपाळ. २ दोन भिवयांमधील अंतर. ＊ **ललाटरेखा (-षा) स्त्री०, ललाटलिखित न०** नशीब, दैव,—जें मनुष्य जन्मतांच त्याच्या कपाळावर ब्रह्मदेव लिहून ठेवतो असें मानण्यांत येतें. **कोणेकाची ललाटरेषा उभी राहाणें** त्याला दैव अनुकूळ होणें. टीप,—' ललाट ' बद्दल अशिक्षित लोक ' लल्लाट ' शब्द योजतात.

**ललाम** [सं०] **वि०** सुंदर. **पु०, न०** गंधाचा टिळा. **न०** १ दागिना; भूषण. २ ( लाक्षणिक) श्रेष्ठ; उत्तम. ＊ **ललामभूत वि०** शोभादायक, अभिमानास योग्य ( माणूस, गुण ).

**ललित** [ सं० ] **वि०** १ विलासी; विलासयुक्त ( स्त्रीचें बोलणें, चालणें, इ० ). २ लहान

असून सुंदर; गोजिरवाणें. ३ मनोहर; आनंददायक. ४ कोमल; सुकुमार. न० १क्रीडा; विलास. २ ( **छंदशास्त्रांत** ) एक समवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत र, ज, स, हे गण असून अंतीं एक लघु आणि एक गुरु अक्षर असतें. पांचव्या अक्षरावर आणि पादान्तीं यति असतो. ॠ **ललितकला स्त्री०** गायन, वादन, चित्रकला, इ० ज्या कला त्या प्रत्येक.

**ललिता [ सं० ] स्त्री०** १ कोणीही स्त्री. २ विलासिनी स्त्री. ३ दुर्गादेवी. ४ कस्तूरी. ॠ **ललितापंचमी स्त्री०** आश्विन शुद्ध पंचमी ही तिथि. ह्या दिवशीं ललितेची ( म्ह० पार्वतीची ) पूजा करतात. **ललितासप्तमी स्त्री०** भाद्रपद शुद्ध सप्तमी ही तिथि.

**लुलुपुतु, लुल्लुपतु, लुलुपतु न०, स्त्री०** १ आर्जव; लाडीगोडी. २ उत्तर देतां येत नसलें म्हणजे जे कोणी अर्धवट शब्द अडखळत अडखळत बोलतो ते समुच्चयानें ( करणें ).

**ललेथोपे [ म० लाड + थोपटणें ] स्त्री०** मुलाला लाडानें किं० प्रेमानें थोपटणें.

**लल्ला पु०** माणूस, पशु, मासे, इ० ना भूल किं० मोह पाडणारी कांहीं वस्तु.

**लल्लाट, लल्हाट न०** ' ललाट ' चा गांवढळ अपभ्रंश. वर ' ललाट ' पहा.

**लव [ सं० ] पु०** १ तुकडा; खंड. २ बिंदु. ३ अल्पांश; लेश. ४( **ज्योतिष** )अंश.५लावापक्षी. ६सूक्ष्म काळ. ७एक वृक्षविशेष किं०त्याचें फळ.८ प्राण्याच्या अंगावरील केश; लोकर.९अपूर्णांकाचा अंश म्ह०रेषेवरचा आंकडा.**स्त्री०**अंगावरचे बारीक कोमल केस. ह्या अर्थी 'लंव' असेंही ह्या शब्दाचें रूप आहे. ॠ **कोणेकाची लव लव बोलणें** त्याच्या अंगावरचा प्रत्येक केस बोलत असणें म्ह० तो जलदीनें आणि पुष्कळ बोलणारा असणें.

**लवकंड, लोळकंड, लोळपट [ म० लोळणें ] स्त्री०** कुत्री, मांजरें, इ० चें एकमेकांच्या अंगावर चढणें किं० लोळणें (खेळतांना किं० भांडतांना).

**लवकर क्रि० वि०** १ उशीर न होऊं देतां; त्वरेनें; जलदीनें. २ नेहेमींच्या वेळेच्यापूर्वी. **न०** ठरलेल्या किं० नेहेमींच्या वेळेच्या अगोदरचा समय; उ० अझून लवकर आहे, इतक्यांतच जाण्याचें कारण नाहीं.

**लंवका, लवका, लबका पु०** पीठ, चिखल, मांस, इ० चा बोटांनीं किं० दातांनीं तोडून किं० फाडून काढलेला भाग किं० तुकडा किं० गोळा.

**लवका, लवकिरा, लवखर [ म० लवणें ] वि०** लवणारा, वाकणारा.

**लवखाद स्त्री०** धाड; झडप; उडी ( पडणें ).

**लवंग [ स्त्री० ] स्त्री०** १ मसाला, विडा, इ० मध्यें घालावयाचें एक फूल किं० त्या फुलाचें झाड. २ ह्या फुलाच्या आकाराचें एक सोन्याचें भूषण,–नाक, कान, इ० ना भोंक पाडून त्यांत घालावयाचें. ॠ**लवंगकाचरी** (किं० **लवंगकचरी** ) **सुपारी स्त्री०, लवंगचूर पु०, लवंगचुरी स्त्री०** पोफळाचे बारीक काप शिजवून केलेली सुपारी.**लवंग**( **लवंगी** किं०)**पिंपळी स्त्री०** लहान आकाराची पिंपळी. **लवंगी मिरची स्त्री०** १ अत्यंत लहान आकाराची पण अत्यंत तिखट अशी मिरचीची एक जात. २ (**लक्षणेनें**) तल्लखपणानें आणि प्रमाणशुद्ध रीतीनें ताबडतोब उत्तरास प्रत्युत्तर देणारी मुलगी ( किं० प्रसंगविशेषीं मुलगा ). **लवंगी फटाकडा पु०** १ बारीक आकाराचा आणि हमखास उडणारा एक प्रकारचा फटाकडा. २ ( **लक्षणेनें** ) चुणचुणीत मुलगा ( किं० मुलगी ). **लवंगेल न०** लवंगांचें तेल.

**लवंगणें अ० क्रि०** ( एकादें गात्र ) चालणें, कांहीं काम करणें, इ० मध्यें कांहीं भलताच प्रकार झाल्यामुळें दुखावणें; लचकणें.

**लवचीक [ म० लवणें ] वि०** १ न मोडतां वाकणारा, वळणारा, किं० वळवितां येईल असा (पदार्थ,–दोरी, तार, वेत, इ०). २ ( **लक्षणेनें** ) ज्याचें मन सहज वळवितां येतें असा ( माणूस ). ह्याच्या उलट ' ताठर, ' किं० ' हेकट, ' किं० ' हट्टी. '

**लवटी स्त्री०** दोरीनें बांधलेला गठ्ठा घट्ट आवळतां यावा म्हणून दोरींत जें लाकूड घालून पिळवटतात तें.

**लवंडणें अ० क्रि०** १ आरामासाठीं आंथ-

रुणावर हातपाय ताणून आडवें पडणें. २ आधारावर ठेविलेला किं० स्थित जो पदार्थ त्याला धक्का लागल्यामुळें त्याचें गुरुत्वमध्य तळाच्या बाहेर जाऊन तो उलथून पडणें किं० ढासळणें; कलंडणें. स० क्रि० (पदार्थाला) धक्का देऊन (तो) एका बाजूनें कलवून पाडणें.

**लवडसवडीं, लवडांसवडीं** क्रि० वि० चपलतेनें; घाईघाईनें; तडखपणें. **लवडीसवडी** स्त्री० घाई; त्वरा; लगबग.

**लवंडी** [ हिं० ] स्त्री० दासी.

**लवण** [ सं० ] न० १ मीठ. २ सैंधव. ३ लोणार खार. पु० १ खारटपणा. २ क्षारसमुद्र. ꣸ **लवणतृण** न० लोणा गवत. **लवणशाक, लवणशाख** न० लोणचें. **लवणजल** पु० क्षारसमुद्र. **लवणजल** न० खारट पाणी.

**लवण** न०,स्त्री०,**लवणी** स्त्री० [ म० लवणें ] १ जमीनीचा खोलगट भाग. २ खळगा. ३ सखल जमीन. ४ शरीराच्या सांध्यालगतचा खोलगट भाग; उ० पायाची लवण, गुडघ्याची लवण,इ०. ५ रस्ता, नदीचा प्रवाह, इ० तांचे वाकण किं० वाकडा भाग किं० कोन.

**लवणभंजन, लवनभंजन** [ म० लवणें+भजणें ] न० ए० व० १ डोकें वाकवून लवून केलेला नमस्कार. २ नम्रपणाचें गोडगोड भाषण. ३ कोणेकाला दाखविलेला आदर; कोणेकाचा केलेला सत्कार.

**लवणी** वर ' लवण ' न०, स्त्री० पहा.

**लवणें** [सं० लू=तोडणें ]अ० क्रि० १ बांबू, काठी, तुळई, इ० अंगच्या किं० वरच्या भारानें वाकणें. २ ( वीज, डोळा ) स्फुरणें किं० कंपयुक्त होणें. ३ (मनोदेवता, मन, मनपिंगळी, इ०) एका विषयाकडे वाहणें; उ० माझी मनोदेवता लवते कीं ह्या मुलाखतीपासून कांहीही निष्पन्न व्हावयाचें नाहीं. ४ वाकणें; नमस्कार करतांना शरीर किंचित वाकविणें; उ० मामलेदारसाहेबांना लवून नमस्कार कर.

**लवथा** पु० बोटांनीं पकडून ओढलेला दंड, मांडी, पोटरी, इ० मांसल गात्रांचा गोळा ( घेणें, ओढणें ).

**लवथट** वि० आडदांड; दांडगट.

**लवनभंजन** वर ' लवणभंजन ' पहा.

**लवनी** स्त्री० शिताफळाची एक जात.

**लवलवणें** [ म० ' लवणें ' चें एक रूप ] अ० क्रि० १ बोलतांना किं० बोलण्याच्या उत्सुकतेनें किं० बोलण्याच्या प्रयत्न करतांना जीभ जलदीनें हालणें किं० हालत राहाणें. २लवचीकपणामुळें ( पदार्थ ) हेलकावत राहाणें. ३ ( सर्प, गांडूळ, आळी, इ०चें शरीर ) स्फुरणें किं० वळवळणें.

**लवलवीत** वि० १ कोंवळें आणि मऊ ( पडवळ, आंबा, इ० ). २ चांगलें पिकून मऊ झालेलें ( गहूं ). ३ चांगली तिंबलेली (कणीक इ०). ४ चांगलें कुसकरलेलें ( शेण, चिखल, इ० ). ५फार घट्ट नव्हे असें ( लोणी इ० ).

**लवलक्षण** [ म० लव+लक्षण ] न० मनुष्य, पशु, इ०च्या दर्शनाचा किं०प्रेक्षकाचें मन ओढून घेण्याचा गुण.

**लवला, लवलाहीं (-हें )** क्रि०वि०तत्काळ; त्वरेनें; वेगानें.

**लवली** [ सं० ] स्त्री० रायआंवळी हें झाड.

**लवलेश** [ सं० लव+लेश ] पु० ए० व० अत्यल्प अंश; उ० कासंडींत तुपाचा लवलेश नाहीं; टीप,–बहुधा निषेधीं प्रयोग. उ० तुमच्या योजनेचा मला लवलेश ठाऊक नाहीं. क्रि० वि० मुळा सुद्धां. निषेधी प्रयोग; उ० सदोबा वाघाला लवलेश भीत नाहीं.

**लवा, लव्हा** [ सं० लव ]पु० १ लावा पक्षी. २ वाळा ( एक तृण ).

**लवाजमा, लवाजिमा** [ अ० लवाजम्,लवाझिमात् ] पु० १ कोणा बड्या माणसाचा परिवार. २ कोणेकाच्या घरांतील नोकरचाकर, आश्रित, इ० चा समुदाय.

**लवाद** [ अ० लव झ्=कैवारी ] पु० दोन पक्षांच्या वादाचा निकाल करणारा दोहों पक्षांस मान्य असलेला तिऱ्हाईत माणूस. ꣸ **लवादी** वि० लवादानें केलेला ( निकाल ). **लवादी** स्त्री०लवादाचा हुद्दा किं०भाधिकार किं०कार्यक्षेत्र.

**लव्हंगी** खालीं ' लव्हांगी ' पहा.

**लव्हा, लव्हाळा** पु०, **लव्हीं** स्त्री० पाण्याचे कांठीं उगवणारें एक प्रकारचें गवत.

**ल्व्हांगी, लोहंगी, लोहांगी, लोहांगी काठी** [ सं० लोह (लोखंड)+सं० अंग; काठी ] स्त्री० लोखंडाचे खिळे, वळीं, इ० बसवून शत्रूवर प्रहार करण्यासाठीं तयार केलेली काठी किं० सोडगा.

**ल्व्हाणा** पु० गुजराथ्यांची एक जात किं० त्या जातीचा इसम.

**ल्व्हाळा, ल्व्ही** वर ' ल्व्हा ' पहा.

**लशकर, लष्कर, लसकर** [ फा० लष्कर ] न० १ सैन्य; फौज. २ शिंदे सरकारचें सैन्य किं० मुलूख. पु० तोफखाना इ० कारखान्यांतील नोकर. ॐ **लशकरगिरी** स्त्री० लशकरांतील नोकरी. **लशकरी** वि० १ फौजेसंबंधाचा. २ फौजेच्या उपयोगाचा. **लशकरच्या भाकरी भाजणें** १ ज्यांत आपला कांहीं फायदा नाहीं असें दुसऱ्याचें कष्टाचे काम पथकरणें. २ नसत्या उठाठेवी करीत बसणें.

**लसाकोड्या** [म० लस+कोड+या(प्रत्यय)] वि० ज्याला कोड किं० रक्तपीति आहे आणि ज्याच्या अंगांतून लस, पू, इ० गळत आहे असा ( मनुष्य ).

**लशी** [म० लस] वि० जींत पू असतो अशी ( खरूज ). व्यावर्तकत्वें 'कोरडी ( खरूज ).'

**लशुन** [ सं० ] पु०, न० कांदा, गुल्छबू, इ०च्या वर्गांतील एक अति उग्र वासाचा कंद. मराठींत 'लसूण' स्त्री०असें रूप वापरण्यांत येतें. **लसणीची बी** स्त्री० लसणीच्या कांद्यांतील एक एक पाकळी. **लसणी** वि० लसणीच्या बीच्या आकारासारख्या कड्या इ० करून त्या जोडून केलेला(जवा,तोडा इ०दागिना). **लसणा,लसण्या** पु० एक रत्न. **लसणी बिंब** न० तपकिरीच्या रंगाचें फूल ज्याला येतें अशी बोरूची एक लहान जात. **लसणी सालमिश्री** स्त्री० एक प्रकारची सालमिश्री. दुसरा प्रकार ' पंजाबी सालमिश्री '

**लस** [ हिं० ] स्त्री० फोड, गळू, खरूज, इ० तून स्रवतो तो पातळ पदार्थ.

**लसण** न० स्त्री० वर 'लशुन' पहा.

**लसलस** (–सां ) क्रि० वि० १ धाईधाईनें; लगबगीनें.

**लसलसणें** अ० क्रि० १ ( तारुण्य, मस्ती, इ० ) अंगांत जोरांत संचरत असणें. २ ( अग्नि, दिवा, ऊन्ह, इ० ) प्रखरपणें झळकत किं० तेवत असणें ). [ ' लशुन ' पहा.

**लसूण** [ सं० लशुन ] पु०, स्त्री०, न० वर

**लस्कर** इ० वर ' लशकर ' इ० पहा.

**लहंगा** [ हिं० ] पु० गुजराथी बायका नेसतात तो परकर. [ पळ.

**लहज** [ अ० लहझाह ] पु० एक क्षण किं०

**लहणें** न० १ अन्य पेठचे सावकार इ० वर हुंडी इ०देणें केलें असतां त्यांस जो मोबदला ऐवज, हुंडी, इ० पाठवितात ती. २ सलोख्याचा संबंध. ॐ**लहणी हुंडी** स्त्री० अडत्या इ०कांकडे लहण्याबद्दल जी हुंडी पाठवितात ती. **गोविंदरावाचें मला लहणं नाहीं** किं० **गोविंदरावाचे आणि माझें लहणें नाहीं** त्यांचा आणि माझा फारसा सलोखा किं० सख्य नाहीं.

**लहंबर, लहांबर, लाहंबर** न० *प्रवासांतील कोणेकाचा परिवार,–नोकरचाकर, गाड्याघोडीं, सामानसुमान, इ० समुच्चयानें. २ भिकारी लोक किं० वात्रट आणि उनाड पोरें इ० जीं कोणेकाच्या पाठीस लागलेलीं आहेत तीं समुच्चयानें. ३ ज्यांची आपणास अडगळ वाटते असे पदार्थ समुच्चयानें. ४ अति खादाड माणूस. टीप,–पहिल्या तीन अर्थासंबंधानें मागें 'लटांबर' पहा.

**लहम** [ अ० लम्हाह ] पु०, स्त्री०, न० एक क्षण; अत्यल्प काळ.

**लहर** [सं० लहरि, लहरी] स्त्री० १ पाण्याची लाट. २ काम, क्रोध, इ० मनोविकारांचा मनांत एकदम झालेला उद्भव किं० उद्रेक. ३ अंगांत विष किं० अमली पदार्थ यांचा संचार झाला असतां मधून मधून ज्या तीव्र वेदना उत्पन्न होतात त्या प्रत्येक. ४ मरणसमयीं ज्या मधून मधून आणि एकदम गात्रांत उत्पन्न होतात त्या हालचाली प्रत्येक. ५ मलविसर्जनाच्या वेळीं मल गुदावाटे बाहेर पडण्याचा जो एक एक हसा तो. ६ ( वाऱ्याची ) मंद झुळूक,(वाऱ्याची)एक लाट. ७ कांहीं गोष्ट करण्याची मनांत आलेली जोराची इच्छा; हुकी. ८ छांदिष्टपणा; छांदिष्टपणाची इसळी. ९ सापाच्या गळ्याखालीं असतात त्या

रेषा. ह्या रेषा जितक्या असतात तितके वेळां त्या सापाच्या दंशाच्या विषानें मनुष्याला तीव्र वेदनेचे झटके येतात. ह्या वरून ' तो साप दोन लहरींचा (किं० तीन, चार, इ० लहरींचा) आहे' असे प्रयोग केले जातात. १० कांहीं गोष्ट करण्याची एकदम उत्पन्न होते ती इच्छा; उ० मला आतां गाण्याची लहर आली आहे. ११ प्रकाशाच्या कमीज्यास्तीपणामुळें वस्त्र, चित्र, इ० वर रंगाच्या ज्या भिन्न भिन्न छटा मारतात त्या प्रत्येक. १२ वस्त्राच्या विणींत विणलेले असतात ते रंगीत सुताचे पट्टे किं० त्या काड्या प्रत्येक. १३ वस्त्रावर छाप इ० नीं ठोकलेले असतात ते रंगाचे पट्टे किं० त्या रंगाच्या काड्या प्रत्येक. १४ परकर, झालर, पडदा, इ० च्या ज्या आडव्या किं० उभ्या घड्या त्या प्रत्येक. १५ झोप, ताप, मळमळणें, इ० चा एकदम जोराचा होतो तो प्रादुर्भाव; उ० त्या मुलाला झोपेची लहर आली म्हणजे तो दगडावर देखील निजतो. ॐ कोणेकानें लहरा मारणें त्याणें छांदिष्टपणाचीं कृत्यें करणें; त्याणें रंगेलपणाच्या गोष्टींत निमग्न होणें. लहरदार, लहरीदार वि० १ छांदिष्ट. २ झोकदार; छाकटेगिरीचा ( पोशाख, भाषण, गायन, इ० ). ३ रंगीत पट्टे ज्यांत आहेत असें ( वस्त्र ). लहरबहर स्त्री० ए० व० १ उमेद, वैभव, उत्कर्ष, इ०. २ उत्कर्षाचा किं० रद्दीचा किं० वैभवाचा काळ. लहरा पु० गायनाचा सूर किं० राग. लहरी वि० छांदिष्ट. स्त्री० १ वेदनेची उसळी. २ काम, क्रोध, इ० चा उद्रेक किं० झटका. लह. लहरी बहरी वि० छांदिष्ट.

लहा, लहालहा स्त्री० १ उन्हाचा तीव्र ताप (करणें). २ उन्हाच्या तापानें ( पिकांची ) सुकलेपणाची अवस्था ( करणें ). ३ स्पर्धा; चढाओढ ( बांधणें ); उ० रामभाऊशीं तूं लहा बांधूं गेलास तर फजिती पावशील.

लहांगड स्त्री० दोन चाकी लहानशी गाडी ( कडबा, धान्य, इ० वाहून नेण्याच्या उपयोगाची )

लहांगी, लोहांगी मागें ' लव्हंगी ' पहा.

लहांचट ( -ड,-र ) वि० लोचट; हट्टी; हेकेखोर.

लहान [ सं० लघु ] वि० (आकारानें, वयानें, दर्जानें, उंचीनें, बुद्धीनें, किं० दुसऱ्या कांहीं गुणानें) उणा किं० कमी. ॐ लहानखुरा, लहानगा, लहानसर वि० साधारणपणें लहान. लहान लहू (-लोहू,-लव ), लहूलहान लहानाळ वि० चिमुकला; लहान आणि सुंदर; गोजिरवाणा ( मूल, वासरूं, इ० ). लहानवी स्त्री० १ लहानपणा. २ दर्जाचा कमीपणा किं० हलकेपणा. लहानवी थोरवी स्त्री० ए० व० वय, दर्जा, इ० बाबतींत अंतर किं० तफावत किं० फरक. लहाना वि० १ लहान. २ लहान (प्रेमाच्या भाषणांत).

लहानावणें, लहानाळणें [ म० लहान ] अ० क्रि० लहान किं० कमी होणें ( आकार, विस्तार, गुण, दर्जा, इ० बाबतींत ).

लहानाळणें [म० लहान] स० क्रि० आकार, विस्तार, गुण, दर्जा, इ० बाबतींत ( माणूस, पदार्थ, प्रकाश, उष्णता, इ० ) कमी करणें.

लहाबर, लहांबर वि० लुब्रा; लोचट; लुडबुड्या; ज्यांत त्यांत नाक घालणारा.

लहांबर मागें ' लहबर ' पहा.

लहाय मागें ' लहा ' पहा.

लहारी स्त्री० तीन आणे किं० तीन आणे ही किंमत.

लहीन [ सं० लीन ] वि० १ विनयशील; नम्र. २ मर्यादशील; सभ्य. ३ आपला दर्जा ओळखून वागणारा.

लहूलहान वि० मागें ' लहान ' मध्यें पहा.

लळत लोंबत [म० लोळणें+लोंबणें ] क्रि० वि० चालण्याला नाखूष अशा माणसाला किं० पशूला त्याची धडपड सुरू असतां त्याला उचलून वाहून ( नेणें ); नीट न बांधलेलें ओझें जमीनीवरून अर्धवट ओढीत आणि अर्धवट उचलून ( नेणें ); कष्टानें कांहीं पदार्थ वाहून (नेणें).

लळलळणें अ० क्रि० तोंडांत लगाम असल्यामुळें किं० अशक्तपणामुळें (घोडा इ० ची जीभ), तोंडांतून बाहेर लोंबत राहाणें.

लळा [ सं० लड्=लाड करणें ] पु० १ कोणा माणसाचा कोणाकडे असतो तो ओढा किं० प्रेम ( असणें, लावणें, लागणें ). २ प्रेमानें कोणी

कोणेकापाशीं मागितलेली वस्तु (चालविणें, पुरविणे ); उ० आईबाप मुलांचा लळा पुरवितात.

**लळीत** [ सं० ललित=क्रीडा, विलास ] न० १ नवरात्राच्या सप्तमीच्या रात्रीं करतात तें नाटक. २ ह्या प्रसंगींचीं पद्यें समुच्चयानें. ३ राज्य, संसार, व्यवहार, इ० चा दुःखमय शेवट किं० परिसमाप्ति. ४ कथा, नाटक, ग्रंथ, इ० ची समाप्ति ज्या अभंग इ० नीं करतात तो अभंग इ०. ❀ **लळतावर येणें, ललितावर येणें** वादामध्यें कोणेकानें पराभव झाल्यामुळें चिरडीस जाणें किं० चरफडणें. **लळित्या, लळत्या** वि० लळीत चालविण्यांत कुशल ( हरिदास इ० ).

**लक्ष** [ सं० ] पु० १ एक ह्या अंकावर पांच शून्यें मांडलीं असतां होते ती संख्या; एक लाख. न० १ ज्यावर बंदुकीची गोळी, धनुष्याचा तीर, इ० मारावयाचा तो पदार्थ. २ मन किं० चित्त ह्यांनें अनुसंधान किं० ध्यान ( एकाद्या विषयाकडे लावणें ह्या दृष्टीनें ). ३ नजर, विचार, इ० ज्याचेकडे लावावयाचें तो पदार्थ. ४ स्मरण, स्मृति; उ० माझा बोध तूं लक्षांत ठेवला नाहींस तर पश्चात्ताप पावशील. ५ विचार, चिंतन; उ० हा मुद्दा लक्षांत घेतला पाहिजे. ६ ( मराठींत ) एक लक्ष रुपये किंमतीच्या पदार्थाइतकी मूल्यवान् अशी कांहीं घडलेली गोष्ट; उ० वाटेंत आमचेवर चोरांनीं हल्ला केला आणि आमचे सर्वस्व लुटून नेलें परंतु आम्ही जिवानिशीं सुरक्षित घरीं आलों एवढें आम्ही लक्ष मोजितों. **टीप**,—वरील सातही अर्थीं ' लक्ष्य ' असाही शब्द योजण्यांत येतो. खालीं ' लक्ष्य ' पहा. ❀ **लक्षदीप** पु० अ० व० आनंदाच्या प्रसंगीं किं० उत्सवांत लावितात ते असंख्य दिवे. **लक्षपूजा** स्त्री० १ बेलाचीं पानें, तुळशीचीं पानें, फुलें, फळें, तीळ, तांदूळ, इ० चा एक एक लक्ष देवावर वाहावयाचा संकल्प करून तो तो लक्ष देवावर वाहून त्या देवाची केलेली पूजा. २ ( लक्षणेनें ) अशा पूजेसाठीं जमविलेली वरील प्रकारची सामग्री. **लक्षभोजन** न० एक लाख ब्राह्मणांना जेवूं घालावयाचें असा संकल्प करून लाख ब्राह्मणांना जेवूं घालणें ह्या रूपाचें धर्मकृत्य. **लक्षलाभ** पु० १ लाख रुपयांच्या किंमतीचा किं० योग्यतेचा लाभ. २ ह्या शब्दाचें ' लखलाभ ' हें अपभ्रष्ट रूप असून त्याचे अर्थ मागें ' लखलाभ ' मध्यें पहा. **लक्षाचा माणूस** पु० हरकामीं उपयोगीं पडणारा प्रामाणिक आणि कासू असा माणूस. **लक्षाधीश, लक्षापति, लक्षेश्वर** पु० एक लाख रुपये किं० अधिक ज्याच्या मालकीचे आहेत असा माणूस म्ह० फार श्रीमंत माणूस. **लक्षानु(–न–)लक्ष** वि० कैक लक्ष; असंख्य. **लक्षावधि** वि० असंख्य; उ० आकाशांत लक्षावधि तारे आहेत. **लक्षेश्वरा** स्त्री० कोणेकाजवळ असलेली पैशाची अफाट समृद्धि. **लक्षेश्वरी किंवा भिक्षेश्वरी** स्त्री० अत्यंत श्रीमंती किं० अत्यंत दारिद्रता ( ह्याच दोन खरोखरीं सुखाच्या स्थिति होत). **लक्षापति किंवा भिक्षापति, लक्षाधीश किंवा कक्षाधीश** अत्यंत श्रीमंत किंवा अत्यंत दरिद्री मनुष्य ( सुखी असतो ).

**लक्षक** [ सं० ] त्रि० सुचविणारें; सूचक; बोधक.

**लक्षण** [ सं० ] न० १ पाहाणें; अवलोकिणें. २ जाणणें. ३ जाणण्याचें कांहीं साधन. ४ खूण; चिन्ह; निशाणी. ५ रोग ओळखावयाचें रोगाचें कांहीं चिन्ह; रोगाचें स्वरूप. ६ (ज्योतिष) शुभ किं० अशुभ सुचविणारी कांहीं गोष्ट. ७ शुभचिन्ह; सद्गुण. ८ अमुक वस्तु अमुक आहे किं० अमुक प्रकारचीं आहे हें ठरविण्याचें कांहीं चिन्ह; निर्णायक अशी कांहीं गोष्ट. ९ शास्त्र इ० तील शब्दाचीं व्याख्या; वस्तूच्या ठायीं असलेला कांहीं गुण किं० धर्म. १० ( न्याय ) अमुक वस्तु अमुक ठिकाणीं आहे असें सिद्ध करणारी कांहीं गोष्ट; उ० डोंगरावर धूर आहे म्हणून डोंगरावर अग्नि असला पाहिजे असा तर्क करतांना धूम हें लक्षण आणि अग्नि हें लक्ष्य. ११ मनुष्याच्या स्वभावाचा चांगलेपणा किं० वाईटपणा दाखविणारें त्याचें वर्तन किं० भाषण; उ० तूं फटदिशीं त्याला आईवरून शिवी दिलीस हें तुझें वाईट लक्षण होय. १२ ( मराठींत ) कोणेकाचा वर्तनक्रम किं० वागण्याची तऱ्हा; उ० अशा लक्षणांनीं तूं लवकरच भिकेस लागशील. १३ ( मराठींत ) सुंदरपणा; गोंडसपणा; मोहकपणा. ❀ **लक्षणसमन्वय** पु० कोणेक वस्तूचीं केलेली व्याख्या त्या वस्तूस लागू करणें किं० लागू करून पाहाणें. **लक्षणहीन** वि० ज्याचे

ठायीं चांगलीं लक्षणें नाहींत असा ( माणूस, पुरुष, स्त्री, घोडा, इ० ).

**लक्षणा** [ **सं०** ] **स्त्री०** ( **साहित्य** ) वाक्यामध्यें योजलेल्या शब्दाचा वाच्यार्थ जर त्या वाक्याच्या अर्थाशीं जुळण्याजोगा नसला तर त्या शब्दाचा तेथें जुळेल असा अर्थ त्या वेळे पुरता आपण करून घेतों त्या अर्थाला 'लक्ष्यार्थ' असें म्हणतात आणि ह्या लक्ष्यार्थाची प्रतीति करून देणारी जी शक्ति तिला 'लक्षणाशक्ति' किं० 'लक्षणा' असें म्हणतात. आणि लक्ष्यार्थ दर्शविणाऱ्या शब्दाला त्या लक्ष्यार्थाच्या अपेक्षेनें ' लक्षक ' असें म्हणतात. गंगेवर गौळवाडा आहे ह्या वाक्यांत गंगा ह्या शब्दाचा अर्थ गंगेचा कांठ हा लक्षणेनें जाणला जातो. मागें ' अजहत्स्वार्थालक्षणा ' पहा.

**लक्षिणें** [ **सं०** लक्ष्=पाहाणें ] **स० क्रि०** १ पाहाणें. २ निरखून पाहाणें. ३ विचारांत घेणें. ४ तर्कानें जाणणें. ५ ( कोणेकाच्या मार्गाकडे ) लक्ष देऊन किं० दृष्टि वळवून बसणें; उ० मी एवढा वेळ तुझा मार्ग ( किं० तुझी वाट ) लक्षीत बसलों आहें. ६ ( पदार्थ किं० अर्थ ) कोणेकाच्या धोरणांत किं० संकल्पांत किं० मनांत असणें. ७ बाण, बंदूक, इ० नीं ( पदार्थविशेष ) वेधण्यासाठीं नेम धरणें.

**लक्षित** [ **सं०** ] **वि०** १ पाहिलेला. २ तर्कानें जाणलेला; चिन्हांवरून ओळखिलेला. ३ उद्दिष्ट.

**लक्षेश्वर**, ' **लक्षेश्वरी** ' ' लक्ष ' मध्यें पहा.

**लक्ष्मी** [ **सं०** ] **स्त्री०** १ संपत्ति; द्रव्य. २ सौंदर्य; शोभा. ४ तेज; कांति. ५ यश; सिद्धि. ६ संपत्ति, सौंदर्य, इ० ची देवता. ७ भगवान् विष्णूची पत्नी. ८ राजस लक्ष्मी. ॐ **लक्ष्मीश, लक्ष्मीकांत पु०** विष्णु **लक्ष्मीपूजन न०, लक्ष्मीपूजा स्त्री०** १ आश्विन महिन्याच्या अमावास्येला प्रदोषकाळीं करतात ती लक्ष्मीची पूजा. २ वधूच्या गृहप्रवेशानंतर वधूवरें करतात ती लक्ष्मीची पूजा. **लक्ष्मीताल पु०** (**संगीतांत**) एक तालविशेष. **लक्ष्मीवान्, लक्ष्मीवंत वि०** १ श्रीमंत. २ सुंदर; शोभवंत. **लक्ष्मीराखण न०, स्त्री०** रोजच्या भोजनांतून लक्ष्मीसाठीं बाजूस काढून ठेविलेला घास,-तिनें आपल्या घरांतून निघून जाऊं नये म्हणून. **लक्ष्मीविलास पु०** एक औषध. **लक्ष्मीबाईची दया स्त्री०** कोणेकाचें भाग्य किं० समृद्धीचा काळ. याच्या व्यतिरेकानें ' अक्काबाईची दया ' म्ह० दारिद्र्याचा काळ. **कोणकाच्या घरांत लक्ष्मी अवतरणें** तो श्रीमंत असणें. **लक्ष्मीचा होरा पु०** कोणेकाच्या आयुष्यांतील वैभवाचा किं० भरभराटीचा काळ. **लक्ष्मी येऊं लागली म्हणजे मोरीवाटे सुद्धां येते** मनुष्याचा वैभवाचा काळ प्राप्त झाला असतां त्याला ओंगळ, हिडिस्स, व्यसन, अपवित्र, असंभवनीय स्थानांपासून किं० द्वारांनीं सुद्धां पैसा मिळतो.

**लक्ष्य** [ **सं०** ] **वि०** १ दृश्य. २ अनुमान करण्याजोगें. ३ ज्ञेय; जाणता येईल असें. ४ ज्याची व्याख्या किं० वर्णन करावयाचें आहे असा. ५ ज्यावर नेम धरावयाचा तो ( पदार्थ ). ६ पाहावयास किं० जाणावयास योग्य. ७ विचारांत किं० तर्कांत घ्यावयास योग्य. **न०** १ बाण, बंदूक, इ० चा नेम ज्यावर धरतात तो पदार्थ. २ विचारांत घ्यावयाची गोष्ट. ३ ज्याची व्याख्या करावयाची आहे तो पदार्थ. ४ चिन्ह. ५ ( **साहित्य** ) लक्षणेनें आलेला किं० प्राप्त झालेला अर्थ. मागें ' लक्षणा ' पहा. ६ लक्ष ही संख्या; लाख. ७ चित्त; अवधान. **लक्ष्यार्थ पु०** वर ' लक्ष्य ' अर्थ ५ पहा. मागें ' लक्षणा ' पहा.

**लाइलाज** [ **अ०** ] **वि०** निरुपाय; लाचार. ॐ **लाइलाजी स्त्री०** उपाय चालत नाहीं अशी स्थिति; कुंठितपणाची अवस्था.

**लांक** [ **सं०** लंका ] **पु०, स्त्री०** एक धान्यविशेष.

**लांक, लांकण, लांख** [ **सं०** लंखनी=लगामाची कडी ] **स्त्री०** १ दोन माणसें, पशु, वि० पदार्थ, यांची जुळणी करणें किं० सांगड (घालणें). २ दोन पदार्थ, माणसें, पशु, इ० च्या जोड्या जोड्या कांहीं कामाच्या सोयीसाठीं धरणें किं० बांधणें; उ० तुमच्याजवळ आधेल्या नसल्या तर दोघां दोघां ब्राह्मणांस एक एक रुपाया देऊन दोघां दोघांची एक एक लांख करून दक्षिणा वांटा. ३ दोन जनावरें ज्या सईलसर दोरीनें

एकत्र बांधतात ती दोरी. ह्या दोरीला ' लांकण दोर ' असेंही म्हणतात.

**लांकड, लकड** स्त्री० १ खूप उंच ताड किं० माड. २ ( लक्षणेनें ) अति उंच मनुष्य.

**लाकड, लाकडूं** [ सं० लकुट, लगुड ] न० काष्ठ; झाडाचा तोडलेला खंड. टीप,-संयुक्त शब्द, वाक्प्रचार, इ० खालीं ' लाकूड ' मध्यें पहा.

**लाकण, लाकन** न० मोटेच्या तोंडाला जें मोठें लोखंडाचें कडें असतें तें चामड्याच्या थैल्याच्या कांठास किं० कड्यांस जोडणारे जे कातड्याचें बंध ते किं० ज्या वाद्या त्या प्रत्येक.

**लांकण** ' लांक, लांकण ' पहा. ॐ **लांकण-दोर** पु० ' लांक, लाकण ' मध्यें अर्थ ३ पहा.

**लांकणें, लाखणें** [ म० लांक, लांकण; सं० लेखनी ] स० क्रि० १ ( दोन पशु किं० माणसें ) दोरीनें जुळविणें किं० सईलसर बांधणें. २ (जनावर किं० माणूस ह्यांना) खुंट्याला दोरीनें बांधणें. ३ ( एक दोरी ) दुसऱ्या दोरीशीं वळून किं० गांठ मारून, किं० बिरडें आणि गुळखी यांच्या योगानें जोडणें किं० जुळविणें. ४ ( कोणा माणसाला किं० जनावराला ) कोणा रक्षकाच्या हवालीं करणें. ५ ( सामान्यतः ) जोडणें; जुळविणें; संबद्ध करणें.

**लाकणें, लाखणें** [ म० लाख ] स० क्रि० ( दागिना, बांगडी, इ० वर ) लाखेचें पाणी चढविणें किं० लाखेनें आच्छादणें किं० मढविणें.

**लाकूड** [ सं० लकुड; लगुड ] न० १ काष्ठ; वृक्षाचा तोडलेला कोणताही फलपुष्पपर्णादिरहित भाग. २ ( लक्षणेनें ) ताठ, टणक, न लवणारा शरीर, गात्र, शेंग, इ० कोणताही पदार्थ; उ० कढीमध्यें हीं लाकडें कशाला घातलीस ?(लाकडें =शेवग्याच्या शेंगांचे तुकडे ). उ०म्हशीला शेतकऱ्यानें खाऊं घातलें नाहीं म्हणून ती लाकूड झाली. ॐ **लाकूडफाटा** पु०, **लाकूडफाटें** न० लाकडें, गोवऱ्या, इ० सर्पण. **जिभेचें लाकूड होणें** जीभ कोरडी झाल्यामुळें खाणें,बोलणें, इ० कामांना असमर्थ होणें. **लाकूड होणें** ( किं० **वळणें** ) १ शुष्क होणें; टणक किं० ताठ होणे. २आजाराने रोड होणें.**लाकडास माकड जोडणें** कसेंही करून वरास वधू मिळेसें करणें; लग्न करूं इच्छिणाऱ्या माणसाला नानाप्रकारच्या लटपटी खटपटी करून वधू मिळवून देणें.**लाकूड मदारी** पु० अत्यन्त किडकिडीत माणूस.

**लाकेरी** स्त्री० एक झाड.

**लाख** [ सं० लाक्षा ] स्त्री० १ बोर, पिंपळ, वड, इ० वृक्षांपासून चिकासारखा जो पदार्थ मिळतो आणि जो रंग इ० कामीं योजतात तो. २ एक प्रकारच्या किड्याचा देह मृत होऊन वाळून त्याचा होतो तो पदार्थ,-ज्याचा पत्रावर मोहोर करणे इ० कामीं उपयोग होतो.ॐ **लाखट** वि० ज्याच्या पोटांत लाख भरली आहे असा ( मणि, तोडे, इ० दागिना ).**लाखट बेगड** वि० १पोटीं लाख भरून केलेला( दागिना ).२ अशक्त, कमजोर ( माणूस,पदार्थ ). ३ दिखाऊ पण कुचकिमतीचा. **लाखदाणा** पु० चीन देशाची उंची लाख. **लाखपाड** पु० हिरा, पाच, लाल, इ० रत्नें अंगठी इ० च्या कोंदणांत बसवितांना त्या कोंदणांत पूर्वी लाख भरणें **लाख लोटणें,लाखलोटें, लाखलोटकें (-गें)** न०, **लाखलोटा** पु० लाखेच्या पाण्यानें आच्छादिलेलें मडकें,-ज्यांत लोणचें, मोरंबा, इ० ठेवितात. **लाखीशाई** स्त्री० लाख, काजळ, इ० च्या मिश्रणानें बनविलेली चकचकीत शाई. **लाखांडी** [ म० लाख+ कांडी ] स्त्री० लाखेची केलेली कांडी. **लाखाळें** न० लाखेनें मढविलेलें भांडें किं० दागिना. **लाखी** वि० १ लाख भरलेला. २ लाखेनें मढविलेला. ३ लाखेच्या रंगाचा.

**लाख** [ सं० लक्ष ] पु० एक ह्या अंकावर पांच शून्यें देऊन होणारी संख्या. मागें ' लक्ष ' पहा.

**लाखटणें** [म०लाख] अ०क्रि० हिरवी मिरची, लसूण, किं० तेलकट पदार्थ खाण्यांत आल्यानें किं०अन्य कांही कारणानें( घसा )शब्दोच्चार किं० स्पष्ट शब्दोच्चार करण्याला करण्याला असमर्थ होणें.

**लाखटणें** [ म० लाख ] स०क्रि० (पदार्थावर) लाखेचें पाणी देणें.

**लाखण, लाखणें** वर ' लाकण,' ' लाकणें ' पहा.

**लाखणें** वर ' लक्षिणें ' पहा.

**लाखालिंप** [ म० लिंपणें ] स्त्री० शेण, माती, इ० नीं भिंत, जमीन, इ० ची दागदुजी.

**लांखळणें, लांखाळणें** [ म० लांख ] स० क्रि० ( कोणेकापासून ) कांहीं लाभ मिळवावयाच्या इच्छेनें त्याचा पिच्छा पुरविणें किं० त्याच्या मागें लागणें.

**लाखा** पु० अळू, पोकळा, इ० वर कृमिरूप रोग पडतो तो.

**लाखाजोहर** पुढें ' लाक्षाजोहर ' पहा.

**लांखाळणें** वर ' लांखळणें ' पहा.

**लाखें** [ म० लाख ] न० लाखेच्या रंगाचा शरीराच्या त्वचेवर पडलेला डाग किं० चट्टा.

**लाखों** [ म० लाख ] क्रि० वि० लक्षावधि.

**लाखोटा** [ हिं० ] पु० १ कागदाच्या पिशवींत घातलेलें पत्र. २ः आंत पत्र घालून जिचें तोंड बंद केलें आहे अशी पिशवी. ३ पत्र आंत घालण्यासाठीं केलेली कागदाची पिशवी.

**लाखोली** [ म० लाख; सं० लक्ष; आवलि ( पंक्ति ) ] स्त्री० १ फुलें, फळें, तांदूळ, इ० चा देवाला अर्पण केलेला लाख म्ह० देवाला अर्पण केलेलीं एक लाख फुलें, फळें, इ० समुच्चयानें. २ ( लाक्षणिक ) शिव्यांचा एक लाख; उ० त्याणें मला शिव्यांची लाखोली वाहिली ( म्ह० मला एक लाख शिव्या दिल्या ).

**लाख्यापंचोतरी (–च्या )** मागें ' लखपचोतरी (–च्या ) ' पहा.

**लाग** [ म० लागणें ] स्त्री० धान्यादींचा दुसरा बहर.

**लाग** [ सं० लग्; म० लागणें ] पु० १ संभव; शक्यता; उ० आज पाऊस पडण्याचा लाग आहे; उ० ह्या नोकरींत पैसे मिळण्याचा लाग आहे. उ० त्या बुळबुळीत फरशीवरून चालण्याचा लाग नाहीं, पाय हटकून निसरतील. २ स्थिति; अवस्था; उ० आंबे पिकावयाच्या लागास आल्यावर ते काढा. ३ ( कांहीं कामासाठीं ) संधान ( बांधणें ); खटपट ( करणें ); वशीला (लावणें); उ० नोकरांसाठीं मी पुष्कळ लाग केले पण नोकरी मिळाली नाहीं. ४ मनांत बाळगलेलें ध्येय किं० उद्दिष्ट ( साधणें, फसणें ); उ० हा लाग साधला तर मी लक्षाधीश होईन. ५ लाभाची संधी; उ० नोकरीचा लाग आला आहे. ६ कोणेकावर कोसळलेलें दुर्दैव; दुर्दैवाचा प्रसंग किं० हल्ला; उ० मी आजपर्यंत दोन तीन लागांतून निभावलों; उ० जिवावरचा लाग; उ० प्राणावरचा लाग. ७ झाड, शेत, इ० पासून फळें, धान्यें, इ० रूप प्राप्ति; उ० हरसाल झाडास लाग कमी असतो. ८ फलादि रूप उत्पन्न करण्याची वृक्षादींची स्थिति; उ० नारळमाड लावल्यापासून दहाव्या वर्षीं तो लागास येतो. ९ गलबत, होडी, इ० चा तळ जेथें जमीनीस लागतो ती जागा. १० बायकांच्या चोळीच्या बाहीचा ढुशांखालचा तुकडा. ११ पत्ता; शोध; तपास. १२ आधार; पाया,–जड वस्तु वर ठेवण्याच्या संबंधानें; उ० ह्या खांबाला हा थोडा लाग म्हणून पुरा. १३ तंबाखू इ० पदार्थांचा अमली गुण. १४ कांहीं कामाचा योग्य समय किं० हंगाम; उ० पेरणीचा लाग, कापणीचा लाग. १५ बंदूक, तोफ, इ० चा पल्ला म्ह० जेथपर्यंत तिचा मारा चालेल तेथपर्यंतचा प्रदेश. १६ विशिष्ट गात्र, इंद्रिय, इ० ची विकृति. **लाग** स्त्री० उडी ( मारणें, साधणें ). ॐ **लाग चालविणें** ठरलेल्या क्रमानें किं० सरणीनें कांहीं काम चालू करणें. **लाग लावणें** संधान बांधणें; कांहीं कामानिमित्त प्रयत्न सुरू करणें. **कांहीं काम लागीं लागणें** ( किं० **लागावर येणें** ) तें सुरळीतपणें सुरू होणें किं० चालू लागणें.

**लागट** [ म० लागणें ] वि० १ जी खाल्ली असतां छातींत बांध बसतो अशी ( सुपारी ). २ जें खाल्लें असतां कैफ किं० अमल येतो असें ( हरीक इ० धान्य ). ३ जें खाल्लें असतां घसा, जिभ, गाल, इ० ना रिवारिव होतें असें ( अळू, सुरण, इ० ). ४ निर्लज्य; लतकोडगा ( मनुष्य ). ५ ज्याला थोडीशी कीड लागली आहे असें ( धान्य, लाकूड, इ० ). ६ लोचट; झिडकारलें असतांही जो लगट करतो असा.

**लागटा** [ म० लागणें ] पु० परंपरा; माळका; ओळ ( लावणें, करणें, होणें, इ० ).

**लागण** [ म० लागणें ] स्त्री० १ नांगरणी.

२ सालोसाल नांगरली जाऊन जोतून पिकें काढण्यांत येतात अशी जमीन; लागवडीखालची जमीन. ३ लागवड. ४ पिशाचबाधा. ५ देवी, आमांश, इ०नीं पछाडलेली माणसें किं० अशा माणसाची संख्या. ❀ **लागणदार** पु० १ मिरासदार; ठिकाणदार. २ जमीन प्रथम लागवडात आणणारा. ३ जमीन कसणारा मालक किं० खंडकरी.

**लागणें** [ सं० लग ] अ० क्रि० ह्या क्रियापदाचा संलग्न, संयुक्त, किं० संबद्ध होणें, जुळणें, चिकटणें, किं० जडणें, असा वस्तुतः एकच अर्थ आहे पण तो स्थिति, देश, काल, मरणी, पदार्थ, इ० च्या भिन्नत्वामुळें भिन्नसा वाटतो. आम्हाला ह्या क्रियापदाच्या अर्थाचें शास्त्रीय दृष्ट्या बिनचूक असें वर्गीकरण करणें आणि उदाहरणें देणें ह्या लहान कोशांत शक्य नसल्या कारणानें आम्ही कांहीं मुख्य अर्थ पुढें देतों. १ स्पर्शिणें; उ० तूं त्याला लागूं नको, तुला विटाळ होईल. २ ( वृक्ष, रोप, शेत, बीज, इ० ) रुजणें किं० ( त्यांनीं ) भूमींत मुळें खुपसणें. ३ ( शस्त्र, काठी, बाण, इ० नीं ) वेधणें किं० प्रहार करणें किं० जखम करणें. ४ (डोळे, दार, झाकण, इ०) मिटणें. ५( श्लोक, शब्द, भाषण, इ० तील अर्थ) ध्यानांत येणें. समजणें, किं० बुद्धीनें ग्रहण केला जाणें; उ० हा श्लोक ( किं० नियम किं० सूत्र ) मला चांगला लागला. ६(कोणेकाचें कठोर भाषण, शिव्या, इ० ) अंतःकरणास बोचणें किं० दुःखदायक होणें; उ० तुझें कुचकें भाषण त्याला लागलें. ७ ( पदार्थाचे भाग किं० अवयव ) एकमेकांस योग्य प्रकारें जडणें; उ० ही बिजागरी झाकणाला. आतां नीद लागली. ८ अनुरूप किं० सोयीचा किं० असावा तसा असणें. ९ चाल, रीत, इ० प्रचारांत येणें. ९ ( कांहीं व्यसन, खोडी, लकब, चटक, इ० ) कोणेकास जडणें. १०(ताप, खोकला, दमा, इ० रोग) औषधें इ० नीं बरा न होतां कोणेकाच्या शरीरांत दृढपणें राहाणें. ११ (तहान, भूक, इ० ) कोणकाम जाणवणें. १२ वाटेंत किं० चाललेल्या क्रमांत दिसणें, आढळणें, येणें, किं० प्रादुर्भूत किं० उपस्थित होणें; उ० देऊन पाषाण गांवास जातांना तुम्हाला वाकडी वाघळ लागेल; इ० दोन सरळव्याजाचीं उदाहरणें संपून चक्रवाढव्याजाचीं उदाहरणें लागलीं. १३ ( भांडण, वाद, इ० ) सुरू होणें. १४ यदृच्छेनें असणें; उ० ही काय मुंबई लागली आहे ? उ० हें काम सोपें लागलें आहे ? १४ कांहीं वस्तु कांहीं गुणांच्या बाबतींत अमुक प्रकारची आहे असें प्रतीत होणें किं० आढळून येणें; उ०गोड लागणें, तिखट लागणें. १५ (नोकरी इ०)मिळणें. १६ नात्याच्या संबंधानें असणें; उ० तो माझा साडू लागतो. १७ (वृक्ष) फलोत्पादनाच्या स्थितीस येणें; ( वृक्षानें ) फळें देणें; उ० ह्या प्रांतांचे माड लागूं लागले म्हणजे असे लागतात कीं एका एका माडास हजार हजार नारळ लागतात. १८ कीड, बुरशी, इ० नीं ( लाकूड इ० ) खराब होणें. १९ ( सुपारी इ० नीं ) कैफ किं० दुःखाची भावना उत्पन्न करणें. २० कांहीं कार्यार्थ ( पैसा इ० ) जरूर असणें किं० खर्चिला जाणें. २१ ( वाद्य, कंठ, इ० ) योग्य स्वर उत्पन्न करण्याच्या स्थितीस येणें. २२ बोलतांना ( माणूस, जीभ, इ० ) अडखळत चालणें. २३ योग्य प्रकारें किं० सुरळीतपणें ( यंत्र, इ० ) काम करण्याच्या स्थितीप्रत पोंचणें. २४ ( चाकू, कातरी, इ० हत्यार ) आपआपलें काम करावयास समर्थ होणें. २५ परिणाम किं० अंत ह्या नात्यानें संबद्ध असणें; उ० उपजल्या प्राण्यास मरण हें लागलेंच आहे. २६ ( शस्त्र ) सहाण, निसणा, इ० वर घासले जाऊन तीक्ष्ण होणें. २७ (कोणी माणूस) कांहीं कामांत व्यापृत होणें किं० गुंतणें; उ० मी आतां अभ्यासाला लागतों. २८ ( पाऊस, पावसाळा, उन्हाळा, इ० ) सुरू होणें. २९ जनावर, माणूस, इ०च्या पाठ, पाय, इ० गात्रांस ( खोगीर, जोडा, लगाम, इ० च्या घर्षणानें ) इजा होणें. ३० (पुरुष प्राण्यानें स्त्रीशीं मैथुनार्थ) संगत होणें. ३१ ( कांहीं काम ) कोणेकाच्या कर्तृत्व, जबाबदारी, इ० वर सोंपावलें जाणें. **टीप,**–ऊं, आवयास, इ० प्रत्यय क्रियापदांस लागून त्यांचे पुढें ' लागणें ' हें क्रियापद आलें असतां ती क्रिया सुरू करणें असा अर्थ होतो; उ० तो तें करूं किं० करावयास लागला. **टीप.**– 'वें' ह्या प्रत्ययापुढें ' लागणें ' आलें तर ' जरूर होणें ' ' अनिवार्य होणें ' असें अर्थ होतात; उ० त्याला जावें लागलें. **टीप,**–'ऊं' प्रत्ययापुढें

'लागणें' आल्यास 'मदत करणें' असा अर्थ होतो; उ० हा घोडा मला उचलूं लाग. **टीप,**— 'लागणें' ह्या क्रियापदाचे कांहीं वाक्प्रचार पुढें देतो. ❀ **कोणेकाला शौचास लागणें** त्याला मलविसर्जनार्थ जाण्याची जरुरी भासणें. **मी काय तुझें चार चवल लागतों ?**(किं० **लागला गेलों आहे ?**) मी अल्प स्वल्प बाबतींतही तुझा मिंधा नाहीं; तुझें यत्किंचित् सुद्धां देणें मजकडे नाहीं. **कोणी मनुष्य कोणेकाहीं लागून असणें** त्याच्या तंत्रानें किं० मर्जीप्रमाणें वागणारा तो असणें. **लागत गुण पु०** संसर्ग किं० सहवास यांच्या योगानें कोणेकास जडतो तो गुण; उ० कोणाचा कोणास लागत गुण असतोच. **लागता गुण पु०** आपणाकडे संपत्ति, माणूस, मित्र, इ० ओढून घेण्याचा जो कोणेकाच्या अंगीं उपजत गुण असतो तो. **लागता झुगता वि०** योग्य सरणीनें सुरू झालेला किं० चालूं लागलेला. **लागपाठ, पाटलाग पु०** कोणेकाला धरण्यासाठीं त्याच्या मागें जाणें ही क्रिया. **मला ही भाजणी दळावयाला हात लाव** मदत कर. **त्याचा डोळा लागला** त्याला झोप आली.

**लागभाग** [ म० लाग, लागणें + भाग ] **पु०** १ संभव; उ० आज पाऊस पडेल असा लागभाग दिसत नाहीं. २ शक्यता; उ० बाघापुढें जाण्याचा त्याचा काय लागभाग आहे? ❀ **लागीं भागीं, लागाभागास क्रि० वि०** १ जवळ; सान्निधच्या प्रदेशांत. २ आटोक्यांत; संभवनीय अशा स्थितींत; शक्य कोटींत.

**लागरा, लागीर वि०** १ ज्याला लवकर कीड लागते असें ( लाकूड, धान्य ). २ ज्याला कीड लागली आहे असें ( धान्य, लाकूड, इ० ). ३ बोलतांना अडणारा ( माणूस, जीभ ).

**लागलाव्या** [ म० लाग+लावणें ] **वि०** धूर्त; हुशार; चतुर; स्वकार्यार्थ संधानें बांधण्यांत किं० वशीले लावण्यांत पटाईत.

**लागलाच क्रि० वि०** ( लिंगवचनांप्रमाणें फिरणारें ) तावडतोब; वेळ न दवडतां.

**लागवड** [ म० लागणें ] **स्त्री०** १ शेतकीच्या संबंधाचीं सर्व कामें (नांगरणें, पेरणें, बेणणें, इ०) समुच्चयानें. २ जमीन लागवडीत आणणें, गोठे, सोपे, इ० चीं दागदुजी करणें, गांव वसविणें, इ० कामांसंबंधाचा खर्च. ३ शेतें, बागा, इ० मध्यें धान्यें, झाडें, इ० लावणें. ४ ज्यांत धान्यें, झाडें, इ० लावलीं आहेत अशीं शेतें, बागा, इ०.

**लागवण** [म० लावणें] **स्त्री०** शेताची लावणी.

**लागबांधा** [ म० लागणें+बांधणें ] **पु०** संबंध; नातें.

**लागवेग पु०** त्वरा; घाई; लगबग.

**लांगालुंगा** [ म० लुंगा ] **वि०** १ हलकें किं० पोकळ ( धान्याचें कणीस ). २ अशक्त, लेचापेचा ( माणूस, पशु, पदार्थ ).

**लागावळ** [ म० लागणें+आवली ( पंक्ति )] **स्त्री०** १ विटाळाचा किं० ओंवळ्याचा संबंध. २ सुरुंग इ०ची दारूची वात. ३ नात्याचा संबंध.

**लागीं** [ म० लागणें ] **श० यो० अ०** ला, प्रत, साठीं ( काव्यांत ); उ० तुजलागीं (=तुला), चरावयालागीं ( चरावयासाठीं ), इ०.

**लागां** [ म० लागणें ] **वि०** १ योग्य; साजेसा. २ आटोक्यांतील. ३ चिकटलेला; जडलेला; निगडित.

**लागीर** [ म० लागणें ] **वि०** १ किड्यांनीं खाल्लेलें किं० पोखरलेलें ( धान्य, लाकूड ). २ किडे खाऊन पोखरतील असें ( धान्य, लाकूड ). ३ दुःसंगतीनें बिघडण्याजोगा ( मुलगा, माणूस ). ४ भूत, पिशाच, इ०नीं पछाडलेला ( माणूस ). ५ कोणेकाशीं मित्रवादिसंबंधानें जुळलेला ( माणूस ). ६ अमल, कैफ, इ० गुण ज्यांत फार आहेत असा ( गांजा, तंबाखू, सुरण, इ० ). ७ दुसऱ्यांना आपल्या अंगच्या वाईट गुणांनीं बाधक किं० अपायकारक होणारा. ८ प्रेमानें दुसऱ्या माणसास आपणाकडे ओढणारा किं० दुसऱ्या माणसास चिकटणारा. ❀ **लागीर होणें** भूतबाधेनें पछाडलें जाणें.

**लागीर** [ म० लागणें ] **स्त्री०, न०** १ भूतबाधा. २ भूत; पिशाच.

**लागुनी, लागून श० यो० अ०** (कवितेंत) कडे, ला, प्रत, इ०. मागें 'लागीं' पहा.

**लागूं** [ म० लागणें ] **वि०** १ परिणामकारक ( पडणें, होणें ); उ० मला एरंडेल अजून लागूं झालें ( किं० पडलें ) नाहीं. २ जुळणारा; जुळलेला; योग्य स्थानीं आधिष्ठित झालेला. ❀ **लागू-**

**लागू** वि० नातें, व्यवहार, धंदा, इ० संबंधानें जुळलेला.

**लांगूल** [ सं० ] न० शेपूट. ॐ **लांगूलचालन** न० १ लाडीगोडी ( करणें ). २ कांहीं स्वार्थ साधण्यासाठीं समर्थांची खुशामत (करणें).

**लागोपाठ** [ म० लागणें+पाठ ] क्रि० वि० एकामागून एक, एका मागून एक, अशा क्रमानें मध्यें खंड न पडतां किं० पडूं देतां; अखंडित क्रमानें.

**लागो मागो दिवाळी** [म० लागणें (ठोकर बसणें )+भागणें ( दमणें )+दिवाळी ( एक सण ) ] उ० वा० अ० लाभ किं० यश हें ध्येय ( दिवाळी ) डोळ्यापुढें ठेवून प्रयत्न चालवावा, हानि झाली ( लागणें) तरी चिंता नाहीं, कष्टानें थकवा आला (भागणें) आला तरी चिंता नाहीं; उच्च ध्येय धरून काम करावें, फळ न आलें तरी खचूं नये. [ बाधा ( होणें ).

**लांगोर, लागोर** [ म० लागणें ] स्त्री० भूत-

**लांगोरणें, लागोरणें** [ म० लांगोर, लागोर] अ० क्रि० ( कोणी मनुष्यानें ) भूतबाधेनें पछाडलें जाणें.

**लाग्या** [ म०लागणें] पु० १ स्त्रीचा जार किं० यार. २ युक्त्या किं० हिकमती करण्यांत किं० संधानें बांधण्यांत चतुर किं० पटाईत.

**लाघव** [ सं० ] न० १ क्षुद्रपणा; हलकेपणा. २ तिरस्कार; अपमान; कमीपणा. ३ चलाखी; चपलपणा; चापल्य. ४ कौशल्य. ५ संक्षेप, संक्षिप्तपणा. ६ ( मराठींत ) आर्जव, लाडीगोडी, खुशामत. ७ ( मराठींत ) लबाडी; बतावणी. ८ ( मराठींत ) पाल्हाळ. ९ ( मराठांत ) वात्रटपणा. ॐ **हस्तलाघव** न० हातचलाखी. **शब्दलाघव** न० आपल्या भाषणांतील शब्दांचा पहिला अर्थ सोडून दुसरा अर्थ घेऊन आपलें म्हणणें खरें आहे असें सिद्ध करणें ह्या रूपाचा वात्रटपणा ( करणें ). **लाघवट** स्त्री० लवचळपणा; फाजील सलगी. **लाघवी** वि०१कुशल. २आर्जवी; लाडीगोडीनें आपलें काम दुसऱ्याकडून करून घेणारा. ३ मायावी; कपटी. ४ आश्चर्यजनक. पु० १नट; बहुरूपी. २ गारोडी.

**लाघळ, लाघळकी, लाघळमावशी** मागें 'लघाळ' इ० पहा.

**लाघावळ** [ म० लागणें ] स्त्री० १ ओळ, पंक्ति, अखंडित क्रम. २माग, पत्ता. ३वात्रट भाषण.

**लाघाळ** इ० मागें 'लघाळ' इ० पहा.

**लाच, लांच** पु०, स्त्री० आपलें काम करून घेण्यासाठीं किं० आपल्या कामांत कोणी विघ्न आणूं नये म्हणून निषिद्ध प्रकारें त्याला गुप्तपणें दिलेलें द्रव्य इ० ( देणें, भरणें ). ॐ **लाचलुचपत** स्त्री० स्वकार्यासाठीं कोणेकास लाच देणें इ० रूप निंद्य कृत्यें. **लाचखाऊ, लाचखोर** वि० लाच घेऊन दुसऱ्याचा कामें करणारा. **लाचकोडगा** वि० निर्लज्ज.

**लांचवणें** [ म० लांच ] अ० क्रि० कांहीं वाईट गोष्ट करण्याला सवकलेलें असणें.

**लाचार** [ फा० ] वि० निरुपाय; हतधैर्य; दीन.ॐ **लाचारी** स्त्री०दीनपणाची स्थिति; दैन्य.

**लांचाविणें** [ म० 'लांचावणें' चें प्रयोजक] स० क्रि० ( कोणेकाला ) त्याची इष्ट वस्तु देऊन आकृष्ट किं० वश किं० अनुकूल करून घेणें.

**लांच्छन** [ सं० ] न० १ खूण; चिन्ह. २ नांव; अभिधान. ३ डाग; कलंक; बट्टा; दुर्लौकिक; बदनामी.

**लांच्छित** [ सं० ] वि० ज्याला डाग लागला आहे असा; कलंकित; निंद्य.

**लाज** [ सं० लज्जा ] स्त्री० १ शरम. २ भित्रेपणा; संकोचवृत्ति; दबकलेपणाची भावना. ३ कोणेकाच्या योग्यतेला किं० दर्जाला अनुसरून जो त्याला मान द्यावयास पाहिजे तो ( राखणें ). ४ कलंक; कालिमा; बट्टा; उ० तूं आपल्या बापाच्या धवल कीर्तीला खचित लाज लावणारा ( किं० आणणारा ) पोरगा आहेस. ॐ **लाजेकाजेनें** क्रि० वि० लोक आपणास काय म्हणतील हें मनांत आणून. **लाजकोंबडा** पु०लाजरा माणूस.**लाजरा, लाजट** वि० लाजणारा. **लाजमर्यादा, लाजलज्जा** स्त्री० ए० व० सभ्यपणाची वर्तणूक करण्याकडे कल. **लाजलावणा** (-ण्या ),**लाजलाव्या** वि० कुटुंब, संस्था, जात, इ०ना आपल्या दुष्कर्मांनीं कलंक लावणारा ( माणूस, कृत्य, इ० ). **लाजवट** वि०लाजणारा; शरमणारा. **लाजाळू, लाजरी** स्त्री०, **लाजरूं** न० जिच्या पानांना हात इ० चा धक्का लाग-

त्यांना तीं भिटतात अशी एक वनस्पति. **लाजाळू**, **लाजरा** वि० १ लाजणारा. २ भिडस्त. **लाजिरवाणा** वि० १ लाज आणणारा; लाज लावणारा. २ लाजलेला; शरमिंदा. **लाजिरवाणें** न० कमीपणा आणणारी कांहीं गोष्ट.

**लाजणें** [ म० लाज ] अ० क्रि० १ शरमिंदें होणें. २ भिडस्तपणानें दबकणें किं० मागें हटणें. ३ ( लाजाळू नावाच्या वनस्पतीनें ) धक्का लागताच पानें मिटणें.

**लाजविणें** [म०'लाजणें'चें प्रयोजक]स०क्रि० १ लाजेंत करणें.२पराभूत करणें.३०पेक्षा वरचढ ठरणें कि०असणें; उ० तुझें मुख चंद्रास लाजवितें.

**लाजा**[सं०] स्त्री० लाह्या.॰**लाजाहोम** पु०१ लग्नाच्या विधांत वधूवरानीं अग्नांत लाह्यांची आहुति देणें.२अशा प्रकारें आहुति देऊन केलेला होम.

**लाजिवा** [ अ० लाझिम् ] वि० १ ( कांहीं कामीं ) जो योग्य किं० लायक तो. २ ( **मराठींत** ) लाजलेला. ३ मिंधा; ओशाळलेला. ४ उपकाराखालीं दडपलेला. **लाजीम** वि० कांहीं कर्तव्यानें बांधलेला; कांहीं करावयाला बांधील. पु० १ हक्क. २ बांधीलपणा. ॰ **लाजिमदार** वि० १ लाजलेला; दबकलेला. २ कोणेकाच्या मिंधेगिरींत असलेला; उपकाराखालीं दडपलेला. **लाजिमदारी** स्त्री० ओशाळगत; मिंधेगिरी. **लाजिमा, लाजिम्मा, लांझा** पु० १ वादाची कांहीं गोष्ट; निकालांत न निघालेलें काम; संदिग्ध अशी कांहीं बाबत ( तोडणें, निघणें, राहणें ). २ हक्काची कांहीं बाबत; हक्क. ३ कांहीं कामीं देण्याघेण्याचा संबंध. **लाजिमा, लाजमा** [अ० लाझिमा] पु०कर;हक्क.

**लाट** स्त्री० १ पाण्याचा तरंग; लहरी. २ बगाडाच्या चौकटीचें वरचें म्हणजे माथ्याचें लाकूड. मागें ' बगाड ' पहा. ३ चुना, पोहे, इ० कुटण्याची तुळई. ४ तेल्याच्या घाण्याचें आडवें तुळवट. ५ उसाच्या चरकाचें तुळवट,– जें बैल किं० माणूस वर्तुळाकार फिरवितो. ६ देवाच्या मूर्तीपुढें जें आडवें लाकूड असतें तें,– ज्याच्या आंत दर्शनार्थ आलेले लोक जाण्याला बंदी असते. ७ घराच्या बांधकामांत कड्यांखालीं असते ती तुळई. ८जमीन सपाट करावयासाठीं दगड,लोखंड,इ०चा दंडगोल फिरवितात तो.

**लाटण** [ म० लाटणें ] न० पोळी लाटतांना पोळी लाटण्याला चिकटूं नये म्हणून पसरून घालतात ती पिठी.

**लाटणी** [ म० लाटणें ] स्त्री० १ पोळी, पापड, इ० करण्याचें जें लाकूड तें; हें हातभर लांब आणि गुळगुळीत असून दोन टोकांकडे बारीक असतें. २ वरील साधनानें पोळीवर करतात तो संस्कार.

**लाटणें** न० वर ' लाटणी ' अर्थ १ पहा. ॰ **लाटण्यासारखी बाजरी भरणें, लाटण्यासारखें शेत भरणें** बाजरीचीं ताटें लठ्ठ होणें किं० कणसांतील दाणे धष्ट पुष्ट झालेले असणें.

**लाटणें** [ म० लाटणें ] न० वर ' लाटणी ' मध्यें अर्थ १ पहा.

**लाटणें** स० क्रि० १ ( पोळी, पापड, इ०चीं पिठाची गोटी ) साधनविशेषानें चेपून फिरवून पातळ आणि वर्तुळाकार करणें.२ (राहाट गाडगें) वाटोळें फिरवून विहीर इ० तून पाणी वर काढणें. ' पाणी लाटणें ' अशी ' पाणी ' यावरही कर्मता येऊं शकते. ३ जेन, बुरणूस, इ० करणें असतां ( खळ लाविलेल्या वेशांवर ) मागें पुढें हात फिरविणें. ४ (कोणेकाची कांहीं वस्तु) त्याच्या परवानगीशिवाय किं० इच्छेविरुद्ध बळकावणें. ५ दांडग्या हातानें (कांहीं काम) करणें.

**लाटणें** [ म० लाटणें ] न० पोळी, पापड, इ० करावयाचें साधनविशेष. ॰ **लाटण्या, लाटणेश्वर** पु० धिप्पाड बांध्याचा माणूस, पशु, किं० कांहीं पदार्थ.

**लाटा** [ म० लाटणें ] पु० १ पापड इ० कांच्या पिठाचा लाटावयाच्या सोयीचा लांबट जो गोळा करतात तो. २ भारणाचा डोकीवर वहावयासाठीं केलेला भारा. ३ लाटणें. वर ' लाटणें ' न० पहा. या अर्थी ' लाटा ' पु० सुद्धां. ॰ **कोणत्याही कामावर लाटा** ( किं० **लांठा** ) **फिरविणे** तें कसेंबसें करून टाकणें; तें निष्काळजीपणानें किं० दांडग्या हातानें करून टाकणें.

**लाटालाटी, लाटालाट** [ म० लाटणें] स्त्री० १ काम करण्यांत अप्रामाणिकपणा किं० लबाडी.

२ दुसऱ्याची वस्तु बळकावून बसणें.

**लाटानुप्रास** [ सं० लाट ( एक देशविशेष+ अनुप्रास ] पु० जेव्हां तेच शब्द त्याच अर्थानें परंतु भिन्न रीतींनीं अन्वित होऊन वाक्यांत अनेक वेळां येतात तेव्हां जो अनुप्रास होतो तो लाटानुप्रास. ' चक्र चक्रपाणि पाणिमाजि तो तदा धरी ' ह्या वाक्यांत दोन वेळां लाटानुप्रास झाला आहे. आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत उपोद्घात पहा.

**लाटी** [ म० लाटणें ] स्त्री० १ पापड, करंज्या, इ० करण्यासाठीं पिठाच्या थापट्या करतात त्या प्रत्येक. २ लाकडाचा खांब किं० तुळई.

**लाटीव** [ म० लाटणें ] वि० लाटून केलेली ( पोळी, बुरणूस, इ० पदार्थ ).

**लाटोरी** [ म० लाटणें ] स्त्री० दोन पदरांची पोळी इ०

**लाट्या** [ म० लाटणें ] पु० १ भिजलेली डाळ उखळांत घालून घाटण्याच्या सोयीचा दगडाचा वरवंटा. २ पापड करावयाच्या पिठाचे जे जाडी आणि लांबट आकार करतात ते प्रत्येक. ३ दांडगेश्वर; धटिंगण. वि० दुसऱ्याचे पदार्थ उपटण्याच्या स्वभावाचा ( मनुष्य ). ❀ **लाट्यागंगाजी, लाट्यागोमाजी** पु० दुसऱ्याचे पदार्थ उपटणारा.

**लाठ** स्त्री० विहिरींतून पाणी काढण्याची तीन वांशांवर आधारलेली एक रचना.

**लांठ, लांठा** वि० १ दांडगा; धटिंगण. २ धीट; साहसी. ३ विपुल ( पाऊस, झाडी, धान्य, इ० ). ❀ **लांठाई** स्त्री० दांडगाई; धिंगामस्ती.

**लाढा** पु० १ भातेणाची जुडी. २नाचणीच्या ताटांची जुडी. वि० वांझ ( गाय, म्हैस, इ० ). ह्या अर्थी ' लाढा ' सुद्धां. [लाटणें.

**लाठा** पु० पोळी, पापड, इ० लाटण्याचें साधन;

**लाड** [ सं० लड्=वागडणें, खेळणें ] पु० मूल इ० वर केलेलें प्रेम; मूल इ० चें केलेलें कौतुक; मूल इ० चें लालन. प्रयोग बहुधा अ० व०. ❀ **लाड चालविणें** ( किं० **पुरविणें** ) मूल इ० ना आवडती वस्तु देऊन त्यांना खूष करणें.

**लाड** पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. हे लोक विड्यांचीं पानें, सुपारी, भांग, गांज्या, इ० पदार्थ विकतात. ❀ **लाडसोनार** पु० पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा.

**लाड** स्त्री० १शिमग्याच्या सणांत करतात तो चिखलाचा खळगा. २राड, चिखल. ❀ **लाडगडा** पु०, **लाडझगडें** न० प्रेमाचें भांडण किं० वाद.

**लाडकणें** [ म० लाड] स० क्रि० (मूल, कुत्रा, मांजर, इ० ना ) प्रेमपूर्वक वागविणें किं० त्यांचे लाड पुरविणें.

**लांडकतोड, लांडगतोड लांडगेतोड** [ म० लांडगा+तोडणें ] स्त्री० १ लांडग्यांनीं शेत, शेळ्यामेंढ्यांचा कळप, इ० ची केलेली नासाडी. २ कापाकापी; कत्तल. ३ अनेकांनीं एकदम दिलेला उपद्रव. ४ शत्रूवर आवेशानें तुटून पडून त्यांचा उडविलेला विध्वंस.

**लाडका** [ म० लाड ] वि० १ प्रिय; आवडता. २ कोणेकाच्या विशेष प्रेमांतील. ३ प्रेम उत्पन्न करणारें ( वर्तन, भाषण, हावभाव, इ० ). ४सौम्य किं० मृदु प्रकृतीचा. 'कठोर' च्या उलट. ५ आवडीचा, पसंतीचा ( धंदा, व्यापार, इ० ).

**लाडकाविणें** [म० लाडका ] स० क्रि० लाड करून ( मूल, कुत्रा, इ० ना ) बिघडविणें किं० शेफारून ठेविणें.

**लांडगा** पु० १ कुत्र्याच्या जातीचा एक वन्य पशु. २ एका तृणाचें बीं,-जें केश, वस्त्र इ० कांस लागलें असतां चिकटतें. २ आघाड्याचें बीं, किं० कळ्या म्हणून एक औषधी आहे तिचें फळ. ❀ **लांडगी** स्त्री० १लांडगा ह्या वन्य पशूच्या वर्गांतील स्त्री. २ कोंवपें हें जे शेतकीचें आउत त्याचें पातें.

**लाडणें** [ सं० लड्=खेळणें, वागणें ] अ० क्रि० १ कोणेकाच्या प्रेमास पात्र झालेलें असणें. २फाजिल लाड केले गेल्यामुळें (मूल इ०)बिघडणें.

**लाडन** [अ० लादन् ] न०, स्त्री० गूळ करावयाच्या काहिलीस उडदाचे पांठ इ० चे लुकण लावितात तें.

**लांडरूं** न० १ लांडोर (तुच्छतेंत) २ शिवीचा शब्द ( बायकी भाषेंत ). [जात.

**लाडसोनार** पु० सोनार लोकांची एक पोट-

**लांडा** वि० १ ज्याचें शेपूट तुटलें आहे किं० तोडण्यांत आलें आहे असा (कोणताही पशु). २ ज्याचा कांहीं अवयव किं० भाग छाटलेला आहे किं० असावा तितका लांब नाहीं असा (कोणताही पदार्थ,–हात, बोट, पाय, काठी, इ०). ३ कोणत्याही प्रमाणांत तोकडा. पु० कांणीही मुसलमान,–सुंता हा विधि मनांत घेऊन. ॐ **लांडा कारभार** पु० नसती उठाठेव.दुसऱ्याच्या कारभारांत केलेली लुडबूड;ज्यांत आपला संबंध नाही त्यांत नाक घालणें.

**लाडावणें** [ म० लाड ] स० क्रि० लाड करून (मूल इ० ना) बिघडविणें.

**लाडीगोडी** [ म० लाड+गोडी ] स्त्री० आर्जव; गोड गोड बोलणें; गोंजारणें.

**लांडी लबाडी, लांडी लटकी** स्त्री० लबाडी; खोटेपणाची कांही गोष्ट.

**लाडू** [ सं० लड्डु=लाड्डू ] पु० १ एक पकान्न-विशेष; हें अनेक पदार्थांचें असून त्याचा आकार चेंडूसारखा वाटोळा असतो. २ कोणताही चेंडूसारखा केलेला पदार्थ.

**लांडूर** स्त्री० लांडोर; मोराची स्त्री.

**लाडेला** मागें ' लाडका ' पहा.

**लाडोबा** [ म० लाड ] पु० फाजील लाड केल्यामुळें बिघडलेला मुलगा.

**लांडोर** स्त्री०, न० मोराची स्त्री. ॐ **मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते** (पण तें शोभत नाहीं) एकानें कांही गोष्ट केली आणि ती लोकांना आवडली म्हणून आपण ती गोष्ट केली तर ती लोकांना आवडेलच असें नाही; कदाचित् आपण उपहासास पात्र होऊं.

**लाढण** मागें ' लाडन ' पहा.

**लाढा** पु० १ गुळाची किं० काकवीची चिकटी. २ घाम, मळ, इ० मुळें अंगाची झालेली ओंगळपणाची स्थिति. ३ वांझोटी गाय, म्हैस, इ०.

**लाण, लाणी** [ सं० लवन ] स्त्री० भात इ० चें शेत कापण्याची क्रिया. **लाणी** स्त्री० गवत इ० कापण्याची कोयती.

**लात, लाथ** [ हिं० ] स्त्री० पायाच्या तळव्यानें केलेला प्रहार (मारणें) ॐ **कांही पदार्थावर लाथ मारणें** तो झिडकारणें; तो तुच्छ म्हणून त्याचा अनादर करणें. **तो लाथ मारील तेथें पाणी काढील** त्याच्या केवळ पायाचा तडाखा इतका जोरदार आहे कीं त्या तडाख्यानें जमीनीत खड्डा पडून तेथें विहीर होईल; तो अत्यन्त पराक्रमी आणि कर्तृत्ववान् माणूस आहे. **उठतां लाथ आणि बसतां बुक्की** चुकार किं० आडमुठ्या माणसाला दर चुकीबद्दल शिक्षा (केली पाहिजे).

**लातडणें, लाथाडणें, लातलणें** [ म० लात, लाथ ] स० क्रि० १ लाथांनीं (कोणेकाला) मार देणें. २ तुच्छ म्हणून झिडकारणें. ३ पायानें (कांहीं पदार्थ) दूर सारणें किं० उडवून देणें.

**लाताड, लाताडी** [ म० लात ] स्त्री० गाय, म्हैस, इ० च्या पायाचा तडाखा (मारणें, देणें, लागणें).

**लाताड,लाथाड**[ म०लात,लाथ ] वि०लाथा मारण्याची खोड ज्याला आहे असा(माणूस,पशु).

**लाताळ, लाताळें, लाथाळें** [ म० लात, लाथ ] न० १ घोडे, गाढव, इ० नीं एकमेकांना लाथा मारून केलेलें भांडण. २ आवेशाचें भांडण. ३ अव्यवस्थित कारभार; कामाचा गोंधळ किं० घोटाळा. ४ दोन किं० अधिक माणसांचें सभ्याचार सोडून जे भांडण तें.

**लादणी** [ म० लादणे ] स्त्री० घोडे, उंट, बैल, गाडी, इ० वर कंठाळ, ओझें, इ० चढविण्याची क्रिया.

**लादणें** [ हिं० लादना ] स० क्रि० १ बैल, गाडी, होडी, इ० वर (सामान, ओझें, माणसें, इ०) चढविणें किं० ठेवणें. २ कोणेकाच्या इच्छेविरुद्ध त्याला(कांही काम)करावयास लावणें किं०त्याच्यावर (कांहीं जबाबदारी) टाकणें किं० त्याला (कांहीं कर, वर्गणी, इ०) द्यावयास भाग पाडणें किं० त्याला (कांहीं कायदा) पाळावयास लावणें. ३ (चुना, रंग, गिलावा, इ० चा थर) भिंत, चित्र, जमीन, किं० कोणताही पदार्थ यांच्यावर चढविणें.

**लादा** [ हिं० लाद्धा ] पु० १ पीठ, चिखल, चुना, इ० चा मळून किं० कमावून केलेला गोळा. २ ज्याला पाणी सुटलें आहे असा भात,

गूळ, इ० पदार्थ. ३ बांध रचण्यासाठीं जमिनींतून पलीव ह्या आउतानें खणून काढलेलीं साधारण चौकोनी आकाराचीं ढिखळें.

**लादा** [ म० लादणें ] पु० १ चिरगुटांचा अव्यवस्थित भारा किं० गठ्ठा. २ भात, गूळ, इ०चा मोठा गोळा किं० खड. ३केश, कागद, सुतें, चिरगुटें, इ० ची गुंतागुंत किं० गुंतलेपणाची स्थिति. ४ गुंतागुंतीची किं० अव्यवस्थितपणाची स्थिति. ५ कागद, चिरगुट, इ० पदार्थांचा चोळामोळा.

**लादी** [ म० लादणें ] स्त्री०साधारणपणें घडविलला दगड,—बांधकामीं योजावयाचा.

**लाधण** स्त्री०, न० मागें ' लाडन ' पहा.

**लाधणें** [ सं० लभ्; लाभ ] अ० क्रि० १ मिळणें; प्राप्त होणें; साध्य होणें. २ फलद्रूप किं० फायदेशीर होणें; उपयुक्त होणें किं० ठरणें. स० क्रि० ( इष्ट वस्तु किं० मनोरथ ) मिळविणें.

**लांपट** [ सं० लंपट ] वि० १ सईल, खिळखिळा ( खिळा, कोयंडा, कडी, खुंटी, इ० ). २ ज्याचे सांधे, अवयव, भाग, इ० सईल झाले आहेत असा ( कोणताही पदार्थ ). ३ ज्याला कितीही रागें भरलें किं० निषेधिलें तरी जो आपलें निंद्य वर्तन सोडीत नाहीं असा ( मनुष्य ); लतकोडगा; निर्लज्ज.

**लापाणिका, लाफणिका, लापटणिका लापनिका** [ सं० लप्=बडबडणें ] स्त्री० १ लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत; चऱ्हाट. २ लबाडीची मसलत. ३ शब्दपांडित्य.

**लापन** [ सं० ] न० १ बडबड. २ श्लोक, कूट, वाक्य, इ० चा अर्थ काढणें, संदर्भ बसविणें, संगति जुळविणें, इ० रूप क्रिया.

**लापनिका** [ सं० ] स्त्री० १ श्लोक, वाक्य, कूट,इ०चा अर्थ लावणें किं० अर्थ काढणें.२वाक्य, श्लोक, इ० चा अर्थ समजून सांगण्याची कोणेकाची शैली किं० सरणी.

**लापशी, लाफशी, लावशी** स्त्री० साबूदाणे, शिंगाड्याचें, रताळ्याचें, किं० तांदुळाचें पीठ, इ० ताक, दूध, इ० मध्यें घालून किं० शिजवून उपासासाठीं किं० आजाऱ्याला देण्यासाठीं जें पेय करतात तें.

**लांपल, लांफल** वि० सईल, लटपटीत, किं० खिळखिळा. वर ' लांपट ' पहा.

**लाफा** स्त्री० फळीला बळकटीसाठीं खिळे इ० नीं ठोकलेली आडवी पट्टी.

**लाफा** [ सं० लप्=बडबड करणें ] स्त्री० अ० व० बढाया; बाता; गप्पा; बडबड ( मारणें, झोकणें, लावणें ).

**लांफाळ** [ म० लंपट ] वि० बदकर्माला आसक्त झालेला; व्यसनी.

**लांब** [ सं० लंब ] वि० १ दीर्घ; अखूड नव्हे असा. २ देश किं० काल ह्या बाबतींत दूर असलेला; उ० अझून दिवाळी लांब आहे; उ० सातारा गांव येथून फारसा लांब नाहीं. ३ अतिशय किं० कंटाळा येण्याइतका लांब. **लांबलेखा**[ म० लांब+लेख ] पु० शुष्क वाटाघाट; रिकामी पंचाईत; उ० ह्या गोष्टीबद्दल आपल्या आपल्यांत उगीच लांबलेखा कशाला ? मी आतांच्या आतां गंगाधररावांना भेटून निकाल करून येतों. **लांबसर** वि० बराच लांब; तोकडा नव्हे असा; अघळपघळ. **लांबून** क्रि०वि० दूरून; अंतरावरून. **लांबट** वि० १ फारच लांब. २ लांबोड्या घाटाचा किं० आकाराचा. **लांबलचक** वि० १ खूप लांब, अघळपघळ (चांगल्या अर्थानें). २ फाजील लांब ( वाईट अर्थानें ).

**लांबण** [म०लांब] स्त्री० १देश किं० काळ ह्या बाबतींत कंटाळा येण्याइतकें अंतर किं० दूरपणा. २ फाजील किं० कंटाळा येण्याइतका विस्तार. ३ लांबचलांब रस्ता, हकीगत, वर्णन, इ०. ४ उशीर; विलंब; दिरंगाई. ५ सावकाशी; संथपणा. **लांबणीवर पडणें** ( किं० **टाकणें** ) दिरंगाईवर जाणें ( किं० लोटणें ); पुढच्या काळावर पडणें ( किं० ढकलणें ).

**लांबणदिवा, लामणदिवा** पु० दोरी, सांखळी, इ० कांस टांगून ठेवण्याचा सोयीचा लोखंडाचा किं० पितळेचा दिवा.

**लांबणें** [ म० लांब ] अ० क्रि० १लांब होणें. २ पुढच्या काळावर किं० दिरंगाईवर पडणें किं० ढकलणें जाणें. ३ पदार्थांत भरती घातल्यामुळें तो वाढणें, मोठा होणें, किं० दीर्घ काळ पुरण्याइतका किं० टिकण्याजोगा होणें. ४(बातमी,

गुप्त गोष्ट, किं० मसलत, इ० ) अनेकांस ज्ञात किं० विदित होणें. ५ ( काम, ग्रंथ, इ० ) अंगें, उपांगें, इ० ची भरती पडल्यामुळें विस्तृत होणें. ६ ( भाषण, ग्रंथ, इ० ) कंटाळा येण्याइतकें किं० पूर्वींच्या अटकळीपेक्षां अधिक मोठें होणें.

**लांवणें** [ म० लांब ] न० १ एक प्रकारचा पोहोरा,–विहीर इ०तून पाणी काढण्याचा. २ लामणदिवा लोंबत सोडण्याची दोरी किं० सांखळी.

**लांबर** वि० १ दुसऱ्याच्या संभाषणांत उगेपणानें बोलणारा. २ लुडबुड्या; लोचट.

**लांबवालांबव** [ म० लांबविणें+लांबविणें ] स्त्री० १ पदार्थ, सामानसुमान, गुरेंढोरें, माणसें, इ० ना चोर इ० पासून बचावासाठीं दूर प्रदेशीं नेऊन ठेवणें. २ दुसऱ्याचे पदार्थ हळूं हळूं गुप्तपणें चोरून नेऊन आपल्या घरांत ठेवणें.

**लांबविणें** [ म० ' लांबणें ' चें प्रयोजक ] १ पुढचा काळावर लोटणें; दिरिंगाईवर टाकणें. २ लांब करणें; वाढविणें. ३ पाणी, पेज, इ० घालून (ताक, आमटी, इ०), किं० दूध इ० घालून ( बासुंदी इ० ) अधिक करणें; पाल्हाळ किं० तपशील इ०नीं ( हकीगत, व्याख्यान, इ० ) लांब करणें. ४ (दुसऱ्याची वस्तु) मुकाट्यानें उचलून घेऊन जाणें; पळविणें.

**लाबशी** वर ' लापशी ' पहा.

**लांवा** पु० शेतांतील भात कापते समयीं गळालेलें किं० अन्य वेळीं शेतांत पडलेलें जे भातगोटे त्यांचीं जमीनीच्या ओलाव्यानें किं० पावसाच्या पाण्यानें उगवतात जीं रोपें तीं व्यक्तिशः.

**लांबी** [ म० लांब ] स्त्री० १ लांबपणा; दीर्घता. २ क्षेत्राचीं जीं काटकोनांत असलेली दोन परिमाणें त्यांपैकीं जे मोठें परिमाण तें. ❀ **कांहीं गोष्ट लांबीवर पडणें** (किं० **लांबणीवर पडणें**) ती दिरिंगाईवर पडणें; ती पुढें म्हणजे कालांतरावर लोटली किं० ढकलली जाणें.

**लांबी** स्त्री० लाकूड, तक्ते, इ०च्या फटी, इ० बुजविण्यासाठीं किं० खिडकीचा तावदानें न हालेशीं बसविण्यासाठीं भरतात तें लुकण.

**लांबोडा** (–ळा ) [ म० लांब ] वि० बराच किं० किंचित् लांब आकाराचा(चांगल्या किं० वाईट अर्थानें ). ' लांबुळा ' ह्याच अर्थी योजतात.

**लांबोरा** [ म० लांब ] वि० १ लोचट; कोडगा. २ दुसऱ्याजवळ कांहीं पदार्थ मागून सतावणारा.

**लाभ** [ सं० ] पु० १ मिळणें; प्राप्ति. २ नफा; फायदा. ३ अकस्मात् निधि सांपडणें. ४ धान्य इ० मोजते समयीं पहिल्या मापाला लाभ, दुसऱ्याला बरकत, असें म्हणून पुढें तीन, चार, पांच, इ० अंक मोजण्याचा व्यापारी लोकांत परिपाठ आहे. लाभ म्ह० एक. ❀ **लाभकाळ** पु० ज्या काळांत नफा, फायदा, सोयीचे सौदे, इष्टसाफल्य, इ० कोणेकाला प्राप्त होतात तो त्याचा लाभकाळ. याच्या व्यावर्तकत्वे ' विनाशकाळ, ' ' ऱ्हासकाळ, ' ' आपत्काळ, ' इ०. **लाभगुण** पु० लाभ सामान्यतः. **लाभदृष्टि** स्त्री० आपल्या स्वताच्याच लाभ कडे जी दृष्टि ती. वि० स्वताच्याच लाभाकडे ज्याची दृष्टि आहे असा. **लाभलोभ, लाभलोभा, लाभालोभा** पु० नफा मिळविण्याची उत्कट इच्छा. **लाभलोभ** पु० १ नफा; फायदा. २ प्रेम किं० कायद्याची आशा,–दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याच्या संबंधांत; उ० लाभालोभावांचून कोणी कोणाचें काम करीत नाहीं. **लाभालोभाचा** वि० प्रेमानें किं० लाभ होण्याच्या संभवानें जो कोणाशीं जुळलेला किं० चिकटलेला तो मनुष्य; उ० लाभालोभाचीं चार माणसें जुळलीं तरच मोठें कार्य तडीस जाऊं शकतें. **लाभवेळ** (–ळा ) स्त्री० ज्या समयीं कोणतेंही काम हातीं घेतलें असतां त्यांत सिद्धि मिळते असा समय. **लाभागोभा** पु० नफा; फायदा. **लाभालाभ** [ सं० लाभ+अलाभ ] १ नफा नुकसान; फायदा आणि तोटा. २ दैव; दैवगति.

**लाभणें** [ म० लाभ ] अ० क्रि० १ प्राप्त होणें; मिळणें. २ ( कांहीं कार्याची ) चांगली किं० वाईट परिणति होणें. ३(कांहीं पदार्थ, पशु, माणूस, इ० ) कोणेकाला फायदेशीर किं० लागदायक होणें. ४ ( लग्न, मुंज, इ० कार्य) कोणेकाला विशिष्ट समयीं शुभप्रद असणें; उ० यदूला यंदा मुंज लाभत नाहीं. ५ ( गुरु, चंद्र, इ० ) कांहीं कार्याला शुभप्रद असणें; उ० यंदा मुंजीला गुरु लाभत नाहीं.

**लामणदिवा, लाम्हणदिवा** पु०, **लामणें, लाम्हणें** न० मागें 'लांबणदिवा,' 'लांबणें' पहा. [पहा.

**लाय, लायलाय** मागें 'लहा,' 'लहालहा'

**लायक** [अ०] वि० योग्य; अनुरूप. ❀ **लायकी** स्त्री० योग्यता; अनुरूपता; पात्रता.

**लाल** [फा०] वि० तांबडा. पु० १ माणिक हें रत्न. २ एक पक्षी. ❀ **लालडी** स्त्री० हलक्या दर्जाचें किं० लहान आकाराचें माणिक. **तांबडा लाल** वि० खूप तांबडा. **हरीचा लाल, ईश्वराचा लाल** पु० देवाचा आवडता माणूस,–क्वचित्र, छांदिष्ट, मूर्ख, किं० दैववान् माणूस असा अर्थ वक्तव्य असतां. **लालझगडा** पु० प्रेमाचें किं० लुटुपुटीचें भांडण. पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा. **लाली** स्त्री० तांबडेपणा. **लालभडक, लाललाल भडक** वि० खूप तांबडा आणि चटकदार (रंग, वस्त्र इ०). **लालवट, लालसर,** वि० किंचित तांबडा; साधारण तांबडा.

**लालच, लालूच, लालची** [सं० लालसा] स्त्री० १ लाभ. २ लाभाचा संभव. ३ कोणेकाला वश करून घेण्यासाठीं त्याला लावून ठेविलेली आशा. ❀ **लालचखोर, लालची, लालचेल, लालूचखोर** वि० लोभी; फायद्याच्या आशेनें आकृष्ट झालेला किं० काहीं काम करणारा.

**लालचणें, लालचावणें** [न० लालच] अ० क्रि० लाभानें आकृष्ट होणें; आपला कांहीं लाभ होईल ह्या आशेला गुंतणें; पूर्वी लाभ झाला आहे तसा आतांही लाभ होईल अशा आशेला (कोणी मनुष्य) गुंतलेला असणें.

**लालची** स्त्री० वर 'लालच' पहा.

**लालझगडा** [म० लाड+झगडा] पु० प्रेमकलह.

**लालडी** मागें 'लाल' मध्यें पहा.

**लालन** [सं०] न० १ स्नेहपूर्वक कोणेकाचा केलेला सांभाळ; प्रेमपूर्वक पालन. टीप,–ह्या अर्थी 'लालनपालन' सुद्धां. २ कोणेकाचे लाड करणें. ३ कोणेकाला गोंजारणें किं० आळविणें.

**लालबुझक्कड, लालभुजंगड** (–क्कण) [हिं०] पु० वस्तुतः मूर्ख, अडाणी, किं० ठोंब्या असून चातुर्य, विद्वत्ता, शहाणपणा, इ०ची पेट मिरवितो तो.

**लालस** [सं०] वि० १ अति उत्सुक. २ तत्पर; तल्लीन; आसक्त. **लालसा** स्त्री० १ उत्कट इच्छा; औत्सुक्य; लोभ. २ विनंती; याचना. ३ कांहीं वस्तूचा लोभ.

**लाला** [सं०] स्त्री० थुंकी; लाळ. ❀ **लालाभक्ष** पु० १ नरकविशेष. २ वरिष्ठाची निंद्य खुशामत करणारा,–त्याची थुंकी पिणें, पाय चाटणें, इ० प्रकारची. **लालामेह** पु० पुवानें मिश्रित अशी लघवी किं० अशा लघवीची विकृति.

**लालाभाईचुरमा** [म० लालाभाई एक बैरागी] पु० १ सर्व वस्तूंची आणि माणसांची समृद्धि; हरएक प्रकारचें वैपुल्य. २ चैनबाजी; रंगेलपणाचें आयुष्यक्रमण.

**लालित** [सं०] वि० १ प्रेमपूर्वक रक्षिलेला किं० पोसलेला. २ ज्याचे लाड केले आहेत असा. ३ आवडता; प्रिय. न० १ सुख. २ प्रेम.

**लालित्य** [सं०] न० १ सौंदर्य; मोहकपणा. २ कान्ति. ३ उल्हास. ४ प्रेमाचे विलास. ५ भाषण, काव्य, इ० तील अर्थाचा किं० शब्दांचा मोहकपणा. [तांबडेपणा.

**लाली** [म० लाल+ई (प्रत्यय)] स्त्री०

**लालुचणें** [म० लालूच] अ० क्रि० मोहाला गुंतणें किं० गुंतलेलें असणें.

**लालूच, लालूचखोर** मागें 'लालच,' 'लालचखोर' पहा.

**लांव** स्त्री० १ एक राक्षसी. ही फळें, वस्त्रें, पक्ष्यांचीं पोरें, दूमदुमतें, इ० ना उपद्रव करते अशी अशिक्षितांची समजूत आहे. २ हिडिंस स्त्री. ३ भांडखोर किं० कजाग स्त्री. ४ एक पक्षी. पुढें 'लावा' पहा.

**लावक** [सं०] पु० १ कापणारा. २ फुलें इ० तोडणारा. ३ लावा नांवाचा पक्षी.

**लावण, लावणिक** [सं०] वि० १ खारट. २ क्षारयुक्त.

**लावणी** [म० लावणें] स्त्री० १ लावणें ही क्रिया. मागें 'लावणें' हें क्रियापद पहा. २ शेत इ० ची लागवड. ३ भात इ० चे रोपे किं० वृक्षाच्या डाहाळ्या, उसाचीं कांडीं, इ० शेत, मळा, बाग, इ० मध्यें लावणें ही क्रिया. ३ कवितेचा

एक प्रकार; उ० रामजोशी याच्या लावण्या उत्कृष्ट म्हणून गणल्या जातात. ॐ **लावणीचा** वि० मुद्दाम लाविलेला जो वृक्षादि तो; आपल्या आपण उगवलेला किं० रुजलेला नव्हे असा. **लावणी अळपणी** स्त्री० ए० व० प्रारंभापासून अखेरपर्यंत जीं शेतकीचीं कामें तीं समुच्चयानें. अळपणी म्ह० भाताचे मुढे इ० घट्ट आवळून बांधणें. मागें' अळपणें ' पहा. **लावणी जुंपणी** स्त्री० १ शेतकीसंबंधाचें कोणतेही काम व्यक्तिशः किं० सर्व कामे समुच्चयानें. २ कामाची योग्य लाविलेली किं० लावून दिलेली सरणी. **लावणी कमज्यास्ती टिपण** न० शेत जमिनींपैका कोणत्यांत लागवड झाली, कोणत्या पडींत टाकण्यात आल्या,इ० तपशिलाचा कोणेक विशिष्ट कालाचा खरडा. **लावणी टुपणी** स्त्री० शेत इ० संबंधीची लावणी, वेणणी, इ० कामें समुच्चयानें. **लावणीपत्रक** न० लागवडींत आणलेल्या पडींत जमीनींच्या वर्णनाचा कागद. **लावणीबाज** वि० लावणी हा जो कवितेचा प्रकार त्याचा शोकीन.

**लावणें** [ म० ' लागणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ एक पदार्थ दुसऱ्याशीं जुळविणें किं० जुळवून किं० चिकटून ठेवणें. २ पाठवून देणें; उ० मी त्याला घराकडे लावून दिला. ३ ( पैशाच्या मागणीचें पत्र ) कोणेकाकडे गुदरणें. ४ ( गांव, घर, इ० ) वसविणें. ५ ( दुकान,इ० ) मांडणें किं० सुरू करणें किं० स्थापिणें. ६ ( गलबत इ० ) थांबविणें किं० नांगरणें. ७ खंडकऱ्याकडे ( शेत, जमीन, इ० ) कसणें, लागवड करणें, इ० कामासाठीं देणें किं० सोंपविणें. ८ ( पुस्तकें, चिरगुटें, इ० ) व्यवस्थित रीतीनें मांडणें किं० रचणें.९(वशीला, चिट्टी, पत्र, इ०) कोणेकावर लागू करणें. टीप,–' लागणें ' ह्या अकर्मक क्रियापदाचे बहुतेक सर्व अर्थ प्रयोजक भेदांत घातले असतां ' लागणें ' ह्या क्रियापदाचे बाकीचे अर्थ विद्यार्थ्याला जाणतां येतील. ॐ **लावून पहाणें** ( एक पदार्थ ) दुसऱ्या पदार्थांशीं ताडून पाहाणें आणि त्याची किंमत, योग्यता, इ० ठरविणें. कोणेकाला **लावून बोलणें** त्याला टोमणे मारणें; त्याला झोंबतील अशीं विधानें करणें.

**लावणें** [ म० लावणें ] न० वाडी, मळा, इ० मध्यें लाविलेलीं झाडें समुच्चयानें.

**लावण्य** [ सं० ] न० १ सौंदर्य.२खारटपणा.

**लावतोड** [ म० लावणें + तोडणें ] स्त्री० ए० व० १ अत्यन्त किं० पराकाष्ठेची घाई किं० लगबग.२घाईमुळें चित्ताला वाटते ती अस्वस्थता. ३ कामामध्यें केलेली किं० करावी लागलेली धावपळ किं० धडपड. ४ कडाक्याचें भांडण.

**लांवसट** [म०लांव]स्त्री०दूधदुभतें,पोरें, फळें, जनावरें,इ०ना उपद्रव करणारी एक राक्षसी. मागें ' लांव ' पहा.

**लांवसटणें, लांवसरणें, लांवारणें** [ म० लांव, लांवसट ] अ० क्रि० लांवीच्या किं० लांवसटीच्या उपद्रवामुळें ( दूध, फळें, गुरें, इ०) बिघडणें किं० नासणें. नारळ, ताडफळ, इ० फळांसंबंधानें ' लांवसरणें ' हेंच क्रियापद बहुधा योजलें जातें.

**लावा** [ सं० लाव ] पु० एक पक्षी. ह्याला ' लावक ' असेंही नांव आहे. हा पक्षी भारी स्त्रीलंपट असतो.

**लावा** [म० लावणें] पु० १ भाषण, लेखन,इ० मध्यें रस उत्पन्न व्हावा म्हणून करतात ती अलंकारांची भरती. २ कोणताही पदार्थ शोभून दिसण्यासाठीं त्याच्यावर करतात तो संस्कार.

**लांवारणें** [ म० लांव ] वर 'लांवसटणें'पहा.

**लावालाव, लावालावी** [ म० लावणें] स्त्री० १ पूर्वी सिद्ध किं० समाप्त केलेल्या पदार्थास दिलेला जोड किं० त्यांत केलेली भरती किं० फिरवाफिरव. २ वर्णन चटकदार करण्यासाठीं घातलेला अलंकार किं० लाविलेले तिखटमीठ. ३ दोन माणसांत कलह पेटविण्यासाठीं केलेल्या चुगल्या किं०चहाड्या.

**लांव्ह, लांव्हारणें** वर ' लांव, '' लांवारणें ' [पहा.

**लाव्हर** स्त्री० एक वर्षाचें लहान कोकरूं.

**लाशा** [ म० लास ] वि० लास ज्याला आहे असा; लासानें विरूप झालेला. खालीं ' लास ' पहा.

**लास** पु० १ वायुविकृति किं० रोग इ० ज्या निरसनार्थ त्वचा तापलेल्या लोखंडानें भाजणें (देणें, घेणें) किं० अशी त्वचा भाजून पडलेला

डाग किं० वण. २ जन्मापासून माणसाच्या तोंड इ० वर जो तांबडा, काळा, पिवळा, इ० रंगाचा डाग असतो तो. ३ आंबा इ० फळ अंशतः सडल्याचा जो डाग सालीवर उत्पन्न होतो तो. ४ वल्ह्याचें टोक जमीन इ० वर टेकून होडी मागें ढकलणें.

**लांस** स्त्री० १ एक राक्षसी. मागें 'लांव' पहा. २ कोल्ही. ३ भाजल्यानें त्वचेवर उत्पन्न होतो तो डाग. ह्या अर्थी ' लास ' सुद्धां. **लांस** न० ज्यावर केश आहेत असा शरीरावरील तीळ किं० वांग.

**लासणी** [म० लासणें] स्त्री० १ रोगादि निवारणासाठीं किं० केवळ खूण म्हणून त्वचेवर लाल तापलेल्या लोखंडानें डाग देणें किं० असा दिलेला डाग. २ शाई, कोळसा, इ० नीं विणावयाच्या वस्त्राच्या ताण्यांवर केलेली खूण ( लावणें ). पुढें ' लासें ' अर्थ २ पहा.

**लासणें** [ म० लास ] स० क्रि० १ लाल तापलेल्या लोखंडानें रोगादि निवारणार्थ किं० खुणेसाठीं ( त्वचा ) भाजणें. २ कोणत्याही कारणासाठीं (त्वचा किं० पृष्ठभाग) तापलेल्या लोखडानें चिन्हित करणें. ३ पांजणीनंतर (ताण्याला) लासें लावणें. खालीं 'लासें' अर्थ २ पहा. अ० क्रि० ( आंबा इ० फळ ) नासण्याच्या क्रियेनें डागळणें.

**लांसरू** [ म० लांस ] न० १ लांस नांवाची राक्षसी ( तुच्छतेंत ). मागें ' लांस ' पहा. २ कोणीही दुष्ट स्त्री. ३ ज्यावर केश आहेत असा त्वचेवरील तीळ किं० वांग. ४ नाक आणि डोळे ह्यांना होतो तो एक रोग. मागें ' नासूर ' पहा.

**लासा** मागें ' लाशा ' पहा.

**लासूर** [ म० ' नासूर ' चें अशुद्ध रूप ] पु०, न० १ डोळे आणि नाक ह्यांना होतो तो एक रोग. २ मागें ' लांसरू ' अर्थ ३ पहा.

**लासें** [ म० लांस ] न० १ प्राण्याच्या शरीरावर किं० फळांवर कधीं कधीं असतो तो काळा डाग. २ वस्त्र विणावयाच्या ताण्यांवर शाई, कोळसा, इ० नीं केलेली खूण ( लावणें ).

**लाहकी** स्त्री० ए० व०, **लाहक्या** स्त्री० अ० व० १ उन्हाची किं० उष्णतेची तिरीप ( मारणें, देणें, टाकणें ). २ ऊन्ह, शोक, इ० नीं अंगांत उत्पन्न होते ती अस्वस्थता; उ० अंगाची लाहकी आज फार होत आहे. ह्या अर्थी ' लाही ' सुद्धां. ३ कांहीं वस्तूसाठीं कोणी एकाद्याला केलेली प्रार्थना किं० घातलेली गळ किं० लाविलेला तगादा. ४ घाई, लगबग. ५ उत्कट इच्छा.

**लाहडा** पु० १ ( ताप, देवी, गोवर, खरूज, इ० चा ) जोर किं० आवेग किं० रखरख. २ चिखल, गूळ, इ० चा लगदा किं० थिरबिटी. ३ कागदपत्रें, पोथीचीं पानें, केश, इ० ची गुंतागुंत किं० घालमेल किं० घोटाळलेपणाची स्थिति.

**लाहडी** [ म० लाहो ] वि० अत्यन्त आसक्त ( चांगल्या किं० वाईट गोष्टीला ).

**लाहणी** स्त्री० १ शेत इ० ची कापणी. २ दिवा, लामणदिवा किं० पणती ठेवण्याचा लाकडाचा खांब किं० आधार.

**लाहणें** [ म० लाभ; सं० लभ् ] स० क्रि० १ कांहीं वस्तु ( कोणेकाला ) मिळणें किं० प्राप्त होणें. २ संपादणें; मिळविणें. ३ भोगणें.

**लाहा** पु० उत्कट इच्छा.

**लाहाणा** वि० शुभ; लाभदायक.

**लाहाणी** [म० लाहणें] स्त्री० प्राप्ति; लाभ.

**लाहातें** [ म० लाभ ] न० लाभ. **वि०** फायदेशीर; लाभदायक.

**लाही** [ सं० लाज ] स्त्री० १ भात, जोंधळे, बाजरी, इ० एकदल धान्यें पाण्यांत भिजत घालून नंतर मडकें इ० पात्रांत घालून विस्तवावर ठेवून ढवळून त्यांचा केला जातो तो आकार किं० त्यांना प्राप्त होतें तें रूप; भाजून फुलविलेला धान्याचा दाणा. २ तुरटी इ० क्षार ह्यांना अग्निसंस्कारानें प्राप्त होतें तें रूप; उ० तुरटीची लाही इ०. ३ क्रोध, ऊन्ह, शोक, इ० मुळें अंगाचा होतो तो दाह किं० ताप. ४ बंदुकांतून उडविलेल्या गोळ्या, सांथीनें मेलेले प्राणी, शिव्या, इ० चें वैपुल्य किं० इ० चा वर्षाव; उ० यंदा पटकीनें ह्या शहरांत लाही उडवून दिली. ॐ **बाजारांत कांहीं मालाची लाही उडणें** तो हां हां म्हणतां विकला जाणें. **अंगाची लाही भाजणें** उष्णतेच्या योगानें अंग

भाजत असणें आणि अंगांतून घामाच्या धारा गळत असणें. **उन्हाची लाही भाजणें** उष्मा फार किं० असह्य होत असणें. **लाह्याचा मान** पु० ज्यांत लाजाहोमाचे प्रसंगीं वरपक्षाकडून वधूपक्षाला पागोटें, नारळ, इ० ची देणगी दिली जाते ती. **लाहीपीठ** न० लाह्या दळून केलेलें पीठ. [पहा.

**लाहूर** न० पु० एक पक्षी. मागें 'लावक'

**लाहो** [म० लाभ] पु० १ लाभ. २ खूप मोठा आणि अकल्पित असा प्राप्त झालेला कांहीं लाभ. ३ लोभ. ४ अतृप्ति. ५ एकाद्या वस्तूबद्दल घेतलेला ध्यास. ६ छंद, नाद. ॐ **लाहोटा** पु० १ कांहीं वस्तूबद्दल उत्कट इच्छा. २ लोभ. ३ ध्यास.

**लाळ** [सं० लाला] स्त्री० १ तोंडांतून गळते ती चिकट आणि बुळबुळीत थुंकी. २ गुरांना होतो तो एक मुखाचा रोग,—ज्यांत त्यांच्या तोंडांतून लाळ गळते आणि खूर सुजतात (येणें, जाणें). ॐ **कोणाची कोणेकाशा लाळ गळणें** त्याचें त्याच्याशीं परम सख्य असणें (निंदेंत प्रयोग). **लाळ घोटणें** १ कोणापासून कांहीं वस्तु मिळविण्यासाठीं त्याची खुशामत करणें (निंदेंत). २ एकाद्या वस्तूच्या प्राप्तीसाठीं उत्कट इच्छा बाळगणें. **लाळेनें चणे भिजवून खाणें** ज्यांनीं आपणास मान दिला पाहिजे त्यांनीं तो न दिला तरी मुकाट्यानें तो अपमान सोसून बसणें.

**लाळ** स्त्री० १ कणसाचें किं० गवत इ० चें कुसळ. २ काट्याचें टोक. ३ विंचवाच्या नांगीचें टोक.

**लाळणें** [म० लाळ] अ० क्रि० (माणूस, गुरूं, इ० च्या) तोंडांतून चिकट मुखरस गळणें.

**लाळें** [म० लाळ] न० घोड्याच्या सरोसरीस किं० म्होरकीस खालच्या बाजूस एक अवयव असतो,—ज्यास जेरबंद किं० दवासन बांधतात,—तो.

**लाक्षणिक** [सं०] वि० १ लक्षणा नामक शब्दशक्तीनें उत्पन्न झालेला (जो अर्थ तो लाक्षणिक अर्थ). मागें 'लक्षणा' पहा. गंगेवर गौळवाडा आहे ह्या वाक्यांत 'गंगा' शब्दाचा 'गंगेचा कांठ' हा जो अर्थ तो लाक्षणिक अर्थ. २ पारिभाषिक. ३ आलंकारिक (भाषा). ४ विशिष्ट गुण दाखविणारा. ५ गौण.

**लाक्षण्य** [सं०] वि० दर्शक; सूचक. २ चिन्हें किं० लक्षणें ह्यांवरून ओळखतां येण्याजोगा.

**लाक्षा** [सं०] स्त्री० लाख. ॐ **लाक्षातरु** पु० पळस. **लाक्षाजोहर** न० पांडवांना ज्या गृहांत जाळावयासाठीं कौंडण्यांत आलें होते तें गृह. [किं० राहाणें.

**लिकटणें** अ० क्रि० चिकटणें; चिकटून बसणें

**लिकंडाव** [म० लिकणें (लपणें)+डाव (खेळ)] पु० एकानें लपावें आणि दुसऱ्यानें त्याला शोधून काढावें हा जो मुलांचा खेळ तो.

**लिकडं, लिकडंमिकडें** पुढें 'लिखडें,' 'लिखडेंमिखडें' पहा.

**लिकण** [म० लिकणें=लपणें] स्त्री० किल्ला, डोंगर, इ०तील लपावयाची जागा.

**लिकणें** [हिं० लिकना] अ० क्रि० लपणें; लपून बसणें.

**लिकलिकणें** अ० क्रि० १ अंधुकपणें (दिवा, चांदणी, इ०) झळकत असणें. २ मंदपणें (दिवा) प्रकाशत असणें.

**लिकाचोरी, लिकीचोरी** [म० लिकणें+चोरी] स्त्री० १ चोरटें काम; गुप्तपणें केलेलें कांहीं कृत्य; चोरटा कारभार. २ गोप्य; रहस्य.

**लिकीर** [म० लिकणें] वि० चोरटें कारभार करणारा; आपले बेत किं० हालचाली गुप्तपणें चालविणारा किं० करणारा.

**लिखडें** न० अल्प किमतीचा दागिना किं० कांहीं पदार्थ. ॐ **लिखडें मिखडें** न० बारीक सारीक आणि अल्प किमतीचे दागिने.

**लिखणें** [सं० लिख्] स० क्रि० लिहिणें (अशिक्षितांत रूढ).

**लिखन** [सं० लिख्] न० १ लिहिणें. २ लिहिलेला कागद, पत्र, खत, इ०.

**लिखा** [सं० लिख्=लिहिणें] स्त्री० १ लेख; दस्तऐवज. २ जें लिहिलें तें. ॐ **लिखापढा, लिखापुसा** पु० दस्तऐवज, कामकाजाचीं पत्रें, लेख, इ० समुच्चयानें.

**लिखित** [सं०] वि० १ लिहिलेलें (पत्र, पोथी, इ०). २ काढलेलें (चित्र, नकाशा, इ०). न० १ लेख. २ पोथी. ३ चित्र. ॐ **लिखितार्थ** पु०

पत्र, दस्तऐवज, इ० मध्यें लिहिलेला किं० नमूद केलेला मजकूर; पत्र इ० चा सारांश किं० मतलब. **ब्रह्मलिखित** न० अमुक वेळीं अमुक घडावयाचें असें ब्रह्मदेवानें पूर्वींच लिहून ठेविलेलें भाकित.

**लिखी** [म० लीख=केशांतील एक क्षुद्र कीटविशेष. सं० लिक्षा, लिख्या=लीख; उवेचें अंडें ] स्त्री० डोकींतील केशांतील लिखा खरडून काढण्याच्या उपयोगाची बारीक दांत्यांची फणी.

**लिख्या** वि० बारीक ( डोळा ).

**लिंग** [ सं० ] न० १ खूण; चिन्ह; निशाणी. २ (वैद्यक) रोगाचें लक्षण. ३ पुरावा. ४ (न्याय) तर्क; अनुमान. ५ ( न्याय ) हेतु, किं० पक्षाचे ठायीं हेतु आहे अशा अर्थाचें विधान. ६ ज्ञानसाधन; वाक्यांत योजलेल्या शब्दाचा अर्थ निश्चित करावयाला संयोग, वियोग, साहचर्य, इ० रूप जो संबंध असतो तो. ८ ( मीमांसा ) अर्थप्रकाशनसामर्थ्य. ९ मूर्ति किं० आकार. १० (व्याकरण) पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकलिंग, हा जो रूढीनें ठरलेला शब्दनिष्ठ विशेष तो. ११ प्राण्यांतील स्त्री आणि पुरुष किं० नर आणि मादी हा जो भेद तो. १२ पुरुषाचें शिश्न. १३ शंकराच्या शाळुंकेंत मध्यभागीं असतो जो हस्तपादाद्यवयवरहित गोल तो. १४ ( वेदान्त ) सूक्ष्मदेह; जीवाचें सूक्ष्म स्वरूप. मागें ' देह ' मध्यें ' देहद्वय, ' ' देहत्रय ' पहा. १५ ( सांख्य ) प्रकृति किं० प्रधान. १६ लिंगायत लोक शिवमूर्ति म्हणून जो खडा अंगावर धारण करतात तो. १७ वर अर्थ १६ तील खड्याचा जो आधारभूत डबा इ० तो. १८ लिंगायतांच्या नांवापुढें ' लिंग' हा आदर दाखविण्यासाठीं योजावयाचा शब्द आहे; उ० दादालिंग, सदालिंग, इ०. १९ ( मराठात ) आपल्या कार्यास नडणारें जें कांहीं तें; शुष्ककाष्ठ; झेंगट; उ० हें काय लिंग माझ्या मागें तूं लावून ठेविलें आहेस ? ॐ **लिंगविभक्ति संभाळून बोलणें** आपल्या भाषणांत चूकीचा शब्द न बोलला जाईल अशी खबरदारी बाळगून बोलणें. **लिंगकार्य** न० शब्दाच्या लिंगाप्रमाणें विशेषण, क्रियापद, इ० फिरविणें. **लिंगदा** पु० शिवलिंगाची पूजा करणारा. **लिंगदेह** पु०, **लिंगशरीर** न० सूक्ष्म देह; देहाचें सूक्ष्म स्वरूप. **लिंगवंत** पु० लिंगायत. **लिंगाईत, लिंगायत** पु० शिवलिंगाची पूजा करणाऱ्या लोकांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. **लिंग्या** पु० लिंगाईत ( तुच्छतेंत ). **शेट सव्वाशेर आणि लिंग आडीच शेर** लिंगायत मुलगा लहान आणि त्याच्या गळ्यांत खूप जड आणि लठ्ठ लिंग (वर अर्थ १६, १७ पहा) ही विषमता हास्यास्पद असते. यावरून एक अति मोठा आणि एक अति लहान माणूस, पदार्थ, इ० यांच्या जुळणीची टवाळकी करावयाची असतां हें वाक्य योजतात.

**लिंगडणें** [ म० लिंग अर्थ १९ ] अ० क्रि० कोणेकाच्या मागें ( कांहीं अडथळा, झेंगट, किं० शुष्कक.ष्ट ) लागलेलें असणें.

**लिंगशा** वि० आळसानें किं० सुस्तपणानें चालणारा ( पशु, माणूस ) किं० काम करणारा ( माणूस ); चेंगट्या. ॐ **लिंगस्ताई, लिंगस्थाई लिंगिस्ताई, लिंगिस्थाइ** स्त्री० सुस्तपणा, मंदपणा, फाजील धिमेपणा, चेंगटाई (काम करण्यांत).

**लिंगाड** [म० लिंग अर्थ १९ ] न० १ झेंगट; लचांड; शुष्ककाष्ठ. २ पंचाईत; पेच. ३ कोणेकाच्या नाशासाठीं रचलेला व्यूह किं० कट किं० केलेली मसलत. ॐ **लिंगाडी** वि० पंचाइती करणारा; स्वतामागें किं० दुसऱ्याच्या मागें झेंगटें लावून घेण्याच्या किं० लावण्याचा स्वभावाचा (माणूस).

**लिंगी** स्त्री० एक औषधी वनस्पति.

**लिंगोरची** स्त्री० मागें ' लगोरी ' पहा.

**लिचंड, लिचांड, लिचंडखोर** मागें ' लचांड ' इ० पहा.

**लिचपिचीत** वि० अशक्त, कमजोर ( कोणताही माणूस, पशु, पदार्थ ).

**लिटकणें** अ० क्रि० चिकटणें; चिकटून बसणें.

**लिडबिडणें, लडबडणें** अ० क्रि० अशक्तपणामुळें हालणें, हादरणें, किं० कांपत होणें; कच्ची जुळणी किं० रचना झाल्यामुळें (पदार्थाचे भाग किं० अवयव ) हालत असणें.

**लिडबिडणें** अ० क्रि० बरबटलेलें असणें ( गू, चिखल, शेण, इ० नीं ). स० क्रि० गू, चिखल,

शेण, इ० नीं ( पदार्थ, अंग, इ० ) माखणें किं० लिप्त करणें.

**लिड्या** वि० अशक्त ( मूल, पशु, इ० ).

**लिद्‌वळ** [ म० लीद ] वि० १ घोड्याचें शेण खाणारी किं० खावयास सवकलेली ( गाय, म्हैस, इ० गुरूं ). २ लाचखाऊ ( अधिकारी ). ३ पैशासाठीं नीच, हलकीं, किं० देशद्रोहाचीं कामें करणारा.

**लिदाड** [ म० लीद ] न० गाईम्हशींचें शेण, घोड्याची लीद, इ० चा ढीग, किं० इ० नीं ओंगळ अशी जागा.

**लिपंडाव** पु० मागें ' लपंडाव ' पहा.

**लिंपण** [ म० लिंपणें ] न०, स्त्री० खालीं ' लिंपणें ' मध्यें पहा.

**लिपण, लपण** [ म० लपणें ] स्त्री० लप-ण्याची जागा.

**लिंपणें** [ सं० लिप् ] स० क्रि० ( कणिंग, डेरा, रांजण, इ० बारदानांत ) धान्य इ० पदार्थ भरून त्यावर गवत, पानें, इ० आंथरून त्यावर शेण, माती, इ० थापणें ( पदार्थ सुरक्षित राहावा म्हणून ). शेण, माती, इ० रूप ही जी बंदिस्ती तिला ' लिंपण ' ( न०, स्त्री० ) असें म्हणतात.

**लिपणें** मागें ' लपणें ' पहा.

**लिपि** [ सं० ] स्त्री० १ भिंत इ० लिंपणें किं० माखणें. २ लेखन. ३ मूळाक्षरें. ४ लेख-नाची कला. ५ जें लिहिलें तें; लेख. ६ चित्र. ७ कोणेकाच्या लिहिण्याची तऱ्हा किं० वळण किं० धाटणी. ＊ **देवनागिरी लिपि** स्त्री० ज्या अक्षरांनीं हा कोश लिहिला आहे किं० छापला आहे त्या अक्षरांची धाटणी. **हेमाडपंती लिपि** स्त्री० मोडी अक्षरें लिहिण्याची रीति; मोडी लिपि. **लिपिमात्र पुस्तक** न० पुस्तकाचा उपयोग त्यांत जें लिहिलें आहे त्यावर अवलंबून असतो,— कागद, शाई, इ० वर नसतो.

**लिप्त** [ सं० ] वि० १ माखलेला; सारविलेला; चोपडलेला. २ दुष्कर्मांत गुंतलेला किं० आस-क्त. ३ जें पुरें केल्याशिवाय आपली सुटका नाहीं अशा कामांत आडकलेला. ४ दुष्कर्मानें दूषित.

**लिप्ताळणें** [ म० लिप्ताळा ] अ० क्रि० १ दुष्कर्म, व्यसन, इ० मध्यें गुंतलेला किं० आसक्त झालेला असणें. २ दूषित होणें. ३ विटाळणें. ४ बाधा पावणें.

**लिप्ताळा** [ म० लिप्त ] वि० १ पाप, दुष्कर्म, किं० व्यसन, यामुळें दूषित किं० कलंकित झालेला. २ दुष्कर्मांत गोंवलेला. ३ कोणेकाच्या ओशाळगतींत किं० मिंधेगिरींत असलेला; कोणे-काच्या उपकाराखालीं दडपलेला; ओशाळा; मिंधा; उ० मी कां तुझे निरोप पोंचवीन ? मी कांहीं तुझा लिप्ताळा नाहीं. मागें ' निपतळा ' ' निपताळा ' पहा.

**लिप्सा** [ सं० ] स्त्री० १ कांहीं वस्तु मिळ-विण्याची इच्छा. २ इच्छा ( सामान्यतः ). ३ हाव; लोभ. [इच्छिणारा.

**लिप्सु** [ सं० ] वि० कांहीं वस्तु मिळवूं

**लिफाप** [ फा० लिफाफाह् ] पु० पत्र घालावयाची थैली ( कागद, कापड, इ० ची ).

**लिंब** [ सं० निंब ] पु० कडू निंब, कढी निंब, बकाण निंब, ही झाडें. मागें ' निंब ' पहा.

**लिबलिबीत** वि० फार मऊ; थिलथिलीत.

**लिंबलोण** इ० मागें ' निंबलोण ' इ० पहा.

**लिबा** वि० अशक्त; कमजोर.

**लिभास, लिबास** [ अ० लिबास् ] पु० १ पोशाख किं० पोशाखाची तऱ्हा. २ भव्य किं० भपकेदार सरंजाम किं० लवाजमा. ＊ **लिबासी, लिभासी** वि० कृत्रिम; तकलोबी; दिसण्यांत मात्र भपकेदार.

**लिलाम, लिलांव** [ पोर्चुगीझ ] पु० १ विकावयाचा जो पदार्थ त्याची जाहीर रीतीनें गिऱ्हाईकांपैकीं जो कोणी सर्वांहून अधिक किंमत द्यावयास सिद्ध असेल त्याला तो पदार्थ विकणें हा विक्रीचा प्रकार. २ ह्या प्रकारानें विकलेला पदार्थ. ३ ह्या प्रकारच्या विक्रीची किंमत. ＊ **लि-लामदार, लिलांवदार** पु० वरील प्रकारानें पदार्थ विकणारा किं० विकत घेणारा इसम.

**लिवका, लवका** [ म० लवणें ] वि० लवचीक; ताठ नव्हे असा.

**लिवलिवीत** वि० मऊ आणि थिलथिलीत असा ( चिखल, लोणी, इ० )

**लिहिणें** [सं० लिख् ] स० क्रि० १ लेखणी इ० साधनानें कागद इ० वर ( अक्षर ) काढणें किं० ( कांहीं चिन्हें ) करणें. २ मुलाचें शिकणें किं० विद्याभ्यास (बायकांत रूढ). ॐ **लिहिणें पुसणें** न० ए० व० १ लिहिणें, वाचणें, हिशेब करणें, जमाखर्च मांडणें, इ० रूप क्रिया. २ लेख; लेखपत्र. **लिहिणें वाचणें** न० ए० व० विद्या किं० विद्याभ्यास. **लिहिलें पुसलें** न० ए० व० लेखपत्र.

**लिक्षा** [ सं० ] स्त्री० १ उवेचें अंडें. २ लीख हा क्षुद्र प्राणी. ३ खसखस. ४ त्रसरेणु हें वजन, मागें ' त्रस ' मध्यें ' त्रसरेणु ' पहा.

**लीख** [ सं० लिक्षा=उवेचें अंडें; खसखस; त्रसरेणु ] स्त्री० १ उवेचें पूर्वरूप सूक्ष्म अंडाकार असतें तें. २ गझनी किं० वस्त्राचा रेशमी कांठ यांत रेशम ठासून भरलें नसल्यास मध्यें मध्यें जो सुताचा अंश दिसतो तो.

**लीद** [ हिं० ] स्त्री० १ हत्ती, उंट, घोडा, गाढव, इ० ची विष्ठा. २ एक वेल.

**लीन** [ सं० ] वि० १ नम्र झालेला. २ निमग्न. ३ मिळून गेलेला; एकरूप झालेला. ॐ **तल्लीन** वि० कांहीं कार्यांत अगदीं गढून गेलेला.

**लीप** [ सं० लिपि ] स्त्री० मागें ' लिपि ' पहा.

**लीला** [ सं० ] स्त्री० १ खेळ; क्रीडा; करमणूक. २ कांहीं काम करण्याचें सौकर्य किं० सुलभपणा. ३ विलास; कामचेष्टा. टीप,–'लीला' या शब्दाचीं ' लिला, ' ' लिळा ' इ० हीं अशुद्ध किं० अपभ्रष्ट रूपें. ॐ **लीलामनुष्य** पु० मनुष्याचें रूप धारण केलेला देव, सिद्ध, इ०. **लीलानट** पु० नट झालेला मनुष्य; नाटक इ० मध्यें सोंग घेतलेला मनुष्य. **लीलोद्यान** न० १ बड्या माणसाची विलासार्थ केलेली बाग. २ देववन, **लीलाकलह** पु० लटुपुटीचें भांडण. **लीलावती** स्त्री० १ सुंदर किं० विलासी स्त्री. २ भास्कराचार्यांचा एक गणितविषयक ग्रंथ. **लीलेनें** क्रि० वि० अनायासें; खेळांत जणों काय. **लीलावतार** पु० मत्स्य, कूर्म, वराह, इ० जे दहा अवतार विष्णूनें धारण केले ते प्रत्येक.

**लुकड, लुकड, लुकडा, लुकड्या** वि० कृश; किर्डकिर्डीत; रोडका.

**लुकण, लुकण, लुंकण** [ हिं० लुक् ] १ मारुति, म्हसोबा, इ० च्या अंगावर शेंदूर, तेल, इ० द्रव्यांचें मिश्रण लावितात तें. २ दगड, लाकूड, इ० च्या सांध्यांत भरतात जें चुना, राळ, मेण, इ० चें मिश्रण तें. ३ पदार्थाला चकाकी आणणारा एक प्रकारचा लेप किं० त्या पदार्थावर जें पाण्यासारखें पातळ मिश्रण लावितात तें.

**लुकसान, लुकसानी** मागें ' नुकसान, ' ' नुकसानी ' पहा.

**लुका, लुक्का** [ अ० लुक्का ] वि० १ धूर्त; कावेबाज. २ व्यवहारांत पक्का वस्ताद आणि न फसणारा आणि साधल्यास दुसऱ्यास फसविणारा. ३ दुर्दैवी माणूस; दैवहतक; उ० समुद्रास गेला लुका तों समुद्र झाला सुका.

**लुक्कड** वि० रोड; किडकिडीत; कृश.

**लगट** न० लुगडें.

**लुगडें** न० स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र.

**लुंगणें, लंगणें, लंघणें** अ० क्रि० आजार, उपवास, किं० काळजी, इ० मुळें अशक्त किं० रोड होणें.

**लुगदी, लुगधी** स्त्री०, **लुगदा** पु० पीठ, चिखल, भात, इ० चा गोळा; ठेचलेला पाला, चित्रें किं० मडकीं करण्यासाठीं कमावलेली माती, इ० चा गोळा. [ एक झाड.

**लुंगर** स्त्री० वड, पिंपळ, इ० च्या वर्गांतील

**लुगस** न० १ बाजरी, जोंधळा, राळा, इ० चें खुरटलेलें कणीस. २ घोंगडी, बुरणूस, शालजोडी, इ० चें फूल म्ह० पृष्ठभागावरील सूक्ष्म तंतु. ३ कुंचली, केरसुणी, चंवरी, इ० चीं टोकें समुच्चयानें. ४ लाकडाची धलपी किं० धलपीचें कुसळ.

**लुंगा** पु० १ राळा, नाचणा, राजगिरा, इ० चें किडकिडीत कणीस. २ लहान घोडा, उंट, गाढव, इ० प्राणी. ३ लहंगा. मागें ' लहंगा ' पहा.

**लुंगा** वि० सत्त्वहीन आणि किडकिडीत (कणीस, धान्याचा दाणा, मनुष्य, पशु, इ०).

**लुगारणें, लुंगारणें, लुंगाडणें** स० क्रि० १ ( मनुष्य, प्रवासी, इ० ना ) लुटणें किं० लुबाडणें. २ ( पैसा, वस्त्र, पात्र, इ० ) कोणेकापासून हिरावून किं० लुबाडून घेणें. ॐ **लुगारू, लुंगारू** पु० लुटारू; वाटमाऱ्या.

**लुंगी** [ फा० ] स्त्री० १ मुसलमान लोक नेसतात ते निळें, तांबडें, किं० काळें वस्त्र. २ हिंदु पुरुष नेसतात तो पंचा, गजा, इ०. ३

मुलांची लंगोटी. ४ बाजरीच्या दाण्याच्या खालीं असतें तें टरफल. ५ सजगुऱ्याच्या दाण्यावर जें बोंड असतें तें.

**लुंगू** न० बाजरी इ० चें खुरटलेलें किं० लहान कणीस.

**लुंघणें** अ० क्रि० लुबाडणें जाणें ( माणूस, [पदार्थ ).

**लुंघणें** [ म० लंघणें ] अ० क्रि० १ आजार, काळजी, उपास, इ० मुळें अशक्त आणि रोड होणें. २ कष्टानें थकणें.

**लुंघविणें** [ म० लुंघणें ] स० क्रि० लुटणें ( माणूस, पदार्थ ).

**लुचणें, लुंचणें** [ सं० लुच् ] अ० क्रि० (तरुण पशूनें )मातेचें दूध पिणें. स० क्रि० १ चिमटा इ० साधनानें दाढीचे किं० नाकांतील किं० डोक्यावरील (केश) उपटून काढणें. २ फाडणें; ओरबाडणें.

**लुचपत** स्त्री० अप्रामाणिकपणानें मिळविलेला [ पैसा इ०.

**लुचपणें** अ० क्रि० लंगडणें; लंगडत चालणें.

**लुचर** स्त्री० आंबा इ० फळांतील रेषा समुच्चयानें किं० त्यांचा रेषाळपणा.

**लुचलुचणें** स० क्रि० नखांनीं (कांहीं पदार्थ) ओरखडणें किं० फाडणें किं० ओरबाडणें.

**लुचाडणें** स० क्रि० लुबाडणें; नागविणें.

**लुचालुचा, लुचाबुंडा, लुचामुंडा** वि० जेथें जो पदार्थ असतो किं० असावयास पाहिजे तेथें तो पदार्थ ज्यांत किं० ज्यावर नाहीं असा; उ० बांगड्यावांचून हात, गंधावांचून कपाळ, इ० लुचेंबुचें.

**लुच्चा** [ हिं० ] वि० लबाड; अप्रामाणिक. ॐ **लुच्चाई, लुच्चेगिरी, लुच्चेशाई** स्त्री० लबाडी; अप्रामाणिकपणा.

**लुटणें** [ सं० लुन्=साल काढणें ] स० क्रि० लुबाडणें; हिरावणें; बलात्कारानें हरण करणें; नागविणें. टीप,-ज्याचा किं० जेथून किं० जो पदार्थ घेण्यांत आला त्याचेवर कर्मता असते; उ० पेंढाऱ्यांनीं गांव लुटला; उ० चोरांनीं सर्व रोकड लुटली; उ० वाटसरांना चोरांनीं लुटलें.

**लुटविणें** [ म० ' लुटणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० हावा त्यानें हावा तितका पदार्थविशेष घेऊन जाण्यास परवानगी देणें; उ० साळुंकाबाईनें संक्रान्तीचे वेळीं कोबीचे गड्डे लुटविले.

**लुटारा, लुटारी, लुटारू** [ म० लुटणें ] वि० लुटणारा; जबरदस्तीनें दुसऱ्याचा पैसा हरण करणारा.

**लुटुपुटु, लुटुटु, लुटुबुटु** वि० गमतीखातर खऱ्याचा देखावा ज्या खोट्याला दिला आहे असा (फराळ, इ०); कल्पित; कल्पनेचा; मुलांच्या खेळांतील हा शब्द आहे; उ० आम्ही लुटुपुटु फराळ केला. 'लुटुपुटीचा' ह्याच अर्थी.

**लुंठन** [ सं० ] न० जमीन इ० वर मनुष्य, पशु, इ० चें लोळणें.

**लुडकणें, लुडगणें** अ० क्रि० १ आडवें होणें. २ लवंडून पडणें; कोसळणें. २ कोणेकाकडे प्रेमानें ओढलें जाणें.

**लुडगी** स्त्री० १ सेवनार्थ केलेला भांगेचा एक प्रकार. २ झोकांडी ( खाणें, जाणें ).

**लुडतें** न० नकासगाराचें एक हत्यार.

**लुडबा** वि० १ बोबडा ( माणूस, मूल ). २ वर्णोच्चार करण्यास असमर्थ ( जीभ, ओठ, कंठ, इ० ). ३ लुडबुड्या ( माणूस, मूल ).

**लुडबुड** स्त्री० १ दुसऱ्यानें बोलावलेलें नसतां त्याच्या कामात पडणें. २ दुसऱ्याला मूल इ० नीं प्रेमपूर्वक केलेली किरकोळ मदत.

**लुडबुडणें** अ० क्रि० १ दुसऱ्याच्या कामांत आपण मदत करूं लागणें. २ इकडून तिकडे आणि तिकडून इकडे असे हेलपाटे घालणें किं० खाणें; उ० द्रविडो लुडबुडाम्यहम्.

**लुडबुड्या** [ म० लुडबुडणें ] वि० दुसऱ्यानें बोलाविलें नसता त्याच्या कामांत त्याला मदत करूं लागण्याच्या स्वभावाचा ( निंदेत प्रयोग ).

**लुडमा** वि० १ आखूड, तोकडा ( पाय, हात, बोट, इ० ). २ ज्याचा एकादा अवयव किं० भाग तोकडा आहे असा ( कोणताही पदार्थ ). ३ लुडबुड्या.

**लुंडा** वि० १ तोकडा, आखूड. २ पंगू; लुला. ३ छिन्नभिन्न ( पदार्थ, गात्र, अवयव ).

**लुडालुडा** वि० जीर्ण; थकलेला; मोडकळीस आलेला; अशक्त. [ (वृक्ष).

**लुडाबुचा** वि० शाखा, पानें, इ० नीं विरहित

**लुतकरी** स्त्री० लुगडें, धोतर, बंडी, इ० फाटून त्याची लोंबत असलेली चिंधी.

**लुतरा** वि १ लबाड; बडबड्या. २ चहाडखोर.

**लुप्त** [ सं० ] वि० १ लोपलेला. २ लपलेला; अदृश्य झालेला. ३ रद्द पडलेला. ४ वहिवाटींतून गेलेला. ५ लिहितांना किं० बोलतांना गळालेलें ( अक्षर ) किं० गळालेला ( मजकूर ). ॐ **लुप्तप्राय** वि० बहुतेक लुप्त झालेला; लुप्त झाल्यासारखाच; उ० विधवांचें वपन हल्लीं लुप्तप्राय झालें आहे. **लुप्तोपमा** स्त्री० उपमा ह्या अलंकाराचीं उपमेय, उपमान, साधारण धर्म, आणि उपमावाचक शब्द, अशीं जीं चार अंगें त्यांपैकीं एक किं० अधिक अंगें ज्या उपमेत अविद्यमान आहेत तिला' लुप्तोपमा' म्हणतात. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

**लुबकणें** अ० क्रि० १ कांहीं पदार्थ मिळण्यासाठीं टपून किं० वाट पहात बसणें; उ० उंदरासाठीं मांजर मघापासून येथें लुबकून बसलें आहे. २ चिकटणें.

**लुबरा,लुब्रा** [ हिं० ] वि०लोकांनीं आपणास विचारलें नसतां त्यांना उपदेश करूं जाऊन किं० आपलें मत सांगूं जाऊन उपद्रव देणारा; दोन माणसें बोलत असतां त्यांच्या भाषणांत भाग घेण्याचा अधिक प्रसंग करणारा.

**लुबलुब** स्त्री० मुलाचें भराभर बोलणें;मुलाची बडबड.

**लुबाडणें** स० क्रि० दुसऱ्याची वस्तु त्याच्या इच्छेविरुद्ध किं० त्याची परवानगी नसतां उपटणें; लुटणें. टीप,—माणूस किं०वस्तु ह्यांवर कर्मता येऊं शकते; उ० चोरांनीं त्या मुशाफराला लुबाडलें; उ० एका पठाणानें माझ्या खिशांतून तीन रुपये लुबाडले.

**लुब्ध** [ सं० ] वि० १ लोभावलेला. २ माणूस किं० पदार्थ ह्यांवर आसक्त झालेला. ३ उत्कटतेनें कांहीं पदार्थ इच्छिणारा. पु० १ पारधी. २ रंडीबाज.

**लुब्धक** [ सं० ] पु० १ पारधी. २ लोभी. ३ रांडबाज; वेश्यालंपट. ४ गुढहार. ५ (ज्योतिष) बृहल्लुब्धक ह्या तारकापुंजांतील ' क ' हा तारा. ह्याला इंग्रजींत सिरियस किं० डॉग्स्टार् म्हणतात. हा पाहिल्या प्रतीचा तारा असून अत्यंत तेजस्वी आहे. [' रुमणें ' पहा.

**लुमणी** स्त्री०, **लमणें** न० मागें ' रुमणी, '

**लुमणें** न० १ उनाड गाय, बैल, इ० च्या गळ्यांत बांधतात तें लाकूड. २ कोणत्याही कामांत आलेली हरकत किं० विघ्न. ३ अवाढव्य आणि अवजड अशी कोणतीही वस्तु. पुढें ' लोढणें ' पहा.

**लुलपणें** [ सं० लोलुप ] अ० क्रि० लोभानें आकृष्ट होणें; एकाद्या वस्तूकडे प्रेमानें ओढलें जाणें.

**लुला** [ हिं०; सं० लोल=हलणारा ] वि० १ जन्मतः किं० रोगादि कारणामुळें व्यंग किं० अशक्त असा ( हात, पाय, मनुष्य, प्राणी, इ० ); उ० हातानें, पायानें किं० जिभेनें तो लुला आहे; उ० त्याचा हात, पाय, जीभ, इ० लुली आहे. २ अशक्त; कमजोर; निर्जीव. ३ म्हातारपणामुळें किं० अन्य कारणामुळें आपलें कर्तव्य करावयाला असमर्थ. ४ अपूर्ण; सदोष. ५ यथास्थित न चालणारा; उ० माझी बायको मेल्यापासून माझा संसार लुला पडला; उ० महात्मा गांधी पुढें आले नसते तर लोकमान्यांनीं सुरूं केलेलं देशकार्य लुलं पडलें असतें. ॐ **लुलापांगळा** वि० मनानें किं० एकाद्या गात्रानें अशक्त, कमजोर, निर्वीर्य, किं० निरुपयोगी.

**लुलाय. ललाप** [ सं० ] पु० रेडा; टोणगा. ॐ **लुलायवाहन** पु० यम.

**लुलावणें** [ म० लुला ] अ० क्रि० १ (हात, पाय, इ० गात्र ) अशक्त होणें किं० आपआपलें कर्तव्य करावयाला असमर्थ होणें. २ अशक्त किं० कमजोर होणें. ३ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुड करून त्याला उपद्रवकारक होणें.

**लुलित** [ सं० ] वि० १ खिळखिळें झालेलें; २चिरडलेल; कुसकरलेलें. ३कोमेजलेलें.४ढवळलेलें.

**लुलपतू, लुलुपुत, लल्लुपत्त** स्त्री० कोणेकाला वश करून घेण्यासाठीं त्याला दादा बाबा करणें किं० त्याचीं आर्जवें करणें.

**लुल** वि०दारूनें झिंगलेला;कैफ इ०नीं बेहोष झालेला; गुल.

**लुवलुवणें** अ० क्रि० १ ( मुलाच्या जिभेनें) बोलण्याचा प्रयत्न करणें. २ ( ढेकूण, पिसवा, इ० ) अंगावर चालणें किं० सरपटणें.

**लुसकान, लुसकानी** मागें ' लुकसान, ' ' लुकसानी, ' ' नुकसान, ' ' नुकसानी ' पहा.

**लुसलुशीत** वि० मऊ आणि टवटवीत; अतिशय कोंवळा.

**लुसलुसणें** अ० क्रि० १ एकाद्या वस्तूबद्दल अतिशय उत्कंठित होणें. २ तजेलेदार किं० टवटवीत असणें किं० दिसणें.

**लुहंगी, लोहांगी, लोहांगीकाठी** स्त्री० पुढें ' लोहगी ' पहा. मागें 'लव्हांगा' पहा.

**लुळणें** [ सं० लुल् ] अ० क्रि० लोळणें.

**लुळा** वि० मागें ' लुला ' पहा. ॐ **लुळापुळा** वि० म्हातारपणामुळें किं० अन्य कारणामुळें अशक्त,कमजोर,किं०निर्वीर्य झालेला(माणूस,पशु, पदार्थ ). **लुळालुळा** वि० मनानें आणि शरीरानें पंगू किं० अशक्त किं० निर्वीर्य.

**लुळी, लोळी** [ म० लोळणें ] स्त्री० श्रम, झोप,थकवा,इ० मुळें मूल,माणूस,पशु,यांना जमीन इ० वर लोळण्याची इच्छा ( येणें ).

**लुलें** न० १ बाजारबुणगें; वात्रट,टवाळ, किं० मवाली लोकांचा समुदाय, दाटी. किं० गर्दी. २ दुकानदार, गिऱ्हाईक, व्यापारीमंडळी, सट्टेबाज लोक.इ०ची गर्दी ३ तमाशा, मारामारी, भांडण, इ० चाललेलें असतां गोळा होतात ते लोक समुच्चयानें.

**लू, लूक.लूख** स्त्री० उन्हाचा तडाखा; उ० सूर्याच्या चंडकिरणांमुळें लुकानें पुष्कळ लोक बेशुद्ध होऊन पडूं लागले.

**लूट** [ म० लुटणें ] स्त्री० १ लुटण्याची क्रिया. २ लुटण्यानें मिळालेले जें कांहीं ते;उ०मोगल दरदरवडेखोरांनीं हिंदुस्थानांतून पुष्कळ लूट नेली. ३ सढळपणानें केलेला खर्च, गरीबांना घातलेलें जेवण, दिलेलें दान, इ०. ४ आंबे, पेरू, तांदूळ, इ० पदार्थांची कांणक स्वस्त किं०वाली झालेली समृद्धि किं० विपुलता. **लूटलवाड** स्त्री० लूट किं० लुबाडणी.

**लूत** स्त्री० मनुष्य, कुत्रा, इ० प्राण्यांस होत असतो तो एक प्रकारचा त्वचेचा रोग. २ सुरणाच्या झाडासारखें एक औषधोपयोगी झाड. त्याच्या फुलाला ' शेवाळें ' म्हणतात.

**लेक** पु० कोणेकाचा मुलगा किं० पुत्र. स्त्री० कोणेकाची मुलगी किं० कन्या. ॐ **लेकपूत** पु०, **लेकबाळ** पु०, न० मूलबाळ; मूलबाळ ( लिंग मनांत न आणतां ). **लेकवळा** पु० रांडेचा किं० रखेलीचा मुलगा. **लेकवळी** स्त्री० रांडेची किं० रखेलीची मुलगी.**लेकवळें** न०रांडेचें किं०रखेलीचें अपत्य,–लिंगांचा विचार न करतां.

**लेकरूं** न० मूल ( प्रेमानें किं० अनुकंपेनें ). ॐ **लेकरालेकरीं** क्रि० वि० वाडवडिलांपासून ( चालत आलेलें वतन, हक्क, इ० ). **लेकरेंबाळें** न० अ० व०, **लेकरूंबाळ** न० मुलेंबाळें; मुलें बिलें. **लेकुरछंद** पु० १ मुलांत मिसळण्याची आवड; मुलांचा शोक. २ पोरकट नाद.

**लेकुरवा** वि० पोरकट. **लेकुरवाला (–ळा )** पु० ज्याला मुलेंबाळें आहेत असा पुरुष. **लेकुरवाली (–ळी )** स्त्री० जिला मुलेंबाळें आहेत अशी स्त्री.

**लेख** [ सं० ] पु० १ जें लिहिलें किं० लिहिण्यांत आलें आहे तें. २ दस्तऐवज; लिहिलेला कागद. ३ एक, दोन, इ० चे पाढे मुलें जे शिकतात ते प्रत्येक. ॐ **लेखपत्र** न०, **लेखपूस** पु० कांहीं करार, व्यवहार, इ० करतांना उभयपक्षांना किं० एकाच पक्षाला जो बंधनकारक ताकीदपत्र, दस्तऐवज, कर्जखत, सनद, इ० लेख केलेला असतो तो. **लेखापुढीं** क्रि० वि० लिहिण्यांत किं० नमूद करण्यांत ( आलेला करार इ० ). ह्याच्या व्यावर्तकत्वें ' तोंडातोंडीं, ' ' तोंडावाटें, ' ' तोंडोतोंडी '

**लेखक** [ सं० ] पु० १ लिहिणारा. २ लिहिण्याचा धंदा करणारा. ३ दुसऱ्याच्या सांगिवरून लिहिणारा. ४ ग्रंथकर्त्यानें सांगितलेला मजकूर जेव्हांच्या तेव्हां आणि सांगितल्याबरहुकुम लिहिणारा कारकून.

**लेखणी** [ सं० ] स्त्री० शाईनें कागद इ० वर लिहिण्याचें बोरू, कांबटी इ० चें केलेलें साधन. 'लेखण,*लेखनी,' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.ॐ **तो लेखणीचा बहाद्दर आहे. त्याची लेखणी खबरदार आहे, तो लेखणीचा पुरा** ( किं०

**भंड )** **आहे,** त्याच्या **लेखणीस चंग बांधला आहे** १ तो उत्कृष्ट लिहिणारा आहे. २ त्याच्या लिहिण्यांत चुकी होत नाहीं. २ त्याचें अक्षर उत्तम वळणदार आहे.

**लेखणें** [ **सं०** लिख् ] **स० क्रि०** १ मानणें; समजणें; गणणें. २ कोणेकाला त्याच्या योग्यतेप्रमाणें मान देणें. ३ आदरास पात्र समजणें. ४ लिहिणें.

**लेखन** [ **सं०** ] **न०** १ लिहिणें. २ जें लिहिलें तें. ३ लिहिण्याची तऱ्हा किं० शैली. ४ चित्र, नकाशा, इ० काढणें किं० रेखादींनी निर्मिणें. ❀ **लेखनाडंबर न०** १ पुष्कळ लिहिणें. २ लांबलचक पत्र इ० लिहून वाचणाऱ्यास त्रास देणें किं० आपल्या लेखनपटुत्वाची ऐट मिरविणें. **टीप,**–पत्र इ०चा शेवट करतांना पुढीलप्रमाणें हा शब्द योजतात; उ० कळावें ही विज्ञप्ति, लेखनाडंबर कशास पाहिजे ?

**लेखनी** [ **सं०** ] **स्त्री०** वर ' लेखणी ' पहा.

**लेखा** [ **सं०** लेख ] **स्त्री०** १ हिशेब; गणती. २ माणूस, पदार्थ, इ० ची योग्यता किं० महत्त्व किं० परवा; उ० मला तुझ्या दहा रुपायांची काय लेखा ? ३ कोणत्याही व्यवहारासंबंधाचा लेख. ४ वर ' लेख ' मध्यें अर्थ ३ पहा.

**लेखापुशीं** मागें ' लेख ' मध्यें पहा.

**लेचणें अ० क्रि०** खचणें; दबणें; दबकणें.

**लेचापेचा वि०** अशक्त; कमजोर; निर्वीर्य.

**लेजीम** [ **फा०** ] **स्त्री०, न०** लाकडाच्या दांड्याच्या दोन टोकांना सांखळी बसवून व्यायामासाठीं केलेलें तालीमखान्यांतील एक साधन.

**लेटणें** [ **हिं०** लेटना] **अ० क्रि०** विश्रांति इ० साठीं जमीनीवर आडवें अंग करणें.

**लेंड** [ **सं०** ] **न०** १ लेंडूक. २ मनुष्य, कुत्रा, मांजर, इ० च्या विष्ठेचा गोळा. ❀ **लेंडसुखास येणें** लहान मूल इ० चें प्रेम करतां करतां अत्यन्त तल्लीन होऊन देहभान विसरणें.

**लेंडकी स्त्री०** चरकांत घालून पिळून काढलेला ऊस. ❀ **लेंडक्या, लेंडकवळ्या, लेंडूकवळ्या पु०** चरकांत पिळून काढलेल्या उसांचा ताटे दुसऱ्या बाजूकडून ओढून घेणारा मनुष्य.

**लेंडपेंड पु०, न०** दागिने इ० नटण्याच्या उपयोगाचे पदार्थ समुच्चयानें.

**लेंडी** [ **सं०** लेंड ] **स्त्री०** १ घोडा, उंट, बकरी, घूस, उंदीर, इ० च्या विष्ठेची लहान गोळी. २ घोड्याचें खोगीर पुढे सरकूं नये म्हणून त्याला बांधतात जो शेपटीच्या खालून घातलेला पट्टा तो. ३ खोगिराच्या पुढच्या अंगास जो घोरबंध असतो तो. ४ बांझोळ्या ताडाला शेंगेसारखा एक लांब अवयव येत असतो तो. ५ मखमलीचें एकेरी फूल. ❀ **लेंड्या गाळणें** ( **किं० टाकणें किं० हगणें**) भयानें गर्भगलित होणें. **लेंडीच्याक स्त्री०** धनधान्यादींची समृद्धि ( अशिक्षितांत रूढि ). **लेंडी प्रसाद पु०** चाबूक किं० छडी मारतांच हगणारा घोडा ( तुच्छतेनें ). **लेंड्याताड पु०** ज्यावर फळें येत नाहींत, फळांचें जागीं नुसत्या लेंड्याच येतात असा ताड; नरताड.

**लेंडूक** [ **सं०** लेंड ] **न०** मनुष्य, कुत्रा, इ० ची केळ्याच्या आकारासारखी पडलेली विष्ठा.

**लेंडूकवळ्या** मागें ' लेंड ' मध्यें 'लेंडकवळ्या' पहा.

**लेंड्याताड** मागें ' लेंडी ' मध्यें पहा.

**लेणदेण** [ **हिं०** लेनादेना ] **स्त्री०** देणें, घेणें, इ० रूप व्यवहार ( व्यापाऱ्यांच्या भाषेंत ).

**लेणें स० क्रि०** १ डोळ्यांत (काजळ) घालणें, कपाळावर ( कुंकूं ) लावणें, अंगावर यथास्थानी ( दागिने ) घालणें. २ (लुगडें इ०) नेसणें. **टीप,**–भूत काळीं ह्या क्रियापदाचा कर्तरि प्रयोग होतो; उ० मालिनी खानम् लहंगा ल्याली.

**लेणें न०** १ शरीराला शोभा देणारा कोणताही पदार्थ,–दागिना, कुंकूं, काजळ, इ०. २ चैत्र महिन्यांत गौरीच्या उत्सवांत भिंतीवर गोपुर इ० चें चित्र काढतात तें. ३ डोंगर पोखरून त्यांत कोरून करतात जो सभामंडप इ० तो. ह्यांना ' पांडवलेणे ' असेंही म्हणतात.

**लेथडणें स० क्रि०** शेण, माती, राख, खरकटें, इ० नीं ( भांडें, अंग, इ० ) माखणें किं० लिप्त करणें.

**लेप** [ **सं०** ] **पु०** १ सारविणें; माखणें. २ अंगाला लावतात ती चंदन इ० ची उटी. ३ चुना, चिखल, इ० चा भिंत इ० वर केलेला गिलावा. ४ भात, भाजी, इ०चा हात, भांडें, इ०

ना निकटून राहिलेला अंश. ५ दुखणारें किं० ठणकणारें गात्र इ० वर झाडाचीं पानें इ० चा ठेचा बांधतात तो. ❀ लेपवणी न० खरकटीं मांडीं ज्यांत धुतलीं आहेत असें पाणी. लेपवळ स्त्री० भोजनानंतर जमीनीवरची उष्टीं काढ-ण्याच्या पूर्वी ताटें, वाट्या, पत्रावळी, इ० राहिलेल्या असतात त्या समुच्चयानें. लेपाटा पु० भिंत इ० वर दांडगाईनें किं० ओबड-धोबड रीतीनें केलेला चिखल इ० चा थर किं० गिलावा किं० सारवण.

लेप पु०, लेपडी स्त्री०, लेपडें न० वस्त्राच्या खोळांत कापूस इ० चा पातळ थर घालून टांके मारून बसण्यासाठीं किं० पांघरण्यासाठीं जो पदार्थ करतात तो; सुजनी.

लेपणें [ सं० लिप् ] स० क्रि० १ शेण, माती, गंध, रंग, इ० नीं ( भिंत, अंग, जमीन, इ० ) माखणें किं० सारविणें. २ ( शेण, माती, रंग, इ० नीं ) जमीन, अंग, भिंत, चित्र, इ० सारविणें किं० माखणें.

लेपन [सं०]न० १लेपण्याची क्रिया.२चुना,रंग, शेण,इ०जें फासावयाचें किं० लेपावयाचें द्रव्य तें.

लेपाळणें [ म० ' लेपणें ' चें एक रूप ]स० क्रि० माखणें; सारविणें. वर ' लेपणें ' पहा.

लेपाळा [ म० लेपाळणें ] पु० हात, मांडें, इ० ना लागलेलें किं० चिकटलेलें जें तेल, तूप, खरकटें, इ० त्यांचा थर ( जमणें, बसणें, लागणें, इ० ).

लेरुडा पु० १ [illegible] पट्टा. २ कपाळावर गंध,कुंकू,इ०चा ओ[illegible] पट्टा किं०फराटा.

लेबडा, लेभळा [illegible] ' नेभळा ' पहा.

लेंभडण, लेभणें [illegible] क्रि० आजार,अतिकष्ट, चिंता, अपुरें जेवण, इ० मुळें रोड होणें किं० थकणें.

लेभागू [ हिं० लेना ( घेणें ) + भागना ( पळून जाणें )] पु० दुसऱ्याचा पदार्थ उचलून घेऊन पळून जाणारा मांजर्‍या, कुत्रा, इ०.

लेंमं न० लफडें; झेंगट; भांडणाचें कारण; वादाचा विषय.

लेलाम, लेलांव मागें ' लिलाव ' पहा.

लेलिह [ सं० ] पु० १ पोटांतील जंत. २ सर्प. ❀ लेलिहमुद्रा स्त्री० तंत्राच्या चौसष्ट हजार मुद्रा किं० संस्थानें ह्यांपैकीं एक.

लेलेमजनू [ फा० लैली+मजनून ] पु० गरीब, अनाथ, आणि हतभाग्य असा माणूस. टीप,–शिमग्याच्या सणांत लैली आणि मजनून ह्या आशुक माशुकांच्या हतभाग्य स्थितीचें एका फारशी काव्यातील संविधानकावर बसविलेलें नाटक तमासगीर करतात किं० करीत असत त्यावरून ' लेलेमजनू ' चा वरील प्रमाणें अर्थ अडाण्यांत रूढ झाला. [चें जोडपें.

लेवट न० मैथुनार्थ जुळलेलें सर्प, कुत्रा, इ०

लेवट, लेवा, लेप पु० शेताची जमीन भाज-ण्यासाठीं पसरलेला काटक्याकुटक्या,गवत,पानें, इ० चा थर.

लेवट पु०, न० कापसाचें विणून बनविलेलें दडदडीत आणि जाडी वस्त्र.

लेवणू [नंदभाषेंत] वि० पाऊण हें परिमाण.

लेवणें स० क्रि० ( भाजावयाच्या शेत-जमीनीवर)काटक्याकुटक्या,गवत,पानें,माती, इ० चा थर करणें. लेवणें न० असा केलेला थर.

लेवा [ सं० लेप ] पु० चिखल, चुना, औष-धींचा रस, काष्ठाचें उगाळलेलें गंध, इ० शरीर, भिंत, इ० कांवर सारवून झालेला किं० केलेला थर.

लेवाडा ( –ड्या ) वि० ज्याला गात्रें सफाईनें किं० जोरानें हालवितां येत नाहींत असा अशक्त,कमजोर ( माणूस किं० त्याचें तसें गात्र ); नेभळा.

लेवा देवा पु०, लेवदेव, लेवादेवी स्त्री० [ हिं० ]देणें घेणें इ० रूप कोणेकाचा कोणेकाशीं असलेला संबंध किं०व्यवहार.

लेश [ सं० ] पु० १ अल्पांश; अत्यन्त थोडें परिमाण. २ अल्पत्व. ३ दोन कला हा कालाचा अवधि. टीप,–अठरा निमेष म्ह० एक काष्ठा; दोन काष्ठा म्ह० एक लव; पंधरा लव म्ह० एक कला; दोन कला म्ह० एक लेश.

लेश, लेस [ हिं०लेस ] वि० सर्व अंगांनीं, उपांगांनीं, किं० सर्व बाजूंनीं सिद्ध किं० तयार झालेला किं० अमलेला (माणूस, पदार्थ,काम).

लेशपंड, लेसपंड, लेसट न० १ अपूर्ण काम

किं० कारभार. २ लचांड; शुष्ककाष्ठ. ३ पंचाइतीची किं० पेचाची स्थिति.

**लेसट** [सं० लेश; म० लेश] न० १ तेल, तूप, जेवलेलें अन्न, इ०चा हात, भांडें, जमीन, इ० ना चिकटून राहिलेला अवशेष. २ लेशपंड. मागें 'लेशपंड' पहा. वि० अपूर्ण, अर्धवट, निकालांत न निघालेलें किं० न काढलेलें (काम, कारभार, वाद, इ०).

**लेसाटा** वि० किडकिडीत; रोड.

**लेह** [सं०] पु० १ चाटणें ही क्रिया. २ चाटून खावयाचा पदार्थ,–औषध, मेथकूट, रायतें, इ०. ३ ग्रहण लागण्याचा एक प्रकार.

**लेहन** [सं०] न० १ चाटण्याची क्रिया. २ जें चाटावयाचें तें,–मेथकूट, औषध, इ०.

**लेह्य** [सं०] वि० चाटावयाचें किं० चाटून खावयाचें (औषध, मेथकूट, इ०). न० चाटून खावयाचा कोणताही पदार्थ.

**लै** [म० लई, लय] वि० पुष्कळ, बहुत. ❀ **लैलूट** स्त्री० मागें 'लईलूट' पहा.

**लोइली, लोयली** स्त्री० गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर.

**लोक** [सं०] पु० १ मानवी प्राणी समुच्चयानें. २ मानवी प्राणी एक एक (प्रयोग अ० व०); उ० लोक हसतील असें कांहीं करूं नये; उ० उ० चरक्याचें महत्त्व सर्व लोकांस पटलें आहे. ३ एका विशिष्ट देश, प्रांत, इ० तील व्यक्ति (प्रयोग अ० व०); उ० हिंदू लोक, चिनी लोक, इ०. ४ एकादा विशिष्ट पंथ, जात, संस्था, संप्रदाय, धंदा, इ० तील व्यक्ति; (प्रयोग अ० व०); उ० वैष्णव लोक, महानुभावी पंथाचे लोक, महार लोक, सोनार लोक, इ०. ५ मनुष्य, देव, दैत्य, गंधर्व, अप्सरा, इ० पैकीं प्रत्येकांचा समूह. ६ इंद्र, ब्रह्मदेव, विष्णु, इ०चें वसतिस्थान; उ० इंद्रलोक, ब्रह्मलोक, इ०. ६ वसतिस्थान (सामान्यतः); उ० अधोलोक, ऊर्ध्वलोक, स्वर्गलोक, भूलोक, इ०. ७ विशिष्ट काम, कारभार, इ० साठीं नियुक्त जीं माणसें तीं; (प्रयोग अ० व०). ८ परकीं माणसें (प्रयोग अ० व०); उ० माझी मसलत लोकांत करूं देऊं नको. ९ प्रजाजन; रय्यत (प्रयोग अ० व०); उ० लोकांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष्य करणारा राजा मूर्तिमत सैतान होय. ❀ **लोकातिग, लोकाधिक** वि० अलौकिक, असामान्य. **लोकाधिप** पु० १ राजा. २ देव. **लोकांतर** न० परलोक. **लोकापवाद** पु० टपका; जननिंदा. **लोकालोक** पु० सप्त द्वीपात्मक पृथ्वीला तटबंदीसारखा आहे तो पर्वत. **लोकेश** पु० १ राजा. २ ब्रह्मदेव. **लोकोक्ति** स्त्री० १ म्हण. २ ज्यांचा रूढ अर्थच घ्यावयाचा, शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं, असे शब्द समुच्चयानें; उ० डोळ्यांत तेल घालून बसणें, डोक्यांत राख घालणें, मूग गिळणें, इ०. ३ (साहित्य) ज्या वाक्यांत वरचा अर्थ २ चा वाक्प्रचार आहे म्हणून ज्या वाक्याला चारुता प्राप्त झाली आहे असें वाक्य; उ० हरिच्या पुन्हा पुन्हा कां काळ्या नाकांत घालिशी शशका? **लोकेषणा** स्त्री० १ लोकांनीं आपणास बरें म्हणावें, हसूं नये, अशी इच्छा. २ स्वर्गादि लोक आपणास मिळावा अशी इच्छा. **लोककंटक** पु० दुष्ट मनुष्य; कुकर्मी. **लोकचक्षु, लोकनेत्र, लोकलोचन** पु० सूर्य. **लोकजित्** पु० गौतमबुद्ध. **लोकत्रय** न०, **लोकत्रयी** स्त्री० स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ समुच्चयानें. **लोकपाल** पु० १ राजा. २ अष्ट दिशांचे स्वामी प्रत्येक. मागें 'अष्ट' मध्यें 'अष्टदिशा' आणि 'अष्टदिक्पाल' पहा. **लोकप्रवाद** पु० वदंता; अफवा. **लोकबंधु, लोकबांधव** पु० सूर्य. **लोकबाह्य** वि० १ लोकांची रीति सोडून वागणारा. २ वाळींत टाकण्यांत आलेला; बहिष्कृत. **लोकयात्रा** स्त्री० १ जगाचा व्यवहार. २ लोका[illegible]. ३ इहलोकचें आयुष्य. **लोकविश्रुत** [illegible] १ सर्वांस ठाऊक असलेलें. २ जगांत प्रसिद्ध; विख्यात. **लोकसंग्रह** पु० १ लोककल्याण. २ जगाचें धारणपोषण. ३ सर्व लोकांस अनुकूल करून घेणें. **लोकसाक्षिक** क्रि० वि० सर्व लोकांच्या समक्ष. **लोकसिद्ध** वि० प्रघातांतील. **लोकस्थिति** स्त्री० जगाची सुव्यवस्था. **लोक आणि ओक** लोकांचें मत किं० टीका ओकीप्रमाणें त्याज्य होय. **लोकधारजिणा** वि० १ लोकांच्या उपयोगीं पडण्याच्या स्वभावाचा. २ लोकांचीं कामें करून स्वतःचीं कामें न करणारा. **लोकमान्य** वि० लोकांना मान्य किं० आदरणीय (चाल, रीति, इ०).

पु०बाळ गंगाधर टिळक हे देशभक्त. **लोकभाषा** स्त्री०सामान्य जनांची भाषा,—ह्याच्या व्यावर्तकत्वें विद्वानांची भाषा. **लोकलज्जा** स्त्री०लोक आपणाला काय म्हणतील हा विचार. **लोकसंपादणी** स्त्री० लोकांची कृपा किं० आदर संपादणें. **लोकापवाद** पु० लोकांनीं केलेली निंदा. **लोकांलोकीं** क्रि० वि० १ तिऱ्हाइतांकडून; तिऱ्हाइतांमार्फत. २विशेष पुरावा नाहीं अशा प्रकारें;उ० ही खबर मी लोकांलोकीं ऐकिलेली आहे, तिच्या वर किती भरंवसा ठेवावयाचा हें तुमचें तुम्ही ठरवा. **लोकलोकपाळ** पु० अ० व० बडे सरदार, बडे लोक, अधिकारी पुरुष, त्यांचे नोकर चाकर आणि आश्रित, इ० लोक.

**लोकर** स्त्री० मेंढरें इ०च्या अंगांवरील केश समुच्चयानें.

**लोखंड** [ सं० लोह ] न० एक खनिज धातु; लोह. ह्या धातूचे तरवार, पहार, इ० असंख्य उपयुक्त पदार्थ करतात. ☸ **लोखंड काम** न० १ पेटी, दार, यंत्र, इ० मध्यें जे लोखंडाचे भाग बिजागऱ्या, खिळे, इ० लागतात ते समुच्चयानें. २ लोहाराचें काम. **लोखंडी** वि० १ लोखंडाचा बनविलेला. २ लोखंडा संबंधाचा. ३ लोखंडासारखा टणक, मजबूत, कणखर, ( प्रकृति, हाडपेर, लाकूड, इ० ). ४ फार आग करणारा ज्वर. **लोखंडी** स्त्री० १ लोखंडाची कढई. २ एक वेली. **लोखंडी कडबा** पु०अरगडी जातीच्या जोंधळ्याचे ताट. **लोखंडी काव** स्त्री० काव ह्या नांवाची तांबडी माती. **लोखंडी चुना** पु० मजबूत आणि टिकाऊ चुना किं० अशा चुन्याची रचना किं० अशा चुन्यानें केलेलें कांहीं काम. **लोखंडी जर** पु० खोटा जर. **लोखंडी रस्ता** पु० आगगाडीसाठीं रूळ घालून केलेला मार्ग.

**लोंग, लोंगी, लोंघ** स्त्री० भात, गहूं, राळा, वरी, इ० धान्याचें कणीस.

**लोंगर** [ म० लोंग ] न०, पु० १ केळीच्या झाडाला येतो तो केळ्यांचा घड. २ मोठा लोंग ह्य० कणीस. वर ' लोंग ' पहा.

**लोंघळाविणें** स० क्रि० चिखल, राख, माती, इ० मध्यें ( वस्त्र ) लोळविणें.

**लोचका, लचका** पु० चिखल, पीठ, मांस, इ० चा तोडून काढलेला तुकडा. मागें 'लचका' पहा.

**लोचट, लोचड** [ म० लवणें ] वि० १ चिवट, लवकर फाडून किं० तोडून जिचा तुकडा काढतां येत नाहीं अशी ( भाकरी, पोळी, जिलबी, इ० ). २ कितीही झिडकारलें किं० रागें भरलें तरी जो लगट करावयास किं० बोलावयास येतो असा निर्लज्ज ( मनुष्य ).

**लोचण** स्त्री० न्हाव्याचा केश उपटण्याचा चिमटा.

**लोचन** [ सं० ] न० १ पाहाणें. २ निरेखणें. ३ डोळा,—बघण्याचें इंद्रिय.

**लोंचा** पु० निकालांत न निघालेला वाद, तंटा, कर्ज, हिशेब, इ०.

**लोंजारणें** स० क्रि० ( मूल, घोडा, इ० चे ) लाड करणें किं० ( त्यांना ) गोंजारणें.

**लोट** [ म० लोटणें ] पु० १ पाणी, वारा, माणसें, गुरें, पक्षी, इ०चा एकदम आणि जोरानें आलेला मोठा प्रवाह, समुदाय, किं० टोळी. २ गतिमान पदार्थाच्या गतीचा किं० वेगाचा जोर. ३ गतिमान पदार्थानें दिलेला धक्का किं० ह्या धक्क्याचा जोर. ४हरएक प्रकारची कामें, काळज्या, जबाबदाऱ्या, इ० चें मनावर पडलेलें दडपण. ५ आंबे, फणस, इ०ची ऋतुविशेषांत झालेली समृद्धि किं० वैपुल्य. ☸ **लोटगाडा** पु० आंत सामान भरून ढकलीत न्यावयाची हातगाडी.

**लोटण** [ हिं० ] पु० एक प्रकारचें खबूतर.

**लोटणें** [ सं० लुठ् ] स० क्रि० ( पदार्थ ) जोरानें पुढें ढकलणें किं० सारणें. २ जमीनवरून ( दगड, चाक, इ० )त्याच्या आसाभोंवतीं फिरवत ढकलणें किं० पुढें सारणें. ३ खिडकी, दार, झडप, इ० बंद करण्यासाठीं चौकटींत ढकलणें. ४ ( दिवस, काळ ) घालविणें किं०अतिक्रान्त करणें. ५ ( खाद्य, पेय, औषध, इ० ) घशाखालीं घालणें ( नाखुषीनें किं० आधाशीपणानें ). अ० क्रि० १ ढकललें जाणें. २ जोरानें येणें किं०घुसणें किं० वाहणें. ३ ( काळ ) अतिक्रान्त होणें. ४ (माणसें, गुरें, बाजारांत माल, इ० ) पुष्कळ संख्येंत किं० प्रमाणांत येणें, जाणें, किं० जमणें. ५ लोळणें. ६ ( भिंत, घर, इ० ) कोसळणें किं० ढासळणें किं०

उलथून पडणें. ७ डोळ्यांतून ( अश्रु ) जोरानें किं० पुष्कळ गळणें.

**लोटपोट** [ म० लोटणें ] **स्त्री०** १ लोळण. २ बेसुमार मौज, आनंद, हशा, खिदळणें, इ० चाळे किं० क्रीडा. ३ पूर्ण तृप्ति किं० समाधान. ४ कसें बसें केलेलें काम किं० कसेंबसें काम रेटण्याची क्रिया. ५ वैपुल्य; चंगाळी. ६ नृत्य,गीत,वक्तृत्व, इ० पाहून किं० ऐकून कोणेकाची होते ती तल्लीनता, करमणूक, किं० एकाग्रता.

**लोटा, लोट्या** [ हिं० लोटा ] **पु०** आकारविशेषाचें मातीचें किं० धातूचें पात्र. **लोटी स्त्री०** आकारविशेषाचें धातूचें पात्र. ॐ **लोटाबाडगी स्त्री०,लोटाबासन न०**१ स्वयंपाकास किं० इतर हरएक कामास लागणारीं भांडीं समुच्चयानें. २ह्या भांड्यांची जुळवाजुळव इ० रूप स्वयंपाकाची पूर्व तयारी.

**लोटांगण** [ म० लोटणें ] **न०** १ देवापुढें किं०साधु पुरुषापुढें किं० राजा इ०पुढें नम्रपणानें लोळणें ( घालणें ) किं० पालथें पडणें. २ मनुष्य, पशु,पदार्थ,इ० कोलमडून किं० ढासळून पडणें.

**लोटालोटी** [ म० लोटणें ] **स्त्री०** १ एकमेकांनी एकमेकांस लोटणें किं० ढकलणें. २ एकमेकांवर कामाची कोलाकोली. ३ काम कसेंबसें करणें किं० तें चालढकलीवर नेणें.

**लोठा, लोठ्या, वि०** लठ्ठ किं० अगडबंब ( माणूस, लाकूड, पशु, किं० कोणताही पदार्थ ). ॐ **लोठाश्रम पु०** १ कोणीही अगडबंब माणूस; धटिंगण. २ ज्याच्या मागें बायको, मुलें, संसार, इ० कांहीं व्याप नाहीं असा माणूस.

**लोड न०,पु०,लोढ पु०**१टेकावयासाठीं केलेला लांब आणि वाटोळ्या आकाराचा पदार्थविशेष; लांबोडा तक्या. २ एक प्रकारची तुरपून घातलेली शिवण. ३ सुताराच्या सामत्याचा लाकडी भाग. **न०** पाभर, कुळव, इ० आउतांस एक अवयवभूत आडवें लाकूड असतें,-ज्यांत जुंवाचा दांडा अडकवितात, तें. [ हत्यार.

**लोढणें न०** सुतार इ० चें कोरकामाचें एक

**लोढणें स० क्रि०** ( कापसांतून ) सरकी काढणें. ॐ **लोढाई स्त्री०** कापसांतून सरकी काढणें किं० ह्या कामाबद्दलची मजूरी.

**लोढणें न०, लोढणा पु०** १ नाठाळ गाय, म्हैस, इ० च्या गळ्यांत बांधतात तें लाकूड. २ आपणाला अप्रिय असें माणूस किं० काम जें आपल्या पाठीस लागलेलें असतें तें. ३ बेढब आणि जड असा दागिना इ०.

**लोंढा पु०** १ एकदम जोरानें वाहात येणारा किं० आलेला पाण्याचा प्रवाह; पूर. २ मोठी आणि जोराची पाण्याची लाट. ३ कोणत्याही धान्यें, फळें,इ०पदार्थांची बाजार, शेत, इ० मध्यें एकदम झालेली समृद्धि. ४ गांव, देश, इ० वर धाड घालावयासाठीं परगांवाहून किं०परदेशांतून आलेली लुटारूंची टोळी. ५ यात्रा इ० प्रसंगानें एकाद्या स्थळीं एकदम गोळा झालेले पुष्कळ लोक. ॐ **लोंढ्याबरोबर वाहात जावें लागतें** समाजांत रूढ असलेल्या किं०होत चाललेल्या सरणीनें प्रत्येकाला वागावें लागतें,-स्वताची वैयक्तिक इच्छा किं० मत हीं उलट असलीं तरी.

**लोण** [ सं० लवण ] **स्त्री०** १ खाऱ्या पाण्याच्या शेजाराला उगवणारें एक प्रकारचें गवत. २ जमीनींतील क्षाराचा अंश. ३ मीठ. ॐ **लोणट न०**अर्थ १चें गवत जेथें विपुल उगवतें अशी जमीन.

**लोण न०** आट्यापाट्यांच्या खेळांत सगळ्या पाट्यांतून निघून जाऊन पलीकडची थोडीशी माती परत आणणें किं० अशी परत आणलेली माती ( आणणें, येणें, देणें ). अशी माती आणली म्हणजे डाव जिंकला असें समजण्यांत येतें. ॐ **लोण बारगळणें** एकादा नियम उल्लंघिल्या कारणानें निरुपयोगी होणें किं० फुकट जाणें. **टीप**,-आट्यापाट्यांच्या खेळांत खालून वर येणारा गडी पाटीवाल्यापाशीं तोंड मागतो त्यावेळीं वरचे गडी खालीं जातात. अशा रीतीनें खालून येणारे गडी आणि वरून येणारे गडी यांची एका चौकांत गांठ पडणें याचें नांव ‘ तोंड मिळणें ’ किं० ‘ लोण मिळणें. ’ अशी गांठ न पडतां म्हणजे वरचा गडी ( असल्यास तो ) खालच्या गड्यास न मिळतां खालचा गडी किं० वरचा गडी पुढें जाणें ह्याला ‘ लोण बारगळणें ’

असें म्हणतात. असें झालें म्हणजे तो नियम मोडणारा गडी बारगळला असें म्हणतात. गडी बारगळला म्हणजे तो ' मरतो ' म्हणजे खेळांत निरुपयोगी होतो आणि बाहेर पडतो; उ० असा आजपर्यंत कोणी राज्यकर्त्यानें किं० शास्त्रकारानें कायदा किं० कानू केलेला आठवत नाहीं कीं अमुक एका विषयास अमुक अमुकच पृष्टें लागावीं. ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं लोण बारगळलें ( विष्णुशास्त्री चिपळूणकर ). **लोणपाट्या** स्त्री० अ० व०, **लोणपट, लोणपाट** न० आट्यापाट्या हा मुलांचा खेळ. याला ' मृदंगपाट्या ' स्त्री० अ० व०,असेंही दुसरें नांव आहे. **लोणपट, लोणपाट** न० ( आट्यापाट्यांच्या खेळांत ) जय किं० सरशी.

**लोणचें** [ सं० लवण ] न० आंबें, लिंबें, इ० चिरून तीं मीठ, मोहरी, हिंग, इ० मध्यें घालून खारवून करतात तें तोंडीलावणें.

**लोणट** वर ' लोण ' स्त्री० मध्यें पहा.

**लोणट, लोणस** खालीं ' लोणी ' मध्यें पहा.

**लोणा**[सं० लवण]पु० १एक प्रकारचा तांदूळ. २ जमीन इ० तील क्षार अंश. ३ अंगकांति; चेहऱ्याची टवटवी; जनावरांना यथेच्छ खाणें पिणें इ० मिळत असल्यानें त्याच्या अंगावर येतो तो तजेला ( येणें, जाणें ). ४ जमीन, भिंत, इ० च्या मातींत असलेला क्षारांश,-जो असल्या कारणानें तेथें निरंतर ओल असते; ती जागा कधींच खडखडीत वाळत नाहीं.

**लोणांबा, लोणंबा** पु०, **लोणंबी, लोणांबी** स्त्री०[सं० लवण+म० आंबा]आंब्याच्या कैऱ्या चिरून मीठ इ० मसाल्याच्या द्रव्यांत घालून खारवून केलेलें तोंडीलावणें.

**लोणारी** स्त्री० लाकडें जाळून त्यांचे कोळसे करणें किं०चुनकळ्या करणें, हा धंदा करणाऱ्यांची किं०कोळसे किं० चुनकळ्या विकणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**लोणी** [ सं० नवनीत, नोनीत, नोनी ] न० दूध, दहीं इ० घुसळलें असतां त्यांतून जो स्निग्धांश निघतो तो. ※ **लोण्याची रवत न साहणें** सवत म्हटली कीं ती असह्य वाटणारच, -ती कितीही सौम्य स्वभावाची असली तरी. **लोण्याच्या पुऱ्या तुपांत तळून खा म्हणजे तुला जें पाहिजे आहे तें मिळेल** तुला जें पाहिजे आहे तें मिळणें अशक्य आहे. **लोण्यांत दांत फुटणें** अत्यन्त सौम्य स्वभावाचा माणूस प्रसंगानें कठोर स्वभावाचा होणें. **लोण्यास दांत फुटणें** आपण ज्याचें लालन, पालन, पोषण, किं० संगोपन केलें त्यानें आपणाशीं कृतघ्नपणें किं० अमर्यादपणें वागूं लागणें. **लोणकाप्या, लोणीकाप्या** वि० बिनधारेचा चाकू, सुरी, इ०. **लोणट** लोण्याच्या वासाचें किं० चवीचें. **लोणस** वि० १ सत्वस ( दूध किं० दही,-ज्यांतून लोणी पुष्कळ निघतें ). १ ज्याच्या दूध किं० दहीं यांपासून पुष्कळ लोणी मिळतें अशी ( गाय, म्हैस इ० ). **लोणकढी, लोणकढी थाप** स्त्री० गमतीखातर आणि गंभीर मुद्रेनें सांगितलेली खोटी खबर. **कोणेकाच्या अंडास लोणी लावणें** त्याला अनुकूल करून घेण्यासाठीं त्याचीं आर्जवें किं० खुशामत करणें.

**लोथ** [ हिं० लोथाड् ] स्त्री० १ मुडदा; प्रेत. २ अगडबंब माणूस किं० पशु. ३ खूप माजलेला म्ह०लठ्ठ भोपळा, फणस, चिबूड, इ०.३जमिनीवर निश्चेष्ट उताणा पडलेला माणूस. ※ **कोणेकाची लोथ पाडणें** त्याला खूप कुबलणें,-तो मृतप्राय होईपर्यंत. [विशेष ).

**लोद्रा** वि० एक प्रकारची ( नाचणी,-धान्य

**लोध, लोद** [ सं० लोध्र, लोध ] पु० एक वृक्ष. पु०, न० ह्या वृक्षाची साल.

**लोध, लोद** [ हिं० लोथाड् ] पु०, स्त्री०१ प्रेत; मुडदा. २ खूप धिप्पाड माणूस, पशु, भोपळा, फणस. इ०.३ मोठा फत्तर किं० लाकूड. ※ **कोणेकाची लोध ( किं० लोद ) पाडणें** त्याला मारून किं० कुबकून त्याला मृतप्राय करणें. **शत्रुसैन्यांत लोधी (किं० लोदी) पाडणें** शत्रुच्या सैन्यांतील शिपायाची कत्तल करणें.

**लोंघट** वि० चिघळलेला किं० पातळ ( गूळ, पीठ, साखर, इ० ).

**लोधडा, लोधा** पु० अगडबंब किं० धिप्पाड माणूस किं० पशु.

**लोधा** [ म० लोध ] पु० १ प्रेत; मुडदा. २ प्राण्याचें तोडून किं० ओरबाडून काढलेलें मांस.

**लोंधा** वि० पातळ ( गूळ, साखर, भात, भाजी, इ० ).

**लोध्र** [ सं० ] पु० एक वृक्ष.

**लोप** [ सं० ] पु० १ गळणें; नाहींसें होणें. २ नाश; मोडून टाकणें; रद्द करणें किं० रद्द पाडणें. ३ प्रचारांतून जाणें. ४ अभाव. ५ बोलतांना किं०लिहितांना अक्षर,शब्द,इ०चें गळणें किं० गाळणें. ६ ( व्याकरण ) अक्षर, प्रत्यय, इ० चे शब्दांतून गळणें.

**लोपणें** [ सं०लुप् ] अ० क्रि० १ लुप्त होणें; नाहींसें होणें. २ प्रचारांतून नाहींसें होणें. ३ अदृश्य होणें. ४ ( व्याकरण ) शब्दाचा प्रत्यय इ० गळणें किं० सोडला जाणें.

**लोंब** स्त्री०,**लोंबट**,**लोंबर** न० [सं०लंब]भात, गहूं, राळा, राजगिरा, भादली, सावा, वरी, इ० चीं कणसें प्रत्येक.

**लोंबकळणें, लोंबकाळणें, लोमकळणें** [म० ' लोंबणें 'चें एक रूप ] अ० क्रि० १ वरच्या आधाराशीं संबध्द असा पदार्थ खालच्या भागाला आधार नसल्यामुळें अधांतरींच लटकत असणें; ओळंबणें.२झाडाची फांदी,खुंटी,घराची तुळई,इ० हातांनीं धरून पाय निराधार स्थितींत ठेवणें. ३ कांहीं ( काम, कारभार,इ० )शेवटास न जातां अपूर्ण स्थितींत पडणें किं० राहाणें; कोणी माणूस अनिश्चित अशा मनःस्थितींत असणें.

**लोंबट, लोंबड** स्त्री० १ नारळ, पोफळें, इ० फळांची रास. २ उपद्रव; त्रास; झेंगट; शुष्ककाष्ठ.

**लोंबण** [म० लोंबणें] स्त्री० फळें, फुलें, नेसलेलें लुगडें, धोतर, इ० चा लोंबत असलेला पदर, घोस, किं० बोजा ( लागणें ).

**लोंबणें** [ सं० लंब ] अ० क्रि० १ वरच्या बाजूस आधार असून खालच्या बाजूस आधार नाहीं अशा स्थितींत ( पदार्थ, माणूस, इ० ) लटकलेला असणें; उ० फाशीं दिलेला माणूस, खुंटी, दांडी, इ० वरील पदार्थ, इ० लोंबत असतो. २ ( कांहीं काम इ० ) निकालांत न काढलेल्या स्थितींत राहाणें. ३ दिरंगाईवर पडणें. ४ अनिश्चित स्थितींत असणें.

**लोंबर** न० मागें ' लोंब ' पहा.

**लोंबरें** न० गोवारीच्या शेंगांची पीठ पेरून केलेली भाजी.

**लोबान, लोभान** [ हिं० लोबान ] पु० एक सुगंधी द्रव्य, ऊद. ꙮ **लोबानदाणी, लोभानदाणी** स्त्री० धुपाटणें.

**लोंबी** स्त्री० लोंबतें कणीस; लोंगी.

**लोंबी झोंबी** [ म० लोंबणें+झोंबणें ] स्त्री० अनेक तऱ्हेची खटपट;कांहीं कार्यार्थ सोसलेले कष्ट किं० केलेली धडपड.

**लोभ** [ सं० ] पु० १ कांहीं पदार्थाच्या प्राप्तीची उत्कट इच्छा. २ पैसा, धान्य, शेतें, इ० आपल्याला मिळावीं किं० आपल्या मालकीचीं असावीं अशी बेसुमार इच्छा. ३ चिक्कूपणा. ४ आपणाजवळ असलेला पदार्थ आपल्या हातून किं० आपल्या जवळून जाऊं नये अशी उत्कट इच्छा. ५ कोणा माणसाची कोणेकावर असते ती मेहेरबानी किं० कृपा किं० प्रीति. ꙮ **लोभी, लोभिष्ट, लोभाळू** वि० १ कांहीं पदार्थ मिळण्याबद्दल किं० आपल्या जवळचा पैसा इ० खर्च न व्हावा म्हणून फाजील किं० निंद्य प्रमाणांत इच्छा करणारा. २ चिक्कू; कंजूष. **लोभमूलानि पापानि** [ सं० ] सर्व पातकें लोभापासूनच उत्पन्न होतात.

**लोभणें, लोभवणें, लोभावणें** [ सं० लुभ् ] अ० क्रि० १ कांहीं वस्तूनें आकृष्ट होणें. २ कोणा माणसाकडे प्रेमानें खेचलें जाणें.

**लोभान** वर ' लोबान ' पहा.

**लोमी** पु० मागें ' कंचुक ' अर्थ ५ पहा.

**लोभें** न० मागें ' लेमें ' पहा.

**लोम** [ सं० लोमन् ] न० १ शरीरावरील केश. २ शरीरावरील बारीक केश किं० लव. ꙮ **लोमश** वि० १ केसाळ ( जनावर, गात्र ). २ लोकरीचें ( वस्त्र,-शालजोडी, बुरणूस, घोंगडी, इ० ). **लोमश मार्जार** पु० जवादी मांजर.

**लोमकळणें** अ० क्रि० मागें 'लोंबकळणें'पहा.

**लोयली** स्त्री० गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर. पुढें 'लोली' पहा.मागें'लोईल'पहा.

**लोल** [ सं० ] वि० १ हलणारें. २ क्षुब्ध; अस्वस्थ. ३ अस्थिर; चंचल. ४ क्षणभंगुर. ५

एकाद्या विषयाकडे आसक्त किं० आकृष्ट झालेला. ६ अति उत्सुक.

**लोलक** [ सं० लोल ] पु० खालीं जाडी आणि वर बारीक असून लांबोळ्या आकाराचा जो काच, पाच, माणिक, इ० चा मणि इ० असतो आणि जो दागिना, झुंबर, इ० ना शोभेसाठीं लोंबत सोडलेला असतो तो.

**लोला** [ सं० लोल ] वि० १ निर्जीव होऊन लोंबत राहणारा ( हात, ताड, माड, इ०चें पान, केळीचें सोपट किं० पान, इ० ). २ अशक्त, निर्जीव ( माणूस, पशु ). पु० १ अशक्त, निर्वीर्य माणूस. २ घंटेचा लोढणा,-जो घंटेच्या बाजूवर आपटून आवाज होतो. ३ घड्याळाची लंबक. ४ तोंडांतील घशांत लोंबत असते ती पडजीभ.

**लोली** स्त्री० गलबताचा लहान नांगर. मागें ' लोयली ' पहा.

**लोलुप** [ सं० ] वि० १ अति उत्सुक. २ अति लोभी. ३ आसक्त.

**लोलो** पु० शब्दांच्या उच्चाराचा शुद्धपणा, योग्य ठिकाणीं शब्दांवर आघात देणें, विराम करणें, इ० कडे लक्ष न देतां केलेलें घोकणें, भाषण, वाचन, वेदपठन, इ० ( घालणें ). ꣸ **लोलो घालणें** १ वर वर्णिल्या प्रकारें वाचणें, घोकणें, इ०. २ भिकाऱ्यानें तगादा करून किं० लोचटपणानें भिक्षा मागणें.

**लोंव** [ सं० लोमन्; म० लंव ] स्त्री० १ अंगावरील केश. २ मेंढरूं इ०च्या अंगावरील केश म्ह० लोकर.

**लोंवथा** पु० मांस, पीठ, चिखल, गूळ, इ०चा तोडून किं० फाडून काढलेला तुकडा, खंड, किं० लचका.

**लोष्ठ** [ सं० ] पु०, न० मातीचें ढेकूळ. न० लोखंडाचें कीट किं० गंज. ꣸ **लोष्ठशौच** न० मलविसर्जनानंतर पाण्याच्या अभावीं मलद्वार ढेकळानें पुसून स्वच्छ करणें.

**लोह** [ सं० ] वि० १ तांबडें. २ लोखंडाचें बनविलेलें. पु०, न० १ लोखंड. २ पोलाद. ३ शस्त्र. ४ रक्त. ५ मासे पकडावयाचा गळ. न० १ कृष्णागरु. २ कांसें हा धातु. ꣸ **लोहकांत, लोहचुंबक** पु० लोखंडाला आकर्षिणारा पदार्थविशेष. **लोहकांत** पु० १ लोखंडाची एक जाति. २ ह्या जातीच्या लोखंडाचें औषधार्थ भस्म करतात तें. ३ तिख्याचें औषधार्थ केलेलें भस्म. **लोहचुंबक** पु० १ लोखंडास आकर्षिणारा पदार्थविशेष. २ आपली मागणी लोकांनीं पुरवावी म्हणून हट्ट घेणारा, अनेक युक्त्या करणारा, किं० धरणें घेऊन बसणारा माणूस. **लोहकार** पु० लोहार. **लोहकिट्ट** न० १ लोखंडाचा गंज. २ मंडूर हें औषधी द्रव्य. **लोहंगी, लोहांगी, लव्हांगी, लोहंगी काठी** [ सं० लोह+अंग ] स्त्री० लोखंडाचे खिळे आणि कड्या जागोजाग बसवून मारामारीसाठीं केलेला सोटा. **लोहचूर्ण** न० लोखंडाचा कीस. **लोहदंड** १ पातकी लोकांना मरणोत्तर यम ज्या सोट्यानें बडवितो तो. २ यम किं० शनि यांच्या प्रसादासाठीं ब्राह्मणाला देतात ती लोखंडाची काठी. **लोहपरिघ** पु० लोखंडाचा सोटा. **लोहभस्म** न०, **लोहमंडूर** पु० एक औषधी द्रव्य. **लोहमय** वि० लोखंडाचा बनविलेला ( कोणताही पदार्थ ). **लोहार** [ सं० लोहकार ] पु० लोखंडाचे खिळे, कोयते, इ० पदार्थ करणारा कारागीर. **लोहारसाळ** स्त्री० १ लोहाराची भट्टी. २ लोहार कामाचा कारखाना. **लोहलोखंड** न० लोखंडाचीं भांडीं, हत्यारें, इ० पदार्थ.

**लोहकर** मागें ' लोकर ' पहा.

**लोहचट** मागें ' लोचट ' पहा.

**लोहट, लोहटी** स्त्री० दगड, तुळया, इ० जड सामान वाहावयाचा भक्कम गाडा.

**लोहडणें** न० मागें ' लोढणें ' पहा.

**लोहनाळी मोहनाळी** [ म० लोहो ( लोभ ), मोह ( प्रेम ), मवाळी ] स्त्री० प्रेमाचें किं० मायेचें वर्तन किं० भाषण; मायाळूपणा; प्रेमळता.

**लोहबंदी ऊद, लोहभान ऊद, लोहभानी ऊद** मागें ' लोभान ' पहा.

**लोहाळा** मागें 'लव्हा' पहा.

**लोहित** [ सं० ] वि० तांबडें; लाल. पु० १ तांबडा रंग. २ ( ज्योतिष ) मंगळ हा ग्रह. ३ रोहें हरिण. ४ माणिक हें रत्न. ५ रताळें. न० रक्त; रुधिर. ꣸ **लोहिताक्ष** पु० १ पारवा. २ कोकिळ.

३ विष्णु. **लोहितांग** पु० मंगळ हा ग्रह. **लोहिताश्व** पु० अग्नि. **लोहितमृत्तिका** स्त्री० गेरू; काव.

**लोहितक** [ सं० ] पु० १ माणिक. २ (ज्योतिष) मंगळ हा ग्रह. न० माणिक रत्न.

**लोहितालु** [ सं० ] पु० रताळें.

**लोहुलहान** [ सं० लघु+म० लहान ] वि० चिमुकला आणि गोंडस.

**लोहो** [ सं० लोभ ] पु० कोणा माणसाची कोणेकावर असते ती मेहेरबानी किं० कृपा. ॐ **देखला गोहो लागला लोहो** लग्न होतांच किं० नवऱ्याची गांठ पडतांच ती (अल्लड) मुलगी त्याच्यावर प्रेम करूं लागली (आणि आईबापांचा तिला विसर पडला).

**लोहोकर, लोहोचट** मागें 'लोकर,' 'लोचट' पहा.

**लोहोडणें** मागें 'लोढणें' पहा.

**लोहोनाळी मोहोनाळी** मागें 'लोहनाळी मोहनाळी' पहा.

**लोळ** पु० १ अग्नीच्या ज्वाळांचा भडका; आगीचा झोत. २ (मुंग्या, माशा, इ० चा) दाट थवा.

**लोळ** [ म० लोळणें ] पु० १ लोळण्याची क्रिया; लोळणें. २ हट्टी मूल इ० नीं जमीनीवर अस्ताव्यस्तपणें हातपाय आपटून गडबडा लोळत जाणें (घालणें). ३ (ताप, लोकांचा उपद्रव, इ० मुळें) कोणेकाची झालेली दुरवस्था किं० पीडितपणाची स्थिति. ४ अव्यवस्थितपणें बांधलेला गठ्ठा; अव्यवस्थित चिरगुटें किं० पदार्थ किं० पोथ्या इ० ची रास किं० ढीग. ५ लठ्ठ पोटाचें पोर. ६ अगडबंब माणूस, घूस, उंदीर, इ० प्राणी ७ काम, कारभार, कारखाना, इ० चा पसारा. ॐ **लोळआकांत** [ म० लोळणें+आकांत ] पु० १ मोठमोठ्यानें रडणें, ओरडणें, किं० तरफडणें (करणें, मांडणें, लावणें, उठणें). २ पटकी, पाऊस, दरवडेखोर, महागाईची धारण, इ० मुळें उत्पन्न झालेली असह्य स्थिति किं० परिस्थिति.

**लोळकंड, लोळकण** [ म० लोळणें ] स्त्री० १ हट्टी मूल इ० चें जमीनीवर रडत रडत लोळणें (घेणें, मारणें). २ कोणा माणसाला कोणी जबरदस्त माणूस त्याच्यां इच्छेविरुद्ध ओढून नेत असतां तो जावयाला नाखूष असलेला माणूस जमीनीवर पडणें, लोळणें, धडपडणें, इ० क्रिया करतो त्या समुच्चयानें (घेणें, मारणें). ३ कुत्रीं, मांजरें, इ० आनंदानें बागडतांना किं० भांडतांना एकमेकांच्या अंगावर लोळणें, उड्या मारणें, इ० क्रिया करतात त्या समुच्चयानें.

**लोळघोळ** [ म० लोळणें+घोळणें ] पु० ए० व० १ कागद, चिरगुटें, खाद्यें, इ० ची कालवाकालव, डिवचाडिवच, कुरकरणी, इ०. २ हिशेब, जमाखर्च, कारभार, इ० ची गुंतागुंत किं० अव्यवस्था. ३ मनाची अस्वस्थता किं० गोंधळलेपणाची स्थिति. ४ हट्टी किं० द्वाड पोर जमीनीवर लोळून आणि हातपाय आपटून करतें तो गोंधळ किं० ती धडपड.

**लोळपट** [ म० लोळणें + पडणें ] स्त्री० १ भांडणारीं मांजरें किं० कुत्रीं इ० यांची जोडी किं० सांगड. २ आजारामुळें कोणेकाची झालेली दुर्बलता किं० हीनदीनपणाची स्थिति (होणें, वळणें). ३ साथीच्या आजारांत अनेक माणसांची किं० गुरांढोरांची एकाच काळीं होते ती दुर्दशा किं० विपन्नावस्था (होणें, वळणें). [ पहा.

**लोळकंबणें, लोळकुंबणें** वर 'लोंबकळणें'

**लोळण (-णी)** [ म० लोळणें ] स्त्री० १ हट्टी किं० द्वाड पोराचें जमीनीवर गडबडां लोळणें (घेणें, घालणें). २ लोटांगण. ३ जबरदस्तीनें ओढून नेलें जात असलेल्या माणसाचें जमीनीवर अव्यवस्थितपणें हातपाय आपटणें (घेणें). ॐ **लोळण घोळण** स्त्री० ए० व० 'लोळण' सर्व अर्थी पहा.

**लोळणें** [ सं० लुल् ] अ० क्रि० १ जमीनीवर या कुशीवरून त्या कुशीवर गडबडां लोळणें. २ अंथरुणावर निजलेल्या (माणसानें) निजलेल्या ठिकाणापासून अव्यवस्थितपणें कुशीवर वळून दूर जाणें. ३ (नेसलेल्या वस्त्राचे सोगे) जमीनीवर फरपटणें. ४ उपयोगी पडण्याच्या स्थितींत असून किं० अंगीं गुण असून (पदार्थ किं० माणूस) कांहीं उपयोग न केला जात असल्या कारणानें किं० उद्योगधंदा न मिळाल्याकारणानें रिकामा राहाणें.

टीप,-ह्या अर्थी ' लोळत पडणें ' सुद्धां; उ० हा पहा तुझा चाकू येथें लोळत पडला आहे;उ०अनेक पदवधिर केवळ ब्राह्मण म्हणून लोळत आहेत. ⁂ लोळणें घोळणें ( मुकद्दमा, कज्जा, गोष्ट, बेत, इ० चा ) सर्व बाजूंनीं किं० साधक-बाधक प्रमाणें विचारांत घेऊन खल किं० वाटा-घाट करणें.

**लोळवडी** [ म० लोळणें, लोळविणें+वडी ] **स्त्री०** अनेक डाळींचीं पिठें मिसळून तीं कालवून त्यांत मीठ, तिखट, इ० द्रव्यें घालून त्याच्या वळकट्या करून त्यांचे काप काढून ते तळून तोंडीलावणें करतात तें.

**लोळविणें, लोळाविणें** [ म० ' लोळणें ' चें प्रयोजक ] **स० क्रि०** १ ( कोणेकास ) जबर-दस्तीनें हातांनीं ढकलून लोळावयास लावणें. २ अंगावर चाल करून आलेल्या (चोर इ० ना) आपल्या अंगच्या सामर्थ्यावर ढकलून देऊन किं० चोप देऊन जमीनीवर आपटणें किं० लोळाव-यास लावणें. ३ खेळ, चढाओढीचा सामना, इ० मध्यें (प्रतिपक्षाला )चित करणें किं० परा-भविणें.

**लोळसाविणें** [ म० ' लोळाविणें ' चें एक रूप ] **स० क्रि०** वर ' लोळविणें ' सर्व अर्थी पहा.

**लोळा** [ सं० लोल ] **पु०** १ घड्याळ, घंटा, इ० चा लंबक. २ पडजीभ. ३ तोडून काढ-लेला पीठ, मांस, इ० चा तुकडा ( काढणें, तोडणें ). ⁂ **लोळा तोडणें** १ आईबापांनीं मुलीचें लग्न करून देऊन तिला दुसऱ्याच्या स्वाधीन करणें. २ ( कृपणानें ) पैसा खर्चणें.

**लोळाविणें** वर ' लोळविणें ' पहा.

**लोळी** [ म० लोळ ] **स्त्री०** १ घंटेच्या मध्य-भागीं लोंबत असतो तो धातु, लाकूड, इ० चा तुकडा,-जो घंटेच्या बाजूवर आपटून आवाज होतो. २ शेंबूड इ० चा जाडी, घट्ट, आणि लोंबता गोळा. ३ दागिन्याला किं० झुंबर इ० ना काच, पाच, हिरा, इ० चा लोंबता भाग असतो तो.४तोंडांतील पडजीभ.५बैल इ०च्या गळ्याखा-लचें पातळ आणि लोंबतें कातडें.६लांबेडा आणि सर्व बाजूंनीं सारखा फणस.·७ गूळ, मेण, इ० कोणत्याही पदार्थांची लांबोडी गोळी.

**लोळी** [ म० लोळणें ] **स्त्री०** १ घोडा, गाढव,इ०चें जमीनीवर लोळणें किं०त्यांना लोळ-ण्याची येते ती हुकी किं०लहर(येणें,मारणें,इ०).२ निजून किं० पडून राहाण्याची आळसामुळें माणसांना होते ती अनिवार इच्छा ( येणें ). ३ गलबतांचा लहान नांगर. ह्या अर्थी ' लोली ' सुद्धां.

**लौकिक** [ सं० ] **वि०** १ इहलोकासंबंधाचें; ऐहिक; अवैदिक; केवळ लोकप्रसिद्ध. २ सामान्य; नेहेमीचें. ३ रूढ; प्रचारांतील. ४ लोकाचा-राला अनुसरून असलेलें. ५ लोकाचारानें जें प्राप्त झालें तें किं० जें करावयास पाहिजे तें. **पु०** १ कीर्ति; कोणेकाच्या संबंधानें लोकांत रूढ असलेले मत; उ० रामभाऊंचा ह्या गांवांत चांगला लौकिक आहे. २ समाजांतील लोकांची व्यवहारांत वागण्याची सरणी; सामाजिक व्यव-हार. ३ कोणेक गोष्टीची वाच्यता किं० लोकांत जाहीर होणें. ⁂ **लौकिकांत येणें** मुलगा वयांत येऊन संसार करूं लागणें किं० कामधंदा इ० ची जबाबदारी वाहूं लागणें. **लौकिकावर येणें** वाद इ० मध्यें पराभव झाल्याकारणानें किं० अंगावर डाव लागल्याकारणानें चिरडीस जाऊन अद्वातद्वा बोलूं लागणें. **लौकिकाचार पु०** शिष्ट लोकांची वागण्याची सरणी. **लौकिकी वि०** १ लोकांत रूढ किं० सुरू असलेली ( चाल, रीति, इ० ). २ पुष्कळ दिवसांपासून लोकांत प्रचलित असलेलें. ३ व्यवहारांत हुशार ( माणूस ).

**लौंद, लोध स्त्री०, पु०** लठ्ठ किं० फोपशा शरीराचा माणूस किं० प्राणी.

**लौह** [ सं० ] **वि०** लोखंडा संबंधाचा; लोखंडी.

**ल्याख** मागें ' लायक ' पहा.

**ल्याणें स० क्रि०** (दागिना,वस्त्र, इ०) अंगा-वर धारण करणें. मागें ' लेणें ' पहा.

**ल्हावा पु०** उन्हाळ्यांत पिकविलेली नाचणी किं० भात.

**ल्होवी स्त्री०** नाचणीची एक जात.

# व

**व** मराठी व्यंजनमालेंतील एकुणतिसावें व्यंजन.

**व** [ अ० ] **उभयान्वयी अ०** आणि. **टीप,**– हा शब्द हल्लीं मराठींतून गळत चालला आहे.

**वकट** [ तेलगू ] **वि०** ( विटीदांडूच्या खेळांत दांडूनें अंतर मोजतांना ) एक. विटीदांडूच्या खेळांत पुढील सात शब्दांनीं अंतराची मोजदाद केली जाते. वकट ( एक ), लेंड ( दोन ), मुंड ( तीन ), नाल ( चार ), आर ( पांच ), वैद ( सहा ), आणि झक्कू ( सात ). हे सर्व शब्द तेलगू भाषेंतील आहेत.

**वकटें न०** १ संकट. २ घुबड.

**वकत, वक्त, वखत, वख्त** [ अ० वक्‌त् ] **पु०,स्त्री०** १ काळ; वेळ. २ कालावधि. ३ समय. ४ विलंब; उशीर. ५ खेप, बारी; उ० चार वकत म्ह० चारदां किं०चार वेळां. ६ संकटाचा काळ. **⚘ वखत गैरवखत क्रि० वि०**वेळीं अवेळीं,भलत्याच वेळीं. **वखतगुजराण स्त्री०** कालक्षेप. **वखतशीर वि०** वेळेवर येणारा, होणारा, किं० घडणारा. **क्रि० वि०**योग्य किं० ठरलेल्या समयीं. **वखताची वेळ स्त्री०** संकटसमय; अडचणीची वेळ; उ० वख्ताच्या वेळीं हें धान्य ( किं० हा पैसा ) उपयोगास येईल.

**वंकनाल न०** मातेनें खाल्लेल्या अन्नाचा रस गर्भाला जाण्याचा मार्ग.

**वकफा** [ अ० ] **पु०** थांबणूक; मुक्काम.

**वकफीयत,वाकफीयत** [अ०] **स्त्री०**माहिती.

**वकर, वक्र** [ अ० ] **पु०** १ कोणेकाच्या अधिकाराचा लोकांवर असतो तो दरारा किं० दबदबा किं० वचक. २ प्रतिष्ठा; लौकिक.

**वकल** [ अ० वक्ल्=बायको, कुटुंब, रांड ] **न०** १ काम, कारभार, इ० चा पसारा; उ० स्वयंपाकाचें वकल, सुतार कामाचें वकल. २ कचेरी, पेढी, इ० चें एक एक खातें. ३ रखेली; रांड. [जाणें.

**वकसणें अ० क्रि०** खरडलें जाणें; घासलें

**वका, वक्का वि०** १ उघडाबोडका. २ ओका.

**वकायानिगार, वकायेनिगार** [ अ० वकाइअनिगार् ] **पु०** वृत्तान्त लिहिणारा; वाकनीस; अखबारनीस. [ हकीगत.

**वकाया** [ अ० वकाइअ ] **स्त्री०** वृत्तान्त;

**वकार पु०** मोठेपणा; मान; प्रतिष्ठा.

**वकील** [ अ० ] **पु०** १ आपल्या तर्फेनें बोलण्यासाठीं किं० आपली बाजू स्पष्टपणें मांडण्यासाठीं न्यायमंदिरांत किं० राजाच्या दरबारांत आपल्या तर्फेनें पाठविलेला माणूस; मुखत्यार; प्रतिनिधि. २ देशमुखाचा वतनदार मदतनीस. **⚘ वकालतनामा, वकिलातनामा, वकीलनामा पु०, वकीलपत्र न०** वकीलाला आपल्या तर्फेनें बोलण्याबद्दल किं० आपली बाजू स्पष्टपणें मांडण्याबद्दल दिलेलें अधिकाराचें पत्र किं०सनद. **वकिली, वकीली स्त्री०** १ वकीलाचा धंदा. २ वकीलास दिलेली मजुरी. ३ दुसऱ्यासाठीं केलेली रदबदली ( उपहासांत ). **वकलात (–द ), वकालत (–द ), वकीलत (–द ), वकिलात (–द ) स्त्री०** वकिलाचा धंदा, कर्तव्य, किं० कार्यक्षेत्र, किं० कामकाजाचें ठिकाण. **वकीलत स्त्री०** १ वकीलाचा पेशा. २ शिष्टाई.

**वकूब** [ अ० वुकूफ ] **पु०** १ ज्ञान; अक्कल. २पराक्रम;कर्तृत्वशक्ति; सामर्थ्य.**⚘ वकूबदार वि०** १जाणता;सुज्ञ; काबिल. २ पराक्रमी, कर्तृत्ववान्.

**वक्कर** [ अ० वक्र् ] **पु०, स्त्री०** संमान; प्रतिष्ठा; लौकिक.

**वक्तव्य** [ सं० ] **वि०** १ बोलण्याजोगें; बोलण्यास योग्य. २ जें बोललें पाहिजे तें. २ निंद्य; दूषणार्ह. **न०** १ भाषण. २ निंदा.

**वक्ता** [ सं० वक्तृ ] **पु०** १ बोलणारा. २ सभेमध्यें श्रोत्यांचीं मनें आकर्षून बोलणारा. ३ बडबड्या, वाचाळ ( निंदेंत ). **⚘ वक्तृत्व न०** १ सभेंत श्रोत्यांचीं मनें आकर्षून आपल्या म्हणण्याचा ठसा श्रोत्यांच्या मनावर उठविण्याचा जो गुण तो किं० जी कला ती. ह्या गुणाला किं० कलेला ' वक्तृत्वशक्ति ' असेंही म्हणतात. २ वरील गुणानें युक्त असें जें भाषण तें. ३ वात्रटपणाचें बोलणें. **शिमगा गेला वक्तृत्व राहिलें** शिमग्यामध्यें हावें तें बोलण्याला मुभा असते ती

शिमगा गेला त्याच्याबरोबर गेली परंतु त्या मुमेमुळें झालेली हानि टिकून राहिली आहे.

**वक्त्र** [ सं० ] न० तोंड; मुख; चेहरा.

**वक्र** [ सं० ] वि० वाकडा; सरळ नव्हे असा. २ कुटिल; संदिग्ध. ३ द्व्यर्थी ( उक्ति ). ४ लुच्चा; कपटी; अप्रामाणिक. ५ उलटी ( गति ). ☸ **वक्रोक्ति** स्त्री० ( साहित्य ) एका अभिप्रायानें उच्चारलेले शब्द दुसऱ्या अर्थी समजणें ( घेणे ); कोणी मनुष्य ' आज माझें पोट फार भरलें ' असें म्हणाला असतां ' भरलें असलें तर पाण्यानें धुऊन टाक ' असें दुसरा मनुष्य म्हणाला तर ती वक्रोक्ति होते. येथे ' भरणें ' यावर श्लेष आहे. 'खाद्यानें पूर्ण झालेलें असणें' आणि 'चिखल इ० नीं माखलेलें असणें' असे दोन अर्थ दोघांनीं घेतले आहेत. ही श्लेषमूलक वक्रोक्ति. **वक्रतुंड** पु० गणपति हा देव. **वक्रपुच्छ** पु० कुतरा. **वक्रगति** मंगल इ० ग्रहांची मेषाकडून वृषभाकडे न जातां मेषाकडून मीनाकडे जाण्याची गति. वि० अशा गतीनें विशिष्ट ( भौमादि ग्रह ). **वक्रदृष्टि** स्त्री० प्रतिकूल दृष्टि; गैरमर्जीची नजर; दुष्टपणाची दृष्टि. **वक्री** वि० १ मेषाकडून वृषभाकडे जात असावें अशी गति सोडून मेषाकडून मिनाकडे जात असलेला ( भौमादि ग्रह ). २ प्रतिकूल. **वक्रपुरशीस** [ सं० वक्र + फा० पुरशीस् ( विचारणें ) ] स्त्री० सत्य बाहेर काढण्यासाठीं कोणेकाला वाकडे तिकडे प्रश्न विचारणें,—न्यायमंदिर इ० ठिकाणीं. **वक्री होणें** कोणी मनुष्यानें कोणेकाला प्रतिकूल होणे किं० त्याच्याशीं दुष्टावा करणें.

**वखत** मागें ' वकत ' पहा.

**वखर** पु०, न०, **वखरा** पु० शेतांतील गवत किं० रान उपटून किं० खरडून काढून टाकण्याचें एक आउत.

**वखद, वकसाद** मागें ' औषध ' पहा.

**वखरणें, वखारणें** [ म० वखर, वखरा ] स० क्रि० १ वखर किं० वखार नांवाच्या आउतानें शेतांतील गवत किं० रान उपटून ( शेत ) साफ करणें. २ नांगरलेल्या शेतांतील ढिखळें फोडून ( शेत ) सपाट करणें.

**वखवख** स्त्री० १ खाण्याची अनिवार इच्छा ( सुटणें ). २ अधाशीपणा. ३ क्षुधा, पित्त, इ० मुळें घसा इ०त होते ती आग किं० जळजळ किं० अस्वस्थता. ४ पोरें, भिकारी, तगादेदार, इ०नीं मांडलेला उपद्रव. ५ अनेक कामांची एकदम लागलेली घाई. ६ कोणत्याही कारणानें झालेला असह्य उपद्रव बेजारपणाची स्थिति ( होणें ).

**वखा** पु० रोजचें अन्न, दूध, खुराक, औषध इ०चें ठरलेलें प्रमाण; रतीब ( लावणें, घालणें, घेणें ) लोकांचा धाकदपशा, इ० मुळें ( कोणेकानें ) नम्र होणें, शरण येणें, किं० दबकणें.

**वखार** [ हिं० वखार ] स्त्री० विकावयाचा माल साठवून ठेवण्याची व्यापाऱ्याची जागा. **वखारदार, वखारी** पु० १ ज्याची स्वतःची वखार आहे असा व्यापारी. २ वखारीवर नेमलेला अधिकारी.

**वखारणें** वर ' वखरणें ' पहा.

**वग** स्त्री० कोणेकाचा कोणेकाशीं असलेला घरोबा किं० स्नेहसंबंध; वशीला किं० भीड घालण्याइतकी कोणेकाची कोणेकाशीं असते ती ओळख. ☸ **वगवशिला** पु० ए० व० आपल्याबद्दल खटपट करणाऱ्या कोणा माणसाची ओळख किं० मैत्री किं० कृपा.

**वंग** [ सं० ] पु० १ वांगें. २ बंगाल देश. न० १ कथील. २ शिसें. ☸ **वंगभंग** पु० बंगालची फाळणी,—जी करझननें इ० स० १९०५ मध्यें केली आणि जी पुढें इ० स० १९११ सालीं रद्द केली गेली.

**वंगण** न० गाडीचा कणा, यंत्राचे एकमेकांवर घासणारे भाग, इ०च्या गतीला मंदता आणणारें घर्षण तें शक्य तितकें कमी करण्यासाठीं घासणाऱ्या भागांत जें तेल इ० द्रव्य घालतात तें.

**वंगणें** [ म० वंगण ] स० क्रि० ( यंत्राचे घासणारे भाग, चाकाचा आस, इ० मध्यें ) तेल इ० घालणें. वर ' वंगण ' पहा. अ० क्रि० भीति, लोकांचा धाकदपटशा, इ० मुळें ( कोणेकानें ) नम्र होणें, शरण येणें, किं० दबकणें.

**वगर** स्त्री० म्हैस.

**वगर, बगर** श० यो० अ० शिवाय, खेरीज; उ० हे दोन श्लोक पाठ केल्याबगर मी येथून उठणार नाहीं.

**वंगविणें** [ म० वंगण ] स० क्रि० १ ( गाडीचें चाक इ० मध्यें ) वंगण घालणें; वंगण घालून घर्षण कमी करणें. २ आपली इच्छा किं० मागणी पुरविण्याला आपल्याला अनुकूल होण्याला

(कोणेकाला) धाकदपटशानें किं० आमिष दाखवून वश करून घेणें; (कोणेक) ताब्यावर येई-पर्यंत त्याला चोप देणें.

**वंगळ, वंगाळ** (अशिक्षितांत रूढ) मागें 'ओंगळ' पहा.

**वगळ** [म० वगळणें] **स्त्री०** पदार्थांचा टाकाऊ अंश किं० टाकून दिलेला अंश; गाळसाळ. **वि०** रद्दी; टाकाऊ; त्याज्य.

**वगळणें** [सं० अव+गल्] **स० क्रि०** १ अग्राह्य म्हणून न घेणें, किं० समाविष्ट करून न घेणें; सोडून देणें. २ कांहीं पदार्थांतील कांहीं भाग स्वीकारून (कांहीं) न स्वीकारणें.

**वगैरे** [फा० वगैराह्] **सर्वनाम** आणि इतर; इत्यादि.

**वघळ, वघळणें,** इ० मागें 'ओघळ,' 'ओघळणें' इ० पहा. हे दोन्ही शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.

**वच** [सं० वचस्] **न०** १ भाषण. २ आज्ञा. ३ उपदेश. ४ कोणा थोर पुरुषाचें किं० साधूचें वचन.

**वचक, वचका** [हिं० भचक्] **पु०** १ कोणेकाला कोणेकाबद्दल वाटतो तो दरारा किं० भीति. २ आकस्मिक कारणानें वाटलेली भीति; दचका; दहशत. ३ कांहीं कारणावरून झालेला मनाचा ग्रह (जाणें); उ० चालण्याच्या ढबीवरून रघुनाथ जात असेल असा मला वचक गेला.

**वंचक** [सं०] **वि०** लुचा; फसव्या; ठग; लबाड. **पु०** १ कोल्हा. २ ठग; लुच्चा माणूस; सोदा.

**वचकणें** [हिं० भचकना] **अ० क्रि०** १ (कोणेकाच्या) भीतिमुळें दबवणे किं० नियंत्रित होणें; उ० रामू एवढ्या आईला वचकतो दुसऱ्या कोणाला वचकत नाहीं. २ कांहीं गोष्ट करतांना कचरणें किं० माघार खाण्याकडे कलणें.

**वचका** मागें 'वचक' पहा.

**वचका** वि० १ मूर्खासारखें बोलणारा; बडबड्या. २ लघळ; फाजील; छचोर.

**वंचणें** [सं वंच्] **अ० क्रि०** १ फसणें; फसविलें किं० लुबाडलें जाणें. २ (कांहीं लाभास) मुकणें किं० आंचवणें किं० अंतरणें. **स० क्रि०** १ (कोणेकाला) फसविणें. २ कोणेकाची (कांहीं वस्तु) लुबाडणें किं० हिरावून घेणें.

**वचन** [सं०] **न०** १ बोलणें. २ बोलण्याची धाटणी किं० तऱ्हा. ३ उचार; उच्चारण्याची क्रिया. ४ कोणा थोर पुरुषांचे म्हणणें किं० वाक्य. ५ शास्त्र, ऋषि, इ० नीं घालून दिलेला नियम किं० त्याचें आधारभूत वाक्य. ६ कोणेकानें कोणेकाला केलेली आज्ञा किं० दाखवून दिलेली शिस्त किं० सरणी. ७ (व्याकरण) एकत्व, द्वित्व, बहुत्व, दाखविणारें शब्दाचें रूप; उ० घोडा हें एकवचन; घोडे हें अनेकवचन; अश्वौ (दोन घोडे) हें संस्कृत द्विवचन. ॐ **वचनाचा खरा** १ कबूल केल्याप्रमाणें वागणारा; प्रतिज्ञा निरतरणारा. २ खोटी किंमत न सांगणारा किं० हिशेबांत न फसविणारा (व्यापारी किं० सावकार). **कोणेकाच्या वचनाच्या आज्ञेंत (किं० अर्थ्या वचनांत) असणें (किं० वागणें)** त्याच्याशीं अत्यन्त आज्ञाधारकपणें वागणें; त्याची आज्ञा बिलकूल न उल्लंघणें. **कोणेकाला वचनीं गोवणें** १ त्याला त्याच्या शब्दांत पकडणें. २ कांहीं गोष्ट करण्याबद्दल स्पष्ट शब्दांनीं त्याला बांधून घेणें. **वचनावचनी, वचनभाक स्त्री०** तोंडी करार किं० ठराव.

**वंचन न०, वंचना स्त्री०** [सं०] १ फसविणें; फसवणूक; प्रतारणा. २ कपट. ३ खोटा ग्रह.

**वचनीय** [सं०] **वि०** १ सांगण्याजोगें. २ निंद्य; दूषणार्ह. **न०** १ निंदा. २ टपका.

**वचपा, वचबा, वजपा** [म० वजा] **पु०** १ एकीकडे झालेली हानि किं० लागलेली ठोकर किं० आलेला कमीपणा दुसरीकडे झालेल्या लाभानें किं० मिळालेल्या नफ्यानें किं० आलेल्या वाढीनें भरून निघणें (काढणें, निघणें). २ सूड घेणें. ३ प्रतिक्रिया; बरोबरी होणे किं० करणें.

**वंचित** [सं०] **वि०** १ फसविलेला. २ फसवून मिळविलेला (पदार्थ).

**वंजणें** [सं०] **क्रि०** तेल इ० नीं (पदार्थ) माखणें किं० घासणें.

**वजणें** [म० ओज्; सं० ओजस्] **अ० क्रि०**

१ काळजीनें राखलें किं० ठेविलें जाणें. २ शुश्रूषा, संगोपन, निगा, इ० मुळें ( शेत, माणूस, पशु )टवटवीत, सशक्त, किं० तेजस्वी होणें किं० उठून किं० खुलून दिसणें.

**वजन** [ अ० ] न० १ पदार्थांच्या अंगीं जो जडपणा असतो तो. २ हा जडपणा ठरविण्या‌साठीं तराजूंत घालतात जो गुंज, रुपाया, वाल, इ० पदार्थ तो. ३ तोलण्याच्या क्रियेनें ठर‌लेली इयत्ता किं० ठरलेलें परिमाण. ४ समाजांत कोणेकाची असते ती प्रतिष्ठा; लोकांच्या मनांत कोणेकाविषयीं असतो तो आदर किं० पूज्यभाव; उ० देशकार्य करणाऱ्या माणसास सरकारनें कैदेंत घातलें असतां त्या माणसाचें वजन हाल‌अपेष्टांनीं कमी झालें तरी समाजांत त्याचे वजन वाढतें. ॐ **वजनदार, वजनशीर** वि० १ जड. २ समाजांत पत असलेला; प्रतिष्ठित. **वजनपूर** वि० वजनांत मुळींच उणा नसलेला. **वजनी** वि० १ वजनानें ठरवावयाचा ( शेर.इ० ). याच्या उलट ' मापी '. २ वजन करून घ्यावयाचा किं० द्यावयाचा ( पदार्थ,-सर्पण, सोनें, इ० ).

**वजनीज** [ म० ओज; सं० ओजस् ] स्त्री० काळजी; निगा; शुश्रूषा.

**वजपा** मागें ' वचपा ' पहा.

**वजा** [ अ० वजह=कमी करणें ] वि० कमी; उणें; उ० दहांतून तीन वजा केले तर सात उर‌तात. **टीप**.–' वजा ' हें विशेषण लिंगवचनां‌प्रमाणें न फिरणारें आहे. ॐ **वजाबाकी** स्त्री० १ एका संख्येतून किं० परिमाणांतून दुसरी संख्या किं० परिमाण कमी करणें किं० काढून टाकणें. २ वरील प्रकारें कमी करण्यानें किं० काढून टाकण्यानें बाकी राहिलेली संख्या किं० किं० परिमाण. **वजाई** स्त्री० १ हिशेबांतून काढून टाकलेली किं० वजा घातलेली रक्कम. २ कोणेकाला वरच्या दर्जावरून खालच्या दर्जावर आणणें. **वजावाजवी** (-बी ), **वजावाजब, वजावाजीब** वि० योग्य; यथायोग्य प्रकारचें; बरोबर. **वजावाट** स्त्री० १ वजा करावयाच्या रकमा वजा करून बाजवी आंकडा किं० परि‌माण काढणें किं० ठरविणें. २ अशा कृत्यानें ठरलेला आंकडा किं० ठरलेलें परिमाण. ३ दोन माणसांचें एकमेकांकडे देणें किं० घेणें किती निघतें हें पाहून त्या देण्याघेण्याचा निकाल करणें किं० केलेला निकाल. ४ हातीं आलेल्या पैशाची विल्हेवाट करून टाकणें किं० तो खर्चून किं० उधळून टाकणें. ५ द्यावयाच्या रकमा ज्याच्या त्याला देऊन टाकणें.

**वजा** [ अ० वजह्=तुल्य ] वि० बहुतेक सारखा; एकंदरींत तोच किं० त्याच्या खालो‌खाल; उ० काडीवजा म्ह० काडीइतका बारीक; खांबवजा म्ह० खांब म्हणावयाला हरकत नाहीं असा. याच सरणीनें खंदकवजा, बुरुजवजा, इ० स्त्री० तऱ्हा; प्रकार; सरणी. ह्या अर्थी ' वजे स्त्री० सुद्धां.

**वजा** पु० सुतारकाम आणि लोहारकाम हीं दोन्हीं करणारा कारागीर.

**वंजार, वंजारा** (-री) इ० पुढें ' वणजार ' ' वणजारा (-री) ' इ० पहा. [पहा.

**वजिरात, वजिरी** खालीं ' वजीर ' मध्यें

**वजीर** [ अ० वझीर ] पु० १ राजाचा मुख्य प्रधान. २ बुद्धिबळांच्या डावांत राजाच्या खालोंखालचें एक मोहोरें. ॐ **वजिरात, वझा‌रत** [ अ० वझारत् ] स्त्री० वजिराचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र. **वजिरी** स्त्री० १ वजिराचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र. २ गंजिफांच्या खेळांत वजिराला द्यावी लागते जी तलफ ती वि० वजिरा संबंधाचें.

**वज्र** [ सं० ] वि० १ अति टणक किं० कठिण. २ × अशा आकाराचा.पु०,न० १इंद्राचें आयुध. २ वीज, विद्युत्. ३ कोणतेंही घातुक शस्त्र. ४ हिरा हें रत्न. ५ रत्नाला भोंक पाड‌ण्याचें एक हत्यार. न० १ पोलाद. २ काळा अभ्रक. ३ कातड्याची दोरी. पु० १ सत्तावीस योगांतील पंधरावा योग. २ विद्या, शौर्य, इ० कांहीं गुणानें दुसऱ्याचा पराभव करण्यास समर्थ असा माणूस. ॐ **वज्रांग** पु० सर्प. **वज्रघात, वज्रपात** पु० अकस्मात् कोसळलेला कांहीं भयं‌कर अनर्थ. **वज्रायुध, वज्रधर, वज्रपाणि** पु० इंद्र. **वज्रकंटक** पु० १मारुति.२निवडुंग. **वज्रकील** पु० वज्र **वज्रक्षार** पु० १ नवसागर.२सज्जीखार.**वज्र‌गोप** पु० मृगकिडा. **वज्रचंचु** पु० गिधाड. **वज्र‌दंत** पु० रानडुकर. **वज्रनाभ** पु० सुदर्शन

चक्र. **वज्रनिर्घात, वज्रनिर्घोष, वज्रनिष्पेष** पु० विजांचा कडकडाट. **वज्रपात** पु०वीज पडणें. **वज्रपुट** न० औषधाचें पाचनपात्रविशेष. **वज्रमणि** पु० हिरा. **वज्रमय** वि० निष्ठुर; कठोर. **वज्रलेप** पु० अत्यंत चिकट असें एक लुकण. **वज्रलोहक** पु० लोहचुंबक. **वज्रसार** वि० अत्यंत टणक किं० कठिण. **वज्रचुडेमंडित,वज्रचूडेमंडित** वि० पत्रांत सौभाग्यवती स्त्रियांच्या नांवामागें हें विशेषण योजतात;उ०वज्रचूडेमंडित सौभाग्यवती गोदूताई. **वज्रकीट** पु० खवल्या मांजर. **वज्रजिव्ह** वि० कठोर किं० मर्मभेदक भाषण करणारा. **वज्रटीक** स्त्री० ए० व०, **वज्रटिका** स्त्री० अ० व० स्त्रियांच्या एका कंठभूषणाचा सुवर्णाचा एक अवयव. **वज्रदेही** वि०काटक किं०कणखर शरीराचा किं० प्रकृतीचा (माणूस). पु०मारुति. **वज्रद्रोह** पु०हाडवैर. **वज्रधार** वि० अत्यंत तीक्ष्ण ( शस्त्र ). **वज्रपथ्य** न० अत्यंत कठिण पथ्य. **वज्रपरीक्षा** स्त्री० कसून केलेली परीक्षा. **वज्रप्रयत्न** पु० नेटानें केलेला प्रयत्न; भगीरथप्रयत्न. **वज्रबट्टु** पु० एक वृक्षविशेष. न० त्याचें फळ. मागें'बजरबट्टु' पहा. **वज्रमहाग** वि० अति महाग. **वज्रमुष्टि** पु० तालीमखान्यांतील मल्लांचें एक आयुध. स्त्री०,पु० जोरदार मुठीची पकड. पु० ज्याच्या हातून पैसा लवकर सुटत नाहीं असा कृपण किं० कंजूष माणूस. **वज्रमूठ** स्त्री० १ खाजरें आणि रानटी सुरण. २ कृपणाची घट्ट मूठ. २ तालिमबाजाची घट्ट आणि जोरदार मूठ. **वज्रलेप** पु० अत्यंत टणक आणि चिकट इमारती चुना, सनल्याचा अति बळकट चुना, किं० अशा चुन्यानें केलेली सांधेजोड. वि० न निघणारा किं०न सुटणारा किं०न मोडला जाणारा ( रंग, सांधा, जोड, प्रतिज्ञा, वैर, इ० ). **वज्री** स्त्री० हात, पाय, इ० घासून स्वच्छ करण्याच्या उपयोगाचा असंख्य भोकांचा दगड. **वज्रहृदय** न० कठोर अंतःकरण. वि०कठोर अंतःकरणाचा ( मनुष्य ). पु० इंद्र. **वज्राधिकार** पु० एका कुटुंबांत अनेक पिढ्या चालत आलेला अधिकार. **वज्रांबट** वि० अत्यंत आंबट. **वज्राळें, वज्रावळ** न० एक वृक्षबीज,-जें मुलांच्या गळ्यांत बांधतात. **वज्रांगी** स्त्री० चिलखत; कवच.

**वट** [सं०] पु० वड हा वृक्ष. ॥ **वटपौर्णिमा** स्त्री० ज्येष्ठ महिन्याची पौर्णिमा हा तिथि. ह्या तिथीला बायका करतात त्या व्रताला ' वटव्रत, ' ' वटसावित्रीचें व्रत ' असें म्हणतात. **वटव्रत** [ सं० ] न० ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेस स्त्रिया वडाची पूजा करतात हें व्रत. **वटश्राद्ध** न०गया येथें यात्रेकरू करतात तें श्राद्ध.

**वट** स्त्री० कच्चें रेशीम धुतांना निघून जातो तो गाळसाळ.

**वटक** [ सं० ] पु० १ वडा,-एक खाद्य. २ गुदद्वारें विसर्जिलेला टणक मळ; खडा. ३ पोटांतील आम म्ह० न पचलेला अन्नांश. ४ मुलाची ओकारी,-जींत चोथा पाण्याच्या रूपांत दूध तोंडावाटें बाहेर पडतें.

**वटकण (-न )** न०१ अटक; खोडा. २पाचर. २ टेकू. खालीं ' वटगण ' पहा. ३ कोणेकाला ताब्यांत ठेवण्याचें साधन; उ० पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं; उ० माकडाचें वटकन दरवेशाच्या हातीं.

**वटका** पु० रिकामी बडबड; वाचालता.

**वटगण (-न ), वडगण** न० १ पदार्थ डळमळूं नये म्हणून खालीं घालतात ती पाचर. २ गाडी इ० चें चाक पुढें फिरूं नये म्हणून चाकापुढें लावितात तो धोंडा इ०.

**वटणें** स० क्रि० १ सरकी काढण्यासाठीं चरकांत ( कापूस ) घालणें. **वटणें** न० हा चरक. २ ( गवत, दगड, इ० ) राशीच्या रूपांत रचणें.

**वटणें** न० वर ' वटणें 'स० क्रि० मध्यें पहा.

**वटपूर्णिमा, वटपौर्णिमा** [ सं० वट + पूर्णिमा, पौर्णिमा ] स्त्री० ज्येष्ठ महिन्यांतील पौर्णिमा. मागें ' वट ' मध्यें हे शब्द पहा.

**वटभरण** न०, **वटभरणी** स्त्री० मागें 'ओटी' मध्यें पहा.

**वटवट** स्त्री० बडबड.

**वटवटीत** वि० विरूप दिसण्याइतके आणि उथळ ( डोळे ). ह्या अर्थी ' बटबटीत ' सुद्धां रूढ आहे.

**वटावणें, वटाविणें** स० क्रि० १ एका रूपांतील ( नाणें इ० ) दुसऱ्या रूपांत बदलून घेणें.

२ ( आजार, अडचण, पंचाईत, इ० ) निस्तरणें, सोसणें किं० सोसून किं० टाळून त्यांतून पार पडणें.

**वटश्राद्ध** न० मागें ' वट ' मध्यें पहा.

**वटसावित्री** मागें ' वट ' मध्यें पहा.

**वटहुकूम** पु० सर्वत्र लागू पडणारा हुकूम.

**वटांग** स्त्री० लोहार, नालबंद, इ० ची एक प्रकारची ऐरण.

**वटारणें** स० क्रि० ( डोळे ) पूर्णपणें उघडणें ( कोणेकाला भीति दाखविण्यासाठीं )

**वटाव** [ हिं० ] पु० रुपाया इ० नाणें मोडतांना जो बट्टा मिळतो किं० द्यावा लागतो तो; बटणावळ.

**वटाविणें** वर ' वटाविणें ' पहा.

**वटाविणें, वाटाविणें** [ म० वाट ] स० क्रि० प्रवासांत ( गांव, ओढा, घांटी, इ० ) ओलांडून किं० उल्लंघून पुढें जाणें.

**वटिका, वटी** [ सं० ] स्त्री० १ बागेंतील झाडांचा वाफा किं० ताटवा. २ औषध इ० ची गोळी. ३ लोणी, गूळ, पीठ, इ० ची थापटी.

**वटीव** [ म० वटणें ] वि० १ रचून किं० रास करून ठेविलेले( गवत, दगड, पेंढा, इ०). २ सरकी काढण्यासाठीं चेपलेला ( कापूस ).

**वटें** पुढें ' वडें, ' ' वढें ' पहा.

**वठण** [ म० वठणें ] स्त्री० १ नम्रपणाची किं० आज्ञाधारकपणाची स्थिति. २ मऊ किं० नरम होणें. ३ रोडपणाची किं० विडकिडीतपणाची स्थिति. ॐ **वठणीस येणें** अ० क्रि० नम्र किं० आज्ञाधारक होणें. **वठणीस आणणें** स० क्रि० नम्र किं० आज्ञाधारक करणें; ताळ्यावर आणणें; सुधारणें.

**वठणें** [ म० उठणें ] अ० क्रि० १स्पष्ट होणें; स्पष्टपणें दिसणें किं० दिसूं लागणें. २ ( रंग ) तजेलेदार दिसूं लागणें. ३ ( शाप ) फलद्रूप होणें. ४ ( माणूस, पशु, झाड ) रोड होणें किं० वाळणें.

**वठाण** [ सं० अवस्थान ] न० १ कांहीं कामाकडे नेमस्त केलेली जागा. २ घर इ० तील खोली किं० दालन.

**वठार** पु० १ शहरांतील विशिष्ट धंद्याच्या लोकांची राहाण्याची पेठ; उ० तेली वठार. २ शहर, गांव, इ० तील मोहला ( सामान्यतः ).

**वठ्ठया, वठ्ठयाबा** वि० लठ्ठ; अगडबंब; अत्यन्त स्थूल. ॐ **वठ्ठयाचें** न० जेवण (निंदेंत).

**वड** [ सं० वट ] पु० एक वृक्ष. ह्याची ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेस स्त्रिया पूजा करतात. ॐ **वडसावित्री, वडपौर्णिमा, वडश्राद्ध** मागें ' वड ' मध्यें ' वटसावित्री, ' ' वटपौर्णिमा, ' ' वटश्राद्ध ' पहा. **वडास आलीं वडफळें आणि कावळ्यास आलें तूं ( किं० आला रोग )** ऐन उपभोगाच्या वेळीं उपभोगाचें सामर्थ्य नष्ट होणें (हें मोठें दुर्दैव होय). **वडाची साल पिंपळास लावणें** किं० **वडाची साल पिंपळास आणि पिंपळाची साल वडास लावणें** १ नसता संबंध जोडणें. २ खरें तें खोटें आणि खोटें तें खरें भासविणें. ३ न खपण्याइतकी अतिशयोक्ति करणें. ४ स्वकार्य साधण्यासाठीं लटपटी खटपटी करणें. **वड पिकणें** अनेक लोकांना कांहीं नवीन काम किं० योजना निघाल्यामुळें अनेक लोकांच्या चरितार्थाची एकदम सोय होणें. **वडजखीण** स्त्री० वडावर वास्तव्य करणारी जखीण किं० स्त्री पिशाच. **वडपिंपळ** पु० ए० व० अविवाहित पुरुष. **वडपुनव** स्त्री० ज्येष्ठी पौर्णिमा. मागें ' वट ' मध्यें ' वटपौर्णिमा ' पहा. **वडवत** मागें ' वट ' मध्यें ' वटव्रत ' पहा. **वडवत, वडवतें** न० नूतन विवाहित स्त्रिया वडपुनवेचे दिवशीं ब्राह्मणांना वायनें देण्याचा समारंभ करतात तो ( देणें ). **वडवाघूळ** न० एक पक्षिविशेष.

**वंडकी** स्त्री०, **वंडकें** न० मागें 'ओंडा 'पहा.

**वडगण** न० मागे ' वटकण ' पहा.

**वडजा** पु० अत्यन्त वाकड्या तिकड्या गात्रांचा माणूस; कुरूप माणूस.

**वडलाई, वडलायकी, वडलांचा आडकित्ता, वडलांचा आहाणा, वडलावडली, वडलोपार्जित, वडलोवडलीं, वडलोबा** खालीं ' वडील-' मध्यें पहा.

**वडस** स्त्री०, न० विहिरींतून दोरीनें पाणी काढण्याचें चाक ज्या तुळईवर बसविलेलें असतें ती तुळई.

**वडवडणें** अ० क्रि० मागें ' ओढवणें ' पहा.

**वडवत** न० मागें ' वट ' मध्यें ' वटव्रत, ' ' वडवतें ' पहा.

**वडवा** [ सं० ] स्त्री० १ घोडी;अश्व जातीची स्त्री. २ वेश्या. ३ ( ज्योतिष ) अश्विनी नक्षत्र.४ ब्राह्मण स्त्री. ॐ **वडवाग्नि, वडवानल, वडवामुख** पु० समुद्रांतील अग्नि.

**वडवा** [ म० वणवा ] पु० जंगल, डोंगर, इ० वरील पेटलेला अग्नि; जंगलांतील आग.

**वडवाघूळ** मागें ' वड ' मध्यें पहा.

**वडस** पु० देवी इ०कारणानें नेत्रावर कवडीसारखा विकार होतो तो.

**वडसावित्री** ' वड ' मध्यें पहा.

**वंडा** [ म० ओंडा ] पु० १ लाकडाचा ओंडा. २ लाकडाची लांब आणि जाडी गंडेरी. ३ वांझ (मानवी स्त्री किं० पशुस्त्री).

**वडा** [ सं० वटक ] पु० उडीद इ०च्या पिठाची थापटी तळून तोंडीलावणें करतात तें. ॐ **वड्याचें तेल वांग्यांवर काढणें** एका माणसाबद्दल आलेला राग दुसऱ्या माणसाला शिव्या देऊन किं० दुसऱ्या माणसाचें कांहीं नुकसान करून शमविणें; एकाच्या चुकांबद्दल दुसऱ्यास विनाकारण रागें भरणें.

**वडांग** स्त्री० कांटेरी कुंपण.

**वडागर मीठ** न०समुद्राच्या पाण्याचें मीठ,- जें मोठ्या खड्यांच्या रूपांत असतें.

**वडांगळें** न० वडाचें फळ.

**वडाची पुनव, वडाची पौर्णिमा** स्त्री० मागें ' वड ' मध्यें ' वडपुनव ' पहा.

**वडारी** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**वडार** न० १ वडारी लोकांची टोळी. २ वडारी जातीचा इसम.

**वडिलकी** पुढें ' वडील ' मध्यें पहा.

**वडी** [ सं० वटी, वटिका ] स्त्री० १ पीठ, चिखल, मेण, गूळ, शेण, इ०ची थापटी. २ शेत भाजण्यासाठीं पसरलेल्या काटक्याकुटक्यांचा थर. ३ सर्पणासाठीं वाळावयास पसरलेल्या काटक्याकुटक्यांचा थर.

**वडील** [ सं० वृद्ध ] वि० मानाई जीं माता, पिता, आजा, आजी, पणजा, पणजी, इ०माणसें तीं प्रत्येक. २ वयानें, गुणानें, किं० शहाणपणानें वरच्या दर्जाचा. ३ आपला पिता. ॐ **कोणेकाचे वडील उद्धरणें** त्याला बापांवरून आणि पितरांवरून शिव्या देणें. **वडील घराणें** न० १ **वडील घराणा** पु० कुटुंबाच्या वडील शाखेचें घर म्ह० वडील भावाचें किं० वडील भावाच्या संततीचें घर. **वडीलधारा** पु०, **वडीलधारें** न० कुटुंबांत शिस्त राखण्याचा अधिकार ज्याच्याकडे आहे असें माणूस. **वडीलपरंपरा** स्त्री० कुटुंबांत मागपासून चालत आलेली सरणी किं० चाल. **वडील परंपरागत** वि० वाडवडिलांपासून चालत आलेलें ( वतन, मान, हक्क,अधिकार, इ० ).**वडीलमान** न० पिढ्यानपिढ्या चालत आलेला कांहीं हक्क. **वडलाई, वडलायकी** स्त्री० १ वडीलपणाचा दर्जा किं० मोठेपणा. २ वडीलपणाची कोणेकाची जबाबदारी. **वडलाई, वडलाबाई** [ म० वडील +आई किं० बाई ] स्त्री० पोक्त किं० प्रौढ स्त्रीप्रमाणें वागणारी मुलगी ( निंदेंत ). **वडलांचा आडकित्ता** पु० सुपारी फोडावयासाठीं योजलेले दोन दगड जोडीनें(विनोदांत).**वडलांचा आहणा** पु० मागपासून चालत आलेलें वृद्धवचन; म्हण. **वडलावडली** वि० १ कुटुंबांत मागपासून चालत आलेलें. २ वडील माणसांसंबंधाचें. **वडलोंदरलीं** क्रि० वि० कुटुंबांत मागपासून चालत ( आलेली रूढि, वतन, इ० ). **वडलोबा** पु० धाकट्या बहिणभावांशीं अरेरावीपणाचें वर्तन करणारा किं० त्यांच्यावर अधिकार चालवूं पाहणारा पोरगा ( उपहासांत ). **वडिलकी** स्त्री० १ वडीलपणा. २ घरचा कारभार पाहण्याचा अधिकार किं० मान.

**वढें** पुढें ' वढें ' पहा.

**वढील** मागें ' वडील ' पहा.

**वढें, वढें** न० सूड; उट्टें ( घेणें, उगवणें, काढणें ).

**वण** [ सं० व्रण ] पु०, न० १ जखम; क्षत. २ जखम, देवी, गळूं, इ० बरें झाल्यावर त्याचा त्वचेवर उठतो किं० राहातो तो डाग. ३ दत्त ळ, म्हसोबा, इ०ना बळी देतात तो पशु.४म्हैस किं०

'म्हशी' ह्या शब्दांच्या मागें चराईच्या बाबतींत योजतात तो शब्द; उ० वण म्हशी चौदा, पैकीं मयत तीन, बाकी जमा अकरा.

**वण** [ सं० वन ] स्त्री० चराईबद्दल द्यावें लागतें तें धन.

**वणज** [ सं० वाणिज्य ] स्त्री० आपला माल खपविणें किं० परठिकाणचा माल खरेदी करणें इ० कामांसाठीं व्यापारी किं० दुकानदार करतो तो प्रवास.

**वणजार, वणजारा** खालीं 'वणजारा' पहा.

**वणजारा (–री)** [ सं० वाणिज्य=व्यापार. वणिज्=व्यापारी, वाणी ] पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. हे लोक धान्य, मीठ, इ० ची वाहतूक करतात. ॐ **वणजार** न०, **वणजारा** पु० बणजारी लोकांची टोळी किं० तळ; वणजारी लोक समुच्चयानें.

**वणवण** [ सं० वनात् वनं=एका रानांतून दुसऱ्या रानांत ] स्त्री० उन्हांत, थंडींत, किं० वाऱ्यांत आणि कष्ट सोशीत भटकणें ( करणें ). क्रि० वि० उन्हांत, थंडींत, वाऱ्यांत, आणि अनेक कष्ट सोशीत ( हिंडणें, भटकणें ). ह्या अर्थी 'वणांवणां' सुद्धां.

**वणवणें** [ सं० अव+नम् ] अ० क्रि० ओणवें होणें ( अशिक्षितांत रूढ ).

**वणवा** [ सं० अव+नम् ] वि० पुढें वाकलेला किं० कललेला; ओणवा (अशिक्षितांत रूढ).

**वणवा** [ सं० वनानल ] पु० १ पेटलेलें जंगल किं० रान. २ कांहीं भयंकर जाळपोळ ( लुटारूंनीं केलेली ). ३ गांवभर पसरलेली कांहीं रोगाची साथ, भयंकर बातमी, प्रचार, इ०. ४ क्रोध इ० कारणानें अंगाची होते ती आग किं० लाही.

**वणिज, वणीक** [ सं० वणिज=व्यापारी ] पु० १ व्यापारी; वाणी. २ ( ज्योतिष ) तूळ रास. स्त्री० व्यापार. ॐ **वणिज्य** न०, **वणिज्या** स्त्री० व्यापार.

**वणी** [ म० पाणी ] न० ( मराठी समासाच्या शेवटीं ) पाणी; उ० चिंचवणी, गुळवणी, मिठवणी, इ०.

**वणीक, वाणिज** वर 'वणिज' पहा.



**वत्** [ सं० ] १ हा प्रत्यय संस्कृत शब्दांस लागून विशेषणें किं० क्रियाविशेषणें होतात; उ० ब्राह्मणवत् ह्म० ब्राह्मणाप्रमाणें; ह्याच सरणीनें वृक्षवत्, मूर्खवत्, इ०. 'वत्' हा प्रत्यय संस्कृत शब्दांस लागून 'संपन्न' हा अर्थ दाखविणारीं विशेषणें होतात; उ० धनवत् ह्म० धनानें संपन्न; विद्यावत् ह्म० विद्येनें युक्त ह्म० विद्वान्. ह्या प्रत्ययाचें मराठींत 'वान्,' किं० 'वंत' रूपान्तर होतें; उ० द्रव्यवान् किं० द्रव्यवंत; धनवान् किं० धनवंत; विद्यावान् किं० विद्यावंत, इ०.

**वत, वती** स्त्री० तरफ, बाजू, पक्ष. ह्या शब्दाचीं प्रथमेचीं रूपें अप्रचलित आहेत. 'वतीं,' 'वतीनें' ही क्रियाविशेषणार्थक रूपें मात्र रूढ आहेत. ॐ **वतीं, वतीनें** क्रि० वि० ( कोणेकाच्या) तर्फेनें, बाजूनें, किं० पक्षानें; (कोणेकाच्या) बद्दल; (कोणेकाचा) पक्ष धरून.

**वंत** स्थावर, जंगम, किं० द्रव्यरूप जी कोणेकाची संपत्ति असते तींत भागीदारांचे अनेक असतात जे अंश ते प्रत्येक. ॐ **वंतदार** पु० अशा संपत्तीवर ज्या ज्या लोकांचे हक्क असतात ते प्रत्येक.

**वतणी** [ म० ओतणें ] स्त्री० ओतण्याची क्रिया. मागें 'ओतणें' पहा (अशिक्षितांत रूढि ).

**वतणें** [ म० उतणें ] अ० क्रि० उतणें ( अशिक्षितांतच रूढ ). मागें 'उतणें' पहा

**वतणें** [ म० ओतणें ] स० क्रि० ओतणें ( अशिक्षितांत ).

**वतन** [ अ० वतन्=जन्मभूमि ] न० १ जन्मभूमि. २ वंशपरंपरागत चालणारा हक्क, शेत, मिळकत, धंदा, अधिकार, मान, किं० उत्पन्न. ॐ **वतनदार** पु० १ वतनाचा भोक्ता. २ कोणेक गांवचा पिढ्यानपिढ्या स्थायिक रहिवासी. **वतनी** वि० १ जेथें कोणेकाचा जन्म झाला तेथील किं० त्या ठिकाणासंबंधाचा. २ वंशपरंपरेनें प्राप्त झालेला. ३ वतनासंबंधाचा (कागद, दस्तऐवज, इ० ). ४ प्रतिग्रहानें किं० विकत घेतल्यामुळें जें आपलें झालें तें. **कोणेकाचें कोणेक ठिकाणीं वतन गाडलेलें असणें** तो तेथील हक्कानें राहणारा असणें. निषेधीं किं० निषेधार्थी प्रयोग; उ० तूं येथें कशाला येत असतोस ? येथें तुझें वतन गाडलें

आहे कीं काय ? वतनगाडलें न० वंशपरंपरागत चालत आलेल्या हक्कानें प्राप्त झालेला स्थिरपणा किं० कायमपणा; उ० ह्या जागेवर वंशपरंपरा नांदून येथें माझें वतनगाडलें आहे तें मी कधींही सोडावयास तयार होणार नाहीं. वतनजप्ती स्त्री० वतनाची सरकारनें केलेली जप्ती किं० ह्या जप्तीनें सरकारास मिळालेला पैसा. वतनदार हिजडा पु० गांवकऱ्यांपासून हक्कानें भिक मागत हिंडणारा हिजडा ह्म० षंढ किं० नपुंसक. वतनबंधु, वतनभाऊ पु० एकाच वतनाचे जे भोक्ते ते परस्परांचे वतनबंधु किं० वतनभाऊ. वतनवाडी स्त्री० कोणेकाची स्थावरजंगम संपत्ति.

वतरणें [ म० अवतरणें ] १ मागें ' अवतरणें ' पहा ( अशिक्षितांत रूढि ). २ ( पिशाचादिकानें ) कोणेकाच्या शरीरांत संचार करणें. ३ पिशाचादिकांच्या संचारानें ( कोणेकानें ) उपद्रव पावणें.

वतवत स्त्री० १ निरुद्योगीपणांत भटकणें; भ्रमंती; भटकंती. २ बडबड; चारगटपणाचें भाषण. वतवत, वतवतां क्रि० वि० अचरटपणानें किं० मूर्खपणानें ( बोलणें ). २ चोखंदळेपणानें ( जेवणें, खाणें ).

वतवतणें अ० क्रि० १ बडबडणें; अचरटपणानें बोलणें. २ तिसरटपणानें किं० त्रासिकपणानें बोलणें.

वंतसें, वनसें [ म० वहिनी+असा ] न० अ० व०, स्त्री० अ० व० नवऱ्याची बहीण.

वतारणें वर ' वतरणें ' पहा.

वतीं, वतीनें क्रि० वि० वर ' वत, वती ' पहा.

वत्स [ सं० ] पु० गायीम्हशींचें वासरूं किं० पिलूं. २ मानव जातीचा मुलगा किं० मूल. ३ मुलगा ( प्रेमानें ). ४ कोंकणांतील ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा इसम. ֍ वत्सतर पु० पाडा; गोऱ्हा. वत्सतरी स्त्री० कालवड. वत्सनाभ पु० बचनाग. वत्सपाल पु० १ गुराखी. २ श्रीकृष्ण. वत्सद्वादशी स्त्री० आश्वीन महिन्याच्या कृष्णपक्षांतील द्वादशी,—ज्या तिथीला गाय आणि वासरूं ह्यांची पूजा करतात. ह्या दिवसाला ' वसुबारस ' असेंही नांव रूढ आहे. वत्सक पु० वासरूं.

वत्सर [ सं० ] पु० वर्ष.

वत्सल [ सं० ] वि० मायाळू; प्रेमळ; उ० भक्तवत्सल, पुत्रवत्सल, इ०. ֍ कुटुंबवत्सल वि० ज्याला बायको, मुलें, इ० परिवार आहे असा. [ किं० हिस्सा.

वंथ पु० वडिलोपार्जित संपत्ति इ० चा वाटा

वथणें [ म० वदणें; सं० वद् ] स० क्रि० १ बोलणें. २ मूर्खपणानें बोलणें. ३ ( जें बोलणें योग्य नाहीं तें ) बोलून जाणें. अ० क्रि० बडबड करणें; वटवट करणें

वंदक [ सं० ] वि० नमस्कार करणारा.

वंदण मागें ' ओंदण ' पहा.

वदणूक [ म० वदणें; सं० वद् ] स्त्री० १ सांगणें; कथन; निवेदन. २ कोणेकानें कोणेकाला केलेला बोध किं० उपदेश किं० घालून दिलेली सरणी.

वदणें [ सं० वद् ] स० क्रि० १ बोलणें. २ भाषणद्वारा ( कांहीं गोष्ट ) प्रकट करणें. ३ कबूल करणें. ४ स्पष्ट शब्दांनीं ( कांहीं गोष्ट ) बोलणें, सांगणें, कबूल करणें, किं० उच्चारून सांगणें. ५ पाठ केलें जें तें म्हणून दाखविणें. ६ परिगणन करणें. ֍ वदतो व्याघातः पु० असंबद्ध भाषण; अशक्य गोष्टीचें कथन.

वंदणें [ सं० वंद् ] स० क्रि० १ नमस्कारणें. २ ( तीर्थ, देवळापुढील माती, इ० ) भक्तिभावानें मस्तकीं धारण करणें.

वदंता [ सं० वद् ] स्त्री० बातमी; अफवा.

वदंती [ सं० वद् ] स्त्री० भाषण; बोलणें.

वदन [ सं० ] न० १ मुख; तोंड. २ श्रेणीचें पहिलें पद.

वंदन [ सं० ] न० १ नमस्कार. २ स्तुति. ֍ वंदनमाला स्त्री० दारावरील तोरण. वंदनशील वि० १ पूज्यांना योग्य तो मान देणारा. २ बोलण्याचालण्यांत सभ्य.

वंदनीय, वंद्य [ सं० ] वि० १ नमस्कारार्ह; नमस्कार ज्याला करावयास पाहिजे असा; पूज्य.

वदळ [ सं० अवदलन ] स्त्री० १ जाणें, येणें, इ० रूप रस्त्यांवरील रहदारी. २ भांडींकुंडीं किं० कोणताही पदार्थ, ह्यांचा

वारंवार उपयोग केल्यानें होणारी झीज किं० मोडतोड. ३ कोणत्याही प्रकारचा वापर किं० वापरामुळें झालेली झीज किं० मोडतोड.

**वदळ** [ सं० अवदलन ] पु० समुद्राच्या लाटा एकसारख्या वाळवंटावर आपटत असल्या कारणानें तेथें जे चर किं० ओहोळ पडतात ते प्रत्येक.

**वदान्य** [ सं० ] वि० १ बोलणारा. २ गोड भाषण करणारा. ३ उदार; दानशूर.

**वद्य** [सं०] वि० १ ( समासान्तीं ) सांगण्या जोगें; बोलण्याजोगें. २ महिन्याचा कृष्ण (पक्ष). ३ महिन्याच्या कृष्णपक्षांतील ( द्वितीया,तृतीया, इ० तिथि ). ※ **वद्यपक्ष** पु० महिन्याचा कृष्ण-पक्ष म्ह० दुसरा पंधरवडा. **अवद्य** वि० निंद्य;दोषी पापी. **अनवद्य** वि० निर्दोष.

**वध** [ सं० ] पु० १ ठार मारणें. २ तडाखा; आघात; इजा. ३ ( गणित ) गुणाकार. ※ **वधस्तंभ** पु० फाशीं देण्याचा सूळ.

**वधणें** [ सं० वध् ] स० क्रि० ठार मारणें.

**वधू** [ सं० ] स्त्री० १ नवरी मुलगी. २ पत्नी. ३ सून. ४ कोणीही स्त्री. ५ ( पशुपक्ष्या-दींत ) मादी. ※ **वधूटिका** स्त्री० १ अल्पवयी स्त्री. २ सून. **वधूप्रवेश** पु० लग्नाच्या सोहाळ्यांत वधूचें नवऱ्याच्या घरीं जाणें हा विधि. **वधूमाय** स्त्री० ( लग्नाच्या सोहाळ्यांत ) नवऱ्या मुलीची आई. **वधूवरें** न० अ० व० नूतन लग्न झालेली नवरानवरी. **वधूवस्त्र** न० लग्न लागतें समयीं वधूला जें पिवळें वस्त्र नेसावयास देतात तें.

**वध्य** [ सं० ] वि० ठार मारण्यास योग्य.

**वंध्य** [ सं० ] वि० १ वांझ किं० वांझोटी (स्त्री ). २ निष्फल ( झाड, खटपट, प्रयत्न ). ※ **वंध्यफळ** वि० १ ज्याला फळें येत नाहींत असा (वृक्ष ). ३ व्यर्थ किं० निरर्थक (प्रयत्न). **वंध्या** स्त्री० वांझोटी स्त्री. **वंध्यापुत्र, वंध्यासुत** पु० अविद्यमान वस्तु.–खपुष्प, शशशृंग, मृगजल, इ० प्रमाणें. **वंध्यामैथुन** न० निष्फळ प्रयत्न, खटपट, किं० यातायात.

**वन** [ सं० ] न० १ अरण्य; जंगल. २ बागें-तील झाडांचा ताटवा. ह्या अर्थी ' बन ' सुद्धां. इ० केळींचें, पोफळीचें वन (किं०बन). ३ ओसाड प्रदेश. ४ समासांत पूर्वपद असतां ' वन ' चा विशेषणात्मक अर्थ रानटी किं०जंगली असा होतो; उ० वनकुक्कट. ※ **वनौका** [ सं० वनौकस् ] पु० १ अरण्यवासी. २ तपस्वी. ३ वानर. ४ वन्य किं० जंगली पशु. **वनगहन** न० निबिड अरण्य. **वनगो** स्त्री० गवा हा पशु. **वनचर, वनेचर** पु० १ अरण्यवासी; वानप्रस्थ. २ वन्य पशु. ३ भिल्ल. ४ राक्षस. **वनचराई** स्त्री० रानांत गुरें चरावयास नेण्याबद्दल सरकारास जें द्रव्य द्यावें लागतें तें. **वन-धेनु** स्त्री० वनगाय. **वनभोजन** न० कार्तिक इ० मासीं किं० अन्य वेळीं झाडाखालीं किं० बाग इ० स्थळीं मित्रमंडळीसह गमतीखातर केलेलें जेवण. **वनमाला** स्त्री० गुडघ्यापर्यंत लोंबणारी माळ. **वनमाली** [ सं० वनमालिन् ] पु० १ श्रीकृष्ण; विष्णु. २ बलराम. **वनराज** पु० सिंह. **वनवास** पु० १ वनांत म्ह० अरण्यांत राहणें किं० वसति करणें; उ० पांडवांनीं अनेक वर्षें वनवासांत काढलीं. २ कष्टमय किं० दुःखमय स्थिति. ३ रानांवनांत भटकत राहून केलेलें आयुष्यक्रमण. **कोणाला वनवास काढणें** त्याला अतोनात सतावणें किं० उपद्रविणें. **वन-देवता** स्त्री० अरण्याची अधिष्ठात्री देवता.

**वन** [ सं० ] पु० पाणी.

**वनवन** मागें ' वणवण ' पहा.

**वनवा** मागें ' वणवा ' पहा.

**वनसं, वन्सें** [ म० वहिनी+असा ] न० अ० व०, स्त्री० अ० व० नवऱ्याची बहीण. मागें ' वंसें ' पहा.

**वनस्पति** [ सं० ] स्त्री० १ फुलें न येतां ज्याला फळें येतात असा वृक्ष ( वड, पिंपळ, इ० ). २ वृक्ष ( सामान्यतः ). ※ **वनस्पतिशास्त्र** न० वृक्ष, लता, त्यांच्या जाति, त्यांचे प्रकार, इ० संबंधाचें शास्त्र.

**वनिता** [ सं० ] स्त्री० १ स्त्री,–सामान्यतः. २ पत्नी; भार्या. ३ मादी ( पशुपक्ष्यादींत ). ४ कामुक स्त्री. ※ **वनिताश्रम** पु० स्त्रियांच्या राहण्याची आणि शिक्षणाची जेथें मुद्दाम सोय केलेली असते अशी संस्था.

**वनेचर** वर ' वन ' मध्यें पहा.

**वनेर** पु० एक कांडेचोरासारखा प्राणी.

**वन्य** [ **सं०** ] **वि०** वनासंबंधाचा; जंगली; रानटी. ॐ **वन्याश्रम पु०** वानप्रस्थाश्रम. **वन्यवृक्ष पु०** पिंपळ.

**वपणी** [म०ओपणी ]**स्त्री०**धातूच्या पदार्थांना चकाकी किं० झिलई आणावयाचें एक हत्यार.

**वपणी** [ **म०** ओपणी; **सं०** अर्प् ] **स्त्री०** १ पेरण्याची क्रिया; देणें. २ देऊन टाकणें.

**वपणें** [ **सं०** अर्प; **म०** ओपणें ] **स० क्रि०** १ देणें; देऊन टाकणें. २ कोणेकाच्या स्वाधीन करणें. ३ विकणें; विकून टाकणें.

**वपन** [ **सं०** ] **न०** १ बीं पेरणें. २ ( वस्त्र ) विणणें. ३ हजामत करणें. ४ हजामत; केश कापणें किं० वस्त्र्यानें तासणें. ५ पुरुषाचें वीर्य किं० शुक्र. **वपनी स्त्री०** १ हजामाचें दुकान. २ कोष्टयाचा माग.

**वपाविणें** मागें ' ओपाविणें ' पहा.

**वपा** [ **सं०** ] **स्त्री०**१ चरबी. २ छिद्र;भोक. ३ काळजांतील केळीच्या कोंवळ्या पानासारखा पापुदरा.

**वपाव** मागें ' ओपांव ' पहा.

**वपु** [ **सं०** वपुस् ] **न०** १ शरीर. २ मूर्ति; आकार. ३ स्वभाव; स्वरूप. ४ रमणीय आकार.

**वप्ता** [ **सं०** वप्तृ ] **पु०** १ पेरणारा; शेतकरी. २ बाप. ३ हजाम.

**वप्र** [ **सं०** ] **पु०, न०** १ शेत. २ टेकाड; उंचवटा. ३ टेकडीची बाजू किं० माथा. ४ डोंगरावरील पठार. ५ नदी, समुद्र, इ० चा कांठ किं० किनारा. ६ वेस. ७ प्राकार; तट. ॐ **वप्रक्रीडा, वप्रक्रिया स्त्री०** बैल, हत्ती, इ० च्या टेकाडावर टक्कर देणें, शिंगांनीं माती उकरणें, इ० रूप क्रिया.

**वमणें** [ **सं०** वम् ] **स० क्रि०** १ ओकणें. २ **(लाक्षणिक)**गुप्त गोष्ट किं० मनांतील रहस्य बोलून टाकणें. **अ०क्रि०**ओकणें; (कोणेकाला)वांति होणें.

**वमन** [ **सं०** ] **न०** १ ओकणें.२**(लाक्षणिक)** मनांतलि बेत प्रकट करणें. ३ कांहीं गोष्टींची परिस्फुटता.

**वय** [ **सं०** वयस् ] **न०** १ जन्म झाल्यापासून विशिष्ट समया पर्यंतचा कालावधि; उ० पांडूचें वय पंधरा वर्षें आहे. वय. २ आयुष्य ३ तारुण्याचा किं० ऐन उमेदीचा काळ. ॐ **वयोतिग, वयोतीत, वयोगत** [ **सं०** ] **वि०** म्हातारा. **वयांत येणें** १ प्रौढ होणें; तारुण्याच्या भरांत येणें.२बाळपण जाऊन संसाराची जबाबदारी वहावयाला योग्य अशा वयाचें होणें. ३ (कायद्याच्या दृष्टीनें ) मुलगा वीस आणि मुलगी अठरा वर्षांची होणें,—ज्या वयानंतर त्यांचे गुन्हे क्षम्य मानिले जात नाहींत. **वयांत होणें** प्रौढ होणें. **वयोधर्मानें क्रि० वि०** वय जें गेलें त्याचे परिणाम विचारांत घेतां(अशक्त होणें,किं० प्रौढ बुद्धीचें होणें ). **वयोवृद्ध, वयस्क, वयस्कर वि०**१ प्रौढ. २म्हातारा. **समवयस्क वि०** सारख्याच वयाचीं ( माणसें, जनावरें, इ० ). **वयातीत** [ **सं०** ' वयोतीत ' चें अपभ्रष्ट रूप ] **वि०** फार म्हातारा. **वयोवस्था स्त्री०** बाल्य, तारुण्य, आणि वार्द्धक्य, ह्या तीन स्थिति प्रत्येक.

**वय** मागें ' वई ' पहा.

**वयकळ** पुढें ' वायकळ ' पहा.

**वयवाढा पु०** शेत इ० च्या भोंवतालचें कुंपण इ०.

**वयस्क** वर ' वय ' मध्यें ' वयस्कर ' पहा.

**वर** [ **सं०** ] **वि०** १ उत्तम; श्रेष्ठ. २ ज्यास्त चांगला. **पु०** १ पसंती. २ कोणेकानें कोणेकापाशीं मागितलेलें अभीष्ट ( मागणें ). ३ कोणेकानें कोणेकाचें पुरविलेलें अभीष्ट ( देणें, पुरविणें ). ४ देणगी. ५ नियोजित पति. ६ जांवई. ॐ **वरद वि०** भक्ताचें मनोरथ पुरविणारा ( साधू, देव, हस्त, इ० ). **वरदचतुर्थी, वरदचौथ स्त्री०** भाद्रपद महिन्याची शुद्ध चतुर्थी. हिला ' गणेश चतुर्थी ' असें व्यवहारांत म्हणतात. **वरदहस्त पु०** देव, साधुपुरुष, इ० चा भक्ताचें अभीष्ट पुरविणारा हात,—जो भक्ताचे डोकीवर ठेविला जातो. **कोणेकाचे डोकीवर वरदहस्त ठेवणें** १ त्याचेवर कृपा करणें. २ तूं माझ्याच सारखा हो असा त्याला आशीर्वाद देणें. ३ त्याला आपल्या गुणांचा करणें ( चांगल्या किं० वाईट अर्थानें ). **वरदक्षिणा स्त्री०** १ नवऱ्या मुलाला कन्यादानविधीचे वेळीं देतात ती दक्षिणा. २ चोरीस गेलेल्या पदार्थाच्या शोधासाठीं जो पैसा खर्चिला जातो तो निष्फळ

झाला असतां त्या पैशाला ' वरदक्षिणा ' म्हणतात ( वैतागांत किं० थट्टेनें). **वरदान** न० १अर्थ ३चा वर देण्याचा विधि(करणें)किं०अशा प्रकारें जें दिलें तें. २ कोणेकाला कांहीं वाईट गोष्ट करण्याचा हक्क ( निंदेत ); उ० पोरांना येथें चिखल करण्याचें जणों वरदान दिलें आहे. **वरांग** न० १ मस्तक. २ जननेंद्रिय. **वरांगना** स्त्री० सुंदर स्त्री. **वरान्न** न० उत्तम किं० श्रेष्ठ अन्न. **वरदानी, वरदी** वि० ज्याला अर्थ ३ चा वर देण्यांत आला आहे असा ( वंश, कुटुंब, किं० माणूस ). **वरनिश्चय** पु० कन्येसाठीं नवरा ठरविणें किं० नवरा निश्चित करणें. **वरपक्ष** पु०नवऱ्या मुलाच्या बाजूचे लोक समुच्चयानें. **वरपक्षीय** वि० वरपक्षासंबंधाचा. **वरप्रस्थान** न० लग्नाच्या विधीसाठीं वराचें वधूच्या घराकडे समारंभानें जाणें किं० ह्या प्रसंगाची मिरवणूक. **वरमाई, वरमाय** स्त्री० ( लग्नाच्या सोहोळ्यांत ) वराची आई. **वरबाप** पु० (लग्नाच्या सोहाळ्यांत) वराचा बाप. **वरमूठ** स्त्री० लग्नाच्या सोहाळ्यांत वधूवरांच्या पदरांना बांधलेली गांठ सोडण्याबद्दल वधूच्या बहिणीला दिली जाते ती देणगी. **वरमुठीचा, वरमूठ** वि० मागें ' वरपंगी ' पहा. **वरोरु** स्त्री० सुंदर स्त्री. **वरतनु** स्त्री० सुंदर स्त्री; सुंदर आहे देह जीचा अशी स्त्री.

**वर** [ सं० उपरि ] क्रि० वि०, श० यो० अ० १ ऊर्ध्वभागीं; उ० घडवंचीवर ( किं० घडवंचीच्या वर ) पोतें ठेव. २ पेक्षां अधिक; उ० गणू कैदेंत गेल्याला तीन वर्षांवर( किं० वर्षांच्या वर ) दिवस झाले. क्रि० वि० १ पर्यंत; उ० आजवर. २ आणखी; पुन्हा; शिवाय; उ० त्यानें मला शिव्या दिल्या आणि वर मारलेंही. **टीप**,–'वर' शब्दाचे कांहीं वाक्प्रचार पुढें देतों. रामू मेल्यावर म्ह० मेल्यानंतर. तेथें शंभरावर लोक होते म्ह० शंभराहून अधिक. त्याच्या भाषणावर कोणी आक्षेप घेतले नाहींत म्ह० त्यांतील विधानें कोणी खोडून काढलीं नाहींत; कचेरींत माझ्यावर कोणी नाहीं म्ह० माझ्यापेक्षां उंच दर्जाचा. दारावर भाजी स्वस्ती पडते म्ह० फेरीवाल्या बाईनें आणलेली भाजी. चोरावर मोर म्ह० एका चोराला फसविणारा त्याच्याहून अट्टल चोर. दिरंगाईवर टाकणें म्ह० आज करूं, उद्या करूं, असें म्हणून पुढें ढकलणें. धर्मावर सोमवार सोडणें म्ह० लोकांच्या परोपकारबुद्धीनें मिळालेल्या पदार्थांवर सोमवारच्या उपासाचें पारणें फेडणें म्ह० सबंध दिवसाचें अन्न वाचविणें. ह्या लोणच्यावर माझें जेवण झालें म्ह० हें लोणचें तोंडीं लावून. ओठावर किं० जिभेवर असणें म्ह० तावडतोब उच्चारून सोडण्याइतकें स्मरणांत खिळलेलें असणें ( पण आतां मात्र आठवत नसणें ). पांच मैलांवर म्ह० पांच मैल भरतात किं० संपतात तेथें. ❀ **वर येणें** रागानें बेफाम होणें. **वरच्यावर** क्रि० वि० १ वारंवार. २ खालीं न पडूं देतां. **वर वर** क्रि० वि० १ फारसें खोल परीक्षण किं० अवलोकन न करतां;साधारण नजर फिरवून.२केवळ देखाव्यासाठीं.

**वर** स्त्री० स्त्रीची प्रसूतिसमयींची वार.

**वरई** स्त्री०१एक धान्य.२एक सोन्याचें नाणें.

**वरकड, वरकट** [ म० वर+कड ] वि० इतर; बाकीचें.

**वरकरणी** [ म० वर+करणें ] वि० बाह्यात्कारीं मात्र असलेला; ढोंगीपणाचा; दिखाऊ.

**वरकर्मी** [ म० वर+कर्म ] वि० १ केवळ बाहेरच्या बाजूसच फलद्रूप होणारा किं०परिणाम दाखविणारा ( उपाय, औषध, इलाज ). २ वरवरचा; केवळ दिखाऊ. ३ अंतःकरणपूर्वक नव्हे असा. ❀ **वरकर्मी आदर** पु० बाहेरून सभ्यपणाचा किं० केवळ औपचारिक आदर.

**वरकल** पु०, स्त्री०, न० सोन्याचा कस पाहाण्याचा दगड,–लाकडाच्या किं० पितळेच्या खोडांत बसविलेला. अशा कस पाहाण्याच्या साध्या दगडाला ' कसोटी ' म्हणतात.

**वरकशी, वरकशील** खालीं ' वरकस ' मध्यें पहा.

**वरकस, वर्कस** [ हिं० बिगर ( शिवाय )+कस ( सत्त्व ) ] वि० १ तांदूळ, गहूं, बाजरी, जोंधळा, हीं एकदल धान्यें, आणि तूर, हरभरा, वाटाणा, मूग, आणि मटकी, हीं द्विदल धान्यें,हीं खेरीज करून बाकीचीं म्ह० हलक्या दर्जाचीं ( धान्यें,–नागली, वरी, हरीक, इ० ).२ वरक-

साचीं धान्येंच पिकविण्याच्या मगदुराची(जमीन). ॐ वरकसल, वरकशील स्त्री० वरकस धान्यें,- नागली, वरी, हरीक, इ०. वरकशी, वर्कशी वि० वरकस धान्येंच जेथें पिकतात अशी ( जमीन ). वरकस पु०, न० नागली, वरी, हरीक, इ० हलकें धान्य.

वरकस [ म० वर ( उंचीं )+कस ( सत्त्व ) ] वि० १ उत्तम म्ह० निर्भेळ ( सोनें ). २ उंची; उत्कृष्ट दर्जाचा; श्रेष्ठ ( माणूस, पशु, शास्ता ). ३ शास्ता; अमल चालविणारा; नियंत्रिणारा; देखरेख करणारा. पु० १ दरारा, अधिकार, वर्चस्व, श्रेष्ठपणा, अमल, वचक ( बसविणें, चालविणें, चढविणें, मिळविणें ). २ अधिकार, सामर्थ्य, इ० गुणानें श्रेष्ठ माणूस, पशु, किं० पदार्थ; उ० सर्व पशूंचा वरकस सिंह; पक्ष्यांचा वरकस बहिरी ससाणा; मुलांचा वरकस पंतोजी; उंदराचा वरकस मांजर. ॐवरकसदार वरकोसदार वि०ह्याच प्रतीकांत 'वरकस' वि०अर्थ३पहा.

वरकांती, वरकांतीचा [ म० वर+कांति ] वि० १ बाहेरून मात्र सुंदर दिसणारा; केवळ दिखाऊ. २ औपचारिक. ३ अप्रामाणिक; फसवणुकीचा; ढोंगीपणाचा. [३ पहा.

वरकोस, वरकोसदार ' वरकस ' वि० अर्थ

वरख, वर्ख, वरक [ अ० वर्क़्=पान ]पु० १ पुस्तकाचें पान. २ सोनें इ० धातूचा अत्यन्त पातळ पत्रा. ३ कागदाचा अर्धा बंद. पाव बंदाला 'चवर्खा'म्हणतात.ॐवरखी,वर्खी,वरकी, वर्की वि० अर्थ २ च्या वरकानें आच्छादिलेला.

वरखडणें,वरखडा मागें 'ओरखडणें', 'ओरखडा ' पहा. हे दोन्ही शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.

वरखर्च [ म० वर ( वरचा )+फा० ख़र्च ] पु० मुख्य कार्याला लागलेल्या खर्चाशिवाय जो अवांतर किं० किरकोळ झालेला खर्च तो.

वरखल पु०, स्त्री० मागें ' वरकल ' पहा.

वरखशी, वरखस, वरखशील, वरखसल मागें ' वरकस ' इ० पहा.

वरखाल [ म० वर+खालीं ] क्रि० वि० १खालीं आणि वर; दोन्ही बाजूंस.२सर्व बाजूंस.

वरंग पु० एक वृक्षविशेष.

वरंगल (-ळ ), वरगल (-ळ ) पु० तांदूळाची एक जात.

वरंगळ, वरंघळ स्त्री० उतरण; उतार; उतरता पृष्ठभाग ( रस्ता, टेकडी, इ० चा ).

वरंगळणें, वरंघळणें, वरगळणें, वरघळणें अ० क्रि० १ घसरत खालीं येणें. २ ढासळून किं० कोसळून पडणें. ३ ( पाण्याचा प्रवाह ) जोरानें वाहात येणें. ४ (कोणताही पदार्थ) बारदान, आधार, पिशवी, पोतें, इ०तून एकदम बाहेर पडणें किं० दूर सरकणें.

वरघडी [म० वर ( वरची )+घडी ] स्त्री० दुकानदारानें किं० कोष्टयानें लुगडें, धोतर, कापडाचें ठाण, इ० ची घडी केल्यावर बाहेर जो भाग येतो किं० दिसतो तो,-जो इतर भागापेक्षा मुद्दाम अधिक तजेलेदार आणि नाजूक विणलेला असतो. ॐ वरघडीचा वि० १ केवळ दिखाऊ किं० भपकेदार. २ ढोंगीपणाचा, खोटा.

वरघाट [ म० वर (बाहेरचा)+घाट (डौल)] पु० पदार्थाचा बाहेरून दिसणारा घाट किं० डौल; बाह्य देखावा.

वरघाट [ म० वर+घाट ] पु० सह्याद्रि नांवाच्या पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेश.

वरघोडा [ म० वर( नवरा मुलगा )+घोडा]१ नवरा मुलगा आणि नवरी मुलगी यांची लग्नाच्या समारंभांतलि घोड्यावरून किं० पालखींतून काढलेली मिरवणूक. २ लग्नाच्या विधीसाठीं नवरा मुलगा नवऱ्यामुलीच्या घरीं ज्या मिरवणूकीनें जातो ती. ३ मुंज्या मुलाची मिरवणूक.

वरचढ [ म० वर+चढणें ] वि० १ कोणत्याही बाबतींत श्रेष्ठ दर्जाचा किं० सामर्थ्याचा.

वरचष्मा [ म० वर किं० फा० बर्+फा० चश्माह् ( डोळा )] पु० १ वरचढपणा; वर्चस्व. २ कोणेकावर नियंत्रणा घालण्याचा किं० ताबा चालविण्याचा जो कोणेकाचा अधिकार किं० हक्क तो.

वरचा, वरला [ म० वर ] वि० १ ऊर्ध्वभागचा. २ पश्चिमेकडील.

वरचील [ म० वर ] वि० बाकीचे; इतर.

वरजाळी स्त्री० भोंवऱ्याच्या खेळांत भोंवरा

फेकण्याची एक रीति.

**वरंट** पुढें ' वरवंट ' पहा.

**वरंटा** पुढें ' वरवंटा ' पहा.

**वरंड** [ सं० ] पु० १ समूह; जमाव. २ मुरमाची पुटकुळी. ३ माशाच्या गळाची दोरी. स्त्री० गवताचा भारा.

**वरंड, वरंडी** स्त्री०, **वरंडा, वरांडा** पु० १ कठड्याची किं० हद्दीची भिंत. २ दोन सलग शेतें किं० पटांगणें यांच्या हद्दीवरची भिंत किं० दरड. ३ मातीच्या विटा विटाळ्यानें कापून काढावयासाठीं चिखल किं० गारा ह्यांचा सारख्या जाडीचा केलेला विस्तीर्ण थर.

**वरंड, वरंडी** [ सं० वरंडक=ओटा ] स्त्री० १ भिंतीचा दोन्ही बाजूंनीं उतरता माथा. २ धान्याच्या ताटांची जुडी. ३ छपराचा कुंद म्हणून जो भाग त्याचा माथा. [ रास.

**वरंडा** [ सं० वरंडक=टेकाड ) पु० दगडांची

**वरडाण** स्त्री० मागें ' ओरट,' ' ओरड ' मध्यें ' ओरडाण ' पहा.

**वरतेल** न० वडे, भजीं, इ० तळून काढल्यावर कढई इ० मध्यें उरलेलें तेल.

**वरडोक, वरडोंक** पु० एक पक्षिविशेष.

**वरण** [ सं० वरान्न ] न० तूर, इ० डाळी शिजवून केलेलें पातळ खाद्यविशेष. **गोड वरण** न० भात कालवतांना घेतात तें वरण. ह्या वरणाला 'गोडें वरण' असेंही म्हणतात. फोडणीचें वरण, आंबट वरण, हे वरणाचे इतर प्रकार. ॰ **वरणभात** पु० ए० व०नवऱ्यापेक्षा बायको मोठी, सशक्त, किं० हिंमतदार अशी पतिपत्नींची जोडी किं० त्यांची ही विषमता.

**वरण** [सं०] न० १ पसंत करणें. २ आच्छादन. ३ वेढणें; वेष्टन. ४ तट; कुंपण. ५ मागणें; याचिणें. ६ वरणें; विवाह. ७ अनुष्ठानादि प्रसंगीं ऋत्विज ठरविणें हा विधि.

**वरणा** [ म० वरण; सं० वर्णा=तूर ] पु० पावटा हें द्विदल धान्य.

**वरणी** [सं० वरण] स्त्री० १ देवावर अभिषेक किं० देवाची पूजा इ० करण्यासाठीं किं० देवाचें उत्पन्न घेण्यासंबंधी जो कोणेकाळा अवधि ठरवून दिलेला असतो तो (मिळणें, देणें, लागणें). २ लग्नाचे वेळीं वधू नेसते तें वस्त्र,—जें नंतर उपाध्याला दिलें जातें. ३ कोणेकाला कांहीं लाभ किं० अभीष्ट मिळण्याची संधी येणें किं० पाळी मिळणें. ह्या अर्थीं ' वर्णी ' मुद्धां ( लागणें ).

**वरणीय** [ सं० ] वि० पसंत करण्यास किं० स्वीकारण्यास योग्य.

**वरणें** [ सं० वृ ] स० क्रि० पसंत करणें किं० पसंत करून स्वीकारणें.

**वरतवळा, वरतावळा, वरताळा** [ म० वर + ताळा]पु० १ भिन्न जातींच्या नाण्यांची अदलाबदल करतांना जें अधिक किं० कमी द्रव्य द्यावें लागतें तें. २ विवक्षित मापानें धान्यादि मोजून वर जो बाढावा येतो तो. ३ देणें, घेणें, इ० व्यवहारांत वजावाट झाल्यावर राहातो जो नफा तो किं० तोटा आला असतां जें पदरचें द्रव्य द्यावें लागतें तें.

**वरतां, वरतीं, वरतें** [ म० वर] क्रि० वि० शिवाय; आणखी. मागें ' वर' पहा. ॰ **थोक्यानें वरतां येणें** त्याणें मागें हटणें किं० आपल्या पायांवर उभें राहाणें.

**वरताणा** पु० सोनारांचा बांगड्या, वळीं, इ० ना वाटोळा आकार देण्याचा एका टोकाला बारीक होत गेलेला खुंटा. मागें ' कांकणा,' ' कांकता,' हे शब्द पहा.

**वरत्रा** [ सं० वरत्रा=दोरी किं० चामड्याची वादी ] स्त्री० कातड्याची दोरी किं० वादी. यांचें अपभ्रष्ट रूप ' वरात ' हें कोंकणांत 'जाडी दोरी ' ह्या अर्थीं रूढ आहे.

**वरद, वरदचतुर्थी** मागें 'वर' मध्यें पहा.

**वरदळ** [ म० वर+दाल] न० १ माजीमध्यें घालतात ती डाळ. २ घराच्या छपरावर कौलांच्या खालीं जे वांसे, कामट्या, रिपा, इ०पसरतात त्या समुच्चयानें.

**वरदळ** [ सं० अव+दलन ] स्त्री० रस्ता, घराची जमीन, इ० वर चालणें, रहदारी, किं० जाणें येणें, इ० मुळें होते ती झीज किं० मोडतोड. २ त्रास, उपद्रव (चोर, लुटारू, इ० नीं दिलेला ). ३ नित्याच्या उपयोगाचीं संसारांतील भांडींकुंडीं समुच्चयानें. ४ स्त्री०, न० व्यापार इ० तील नफा. ॰ **वरदळ खर्च** पु० अवांतर खर्च.

**वरदळ जिंदगी, वरदळ दौलत स्त्री०** जंगम संपत्ति. **वरदळसामान न०** १ संसारांतील जंगम वस्तु. २ प्रसंगविशेषींच ज्याची संसारांत जरूरी असते असें सामान,-मोदकपात्र, जिलबीपात्र, इ०. **वरदळीस येणें, वरदळीवर येणें** हमरीतुमरीचें भांडण सुरू करणें. **वरदळीचा वि०** वहिवाटींतील किं० नित्याच्या उपयोगाचा.

**वरदळणें** [ म० वरदळ ] अ० क्रि० कोणेकावर रागानें तोंड सोडणें; भांडण्यास सिद्ध होणें.

**वरदावरद स्त्री०** प्र० व० पुढें 'वरावर्द' पहा.

**वरदावळ** मागें ' वरदळ ' स्त्री० पहा.

**वरदूध** [ म० वर+दूध ] न० मातेच्या दुधाहून अन्य दूध गाय, म्हैस, इ० चें तान्ह्या मुलाला पातलें जातें तें.

**वरघणी पु०, न०** चुलीवर भाजी इ० शिजत ठेवलेल्या पात्रावर जें झाकण ठेवतात तें.

**वरघावा पु०** १ नवऱ्यामुलाला बोलावून आणण्याकरितां नवऱ्यामुलीच्या घराहून नवऱ्या मुलीचा भाऊ किं० त्याच्याबद्दल दुसरा कोणी मनुष्य ज्या मिरवणूकीनें जातो ती. २ अशा प्रकारें बोलावून आणिलेला नवरा मुलगा.

**वरचाविणें स० क्रि०** ( कोणेकाला ) गोड गोड बोलून किं० ( त्याची ) खुशामत करून सुखविणें किं० वश करून घेणें.

**वरपंकाचा, वरपंगीचा, वरपांगीचा, वरपंकीचा, वरपंकी (-गी,-की), वरपांगी वि०** बाह्य; दिखाऊ; बाह्यात्कारी; खोटा.

**वरपंग न०** बाह्य किं० बाहेरचा देखावा.

**वरपट्टी** [ म० वर+पट्टी ] **स्त्री०** कोष्टयाच्या मागांतील एक अवयव.

**वरपणें** मागें ' ओरपणें ' पहा.

**वरपिका** [ म० वर+पिकणें ] **वि०** झाडावर पिकलेला ( आंबा, केळें, इ० फळ ).

**वरबट्टा** [ म० वर+बट्टा ]**पु०** एका जातीचें नाणें दुसऱ्या जातीच्या नाण्याच्या रूपानें बदलून घेतेसमयीं जें द्यावें लागतें तें द्रव्य.

**वरंबा पु०** १ शेत, कालवा, पाण्याचा पाट, इ०ना घातलेला बांध ( घालणें, फुटणें, इ० ). २ पाण्याचा पाट. ३ कपाळ इ०वर तडाखा बसल्यानें तेथें उठतें तें टेंगूळ. ४ मागें 'वरंड, वरंडी' पहा.

**वरबुजारत क्रि० वि०** बाहेरून, बाह्याकारीं.

**वरभा, वरंभा पु०** मागें ' वरंबा ' पहा.

**वरमणें** [ म० वर्म; स० वर्मन् ] **अ० क्रि०** १ आपलें वर्म किं० पाप प्रकट झाल्यामुळें (कोणेकानें ) शरमणें किं० लज्जित होणें. २ ( गळू, फोड, इ० ) आपल्या आपण किं० औषधोपचारामुळें दबणें किं० बसणें.

**वरमूठ** मागें ' वर ' मध्यें ' वरमूठ ' पहा.

**वरला** [ म० वर ] **वि०** वरचा; वर असलेला. ॐ **वरलाकडे क्रि० वि०** पश्चिम दिशेच्या बाजूस. **वरलाशीं न० अ० व०** स्त्रीचे स्तन.

**वरव** [ म० उरणें ] **स्त्री०** १ समृद्धि; पुरवठा; वैपुल्य; भरपूर परिमाण. २ कांहीं कामीं योजावयासाठीं आणलेला पदार्थ त्या कामीं योजला जाऊन त्याचा उरतो तो अवशेष ( येणें ). ३ कांहीं पदार्थ अंदाजापेक्षा कमी खर्चावा लागल्यामुळें त्या पदार्थाला येते ती बरकत किं० त्याची पडते ती शिल्लक.

**वरवंचाई** [ म० वर+वंचन ( फसवणूक ) ] **स्त्री०** आंतून सत्त्वहीन, पोकळ, किं० खोटा, आणि वरून भपकेदार आणि सत्त्वस दिसण्याचा गुण, किं० ह्या गुणामुळें झालेली फसवणूक. ॐ **वरवंचाईचा वि०** १ बाहेरून मात्र चांगला, दिखाऊ, किं० भपकेदार(आणि आंत वाईट, निकस, किं० पोकळ ). २ खोटेपणाचा, ढोंगपिणाचा ( आजार, प्रेम, भाषण ); बतावणीचा.

**वरवंट पु०** लहान मुली साडी नेसतात तेव्हां पोटावर निऱ्यांचा केळ्याच्या सारखा आकार करतात तो. ह्याला ' वरवंटाचें नेसणें ' म्हणतात.

**वरवंटा** [म० वर+वाटणें ] **पु०** १ पाट्यावर चटणी इ० वाटण्यासाठीं योजतात तो दंडगोलाकृति दगड. २ मोटेची सोंड ज्या दंडगोल लाकडावरून वळून किं० सरकून हौदांत येऊन रिती होते तें लाकूड. ३ वायु इ० च्या बाधेनें पोट, पाय, इ० मध्यें येतो तो पेटका. ॐ **पाटावरवंटा फिरणें** क्रि०

**वरवंटा फिरणें** १ पूर्ण नासाडी होणें; उ० काशीनाथाला वाईट संगति लागली म्हणून त्याच्या विद्येवर वरवंटा फिरला. २ जरब, कडक शासनपद्धति, किं० शिरजोरपणाची वागवणूक कोणेकाला भोगावी लागणें.

**वरवड** स्त्री० टोकाला गांठी दिलेल्या वस्त्राच्या दशा; घोंगडी इ०स घालतात ती रेवड.

**वरवंड, वरवंडी** स्त्री० मागें 'वरंड,' 'वरंडी' पहा.

**वरवणी** [ म० वर (आकाशांतील)+पाणी ] न० सटवणीचा पाऊस. [ पहा.

**वरवा** पु० गलबताचा नांगर.मागें 'ओरवा'

**वरशिका, वरशीक** [ सं० वर्ष, वार्षिक ] एक प्रकारचा माठ,-ज्याला वर्षाच्या आंत बीं येत नाहीं.

**वरशीं, वरचीं** [ म० 'वरचें' चें अ० व०] न० अ० व० स्त्रीचे स्तन.'वरला'मध्यें 'वरलाशीं'

**वरसणें** अ० क्रि०वर्षणें. ॐ **वरसून चालणें** ( किं० जाणें ) अ० क्रि० ( नदी, तळें, ओढा, इ० )तुडुंब भरून कांठांवरून त्याचें पाणी बाहेर पडून वाहाणें.

**वरसल, वर्षल, वर्षेली** [ सं० वर्ष ] स्त्री० पुजारीपण, शेत, वतन, कांहीं उत्पन्न, इ० चा पाळीपाळीनें कोणेकाकडे येतो तो उपभोग.

**वरसाडा, वसाडा** [ सं० वर्ष ] पु० पाउस, कारंजें, इ० च्या पाण्याच्या थेंबाचा वर्षाव किं० तुषार (उडणें). मागें 'ओसाडा' पहा.

**वरसोल** [ म० वर+श्वास ] पु० जोराचा श्वासोच्छ्वास ( लागणें ). [ पहा.

**वरळा, वरळी** मागें 'रोवळा,' 'रोवळी'

**वरळें** न० तिसऱ्या खेपेचें खळ्यावर स्वच्छ केलेलें धान्य,-ज्यांत सालपटें आणि दाणे यांचें मिश्रण असतें आणि जें महाराला हक म्हणून द्यावें लागतें.

**वरळें** न० पुढें 'वरुळें' पहा.

**वरा** पु० मागें 'ओरा' पहा.

**वराई** स्त्री० १ सोन्याचें प्राचीन काळचें एक नाणें.२एक धान्यविशेष,-ज्याला 'वरी' म्हणतात.

**वराक** [ सं० ] वि० १ बापडा; बिचारा. २ दुर्दैवी; हतभाग्य. ३ नीच; क्षुद्र.

**वराट** [ सं० ] पु० १ दोरी. २ कवडी.

**वराटक** [ सं० ], पु०, न० १ कवडी. २ कमळाच्या बीजांचा वांदा; बीजकोष. ३ दोरी.

**वरांडा** पु० मागें 'वरंड,' 'वरंडा' पहा.

**वरात** [ सं० व्रात=लग्नाचें वऱ्हाड ] स्त्री० लग्नानंतर वधूसह वराचें आपल्या घरीं परत येण्याची मिरवणूक. ॐ **वरातीमागून घोडें** कांहीं काम करण्याला जरूर अशी सामग्री ते काम कसेंबसें होऊन गेल्यावर आपल्याला मिळणें.

**वराल्या, वराती** वि० १ केवळ वरातीच्या मिरवणुकींत शोभेसाठीं शृंगारून चालवावयाच्या लायकीचा पण कामाला निरुपयोगी असा(घोडा, माणूस, इ० ). २ नादान, कुच किमतीचा ( माणूस, जासूद, पदार्थ, इ० ).

**वरात** [ फा० ] स्त्री० मामलतदार इ०कांकडे यावयाचा जो पैशाचा भरणा त्याबद्दल त्यांचेवर सरकारांतून करतात ती चिठ्ठी. २ पैसे देण्याबद्दल कोणा अधिकाऱ्याकडे पाठविलेली चिठ्ठी. ॐ **वरातदार** पु० १ सरकारची वरात घेऊन मामलतदार इ० कांकडे वसूलाकरतां येतो जो शिपाई, स्वार, इ० तो. २ मामलतदार, खोत, इ० कांकडून कुळाकडे येतो जो तगाददार तो. **वाऱ्यावर वरात** जो मनुष्य व्यवस्थितपणें काम करील अशी आपली खात्री नाहीं त्याचेकडे काम सोपविणें ( हा मूर्खपणा होय ).

**वरात** [ सं० वरत्र=दोरी ] स्त्री० १ दोरी. २ पाळणा, झोपाळा, इ० टांगण्याची जाडी दोरी किं० सांखळी, गज, इ०. ३ किल्ला, गड, इ० वर चढावयासाठीं प्राचीन काळीं टोकाला आंकडा असलेल्या ज्या जाडी दोऱ्या तटावर दूरून फेकीत असत त्या प्रत्येक ( टाकणे ). ४ चामड्याची दोरी. ५ हत्तीचा किं० घोड्याचा तंग.

**वरान्न** [ सं० ] न० १ उत्तम अन्न. वरण,-भातावर घेण्याचें किं० तोंडीं लावण्याचें.

**वराम** न० गलबताचा मागला भाग.

**वराय, वरायी** स्त्री० मागें 'वराई' पहा.

**वरावर** [ सं० वर+वर ] स्त्री० लग्न जुळविणें, ठरविणें, इ० कामें समुच्चयानें.

**वरावर** [ म० वर+वर ] क्रि० वि० १ पाठोपाठ; ताबडतोब. २ झपाट्यानें.

**वरावर्द, वरावर्दी** [ फा० बर्‌आवर्द्=वर आणलेलें ] **स्त्री०** १ ( गणितांत ) गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी, त्रिराशिक, इ० करण्याची रीति, सरणी, किं० पद्धति. २ कमावीसदार इ० च्या खात्यांतील नोकरांचे दरमहाचे पगार, किरकोळ खर्च, इ० च्या हिशेबाचें पत्रक; मासिक हिशेबपत्रक. ३ अंदाज. ४ सरासरी. ५ गणती,–सामान्यतः.

**वराह** [ सं० ] पु० १ रानडुकर. २ डुकर सामान्यतः. ३ विष्णूच्या दहा अवतारांपैकीं तिसरा. ॐ **वराहक्रांता** स्त्री० लाजाळू ही वनस्पति. **वराहद्वादशी** स्त्री० माघ शुद्ध द्वादशी ही तिथि.

**वराळी** स्त्री० एक औषधोपयोगी पदार्थ.

**वरिष्ठ** [ सं० ] वि० श्रेष्ठ; उत्तम दर्जाचा किं० गुणाचा. पु० कचेरींतील किं० संस्थेतील वरचा अधिकारी.

**वरी** स्त्री० एक तृणधान्यविशेष.

**वरी** क्रि० वि०, श० यो० अ० वर(कवितेंत).

**वरीं, वर** [ सं० पर्यन्त ] श० यो० अ० पर्यंत; उ० आजवर, उद्यावर, खंडीवर.

**वरीयान्** [ सं० वरीयस्' च्या षष्ठीचें पुल्लिंगी ए० व० ] वि० अधिक वयाचा, योग्यतेचा, गुणाचा, किं० दर्जाचा. पु० सत्तावीस योगांतील अठरावा. [ तलेला.

**वरील** [ म० वर ] वि० वरचा; वर सांगि-

**वरीस (–ष)** [ सं० वर्ष ] न० वर्ष; साल ( बायकी रूढि ). ॐ **वरीस (–ष) खंड्या** पु० शेतकी इ० कामासाठीं वर्षाच्या ठरावानें किं० बोलीनें लाविलेला गडी किं० नोकर.

**वरुण** [ सं० ] पु० १ जलचरांचा राजा. २ जलाचा अधिपति देव. हाच पश्चिम दिशेचा अधिष्ठाता. ॐ **वरुणात्मज** पु० जमदग्नि. **वरुणा** स्त्री० मद्य. **वरुणालय** पु० समुद्र. **वरुणानी** स्त्री० जलाचा अधिपति जो वरुण त्याची पत्नी.

**वरुता, वरुतें** क्रि० वि०, श० यो० अ० ( कवितेंत ) वर.

**वरुलें** न० तिसऱ्या खेपेचे खळ्यावर स्वच्छ केलेलें धान्य. मागें ' वरलें ' पहा.

**वरू** [ म० वर ] स्त्री० १ उंची आणि रुचकर खाद्य. २ श्रेष्ठता. ३ बेगमी; वैपुल्य; बरकत. ४ मागें ' वरव ' सर्व अर्थीं पहा.

**वरूथ** [ सं० ] पु०, न० १ रथाचें कवच. २ चिलखत. ३ ढाल. ४ समूह. ५ सेना. ॐ **वरूथिनी** स्त्री० १ जमाव. २ सैन्य.

**वरून** [म० वर+ऊन ( प्रत्यय )] श० यो० अ० १ ऊर्ध्व भागापासून; उ० झाडावरून आंबा पडला. २ साधनानें, द्वारानें, प्रमाणानें; उ० मी तुला शब्दावरून ओळखिलें. ३ अनुसरून, आधारानें; उ० तूं सांगितल्यावरून मी त्याला भेटलों. ४ शेजारानें; शेजारून; लगत्यानें; उ० ती हेंड्याची मिरवणूक माझ्या दारावरून किं० घरावरून गेली. ५ विशिष्ट स्थान, हुद्दा, अधिकार, दर्जा, इ० पासून किं० नंतर; उ० त्यानें मामलतदारीवरून पेनशन घेतलें. ६ पृष्ठभागाच्या सांनिध्यानें किं० आधारानें; उ० पाण्यावरून तें लाकूड तरंगत तरंगत येऊन कांठाला लागलें. ७ अनेक आधारांवर अनेक ह्या क्रमानें; उ० पाटावरून जेवणारे बसले; उ० सर्व पानांवरून मी कोशिंबिरी आणि चटण्या वाढल्या.

**वरेकज** [ म० वर+काज ( कार्य ) ] स्त्री० लग्न जुळविणें किं० ह्या संबंधाची खटपट. ॐ **वरेकज्या** पु० लग्न जुळविण्याची खटपट करणारा; लग्नीनदलाल.

**वरेण** [ म० वरी+तण ( तृण ) ] न० वरी ह्या धान्याचीं ताटें समुच्चयानें. [ श्रेष्ठ.

**वरेण्य** [ सं० ] वि० १ वरण्यास योग्य. २ उत्तम;

**वरोटा** पु० विहिरी जवळचा पाण्याचा हौद.

**वरोंटा** [ म० वरवंटा ] पु० चटणी, पुरण, इ० पाट्यावर वाटण्याचा लांबोटा दगड. मागें ' वरवंटा ' पहा.

**वरोळा, वरोळी** मागें ' वरळा, '' वरळी ' पहा. मागें ' रोवळा, '' रोवळी ' पहा. [ बांध.

**वरोळी**[ म० रोवळी ] स्त्री० शेताच्या हद्दीचा

**वरोळें** न० मागें ' वरळें, '' वरुळें ' पहा.

**वर्कर** [ सं० ] पु० १ कोंकरूं. २ बोकड; बकरा. ३ पिल्लूं; तरुण पशु.

**वर्कस** मागें ' वरकस ' पहा.

**वर्ग** [ सं० ] पु० १ समुदाय, समूह. २ सजातीय वस्तूंचा समूह; उ० प्राणिवर्ग, वनस्पतिवर्ग. ४ एक विशिष्ट विषय शिकणारे, एका

विशिष्ट इयत्तेंत असणारे, एका विशिष्ट दर्जाचे जे विद्यार्थी ते समुच्चयानें. ५ कोणत्याही विशिष्ट तत्त्वावर केलेले जे समूह ते प्रत्येक. ६ग्रंथभाग. ७ ( गणित ) दोन समान संख्यांचा गुणाकार; उ० बाराचा वर्ग एकशे चव्वेचाळीस. ८ ( व्याकरण ) उत्पत्तिस्थानावरून अक्षरांचे केलेले समूह किं० गट जे ते प्रत्येक; उ० क वर्ग, च वर्ग, ट वर्ग, इ०. ◎ **वर्गपद, वर्गमूल** न० ज्या संख्येला तिनेंच गुणिलें असतां विशिष्ट संख्या येते ती संख्या; उ०पंचवीसाचें वर्गमूळ पांच. **वर्गघन** न० विशिष्ट संख्येच्या वर्गाला त्याच विशिष्टसंख्येच्या घनानें गुणून येतो तो गुणाकार; षड्घात. **वर्गावर्गी** स्त्री० १ कोणेकाला कोणेक ठिकाणावरून काढून दुसऱ्या ठिकाणीं नेमणें, त्याच्या रिकाम्या झालेल्या ठिकाणीं दुसऱ्यास नेमणें,ह्या दुसऱ्याच्या रिकाम्या झालेल्या ठिकाणीं तिसऱ्यास नेमणें, अशा प्रकारची जी नेमणुकांची परंपरा ती. २ पदार्थ, माणसें, इ० चे कांहीं विशिष्ट तत्त्वावर *वेगळे वेगळे वर्ग* किं०समुदाय ठरविणें. **वर्गीय** वि० विशिष्ट वर्गाचा; विशिष्ट समूहांतील;ज्याचा दर्जा ठरविण्यांत आला आहे असा. **वर्गित** वि० ज्या संख्येला त्याच संख्येनें गुणिलें आहे ती; उ०पांच ही संख्या वर्गित केली असतां पंचवीस ही संख्या उत्पन्न होते. **वर्गसमीकरण** न०ज्या समीकरणांत संख्येचा वर्ग समाविष्ट असतो असें समीकरण. **वर्ग आमद** [ अ० वर्ग ( सदर )+फा० आमद् ( आला ) ] वि० ह्या सदरांत आलेली किं० घातलेली कांहीं बाबत, रकम, इ०. **वर्ग रफत** [ अ० वर्ग ( सदर ) + रफ्त् ( गेली ) ] वि० दुसऱ्या सदरांत घातलेली कांहीं बाबत इ०. **वर्गी** [ सं० वर्गिन् ] पु० टोळीचा मुख्य किं० नायक.**वर्गीय, वर्गीण, वर्ग्य** [सं०]वि० (समासांतीं ) त्यांच वर्गांतील किं० समूहांतील; सहाध्यायी; जोडीदार; उ०एकवर्गीय,भिन्नवर्गीण,इ०.

**वर्गणी, वरगत** [अ०वर्ग]स्त्री० १समुदायावर जे देणें किं० घेणें बसतें त्याचा त्या समुदायांतील प्रत्येक व्यक्तीवर बसलेला अंश. २ वर्तमान पत्रें, नियत कालिकें, संस्था, इ० बद्दल जे ठराविक हप्त्यांनीं किं० एकदम देय द्यावें लागतें तें. **वर्गणीदार** पु० अर्थ १ ची वर्गणी ज्याचेवर बसली आहे तो. २ वर्तमानपत्र, मासिक, संस्था, इ०ना कांहीं ठराविक हप्त्यांनीं किं० एकदम कांहीं देय द्यावयाला जो बांधील झाला आहे तो.

**वर्चस, वर्चस्व** न०, **वर्चस्वता** स्त्री० [ सं० वर्चस्=तेज, कांति ] १ महत्त्व; श्रेष्ठपणा. २ अमल; अधिकार. ३ वरचढपणा. ◎ **वर्चस्वी** वि० वरचढ; श्रेष्ठ; करडा अमल चालविणारा.

**वर्ज** [ सं० ] वि० सोडलेला; त्यागिलेला; वगळलेला; नापसंत ठरविलेला; उ० खोकला आला असतां तेलकट पदार्थ वर्ज करावे. पु० त्याग; वगळणें.◎**वर्जादिवस, वर्जवार** पु०प्रवास इ० महत्त्वाच्या किं० जोखमीच्या किं० मंगल कृत्यास जो निषिद्ध दिवस तो.

**वर्जन**[सं०]न०टाकणें;सोडणें;वगळणें; टाळणें.

**वर्जनीय, वर्ज्य** [ सं० ] वि० टाळण्यास किं० वगळण्यास योग्य किं० जरूर असा.

**वर्जिणें, वर्जणें** [ सं० वर्ज्=सोडणें ] स० क्रि० टाळणें; सोडून देणें; वगळणें.

**वर्जित** [ सं० ] वि०१ सोडलेला; वगळलेला; टाकलेला.२ रहित; उ०गुणवर्जित म्ह०गुणरहित.

**वर्ण** [ सं० ] पु० १ रंग. २ कांति; सौंदर्य, रूप. ३ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, हे हिंदूंचे जे विभाग ते प्रत्येक. ४ जात; प्रकार. ५ अ, आ, इ० स्वर, आणि क, ख, इ० व्यंजनें, हीं अक्षरें प्रत्येक. ६ शब्द. ७ कीर्ति. ८ आकृति. ९ गीतक्रम; गाण्यांतील राग. १० ( गणित ) अव्यक्त राशि; उ० एकवर्णसमीकरण. ११ अंगाला लावतात तें उटणें. १२ तालविशेष. १३ कसोटीच्या दगडावर सोन्याची रेषा,-जीवरून त्या सोन्याचा दर्जा ठरविला जातो. १४ ( गणित ) गुणक संख्या. १५ व्रण ( अशिक्षितांत ). ◎ **वर्णचतुष्टय** न० ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या हिंदूंच्या चार जाति समुच्चयानें. **वर्णक्रम** पु० अ, आ, इ० अक्षरांचा अनुक्रम. **वर्णधर्म** पु० ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या हिंदूंच्या चार समूहांस स्मृतिकारांनीं लावून दिलेली त्या त्या समूहाचीं कर्तव्यें समुच्चयानें. **वर्णमाला** स्त्री० अ, आ, इ० स्वर आणि क, ख, इ० व्यंजनें, ह्या अक्षरांचा समुच्चय; मुळाक्षरें. **वर्णाक्षर**

वि० बहिष्कृत; जातींतून काढून टाकिलेला (मनुष्य). **वर्णसंकर** पु० १ जातींचें मिश्रण; सबगोलंकार. २ तांबडा, हिरवा, इ० रंगाचें मिश्रण (चित्रें, इ०मध्यें). **वर्णसंघात** पु० मुळाक्षरें. **वर्णाश्रम** पु० १ ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या हिंदूंच्या ज्या चार जाति त्यांपैकीं प्रत्येकाची स्मृतिकारांनीं लावून लावून दिलेली सरणी किं० राहाणी. २ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, ह्या ज्या चार अवस्था त्या प्रत्येक. **वर्णोच्चार** पु० वर्णांचा स्पष्ट उच्चार. **वर्णविपर्यास** पु० शब्दांतील एका अक्षराबद्दल दुसरें घालणें. **वर्णवृत्त, अक्षरवृत्त** न० ऱ्हस्व, दीर्घ, इ० अक्षरांच्या विशिष्ट संख्येनें आणि क्रमानें नियंत्रित असें वृत्त (शार्दूलविक्रीडीत इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें आर्या, साकी, इ० मात्रावृत्त.

**वर्णणें, वर्णिणें** [ सं० वर्ण ] स० क्रि० १ (पदार्थ इ० ची) माहिती सांगणें; निरूपिणें; निवेदिणें. २प्रशंसिणें; स्तविणें. ® **वर्णणूक** स्त्री० नावाजणी; स्तुति; प्रशंसा.

**वर्णन** न०, **वर्णना** स्त्री० [ सं० ] १ निवेदन; कथन; हकीगत. २ प्रसंशा; स्तुति; तारीफ.

**वर्णनीय, वर्ण्य** [सं०] वि०१वर्णावयास योग्य किं० जरूर. २ स्तुत्य; प्रशंसनीय. ३ वर्णन ज्याचें करावयाचें असा (पदार्थ, विषय).

**वर्णषष्ठी, वर्णसट** (-ठ) [ सं० वर्णा=तूर;+ षष्ठी;+म० सट, सठ (षष्ठी) ] स्त्री० श्रावण महिन्यांतील शुक्ल पक्षाची षष्ठी ही तिथि. ह्या तिथीस बायका ब्राह्मणाला तुरीची डाळ दान देतात.

**वर्णित** [ सं० ] वि० १ वर्णिलेला; सांगितलेला; निवेदिलेला. २ प्रशंसिलेला; स्तविलेला.

**वर्णिनी** स्त्री० १ स्त्री. २ ब्राम्हण, वैश्य, इ० जातीची स्त्री. ३ हळद.

**वर्णी** [ सं०वर्णिन् ] पु०१ चितारी. २लेखक. ३ ब्रह्मचारी. ® **वर्णिलिंगी** [ सं० वर्णिन्+ लिंगिन् ]पु०ब्रम्हचाऱ्याच सोंग घेतलेला माणूस.

**वर्णीक** [ म० वर्ण ] वि० ज्याचा रंग शुद्ध जातीचा नाहीं असें (रत्न).

**वर्तक** पु० १ गांवाचा एक वतनदार आधिकारी. २ हिंदूंचें एक आडनांव किं० त्या आडनांवाचा कोणीही माणूस. ® **वर्तकी** स्त्री० वर्तक ह्या गांवकामगाराचा हुद्दा, अधिकार, किं०कार्यक्षेत्र. **वर्तकी तपकीर** स्त्री० वर्तक ह्या आडनांवाच्या पुण्याच्या एका गृहस्थानें केलेली एक प्रकारची तपकीर.

**वर्तणूक** [ म० वर्तणें ] स्त्री० १ कोणेकाची वागण्याची तऱ्हा किं० सरणी. २नांदणें; राहाणें; निभावणूक; उ० त्या दुष्ट मामलतदाराच्या कारकीर्दींत ह्या गांवीं आमची वर्तणूक कठिण दिसते.

**वर्तणें** [ सं० वृत् ] अ० क्रि० १ वागणें. २ राहाणें. ३ विशिष्ट सरणीनें कोणेकानें वागणें किं० राहाणें. ४ घडून येणें; होणें; उ० त्या आश्रमांत काय वर्तलें तें मी विवेदितों, सावधान चित्ते श्रवण करा. ५(कायदा, नियम, सरणी) अमलांत किं० रूढ असणें; चालू असणें.

**वर्तन** [ सं० ] न० १ जगणें; असणें; राहाणें. २ कोणेकाची वागण्याची तऱ्हा किं० सरणी किं० त्याणें जें केलें तें. ३ उदरनिर्वाह. ४ चरितार्थाचें साधन; धंदा; उद्योग.

**वर्तमान** [ सं० ] वि० १ असणारा. २ जिवंत, रूढ, किं० चालू असलेला किं० घडत असलेला. ३ हल्लींचा (काळ). न० बातमी; खबर. ® **वर्तमान काळ** पु० हल्लीं चालू असलेला काळ. **वर्तमानपत्र** न० ठिकठिकाणीं किं० विशिष्ट ठिकाणीं घडत असलेल्या गोष्टींचें नियमित किं० ठराविक दिवशीं निवेदन करण्यासाठीं छापिलेला कागद.

**वर्तवळा** इ० मागें ' वरतवळा ' इ० पहा.

**वर्तावणें** [ म० 'वर्तणें'चें प्रयोजक ] स० क्रि० १ ग्रहादींच्या स्थितीवरून आणि गमनकाळावरून गणित करून (ग्रहणें, संक्रांति, व्यतिपात, इ० ज्योतिषविषयक गोष्टी अगोदर) ठरविणें किं० ठरवून सांगणें. २ (कोणत्याही गोष्टीचा काय परिणाम ) होईल तो तर्कानें ठरविणें किं० ठरवून सांगणें.

**वार्ति, वर्ती, वार्तिका** [ सं० ] स्त्री० १

दिव्याची वात. २ जखमेंतील रक्त, पू, इ० शोषून घेण्यासाठीं आंत घातलेली चिंधी, कापसाची वळकटी, इ०. ३ रंगारी किं० चितारी यांचा कुंचा. ४ डोळ्यांत घालावयाचें जें अंजन तें, किंवा तें अंजन घालण्याची काडी किं० सळई.

**वर्तुल, वर्तुळ** [ सं० वर्तुल ] वि० वाटोळें. न० ज्या आकृतीची मर्यादारेषा एकाच वक्रदिशेची असते आणि ह्या वक्ररेषेवरील कोणताही बिंदु मध्यबिंदूपासून सारख्याच अंतरावर असतो ती आकृति. ❀ **वर्तुलपाद** पु० न० वर्तुळाचा चवथा भाग. **वर्तुलाकार** वि० वाटोळा; गोल. पु० १ नासधूस; विध्वंस; नासाडी; सत्यानास. २ अत्यन्त हीन,दीन, किं० दारिद्रीपणाची स्थिति.

**वर्तोळा** पु० मागें ' वरताळा ' पहा.

**वर्त्म** [ सं० वर्त्मन् ] न० १ रस्ता. २ वर्तनाची सरणी. ३ डोळ्याची पापणी. ❀ **वर्त्मावबंध** पु० डोळ्याच्या पापण्या सहज मिटतां न येणें ही विकृति.

**वर्दोवर्द, वर्दोवर्दी** [ फा० वर् आवर्द् ] स्त्री० १ अंदाज; हिशेब; गणना. मागें ' वरावर्द ' पहा. २ देणें, घेणें, जमा, खर्च, नफा, तोटा, इ० ची बरोबरी म्ह० जितक्यास तितका पदार्थ, व्यवहार, इ०. ३ आज मिळवावें आणि आज खावें अशा सरणीचा चरितार्थ, संसार, किं० प्रपंच. ४ ज्याचें त्यास देणें, जिकडचें तिकडे पोचविणें, इ० रूप कामाची विल्हेवाट किं० निरवानिरव.

**वर्धक** [ सं० ] वि० वृद्धिकारक; वाढविणारा; उ० केशवर्धक तेल.

**वर्धकी** [ सं० ] स्त्री० वेश्या; जारिणी.

**वर्धणें** [ सं० वृध् ] अ० क्रि० १ वाढणें. २ भरभराटीस येणें; वैभवास चढणें.

**वर्धन** [ सं० ] न० १ वाढ; वाढण्याची क्रिया. २ भरभराट; अभ्युदय; वैभव. ३ वाढविणें. ४ पौष्टिक औषध. ५ समृद्धि; वैपुल्य.

**वर्धनी** [ सं० ] स्त्री० केरसुणी. कोकणांत केरसुणीला ' वाढवण ' म्हणतात.

**वर्धनीय** [ सं० ] वि० १ वाढवितां येण्याजोगा; वाढण्याची पात्रता ज्याच्या अंगीं आहे सा ( सोनें, इ० धातु, झाड, प्राणी, इ० ). २ वैभवास चढण्याची लायकी ज्याचे अंगीं आहे असा ( माणूस इ० ).

**वर्धमान** [ सं० ] वि० वाढता; वाढणारा; उत्तरोत्तर वाढत जात असलेला. ❀ **वर्धमान पिंपळी** स्त्री० पहिल्या दिवशीं एक भाग, दुसऱ्या दिवशीं दोन भाग, तिसऱ्या दिवशीं तीन भाग, अशा प्रकारें कांहीं दिवस चढवून तशाच क्रमानें उतरीत आणावी अशी औषधरूपें सेवितात ती पिंपळी.

**वर्धमानक** [ सं० ] पु० हात, डोकें, इ० वर समई, मांडे इ० घेऊन नाचणारा.

**वर्धापन** [ सं० ] न० १ कापणें ही क्रिया. २ नाळ कापणें हा संस्कार. ३ वाढदिवस.

**वर्धावणें** [ सं० वर्धापन ] स० क्रि० कांहीं कार्यार्थ ( पोरें इ० कांस ) खुलविणें.

**वर्धावा** पु० १ नवऱ्या मुलीचा भाऊ किं० त्याच्या बदली जो दुसरा कोणी माणूस घोड्यावर बसून समारंभपूर्वक वरास आणावयास जातो तो. २ नवरा मुलगा. मागें ' वरधावा ' पहा.

**वर्धित** [ सं० ] वि० वाढलेला; वाढविलेला.

**वर्धिष्णु** [ सं० ] वि० वाढणारा; वाढीस लागलेला; उ० हिंदूंच्या वर्धिष्णु आकांक्षांना पूर्ण अवसर देणारीच शासनपद्धति हिंदूंना पटेल.

**वर्म** [ सं० वर्मन् ] न० १ चिलखत. २ आश्रय; चिलखताप्रमाणें रक्षिणारा माणूस. ३ क्षत्रियाच्या नांवापुढें बहुमानार्थक लावावयाचा शब्द; उ० रविवर्मा, प्रहारवर्मा, इ०. ❀ **कोणेकाचीं वर्मेंचर्में छेदणें** त्याच्या नाजुक मार्गीं क्लेश होण्याइतकें त्याला शस्त्रांनीं बोचणें किं० शब्दांनीं ताडन करणें.

**वर्म** [ अ० ] न० १ दुखरा किं० नाजुक भाग,–जेथें यत्किंचित् इजा झाली असतां परम वेदना होते. २ शरीर, मन, यंत्र, संस्था, इ० चा नाजूक भाग,–ज्यावर प्रहार झाला असतां किं० ज्यांत कांहीं बिघाड झाला असतां तो त्या सर्व वस्तूस अपायकारक किं० दुःखदायक होतो. ३ कोणेकाचें रहस्य,–जें उघडकीस आलें असतां तो शरमतो किं० खजिल होतो किं० इतबल होतो. ❀ **वर्मी** वि० १ वर्मास म्ह० नाजूक

भागास बोचणारा किं० वेधणारा किं० दुःख देणारा ( शब्द, घाव, इ० ). २ कोणेकाचीं वर्मे किं० रहस्यें किं० लाजिरवाणीं कृत्यें किं० गुण जाणत असलेला ( माणूस ). ३ कोणतीही कला, शास्त्र, यंत्र, इ० चीं रहस्यें किं० खुब्या ज्याला ठाऊक आहेत असा. ४ ग्रंथ, भाषण, इ०चा गूढार्थ जाणणारा किं० हुडकून काढणारा. ५ ज्यांचे ठायीं कोणत्याही प्रकारचा उणेपणा आहे किं० लाजिरवाणे गुण आहेत असा. **वर्मकर्में** न० अ० व० नाजूक भाग; लाजिरवाण्या गोष्टी.

**वर्मणें** मागें ' वरमणें ' पहा.

**वर्य** [ सं० ] वि० उत्तम; श्रेष्ठ; प्रधान; उ० गुरुवर्य, मुनिवर्य.

**वर्ष** [ सं० ] न०, पु० १ पाऊस. २ वर्षाव; वृष्टि. ३ शिंपडणें. ४ बारा महिन्यांचा अवधि. **टीप**,–मराठींत अर्थ ४ हा न० शब्द म्हणून योजिल्यांत येतो. ५ द्वीपाचा पोटविभाग. ६ जंबुद्वीप. ⊛ **वर्षोपल** पु० पावसांत पडतात त्या पाण्याच्या गोट्या प्रत्येक; गार. **वर्षकाल** पु० पावसाळा. **वर्षधर, वर्षवर** पु० खोजा; नपुंसक. **वर्षपर्वत** पु० खंडाच्या सीमेवरचा पर्वत. हे सात आहेत. हिमवान्, हेमकूट, निषद, शृंगवान्, नील, माल्यवान्, आणि गंधमादन. **वर्षवृद्धि** स्त्री० वाढदिवस. **वर्षगांठ** स्त्री० वाढदिवस. **वर्षघात, वर्षधात** स्त्री० १ कोणत्याही विशिष्ट कामाला मंगल किं० शुभ जो समय तो (संभाळणें, जपणें). २ इष्ट किं० अनिष्ट ह्या रूपाचें फळ देणारी जी वर्षरूप कालाची गति ती. **वर्षप्रतिपदा** स्त्री० चैत्र शुद्ध प्रतिपदा; गुढीचा पाडवा. **वर्षफल** न० टोळधाड, अतिवृष्टि, अनावृष्टि, सुभिक्ष, दुर्भिक्ष, राजभय, अग्निभय, चोरभय, इ० त्या वर्षीं घडतील असें ज्योतिषी जें गणितावरून भाकीत करून गुढीपाडव्याच्या दिवशीं सांगतो तें. **वर्षर्तु** पु० पावसाळा,–श्रावण आणि भाद्रपद ह्या दोन महिन्यांचा अवधि. **वर्षल** स्त्री० वतन इ० च्या उपभोगाचें कोणेकाकडे पाळीनें येतें तें वर्ष. **वर्षवीण** वि० वर्षांनें विणारी ( गाय किं० म्हैस. **वर्षवृद्धि** स्त्री० गुरु हा ग्रह एकाच राशींत ज्या वर्षीं असतो तें वर्ष. **वर्षसण** पु० लग्नानंतर एका वर्षानें जांवयाला जें भोजन, पागोटें, इ० देतात तें देण्याचा समारंभ. **वर्षाचा दिवस** पु० १ वाढदिवस. २ सणाचा दिवस,– जो वर्षांतून एकदाच येतो. **वर्षादिसाचा दिवस** पु० वाढदिवस. **वर्षानवर्ष, वर्षानुवर्ष** क्रि० वि० १ दर वर्षीं; प्रत्येक वर्षीं. २ अनेक वर्षेंपर्यंत सतत किं० अखंड; अनेक वर्षेंपर्यंत. **वर्षासन** [ सं० वर्ष+अशन ( खाणें ) ] न० कोणेकाला वर्षभर खावयाला किं० भोगावयाला पुरेल इतकी राजादिकांनीं कोणेकास करून दिलेली द्रव्य, धान्य, इ० ची नेमणूक.– जी दर वर्षी अखंड क्रमानें द्यावयाचें ठरलेलें असतें 'वर्षासन' हा मराठी अपभ्रंश. **वर्षोगणती** क्रि० वि० अनेक वर्षांच्या अवधिनें मोजण्याइतक्या काळपर्यंत. स्त्री० अनेक वर्षांची गणती. **वर्षोन्वर्ष** क्रि० वि० १ सतत किं० अनेक वर्षांच्या अवधीनें मोजण्याइतक्या परिमाणांत किं० परिमाणानें; सतत अनेक वर्षेंपर्यंत. २ दरवर्षी.

**वर्षण** [ सं० ] न० १ वृष्टि; वर्षाव. २ पाऊस.

**वर्षणें** [ सं० वृष्=वृष्टि करणें ] अ० क्रि० ( ढगांतून किं० आकाशांतून पाणी ) धारांच्या रूपानें पडणें; ( पाऊस ) पडणें. स० क्रि० कोणेकावर ( बाण, अग्नि, देणग्या, शिव्या, इ० ची) वृष्टि करणें.

**वर्षा** [ सं० ] स्त्री० १ पावसाळा. ⊛ **वर्षाभू** पु० बेडूक. **वर्षाऋतु** पु० पावसाळा.

**वर्षाव** [ सं० वृष ] पु० १ वृष्टि. २ (लाक्षणिक ) देणग्या, शिव्या, पदव्या, इ० वैपुल्यानें किं० पुष्कळ प्रमाणांत देणें.

**वार्षित** [ सं० ] न० पाऊस. वि० वर्षलेला ( पाऊस ); दिलेली ( देणगी ).

**वर्सल** मागें ' वर्ष ' मध्यें ' वर्षल ' पहा.

**वऱ्हा** पु० उसाचा रस निववण्यासाठीं ज्यांत ओतितात तो खळगा.

**वऱ्हाड** न० १ लग्नाची मिरवणूक. २ लग्नाच्या समारंभांत वधू, वर, त्यांच्या पक्षांची बायका पुरुष, स्नेही, इ० मंडळी समुच्चयानें. ३ मुंग्यांची रांग. ४ गायी, म्हशी, इ० नीं सकाळीं माणसांची विष्ठा, उष्टें, इ० खाण्यासाठीं भटकणें ( करणें ) किं० त्यांचें हें भक्षण. मागें 'हरड' पहा. ५ बदमाषपणाची भटकणी; विषयासक्तीची कालक्रमणा,

॥ वऱ्हाडगोष्टी स्त्री० अ० व० १ कोणेका मुलाचें लग्न जुळविण्यासाठीं मुलीच्या बापाजवळ जी बाटाघाट केली जाते ती; मुलाला अनुकूल अशा गोष्टी ज्या मुलीच्या बापाला सांगितल्या जातात त्या,-त्याणें आपली मुलगी द्यावयास कबूल व्हावें म्हणून. २ पोकळ बढाई किं० प्रौढी. वऱ्हाडघर न० ज्या घरांत लग्न व्हावयाचें आहे किं० होत आहे तें घर. वऱ्हाडीण स्त्री० लग्नासाठीं जमलेल्या ज्या स्त्रिया त्या प्रत्येक. वऱ्हाडणी स्त्री० अ० व० लग्नासाठीं जमा झालेल्या स्त्रिया. वऱ्हाडी वि० १ लग्नासाठीं आलेला (मनुष्य), किं० आणलेलें (कापड). २ लग्नाच्या समारंभांत साजेसा (दागिना, वस्त्र, इ०). ३ विष्टा खाण्यासाठीं सकाळीं भटकणारीं (गाय, म्हैस, इ०).

वऱ्हाडणें [ म० वऱ्हाड ] अ० क्रि० १ (वधू आणि वर यांचें) लग्न होणें; (वरानें वधूशीं किं० वधूनें वराशीं) लग्नाच्या विधीनें जुळणें किं० संबध्द होणें. २ कोणत्याही करमणुकींत किं० कामांत गढून जाणें किं० निमग्न होणें.

वळवरणें अ० क्रि० (डोईचे केश, सामानसुमान, इ०) अस्ताव्यस्तपणें पसरलेलें असणें.

वलद, वल्लद [ अ० वलद्=पुत्र ] पु० (कोणेकाचा) पुत्र. टीप,-कोणा माणसाचें नांव सांगून पुढें 'वलद,' 'वल्लद,' हा शब्द घालून पुढें बापाचें नांव सांगतात; उ० सुरज वल्लद बापू जोशी ह्म० बापू जोशाचा पुत्र सुरज.

वलन [ सं० ] न० १ वळणें; बाजूस सरणें. २ कांपणें; हालणें. ३ चित्तक्षोभ.

वलभि, वलभी [ सं० ] स्त्री० १ छपर; पाखें. २ घराची गच्ची; स्ज्जा. ३ ओंवण. ४ वांसा.

वलय [ सं० ] पु०, न० १ कडें; पोंची; बाजूं. २ वर्तुळ. ३ कंबरपट्टा. ॥ वलयित वि० वेष्टिलेलें. समुद्रवलयांकित वि० समुद्ररूपी कंबरपट्ट्यानें वेष्टिलेली (पृथ्वी).

वलवणें, वल्हावणें, वल्हयणें [ म० वल्हें ] स० क्रि० १ वल्ह्यांनीं (होडी, गलबत, इ०) पाण्यांतून चालविणें. २ (काम, कारभार सस्था, कुटुंब, प्रेटणें किं० चालविणें.

वलाट न०, वलाटी (-ठी) स्त्री० [ म० वर+ठाय ] समुद्राच्या किनाऱ्यापासून सह्याद्रीपर्यंतचा चढता जमीनीचा पट्टा.

वलावा पु० कोणेकाचा लवाजमा किं० त्याच्या संबंधाचा खर्च.

वली, वल्ली [ अ० वली ] पु० १ साधुपुरुष. २ वेडसर किं० विक्षिप्त माणूस; वेडापीर.

वलें, वल्हें न० होडी, गलबत, इ० पाण्यांतून चालविण्याचें साधनविशेष. ॥ वल्हेकरी, वलेंकरी पु० वल्हें मारणारा माणूस.

* वल्कल [ सं० ] पु०, न० झाडाची साल किं० सालीचें केलेलें वस्त्र.

वल्ग पु०, वल्गा स्त्री० घोड्याच्या तोंडांत घालतात तो लगाम.

वल्गना [ सं० ] स्त्री० बढाई; बडबड.

वल्गु [ सं० ] वि० मोहक; सुंदर.

वल्मिक, वाल्मीक [ सं० ] पु० मुंग्यांचें वारूळ.

वल्मीक पु०, न० मान, खाक, सांधा, इ० ठिकाणीं गांठी येणें हा रोग.

वल्लकी [ सं० ] स्त्री० वीणा हें वाद्य.

वल्लद मागें 'वलद' पहा.

वल्लभ [ सं० ] वि० प्रिय; आवडता, लाडका. पु० १ नवरा. २ जार. ३ प्रिय माणूस. वल्लभा स्त्री० १ पत्नी. २ कोणीही प्रिय किं० आवडती स्त्री.

वल्ली [ सं० ] स्त्री० वेली; वेल.

वल्हविणें [ म० वल्हें ] स० क्रि० वल्हें ह्या साधनानें (होडी, गलबत, इ०) पाण्यांतून चालविणें.

वल्हा पु०, वल्हें न० गलबत, होडी, इ० पाण्यांतून चालविण्याचें आकारविशेषाचें साधन.

वल्हा, वल्हे, वल्ले, वल्हेवल्हे [ कानडी ] उ० वा० अ० शाबास! भलेशाशी! वेश!

वल्ही [ अ० ] पु० साधुपुरुष. मागें 'वली' पहा.

वर्वंडा, वर्वंडेकरी, वंवणें, वंवर, वंवरा, इ०

मागें ' ओवंडा, ' ' ओवंडेकरी, ' ' ओंवणें, ' ' ओंवर, ' ' ओंवरा, ' इ० पहा.

**ववर** [ सं० वधूवर ] न० नूतन विवाहित वधूवरें; वधू आणि वर हें जोडपें. मागें ' ओवर ' पहा.

**ववाळणें, ववाळणी** मागें ' ओवाळणें, ' ' ओवाळणी ' पहा.

**वश** [ सं० ] वि० १ ताब्यांतला. २ आज्ञाधारक. ३ नम्र. ४ कोणत्याही गोष्टीनें आकृष्ट झालेला; मोहित. ५ ग्रस्त; पीडिलेला; उपद्रुत; उ० शोकग्रस्त, दुःखग्रस्त, व्याधिग्रस्त. पु०, न० ताबा; अमल; कबजा; उ० दैववश. ❀ **वशी** वि० ज्याणें मनोविकार ताब्यांत ठेविले आहेत असा. **वशंवद** वि० आज्ञाधारक; नम्र. **दैववशात्** [ सं० ] क्रि० वि० दैवानें; दैवगतीनें; कर्मधर्मसंयोगानें. **वशक्रिया** स्त्री० मंत्रतंत्र,जादू, इ० नीं कोणेकाला आपल्या ताब्यांत आणणें.

**वंश** [ सं० ] पु० १ चिवा; वांबू; कळक. २ पांवा; मुरली. ३ कुळ; कुटुंब. ४ वर्ग; समूह. ५ घराचें आढें. ६ पाठीचा कणा. ७ वंशलोचन. ८ संतति. ❀ **वंशावळ** स्त्री० कुळांत जन्मलेल्यांची यादी. **वंशानुक्रम** पु० वंशावळ. **वंशागत** वि० वडिलोपार्जित. **वंशज** वि० कुळांत उत्पन्न झालेला. **वंशच्छेद** पु० १ कुळाचा नाश; वंश खुंटणें. २ बांबूंची तोड. **वंशपरंपरायात, वंशपरंपरागत** वि० वंशाच्या मागल्या प्रत्येक पिढींत चालून आपणापर्यंत आलेलें ( घर, वतन, हक्क, वृत्ति, इ० ). **वंशलोचन, वंशक्षीर,** न०, **वंशरोचना, वंशक्षीरी** स्त्री० बांबूच्या पोटांत उत्पन्न होतो तो एक पांढरा पदार्थ. हा पदार्थ औषधाच्या उपयोगाचा असतो. **वंशपात्र** न० बांबूच्या पाती विणून केलेलें पात्र,–रोवळी, टोपली, करंडी, हारा, इ०. **वंशीक** वि० वंशपरंपरेनें चालत आलेलें ( वतन, हक्क, इ० ). **वंशीय, वंशी** वि० विशिष्ट वंशांतील ( समासांत); उ० सूर्यवंशी, चंद्रवंशी. **सूर्यवंशी** वि० सूर्य उगवल्यानंतर निजून उठणारा. **वंशी** वि० बांबूचें केलेलें.

**वशट** वि० मागें ' ओशट ' पहा. न० मांसाचें खाद्य.

**वशा** [ सं० वंश ] पु० आपल्या शेताची नांगरणी, मशागत, लावणी, कापणी, इ० शेतकीचीं कामें करावयासाठीं नेमलेला जो प्रत्यक्ष शेत करणारा त्याच्यावर देखरेख करावयासाठीं नेमिलेला मनुष्य.

**वशारणें** न० विणावयासाठीं मागावर घातलेले धागे समुच्चयानें; ताणा.

**वशिंड (-ढ)** [ सं० वृषस्कंध ] न० बैलाच्या पाठीवर मानेजवळ असतो तो मांसाचा उंचवटा.

**वशिता** स्त्री०, **वशित्व** न० [ सं० ] १ ताबा. २ मोहित करणें. ३ अणिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, महिमा, ईशिता, वशिता, कामावसायिता, ह्या ज्या अष्टसिद्धि त्यांपैकीं एक. वशिता ह्या सिद्धीनें हव्या त्या माणसाला वश करून घेतां येतें.

**वशिला** [ अ० वसीलाह् ] पु० आपल्यासाठीं जो आपल्या संबंधानें तरफदारी करील, आपलें काम पुढें रेटील, आपल्याबद्दल मींड खर्च करील, असा मनुष्य; वग; आधार; टेका.

**वशिष्ठ, वसिष्ठ** [ सं० ] पु० १ एक तपस्वी. हा सूर्यवंशींच्या राजांचा कुलगुरु होता. २ ( लाक्षणिक ) धर्मकर्में यथासांग आणि शास्त्रोक्त रीतीनें करणारा ( माणूस, उपाध्या ). ❀ **वशिष्ठ वामदेव** पु० ए० व० विचारवंत आणि व्यवहारज्ञ असा माणूस.

**वशीं, वशींड** न० बैलाच्या मानेजवळ पाठीवर असतो तो मांसाचा उंचवटा; वशिंढ.

**वशोळी** [ म० वसा=व्रत, नेम ] स्त्री० कांहीं व्रत किं० नियम जिणें धरला आहे अशी स्त्री. खालीं ' वसा ' मध्यें पहा.

**वश्य** [ सं० ] वि० १ वश होण्याजोगें. २ वश केलेलें; स्वाधीन. पु० सेवक; नोकर.

**वसकणें** अ० क्रि० कोणेकाच्या अंगावर एकदम रागानें ओरडणें; उ० तो माझ्या अंगावर उगीचच्या उगीच वसकला.

**वसंड** [ सं० वृषस्कंध ] न० बैलाचें वशिंड. मागें ' वशिंड ' पहा.

**वसण** न० १ पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला गाळ किं० केरकचरा. २ बैलाच्या नाकांत असते ती वेसण. पुढें ' वेसण ' पहा

**वसणवणें, वसणावणें, वसणणें** अ० क्रि० झोपेंत किं० तापाच्या लहरींत बडबडणें.

**वसणें** [ सं० वस् ] अ० क्रि० १ कोणेक स्थळीं राहाणें किं० वास करणें किं० असणें. २ ( शहर, गांव, किं० भूमीचा प्रदेश ) माणसांच्या वसतीनें व्यापला जाणें किं० गजबजलेला असणें.

**वसणें** [ म० वसा=व्रत ] स० क्रि० ( व्रत, नियम ) आचरणें; उ० मुलींना मंगळागौर लग्नानंतर पांच वर्षें वसावयाची असते.

**वसंत** [ सं० ] पु० १ चैत्र आणि वैशाख ह्या दोन महिन्यांचा अवधि;किं० मीन आणि मेष ह्या दोन संक्रांति मिळून जो दोन महिन्यांचा अवधि तो.२( संगीत ) एक राग.३( वैद्यक ) मालिनीवसंत हें औषध. ◈ **वसंतोत्सव** पु० होळीचा उत्सव. **वसंतपंचमी** माघ शुद्ध पंचमी ही तिथि.**वसंतपूजा** स्त्री० वसंतऋतूंत ब्राह्मणांना आपल्या घरीं बोलावून त्यांचेकडून मंत्र म्हणवून घेऊन त्यांना आंब्याचा रस, पन्हें, इ० प्यावयास देतात,त्यांना चंदनाची उटी लावितात,पंखे बक्षीस देतात, दक्षिणा देतात, हा जो समारंभ तो. **वसंतमाधव** पु० श्रीविष्णु,-वसंतऋतूची देवता. **वसंताचें बोलणें** न० १ टाळाटाळीचें उत्तर. २ कोणेकाला वश करून घेण्यासाठीं त्याच्याशीं केलेलें गोड गोड भाषण. **वसंततिलका** स्त्री० एक अक्षरगणवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत त, भ, ज, ज, हे गण असून शेवटीं दोन गुरु अक्षरें असतात.

**वसतकरू** [ म० वसति+करणें ] पु० कांहीं काळापुरता कोणेक स्थळीं राहावयाला आलेला किं० राहिलेला मनुष्य.

**वसंतरा** [ सं० वंश ] स्त्री० वंश, संतति ( अशिक्षितांत ).

**वसता** [ म० वसणें ] वि० व्यापिलेला;ज्यांत वसति करण्यांत आली आहे असा ( देश, गांव, इ० ). पु० १ वाटसरू. २ रहदारीचा रस्ता.

**वसति, वसती** [ सं० ] स्त्री० १ राहाणें; निवास करणें. २ वासस्थान; घर. ३ आधार; आश्रयाची जागा. ४ सैन्य, यात्रेकरू, इ० चा तळ किं० मुक्काम किं० मुक्कामाची जागा.

**वसति** [ सं० वस्=राहाणें ] स्त्री० १ राहाणें. २ एकाद्या ठिकाणीं राहिलेले लोक समुच्चयानें; उ० येथें सारी शेतकऱ्यांची वसति आहे. ३ राहाण्याचें ठिकाण. ◈ **वसतिगृह** न० जेथें प्रवासी, सडे लोक, इ०ची पैसे घेऊन भोजनाची आणि रात्रीच्या निजण्याची सोय केली जाते असें घर.

**वसन** [ सं० वस्=राहाणें ] न० १ राहाणें; वसति करणें. २ घर. [ सं० वस्=पेहेरणें ] न० १ पोशाख; कपडे धारण करणें. २ वस्त्र,-धोतर, लुगडें, इ०.

**वसला** पु० १ जमीनीची मोजणी करतेसमयीं सोयीसाठीं जमीनीचे जे तुकडे करतात किं० कल्पितात ते प्रत्येक.२कोणत्याही क्षेत्राचे तुकडे प्रत्येक. ३ वस्त्राचे फाटून निघालेले किं० फाडून काढलेले तुकडे प्रत्येक.ह्या अर्थी प्रयोग बहुधा अ०व०होतो. ◈ **कोणेकाचे वसले काढणें** त्याची भोसडपट्टी किं० खरडपट्टी काढणें. **एकाद्या सूचनेचे वसले काढणें** ती मूर्खपणाची आहे असें सिद्ध करून देणें; तिच्यावर हरएक प्रकारचे आक्षेप काढणें.

**वसलात (-द )** [ अ० वस्ल ] स्त्री० एकाद्या कुटुंबांत वंशपरंपरेनें चालत आलेला जो गुण, धर्म, स्वभाव, रोग, इ० तो.

**वसली, वसल्या** [ म० वसूल ] वि० १ वसूल करण्याच्या कामावर नेमिलेला ( कारकून, नोकर, इ० ). २ वसूलासंबंधाचा ( खर्डा, कागद, हिशेब, इ० ).

**वसवटा** [ म० वसणें ] पु० १ वास्तव्य. २ वसतीची जागा किं० घर.

**वसवस, वसवसां** क्रि० वि० ओरडून किं० चरफडून ( बोलणें, रागें भरणें, इ० ).

**वसवसणें** अ० क्रि० कोणेकाच्या अंगावर रागानें ओरडणें, चरफडणें, किं० तोंड टाकणें.

**वसवसा, वस्वास, वस्वसा** [ अ० वस्वास्, वसवसाह् ] पु० १ कोणेकाविषयीं कोणेकाला वाटते ती भीति;धाक;दरारा.२कांहीं कारणामुळें मनाला लागते ती टोचणी; हुरहुर; काळजी. ३ कल्पना; तर्क. ४ शंका; संशय; अंदेशा. ◈ **वस्वासी, वस्वसी, वसवशी** वि० संशयी; शंकाखोर.

**वसवा** पु० १ सावली; छाया. २ अंधेर;

काळोख. ३ जिव्यापासून लिहिणें, वाचणें, इ० कामाला हरकत होते अशी परिस्थिति.

**वसविणें** [ म० 'वसणें' चें प्रयोजक ] **स० क्रि०** लोकांना ( एकाद्या स्थळीं ) घरें बांधून रहावयास सांगणें; उ० येथें पूर्वी रान होतें, पेशव्यांनीं हा प्रदेश वसविला; उ० रास्त्यांनीं ही पेठ वसविली.

**वसवी स्त्री०, वसवें न०** जांत्याचा खुंटा, कोयत्याची मूठ, मुसळ, इ० च्या टोकाला जें लोखंडाचें वळें बसवितात तें.

**वसहत, वसहात, वसात, वसाद, वसाहत** [ अ० वस् अत् ] **स्त्री०** कोणेक ठिकाणीं जुटीनें किं० शेजारपणानें राहिलेले लोक ( किं० प्राणी ) समुच्चयानें किं० तें ठिकाण.

**वंसा, वसा पु०** स्त्रीनें केलेलें किं० करावयाचें म्हणून ठरविलेलें कांहीं व्रत,नियम,इ०( घेणें,पार पडणें ). ꣸ **वसाळी, वशेळी स्त्री०** कांहीं व्रत आचरीत असलेली स्त्री.

**वसा** [ सं० ] **स्त्री०** १ चरबी. २ मगज; मेंदू.

**वसाडा पु०** मागें 'ओसाडा' पहा.

**वसात (-द )** वर 'वसहत' पहा.

**वसार** मागें दोन्ही अर्थी 'ओसर' पहा.

**वसाहत** मागें 'वसहत' पहा.

**वसाळी** मागें 'वंसा' मध्यें पहा.

**वसु** [ सं० ] **पु०** देवताविशेष. आप, ध्रुव, सोम, धर ( किं० धव ), अनिल, अनल, प्रत्यूष, आणि प्रभास, हे आठ वसु गणिलेले आहेत. न० द्रव्य; संपत्ति. ꣸ **वसुदा स्त्री०** पृथ्वी. **वसुदेवता स्त्री०** ( ज्योतिष ) धनिष्ठा. **वसुधा, वसुंधरा स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन. **वसुमती स्त्री०** पृथ्वी. **वसुश्रेष्ठ न०** १ सोनें. २ रुपें. **वसुबारस स्त्री०** आश्विन वद्य द्वादशी. ह्या दिवशीं गाय आणि वासरूं यांची पूजा बायका करतात.

**वसुजणें** [ म० अव+सुजणें ] **अ० क्रि०** ( गळूं, सूज, इ० ) ओसरणें, दबणें, किं० बसणें.

**वसुली** [ म० वसूल ] **वि०** १ वसुलासंबंधाचें. २ पुष्कळ नफा, उत्पन्न, किं० लाभ देणारा (गांव, शेत, धंदा, इ० ). ३ वसूल करावयाच्या कामावर नेमिलेला ( गडी, कारकून, इ० ). ꣸ **वसुली गल्ला पु०** धान्याच्या रूपांत आलेला सारा किं० शेताचा वसूल. **वसुली जमा स्त्री०** प्रत्यक्ष मिळालेला किं० वसूल झालेला शेतसारा ( 'आकारजमा' च्या व्यावर्तकत्वें ). **वसुली बेरीज स्त्री०** बाद करावयाचे भाग बाद केल्यावर जी प्रत्यक्ष जमा होते ती.

**वसुसर्ग** [ सं० वृषोत्सर्ग ] **पु०** मृत माणसाची प्रेतावस्थेंतून मुक्तता व्हावी म्हणून त्याच्या पहिल्या श्राद्धाच्या दिवशीं पोळ किं० सवत्स धेनु यांचा उत्सर्ग ( म्ह० सोडून देणें ) हा विधि.

**वसू** [ सं० वृष=बैल ] **पु०** ढुंगणावर तापलेल्या लोखंडानें डाग देऊन देवाच्या नांवानें मोकळा सोडलेला बैल. वर 'वसुसर्ग' पहा.

**वसू पु०, स्त्री०, वसूं न०** मुसळ, जांत्याचा खुंटा, इ० च्या टोकाला बसवितात तें लोखंडाचें कडें किं० दळें.

**वसूबारस** मागें 'वसु' मध्यें 'वसुबारस' [ पहा.

**वसूल** [ अ० ] **पु०** कोणेकाकडून सरकार, सावकार, इ० ना यावयाचें जें द्रव्य, धान्य, इ० तें. २ कोणेकाकडून कोणेकाला मिळावयाचें जें द्रव्यादि तें. ꣸ **वसूलदार पु०** मालकासाठीं द्रव्य, धान्य, इ० कुळें इ० कांकडून गोळा करणारा कारकून, शिपायी, इ० माणूस. **वसूलबाकी स्त्री०** १ वसूल घेणें, वसूलाची बाकी काढणें, इ० संबंधाचीं कामें समुच्चयानें. २ वसूलाचा अद्यापि मिळावयाचा भाग. **वसूलवासलात स्त्री०** वसूलाचा हिशेब. **वसूल वासूल पु०** वसूल करणें आणि ह्या संबंधाचीं इतर कामें समुच्चयानें.

**वसें न०** जांत्याचा खुंटा, काठी, मुसळ, इ० च्या टोकांना बसवितात तें लोखंडाचें कडें.

**वस्त** [ सं० ] **पु०** बोकड; बकरा.

**वस्त** [ सं० वस्तु ] **स्त्री०** १ सोनें, रुपें, इ० धातूंचा दागिना. २ कोणताही पदार्थ. ꣸ **वस्तभाव, वस्तवानी स्त्री०** १ दागिने, खेळणीं, अत्तरदाणी, इ० सुंदर पदार्थ समुच्चयानें. २ संसारांतील भांडींकुंडीं इ० सामानसुमान. ३ प्रवासांत जरूर असें सामानसुमान.

**वस्तरा, वस्तारा, वस्त्रा** [ फा० ] **पु०** अंगा-

वरील केश तासून काढण्याचें एक पोलादी हत्यार.

**वस्ताद** [ फा० उस्ताद् ] पु० १ गुरुजी; शिक्षक. २ गाणें, नाचणें, वाद्यें वाजविणें, तालमींतील उड्या, कुस्त्या, इ० कामें शिकविणारा गुरु. ३ कोणत्याही विद्येत किं० कलेंत जो प्रवीण तो. ४ कांहीं गुणानें दुसऱ्यापेक्षां वरचढ जो माणूस तो.५प्रतिपक्ष्यानें आपणाविरुद्ध योजलेल्या युक्त्या किं० कृत्या हाणून पाडण्याचें कोणेकाच्या अंगचें सामर्थ्य. ५ पक्का निष्णात; वाकबगार; हार न जाणारा. ६ शिरजोर माणूस. ❀ **वस्तादगिरी** स्त्री० १ वस्तादाचा धंदा. २ कोणतीही कला, शास्त्र, इ० मध्यें जो कोणेकाचा निष्णातपणा तो. ३ चातुर्य. ४ लढविलेली युक्ति किं०हिकमत. **वस्तादी** वि० गुरुपासून शिकून घेतलेलें (ज्ञान, कला, इ० ); स्वताच्या मेहेनतीनें संपादन केलेलें नव्हे असें ( ज्ञान, कला, इ० ).

**वस्तारा** वर ' वस्तरा ' पहा.

**वस्ति** [ सं० ] पु०, स्त्री० १ वसति; राहाणें. २ ओटी पोट. ३ मूत्राशय. ४ पिचकारी. ❀ **वस्तिशोधन** न० लघवी किं० लघवी करविणारें औषध.

**वस्ती** [ सं० वसति ] स्त्री० १ कोणेक ठिकाणीं राहाणें किं० वास करणें. २ कोणेक ठिकाणीं राहिलेले लोक समुच्चयानें; उ० ह्या गांवांत सगळी मराठ्यांची वस्ती आहे, इतर जातीचें एकही घर नाहीं. ❀ **वस्तीस राहाणें** (किं०**उतरणें**) एकाद्या ठिकाणीं अल्पकाल मुक्काम करणें. **वस्तीकरू** पु० १ कोणेक स्थळीं अल्प काळ बसतीसाठीं राहिलेला माणूस.मागें'वसतकरू'पहा. २ प्रवासी; मुशाफर. **वस्तीवाडी** स्त्री० १ गांव, शहर, इ० मध्यें लोकांची वसति.२संतति.

**वस्तु** [ सं० ] हा शब्द संस्कृतांत न० आणि मराठींत स्त्री० आहे. मराठींत कधीं कधीं न० योजतात. १सृष्टींतील यच्चयावत् पदार्थ प्रत्येक. २ सत्य पदार्थ किं० गोष्ट; सत्य स्वरूपाशीं जुळणारें कांहीही; उ० वस्तूचे ठायीं अवस्तूचा आरोप भ्रमानें केला जातो.३ दौलत; जिंदगी.४पदार्थाचा धर्म; स्वभाव. ५ सार; सत्त्वांश. ६ नाटक, कादंबरी, गोष्ट, इ० चें संविधानक. ❀ **वस्तूत्थापन** न० जादूनें पदार्थांचा फेरफार करणें. **वस्तुतः** क्रि० वि० १ खरोखरीं; खरें पाहिलें असतां; वास्तविक रीत्या. २ स्वभावतः. ३ अर्थात्. **वस्तुमात्र** न० प्रत्येक वस्तु; उ० ह्या सृष्टींतील वस्तुमात्र नाशवंत आहे. **वस्तुशक्ति** स्त्री०, **वस्तुस्वभाव** पु० पदार्थाचें तत्त्व;पदार्थाचा धर्म. **वस्तुस्थिति** स्त्री०खरोखरी घडलेला प्रकार;खरी गोष्ट; खरी हकीगत,खऱ्याचा जो भाग किं० अंश तो. **वस्तुगत्या** क्रि० वि० खरा विचार करून पाहातां; परमार्थानें. **वस्तुकथन** न० कांहीं एका अर्थाच्या वास्तविक स्वरूपाचें जें कथन तें.

**वस्तूक** [ सं० वस्तु ] स्त्री० मुलाला भुलविण्यासाठीं किं० रमविण्यासाठीं त्याला खाऊ, खेळणें, इ० देतात तें.

**वस्त्र** [ सं० ] न० १ कपडा; चिरगुट. २ पोशाख. ३ आच्छादन. ❀ **वस्त्रग्रंथि** पु०, स्त्री० नेसलेल्या वस्त्राची कमरेवरची गाठ. **वस्त्रपुत्रिका** स्त्री० चिंध्यांची बाहुली; जिनगरी बाहुली. **वस्त्रगाळ, वस्त्रगाळींव** वि० वस्त्रांतून गाळून घेतलेलें ( औषध, पीठ,माती, इ० ). **वस्त्रपात्र** न० ए० व० संसारांत जरूर अशीं भांडीं, चिरगुटें, सामान, इ० समुच्चयानें. **वस्त्रप्रावरण** न० ए० व० वापरावयाचीं, पांघरावयाचीं, अंगांत घालावयाचीं, आणि नेसावयाचीं चिरगुटें समुच्चयानें. **वस्त्रलोचन** [ सं० वस्त्र+लुंचन (लुबाडणें) ] न० कोणेकाचीं वस्त्रें, कपडे, आणि इतर चिरगुटें, इ० चें हरण किं० लुबाडणूक. **वस्त्राचा ताणा** पु० नक्षत्रमाळेप्रमाणें दोरीवर टाकलेलीं चिरगुटें समुच्चयानें,— वाळावयासाठीं किं०अव्यवस्थितपणानें.**वस्त्राहरण** न० कोणेकाचीं वस्त्रें हिरावून घेणें. **वस्त्रहरण** न० कोणेकाचीं नेसलेलीं वस्त्रें काढून घेऊन त्याला नग्न करणें; उ० द्रौपदीचें वस्त्रहरण.

**वस्त्रा** [ फा० उस्तरा ] पु० १ अंगावरील केस तासून टाकण्याचें एक पोलादी आणि तीक्ष्ण धारेचें साधन. २ (**लाक्षणिक**) प्रतिपक्ष्याच्या विधानाला चोख आणि तडफदारपणें उत्तर देणारा मनुष्य. ३ तडफदार आणि झोंबरें भाषण. मागें ' वस्तरा ' पहा.

**वस्मरणें, वस्मारणें** [ **सं०** उद् (वर)+स्मृ ] **अ० क्रि०** मागें ' उस्मरणें ' पहा. ❀ **उस्मरा, उस्मारा, वस्मरा पु०** उस्मरण्याची क्रिया.

**वस्वी** [ **म०** वसूं ] **स्त्री०** काठी, खुंटा, इ० च्या टोकाला बसविलेली लोखंडाची विडी.

**वहणें** पुढें ' वाहणें ' पहा.

**वहन, वाहन** [ **सं०** ] **न०** १ वाहून नेणें. २ जलाचें वाहणें. ३ प्रवासाचें साधन;—गाडी, घोडा, मेणा, पालखी, इ०.

**वहमा, वहिमा, वहीम** [ **अ०** वह्म् ] **पु०** १ कोणेकाच्या कांहीं दुष्कृत्याबद्दल त्याच्यावर असलेला लोकांचा संशय; उ० रानड्यांच्या घरीं चोरी केल्याच्या वहिमावरून शिपायांनीं खंड्या सुताराला पकडलें. २ कांहीं गोष्टिसंबंधानें कोणेकाचा तर्क, संशय, किं० आदमास.

**वहाटळ, वहाटूळ, वाहुटळ** [ **सं०** वातल= वायु ] **स्त्री०** १ जोराचा वारा; सोसाट्याचा वारा. २ चक्राकार गतीनें वाहाणारा वारा.

**वहाडणें** पुढें ' वाढणें ' पहा.

**वहाण** [ **म०** वाहणें ] **स्त्री०** १ पाण्याचा प्रवाह. २ वाहलेलें पाणी. ३ पायाच्या रक्षणार्थ चालतांना घालतात तो कातड्याचा पदार्थ. ❀ **पायींची वहाण पायींच बरी** हलकट माणसाला मोठेपणा देऊन चढवून ठेवूं नये.

**वहाणी, वहाणें;** इ० पुढें ' वाहणी, ' ' वाहणें, ' इ० पहा.

**वहावट** पुढें ' वहिवाट ' पहा.

**वहावट** [ **म०** वाहणें ] **न०** नदी इ० च्या प्रवाहानें ज्यांतील माती धुपून गेली आहे असें शेत किं० अशी जमीन.

**वहाळ** मागें ' ओहळ ' पहा.

**वहिनी** [ **सं०** भगिनी ] **स्त्री०** १ भावाची बायको. २ पोक्त स्त्री( आदराचा शब्द ).

**वहिमा पु०** मागें ' वहमा ' पहा.

**वाहिला वि०** १ ( कवितेंत ) पृथक्; वियुक्त; निराळा. २ श्रेष्ठ. ३ सुंदर. **क्रि० वि०** १ तडकपणें; तडकाफडकीं. २ निश्चितपणें; खात्रीपूर्वक.

**वहिवट, वहिवटणें** पुढें ' वहिवाट, ' 'वहिवाटणें ' पहा.

**वहिवाट** [ **म०** वाहणें ] **स्त्री०** १ कांहीं काम, कारभार, संस्था, इ० सुरळीतपणें आणि जबाबदारी शिरावर घेऊन चालविणें किं० चालविण्याची सरणी, शिरस्ता, किं० परिपाठ. २ कांहीं काम जलद आणि सफाईनें करण्याची कोणेकाची हातोटी किं० कुशलता किं० खुबी. ३ कोणा अमलदाराची कारकीर्द किं० अमल चालविण्याची सरणी. ४ वतन, शेत, घर, इ०चा भोगवटा. ५ वापर; उपयोगांत आणणें. ६ जाणें, येणें, बोलणें, देणें, घेणें, इ० बाबतींत कोणेकाशीं कोणेकाचा असतो तो घरोबा किं० परिपाठ किं० क्रम. ७ सलगीचा किं० मित्रत्वाचा संबंध. ❀ **वहिवाटदार पु०** १ गांव, तालुका, इ०मध्यें बंदोबस्त ठेवणें, तेथील वसूल करणें, इ० कामावर सरकारनें नेमलेला अधिकारी. २ शेत, वतन, हक्क, इ० चा प्रत्यक्ष जो भोक्ता तो. ३ कांहीं काम, धंदा, इ० मालकाच्या सांगण्यावरून जो चालवितो तो त्याचा गुमास्ता किं० मुनीम.

**वहिवाटणें** [ **म०** वहिवाट ] **अ० क्रि०** १ कांहीं कामीं (कोणेकाला) अनुभव मिळणें; कांहीं कामीं ( कोणेकानें ) परिचित होणें. २ (कोणेकाचा )कोणेकाशीं कांहीं कामीं संबंध येणें किं० होणें. ३ वापरण्यांत किं० उपयोगांत ( पदार्थ ) असणें. ४ परिस्थितीशीं परिचित होणें; रुळणें. ५ टिकून राहाणें. ६ ( संकट, अडचण, इ० ) पार पडणें किं०निस्तरलें जाणें. **स० क्रि०** १( काम, धंदा, नोकरी, इ० ) चालविणें, चालू ठेवणें, किं० करीत राहाणें. २ ( शेत, वतन, हक्क, इ० ) भोगणें किं० उपभोगणें. ३ कांहीं कामीं ( कोणेक माणूस, पशु, पदार्थ, सरणी, औषध, इ० ) योजणें, वापरणें, उपयोगांत आणणें, किं० ठेवणें; उ० हा घोडा मी लढाईंत वहिवाटला आहे; उ० हें औषध मी आमांशांत सदैव वहिवाटींत असतों. ४ ( संकट, अडचण, पेंच, इ० तून ) निभावून बाहेर पडणें. ५ कोणेकानें ( कोणेक स्त्री ) एकदां किं० अनेक वेळां मैथुनानें भोगलेली असणें.

**वही** [ **हिं०** बही ] **स्त्री०** १ व्यापाऱ्याची हिशेब, जमाखर्च, इ० साठीं केलेली चोपडी. २ टिपणें, शब्द, अर्थ, उदाहरणें, इ० लिहिण्यासाठीं विद्यार्थी करतो ती चोपडी.

**वही स्त्री०** ताण्याचीं सुतें कोष्टी ज्या फणी-

तून ओवितो ती फणी.

**वही, वय, वई स्त्री०** शेत, घर, इ० भोंवतीं घालतात तें कुंपण. ꕥ **वहीवाडा पु०** घराभोंवतचें कुंपण घातलेलें पटांगण.

**वही स्त्री०** लग्नासाठीं घातलेल्या बहुल्याच्या चार कोपऱ्यांस चार उतरंडी रचावयासाठीं ठेवतात त्या मडक्यां प्रत्येक उतरंडींत पांच पांच मडकीं असतात. ह्यांपैकीं दोन उतरंडी लग्नानंतर वधूकडे आणि दोन वराकडे ठेवल्या जातात. ꕥ **वहीवरून आंबट होणें** क्षुल्लक कारणावरून असंतुष्ट होणें किं० भांडणें.

**वहीत वि०** लागवडीस आणलेली ( जमीन ).

**वहीम** मागें ' वहमा ' पहा.

**वहू [सं० वधू; हिं० बहू] स्त्री०** सून. ꕥ **वहू नाहला ( किं० वर नाहला ) आणि वाफा शिंपला** एकच गोष्ट किं० कृत्य करून दोन अर्थ किं० उद्देश साधणें किं० सफल होणें. ꕥ **वहूमाय स्त्री०** ( लग्नांत ) नवऱ्या मुलीची आई.

**वह्नि [ सं० ] पु०** १ अग्नि; विस्तव. २ ज्याचे योगानें खाल्लेलें अन्न पचतें ती शक्ति; जाठराग्नि. ꕥ **वह्निगर्भ पु०** १ बांबू. २ शमी.

**वह्वर [ सं० वधू+वर ] न०** १ लग्नानंतर वधू आणि वर यांचें देवदर्शनास जावयाला निघालेलें जोडपें. २ नवरामुलगा आणि नवरी मुलगी यांचें जोडपें. ꕥ **वह्वरजत्रा, वाह्वरभरणी स्त्री०, वह्वरभरणें न०** लग्नानंतर वधूवरांचें देवदर्शनास जाणे हा विधि ( भरणें, करणें ).

**वळ पु०** १ मांडी, खाक, कान, यांचे संधिप्रदेशीं उत्पन्न होतें तें लांबट उठाणूं. २ दोरी किं० सूत यांना फाजील पीळ पडलेला असल्यास जागोजाग गांठी उत्पन्न होतात त्या प्रत्येक; मेंढा; पिंपळी. **पु०, स्त्री०** १ काठी, चाबूक, चापट, इ० चा तडाखा शरीरावर झाला असतां त्याच आकाराचें चिन्ह त्वचेवर उमटतें तें. २ वायूच्या विकारामुळें हात, पाय, इ० मध्यें उत्पन्न होते ती वायूची व्यथा; पेटका. पु० परमावधीची उत्सुकता किं० उत्कंठा; खाज.

**वळ [ सं० आवालि; म० ओळ ] स्त्री०** १ ओळ, रेघ. २ वर्तनाची सरणी. **टीप**,–' वळ ' हा शब्द ह्या दोन्ही अर्थीं अशिक्षितांतच रूढ आहे.

**वळई [ सं० वलय ] स्त्री०** १ भूस, गुळी, इ० गुरांचे खाद्य पदार्थ आदबशीर रीतीनें ठेवण्यासाठीं जी चारी बाजूंनीं कडबा घातलेली जागा करतात ती. २ कडब्याच्या पेंढ्यांनीं सुरक्षित केलेली भुसाची रास. ३ कडबा, गवत, इ० ची रास किं० गंजी. ४ गव्हाच्या ताटांची पेंढी.

**वळकटी, वळकुटी, वळकोटी [ म० वळणें ] स्त्री०** १ सतरंजी, गालिच्या, गादी, इ०ची दंडगोल केलेली गुंडाळी. २ घडी; सुरळी. ३ सुरकुती. ꕥ **वळकुट्या सुरकुट्या स्त्री० अ० व०** चिरगुटांचा किं० कागदांचा चोळाबोळा.

**वळकवणें** इ० मागें ' ओळकवणें ' इ० पहा.

**वळका [ म० वळणें=पीळ घालणें ] पु०** १ किडे, गांडुळें, इ० ची वळवळ. २ मुंग्या, माशा, ढेकूण, इ० चा कोणेक स्थळीं झालेला बुजबुजाट. ३ बोलणें, लिहिणें, हसणें, इ० मध्यें कोणेकानें केलेला फाजिल किं० निंद्य अतिरेक. ꕥ **खरजेचा वळका पु०** खरजेमुळें खाजविण्याची एकदम आणि जोराची इच्छा होते ती ( येणें ).

**वळखर [ म० वळणें ] वि०** घट्ट पीळ जिला घातला आहे अशी (दोरी, सूत, इ०); वळीव.

**वळगणें, वळंगणें, वळघणें, वळंघणें स० क्रि०** १ जोरानें किं० आवेशानें पकडणें, धरणें, किं० रोधणें. २ चढते समयीं (झाड, फांदी, इ०) घट्ट धरणें. ३ ( वृक्ष, टेकडी, इ० वर)चढणें. ४ (एकाद्या गांवांत) कांहीही प्रसंग आला तरी तेथें करारीपणानें वसति करून राहाणें;(गांव,देश,इ०) न सोडतां तेथेंच अडचणी सोसून राहणें. ꕥ **वळघ घेणें, वळघून जाणें** ( झाड, टेकडी, इ० वर ) धडपडत चढणें.

**वळघ [ म० वळघणें ] स्त्री०** पकड ( बोटें, बाहु, इ०ची, आणि मारणें, घालणें, इ०च्या योगीं); उ० मी माडाला वळघा घालीत घालीत अर्ध्यापर्यंत चढलों पण पुढें चढवेना.

**वळचण स्त्री०** १ घर इ० च्या छपराची अगदीं खालची कड; पाख्याची खालची कड. २ ह्या ठिकाणीं शाकारण्यासाठीं घातलेलें गवत. ३ घराच्या छपरा लगतची आडोशाची किं० निवा-

ऱ्याची जागा. ४ छपराच्या पागोळ्या जमीनीवर जेथें लंब रूपांत पडतात तेथपर्यंतची आणि भिंतीलगतची जागा. ꣸ **भुकेलेलें गुरूं वळचण ओढतें** १ भुकेनें व्याकुळ झालेला मनुष्य चांगल्या आणि वाईट अन्नाची निवड करीत बसत नाहीं; तो मिळेल तें गपांगपां खातो. २ गरजवंताला पापपुण्याची क्षिति नसते. **वळचणीचें पाणी आढ्याला जात नाहीं** मोठ्या दर्जाच्या माणसानें हलक्या दर्जाच्या माणसाला फाजिल मान देणें शोभत नाहीं. **वळचणीचा वांसा** पु० पदोंपदीं नडणारा माणूस; ज्याची आपणाला नेहेमीं ठोकर बसण्याचा संभव असतो असा मनुष्य, शेजारी, किं० त्याच तालमींतील किं० संस्थेतील माणूस ( अशांशीं आपण वैर करणें टाळावें अशा अर्थानें ). **वळचणीची पाल** स्त्री० दुसऱ्यांचीं गुप्त बोलणीं आडून ऐकणारा माणूस.

**वळण** [ सं० वल् ] न० १ अक्षराची आकृति काढण्याची धाटणी; उ० बिवलकरी मोडी वळण. २ पदार्थ, चेहेरा, इ० ची ढब किं० तऱ्हा. ३ रस्ता, नदी, इ० चा वाक किं० दिशेचा बदल. ४ वर्तनाची, बोलण्याची, किं० शिकविण्याची कोणेकाची धाटणी. ५ वशीला; अनुकूल परिस्थिति; उ० सरकारांत तुम्ही वळण बांधल्याशिवाय तुमचा खटला लवकर विचारासाठीं घेतला जाणार नाहीं. ६ कोणेकाचा गाणें, बजावणें, तालीम, इ० कडे असतो तो मनाचा कल; विशिष्ट विषयाची कोणेकाला असते ती आवड. ७ पाण्याचा प्रवाह आडविण्यासाठीं किं० वळविण्यासाठीं घातलेला बंधारा. ꣸ **पाण्याआधीं वळण बांधावें** पुढें येणाऱ्या अडचणींची अगोदरपासून तजवीज करून ठेवावी. **कोणी माणूस कोणेकाच्या वळणावर जाणें** तो दिसण्यांत, बोलण्यांत, किं० वागण्यांत त्याच्या सारखा असणें. **वळणावर जाणें** मागपासून चालत आलेली वाईट सरणी कोणेकानें चालू ठेवणें. **वळणावळणानें नाव हाकली पाहिजे** खडक, उथळ पाणी, इ० टाळून नाव चालवावी लागते; ज्या अडचणी येण्याचा संभव असेल त्या चुकवून काम, व्यवहार, किं० धंदा चालवावा लागतो. **वळणदार** वि० सुंदर सरणीचें किं० धाटणीचें ( अक्षर इ० ). **वळणशुद्ध** वि० १ योग्य प्रमाणांत ज्याचे अवयव, अंगें, किं० भाग आहेत असा (चेहेरा, अक्षर, चित्र, इ०). २ शिस्तवार (वर्तन). **वळणाचें पाणी वळणानेंच जाईल** कुटुंबाची शिस्त मागपासून चालत आलेली असेल त्या शिस्तीनें मुलें वागतील. **मुलांना वळणांत ठेवणें** त्यांना योग्य सरणी लावणें; त्यांना योग्य नियंत्रणेंत ठेवणें.

**वळणी** [ म० वळणें ] स्त्री० वळण्याची क्रिया किं० दिशा किं० रोख. ꣸ **वळणीस ( किं० वळणीं ) आणणें** आपणास सोयीच्या किं० अनुकूल अशा स्थितीस ( पदार्थ, माणूस, पशु, इ० ) सौम्य किं० कडक उपायांनीं आणणें किं० वळविणें किं० पाहिजे तसा करून घेणें.

**वळणें** [ सं० वल् ] अ० क्रि० १ विशिष्ट मार्ग, दिशा, रूप, मनःस्थिति, इ० कडे (माणूस, पशु, काम, इ० ) कलणें; उ० ही नदी विपडी गांवापाशीं उत्तरेस वळली आहे; उ० रामू जर वळला तर तो तुम्हाला हजार रुपये देईल; उ० मडकें ओलें असे तोंपर्यंत त्याचा कांठ वळेल; उ० साखरेचा पाक थोडासा घट्ट झाला म्हणजे लाडू वळतील. २ (अक्षर, चित्र, आकृति, इ० नीं) विशिष्ट आकार धारण करणें; उ० तुझें अक्षर वळावयाला आणखी सहा महिने लागतील. ३ कांहीं काम करण्यांत (हात, बोटें, इ०) परिचित किं० अभ्यस्त होणें किं० (त्यांना) सफाई प्राप्त होणें. ४ ( माणूस, पशु, पदार्थ, इ० नीं ) विशिष्ट आकार धारण करणें किं० धारण करण्याच्या स्थितींत येणें किं० असणें. ५ ( गाय, म्हैस, इ० नीं ) पुन्हा दूध देऊं लागण्याच्या दशेस येणें. ६ ( दोरी, तार, इ० ना ) पीळ घालणें शक्य होणें; उ० हें गवत फारच ढिसूळ आहे, त्याची दोरी वळत नाहीं.

**वळणें** [ सं० वल् ] स० क्रि० १ फिरविणें. २ बदलणें. ३ वेगळ्या दिशेस लावणें. ४ (शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी, इ० ) चरत असतां किं० चरावयास जात असतां त्यांच्यावर देखरेख करणें. ५ ( तंतु, काड्या, गवत, इ० ना ) पीळ घालून त्यांना दोरीचें रूप देणें. ६ तंतु, काड्या, गवत, इ० ना विशिष्ट प्रकारें पीळ भरून त्यांची (दोरी)

करणें. ७ दुधांत भिजविलेलें रव्याचें पीठ(गव्हले, बोटवे, मालत्या इ०च्या रूपांत ) घालणें.

**वळता** [ म० वळणें ] वि० वळविलेला;परत केलेला, वजा केलेला, देऊन टाकलेला(पैसा,कर्ज, किंमत, इ० ); उ० ह्या गायीची किंमत शंभर रुपये, त्यांत तीस रुपये वळते करून घेऊन बाकीचे सत्तर रुपये तुम्ही मला द्या. ꣸ **वळता देणें** उसना घेतलेला पदार्थ ज्याचा त्याला देऊन टाकणें.

**वळती** [ म० वळणें ] स्त्री० १ चरावयास गेलेलीं गुरें परत आणण्याची क्रिया किं० त्यांचें परत येणें. २ गुरांचें चरावयाला जाणें. ३ कोणे-काचें कोणेक स्थानाकडे आकास्मिक जाणें किं० तेथून परत येणें; फेरी; उ० ह्या करंज्या येथें ठेवूं नको, मांजरांची जर कोणीकडून वळती आली तर तें साऱ्या करंज्या खाऊन टाकील. ४ जाणारे किं० येणारे लोक, गुरें, इ० चा जमाव, रांग, भरव, किं० प्रवाह; उ० गुरें गांवाकडे येत होतीं, आतां वळती रानाकडे चालली. ५ रानांत गुरें चरावयास नेणें किं० संध्याकाळीं त्यांना परत गांवांत आणणें ही क्रिया. ६ गुराख्यांचीं पोरें खेळत असतां ज्याच्यावर डाव लागेल त्यानें गुरें गांवांत परत जातांना वळावीं अशा संकेतानें जी कोणेकावर गुरें वळण्याची पाळी येते ती; उ० राम्या हरला, त्याच्याकडे आज वळती जाणार. ७ जुगारांत लाविलेलें द्रव्य. ८ छपराचा खालचा भाग ( बांधणें ).

**वळंवणें** मागें ' ओळंवणें ' पहा.

**वळंबा** मागें ' ओळंबा ' पहा.

**वळया, वळ्या** पु० मळसूत्राच्या आकाराचा शंख. हा वळ नांवाच्या सुजेवर घासल्यानें वळ बरा होतो अशी लोकांची समजूत आहे.

**वळंव** न० ओबडधोबड मोठा धोंडा,–जो शेताचा बांध, घराचा पाया, इ०च्या रचाईत योजतात.

**वळवंजी** स्त्री० गोम ह्या किड्यासारखा एक किडा. याच्या अंगाचा शेंबडासारखा मळ जमी-नीस लागलेला असला तर तो रात्रीं चकाकतो.

**वळवट** [ म० वळणें ] न० खिरीसाठीं वळ-लेले जे गव्हले,मालत्या,बोटवे,इ०त्यांचा समुच्चय.

**वळवटा, वळवट** [ म० वळणें, वाटणें ] पु० १ चाल; तऱ्हा; परिपाठ. २ जाण्यायेण्याचा परिपाठ किं० घरोब्याचा संबंध.

**वळवटी, वळवंटी** [ म० वळणें ] स्त्री० गुंडाळी; गुंडाळलेला पदार्थ ( गादी, सतरंजी, जाजम, इ० ).

**वळवणी** [ म० वळवा+पाणी ] न० वळ-वाचा पाऊस किं० ह्या पावसाचें पाणी.

**वळवळ, वळवळी** स्त्री०, **वळवळा** पु० [ म० वळणें+वळणें ] १ साप, गांडुळें, आळ्या, इ०च्या शरीराचें जलदीनें चालतांना किं०कांहीं दुखापत झाली असतां वाकडे तिकडे होऊन चल-नवलन.२अस्वस्थपणाची स्थिति किं० ह्या स्थितींत जी अंगाची हालचाल ती.३अत्युत्कंठा(सुटणें,येणें).

**वळवळणें** [ म० वळणें+वळणें ] अ० क्रि० ताप, आजार, वेदना, चिंता, उत्कंठा, इ०च्या अतिरेकांत शरीराचा पिळवटणें, मुरडणें, इ०रूप जो व्यापार तो. २ अत्युत्कंठेनें किं०अस्वस्थपणानें जर्जर किं० पीडित होणें.

**वळवा** [ म० वळणें ] स्त्री० अ० व० १ पूर्वा नक्षत्राच्या पुढचीं जीं पावसाचीं नक्षत्रें तीं ( लागणें ). २ ह्या नक्षत्रांत पडलेला पाऊस ( पडणें, लागणें ). ꣸ **वळवांचा पाऊस** पु० १ उत्तरा, हस्त, चित्रा, आणि स्वाति, ह्या नक्ष-त्रांत पडतो तो पाऊस. २ कोणच्या दिशेकडे वळेल, कोणचा पक्ष स्वीकारील, औदार्य दाख-वील कीं०चिक्कूपणा करील, इ० गोष्टी ज्याच्या संबंधानें तर्कितां येत नाहीत असा माणूस; लहरी माणूस.

**वळशेण** न०,**वळशेणी**,**वळशिणी** स्त्री०शेण कालवून आणि तुडवून त्या शेणाची सर्पणासाठीं थापलेली गोवरी,–भाकरीच्या किं० वरवंट्याच्या आकाराची. याच्या व्यावर्तकत्वें रानशेण न० किं० रानशेणी स्त्री०.

**वळसणें** [ म० वळसा ] अ० क्रि० १(पदार्था-भोंवतीं ) फेरा करणें किं० वळसा घालणें. २ (स्थळविशेष) मागें टाकून पुढें जाणें.

**वळसा** [ म० वळणें ] पु० १ पदार्थाभों-वतीं घातलेली वाटोळी फेरी; प्रदक्षिणा. २ इक-डून तिकडे जाणें आणि तिकडून इकडे येणें. ३

दोरी इ० चा गांठोडें इ० भोंवतीं घातलेला फेरा. ४ चालण्याचा व्यर्थ हेलपाटा. ५ रवा, हळकुंड, मात्रा, इ० सहाणेवर घासणें.

**वळसाविणें स० क्रि०** ( नवें मडकें ) वापरून टणक करणें.

**वळही, वळहीं स्त्री०** मागें ' वळई ' पहा.

**वळापिळा** [ **म०** वळणें+पिळणें ] **पु०** साप, माणूस, गांडूळ, इ० च्या शरीराचें पिळवटणें.

**वाळिंबा पु०** मागें ' ओळंबा ' पहा.

**वळी** [ **म०** वळणें ] **स्त्री०** १ घोडा, बैल, इ० च्या पाठीवर खोगीर घट्ट बसावें आणि त्यांच्या पाठीला खोगीर बोचूं नये म्हणून शेजारीं मांडून जोडलेल्या दोन उशांच्या रूपाचा पदार्थ ठेवितात तो. २ वळकटी; गुंडाळी. ३ दोन दोरे किं० दोन्या टोकांशीं एकमेकांत गुंतवून केलेला सांधा किं० जोड. ४ कोष्टयाच्या विणकामांतील एक पारिभाषिक शब्द. पुढें ' सांधणी ' पहा. ❀ **वळीमूठ पु०** १ वळी अर्थ १ चा पदार्थ आणि खोगीर जोडीनें ( कसणें, बांधणें ). २ चोळखण आणि लुगडें,-वरपक्षाकडून वधूच्या आईस लग्नाच्या सोहाळ्यांत देण्यांत येतें तें. ३ निरक्षर माणूस.

**वळी** [ **सं०** आवली ] **स्त्री०** १ पंक्ति; ओळ. २ लेखणी, कोळसा, खडू, इ० नीं काढलेली किं० ओढलेली रेघ. ३ वर्तन, कांहीं काम करणें, बोलणें, चालणें, हसणें, इ० ची कोणेकाची सरणी. ४ लठ्ठ आणि थिलथिलति माणसाच्या पोटाला पडतात त्या निऱ्या प्रत्येक.

**वळींव** [ **म०** वळणें ] **वि०** १ अनेक दोरे किं० सुतें एकत्र वळून तयार केलेला घट्ट ( दोरा, सूत, रेशीम, इ० ). २ ज्यास विशेष पीळ आहे असा ( दोरा, दोरी, इ० ). ३ तालमीच्या कामांनीं कसलेलें किं० बळकट झालेलें ( शरीर ). ❀ **वळींव पाऊस पु०** पावसाळ्याच्या अखेरच्या दिवसांत पडतो तो पाऊस. **वळींव गोवरी** ( किं० **गवरी** ) **स्त्री०** शेण तुडवून आणि मळून थापून केलेली गोवरी.

**वळू, वळ्हू, वळहो पु०** घोडीं पासून अपत्यें उत्पन्न करण्यासाठीं अंड न बडवितां आणि दुसऱ्या कामास न लावतां ठेविलेला घोडा.

**वळें** [ **सं०** वल्य ] **न०** १ बोटांत घालावयाचें सोनें, चांदी, इ० चें एकेरी किं० दुहेरी वेढें. २ कोणत्याही धातूचें कोणत्याही उपयोगाचें वतुळाकार कडें. [ प्राणी.

**वळोंची, वळोंजी स्त्री०** गोम किं० घोण हा

**वळया पु०** मळसूत्राच्या आकाराचा समुद्रांत सापडणारा शंख,-हा वळ ह्या नांवाच्या सुजेवर घासल्यानें सूज ओसरते अशी समजूत आहे.

**वक्ष** [ **सं०** वक्षस् ] **न०** ऊर; छाती. ❀ **वक्षोज, वक्षोरुह पु०** स्त्रीचा स्तन. **वक्षस्थल, वक्षःस्थळ न०** छाती; ऊर. [आहे तें.

**वक्ष्यमाण** [ **सं०** ] **वि०** जें बोलावयाचें

**वा** [ **सं०** ] **उ० अ०** अथवा; किंवा.

**वाइसा, वाइच वि०** थोडका, अत्यल्प (अशिक्षितांत रूढि).

**वाई** [ **सं०** वायु ] **स्त्री०** संधिवात.

**वाईट वि०** जें चांगलें नाहीं तें. ❀ **कोणेकाच्या वाइटावर असणें** त्याचें नुकसान करावयाला टपून बसलेलें असणें. **कोणेकाचें वाईट करणें** त्याचें नुकसान करणें. **वाईटवरा वि०** १ असेल तसा,-मग तो चांगला असो किं० वाईट असो; उ० बायकोनें वाईटवरा नवरा पथकरला पाहिजे. २ मध्यम प्रतीचा. **वाईटसाईट वि०** वाईट; गाळगदळ ह्या रूपाचा; टाकाऊ. **वाईटवाणा वि०** वाईट; हलक्या दर्जाचा. **वाईटाविंडूळ वि०** १ वाईट; टाकाऊ. २ कुरूप.

**वाईण, वाईन न०** १ दगडाचें उखळ. २ दगडाची किं० लाकडाची पोहे कांडण्याची उखळी. ❀ **वाईनसळ न०** उसाचा रस काढण्याच्या चरकाचे नवरानवरी हे भाग ज्या दोन आडव्या तक्त्यांत फिरतात त्यांतील खालचा तक्ता. ह्या तक्त्याला ' काठवट ' असेंही म्हणतात.

**वाईल, वईल** [ **म०** वायला=वेगळा ] **पु०**, **न०** चुलीचा अवेल. मागें 'अवेल' पहा. ❀ **वाईल चूल स्त्री०** जिला वईल आहे अशी चूल. वईल नसलेल्या चुलीला ' चुला ' **पु०** म्हणतात.

**वाउगा, वावगा वि०** भलताच; बेशिस्त; असावा तसा नसलेला.

**वाक्** [ सं० वाच् ] **स्त्री०** १ शब्द. २ भाषण. ३ भाषा. ४ वचन; करार. **टीप,**–' वाक् ' हा शब्द **सं०** ' वाच् ' असा आहे. समासांत तो पूर्वपद असतां कठोर व्यंजनापूर्वी ' वाक् ' आणि स्वर आणि मृदुव्यंजन ह्यांच्या पूर्वी ' वाग् ' आणि न, म, यांच्यापूर्वी ङ असें रूप धारण करतो. ॐ **वागीश, वाक्पति पु०** १ वक्ता. २ बृहस्पति. ३ ब्रह्मदेव. **वाक्चापल्य न०** १ बडबड. **वाक्छल पु०** १ बोलण्यांतलि धरसोड. २ शब्दांचे वेगळे अर्थ घेऊन वाक्याचा वेगळा अर्थ करणें हा वात्रटपणाचा प्रकार. **वाक्चातुर्य न०** वक्तृत्वाची कला. **वाक्चापल्य न०** बडबड; वटवट. **वाक्पटु वि०** बोलण्यांत चतुर; वक्तृत्वगुण ज्याच्या अंगीं आहे तो. **वाग्डंबर पु०, वाग्जाल न०** पोकळ आणि भपकेदार भाषण. **वाग्डंबर पु०** वक्तृत्व. **वाग्दंड पु०** १ शब्दांनीं कोणेकावर केलेला भडीमार. २ वाणीचा निग्रह; मित भाषण; मौन. **वाग्दान न०** १ वाणीनें देणें. २ विवाहांतील ' वाङ्निश्चय ' हा विधि. **वाग्दोष पु०** १ निंदा. २ अप्रिय भाषण. ३ अशुद्ध भाषण. **वाङ्निश्चय पु०** मी आपली मुलगी तुमच्या मुलास पत्नी म्हणून द्यावयाला कबूल आहे अशा अर्थाचा विधि लग्नाचे पूर्वी करतात तो. **वाक्पंडित पु०** बोलण्यांत चतुर. **वाक्पांडित्य न०** वक्तृत्वाचा गुण. **वाक्पारुष्य न०** भाषणाचा कठोरपणा. **वाङ्मय वि०** १ शब्द, वाणी, इ० संबंधाचें. २ शब्दमय; शब्दरूप. **न०** १ भाषा. २ वक्तृत्व. ३ कोणत्याही भाषेतील ग्रंथ समुच्चयानें. **वाङ्मुख न०** प्रस्तावना; उपोद्घात. **वाक्शस्त्र न०** शाप. **वाक्चतुष्टय न०** परा, पश्यंती, मध्यमा, आणि वैखरी, ह्या शब्दोच्चारणाच्या ज्या चार अवस्था त्या समुच्चयानें. **वाक्सिद्धि स्त्री०** मुखांतून जें वाक्य उच्चारलें जाईल त्याला अनुसरून परिणाम व्हावा असें जें कोणा साधु इ० चे सामर्थ्य असतें तें. **वाक्स्तंभ पु०** गहिंवर, घसा लाखटणें, इ० कारणांनीं शब्दोच्चार करण्याचें सामर्थ्य नाहींसें होणें. **वाचिक वि०** १ शब्दांनीं व्यक्त केलेलें. २ बोलण्यानें घडलेलें ( पाप ). **न०** १ निरोप. २ **(मराठींत)** हकीगत; घडलेल्या गोष्टीचें निवेदन किं० कथन. **वाग्देवी, वाग्वल्लरी, वाग्वल्ली, वाग्विलासिनी स्त्री०** भाषेची देवता सरस्वती. **वाग्मी** [ **सं०** वाग्मिन् ] **पु०** १ मोठा वक्ता. २ फार बोलणारा. ३ बृहस्पति. ४ नैयायिक.

**वाक पु०** एक पक्षी.

**वांक, वाक** [ **सं०** वंक=नदीचें वांकण; खोगिराचें पुढचें टोंक ] **स्त्री०** स्त्रियाचें कोपरावर घालण्याचें एक भूषणविशेष. **न०** १ रहाटाचे किं० गाडीचें जें चाक त्याचा परीघ ज्या सहा ( किं० अधिक ) तुकड्यांचा बनविलेला असतो ते तुकडे प्रत्येक. २ होडी करताना जे तक्ते पुढच्या टोंकापासून तों मागच्या टोंकापर्यंत बसविलेले असतात ते प्रत्येक. **पु०, न०** वाकडेपणा; वक्रता ( पदार्थ, भाषण, इ० चा ). **पु०** कोणेकाचें कोणेकाशीं असते ते वैमनस्य किं० असतो तो विरुद्धपणा.

**वाक पु०** घायाळ, अंबाडी, ताग, इ० चे तंतु,–जे वळून दोऱ्या इ० पदार्थ करतात.

**वाकचवडा** (–डे) पुढें ' वाघ ' मध्यें ' वाघचवडा (–डें) ' पहा.

**वांकड, वांकडी स्त्री०** संतत वृष्टि; पावसाचीझड.

**वांकडणें** [ **म०** वांकडा होणें ] **अ० क्रि०** १ थंडी इ० मुळे शरीर वांकडें होणें. २ वांकडें होणें ( सामान्यतः ).

**वांकडा** [ **सं०** वंक=नदीचें वाकण ] **वि०** १ नागमोडी रूपाचा. २ सरळ नव्हे असा. ३ प्रतिकूल. ४ नीतिमार्गाला सोडून असलेला. ५ दुष्ट; वैर करणारा. ६ हट्टी; हेकट. **वांकडें न०** १ वैर. २ प्रतिकूळ ग्रह, मत, किं० समजूत. ३ अनीतिचें वर्तन. ॐ **कोणेकाचें कोणेकाशीं वांकडें असणें** ( किं० पडणें ) त्याच्यांत वैमनस्य किं० शत्रुत्व असणें ( किं० उत्पन्न होणें ). **वांकडें पाऊल न०** परदारागमन किं० परपुरुषगमन इ० रूप पातक. **कोणेकाला वांकडें दाखविणें** त्याला खिजविण्यासाठीं त्याच्या पुढें वांकडीं तोंडें करणें. **वांकडें घेणें** १ वाटोळें फिरत राहाणें; घिरट्या घालणें. २ कोणेकाचें बोलणें आपल्या उलट आहे असा स्वताचा खोटा ग्रह करून घेणें. **वांकडकोका, वांकडमुसका, वांकडातिकडा, वांकडातिरका, वांकडादेहुडा वि०** १ बेढब आणि कुरूप दिस–

ण्याजोगा आणि अनेक ठिकाणीं आणि अनेक प्रकारें वांकडा असा ( माणूस, पशु, बांधलेलें घर, इ० ). २ गैरसोयीची ( योजना, सरणी, बेत, इ० ). ३ दुसऱ्याला फसविण्यासाठीं अवलंबिलेली लबाडीची किं० लुच्चेगिरीची ( सरणी, भाषणपद्धति, कोटिक्रम, इ० ). **वांकडी दृष्टि ( किं० नजर ) स्त्री०, वांकडा डोळा पु०** गैरमर्जी. **वांकडी पगडी करणें** (किं० ठेवणें) १ नखरेबाजीनें वागणें. २ उर्मटपणानें वागणें; दुसऱ्यास तुच्छ लेखणें. **वांकडी हौस स्त्री०** १ वांकड्या शिंगांची हौस. २ चिंचेचें झाड. **वांकडी समजूत स्त्री०** १ अडाणीपणाचा ग्रह किं० मत; दुराग्रह. २ वैरभाव; वैमनस्य.

**वांकडा** [ सं० वंक ] पु० मुलांच्या दंडांत बालवयाचा एक सोन्याचा किं० चांदीचा दागिना.

**वाकंडी** पुढें ' वाखंडी ' पहा.

**वांकडी** [ म० वांकडा ] स्त्री० अतिशय कडक थंडी,–जिच्यामुळें हातपाय वांकडे होतात.

**वांकण** [ सं० वंक ] न० १ वांकडेपणा ( सामान्यतः ). २ रस्ता, नदीचा प्रवाह, गमनाची सरणी, झाडाची फांदी, इ० मध्यें एकदम झालेला दिशेचा बदल. ३ जमिनींत घुसलेला पाण्याचा प्रवाह,–उपसागर इ० रूप. ४ वांकलेला भाग.

**वांकणें** [ सं० वंक ] अ० क्रि० १ वक्र होणें; वांकडें होणें. २ ओणवें होणें. ३ नम्र होणें; शरण जाणें; ताठा सोडणें; आज्ञाधारक होणें.

**वांकती** [ म० वांकणें ] स्त्री० पदार्थ आंत भरण्यासाठीं किं० घेण्यासाठीं धोतर, उपरणें, इ० वस्त्राचा खोलगट केलेला भाग.

**वाकदोर, वाखदोर** [ म० वाक, वाख+दोर ] पु० वाखाचा बारीक तंतु किं० अशा तंतूंची वळलेली दोरी.

**वाकन (–नि–) विशी, वाकनिशी (–सी)** खालीं ' वाकनिवीस ' मध्यें पहा.

**वाकानिवीस, वाकनीस** [ फा० वाकि आह् नवीस् ] पु० १ बड्या गृहस्थाच्या कुटुंबांत खाजगी हिशेब, कागदपत्रें, तैनात, भोजनाची व्यवस्था, इ० संबंधाचीं कामें पाहाणारा नोकर. २ बड्या कुटुंबांत घडणाऱ्या गोष्टींचा इतिहास ठेवणें ह्या कामगिरीवर नेमिलेला अधिकारी. ३ शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकीं एक. ह्याचें काम खाजगी पत्रें, जमाखर्च, दाणागोटा, पागा, इ० वर देखरेख करणें हें असे. ॐ **वाकानिविशी, वाकनिशी (–सी ) स्त्री०** वाकनिसाचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र.

**वाकब** [ अ० वाकफ् ] वि० कोणत्याही विशिष्ट शास्त्र, कला, इ० मध्यें पूर्ण माहीतगार किं० तरबेज. ॐ **वाकबदार, वाकबगार वि०** वर ' वाकब ' पहा. **वाकबदा (–गा–)री स्त्री०** निष्णातपणा.

**वाकवट (–टी), वाखवट** [म० वाक; वाख] स्त्री० वाखाच्या तंतूंचा गोळा किं० जुडगें.

**वाकविणें** [ म० ' वाकणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ वक्र करणें. २ नम्र करणें. ३ अनुकूल करून घेणें. ४ आज्ञाधारक करणें. ५ (कोणेकाचा ) नक्षा उतरण; ( त्याला ) जिरविणें. ६ अनीतिच्या मार्गाकडे ( कोणेकाला ) वळविणें.

**वांकस, वाकस पु०, न०** तुळया, वांसे, इ० तासण्याचें सुताराचें एक हत्यार.

**वांकसणें, वाकसणें** [ म० वांकस, वाकस] स० क्रि० (तुळई, वांसा, इ०) वाकसानें तासणें किं० सोलणें.

**वाकसळ, वाकसाळ स्त्री०** तांदुळाची एक [ जात.

**वाकळ** [ स० वल्क, वल्कल ] स्त्री० १ वस्त्राचे तुकडे एकावर एक शिवून केलेलें मऊ पांघरूण; गोधडी. २ फाटून गेलेलें आणि जीर्ण असें धोतर, लुगडें, इ० वस्त्र. ३ अव्यवस्थितपणें लुगडें, चोळी, इ० पेहरलेली मुलगी किं० स्त्री. ४ म्हातारी जख्ख अशी स्त्री.

**वाका** [ अ० वांकिआ ] पु० १ वर्तमान; हकीगत. २ घडलेली गोष्ट. ३ मरण; मृत्यु. ४ आपआपल्या हद्दींत किं० कार्यक्षेत्रांत काय काय गोष्टी विशिष्ट अवधींत घडल्या त्यांच्या संबंधाची हकीगत तो तो अधिकारी सरकारास कळवितो ती. ५ आपआपली बाजू प्रत्येक पक्ष पंचांना सांगतो ती.

**वांकाड, वांकाण** मागें ' वांकण ' पहा.

**वांकाडी** [ म० वांकडा ] **स्त्री०** नदी, रस्ता, झाडाची फांदी, इ० चें वळण.

**वाकांडी, वाखंडी स्त्री०** ताग, आंबाडी, घायाळ, इ० चे दोरी इ० साठीं काढतात ते तंतु समुचयानें.

**वाकांडी स्त्री०** स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र [(नेसणें ).

**वांकारणें** [ **म०** वांकडा ] **अ० क्रि०** १ विमनस्कतेनें किं० असंतुष्टतेनें किं० रागावून कोणेकापासून फटकून वागणें किं० दूर सरणें. २ कोणेकाशीं संबंध न यावा किं० न घडावा म्हणून दूर दूर असणें.

**वांकाळा** [ **म०** वांक+आळा ] **पु०** रहाटास वांकाची नपूर आली असतां किं० एकादा वाक गळून पडला असतां त्याच्या स्थानीं जो दोरीचा बंध घालतात तो.मागें'वांक,' 'वाक 'न० अर्थ १ पहा.

**वांकी, वांक** [ **सं०** वंक ] **स्त्री०** स्त्रियांचा कोपरावर घालावयाचा एक दागिना.

**वांकी म्हस स्त्री०** मागें'वाकडा'मध्यें' वांकडी म्हैस 'पहा.

**वांकांव** [ **म०** वांकविणें ] **वि०** वाकविलेला; वाकडा केलेला;उ०पालखीची दांडी वांकांव असते.

**वांकुडणें** [ **म०** वांकडा ] **अ० क्रि०** १ वांकडा होणें. २ आखूड होणें.

**वांकुडा** मागें ' वांकडा ' पहा.

**वांकुडी स्त्री०** स्त्रियांचें नेण्याचें वस्त्र. मागें ' वाकांडी ' पहा.

**वाकुदणें अ० क्रि०** गमतीनें किं० रंगेलपणानें नाचणें, उड्या मारणें, किं० खिदळणें.

**वांकुल्या, वांकोल्या** [ **म०** वांक+वळणें ] **स्त्री० अ० व०** चेष्टेनें किं० टवाळकीनें किं० वात्रटपणानें वेडावाकडीं केलेलीं तोंडें (दाखविणें).

**वांकें** [ **सं०** वंक ] **न०** १ रहाट, गाडी, इ० चें जें चाक त्याचा परिघ ज्या सहा ( किं० अधिक ) तुकड्यांचा बनविलेला असतो ते तुकडे प्रत्येक. मागें ' वांक, वाक ' **न० अर्थ** १ पहा. २ अंघोळीच्या वेळीं धोतर, अंगपुसणें, इ० ठेवण्यासाठीं जी दांडी मोरीजवळ आडवी टांगलेली असते ती. ३ सोनार, सुतार, इ० कारागीर लोकांचीं हत्यारें खुपसून ठेवण्याची भिंतीला ठोकलेली जी दुहेरी पट्टी असते ती. ४ खटारा गाडीच्या बाजूच्या सहा लाकडांपैकीं प्रत्येक.

**वांकेनिविशी** इ०मागें'वाकनिविशी'इ०पहा.

**वांकेरी स्त्री०** एक वनस्पति. वांकेरांचें भातें औषधाच्या कामीं योजलें जातें.

**वांकोरणें स० क्रि०** वांकोरें नांवाच्या आउतानें ( शेतांत ) चर पाडणें.

**वांकोरा पु०** नखें, खिळा, इ० नीं अंग, जमीन, इ० वर ओढलेला ओरखडा किं० चरा.

**वांकोरें न०** १ दाराचें खालचें कुसू अंगचें न करतां लोखंडाचें करून बसविलेलें असतें तें. २ शेतांत लहान लहान चर पाडण्याचें एक आउत.

**वांकोळया स्त्री० अ० व०** मागें ' वांकुल्या ' पहा.

**वाक्चतुष्टय, वाक्चातुर्य, वाक्चापल्य, वाक्छल, वाक्पटु, वाक्पंडित,वाक्पांडित्य, वाक्पाटव, वाक्पारुष्य** मागें ' वाक् ' मध्यें हे शब्द पहा.

**वाक्य** [ **सं०** ] **न०** १ भाषण. २(**व्याकरण**) विचार पूर्णपणें व्यक्त करणारा आणि शिष्टांच्या रूढीप्रमाणें जुळविलेला शब्दसमुदाय. ३ आज्ञा. ४ नियम. ५ ( **संस्कृत व्याकरण** ) वार्तिक. ६ ( **ज्योतिष** ) सूर्याच्या गतीवरून केलेलें गणित. ७ धर्मशास्त्र इ० बाबतींत निर्णायक जें सूत्र तें किं० जो नियम तो. ॥ **वाक्यखंडन न०** १ व्याकरणाच्या नियमाप्रमाणें वाक्याचे घटक वेगवेगळे करणें. २ प्रतिपक्ष्याच्या विधानाचें निराकरण. **वाक्यालंकार पु०** वाक्य कानाला गोड लागावें किं० वक्त्याला पुढचा शब्द आठवावयाला वेळ मिळावा ह्यासाठीं जो शब्द किं० जे शब्द योजतात ते: उ० ' रावण उताणा पडला ' ह्या वाक्याबद्दल ' रावण जो आहे तो उताणा पडला ' हें वाक्य पुराणिकानें उच्चारलें तर ' जो आहे तो ' हे शब्द वाक्यालंकाररूप होत.

**वाख पु०** ताग, अंबाडी, घायाळ, इ० झाडांचे तंतु. या तंतूंच्या दोऱ्या इ० करण्याकडे उपयोग होतो.

**वाखंडी, वाखांडी स्त्री०** १ एक औषधी लता. २ घायाळ, अननस, इ० चे तंतु.

**वाखल स्त्री०** उपास, आजार, इ० मुळें खोल गेलेलें पोट किं० पोटाचा खोलगटपणा.

**वाखलणें** [ म० वाखा ] अ० क्रि० (मनुष्य, जनावर, इ० नीं ) वाख्यानें पीडित होणें किं० पीडित झालेलें असणें. खालीं 'वाखा' अर्थ ३ पहा.

**वाखळ** [ सं० वल्कल ] **स्त्री०** गोधडी. मागें ' वाकळ ' पहा.

**वाखा** [ अ० वाकिअ ] पु० १ अनर्थ; घोर संकट. २ युद्धांतील संहार; मारामारी. ३हगवण, आमांश, पटकी, पोटशूळ, इ० रोगांमुळें मनुष्य, पशु, इ०ची होते ती दुर्दशा. ६ अशा रोगांचा कोणेक स्थळीं मोठ्या प्रमाणावर झालेला प्रादुर्भाव.

**वाखांडी** मागें ' वाखंडी ' पहा.

**वाखाण, वाखाणकी,(–णी ) वाखाणणूक** [सं०व्याख्यान]स्त्री० स्तुति; तारीफ; शिफारस.

**वाखाणणें** [ सं० वि+आ+ख्या ]स०क्रि० स्तविणें; प्रशंसिणें; ०चे गोडवे गाणें. ॐ **वाखाणला गुरव देवळांत हगे** फाजिल स्तुति कोणेकाची केल्यास तो शेफारतो.

**वाखाळणें** वर ' वाखलणें ' पहा.

**वांखोरणें** [ म० वांकोरें ] स०क्रि०(शेतांत) वांकोरें ह्या आउतानें चर पाडणें. मागें ' वांकोरें पहा.

**वाग** [ म०वागविणें ] पु० पदार्थ वाहून नेला जाण्याची सोय किं० शक्यता; उ० आठकीची वाग म्ह० आठांनीं वाहून नेलें पाहिजे इतकें पदार्थाचें परिमाण.

**वाग** [ म० वागणें ] **स्त्री०** वर्तनाची सरणी; वागणूक.

**वांग पु०** कोणेक गळ्यावर एकसारखा ताण बराच वेळ पडला असतां त्या गळ्याचे ठायीं जो ताठपणा येतो तो किं० उठते ती कळ ( येणें ).

**वांग** [ सं० व्यंग ] पु० १ मनुष्याच्या मुख इ० कांवर जन्मजात किं० मागाहून उत्पन्न झालेले जे काळसर डाग ते प्रत्येक. २ सोनें, रुपें, इ० कांस मोरचूद, शिसें, इ०चा संबंध झाल्यानें त्यांजवर जो काळा डाग पडतो तो. ३ धातूचें पात्र घडवितांना त्यांचेवर जों हातोडीच्या ठोक्यांचीं चिन्हें उमटलेलीं असतात तीं प्रत्येक. ४ देवी, जखम, गळूं, इ० चीं चिन्हें जीं त्वचेवर राहातात तीं प्रत्येक.

**वागटी स्त्री०** १ एक प्रकारचा मासा. २ एक प्रकारचें जंगली मांजर.

**वागणूक** [ म० वागणें ] **स्त्री०** १ वर्तनाची सरणी. २ कोणत्याही व्यवहारांत कोणेकाची जी सरणी ती.

**वागणें** [ सं० वृत् ] **अ० क्रि०** १ वर्तन करणें· राहाणें. २ आपल्या स्थितीला अनुसरून वर्तन करीत असणें. ३आपल्या परिस्थितीला अनुसरून असणें किं० राहाणें. ४ ( कांहीं बोध किं० वर्तनाची सरणी ) मनांत जागृत असणें. ५ (हात पाय, मन, बुद्धि, इ० ) स्वस्व व्यापार करावयाला समर्थ असणें; उ० आपले हातपाय यथास्थितपणें वागत आहेत तोंपर्यंत दुसऱ्यावर कोणी भार घालीत नाहींत. ६ कोणेकाशी (कोणेकानें) व्यवहार करीत राहाणें. ७ ( कांहीं मनोविकार) चित्तामध्यें कांहीं प्रेरणा करीत असणें; उ० जोंपर्यंत तुझ्या मनांत वैरभाव वागत आहे तोंपर्यंत त्या सदोबाविषयीं तूं साशंकच राहशील. ८ ( चाल, रीति, सरणी, रूढि, लिपि, प्रचार, नाणें, इ० ) विशिष्ट समाजांत किं० देशांत चालू असणें. ॐ **आजारांतून उठून वागूं लागणें** घराबाहेर किं० घरांत तो पूर्वीप्रमाणें हिंडूं फिरूं लागणें.

**वागदोर पु०** घोड्याला चालवितांना त्याच्या गळ्याला बांधतात ती दोरी. मागें 'बाग' ' बागदोर ' पहा.

**वागबारस** [ सं० वत्स+द्वादशी ] **स्त्री०** कार्तिक शुद्ध द्वादशी ( किं० कित्येक प्रांतांत आश्विन कृष्ण द्वादशी). ह्या दिवशीं गुराखी कोकणांत उत्सव करतात. मागें' वसुबारस ' पहा.

**वांगवांग** [ सं० व्यंग ] **स्त्री०**अस्वस्थपणाची तरफड, धडपड, किं० चलनवलन; उ०माझें अंग वांगवांग करतें; उ० हें पोर आई देवाला गेल्यापासून वांगवांग करीत आहे.

**वागविणें** [ म० ' वागणें ' चे प्रयोजक ] **स० क्रि०** १ (उपदेश इ०)मनांत साठविणें किं० स्मरणांत ठेवणें; उ० माझा बोध तूं नीट मनांत वागीव. २ ( कोणेकाशीं ) चांगल्या किं० वाईट

रीतीनें वर्तन करणें; उ० तो गोविंदराव आपल्या बायकोला वाईट रीतीनें वागवितो. ३ ( मुलेंबाळें, आश्रित, इ० चा मार ) वाहून त्यांचें संगोपन, पालन, इ० करीत असणें. ४ ( ओझें, काम, कारभार, जबाबदारी, इ० ) यथायोग्य रीतीनें वाहणें, चालविणें, किं० संभाळणें. **कोणेकाला वागवून घेणें** त्याचे दोष किं० अपराध पोटांत घालून त्याच्याशीं प्रेमानें वर्तन करणें. **वागायचा** [ म० वागवावयाचा ] वि० नित्याच्या वहिवाटींतील; नित्य उपयोगांत येण्याचा ( वस्त्र, पात्र, इ० पदार्थ). या शब्दाचीं इतर रूपें ' वागाचा, ' 'वाघाचा' अशीं आहेत. याच्या व्यावर्तकत्वें सणावाराचा, प्रसंगविशेषाचा, इ०

**वागळ** न०, स्त्री० पुढें ' वागूळ ' पहा.

**वागळी** स्त्री० एक प्रकारचा मत्स्य.

**वागाटी** एक वनस्पती. पुढें 'वाघांटी' पहा.

**वांगी** [ सं० वंग=वांगें ] स्त्री० मिरची, तंबाखू, बटाटा, टोमाटो, इ० च्या वर्गांतील एक झाड. **वांगें** न० ह्या झाडाचें फळ. ह्या फळाचें भरीत, भाजी, भर्जी, वांगीभात, इ० खाद्य करतात. ॐ **वांगेंसट** स्त्री० मार्गशीर्ष शुध्द षष्ठी ही तिथि. चातुर्मास्यांत जे कोणी वांगीं खात नाहींत ते ह्या तिथीपासून तीं खाऊं लागतात.

**वागुरा** [ सं० ] स्त्री० १ जाळें; फास. २ वाघांटी ही वनस्पति. ॐ **वागुऱ्या, वागोऱ्या** स्त्री० अ० व० वस्त्र अव्यवस्थितपणें किं० बहुत काळ वापरल्यामुळें वस्त्राच्या झालेल्या चिंध्या किं० लक्तरें; उ० एका महिन्यांत ह्या साडीच्या चिंगीनें वागुऱ्या करून टाकल्या. **टीप,**–वागुरी, वागोरी, हीं ए० व० चीं रूपें क्वचित् योजण्यांत येतात. [ रंवथ ( करणें ).

**वागुळ** स्त्री० गाय, म्हैस, इ० करतात तें

**वागूळ, वागळ, वाघूळ** [ सं० वलगुल ] न०, स्त्री० १ एक पक्षी,–जो पायांनीं झाडाची फांदी धरून खालीं डोकें लोंबत सोडून राहातो. ह्या पक्ष्याला ' वडवाघूळ ' असेंही म्हणतात. २ पाकोळी ( कोंकणांत प्रचार ).

**वांगेंसट** वर ' वांगी ' मध्यें पहा.

**वागोऱ्या** मागें 'वागुरा' मध्यें 'वागुऱ्या' पहा.

**वाघ** [ सं० व्याघ्र ] पु० १ अत्यन्त क्रूर असा एक अरण्यांतील प्राणी. २ एक क्षुद्र कीटविशेष. ३ ( लाक्षणिक ) विद्या, शौर्य, मुत्सद्देगिरी, इ० गुणांनीं जो श्रेष्ठ तो. ॐ **वाघ आणि बकरी यांनीं एकत्र पाणी पिणें** परस्परविरोधी अशा गुणांच्या दोन माणसांनीं एके ठिकाणीं गुण्यागोविंदानें राहाणें. ॐ **वाघचक्का** पु० एक सुंदर फुलांचें झाड,–ज्याच्या पाकळ्यांना आणि पानांना वाघाच्या नखासारखे आंकडे असतात. **वाघचवडा** पु०, **वाघचवडें** न० उठाणूसारखी एक विकृति,–जी प्राय: तळहाताला होते ती. ही विकृति वाघाच्या मांसाचा स्पर्श केल्यास बरी होते अशी समजूत आहे. **वाघट** न० १ वाघ ( तुच्छतेनें ). २ वाघासारखा पण लहान असा एक जंगली प्राणी. **वाघनख** न० १ वाघाचें नख. २ वाघाचीं नखें कोंदणांत बसवून मुलांच्या गळ्यांत घालतात तो एक दागिना. ३ शत्रूचें अंग ओरबाडून फाडून काढण्याचें एक हत्यार. ह्या अर्थी ' वाघनखी ' स्त्री० असाही शब्द आहे. **वाघमारी** वि० फार अमली ( सुपारी, हरीक, इ० ), **वाघमाऱ्या** वि० अत्यंत क्रूर आणि साहसी (माणूस ). **वाघमेंढ्या, शेळ्यामेंढ्या** स्त्री० अ० व० मुलांचा एक खेळ. **वाघमुंगी** स्त्री० एका जातीची मुंगी,–जी चावली असतां फार वेळ आग होत राहाते. **वाघरूं** न० १ वाघ ( प्रेमानें ). २ लहान वाघ. ३ वाघ ( तुच्छतेनें ). **वाघवें, वाघावें** न० वाघानें शेळ्या, मेंढ्या, गुरेढोरें, इ० खाऊन टाकून एकाद्या गांवीं मांडलेला अनर्थ. **वाघाची जाळी** स्त्री० वाघाची लपून बसावयाची झाडाच्या गुंतागुंतींतील जागा. **वाघाची मावशी** स्त्री० मांजर. **वाघाचें कातडें** न० जो अधिकाराच्या स्थानावरून च्युत झालेला असला तरी लोकांना उपद्रव करीत असतो आणि म्हणून ज्याची लोकांना भीति वाटते असा मनुष्य. **वाघाड्या** पु० मंत्रातंत्राच्या योगानें मी तुमचा वाघापासून बचाव करीन अशा प्रवाशांना थापा मारून त्यांच्यापासून पैसे उपटणारा माणूस. **वाघी कवडी** स्त्री० एक प्रकारची कवडी,–जीवर वाघाच्या अंगावरी

पट्ट्यांसारखे बारीक बारीक पट्टे असतात. **वाघीण स्त्री०** वाघाच्या जातीची स्त्री. **वाघी तंबाखू, व्याघ्रांबरी तंबाखू स्त्री०** एक प्रकारची तंबाखू,-जिच्या पानावर वाघाच्या अंगावरील पट्ट्यांसारखे पट्टे असतात. ही तंबाखू फार कडक असते. **वाघी, वाघा, वाघ्या** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

**वाघर, वाघरी** [ सं० वागुरा ] **स्त्री०** हरिण इ० जनावरांना पकडावयासाठीं पसरतात ते जाळें(पसरणें,लावणें,ताणणें). ⚘ **कोणेकाला वाघर (किं०वाघरी )करणें** त्याला ( भिकारी, यजमान, सावकारानें पाठविलेले तगादेदार, पोरें इ० नीं ) गांजणें, छळणें, किं० सळो का पळो करणें. **वाघरी पु०** जाळ्यांत पशु, पक्षी, इ० पकडणाऱ्या लोकांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**वाघळ** [ सं० वल्गुल=वडवाघूळ ] **स्त्री०, न०** एक पक्षी. वर ' वागूळ ' पहा.

**वाघा, वाघ्या** [ म० वाघ ] **पु०** खंडोबाचा भक्त. हा गळ्यांत वाघाच्या कातड्याची पिशवी ( जिला ' वाघी ' म्हणतात ती ) घालून तींत हळद किं० भंडार ठेवतो. खंडोबाच्या भक्त स्त्रीस ' मुरळी ' असें म्हणतात.

**वाघी** [ म० वाघ ] **स्त्री०** १ भंडार ठेवण्याची खंडोबाच्या भक्ताची वाघाच्या कातड्याची पिशवी. २ जिच्या पुढच्या टोकाला वाघाचा लाकडी मुखवटा असतो आणि जी जलद चालणारी असते अशी होडी. ३ घोड्याची झूल,-जीवर वाघाच्या अंगावरील पट्ट्यासारखे पट्टे असतात. ४ सुतार लोक लाकूड तासतांना तें ज्यावर ठेवितात तो ठोकळा. ५ दोन्ही टोकांकडे निमुळता खिळा; सुरसा.

**वाङ्मुख न०** मागें ' वाक् ' मध्यें पहा.

**वाचक** [ सं० ] **वि०** १ सांगणारा; बोलणारा. २ ( अर्थाचा ) बोधक ( शब्द ); कांहीं अर्थ, परिमाण, गुण, धर्म, संख्या, इ० दाखविणारा; उ० संख्यावाचक, कालवाचक, क्रियावाचक, इ०. **पु०** १ वक्ता. २ वाचणारा. ३ निरोप कळविणारा. ४ पुढें ' वाच्य ' पहा.

**वाचणी** [ म० वाचणी ] **स्त्री०** १ वाचण्याची क्रिया. २ कोणेकाला कांहीं धडा किं० पाठ इ० वाचावयास किं० म्हणावयास शिकविणें ( देणें, घेणें ); संथा ( देणें, घेणें ).

**वाचणें** [ सं० वाचय्=बोलावयास लावणें ] **स० क्रि०** कागद, पाटी, इ० वर लिहिलेली अक्षरें, वाक्यें, इ० वरून नजर फिरवून तीं मोठ्यानें उच्चारणें किं० तीं-न उच्चारतां त्यांच्यावर नजर फिरवून त्याच्या अर्थाचें ग्रहण करणें. अंधळे लोक कांहीं विशेष प्रकारें लिहिलेले लेख स्पर्शेंद्रियानें वाचूं शकतात. ⚘ **कोणेकापुढें पाढा ( किं० पाढा ) वाचणें** १ त्याला तपशीलवार सूचना देणें. २ त्याला साद्यन्त हकीगत निवेदिणें.

**वांचणें** [सं० वच्, वंच्=फसविणें, चुकविणें] **अ० क्रि०** १ टिकून राहणें;बचावणें;कांहीं कठिण प्रसंगांतून निभावणें. २ जगणें; जिवंत राहणें; उ०माझे सगळे पूर्वज ऐंशी वर्षांहून अधिक वांचले. ⚘ **वांचण्याच्या पंथास लागणें** आजारानें मरणोन्मुख असा माणूस बरा होण्याचा संभव दिसूं लागणें.

**वाचन** [ सं० ] **न०** १ ग्रंथ इ० वाचणें. २ पठन, म्हणणें, उच्चारणें. उ० पुण्याहवाचन.

**वाचनक** [ सं० ] **न०** उखाणा; कोडें.

**वाचनिक** [ सं० ] **वि०** १ शब्दांनीं व्यक्त केलेलें किं० सांगितलेलें. २ बोलण्यानें घडलेलें ( पाप ). याच्या व्यावर्तकत्वें ' मानसिक ' आणि ' कायिक '. **न०** निरोप.

**वाचस्पति** [ सं० ] **पु०** १ बृहस्पति. २ विद्वान्. ३ विष्णु. ⚘ **वाचस्पत्य न०** वक्तृत्व.

**वाचा** [सं० वाचा=वाणी; जिव्हा;सरस्वती] **स्त्री०** १ भाषण. २ बोलण्याची ताकद; उ० गायीला वाचा नाहीं. ३ कांहीं करीन अशा अर्थाचें वचन, प्रतिज्ञा, किं० करार. ४ ज्याचा उगम ठाऊक नाहीं अशी बातमी, बोध, सूचना, इ०. ५ अवसरणी. मागें ' अवसरणी ' पहा. ⚘ **बरी वाचे तुझें काय वेचे ?** सभ्यपणानें तूं बोललास तर त्यांत तुझें काय नुकसान होईल ? कांहीं नाहीं. **वाचा उलटणें ( किं० पालटणें**

किं० फिरणें ) कांहीं काम आपल्या अंगावर आल्याकारणानें त्याची तरफदारी करणें अशक्य होणें म्ह० स्वस्थच बसणें जरूर होणें. **वाचा फुटणें** राघू, मूल, इ० बोलूं लागणें किं० त्यांना बोलतां येऊं लागणें. **कोणेकावर वाचा फोडणें** त्याचें अनिष्ट होईल किं० होओ, त्याचें निसंतान होईल किं० होओ, इ० रूप शाप उच्चारणें. **कोणेकाची वाचा लवणें** ( किं० वदणें ) घडलेल्या कांहीं प्रकारासंबंधानें आपलें मत बोलून दाखविणें त्याला जरूर वाटणें किं० बोलून दाखविण्याची त्याला उत्कट प्रेरणा होणें. **वाचा विटाळणें** १ नालायक माणसाची स्तुति करणें. २ शिव्या देणें. ३ दिलेलें वचन किं० केलेली प्रतिज्ञा न निस्तरणें. **तुझी वाचा साखरेनें भरो** चांगलें किं० शुभ बोलल्याबद्दल तुझ्या तोंडांत साखर पडो ! शाबास ! **वाचादत्त** वि० अमुक पदार्थ अमक्याला मी दिला अशा स्पष्ट शब्दांनीं दिलेला ( जो पदार्थ तो ). **वाचाट, वाचाल,वाचाळ**[सं०]वि० बडबड्या; पुष्कळ बोलणारा. **वाचांश** पु० १ ब्र, अक्षर मुद्दां. निषेधीं प्रयोग; उ० त्याणें मजविरुद्ध इतकें अकाडतांडव केलें तरी मी कांहीं वाचांश काढला नाहीं ( किं० केला नाहीं ). २ एकाद्या विषयासंबंधानें बोलणें ( काढणें, निघणें ); उ० तुमच्या संभाषणांत गोदीच्या लग्नासंबंधानें कांहीं वाचांश निघाला होता काय ? ३ कांहीं रहस्याचा कोणेकानें केलेला किं० त्याच्या हातून झालेला बोभाटा, परिस्फुटता, किं० प्रकटीकरण ( करणें ). ४ मी कांहीं करीन अशा अर्थाची प्रतिज्ञा ( करणें ). **वाचाशक्ति** स्त्री० १ वक्तृत्व; जोरदार भाषण करण्याची कोणेकाची शैली. २ न अडखळतां बोलण्याची कोणेकाची शक्ति किं० सामर्थ्य. **वाचाळपंचविशी** स्त्री०, **वाचाळपंचांग** न० वटवट, बडबड, टकळी ( लावणें, करणें, चालविणें, इ० ). **वाचाळवाणा (-णी )** वि०बडबड्या; गलागला बोलणारा.

**वाचिक** मागें ' वाच् ' मध्यें पहा.

**वाची** [ सं० वाचिन् ] वि० ( उपपद समासांत उत्तरपदीं ) सांगणारा, दर्शविणारा, बोधक; उ० काळवाची, धर्मवाची, इ०.

**वांचून** [ म० वांचणें ] श० यो० अ०,क्रि० वि० शिवाय, खेरीज; उ० हा श्लोक पाठ केल्यावांचून मी तुला येथून हालूं देणार नाहीं; उ० रामभाऊवांचून सर्व लोक तेथें हजर होते.

**वाच्य** [ सं० ] वि० १ बोलण्यास किं० सांगण्यास योग्य किं० आवश्यक. २ निंद्य; गर्हणीय; दोषास पात्र. ३ शब्दांचा मूळचा (अर्थ), –लाक्षणिक अर्थ आणि व्यंग्यार्थ याच्या व्यावर्तकत्वें. न० १ निंदा; दूषण. २ मूळचा अर्थ. ३ प्रतिपादनाचा विषय; वर्णनाचा पदार्थ; उ० खुरांचा भग्नपणा, गळ्याखालीं सास्ना ( पोळी ) असणें, दूध देणें, इ० धर्मांनीं युक्त जो प्राणी तो वाच्य आणि ' गाय ' हा त्या प्राण्याचा वाचक. वाच्य आणि वाचक याचा जो संबंध तो ' वाच्यवाचकसंबंध. ' ॐ **वाच्यता** स्त्री० १ दोष;निंदा. २ ( **मराठींत** ) रहस्याचें प्रकटीकरण; उ० ह्या आपल्या बेताची वाच्यता करूं नको.

**वांछा** [ सं० ] स्त्री० इच्छा; अभिलाष; मनोरथ.

**वांच्छिणें** [ सं० वांच्छ्=इच्छिणें ] स० क्रि० इच्छिणें.

**वांच्छित** [ सं० ] वि० जें इच्छिलें तें; इष्ट. न० मनोरथ; इच्छिलेला पदार्थ.

**वांज, वांजट** इ० पुढें ' वांझ, ' ' वांझट, ' इ० पहा.

**वाजगस्त** [ म० वाजणें+फा० गश्तन्= फिरणें ] स्त्री० घुंगराची काठी ठोकीत ठोकीत आणि फिरत फिरत पहारेवाल्यानें केलेला पहारा. याच्या व्यावर्तकत्वें ' चोरगस्त. '

**वाजट** [ म० वाजणें ] वि० १ प्रख्यात, प्रसिद्ध, जगजाहीर (चांगल्या किं० वाईट अर्थी). २ ज्या विषयीं लोक बोलत आहेत असा (प्रकार, गोष्ट, इ० ). ३ भरपूर आवाज ज्यांतून निघतो असें ( वाद्य ). न० १ प्रसिद्धि. २ बोभाटा. ३ कांहीं रहस्याची परिस्फुटता ( करणें ).

**वाजणें** [ सं० ' वद् ' चें प्रयोजक ] अ० क्रि० १ शब्द करणें; आवाज काढणें; उ० ही झांज किं० घंटा चांगली वाजत नाहीं. २ (कांहीं गोष्ट) प्रसिद्ध किं० जगजाहीर होणें. ३ ( थंडी, हीव )

अनुभूत होणें; उ० मला थंडी वाजते. ४ थंडी, भीति, इ० मुळें ( दांतांच्या दोन्ही कवळ्या ) एकमेकींवर आपटणें. ५ ( वारा ) वाहाणें; उ० वारा वाजेल तशी पीठ ओढवावी. ६ ( वांसा, तुळई, इ० ) वरच्या भारामुळें न मोडतां करकरणें किं० करकरत राहाणें. ॐ **बारा वाजणें** १ उतरती कळा लागणें; ऱ्हास पावणें. २ समाप्त होणें; नष्ट होणें. **बारा वाजविणें** १ उतरती कळा लागेल असें करणें. २ समाप्त, उध्वस्त, किं० नष्ट करणें; उ० तूं उधारीनें माल देत गेलास तर तुझ्या दुकानाचे लवकरच बारा वाजतील. **टीप**,–रात्रीचे बारा वाजले म्हणजे तो दिवस संपला इ० घड्याळाचे दाखले ह्या दोन्ही वाक्प्रचारांना आधारभूत आहेत. **वाजणें गाजणें** अ० क्रि० १ विजा लवून किं० कडकडून ( पाऊस ) पडणें. २ सर्व लोकांच्या संभाषणाचा ( कांहीं खबर, गोष्ट ) विषय होणें. **वाजत गाजत** क्रि० वि० वाद्यें वाजवीत, थाटमाट करून, प्रसिद्धपणें ( येणें, जाणें, मिरवणें, इ० ).

**वाजता** [ म० वाजणें ] वि० आवाज काढणारा; खळखळणारा. ॐ **वाजता नारळ** पु० जो नारळ हालविला असतां आंतील पाणी वाजतें असा नारळ. **वाजता पुडा** पु०, **वाजतें पुड** न० ज्यावर हाताचा आघात केला जातो तो पुडा. मागें ' धुमा ' अर्थ १ आणि ' पुडा ' अर्थ २ पहा. **वाजती घांट** स्त्री० कानीं पडलेली कांहीही गुप्त गोष्ट ज्याला त्याला सांगत सुटणारा माणूस.

**वाजंत्र,वाजंत्रें** [ सं० वादित्र ] न० १ वाद्य. २ वायुवाद्य. ३ सनई, संबळ, आणि सूर, ह्या तीन वाद्यांचा ताफा. ४ ( **लाक्षणिक** ) मुलाचें रडणें. ॐ **वाजंत्री** स्त्री० सनई,सूर,आणि संबळ, हीं वाद्यें वाजविणाऱ्यांचा ताफा.

**वाजपुशी,वाजपूस** [ फा० वाझ्पुर्स् ] स्त्री० चौकशी; विचारणा; वारतपुस्त.

**वाजपेय** [ सं० ] पुं०, न० यज्ञविशेष. ॐ **वाजपेयी** [ सं० वाजपेयिन् ] पु० वाजपेय यज्ञ करणारा किं० त्याचा कोणीही वंशज.

**वाजब, वाजबी, वाजवी, वाजावाजवी** [ अ० वाजिब् ] वि० योग्य; समंजसपणाचें; शिस्तवार; न्याय्य; रास्त.

**वाजबमिती, वाजीबमिती** [ अ० वाजिब् +म० मिती ] स्त्री० १ पूर्वी होऊन गेलेल्या व्यवहाराचा नंतर कांहीं दिवसांनीं कागद करावयाचा असतां त्या कागदांत पूर्वीची खरी तारीख किं० मिती नमूद करतात ती.२ पुढें व्हावयाच्या व्यवहाराचा अगोदर कागद करावयाचा असतां पुढची तारीख किं० मिति घालतात ती.

**वाजबुल अर्ज** [अ० वाजिब् उल् अर्ज्] स्त्री० लेखी आज्ञा किं० परवानगी.

**वाजविणें** [ म० ' वाजणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ वाजावयास लावणें; वाजेल असें करणें. २ प्रसिद्ध करणें; जगजाहीर करणें. ॐ **कोणेकाचे बारा वाजविणें** त्याचा नाश किं० विध्वंस करणें;तें नष्ट करणें. मागें ' वाजणें ' मध्यें हा वाक्प्रचार पहा.

**वाजावाजा, वाजागाजा, गाजावाजा** पु०, **वाजी** स्त्री० [ म० वाजणें, गाजणें ] पु० १ बोभाटा; प्रसिद्धि; प्रख्याति ( करणें, होणें ). २ कीर्ति. ॐ **कोणेकाचा वाजावाजा(गाजावाजा किं०वाजा गाजा) करणें, कोणेकाचे वाजेवाजे करणें** १ त्याची फाजिल उभेउभे करणें; त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाणें.

**वाजी** [ सं० वाजिन् ] वि० १ चपळ; वेगवान्.२बलिष्ट. पु०१घोडा. २ बाण. ३ वाजसनेयी ब्राह्मण. ॐ **वाजिशाळा** स्त्री० घोड्यांची पागा. **वाजिमेघ** पु० अश्वमेध. **वाजिनी** स्त्री० घोडी.

**वाजीकर** [सं०] वि० कामोत्पादक (औषध).

**वाजीकरण** न० वीर्याची वृद्धि करणारें एक औषधविशेष. [पहा.

**वाजीबमिती** स्त्री० मागें ' वाजबमिती '

**वांझ, वांझटोळी** [ सं० वंध्या ] स्त्री० जिला अपत्यें होत नाहींत अशी स्त्री. वि० १ जी गर्भधारण करूं शकत नाहीं किं० अपत्यें प्रसवूं शकत नाहीं अशी ( स्त्री ). २ ज्याच्या वीर्यापासून स्त्रीचे ठायीं गर्भाचें आधान होऊं शकत नाहीं असा ( पुरुष ).३ज्याचे पासून नफा,वैभव,

समृद्धि, इ० मिळत नाहीं असा ( धंदा, नोकरी इ० ). ४ ज्यां फुलें पुंकेसरात्मकच असतात आणि म्हणून ज्यांची फलरूप परिणति होत नाहीं अशीं ( फुलें ). ५ ज्या झाडावर फळें धरत नाहींत किं० जें नर झाड आहे तें( झाड).६ ज्यांत असावा तितका गर नाहीं असें ( फळ ); जितें असावेत तितके दाणे नाहींत किं० मुळींच दाणे नाहींत अशी ( शेंग ). ७ ज्यांत गरे थोडे असा ( फणस ). **टीप,–वांझ, वांझा** पु०, **वांझ, वांझी** स्त्री०, **वांझटोळा** पु०,**वांझटोळी** स्त्री०. ॐ **वांझखडा** पु० गर्भ न राहावा म्हणून कांहीं स्त्रिया घेतात तें औषध. **वांझट** वि० थोडासा षंढ ( पुरुष ) किं० थोडीशी वांझ ( स्त्री ). **वांझोटी, वांझोळी** स्त्री० वांझ स्त्री ( निंदेंत ). **वांझतिथि, वांझतीथ,वांझीतिथि, वांझीतीथ** स्त्री० ज्या तिथीला कांहीं धर्मकृत्य, उपास, किं० मंगलकार्य, इ० विहित नाहीं ती तिथि. **वांझी पुनव, वांझी पौर्णिमा** स्त्री० पौष महिन्यांतील पौर्णिमा. पुष्कळ मुलें जिला आहेत अशा सुवासिनीस ह्या दिवशीं वांझ स्त्रिया जेवावयास बोलावतात,–तिच्या अशीर्वादानें आपणासही मुलें व्हावींत ह्या उद्देशानें. **वांझें ढग** न० ज्यापासून वृष्टि होत नाहीं असा मेघ.

**वाट** [सं० वाट=मार्ग ] स्त्री० १ रस्ता; मार्ग; उ० मी रामभाऊकडे कोणच्या वाटेनें जाऊं ? २ वर्तनक्रम; सरणी; उ० काशीनाथपंतानें अन्यायाच्या वाटेनें पैसे मिळविले. ३ परिणाम; गति; निकाल; शेवट; पर्यवसान; उ० मी आपली तक्रार वरिष्ठापुढें मांडली आहे, तिची काय वाट होते ती पाहावी. ४ तऱ्हा; प्रकार; रीति; उ० ह्या वाटेनें तें उदाहरण सुटणार नाहीं.५ बेंबीच्या खालीं पोटांत वाटीच्या आकाराचा उंचवटा असतो तो. जड ओझें उचलल्यानें ही वाट सरून म्ह० स्थानभ्रष्ट होऊन पोट दुखूं लागतें किं० अन्य प्रकारें उपद्रव होतो. ६ संभव; शक्यता; उ० अहमदाबादेस भरलेल्या पुढाऱ्यांच्या परिषदेचा निकाल आज कळण्याची वाट आहे. ॐ **तिघांच्या तीन वाटा करणें, चौघांच्या चार वाटा करणें** त्यांच्यांतील ऐक्याचा किं० सलोख्याचा भंग करणें; त्यांची फाटाफूट किं० दाणादाण करणें; त्यांच्यांत मत्सर किं० विरोध पिकविणें. **त्याला तिवाटांची माती येत नाहीं(किं० समजत नाहीं )** तो अत्यन्त अडाणी आहे. **देखली वाट करणें ( किं० पाहाणें )** ज्या वाटेनें कोणी आला असेल त्याच वाटेनें त्याणें परत जाणें; तो जसा आला तसा जाणें. **मधल्या वाटेस येणें** इष्ट वस्तु न मिळवितां येणें. **टीप,–** जाणें, नेणें, आणणें, हीं क्रियापदेंही याच सरणीनें योजतां येतात. **वाट करणें** १ रस्ता करणें किं० करून देणें; जाण्यायेण्याच्या वाटेतील अडचण नाहींशी करणें; उ० ह्या सतरंजीचा कोपरा दुमडून त्या सुताराला वाट करून दे. २ ( लाक्षणिक ) वर्तनक्रम ठरविणें किं० दाखवून देणें; अगोदरची व्यवस्था किं० मांडणी करणें. ३ दूर करणें; नाहींसा करणें. **एकाद्याची वाट धरणें** १ त्याच्या गतीला प्रतिबंध करणें. २ त्याच्या येण्याची किं० घडण्याची अपेक्षा करीत बसणें. **वाट पाहणें** १अपेक्षिणें. २उत्कंठेनें इच्छिणें. **वाट मारणें** रस्त्यांत लपून बसून मुशाफरांस लुटणें. **वाट लागणें** १ दूर होणें; नष्ट होणें; निरस्त होणें; निराकृत होणें. २ विल्हेस लागणें; निकालांत निघणें किं० काढलें जाणें. ३ समाप्त होणें; संपून जाणें; शिल्लक न राहाणें. **वाट वावरणें** १ निरर्थक खेप घालणें; व्यर्थ हेलपाटा घालणें. २वाटेवर रहदारी असणें;मुशाफरांनी किं० प्रवाशांनीं वाट गजबजलेली असणें. **वाट होणें** गत होणें; नष्ट होणें. **वाटेवर येणें** योग्य पद्धतीप्रमाणें किं० समंजसपणानें वागूं किं० वागूं लागणें. **एकाद्याच्या वाटेस जाणें** त्याची खोडी करणें; त्याची कुरापत काढणें; त्याला राग येईल असें त्याच्याशीं वर्तन करणें; त्याला चिडविणें. **वाटेस लावणें** १हाकलून देणें; निरोप देणें. २कोणेकास योग्य मार्ग दाखवून देणें. ३ निकालांत काढणें. **वाटेवर पडणें** अल्प श्रमानें किं० मुळींच श्रम न करतां प्राप्त किं० साध्य होण्याजोगा असणें; उ० नोकऱ्या काय वाटेवर पडल्या आहेत ? **वाट लावणें** १ आपल्या वाटेंतून काढून टाकणें किं० दूर सारणें. २ विल्हेवाट करणें; उ० दहा प्रकरणांची मी तीन तासांत वाट लाविली. ३ खाऊन टाकणें; संपवून टाकणें; मोडून तोडून टाकणें. **कोणे-**

**काला चारी वाटा(किं०बारा वाटा) मोकळ्या असणें** त्याला आवरणारा कोणी माणूस नसल्यामुळें त्याला हावें तिकडे जाण्याला मोकळीक असणें किं० स्वछंदानें वागण्याची मुभा असणें. **त्याची काय वाट झाली?** तो कोठे आहे? तो कोठे गेला? त्याला काय दैवगति प्राप्त झाली? तो दिसत कां नाहीं? **वाटेचा पाय(किं०वाटेचें वाऊल) आड वाटेस पडणें** चांगल्या माणसानें प्रसंगविशेषीं अनीतीची कांहीं गोष्ट करणें किं० चुकीच्या मार्गाचा अवलंब करणें. **वाटेवर येणें** पुन्हा नीट वागूं लागणें; ताळ्यावर येणें. **वाटकाढू, वाटाड्या** पु०प्रवाशाला वाट दाखविणारा. **वाटखर्ची** स्त्री० प्रवासांत खर्चावयासाठीं घेतलेला पैसा. **वाटचा चोर** पु०कोणीही मनुष्य; उ० ह्या चांदीच्या पेल्याला वाटचा चोर दहा रुपये देईल. **वाटचा वाटसरू** पु० कोणीही तिऱ्हाईत. **वाटतीट** स्त्री०भलताच किं०धोक्याचा रस्ता; रस्ता(सामान्यतः); उ०वाटेतिटेनें संभाळून जा बरें कां. **वाटपाडू (-ड्या)** पु०मुशाफरांना रस्त्यावर लुटणारा. **वाटभेट** स्त्री० सहजासहजीं रस्त्यांत कोणेकाची पडलेली गांठ किं० झालेली भेट. **वाटमार** स्त्री० रस्त्यांत कोणा बदमाषानें कोणेकावर केलेला हल्ला किं०त्याची केलेली लुबाडणूक. **वाट मार्ग** पु०रस्ता, वाट, सरणी. **वाटमार्गी** पु०प्रवासी; मुशाफर. **वाटमाऱ्या** पु० प्रवाशांवर रस्त्यांत हल्ला करून त्यांना लुबाडणारा चोर. **वाटेशेक** क्रि० वि० १ रस्त्यावर (असलेलीं सावलीचीं झाडें, पाण्याची सोय, घरें, धर्मशाळा, दूध, इ०). २ सबंध रस्ताभर; वाटेनें. **वाटसर, वाटसरू, वाटसारू, वाटसुरू, वाटसूर** पु०प्रवासी; मुशाफर. **वाटाडी, वाटाड्या** पु० प्रवाशाला वाट दाखविणारा. **वाटवणी** [म० वाट+पाणी] न० लघवी; मूत्र. **वाटवणी** [म० वाटाविणें] स्त्री० रस्त्यांत झाड, विहीर, इ० मागें टाकून प्रवाशानें पुढें जाणें.

**वाटकोळ, वाटखोळ, वाटकूळ, वाठखूळ, वाढोळ, वाढूळ** [सं० वाढ(पुष्कळ)+काळ] क्रि० वि०पुष्कळ वेळपर्यंत. पु०बहुत काळ; उशीर; अवकाश. टीप,—हे सर्व शब्द पवित्र जातकुळींचे असून आज अशिक्षितांतच त्यांना थारा उरला आहे.

**वाटगा, वाडगा** [म० वाटी] पु० पसरट आकाराचें मातीचें किं०धातूचें स्थळ पात्र.

**वाटघाट** [म० वाटणें+घाटणें] स्त्री० १ चटणी, औषधी द्रव्यें, इ० वाटणें, कुटणें, इ० क्रिया समुच्चयानें. २ कांहीं काम, कारभार, इ० संबंधाचें बोलणें, व्यवस्था, विचार, चर्चा, इ०.

**वांटचा** [म० वांटणें; सं० वंट्=विभागणें, वांटे पाडणें] वि० कोणेकाच्या बद्दल किं०ऐवजीं किं० स्थानीं असलेला किं० ठरविलेला; उ० मी आजारी आहें; माझ्या वांटचा तूंच पानसुपारीला जाऊन ये.

**वांटण** [म०वांटणें; सं० वंट्] न० जें वाटलें तें किं० जें वांटावयाचें तें (चटणी, पुरण, इ०)

**वाटणा** पुढें ' वाटाणा ' पहा.

**वांटणी** [म० वांटणें] स्त्री० १ विभागणी; विभागण्याची क्रिया. २ विभागण्याच्या क्रियेनें कोणेकाला मिळालेला अंश किं०भाग किं०हिस्सा; उ०माझ्या वाटणीस घराचे पांच खण आले आहेत. ३ पत्ते, गंजिफा, इ० चा भाग प्रत्येक खेळाडूला देणें किं० दिलेले पत्ते किं० गंजिफा समुच्चयानें. ॐ **वांटणीपत्र(-पत्रक)** न०समाईक वस्तूचा कोणाला किती अंश द्यावयाचा किं० दिला हें ज्यांत नमूद केलें आहे तो कागद.

**वांटणें** [सं० वंट्=विभागणें] स० क्रि० १ (पदार्थांचे) कांहीं एका तत्त्वावर भाग पाडणें. २ (पदार्थांचे) कांहीं तत्त्वावर भाग पाडून ते त्या त्या माणसांकडे किं० त्या त्या स्थानीं ठेवणें, देणें, किं० स्थापिणें; उ० पन्नास रुपये दहा माणसांत वांटले तर प्रत्येकाला पांच पांच रुपये येतात.

**वांटणें** [सं० वंट्=विभागणे] स० क्रि० १ पाटा इ० वर (मिरच्या, कोथिंबीर, इ० पदार्थ) घालून वरवंटा इ० साधनांनी (ते) चूर्णरूप करणें किं० अशा कृतीनें (पदार्थ विशेष) उत्पन्न करणें; उ० चटणी, कोथिंबीर, पुरण, तांदुळाच्या कण्या, इ० वांटणें. २ एकाद्या विषयाचा किं० प्रश्नाचा अनेकांनीं एकत्र बसून विचार करणें किं० एकानेंच आपल्या मनाशीं विचार करणें. **वांटून घाटून** क्रि० वि० १ पूर्णपणें चूर्णरूप करून. २ पूर्णपणें विचारांत घेऊन; साधक बाधक गोष्टींचा पूर्णपणें विचार करून. **कोणेकाला**

**वांटून घाटून पिणें** (किं० खाणें किं० गिळणें) त्याच्यावर करडा अमल चालवून किं० त्याच्यावर फाजील नियंत्रणा लादून त्याला सतावणें किं० गांजणें; त्याला अतिशय उपद्रविणें.

**वाटणें** अ० क्रि० १ कांहीं अर्थ, वस्तु, विषय, इ० कांहीं गुण, धर्म, स्वरूप, इ० संबंधानें प्रतीत होणें किं० भासमान होणें किं० विचारानें गृहीत होणें; दिसणें; भासणें; उ० आज पाऊस पडेल असें मला वाटतें; उ० ताराबाईला रानडयांचें स्थळ उत्तम आहे असें मला वाटतें. २ सर्वांत येणें.३कांहीं गोष्ट, स्थिति, सरणी,इ० घेण्या जोगी किं०अवलंबिण्याजोगी आहे असें मनानें ठरविणें.

**वांटप** [ म० वांटणें ]न० भाऊबंध,व्यापारीमंडळी, इ० च्या समायिक माल, पैसा, इ० ची वांटणी करणें ही क्रिया किं० ह्या क्रियेचें फळ किं० ह्या क्रियेनें जे ठरलें तें. ꣸ **वांटपपत्र** न० वांटण्या ज्यावर नमूद करण्यांत आल्या आहेत तो कागद.

**वाटपाडू, वाटमान्द्या,वाटमारू, वाटशेक, वाटसरू** इ० मागें ' वाट ' मध्ये पहा.

**वाटपिठाचा** [म० वाटणें+पीठ]वि० डाळ, तांदूळ, इ० भिजवून आणि नंतर वांटून तळून किं० शिजवून केलेला ( वडा, ढंढा, इ० ).

**वाटला** [म० वाट=रस्ता] क्रि० वि० सभोंवार; सभोंवतालीं: उ० घरा वाटली घार फिरते. **टीप**,–१ हें क्रि०वि०लिंगवचनांप्रमाणें फिरणारें आहे.**टीप**,–२ हा शब्द रत्नागिरीकडे वापरतात.

**वाटवणें** [ म० वाट=रस्ता ] अ० क्रि० मुक्कामानंतर पुन्हा (प्रवाशानें) प्रवास सुरू करणें.

**वाटवा** [हिं०बटवा ] पु०सराफ, प्रवासी,इ० नी पैसे,उपयुक्त पदार्थ,पान तंबाखू इ० ठेवण्याची कप्याकप्यांची आणि दोऱ्या ओढल्यानें उघडणारी किं० मिटणारी पिशवी. मागें ' बटवा, ' ' बटवी ' पहा.

**वाटविणें** [ म० वाट=रस्ता ] स० क्रि० १ प्रवासांत आणि चालतांना ( स्थलविशेष ) मागें टाकून किं० लंघून पुढें जाणें; उ० ही घांटी आपण वाटविली म्हणजे नेवरें गांव आपणाला दिसूं लागेल. २ ( प्रसंग, काळ, अवधि, किं० समय ) अतिक्रान्त करणें; उ० उद्या अमावास्या वाटविली तर ह्या रोग्याला उतार पडूं लागेल.

**वांटा** [ म० वांटणें ] पु० एका वस्तूचे केलेले जे अनेक विभाग ते प्रत्येक; हिस्सा; उ० देशकार्याचा ज्याचा त्याणें वांटा उचलला म्हणजे हावें तें ध्येय हां हां म्हणतां साध्य केलें जातें. ꣸ **वांटकरी, वांटेदार, वांटेलदार, वांटेली** पु० कांहीं वस्तूंचा वांटा किं० हिस्सा ज्याला मिळाला आहे किं० मिळावयाचा आहे तो किं० त्या वांट्याला किं० हिशाला जो हक्कदार आहे तो.

**वाटाघाट** [ म० वाटणें+घाटणें ] स्त्री० संदिग्ध विषयाचा निर्णय ठरविण्यासाठीं केलेली चर्चा, खल, किं० वादविवाद. पु०, स्त्री० १ पराकाष्ठेचा प्रयत्न किं० खटपट किं० तेणेंकरून आलेला शीण किं० थकवा. २ तगादेदार, करडा यजमान, इ० नीं चालविलेली सतावणूक.

**वाटाडी** (-ड्या ) [ म० वाट ] पु० प्रवाशाला वाट सांगणारा किं० दाखविणारा.

**वाटाणा** [ हिं० बटाना ] पु० एक द्विदळ धान्य. ꣸ **कोणेकाला वाटाण्याची अक्षत**(किं० **अक्षता** ) **लावणें** त्याला नकारात्मक उत्तर देणें; त्याची विनंती अमान्य करणें.

**वाटांदुळा, वाटांदूळ** [ म० वाटोळा+तांदूळ ] पु० सडीक तांदुळांत जी मोठी आणि जाडी कणी निघते ती किं० ज्या कण्या निघतात त्या समुच्चयानें.

**वाटारणें** स० क्रि० ( डोळे ताणून ) कोणेकाकडे नजर वळविणें; वटारणें.

**वाटावणें, वाटाविणें** मागें ' वाटवणें, ' ' वाटविणें ' पहा.

**वांटावांट** [ म० वांटणें+वांटणें ] स्त्री० एका पदार्थाचे अनेकांत विभाग पाडणें; एक पदार्थ वांटून अनेकांस देणें. [ पहा.

**वाटावाट** (–टी ) स्त्री० मागें ' वाटाघाट '

**वाटिका, वाटी** [ सं० ] स्त्री० १ बाग. २ क्रीडावन. ३ मोकळें किं० भाज्या इ० लाविलेलें पटांगण.

**वाटी** स्त्री० बासुंदी, खीर, दूध, आमटी, इ० पातळ पदार्थ ठेवण्याचें, घालण्याचें, किं० घट्ट पदार्थ ठेवण्याचें पात्रविशेष.

**वांटाव** स्त्री० वादविवाद; विचार; वांटाघाट.

**वाटींव** [ म० वाटणें ] **वि०** पाटावरवंटा ह्या साधनानें चूर्णरूप केलेला.

**वाटेचा, वाटचा** [ म० वाट=रस्ता ] **श० यो० अ०** बद्दल; कोणेकाच्या जागीं किं० ऐवजीं.

**वाटोणी** [ म० वाट+पाणी ] **न०** लघवी; मूत्र किं० मूत्रविसर्जन.

**वाटोळा** [ **सं०**वृत्त, वर्तुल ] **वि०** मध्यबिंदूपासून सारख्या अंतरावर ज्याचा परिध आहे असा (धोंडा), आकृति, पटांगण, इ०). ॐ**(कांहीं वस्तूचें) वाटोळें होणें(किं०करणें)** १तो नष्ट किं०विध्वस्त होणें किं० नाहींसा होणे.( किं० करणें) २ त्याची नासाडी होणें (किं० करणें). **कोणेकाचें वाटोळें लांबोडें होणें(किं०करणें)** त्याचा पूर्णपणें विध्वंस किं०नाश होणें ( किं०करणें ).**वाटोळा खूर पु०** १खर्चास कारणीभूत आणि उपयोगास न येणारा किं० ज्याचा खर्च आपणास झेपत नांहीं असा घोडा ( निंदेत ). **टीप,**–घोड्याचा खूर वाटोळा असतो ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. २ मामल्या; फसव्या. **वाटोळा गोटा ( किं० गोळा किं० धोंडा ) पु०** १ अट्टल सोदा. २ सर्वांशीं सारख्याच सभ्यपणानें वागणारा. ३ भाषण, व्यवहार, इ० मध्यें न सांपडणारा, न अडकणारा, किं० न फसणारा असा मनुष्य.

**वाठ,वांठ**[सं०वत्स ]**स्त्री०**म्हशीचें स्त्री अपत्य; रेडी. ॐ **वाठीचा पिता पु०** मूर्ख; अडाणी माणूस; बैलोबा. **वाठरूं न०** रेडकूं ( प्रेमांत ).

**वाठणें, वाठरणें अ० क्रि०** ( हात, पाय, इ० गात्र ) थंडी, लचक, उसण, इ० मुळें आखडणें किं० वांकडें होणें.

**वांठरूं** वर ' वाठ ' मध्यें पहा.

**वाठार** [ सं० वाट ] **न०,स्त्री०** १ गांवांतील अरुंद रस्ता; बोळ. २ गांवाचा मोहल्ला किं० पेठ किं० भाग.

**वाठां, वांठ्यं न०** पोटांत धान्य इ० घालून वर तृण लपेटून बांधलेला गठ्ठा; मुडा.

**वाड न०** उसाचें पीक.

**वाड स्त्री०** १ रिकामी जागा किं० पटांगण. २ रिकामपण; फुरसूत.

**वाड** [ सं० बाढ ] **वि०** १ मोठा; विशाल; विस्तीर्ण; अमर्याद. २ समर्थ; जोरदार.

**वाडकर, वाडकुलें, वाडगें** पुढें ' वाडी ' मध्यें पहा.

**वाडगा** मागें ' वाटगा ' पहा.

**वाडदिवस, वाडदीस** पुढें 'वाढदिवस' पहा.

**वाडप, वाडपी, वाड्या, वाडलें, वाडवण** पुढें ' वाढप, ' ' वाढपी, ' ' वाढलें, ' ' वाढवण ' पहा.

**वाडवळ** [ म० वाडी+वळणें ] **पु०** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**वाडवळ न०** शेतकऱ्यांचा एक उत्सव. मागें ' डवरा ' अर्थ ३ पहा.

**वाडवीस, वाडवेळ** पुढें ' वाढवींस, ' ' वाढवेळ ' पहा.

**वाडा** [ सं० वाट] **पु०** १ मोठें घर; विस्तीर्ण घर. २ गांवाचा एक भाग, पेठ, किं० मोहल्ला. ३ एका गांवाच्या हद्दींत, किं० अमलांत, किं० सरकारदेणें इ० बाबतींत, जे थोड थोड्या घरांचे समूह असतात किं० मोडतात ते प्रत्येक. ४ मौजाचा एक विभाग. मागें ' मौज ' **न०** पहा. ५ बंदिस्त पटांगण. ६ गुरें, शेळ्या, मेंढ्या, इ० कोंडावयाची बंदिस्त जागा. ७ विशिष्ट धंद्याच्या लोकांच्या वसतीचा गांवाचा भाग. उ० चांभारवाडा, महारवाडा, गऊळवाडा, इ०.

**वाडाळणें स० क्रि०** ( धान्य इ० ) पाखडणें किं० हसडणें.

**वाडी** [ म० वाढणें ] **स्त्री०** मुतांखेतांना दिलेला शिजविलेल्या अन्नाचा नैवेद्य.

**वाडी** [ सं० वाटी ] **स्त्री०** १ कुंपणानें मर्यादित असलेली बागाईत जमीन. २ शेतकरी लोकांच्या वसतीचीं गांवाशेजारीं असलेलीं घरें समुच्चयानें किं० त्यांच्या वसतीचा टापू किं० प्रदेश. ३ अंतरा अंतरावर असलेले एकाच गांवाचे विभाग. ४ शहराचे वेगवेगळे विभाग. ॐ **वाडीवतन न० ए० व०** कोणेकाची स्वताच्या मालकीची शेतें, घरें, इ० जिंदगी. **वाड्या पु०** वाडीचा मालक. **वाडकर पु०** वाडीचा वतनदार धनी किं० मालक. **वाडकरी पु०** १ वाडीचा मालक. २ वाडींत राहाणारा.

**वाडकुलें** न० लहान वाडी. **वाडगें** न० कुंपण घातलेलें लहानसें पटांगण.

**वांडें** [ सं० वाणिज्य ] न० १ विक्रीचा माल. २ व्यापाऱ्याचा वखारींतील माल. ३ बाजारांत विक्रीसाठीं आलेला पर ठिकाणचा माल. ॐ **वाड्याचें वांडें** न० व्यापारांत घातलेलें कांणकाचें भांडवल.

**वाडें, वाढें** न० १ उसाचा पानांसकट शेंडा. २ खजुराचें एक ओझें.

**वाडेंकोडें** [ म० कोड ] क्रि० वि० १ प्रेमपूर्वक. २ नखरेबाजीनें. ३ कौतुकानें.

**वाढ** [ सं० वृद्धि ] स्त्री०,पु० १ मनुष्य,पशु, वृक्ष, इ० ची जन्मापासून बाल्य, तारुण्य, इ० अवस्थांत शरीर, बुद्धि, आकार, उंची, इ० मध्यें होत जाते जी प्रगति किं० वृद्धि ती. २ वृद्धि; अधिकपणा; अधिक संपन्न होणें ही स्थिति; संख्या, विस्तार, उंची, लांबी, सामर्थ्य, इ० बाबतींत जो मोठेपणा तो किं० जें वैभव तें. ३ उसना आणलेला पदार्थ ( मेतकूट, पीठ, बाजरी, दूध, इ० ) परत देतांना त्यांत घालून देतात ती भर. न०, स्त्री० कोनफळ, बटाटा, ऊस, इ० च्या ज्या भागावर डोळा असतो तो भाग. मागें ' डोळा ' अर्थ ६ पहा. न० उसाचें पानांसकट टोक. ॐ **वाढीस लागणें** १ योग्य प्रमाणांत पोषक द्रव्य मिळूं लागून ( गर्भ, संस्था, इ० ) आकार, वैभव, इ० गुणांनीं मोठें होणें. २ कांहीं कारणानें कुंठित झालेली (गर्भ, संस्था, इ० ची) वाढण्याची क्रिया पुन्हा पूर्ववत् सुरू होणें.

**वाढकर, वाढकरी** मागें 'वाडी' मध्यें 'वाडकर ' ' वाडकरी ' पहा.

**वाढण, वाढणें** [ म० वाढणें ] न० १ जेवावयास बसलेल्या माणसांस भात, पोळी, आमटी, इ० खाद्यें, किं० पेयें, किं० चोष्यें, किं० लेह्यें वाढणें ही क्रिया किं०जे वाढावयाचे पदार्थ ते. २ न्हाणवलेला सोयरेधायरे किं० घरोब्याचीं माणसें जें खाद्यपेयांचें ताट पोंचवितात तें. ३ गडी, नोकर, इ० ना सणाचे दिवशीं किं० लग्न, मुंज, इ० प्रसंगीं जें खाद्यपेयें घालून ताट देतात तें.

**वाढणी** [ म० वाढणें ] स्त्री० जेवावयास बसलेल्या माणसांना वाढावयास पदार्थ ज्या आकारविशेषाच्या ताटांत घालून नेतात तें ताट.

**वाढणी** [ हिं० बढणी ] स्त्री० केरसुणी; वाढवण.

**वाढणी** [ म० वाढणें ] स्त्री० वृद्धिंगत होणें ही क्रिया. ॐ **वाढणीस लागणें** वाढूं लागणें; वैभवास चढूं लागणें.

**वाढणें** [ सं० वृध्, वर्धं ] अ० क्रि० १ आकार, परिमाण, उंची, वैभव, कौशल्य, इ० अधिक होणें. २ परिपक्व होणें. ३ दिवस, मुदत, इ० अधिक होणें किं० लांबणें. ४ ( कुंकूं, बांगड्या, काजळ, इ० ) संपणें किं० खलास होणें. ह्या अर्थीं ' वाढवणें ' सुद्धां. ५ प्रतिपक्ष्यावर चाल करून जाणें. ६ भूतपिशाचादिकांच्या बाधेनें हात, डोकें, पाय, इ० गात्रें हालूं लागणें किं० हालत असणें. ७ ( भूत, पिशाच, इ० नीं) मनुष्याच्या हात,पाय,इ०गात्रांत प्रविष्ट होणें. स० क्रि० १ भोजनास बसलेल्या माणसांच्या वाट्यांत, किं० ताटांत भात, भाजी, इ० पदार्थ घालणें. २ समई, लामणदिवा, निरांजन, इ० मध्यें (तेल, तूप, इ० ) घालणें. ॐ **वाढून ठेवलेलें असणें** १ ( आजार, संकट, पेच, इ० ) माणसाला छळावयाला हजर किं० सिद्ध असणें ( वैतागांत ). २ ( नोकरी, बढती, इ० ) नोकरास द्यावयास यजमानानें तयार करून ठेविलेली असणें ( उपहासांत ). **वाढणें वर्तणें** अ० क्रि० कोणेकाच्या आश्रयानें लहानाचा मोठा होऊन संसार करूं लागून सुस्थितींत असणें; उ० मी तुमच्याच अन्नावर इतके दिवस वाढलों वर्तलों आहे, तो मी तुमच्या उलट साक्षी कशी देईन ?

**वाढणें** न० मागें ' वाढण ' पहा.

**वाढता** [ म० वाढणें ] वि० उत्तरोत्तर वाढत जाणारा किं० समर्थ, प्रगल्भ, किं० वैभवशाली होत जाणारा ( संसार, व्यापार, व्याप, बुद्धि, पैसा, इ० ). ॐ **वाढता चुडा** पु०,**वाढती बांगडी** स्त्री० कासाराकडून हातांत बांगड्या भरविल्या असतां ठरावापेक्षां अधिक जी एक बांगडी कासार भरतो ती बांगडी. **वाढत्या अंगाचा कपडा** पु० मुलगा अंगानें धष्टपुष्ट

होणार यासाठीं त्याच्या धष्टपुष्ट शरीराला कमी पडणार नाहीं अशा बेताने शिवविलेला कपडा (बंडी, सदरा, विजार, इ०). **वाढत्या अंगाचा** वि० शरीरानें उंच आणि जाडी होत जाण्याच्या वयाचा ( मुलगा, मुलगी, वासरूं, इ० ).

**वाढती** [म० वाढणें] स्त्री० मुलाला लागते ती उचकी,–जी मूल सुस्थितीत आहे असें सुचविते.

**वाढदिवस, वाढदीस, वाढवीस** [म० वाढणें +दिवस ] पु० मूल ज्या वर्षाच्या ज्या महिन्याच्या ज्या पक्षांतील ज्या तिथीस जन्मलें असतें त्या वर्षाच्या पुढच्या वर्षाच्या त्या महिन्याच्या त्या पक्षांतील त्या तिथीस घुसळखांब्याची पूजा करून नंतर जो उत्सव करतात तो किं० तो उत्सवाचा दिवस. हा उत्सव मुलाच्या जन्मानंतर पहिले सहा महिने दर महिन्यास करतात नंतर पुढें दर वर्षी मात्र करतात.

**वाढप** [ म० वाढणें ] न० जेवणाऱ्या मंडळींना पदार्थ वाढणें किं० जें वाढलें तें. ॐ **वाढपी** पु० भोजनाला बसलेल्यांना पदार्थ वाढतो तो किं० असा लग्न इ० प्रसंगीं वाढण्याचा धंदा करतो तो.

**वाढया** [ सं० वर्धकि=सुतार; हिं० बढई ] पु० १ सुतार. २ सुताराच्या नांवापुढें लावावयाचा बहुमानाचा हा शब्द आहे; उ० रूपाबढाई. मागे ' बढई ' पहा.

**वाढलें** [ म० वाढणें ] न० मागें ' वाढण ' अर्थ २ आणि ३ पहा.

**वाढवण** [ म० वाढविणें ] स्त्री० १ अधिक करणें किं० अधिक करण्यासाठीं घातलेली भर. २ केरसुणी ( कोंकणांत रूढ ). ३ खराटा ( नारळाच्या पातींच्या हिरांचा ).४ वजन किं० माप ह्यांत आढळून आलेलें अधिक परिमाण.

**वाढवा, वाढावा** [ म० वाढणें ] पु० धान्य इ० च्या दुसऱ्या मोजणीच्या किं० मापणीच्या प्रसंगीं पहिल्या मोजदादीहून जो अधिकपणा कांहीं वेळां आणि कांहीं कारणांनीं दिसून येतो तो .

**वाढविणें** [ म० ' वाढणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ अधिक करणें,–ताकांत पाणी किं० बासुंदींत दूध घालून किं० अन्य प्रकारें. २ (मूल, झाड, संस्था, इ० चें) संगोपन करून (त्यांना) प्रगल्भ दशेस आणणें. ३ नव्या बांगड्यासाठीं मनगटाकर जागा करण्याकरितां कासारावडून (किं० स्वता) जुन्या (बांगड्या) मुद्दाम फोडविणें (किं० फोडणें). ॐ **भांडण वाढविणें** जें विधान करण्याची फारशी जरूरी नाहीं तें करून प्रतिपक्ष्याला चिडवून भांडण चालूं ठेवणें. **वाढविणें दर्तविणें** ( कोणा माणसाचें ) लालन, पालन, संगोपन, इ० करून ( त्याला ) स्वताच्या जबाबदारीवर संसार, धंदा, नोकरी, इ० करावयाला समर्थ करणें.

**वाढवीस** पु० मागें ' वाढदिवस ' पहा.

**वाढवेळ** [ सं० वाढ+वेला ] पु० पुष्कळ वेळ किं० कालावधि. क्रि० वि० दीर्घ कालपर्यंत.

**वाढळ** वि० खालीं ' वाढाळ ' पहा.

**वाढा** [ म० वाढणें] पु० गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, इ० चा संततिरूप जो विस्तार तो. ॐ **वाघांचा वाढा वाढत नाहीं** दुष्ट लोक बहुधा वैभवास चढत नाहींत.

**वाढाळ, वाढळ, वाढाळू** [म० वाढणें ] वि० जें लवकर किं० भराभर वाढत जातें असें ( मूल, झाड, इ०). [ पहा.

**वाढावा** [ म० वाढणें ] पु० मागें 'वाढवा '

**वाढी** [ म० वाढणें ] स्त्री० दसनें आणलेलें धान्य परत देतेसमयीं त्यांत जें अधिक किं० भरतीचें परिमाण घालतात तें.अशा व्यवहाराला ' वाढीदिढी ' म्हणतात.

**वाढी** [ म० वाढणें ] स्त्री० पातळ पदार्थ जेवणाऱ्यांना वाढावयाचें आकारविशेषाचें आणि तोटी किं० पन्हळ असलेलें पात्रविशेष.

**वाढें** [ म० वाढ ] न० १ दसाचा माथ्याकडचा भाग. २ कोष्टयाच्या मागावर घातलेले बे ताणे त्यांचीं न विणतां सोडलेलीं टोकें समुच्चयानें. ३ कोष्टयाच्या मागावर चार पांच पंचे इ० एकदम विणावयासाठीं ताणे पसरलेले असतात त्यांत वेगळे वेगळे पंचे पृथक् दाखविण्यासाठीं जे भाग वाण्याचे तंतु न भरतां रिकामे सोडलेले असतात ते प्रत्येक.

**वाढोळ** पु० मागें ' वाढवेळ ' पहा.

**वाण** [ सं० वर्ण ] पु०, न० ( शरीर, वस्त्र, इ० संबंधांत ) रंग किं० वर्ण. २ वस्त्र, शरीर, इ० च्या रंगांचा नमुना, उंची, दर्जा, किं० अवलाद

दाखविण्याच्या बाबतींत ). ३ रंग (सामान्यतः). ॐ हवळ्या शेजारीं बांधला पोवळा, वाण नाहीं पण गुण लागला मागें ' हवळा ' मध्यें पहा. वाण पालटणें ( किं० फिरणें किं० बदलणें ) १ मनुष्य, झाड,इ० ची जोराची वाढ किं०वाढीचा कुंठितपणा दाखविणारा त्यांचा रंग, वर्ण, किं० तजेला वेगळा दिसणें. २ सोनें, चांदी, इ० च्या दागिने इ० ची चकाकी, हिरे माणकें, इ० चा तजेला कमी किं० अधिक किं० वेगळ्या प्रकारचा होणें. वाण मारणें टवटवी, तजेला, हिंमत, इ० गुण कमी प्रमाणांत ( माणूस , पशु, इ० नीं ) प्रकटिणें; उ० आज घोडा वाण मारल्यासारखा दिसतो आहे. वाणचोर पु० स्वतांचें स्वरूप झाकणारा; लबाड. वाणढाळ वि० ज्याचा रंग, तजेला, किं० टवटवी कमी झाली आहे असें ( फळ, कपडा, मोती, हिरा, किं० कोणताही पदार्थ ); फिका; मजीत. वाणमाऱ्या त्रि० १ फिका; निस्तेज. २ उदासीन किं० खिन्न दिसणारा.

वाण, वाणक [ सं० वायन ] न० बायका व्रत करतात तेव्हां नारळ, केळीं, इ० फळें, किं० कुंकू इ० सौभाग्य द्रव्यें बांबूच्या शिपतरांत घालून ब्राह्मणास किं० सुवासिनीस दान देतात तें दान. ॐ वाणवसा, वाणवसा पु० बायका करतात तीं व्रतें, नेम, इ० समुच्चयानें.

वाण [ म० उणा ] स्त्री० कमताई; न्यूनता. ॐ मिठाची केली वाण आणि लोणच्याला पडली घाण कांहीं कामीं योग्य तो खर्च न केल्यास सर्वच काम बिघडतें आणि ( एकंदरींत अधिक पैसा खर्चावा लागतो).

वाणका वि० मजबूत; दणगट; मक्कम.

वाणकूट, वाणगट, वाणगंड [ म० वाणी= हिंग, जिरे, मिरे, इ० विकणारा ] पु० वाणी ( तुच्छतेंत ).

वाणगी पुढें ' वानगी ' पहा.

वाणणें, वाणिणें [ सं० वर्ण् ] स० क्रि० स्तविणें; प्रशंसिणें.

वाणा [ सं० वाणि=१ विणणें. २ माग ]पु० मागावर वस्त्र विणतांना धोट्याच्या गतीनें जीं आडवीं सुतें भरतात तीं समुच्चयानें. उभ्या सुतांना ' ताणा ' म्हणतात. ' ताणा ' चा अर्थ आम्ही मागें चूक दिला आहे. ॐ वाणाताणा पु० पु० व० वस्त्राची वीण.

वाणिज्य [ सं० ] न० व्यापार; उदीम.

वाणिणें मागें ' वाणणें ' पहा.

वाणी [ सं० वाणिज=व्यापारी ] पु० १ हिंग, जिरे, मिरे, धान्य,इ० विकणारा व्यापारी. २ हिंदूंची एक विशिष्ट जात किं० त्या जातीचा कोणीही इसम. ३ एक कीटविशेष. याला ' मंडळी, ' ' मंडाळी ' असेंही म्हणतात. ॐ वाणी उदमी, वाणी बकाल पु०अ०व० हरएक प्रकारच्या मालाची खरेदीविक्री करणारे व्यापारी. वाणीजिन्नस पु० वाणी विकतो ते हिंग, जिरे, इ० जिन्नस प्रत्येक. वाणपसारा पु० १ वाण्याचा धंदा. २ वाण्याचे विकावयाचे जिन्नस समुच्चयानें. ३ कोणत्याही कामाच्या उपकरणांचा व्याप किं० पसारा ( घालणें, मांडणें, इ० ). ४ अव्यवस्थित पसरलेलें सामानसुमान,-पुस्तकें, भांडीं,चिरगुटें, इ०. ५ ( लाक्षणिक ) प्रसूत होत असलेल्या स्त्रीची अडणूक ( पडणें ). वाणसवदा, वाणसौदा पु० वाणी विकतो ते जिन्नस.

वाणी [ सं० ] स्त्री० १ बोलणें. २ भाषा. ३ शब्दोच्चार. ४ भाषेची किं० शब्दोच्चाराची देवता;सरस्वती. ॐ वाणीवाटें निघणें कांहीं वाक्य किं० विचार बोलला जाणें( निंदेत प्रयोग ).वाणीवदणें मूर्खासारखें कोणी कांहीं बोलणें.

वाणीकिणाचा, वाणीतिणीचा, वाणीदेणीचा [ म० वाण=उणीव ] वि० दुर्मिळ किं० अपूर्व म्हणून मूल्यवान् म्हणून समजला जाणारा ( पदार्थ ).

वात[ सं० वर्ति ]स्त्री० १कापूस, सूत,चिंधी, इ०ची गुंडाळी,-जी समई इ० तील तेल आकर्षून घेते आणि जी पेटविली असतां प्रकाश देते. २ जखम इ० तील पू, रक्त,इ०शोषून घेण्यासाठीं आंत खुपसतात ती वस्त्राची चिंधी, कापसाची काडी, इ०. ३ बारीक पडवळ, शेंग, इ०.४ गलबताचें अवजार गुंडाळलें म्हणजे होते ती गुंडाळी. ५समई इ०तील पन्हळ,ज्यांत वात घातलेली असते तो. ६ देवळांत दिवा लावण्याच्या कामावरच्या

नोकराला चरितार्थासाठीं बक्षिस दिलेली जमीन

**वात** [ सं० ] पु० १ वायु; वारा. २ (वैद्यक) शरीरांतील धातुविशेष. ३ ह्या धातुविशेषाच्या बिघाडामुळें झालेला रोग; उ० वातातिसार, वातज्वर, इ०. ❀ **वातायन** न० खिडकी; गवाक्ष. **वातावरण** न० पृथ्वीभोंवतीं जें हवेचें आवरण आहे तें. **वाताहत** स्त्री० सैन्यांतील शिपाई, कुटुंबांतील माणसें, इ० ची दाणादाण किं० पांगापांग. **वातशूळ** पु० पोटदुखी. **वातकंटक** पु० पाय इ० गात्र वळणें ही विकृति. **वातगुल्म** पु० १ वादळ. २ एक गुल्मरोग. **वातचक्र** न० १ वावटळ. २ आकाश. ३ वातावरण. **वातदोश** पु० गरोदर गायी, म्हशी, इ० च्या गर्भाशयांतून बाहेर पडते ती वार. **वातबद्ध** वि० वारंवार पोट फुगणें, शौचास साफ न होणें, पोट सुटणें, इ० रूप विकृति ज्यास आहे असें ( माणूस ) किं० असें ( शरीर ) किं० अशी ( प्रकृति ). **वातरक्त** न० १ संधिवात. २ रक्तपिती; महाव्याधि.

**वांत** [ सं० ] वि० जें ओकून पडतें तें. [ सं० ' वान्ति ' चा अपभ्रंश ] स्त्री० १ ओकारी, २ जें ओकून पडलें तें. ❀ **वान्ताद** पु० १ कुत्रा,—जो आपली ओक आपणच खातो. २ पूर्वी बोललेलें जो नंतर नाकबूल जातो, किं० एकदा केलेलें विधान मी केलें नाहीं असें म्हणतो, तो नीच माणूस.

**वातट, वातड, वाताड, वाताट, वात्रट, वात्रड** वि० १ चिवट; लोचट ( खाद्य ). २ लोचट ( माणूस ).

**वातटणें, वातडणें** [ म० वातट, वातड ] अ० क्रि० (भाकरी, पोळी, जिलबी, इ० खाद्य) चिवट किं० लोचट होणें म्ह० तिचा तुकडा लवकर न पडण्याजोगी होणें.

**वाता, वाथा** पु० दार, खिडकी, इ० च्या फळ्यांची कुसवें प्रत्येक.

**वांति** [ सं० ] स्त्री० १ ओकारी. २ जें ओकून पडलें तें.

**वातुल, वातूल** [ सं० ] वि० १ वातरोगानें पीडित. २ शरीरांत वात उत्पन्न करणारा ( खाद्य पदार्थ ).

**वातेर, वातेरें** [ म० वाता ] न० दार, खिडकी, इ० च्या माथ्यावरच्या छावणीच्या ज्या फळींतील मोकांत झडपांचीं कुसवें फिरतात ती फळी. 'वातेरपट्टी,' 'वातेरफळी,' 'वात्रटफळी' स्त्री० ह्याच अर्थी.

**वातेरें, वात्थेरें** [ म० वात ] न० १ समयी इ० मध्यें जळावयासाठीं जी चिंधीची गुंढाळी किं० वळकटी करतात ती किं० तशा उपयोगाची चिंधी. २ जीर्ण झालेलें चिरगुट,—ज्याच्या चिंध्या लोंबत आहेत. ३ दार, खिडकी, इ० च्या झडपेचें कुसूं; वात्या.

**वात्थेरें** वर ' वातेरें ' पहा. [ वारा.

**वात्या** [ सं० ] स्त्री० वावटळ; सोसाट्याचा

**वात्रट, वात्रड** मागें ' वातट ' पहा.

**वात्रटफळी** स्त्री० मागें 'वातेर,' 'वातेरें' पहा.

**वात्सल्य** [ सं० ] न० प्रेम; प्रीति.

**वात्सी** [ सं० ] स्त्री० ब्राह्मण आणि शूद्र स्त्री यांची कन्या.

**वात्सी, वाथसी** मागें ' वास्ति ' पहा.

**वाथंग, वाथंग्या** पुढें ' वाधंग, ' ' वाधंग्या ' पहा.

**वाथा** वर ' वाता, ' ' वाथा ' पहा.

**वाध्या** स्त्री० अ० व०, पु० रिकामी किं० निरर्थक वाटाघाट ( कुटणें, बडविणें ); उ० लोकांचा वरवंटा घेऊन आपला वाध्या कुटावा ह्यांत काय फळ ?

**वाथ्या** मागें ' वस्ति ' पहा.

**वाद** [ सं० ] पु० १ बोलणें. २ भाषण. ३ कांहीं गोष्टीचें विधान; वाक्य. ४ वृत्तान्त. ५ वाटाघाट; स्वमताचें मंडन आणि प्रतिपक्ष्याच्या मताचें खंडन, इ० रूप जें दोन किं० अधिक माणसांत भाषण चालतें तें; वादविवाद; चर्चा. ६ तत्त्वज्ञानार्थ केलेली चर्चा. ७ स्पष्टीकरण. ८ मत; सिद्धान्त; उ० नास्तिकवाद, परमाणुवाद, अद्वैतवाद, इ०. ९ भाईबंद इ० मध्यें निकालांत न निघालेली बाबत. १० वदंता; बातमी; अफवा. ❀ **वादग्रस्त** वि० जिच्या संबंधानें कांहीं निकाल किं० निर्णय झाला नाहीं अशी कांहीं गोष्ट किं० बाबत. **वादप्रतिवाद** पु० ए० व० एकानें पूर्वपक्ष करावा, दुसऱ्यानें समाधान करावें, ह्या रूपाचा दोन माणसांत चाललेला वाद. **वादेली** वि०

१ भांडखोर. २ फिर्यादींतील एक पक्ष.

**वाद, वादी** [ सं० वाध्री ] स्त्री० १ वहाण इ० ला शिवलेली कातड्याची पट्टी किं० चिंधी. २ कातड्याची पट्टी किं० चिंधी ( सामान्यतः ).

**वाद** [म० वात] पु० गात्रविशेषाला आलेली बधिरता.

**वादक** [ सं० ] पु० १ वक्ता. २ वाद्य वाजविणारा; बजवय्या.

**वादघाई** पुढें ' वाद्य ' मध्यें पहा.

**वादट (-ड)** [ सं० वात ] वि० सर्द हवेनें बिघडलेला.

**वादडणें, वादाडणें** [ म०वादी ] स० क्रि० १ कातड्याच्या वादीनें मारणें किं० बांधणें. २ ( कांहीं काम ) झोकांत किं० पेटीत करून टाकणें.

**वादडा** पु० थप्पड; थापटी; चपराक.

**वादणा, वाधणा** पु० मागें ' अवधणा ' पहा.

**वादन** [ सं० ] न० सतार, तबला, इ०वाद्य वाजविणें. पु० वाद्य वाजविणारा.

**वांदर** इ० पुढें ' वानर ' इ० पहा.

**वादळ** [ सं० वातल ] न० वाऱ्याचा खूप जोराचा आणि विध्वंसकारक आणि पुष्कळ वेळ चाललेला सोसाटा.

**वादळणें, वादाळणें** [म० वादळ] अ० क्रि० १ मोठ्याठ्यानें आणि रागारागानें ओरडणें किं० बडबडणें. २( प्राणी, वृक्ष, इ० नीं )थंडी, वारा, इ० मुळे बाधा पावणें.

**वादा** पु०, **वादें** न० लाळ गळणें,खूर ठणकणें, इ०रूप जो गायी,म्हशी,इ०ना होतो तो एक रोग.

**वादा** पु० १ चाबकाची दोरी.२ कातड्याचा लांब आणि रुंद पट्टा. [ पहा.

**वादांग, वादांग्या** पुढें ' वाधंग, ' 'वाधंग्या'

**वादाडणें** मागें ' वादडणें ' पहा.

**वादाळणें** मागें ' वादळणें ' पहा.

**वादित** [ सं० वादय्=वाजविणें ] वि० वाजविलेलें ( सतार, वीणा, मृदंग, इ० वाद्य ).

**वादित्र** [ सं० ] न० १ सतार, मृदंग, इ० वाद्य. २ वाद्य वाजविण्याची कला.

**वादी** [सं०वादिन्]पु० १वाद, तंटा,फिर्याद,इ० तील एका पक्षाचा माणूस किं०एक पक्ष.२फिर्याद करणारा.ज्याच्यावर फिर्याद केली आहे तो'प्रतिवादी.' ३ शत्रु; वैरी.वि० १भांडखोर स्वभावाचा. २ उत्तम प्रकारें वाद करणारा; कुशलपणें प्रतिपक्ष्याशीं बोलणारा. ३ विशिष्ट मत किं० सिद्धान्त प्रतिपादणारा किं०त्याचा अभिमान बाळगणारा; उ० अद्वैतवादी, कर्मवादी, दैववादी, इ०. पु० १ वक्ता. २ वाद करणारा. ३ एखादें विशिष्ट मत स्थापणारा. ४ फिर्यादी. ५ ( संगीत) १ सूर. २ सूर खालीं वर करण्यासाठीं चर्मवाद्यांत ओविलेली दोरी.

**वादी** [ सं० वाध्री ] स्त्री० १ चामड्याची लांबलचक चिंधी किं० पट्टी. २ वहाणा, तं.ला, इ० ना लाविलेल्या असतात त्या कातड्याच्या पट्ट्या प्रत्येक.

**वादें** न० गायी, म्हशी, इ०ना होतो तो एक रोग. मागें ' वादा ' पहा.

**वादेली** वि० ' वाद ' मध्यें ' वादेलो 'पहा.

**वाद्य** [ सं० ] न० मृदंग, वीणा, सनई, इ० मधुर स्वर काढण्याचें साधनविशेष. चर्मवाद्य, तंतुवाद्य. मुखवाद्य, मंगलवाद्य, रणवाद्य, इ० अनेक प्रकारचीं आणि भिन्न भिन्न प्रसंगीं वाजवावयाचीं वाद्यें असतात.॰ **वाद्यघाई, वादघाई** स्त्री० कोणतेंही वाद्य वाजवितांना केलेली घाई किं० दामटविलेला आवेश.

**वाद्या** [ म० वाद ]पु० १ फिर्यादी. २तक्रारी. ३ भांडखोर. ४ वैरी; शत्रु.

**वाधंग. वाधांग** पु०, न० अरुंतुदपणाची चरफड; पिरपिर ( लावणें, मांडणें ).॰ **वाधंग्या, वाधांग्या** वि० अरुंतुदपणें सदा चरफडण्याच्या स्वभावाचा.

**वाधणा** पु० मागें ' अवधाणा ' पहा.

**वांधा** पु०, **वांधें** न० हिशेब, जमाखर्च, देणें घेणें, इ०मध्ये निकालांत न निघालेली बाबत.

**वाधांग, वाधांग्या** वर ' वाधंग, ' 'वाधंग्या' पहा. [चिंधी; वादी

**वाधी** स्त्री० कातड्याची लांब पट्टी किं०

**वान्** [सं०'वत्'पु०प्र०ए०व०]पु० अमुक गुण धर्म, किं० पदार्थ, ज्याचे जवळ ज्याचे अंगीं, किं० ज्याचे ठायीं आहे तो; उ० धनवान्, भाग्यवान्.

दैववान्. टीप,—१ मराठींत हा प्रत्यय स्त्री०,न० सुद्धां योजला जातो. टीप,—२ ' वान् ' याचे-बद्दल ' वंत 'सुद्धां मराठींत सर्व लिंगीं योजतात.

**वान** [ म० वाण; सं० वर्ण ] पु० रंग.

**वान** न० १ औषध तयार करतांना त्यांत घालतात जीं द्रव्यें तीं प्रत्येक. २ भक्तानें देवाला अर्पण केलेला कांहीं पदार्थ.

**वानगी** [ हिं० बानगी ] स्त्री० १ पदार्थाचा नमुना; उ० ह्या गुळाची वानगी मला दे. २ ऐकणें, पाहणें, हुंगणें, जिभेनें चव पाहणें, इ० क्रियांनीं कोणत्याही पदार्थाची योग्यता, किंमत, इ० ठरविण्यासाठीं त्या पदार्थाचा घतलेला किंवा सेविलेला लहान अंश. ३ जकाती वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यास जकाती देऊन शिवाय ज्या मालावर जकात भरली आहे त्या मालाचा नमुना म्हणून अल्प अंश फुकट देतात तो. ४ लोकांचें शेत, मळा, इ० खंडानें करणारा मनुष्य ठरावाच्या पैशाव्यतिरिक्त जो उत्पन्न केलेल्या भाज्या, केळीं, इ०चा अल्प अंश मालकाला फुकट देतो तो.

**वानणें** स० क्रि० स्तविणें; प्रशंसिणें.

**वानप्रस्थ** [ सं० ] पु० १ स्मृतींत सांगितल्या प्रमाणें अरण्यवास करणारा. २ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, हे जे चार आश्रम त्यांतील तिसरा. ३ तपस्वी.

**वानर** [ सं० ] पु० झाडावर राहाणारा आणि लांब शेपटीचा आणि लांब लांब उड्या मारणारा काळ्या तोंडाचा एक वन्य पशु. ❀ **वानर किंवण** स्त्री० वानरांचीं एका सजातीयाबद्दल कींव किंवा अनुकंपा. टीप,—कोणा वानराला जखम झाली असता त्याचे मित्र, आप्त, सोयरेधायरे, इ० त्याच्या समाचारास येतात आणि जखम किती खोल आहे हें आंत बोट खुपसून पाहातात; असा अनेक माकडांनीं प्रेमानें समाचार घेतला असतां त्या जखमेच्या जागीं आरपार भोक पडतें आणि तें जखमी माकड मरतें. ह्या वरून ' वानर किंवण ' चा अर्थ मूर्खपणाची अनुकंपा असा झाला. मागें ' माकड ' मध्ये ' माकडाची जखम ' पहा. ' वानरखट, ' ' माकडाची जखम ' हेही ह्याच अर्थाचे शब्द आहेत. **वानरखाद** स्त्री० बाग, मळा, इ० मध्ये फळें इ० खाऊन वानरांनीं केलेली नासाडी. **वानरचेष्टा** स्त्री०, **वानरथेर** न० पोरकट चाळे; पोरांच्या खोड्या. मागें 'माकड' मध्यें 'माकडचेष्टा' पहा. **वानरतेल** न० ज्या समर्थाचा किंवा अधिकाऱ्याची आश्रय कोणा दुष्ट माणसाला मिळाला आहे त्याणें त्या आश्रयाच्या जोरावर दीन आणि अनाथ माणसांना छळिलें आणि पुढें दैववशात् तो आश्रय सुटून त्या दुष्ट माणसाला जी विपत्ति प्राप्त होते ती. कोणेकाचें वानरतेल काढणें म्ह० त्याचें पारिपत्य करणें; कोणेकाचें वानरतेल निघणें म्ह० त्याचें पारिपत्य होणें. **वानरदुःख** न० वर ' वानरखट ' पहा. **वानरदृष्टि** स्त्री० बारकाईची नजर. **वानरभोजन** न० खाद्य पदार्थ बकाबका तोंडांत कोंबून नंतर स्वस्थपणानें तो नीट चावून खाणें. **वानरलकडी** स्त्री० जाळ न होतां धुमसत राहाणारें सर्पण. टीप,—थंडींत शेकावयासाठीं सर्पण गोळा करून पेटवावें म्हणून वानर काटक्या सकाळीं गोळा करतात पण ऊन्ह पडलें म्हणजे थंडी नाहींशी होते आणि शेकण्याची गरज राहिली नाहीं म्हणजे त्या काटक्या ते वानर फेंकून देतात. **वानरविचका** पु० कांहीं बेत, संकल्प, कारभार, इ० मध्यें अनेक लोकांनीं लुडबूड केल्यामुळें होतो तो कार्यनाश किंवा बिघाड. 'वानर किंवण' च्या स्पष्टीकरणावरून ह्याची उत्पत्ति कळण्याजोगी आहे. **वानर विचकुल्या**, **वानर वेचकुल्या** स्त्री० अ० व० कोणेकापुढें वाकडीं तिकडीं तोंडें करणें (त्याला खिजविण्यासाठीं). **वानरशेक** पु०, **वानर शेकणी** स्त्री०, **वानर शेकणीचीं लाकडें** न० अ० व० ह्या वाक्प्रचारांचा अर्थ ' वानर लकडी ' वरून विद्यार्थ्याला जाणतां येईल. **वानरक्षत** न० वर ' वानरखट 'पहा. **वानरी** स्त्री० वानराच्या जातीची स्त्री. **वानऱ्या** वि० १ वानरासारखीं तोंडें करणारा पोरकट (माणूस). २ वानरासारखें तोंड ज्याचें आहे असा (माणूस).

**वानवळा**, **वानोळा** [ म० वाना ] पु० १ व्यापारी माल. २ शेतकरी, मळेवाले, इ० कांकडून त्यांच्या जमीनींत जिन्नस उत्पन्न झाल्याबरोबर त्या जिनसेचा नमुना म्हणून जो अंश ( किं०

त्याची किंमत) देशमुख, पाटील, इ० गांवकामगार, सरकार, इ० घेतात तो. ३ पदार्थांचा नमुना. ४ विशिष्ट ऋतूंत जें वाटाण्याच्या शेंगा, हरभऱ्याचे सोले, अंजीर, इ० पदार्थ बाजारांत प्रथम विकावयास आलेले असतात ते. ५ कोणेकाला नजर केलेली कांहीं अपूर्व जिन्नस.

**वानवा** [ सं० वा+न+वा ] पु०, स्त्री० १ होय किं० नाहीं. असें किं० तसें, हें किं० तें, ह्या संबंधाची अनिश्चितता; शंका; संदिग्धपणाची स्थिति; अनिश्चितता; उ० रामल्या पटवर्धनाकडून माझे पैसे वसूल होण्याची वानवा आहे. २ संदिग्धपणाच्या स्थितीच्या वाटाघाटीनें ठरलेला निकाल किं० निर्णय; उ० तो येतो कीं नाहीं ह्याची वानवा करून द्या.

**वानवा** [ म० वानणें=प्रशंसिणें] पु० स्तुति; तारीफ; प्रशंसा.

**वाना** पु० १ औषधाच्या घटनेंतील एक एक द्रव्य. २ व्यापारी माल. [ पहा.

**वानेर, वान्नेर, वान्नर, वान्येरू** मागें 'वानर'

**वानोळा** पु० वर ' वानवळा ' पहा.

**वाप** [ सं० ] पु० १ धान्यादि पेरणें. २ वस्त्र विणणें. ३ मुंडन; हजामत. ४ धान्य पेरल्यावर रुजलेली लहान कोंवळीं झाडे समुच्चयानें. ❀ **वापदंड** पु० कोष्टयाचा धोटा.

**वापर** [ सं० व्यापार ] पु० पुस्तक, वस्त्र, भांडें, इ० चा उपयोग करण्याची क्रिया; वहिवाट; पदार्थांचा उपभोग ( करणें, पडणें ); उ० ह्या तपेलीवर फार वापर पडल्यामुळें ती लवकर फुटली.

**वापरणें** [ सं० वि+आ+पृ ] स० क्रि० ( वस्तु ) उपयोगांत किं० वहिवाटींत आणणें किं० कांहीं कामीं योजणें. अ० क्रि० १ वहिवाटींत किं० उपयोगांत ( शस्त्र, वस्त्र, इ० ) आलेलें असणें. २ समाजांत किं० कांहीं कामांत (मनुष्य, पशु, इ० ) परिचित किं० अनुभविक किं० वहिवटलेला झालेला असणें.

**वापरणें** [ सं० वाप=पेरणें ] अ० क्रि० १ पावसाळ्यांत कांहीं काळ उघाडी पडली असतां पेरे करावयाला योग्य अशी ( जमीन ) होणें. २ गायी, म्हशी, इ० च्या वासरांनीं दांवे सोडल्यावर तीं मोकळीं झालीं असतां त्यांनीं हुरळणें किं० वागडणें. ४ रागानें धुमसणें किं० मनांतल्या मनांत चरफडणें.

**वापस** [ फा० ] वि० परत ( देणें, करणें ); उ० तूं माझा चाकू कधीं वापस करणार ? ❀ **वापस करणें** १ कर्ज, पैसा, इ० परत करणें किं० फेडणें. २ वजा करणें.

**वापसा** [ स० वाप=पेरणें ] पु० कांहीं काळ पाऊस पडून नंतर पाऊस उघडला असतां धान्य पेरावयाला योग्य अशी जमीनीची स्थिति(होणें).

**वापा, वापी** पुढें ' वाफा ' पहा.

**वापी** [ सं० ] स्त्री० १ विहीर. २ तळें.

**वाफ** [ सं० बाष्प ] स्त्री० पाणी इ० द्रव पदार्थांचें अग्निसंयोगानें किं० हवेंतील उष्णतेनें जें वायुरूप होतें तें.

**वाफ** [ म० वाप; सं० वाप=पेरणें ] स्त्री० मागें ' वापसा ' पहा.

**वाफ** न० नांगर इ० चालविण्यासाठीं आपला बैल कोणा शेतकऱ्यास कांहीं काळापुरतां वापरावयास दिला असतां धान्य किं० द्रव्य इ० रूप जो मोबदला घेतात तो.

**वाफणें** [ म० वाफ ] स० क्रि० १ धान्य मुठींमुठींनीं घेऊन ( शेतांत ) चहूंकडे टाकून पेरणें. २ पेरण्यासाठीं ( धान्य ) मुठींमुठींनीं टाकून शेतांत फेकणें.

**वाफणें** [ म० वाफ ] अ० क्रि० ( कांहीं खाद्य पदार्थ किं० औषध ) अंगच्या किं० बाहेरच्या पाण्याच्या वाफेनें पक्व होणें किं० शिजणें किं० उपयोगाला लायक होणें.

**वाफणें** [ सं० वाप; म० वाफ ] अ० क्रि० ( पेरलेलें बी ) रुजणें.

**वाफेरें** न० थंडी, भूतबाधा, इ० मुळें अंगाला सुटतो तो कंप ( भरणें, येणें ).

**वाफलणें** [ म० वाफ ] अ० क्रि० १ ( पदार्थाला ) वाफ सुटणें. २ ( पदार्थ ) वाफेनें पक्व होणें.

**वाफलणें** [ म० वाफ ] स० क्रि० १ (पदार्थ) वाफेवर पक्व करणें. २ ( पदार्थाला ) वाफेवर धरणें.

**वाफवा** [ म० अफवा ] स्त्री० गांवांत पसर

लेली कांहीं खबर किं० बातमी.

**वाफसा** मागें 'वापसा' पहा. ॐ **वाफसोंडा वि०** ज्यांतून वाफ निघणें बंद झालें आहे असा ( खाद्य, औषध, इ० पदार्थ ).

**वाफा [ सं०वाफ ] पु०**१बाग, मळा,इ० तील वांगीं, मिरच्या, तुळशी, इ० च्या वाढीसाठीं करतात ते लहान लहान चौक.ह्याच अर्थी'वापा' पु०आणि 'वापी'**स्त्री०**हेहीं शब्द आहेत.२काहिलींतून कढत उसाचा रस ढेपा करण्यासाठीं ज्या खळग्यांत ओतितात ते खळगे प्रत्येक.

**वाफारा [ म० वाफ ] पु०** दुखणारें गात्रविशेष इ० चा ठणका इ० बरा करण्यासाठीं त्याचेवर औषधी द्रव्यें पाण्यांत घालून त्या पाण्याची किं० साध्या पाण्याची वाफ सोडतात ती ( देणें,घेणें ). २ पोट, गलांड, इ० चा फुगीरपणा किं० दब्बपणा ( धरणें ).

**वांब स्त्री०** नदीच्या कांठीं उगवणारी कडू अशी एक वनस्पति.

**वांब पु०, स्त्री०** गात्रविशेषाचा ठणका किं० बधिरपणा.

**वांब [ हिं० वाम् ] पु०** एक जलचर प्राणी.

**वांब वि०** अनेक वेळां व्यालेली (गाय, म्हैस, इ० ). याच्या व्यावर्तकत्वें 'पहिलार' 'पहिलारू.'

**वांबणें** मागें 'ओंवणें' पहा.

**वांबळ,वांभळ,वामळ,व भांळ स्त्री०**ध्याकाशांत ढग येणें,स्वच्छ ऊन्ह न पडणें, दिवस गरा वाहाणें,इ०रूप जी एकाद्या दिवशीं हवा पडते ती किं०तशी दिवसाची स्थिति ( पडणें, असणें इ०)

**वाभळ स्त्री०** लवकर माजूनलवकर वाळल्याकारणानें दाण्यांशिवाय कणसे ज्या भाताला आलीं आहेत असें भात.

**वाभळणें अ० क्रि०** १ लवकर वाढून माजल्यामुळें ( भातानें ) शुष्क कणसें उत्पन्न करणें. २ ( शेतांत ) असें शुष्क कणसांचें भात उत्पन्न होणें.

**वाभा, वाभारा, वाभाडा पु०** १ वस्त्र फाटलें असतां त्याची निघते ती चिंधी किं० निघतो तो मोठा पट्टा.२वस्त्र,कागद,कातडें,फळ,इ०फाटून किं० फुटून लोंबत असलेला त्याचा भाग. ३ फाटणें, फुटणें, उंदरांनीं किं० कसरीनें खाणें, जळणें, सडणें, इ० कारणांनीं पडतें तें भोक, फट, चीर, किं० खळगा.

**वांभेरें न०** माणसाच्या हाताच्या बोटांसारखे खिळे ज्याला आहेत असें सापाला जमीनीशीं आडकावून ठेवण्याचें साधन.

**वाम [ सं० ] वि०** १ डावा ( हात, पाय, बाजू, इ० ). २ डाव्या बाजूचा. ३ उलटा. ४ प्रतिकूल. ५ द्वाड, वक्र, कुटिल, लबाडीचा ( शील, स्वभाव, मार्ग, इ० ).६ अति सुंदर,किं० मनोहर; उ० वामलोचना म्ह० सुंदर आहेत डोळे जिचे अशी स्त्री. ॐ **वामाचार पु०** १ वेदांच्या विरुद्ध वर्तन किं० आचरण. २ तंत्रांत सांगितलेलें डाव्या हातानें देवांची पूजा आणि मद्यमासादींचें सेवन. **वामावर्त पु०** डावीकडे वळलेला शंख. **वामदेव पु०** महादेव; शंकर. **वामकुक्षि स्त्री०** दुपारच्या भोजनानंतर अल्पकाळ घेतलेली झोप,—जी डाव्या कुशीवर पडून घेतली असतां अन्नपचन चांगलें होतें असें वैद्यशास्त्राचें मत आहे ( करणें ). **वामकुक्षि होणें** डाव्या कुशीवर पडून झोप घेणें. **वामांग न०** डावी बाजू. **वामांगी स्त्री०** पत्नी; भार्या.

**वामन [ सं० ]वि०** १ ठेंगणा. २ लहान ३ वाकलेला; नम्र. **पु०** १ श्रीविष्णूच्या दहा अवतारांपैकीं पांचवा. मागें 'अवतार' मध्यें ह्या अवतारांचीं नांवें पहा.२ दक्षिण दिशेचा दिग्गज. ३ वामनद्वादशीच्या दिवशीं जेवावयास बोलाविलेला बटु किं० मुंज झालेला ब्रह्मचारी. ॐ **वामनजयंती, वामनद्वादशी स्त्री०** भाद्रपद शुक्ल द्वादशी ही तिथि. **वामनमूर्ति स्त्री०** अतिशय ठेंगणा माणूस.

**वामाळ** वर 'वांभळ' पहा.

**वामी [ सं० वाम ] पु०** 'वामाचार' अर्थ२ पाळणारा.

**वाआभाळ [ सं० वायु+म० आभाळ ]** ज्यांतूनवृष्टि होत नाहीं आणि जे पोकळ ढगांनीं व्याप्त आहे असें आकाश.

**वायकणी [ म० वाया ( निष्फळ ) + करणी ] वि** पोकळ; निःसत्त्व; निष्फळ;खोटा; दिखाऊ ( भाषण, आदर ).

**वायकळ, वायफळ** [ म० वाया+फळ ] वि० १ पोकळ, खोटा ( भाषण,आदर, प्रेम ).२ निरुपयोगी; निरर्थक.

**वायकळणें** [ म० वायकळ ] अ०क्रि० भलत्याच रीतीनें किं० सभ्य चालीरीती सोडून किं० उत्संखळपणें वागूं लागणें.

**वायकळा** [ म० वायु+कळा ] स्त्री० अ० व० सांधे दुखणे हा व्याधि.

**वायंगणा** पु०, **वायंगणें** न० [ म० वायंगें= वांगें ] उन्हाळ्यांत पिकाविलेलें भात.

**वायगमन** [ सं० वायु+गमन ] न० पोटांत धरतो तो वायु.

**वायंगें** इ० मागें ' वांगें ' इ० पहा.

**वायगोळा** [म० वायु+गोळा] पु० पोटाच्या रिकामेपणामुळें किं० अन्य कारणांमुळें पोटांत जो गोळा उठतो तो.

**वायंघोय** न० कळपांतील मेलेला बैल, गाय, रेडा, म्हैस, इ० गुरूं.

**वायंचणें** पुढें ' वैंचणें ' पहा.

**वायचळ** [ म० वायु+चळ ] पु० शरीरांत वायूचा क्षोभ झाल्यामुळें मनुष्य वेड्यासारखी बडबड करतो तीं.

**वायटळ, वायटूळ, वायटोळ, वावटळ** [ सं० वायु ] स्त्री० जोराचा किं० सोसाट्याचा वारा.

**वायंडा, वावंडा** [ म० वाया ] वि० फळ किं० अर्थ न मिळतां किं० उद्दिष्ट सफळ न होतां गेलेला ( काळ) किं० केलेली (खटपट); रिकामा; फुकट; निष्फळ; व्यर्थ झालेला.

**वायण** दगडाचें उखळ. मागें ' वाईन, ' ' वाईण ' पहा.

**वायदा** [ अ०वअदाह्] पु०अमुक वेळीं अमुक करावयाचें किं० द्यावयाचें असा ठराव; वचन; मुदतीचा ठराव. ※ **वायदेबंदी** स्त्री० मुदतशीर कर्जाची फेड किं० पैसा देणें ह्या बाबतीचा ठराव. **वायदेचिट्टी** स्त्री०,**वायदेरोखा** पु० १ कर्जाच्या फेडीसंबंधाचा किं० कांहीं रकम कोणेकाला देण्यासंबंधाचा पुनः किं० दुसऱ्यांदा कागदावर लिहिलेला ठराव. २ जो इलाज किं० औषध रोग विकोपास जाऊं देत नाहीं,पण कांहीं काळ रोगाचा जोर आवरून धरतो तो इलाज,किं०जें औषध तें.

**वायदेशा** वि० एके ठिकाणीं कायमचें वास्तव्य न करतां सदा स्थलांतर करीत फिरणारा ( माणूस ).

**वायधळ**[म० वाया]वि० रिकामा, पोकळ, निरर्थक ( भाषण,व्यवहार, खटपट,इ० ).

**वायधूळ** [ म० वायु+धूळ ] स्त्री० जोराचा वारा,-जो वाहात असतां धूळ उडते.

**वायन** [ सं० ] न० १ कांहीं व्रतानिमित्त ब्राम्हणास किं० सुवासिनीस देतात तीं फळें मिठाई, धारगे, इ० ची देणगी. २ निरशनाचा खाद्य पदार्थ.

**वायन** न० दगडाचें उखळ.मागें 'वायण'पहा.

**वायपोळ** न० मरूं घातलेला पशु,-गाय, बैल, म्हैस, रेडकूं, इ०.

**वायफट, वायफळ** [ म० वाया ] वि० १ रिकामा; पोकळ; निरर्थक;पाणचट(वर्तन,भाषण). २ वात्रट, उत्संखळ, लहरी, टवाळ (पोर,माणूस). ※ **वायफळी** वि० फळें न देणारें ( झाड ).

**वायफूल** [ म० वाया+फूल ] न० ज्या फुलांतून फळ निघत नाहीं असें फूल; नरफूल.

**वायबार** [ म० वाया+बार ] पु० आंत गोळा इ० घालतां बंदुक, तोफ, इ० तून दारु पेटवून काढतात तो रिकामा बार किं० आवाज.

**वायला** वि० वेगळा ( अशिक्षितांत रूढि).

**वायवी** खालीं ' वायव्य ' पहा.

**वायव्य** [ सं० ] वि० वायूसंबंधाचें. **वायव्या** स्त्री० वायव्य दिशा,-म्हणजे उत्तर आणि पश्चिम ह्या दोन मुख्य दिशांच्या मधली दिशा.

**वायस** [ सं० ] पु० कावळा. ※ **वायसपिंड** पु० मृताच्या उत्तर क्रियेंत दशपिंडाच्या दिवशीं कावळ्यांना खावयासाठीं जो भाताचा गोळा टाकतात तो.

**वायसा** वि० किंचित; थोडा; जरासा ( अशिक्षितांत रूढ ).

**वायां** क्रि० वि० व्यर्थ; फुकट; उ० त्याचा खर्च वायां गेला.

**वाया** पु० सोनें किं० चांदी ह्या धातूचा पन्हळाच्या आकाराचा ठोकलेला पत्रा. ※ **वायाची आवटी** स्त्री० सोनें,चांदी,इ०चा पत्र.

ठोकून वाया करावयाचें सोनाराचें एक साधन.

**वायु** [ सं० ] पु० १ वारा. २ वाऱ्याची देवता. ३ शरीरांतील प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान, हे जे पांच प्राण ते प्रत्येक. ४ शरीरांत वाताचा बिघाड झाल्यानें होतो तो रोग. ५ अपानद्वारानें शरीरांतून बाहेर पडतो तो वारा ( सरणें ). ॐ **वायुबद्ध** वि० स्थूल किं० लठ्ठ ( शरीर किं० मनुष्य ). **वायुबद्धक** वि० पोटांत वायु उत्पन्न करणारा (खाद्य पदार्थ,–पावटा इ० ). **वायूची मोट बांधणें** जगांतील सर्व वारा गोळा करून त्याचा एक गठ्ठा बांधणें हा (मूर्खपणा होय किं० अशक्य गोष्ट होय).

**वार** [ सं० ] पु० १ दिवस. २ आठवड्याचे जे सात दिवस ते प्रत्येक; उ० सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, आणि आदित्यवार. ३ पाळी; खेप; वेळ; उ० एकवार, द्विवार, त्रिवार इ०. ४ संधि; अवसर; सोयीचा समय. ५ समुदाय; ढीग; जमाव. ६ द्वार; दार. ७ आच्छादन. ८ आठवड्याचा ठराविक दिवस,–जो गरीब मुलाला जेवावयास घालण्यासाठीं ठरविलेला असतो तो. ९ आठवड्याच्या एका वारापासून पुन्हा तो वार एकदा, दोनदां, तिनदा येईतोंपर्यंतचा कालावधि; उ० मी तीन वारांनीं परत येईन(म्ह० एकवीस दिवसांनीं). १० उशीर; दिवसगत; उ० वार लावूं नको. ॐ **वारांगना, वारयुवति, वारनारी, वारयोषिता** स्त्री० वेश्या; रांड. **वारवाण, वारबाण** पु०, न० १ चिलखत; कवच. २ अंगरखा. **वारविलासिनी** स्त्री० वेश्या. **वारानें जेवणें** आठवड्याच्या त्या त्या दिवशीं त्या त्या कुटुंबांत जेवावयास जाणें. **कोणा गरीब विद्यार्थ्याला वार देणें** त्याला आठवड्याच्या एका ठराविक दिवशीं जेवूं घालणें. **मला तीन वार कमी आहेत** आठवड्याच्या तीन वारीं माझी जेवणाची सोय झालेली नाहीं. **वारकरी** पु० आठवड्याच्या ठराविक दिवशीं लोकांच्या घरीं जेवावयास जाणारा गरीब विद्यार्थी. **माझ्या वारचा** लिंगवचनांप्रमाणें फिरणारें क्रि० वि० माझ्याबद्दल; माझ्या ऐवजीं.

**वार** [ हिं० ] पु० १ शस्त्र, घोडा, इ० नीं झालेली जखम किं० इ० चा तडाखा. २ कांहीं कामाचा कोणेकावर आलेला टपका. ३ कांहीं कामाची कोणेकावर पडलेली जबाबदारी किं० आलेली जोखीम.

**वार** [ हिं० ] स्त्री० १ रिकामपण; फुरसत. २ रिकामा जागा.

**वार** [ म० उरणें ] स्त्री० तांदूळ सडल्यावर कोंड्यापेक्षां अधिक भरलेला तांदूळ.

**वार** स्त्री० जरायु म्हणून जें गर्भवेष्टन तें.

**वार** पु० पुढें 'वारसा' पहा.

**वार** [ फा० ] क्रि० वि० प्रमाणें; अनुसरून; उ० तपशीलवार, क्रमवार, नांवनिशीवार, इ०. **किफायतवार** क्रि० वि० किफायत म्ह० नफा होईल अशा रीतीनें. **उमेदवार** मागें 'उमेद' मध्यें 'उमेदवार' पहा.

**वारकरी** [ म० वार=आठवड्याचा ठराविक दिवस] पु० दुसऱ्याच्या घरीं प्रत्येक आठवड्याच्या एका ठराविक दिवशीं जेवावयास जातो तो. मागें 'वार' मध्यें 'वारकरी' पहा.

**वारकरी** [ म० वारी ] पु० १ पंढरपूर इ० ठिकाणीं वर्षाच्या ठराविक दिवशीं देवदर्शनास जातो तो. २ ( **लाक्षणिक** ) अनेक वेळां एका परीक्षेस बसून नापास होणारा उमेदवार.

**वारकोंड** [ म० वारा+कोंडणें ] वि० जेथें वाऱ्याचा प्रवाह मोकळेपणानें चालत नाहीं अशा ( खोली, घर, इ० ).

**वारंग** पु० विळी, कोयती, सुरी, इ० चें जें टोक लाकडाच्या मुठींत खुपसलेलें असतें तें.

**वारगी पारगी** मागें 'पारगी वारगी' पहा.

**वारंगुळा, वारगोळा** पु०, **वारगुळें, वारगोळें** न० एक बैल किं० रेडा दुसऱ्या शेतकऱ्याकडून आपल्या शेताच्या नांगरणी इ० कामासाठीं आणून आपलें काम करून घेणें आणि त्या दुसऱ्या शेतकऱ्याच्या कामाच्या वेळीं आपला बैल किं० रेडा त्याला देणें ही जी एकमेकांना मदत करण्याची सरणी ती. नांगर, माणसें, इ० उसनीं देणें किं० घेणें ह्या सरणीलाही वारंगुळा इ० शब्द योजतात.

**वारण** [ सं० ] पु० १ हत्ती. २ चिलखत. ३ हत्तीची सोंड. न० १ निरोध; दूर सारणें. २ प्रति-

षेध; परतविणें. ३ (हत्तीला नियंत्रणारें) अंकुश. ४ संरक्षण. ॐ **वारणसाह्वय** न० हस्तिनापूर.

**वारणें** [ सं० वृ ] स० क्रि० १ (कोणेकाला) कांहीं कृत्य करण्यापासून निवृत्त करणें किं० पराङ्मुख करणें; आडविणें; थांबविणें. २ ( कांहीं प्रसंग, संकट, इ० ) टाळणें. ३ ( माशा ) हात इ० हालवून जवळ न येतील असें करणें. ४ ( कर्ज ) फेडणें किं० ज्याचें त्यास देऊन टाकणें. ५ देव, बडा माणूस, इ० च्या डोक्यावर (चंवरी, पंखा, इ० ) हालविणें. अ० क्रि० १ मरणें. **टीप**,–या अर्थी ' वारणें ' या क्रियापदाचा फक्त भूतकाळींच प्रयोग होतो. २ टळणें. ३दूर सरणें. ४ ( कर्ज ) फेडलें जाणें. ५ ( माशा ) हाकलून दिल्या जाणें.

**वारणें** स० क्रि० ( कोणेकाला ) बोलावणें किं० हाका मारणें.

**वारती** [ सं० वरत्रा ] स्त्री० झोपाळा, पाळणा, इ० टांगावयाची दोरी, गज, सांखळी, इ०. [ प्राप्त.

**वारद, वारीद** [ अ० ] वि० प्रविष्ट;दाखल;

**वारयुवती** [ सं० ] स्त्री० वेश्या. वर 'वार' मध्यें पहा.

**वारलें** न० ज्वस, मुंज, इ० प्रसंगीं घालतात जें बहुलें त्याच्या चारी कोपऱ्यांस ज्या उतरंडी असतात त्यांतील जीं मडकीं तीं प्रत्येक.

**वारवण, वारवणें** न० शेळ्या, मेंढ्या, इ० ची चराई किं० त्यांच्या चराईबद्दलचें देय.

**वारवणें,वारविणें,वारावणें,वाराविणें,वारसंडणें**[म० वारा] स०क्रि०(धान्य इ०तील) केरकचरा उडवून लावण्यासाठीं ( तें ) सूप इ० मध्यें घालून वाऱ्याच्या प्रवाहांत उंचावरून खालीं हळूं हळूं ओतणें.

**वारवधू** [ सं० ] स्त्री० वेश्या. मागें ' वार ' मध्यें पहा. [ करतात.

**वारवा** पु० घेवडा,–ज्याच्या शेंगांची भाजी

**वारंवार** [ सं० ] क्रि० वि० पुनःपुनः

**वारविलासिनी** [ सं० ] स्त्री० वेश्या. वर ' वार ' मध्यें पहा.

**वारस** पु०, स्त्री०, न० एक झाड. ह्यापासून इमारती लाकूड मिळतें.

**वारसंडणें** [ म०वार] स० क्रि० वर ' वारवणें ' पहा. अ० क्रि० वाऱ्याच्या योगानें ( लाकूड, फळी, इ० ) भेगळणें किं० तिरपणें.

**वारस, वारीस** [ अ० वारिस् ] वि० १ वडिलोपार्जित संपत्तीचा जो हक्कदार किं० मालक तो. २ वाली, कैवारी.

**वारसा, वार्सा** [ अ० वर्सा ] पु० १ वंशपरंपरागत संपत्ति. २ अशा संपत्तीवरील हक्क; मालकी. ॐ **वारसदार,वारिसदार, वारिशदार** पु० वडिलोपार्जित संपत्तीचा हक्कदार. **वारसान** पु० अ० व० वडिलोपार्जित संपत्तीचे जे हक्कदार ते. **वारसेदार** पु० वडिलोपार्जित संपत्तीवर ज्यांचे हक्क आहेत ते लोक प्रत्येक.

**वारस्त्री** [ सं० ] स्त्री० वेश्या; गणिका.

**वारली, वाऱ्ली** [ म० ] स्त्री० उत्तर कोंकणांतील एक रानटी जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**वारा** पु० चलन पावलेली हवा. ॐ **वाजता वारा लागूं न देणें** कोणत्याही प्रकारचा त्रास किं० उपद्रव किं० तोशीस सोसावयास सिद्ध किं० कबूल नसणें आणि त्याचा प्रतिकार करावयास तत्पर असणें. **एखाद्याचा वारा न घेणें** ( किं० **न पडूं देणें** ) त्याच्या संसर्गास न राहाणें; त्याच्यापासून दूर किं० अलिप्त राहाणें. **वारा पडणें** वारा खळणें किं० वहावयाचा बंद होणें. **वारा पिणें** उदासीन किं० खिन्न होणें. **वारा वाहील तशी पाठ देणें** परिस्थिति बदलेल तिच्याप्रमाणें किं० तिला अनुसरून आपल्या ठायीं बदल करणें. **वाऱ्याचा उपद्रव** पु० पटकी; महामारी. **वाऱ्याचा बुंद** पु० यत्किंचित्सुद्धां वारा ( एखाद्या ठिकाणीं नसणें ). **वाऱ्याचें घोडं** न० (लाक्षणिक) गलबत; होडी. **वाऱ्याची मोट बांधणें** १ जगांतील सारा वारा गोळा करून त्याचा एक गठ्ठा बांधणें ( हें दुर्घट किं० अशक्य होय ). २अनेक मतांचें,अनेक पक्षांचें,अनेक ध्येयांचे लोक कांहीं कार्यार्थ एकत्र जमविणें आणि त्यांच्या साहाय्यानें तें कार्य पार पाडणें ( हें अति कठिण काम होय );उ० हिंदी लोकांनीं जुळून इंग्लंडला एकमुखी मागणी करणें हें वाऱ्याची मोट बांधणें होय. **वाऱ्याशीं भांडणें**

मांडावयाला कांहीं विशेषसें. किं० महत्त्वाचें कारण नसतां मांडत सुटणें. **एकाद्याच्या वाऱ्यास उभें न राहणें** त्याच्याशीं यत्किंचित् संबंध ठेवणें. **वाऱ्यांवर सरणें** मनुष्यादिकानें उत्संखळपणें वागूं लागणें किं० बेतालपणें बोलूं लागणें. **वासरूं इ० नीं वारा घेणें ( किं० पिणें )** दाव्यांतून मोकळें झाल्याबरोबर त्यांनीं आनंदानें उड्या मारीत किं० धावत सुटणें. **वाऱ्यावर टाकणें** पदार्थ, मूल, जनावर, इ०च्या संरक्षणाची किं० जोपासनेची काळजी कोणाच्या माथीं न मारतां किं० आपण न स्वीकारतां त्यांना मोकळें सोडणें; त्यांच्या संबंधानें बेफिकीर राहणें. **वाऱ्यावर वरात आणि दर्यावर हवाला** बेजबाबदार माणसाकडे कांहीं काम सोपविणें ( हा मूर्खपणा होय ). **धान्य इ० वाऱ्यास देणें** तें वारविणें. वर 'वारविणें' पहा. **वारा घालणें** तोंडानें फुंकर घालणें किं० पंखा हालवून पदार्थावर वाऱ्याचा प्रवाह चालविणें. **वारा घेणें** उत्संखळपणें वर्तणें. **वारा पिणें** उदासीन किं० निरुत्साह होऊन बसणें. **वारा सोडणें** किं० **वारा मोकळा करणें**(किं० सोडणें) अपानद्वारें वारा बाहेर टाकणें. **वारा पाठीवर घ्यावा** परिस्थिति अनुकूळ करून घ्यावी; परिस्थितीचा फायदा करून घ्यावा. **वारापाणी करणें** १ झिडकारणें; मनावर न घेणें; उ० मी तुला जें सांगितलें त्याचें वारापाणी करूं नको. २ निरवानिरव; विल्हेवाट करणें; व्यवस्थित रूपांत घालणें किं० ठेवणें. **कर्जाचें वारापाणी करणें** तें फेडून मोकळें होणें. **वारापाणी खाणें** जबाबदारी नाहीं अशा स्थितींत कांहीं काळ घालविणें; मोकळेपणानें किं० निश्चितपणांत कांहीं काळ राहणें. **वाऱ्यावशीं, वाऱ्यासोईं** क्रि०वि० उघड्यावर; वाऱ्यांत.

**वारांगना** [ सं० ] स्त्री० वेश्या.

**वारांगुळें** न० धान्य, चिरगुटें, इ०ची अव्यवस्था, उडवाउडव.

**वाराणशी** [ सं० ] स्त्री० श्रीक्षेत्र काशी. ० **वाराणशीकर** पु० लुच्चा; सोदा.

**वारावणें** मागें ' वारवणें ' पहा.

**वारावार, वारासार** [ म० वारणें+वारणें ] स्त्री० विल्हेवाट ; निरवानिरव; ज्याचें त्याला देणें तें देणें आणि घेणें तें घेणें; नवस इ० ची फेड.

**वाराविणें** मागें ' वारविणें ' पहा.

**वारासार** [ म० वारणें+सारणें ] स्त्री० वर ' वारावार ' पहा.

**वाराह** [ सं० ] वि० डुकरासंबंधाचें. पु० १ डुकर. २ काळा गेळा. **वाराही** स्त्री० १ गोराडू; डुकरकंद. २ पृथ्वी. ३ मातृकाविशेष. **वाराहकल्प** पु० कालविशेष,–विष्णूनें वराह अवतार घेतला तो कल्प. **वाराही कंद** पु० गोराडू.

**वारित** [ सं० ] वि० परतविलेला; टाळलेला; चुकविलेला; निवारलेला.

**वारिशदार** इ० मागें ' वारस ' मध्यें पहा.

` **वारी** स्त्री० वाटा; हिस्सा; उ० आज बाजारांत पुष्कळ आंबे आले होते पण माझ्या वारीला कांहींच आले नाहींत.

**वारी** [ म० वार ] स्त्री० १ क्षेत्राच्या ठिकाणीं नियमित समयीं किं० दिवशीं जाण्याचा कोणेकानें पथकरलेला नियम; उ० पंढरीची वारी इ०. २ एकाच परीक्षेला अनेक वेळां जाऊन येणें ( नापास होण्याच्या दृष्टीनें ). ३ खंडोबा, भवानी, इ० चे भक्त मागतात ती भिक्षा. ४ ( कवितेंत ) अवकाश, जागा.

**वारीं** [ म० वार ] क्रि०वि० ० च्या साधनानें किं० उपायानें; उ० चोर आले तर आमच्या घरच्या बायका त्यांना केरसुण्या वारीं पिटाळून लावतील; उ० पंख्यावारीं वारा घ्यावा. २ प्रमाणें; तुल्यतेच्या दृष्टीनें; उ० मला तो तृणावारीं मोजतो; उ० अशा कामांना पाण्यावारीं पैसा खर्चावा लागतो; उ० त्याणें माझें बोलणें थट्टेवारीं नेलें; उ० पाटीभर आंबे प्रसादावारीं गेले. १ बदलीं; जागीं; मोबदल्यानें; उ० मी केवळ पोटावारीं हें काम करतों ( म्ह० फक्त जेवण हा मोबदला घेऊन ).

**वारीक** [ म० वार ] पु० न्हावी; हजाम.

**वारीद, वारित** [ अ० वारिद ] वि० प्रविष्ट; दाखल; आलेला. २ फंदलेलें ( कर्ज इ० )

**वारीस** [ अ० ] पु० वडलोपार्जित संपत्ति, शेत, इ०; किं० त्याच्या उपभोगाचा कोणेकाचा हक्क. ० **वारीसदार** पु० वडिलोपार्जित जें

काहीं त्याचेवर ज्याचा हक्क आहे तो.

**वारुणी** [ सं० ] स्त्री० १ पश्चिम दिशा,— जिचा अधिपति वरुण आहे. २ मद्य.

**वारू** [ सं० वारु ] पु० १ युद्धांतील जरीपटक्याचा हत्ती. २ ( मराठींत ) लढाईच्या कामीं उपयुक्त घोडा. ३ ( मराठींत ) उत्तम घोडा.

**वारूळ** [ म० वाळू+घर ] न० १ भोम; मुंग्यांचें किं० किड्यांचें वसतीचें उंचवट्याच्या रूपाचें स्थान. २ एक व्रणरोग. ३ वाळा,— पाण्याला वास लागावा म्हणून त्यांत घालतात तें तृणविशेष.

**वारें** [ म० वारा ] न० १ वारा; चलन-वलनशील वारा; उ० आज फार हिंवस वारें सुटलें आहे. २ एकाद्या विशिष्ट ठिकाणाहून वाहात आल्याकारणानें तेथील गुणांनीं युक्त असा जो वायु तो किं० तेथील गुणांचा समुच्चय; उ० पटकीचें वारें, पडशाचें वारें; इ०. संपत्तीचें वारें किं० अधिकाराचें वारें म्हणजे संपत्ति किं० अधिकार प्राप्त झाल्यामुळें अंगीं येणारे दुर्गुण. ३ गुण-विशेषाची द्योतक अशी जी चेहऱ्याची ठेवण ती; उ० त्याच्या तोंडावर कारकुनीचें वारें दिसतें आहे. ४ एकादी गोष्ट करण्याकडे प्रसंगविशेषा-पुरता उत्पन्न झालेला जो कल तो; उ० ह्या पोराच्या अंगांत आतां बागडण्याचें वारें आलें आहेसें दिसतें. ५ सामर्थ्य; उत्साह; रंग; उ० तारुण्याचें वारें. ६ आविर्भाव; देखावा; उ० चोरांच्या पुढें शामूआण्णानें पहिलवानगिरीचें वारें अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. ७ स्थल, काल, परिस्थिति, इ० च्या योगानें सोय, नफा, लाभ, इ० होण्याची शक्यता; उ० पूर्वी एका विघ्यास पांच खंडी भात पिकत होतें तें वारें आतां उरलें नाहीं. ८ वर्त-नाची सरणी; उ० तें वारें आतां सोड. ॐ **एकाद्या गात्रावरून वारें जाणें** शरीरांतील काहीं बिघाडामुळें तें विशिष्ट गात्र लुलें पडणें म्ह० लटकें पडणें. **वारें फिरणें** अगदीं उलट प्रकारची वर्तणूक होणें; वस्तुस्थितींत बदल होणें किं० बिघाड होणें; उ० रामूला नोकरी लागल्या-पासून लक्ष्मीबाईचें वारें फिरलें ( म्ह० तिची पूर्वीची साधेपणाची वर्तणूक पालटली). **वारें पाल-टणें** पूर्वीची स्थिति अगदीं बदलणें. **वारें लागणें** संसर्ग होणें; संगति लागणें; संबंध घडणें. **त्याला पुण्याचें वारें लागलें** पुण्याच्या लोकांच्या अंगचे दुर्गुण त्याला जडले. **आधींच तारें त्यांत शिरलें वारें** आधींच द्वाड आणि तशांत त्या द्वाडपणाला उत्तेजक परिस्थिति जमून आल्यामुळें तो त्याचा द्वाडपणा अधिक भयंकर किं० उपद्रव-कारक होणारच. **वारेघशीं** [ म० वारा+घासणें ] **क्रि० वि०** वाऱ्याच्या झोतांत; उघड्यावर. **वारेमाप** [ म० वारा हेंच माप आहे ज्याला ] **न०** १ वस्तुस्थितीपासून फारच दूर असा तर्क किं० अशी अटकळ; वस्तुस्थितीशीं फारच विसं-वादी काहीं गोष्ट. २ भरमसाट भाषण. **वारेहळक** [ म० वारा+हडकणें ] वि० वाऱ्यांत ठेवून वाळ-विलेलें; वाऱ्यांत असल्यामुळें वाळलेलें.

**वारेळूं** न० एक सुगंधी तृणविशेष; वाळा.

**वार्ता** [ सं० ] स्त्री० १ खबर; बातमी; अफवा. २ संभाषण ( करणें ). ॐ **ह्या गोष्टीची मला वार्ताही नाहीं** ही गोष्ट मला मुळींच ठाऊक नाहीं; ही गोष्ट माझ्या स्वप्नींही नाहीं. **ह्या पंचपाळ्यांत हिंगाची वार्ताही नाहीं** मुळींच हिंग नाहीं. **वार्ताहर, वार्तावह** पु० जासूद; दूत.

**वार्तिक** [ सं० ] पु० १ दूत; जासूद; निरोप, पत्रें, इ० नेणारा किं० आणणारा. २ वैश्य. न० न्यूनाधिक सांगणारा आणि स्पष्टीकरण करणारा नियम. ॐ **वार्तिककार** पु० कात्यायन ऋषि,— ज्याणे पाणिनीच्या सूत्रांवर वार्तिकें केलीं.

**वार्द्धक, वार्द्धक्य** [ सं० ] न० म्हातारपण.

**वार्द्धुष, वार्द्धुषि, वार्द्धुषिक** [ सं० ] पु० व्याज-बट्टा किं० वाढीदिढी करणारा सावकार. **वार्द्धुषी** [ सं० वार्द्धुषिन् ] पु० वर 'वार्द्धुष' पहा. **वार्द्धुष्य** न० व्याजबट्टा करण्याचा धंदा.

**वार्षिक** [ सं० ] वि० १ वर्षाऋतूंतील; पावसाळ्यांतील. २ दर वर्षी येणारा, होणारा, किं० घडणारा. ३ वर्षभर पुरण्याइतकें. न० दर वर्षी येणारा किं० होणारा सण किं० उत्सव. २ वर्षाला कोणेकाला द्यावयाचा ठरलेला पगार. ॐ **वार्षिकी नदी** स्त्री० फक्त पावसाळ्यांतच जिला पाणी असतें अशी नदी.

**वाल** [ सं० वल्ल ] पु० १ एका वृक्षविशेषाचें

बीज,-जें बहुधा गुंजेसारखें तांबडें आणि गुळगुळीत असतें. हें सोनें इ० चें वजन करतांना घेतात. २ कडवा हें धान्य. ❀ **आटतां वाल, पिटतां वाल, वाल वाल निसंतान** सोनें इ० आटवितांना एक वाल चोरावयाचा, तें ऐरणीवर ठोकतांना एक वाल चोरावयाचा, अशा रीतीनें प्रत्येक संस्कारांत सोनार एक एक वाल चोरणार आणि शेवटीं मालकाचें मोठें नुकसान होणार. सोनार लोकांची चोरी बेमालूम असते.

**वालई, वालय** स्त्री० साळीची एक जाति.

**वालखिल्य** [ सं० ] पु० १ अंगठ्याएवढे लहान जे साठ हजार ऋषि ते प्रत्येक. हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र. २ ( **लाक्षणिक** ) एकत्र जमलेलीं लहान लहान मुलें.प्रयोग अ०व० ;उ०येथें हे इतके वालखिल्य कशासाठीं जमले आहेत ? ❀ **वालखिल्यस्वामी** पु० मुलांमध्यें मिसळून पोरकटपणा करणारा मोठ्या वयाचा माणूस.

**वालथर** [ म० वाळू+थर ] वि० अशक्त; सत्त्वहीन; निर्वीर्य; निकस; पानचट ( भाषण, प्रयत्न, पदार्थ ).

**वालदाणी (-नी )** म० [ वाळू+फा० दानी ( आधार ) ] स्त्री० शाईनें लिहिलेल्या कागदावर घालावयाची वाळू ज्या पेटी, डबी, इ०मध्यें ठेविलेली असते ती.

**वालपापडी** स्त्री० घेवड्याची एक जात.

**वालवाल** [ म० बाल ( केश ) + बाल ( केश ) ] वि० पूर्ण; पक्का; संदेहरहित. क्रि० वि० पूर्णपणें; सर्वथैव; अगदीं; पक्केपणीं. मागें ' बाल ' मध्यें ' बालंबाल ' पहा. पुढें ' वालोवाल ' पहा.

**वाला** [ हिं० ] वि० कोणेक अर्थ, क्रिया, नातें, गुण, धर्म, इ० नीं जुळलेला किं० संबंध पावलेला; उ० तांदूळवाला म्ह० तांदूळ विकणारा; कांग्रेसवाला म्ह० कान्ग्रेसचा सभासद, इ०. वाली हें स्त्री०, वालें हें न० इ०. ' वाला ' हा प्रत्यय लिंगवचनांप्रमाणें फिरतो.

**वाला** [ म० वेगळा ] वि० वेगळा; पृथक् ( अशिक्षितांत रूढ ). [पंचा.

**वाला** पु० १ दोरी; कऱ्हाट. २ नेसावयाचा

**वाली, वाल्ही** [ अ० वली ] पु० १ रक्षण करणारा. २ कैवारी. ❀ **वालीवारस** पु० धनी, हक्कदार, वारस.

**वालीप, वालीफ** वि० अत्यंत विरळ आणि अशक्त विणीचें ( वस्त्र ).

**वालुका** [ सं० ] स्त्री० १वाळू;रेती.२वाळूक, काकडी. ❀ **वालुकातैल** न० अविद्यमान वस्तु; खपुष्प, वंध्यापुत्र, इ० प्रमाणें. **वालुकायंत्र** न० वाळूचें घड्याळ.

**वालोवाल** [ म० बालंबाल ] वि० पूर्ण; पक्का; निश्चित; संदेहरहित. ❀**वालोवाल निसंतान** न० पूर्ण नाश; द्रव्य, धान्य, नातलग, इ० ची अगदीं निःशेषता किं० समाप्ति.

**वाल्मीकि** [ सं० ] पु० रामायण रचणारा ऋषि.

**वाल्ही** वर ' वाली ' पहा.

**वांव** [ सं० व्याम ] स्त्री०,न० १ चार हात लांबी. २ शरीरास काटकोनांत दोन्ही बाहु लांब केलें असतां लांबीचें जें प्रमाण होतें तें. ३ वरील प्रकारें दोन्ही बाहु ताणून जी बाहूंची पकड होते ती; उ० ह्या झाडाचें खोड माझ्या वांवेंत मावत नाहीं.

**वांव** [ हिं० वाम् ] पु० एक जलचर प्राणी.

**वाव** [ सं० वायु ] पु० वारा; हवा ( अशिक्षितांत रूढि ).

**वाव** पु०, स्त्री० १ पुरेशी जागा; अवकाश. २ फुरसुत; रिकामपणा.३संधि;प्रसंग;योग्य समय. ४ समयोचितता. ५ जाण्यायेण्याला कोणेकाला मिळालेली किं० करून दिलेली वाट.

**वाव** न० निरुपयोगीं झाडेंझुडपें.

**वाव** [ म० वाया ] वि० निष्फळ; व्यर्थ.

**वावकळ, वावकळणें** मागें ' वायचळ,' ' वायचळणें ' पहा.

**वावगा** वि० १ गैरशिरत;अयोग्य.२ निष्कारण; निरर्थक.

**वावझड (-डी )** स्त्री० १ घरांत पावसाचे तुषार वाऱ्यानें येतात ते समुच्चयानें. २ थंडी, वारा, पाऊस, इ० मुळें अंगांत भरते ती हुडहुडी ( येणें, भरणें, लागणें ).

**वावटळ, वावटूळ** [ सं० वात ] स्त्री० १ वादळ; जोराचा वारा. २ मंडलाकार फिरणारा

वारा. वि० भरमसाट, उत्संखळ ( भाषण, वर्तन ).

**वावड** वि० भटक्या मारणारें, स्वच्छंदी ( मूल, माणूस, गुरूं ). ꙮ **वावडकी** स्त्री० स्वच्छंदीपणाचें किं० उनाडपणाचें भटकणें.

**वावडंग, वावडिंग** [ सं० विडंग ] स्त्री० एक वन्य झाड. न० त्याचें फळ. वावडिंगें पोटांतील जंतांवर योजतात.

**वावडणें** अ० क्रि०(मुलें, गुरें,इ०नीं) स्वच्छंदानें भटकणें.

**वावडणें** स० क्रि०(हत्यार इ०)परजणें किं० पेलणें किं० उगारणें.

**वावडा** वि० १ वातुल (पदार्थ). २अपथ्यकर. रोगविशेषाचा जोर वाढविणारा; उ० खोकल्याला भजीं वावडीं होत. ३ अप्रिय; नापसंत; न आवडणारा. ४ बाधक;कमीपणा आणणारा;आक्षेपार्ह.

**वावडा** वि० १ रिकामा; सुना; फुकट. २ लाभरहित. ३ चालू क्रम, परिपाठ, इ० ना सोडून असलेला.

**वावंडा, वावंडेकरी** मागें ' ओवंडा , 'ओवंडेकरी ' पहा.

**वावडिंग** वर ' वावडंग ' पहा.

**वावडी** स्त्री० १ कागदाला कांहीं विशेष प्रकारें काड्या जडवून हवेंत उडविण्यासाठीं करतात तो पदार्थ; पतंग ( उडविणें ). २ धान्यांतील केरकचरा वाऱ्यानें उडवून लावणाऱ्या माणसाला उंचावर उभें राहाण्यासाठी जो आधार करतात तो. ꙮ **कोणेकाची वावडी करणें** त्याची फजिती करणें; त्याची हुर्यो करणें.

**वावडें** न०१ सांधे दुखणें,मांधे धरणें,इ० रूप जी वातविकृति होते ती. २ शरीरास किं० प्रकृतीस विशेषप्रसंगीं जो अपायकारक पदार्थ खाद्यादि तो.

**वावदळ** न० मागें ' वादळ ' पहा.

**वावदूक** [ सं० ] पु०१ वक्ता. २ वाचाळपणें किं०वात्रटपणें बोलणारा.

**वावदळ,वावधाण, वावधात** न०, **वावधूळ** स्त्री० १ चक्राकार वाहणारा वारा. २ वादळ; वावटळ.

**वावर** न० ( झाडें, शेतें, इ० लावण्याच्या बाबतींत किं० कसाच्या दृष्टीनें ) जमीनीचा पट्टा किं० प्रदेश;उ०आमचें घर काळ्यावावरांत आहे.

**वावर** [ सं० व्यवहार ] पु० १ घरांतील किं० संस्थेंतील किं० कारखान्यांतील माणसांचें जाणें, येणें, इ० रूप जी हालचाल ती. २ जाणें, येणें, धावणें, इ० रूप कोणतीही हालचाल; उ० घरांत रात्रीं दिवा मालविला म्हणजे उंदरांचा वावर चालतो.

**वावरणें** [ सं० वि+अव+हृ ] अ० क्रि० १ कामानिमित्त घर, कारखाना, गिरणी, इ० मध्यें माणसांनीं जाणें, येणें, इ०. २ स्वच्छंदानें हिंडणें; कोणेक स्थळीं राहाणें,नांदणें, किं०वसति करणें; उ०ह्या ओसाड वाड्यांत दिवसास देखील भुतें वावरतात. स० क्रि० चालविणें; वहिवाटणें; उ० मी शेत वावरतों माझी बायको घर वावरते.

**वावरीचें जाळें** न०मोठें जाळें,–मासे पकडावयाचें. हें जाळें होडीला बांधलेलें असून त्याला नांगर नसतो. मागें ' बुरीचें जाळें ' पहा.

**वावशी** स्त्री० १ डोळ्याची एक विकृति,– ( धरणें ). २ ( डोळ्यांचा ) फुगीरपणा ( येणें ).

**वावसळणें** अ० क्रि० उत्संखळपणें वागणें.

**वावसा** वि० अव्यवस्थित, उत्संखळ, अनियंत्रित ( कारभार, भाषण, वर्तन ).

**वावसाव** [ सं० व्यवसाय ] पु० उद्योगधंदा; कामकाज; कारभार.

**वावसें** न० वेड; वेडाची लहर ( भरणें ).

**वांवसें** [ म० वांव; सं० व्याम ] न० काथ्याच्या दोरीचे कोपर आणि पंजा यांना गुंडाळलेलें तीन फेऱ्यांचें वेटोळें; उ० चार वांवसें सुंभ असलें म्हणजे एक बाज विणून होते.

**वावाची अवटी** स्त्री०सोनार लोकांचा सोनें, चांदी, इ० च्या पत्र्याला पन्हळाचें रूप देण्याचा ठसा. मागें ' अवटी ' पहा. मागें ' पेरा ' मध्यें ' पेरांची आवटी ' पहा.

**वावीर** न० १ हलक्या दर्जाची भातजमीन. २ मोड फुटलेले भातदाणे,–पेरावयासाठीं केलेले. ३ निरुपयोगीं झाडेंझुडपें समुच्चयानें.

**वाव्हणी** स्त्री० खालीं ' वाहणी ' पहा.

**वांशिक** [ सं० ] वि० १ बांबूचें केलेलें. २ उत्तम कुळांतील.

**वांशीक** [ म० वांसा; सं० वंश ] न० घराकार वांसे घालून आणि बांधून करतात ती रचना; वांशांचें छपर; छपरासाठीं योजलेले वांसे समुच्चयानें.

**वाशील** [ अ० ] वि० वजा किं० कमी केलेलें ( करणें, होणें, पडणें ). ॐ **वाशीलबाकी** स्त्री० हिशेबाची निरवानिरव; हिशेबाचा किं० जमाखर्चाचा निकाल.

**वाशेळा, वाशेरा, वासट, वाशिळा, वासाळ** [ मं० वास=दुर्गंधी ] वि० शिळा झाल्यामुळें किं० नासल्यामुळें ज्याला दुर्गंधी येऊं लागली आहे असा ( खाद्यादि पदार्थ ).

**वास** [ सं० ] पु० १ सुगंध; सुवास. २ राहाणें. ३ राहाण्याची जागा,-घर इ०. ४ ( लक्षणेनें ) पदार्थाचा अत्यंत अल्प अंश; उ० विहिरींत पाण्याचा वास नाहीं. टीप,-अकरणरूपी प्रयोगांत 'वासवारा'सुद्धां ह्याच अर्थी योजतात; उ० त्याला गणिताचा वासवारा नाहीं. ५ हिंग (फोडणी इ० त चवेसाठीं घातलेला); उ० ह्या ताकाला वास लाव ( म्ह० हिंग लाव ). ६ ( लाक्षणिक ) पत्ता, तपास ( लावणें, लागणें, काढणें ); उ० आमच्या चोरीचा अद्यापि वास लागला नाहीं. ॐ **वासकट, वासट** वि० ज्याला दुर्गंधी येत आहे असा. **वासाचें पोतें** न०१ पूर्वी श्रीमंत असून हल्लीं निकृष्टावस्थेस पोंचलेला माणूस. २ जो श्रीमंत असेल असा लोकांचा तर्क आहे असा मनुष्य. ३ जो खरोखरी श्रीमंत आहे असा माणूस. **वासित** वि० धूप इ०च्या वासानें सुगंधित झालेला किं० केलेला.

**वास** [ सं० वासस् ] न० १ वस्त्र. २ पडदा.

**वांसकटी, वांसटी** [ म० ] स्त्री० १ वांसा ( तुच्छतेत ). २ अशक्त किं० लहान वांसा.

**वासणें** [ सं० वि+अस् ] स० क्रि०१(तोंड) उघडणें ( निंदेंत ). २ ( डोळे ) ताणणें; उ० डोळे वासून पहा म्हणजे दिसेल. अ० क्रि० १ (तोंड, डोळे, इ० ) उघडले जाणें. २ ( तंगड्या ) ताणून निजणें.

**वासंत** [ सं० ] वि० १ वसंत ऋतूंतील. २ वसंतऋतूसंबंधाचें. टीप,- ह्या दोन्ही अर्थी 'वासंतिक' सुद्धां. **वासंती** स्त्री० १ पांढरी जाई. २ वसंतोत्सव. ३ कोकिळा.

**वासन** [सं०] न० १ वस्त्र इ० पदार्थ सुगंधित करण्याची क्रिया. २ घर, पेटी, इ० धुपाविणें. ३ मूल्यवान वस्त्रें, पोथ्या, इ० बांधून सुरक्षित ठेवण्याचें वस्त्र. ४ कोणेक ठिकाणीं राहाणें. ५ वास्तव्याची जागा. ६योगाचें एक आसन. ७ वस्त्रसमुदाय.

**वासना** [ सं० ] स्त्री० १ स्मरण; स्मृतिहेतु असा संस्कार. २ कर्मांचा मनावर राहाणारा संस्कार. ३ ज्ञान. ४ ( न्याय ) अज्ञान; मिथ्याज्ञानजन्य संस्कार. ५ इच्छा; आवड. ६ ( ज्योतिष) ग्रह स्पष्ट करण्याचा एक संस्कार. ७ ( मराठींत ) मरणाऱ्या माणसाची शेवटची इच्छा; मरणारानें आग्रहपूर्वक दर्शविलेली इच्छा. ८ शास्त्र, कला, इ० चा परिचय, अभ्यास, किं० माहिती; उ० शास्त्राची थोडीशी वासना असली म्हणजे भाषण प्रौढ दिसतें. ॐ **वासना फजीत करणें** अत्यल्प प्रमाणांत ती तृप्त करणें किं० पुरविणें. **वासना मोडणें** इच्छा नियंत्रित करणें किं० आटोक्यांत ठेवणें.

**वासपूस** [ म० पुसणें=विचारणें ] स्त्री० कांहीं काम, कोणी माणूस, कांहीं गोष्ट, इ०च्या संबंधाची चौकशी किं० तपास ( करणें, घेणें ). मागें ' पूस ' मध्यें ' पूसतपास ' पहा. पुढें ' वास्त ' मध्यें ' वास्तपुस्त ' पहा.

**वासर** [ सं० ] पु० १ दिवस. २ आठवड्याचा दिवस. ॐ **वासरमणि** पु० सूर्य.

**वासरूं** [ सं० वत्स ] न० १ गाय, म्हैस, इ० चें अपत्य. २ ( प्रेमांत ) मूल, धाकटा भाऊ, इ०. ३ गलबताच्या अवजाराची एक दोरी. ॐ **वासुरकरीण** स्त्री० जिचें वासरूं असून तें वासरूं जवळ असलें म्हणजेच दूध देते अशी गाय किं० म्हैस. आंबोण पुढें ठेविलें असतां जी दूध देते, अशा गायीला किं० म्हशीला ' हातकरीण ' म्हणतात.

**वासलात** (-द ) [ अ० वासिलात्=एका बाजूने खालच्या सर्व रकमा ] स्त्री० १ जमा झालेल्या किं० भरणा झालेल्या रकमा किं० त्यांच्या संबंधाचा हिशेब किं० त्यांच्या खर्चाचा तपशील. २ जमाबंदीच्या बंदावर काढतात ती

एक विशेष प्रकारची रेघ. ३ घडलेल्या एकाद्या गोष्टीची किं० प्रकरणाची साद्यंत हकीगत. ४ एकादा खटला किं० गुंतागुंतीचें प्रकरण किं० बाबत ह्यांचा निकाल. ५ पैसा, सामग्री, इ० ची उधळपट्टी ( वाईट अर्थानें ); उ० बाप मेल्यावर तीन वर्षांच्या आंत त्याणें दोन लाखांच्या संपत्तीच्या वासलात लावली. ❀ वासलात लावणें ऐकणाराला कंटाळा येण्याइतक्या तपशीलासह कांहीं हकिकत सांगणें.

**वासवारा** [ म० वास+वारा ] पु० ए०व० अत्यल्प प्रमाणसुद्धां ( नसणें ). मागें ' वास ' मध्यें अर्थ ४ ची टीप पहा.

**वासळणें** [ म० वास ] अ० क्रि० पिकल्यपणाच्या वासानें (आंबा, फणस, इ० ) युक्त होणें.

**वांसा** [ सं० वंश ] पु० १ बांबू; चिवा; कळक. २ सागाच्या झाडाचे, आढ्या पासून वळचणीपर्यंत ओंवणाखालीं घालतात ते सोट प्रत्येक. ३ नाकाचें हाड शेंड्यापर्यंतचें. ४ पाठीचा कणा. ५ ( लक्षणेनें ) जाडी लेखणी, बोरू, इ०. ❀ खाल्ल्याघरचे वांसे मोजणें कृतघ्नपणा करणें; आपल्या आश्रयदात्याचें नुकसान झालें किं० त्याला दारिद्र्य आलें तर आपला काय फायदा होईल हा विचार करीत बसणें.

**वासाचें पोतें** न० मागें ' वास ' मध्यें पहा.

**वासाळ** वर ' वाशेळा ' पहा.

**वासित** वि० वर ' वास ' मध्यें पहा.

**वासी** [ सं० वस्=राहाणें ] वि० राहणारा. हा शब्द स्थलवाचकांपुढें येऊन ' त्या स्थळीं राहाणारा ' असा अर्थ होतो; उ० वंगवासी म्ह० बंगाल्यांत राहाणारा; महाराष्ट्रवासी म्हणजे महाराष्ट्रांत राहाणारा; वैकुंठवासी किं० स्वर्गवासी म्ह० मेलेला; वनवासी म्ह० वनांत राहाणारा, इ०.

**वासुदेव** [ सं० ] पु० १ श्रीकृष्ण; विष्णु. २ भिकाऱ्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणी भिकारी. हे लोक मोराच्या पिसांचा टोप डोक्यावर धारण करून भिक्षा मागतात.

**वासुरकरीण** स्त्री० मागें ' वासरूं ' मध्यें [ पहा.

**वासुरूं** न० मागें ' वासरूं ' पहा.

**वासेंबी** [ सं० वंशबीज ] न० बांबूचें बीज.

**वांसोंडी, वांसोळी** [ सं० वंश; म० वांसा ] स्त्री० १ लहान किं० अशक्त वांसा. २ वांसा;–तुच्छतेंत.

**वास्त, वास्ता** [ हिं० पूच्छाइ् ] स्त्री० १ काळजी; पर्वा; आस्था; ( टाकणें, सोडणें ); उ० रामूकडे माझे जे रुपये आहेत त्यांची मी वास्त सोडली. २ चौकशी; विचार ( करणें ); उ० मी दोन महिने आजारी होतों, तुम्ही कोणी एका शब्दानें तरी माझी वास्त केलीत काय ? उ० मी कोणाची वास्ता ठेवणारा मनुष्य नाहीं. ❀ वास्तपुस्त १ चौकशी. २ काळजी; पर्वा.

**वास्तव, वास्तविक** [ सं० ] वि० १ खरें; सत्य; सत्याला धरून असलेलें. २ निश्चित.

**वास्तव्य** [ सं० ] न० १ राहाणें; वसति. २ राहावयाचें घर; राहावयाला योग्य ठिकाण.

**वास्तु** [ सं० ] पु०, न० १ घराची जागा. २ घर; स्थान. ह्या दोन्ही अर्थी मराठींत स्त्री० रूढ. ❀ वास्तुकर्म [ सं० वास्तुकर्मन् ] न० घर बांधणें. वास्तुशांति स्त्री० नवीन घरांत राहावयाला जाण्यापूर्वी त्या घरांत करतात तो होम इ० रूपाचा विधि. वास्तुपुरुष पु०, वास्तुदेवता स्त्री० गृहाभिमानी देवताविशेष. वास्तुप्रवेश पु० नव्या बांधलेल्या घरांत राहावयास जाणें. वास्तुविद्या स्त्री० घर बांधण्याची कला,–चौसष्ट कलांपैकीं एक.

**वाह** [ सं० ] पु० १ घोडा. २ बैल. ३ ओझें वाहाणारा पशु. [ वाहाणारा पशु.

**वाहक** [ सं० ] वि० वाहून नेणारा. पु० १ हमाल. २ गाडीवान. ३ मोतदार.

**वाहटळ, वाहटूळ, वाहडूळ** स्त्री० १ चक्राकार गतीनें वाहाणारा वारा. २ जोराचा आणि सोसाट्याचा वारा; वादळ.

**वाहणी, वाहण, वाहवणी, वाव्हणी** स्त्री०, **वाहणें** न० [ म० वाहाणें ] १ पाणी इ० चा प्रवाह. २ कापलेल्या शेतांतलि धान्य इ० घरीं नेऊन साठविणें.

**वाहणें, वाहाणें** [ सं० वह् ] स० क्रि० १ ( पदार्थांचा भार ) अंगावर घेऊन (तो पदार्थ) एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं नेणें; उ० पल्लाभर तांदूळ मी एकटा दाणेआळींतून घरापर्यंत वाहून नेईन. २ ( पदार्थाचा भार ) सोसणें किं० सहन करणें; उ० ही काठी इतका मार

वाहणार नाहीं; उ० पृथ्वीचा भार शेष आपल्या मस्तकावर वाहतो. ३ गर्व, अभिमान, ताठा, इ० मनोविकार ( कोणेकाचे ठायीं ) असणें; उ० तूं कशाला तालिमबाजीचा इतका गर्व वाहातोस ? ४ जबाबदारी, कामाचा भार, किं० काळजी(कोणेकानें) पत्करलेली असणें; उ० तुमचा मुलगा परीक्षेंत पास करून देण्याची जबाबदारी मीं वाहीन. ५ ( चरितार्थाचें साधन ह्या दृष्टीनें दुकान, धंदा, कारभार, संसार, इ०) चालविणें. ६ पूजेच्या विधींत देवाला (फुलें,गंध, अक्षता,इ०) अर्पिणें. ७ ( शपथ ) करणें किं० उच्चारणें. ८ ( पदार्थविशेष ) मिळण्याची आशा सोडून देणें. ९ गमावून घेणें; उ० जामीन रहा आणि गांठचें वहा ( ह्म० जामीन राहातो त्याला पदरचें भरावें लागतें ). १० ( धनुष्यास दोरी ) चढविणें किं० लाविणें. ११ ( लेखणी, शस्त्र, पागोटें, इ० चा ) पुन्हा स्वीकार करावयाचा नाहीं असा निश्चय करणें. अ० क्रि० १ ( वारा, पाणी, नदी, इ० ) गतिमान् होणें किं० पुढें जाणें. २ ( सैन्य, टोळ, चोर, यात्रेकरू, इ० ची )रहदारी सुरू होणें. ३ ( रस्ता ) गाड्या, प्रवासी, माणसें, इ० च्या जाण्यायेण्यानें गजबजलेला असणें.४ नाक, डोळे, जखम, फुटकें भांडें, इ० तून ( पाणी, पू, रक्त, तेल, इ०) बाहेर पडत असणें. ५ ( हत्यार, शस्त्र, यंत्र, इ० ) काम करण्याच्या स्थितींत असणें. ६ ( काळ ) अतिक्रान्त होणें किं० जाणें.७ (संस्था, समाज, जग, इ० ) आपआपल्या सरणीनें चाललेलें असणें.८(तर्क, विचार, मन बुद्धि,इ०)चालणें. ® **वाहिली ती गंगा राहिलें तें तीर्थ** पाणी वाहून गेलें तर ती गंगा किं० पवित्र नदी होते, आणि पाणी तेथेंच सांचून राहिलें तर त्याला ' तीर्थ ' म्ह० पवित्र पाण्याचा संचय असें नांव प्राप्त होतें; सारांश, पाणी कोणत्याही स्थितींत असलें तरी पवित्रच. त्याप्रमाणें पैसा धर्मकृत्यांत खर्चिला तर पुण्य लागतें, आणि पैसा शिल्कीस टाकला तरी आपल्या अडचणीच्या वेळीं तो कामास येतो. सारांश,पैसा हा सर्व प्रकारें उपयोगी किं० मूल्यवान् पदार्थ आहे.

**वाहता** [ म० वाहणें ] वि० १ वाहणारा ( रस्ता ). २ रहदारीचा (रस्ता). ३ संचलनशील ( वारा ). ४ सतत चालणारा किं० वाहणारा ( झरा, पाट, नदी, इ० ). ५ कापणें, मारणें, इ० कामीं उपयुक्त ( शस्त्र, तरवार, इ० ). ६ विचार करण्याच्या स्थितींत असलेली ( बुद्धि ). ७ चालू स्थितींत किं० उपयोगांत असलेलें ( यंत्र, चरक, चरका, तेलाचा घाणा, इ० ). ® **वाहत झरा, वाहता झरा** पु०, **वाहात झरी** स्त्री० १ ज्याचें पाणी वाहावयाचें कधींच थांबत नाहीं असा विहीर, टांकें, तळें,इ०च्या पाण्याचा उगम. २ ( **लाक्षणिक** ) द्रव्यप्राप्तीचें अखंडित साधन; चरितार्थाचें सतत चालू राहणारें साधन. **वाहत वाटोळें** न० १ कांहीं काळापुरती केलेली तजवीज किं० तरतूद; कांहीं काळ मात्र टिकेल अशी कांहीं कामाची निरवानिरव किं०विल्हेवाट किं० निकाल; तात्पुरती तडजोड.२ विध्वंस;सत्यानास; नासाडी.**वाहती कूस** स्त्री०ज्या स्त्रीस पुष्कळ दिवसांत मूल झालेलें नाहीं तिच्या गर्भाशयांत एकदा गर्भधारणा झाली आणि तिला मूल झालें म्हणजे तिची जी कूस ( म्ह० गर्भाशय ) ती; उ० एकदा वाहती कूस झाली म्हणजे हावी तितकीं पोरें होऊं शकतील. **पावसाची वाहती कूस होणें** लांबणीवर पडलेल्या पावसाळ्याला एकदा पाऊस पडून सुरवात होणें. **वाहती गंगा** स्त्री० सुरवात होऊन सुरळीतपणें चालू लागलेलें काम, धंदा,किं०नोकरी.कोणेकाची वाहती गंगा होणें ( किं० चालणें, किं० चालू होणें ) असे प्रयोग होतात. **वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावे** अनुकूल परिस्थिति जमून आल्यामुळें जर आपलें सहजगत्या काम होण्याजोगें असलें तर तें तावडतोब किं०अवश्य करून घ्यावें. **वाहती धार** स्त्री० १ उपयोगी पडण्याच्या स्थितींत असलेली शस्त्राची धार ( म्ह० तीक्ष्ण धार ). याच्या उलट ' पडती धार. ' २ सतत वाहणारा झरा, ओढा, जखम, गळूं, इ०. ३ ऐन रंगांत आलेला वाद, लढाई, इ०. **वाहाती वाट** स्त्री० ज्यावर सदैव रहदारी चालू असते अशी वाट म्ह० रस्ता. **वाहतें नांव** न०लोकांत प्रसिद्ध असें कोणेकाचें नांव;ज्या नांवानें लोक त्याला ओळखतात तें नांव.

**वाहतीस** [ म० वाहणें ] पु० चाल; रीति

शिरस्ता; परिपाठ.

**वाहतूक** [ म० वाहणें ] **स्त्री०** १ रहदारी. २ सामान वाहून नेण्याआणण्याबद्दलचा खर्च.

**वाहन न०** दगडाचें उखळ,-विशेषत: जमीनींत पुरलेलें. ह्यांवें तेथें मांडावयाचें आणि पोहे इ०कांडावयाचें जें उखळ त्याला ' उखळी ' **स्त्री०** असें म्हणतात.

**वाहन** [ सं० ] **न०** १ नेणें; वाहून नेणें. २ प्रवासाचें साधन,-गाडी, घोडा, पालखी, मेणा, इ०. ॐ **गरुडवाहन पु०** श्रीविष्णु. **मूषकवाहन, आखुवाहन पु०** गणपति. **नरवाहन पु०** कुबेर.

**वाहवट** [ म० वाहणें ] **वि०** १ पाण्याच्या प्रवाहानें वाहवून नेलेलें ( गवत,केरकचरा, इ०). २ पाण्याच्या प्रवाहानें उकरली गेलेली ( माती इ० ) किं० झिजविलेला ( प्रदेश ). **स्त्री०** प्रवाह; ओढा. ह्या अर्थी ' वाहवटळ ' **स्त्री०** सुद्धां.

**वाहवटळ**[म० वावटळ]**स्त्री०** १ सोसाट्याचा वारा; वादळ. २ प्रवाह; ओढा.

**वाहवण** [ म० वाहणें ] **स्त्री०** प्रवाह; वाहत जाणें. **वाहवणी न०** १ वाहाणारें पाणी;वाहात आलेलें पाणी.२ पावसाचें वाहणारें पाणी. याच्या उलट' जिरवणी 'म्ह० जमीनीत जिरणारें पाणी.

**वाहवणें** [ म० ' वाहणें ' चें एक रूप ] **अ० क्रि०** १ पाण्याच्या प्रवाहाबरोबर ( लाकूड इ०) वाहत जाणें. २ फुटलेल्या बारदानांतून ( आंतील पदार्थ ) बाहेर पडणें. ३ ( **लाक्षणिक** ) शिस्तीपासून चळणें किं० च्युत होणें; उ० राम्याची संगत लागल्यापासून गोविंदा फारच वाहवला. ४ ( **लाक्षणिक** ) मुद्दा सोडून बोलणें किं०लिहिणें. ५ ( **लाक्षणिक** ) ( बेत, योजना, संकल्प, इ०) फिसकटणें किं० विफळ होणें.

**वाहवरा** [ म० वाहवणें ] **वि०** १थिलथिलीत किं० पातळ ( गूळ, लोणी, चिखल,इ० ). २ लठ्ठ असून अशक्त( शरीर );थिलथिलीत(शरीर,पोट). ३ भरमसाट, मुद्याला सोडून असलेलें (भाषण).४ मुद्याला सोडून बोलणारा ( माणूस ).

**वाहवा** [ फा० वाह्+वाह् ] **उ० वा० अ०** उत्तम ! ठीक ! शाबास ! भले खाशे ! **स्त्री०** प्रशंसा; स्तुति; तारीफ.

**वाहळी** [ म० वाहळ ] **स्त्री०** १ लहानसा ओढा किं० पाण्याचा प्रवाह. २ तेरडा ह्या फुलझाडाची एक जात.

**वाहाटळ, वाहाडणें** इ० मागें ' वाहटळ, ' वाहडणें ' पहा.

**वाहाण, वहाण** [ म० वाहणें ] **स्त्री०**ओढा; झरा; झऱ्याचें पाणी.

**वाहाण,वाहण, वहाण स्त्री०**चालतांना खडे, कांटे, इ० पासून पायाच्या तळव्याचें रक्षण करणारा कातड्याचा पदार्थविशेष. [पहा.

**वाहाळ, वाहाळी** मागें ' वहाळ,' 'वहाळी'

**वाहिनी** खालीं ' वाही'मध्यें पहा.

**वाहिला** [ म० वाहणें ] **पु०** पोहणाराचें भोपळा इ० साधन.

**वाही** [ सं० वाहिन् ] **वि०** ( उपपद समासांत ) वाहणारा; उ० पूर्ववाही किं० पूर्ववाहिनी (नदी). **वाहिनी स्त्री०** १ नदी. २ सैन्य.

**वाहीक** [ म० वाहणें ] **वि०**१ओझें इ०वाहणारा. २ जबाबदारी वाहणारा.

**वाहीत** [ म० वाहणें ] **वि०**वहिवाटींत म्ह० लागवडींत असलेली ( जमीन, मळा,इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें ' पडीत. '

**वाहीम** [ म० वाहणें ] **न०** गाडी, नांगर, रहाट, इ० ओढणारा किं० चालविणारा किं० फिरविणारा पशु,-बैल, रेडा, इ०.

**वाहील, वाहेल** [ म० वाहणें ] **स्त्री०** शेत इ० नांगरण्याची क्रिया. **न०** १ वांझा नारळ. २ पोहोणाऱ्याचा भोपळा इ०.

**वाहुटळ, वाहुटूळ** मागें ' वावटळ ' पहा.

**वाहोळ, वाहोळकी, वाहोळदारी** [ **म०** वाहणें ] **स्त्री०** शेतकीचीं कामें समुच्चयानें ( करणें, चालविणें ).

**वाहोळ** [ **म०** वाहणें ] **वि०** लागवडींत असलेली ( जमीन ). ॐ **वाहोळकर, वाहोळकरी, वाहोळदार पु०** शेतकीचीं कामें करणारा; शेत वाहाणारा किं० कसणारा.

**वाह्य** [ **सं०** ] **वि०** १ वाहून नेण्याजोगें; सोसतां येईल असें. २ वाहावयाचें; उ० मनुष्यवाह्य पालखी. **पु०** धर्माला सोडून वर्तन करणारा माणूस.

**वाह्या, वाह्याची अवटी** मागें 'वाया,' 'वायाची अवटी' पहा.

**वाह्यात** [ सं० वाह्य ] वि० १ धर्माला विरुद्ध असें वर्तन करणारा. २ शिष्टाचारास सोडून वागणारा ( मनुष्य ); लफंगा.

**वाळ** वि० १ फुटणें, झिजणें, इ० कारणांमुळें व्यवहारांतून गळालेलें ( रुपाया इ० नाणें ). २ जातींतून अधर्माचरणामुळें बाहेर टाकलेला ( माणूस ). ४ प्रचार, वहिवाट, अमल, इ० तून गळालेला किं० रद्द पडलेला ( कायदा, नियम, चाल, इ० ). स्त्री० १ फुटणें, झिजणें, इ० मुळें रुपाया इ० नाण्याला येते ती सदोषता किं० व्यवहारांत किं० किंमतींत येतो तो कमीपणा. २ चाल, रीति, कायदा, इ० प्रचारांतून जाणें. ३ जातींतून बाहेर टाकलें जाणें. टीप,-ह्या अर्थी फक्त सप्तम्यन्त प्रयोग होतो; उ० वाळींत काढणें, पडणें, टाकणें, किं० असणें.

**वाळ** [ म० वाळणें ] स्त्री० झाड,पान, फूल, इ० ची वाळलेपणाची स्थिति. ॐ **वाळका, वाळकुंजा, वाळकुंढा** वि० १ वाळलेलें; सुकलेलें.२ आजार, फार काम, काळजी,अपुरें जेवण, इ० मुळें रोड झालेला ( माणूस, पशु ).

**वाळकी** स्त्री० काकडीचें झाड. **वाळूक** न० त्याचें फळ.

**वाळगणें** अ०क्रि०( भात,भाजी, खीर, दूध, इ०ना ) चुलीवर फार आच लागल्यामुळें करपणें किं०( त्यांना )करपट घाण येणें. ॐ **वाळगहाण** स्त्री० पदार्थ करपल्यामुळें त्याला येते ती घाण.

**वाळणें** अ० क्रि० १ (फळ, पान, फूल, इ०) शुष्क किं० रसरहित होणें.२( ओलें वस्त्र ) कोरडें होणें. ३ आजार, जबाबदारी, कष्ट, इ० कारणांमुळें ( मनुष्य, जनावर ) रोड किं० किडकिडीत होणें.

**वाळणें** [ म० वाळ ] अ० क्रि० ( कोणी मनुष्य ) जातींतून बाहेर पडणें किं० बाहेर टाकला जाणें.

**वाळंबा** पु० १ चांचड म्हणून जो मुंगळ्यासारखा प्राणी तो. २ वधई किं० वाळवी हा प्राणी.

**वाळवंट (-ठ ),वाळवट (-ठ )** [ म० वाळू +ठाव, ठाय ] न० वाळूनें व्यापलेला प्रदेश ( समुद्र, नदी, इ० च्या कांठचा ).

**वाळवण** [ म० वाळविणें ] न० १ पदार्थ वाळविण्यानें किं० वाळण्यानें कमी केलेला किं० झालेला अंश ( जाणें ). २वाळत घातलेलें धान्य, पापड, चिरगुट, इ०. स्त्री० वाळण्यानें झालेली स्थिति; सुकलेपणाची स्थिति.

**वाळवत** [ म० वाळणें+पत्र ] न०, स्त्री० वाळलेलें किं० वाळण्यानें रसहीन झालेलें केळीचें पान.

**वाळविणें** [ म० 'वाळणें' चें प्रयोजक ] स० क्रि० १ शुष्क किं० रसहीन करणें. २ ( पदार्थांतील ) जलांश काढून टाकणें. ३(मनुष्य, पशु, इ० ना) आजार, उपवास, चिंता, इ० नीं रोड किं० किडकिडीत करणें.

**वाळवी** [ सं० वल्मी=मुंगी ] स्त्री० १ वस्त्र, कागद, काष्ट, इ० कांस खाऊन त्यांचा नाश करणारा एक कीटविशेष; वधई. २ ह्या कीटाच्या रूपाचा जो रोग लाकूड, वस्त्र, इ० ना लागतो तो ( लागणें ). ३ ( लाक्षणिक ) रोग, चिंता, भीति, इ० रूप जें शरीर, संस्था, राज्य, इ० च्या ऱ्हासास कारण तें ( लागणें ).

**वाळवेणें** [ म० वाळवी ] अ० क्रि० वाळवी ह्या कीटानें ( वस्त्र, काष्ट, इ० ) उपद्रव किं० बाधा पावणें किं० पोखरलें जाणें.

**वाळसर** [ म० वाळू ] वि० रेताड (जमीन); जींत वाळू फार अशी (जमीन).

**वाळा** [ सं० वाल,वालक ] पु०१ एक तृण,-ज्याचीं मुळें सुगंधी असतात.२ह्या तृणाच्या तुकड्या समुच्चयानें.

**वाळा** पु० १ पाय किं० हात ह्यांत घालावयाचें एक भूषण. २ कोणत्याही उपयोगाची वाटोळी कडी किं० वाटोळें कडें. ३ तांब्या, पेला, इ० च्या बुडाला असते ती पट्टी. ४ एक प्रकारचा सर्प.५खोबऱ्याच्या वाटीची सगळी सलग कड कापली असतां जी चाकी निघते ती किं० अशा चाक्या समुच्चयानें. ६ कडें तापवून शरीरावर दिलेला वर्तुळाकार डाम. ७ जांघेंत किं० खाकेंत होतें तें गळूं.

**वाळियेणें** [ म० वळणें ] स० क्रि० (गलबत, होडी, इ० ) वाऱ्याच्या दिशेनें चालविणें.

**वाळी** [ म० वाळा ] स्त्री० नाक किं० कान यांत घालावयाचें सोन्याच्या किं० रुप्याच्या तारेचें लहानसें वलय; मुरकी. [ झाड.

**वाळी** [ सं०वालुकी ] स्त्री० वेलवोंडी नांवाचें

**वाळींत** [ म०'वाळ' ची सप्तमी 'वाळींत' ]न० जातींतून काढून टाकणें; जातींतून कोणेकाची झालेली किं० केलेली हकालपट्टी. कोणेकावर वाळीत टाकणें, कोणेकाला वाळींत घालणें, कोणेकावर वाळींत पडणें, कोणेकाचें वाळींत निघणें, असें प्रयोग होतात. टीप,–'वाळींत' ह्या शब्दांतील अनुस्वार उडून 'वाळीत' असें रूप झालेलें आहे.

**वाळू** [ सं० वालुका ] स्त्री० १ रेती,–काग-दावर घालण्याच्या उपयोगाची. २ दगडाचे खडे,–रस्त्यावर पसरतात ते किं० चुना कुटतांना घालतात ते. ® **वाळूंत मुतून फेस ना पाणी** कृतघ्नावर उपकार केले असतां ते फुकट जातात. **वाळूंत मुतणें** १ कृतघ्नावर उपकार करणें. २ भलत्याच कामीं पैसा, सामग्री, इ० खर्चणें. ३ ज्याचें फळ मिळालें नाहीं असें कांहीं काम किं० यत्न करणें. **जांवयांस देणें आणि वाळूंत मुतणें** जांवई कृतघ्न असतात.

**वाळूक** [ सं० वालुका, वालुकी ] न० १ खिरा किं० काकडी हें फळ. २ अवाळू,–एक रोग. ® **वाळकाची चोरी आणि डुकऱ्यांचा मार** क्षुल्लक अपराधाबद्दल फारच कडक पारिपत्य करणें ( हें योग्य नाहीं ).

**वि** [ सं० ] **उपसर्ग** हा उपसर्ग पुढील अर्थ दाखवितो. १ क्रियेचा उलटपणा; उ० विक्रय, वियोग, विस्मरण, इ०. २ अभाव; उ० विधवा; व्यसु, विनिद्र. ३ पालट, बदल; उ० विकार. ४ पूर्णता, आधिक्य;उ०विध्वंस.५भेद; उ० विवेचन. टीप,–'वि'चे ह्याशिवाय इतर कांहीं अर्थ आहेत.

**विकच** [ सं० ] वि० १ उमललेलें, प्रफुल्लित ( फूल ). २ पसरलेलें, वासलेलें ( तोंड ).३ विस्कु-रलेले ( केश ). ३ स्पष्ट, प्रकट. ४ उज्ज्वल. पु० १ बौद्ध भिक्षु. २ ( ज्योतिष ) केतु हा ग्रह.

**विकट** [सं०] वि० १ कुरूप; हिडिस. २ भयंकर;विकराळ.३क्रूर.४विशाल;प्रचण्ड.५गर्विष्ठ; उद्धट. ® **विकटान्त अध्ययन, विकटोपर्यंत अध्ययन** न० सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गज-कर्णकः । लंबोदरश्च विकटो विघ्नराजो गणाधिपः॥ हा श्लोक सर्वांना पाठ येत असतो पण तोही 'विकट' पर्यंतच ज्याला येतो म्हणजे पुरता येत नाहीं अशा माणसाचें अध्ययन म्ह० अपुरतें किं० अर्धवट अध्ययन. विपरीत लक्षणेनें प्रचंड विद्वत्ता म्ह० शून्य विद्वत्ता; उ० गोविंदाचें विकटोपर्यंत अध्ययन झालें आहे (म्ह०तो ढ किं० आशिक्षित आहे).टीप,–'अकटोपासून विकटोपर्यंत अध्ययन' ह्याचाही वरील प्रमाणेंच अर्थ आहे 'अकटोपासून' हे शब्द केवळ यमका-साठींच आहेत. **विकटोपशास्त्री** पु० जाडा विद्वान म्ह० अगदीं निरक्षर.

**विकण** [म० वि(नाहीं)+कण]वि० ज्याच्या जवळ धान्याचा एकही कण नाहीं असा म्ह० अत्यन्त दरिद्री.

**विकणें** [ सं० वि+क्री ] स० क्रि० किंमत घेऊन कोणेकाला ( पदार्थ ) देणें. अ० क्रि० १ गिऱ्हाइकाकडून पदार्थाच्या मालकाला त्या पदार्थाची किंमत घेऊन ( तो पदार्थ ) त्या गिऱ्हाईकाच्या मालकीचा होणें; विकला जाणें; उ० पुण्यांत खादी फारशी विकत नाहीं; उ० पिकेल तसें विकेल. २ चालणें; मान किं० आदर पावणें; फलद्रूप होणें; उ० येथें तुमचें शहाणपण विकणार नाहीं. ® **विकलेला** वि० अंकित. **मी गोविंदरावाचा विकलेला आहें** मी गोविं-दरावाच्या उपकारांखालीं दडपलेला आहें आणि मी त्याचें हावें तें काम करावयाला बांधील आहें.**विकणाऊ** वि०खालीं'विकाऊ'पहा.

**विकत, विकता** [म०विकणें] वि०विकत देणें किं०घेणें ह्या व्यवहारांत किं०व्यवहारानें दिलेला किं०घेतलेला.® **विकत ( किं० विकता ) कज्जा ( किं० कलागत )** आपल्याच हेकटपणामुळें अंगावर ओढून घेतलेलें भांडण. **विकत ( किं० विकता ) खोकला ( किं० तंटा इ० )** आपल्या हेकटपणामुळें आपणावर आणून घातलेलें कांहीं संकट, अनिष्ट, चिंता, कष्ट, खर्च, इ०. **विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करीत म्हणणें** आपल्या मूर्खपणानें स्वतःला कांहीं त्रासास पात्र

करून घेणें. **विकतेकरी** पु० स्वतास लागणारे जिन्नस विकत घेऊन प्रपंच करणारा. याच्या व्यावर्तकत्वें स्वतास जरूर असे पदार्थ स्वताच निर्माण करणारा.

**विकत्थन** [ सं० ] न० बढाई; प्रौढी; शेखी.

**विकंपित** [ सं० ] वि० १ कांपरा ( स्वर ). २ हालणारे ( केश, झाडाचीं पानें, इ० ).

**विकरण** [ सं० ] न० १ बदल; विकार. २ ( **व्याकरण** ) गणचिन्ह; गणालाच लागणारा प्रत्यय.

**विकरा** पु०, **विकरी** स्त्री० [ सं० वि+क्री= विकत देणें ) ] पदार्थ विकत देणें किं० विकत देऊन आलेली किंमत; उ० माझा आजचा विकरा पन्नास रुपयांचा झाला.

**विकराळ** [सं० विकराल] वि० फार भयंकर. मागें'अकराळ विकराळ' पहा. [बाण.

**विकर्ष** [ सं० ] पु० १ ओढण्याची क्रिया. २

**विकर्षण** [ सं० ] न० १ ओढण्याची क्रिया. २एकीकडे किं०बाजूला सारणें किं०करणें.३उपास.

**विकल** [ सं० ] वि० १ ज्यांत कांहीं न्यून किं० व्यंग आहे असा; अपूर्ण. २ निश्चेष्ट. ३ दीन. **विकला** स्त्री० एका कलेचा साठावा अंश. ॐ **विकलांग** वि० १ ज्याच्या शरीरांत कांहीं व्यंग आहे असा म्ह० लंगडा, थोटा, बोबडा, आंधळा, बहिरा, इ०. २ अर्धवट ( असा कांहीं पदार्थ ). **विकलेन्द्रिय** वि० ज्याचें एकादें इंद्रिय कामाला निरुपयोगी आहे असा.

**विकलेला** मागें ' विकणें ' मध्यें पहा.

**विकल्प** [ सं० ] पु० १ अमुक हें असें किं० तसें ह्या संबंधाचा संशय. २ मताची भिन्नता; वेगळें मत. ३ भ्रम; चूक. ४ असेंही होईल किं० तसेंही होईल अशी शक्यता किं० स्थिति; कोणताही पक्ष ग्राह्य असणें असा प्रकार. ५ कोणेकाच्या सद्धेतूबद्दल कोणेकाच्या मनांत येते ती शंका. ६ हें करूं किं० तें करूं, हें खरें किं० तें खरें, अशी मनाची अनिश्चित स्थिति. ७ कांहीं एका गोष्टीसंबंधानें मनांत उद्भवतात ते विचार-तरंग.(अ० व० प्रयोग).ॐ **विकल्प घालणें** कांहीं एखादींबंधानें शंका किं० अडचण प्रदर्शित करणें.

**विकसणें** [ सं० वि+कस् ] अ० क्रि० १ ( फूल ) प्रफुल्लित होणें किं० उमलणें. २ ( मन, वृत्ति ) प्रसन्न होणें. ३ विस्तार पावणें; वाढणें.

**विकसन** [ सं० ] न० प्रफुल्लित किं० प्रसन्न किं० विस्तीर्ण होणें.

**विकासित** [ सं० ] वि० १ उमललेलें (फूल). २ प्रसन्न ( मन, वृत्ति ). ३उघडलेलें (तोंड, इ०). ४ विस्तार पावलेलें. [ इ० पहा.

**विकळ, विकळा** इ० वर 'विकल,' ' विकला'

**विकळणें** [ म० विकळ]अ०क्रि०१बुद्धिभ्रंशानें (कोणेकानें)विकार पावणें; बुद्धिभ्रंश झाला आहे अशा स्थितीस ( कोणेकानें ) येणें; बुद्धिभ्रंशानें विकृत झालेलें असणें. २ ( मूल, माणूस, इ० नीं ) योग्य मार्ग सोडून अयोग्य मार्गानें जाऊं लागणें म्ह०(त्यांणीं)विघडणें किं०उत्संखळ होणें. ३ कष्ट, चिंता, आजार, इ० नीं जर्जर होणें. ४ दूध, दही, इ० फुटणें म्ह० त्यांना चोथापाण्याची स्थिति प्राप्त होणें.

**विकळा** [ म० वि (नाहीं) +कळा (तेज) ] वि० निस्तेज, फिका, मंद ( चेहेरा ).

**विकळ, विकळत** स्त्री० १ खंत, शिसारी, किळस ( येणें ). २ मळमळ, ओकारीची भावना ( येणें ).

**विकाऊ,विकणाऊ**[म०विकणें]वि०१विकावयास ठेविलेला; विकावयाचा.२ केवळ विकावयासाठीं बनाविलेला किं०केलेला(म्ह०अशक्त पदार्थ).

**विकार** [ सं० ] पु० १ पदार्थांच्या रूपांत किं० प्रकृतींत झालेला बदल; पालट; बदललेली स्थिति; भिन्नता; उ०दहीं हा दुधाचा विकार;घट हा मृत्तिकेचा विकार; वाफ हा पाण्याचा विकार. २ शरीराच्या सुस्थितींत किं० सुरळीतपणांत झालेला बिघाड. ३ मनाच्या नैसर्गिक किं० शांतपणाच्या स्थितींत होते ती चलबिचल; उ० काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे मनाचे सहा विकार होत. ॐ **विकारी** वि० १ कांहीं रोगानें पछाडलेला; रुग्ण. २ शरीरांत विकार उत्पन्न करणारें ( पाणी,खाद्य, इ० ). ३ ज्याला कांहीं शंका आली आहे किं०ज्यांत कांहीं किल्मिष उत्पन्न झालें आहे असें ( मन ). ४ बदलणारें; परिवर्तनशील. पु० तेहेत्तीसावा संवत्सर.

**विकाश** [ सं० ] पु० १ प्रसिद्धि. २ फुलांचें उमलणें किं० फुलणें. ३ प्रसार; विस्तार. ४ उल्हास; आनंद. ५ एकान्त.

**विकास** [ सं० ] पु० १ उमलणें. २ टवटवी. ३ विस्तार; प्रसार. ४ वाढ; वृद्धि; प्रगल्भदशा. ५ बुद्धि,ज्ञान,संपत्ति,अनुभव,इ० ची प्रगति किं० उत्कर्ष किं०प्रगल्भ दशा.

**विकासणें** [ म० विकास ] अ० क्रि० १ प्रफुल्लित होणें. २ विस्तार पावणें. ३ प्रकट होणें. ४ उघडणें. [ पावलेलें.

**विकासित** [ म० विकास ] वि० विकास

**विकिर** [ सं० विकिर ] पु० १ विखुरणें; विखुरलेला चुरा; तुकडे. २ पक्षी. ३ विहीर; डोह. ४ विघ्नशांतीसाठीं फेकलेल्या पांढऱ्या मोहोऱ्या. ५ श्राद्धांत पिंडदानानंतर असोमप देवांना आणि असंस्कृत मृत इ० पितरांना देण्याचें पिंड न केलेलें अन्न. ह्या अर्थी ' विकीर पिंड, ' पु०, ' विकीर अन्न ' न० हेही शब्द रूढ आहेत. टीप,–ह्या पांचही अर्थी मराठींत 'विकीर' हें रूप रूढ आहे. ॐ **विकीरपिंड** पु० कुरूप पोर.

**विकिरणें** [ सं० वि+कृ ] अ० क्रि० अस्ताव्यस्त पडणें; उधळणें. स० क्रि० उधळून टाकणें; फेकून पसरणें; उडवून देणें.

**विकिरण, विकीरण** [ सं० विकिरण ] न० उडविणें, उधळणें, फेकून पसरणें. मराठींत ' विकीरण ' हेंच रूप प्रचलित आहे.

**विकीरवत** [ सं० विकिर+वत् ( प्रत्यय ) ] क्रि० वि० तुच्छतेनें; तिरस्कार बुद्धीनें; हेटाळणी करून. वर' विकिर 'मध्यें अर्थ ५पहा.

**विकीर्ण** [ सं० ] वि० उधळलेला; उडवून पसरलेला.

**विकृत** [ सं० ] वि० १ बदललेला; पालटलेला. २ बदलल्यामुळें वाईट झालेला; बिघडलेला. ३ रूपांतर झालेला. ४ ज्यांत मुद्दाम बदल केल्यामुळें बिघाड झाला आहे असा. ५ जी मुद्दाम वेडी वाकडी करून सांगितली आहे अशी (हकीगत ). ६ रोगी; आजारी. ७शरीर किंवा गात्र ह्यांत व्यंग असलेला. ८ विलक्षण; अस्वाभाविक. ९ गहिंवरलेला. न० अपकार; नुकसान.

**विकृति** [ सं० ] स्त्री० १ बदल; पालट; रूपांतर. २ क्रोध; क्षोभ. ३ मनोविकार. ४ रोग; आजार. ५ स्वरविशेष.

**विकोप** [ सं० वि (विशेष)+कोप (क्षोभ) ] पु० १ अतिरेक; जें वाईट तें अधिक वाईट होणें; ज्यास्ती बिघाड झाल्याची स्थिति; उ० त्याच्या अपथ्यामुळें त्याचा आजार विकोपास गेला;- उ० त्यांचें भांडण विकोपास गेलें आणि पुढें त्यांची मारामारी जुंपली. २ बाजारांत पदार्थांच्या किंमतींत एकदम फार महागाईचे दर होणें. ३ स्नेह, मैत्री, सलगी, इ० मध्यें शिस्तीचें उल्लंघन.

**विक्या** [ म० विकणें ] वि० विकणारा; उ० कोथिंबीरविक्या.

**विक्रम** [ सं० ] पु० १ गति; गमन; जाणें. २ पाऊल टाकणें; ढेंग. ३ चालतांना टाकलेलें पाऊल. ४ जिंकणें. ५ पराक्रम; शौर्य. ६ परमावधीचें सामर्थ्य. ७ एक शककर्ता राजा. ह्याचा शक नर्मदेच्या उत्तरेस चालतो. हा शक इ० स० पूर्वी छपन्न वर्षांपासून सुरू झाला. ह्या शकाच्या वर्षाला कार्तिक शुद्ध प्रतिपदेला सुरवात होते.

**विक्रय** [ सं० ] पु० १ विक्री. २ विक्रीचा दर. ॐ **विक्रयिक** पु० विकणारा; वाणी. **विक्रयानुशय** पु० विक्री रद्द करणें.

**विक्रयी, विक्रेता** [ सं० विक्रयिन्; विक्रेतृ ] १ विकणारा. २ दुकानदार.

**विक्राळ** [ सं० विकराल ] वि० भयंकर.

**विक्रा** पु०, **विक्री** स्त्री० [ सं०वि+क्री ] १ विकणें; विकत देणें.२कांहीं पदार्थ विकून आलेली किंमत; उ० आज पंधरा रुपयांची माझी विक्री झाली. वर ' विकरा, ' 'विकरी' पहा.

**विक्रीत** [ सं० ] वि० विकलेला; विकत दिलेला. ' विक्रत ' हा ' विक्रीत ' चा अपभ्रंश.

**विख** [ सं० विष ] न० विष.

**विखंड** न०, **विखण** स्त्री०, न० [ सं० विखंड ] विळा, खोरें, कुदळ, इ० जातींचें आउत किं० हत्यार.

**विखम** [ सं० विषम ] वि० विषम ( अंक, १, ३, ५, ७, इ० ).

**विखरणें, विखुरणें** [ सं० वि+कृ ] स० क्रि० इकडे तिकडे फेकणें; अस्ताव्यस्तपणें टाकणें.

अ० क्रि० १ ( डोईवरचे केश ) वाऱ्यानें अस्ताव्यस्त होणें. २ ( झाडाचीं फुलें, पानें, इ० ) इतस्ततः पसरलेलीं असणें. ३ ( घरांतील पदार्थ, चिरगुटें, भांडीं, विद्यार्थ्यांची पुस्तकें, इ० ) इकडे तिकडे पडलेलीं असणें.

**विखरा** [ म० विखरणें ] पु० पदार्थांची अस्ताव्यस्तपणाची स्थिति; गलद.

**विखवणी** [ म० विख ( विष )+पाणी ) ] न० पावसाळ्यांतील अगदीं पहिला पाऊस वगैरे अशा पावसाचें पाणी. हें पाणी झाडांना अपायकारक असतें म्हणून ह्या पावसानंतर विहिरीचें पाणी शेतकरी झाडांवर घालतात.

**विखळणें** मागें ' उखळणें ' पहा.

**विखार** [ म० विषार ] पु० १ विष. २ विषाचा शरीरावर झालेला परिणाम ( होणें ). ३ साप. ॐ **विखारा,विखारी** **वि०** १ विषयुक्त; विषारी. २अपायकारक.

**विखारणें** [ म० विखार ] अ० क्रि०१ विषयुक्त होणें. २ अपायकारक होणें. ३ सर्पादिकें विष अंगांत संचरल्यामुळें जर्जर होणें.

**विखुरणें** वर ' विखरणें ' पहा.

**विखोप** वर ' विकोप ' पहा.

**विख्ख** [ म० विष ] न० विष.अत्यन्त कडूपणा दाखवितांना पुढीलप्रमाणें ह्याचा उपयोग होतो; उ० हें औषध कडू कडू विख्ख आहे.

**विख्यात** [ सं० ] वि० प्रख्यात; प्रसिद्धीस आलेला; सर्वांस ठाऊक; कीर्तिमान्.

**विख्याति** [ सं० ] वि० प्रसिद्धि; नांवलौकिक; कीर्ति.

**विख्यापन** [ सं० ] न० १ जाहीर करणें; प्रसिद्ध करणें. २ स्पष्टीकरण; विवेचन; विवरण.

**विगत** [ सं० ] वि० गेलेला; नष्ट झालेला; मृत;विध्वस्त.ॐ**विगतधवा स्त्री०**मृत झाला आहे पति जिचा अशी स्त्री.**वितश्री,विगतश्रीक वि०** नष्ट झाली आहे संपत्ति वगैरे कांति ज्याची असा. [ निंदिणें.

**विगर्हण न०, विगर्हणा स्त्री०** [सं०] निंदा;

**विगर्हित** [ सं० ] वि० १ निंदित; निंद्य; निंदिलेलें. २ दुष्ट; नीच. न० निंदा.

**विगलित** [सं० ] वि० गळालेलें; नष्ट झालेलें; लोपलेलें.

**विंगळ, विंगळी, विंगा,** इ० मागें 'इंगळ,' ' इंगळी,' ' इंगा,' इ० पहा. हे शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.

**विगान** [ सं० ] न० १ निंदा; अपवाद. २ असंबद्धता; परस्परविरोध; विसवाद.

**विगाह** [ सं० ] पु० १ स्नान. २ पाण्यांत बुडणें. ३ एकाद्या शास्त्र, विषय, इ० मध्यें प्रवेश.

**विगीत** [ सं० ] वि० १ प्रख्यात. २ वेदानीं निंदिलेलें. ३ अनिष्टकारक; अपायकारक. ४ हलकट; नीच; अधम.

**विगुण** [ सं० ] वि० १ गुणरहित.२ वाईट; सदोष. ३ निष्फळ; निरर्थक.

**विगृहीत** [ सं० ] वि० १ आडविलेला. २ जिंकिलेला. ३ ( **व्याकरण** ) ज्याचा विग्रह करण्यांत आला असा ( समास इ० ).

**विग्रह** [ सं० ] पु० १ ताणणें. २ शरीर. ३ मूर्ति; आकार. ४ पृथक्करण. ५ पोटभाग. ६ विस्तार. ७ भांडण; तंटा; विरोध; वैर. ८ अवकृपा. पु०,न० लढाई. ॐ **विग्रहवान् वि०** मूर्तिमंत; देहधारी.

**विघटणें** खालीं 'विघडणें' पहा.

**विघटन** [ सं० ] न० विदारण; विध्वंस; मोडणें. मराठींत ' विघाटन ' ह्याच अर्थी.

**विघटिका** [ सं० ] स्त्री० एका घटिकेचा साठावा भाग; एक पळ.

**विघटित** [ सं० ] वि० १ दूर केलेलें; वेगळें केलेलें. २ मोडलेलें; छिन्न भिन्न केलेलें; विध्वंसिलेलें.

**विघड** [ सं० वि+घट् ] पु० १ बेबनाव; विरोध; विभक्तपणाची स्थिति; बिघाडपणा. २ यंत्र; संस्था, कुटुंब, इ० मध्यें झालेला कांहीं बिघाड. ३ मित्र, पतिपत्नी, सरकतदार, इ० त फूट ( पडणें, पाडणें ).

**विघडणें,विघटणें, विघाटणें**[**सं०वि+घट्** ] **स० क्रि०** १ विध्वंसिणें. २ बिघडविणें; खराब करणें; अव्यवस्थित करणें. **अ० क्रि०**खराब होणें; नाश पावणें; अव्यवस्थित होणें.ॐ**विघडविघड**

स्त्री० खराब करणें; संस्था, कुटुंब, इ० मध्यें झालेला बेबनाव किं० फूट.

**विघरणें** अ० क्रि० (तूप, गूळ, मीठ, साखर, कथील, इ० चें) अग्नि, पाणी, इ० च्या संयोगानें पातळ होणें.

**विघाटणें** वर ' विघडणें ' पहा.

**विघात** [ सं० ] पु० १ नाश. २ निवारण. ३ वध. ४ विघ्न· अडथळा; हरकत. ५ प्रहार; आघात; तडाखा. ६ निराकरण; निषेध.

**विघातक** [ सं० ] वि० नाशकारक; अपाय-कारक.

**विघुरणें** वर ' विघरणें ' पहा.

**विघ्न** [ सं० ] न० अडथळा; हरकत; कांहीं कामांत कुंठितपणा उत्पन्न करणारी कांहीं गोष्ट. ❀ **विघ्ननाशन, विघ्नेश, विघ्ननायक, विघ्नराज, विघ्नहर** पु० गणपति हा देव. **विघ्नकर्ता** पु० कामांत हरकत किं० अडथळा आणणारा. **विघ्नसंतोषी** वि० १ दुसऱ्याच्या कामांत हरकत आणून जो आनंद पावतो तो. २ असंतोषी.

**विघ्नित** [ सं० ] वि० अडविलेलें; कुंठित.

**विंच** स्त्री० जमीन, तुळई, इ० तील फट, चीर, किं० भेग.

**विचकट** [ सं० विकट ] वि० १ बीभत्स ( भाषण ).२ बीभत्स भाषण करण्याच्या स्वभा-वचा. मागें ' अचकट ' पहा.

**विचकटणें, विचकडणें** [ म० ' विचकणें ' चें एक रूप ] स० क्रि० ( पदार्थांचें ) सांधे उखळणें; ( पदार्थ ) उकलणें; ( जखम, भोक, इ० ) ताणून मोठें करणें.२ ( पदार्थांत) डिवचा-डिवच किं० चिवडाचिवड करणें.

**विचकणें** स० क्रि० [ सं० वि+कुच् (संयोग पावणें ) ] स० क्रि० १ ( तोंड ) उघडणें किं० वासणें ( निंदेंत ).२ ( जखम ) दांडग्या हातानें ताणणें. ३ ( कोणेकाचीं रहस्यें किं० दुष्कर्में ) प्रकटिणें किं० चवाठ्यावर आणणें. ४ जें बिघड-लेलें आहे तें ज्यास्त बिघडविणें. अ० क्रि० १ उघडलें जाणें; ( पदार्थांत ) फट पडणें; फाटणें. २ ( जखम, तोंड ) पसरणें. ३ ( बेत, संकल्प ) ढासळणें किं० बिघडणें. ❀ **कोणेकापुढें तोंड** ( किं० **दांत, बत्तीशी,** किं० **जबडा** ) **विचकणें** १ त्याला वेडावून दाखविणें. २ त्याची हीनदीनपणें किं० नामुष्कीनें किं० अपमान पथकरून प्रार्थना करणें. **केश विचकणें** केश अस्ताव्यस्त होणें किं० करणें. **त्याचें विचकलें** १ त्याच्या कामांत किं० योजनेंत बिघाड झाला. २ त्याचा सर्व-तोपरीं नाश झाला; तो धुळीस मिळाला.

**विचका, विचकोपा** [ म० विचकणें ] पु० नाश; बिघाड; डिवचाडिवच;दुर्दशा; अव्यवस्था.

**विचका** पु० १ एक वेल. २ गोफण.

**विचकुरणें, विचखुरणें** स० क्रि० १ नखें, खिळा, इ० नीं ( अंग, त्वचा, किं० पृष्ठभाग ) खरडणें किं० त्यांच्यावर ओरखडे काढणें. २ चिमटींत ( त्वचा ) धरून पिळवटणें किं० चेपणें.

**विचकुरा, विचकोरा, विचखुरा, विचखोरा** [म० विचकुरणें, विचखुरणें] पु० नखें इ० नीं जोरानें त्वचा इ० वर रेघा ओढणें किं० रेघा ओढून पडलेलीं चिन्हें प्रत्येक.

**विचकोपा** मागें ' विचका, विचकोपा ' पहा.

**विंचडा** [ म० विंचू ] पु० १ विंचू ( तुच्छ-तेंत ). २ मोठा विंचू.

**विंचणी** [म० विंचू] स्त्री० धातूच्या भांड्याला पडलेलें बारीक भोक,–जें विंचवानें नांगी मार-ल्यामुळें पडतें असें समजतात.

**विंचरणी** [ म० विंचरणें ] स्त्री० १ विंचर-ण्याची क्रिया. २ फणी.

**विंचरणें** स० क्रि० फणीनें ( केश )एकमेकां-पासून सोडवून मोकळें करणें. **टीप,**–'डोकें ' वर सुद्धां कर्मता येऊं शकते.

**विचरणें** [ सं० वि+चर् ] अ० क्रि० भट-कणें; स्वच्छंदानें हिंडणें.

**विंचळी** [ म० विंचू ] स्त्री० १ विंचवाची मादी. ह्या अर्थी 'विंचवीण' सुद्धां. २ इसप,–एक त्वचेचा रोग. [ मध्यें पहा.

**विंचवाचें पेव, विंचाचें पेव** न० पुढें 'विंचू'

**विचक्षण** [ सं० ] वि० १ निपुण; कुशल. २ विद्वान्. ३ दूरदर्शी. ४ बारकाईनें पदार्थ, शास्त्र, इ० चा विचार करणारा.

**विचक्षणा** [ सं० ] स्त्री० १ बारकानें पदा-र्थांची केलेली तपासणी. २ सर्व दृष्टीनीं किं० सर्व

बाजूनीं विषयाची परीक्षा. ३ वालटपणानें काढलेले तर्क किं० कुतर्क.

**विचार** [ सं० ] पु० १ मनाचा किं० बुद्धीचा व्यापार. २ चर्चा; खल; विवरण. ३ चौकशी; तपास. ४ चिंतन; मनन. ५साधकबाधक गोष्टींची चिकित्सा करून ठरविलेला सिद्धान्त किं० निर्णय. ६ विवेक; युक्तायुक्त विचार. ७ संशय. ९ दूरदर्शीपणा. ९ पंचाईत; पेच. ॐ **सारासार विचार** पु० १ अडचणीच्या प्रसंगीं दोन्ही बाजूंचा विचार करून नंतर सोयीचा मार्ग ठरविणें. २ग्राह्य आणि अग्राह्य ह्यांचा विवेक करणें. ३ कोणत्या समयीं काय करावें ह्याचा विचार. **सदसद्विचार** पु० चांगलें काय आणि वाईट काय हें ठरविणें ( आणि चांगलें जें तें स्वीकारणें ). **विचारस्वातंत्र्य** न० मनांतील विचार स्पष्ट-पणें जाहीर करण्याची परवानगी किं०मोकळीक. **विचारविनिमय** पु० एकमेकांनीं एकमेकांस आप आपले विचार कळविणें; संभाषण. **कांहा गोष्ट विचारांत घेणें** तिच्याबद्दल विचार करणें; तिला योग्य महत्त्व देणें; तिच्याकडे दुर्लक्ष्य न करणें. **विचारगम्य** वि० विचार केला असतां समजेल असें. **विचारवान्, विचारी, विचारवंत** पु० १ विचार करणारा. २विचार केल्याशिवाय कांहीं न करणारा.

**विचारक** [ सं० ] पु० १ पंच. २ तपासनीस; परीक्षक. ३ चौकस माणूस.

**विचारण** न०, **विचारणा** स्त्री०[सं०]१विचार करणें. २ चौकशी; तपास. **विचारणा** स्त्री० अडचण; पंचाईत ( येणें, येऊन पडणें ).

**विचारणीय, विचार्य** [ सं० ] वि०१ विचारांत घेण्यास योग्य; जिच्याबद्दल विचार केला पाहिजे अशी ( बाबत ). ३ ज्याबद्दल कांहीं शंका आहे किं० निश्चय करणें कठिण आहे असें.

**विचारणें** [ सं० वि०+चर्=शंका काढणें ] स० क्रि० १ कोणेकाला ( कांहीं गोष्टिसंबंधानें) पुसणें किं० त्याचें(मत) पुसणें. २ मानाला, आदराला, किं० प्रेमाला योग्य किं० लायक समजणें; महत्त्वाचा समजणें; उ० जेथें हापूसचे आंबे विपुल मिळतात तेथें ह्या रायवळ आंब्यांना कोण विचारणार ? उ० गुलामगिरीला आनंदानें कवटाळणाऱ्या राष्ट्राला कोणी विचारीत नाहीं. ३ ( कोणेकाची ) कांहीं बाबतींत सल्ला घेणें; उ०मी खादीचे कपडे वापरूं लागूं काय असें वडिलांना विचारलें. ४ कोणेकाला (कांहीं अडचणींत) मार्ग दाखवा, युक्ति सांगा, शंका निरसा,अशी विनंती करणें; उ० मी पंतोजीला हें उदाहरण विचारलें. ५ ( कोणेकाचा ) समाचार घेणें; ( कोणेकाची ) सुस्थितीसंबंधानें प्रेमपूर्वक चौकशी करणें; उ०मी त्याला विचारलें आहे असें त्याला सांगा. अ०क्रि० चिंतिणें; मनन करणें; कांहीं गोष्ट किं० बेत ठरविणें. ॐ **विचारपूस** स्त्री० ए० व० कोणेकासंबंधानें केलेली चौकशी किं० तपास.

**विचारित** [ सं० ] वि० विचारांत घेतलेली ( कांहीं बाबत ); जिच्याबद्दल कांहीं निर्णय ठरविण्यांत आला आहे अशी (कांहीं गोष्ट).

**विचार्य** [ सं० ] वि० विचारांत घ्यावयास योग्य. वर ' विचारणीय ' पहा.

**विचिकित्सा** [ सं० ] स्त्री० १ संशय; अनिश्चितपणा. २ वाटाघाट;भवति न भवति.३साधक-बाधक गोष्टी विचारांत घेणें. ४ तत्त्वनिर्णय.

**विचित्र** [ सं० ] वि० १ अनेक रंगांचें. २ विविध प्रकारचा; नाना तऱ्हांचा. ३ आश्चर्यकारक. ४ विलक्षण; सामान्य सरणीला सोडून असलेला; छांदिष्टपणाचा.

**विंचीण** [ म० विंचू ] स्त्री० १ विंचवाच्या जातींतील मादी. २ इसब ह्या त्वचेचा रोग.

**विचुका, विचूक** वि० भ्रांतिष्ठ; असंबद्ध; भलतेंसलतें; बेताल ( भाषण ). क्रि० वि० असंबद्धपणें; भरमसाटपणानें.

**विंचुरणी** [ म० विंचुरणें ] स्त्री० १ फणी. २ फणीनें केश मोकळे करणें.

**विंचुरणें** स० क्रि०मागें 'विंचरणें'स०क्रि०पहा.

**विंचू** [सं० वृश्चिक] पु० १ एक क्षुद्र प्राणी,–याला नांगी असून तींत विष असतें. २ कृत्तिका नक्षत्र,–ज्यांत सहा तारे असून त्यांची मांडणी विंचवाच्या आकाराची असते.३ पलंग, बाज, इ० दोरीनें विणते समयीं त्या दोरीचे पदर सरूं नयेत म्हणून अडकणासाठीं जो एक दोन गांठी देऊन वीत दीड वीत दोरीचा तुकडा घेतात तो. ॐ **विंचवाचें पेव,विंचाचें पेव** न०१जेथें विंचू पुष्क०

**राहतात** असें मोक.२दुष्ट माणसांचा दुष्ट बेत किं० मसलती करण्याचा आड्डा. **विंचवी, विंचवीण** स्त्री० विंचवाची मादी. **सांबाच्या पिंडीवरचा विंचू** पु० जोड्यानें सडकून काढला जाण्याची ज्याची लायकी आहे, पण ज्याला मोठ्याचा आश्रय मिळालेला असल्यामुळें हें सडकून काढणें शक्य नाहीं, असा नीच,अधम,किं०पाजी माणूस.

**विचूक** वि० भरमसाट, असंबद्ध ( भाषण ). क्रि० वि० असंबद्धपणें; छांदिष्टपणें ( बोलणें ).

**विच्छिन्न** [ सं० ] वि० फुटलेलें; तुटलेलें; मोडलेलें. २ भंगलेली ( मूर्ति, आकृति, इ० ). ३ मोडलेला ( नियम, व्रत, इ० ). ४ बंद पडलेलें ( वतन, वर्षासन ). ❀ **छिन्नविच्छिन्न** वि०पूर्णपणें मोडलेलें, भंगलेले, विध्वंसिलेलें; उ० रणांगणावर लक्षावधि सैनिक छिन्नविच्छिन्न स्थितींत पडलेले होते.

**विच्छेद** [ सं० ] पु० १ कापणें; मोडणें. २ ताटातूट; वियोग. ३ लोप. ४ निषेध; अडथळा. ५भेद; प्रकार.६ग्रंथाचा भाग.७संतति नसल्यामुळें कुटुंब किं०वंश किं०वतन इ०चा लोप किं०नाश.

**विंजणा, विंझणा, विंजना** [ सं० व्यंजन+ वारा ] पु० १ पंखा. २ पंख्यानें घेतलेला किं० घातलेला वारा. ' विंझणवारा,' 'विंझुणवारा,' ' विंजणवारा,' 'विंजुणवारा ' पु० ह्याच अर्थी.

**विजन** [ सं० ] वि० १ जनरहित; ओसाड; निर्जन. २ गुप्त; अतस्थ. न० एकान्त; रहस्याची जागा; एकान्ताचें स्थान.

**विजमायली** मागें ' इजमायली ' पहा.

**विजय** [ सं० ] पु० १ मोड किं० पराभव. २ जिंकणें; जय. ३ अर्जुनाचें एक नांव. ४ ( ज्योतिष ) एक मुहूर्तविशेष. ५ सत्ताविसावा संवत्सर. ६ श्रीविष्णूचा एक द्वारपाल,-ज्याची मूर्ति देवाजवळ किं० देवद्वारीं स्थापितात. ❀ **विजया** स्त्री०१ पार्वती.२ पार्वतीची एक सखी. ३ भांग, नळि, दूर्वा, शमी, इ० वनस्पती. ४ पिण्यासाठीं तयार केलेली भांग. ५ महिन्याची तृतीया, अष्टमी, आणि त्रयोदशी, ह्या तिथि प्रत्येक. ६ आश्वीन शुक्ल दशमी ही तिथि. हिलाच ' विजयादशमी' म्हणतात. हा दसरा ह्या सणाचा दिवस. **विजयादशमी** स्त्री० आश्विन शुक्ल दशमी ही तिथि; दसरा. ह्या दिवशीं सीमोल्लंघन हा सार्वजनिक विधि करतात. **विजयाभिनंदन** पु० पुढें ह्या नांवाचा एक शककर्ता होणार आहे तो. **विजयी** वि० ज्याला जय मिळाला आहे असा.

**विजवटा** [ म० वजि+सं० वत (सारखा) ] वि० खोडकर, मोडतोड करण्याच्या स्वभावाचा ( पोरगा, माणूस ).

**विजवरा** पु० कपाळावर घालावयाचा एक दागिना. ह्यालाच ' बिजवरा, ' ' बिजोरा ' अशीं अन्य नांवें आहेत. मागें ' बिजवरा ' पहा.

**विजळणें** अ० क्रि० १( दूध ) नासून चोथा-पाणी होणें. २ ( आंबा इ० फळ ) सडणें.

**विजात** [सं०] वि० १ संकरापासून उत्पन्न झालेला. २ ( मराठींत ) वेगळा; भिन्न; वेगळ्या जातीचा. ३ ( मराठींत ) द्वाड; खोडकर.

**विजाति** [ सं० ] स्त्री० भिन्न जाति. वि० विचित्र; छांदिष्ट; तऱ्हेवाईक.

**विजातीय** [ सं ०] वि० १ भिन्न जातीचा. २ विविध प्रकारचा. ३ ( मराठींत ) छांदिष्ट; तऱ्हेवाईक; विलक्षण. ४ ( मराठींत ) लोकोत्तर ( कृति, माणूस, सामर्थ्य, कौशल्य, इ० ).

**विजायली** [ अ० ] वि० सागवानाहून इतर लाकडाचा केलेला ( पाट, चवरंग, इ० पदार्थ ). मागें ' इजायली ' पहा.

**विजार, विजारा** मागें ' इजार, ' ' इजारा पहा.

**विजिगीषु** [ सं० ] पु० १ योद्धा. २ वैरी.

**विजित** [ सं० ] वि० १ जिंकिलेला; पराभविलेला. २ जुगारींत मिळविलेला (पैसा). **विजित: जाणें** १ हार जाणें. २ आपण पराभव पावलों असें कबूल करणें;उ०मी कोणाला विजित जाणारा मनुष्य नाहीं.

**विजू** [ म० वीज; सं० विद्युत ] स्त्री०१वीज.

**विजोगत** [ सं० वियुक्त ] स्त्री० दुर्दैवाची कांहीं गोष्ट. २ विघ्न; अडथळा. ३ कुंठितपणाची स्थिति ( येणें, पडणें ).

**विजोड** [ म० वि ( वेगळा )+जोड (जोडीदार)]वि०जोडीनें वापरावयाच्या दोन पदार्थांपैकीं

एकं जर भिन्न जातीचा असला तर तो पदार्थ विजोड ( बुगड्या, कुडीं, पायमोचे, जोडे, इ० संबंधानें बोलतांना ).

**विझण** [ म० विझणें ] न० १ नाश; नासाडी. २ दिवा इ० ची विझलेपणाची स्थिति. ॐ**विझण घालणें** मालविणें; विझविणें. **विझण पडणें** मालविला जाणें; विझणें.

**विंझणवारा, विझणा** मागें ' विंजणवारा, ' ' विंजणा ' पहा.

**विझणें** अ० क्रि० १ ( पेटलेला अग्नि, जाळ, मशाल, दिवा, इ० ) मालवणें, शांत होणें, किं० नष्ट होणें. २ ( वाद, तंटा, भांडण, इ० ) संपणें किं० मिटणें.

**विझविणें** [ म० ' विझणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ मालविणें; शांत करणें. २ (भांडण, तंटा ) मिटविणें किं० संपाविणें. [पंखा.

**विंझणा, विंझणा, विंझुणा**[ सं० व्यजन] पु०

**विंझुणवारा** मागें ' विंझणवारा ' पहा.

**विट** [ सं० ] पु० १ कामुक; जार. २ वेश्येचा आश्रित; ढवा. ३ युवराजाचा विलासी सखा. ४ ठक; धूर्त.

**विटकणी** स्त्री० टवाळकी; चेष्टा( दाखविणें ).

**विटकर** [ म० विटणें ] वि० १ लवकर विटणारा ( रंग, रंगित वस्त्र ). २ विटलेलें ( वस्त्र, रंग, इ० ).

**विटकर** [ म० वीट ] स्त्री० १ विटांचा चुरा किं० धूळ. २ विटेचा तुकडा.

**विटकरी** [ म० वीट] वि० विटेच्या रंगाचा ( कपडा, इ० ).

**विटका** [ म० विटणें ] वि० १ विटलेला; फिक्का पडलेला; मळलेला ( रंग, वस्त्र, इ० ). २ लवकर विटणारा ( रंग, वस्त्र, इ० ). ३ खिन्न, निर्विण्ण, उदास, प्रेमरहित झालेलें ( मन ).

**विटकुली** स्त्री० लहान विडी,-काठी इ०च्या टोकाला बसवितात ती.

**विटकूर** [ म० वीट ] न०,स्त्री० १ विटेचा तुकडा. २ विटांची धूळ.

**विटणें** अ० क्रि० १ ( रंग, तजेला ) फिक्का किं० कमी होणें. २ ( वस्त्र ) फिकें किं० मजित होणें. ३ ( पदार्थांची ) टवटवी किं० तजेला नष्ट होणें. ४ ( फूल, झाड ) कोमेजणें किं० सुकणें. ५ (मन) कंटाळणें किं० प्रेमरहित होणें; (मनाला) कांहीं पदार्थाची किळस किं० चीड किं० शिसारी येणें. ६ ( खाद्य पदार्थ ) शिळेपणामुळें आंबणें.

**विटप** [ सं० ] पु० १ शाखा; फांदी. २ झाडाचा नवा अंकुर किं० पल्लव. ३ लता; वेली. ॐ **विटपी** [ सं० विटपिन् ] पु० १ वृक्ष; झाड. २ वडाचें झाड.

**विटंबणें, विटंबिणें**[सं० वि+डंब्] स० क्रि० ( कोणेकाला ) वेडावून दाखविणें किं० त्याची टवाळकी करणें किं० त्याचें अनुकरण करणें.

**विटंबन** न०, **विटंबना** स्त्री० [ सं० विडंबन, विडंबना ] १ अनुकरण. २ वेडावणें. ३ टवाळकी; उपहास; फजीती उडविणें.

**विटवणी** [ म० विटणें+पाणी ] न० पावसाचें फाजील पाणी ( बागेंतील झाडांना अपायकारक ह्या दृष्टीनें ). हें पाणी माळी लोक विहिरीच्या पाण्यानें वाहवून किं० धुपवून टाकतात. क्रि० मोडणें, काढणें.

**विटा** पु० भाल्यासारखें एक शस्त्र. मागें 'इटा' पहा.

**विटाळ** पु० १ भोजन, पूजा, इ० कर्म करण्यास घालेला प्रत्यवाय किं० अडथळा. हा कुत्रा, गाढव, प्रेत, इ०चा स्पर्श झाल्यानें येतो. २ स्त्रीचा मासिक रजःस्राव. अशा रजःस्रावाच्या स्थितींतील स्त्रीस ' विटाळशी ' म्हणतात. ३(लाक्षणिक) यत्किंचित सुद्धां अंश; अत्यल्प प्रमाण; गंध देखील ( अकरणरूपी प्रयोग ); उ० त्याला सारासार विचाराचा विटाळ नाहीं(म्ह० त्याच्या ठायीं सारासार विचार मुळींच नाहीं ). ४(लाक्षणिक) त्याज्य वस्तु; जवळ न येऊं देण्याची वस्तु; टाळावयाची वस्तु; उ० मला पैशाचा विटाळ आहे ( म्ह० मजजवळ मुळींच पैसा नाहीं ). **टीप,**— अर्थ ३ आणि ४ हे रागांत आणि वैतागांत योजतात. ॐ **विटाळ कालविणें** संसर्गानें सुतक इ०चा विटाळ इतर माणसांत किं० पदार्थांत पसरणें. **त्या मुलीला हळकुंडाचा विटाळ झाला** तिच्या लग्नाचा विधि मात्र झाला ( पण ती खरोखरी कुमारीच आहे ). लग्न होतांच जिचा पति मेला तिच्या संबंधानें अनुकंपेनें हा उद्गार काढला जातो

**विटाळचंडाळ पु० ए० व०** हरएक प्रकारचा विटाळ; विटाळविटाळ.

**विटाळणें** [ **म०** विटाळ ] **अ० क्रि०** विटाळ झाल्यामुळें ( वस्त्र, अन्न, पाणी, इ० ) अपवित्र होणें. **स० क्रि०** स्पर्श करून ( माणूस, वस्त्र, पाणी, इ० ) अपवित्र किं० अमंगळ करणें.

**विटाळशी** [ **म०** विटाळ] **स्त्री०** मासिक रजःस्रावामुळें अपवित्र किं० अस्पृश्य झालेली स्त्री. ❀ **विटाळशी चंडाळशी स्त्री०** कोणत्याही कारणानें अपवित्र किं० अमंगळ किं० अस्पृश्य झालेली स्त्री.

**विटाळें, विटी, विटेकरी इ०** मागें 'इटाळें,' 'इटी,' 'इटेकरी,' इ० पहा.

**विट्ट** [ **म०** विटणे ] **पु०** १ बेआबरू;फजीती; बोऱ्या. २ पदार्थाची खंनी,कंटाळा,किं०शिसारी.

**विठाई, विठाबाई स्त्री०** विठोबा हा देव ( प्रेमांत ). **विठोबा, विठो, विठू पु०** पंढरपुरचा किं० इतर ठिकाणचा विठ्ठल हा देव.

**विठू बोका पु०** नर मांजराचें लाडकें नांव.

**विठ्ठल पु०** हिंदूंचा एक देव. ह्याचें प्रसिद्ध स्थान पंढरपूर. येथें दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीस मोठ्या यात्रा जमतात. ❀ **विठ्ठलपंती तांब्या पु०** आकारविशेषाचा तांब्या किं० गडवा. **विठ्ठल सवाशीण, विठ्ठलसवाष्ण स्त्री०** विधवा ( वाग्रटपणांत ).

**विडकुली** [ **म०** विडा ] **स्त्री०** लहान विडा,- मुलाना खावयाला देतांना.

**विडंबन न०, विडंबना स्त्री०** मागे 'विटंबन,' 'विटंबना ' पहा.

**विडंबित** मागें ' विटंबित ' पहा.

**विडवर** [ **म०** वीट ] **न०** दुर्दशा; नासाडी. **वि०** नासलेला; घाण झालेला; हिडिस्स;ओंगळ.

**विडा** [ **सं०** वीटिका ] **पु०** नागवेलीच्या पानाला चुना लावून त्यांत सुपारी, कात, इ० द्रव्यें घालून मुखशुद्धीसाठीं खावयाला त्या पानाची आकारविशेषाची घडी करतात ती. ❀ **एकाद्या कामाचा विडा उचलणें** तें करण्याची प्रतिज्ञा मोगणें. **पैजेचा विडा उचलणें** एकादे दुर्घट कार्य करावयाचें असतां मंडळींचा जमाव करून त्यांच्यापुढें तबकांत एक विडा मांडावयाची पूर्वी चाल असे.जो कोणी तें कार्य करावयास सिद्ध असेल त्याणे तो विडा उचलावा आणि अमुक बक्षीस मिळवावें असें त्या वेळीं सांगण्यांत येत असे. जो कोणी मनुष्य तें कार्य करावयास सिद्ध असेल तो तो विडा उचली. त्याच्या हातून तें कार्य तडीस गेलें तर त्याला पूर्वी जाहीर करण्यांत आलेलें बक्षीस दिलें जात असे. **कोणेकाला कांहीं कामाचा विडा देणें** त्याच्याकडे तें काम सोपवून त्याला विडा देऊन त्याला ते काम करावयास सांगणें. **कोणेकाला विडा देणें** त्याला हाकलून देणें. मेजवानीचें जेवण झाल्यावर विडे देतात आणि जमलेली मंडळी घरोघर जातात या परिपाठावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे.

**विडाल, विडालक** [ **सं०** ] **पु०** मांजर.

**विडी** [ **सं०** वीटि; **हिं०** बीडी ] **स्त्री०** १ पेटवून ओढावयाची तंबाखू इ० ची टेमुरणी इ० च्या पानाची केलेली सुरळी किं०गुंडाळी.२लहान विडा,-नागवेलीच्या पानाचा. ३ लग्नांत नवरा मुलगा आणि नवरी मुलगी हीं एकमेकांनीं तोंडांत धरलेली विड्याच्या पानाची गुंडाळी दातांनीं तोडतात ती. ४ मुसळ, जात्याचा खुंटा, पटाशी, इ०च्या टोकास बसवितात तें लोखंडाचें वळें किं० ती शेंबी. ५ कोणत्याही कामी योजावयाचें कडें.

**विडुळणें, विडोळणें** [ **म०** विडूळ ] **अ० क्रि०** १ ( फळ ) नासून किं० सडून बिलबिलीत होणें. २ (दहीं,दूध,भाजी,इ०)नासणे किं०आंबणें.

**विडूळ, विडोळ वि०** १ शिळेपणा, नासणें, कुजणें,आंबणें,इ०कारणामुळें बेचव झालेलें(पाणी, खाद्य, फळ, इ० ). २ निस्तेज,फिका, ( चेहरा, रंग, इ० ). ३ नीरस, पाणचट ( भाषण ). ४ ओंगळ, हिडिस्स, अमंगळ, निंद्य ( कृत्य ).

**विडोळ, विढूळ, विढोळ, विढोळणें** वर ' विडूळ,' ' विडुळणें ' पहा.

**विणकर** [ **म०** विणणें ] **स्त्री०** वस्त्र विणण्याची तऱ्हा ( ठाशीव किं० विरळ ह्या दृष्टीनें). ❀ **विणकरी पु०** वस्त्रें विणणारा; कोष्टी.

**विणची वेळ स्त्री०** ऐन संध्याकाळचा समय. ( लहान मुलाना ह्या वेळीं घराच्या बाहेर नेलें असतां त्यांना दृष्ट लागते किं० पिशाच्चबाधा होते ह्या संबंधानें बोलतांना ).

**विणणावळ, विणाई** [ **म०** विणणें ] **स्त्री०**

१ वस्त्र, बाज, पलंग, इ० विणण्याबद्दलची मजुरी. २ वस्त्र, बाज, पलंग, इ० विणण्याची तऱ्हा किंवा थाटणी.

**विणणें** [ सं० व्ये=विणणें ] **स० क्रि०** १ मागावर लांब तंतु ताणून घालून त्यांतून विशिष्ट प्रकारें धोट्यानें आडवे तंतु भरून ( वस्त्रादि ) निर्मिणें. २ बांबूच्या किंवा शिंदी इ० च्या पाती एकमेकांत विशेष प्रकारें गुंतवून ( चटई, तट्ट्या, इ० ) निर्मिणें. ३ सुतें, रेशमाचे धागे, इ० एकमेकांत विशेष प्रकारें गुंतवून ( गोफ, जाळें, इ० ) निर्मिणें. वरील तीन्ही अर्थी सुतें, तंतु,पाती, इ० कांकडेही कर्मता येऊं शकते. ४ सुंभ, नवार, इ० चे पट्टे ( बाज, पलंग, माचा, इ० च्या ) चौकटीभोंवतीं विशेष प्रकारें गुंतवून बसावयाच्या किंवा निजावयाच्या उपयोगासाठीं सिद्ध करणें.

**विणती** [ सं० विनति=प्रार्थना ] **स्त्री०** १ कांहीं प्रश्न देवाला विचारून त्याच्या मूर्तीला चिकटावितात ते तांदूळ, फूल, सुपारी, दगडाची गोटी, इ० ( लावणें, ठेवणें ). २ अशा प्रश्नाला देवानें विशेष प्रकारें सुपारी, तांदूळ, गोटी, इ० पाडवून दिलेलें उत्तर ( देणें ).

**विणवणें** [ सं० वेदना; म० वेणा ]**अ०क्रि०** आजार, शारीरिक वेदना, चिंता, इ० मुळें ( कोणेकानें )कण्हणें.

**विणा** पुढें ' वीणा ' पहा.

**विणा** पुढें ' विना ' पहा.

**विणाई** मागें ' विणणावळ ' पहा.

**विणी** पुढें ' वेणी ' पहा.

**विणें** [ सं० वी=गर्भधारणा करणें; उत्पन्न होणें ] **स० क्रि०** १ गाय, म्हैस, शेळी, इ० नीं ( अपत्याला ) जन्म देणें. २ ( कवितेंत किंवा निंदेंत ) मानवी स्त्रीनें ( अपत्याला )जन्म देणें.३ उत्पन्न करणें ( सामान्यतः ). **अ० क्रि०** १ गाय, म्हैस, शेळी, इ० नीं अपत्याला जन्म देणें. २ केळ, चवई, इ० नीं केळीं इ० चा लोंगर उत्पन्न करणें; पसवणें.ꣲ **व्यालीची वेदना व्यालीच जाणे** ज्याणें एकादें दुःख स्वतः सोसलेलें असतें त्यालाच तें दुःख किती तीव्र असतें ह्याची कल्पना करतां येते, इतरांस येत नाहीं. **व्याली आणि चाटावयास विसरली** १ तिणें मुलाला जन्म दिला पण तिणें मुलाच्या मनांत नीतितत्त्वें बिंबविण्याची काळजी घेतली नाहीं. २ त्याणें काम सुरू केलें पण अर्धवटच टाकून दिलें.

**विणें** [ सं० विना ] **श० यो० अ०** शिवाय; खेरीज.

**वितकळणें अ० क्रि०** ( दूध, दहीं, खीर, इ० ) नासणें किंवा त्यांना चोथापाण्याचें रूप प्राप्त होणें.

**वितंडा** [ सं० वितण्डा ] **स्त्री०** १ खोटा वादविवाद; पोरकट कोटी; श्लेष काढून किंवा शब्दच्छल करून वात्रटपणें स्वपक्ष स्थापणें किंवा प्रतिपक्ष हाणून पाडणें. २ चर्चा; वादविवाद. ꣲ **वितंडवाद** [ सं० वितंडावाद ] **पु०** वात्रटपणाचा कोटिक्रम; आपला पक्ष खोटा आहे आणि प्रतिपक्ष खरा आहे असें जाणत असून जो कोणी मनुष्य वाद करतो तो वाद. [ पहा.

**वितणें अ० क्रि०** वितुळणें. पुढें ' वितुळणें '

**वितत** [ सं० ] **वि०** १ विशाल; मोठें. २ लांब; दीर्घ. ३ दूर असलेलें. ४ ताणलेलें. ५ लांबवर पसरलेलें. **न०** १ पसारा; विस्तार. २ तंतुवाद्य.

**वितंत म०** [वि+तंत (तंतु) ] **वि०** सुसंगत; सुरळीत; व्यवस्थित; नीटनेटकें. **क्रि० वि०**अगदीं पूर्णपणें किंवा तंतोतंत रीतीनें.मागें'तंत' **वि०** पहा.

**वितथ** [ सं० ] **वि०** १ असत्य; निष्फळ. २ न निस्तरलेली ( प्रतिज्ञा, भाक, वचन, इ० ).

**वितरण** [ सं० ] **न०** १ तरून जाणें. २ देणगी; दान. ३ त्याग; सोडून देणें.

**वितर्क** [ सं० ] **पु०** १ अनुमान; तर्क; अंदाज. २ कल्पना. ३ खोटी किंवा विपरीत कल्पना. ४ संशय; शंका. ५ विचार; चर्चा. ६ ब्रह्मज्ञानाचा उपदेष्टा. ꣲ **तर्कवितर्क पु० अ० व०** एकाद्या गोष्टीसंबंधानें अनेक प्रकारचे केलेले तर्क किंवा केलेलीं अनुमानें.

**वितल** [ सं० ] **न०** सात पातालांपैकीं दुसरें.

**वितवितणें अ० क्रि०** चरफडणें; पिरपिरणें; कोणेकाच्या अंगावर ओरडणें.

**वितवितलें क्रि० वि०** १ अजागळपणानें किंवा अव्यवस्थितपणें ( कांहीं काम करणें ). २

चोखंदळेपणानें ( खाणें, जेवणें ). **टीप,**—लिंगवच-नाप्रमाणे फिरणारें हें **क्रि० वि०** आहे.

**वितस्ति** [ **सं०** ] **पु०, स्त्री०** हाताची वीत किं० वीत हें अंतर; पंजाचा अंगठा आणि करं-गळी ताणून होतो तो आकार किं० तें अंतर.

**वितळणें, वितुळणें** [ **सं०** वि+द्रु ] **अ० क्रि०** १ अग्निसंयोगानें ( सोनें, चांदी, लोखंड, रातांबेल, इ० ) पातळ होणें. २ साखर, मीठ, इ० पाणी, दूध, इ० मध्यें विरघळणें. ह्या अर्थी 'वितळणें,' 'वितुळणें' ह्यांचा उपयोग चुकीचा होय. ३ ( रंग, ताकद, अवसान, इ० ) मजित होणें किं० गळून जाणें किं० लोपणें. ३ ( ढग, लोक, सैन्य, इ० ची )पांगापांग होणें.४(मगरूरी, केलेला निश्चय,प्रयत्न,इ०)जिरणें किं०लोपणें किं० विफल होणें. ६ दयेनें आर्द्र होणें; कळवळणें.

**वितान** [ **सं०** ] **पु०, न०** १ विस्तार. २ समुदाय; पटल. ३ घर, मांडव, इ० चें छत; चादवा.

**वितिपात** पुढे 'व्यतिपात' पहा.

**विती गाभती** [म० विणें+गाभणें]**वि०स्त्री०** गाभण होणें, विणें, इ० क्रिया योग्य क्रमानें किं० सरणीनें जिच्या चालल्या आहेत अशी ( गाय, म्हैस, इ० ).

**वितुष्ट** [ **सं०** ] **वि०** नाखूष झालेला;असंतुष्ट. **न०** वैमनस्य; बेबनाव ( येणें, पडणें ).

**वितुळणें** वर ' वितळणें ' पहा.

**वित्त** [ **सं०** ] **न०** द्रव्य. **वि०** ज्ञात; जाणलेलें. ॐ **वित्तपति, वित्तपाल, वित्तप पु०** कुबेर. **वित्तपिसा वि०** द्रव्याचा अनिवार लोभ ज्याला झाला आहे असा. **वित्तपिसें न०** द्रव्याचा अनिवार लोभ. **वित्तविषय पु०** द्रव्य. घर, शेतें, गुरें, इ० रूप ऐहिक संपत्ति. **वित्तशाठ्य न०** १ जवळ द्रव्य असून दानधर्म इ० न करणें. २ चिक्कूपणा; कंजूषपणा. **वित्तेषणा स्त्री०** आपणाजवळ द्रव्य असावें, आपणाला द्रव्य मिळावें, अशी इच्छा; द्रव्यलोभ.

**वित्पत्ति, वित्पन्न** ' व्युत्पत्ति, ' ' व्युत्पन्न ' ह्यांचे अपभ्रंश.

**वित्रस्त** [ **सं०** ] **वि०** भ्यालेला; घाबरलेला.

**वित्रास** [ **सं०** ] **पु०** भीति; दहशत.

**विथर** [ **हिं०** बिथरना ] **पु०** १ ( काम, व्यापार, संसार, धंदा, इ० चा ) विस्कळीतपणा ( होणें ). २ बिघाड; अव्यवस्थितपणा. **वि०** १ लंबरेषेंत नसलेले ( खांब, भिंत, बांध, इ० ). २ भिन्न जातींच्या किं० रंगांच्या तुकड्यांनीं शिव-लेला ( कपडा ) किं० केलेला ( देव्हारा, चवरंग, झोपाळा, इ० पदार्थ ). ३ विसंवादी; न जुळ-णारें; विरोधी; असंबद्ध ( भाषण, वर्तन, इ० ).

**विथरणें** [ **हिं०** बिथरना ] **अ० क्रि०** अनि-यंत्रित होणें; दाब किं० नियंत्रणा झुगारून देणें; सन्मार्ग सोडून असन्मार्गास लागणें; चळणें.

**विथानक,विथानकि** [ **सं०** व्यथा ] **वि०**१ उपद्रवकारक, द्वाड ( पोर, माणूस, पशु ). २ दुःखानें गांजलेला किं० जर्जर. **टीप,**—हे शब्द अशिक्षितांत रूढ आहेत.

**विथापाक** [ **सं०** व्यर्थ+पाक ] **पु०** चालू असलेल्या कामांत झालेला किं०करण्यांत आलेला बिघाड ( अशिक्षितांत रूढि ).

**विदगुडणें अ० क्रि०** ( हात,पाय, इ० गात्र) मुरगळणें किं० लचकणें.

**विदग्ध** [ **सं०** ] **वि०** १ चतुर. २ कार-स्थानी; मुत्सद्देगिरीचा. ३सभ्य चालीरीतींचा. ४ सुंदर. ५ वरच्या दर्जाचें आणि सभ्य आणि कर-मणूक करणारें ( वाङ्मय ). ६ शिजविलेलें. ७ जळून खाक झालेला ( पदार्थ,—भात, भाकरी, औषध, इ० ). ८ कोठ्यांत पूर्णपणें न पचलेलें ( अन्न ). ९ अर्धवट शिजलेलें. १० यथायोग्य प्रकारें शिजविलेलें. **पु०** विद्वान्; पंडित. ॐ **विदग्धाजीर्ण न०** ( **वैद्यक** ) करपट ढेकरा येणें, घशांत जळजळ होणें,इ० रूप अजीर्णाचा प्रकार.

**विंदर्** [सं०वेध] **न०**बारीक भोक किं०छिद्र.

**विदविदणें अ० क्रि०** ( फळ, गळू ) अति पिकल्यामुळे मऊ होणें किं० बिलबिलीत होणें.

**विदविदा वि०**मऊ,बिलबिलीत ( फळ,गळू ).

**विंदाण, विंदान न०, विंदाणी स्त्री०** [**म०** विंधणें=भोक पाडणें ] १ युक्ति; कावा; हिकमत. २ कौशल्य; चातुर्य. ३ दैवाची किं०परमेश्वराची घटना.

**विदारक** [ **सं०** ] **वि०** फाडणारा; चिर-णारा; उ० हृदयविदारक देखावा ( किं० हकी-

गत).पु०१पाण्याचा प्रवाह दुभागणारा खडक.२ आटलेल्या नदींत पाण्यासाठीं खणलेला खळगा.

**विदारण** [ सं० ] न० १ युद्ध. २ फोडणें; फाडणें; चिरणें. ३ कत्तल.

**विदारणा** [ सं० ] स्त्री० फाडणें; चिरणें.

**विदारणी** [ म० विदारणें ] स्त्री० १ फाडणें; चिरणें; फोडणें. २ कोणेकाच्या दुष्कृत्याचा सार्वजनिक रीत्या केलेला किं० झालेला बोभाटा; बोऱ्या; फजीतवाडा.

**विदारणें** [ सं० वि+दृ ] स० क्रि० १ फाडणें; तोडणें; चिरणें. २ टरांटरां फाडणें. ३ ( लाक्षणिक ) ( विषयाची ) फोड करणें. अ० क्रि० उच्छृंखल होणें. ॐ **विदारून सांडणें** (गुरें,माशा,इ० )उधळून लावणें.**विदारण्या** वि० चाह्याडखोर;चहाड्या सांगून कलागती लावणारा.

**विदाह** [ सं० ] पु० १ आग; उष्णता. २ तिखटपणा.

**विदित** [ सं० ] वि० १ ज्ञात; ठाऊक असलेला; जाणलेला. २ सांगितलेला. ॐ **विदितात्मा** [ सं० विदितात्मन् ] पु० परमेश्वर.

**विदिशा** [ सं० ] स्त्री० दोन दिशांच्या मधली दिशा; उपदिशा; उ० आग्नेयी ( पूर्व आणि दक्षिण ह्यांच्या मधली ), नैर्ऋत्य ( दक्षिण आणि पश्चिम ह्यांच्या मधली ), वायव्य ( दक्षिण आणि उत्तर ह्यांच्या मधील ), ईशान्य ( उत्तर आणि पूर्व यांच्या मधील ) ह्या चार विदिशा किं० उपदिशा होत.

**विदीर्ण** [ सं० ] वि० ( वाच्यार्थानें किं० लाक्षणिक अर्थानें ) फाटलेला; उ० ती हकीगत ऐकून माझें हृदय विदीर्ण झालें; उ० हा मुकुट विदीर्ण झाला.

**विदुर** [ सं० ] वि० १ शहाणा; चतुर. २ सभ्य चालीरीतींचा मनुष्य. पु० विचित्रवीर्याच्या अंबिका नामक भार्येच्या दासीला व्यासापासून झालेला पुत्र. हा नीतिमान्, निःपक्षपाती, न्यायी, आणि शहाणा होता. हा भारतीय युद्धाच्या वेळीं तीर्थयात्रेस गेला होता.

**विदेश** [सं०]पु० १ दूरचा देश. २ परदेश. ॐ **विदेशी वस्तु** स्त्री० आपल्या देशांत निर्माण न झालेली वस्तु. **विदेशी, विदेशीय** वि० परदेशचा ( माणूस, पदार्थ ).

**विदेह** [ सं० ] वि० १ देहहीन; देहरहित. २ निराकार. ३ देहबंधशून्य. पु० १ निमिराजा. २ जनक कुलांतील एक राजा. ॐ **विदेही** वि० परमार्थदृष्टीनें ज्याचा देहाभिमान गळाला आहे असा. **विदेहस्थिति** स्त्री० देहाविषयीं आस्था नाहीं अशी ज्ञानी माणसाची निर्विकल्प स्थिति.

**विंदोर** पु० ( कोष्ट्याच्या मागांत ) ताणा आवळावयाची हातखुंट्याला बांधलेली दोरी.

**विदोस, विधोस** [ सं० विध्वंस ] पु०नाश; नासाडी(अशिक्षितांत रूढ).ॐ **विदोशा,विधोशा** वि० विध्वंसक; नासाडी करणारा ( अशिक्षितांत रूढि ).

**विद्ध** [ सं० ] वि० १ छिन्न; भग्न. २ भोक पाडलेला. ३ शस्त्र, बाण, प्रहार, इ० लागला आहे ज्याला असा.

**विद्यमान** [ सं० ] वि० १ चालू; हल्लीं असलेला; सध्यांचा. २ अस्तित्वांत असलेला. पु० वर्तमान काळ.स्त्री०,न० (देवघेवीच्या व्यवहारांत) समक्षता; हजेरी; साक्षी; उ० गोविंदपंताच्या विद्यमानें मी त्याला शंभर रुपये दिले ( गोविंदपंत जवळ असतां किं०पाहत असतां)ॐ.**विद्यमानें** क्रि० वि० साक्षीदार ठेवून; ०च्या देखत किं० समक्ष.

**विद्या** [ सं० ] स्त्री० १ एकाद्या विषयाचें सांगोपांग ज्ञान किं० माहिती किं० त्या संबंधाचें शास्त्र. २ तत्त्वज्ञान; ब्रह्मज्ञान. ३ चित्रें काढणें, गाणें, सतार वाजविणें, इ०ज्या कला त्या प्रत्येक. ४ युक्ति; खुबी; हिकमत. ॐ **विद्यागुरु** पु० १ एकादी विद्या जो आपणास शिकवितो तो. २ एकाद्या विद्येत जो निष्णात तो.**विद्याधन** न०१ विद्यारूपी धन. २ विद्या शिकवून मिळविलेलें द्रव्य. **विद्यापीठ** न० १ विद्वान् लोक जेथें विद्यार्थ्यांना हरएक शास्त्रें,भाषा,तत्त्वज्ञान,इ०शिकवितात, किं० जेथें विद्वान् लोक एकाद्या विषयाची चर्चा करतात अशी संस्था.२जेथें हरएक विषयांत पारंगत लोक राहात आहेत असें स्थान; क्षेत्रें माहेर घर असा गांव, शहर, इ०. ३ जेथें विद्यार्थ्यांना विशिष्ट विषय शिकवून त्यांत त्यांच्या

परीक्षा घेतात अशी संस्था. **विद्यार्बंधु** पु० १ एकाच गुरुपाशीं अध्ययन करणारे जे विद्यार्थी ते परस्परांचे विद्याबंधु. २ एकच शास्त्र, कला, इ०चा अभ्यास करणारे जे ते परस्परांचे विद्याबंधु. **विद्याभ्यास** पु० अध्ययन; शिकणें. **विद्यार्थी** पु० १ शाळेंत जाऊन शिकणारा. २ श्रीमंताच्या आश्रयाला राहून त्याचीं किरकोळ कामें करून बाकीच्या वेळांत अध्ययन करणारा मुलगा. ३ एकाद्या विषयाचा अभ्यास करणारा. **विद्यावान्, विद्यावंत** पु० विद्वान् माणूस. **विद्यालय** न०शाळा;उ० नूतन मराठी विद्यालय.

**विद्याधर** [ सं० ] पु० उपदेवविशेष,-यक्ष, गंधर्व, किन्नर, इ० प्रमाणें.

**विद्युत्** [ सं० ] स्त्री० वीज.⊛**विद्युत्वान्** पु० मेघ. **विद्युल्लता** स्त्री० नागमोडी आकाराची वीज. **विद्युल्लेखा** स्त्री० विजेची चमक. **विद्युत्पात** पु० १ वीज पडणें. २ ( **लाक्षणिक** )कांहीं भयंकर अनर्थ. [ असा फोड.

**विद्रधि** [ सं० ]पु० ज्यांतून पू स्रवत असतो

**विद्रा** [ सं० विरूप ] वि०१वाकडी तिकडी गात्रें असलेला किं० नाक, डोळे, इ० अवयवांनीं व्यंग असलेला ( माणूस ). २ दिसण्यांत बेधाट, किं० बेडौल असा ( पदार्थ ). ३ कुरूप; वेडावाकडा. ⊛ **वेडाविद्रा** वि० कसाबसा असलेला; नीटनेटका नाहीं असा ( माणूस, लेख, चित्र, घडविलेला पदार्थ, शिवलेला कपडा, भाषण, इ० ). [ गेलेला.

**विद्रुत** [ सं० ] वि० १ वितळलेलें. २ पळून

**विद्रुम** [ सं० ] पु०, न०पोवळें,-एक रत्न.

**विद्वान्** [ सं० 'विद्वस्' च्या प्रथमेचें पु०ए०व० ] पु० १ जाणणारा; जाणता. २ पंडित. ३ शास्त्रवेत्ता. **विदुषी** स्त्री० जाणती स्त्री; पंडित स्त्री; शिकलेली स्त्री. **विद्वत्ता** स्त्री० पांडित्य. **विद्वज्जन** पु० विद्वानांचा समुदाय. **विद्वन्मान्य** वि० विद्वान् लोकांत ज्याला मान किं० आदर आहे असा. **विद्वंमन्य** वि०जो खरोखरीं विद्वान् नाहीं परंतु जो स्वतास विद्वान् समजतो असा.

**विद्विष्** [ सं० ] पु० शत्रु.

**विद्विष्ट** [ सं० ] वि० १ द्वेषास पात्र. २ ज्याची खंती वाटते असा.

**विद्वेष** [ सं० ] पु० १ तिरस्कार. २ किळस; खंती. ३ वैर; शत्रुत्व.

**विद्वेषक, विद्वेषी, विद्वेष्टा** [ सं० विद्वेषिन्; विद्वेष्टृ ] वि० १ द्वेष करणारा. २ शत्रु; वैरी.

**विध** [ सं० ] पु० १ प्रकार. २ वेध करणें ही क्रिया, ३ भोक. खालीं ' विधा ' पहा.

**विंध** [सं०विद्=छिद्र; चीर] न०भोक; चीर; वेज. ⊛ **विंधकाम** न० मोतीं, रत्नें, इ०ना भोकें पाडण्याचें काम किं० कौशल्य.

**विधणू** स्त्री० गाय, म्हैस इ०च्या गर्भाशयांत अकालीं प्रसव झाल्यानें उत्पन्न होतो शुष्कपणा.

**विंधणें** [ सं० विध्=भोक पाडणें ] स०क्रि० १ बाण, सुई, इ० नीं ( पदार्थाला ) आरपार भोक पाडणें. २ कांहीं हत्यारानें(पदार्थावर) क्षत करणें.

**विंधणें** [ सं० विध्=भोक पाडणे ] न० किकरें हें सुताराचें हत्यार.

**विंधरू, विंधरूक** [ सं० विध्=भोक पाडणें] न० भोक; छिद्र; वेजें.

**विधर्मी** [ सं० वि+धर्म ] वि० १ परधर्माचा; आपल्या धर्माहून ज्याचा धर्म वेगळा आहे असा. २ धर्म जो मानीत नाहीं तो. ३ धर्माच्या उलट वर्तणारा.

**विधवा** [ सं० ] स्त्री० जिचा पति मेला आहे अशी स्त्री. ⊛**वैधव्य** न० विधवेची स्थिति.

**विधवाट** [ सं० विविध+म०वाट (रस्ता) ] स्त्री० १ उधळपट्टी; नासाडी ( लागणें, लावणें, होणें, इ० ). २ विध्वंस.

**विधा** [ सं०विधा=रीति; प्रकार ] स्त्री० रीति; पद्धति; प्रकार. विविध, बहुविध, अनेकविध,नानाविध,इ० समास होतात.

**विधाता** [ सं० विधातृ ] पु० १कर्ता;उत्पादक. २ ब्रह्मदेव.३ ध्रुवमत्स्य ह्या तारकापुंजांतील एक तारा.

**विंधान** [ सं० विध्=भोक पाडणें ] न० बाण, दगड, इ०नीं धरलेला नेम; लक्ष्य ( करणें, बांधणें ).

**विधान** [ सं० ] न० १ करणें; आचरणें; अमलांत आणणें. २ उत्पन्न करणें.३ कृति;पद्धति; कांहीं करण्याची सरणी. ४ कृत्य; जें केलें तें. ५

व्यवस्था; तजवीज. ६ उपाय; इलाज. ७ हुकूम; आज्ञावाक्य; घालून दिलेला नियम. ८ अमुक करावें अशा अर्थाचें वाक्य.अमुक करूं नये अशा अर्थाच्या वाक्याला 'निषेधवाक्य' म्हणतात. ९ विशिष्ट मत किं० विचार व्यक्त करणारें वाक्य. १० ( **व्याकरणांत** ) शब्दाला उपसर्ग किं० प्रत्यय लावणें.

**विधायक** [ **सं०** ] **वि०** १ व्यवस्था लावणारा. २ करणारा; निर्मिणारा. ३ नियम घालणारा; नियम घालून देण्यासंबंधाचा. ४ हवालीं करणारा. ५ कोणकोणच्या गोष्टी कराव्या हें सांगणारी सरणी. ६ करावयाच्या ज्या गोष्टी त्या करण्यासंबंधाचा ( क्रम ); उ० विधायक कार्यक्रम अगोदर पार पाडा आणि नंतर कायदेभंग करा हें महात्मा गांधींनीं १९२२ सालीं राष्ट्राला सांगितलें.

**विधि** [ **सं०** ] **पु०** १ करणें. २ कृत्य; क्रिया. ३ पद्धति; प्रकार; योग्य सरणी. ४ आज्ञा. ५ अमुक करा अशा अर्थाचें वाक्य किं० वचन. ६ धर्मनियम. ७ धर्मकृत्य; अनुष्ठान. ८ दैव;प्राक्तन; नशीब. ९ ब्रह्मदेव. १० लग्न, मुंज, गर्भाधान, इ० जे संस्कार ते प्रत्येक. ११ कोणतीही विशिष्ट गोष्ट; उ० भोजनविधि, शौचविधि, स्नानविधि. ॐ **विधिवत्, यथाविधि क्रि० वि०** योग्य सरणीला अनुसरून. **विधिदिष्ट, विधियुक्त, विध्युक्त वि०** शास्त्र, धर्म, किं० रूढि, ह्यांना अनुसरून असलेलें. **विधिनिषेध पु० ए० व०, पु० अ० व०** अमुक करावें, अमुक करूं नये, असे नियम व्यक्तिशः किं० समुच्चयानें. **विधिनिषेधातीत वि०** १ ब्रह्मज्ञान झाल्यामुळें शास्त्रोक्त विधिनिषेधाचे नियम जो पाळीत नाहीं किं० पाळण्याचें महत्त्व ज्याला वाटत नाहीं असा. २ उच्छृंखलपणामुळें जो विधिनिषेध पाळीत नाहीं असा. **विधिभंजक वि० ( व्याकरण )** सामान्य नियमाच्या उलट असलेला; अपवादरूप. **विध्यर्थ पु०** अमुक गोष्ट करावी किं० अमुक गोष्ट संभवनीय आहे असें क्रियापदाच्या ज्या रूपावरून समजतें तें रूप; उ० खरें बोलावें, आज पाऊस पडावा. **विधिविशेषण न०** वाक्यांत विशेष्याच्या मागें विशेषण येतें तेव्हां त्याला ' अधिविशेषण ' म्हणतात आणि विशेष्याच्या पुढें विशेषण येतें तेव्हां त्याला ' विधिविशेषण ' म्हणतात. विधिविशेषण हें वाक्यांतील विधान पूर्ण करण्यास क्रियापदास साहाय्य करतें; उ० ' अरबी घोडा जलद चालतो ' या वाक्यांत ' अरबी ' हें अधिविशेषण; उ० ' कोंवळी मेथी रुचकर असते ' ह्या वाक्यांत ' रुचकर ' हें विधिविशेषण.

**विंधी** [ **म०** विंधणें ] **स्त्री०** १ कुसूं बसवावयाचें भोक. २ कांहीं पदार्थ कुटण्याचा खल.

**विधुर** [ **सं०** ] **पु०** ज्याची बायको मेली आहे असा पुरुष. **वि०** १ पीडित; व्याकूळ; दुःखी. २ ज्याला वियोग झाला आहे असा. ३ रहित. ४ असमर्थ; दीन; विव्हल. ॐ **विधुराग्नि पु०** विधुरानें गृहांत यथाविधि ठेवावयाचा अग्नि.

**विधुळणी** [ **सं०** विधूलन ] **स्त्री०** नासाडी; उधळपट्टी;विध्वंस. ॐ **विधुळणीस पडणें** संपत्ति, व्यापार, इ०अपकर्षाच्या स्थितीस लागणें.

**विधेय** [ **सं०** ] **वि०** १ करण्यास योग्य; केलें पाहिजे असें. २ स्वाधीन; वश. ३ आज्ञाधारक; नम्र. ४ अनुकूल. **न०** १ कर्तव्यकर्म. २ वाक्यांत उद्देश्याबद्दल जें विधान केलेलें असतें. म्ह० उद्देश्यासंबंधानें जें सांगितलें असतें त्याला ' विधेय ' म्हणतात; उ० ' गोदी पळाली ' ह्या वाक्यांत ' गोदी ' हें उद्देश्य आणि ' पळाली ' हें विधेय.

**विंध्य** [ **सं०** ] **पु०** आर्यावर्त आणि दक्षिण ह्या दोहोंच्या मध्यें आहे ती पर्वताची रांग.

**विंध्रुका, विंध्रु, विंध्रुक** [**म०**विंधणें]**पु०**वस्त्र, पर्ण, इ० स पडलेलें किं० पाडलेलें भोक.

**विध्वंस पु०, विध्वंसन**[ **सं०** ] नाश; समूळ उच्छेद.

**विध्वंसक** [ **सं०** ] **वि०** नाशकारक.

**विध्वंसिणें** [ **सं०** वि+ध्वंस् ] **स० क्रि०** मोडणें, फोडणें, नष्ट करणें.

**विध्वस्त, विध्वंसित** [ **सं०** ] **वि०** नष्ट [ केलेलें.

**विनटणें** [ **सं०** वि+नट् ] **अ० क्रि०** १ नाचणें. २ मौज करणें. ३ रमणें; तल्लीन होणें.

**विनत** [ **सं०** ] **वि०** १ वाकलेला. २ नम्र. ३ वाकडा.

**विनति** [ **सं०** ] **स्त्री०** १ वाकणें. २ नम्रता.

३ प्रार्थना. **टीप,**–मराठींत ह्या अर्थी ' विनंती ' हेंही रूप प्रचलित आहे.

**विनंति** वर ' विनति ' पहा.

**विनमोजबा (–बी), विनमोहजबा (–बी)** मागें ' विन ' श० यो० अ० मध्यें ' बिनमोजबी' पहा.

**विनय** [ सं० ] पु० १ शिक्षण; वळण. २ शिष्टाचार. ३ नम्रपणा. ४ हाताखालच्या लोकांशीं किं० गरीब लोकांशीं सौम्य आणि ममताळूपणाचें वर्तन.

**विनवणी, विनवणूक** [ म० विनवणें ] स्त्री० १ कोणेकाजवळ नम्रपणानें केलेली कांहीं प्रार्थना किं० त्याचें मन वळविणें ही क्रिया. २ कण्हणें.

**विनवणें** अ० क्रि० कण्हणें.

**विनविणें** [ स० वि+नम् ] स० क्रि० ( कोणेकाला ) प्रार्थिणें किं० दीनपणानें याचिणें.

**विनष्ट** [ सं० ] वि० १ लोपलेला; रद्द पडलेला. २ हरवलेला. ३ नाहींसा झालेला. ४ पतित ( माणूस ).

**विना** [ सं० ] श० यो० अ० शिवाय; खेरीज; वांचून; उ० रामाविना सर्व मुलें हजर होतीं; उ० हा श्लोक पाठ केल्याविना मी तुला येथून उठूं देणार नाहीं. **टीप,**–' विना ' पूर्वपदीं येऊन पुष्कळ उपयुक्त सामासिक शब्द होतात. विनाकारण म्ह० कारण नसतां; विनामूल्य म्ह० फुकट; विनापराध म्ह० गुन्हा घडलेला नसतां.

**विनायक** [ सं० ] पु० १ गणपति हा देव. २गरुड हा पक्षी. ॐ**विनायकी चतुर्थी** स्त्री०महिन्याच्या शुक्लपक्षांतील चतुर्थी ही तिथि. कृष्ण पक्षांतील चतुर्थीला ' संकष्टी चतुर्थी ' म्हणतात.

**विनाश** [ सं० ] पु० नासाडी; विध्वंस; लोप. ॐ**विनाशकाल** पु०कोणेकाची द्रव्य,आप्त,वैभव, इ० बाबतींत हानि ज्या काळीं होते तो त्याचा विनाशकाल. **विनाशकाले विपरीतबुद्धिः** कोणेकाचा विनाशकाल प्राप्त झाला असतां त्याला भलभलत्या गोष्टी करण्याची बुद्धि होते.

**विनाशी** वि० १ नाश पावणारें; क्षणभंगुर. २ नाश करणारें; विध्वंसक.

**विनिगम** [ सं० ] पु० शास्त्राचा सिद्धांत.

**विनिमय** [ सं० ] पु०१अदलाबदल. २गहाण.

**विनिमेष** [ सं० ] पु० १ डोळ्यांची उघडझाक. २ नेत्रसंकेत; डोळ्यांनीं केलेली इशारत.

**विनियोग** [ सं० ] पु० १ निराळें करणें; वियोग. २त्याग. ३ उपयोग. ४ नेमणूक; योजना. ५पदार्थविशेषाचा कार्यविशेषाकडे उपयोग करणें; उ० ह्या शिलकीच्या दहा रुपयांचा विनियोग त्याणें गरीब मुलांना खादीच्या टोप्या वाटण्यांत केला.

**विनिर्णय** [ सं० ] पु० १ पूर्ण निकाल. २ अखेरचा निर्णय.

**विनिर्बंध** [ सं० ] पु० कडक शिस्त; जरब [ नियंत्रणा.

**विनिर्मुक्त** [ सं० ] वि० पूर्णपणें कह्यांतून किं० नियंत्रणांतून सुटलेला.

**विनिश्वास** [ सं० ] पु० दीर्घ सुसकारा.

**विनिहत** [ सं० ] वि० १ पूर्णपणें ठार केलेला. २ जेरीस आणलेला. पु० १ दुश्चिन्ह. २ दैवी आपत्ति.

**विनीत** [ सं० ] वि० १ शिकवून तयार केलेला; शिकविलेला; शिक्षित. २ सभ्य; सदाचारसंपन्न. ३ नम्र; विनययुक्त. ४ जितेंद्रिय. पु० शिकवून तयार केलेला घोडा.

**विनेता** [ सं० विनेतृ ] पु० १ पुढारी; नायक;अग्रणी.२शिक्षक; गुरु.३ नियंता;शास्ता.

**विनोद** [ सं० ] पु० १ घालविणें; परिहार; उ० श्रमविनोद. २ क्रीडा, मनोरंजन. ३ मनोरंजनाचें कांहीं साधन. ॐ **विनोदास्पद** न० १ करमणुकीचें साधन; मनोरंजन करणारी कांहीं गोष्ट. २ ज्याचे पासून करमणूक होऊं शकेल असें कांहींही. ३ थट्टेचा किं० उपहासाचा विषय. **विनोदी** वि० १ आनंदी ( स्वभाव, माणूस ). २ दुसऱ्याची करमणूक करणारा ( मनुष्य ). ३ थट्टेचें किं० गमतीचें ( भाषण ).

**विन्मुख** [ सं० विमुख ] वि० १ तोंड फिरविलेला; पराङ्मुख. २ विरुद्ध; प्रतिकूल. पुढे ' विमुख ' पहा. ॐ **कोणेकाच्या प्रार्थनेला विन्मुख होणें** त्याची विनंती अमान्य करणें; ती न पुरविणें.

**विन्यस्त** [ सं० ] वि० १ रचिलेलें. २ घातलेलें. ३ योग्य ठिकाणीं मांडलेलें.

**विन्यास** [ सं० ] पु० १ हवाली किं० स्वाधीन करणें. २ नीट मांडणें; व्यवस्थित रीतीची मांडणी. ३ दुसऱ्याचे जवळ रक्षणार्थ ठेविलेली वस्तु; ठेव. टीप,-मागें ' न्यास ' सर्व अर्थी पहा.

**विन्हणें, विंधणें** [ म० विंधणें ] न० सुतारांचें एक हत्यार.

**विपचार** [ सं० ' व्युपचार ' चा गांवढळ अपभ्रंश ] पु० १ कोणेकाला वाईट रीतीनें किं० असभ्यपणें वागविणें; कोणेकाशीं केलेले असभ्यपणाचें वर्तन; कोणेकाचा केलेला अनादर. २ दुर्दशा; विनाश; विध्वंस; उ० बायको शाहाणी असली तर संसार, नाही तर विपचार.

**विपट** [ म० वि ( नाहीं )+पडणें, पटणें ] स्त्री०, न० दोन माणसांत बेबनाव, वैषम्य, किं० विमनस्कता; न पटणें.

**विपतर** वि० १ द्वाड, खोडकर, उपद्रवी ( मूल, माणूस, जनावर, इ० ). २ मूर्ख; अजागळ. ३ कुरूप; विद्रूप.

**विपत्ति** [ सं० ] स्त्री० १ संकट; पंचाइतीची स्थिति. २ नाश; मृत्यु. ॐ **विपत्तिकाळ** पु० ज्या काळांत कोणेकावर अनेक दुर्वह संकटें कोसळतात तो त्यांचा विपत्तिकाळ. **विपत्य** पु० अ० व० हाल, कष्टमय स्थिति ( अशिक्षितांत रूढि ).

**विपथ** [ सं० ] पु०, न० निंद्य मार्ग; आडमार्ग; भलतेंच वर्तनसरणी. ॐ **विपथगामी** वि० स्वैर वर्तन करणारा; उत्संखळ; निंद्य मार्गाचें आचरण करणारा.

**विपद्, विपदा** [ सं० ] स्त्री० १ संकट. २ हीनदीनपणाची स्थिति; उ० विपद्ग्रस्त ( ह्म० संकटांत पडलेला ); उ० विपत्काल, विपद्धर्म, इ०.

**विपदा** मागें ' विपद्, ' ' विपत्ति ' पहा.

**विपदात** ' विपदा ' चा गांवढळ अपभ्रंश. मागें ' विपदा ' पहा.

**विपन्न** [ सं० ] वि० १ संकटांनीं ग्रस्त. २ दुर्दैवी. ३ हीन, दीन, अनाथ.

**विपरिणमन** न०, **विपरिणाम** पु० बदल; रूपान्तर.

**विपरीत** [ सं० ] वि० १ बदललेला; चळलेला. २ उलटा; विरुद्ध. ३ खोटें. ४ नियमाला सोडून असलेलें. ५ दुर्वर्तनी. ६ शास्त्र, रूढि, इ० शीं विरोधी. ७ प्रतिकूल ( काळ, दैव, परिस्थिति ). ॐ **विपरीत लक्षणा** स्त्री० उलट्या किं० विरुद्ध अर्थानें जेथें वाक्यांतील शब्द घ्यावयाचे असतात किं० घ्यावे लागतात तेथें ' विपरीत लक्षणा ' होते; उ० माझ्या शत्रूला माझ्या घरच्या गुप्त गोष्टी सांगून तूं त्याची बाजू बळकट करून दिलीस हे तुझे मजवर मोठे उपकार आहेत. ह्या वाक्यांत ' उपकार ' चा अर्थ ' अपकार ' असा घ्यावयाचा आहे. येथें विपरीत लक्षणा झाली आहे. आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' उपोद्धात पहा. **विपरीत भावना** स्त्री० १ उलटा ग्रह किं० मत. २ रोग इ० ची बदललेली स्थिति किं० परिस्थिति.

**विपर्यय** [ सं० ] वि० उलट; उलटा; विपरीत. पु० १ विरोध; विरुद्धपणा. २ बदल; पालट. ३ उलटापालट. ४ उलटी स्थिति. ५ आपत्ति. ६ उलटें किं० विपरीत वर्तन. ७ प्रलयकाळ. ८ भ्रम; गैरसमज. ९ चुकी.

**विपर्यस्त** [ सं० ] वि० १ उलट झालेला. २ बदललेला. ३ विपरीत. ४ उलथून टाकलेला. ५ भलत्याच प्रकारचा.

**विपर्यास** [ सं० ] पु० १ बदल; रूपान्तर. २ उलटपणा. ३ कोणेकानें बोललेल्या वाक्याचा भलतांच अर्थ करणें किं० घेणें. ४ उलथापालथ; उलटापालट. ५ विरोध; प्रतिकूलता.

**विपल, विपळ** [ सं० विपल ] न० पळाचा साठावा अंश. पळ=घटिकेचा साठावा अंश.

**विपलाप, विपळाप** [ सं० ' विलाप ' चा गांवढळ अपभ्रंश ] पु० रडणें; रोदनाचा आक्रोश. [ रोदन करणें.

**विपलापणें** [ म० विपलाप ] अ० क्रि० रडणें;

**विपसळ, विपसळा** वि० खोडकर; द्वाड; व्रात्य. मागें ' उपसळा ' पहा.

**विपसळी** पु० १ कुत्रीं, मांजरें, उंदीर, घुशी, इ० चा उपद्रव. २ खोडकर पोरांचा त्रास, उपद्रव, किं० कटकट. मागें ' उपसळी ' पहा.

**विपक्ष** [ सं० ] पु० १ शत्रु; वैरी. २ प्रतिपक्षी. ( न्याय ) (१) पर्वतावर वह्नि आहे; (२)

कारण, पर्वतावर धूम आहे; (३) जेथें जेथें धूम असतो तेथें तेथें वह्नि असतो, जसें महानस; (४) न्हदांत धूम नाहीं आणि वन्हीही नाहीं. ह्या चार वाक्यांपैकीं पहिल्या वाक्यांत 'पर्वत' हा 'पक्ष,' कारण त्याचेवर वन्हि आहे असें सिद्ध करावयाचें आहे. 'वह्नि' हें 'साध्य'. ज्याचे-वरील साध्यरूपी धर्म निश्चित असतो त्याला 'सपक्ष' म्हणतात. वरील उदाहरणांत 'महानस' हा 'सपक्ष' होय. ज्याचेवरील साध्याचा अभाव निश्चित असतो त्याला 'विपक्ष' म्हणतात. वरील उदाहणांत 'न्हद' हा 'विपक्ष' होय. वि० उलट बाजूचा किं० पक्षाचा.

**विपाक** [ सं० ] पु० पक्कपणा; पूर्ण वाढ. २ पचन. ३ जठराग्नि. ४ परिणाम; शेवट; पर्यवसान. ५ ( **वेदान्त** ) कर्मांचें फळ.

**विपारणें** [ म० विपारा ] अ० क्रि० ( मूल, माणूस, पशु ) अव्यवस्थित किं० उत्संखल होणें.

**विपारा** [ सं० विपरीत ] वि० १ हेकट; चिरडखोर; हट्टी ( मूल, जनावर ). २ हेकटपणाचें किं० वात्रटपणाचें ( भाषण, वर्तन ). ३ कुरूप; विरूप. ४ मूर्ख; वेडा. ५ जन्मतांना ज्यांचे पाय अगोदर बाहेर पडले आहेत असें ( मूल ). ॐ **वेडाविपारा** वि० साधाभोळा; अजागळ.

**विपाश** [ सं० ] वि० बंधनांतून सुटलेला.

**विपिन** [ सं० ] न० अरण्य. ॐ **विपिनौकस्** पु० वानर.

**विपुल** [ सं० ] वि० १ मोठें; विस्तृत. २ पुष्कळ; अघळपघळ.

**विप्र** [ सं० ] पु० ब्राह्मण,–हिंदूंच्या चातुर्वर्ण्यांतील पहिला वर्ण किं० त्या वर्णाचा कोणी इसम.

**विप्रकर्ष** [ सं० ] पु० १ ओढणें; ओढींत किं० फरपटीत नेणें. २ दूरपणा; अंतर. ह्याच्या उलट 'संनिकर्ष' ह्या० सांनिध्य किं० जवळपणा.

**विप्रकृष्ट** [ सं० ] वि० दूरचा; अंतरावर असलेला.

**विप्रतिपत्ति** [ सं० ] स्त्री० १ मतभेद. २ भांडण; विरोध. ३ आक्षेप. ४ विरुद्ध किं० प्रतिकूल आचरण.

**विप्रतिपन्न** [ सं० ] वि० १ ज्याबद्दल संदेह आहे असें. २ घोटाळलेलें. ३ विरुद्ध बाजूचा. ४ आडविलेला.

**विप्रतिषेध** [ सं० ] पु० १ आवरण्याची क्रिया; विग्रह. २ विरोध; हरकत.

**विप्रतिसार, विप्रतीसार** [ सं० ] पु० पश्चात्ताप; अनुताप.

**विप्रयुक्त** [ सं० ] वि० १ ज्याला वियोग झाला आहे असा. २ पदार्थविशेष ज्याचे जवळ नाहीं असा.

**विप्रयोग** [ सं० ] पु० १ ताटातूट; वियोग. २ भांडण; विरोध. ३ फसविणें ही क्रिया.

**विप्रलंभ** [ सं० ] पु० १ फसवणूक. २ वियोग; विरह. ३ भांडण; कलह; विरोध. ४ ( **साहित्य** ) शृंगाराचा एक प्रकार,–ज्यांत नायक आणि नायिका यांची ताटातूट होऊन परस्परांस दुःख होत आहे असें वर्णन असतें.

**विप्रलाप** [ सं० ] पु० १ बडबड; अर्थहीन भाषण. २ भांडण; विरोध. ३ परस्परविरोधी भाषण; असंबद्ध बोलणें.

**विप्रिय** [ सं० ] वि० अप्रिय; न आवडणारें. न० १ अप्रिय गोष्ट. २ कोणेकाचा केलेला अपराध.

**विप्रोषित** [सं०] वि० १ प्रवासास गेलेला. २ हद्दपार केलेला. ३ रहित.

**विप्लव** [ सं० वि० अनन्वित; असंबद्ध; पु० १ तरंगणें. २ प्रसिद्धि; पसरणें. ३ प्रमाणराहित्य; गोंधळ; घोटाळा. ४ उध्वस्त करणें; लुटणें. ५ उपद्रव. ६ नाश; प्रलय. ७ संकट. ८ पाप; दुष्कर्म.

**~फल** [ सं० ] वि० १ निरर्थक; व्यर्थ; निष्फळ. २ वांझ. ३ वृषणरहित.

**विबुध** [ सं० ] वि० शाहाणा; सुज्ञ. पु० १ ज्ञानी; पंडित. २ देव. ३ चंद्र.

**विबोध** [ सं० ] पु० १ जागे होणें. २ जाणणें. ३ दक्षता; जागरूक असणें.

**विभक्त** [सं०] वि० १ पृथक् केलेला. २ वेगळा झालेला ( भाऊ ). ३ भिन्न; विविध. ॐ **विभक्तभाव** पु० आपआपले हिस्से घेऊन भाऊबंदांनें विभक्त होणें किं० विभक्त झाल्यांची स्थिति.

**विभक्ति** [ सं० ] स्त्री० १ विभाग. २ भाऊबंदांची फारकत किं० त्यांची विभक्तपणाची स्थिति. ३ हिस्सा. ४ ( व्याकरण ) कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, स्वामित्व, अधिकरण, इ० अर्थ किं० संबंध दाखविणारे प्रत्यय नामें इ०स लागून विकार होतो तो. वाक्यांत नामाचा आणि क्रियापदाचा जो संबंध असतो त्याला ' कारक ' म्हणतात. कारक दाखविण्यासाठीं नाम किं० सर्वनाम यांचें जें रूप करतात त्याला ' विभक्ति ' म्हणतात.

**विभव** [ सं० ] पु० १ संपत्ति; द्रव्य; धन. २ सामर्थ्य. ३ ऐश्वर्य; वैभव; उत्कर्ष. ४ मनाचा मोठेपणा; औदार्य. ५ पालन; संरक्षण.

**विभा** [ सं० ] स्त्री० १ प्रकाश; तेज. २ किरण. ३ कांति; शोभा. ꙮ **विभाकर पु०** १ सूर्य. २ अग्नि. **विभावसु** पु० १ सूर्य. २ अग्नि.

**विभाग** [ सं० ] पु० १ वांटणी. २ हिस्सा; वांटा. ३ तुकडा. ४ पोटभाग.

**विभागणें** [ सं० वि+भज् ] स० क्रि० ( कांहीं पदार्थांचे ) तुकडे किं० भाग करणें किं० भाग पाडणें.

**विभाज्य** [ सं० ] वि० ज्याचे तुकडे करणें जरूर आहे असें; ज्याचे तुकडे करतां येतील असें.

**विभाव** [ सं० ] पु० ( साहित्य ) रसाला उद्दीपक अशी गोष्ट. प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत रति, हास्य, शोक, क्रोध, भय, उत्साह, जुगुप्सा किं० किळस, विस्मय, आणि निर्वेद किं० वीट, असे नऊ विकार बीजरूपानें सिद्ध असतात; त्या विकारांना 'स्थायिभाव' म्हणतात. रति, हास्य, इ० स्थायिभावांस जीं कारणें त्यांना ' विभाव ' म्हणतात. विभाव दोन प्रकारचे आहेत. आलंबनविभाव आणि उद्दीपनविभाव. हास्यरसास आलंबन ( म्ह० आश्रय ) विदूषक इ०; आणि उद्दीपन चित्रविचित्र वेष, भाषण, चेष्टा, इ०. रति, हास्य, शोक, भय, क्रोध, उत्साह, जुगुप्सा, विस्मय, आणि निर्वेद, ह्या रसांचीं जी कार्यें ते 'अनुभाव' किं०'सात्विक भाव'. स्थायिभावांच्या कार्यांच्या उत्पत्तीस साहाय्यभूत होणारे जे भाव त्यांस 'सहकारि किं० व्यभिचारिभाव'म्हणतात. ह्यांनाच'संचारिभाव' असेंही नांव आहे.

**विभावन** न०, **विभावना** स्त्री०[ सं० ] १ भासणें. २ कल्पना; तर्क. ३ तत्त्वनिर्णय. ४ व्यक्त करणें. वाटाघाट. **विभावना** स्त्री०(**साहित्य**) कारण घडलेलें नसतां कार्य घडलें आहे अशा अर्थाचें जें विधान त्याला विभावना म्हणतात. विशेष विवरण, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण '' ह्या पुस्तकांत पहा.

**विभावित** [ सं० ] वि० १ पाहिलेला. २ प्रकट केलेला. ३ जाणलेला.

**विभाषा** [ सं० ] स्त्री० विकल्प; करणें किं० न करणें. [ रागविशेष.

**विभास** [ सं० ] पु० ( संगीतांत ) एक

**विभिन्न** [ सं० ] वि० १ विदीर्ण, विदारित. २ पालटलेला. ३ नाना प्रकारचा; विविध.

**विभीतक**[सं०]पु०, न० बेहडा,–एक फळ.

**विभीषण** [ सं० ] वि० भयंकर. ꙮ **विभीषणकाल** पु०, **विभीषणवेला** स्त्री० ( फलज्योतिषांत ) एक समय किं० काल.

**विभु** [सं०] वि० १ बलिष्ठ. २ श्रेष्ठ. ३ समर्थ; सर्वशक्तिमान्. ४ स्थिर. ५ सर्वव्यापि; व्यापक. पु० १ धनी. २ राजा. ३ ईश्वर. ४ शंकर. ५ आत्मा. ꙮ **विभुता** स्त्री० प्रभाव.

**विभूत** [ सं० विभूति ] स्त्री० गायींच्या शेणाची राख,–जी कपाळावर लावितात. खालीं ' विभूति ' अर्थ ६, ७ पहा.

**विभूति** [ सं० ] स्त्री० १ संपत्ति; समृद्धि. २ कल्याण. ३ माहात्म्य; तेज; प्रभाव; शक्ति. ४ अष्टसिद्धि प्रत्येक. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टसिद्धि ' पहा. ५ लक्ष्मी ही देवता. ६ गायीच्या शेणाची राख,–जी संध्यावंदन इ०प्रसंगीं कपाळावर लावितात; भस्म. ७ लिंगायत लोक कपाळावर लावितात ती पांढरी मृत्तिका. ८ ( लाक्षणिक ) विद्या, शौर्य, पराक्रम, इ० गुणांनीं लोकोत्तर पुरुष. ꙮ **विभूतीचें मूळ रेड्याच्या गाडींत** ऐहिक वैभव ( पुष्कळ प्रसंगीं ) पापांवर अधिष्ठित किं० आधारलेलें असतें.

**विभूषण** [ सं० ] न० १ दागिना. २शोभादायक पदार्थ; अलंकाररूप कोणताही पदार्थ.

**विभूषा** [ सं० ] स्त्री० १ दागिना; अलंकार. २ तेज; कान्ति. ३ सौंदर्य; शोभा.

**विभूषित** [ सं० ] वि० शोभविलेला.

**विभेद** [ सं० ] पु० भेद; पृथक्करण.

**विभ्रम** [ सं० ] पु० १ भ्रमण; भटकणें. २चक्राकार गतीनें फिरणें. ३ मनाचा घोटाळा, गोंधळ, किं० खळबळ. ४ लगबग; त्वरा; घाई. ५ चूक; चुकी. ६ भ्रांति; विचारांचा गोंधळ किं० गुंतागुंत. ७ शृंगारमूलक चित्ताचा गोंधळ किं० घोटाळा.

**विभ्रांत** [ सं० ] वि० गोंधळलेला.

**विमत** [ सं० ] वि० १ अमान्य असलेलें. २ प्रतिकूल.

**विमति** [ सं० ] स्त्री० १ मतभेद. २नापसंती.

**विमना, विमनस्क** [ सं० विमनस्+क (प्रत्यय) ] वि०१खिन्न; खट्ट. २ ज्याला कांहीं सुचत नाहीं असा.३कोणेकावर रुसलेला; असंतुष्ट.

**विमर्द** [ सं० ] पु० १ वाटणें; मळणें. २ चोळणें; घासणें.३घट्ट आवळणें; आलिंगन; मिठी. ४ कालवाकालव; कुसकरणी. ५ गर्दी; खेचाखेच; दाटी. ६ युद्ध. ७ भांडण. ८ (**मराठींत**) उशीर; विलंब ( लागणें, लावणें ).

**विमर्दन** [ सं० ] न० वर ' विमर्द ' पहिले सात अर्थ पहा.

**विमर्श** [ सं० ] पु० १ विचार; वाटाघाट; चर्चा. २ सशय; शंका. ❀ **विमर्शात्मक निबंध** पु० एकादा सद्गुण, दुर्गुण, चालरीत, उपदेशवाक्य, बोधवचन, म्हण, वाद, इ० संबंधानें विचार साधकबाधक प्रमाणें देऊन ज्यांत नमूद केलेले असतात असा निबंध. विशेष विवरण आमचें ' निबंधलेखन आणि अनुवाद ' ह्या पुस्तकांत लेखांक ५ पहा.

**विमर्ष** [ सं ] पु० १ क्रोध. २ अवकृपा. ३ (**नाट्यशास्त्र**) विघ्न,-शाप इ० कारणांमुळें नायक आणि नायिका ह्यांच्या संयोगाला व्यत्यय आणणारी कांहीं गोष्ट.

**विमल** [ सं० ] वि० १ स्वच्छ; ज्यांत मळ, घाण, किं० गदळ नाहीं असा. २ पांढरा. ३पवित्र; पापरहित. ❀ **विमलाद्रि** पु० गिरनार पर्वत.

**विमा** [ **फा० बीमा** ] पु० १ मी मरण पावेन तेव्हां माझ्या पत्नीस किं० पुत्रांस अमुक रक्कम तुम्हीं द्यावी आणि हयातींत अमुक हप्त्यांनीं अ... जाईन, असा कोणेक संस्थेशीं क... ठराव ( करणें, ठरविणें, इ० ). २ आ... बद्दल किं० मालाबद्दल केलेला अशाच शर्तींचा ठराव. **टीप**,-विम्याचे शेंकडों प्रकार आहेत. ❀ **विमेकरी, विमेदार** पु० विमा उतरणारा.

**विमाता** [ सं० विमातृ ] स्त्री० सावत्र आई. ❀**विमातृज** पु० सावत्र भाऊ.

**विमान** [ सं० ] वि० ज्याचा अपमान झाला आहे किं० करण्यांत आला आहे असा. पु०, न० १ अपमान; मानखण्डना. २ आकाशयान. ह्या अर्थीं मराठींत न० प्रयोग आहे. ३ सात मजली वाडा. ४ राजवाडा.

**विमानन** न०, **विमानना** स्त्री० [ सं० ] अपमान; तिरस्कार; तुच्छ लेखणें.

**विमार्ग** [सं०] पु० १ भलताच रस्ता;आडमार्ग; वाईट मार्ग. २ असत्पथ; नीतीला सोडून वर्तनाची सरणी. ३ दुर्वर्तन.❀**विमार्गगा** स्त्री० व्यभिचारिणी स्त्री.

**विमुक्त** [ सं० ] वि० १ नियंत्रणेंतून मोकळा झालेला. २ सोडून दिलेला. [३ वियोग.

**विमुक्ति** [ सं० ] स्त्री० १ मोकळीक. २मोक्ष.

**विमुख** [ सं० ] वि०१तोंड फिरविलेला;पराङ्मुख. २ विरुद्ध; प्रतिकूल. **टीप**,-१ ह्या दोन्ही अर्थांच्या उलट अर्थाचा शब्द ' संमुख. ' **टीप**,-२ ' विमुख ' चें ' विन्मुख ' हें अपभ्रष्ट रूप.

**विमोचन** न०, **विमोचना** स्त्री० [ सं० ] १ सुटका; मोकळीक. २मोक्ष.३त्याग; सोडून देणें.

**विमोहन** [ सं० ] न० मोह पाडणें; मारणें. पु०, न० एक नरकविशेष.

**वियत्** [सं०] न० आकाश. ❀ **वियद्गंगा** स्त्री० मंदाकिनी,-स्वर्गांतील नदी. **वियन्मणि, वियन्मध्यहंस** पु० सूर्य.

**वियुक्त** [ सं० ] वि० १ विरहित; रहित. २ वेगळा किं० पृथक् झालेला.

**वियोग** [ सं० ] पु० १ पृथक्पणा;वेगळेपणा. २ ताटातूट; दूर जाणें किं० असणें किं० होणें. ३ (**गणित**) वजाबाकी.

... ० ] वि० १ वजा करावयाची ... टातूट करणारा.

... सं० ] वि० जीतून एकादी संख्या ... करावयाची आहे ती ( संख्या ).

**विरका** [ म० विरणें ] वि० कांडतांना फुटणारें ( भात किं० तांदूळ ); भरडतांना फुटणारी ( डाळ ).

**विरक्त** [ सं० ] वि० १ फार तांबडा; लालभडक. २ असंतुष्ट. ३ प्रपंचांत आसक्त नसलेला. ४ उदासीन.

**विरक्ति** [ सं० ] स्त्री० १ असंतोष. २वैराग्य; प्रपंचाचा वीट. ३ औदासीन्य. ४ कोणेका वस्तूवरून किं० माणसावरून मन उडणें.

**विरखंड** [ म० विरी+खंड ] न० पोफळींच्या घोसांचें आवरण किं० कवच. पोथी, कागदपत्रें, इ० सुरक्षित ठेवण्यासाठीं विरखंडाचा उपयोग करतात.

**विरंगुळणें** अ० क्रि० कांहीं काम आळसानें किं० थांबत थांबत करणें.

**विरंगुळा** [ म० विरंगुळणें ] पु० १ काम करून कंटाळा किं० थकवा आला असतां मन ज्यांत किं० ज्यानें रमतें असें कांहींही,–गाणें, वाजविणें, खेळणें, इ०. २दुःखी मनाला दुःखाचा विसर पाडणारें कांहींही,–मूल, उद्योग, वाचन, देवदर्शन, इ०.

**विरघळणें** अ० क्रि० १ सोनें, रुपें, इ० धातु अग्निसंयोगानें द्रवरूप होणें. टीप,–हा अर्थ चुकीनें रूढ झाला आहे. २ साखर, मीठ, इ० दूध, ताक, इ० मध्यें घातलें असतां तें द्रवरूप होणें. ३ अति जीर्ण झाल्यामुळें (वस्त्र, पोथीचीं पानें,इ०नीं) मध्यें मध्यें फाटण्याची स्थिति पावणें. ४ आपलें पातक उघडकीस आल्यामुळें लज्जित होणें किं० शरमणें. ५ दुसऱ्याचें दुःख, विपत्ति, संकट, इ० पाहून ( अंतःकरण ) द्रवणें किं० कळवळणें.

**विरचणें** मागें ' रचणें ' सर्व अर्थीं पहा.

**विरचित** [ सं० ] वि० रचिलेला; व्यवस्थित रीतीनें मांडलेला.

**विरजण** [ म० विरजणें ] न० १ दुधाचें दहीं व्हावें म्हणून त्यांत ताक इ० जो आंबट पदार्थ घालतात तो. २ ज्याला विरजण घातलें आहे असें दूध किं० असें दूध ज्यांत ठेविलें आहे असें भांडें. ३ कांहीं काम चालू असतां त्यांत कोणी उत्पन्न केलेलें कांहीं विघ्न. ४ कांहीं काम करणाराचा उत्साह खचविणारी कांहीं गोष्ट ( पडणें, घालणें ). ५ विद्वता, शौर्य, देशभक्ति, इ० कोणेकाच्या अंगच्या गुणाला कालिमा किं० कलंक लावणारा त्याच्या अंगचा कांहीं गुण,–वेश्यागमन, मद्यपान, इ०.

**विरजणी** स्त्री०, **विरजणें** न० [ म० विरजणें ] दुधाला ज्या भांड्यांत विरजण घालतात तें भांडें.

**विरजणें** अ० क्रि० १ ताक इ० च्या संयोगामुळें (दुधानें)दह्याचें रूप पावणें. २ भांडण मिटवून ( दोन पक्षांनीं )पुन्हा सलोख्याच्या स्थितींत येणें. स० क्रि० ताक इ० पदार्थ आंत घालून( दुधाला ) दह्याचें रूप आणणें.

**विरजणें** न० वर ' विरजणी ' पहा.

**विरजाहोम** पु० गोसावीपणाची किं० संन्यासाची दीक्षा घेतांना जो होम करतात तो.

**विरजीक, विरज्या, विरड** मागें 'इरजीक,' ' इरज्या, ' ' इरड ' पहा.

**विरड** स्त्री० पूर्वाह्न आणि अपराह्न हे जे दिवसाचे दोन भाग ते प्रत्येक; मध्याह्नापर्यंतचा आणि नंतरचा असे जे दिवसाचे दोन भाग ते प्रत्येक.

**विरडणें** अ० क्रि० खरूज, नायटा, इ०नीं ( त्वचा )ग्रस्त झालेली असणें.

**विरडा,विरढा** पु० तुळस इ०चा कोवळा रोपा.

**विरडी** स्त्री०, **विरडें** न० मागें 'विरडी(–ढी)' पहा. मागें ' विरडें (–ढें ) ' ४ अर्थ पहा.

**विरणा** वि० सडतांना सहज फुटणारा म० ढिसूळ ( तांदूळ ); दळतांना फुटणारी ( डाळ ).

**विरणें** अ० क्रि० १ विरघळणें; वितळणें. २ दया इ० भावनांनीं ( अंतःकरण ) द्रवणें. ३ जीर्ण झाल्यामुळें (वस्त्र,पोथीचें पान,इ०) अशक्त होऊन फाटूं लागणें किं० त्याला भोकें पडूं लागणें. ४ ( तांदूळ, डाळ ) कांडतेसमयीं ढिसूळपणामुळें फुटणें. ५ आकाशांत जमलेले ढग नाहींसे होणें. ६ ( शंका, अडचण, विघ्न, इच्छा, चिंता ) निरस्त

होणें. ७ ( तहान, भूक, कांहीं उत्कट इच्छा ) तृप्त न होतां शमणें.

**विरणें** स० क्रि० ( शेण, काटक्या, गवत, इ० ) भाजावयाच्या शेतांत पसरणें.

**विरत** [ सं० ] वि० १ थांबलेलें; बंद पडलेलें. २ ऐहिक विषयांची गोडी ज्याची लोपली आहे असा ( मनुष्य ).

**विरति** [ सं० ] स्त्री० १ थांबणूक; बंद पडल्याची स्थिति. २ शेवट; लय; नाश. ३ वैराग्य; निरिच्छपणा; ऐहिक सुखोपभोगांपासून पराङ्मुखता किं० त्यांचा वीट.

**विरथ** [ सं० ] वि० १ रथांतून उतरलेला किं० पडलेला. २ रथांतून ओढून काढलेला.

**विरधाळें** [ सं० वृद्धि+आलय ] न० कुटुंबांत मुलाच्या जन्मामुळें कुटुंबांतलि माणसांना आलेलें अशौच; सुवेर; सोयर.

**विरपणी** [ म० विरपणें ] स्त्री० शेतांतील गवत, काटक्या कुटक्या, झाडपाला, इ० उपटून जमीन स्वच्छ करण्याची क्रिया.

**विरपणें** स० क्रि० ( शेतांतील ) रद्दी गवत इ० उपटून ( शेत ) स्वच्छ करणें.

**विरपल** स्त्री० जमीन भाजल्यावर न जळतां राहिलेल्या ज्या काटक्याकुटक्या, गवत, इ०त्यांचा समुदाय.

**विरंबणें** अ० क्रि० १ शरमणें; लज्जित होणें. २ शिजलेला ( भात ) पचपचीत होणें किं० पाणचट होणें. [३ सुरासित.

**विरम** [ सं० ] पु० १ थांबणें. २ विसावा.

**विरमणें** [ स० वि+रम् ] अ० क्रि० १ थांबणें; कांहीं क्रिया करण्यापासून निवृत्त किं० पराङ्मुख होणें. २ लज्जित किं० खजिल होणें.

**विरल, विरळ**[सं०]वि० १ मध्यें मध्यें फटी किं० भेगा किं० अंतर असलेलें. २ क्वचित् आढळणारा किं० पाहाण्यांत येणारा; दुर्मिळ. ꣸ **विरलागत** वि० क्वचित् होणारा, आढळणारा, किं० येणारा.

**विरलणें, विरळणें** [म० विरल ]अ० क्रि०(वस्त्र) जुनेपणामुळें फाटण्याच्या स्थितीस आलेलें असणें.

**विरली** स्त्री०, **विरलें** न० मागें ' इरलें ' पहा.

**विरवड** स्त्री० मागें ' इरड ' पहा. मागें ' इरळ ' पहा.

**विरवदी** (-धी,-ळी ) स्त्री० स्त्रियांच्या पायाच्या बोटांत घालावयाचें एक रुप्याचें भूषण.

**विरविरणें** मागें ' रिवरिवणें ' पहा.

**विराविरी, विरविर** स्त्री० रिवरिवण्याची क्रिया किं० ह्या क्रियेची जीभ इ०ना होते ती भावना. मागें ' रिवरिवणें ' पहा.

**विरविरीत** वि० ज्याची मागावर कच्ची ठासणी झाली आहे किं० ज्याच्यावर फार वापर पडल्यामुळें ज्याचे तंतु विरळ झाले आहेत असें ( वस्त्र ).

**विरस** [ सं० ] वि० १ शुष्क, रसहीन, बेचव ( आंबा, इ० फळ किं० कांहीं खाद्य ). २ पांचट ( भाषण ). ३ खिन्न, उदास ( मन ). ४ निरुत्साहाची (स्थिति, कृति). ५ आनंदरहित (अंतःकरण).

**विरह** [सं०]पु० १ वियोग; ताटातूट. २ अभाव. ꣸ **विरहज्वर** पु० प्रेमाचें माणूस जवळ नसल्यामुळें होतो तो ताप किं० वाटतें तें दुःख. **विरहाग्नि, विरहानळ** पु० विरहरूपी अग्नि. **विरहिणी** स्त्री० प्रियपतीच्या वियोगामुळें पीडित झालेली स्त्री. **विरही** वि० ज्याला विरह झाला आहे असा.

**विरहित** [ सं० ] वि० १ त्यक्त; सोडलेला. २ जें असावें तें नसलेला; उ० मुठीनें विरहित चाकू काय कामाचा ? उ० स्त्रीचें कुंकवानें विरहित कपाळ पाहून मला दुःख होतें. ३ कांहीं विशिष्ट गुण, धर्म, पदार्थ, इ०ज्यांत नाहीं असा; हीन; शून्य; उ० औदार्यरहित म्ह० ज्याचे ठायीं औदार्य नाहीं असा. ४ अवशिष्ट; शिलकीचा; उरलेला.

**विरळ, विरळणें, विरळागत** मागें 'विरल,' ' विरलणें, ' ' विरलागत ' पहा.

**विरळा** [ म० विरल ] वि० क्वचित् येणारा, होणारा, आढळणारा, किं० घडणारा; उ० परदुःखानें दुःख पावणारा माणूस विरळा. **टीप,**— लिंगवचनांप्रमाणें न फिरणारें हें विशेषण आहे.

**विराकत, विराखत** स्त्री० १ लघ्वी; मूत. २ लघ्वी करणें; मुतणें. मागें ' इराकत ' पहा.

**विराग** [ सं० ] पु० १ असंतोष; अप्रीति. २ उदासीनता. ३ निरिच्छता; वैराग्य. ꣸ **विरागी** पु० ऐहिकसुखाचा ज्याला वीट आला आहे

असा; विरक्त. ‘ विरागी ’ चा मराठींत अपभ्रंश ‘ वैरागी ’ असा झाला आहे.

**विराजणें** [ सं० वि+राज् ] अ० क्रि० १ शोभणें; खुलणें; उठून दिसणें. २ चकचकणें; झळकणें.

**विराजमान** [ सं० ] वि० शोभणारा; उठून दिसणारा; उ०अध्यक्षाच्या खुर्चीवर शिवरामपंत विराजमान होतांच सभेच्या कामास सुरवात झाली.

**विराट्** [ सं० ] पु० १ तेज; शोभा. २ क्षत्रिय. ३ ब्रह्मांडरूपी देह; ब्रह्मांड. ४ (**वेदान्त**) ब्रह्माण्डाभिमानी आदिपुरुष. ५ जगदाकाररूपी जो ईश्वराचा देह तो. ❀ **विराट्पुरुष** पु० ब्रह्माण्डव्यापी सगुण ब्रह्म. **विराट्स्वरूप** न० ब्रह्माण्डव्यापी आत्मस्वरूप.

**विराम** [ सं० ] पु० १ थांबणें. २ विसावा. ३ अखेर; शेवट; नाश. ४ वाक्यांत किं० गाण्यांत किं० भाषणांत थांबण्याचें ठिकाण. ❀ **विरामचिन्ह** न० प्रश्न, उद्गार, आश्चर्य, विसाव्याचें स्थान, इ० चिन्हें लिहिलेल्या वाक्यांत योजतात तीं प्रत्येक.

**विराव** [ सं० ] पु० शब्द; आवाज; ओरडणें.

**विरी** [ सं० वीर्य ] स्त्री० चुना, डींक, खळ, पीठ, औषध, इ० च्या अंगचा जो सत्त्वांश तो ( जाणें, असणें ).

**विरी** स्त्री० पोफळाच्या घडाला वेष्टिणारें साल. मागें ‘ विरखंड ’ पहा.

**विरिंच, विरिंचि** [ सं० ] पु० ब्रह्मदेव.

**विरुद्ध** [ सं० ] वि० १ आडविलेला; थांबविलेला. २प्रतिकूळ; उलट; विसंवादी. ३ अपायकारक. ४ असंबद्ध ( भाषण इ० ).

**विरूप** [ सं० ] वि० १ कुरूप; बेढब. २ न जुळणारा; विसंवादी. ❀ **विरूपाक्ष** पु० शंकर.

**विरूळ** [ म० विरळ ] वि० विरळ. मागें ‘ विरळ ’ पहा. हा शब्द अशिक्षितांत रूढ आहे.

**विरें** [ म० विरी ] न० विरीचा केलेला द्रोण ( तूप, आमटी, इ० साठीं ). मागें ‘ विरी ’ पहा. [ढाळक.

**विरेक** [ सं० ] पु० १ ढाळ, जुलाब. २ ढाळ करणारें औषध.

**विरेचन** [ सं० ] न० १ ढाळ; रेच; जुलाब. २ ढाळ करणारें औषध.

**विरोदी** स्त्री० पायाच्या बोटांत घालावयाचें स्त्रियांचें भूषण. मागें ‘ विरवली ’ पहा.

**विरोध** [ सं० ] पु० १ अडथळा; अटकाव. २ गराडा; वेढा. ३ नियंत्रणा; निग्रह; दाब. ४ असंबद्धता; विसंवादिता. ५ वैर; शत्रुत्व. ६ कलह; भांडण. ७ पु० ( **साहित्य** ) दोन वस्तूंमध्यें खरोखरीं विरोध नसतां त्यांच्यांत विरोध असल्याचें विधान केलें असतां ‘ विरोध ’ हा अलंकार होतो. ह्याला ‘विरोधाभास’ असेंही म्हणतात. ह्या अलंकाराचीं उदाहरणें आमच्या ‘अर्थालंकारांचें निरूपण’ ह्या पुस्तकांत पहावीं. ❀ **विरोधी** [ सं० विरोधिन् ] वि० १ विरोध करणारा. २ विसंगत (भाषण, वर्तन). पु० वैरी, शत्रु. **विरोधी भक्ति** स्त्री० देवाच्या हातून आपणाला मरण आल्यानें आपणाला मुक्ति मिळेल अशा भावनेनें त्याच्याशीं मुद्दाम शत्रुत्व करणें; अशा प्रकारची देवाची भक्ति करणारा जो तो ‘ विरोधी भक्त. ’

**विरोली** स्त्री० विरवली. मागें ‘ विरोदी ’ पहा. [ सर्प.

**विरोळा** पु० जलांत राहाणारा एक निर्विष

**विऱ्हा** पु० ओढा; नाला; पऱ्हा.

**विलग** [ सं० विलग्न ] न० १ सुसंगतपणा किं० व्यवस्थितपणा किं० सुसंघटितपणा यांचा लोप किं० बिघाड; विसकळीतपणा; उ० बायको मेल्यामुळें संसाराचें विलग झालें. २विरोध; भांडण. वि० दूर असलेलें; दूर केलेलें; अंतरावर पडलेलें; उ० माझी चार शेतें आहेत आणि तीं एकमेकांपासून विलग आहेत.

**विलग्न** [ सं० ] वि० १ चिकटलेलें. २ कृश; बारीक. न० ( **ज्योतिष** ) उदय पावलेला राशि.

**विलंघणें** [ सं० वि+लंघ् ] स० क्रि० ( देश, समय, प्रतिज्ञा, उपदेश, इ० ) उल्लंघिणें किं० मोडणें किं० मागें टाकून पुढें जाणें; ०चें अतिक्रमण करणें.

**विलंघन** [ सं० ] न० उल्लंघन; अतिक्रमण.

**विलज्ज** [ सं० ] वि० निर्लज्ज; बेशरम.

**विलपणें** [ सं० वि+लप् ] अ० क्रि० १ बोलणें.

-२ बडबड, ३ रडणें; शोक करणें.

**विलपन** [ सं० ] न० १ बोलणें. २ बडबड; असंबद्ध भाषण. ३ रडणें. ४ शोक.

**विलंब** [ सं० ] पु० १ खोळंबा; हरकत. २ उशीर.

**विलंबिका** [ सं० ] स्त्री० १ ( वैद्यकांत ) मलावरोध. २ विषूचिका, अलसिका, आणि विलंबिका, ह्या ज्या पटकीच्या रोगाच्या तीन अवस्था त्यांतील शेवटची. मागें ' अलसिका ' पहा.

**विलंबित** [ सं० ] वि० १ उशीर लावणारा; उशीर करणारा. २ मंद ( गायन, वादन, इ० ). ३ लांबणीवर टाकलेलें; रेंगाळत पडलेलें ( काम इ० ). न० उशीर; विलंब.

**विलंबी** [ सं० विलंबिन् ] वि० १ रेंगाळणारा. २ उशीर लावणारा; चेंगट. ३ रेंगाळत चाललेलें किं० चालविलेलें ( काम ). पु० साठ संवत्सरांतील बिसावा संवत्सर.

**विलय** [ सं० ] पु० १ विरणें; मिळून जाणें. २ नाश. ३ प्रलय. ॐ **विलयास जाणें** नष्ट किं० विध्वस्त होणें; नाश पावणें.

**विलसणें** [ सं० वि+लस् ] अ० क्रि० १ प्रकाशणें; चकाकणें. २ दिसणें; प्रकट होणें. ३ खेळणें; क्रीडा करणें.

**विलसन** [ सं० ] न० १ शोभणें. २ क्रीडा.

**विलसित** [ सं० ] वि०१ शोभणारा; चकाकणारा. २ उत्पन्न झालेला; दृग्गोचर झालेला. न० १ शोभणें; चमकणें. २ प्रादुर्भाव; प्रकट होणें. ३ क्रीडा; खेळणें; लीला. ४ हावभाव.

**विलक्षण** [ सं० ] वि० १ भिन्न; वेगळा; निराळा. २ चमत्कारिक; तऱ्हेवाईक; विचित्र. ३ लोकोत्तर; अलौकिक. ४ अशुभलक्षणी.

**विला** [ फा० ] स्त्री० समय; प्रसंग; संबंध (फक्त दफ्तरी भाषेंत). ॐ **दर ई विला** क्रि० वि० ह्या संबंधांत किं० बाबतींत.

**विलाचें जाळें** न० मासे पकडण्याचें मोठें जाळें. मागें ' बुरीचें जाळें ' पहा.

**विलाज** [ अ० इलाज ] पु० इलाज; उपाय; उपचार; युक्ति. **टीप**,-हा शब्द अशिक्षितांतच रूढ आहे.

**विलाप** [ सं० ] पु० रडणें; शोक.

**विलापणें** [ अ० वि+लप् ] अ० क्रि० रडणें; शोक करणें.

**विलायत** [ सं० विलायत् ] स्त्री० १ प्रांत. २ कोणताही परदेश. ३ इंग्लंड. ४ यूरोप. ५ फळझाड, प्राणी, इ० चें मूळचें उत्पत्तिस्थान. ॐ **विलायती** वि० १ परदेशी. २ अपरिचित. ३ विचित्र. **विलायती कावा** पु० फसविण्याची कांहीं युक्ति,-जी दिसण्यांत प्रामाणिक आणि असण्यांत लबाडीची असते.

**विलास** [ सं० ] पु० १ खेळ; क्रीडा. २ शृंगारचेष्टा. ३ हावभाव. ॐ **विलासी** वि० विषयासक्त; गुलहौसी; सुखांत सदा निमग्न असणारा. **विलासवती** स्त्री० १ विलास करणारी स्त्री. २ सुंदर स्त्री. [ एकांकी नाटक.

**विलासिका** [ सं० ] स्त्री० शृंगारमय आणि

**विलीन** [ सं० ] वि० १ वितळलेला. २ विरघळलेला. ३ नष्ट; अदृश्य झालेला. ४ तल्लीन.

**विलुलित** [ सं० ] वि० १ विस्कटलेला. २ अस्थिर; चंचल. ३ गळालेला. ४ चुरगळलेला; कुसकरलेला.

**विलेप** पु०, **विलेपन** न० [ सं० ] १ उटी लावणें. २ उटी लावण्याचें द्रव्य; उटणें. ३ लेप; गिलावा.

**विलेपिका, विलेपी, विलेपिनी** [ सं० ] स्त्री० चौपट पाणी घातलेली कण्हेरी; आटवल.

**विलेपित** [ सं० ] वि० उटी इ० नीं चोपडलेलें (अंग ). २ जें चोपडलें तें ( द्रव्य,-उटी इ० ).

**विलोकणें** [सं० वि+लोक् (पाहाणें)] स० क्रि० १ पाहाणें; बघणें. २ विचारांत घेणें. ३ (शास्त्रांचें) अध्ययन किं० (अध्ययनाची) उजळणी करणें.

**विलोकन** [ सं० ] न० १ पाहाणें; बघणें. २ अध्ययन. ३ उजळणी.

**विलोचन** [ सं० ] न० १ पाहाणें; बघणें. २ डोळा. ॐ **त्रिलोचन, भाललोचन** पु० शंकर.

**विलोप** [सं०] पु० १ गळणें. २ लुटणें. ३ नाश; विध्वंस; ऱ्हास.

**विलोभन** [ सं० ] न० १ भुलविणें; फसविणें; मोह पाडणें. २ लालूच. ३ भेट; नजराणा. ४ मोहक वस्तु.

**विलोम** [ सं० वि० १ विपरीत; उलटें. २

( **गणित** ) व्यस्त. ३ प्रतिकूळ. ४ उलट्या दिशेनें किं० सरणीनें कांहीं क्रिया करणें किं० केलेली क्रिया; उ० 'रामाला माला मारा' हें वाक्य विलोम केलें तरी तसेंच होतें. ॐ **विलोमज, विलोमवर्ण, विलोमजात** वि० प्रतिलोम विवाहापासून झालेला. **विलोमजिह्व पु०** हत्ती. **अनुलोम विवाह पु०** वरच्या जातीचा पुरुष आणि खालच्या जातीची स्त्री यांचा विवाह. मागें 'अनुलोम' मध्यें हा शब्द पहा. **विलोमोत्पन्न, विलोमजात, विलोमवर्ण, प्रतिलोमज वि०** वरच्या वर्णाची स्त्री आणि खालच्या वर्णाचा पुरुष यांच्या संयोगापासून जन्मलेला. मागें 'प्रतिलोम' पहा.

**विल्हय स्त्री०, विल्हाणा पु०, विल्हाणें न०**[अ० विलाइयाह] १कुटुंब. २जात. ३जातीचा विस्तार. ४ एका मूळपुरुषापासून झालेला जो वंशविस्तार तो.

**विल्हय, विल्हेवाट** [ अ० विलाइयाह्+**म०** वाट] **स्त्री० १** उधळपट्टी; संपलेपणाची स्थिति; उ० बाप मेल्यावर एका वर्षांत त्याणें लाखाच्या संपत्तीची विल्हेवाट ( किं० विल्हय ) लाविली. २ पदार्थ शिस्तीनें ठेवणें; जेथल्या तेथें ठेवणें; जिकडच्या तिकडे पोचविणें किं० देऊन टाकणें. ३ योग्य प्रकारची मांडणी किं० व्यवस्था.

**विल्हा पु०, विल्हे स्त्री०** [ अ० विलाइयाह् ] १ वर्ग; गट; समूह; कांहीं एका तत्त्वावर केलेले समूह; उ० सकाराचा विल्हा म्ह० श, ष, स, हीं अक्षरें; उ० पत्रांच्या विल्हे लाविलेल्या असल्या म्हणजे हावें तें पत्र तावडतोब पाहातां येतें. २ एक गांव, किल्ला, इ०च्या अमलाखालीं मोडणारा प्रदेश. ॐ **विल्हेस लावणें** ( किं० **देणें** किं० **करणें** ) हवालीं करणें देखरेखीस ठेवणें. **विल्हेस लावणें** यथास्थानीं ठेवणें; सदरवारीनें मांडणें. **विल्हेस लागणें** योग्य सरणीनें मांडला जाणें; व्यवस्थित रूपांत घातला जाणें. **विल्हेवार क्रि० वि०** योग्य क्रमानें. **विल्हेवारी स्त्री०** शिस्तवार मांडणी.

**विल्हाळ, विल्हळ** [ सं० विह्वल ] **पु०** १ आपल्या दुःस्थितीसंबंधाची खोटी ओरड किं० चरफड. २ अशुभ वाचा. ॐ **जिवाचे विल्हाळ करणें** आपली स्थिति दुःखमय आहे अशी पिरपिर करीत बसणें. **विल्हाळगोर स्त्री०** १ सदा चरफडण्याच्या स्वभावाची स्त्री. २ सदा अशुभ वाणी बोलणारी स्त्री. **विल्हाळ्या वि०** सदा चरफडणारा; पिरपिऱ्या.

**विल्हाळणें, विल्हळणें** [ सं० विह्वल ] **अ० क्रि०** १ विवळणें; चरफडणें. २ पिरपिरणें. ३ अशुभ वाणी बोलत राहाणें.

**विवंचणें** [ सं० वि+वच् वंच् ] **अ० क्रि०** काळजी करीत बसणें.

**विवंचना** [ सं० ] **स्त्री०** काळजी; चिंता.

**विवर** [ सं० ] **न०** १ छिद्र; बीळ; भोक. २ डोंगरांतील गुहा. ३ भूमीच्या आंतील पोकळ भाग. ४वृक्षाची ढोली. ५एकांत. ६संधी; अवकाश. ७ पाताळ. ८कोणेकाचें कांहीं व्यंग; उणें; दूषण.

**विवरण** [ सं० ] **न०** १ उघडणें. २ वर्णन. ३ स्पष्टीकरण. ४ व्याख्या. ५ व्याख्याग्रंथ.

**विवरणें**[ सं० वि+वृ (उघडें किं० स्पष्ट करणें) ] **स० क्रि०** (कांहीं विषयाचें) स्पष्टीकरण करणें; विस्तारानें सांगणें किं० वर्णिणें; (कांहीं) विषयाचा साधकबाधक गोष्टी विचारांत घेऊन खल करणें.

**विवर्जन, विवर्जित, विवर्जणें** मागें 'वर्जन,' 'वर्जित,' 'वर्जणें' पहा.

**विवर्ण** [ सं० ] **वि०** १ निस्तेज; फिक्का. २ वाईट रंगाचा. ३ उदासीन; म्लान. **पु०** जातीतून बहिष्कृत.

**विवर्त** [ सं० ] **पु०** १ चक्राकार गति. २ परत वळणें. ३ ( **वेदान्त** ) आभास; भ्रम. ४ ( **वेदान्त** ) मायेचें कार्य; नश्वर वस्तु. ५ ढीग; समुदाय.

**विवर्तन** [ सं० ] **न०** १ वर 'विवर्त' अर्थ १ आणि २ पहा. २ परत फिरणें; उलटणें. ३ उलट वर्तन. ४ लोळणें. ५ कुशीवर वळणें. ६ बदल; पालट; रूपांतर.

**विवर्धन** [ सं० ] **न०** वाढ; वृद्धि.

**विवश** [ सं० ] **वि०** १ स्वतंत्र; दुसऱ्याच्या नियंत्रणाखालीं नसलेला. २ बेशुद्ध; निश्चेष्ट. ३ बेफाम. ४ घाबरलेला.

**विवशी, विंवशी स्त्री०** १ हाल, अपेष्टा, संकटें, चिंता, इ० मनुष्याच्या भोगास घालणारी

देवता; उ० त्याच्या घरांत विवशी शिरली आणि तो किमयाच्या नादास लागला आणि सर्वस्वीं बुडाला. २ वाईट पायगुणांची स्त्री किं० कोणीही माणूस किं० पशु.३एकाद्या माणसास किं० वंशास जडलेला जो व्याधि,-रक्तपीति,दमा,क्षय,इ०तो.

**विवसा** [ सं० व्यवसाय ] पु० उद्योग, धंदा ( अशिक्षितांत रूढ ). [ कल.

**विवसा** स्त्री० (कवितेंत) इच्छा;नाद;मनाचा

**विवळणें** [ सं० विह्वल ] अ० क्रि० कण्हणें; दुःखानें पिरपिरणें; कांहीं काम बिघडल्यामुळें दुःखानें चरफडणें किं० अस्वस्थ होणें.

**विवक्षा** [ सं० ] स्त्री०१बोलण्याची इच्छा.२ अभिप्राय;हेतु;आशय.३ अपेक्षा. ४ संशय;पृच्छा.

**विवक्षित**[सं०]वि० १ उद्दिष्ट.२जें बोलावयाचें आहे किं०जें बोलावयाचें म्हणून योजलें किं०इच्छिलें आहे तें;अभिप्रेत. न०१हेतु.२अर्थ. ३अभिप्राय. पु० (मराठींत)गांव,राज्य,संस्था,इ०मध्यें चातुर्य, पराक्रम,इ०कांहीं गुणांमुळें अग्रगण्य जो माणूस तो.

**विवाद** [ सं० ] पु० १ वाद; भांडण. २ विरोध; विसंवाद. ३ फिर्याद; खटला.४ चर्चा.

**विवाह** [ सं० ] पु० १ स्त्री आणि पुरुष यांचा धर्माला अनुसरून घडवून आणलेला जो संबंध तो; लग्न. विवाह आठ प्रकारचे आपल्या शास्त्रकारांनीं सांगितले आहेत. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्ट विवाहविधि ' पहा. ॐ **विवाही, व्याही** पु० आपल्या पुत्राचा किं० कन्येचा सासरा. **विवाहदीक्षा** स्त्री० लग्नाचा संस्कार.

**विवाहणें** [ म० विवाह ] स० क्रि० १ पुरुषानें ( स्त्रीला ) विवाहाच्या धर्मविधीनें पत्नी करून घेणें. २ ( कोणा कुमारिकेचें ) लग्न कोणा वराशीं करून देणें. ३ (कोणा वराचें)कोणा कुमारिकेशीं लग्न करून देणें. टीप,-ह्या तिन्हीं अर्थी कवितेंतच रूढि.

**विवाह्य** [सं०] वि० १ज्याचें लग्न करावयाचें आहे असा. २ लग्नाला योग्य.पु० १ वर.२ जांवई.

**विविक्त** [सं०] वि० १ वेगळें केलेलें; भिन्न. २ निर्जन; ओसाड; एकांतांतील. ३ स्पष्टपणें ठरविलेलें. ४ शुद्ध; पवित्र. न० एकान्त स्थळ.

**विविध** [ सं० ] वि० नाना प्रकारचा; हरएक जातींचा. ॐ **विविध परिमाणें** न० अ० व० हीं चार प्रकारचीं आहेत. ( १ ) रुपये, आणे, पै, इ० नाण्यांच्या रूपानें सांगितलेलीं परिमाणें. ( २ ) शेर, तोळे, इ० भारवाचक शब्दांच्या रूपानें सांगितलेलीं परिमाणें. ( ३ ) वर्ष, दिवस, इ० काल दाखविणारीं परिमाणें; ( ४ ) महत्त्वदर्शक परिमाणें म्ह० लांबी, रुंदी, क्षेत्र, घनफळ, इ० दाखविणारीं परिमाणें.

**विवृत** [ सं० ] वि० १ उघडलेलें. २ स्पष्ट किं० जाहीर केलेलें किं० झालेलें. ३ खुलासेवार; स्पष्ट. ४ प्रफुल्लित (फूल इ०).५ पसरलेलें; विस्तृत.

**विवृति** [ सं० ] स्त्री० मागें ' विवरण ' पहा.

**विवृत्त** [ सं० ] वि० १ वळविलेलें. २ गरगर फिरविलेलें.

**विवेक** [ सं० ] पु० १ सारासार विचार. २ खल;वाटाघाट.३पृथक् करणें; दोन पदार्थांतील भेद दाखविणें.४(मराठींत)दुःखमय विचारांपासून मन निवृत्त करून तें शांत ठेवण्याचा प्रयत्न. ॐ **सदसद्विवेक** पु० चांगल काय आणि वाईट काय हें स्पष्टपणें ठरविणें. हें ठरविण्याला समर्थ अशी जी बुद्धि ती ' सदसद्विवेकबुद्धि '. **विवेकी** वि० विवेक अर्थ ४ करतो तो.

**विवेचक** [ सं० ] वि० विषयाचें बारकाईनें परीक्षण करणारा.

**विवेचन** [ सं० ] न० १ स्पष्टीकरण. २ एकाद्या विषयाचें सांगोपांग निरूपण; व्याख्यान.

**विशंक** [ सं० ] वि० १ ज्याला शंका नाहीं असा; निःशंक. २ बिनधोक.

**विशंकट** [ सं० ] वि० १ जोरदार.२ प्रचंड; मोठें; भयंकर.

**विशकल** [ सं० ] वि० १ फुटलेला; फोडलेला.२ज्याचे घटक भाग वेगळे केले आहेत असा.

**विंशति** [ सं० ] स्त्री० वीस ही संख्या.

**विशद** [ सं० ] वि० १ निर्मळ; स्वच्छ. २ पांढरें. ३ शोभिवंत. ४ स्पष्ट; उघड. ५ महिन्याचा शुक्ल ( पक्ष ). ६ज्यांत कांहीं घोटाळा किं०गुंतागुंत नाहीं असा.

**विशर** पु०, **विशरण** न० [ सं० ] १ नाश; विध्वंस. २वध.

**विशाख** [ सं० ] वि० शाखारहित( वृक्ष ). पु० कार्तिकस्वामी; कार्तिकेय.

**विशाखा** स्त्री० सोळावें नक्षत्र.

**विशारद** [ सं० ] वि० १ हुशार; प्रवीण; वाकबगार. २ विद्वान्; पंडित.

**विशाल** [ सं० ] वि० मोठा; विस्तीर्ण.

**विशिख** [ सं० ] पु० बाण. वि० ज्याला शेंडी नाहीं असा (मुसलमान, ख्रिस्तांव, इ०).

**विशिष्ट** [ सं० ] वि० १ निराळें. २व्यक्तीचें; वैयक्तिक; असामान्य. ३ युक्त; सहित. ४ श्रेष्ठ. ५ अमुक प्रकारचा किं० गुणाचा. ६ कांहीं गुण, प्रकार, इ० वरून वेगळा केलेला. ॥ **विशिष्टाद्वैत** न० मायाविशिष्ट ब्रह्म हें जगाचें कारण असें मत. **विशिष्टगुरुत्व** न० एकादा पदार्थ आणि पाणी हीं सारख्याच आकाराचीं घेऊन त्यांचीं वजनें केलीं असतां त्या पदार्थाचें वजन पाण्याच्या जितकें पट भरतें तितकी पट. कांहीं आकारमानाचें कोणत्याही पदार्थाचें वजन हें तितक्याच आकारमानाच्या पाण्याच्या वजनाच्या किती पटीनें हलकें किं० जड असेल तितकी पट त्या पदार्थाचें विशिष्ट गुरुत्व; उ० सोन्याचें विशिष्ट गुरुत्व १९ आहे; लोखंडाचें ७½ आहे.

**विशी** [ म० वीस ] स्त्री० १ वीस वर्षांचें वय. २ वीस वस्तूंचा समुदाय किं० समुच्चय. ॥ **विशीं विद्या तिशीं धन** ( किं० पराक्रम ) मागें ' तिशी ' मध्यें पहा. **विशादाविशी, विशीएकाणिशी** स्त्री० किंचित् फेरफार किं० बदल ( आजार, हवा, इ० बाबतींत ).

**विशीर्ण** [ सं० ] वि० १ फुटलेलें; तुकडे तुकडे ज्याचे झाले आहेत असें. २ जीर्ण, शुष्क ( वृक्ष, पान, इ० ). ३ चुरगळलेलें, कोमेजलेलें ( फूल, पान ).

**विशुद्ध** [ सं० ] वि० १ मलरहित; निर्मल. २ निष्पाप. ३ सद्गुणी. ४बिनचूक.

**विशुद्धि** [ सं० ] स्त्री० १ शुद्ध करणें. २ शुद्धपणा; शुद्धता. ३ बिनचूकपणा; निर्दोषपणा. ४ प्रायश्चित्त. ५ शंकेचें निवारण.

**विशूचिका** पुढें ' विषूचिका ' पहा.

**विशृंखल** [ सं० ] वि० ज्याला आडविणारें किं० थांबविणारें कोणी नाहीं किं० कांहीं नाही असा; उच्छृंखल; उत्सखळ.

**विशेष** [ सं० ] वि० १असामान्य. २विपुल. ३ अधिक. ४वेगळ्या प्रकारचें किं०दर्जाचें. पु० १अन्यत्र नसणारा पदार्थाचा कांहीं गुण; पदार्थाला सजातीयांपासून वेगळा किं० भिन्न करणारा त्याच्या अंगचा कांहीं गुण; गुणाधिक्य. २ कांहीं एका समुदायापैकीं एक व्यक्ति; उ० आंबा हा वृक्षविशेष आहे म्ह० वृक्षांच्या समुदायांत आंबा ही एक व्यक्ति आहे. ३ प्रकार; भेद. ४ फरक; भिन्नता; तफावत. ५ घर, गांव, यंत्र, बाजार, इ० तील प्रेक्षणीय गोष्टी किं० पदार्थ किं० भाग. ६उत्तम व्यक्ति; उ० अतिथिविशेष म्ह०उत्तम किं०वंद्य अतिथि. ७कपाळावरचा गंधाचा टिळा. ८ ( साहित्य ) एक अलंकार. ( १ ) एकाद्या वस्तूचा लोकांत प्रसिद्ध असा जो आधार तो नसतांही ती वस्तु राहूं शकते असें वर्णन; ( २ ) एकादी वस्तु आपल्या नेहमींच्या रूपांत एकाच वेळीं अनेक ठिकाणीं राहूं शकते असें वर्णन; ( ३ ) कोणी माणूस कांहीं गोष्ट करीत असतां दुसरीही कांहीं अशक्य अशी गोष्ट त्याच यत्नानें करतो असें वर्णन. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमच्या ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. ॥ **विशेषज्ञ** वि० शहाणा. **विशेषविधि** पु० मुद्दाम सांगितलेला नियम. **विशेषनाम** न०(व्याकरणांत)ज्या नामानें एकाच व्यक्तीचा बोध होतो तें नाम; व्यक्तीचें जें नांव तें विशेषनाम; उ० गोदी, कृष्णराव, इ०. **विशेषोक्ति** स्त्री० ( साहित्य ) कारण उपस्थित असून कार्य घडलें नाहीं अशा अर्थाचें विधान. उदाहरणें इ०आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. **विशेषेंकरून** क्रि० वि० मुख्यत्वें करून; विशेषतः. **विशेषत्कार** पु० १ विशेषपणा; पदार्थाचें वैशिष्ट्य; पदार्थाला त्याच्या सजातीयांपासून भिन्न करणारा कांहीं गुण किं०धर्म. **विशेषात्कारें करून** क्रि० वि०विशेषें करून; विशेष गुण विचारांत घेतले असतां; विशेष स्थिति, समय, इ० विचारांत घेऊन.

**विशेषक** [ सं० ] पु०, न० १ विशेष गुण. २ कपाळावरील टिळा. ३उटी इ०नीं शरीर इ० भूषविण्याची क्रिया. ३एकत्र अन्वित असे तीन श्लोक समुच्चयानें; तीन श्लोकांचें बनविलेलें एक वाक्य

**विशेषण** [ सं० ] न० १ भेद; फरक. २ वेगळेपणा; भेदकत्व. ३ ( व्याकरण ) पदार्थाचा गुण दाखविणारा शब्द. ४ विशिष्ट गुण; व्यावर्तक असा कांहीं धर्म.

**विशेष्य** [ सं० ] न० ( व्याकरण ) ज्या नामाचा गुण किं० धर्म विशेषण दाखवितें तें नाम; उ० ' चांगला मुलगा ' यांत ' चांगला ' हें विशेषण आणि ' मुलगा ' हे विशेष्य. ॐ **विशेष्यानघ्न** वि० विशेष्याच्या लिंगवचनादिकाप्रमाणें बदल पावणारें ( विशेषण ).

**विशोक** [ सं० ] पु० १ शोकाचा अभाव.२ अशोक वृक्ष. वि० शोकरहित.

**विशोधन** [ सं० ]न०१साफसूफ करणें;मलरहित करणें; चुका किं० दोष काढून टाकणें; घाण काढून टाकणें. २ तपासणें.३ प्रायश्चित.

**विशोध्य**[ सं० ] न० कर्ज.

**विंशोपक** [ सं० विंशति ] न० पदार्थाचा वीसावा भाग. पुढे ' विश्वा ' अर्थ १ पहा.

**विशोभित** [ सं० वि ( नाहीं ) + शुभ् ( शोभणें ) ] वि० ज्याच्या शोभेंत कांहीं कमीपणा आला आहे असा; शोभिवंत न दिसणारा; उ० तुला जरीची टोपी विशोभित दिसते.

**विश्रब्ध** [ सं० ] वि० १ विश्वासणारा. २ निश्चिंत; निर्भय. ३ धमकदार; जोरदार. ४ शांत; निश्चल.

**विश्रम** [ सं० ] पु० १ थांबणें;कांहीं कामापासून निवृत्त होणें. २ विसावा. ३ विश्रांतिस्थान.

**विश्रंभ** [ सं० ] पु० १ विश्वास; खात्री; भरंवसा. २ गुप्त गोष्ट; रहस्य. ३ विश्रांति. ४प्रेमकलह.

**विश्रांत** [ सं० ] वि० थांबलेला; बंद पडलेला.

**विश्रांति** [ सं० ] स्त्री० १ थांबणें.२विसावा; अमपरिहार. ३ विश्रांति घेण्याची जागा ४ आराम किं० आनंद किं०शांति वाटविणारी कांहीं वस्तु किं० गोष्ट. ५ चालू क्रियेंत अडथळा किं० थांबणूक; उ० मी येथें लिहीत आहे, येथली दकत तुम्ही घेऊन गेलांत तर येथें विश्रांति होणार. ६ चौकशीचें पर्यवसान किं० समाप्ति; उ० चोरी कोणी केली असावी म्हणून जी चौकशी मी चालविली तिची विश्रांति खंडोबावर झाली ( म्ह० खंडोबानें चोरी केली असें माझ्या मतानें ठरलें ). ७ रिकामपणा; फुरसत; उ० मला आतां विश्रांति आहे, तुमच्या काशीयात्रेची हकीगत स्वस्थपणानें सांगा.८मदार;भिस्त;आधार;टेका उ० मला नोकरी पाहिजे आहे,माझ्या आशेची विश्रांति तुमच्यावर आहे.

**विश्राम** [ सं० ] पु० १ विश्रांति; विसावा. २ विसाव्याचें स्थान. ३ आनंद वाटविणारी किं० मनाला शांत करणारी कांहीं गोष्ट. ४ परमेश्वर.

**विश्रामणें** [ म० विश्राम ] अ० क्रि० विसावा घेणें.

**विश्रामा** [ म० विश्राम ] पु० विसांवा.

**विश्रुत** [ सं० ] वि० प्रख्यात; प्रसिद्ध; उ० लोकविश्रुत म्ह० सर्व लोकांस ठाऊक असलेला.

**विश्रुति** [ सं० ] स्त्री०कीर्ति; यश;प्रख्याति.

**विश्लथ** [ सं० ] वि० सैल;ढिलें;विसकळित.

**विश्लेष** [ सं० ] पु० १ वेगळे करणें; पृथक् करणें. २ वियोग; ताटातूट. ३ ( गणित ) वजाबाकी.

**विश्व** [ सं० ] न० जग; दुनिया. वि० सर्व; दरोबस्त. पु० अ० व० विश्वेदेव. ॐ **विश्वात्मा** [ सं० विश्वात्मन् ] पु० १ परमात्मा. २ शंकर. ३ विष्णु. **विश्वात्मना** क्रि० वि० पूर्णपणें; सर्वथैव; सर्वथा. **विश्वेश्वर** पु० शंकर. **विश्वकर्मा** [ सं० विश्वकर्मन् ] पु० १ देवांचा शिल्पी. २ सूर्य. ३ परमेश्वर. **विश्वकेतु** पु० १ अनिरुद्ध. २ मदन. **विश्वजनीन, विश्वजन्य** वि०सर्वांस उपयोगी. **विश्वजित्** पु०यज्ञविशेष. **विश्वतः** क्रि० वि० १ सर्वत्र.२सर्व बाजूंनीं. **विश्वंभर** पु०१ परमात्मा. २विष्णु. **विश्वंभरा** स्त्री० पृथ्वी. **विश्वमूर्ति** पु० परमेश्वर. **विश्वरूप** पु० १ विष्णु. २ (मराठांत) भयंकर देखावा; उग्र मुद्रा;उ०ज्या पोराला विश्वरूप दाखविलें तेंव्हा त्याणें हट्ट सोडला. **विश्वसृज्** पु० १ ब्रम्हदेव. २ प्रजापति. ३ मय सुर. **विश्वसाक्षी** पु० १ सर्व जग पाहाणारा परमेश्वर. २ सूर्य. **विश्वकुटुंबी** पु० १ ईश्वर. २ (लाक्षणिक) जो सर्वांस सारख्या भावानें वागवितो आणि ज्याचे ठायीं आपपर भाव नाहीं असा माणूस-

३ माझ्या सत्यचा चालक. ४ ज्याच्या कुटुंबांत अनेक माणसें,आश्रित,नोकरचाकर,इ०आहेत तो. विश्वजीवन पु० परमेश्वर. विश्वतोमुखीं क्रि० वि० सर्व लोकांच्या संभाषणांत ( असलेली कांहीं गोष्ट किं० खबर ). विश्वतोमुखी वि० सर्व लोक जिच्याबद्दल बोलत आहेत अशी ( कांहीं गोष्ट ). विश्वदुनी [ सं० विश्व; म० विश्व; फा० दुनिया ( जग ) ] स्त्री० सर्व जग; सर्व मानवजाति. विश्वपाल पु० परमेश्वर. विश्वमंगल वि० सर्वांस शुभ असा. न० सर्व जगाचें कल्याण. विश्वाधाया पु० परमेश्वर विश्वामित्र पु० १एक ऋषि.२छळीक माणूस.विश्वामित्रसृष्टि स्त्री०ब्रह्मदेवाच्या सृष्टींतील प्रत्येक पदार्थाच्या समान नवे पदार्थ जे विश्वामित्रानें निर्माण केले ते समुच्चयानें; उ०माड,सुरमाड; घोडा,गाढव; गाय, म्हैस,आणि वनगाय. विश्वामित्री स्त्री० म्हैस,–विश्वामित्रानें आपल्या प्रतिसृष्टींत गाईसारखा निर्मिलेला प्राणी.

विश्वसनीय [ सं० ] वि० १भरंवशाला पात्र; ज्यावर विश्वास ठेवतां येईल असा ( माणूस, बातमी, इतिहास ).

विश्वस्त [ सं० ] वि० १ज्याच्यावर विश्वास ठेविलेला आहे असा. २ विश्वासास पात्र.३ज्याणें कोणेकावर विश्वास ठेविला आहे तो; निःशंक; निर्भय. ४ धीट.

विश्वा, विस्वा [ म० वीस; वीसावा ] पु० १ पदार्थाचा विसावा भाग. २ रती हें जें वजन त्याचा वीसावा भाग.३ रुक्याचा वीसावा भाग. ꣸ अठरा विस्वे ( किं० विश्वे ) दारिद्य न० पराकाष्ठेचें दारिद्य.

विश्वामित्री स्त्री० म्हैस. मागें ' विश्व ' मध्ये ' विश्वामित्री ' पहा.

विश्वावसु [ सं० ] पु० १ एकुणचाळीसावा संवत्सर. २ एक गंधर्वविशेष.

विश्वास [ सं० ] पु० १ भरंवसा. २ श्रद्धा. ꣸ विश्वासघात पु० कोणी आपणावर भरंवसा टाकून बसला असतां त्याला फसविणें किं० त्याच्याशीं द्रोहाचें वर्तन करणें. विश्वासघातक, विश्वासघातकी पु०जो विश्वासघात करतो तो; उ० विश्वासघातकी तो महापातकी. विश्वासजामीन,विश्वासप्रतिभू पु०कोणेकाबद्दल जामीन राहिलेला मनुष्य. विश्वासनिधि पु० विश्वासाला पात्र असा माणूस. विश्वासू, विश्वासूक वि० विश्वासाला सर्वथैव लायक किं० पात्र. विश्वासी वि० १ विश्वासास पात्र. २ जो निःशंकपणें कोणेकावर भरंवसा टाकतो तो.

विष [ सं० ] न० जो पोटांत गेल्यानें मरण येतें असा कोणताही पदार्थ; उ० सोमल,बचनाग, इ०. २ शरीरांत जें भिनल्यानें मृत्यु येतो असा पदार्थ; उ०विंचवाच्या नांगींतील द्रव, सर्पदंतांतील द्रव,इ०.३(लाक्षणिक) कोणत्याही कारणानें अपायकारक असा कोणताही पदार्थ, कोणतेंही खाद्य किं० पेय, कोणतीही कृति, इ०; उ०आमांशानें पीडित अशा माणसाला बासुंदी हें विष; उ० खोकल्यांत मजों, वडे, हें विष. ४ कोणताही अत्यंत कडू असा पदार्थ. ꣸ विष मानणें अगदीं त्याज्य समजणें; उ० यति स्त्रीदर्शन विष मानतो. विषाची परीक्षा घेऊं नये ( किं० पाहूं नये ) ज्या कर्मात नाश होणें, अनर्थ कोसळणें, अपाय किं० हानि होणें, हें बहुतेक निश्चित असतें तें कर्म करून पाहूं नये. विषघटी स्त्री० अ० व० अश्विन्यादि नक्षत्रांपैकीं कांहींच्या पहिल्या, कांहींच्या मधल्या, आणि कांहींच्या शेवटल्या, अशा चार चार अशुभ घटका फलज्योतिषांत सांगितल्या आहेत त्या. विषघ्न वि० विषाचा प्रतिकार करणारें ( कांहीं औषध ).विषवैद्य पु० मंत्र, तंत्र, औषध, इ० उपायांनीं विषाची बाधा नाहींशीं करणारा;जांगुलिक. विषवल्ली स्त्री० १ कोणतीही विषारी वनस्पति. २ दुष्ट आणि मत्सरी माणूस. विषदृष्टि स्त्री० माणूस, पशु,पदार्थ,इ० वर जी नजर पडली असतां अपाय करते ती नजर.वि० ज्याची नजर कोणेक माणूस, पशु, पदार्थ, इ० वर पडली असतां त्यांचा नाश होतो असा (माणूस) विषप्रयोग पु०कोणेकाला ठार मारण्यासाठीं त्याच्या खाद्यांत किं० पेयांत विष घालणें ( करणें ). विषकंठ पु० शंकर.

विषकट [ सं० विशंकट ] वि० १ मोठें; विशाल; अवाढव्य. २ जोरदार.

विषण्ण [ सं० ] वि० खिन्न; खट्टू; ज्याचा उत्साह नष्ट झाला आहे असा.

विषम [ सं० ] वि० १ उंचसखल; सपाट

नव्हे असा ( प्रदेश ). २ तुल्य म्ह० सारखें नव्हे असें. ३ ( गणित ) सम नव्हे अशी ( संख्या ); उ० १, ३, ५, ७, इ०. ४ वक्र, वाकडें. ५ गूढ; दुर्बोध. ६ अनियमित. ७ खरबरीत. ८ दुर्गम, दुष्प्रवेश्य ( अरण्य, डोंगर, किल्ला, इ० ). ९ दुःखपूर्ण (स्थिति, अवस्था ). १० जोरदार. ११ भयंकर. १२ प्रतिकूळ; विपरीत; वैरभावाचें. १३ कठिण. न० १ विकट प्रसंग किं० परिस्थिति. २ ( साहित्य ) ( १ ) भिन्नधर्मीय वस्तूंचा संयोग घडल्याचें वर्णन; ( २ ) इष्ट फळ प्राप्त न होतां अनर्थ कोसळल्याचें वर्णन; ( ३ ) कारण आणि कार्य याच्यांत साम्य असावयाचें तें नाहीं आणि कारण भिन्न आहे असें वर्णन; ( ४ ) कारणाहून कार्य भिन्न असल्याचें वर्णन; असे चार प्रकार विषम ह्या अलंकाराचे आहेत. तपशील, उदाहरणें, इ० आमचे ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. ❀ विषम अपूर्णांक पु० ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षां लहान नसतो त्याला विषम अपूर्णांक म्हणतात; उ० $\frac{3}{2}$, $\frac{5}{3}$, $\frac{4}{4}$, इ०. विषम काळ पु० प्रतिकूळ किं० अशुभ वेळ. विषमचतुर्भुज, विषमचतुरस्र न० ज्याच्या बाजू सारख्या लांबीच्या नाहीत आणि समांतरही नाहींत अशी चार बाजूंची आकृति. विषमत्रिभुज न० ज्याच्या कोणत्याही दोन बाजू सारख्या लांबीच्या नाहींत असा त्रिकोण; ज्याच्या तिन्ही बाजू भिन्न भिन्न लांबीच्या आहेत असा त्रिकोण. विषमज्वर पु० जो अंगात भरण्याची किं० अंगातून निघण्याची वेळ नियमित नाहीं आणि जो सर्वदा सारखा असत नाहीं असा ताप. विषमपाचन न० १ विषमज्वरावर घेतात तो काढा. २ पदार्थांचा अपायकारक गुण नाहींसा करणारा कोणताही पदार्थ, औषध, इ०. विषमभाव पु० १ शत्रुत्वाची भावना. २ पक्षपात. ३ भिन्नपणा; सारखेपणाचा अभाव. विषमभोजन, विषमाशन न० १ नेहमींच्या वेळेपेक्षां अगोदर किं० नंतर जें जेवण तें. २ नेहेमीपेक्षा कमी किं० अधिक जें जेवण तें. विषमवासना स्त्री० वेश्या किं० परस्त्री यांच्याशीं संभोगसुखाची इच्छा. विषमसाहस न० अगदीं मूर्खपणाचें धाडस. विषमस्थ वि० संकटांत किं० अडचणींत पडलेला. विषमान्न न० नेहमींच्या अन्नाहून जें वेगळें तें अन्न,–जे अपायकारक होण्याचा संभव असतो.

विषय [ सं० ] पु० १ इंद्रियानें ग्राह्य किं० सेव्य जो पदार्थ तो; उ० गंध हा नासिकेचा विषय; उ० रुचि हा जिव्हेचा विषय. २ मनानें किं० बुद्धीनें जाणावयाचा पदार्थ; उ० गणित हा बुद्धीचा विषय. ३ डोळे, कान, जीभ, इ० जीं इंद्रियें त्याचे व्यापार किं० त्या व्यापारांपासून प्राप्त होणारें सुख. ४ कोणताही पदार्थ; वस्तुमात्र. ५ ध्येय; लक्ष्य. ६ टप्पा; आटोका; पल्ला. ७ ज्याचे अध्ययन, परीक्षण, विवेचन, इ० करावयाचें तो पदार्थ. ८ बाब; बाबत. ९ स्थान; आश्रय; देश; उ० शरीर ऐन उमेदींत असतां किं० शरीर जों रोगविषय झालें नाहीं तों पथ्यापथ्याचा विचार कोणी करीत नाहीं. १० अनेक गांवांचा समुच्चय; प्रांत; जनपद. ११ खातें; प्रकरण. १२ काम, क्रोध, मोह, मद, मत्सर, आणि लोभ, हे मनोविकार ज्या वस्तूंच्या संबंधानें मनांत उद्भवतात त्या वस्तु त्या त्या मनोविकारांचे विषय; उ० स्त्री हा कामवासनेचा विषय; दुष्ट माणूस हा क्रोधाचा विषय, इ०. १३ पैशाच्या रूपानें किंमत करावयाची असतां कोणताही पदार्थ किं० कोणतेही पदार्थ समुच्चयानें; उ० आमच्या उपाध्याला ह्या लग्नात रोख पंचवीस रुपये आणि शिवाय दहा रुपयांचा विषय पोंचला ( नारळ, सुपाऱ्या, पंचे, भांडीं, इ० ). १४ कर्तव्याचें क्षेत्र; उ० गुरें वळणें हा खलाशाचा विषय नव्हे; उ० गलबतें चालविणें हा गुराख्याचा विषय नव्हे. १५ उद्देश; हेतु; ध्येय; उ० तुम्ही हा जो पसारा ... ला आहे त्याचा विषय काय ? ❀ वि... न० कान, डोळे, जिव्हा, नासिका, त्वचा, ... शब्द, रूप, रस, वास, आणि स्पर्श, हे पांच विषय ते समुच्चयानें. विषयसुख न० १ ... यांच्या उपभोगाचें सुख. २ स्त्रीसंभोगाचें ... वि० १ विषयसुखाला लंपट. २ जो ... यनादि ) ज्या (श्रुति इ०) इंद्रियाचा ... याचा तो विषयी. हा थट्टेचा विषय नव्हे थट्टेवारी ही गोष्ट नेणें योग्य नव्हे; ह्या गोष्टीचा गंभीरपणें विचार केला

पाहिजे. **विषयीं** श० यो० अ० संबंधानें; बाबतींत; उ० मी अद्वैत मताविषयीं बोलत नाहीं. **विषयान्तर** न० प्रस्तुत विषय सोडून भलत्याच विषयासंबंधानें बोलणें किं० विवरण करणें.

**विषाण** [ सं० ] पु०, न० १ शिंग. २ हत्तीचा दांत. ३डुकराचा सुळा.

**विषाद** [ सं० ] पु० १ खेद; दुःख. २उत्साहभंग. ३ निराशा. ४ ग्लानि; गळाठा. ५ वीट; किळस.

**विषानैनी** [ सं० विष+नयन+ई (प्रत्यय) ] वि० तांबड्या डोळ्यांचा ( घोडा). हें घोड्याचें अशुभ लक्षण समजलें जातें.

**विषार** [ म० विष ] पु० १ विष. २विषाची बाधा. ३ पदार्थांतील अपायकारक गुण किं०अंश.

**विषारणें** [ म० विष ] अ० क्रि० १विषाच्या बाधेनें उपद्रव पावलेलें असणें. २ कोणत्याही कारणानें अपायकारक झालेलें असणें.

**विषालु, विषाळू** [ म०विष ] वि० विषारी.

**विषु** 'विषुव' चा अपभ्रंश.खालीं 'विषुव'पहा.

**विषुव** [ सं० ] न० दिवस आणि रात्र हीं एका वर्षांत दोन दिवस समान असतात. हे जे दोन दिवस ते प्रत्येक. ह्या दिवसांना 'विषुवदिन' असेंही म्हणतात.ह्या दोन दिवशीं सूर्य मेष राशींत आणि तुला राशींत प्रवेश करतो. ह्या प्रवेशांना 'मेषसंक्रान्ति ' आणि 'तुलासंक्रान्ति' म्हणतात. ॐ **विषुववृत्त** न० मागें ' याम्य ' मध्यें 'विषुववृत्त ' पहा.

**विषूचिका, विसूचिका** [ सं० ] स्त्री० १ पटकी ही बाधा,—जींत पेटके येतात. मर्गें ' अलसिका ' पहा. मागें ' विलंबिका ' पहा.

**वि[illegible], विष्कंभक** [ सं० ] पु० १ विघ्न.२ विस्तार. [illegible] गणित ) वर्तुळाचा व्यास. ४ ( **नाटक** ) दोन अंकांना जोडणारा प्रवेश. ५ ( **योग** ) आसनविशेष. ६ सत्तावीस योगांतील पहिला.

**विष्टप** [ सं० ] पु[illegible] ० लोक; भुवन. ॐ **त्रिविष्टप** न० स्वर्ग.

**विष्टंभ** [ सं० ] पुं० १ पक्कें बसविणें; खिळविणें. २ आधार. ३ प्रतिबंध; अडथळा.४खोळंबा. ५ मलमूत्रावरोध. ६ देह किं० गात्र बधिर होणें.

**विष्टर** [ सं० ] पु० १ आसन. २ दर्भासन. ॐ **विष्टरश्रवा** [ सं० विष्टरश्रवस् ] पु० विष्णु.

**विष्टि** [ सं० ] स्त्री० १ व्यापणें. २ फुकट काम; वेठ. ३ सातवें करण.

**विष्टा** [ सं० ] स्त्री० गुदद्वारें शरीराच्या बाहेर पडतो तो मळ.

**विष्णु** [ सं० ] पु० १ उत्पत्ति, स्थिति,आणि लय करणारे जे परमेश्वराचे तीन अवतार त्यांपैकीं स्थितीचा अधिकारी अवतार.२ अष्ट वसूंपैकीं एक. ३ आहवनीय अग्नि. ४ ( **ज्योतिष** ) श्रवण नक्षत्र. ६ द्वादश आदित्यांपैकीं एक. ॐ **विष्णुक्रान्ता** स्त्री० एक वनस्पतिविशेष. **विष्णुजन** पु० भक्त; संत. **विष्णुपद** न० १ आकाश. २ क्षीरसागर. ३ गया येथील विष्णूच्या पावलाची आकृति. **विष्णुपदी** स्त्री० १ गंगा नदी.२ द्वारका नगरी. **विष्णुप्रिया** स्त्री०१ तुळस. २ लक्ष्मी. **विष्णुरथ, विष्णुवाहन** पु० गरुड. **विष्णुवल्लभा** स्त्री० तुळस. **विष्णुबलि** पु०१सोळा संस्कारांपैकीं एक. २ संन्याशाच्या मरणानंतर तेराव्या दिवशीं करतात तो होम. **विष्णुवर्धन** पु० कोंकणांतील ब्राह्मणांची एक जाति किं० त्या जातीचा इसम. ' विष्णुवृद्ध ' असाही ह्या अर्थी शब्द आहे.**विष्णुवात** स्त्री० चवदा फेरे वळून बायका करतात तीं देवापुढें लावावयाची वात.

**विष्पंद** [ सं० ] पु०१गात्राचें ठणकणें. २दूध आणि तांदूळ यांचें एक पक्वान्न.

**विष्फार** [ सं० ] पु० धनुष्याचा टणत्कार.

**विष्फूर्जित** [सं०] न० वायूचा सोसाटा.

**विष्यंद** [ सं० ] पु० प्रवाह; पाझर.

**विसकटणें, विचकटणें, विसकणें** [सं०वि+शकल]स०क्रि०(कागद,चिरगुटें,पोथीचीं पानें,इ०) अव्यवस्थित करणें किं० त्यांची मांडणी मोडणें. अ० क्रि०अव्यवस्थित होणें.ॐ**विसकटा विसकट** स्त्री० अव्यवस्था; घालमेल; मांडणीचा भंग;गल्लत.

**विसकणें** अ०क्रि०(गाय, म्हैस,इ०प्राण्यांनीं) दूध देईनासें होणें.

**विसकळ** [ सं० वि+शकल ] वि० १ मोकळेपणानें म्ह० योग्य अंतरांवर स्थित किं० असलेली ( घरें, झाडें, माणसें, इ० ). २दूर दूर असलेलीं ( घरें, झाडें, इ० ). ३ अघळपघळ;

प्रशस्त ( घर, सभामंडप, इ० ). ४ स्पष्ट, बिनगुंतागुंतीचें ( भाषण, निबंध, इ० ). स्त्री० अव्यवस्था; गुंतागुंत; घोटाळा.

**विसकळणें** [ म० विसकळ ] अ० क्रि० विसकटणें; अव्यवस्थित होणें.

**विसकळीत** [ म० विसकळणें ] वि० ज्याची घडी, मांडणी, व्यवस्था, रचना, इ० बिघडली आहे किंवा भग्न झाली आहे अशी ( पोथी, व्यापार, कार्य, बायकांची वेणी, इ० ).

**विसका** [ म० विकसणें ] वि० दूध देईनाशी झालेली ( गाय, म्हैस, इ० ).

**विसंगत** [ सं० वि+संगति ] वि० पूर्वापर संगति किंवा मेळ ज्यांत नाहीं असें; विसंवादी; पूर्वक्रमाला धरून नसलेलें ( भाषण, लेख, इ० ).

**विसण** [ सं० वि+शमन ] न० फारच उष्ण पाणी बेताचें उष्ण करण्यासाठीं त्यांत घालतात तें थंड पाणी.

**विसंधित** [ सं० वि ( नाहीं ) + संधि ( सांधा ) ] वि० १ ज्याचे सांधे निखळले आहेत असा ( पदार्थ ). २ पूर्वापरसंबंधरहित ( भाषण, लेख, वर्तन ).

**विसनखी** [म०वीस+नख+ई(प्रत्यय)]स्त्री० देहविक्रय करणारी स्त्री; वेश्या. ॐ **विसनखीचा** वि० वेश्यासंभोगानें झालेला ( गरमी ) किंवा झालेला ( उपद्रव ). **विसनख्या** वि० वीस आहेत नखें ज्याला अशा एका जातीचा ( कुत्रा इ० प्राणी ).

**विसप, विसब** [ सं० विसर्प ] पु० मागें 'इसप,' 'इसब' अर्थ १ पहा.

**विसपगोल, विसबगोल** [ फा० इस्पूगोल् ] पु० एक औषधी बीजविशेष. मागें ' इसपगोल ' पहा.

**विसंबणें, विसमणें**[ सं०वि+श्रम् ]अ० क्रि० १रिकामें बसणें;गमणें;निश्चिंतपणें राहणें.२दुसऱ्यावर भिस्त ठेवून असणें; उ० मी राम्यावर विसंबलों पण त्यानें मला फसविलें. स० क्रि० ( ज्याची काळजी घेणें जरूर आहे तें ) दृष्टीआड करणें, किंवा दुसऱ्याच्या हवालीं करणें,किंवात्याचे बद्दल बेफिकीर राहणें; उ० मी क्षणमात्र माझ्या मुलाला विसंबत नाहीं.

**विसर** [म० विसरणें;सं० वि+स्मृ]पु० १विसरलेपणा; विसरलेपणाची स्थिति;विस्मरण २ कांहीं गोष्ट सदैव डोळ्यापुढें नसल्यामुळें तिच्या संबंधानें स्मृतींत जो मंदपणा येतो तो किं०स्मृतींत येते ती अस्पष्टपणाची भासमानता. ॐ **एकाद्या गोष्टीचा विसर पडणें** ती विसरली जाणें; तिची तीव्रता किं०स्पष्टता मंद किं०कमी होणें. **विसराळ, विसराळू, विसरभोळा** वि०कोणतीही गोष्ट ज्याच्या लक्ष्यांत नीट किं० पूर्णपणें रहात नाहीं असा. **विसरभोळ्यां** क्रि० वि० विसराळूपणानें. **विसरसांड** स्त्री० कोणेकाच्या अपराधाकडे केलेलें दुर्लक्ष्य किं० केलेला काणाडोळा.

**विसरणें** [ सं० वि+स्मृ ] स० क्रि० १ स्मरणांतून घालविणें किं० लोपविणें. २ ( पदार्थविशेषाकडे ) दुर्लक्ष्य करणें किं० त्याच्या संबंधानें बेफिकीर राहणें.ॐ **ही गोष्ट करावयाला विसरूं नको** विसरूं नको म्ह०चुकूं नको. **विसरत बोलणें** पूर्व संगति सोडून बोलणें; पूर्वी जें बोलले त्याशीं विसंगत असें कांहीं बोलणें.

**विसर्ग** [ सं० ] पु० १ पाठविणें; पाठवून देणें. २ बाण, धोंडा, इ० फेकणें किं० सोडणें. ३ त्याग; परित्याग. ४ दान. ५ मुक्त करणें; मुक्तता. ६ मोक्ष. ७ गुदद्वारें मलविसर्जन. ८शब्द लिहितांना उभ्या दोन टिंबांनीं जो उच्चार दर्शविला जातो तो;उ०कः पदार्थ,निःसंशय,छिः, इ०.

**विसर्जणें, विसर्जिणें** [ सं० वि+सृज् ]स० क्रि० १ सोडणें; सोडून देणें. २ बाहेर टाकणें. ३ दान देणें. ३ ( पदार्थावरचा आपला हक्क किं० ताबा ) सोडणें.

**विसर्जन** [ सं० ] न० १ देणें; दान.२त्याग; सोडणें. ३ सभा बरखास्त करणें. ४ निरोप देणें;समाप्त करणें; बंद पाडणें.ॐ **गणपति, देवी, इ०चें विसर्जन** न० त्यांची यथाविधि किं० यथाशास्त्र पाठवणी किं० बोळवणी करणें.

**विसर्प** [ सं० ] पु० १ सरपटत जाणें. २ पसरणें; प्रसार. ३ जखम, खरूज, नायटा, इ० चें चरत जाणें म्ह० अधिक अधिक त्वचा विकृत करीत जाणें.४ नायटा, इसब,गजकर्ण,इ० त्वग्रोग.

**विसर्प** पु०, **विसर्पिका** स्त्री०[सं०] नायटा, इसब, इ० त्वग्रोग.

**विसवटा** पु० पुढें ' विसावा ' पहा.

**विसवणें** [ म० विसावा ] अ० क्रि० १ थांबणें; खळणें. २ विश्रांति घेणें. ३ (हात, पाय, कंठ, बोटें, इ०एकादें गात्र किं० इंद्रिय) बरेच दिवस कामास न लाविल्याकारणानें त्याची रुफाई किं० कुशलता नष्ट होणें;उ०बरेच दिवस गाण्याचा प्रसंग न आल्याकारणानें माझा घसा विसवला आहे. ३ आळसावणें; आळसटणें. ४ ( भिंत, इमारत, इ० ) खचणें.

**विसवा** [ म० वीस ] पु० १ रुपयाचा विसावा भाग. २ विशोपक. मागें ' विंशोपक ' पहा.

**विसवाट** न० घराभोंवतालचें कुंपण.

**विसंवाद** [ सं० ] पु० परस्परविरोध; भिन्नता; मेळाचा अभाव. ॐ **विसंवादी** वि० १ मेळ नसलेलें; असंबद्ध; न जुळणारें. २ खोटें.

**विसवाविसवी** क्रि० वि० आळीपाळीनें; बारगीपारगीनें. मागें ' बारगीपारगी ' पहा.

**विसाविशीत** वि० ताठर नव्हे असें; मृदु; पिशपिशीत.

**विसळणें, विसुळणें**[सं० वि+क्षल्, क्षाल्]स० क्रि०(पात्रांत किं०पात्रावर)पाणी घालून पात्राला चिकटलेल्या गवताच्या काड्या, माती, राख, इ० धुऊन तें स्वच्छ करणें. ॐ **विसळवणी** न० भांडीं ज्यांत विसळलीं आहेत असें पाणी; भांडी विसळावयास घ्यावयाचें पाणी.

**विसा** [ म० वीस ] स्त्री० वीस वस्तूंचा समुच्चय.

**विसाड** न० १ नांगराचा दांडा. २ झाडाचा कांहीं बुंधा शाबूत ठेवून वरचा तोडून टाकून खालच्या बुंधावर त्याच जातीच्या झाडाचीं कलमें लावून नवीं झाडें करतात तो प्रत्येक. मागें ' इसाड, ' ' इसाडा ' पहा

**विसाण** न० मागें ' विसण ' पहा.

**विसाणणें** [म० विसण, विसाण] स० क्रि०(अति कढत पाणी ) थंड पाणी घालून त्याचें कढत करून घेणें. [ पहा.

**विसाप, विसाब** वर ' विसप, ' ' विसब '

**विसार, विसारा** पु० मागें ' इसार, ' ' इसारा ' पहा.

**विसावण** न० मागें 'विसाण,' 'विसण' पहा.

**विसावणें** [ म० ] अ० क्रि० थांबणें. मागें ' विसवणें ' पहा.

**विसावा, विसांवा** [ सं० वि+श्रम् ] पु० १ विश्रांति; काम बंद ठेवून पुन्हां ताजेतवानें होणें (घेणें).२मनाला विश्रांति किं०हुशारी वाटविणारें कांहीं काम किं० करमणुकीचा विषय किं० पदार्थ. [ पहा.

**विसावणें** स० क्रि० मागें ' विसाणणें '

**विसाळ, विसाळा** [ सं० ईर्षा ] पु० ईर्षा; ईर्षेचा उद्रेक. मागें ' इसाळ, ' ' इसाळा ' पहा.

**विसुळणें, विसुळवणी** मागें ' विसळणें, ' ' विसळवणी ' पहा.

**विसूत्र** [ सं० वि+सूत्र ] वि० १ सूत्रांतून गळालेला ( मणि, फूल, इ० ). २तुटलेला ( हार, कंठा, माळ, इ० ). ३ शिस्तीला किं० नियमाला सोडून असलेलें(भाषण, वर्तन, इ०).

**विसृत** [ सं० ] वि० १ पसरलेलें. २ विस्तीर्ण.

**विस्कटणें** इ० मागें ' विसकटणें ' इ० पहा.

**विस्तर** [ सं० ] पु० १ फैलाव. २ विस्तार. ३ बोलण्यांत किं० लिहिण्यांत फाजील तपशील. ॐ **सविस्तर** वि० तपशीलासह असलेली किं० सांगितलेली ( हकीगत ). क्रि० वि० तपशील देऊन; सांगोपांग रीतीनें.

**विस्तरणें, विस्तारणें**[सं० वि+स्तृ]स० क्रि० १ ( कांहीं गोष्ट, कथा, इ० ) तपशीलवार सांगणें किं० निवेदिणें. २ तपशील देऊन ( हकीगत ) लांबविणें.

**विस्तव** पु० अग्नि. ॐ त्या दोघांमधून विस्तव जात नाहीं त्यांचें एकमेकांशीं हाडवैर आहे.

**विस्तवणें** [ म० विस्तव ] स० क्रि० १ जाळणें. २ ( दोन माणसांत ) कलह पेटविणें.

**विस्तार** [ सं० ] पु० १ वाढ; फैलाव. २ विस्तीर्णपणा. ३ लांबी, रुंदी, आणि उंची ( किं० खोली ). हीं जीं पदार्थांचीं तीन परिमाणें, त्यांपैकीं दुसरें म्ह० रुंदी हें परिमाण. ४ तपशील. ५ ( गणित ) व्यास. ६ वृक्षाची शाखारूप वाढ. ७ ग्रंथ इ० मध्यें टीका, भाष्य, इ० रूप भरती.

**विस्तारणें** [म० विस्तार] स० क्रि० विस्तृत करणें; वाढविणें. मागें ' विस्तरणें ' पहा.

**विस्तारित** [ सं० ] वि० १ वाढविलेलें. २ सांगोपांग निरूपिलेलें किं० सांगितलेलें.

**विस्तारी** [ म० विस्तार ] स्त्री० पानांस पानें चोयींनें टांचून केलेलें ताट; पत्रावळ.

**विस्तावा** मागें ' इस्तावा ' पहा.

**विस्तू, विस्तूव, विस्तो, विस्तोव, विस्तेव** पु० विस्तव. हीं सर्व रूपें अशिक्षितांत रूढ आहेत.

**विस्तृत** [ सं० ] वि० १ पसरलेलें; विस्तीर्ण. २ अघळपघळ; प्रशस्त ( घर, जागा ). ३ रुंद.

**विस्पष्ट** [ सं० ] वि० स्पष्ट उच्चारलेलें.

**विस्फार** [ सं० ] पु० १ धनुष्याचा टणत्कार. २ कंप; कांपणें.

**विस्फारित** [ सं० ] वि० १ विचकलेलें, वासलेलें ( तोंड, डोळे, जखम, इ० ). २ कांपणारें; हालणारें. ३ स्पष्ट. ४ विस्तीर्ण.

**विस्फूर्जथु** [ सं० ] पु० १ गर्जना; कडकडाट २ उसळणें; खळबळ. ३ क्षोभ; उद्रेक.

**विस्फोट** [ सं० ] पु० १ फोड. २ देवी. ३ गोवर. ४ कांजिण्या. ५ फुटणें.

**विस्मय** [ सं० ] पु० आश्चर्य.

**विस्मरण** न०, **विस्मृति** स्त्री० [सं०] विसरणें; विसर ( होणें, पडणें ).

**विस्मापन, विस्मायन** [सं०] वि० आश्चर्यकारक. न० १ नजरबंदीचें कृत्य; गारुड. २ गंधर्वनगर.

**विस्मित** [ सं० ] वि० आश्चर्य पावलेला; आश्चर्यचकित.

**विस्मृत** [ सं० ] वि० विसरलेलें.

**विस्मृति** [ सं० ] स्त्री० विसरण्याची क्रिया; विसर; विसराळूपणा; आठवण न होणें. ॐ **विस्मृतीखालीं पडणें** १ पूर्णपणें पारिचित होणें; अंगवळणी पडणें. २ विसरलें जाणें.

**विस्र** [ सं० ] वि० कच्चया मांसाचा वास येत असलेलें. ॐ **विस्रगंधी** वि० कुजकेपणाचा वास असलेलें.

**विस्रब्ध** [ सं० ] वि० १ विश्वासयुक्त. २ निःशंक; निर्भय.

**विस्रम्भ** [ सं० ] पु० १ विश्वास; भरंवसा. २ खातरी; प्रत्यय. ३ लटकें भांडण.

**विस्रंस** [ सं० ] पु० १ पडणें; गळणें. २ क्षीणता.

**विस्रंसन** [ सं० ] न० १ पडणें. २ पाझरणें. ३ ( वैद्यक ) रेचक. [अपसूर.

**विस्वर** [ सं० ] वि० बेसूर; बदसूर. पु०

**विहग, विहंग** [ सं० ] वि० आकाशांत संचरणारा. पु० पक्षी. ॐ **विहगराज, विहंगराज** पु० गरुड. **विहंगदृष्टि** स्त्री० खालीं ' विहंगम ' मध्यें ' विहंगमदृष्टि ' पहा.

**विहंगम** [ सं० ] वि० आकाशांत संचरणारा. पु० १ पक्षी. २ सूर्य. ॐ **विहंगदृष्टि, विहंगमदृष्टि** स्त्री० तपशिलांत न शिरतां ठळक ठळक गोष्टी पाहाण्यासाठीं फेकलेली दृष्टि किं० नजर; पदार्थाचा स्थूल देखावा मात्र अवलोकन करावयासाठीं टाकलेली नजर. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' हें पुस्तक लेखांक १२८४ पहा. **विहंगममार्ग** पु० १ ( योग ) समाधि त्वरित लावण्याचा सरणी. २ त्वरित वैराग्य स्वीकारण्याचा मार्ग. ३ कोणतेंही कार्य त्वरित गतीनें उरकून घेण्याचा मार्ग.

**विहत** [ सं० ] पु० जैनांचें देऊळ. वि० १ ठार मारलेला. २ नष्ट केलेला; बंद पाडलेला.

**विहनन** [ सं० ] न० १ कापूस पिंजण्याची धनुकली. २ विघ्न; हरकत. ३ वध; हिंसा.

**विहर** [ सं० ] पु० १ दूर घेऊन जाणें. २ क्रीडा; लीला.

**विहरण** [ सं० ] न० १ अपहार; घेऊन जाणें. २ सहल करणें. ३ विहार; क्रीडा.

**विहरणें, विहारणें** [ सं० वि + हृ ] अ० क्रि० १ भटकणें. २ खेळणें; क्रीडा करणें.

**विहसन, विहसित** न०, **विहास** पु० [ सं० ] मध्यम हास्य.

**विहस्त** [ सं० ] वि० १ ज्याला हात नाहीं असा; थोटा. २ गोंधळलेला; व्याकुळ. ३ असमर्थ. ४ विव्हळ.

**विहार** [ सं० ] पु० १ अपहार. २ हिंडणें; सहल करणें; भटकणें. ३ क्रीडा; खेळ. ४ क्रीडावन. ५ देऊळ. ६ बौद्धांचा मठ. ॐ **विहारी** वि० १ खेळण्याकडे कल असलेला; रंगेल. २ विषयसुखांत रमणारा.

**विहित** [सं०] वि० १ केलेलें. २ निर्माण केलेलें. ३ ठेविलेलें. ४ ठरविलेलें. ५ योग्य; शास्त्रोक्त. ६ अनुरूप. ७ क्रमप्राप्त.

**विहिरा** [ सं० विहीर ] पु० नदीच्या वाळवंटा इ० मध्यें पाण्यासाठीं खणलेला खळगा.

**विहीण** [ सं० विवाह; म० विवाह; म० व्याही ] स्त्री० आपल्या मुलाची किं० मुलीची जी सासू ती. खालीं ' व्याही ' पहा.

**विहीत** स्त्री० ' वीत 'चा अपभ्रंश. खालीं ' वीत ' स्त्री० पहा.

**विहीन** [ सं० ] वि० रहित, शून्य; उ० ज्ञानानें विहीन ते पशुसमान होत.

**विहीर** [ हिं० बीर् ] स्त्री० पाण्यासाठीं जमीनींत खूप खोल खणलेला आणि सर्व बाजूंनीं दगड, विटा, चुना, इ०नीं बांधून काढलेला खळगा; आड; बाव. ꣸ **विहीर हुंडा** पु० विहिरीवर किं० विहिरीच्या पाण्यानें पिकविलेल्या बागा, शेतें, मळे, इ० वर सरकारनें बसविलेला कर.

**विहू, विभू** [ सं० व्यूह ] पु० १ सैन्याच्या रचनेचा एक प्रकार. २ समुदाय. ३ कांहीं कार्यासाठीं केलेली योजना किं० रचिलेला बेत. ४ मनोरथ; ध्येय; उद्दिष्ट. ५ एकाद्याला गोत्यांत घालण्यासाठीं केलेली मसलत (रचणें, उभारणें).

**विह्वळ, विव्हळ**[सं० विह्वल ]वि० १ व्याकुळ; दुःखानें जर्जर किं० कासावीस झालेला. २ कोणत्याही कारणानें अस्वस्थ किं० अशांत झालेला. ३ गोंधळलेला. ꣸ **विव्हळगौर** स्त्री० सदा पिरपिरणारी किं० चरफडणारी मुलगी किं० स्त्री.

**विळखा, विळका** पु० १ दोन बाहु ताणून आणि पसरून मनुष्य, वृक्ष, इ० च्या सभोंवतीं घातलेला वेढा; मिठी. २ सर्पानें मनुष्याच्या तंगडी, बाहु, इ० च्या भोंवतीं घातलेला वेढा किं० घातलेले वेढे ( घालणें ).

**विळचण** मागें ' विसण ' पहा.

**विळवणें** [ म० विव्हळ] अ० क्रि० आजार, दुःख, वेदना, किं० निराशा, इ० मुळें कण्हणें.

**विळाविणें, वेळणें, वेळाविणें** स० क्रि० १ दांडगाईनें किं० जोरानें ( पदार्थ) हालविणें किं० हासडणें. २ इकडून तिकडे किं० तिकडून इकडे ( मान, डोकें ) पसंती किं० नापसंती दाखविण्यासाठीं कलविणें किं० वळविणें. ३ (हात, पाय, इ० ) लोंबत सोडणें.

**विळाविणें** स० क्रि० माणसाच्या डोक्यावर किं० जनावरांच्या पाठीवर किं० घडवंची इ० आधारावर ( पोतें इ० ) ठेवणें किं० चढविणें.

**विळविळणें** अ० क्रि० सर्प, ढेकूण, पिसवा, इ० नीं माणूस, जनावराचें शरीर, इ० वर वेगानें सरपटत चालणें. [ अस.

**विळाविळीत** वि० ज्यांत ताठरपणा नाहीं

**विळा, विळाखिळा, विळी** मागें ' इळा, ' ' इळाखिळा, ' ' इळी ' पहा.

**विक्षिप्त** [ सं० ] वि० १ टाकलेलें; टाकून दिलेलें. २ अमान्य केलेलें; नाकारलेलें. ३ विसकटलेलें. ४ लोकरीती सोडून वर्तन करणारा; छांदिष्ट; तऱ्हेवाईक; लहरी ( माणूस, वर्तन ).

**विक्षेप** [ सं० ] पु० १ उडविणें; पसरणें. २ फेकणें; उधळून लावणें. ३ घोटाळा; व्यग्रता. ४ मनाची एकाग्रता खंडित करणारी कोणतीही गोष्ट. ५ भ्रमिष्टपणा. ६ ( ज्योतिष ) ग्रहाचें याम्योत्तर अंतर. ꣸ **विक्षेपशक्ति** स्त्री० (वेदान्त) मायाशक्तिविशेष. [पंडित.

**विज्ञ** [ सं० ] वि० १ तज्ञ, प्रवीण. २ ज्ञानी;

**विज्ञप्त** [ सं० ] वि० कळविलेलें; विज्ञापित. न० विनंती.

**विज्ञप्ति** [ सं० ] स्त्री० १ विनंति. २ उपदेश.

**विज्ञात** [ सं० ] वि० १ ठाऊक असलेलें; जाणलेलें. २ प्रख्यात; सर्वांस ठाऊक असलेलें.

**विज्ञाता**[सं० विज्ञातृ] वि० जाणणारा; पंडित.

**विज्ञान** [ सं० ] न० १ ज्ञान. २ नैपुण्य; प्रावीण्य; विशेष ज्ञान. ३ शिल्प, कला, इ० संबंधाचें ज्ञान किं० माहिती. ४ अतींद्रिय विषयाचें ज्ञान. ५ ज्ञानेंद्रिय. ६ बुद्धि. ७ बातमी; माहिती. ८ ( वेदान्त )आत्मैक्यज्ञान. ꣸ **विज्ञानपाद** पु० व्यास ऋषि. **विज्ञानमय** वि० बुद्धि उपाधि असलेला. पु० आत्म्याच्या पंच कोशांपैकीं चवथा. मागें ' आनंद ' मध्यें ' आनंदमय कोश ' पहा. **विज्ञानमातृक** पु० गौतमबुद्ध.

**विज्ञापक** [ सं० ] पु० गुरु; शिक्षक.

**विज्ञापणें, विज्ञापिणें** [सं० वि+ज्ञा]स० क्रि० नम्रपणें (कांहीं गोष्ट) वरिष्ठाला सांगणें.

**विज्ञापन** न०, **विज्ञापना** स्त्री० [ सं० ] १ विनंती २ उपदेश ३ नम्रपणें वरिष्ठ,गुरु, राजा, इ० ना कांहीं गोष्ट किं० हकीगत वि० तकरार कळविणें. ४ वडील माणसांस पत्र लिहितांना मजकुराला सुरवात करतांना 'विज्ञापना' हा शब्द घालतात; उ० विज्ञापना ऐसी जे, विज्ञापना विशेष.

**विज्ञापित** [ सं० ] वि० १ नम्रपणें ज्यास कांहीं गोष्ट किं० हकीगत कळविली आहे असा ( मनुष्य ). २ नम्रपणें वरिष्ठास कळविलेली ( हकीगत ).

**विज्ञाप्य** [ सं० ] वि० १ ज्यास नम्रपणें कांहीं गोष्ट कळवावयाची आहे तो ( राजा, गुरु, वरिष्ठ, इ० ). २ वरिष्ठ,राजा,गुरु,इ०ना जें नम्रपणें कळवावयाचें तें.

**वीख** मागें ' विष ' पहा.

**वीचि,वीची** [ सं० ] स्त्री० पाण्याची लाट; तरंग. ॐ **वीचिमाली** [ सं०वीचिमालिन् ] पु० समुद्र.

**वीज** [ सं० विद्युत् ] स्त्री० १ रासायनिक द्रव्यांच्या संयोगानें किं०घर्षणानें उत्पन्न होणारी एक शक्ति. २ ह्या शक्तीच्या उत्पत्तीच्या वेळीं उत्पन्न होतो तो प्रकाश किं० तो ध्वनि. ॐ **वीज कडाडणें** आकाशांत गर्जना होऊन प्रकाशाची चमक लकाकणें. **वीजविहिरा** पु० डोंगरावर वीज पडून उत्पन्न होतें तें पाण्याचें टांकें.

**वीट** [ म० विटणें ] पु० १ किळस; संत; शिसारी; अप्रीति; कंटाळा ( येणें ). २ नासाडी. ३ फजीती.

**वीट** [ सं० इष्टका, इष्टिका ] स्त्री० भिंत इ० बांधावयासाठीं जे मातीचे लांबोडे चतुष्कोण ठोकळे योजतात ते प्रत्येक.मागें'इंट'पहा.**वीटबंदी** स्त्री० मागें ' इट ' मध्यें ' इंटबंदी ' पहा.

**वीटिका** स्त्री० मागें ' विडा ' पहा.

**वीड** [ म० विडी ] पु०, न० १ मणगटाच्या घेराचे माप ( पाटल्या, बांगड्या, गोठ,इ०साठीं घेतात तें ). २ कोणत्याही कारणासाठीं घेतलेलें पदार्थाच्या घेराचें माप.

**वीड** मागें ' ईड ' न०,स्त्री० पहा.

**वीण** [म० विणें] स्त्री० १ पशु, पक्षी, क्षुद्र जंतु, यांचा अपत्यें समुच्चयानें. २ गाय, म्हैस, ह्यांचें विणें म्ह० अपत्यें प्रसवणें किं० ह्या प्रसवण्याचा काळ किं० प्रसवण्याची खेप.

**वीण** [ म० विणणें ] स्त्री० वस्त्र, चटई, तट्ट्या, इ० विणण्याची क्रिया किं० तऱ्हा.

**वीण** [ सं० विना ] श० यो० अ० शिवाय; खेरीज.

**वीणा** [ सं० ] पु० एक तंतुवाद्य. ॐ **वीणाकाव्य** न० वीणेच्या सुराबरोबर गावयाचें लहान काव्य; रसानें परिप्लुत असें लहान पद.

**वीत** [ सं० वितस्ति ] स्त्री० हाताचा पंजा ताणून पसरला असतां अंगठ्याच्या टोकापासून करंगळीच्या टोकापर्यंत जें अंतर तें ॐ **आपल्या पुरती वीत काढणें** किं० **आपल्या भोंवतीं वीत काढणें** १ सर्वांवर कोसळलेलें जें संकट त्यांतून इतरांची पर्वा न करतां आपली कशी तरी सुटका करून घेणें. २ आप्पलपोटेपणानें आपला स्वार्थ साधणें. **वीत काढणें** शेतकामासाठीं जमीन भाजावयाची असतां इतर भागांकडे आग न चरत जावी म्हणून सभोंवार वीतभर पट्टा गवत उपटून वेगळा करणें.

**वीत** [ म० विणें ] न० १ गायी, म्हशी, इ० चें विणें किं० विण्याची खेप २मांजरी,कुतरी, शेळी,इ०चें अपत्यें प्रसवणें किं०एका खेपेचीं अपत्यें समुच्चयानें.

**वीत** [ सं० ] वि० १ गेलेला; दूर झालेला; लोपलेला;नष्ट; उ० वीतचिंत म्ह० निश्चिंत; वीतशोक म्ह० शोकरहित; वीतकल्मष म्ह०निष्पाप; वीतराग किं० वीतरागी म्ह० विरक्त, २ धारण केलेला. ॐ **वीतसूत्र** न० जानवें.

**वीथ** [ सं० वितस्ति; म० वीत ] स्त्री०मागें ' वीत ' स्त्री० पहा.

**वीथि, वीथी** [सं०] स्त्री०१रस्ता.२गांवांतील अरुंद बोळ; विदी. ३ ओळ; पंक्ति. ४ जिना; पायऱ्या. ५ बाजार; दुकानांची पेठ. ६ एक प्रकारचें नाटक.

**वीध्र** [ सं०विधि ] पु०लग्नानंतर पहिल्या वर्षी नवऱ्यामुलाकडून नवऱ्यामुलीकडे किं० तिच्या-

कढून त्याच्याकडे ज्या हौसेच्या देणग्या दिल्या जातात त्या; आषाढपाटी, श्रावणपाटी, गांठ्या, आंबे, इ०.

**वीप्सा** [ सं० ] **स्त्री०** १ व्याप्ति; साकल्य; सर्वत्र पसार. २ पुनरुक्ति; आवृत्ति.

**वीर** [ सं० ] **वि०** १ शूर. २ बलिष्ठ. ३श्रेष्ठ. **पु०** १ योद्धा. २ ( **साहित्य** ) वीर रस.३ज्याचा कोणी पूर्वज युद्धांत मरण पावलेला असतो तो फाल्गुन वद्य प्रतिपदेस शिपायाच्या वेषांत आणि नागवी तरवार हातांत घेऊन देवाच्या दर्शनास समारंभपूर्वक जातो तो ( त्या प्रसंगीच ' वीर ' याचा असा प्रयोग होतो ). ४ एकाद्या कुळांतील किं०वंशांतील किं०जातींतील अत्यंत नामांकित जो पुरुष तो; उ० रघुवीर, यदुवीर, कुरुवीर, इ०. ५कोणत्याही कामांत धिटाईनें जो पुढाकार घेतो तो; उ० वीर वामनराव. ꣸ **वीरकंकण न०** वीरत्वाचा अभिमान बाळगणारे लोक आकारविशेषाचें कडें हातांत घालतात तें. **वीरकन्या स्त्री०**१वीराची कन्या.२शूर मुलगी. **वीरभार्या, वीरपत्नी स्त्री०**वीराची बायको. **वीरगर्जना स्त्री०** युद्धभूमीवर योद्धे ज्या गर्जना करतात त्या प्रत्येक. २योद्ध्यांना उत्तेजन देण्यासाठीं त्यांच्या त्यांच्या पक्षांचे लोक करतात त्या गर्जना प्रत्येक. **वीरगुंठी स्त्री०**योद्धे किं०मल्ल डोक्यावरील केशांची मारतात ती गांठ किं० त्या केशाचा झुबका. **वीरघोषणा स्त्री०** १ वीरांना बोलावण्यासाठीं केलेली गर्जना किं० मारलेली हाक. २ वीरानें वीराला केलेलें आव्हान. **वीरजननी, वीरसू, वीरमाता स्त्री०** १वीर प्रसवणारी स्त्री.२ वीराची माता **वीरजयंतिका, वीरजयंती स्त्री०** १ युद्ध. २ युद्धांतील नृत्य.३ युद्धांत जय मिळवून आलेले लोक करतात तो उत्सव. **वीरपट्ट पु०** वीराच्या कपाळावर संमानार्थ बांधतात तो मुकुट. **वीरपाण, वीरपान न०** १ युद्धाच्या श्रमाच्या परिहारार्थ केलेलें पान. २ युद्धास जातांना योद्धे करतात तें पान. **वीरपीर पु०** दांडगेश्वर; धटिंगण ( निंदेंत ). **वीरभगिनी स्त्री०** १ शूराची बहीण. २ शूर स्त्री. **वीरभद्र पु०** १ एक शिवगणविशेष. २ यज्ञाश्व. ३ वीरश्रेष्ठ. **वीररस पु०** काव्यांतील जे शृंगार, वीर, इ० नऊ रसत्यांपैकीं एक.देशासाठीं,धर्मासाठीं, समाजासाठीं, व्यक्तीसाठीं,परंपरागत संस्कृतीसाठीं, किं०सत्यासाठीं मनाच्या मोठेपणानें प्रेरित होऊन केलेले पराक्रम, सोशिलेले कष्ट,भोगलेल्या यातना, किं० अंगीकारलेला आत्मयज्ञ आणि स्वार्थत्याग,इ०च्या वर्णनात वीररस असतो. वीररसाचे अनेक प्रकार आहेत.शस्त्रास्त्रांनीं समरांगणावर लढाई करतांना जो उत्साह असतो त्याला'युद्धवीर'म्हणतात.ईश्वराविषयीं भक्ति जर उत्साहाला कारण असली तर तो'भक्तिवीर.'याच सरणीनें दानवीर,'धर्मवीर,' दयावीर,इ०रस समजावे. **वीरवैष्णव पु०**वैष्णवाचे आचार कडकडीत पाळणारांचा पंथ किं० त्या पंथाचा इसम. **वीरश्री स्त्री०** शौर्याचें वारें;उत्कट उत्साह. **वीरासन न०** १ डावा गुडघा मोडून आणि उजवा उभा करून बसण्याचा प्रकार. २ ( **योग** ) आसनविशेष. **वीराईसन न०**१पहारा. २ युद्धभूमीवरील अतिभयंकर भाग. **वीरमुद्रिका स्त्री०** हाताच्या मधल्या बोटांत घालावयाची अंगठी. **वीरशय्या स्त्री०**१वीरासन.२ तपस्व्याचें आसनविशेष.

**वीर्य** [ सं० ] **न०** १ पराक्रम; अत्युत्साह. २ शक्ति. ३ प्रभाव. ४ पुरुषाचा धातु. ꣸ **वीर्यवान्, वीर्यशाली वि०** पराक्रमी;शूर.

**वीस** [ सं० ] **वि०** दहाच्या दुपटीइतका. ꣸**वीसनखीचा,वीसनख्या** मागें 'विसनखीचा' इ० पहा.

**वीळ** [ सं० वेला ] **स्त्री०** १ समुद्र, खाडी, यांस येते ती भरती. २ वेळ (अशिक्षितात रूढ).

**वीक्षण** [सं०] **न०** १ पाहाणें. २ डोळा.

**वीक्षणें,वीक्षिण**[ सं० वि+ईक्ष् ] **स०क्रि०** पाहाणें.

**वीक्षित** [ सं० ] **वि०** पाहिलेलें; अवलोकिलेलें. **न०** नजर; दृष्टि.

**वृक** [ सं० ] **पु०** १ लांडगा. २ कोल्हा. ꣸ **वृकोदर पु०** भीम,–पांच पांडवांपैकी मधला.

**वृंत** [ सं० ] **न०** १ फुलाचें किं० पानाचें देठ. २ स्तनाचे अग्र.

**वृंताक** [ सं० ] **पु०** वांगें. **वृंताकी स्त्री०** वांग्याचें झाड.

**वृत्त** [ सं० ] **वि०** १ घडलेलें; झालेलें. २

मेलेला. ३ वाटोळें; वर्तुळाकार. न० १ पूर्वीची गोष्ट. २ बातमी; हकीगत; खबर; घडलेली गोष्ट. ३ वर्तन; वर्तनाची सरणी. ४ शील. ५ वर्तुळ. ६ मंदाक्रान्ता, वसंततिलका, इ० पद्य; छंद. ७ इतिहास. ८ भूतकाळ. ९ ( मराठींत ) कोणे-काचा धंदा किं० चरितार्थाचें साधन. ॐ वृत्तान्त पु० १ हकीगत. २ इतिहास. ३ बातमी. ४ प्रकरण; विषय. **वृत्तस्थ** वि० सदाचार पाळणारा.

**वृत्ति** [ सं० ] स्त्री० १ असणें; अस्तित्व. २ राहाणें; वास्तव्य. ३ वर्तन; वागणूक. ४ व्यव-साय; धंदा. ५ जीवनयात्रा; निर्वाह; चरितार्थाचें साधन,—यजमानाच्या घरीं किं० क्षेत्राचें ठिकाणीं जोशीपणा किं० उपाध्येपणा इ०. ६ व्यवहार. ७ वेतन; मजुरी. ८ शब्दाची अर्थबोधक शक्ति. वाचकता, व्यंजकता, लक्षणा, इ० रूप जे शब्दानें अर्थ बोधवावयाचें अनेक प्रकार ते प्रत्येक. ९ व्याख्यान; विवरण; स्पष्टीकरण. १० चक्राकार गति. ११ ( गणित ) परिघ. १२ मनाची स्थिति. १३ ( व्याकरण ) साधित शब्द ( कृदंत, सामासिक, तद्धितान्त, इ० ). ॐ **वृत्तिच्छेद** वृत्तीचा विचका पु०, **वृत्तिच्छेदन** न० वडिलो-पार्जित जें चरितार्थाचें साधन त्याचें राजकोप, दुर्दैव, इ० मुळें बंद होणें किं० बंद पडणें. **वृत्ति-मंत, वृत्तिमान्, वृत्तिवंत, वृत्तिवान्** पु० १ ज्याला कांहीं चरितार्थाचें साधन आहे तो. २ क्षेत्राच्या ठिकाणीं येणारे यात्रेकरू हे ज्याचे ठर-लेले यजमान आहेत तो. **वृत्त्यनुप्रास** पु० अनु-प्रासाची एक तऱ्हा. या अनुप्रासाचे तीन प्रकार आहेत. (१) एकच व्यंजन दोन वेळां किं० अधिक वेळां येणें; ( २ ) अनेक व्यंजनें दोहोंहून अधिक वेळां त्याच क्रमानें येणें; (३) अनेक व्यंजनें दोनच वेळां कोणत्याही क्रमानें येणें. या प्रकारांची उदाहरणें इ० आमचे ‘ अर्थालंकारांचें निरूपण ’ या पुस्तकांत पहा. **वृत्त्यंशी** पु० वाडिलोपार्जित वृत्तीचे जे भागीदार ते प्रत्येक.

**वृत्र** [ सं० ] पु० एक दैत्यविशेष. ॐ **वृत्रारि** पु० इंद्र.

**वृथा** [ सं० ] क्रि० वि० १ व्यर्थ; निष्कारण; उगीच्या उगीच २ चुकीनें; विधिविरुद्ध. ३ मूर्खपणानें. ॐ **वृथापुष्ट** वि० कोणत्याही कामाच्या उपयोगीं न येणारा आणि केवळ खाऊन पुष्ट झालेला.

**वृंद** [ सं० ] न० १ समूह; समुदाय. २ केळीचा घड. ३ ( मराठींत ) विद्वत्तेनें, पैशानें, किं० कर्तबगारीनें जो एकाद्या गांवांत श्रेष्ठ मनुष्य तो.

**वृंदा** [ सं० ] स्त्री० तुळस. ॐ **वृंदावन** न० तुळस लावावयासाठीं दगड, विटा, माती, धातूचा पत्रा, इ० ची केलेली असते ती रचना.

**वृंदारक** [ सं० ] वि० १ पूज्य; ? . २ सुंदर. पु० देव.

**वृद्ध** [ सं० ] वि० १ म्हातारा. २ वाढलेला; वृद्धिंगत; परिपक्व. ३ निष्णात. ४ उच्च दर्जास पोंचलेला; श्रेष्ठ; उ० ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, वयोवृद्ध, इ०. ॐ **वृद्धकाक** पु० १ डोमकावळा. २ (मराठींत) जो म्हातारा असून सशक्त आणि निकोप प्रकृ-तीचा आहे असा मनुष्य. **वृद्धप्रपितामह** पु० बापाचा पणजा. **वृद्धप्रमातामह** पु० आईचा पणजा. **वृद्धश्रवा** [ सं० वृद्धश्रवस् ] पु० इंद्र. **वृद्धत्व** न० म्हातारपण; वार्द्धक्य. **वृद्धपरंपरा** स्त्री० १ पूर्वीच्या पिढ्यांची वृद्ध माणसें समुच्चयानें. २ मागपासून चालत आलेली रूढि किं० आचाराची सरणी. **वृद्धा-चार** पु० कुटुंबांत मागपासून चालत आलेली रूढि. **वृद्धापकाळ** पु० म्हातारपणामुळें गात्रें जीर्ण झाल्याची स्थिति.

**वृद्धि** [ सं० ] स्त्री० १ वाढ; वाढलेपणाची स्थिति. २ अधिक होणें; उ० तिथिवृद्धि. ३ तिथि, नक्षत्र, योग, यांचें वारत्रयास स्पर्श व्हावयाजोगें जें आधिक्य तें. ४ कर्जाच्या पैशा-वरचें व्याज. ५ व्याजबट्टा. ६ वृषणवृद्धि. ७ ( व्याकरण ) आ, ऐ, आणि औ, हे वर्ण; उ० कठिन, काठिन्य; शीत, शैत्य; गुरु, गौरव, या शब्दांतील आ, ऐ, औ, हीं वृद्धीचीं उदाहरणें. ८ कुटुंबांत मुलाचा जन्म झाला असतां जो विटाळ येतो तो. पु० अकरावा योग. **वृद्धिश्राद्ध** न० नांदीश्राद्ध. **वृद्धिंगत** वि० उत्तरोत्तर वाढत गेलेला. **वृद्धिजीविका** स्त्री० सावकारी करून किं० कर्जें देऊन व्याज मिळवून जें द्रव्योपार्जन तें किं० जो चरितार्थ तो. **वृद्ध्याजीव** पु० सावकारीवर

चरितार्थ चालविणारा. **वृद्धिद्योतक** न० वर ' वृद्धि ' अर्थ ८ पहा.

**वृश्चिक** [ सं० ] पु० १ विंचू. २ (ज्योतिष) मेष,वृषभ, इ०ज्या बारा राशि, त्यांतील आठवी रास.मागें'तूळ'मध्ये ह्या बारा राशींचीं नांवें पहा.

**वृष** [ सं० ] पु० १ बैल. २ वृषभ रास. ३ (समासांत उत्तरपद) श्रेष्ठ. ४ वृषण; अंड. ॐ **वृषांक, वृषध्वज** पु० शंकर. **वृषोत्सर्ग** पु० मृतप्रीत्यर्थ पोळ सोडणें. मागें ' वसुसर्ग ' पहा. **वृषस्कंध** पु० बैलाचें वाशिंड.

**वृषण** [ सं० ] पु० अंडकोष; अंड.

**वृषभ** [ सं० ] पु० वर ' वृष ' अर्थ १, २, ३ पहा. ॐ **वृषभकेतु, वृषभध्वज** पु० शंकर.

**वृषल** [सं० ] पु० १ शुद्र. २ चंद्रगुप्त राजा. ३ बाह्यकृत किं० अधार्मिक माणूस. **वृषली** स्त्री० १ शूद्र स्त्री. २ चांडाळीण. ३ लग्नापूर्वी रजोदर्शन झालेली मुलगी.

**वृष्टि** [ सं० ] स्त्री० १ पाऊस. २ वर्षाव. ३ ( दगड, बाण, शिव्या, शपथा, इ० चा ) प्रहार.

**वृक्ष** [ सं० ] पु० झाड. ॐ **वृक्षवाटिका** स्त्री० बाग; घराजवळची आरामार्थ केलेला बाग. **वंशवृक्ष** पु० एकाद्या कुटुंबातील स्त्रीपुरुषाची वृक्ष, शाखा, इ० रूपाचा मांडणी. **वृक्षराज** पु० वड, पिंपळ, आपटा, शमी, इ० वृक्ष प्रत्येक.

**वेंकावल्या** स्त्री० अ० व० टिवल्या बावल्या; वाकुल्या.

**वेखंड** [ सं० वचा+खंड; वचा=वेखंड ] न० एक झाड. याची मुळी औषधाच्या उपयोगी पडते.

**वेंग** स्त्री० दोन्ही बाहु अंगापासून लांब करून त्यांच्यात माणूस,वृक्ष,गाठोडें,इ०पकडावयासाठीं घातलेली मिठी; दोन्ही बाहूंचा कव ( मारणें, घालणें ). ॐ **मूल, घागर, इ० वेंगेवर घेणें** म्ह० कडेवर घेणें.

**वेग** [ सं० ] पु० १ त्वरा; घाई; गतीचा जोर. २ ताप, थंडी, इ० ची तीव्रता. ३ अंगांत भिनत असलेल्या विषाच्या लहरी किं० वेदनेच्या उसळ्या प्रत्येक; उ० आपण मारला तो साप तीन वेगांचा होता. ४ गुदद्वारें मलविसर्जन ज्या दोन, तीन, चार, इ० हप्त्यांनीं होतें ते हप्ते प्रत्येक. ५ वायु, पर्जन्य, पाण्याचा प्रवाह, इ० चा जोर. ६ कांहीं काम करण्याची आकस्मिक इसळी. ॐ **वेगमान** न० पदार्थाचें वजन आणि त्याच्या गतीचा वेग ह्यांचें एकवटलेलें सामर्थ्य.

**वेंगटणें** [ सं० वेंग ] स० क्रि० ( कांहीं पदार्थ, माणूस, इ० ) वेंगेत धरणें किं० पकडणें.

**वेंगटणे, वेगाटणें, वेंगढणे, वेंगाढणे** [ म० ' वेंगणे ' चें एक रूप ] स० क्रि० दीनपणाची मुद्रा ( तोंडावर ) आणून किं० वठवून कोणे-कापाशीं काहीं याचना करणें; उ० माझ्यापुढें तोंडें कां वेंगाडतोस ? तुला नोकरी देणे माझ्या हातांत नाहीं.

**वेंगडी** [ म० वेंगणें ] स्त्री० १ वक्र गति. २ घाबरल्यामुळे गात्रें ताठ होणे किं० आखडणें. ह्या अर्थी प्रयोग अ० व०. हातापायाच्या, अंगाच्या, किं०बोटाच्या वेंगड्या वळणें,चढणें,उत-रणें, असे प्रयोग होतात.

**वेंगणें** अ० क्रि० अतिकष्ट, चिंता, उपास, इ० मुळें थकणें किं० ग्लान किं० निर्वीर्य होणें.

**वेंगणें** पुढे ' वेंधणे ' पहा.

**वेंगलण** [ म० वेंग ] स्त्री० पोटाशीं लहान पोर वागविणारी माकडी किं० वानरी.

**वेगळ** वि० १पृथक् असलेला.२भिन्न,विजातीय. ह्या दोन्ही अर्थी कवितेंत'वेगळा'बद्दल'वेगळ'येतो.

**वेगळ** श०यो०अ०शिवाय,वाचून (कवितेत).

**वेगळणें** [ म० वेगळा ] स० क्रि० १(पदार्थ) वेगळे वेगळे करणें. २ वगळणें; काढून टाकणें. ह्या अर्थी ' वगळणें ' अधिक रूढ आहे. मागें ' वग-ळणें ' पहा.

**वेगळा** [ स० विगलित ] वि० १ विभक्त केलेला; अंतरावर सारलेला किं० ठेविलेला. २ भिन्न; अगदा विधर्मीय; निराळा. श० यो० अ० १ सोडून; शिवाय; वाचून; खेरीज; उ० मी रामा वेगळा राहणार नाहीं असें भरत म्हणाला. उ० ज्ञानावेगळा माणूस पशु होय. २ पलीकडे; आटोक्या बाहेर; उ० दृष्टीवेगळा म्ह० नजरेच्या टप्प्याच्या पलीकडे.टीप,- ह्या दोन्ही अर्थी'वेगळा' लिंगवचनांप्रमाणें फिरतो. ॐ **वेगळीक** स्त्री० १ वेगळेपणाची स्थिति; पृथक्पण; भिन्नता.

समान दर्जाच्या माणसांना भिन्न प्रकारें वागविणें ह्या रूपाचा पक्षपात. ३ पदार्थांचें वर्गीकरण; उ० ह्या पिशवींतील रुपये, आधेल्या, पावल्या, आणि चवल्या, यांची वेगळीक कर.

**वेगळचार, वेगळेचार** [ म० वेगळे + आचार, विचार, इ० ] पु० अ० व० १ मतें, सरणी, आचार, हिताहित, इ० बाबतींत वेगळेपणा किं० पृथक्पणा किं० भिन्नता. २ भावाभावांची विभक्तपणाची स्थिति.

**वेगळेचार** वर ' वेगळा ' मध्यें पहा.

**वेंगाटणें, वेंगाढणें** वर ' वेंगटणें, ' 'वेंगढणें' पहा.

**वेंगाटी** [ म० वेंग ] स्त्री० बाहूंनीं घातलेली किं० मारलेली मिठी; आलिंगन; कवटाळणी.

**वेंगाळणें** [ म० वेंग ] स० क्रि० वेंगेंत किं० वेगेनें ( माणूस, झाड, गठ्ठा, इ० ) पकडणें.

**वेंघणें, वेगणें** [म० वेंग ] स० क्रि० १(पर्वत, झाड,जिना, इ० वर ) चढणें. २ ( फांदी हातांत धरून तिला लोंबकळून ती खालीं ओढणें किं० तिला लोंबकळत राहाणें.

**वेंघणें** अ० क्रि० १ करूं कीं नको करूं ह्या विचारानें साशंक स्थितींत पडणें; कचरणें,शंकित होणें. २ आजार,कष्ट, चिंता, उपवास, इ० कारणांमुळें थकणें,म्लान होणें, किं० निरुत्साह होणें.

**वेच** [ सं० व्यय ] पु० खर्च; द्रव्य, सामग्री, इ०चा काहीं कामाकडे विनियोग. ॐ **खर्चवेच, वेचखर्च** पु० ए० व० खर्च; व्यय.

**वेचक, वेचका** [ म० वेचणें ] वि० १ निवडून वेगळा काढलेला. २ उदार; खर्चिक.

**वेंचकुल्या** स्त्री० अ० व० टिवल्या बावल्या; तोंडें वेडांवाकडीं करणें हा पोरकटपणाचा प्रकार.

**वेचणें** [ सं०व्यय्=खर्च करणें,देणे] स० क्रि० खर्चणें;संपविणें;उ० तूं आपली सर्व शक्ति वेचलीस तरी हा धोंडा तुला सरकावितां येणार नाहीं.

**वेचणें** [ सं० विच्=वेगळें करणें ] स० क्रि० उचलून घेणें; वेगळें काढणें; निवडणें; उ० फुलें, तांदुळ, बोरें, इ० वेचणें.

**वेचला** [ म० वेचणें ] वि० १निवडूनकाढलेला; बाजूस काढून ठेविलेला; पसंत केलेला. २ विचारांत घेतलेला ( विषय, मुद्दा, इ० ).

**वेंचवी, वेंचवीण** स्त्री० त्वचेच्या रोगाचा एक प्रकार.

**वेचा** [ म० वेचणें ] पु० १ मोठें पुस्तक, ग्रंथ, लेख, भाषण, इ०तून कांहीं उद्देशानें निवडून काढलेला भाग.२सारांश.ॐ **वेचे वेचे बोलणें** १ चोखंदळपणानें शब्द निवडून आणि थांबत थांबत बोलणें. २मुखातून वावगा शब्द बाहेर पडूं नये किं० भलतेंच विधान केलें जाऊं नये अशी काळजी घेऊन बोलणें(दोन्ही अर्थी निंदेंत प्रयोग).

**वेचावण (–न )** मागें ' बेचावण ' पहा.

**वेज, वेजे** [ सं० वेध ] न० १ मोती, लाल, माणिक, इ० ना पाडिलेलें भोक. २ सुई,दाभण, इ०चा डोळा. ॐ **वेजीं उतरणें** मोती, माणिक, इ०चें भोक,तार, रेशिम, इ०च्या सततच्या घर्षनानें मोठें होणें.

**वेट, वेंट** [ सं० वेष्ट् ] पु०, स्त्री० १ पेंढा, गवत, इ० वळून केलेला दोर. २ वायूचे विकृतीमुळें पोटांत दोरीसारखा उंचवटा उठतो तो. ३ प्रेमाच्या अतिरेकानें पोटांत पीळ पडल्याची भावना होते ती (उठणें, वळणें, इ० ). ४ पदार्थांभोंवतीं घातलेला दोरीचा वळसा किं० वेढा. ५ अंबाडीची तीन पदराची दोरी. ६ एक वेल किं० वल्ली. ॐ **लोकांचा वेट वळणें** त्याणीं संघशक्तीनें कांहीं कार्य करणें. **माणसें, गुरें,शिपायी,इ० चा कोणेक स्थळीं वेट वळणें** त्याणीं खेचाखेच करून एकत्रिक होणें; उ० त्या वादळांत गुरांचा वडाच्या झाडाखालीं वेट वळला.

**वेटणें, वेंटणें** न०, **वेटली (–ळी )** स्त्री० [ सं०वेष्ट् ] १ गवताला पीळ घालून वळलेली दोरी. २ गवत इ०ची पेंढी. ३ वेटोळें.

**वेटणें** [ म० ' वेचणें ' चें एक रूप ] स० क्रि० १ ( कणसें, फुलें, दूर्वा, इ० )तोडून गोळा करणें. २ ( गवताला ) पीळ भरून त्याची दोरी वळणें. ३ ( कापसावर ) लाटणें फिरवून त्यांतून सरक्या काढून टाकणें.

**वेटविणें, वेटाविणें** स० क्रि०कोणेकापुढें तोंडें वेडांवाकडीं करून किं० त्याच्या सारखें बोलून, हसून, किं० चालून त्याचा उपहास करणें.

**वेटावण्या** स्त्री० अ० व०, **वेटावणें** न०

कोणेकापुढें वात्रटपणानें वेडींवांकडीं तोंडें करणें ( दाखविणें, करणें ).

**वेटाळणें** [ म० 'वेटणें' चें एक रूप ] स० क्रि० १ ( पदार्थ, माणूस, इ० च्या भोंवतीं ) बाहु, दोरी, सैन्य, इ० चा वेढा घालणें; गराडणें. २ पिळणें; पिळवटणें. ३ एके ठिकाणीं करणें; गोळा करणें. ४ कवळणें.

**वेटाळा** पु०, **वेटोळें, वेटाळें** न० [ म० वेटणें, वेटाळणें ] गुंडाळी, वळकटी, पीळ, सुरळी ( घालणें, पडणें ). **वेटाळी** स्त्री० गवताची दोरी-सारखी गुंडाळी किं० जुडी.

**वेटी** [ म० वेटणें ] स्त्री० गवताची दोरी.

**वेठ** [ सं० विष्टि=फुकट काम ] स्त्री० १ मजुरी न देतां कोणी अमलदार, समर्थ, इ० नीं करवून घेतलेलें काम किं० करविलेली ओझ्याची वाहतूक. २ पैसे न देतां खोत, सरकारी अमलदार, इ० नीं रयतेपासून अधिकाराच्या जोरावर उकळलेले पदार्थ. ३ जुनीं भांडीं मोडींत घालून नवीन भांडीं विकत घेतांना भांडीं घेणारा मनुष्य जो ज्यास्ती रोख पैसा देतो तो. ॐ **कामाची वेठ करणें** ( किं० **वळणें** किं० **काढणें** ) तें कसेंबसें करून टाकणें; तें निष्काळजीपणानें करून टाकणें. **वेठीचें करणें** कसें बसे करणें. **कोणेकास वेठीस धरणें** आपलें काम करविण्यासाठीं त्याला धरणें किं० अडकावणें; त्याला आपलें काम करावयाला भाग पाडणें. **वेठकरी, वेठ्या** पु० वेठीस धरलेला माणूस. **वेठविरळा** पु०, **वेठबिगार** स्त्री० ए० व० वेठीनें करविलेलें काम किं० असें काम करविण्याचा खोत इ० चा हक्क.

**वेठ, वेंठ** मागें 'वेट, वेंट' पहा.

**वेठन** [ सं० वेष्टन ] न० १ गाडी, नांगर, इ० चें टेरूं, लोड, इ० भाग बांधण्याची दोरी. २ कांहीं काम करण्याची कोणेकाची खुबी, सफाई, किं० चलाखी ( शेतकऱ्यांचा शब्द ).

**वेठणें** [ सं० वेष्ट् ] स० क्रि० १ ( गाडी, नांगर, इ० चें जूं, धुरी, इ० भाग ) दोऱ्यांनीं बांधणें. २ ( दोऱ्या, बंधन, इ० ) यथास्थानीं बांधणें. ॐ **आठला वेठला** वि० दोऱ्या, बंध, इ० यथास्थानीं बांधून किं० गुंडाळून सिद्ध किं० सज्ज केलेला ( नांगर, गाडा, इ० ).

**वेड** स्त्री० गव्हाच्या जुड्यांची रास करून जुड्यांतील ताटांच्या मुळ्यांची वेणी घालतात ती,–चोरांना हीं ताटें उपसून काढतां येऊं नयेत म्हणून. न०, स्त्री० हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालतात तें वेढें किं० वळें.

**वेड** स्त्री० इंडलिंबाचें झाड. मागें 'इंड' पहा. न० ह्या झाडाचें फळ. हें शब्द अशिक्षितांत रूढ आहेत.

**वेड** [ सं० विड्=किंचाळणें, चरफडणें ] न० १ मेंदूमध्यें कांहीं बिघाड झाल्यामुळें बुद्धिभ्रंश इ० रूप होतो तो आजार. २ कोणताही मूर्खपणाचा विचार किं० कृति किं० यत्न. ३ एकाद्या पदार्थाबद्दल अत्युत्कट किं० फाजील इच्छा. ४ भूतबाधा, वायुप्रकोप, इ० मुळें कोणेकाला भलतें भलतें बोलणें, करणें, इ० ची येते ती लहर. ॐ **वेड घेऊन पेडगांवास जाणें** वेड्याचें सोंग घेऊन आपला मतलब साधावयास झटणें. **वेड पांघरणें** मुद्दाम वेड्यासारखें बोलणें किं० वागणें ( निंदेंत प्रयोग ). **एकाद्याला वेड भरणें** त्याला वेड लागणें. **कोणेकाला एकाद्या वस्तूचें वेड लागणें** त्याला तिचा नाद लागणें; तीच वस्तु त्याच्या ध्यानीं मनीं सदैव घोळत असणें; तो एकसारखा तिच्या नादांत असणें. **एकाद्याला वेड लावणें** १ त्याला मोहित करणें; त्याचें मन आकृष्ट करणें. २ त्याला घोटाळ्यांत घालणें. ३ त्याला भारी उपद्रव करणें,–जेणेंकरून त्याला वेड लागण्याइतकी त्याची स्थिति व्हावी.

**वेडा** [ म० वेड; सं० विड्=किंचाळणें ] वि० १ मेंदूंत कांहीं बिघाड झाल्यामुळें जो भलभलतें बोलतो किं० करतो तो; ज्याला वेड लागलें आहे असा. २ मूर्ख; व्यवहारचातुर्य ज्याला नाहीं असा. ३ पूर्वापरसंबंधरहित ( वर्तन, भाषण, इ० ). ४ छांदिष्ट. ५ मोहित किं० आकृष्ट झालेला. ६ एकदम पुष्कळ कामें करावयाचीं असतां काय करावें, कसें करावें, अशी ज्याच्या मनाची भ्रांतिष्ट स्थिति झाली आहे असा; कर्तव्यमूढ झालेला; संभ्रांत झालेला. ॐ **वेडसर, वेडदुल्ला, वेडपा, वेडाखुळा** वि० अर्धवट वेडा; वेड्या-

सारखें भाषण किं० कृति करणारा. **वेडापिसा** वि० वेडा; अर्धवट. **वेडापीर** पु० छांदिष्टपणें बोलणारा; छांदिष्टपणें वागणारा. **वेडाबागडा** वि०वेडावाकडा;बेडौल.**वेडामधुरा** पु०एक प्रकारचा ज्वर,–ज्यांत शीतोपचार झाला असतां तो ज्वर विकोपास जाऊन वायु होतो आणि वेड लागल्या सारखी प्रकृति होते. **वेडावाकडा** वि० १ वाकडा तिकडा. २ जें फारसें वाखाणण्याजोगेंही नाहीं आणि जें अगदीं टाकाऊही नाहीं असें (भाषण किं०चित्र इ०कांहीं पदार्थ ). **वेडापिसा, वेडाखुळा** वि० अर्धवट वेडा. **वेडथर, वेडगळ, वेडगेला वेडका,** वि० वेडा; अर्धवट; मूर्ख. **वेडा ऊस** पु० १ जंगली ऊस.२हलक्या उसाची एक जात.**वेडाविद्रा,वेडाविपारा** वि०१वेडा आणि कुरूप. २कुरूप आणि बेघाट ( माणूस,पदार्थ ).**वेडाळया, वेडाळा** वि० वेडा; अर्धवट. **वेडे चार** पु०अ०व० मूर्खपणाचीं कृत्यें.**वेडी हळद** स्त्री० जिचें खोड जाडी आहे अशी हळद. **वेडें पीक** न० १ मशागती वांचून विपुल येणारें पीक. २ आलें तर विपुल, नाहीं तर मुळींच नाहीं, असें कित्येक झाडांना येतें तें पीक. ३ वळला तर हावें तें देईल, नाहीं तर मुळींच कांहीं देणार नाहीं असा छांदिष्ट किं० लहरी दाता.४क्षुल्लक कारणांवरून कधीं कधीं फार रागावणारा आणि मोठा उपद्रव त्याला कोणी केला तरी शांत राहणारा असा छांदिष्ट माणूस.५छांदिष्ट वर्तन किं०वृत्ति.**वेडें भाग्य** न० नादान आणि कर्तृत्वशून्य माणसाला एकदम प्राप्त झालेलें भाग्य. **वेडे वेडे चार** पु० अ० व० छांदिष्टपणाचीं कृत्यें. **वेड्यांचा बाजार** पु० मूर्ख माणसांचा जमाव,–कांहीं गोष्ट करावयाला प्रवृत्त झालेला ( भरणें, जमणें ).

**वेडगळणें, वेडवणें** [ म० वेड, वेडा ] अ० क्रि० १ वेडें होणें. २ छांदिष्टपणाचें वर्तन करणें किं० करूं लागणें.

**वेढण** [ म० वेढणें ] न० हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालावयाचें सोन्याचें किं० चांदीचें वळें.

**वेडविणें** [ म० वेडा ] स०क्रि० (कोणेकाला) वेड लागण्याइतकें छळणें, सतावणें, किं० गांजणें.

**वेडावणें** स०क्रि०(कोणेकापुढें)वाकडीं तिकडीं तोंडें करून (त्याला) खिजावणें.

**वेडावणें, वेडाळणें** [ म० वेडा ] अ० क्रि० १ वेडें होणें. २ कांहीं गोष्टींच्या नादानें फाजिल आकृष्ट होणें किं० तिच्या भरीं भरणें.

**वेढ** [ सं० वेष्ट् ] न०, स्त्री० हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालावयाचें वळें. पु० किल्ला, घर, कंबर, छाती, इ०चा परिघ.

**वेढणी** स्त्री० उडदाच्या पिठांत तिखट, मीठ, इ० घालून धिरड्यासारखें करतात तें–तोंडीं लावणें.

**वेढणें** [ सं० वेष्ट् ] स० क्रि० १ गराडणें. २ ( पदार्थाभोंवतीं ) दोरी, वस्त्र, इ० लपेटणें. ३ ( किल्ला, घर, गांव, इ० भोंवतीं )वेढा देणें किं० गराडा घालणें. ४ कमरेभोंवतीं ( लुगडें, धोतर, इ० ) सरासरीं गुंडाळून घेणें किं०तें कसेंबसें नेसणें. ५(गांव,देश,इ०)लुटारू इ०नीं पादाक्रान्त करणें. अ० क्रि०१(कागद,भिंत,इ०)चित्रें,आकृति,अक्षरें, इ०नीं खरडला जाणें. २ कामाखालीं ( कोणी मनुष्य ) दडपून गेलेला असणें.

**वेढा** [ सं० वेष्ट् ] पु० १ गराडा. २ पदार्थाभोंवतीं दोरी इ०चा वळसा. ३ मळसूत्राचा स्वताच्या आसाभोंवतीं एक सबंध फेरा. ४मध्य बिंदूभोंवतीं कांहीं पदार्थ एक वेळां फिरला म्हणजे होतें तें वर्तुळ. ५ मात्रा इ० सहाणेवर उगाळतांना तिचा एक सबंध वळसा.oo **फिरत्या भोंवऱ्याचे वेढे मोजतां येत नाहींत** मनुष्य ऐन वैभवाच्या किं०उत्कर्षाच्या स्थितींत असतो तो पर्यंत त्याच्या बारीक सारीक हालचालींकडे लक्ष्य देतां येत नाहीं किं० त्याचे दोषही सांगतां येत नाहींत.

**वेढें** [सं० वेष्ट्] न० हाताच्या किं०पायाच्या बोटांत घालावयाचें सोनें, चांदी, तांबें,इ०धातूचें वळें.

**वेण, वेणा** [ सं० वेदना ] स्त्री० १ प्रसूतिसमयीं स्त्रीस पोटांत येतात त्या कळा प्रत्येक. **टीप,**–' वेणा ' असा स्त्री० अ० व० प्रयोग बहुधा होतो. क्रि० देणें, येणें, होणें. २ आमांश झाला असतां गुदद्वारें मलविसर्जनाचे समयीं पोटांत जो मुरडा होतो तो किं० कळ उठते ती. **वेण** स्त्री०स्त्रीच्या प्रसूतीचा प्रकार,–उशीर,सांव-

काशी, कळा निघणें, इ० विषयीं बोलतांना; उ० गोदूबाईची वेण हरिणीसारखी आहे. ॐ **वेणा ( किं० वेण्या ) देणें** कांहीं कार्यार्थ परमावधीचा प्रयत्न करणें किं० कष्ट सोसणें.

**वेणटणें, वेणाटणें, वेणवणें** [ म० वेण, वेणा ] अ० क्रि० प्रसूति होण्याच्या अगोदर ( स्त्रियांच्या ) पोटांत कळा उठत असणें; उ० गोदूआक्का सकाळपासून वेणटती आहे पण अजून तिची सुटका झाली नाहीं ( म्ह०ती प्रसूत झाली नाहीं ).

**वेणा** वि० घिरटांत घालून भरडून काढलेला [ ( तांदूळ ).

**वेणी** [ सं० ]स्त्री०१डोईचे केश,अंबाडी,इ०चे तीन किं०अधिक पेड एकांत एक विशिष्ट प्रकारें गुंतवून लांबलचक केलेला आकार ( घालणें ).२ पाण्याचा अरुंद ओहोळ.३ पंक्ति; रांग. ४नद्यांचा संगम; त्रिवेणीसंगम. ॐ **वेणीफणी** स्त्री० ए०व० केशांस तेल लावणें, केश विंचरणें, त्यांची वेणी घालणें, कुंकू लावणें, काजळ घालणें, इ०रूप जो स्त्रियांचा प्रसाधनविधि तो ( करणें, होणें ).

**वेणु** [ सं० ] पु० १ वेळू; बांबू. २ पावा; मुरली. ॐ **वेणुबीज** न०, **वेणुयव** पु० वेळूचें बीं.

**वेत, वेतस** [ सं०वेतस ] पु०१वेत,-ज्याच्या तंतूंनीं खुर्चा, पलंग, इ० विणतात. २ वेताची छडी. ॐ **वेतसरी** स्त्री० वेताचा तंतु,-खुर्ची इ० विणावयासाठीं काढलेला. **वेतस वृत्ति, वैतसी वृत्ति** स्त्री०नम्रपणाची किं० लहानपणाची वर्तनसरणी. **वेतसी** वि० वेताचा बनविलेला ( पदार्थ,- टोपलें, खुर्ची, इ० ). स्त्री० वेत किं० वेताची काठी.**वेताटी** [ म० वेत+काठी ] स्त्री० वेताची काठी,-हातांत धरावयाची किं० मारामारींत वापरावयाची.

**वेत** [ म० विणें ] न० गायी, म्हशी,शेळ्या, इ० चीं एक एक प्रसूति किं० प्रसूतीची खेप किं० वेळ; उ० ही गाय तीन वेतांची आहे ( म्ह०तीन वेळां व्यालेली आहे ).

**वेतन** [ सं० ] न० १ पगार; मजूरी. २ निर्वाहाचें साधन.३ पुराणिक, हरिदास,फडणीस, इ०ना देतात ती बिदागी किं० बक्षिशी.ॐ**वेतनी** (वि० १ वेतन ठरवून कांहीं कामास लाविलेला गडी, मजूर, पुराणिक, इ० ).२ कांहीं कामाबद्दल कोणेकाला रोख पैसे किं० पगार न देतां त्याच्या मोबदला बक्षीस दिलेला ( गांव, हक्क, अधिकार, इ० ). ३ वेतनासंबंधाचा ( तंटा, हिशेब, इ० ).

**वेंतस, वेंतूस** न० शरीरांतून रक्त काढावयाचें एक साधनविशेष; एक प्रकारची तुंबडी.

**वेतस** मागें ' वेत, वेतस ' पहा.

**वेताळ** [ सं० ] पु० पिशाचांचा राजा. २ भुतानें पछाडलेलें प्रेत. ॐ **वेताळ आहे तेथें भुतावळ आहेच** द्वाडपणाचें कांहीं कृत्य करावयाला कोणी मनुष्य सिद्ध झाला म्हणजे त्याच्या मदतीला द्वाड माणसें जुळतातच. **वेताळ पूर्व स्थळीं येणें**१उत्संखळ किं०द्वाड माणसाला केलेला उपदेश जुना झाला म्हणजे किं०त्याच्यावरचें नियंत्रण शिथिल झालें म्हणजे तो पूर्वीप्रमाणें दुर्वर्तनी होणें. २ पुनः पूर्वक्रम किं० सरणी अनुसरूं लागणें.

**वेत्ता** [ सं० वेत्तृ ] पु० ज्ञाता; एकाद्या विषयांत पारंगत मनुष्य.

**वेत्र**[ सं० ]पु०वेत,-ज्याच्या तंतूंनीं खुर्च्या, पलंग, इ० विणतात. न० काठी; सोटा.ॐ **वेत्रधर, वेत्रधारी** पु० द्वारपाळ; भालदार. **वेत्रलता** स्त्री० भालदाराची काठी. **वेत्री** [ सं० वेत्रिन् ] पु० द्वारपाळ.

**वेद** [ सं० ] पु० १ ज्ञान. २ धर्म, ब्रह्म, इ० चें कथन करणारा मंत्रब्राह्मणात्मक आणि हिंदूंना परमपूज्य असा ग्रंथ,-ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, आणि ब्राह्मण ग्रंथ, ह्यांचा समुच्चय किं० हीं प्रत्येक.ॐ**कोणेकाचे वेद हरणें** त्याच्या सर्व युक्त्या,बेत, इ० फसून तो कर्तव्यमूढ होणें. **वेदनिंदक** पु० बौद्ध किं० जैन माणूस. **वेदमुख** वि० ज्याला वेद पाठ आहेत असा. **वेदांग** न०. शिक्षा, कल्प, व्याकरण, ज्योतिष, आणि निरुक्त, हीं प्रत्येक. **वेदान्त** न० ब्रह्मज्ञान; जग मिथ्या आहे हें तत्त्व किं०ह्या तत्त्वाचें निरूपण करणारा ग्रंथ.२ (मराठींत) प्रपंचाचें मिथ्यात्व आणि ब्रम्हाचें सत्यत्व प्रतिपादिणारी गोष्ट जी हरिदास सांगतात ती.**वेदोनारायण** पु० वेदविद्येंत पारंगत ब्राह्मण. **वेदोक्त, वेदोदित** वि० वेदांत कर्तव्य म्हणून सांगितलेलें (धर्मकृत्य).**वेदान्ती**[सं०वेदान्तिन्]वि०ब्रह्मज्ञानी.

**वेदावभृथसंपन्न** वि० वेदांत पारंगत. **वेदादिवर्ण** पु० ॐ हें अक्षर. **वेदोदय** पु० सूर्य. **वेदगर्भ** पु० १ ब्रह्मदेव. २ ब्राह्मण. **वेदत्रय** न० ऋक्,यजुस्,आणि साम, हे तीन वेद समुच्चयानें. **वेदवाचा** स्त्री० देवी सरस्वती. **वेदवदन** न० व्याकरण. **वेदवाद** पु० कर्मकांड. **वेदवास** पु० ब्राह्मण. **वेदविद्वान्** वि० वेद पढलेला. **वेदव्यास** पु० व्यास ऋषि. **वेदमूर्ति** स्त्री० मूर्तिमंत वेद. वेदविद्यासंपन्न आणि भिक्षुकवृत्तीनें राहाणाऱ्या ब्राह्मणाच्या नांवामागें कागदोंपत्रीं योजावयाचा ह्या शब्द आहे; उ० वेदमूर्ति अनंतभट्ट पाळंदे. **वेदशास्त्रसंपन्न** वि० शास्त्रपुराणादि जाणणारा प्रतिष्ठित जो ब्राह्मण त्याच्या नांवामागें कागदोंपत्रीं ही पदवी योजतात.

**वेदन** [ सं० ] न० १ जाणणें. २ ज्ञान. ३ मनोविकार. ४ सुखदुःखादींचा अनुभव.

**वेदना** [ स० ] स्त्री० १ तीव्र दुःख. २ शारीरिक दुःखाची तिडीक किं० कळ. ※ **ह्या बोटाची वेदना त्या बोटास येत नाहीं** मित्र, नातलग,आप्त,हीं माणसें जरी अगदीं एक दिलाचीं असलीं तरी एकाचें दुःख पूर्णपणें दुसऱ्याच्या लक्ष्यांत किं० अनुभवास किं० प्रतीतीस येत नाहीं.

**वेदि, वेदी** [ सं० ] स्त्री० १ यज्ञार्थ सुसंस्कृत केलेली भूमि. २ यज्ञकुंड. ३ आसन; बैठक. ४ लग्न, मुंज, इ० विधींत घातलेलें बहुलें. ५ अंगुलीमुद्रा; नांवाची अंगठी.

**वेदिका** [ सं० ] स्त्री० १ यज्ञार्थ सुसंस्कृत केलेली भूमि. २ उंच आसन किं० बैठक. ३ ओटा. ४ मंडप.

**वेदितव्य, वेद्य** [ सं० ] वि० १ कळवावयाचें. २ जाणावयाचें. ३ जाणावयास योग्य.

**वेध** [ सं० ] पु० १ मोती, माणिक, इ० ना छिद्रें किं० भोक पाडणें. २ पाडलेलें भोक किं० छिद्र. ३ खोलीचें किं० उंचीचें माप. ४(ज्योतिष) ग्रहाचें स्थान, ग्रहण, तिथि, इ०चा निर्णय. ५ दृष्टि, बाण, बंदुकीची गोळी, इ० चा लक्ष्य पदार्थावर झालेला पात. ६ सूर्यग्रहणाच्या अगोदर चार प्रहर आणि चंद्रग्रहणाच्या अगोदर दोन प्रहर असा जो धर्मशास्त्रांत ग्रहणासंबंधाच्या दोषाचा अवधि सांगितलेला असतो तो,–ज्या अवधींत भोजन इ० निषिध समजलें जातें. ७ ज्या दिवशीं प्राधान्यें करून जें तिथिनक्षत्रादि असतें, त्यास त्याच दिवशीं प्रातःकाळीं किं० सायंकाळीं किं० अन्य समयीं असतो जो तिथिनक्षत्रादिकांचा अंश, त्याचा गुणदोषप्रयोजक असतो जो संबंध तो; उ० आज मंगळवारीं दशमी दोन घटिका आणि एकादशी सत्तावन्न घटिका तस्मात् ह्या एकादशीस दशमीचा वेध आहे. ८ सप्तशलाकादि चक्राचे ठायीं एकशलाकादिगत जीं नक्षत्रादिक असतात त्यांतून एकीकडचे नक्षत्रादिकांवर जो कोणी ग्रह असतो त्याचा दुसरेकडचे नक्षत्रादिकांवर जो दृष्टिपात असतो तो. ९ कांहीं कामाचा कोणेकावर जो भार असतो ज्याचेमुळें त्याला इतर गोष्टींकडे लक्ष्य लावितां येत नाहीं तो भार; उ० कुटुंबाचा वेध ज्याच्या पाठीशीं आहे त्याला नाच तमाशे कसे सुचणार? १० तळें, विहीर, इ० चा खोलपणा. ११ व्याक्षेप; चाललेल्या क्रमामध्यें झालेलें किं० आलेलें विघ्न किं० तेणेंकरून झालेला खोळंबा. १२ एकाद्या गोष्टीचा कोणेकाला लागलेला नाद किं० छंद (लागणें). ※ **वेध घेणें** ( किं० **करणें** ) दुर्बीण इ० साधनांनीं खस्थ पदार्थांची स्थिति इ० मापणें किं० ठरविणें. **वेधशाला** स्त्री० ज्योतिष विषयक अवलोकन करण्याची जागा.

**वेधक** [ सं० ] पु० १ मोती, हिरे, इ० ना भोकें पाडण्याचा धंदा करणारा. २ रमविणारा; आकर्षिणारा; उ० मनोवेधक, चित्तवेधक.

**वेधणें** [ सं० विध्, व्यध्=भोक पाडणें ] स० क्रि० १ ( पदार्थास ) भोक पाडणें. २ ( पदार्थांवर ) प्रहार करणें. ३ ( लक्ष्य, मन ) खेचणें किं० आकर्षिणें. अ० क्रि० १ (पदार्थांवर) बाण, धोंडा, इ० चा प्रहार होणें. २(पदार्थाला) भोक पडणें. ३( मन ) आकृष्ट होणें किं० गुंतणें.

**वेधन** [ सं० ] न० १ सुई; दाभण. २ भोक पाडावयाचें सुतार इ० चें हत्यार. ३ भोक पाडणें ही क्रिया.

**वेंधळा** वि० अजागळ; गैबती; बावळट; गैदी.

**वेधा** [ सं० वेधस् ] पु० १ ब्रह्मदेव. २ उत्पादक; स्रष्टा. ३ परमात्मा.

**वेधित** [ सं० ] **वि०** १ ज्यांला भोक पाडलें आहे असें. २ वेध केलेलें.

**वेपथु** [ सं० ] **पु०** कंप; कांपणें.

**वेपन** [ सं० ] **न०** १ कंप. २ शरसंधान.

**वेम, वेमा** [ सं० वेम, वेमन् ] **पु०** १ कोष्ट्याचा माग. २ आडवीं सुतें ठासण्याची कोष्ट्याची फणी.

**वेरजार, वेरझार, वेरधार** [म० येरे+जा रे] **स्त्री०** १ रिकामा हेलपाटा. २ जाण्यायेण्याची खेप. मागें 'येरजार' पहा.

**वेरीं** [ सं० पर्यंत ] **श० यो०** अ० पर्यंत; उ० आजवेरीं, एथवेरीं.

**वेरूळचा निचाळ्या वि०** अत्यंत चिक्कू किं० कंजूष. [ योग्य वेळीं.

**वेरेवाळीं, वेरवाळीं, वेळेवारीं क्रि० वि०**

**वेल** [ सं० वल्ली ] **पु०, स्त्री०** १ लता; जिच्या कांडांत ताठपणा नसतो आणि जी जमीनीवरच पसरते किं० दुसऱ्या झाडाच्या आधारानें वर चढते अशी वनस्पति. २ विड्याच्या पानाचा वेल; नागवेली. ३ बुगडी, काप, कुडूक, इ० कर्णभूषणांस जी मोत्यांची सांखळी लावितात ती. ४ झाडाची लवचीक साल,–जी गठ्ठे, भारे, इ० बांधण्याकडे योजतात. ॐ **तुझा वेल मांडवीं जाओ** तुझ्या वंशाचा विस्तार होओ! (आशीर्वाद देतांना हें वाक्य उच्चारतात). **वेल वाढणें** वंशाचा विस्तार होणें. **वेलीस दुःख नाहीं आणि वाळकास दुःख नाहीं अशा प्रकारें क्रि० वि०** अत्यन्त नाजूकपणानें. मागें 'डोळा' मध्यें 'डोळा न फुटे आणि काडी न मोडे अशा रीतीनें' हा वाक्प्रचार पहा. **वेलबूट, वेलबुट्टा पु०, वेलबुटी, वेलबुट्टी स्त्री०** वस्त्र, भिंत, इ० वर काढलेली वेलीच्या रूपाची नक्षी.

**वेल स्त्री०** घोड्यांना होतो तो क्षयरोग.

**वेलची, वेलदोडा** मागें 'एलची,' 'एलदोडा' पहा.

**वेला** [ सं० ] **स्त्री०** १ वेळ; समय. २ फुरसद; अवकाश; रिकामपण. ३ समुद्रकिनारा. ४ मर्यादा.

**वेलाटी, वेलांटी, वेलांडी, वेल्हांटी, वेल्हांडी स्त्री०** व्यंजनाला ऱ्हस्व किं० दीर्घ इकार जोडण्याचें चिन्ह; ि, ी.

**वेली स्त्री०** वर 'वेल' पु०, स्त्री० पहा.

**वेल्हाळ** [ सं० वेल्लहल=व्यभिचारी; जारकर्मी ] **वि०** १ परमप्रीतिपात्र जो भर्ता इ० तो. २ प्रियकर; लाडका. ३ सुंदर; मनोहर (भाषण, चेहरा, इ० ). **पु०** तिखटमीठ लावून सांगितलेली हकीगत; पाल्हाळाची हकीगत (लावणें, मांडणें, करणें ). अशी हकीगत सांगणाराला 'वेल्हाळ्या' म्हणतात. **स्त्री०** १ प्रिय स्त्री,–पत्नी, रखेली, किं० कोणीही अन्य स्त्री. ह्या अर्थी 'वेल्हाळा,' 'वेल्हाळी' सुद्धां. २ वटवट करणारी स्त्री.

**वेवतणें, वेवंतणें** [सं०वि+वेष्ट्]**स०क्रि०** कांहीं वस्तु अनेक वेळां मागून मागून(कोणेकाला) सतावणें किं०गांजणें.ह्या अर्थी 'वेवतून घेणें,''वेतवेतून घेणें' सुद्धां.

**वेंवें न०** भय, घाबरगुंडी, इ० मुळें कोणेकाला स्पष्ट शब्द उच्चारतां येत नाहींत अशी स्थिति; गाळण; (उडणें, होणें ).

**वेव्हार**[सं०व्यवहार]**पु०**१परस्परांचें देणें,घेणें, कामकाज करणें,घरोबा ठेवणें,इ०रूप दळणवळण. २कोणेकाच्या कांहीं भाषणावर कुत्सितपणें दुसरा कोणी काढतो ती हरकत, शंका, इ०. ३ लोकरीति; जगाची राहाटी. ॐ पुढें 'व्यवहार' पहा. **वेव्हारी वि०** १ व्यवहार करणारा; देणें, घेणें, इ० रूप सावकारी किं० व्यापारी कामें करणारा. २ हुजतखोर; दुसऱ्याच्या बोलण्यावर किं० सांगण्यावर कुत्सितपणें शंका काढणारा. पुढें 'व्यवहारी' पहा.

**वेश, वेष** [ सं० ] **पु०** १ पोशाख; कपडे पेहरण्याची तऱ्हा. २ सोंग. ३ तंबू. ॐ **वेशधारी** [ सं० वेशधारिन् ] **पु०** १ नट. २ ढोंगी. **वेशवार पु०** मसाला; दोन तीन प्रकारच्या डाळी, धने, हळद, मिरच्या, मिरी, इ० पदार्थ तळून किं० भाजून त्यांचें चूर्ण भाजी इ० मध्यें घालायासाठीं करतात तें. **वेश (–स–) वाराचें लोणचें न०** मोहऱ्या, मेथ्या, हिंग, हळद, इ० द्रव्यांचें चूर्ण घालून आंब्यांचें लोणचें करतात तें.

**वेश्या, वेश्या** [ सं० ] **स्त्री०** १ रांड; देह-

विक्रय करून चरितार्थ चालविणारी. २ नर्तकी. ॐ **वेश्याचार्य** पु० १ नपुंसक. २ नर्तकी स्त्रियांचा गुमास्ता किं० दलाल. **वेश्यापुत्र** पु० रांडलेक ( शिवी ). **वेश्यालय** न० कुंटणवाडा.

**वेष** वर ' वेश ' पहा.

**वेष्टक** [ सं० ] वि० गराडणारा; गुंडाळणारा.

**वेष्टण** न० खालीं ' वेष्टन ' पहा.

**वेष्टणें** [ सं० वेष्ट ] स० क्रि० १ ( सूत्र, वस्त्र, इ० ) एकाद्या पदार्थाभोंवतीं गुंडाळणें. २ ( पदार्थाचे भोंवतीं ) सूत्र, वस्त्र, कागद, इ० लपेटणें किं० गुंडाळणें. ३ ( किला, गांव, इ० ) गराडणें किं० वेढणें. ४ ( लुगडें, धोतर, इ० ) अंगाभोंवतीं गुंडाळणें किं० नेसणें.

**वेष्टन, वेष्टण** [ सं० वेष्टन ] न० १ गुंडाळणें; आच्छादन; लपेटणें. २ पदार्थाभोंवतीं गुंडाळलेलें वस्त्र, कागद, इ०. ३ पोथी, उंची सणंग, इ० च्या संरक्षणार्थ त्याचे भोंवतीं गुंडाळावयाचें वस्त्र, कागद, इ०. ४ कुंपण; वई. ५ पागोटें; मुंडासें; रुमाल. ६ नाचणाऱ्याचें एक संस्थान.

**वेस** स्त्री० १ गांवाभोंवतालच्या भिंतीस जें दार असतें तें. २ घर, परसूं, इ० च्या भोंवतालच्या कुंपणास असतें तें दार किं० फाटक. ३ ( **लाक्षणिक** ) सरकारला द्यावयाचें देय,-जें देईपर्यंत गांवाची वेस सरकारकडून बंद करण्यांत येत असे. ॐ **वेसकट** (-ड ) न० कुंपणांतील लाहानसें दार किं० फाटक. **वेसकर** (-री ) पु० गांवाच्या वेशीवरचा रखवालदार महार. **दुःख ( किं० दुखणें ) वेशीस बांधणें** आपली अडचण जाहीर करणें ( जाहीर केली असतां कोणी तरी उपाय सुचवितो म्हणून ). **वेसवाटी** पु० गृहादिकांचा अभिमानी सर्प,-जो घर इ० च्या दारापाशीं गुप्त रूपें बसून भुतें इ०ना घरांत येऊं देत नाहीं. त्या सर्पाच्या नांवानें ठराविक वेळीं खाद्यपेयांचें वाढणें द्यावें लागतें.

**वेसण** (-न ) स्त्री० १ बैल, रेडा, इ० ना नियंत्रणेंत ठेवण्यासाठीं त्यांच्या नाकाच्या पडद्याला भोंक पाडून त्यांत ओंविलेली असते ती दोरी. २ कोष्टयाच्या मागांत रगडणीला असतो तो दोरीचा फास किं० वळसा. ३ ( **लाक्षणिक** ) कोणेकाला नियंत्रणेंत ठेवण्याचें कोणतेंही साधन.

**वेसन, वेसनी** पुढें 'व्यसन,' 'व्यसनी' पहा.

**वेसवा** [ सं० वेश्या ] स्त्री० १ गरत असून निर्लज्जपणें व्यभिचार करणारी स्त्री. २ स्त्रियांस द्यावयाची ही शिवी आहे.

**वेसवार** [ सं० ] पु० मसाला. मागें ' वेश ' मध्यें ' वेशवार ' पहा.

**वेहळा** पु० १ बेहेडा नांवाचा वृक्ष. २ त्याचें फळ. मागें ' ब्याहडा, ब्याहाडा, ' 'बेहडा' पहा.

**वेळ** [ सं० वेला ] पु०, स्त्री० १ काळ. २ अवधि; काळाचे विशिष्ट परिमाण. ३ समय. ४ अवकाश; कांहीं गोष्ट होईपर्यंतचा मधला अवधि. ५ कांहीं काम करण्याला असावी तितकी फुरसुत. ६ एक, दोन, तीन, इ० ज्या कामाच्या आवृत्त्या त्या प्रत्येक; उ० तो एका दिवसांत तीन वेळ जेवतो. या उपयोगांत ' वेळ ' शब्द क्रि० वि० आहे. एक वेळ म्ह० एकदा; दोन वेळ म्ह० दोनदा; इ०. ७ उशीर, विलंब, दिरिंगाई; उ० हा जमाखर्च पांच वाजेपर्यंत मांड, वेळ लावूं नको. ८ कांहीं काम करावयाला योग्य; अनुकूल, शुभ, किं० सोयीचा समय; उ० या कामाला चांगली वेळ लागली नाहीं; उ० वात्रटपणाची ही वेळ नव्हे. ९ सुर्योदयापासून मध्यान्हापर्यंत आणि मध्यान्हापासून सूर्योस्तापर्यंत जे दिवसाचे दोन विभाग ते प्रत्येक. १० फलज्योतिषांत ठरलेले आणि फळाच्या संबंधांत जे आठ कालावधि ते प्रत्येक; अमृतवेळ, उद्योगवेळ, काळवेळ किं० मृत्युवेळ, चंचलवेळ किं० चोरवेळ, रोगवेळ, लाभवेळ, शुभवेळ, आणि स्थिरवेळ. या आठ वेळांहून इतर तत्त्वांवर दुसऱ्याही वेळा मानण्यांत येतात. आंधळवेळ, जातीवेळ, वातवेळ, इ०. ॐ **वेळभर** क्रि० वि० १ संबंध अर्धा दिवस म्ह० सकाळपासून दुपारपर्यंत किं० दुपारपासून संध्याकाळपर्यंत. वर ' वेळ ' अर्थ९पहा. २ पुष्कळ वेळपर्यंत. **वेळ मारून नेणें** एकाद्या विशिष्ट समयीं किं० प्रसंगीं आपला कमीपणा प्रगट न होऊं देणें. **वेळ वाहणें, वाहती वेळ असणें** कांहीं कामाला वेळ सोयीचा किं० अनुकूल असणें. **वेळेचा गुण** पु० वेळेचें सामर्थ्य,-ज्याचें फळ यदृच्छेवर अवलंबून असतें; उ० काल मी याच सरणीचा रांधा केला, कालचा रांधा

साधला, आजचा साधला नाहीं; दुसरें काय ? वेळेचा गुण;उ० काल मला पंधरा रुपये मिळाले, आज आठच आणे मिळाले, वेळेचा गुण ! **वेळ अवेळ** स्त्री ए० व० कांहीं कामाला विशिष्ट समय योग्य आहे किं० अयोग्य आहे (हें पाहाणें किं० विचारांत घेणें ). **वेळीं अवेळीं** क्रि० वि० १ भलत्याच किं० अडचणीच्या समयीं. २ कोणत्याही वेळीं,–मग ती सोयीची असो किं० गैर सोयीची असो. **वेळाकाळाला कामास येणें** जरूरीच्या किं० अडचणीच्या वेळीं उपयोगीं पडण्याला सज्ज किं० सिद्ध असणें. **वेळणेवारचा, वेळणेवारीं** क्रि० वि० भलत्याच किं० अयोग्य समयीं; उ० वेळणेवारचा तूं बोंबलतोस तुला लाज कशी नाहीं वाटत? ‘ वेळणेवारचा ’ लिंगवचनांप्रमाणें फिरणारें क्रि० वि० आहे. **वेळवारीं, वेळेवारीं** क्रि० वि०योग्य वेळीं; सोयीच्या वेळीं. **वेळेनुसार** क्रि० वि० १ वेळ सोयीची किं० गैरसोयीची असेल त्याप्रमाणें. २कदाचित्. **वेळोंवेळां** क्रि० वि० पुनः पुन्हा; अनेक वेळां; वारंवार. **वेळकाळ** पु० ए० व० प्रसंग,–शुभ किं० अशुभ ह्या दृष्टीनें. **वेळनावारीं** क्रि० वि० भलत्याच वेळीं; अशुभ समयीं. **वेळप्रसंग** पु०ए०व०शुभ किं० अशुभ समय; सोयीचा किं० अडचणीचा समय. **वेळमाऱ्या** वि० प्रसंगविशेषीं आपला कमीपणा प्रकटन होऊं देणारा;वेळ साजरी करणारा. **वेळसाधू,वेळ साधणारा** पु०सोयीचा समय पाहून आपलें इष्ट साधून घेणारा. **वेळां** क्रि० वि० खेपांस. संख्यावाचकांपुढें ‘ वेळां ’ योजतात; उ० पांच वेळां, दहा वेळां. **वेळाइत** पु० संकटाचे वेळीं धावून येऊन मदत करणारा.

**वेळ** [ सं० वेला ] स्त्री० समुद्रकांठ.

**वेळ** स्त्री० १ कोपरावर घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना. २ एक वनस्पति.

**वेळ अंवस** [म० वेळू+अंवस ( अमावास्या )] स्त्री० मार्गशीर्ष महिन्याची अमावास्या; इतर कांहीं ठिकाणीं कार्तिक महिन्याची अमावास्या. ह्या दिवशीं यात्रेकरू लोक पावा वाजविणाऱ्या श्रीकृष्णाच्या मूर्तीची पूजा करून नदींच्या कांठीं फराळ करतात.

**वेळकट, वेळकूट** [ म० वेळू+काठी ] न० वेळूची किं० चिव्याची काठी किं० तुकडा.

**वेळकाठी** स्त्री० वेळूची काठी; अखंड बांबू.

**वेळणी** स्त्री० १ भात वेळणें इ० कामीं योजतात तें मध्यें किंचित् खोलगट असें धातूचें ताट. २ धिरड्यासारखें एक तोंडीं लावणें.

**वेळणें** स० क्रि० ( भात, भाजी, इ० ) अर्धवट शिजलेली असतां त्यांतील ज्यादा पाणी हळूंच ओतून काढणें.

**वेळणें,वेळविणें** स० क्रि० ( डोकें,हात,पाय, मान, इ०) हालविणें किं० वळविणें किं० हासडणें.

**वेळवणी** [ म० वेळणें+पाणी ] न० भात, भाजी, इ० अर्धवट शिजलीं असतां त्यांतून काढून टाकलेलें ज्यादा पाणी.

**वेळवी** [ म० वेळू ] वि० वेळूचा; बांबूचा.

**वेळा** [ सं० एला ] स्त्री० लट्ठ वेलदोडा.

**वेळां** क्रि० वि० खेपांस. मागें‘वेळ’मध्येंपहा.

**वेळाइत** ‘ वेळ ’ मध्यें पहा.

**वेळावणें** [ म० वेळ ] अ० क्रि० ( जनावरें, मुलें, पिकें ) योग्य वेळीं काळजी न घेतल्याकारणानें बिघडणें किं० खराब होणें.

**वेळू** [ सं० वेणु ] पु० बांबू; चिवा. ** कोणेक ठिकाणीं बारा हात वेळू फिरत असणें** तेथें पराकाष्ठेचें दारिद्र असणें.टीप,–बारा हात लांबीच्या वेळूच्या टोकाला बांधलेली केरसुणी घरांत सामानसुमान नसल्याकारणानें मोकळेपणानें भिंती इ० झाडूं शकते. **वेळवावर बसविणें** ( किं० चढविणें ) कोणा भित्र्या किं० पुचाट माणसास कांहीं काम करावयास चेतविणें किं० भर देऊन उठविणें.

**वै** मागें ‘ वही ’ चार प्रतीकांत दिला आहे त्यांतील दुसरें, तिसरें, आणि चवथें, हीं तीन प्रतीकें पहा.

**वैकल्पिक** [ सं० ] वि० १ इच्छेवर अवलंबून असलेलें; ऐच्छिक. २अनिश्चित. ३ ज्याच्या संबंधानें मतभेद आहे असें.

**वैकल्य** [ सं० ] न० १ विकलत्व; अपूर्णत्व; उणें. २ अभाव; जें जेथें असावयास पाहिजे तें तेथें नसणें. ३ घोंदल; गोंधळ; गडबड. ४ असमर्थपणा; कमकुवतपणा.

**वैकळ** मागें ' वायकळ ' पहा.

**वैकाटी** स्त्री० कोष्ट्याच्या मागाच्या ओवीची पट्टी किं० पाचर.

**वैकुंठ** [ सं० ] १ विष्णु. २ इंद्र. न० विष्णूचा लोक. ह्या अर्थी ' वैकुंठभुवन ' न० सुद्धां. ❀ **वैकुंठचतुर्दशी** स्त्री० कार्तिक शुद्ध चतुर्दशी ही तिथि. **वैकुंठवासी** पु० मृत मनुष्याच्या नांवा-मागें हा शब्द योजतात,–विशेषतः वैष्णवसंप्र-दायाचे लोक. **वैकुंठसमाराधना** स्त्री० नवऱ्या मुलीच्या घरीं नवऱ्या मुलाच्या घरच्या आणि पक्षाच्या लोकांना दिलेली मेजवानी.

**वैकृत** [ सं० ] वि० १ बदललेला. २ बिघड-लेला. ३ विपरीत. ४ बीभत्स. ५ दोषयुक्त; व्यर्थ. ६ फक्त विशेष सांगितलेला ( यज्ञ ). न० १बदल; फेरफार; बिघाड. २ दुश्चिन्ह; अपशकुन.

**वैक्रान्त** [ सं० ] न० तुरमली नांवाचें रत्न-विशेष.

**वैक्लव, वैक्लव्य** [ सं० ] न० १ गोंधळ. २ व्याकुळ होणें. ३ निरुत्साह; खेद.

**वैखरी** [ सं० ] स्त्री० १ स्पष्ट उमटणारी वाणी. २ भाषण; वाणी. मागें 'परा,' 'पश्यन्ती,' 'मध्यमा' हे शब्द पहा.

**वैखानस** [ सं० ] पु० वानप्रस्थ; तपस्वी.

**वैगुण्य** [ सं० ] न० १ गुणांचा अभाव. २ अपुरतेपणा; कमीपणा. ३ व्यंग. ४ गुणांचा भिन्नपणा.

**वैचणें** [ सं० वि+विच् ] स० क्रि० सुपांत घालून सुपाला विशेष प्रकारची गति देऊन (तांदूळ, कणी, कणीक, सांजा, इ०)पृथक् करणें. ❀**वैचपाखड** स्त्री०व०ए०सुपांत घालून पाखडणें, कणी, कोंडा,इ०काढणें,इ० व्यापार समुच्चयानें.

**वैचक्षण्य** [ सं० ] न० १ नैपुण्य; शास्त्रा-दीशीं पूर्ण परिचय. २ हुशारी. ३ शोधकपणा.

**वैचित्र्य** [ सं० ] न० १ विविधता; भिन्न-पणा. २ चमत्कृतिजनकत्व; विचित्रपणा.३आश्चर्य.

**वैजयंती** [ सं० ] स्त्री० १ पताका. २ विष्णूची माळ. ३ मोत्यांचा हार. ४ एक प्रका-रची तुळस. [ वैधर्म्य.

**वैजात्य** [ सं० ] न० १ विविधपणा.२ भेद;

**वैडाल** [ सं० ] वि० मांजरासंबंधाचा. ❀ **वैडालव्रतिक** वि० कपटी, लुच्चा, आणि दुष्ट असून बाहेर पवित्रपणाचें किं० साधुत्वाचें रूप दाखविणारा.

**वैडूर्य** [ सं० ] न० एक रत्नविशेष.

**वैतरणी** [ सं० ] स्त्री० १ यमलोकची नदी. २ मृताचा वैतरणी नदीवरून प्रवास सुखानें व्हावयासाठीं ब्राह्मणाला देतात ती गाय.

**वैताग** [ सं० ' वित्याग ' चा अपभ्रंश ] पु० १ उद्योग, धंदा, प्रपंच, इ०मध्यें एका मागून एक अशीं विघ्नें येत गेल्यामुळें किं० आप्तेष्टांच्या वियोगामुळें किं० मरणामुळें मनाला वाटते ती खंती किं० किळस.२ आकस्मिक आलेली रागाची लहर,–जी आली असतां मनुष्य हावी ती हानि पथकरावयास सिद्ध होतो.

**वैतागणें** [ म० वैताग ] अ० क्रि० नाना प्रकारच्या अडचणी, संकटें, दुःखें, इ० मुळें चिडून जाऊन खिन्न किं० खट्टू होऊन बसणें; कंटाळणें; विटणें; विरक्त होणें.

**वैतालिक** [ सं० ] पु० १ स्तुतिस्तोत्रें म्हणून प्रातःकाळीं राजाला जागें करणारा अधिकारी. २ जादूगार; वेताळानुचर.

**वैदग्ध,वैदग्ध्य** न०, **वैदग्धी** स्त्री० [सं०] १ चातुर्य; नैपुण्य; पारंगतता. २ धूर्तपणा.३वक्रोक्ति. मागें'वक्र' मध्यें 'वक्रोक्ति' पहा.४सौंदर्य; शोभा.

**वैदर्भ** [ सं० ] न० वक्रोक्ति. मागें 'वक्र' मध्यें 'वक्रोक्ति' पहा. पु० हिरड्या सुजणें ही विकृति. **वैदर्भी** स्त्री० ( साहित्य ) समास कमी असणें ही ग्रंथरचनेची सरणी किं० शैली.

**वैदिक** [ सं० ] वि० वेदविहित; वेदांत सांगितलेलें; वेदाला अनुसरून असलेलें. न० वेद-वाक्य. पु० वेद पढलेला ब्राह्मण. ❀ **वैदिकी** वि० वैदिक ब्राह्मणासंबंधाचें. स्त्री० वैदिकाचा धंदा किं० दर्जा.

**वैदू** [ म० वैद्य ] पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. हे लोक औषधी मुळ्या, माला, औषधें, इ० विकून चरितार्थ चालवितात.

**वैदूर्य** [ सं० ] न० एक रत्नविशेष. 'वैडूर्य' ह्याच अर्थी.

**वैदेह** [ सं० ] पु० १ विदेह देशाचा राजा. २ वैश्य पुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांचा पुत्र. ३

वैश्य; वाणी. ४ अंतःपुराचा रखवालदार.
**वैदेही** स्त्री० जानकी,–रामाची पत्नी.

**वैद्य** [ सं० ] पु० १ विद्वान्. २ औषधें देऊन रोग बरे करणें ह्या शास्त्रांत वाकबगार आणि हा धंदा करणारा.❀**वैद्यक** न०वैद्यशास्त्र. **वैद्यकी** स्त्री०वैद्याचा धंदा.**वैद्यराज** पु०वैद्य( बहुमानांत ).

**वैद्यनाथ** [ म०वैजनाथ ]पु० शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं वैजनाथ हें एक.मागें ' ज्योति ' मध्यें हीं बारा ज्योतिर्लिंगें पहा.

**वैध** [ सं० ] वि० विधिविहित; यथाविधि असलेलें.

**वैधर्म्य** [ सं० ] न० १ भेद; भिन्नता; गुण, धर्म, इ० बाबतींत वेगळेपणा. २ विरोध. ३ अन्याय. ४ पाखंडमत; धर्माविरुद्ध आचरण.

**वैधव्य** [ सं० ] न० विधवेची स्थिति.

**वैधुर्य** [ सं० ] न० १ वियोग. २ चित्तक्षोभ.

**वैधृत** न०, **वैधृति** स्त्री० [ सं० ] १ सत्ताविसावा योग. २ चंद्र आणि सूर्य यांची एक सापेक्ष स्थिति. ही अशुभ सुचविते. ३ पोटांत एक शूल उठतो तो.

**वैनतेय** [ सं० ] पु० गरुड हा पक्षी.

**वैनसें** न० अ० व०, स्त्री० अ० व० मागें ' वनसें ' पहा.

**वैपरीत्य** [ सं० ] न० १ विपरीतपणा; उलटपणा. २ असंबद्धपणा.

**वैपुल्य** [ सं० ] न० विपुलपणा; पदार्थांची [ समृद्धि.

**वैफल्य** [सं०] न० विफलपणा; निष्फलपणा; व्यर्थता.

**वैभव** [ सं० ] न० १ ऐश्वर्य; समृद्धि. २ [ सामर्थ्य.

**वैमनस्य** [ सं० ] न० १ खेद; दुःख. २ वैर; बेबनाव. ३ खचलेपणाची स्थिति.

**वैमात्र, वैमात्रेय, वैमातृक** [ सं० ] पु० सावत्र बंधु.

**वैमुख** [सं०विमुख ]वि० मागें 'विमुख' पहा.

**वैमुख्य** [ सं० ] न० विमुखता; प्रतिकूलपणा.

**वैयधिकरण्य** [ सं० ] न० भिन्न किं० वेगळ्या अधिकरणांत असणें. चक्रपाणि ह्या शब्दाचा विग्रह करतांना ' चक्र ' प्रथमा विभक्तींत आणि 'पाणि'सप्तमी विभक्तींत येतो म्हणून 'चक्र'आणि 'पाणि' ह्यांच्यांत वैयधिकरण्य आहे. अधिकरण म्ह० स्थान ( सप्तमीचा अर्थ ). मागें ' अधिकरण ' चा अर्थ ६ पहा.

**वैयर्थ्य** [ सं० ] न० व्यर्थपणा; निष्फळता.

**वैयाकरण** [ सं० ] वि० व्याकरण शिकलेला किं० शिकणारा. वि० व्याकरणासंबंधाचा.

**वैयात्य** [ सं० ] न० १ निर्लज्जपणा. २धीटपणा; न लाजणें हा गुण.

**वैर** [ सं० ] न० शत्रुत्व; विरोध; द्वेष. ❀ **वैरशुद्धि, वैरप्रतिक्रिया** स्त्री०, **वैरनिर्यातन** न०, **वैरोद्धार** पु० सूड घेणें; उट्टें काढणें. **वैर उगाविणें** सूड घेणें.

**वैरक्त, वैरक्त्य** [सं०]न० १नावड; अप्रीति. २ संसार,व्यापार, इ०मध्यें गोडी न वाटणें किं० मन न रमणें; खंती; किळस.

**वैरंगिक** [ सं० ] वि०जितेंद्रिय;वैराग्यशील.

**वैरण** [ म० वैरणें ] स्त्री० १ गाय, म्हैस, घोडा, इ०चें खावयाचें जें अन्न,–कडबा,गवत,इ० तें. २ गुराच्या पुढें गवत, कडबा, इ०खाद्य गदबशीर रीतीनें घालतां यावें म्हणून जो उभ्या फळ्या इ० मांडून खळगा करतात तो; ओयरण; गव्हाणी. न०, स्त्री०दळते वेळीं जांत्याचे पाळींत किं० भाजते वेळीं कढईत एका खेपेला जें धान्य इ० घालतात तें. स्त्री० नवरी मुलगी लग्नाच्या समारंभांत अंगावर घेते ती चिरडी किं० साडी.

**वैरणें** स० क्रि० १ शिजवून भात करण्यासाठीं ( तांदूळ ) आधणांत ओतणें; दळावयासाठीं ( धान्य ) जांत्याच्या पाळींत थोडे थोडें घालणें. २ ( नको तो पदार्थ ) भलत्याच रीतीनें खर्चून किं०संपवून टाकणें.३(**लाक्षणिक**)नादान, दुर्गुणी, किं० म्हाताऱ्या नवऱ्याशीं ( लहान मुलगीचें ) लग्न करून देणें. ४ ( **लाक्षणिक** ) ( कांहीं गोष्टीचा टपका ) भलत्याच माणसावर लोटूं पाहणें.

**वैरणें** [ म० वैरणें ]न०एका खेपेस दळावयासाठीं,भाजावयासाठीं,किं०तळावयासाठीं घेतलेलें किं० काढलेलें धान्य इ०.

**वैरल्य** [ सं० ] न० विरळपणा.

**वैरस्य** [ सं० ] न० १ नीरसपणा; शुष्कपणा. २ अप्रीति; खंती; नावड.

**वैरा** पु० मागें ' ओयरा ' अर्थ १ पहा. ❀

**कोणेकाच्या घरीं मणाचा वैरा** (किं०**ओयरा**) **असणें** त्याच्या घरांत जेवणारीं माणसें पुष्कळ असणें. [ 'वैर' पहा.

**वैराकार** पु० शत्रुत्व; विरोध; द्वेष. मागें

**वैरागर** [ सं० वज्राकर ] पु० १ हिऱ्याची खाण. २ चिंतामणि हें रत्न.

**वैरागी, वैरागिक** [सं० वैरागिन्, वैरागिक] वि०विरक्त;प्रपंचाला कंटाळलेला;ज्याणें सर्व संगपरित्याग केला आहे असा.

**वैराग्य** [ सं० ] न० १ प्रपंचाबद्दल अप्रीति किं० अनासक्ति.२असंतोष.॥ **वैराग्यमाला** स्त्री० वैरागी लोक भिक्षा मागतांना हिंडतात तेव्हां ते गळ्यांत घालतात ती माळ. **वैराग्यमाला घेणें** किं० **वैराग्यमालेंत पडणें** संसार टाकून वैरागी होणें.

**वैराट** [ सं० ] वि० विराटा संबंधाचें.**वैराटि** पु० विराटाचा पुत्र उत्तर. **वैराटी** स्त्री० विराट राजाची कन्या उत्तरा.

**वैराण, वैराळ** पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम.

**वैराण,वैरान**[ फा० वैरानाह] वि० उध्वस्त; पडीत; ओसाड.॥**वैराणी** स्त्री० १ओसाडपणाची स्थिति. २देशाची नासाडी किं०बेचिरागपणाची स्थिति.

**वैरी** [ सं० वैरिन् ] पु० १ शत्रु; दुष्मन. २ योद्धा. ३ प्रतिपक्षी.

**वैरूप्य** [ सं० ] न० विरूपपणा; कुरूपता.

**वैल** मागें ' वाईल ' पहा. ॥ **वैलचूल** स्त्री० जिला वैल आहे अशी चूल.

**वैलंडी, वैलांडी** मागें 'वेलाटी''वेलांटी'पहा.

**वैलक्षण्य** [ सं० ] न० १ विलक्षणपणा;तऱ्हेवाईकपणा. २ उलटेपणा. ३ वैशिष्ट्य. ४भिन्नता.

**वैलाटी (–टी )** स्त्री० मागें ' वलाटी ' पहा.

**वैलोम्य** [ सं० ] न० विपरीतपणा; उलटपणा; उलटेपणा.

**वैवथणें** मागें ' वेवतणें, वेवंतणें ' पहा.

**वैवर्ण्य** [ सं० ] न० १ फिक्कटपणा; निस्तेजपणा. २ मलिनता. ३ फरक. ४ जातींतून बाहेर टाकलें जाणें.

**वैवस्वत** [ सं० ] पु० १ यम. २ शनि हा ग्रह. ३ सांप्रत चाललेल्या मन्वन्तराचा अधिकारी सातवा जो मनु तो.

**वैवाडा** [ म० वई+वाडा ] पु०घर इ०च्या भोंवतालचें पटांगण.

**वैवाहिक** [ सं० ] वि० १ विवाहासंबंधाचें; विवाहानें उत्पन्न झालेलें. २ विवाहाच्या उपयोगाची ( सामग्री ).पु०व्याही.न०,पु०लग्न;विवाह.

**वैशद्य** [ सं० ] न०, १ स्वच्छता. २ पांढरेपणा. ३ स्पष्टीकरण.४जागेची विपुलता; जागेचा अघळपघळपणा.

**वैशाख** [ सं० ] वि० विशाखा नक्षत्रानें युक्त. पु० हिंदूंच्या वर्षांतील दुसरा महिना. **वैशाखी** स्त्री० वैशाख महिन्याची पौर्णिमा. **वैशाखस्नान** न० वसंतमाधवाच्या प्रीत्यर्थ चैत्री पौर्णिमापासून वैशाखी पौर्णिमेपर्यंत सूर्योदयापूर्वी स्नान करणें किं० स्नान करण्याचा नियम.

**वैशिष्ट ,वैशिष्ट्य** [ सं० ] न० १ फरक. २ उत्कृष्टपणा. ३ सजातीय इतर वस्तूंहून कोणेक पदार्थाच्या अंगीं जो वेगळेपणा असतो तो.

**वैशेषिक** [ सं० ] वि० विशिष्ट; अतिशय. न० कणादाचें मत.पु०कणादाच्या तत्त्वज्ञानाचा अनुयायी. [भेद. २ श्रेष्ठत्व.

**वैशेष्य** [ सं० ] पु० १ विशिष्टपणा;भिन्नता;

**वैश्य** [ सं० ] पु० १ ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य,आणि शूद्र,अशा हिंदूंच्या ज्या चातुर्वर्ण्यात्मक चार जाति त्यांपैकीं तिसरी. २ व्यापार आणि शेतकी करणारी जी हिंदूंची जाति ती किं० त्या जातीचा कोणी माणूस. वि० तेज, गुण, धर्म, वीर्य, इ० बाबतींत कमी दर्जाचा किं० हलक्या प्रतीचा ( हिरा, भांग, इ० ).

**वैश्रवण** [ सं० ] पु० कुबेर,–धनाचा अधिपति देव.

**वैश्वदेव** [ सं० ] पु० (**मराठींत**) गृहस्थाश्रमी माणसाचा आह्निक कर्मांपैकीं एक विधि,–अग्नीला खाद्यान्नाची आहुति देणें ह्या रूपाचा.

**वैश्वानर** [ सं० ] पु० १ अग्नि. २ पोटांतील अग्नि; जठराग्नि. ३( **वेदान्त** ) स्थूलदेहाभिमानी आत्मा. ४ ( **वैद्यक** ) पित्त. ५ ( **वैद्यक** ) एक औषधी पाकविशेष.

**वैषम्य** [ सं० ] न० १ विषमपणा; भिन्नता. २ कठिणपणा. ३ संकट; संकटकाळ. ४(मराठींत) अप्रिय अशी कांहीं गोष्ट. ५ ( **मराठींत** )वितुष्ट; विमनस्कता . ६ ( **मराठींत** ) पक्षपात.

**वैषयिक** [ सं० ] वि० १ प्रपंचांत किं० संसारांत आसक्त. २ विषयसुखांत रमणारा.

**वैष्णव** [ सं० ] वि० श्रीविष्णूच्या संबंधाचें. पु० विष्णूचा भक्त. ॐ **वैष्णवी** वि० विष्णुभक्तांसंबंधाचा; वैष्णवांत रूढ किं० प्रचलित(रीति, आचार, इ० ).

**वैससे, व्हणजे, व्हणसे** [ म० बहीण ]स्त्री० नवऱ्याची बहीण ( अशिक्षितांत रूढि ).

**वैसारिण** [ सं० ] पु० मासा ( जलांत राहणारा प्राणी ).

**वो** [ म० हो, अहो ] उ० वा० अ० अहो !

**वोपणें** देणें. मागें ' ओपणें ' पहा.

**वोमाय** [ म० वधू+माय ] स्त्री० (लग्नाच्या समारंभांत ) नवऱ्या मुलीची आई.

**वोसंग** [ सं० उत्संग ] पु० मागें ' ओसंग ' पहा.

**वोसंडणें** मागें ' ओसंडणें ' पहा.

**वोसण** मागें ' ओसण ' पहा.

**वोसणणें** मागें ' ओसणणें ' पहा.

**वोहम** मागें ' वहीम, ' ' वहिमा ' पहा.

**वोळंगणें** मागें 'ओळंगणें' पहा.

**व्यंकटेश, व्यंकोबा** [ म० व्यंकट ( एक डोंगर )+ईश, बा ( प्रत्यय ) ] पु० कृष्णाचा एक अवतार. ॐ **व्यंकोबाचा गिरि** पु० व्यंकटेश देवाचें स्थान ज्यावर आहे तो डोंगर. ह्या स्थानीं हाण्या त्या महिन्यांत लग्नें,मुंजी, इ० विधि करण्यास हिंदूधर्माची मोकळीक आहे.

**व्यक्त** [ सं० ] वि० १ उघड केलेलें; स्पष्ट असलेलें; जाहीर. २ जें स्पष्टपणें इंद्रियगोचर झालें किं० होऊं शकतें तें.न० १ प्रकट होण्याची क्रिया. २ ( **वेदान्त** ) महत् हें तत्त्व. ॐ **व्यक्त गणित** न० अंकगणित. **व्यक्तराशि** पु० अंकांनीं दर्शविलेली संख्या.

**व्यक्ति** [सं०] स्त्री० १ प्रकट करणें ही क्रिया; प्रकटीकरण; आविष्करण; प्रकट होणें. २ व्यक्त पदार्थ; व्यक्त रूपांत असलेली वस्तु. ३ स्पष्टपणा. ४ पृथक्करण; वेगळें करणें. ५ स्पष्ट उच्चारण; स्पष्ट श्रवण; स्पष्ट कथन; उ० ते बोलत होते पण मला शब्दांची व्यक्ति झाली नाहीं. ६ व्यंजक शब्दादिकांपासून व्यंग्यार्थाचा बोध. ७ समूहांतील एक एक वस्तु पृथक्पणें,-जातीच्या व्यावर्तकत्वें. ८ फरक; तफावत. ९ ( कोणेकाचा कांहीं विशेष गुण सांगतांना ) एक माणूस; उ० ही भारी भांडखोर व्यक्ति आहे. १० विचित्र किं० तऱ्हेवाईक माणूस; अत्यन्त खोडकर, टवाळ, वात्रट, किं० द्वाड माणूस. ॐ **व्यक्तिस्वातन्त्र्य** न० आपल्या इच्छेस येईल तें बोलावयाला किं० करावयाला प्रत्येक माणसाला असते ती मोकळीक,-जर त्याचें तें बोलणें किं०करणें समाजाला अपायकारक नसलें तर. **व्यक्तिवाचक शब्द** पु० ( **व्याकरणांत** ) एक एकच व्यक्ति दाखविणारा शब्द,-जातिवाचक याच्या व्यावर्तकत्वें; उ० जवाहिरलाल, मोहनलाल, लंका, इ०.

**व्यंग** [ सं० ] वि० १ देहहीन; शरीररहित. २हात,पाय,इ० एकाद्या गात्रानें उणा.३लंगडा. ४ कोणत्याही भागानें किं० अवयवानें अपूर्ण(पदार्थ, माणूस ). न० १ कमीपणाची किं० लाजिरवाणी अशी कोणेकाची कांहीं गोष्ट. २त्वचेवरचा तीळ.

**व्यंगणें** मागें ' वेंगणें ' पहा.

**व्यंगुल** [ सं० ] न० अंगुलाचा साठावा हिस्सा,-लांबीचें एक प्रमाण. वि० बोट किं० बोटें नसलेला ( हात, पाय, माणूस ).

**व्यंग्य** [ सं० ] वि १ स्पष्ट न सांगितलेला; केवळ सुचविलेला. २ ( **साहित्य** ) व्यंजना शक्तीनें कळविलेला ( अर्थ ). न० गर्भितार्थ. ॐ **व्यंग्यार्थ** पु० वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ ह्यांची प्रतीति झाल्यावर देखील शब्दापासून आणखीही कधीं कधीं ज्यास्ती अर्थाची प्रतीति होते. हा जास्ती जो अर्थ तो व्यंग्यार्थ.हा व्यंग्यार्थ प्रतीतीस आणून देणारी जी शब्दशक्ति तिला'व्यंजना' म्हणतात आणि व्यंग्यार्थाच्या अपेक्षेनें त्या शब्दाला ' व्यंजक ' म्हणतात. 'गंगेवर गोळवाडा आहे ' ह्या वाक्यापासून शैत्य, पावनत्व, इ० धर्मांचें अस्तित्व हा जो अर्थ प्रतीत होतो तो ' गंगा 'ह्या शब्दाचा व्यंग्यार्थ.वाच्यार्थ,लक्ष्यार्थ, आणि व्यंग्यार्थ, असे शब्दांचे तीन प्रकारचे अर्थ

असतात. मागें ' वाच्य' मध्यें ' वाच्यार्थ ' पहा. मागें ' लक्ष्य ' मध्यें ' लक्ष्यार्थ ' पहा. ज्यास्ती खुलाशासाठीं आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' पहा. **व्यंग्योक्ति, व्यंगोक्ति** स्त्री० व्यंगरूप अर्थ ज्यांत आहे असें भाषण किं०लेखन.

**व्यग्र** [ सं० ] वि० १ अनेक गोष्टींकडे ज्याचें चित्त किं० लक्ष्य गेलें आहे असा. २ गोंधळलेला. ३ भांबावलेला. ४ कांहीं वाचन, लेखन, मनन, किं० चिंतन, ह्यांत तल्लीन झालेला.

**व्यंजक** [ सं० ] वि० १ दर्शक. २ गर्भितार्थ-सूचक. पु० १ हावभाव. २ चिन्ह; निशाणी. ३ व्यंग्यार्थ.

**व्यजन, व्यजनक** [ सं० ] न० पंखा,-वारा घेण्याचें किं० घालण्याचें साधनविशेष.

**व्यंजन** [ सं० ] न० १ उघड करणें. २ खूण; चिह्न; निशाणी. ३चटणी, कोशिंबीर,भाजी,इ० कोणतेंही तोंडीं लावणें. ४मसाला. ५दाढी, मिशा, इ० यौवन दशेचें चिह्न.६ ( व्याकरण ) क, ख, ग, इ० जे वर्ण ते प्रत्येक.७(साहित्य)गर्भितार्थाचें सूचन. **व्यंजना** स्त्री० १ स्पष्ट उच्चार. २ गर्भि-तार्थ; सूचितार्थ. ३ व्याजोक्ति. मागें ' व्यंग ' मध्यें ' व्यंजना ' शब्दाचा खुलासा पहा.

**व्यजित** मागें ' अजित ' आणि ' अजित जाणें ' पहा.

**व्यतिकर** [ सं० ] पु० १ मिश्रण. २ संयोग; संबंध. ३ दोन पदार्थ एकमेकांवर आपटणें; टक्कर. ४ अदलाबदल. ५ व्यत्यास;उलटेपणा. ६ चित्तांत झालेला क्षोभ.

**व्यतिक्रम** [ सं० ] पु० आज्ञा, नियम, इ०चें उल्लंघन. २ लोप; गळणें. ३ उद्दामपणा; मर्यादेचें उल्लंघन.४ अन्याय; दोष; अपराध. ५ उलटपणा; विपर्यय.

**व्यतिरिक्त** [ सं० ] वि० १ निराळें; भिन्न. २ दुसऱ्यावर सरशी मिळविणारा किं० ताण करणारा. ३ रहित; शून्य; उ० ज्ञानव्यतिरिक्त देह काष्ठोपम समजावा.४ ( मराठींत ) शिवाय, खेरीज; उ० भूताला बलि दिल्या व्यतिरिक्त तुमचा आजार हटणार नाहीं. **टीप,**-ह्या अर्थी ' व्यतिरिक्त ' हें श० यो० अ० प्रमाणें योज-ण्यांत येतें.

**व्यतिरेक** [ सं० ] पु० १ भेद; वेगळेपणा, २ वियोग. ३ वगळणें; गाळणें. ४ अपवाद. ५ ताण करणें; सरशी मिळविणें. ६ पृथग्भाग. ७ ( न्याय ) अभाव; अत्यन्ताभाव. साध्य आणि हेतु ह्या दोन्हींचा अभाव. पर्वतावर अग्नि आहे कारण पर्वतावर धूम आहे. येथें धूम हा अन्वयव्यतिरेकी हेतु आहे. कारण त्याचे ठायीं अन्वय व्याप्ति असून व्यतिरेक व्याप्ति आहे. मागें ' अन्वय ' मध्यें ' अन्वय व्याप्ति, ' ' व्यतिरेक व्याप्ति, ' आणि ' अन्वय व्यतिरेकी ' हे शब्द पहा. जेथें जेथें धूम असतो तेथें तेथें अग्नि असतो ही अन्वयव्याप्ति. जेथें जेथें अग्नि नसतो तेथें तेथें धूम नसतो ही व्यतिरेक व्याप्ति. ८ ( साहित्य ) एक अलंकार. उपमानापेक्षां उपमेयाच्या ठायीं कांहीं एका विशिष्ठ गुणाचा अधिकपणा आहे असें सांगावयाचें असतां केलेलें जें विधान त्याला ' व्यतिरेक ' म्हणतात. तसेंच उपमेयापेक्षां उपमानाचे ठायीं कांहीं एका गुणाचा कमीपणा आहे असें सांगावयासाठीं केलेलें जें विधान तोही व्यतिरेकच होय. उदा-हरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

**व्यतीत** [ सं० ] वि० १ होऊन गेलेलें; गत; गतकाळचें. २ मृत.

**व्यतीपात** [ सं० ] पु० १ अगदीं जाणें. २ पूर्ण भ्रंश. ३ अपमान.४ महा संकट; उत्पात; उप-द्रव. ५ ( ज्योतिष ) एक योगविशेष. विष्कंभ, प्रीति,आयुष्मान्,इ०फलज्योतिषांत सत्तावीस योग सांगितले आहेत त्यांत व्यतिपात हा सतरावा आहे.हा योग असतां संकटें प्राप्त होतात.यावरून चंचल, दुष्ट, आणि खोडकर पोरास ' व्यतिपात' किं० ' वितिपात ' म्हणण्याची रूढि बायकांत पडली आहे.

**व्यत्यय** [ सं० ] पु० १ अडथळा; चालू कामांत आलेली कांहीं हरकत किं० खोळंबा. २ विरोध; उलटपणा. ३ अदलाबदल; विपर्यास. ४ परस्परसंबंध.

**व्यत्यस्त** [सं०] वि० १ उलटें; विरुद्ध; विप-र्यस्त. २ असंबद्ध. ३ एकावर एक असे टाकलेले ( पाय, हात, इ० ). ४ तिरवागडें किं० आडवे तिडवें पडलेलें किं० टाकलेलें.

**व्यत्यास** [ सं० ] पु० १ बदल. २ विरोध. ३ उलटपणा. ४ ह्याचेबद्दल तें आणि त्याचेंबद्दल हें अशी फिरवाफिरव किं०अदलाबदल; विपर्यास.

**व्यथक** [ सं० ] वि० १ दुःखदायक; पीडादायक. २ अति भयंकर.

**व्यथा** [ सं० ] स्त्री० १ दुःख; पीडा. २ रोग ( आमांश, संग्रहिणी, इ० ); आधिरूप किं० व्याधिरूप दुःख. ❀ **व्यथानक, व्यथानीक** वि० १ द्वाड; त्रासदायक, उपद्रवकारक ( पोर, माणूस ). २ दुःखित. ३ रोगानें जर्जर. **व्यथिष्ट** वि० १ पुष्कळ दिवसांच्या आजारानें जर्जर झालेला. २ दमा, मूलव्याधि, इ०चिरस्थायी किं० पुष्कळ दिवस राहिलेल्या रोगानें जर्जर किं० पीडित. [ दुःखित.

**व्यथित** [ सं० ] वि० त्रास पावलेला;

**व्यधिकरण** [ सं० ] वि० १ समान अधिकरण ज्यांत नाहीं असा ( समास ). २ वेगळ्या अधिकरणीं म्ह० स्थानीं असलेला. ३ विरोधी. ४ ज्यामध्यें सरळ युक्तिवाद नाहीं असें ( भाषण, वाद ); वितंडवादाच्या रूपाचा. ❀ **व्यधिकरण बहुव्रीहि** पु० एक समास. ज्याचीं घटक दोन पदें एकाच विभक्तींत नाहींत असा बहुव्रीहीचा प्रकार; उ० खड्गहस्त म्ह० खड्ग आहे हस्तीं ज्याच्या असा ( योद्धा ).येथें 'खड्ग' प्रथमेंत असून 'हस्त' सप्तमींत आहे. हा व्यधिकरण बहुव्रीहि. 'नीलांबर' म्ह० निळें आहे अंबर म्ह० वस्त्र ज्याचें असा ( बलराम ). येथें 'नील'आणि'अंबर' हे दोन्ही शब्द प्रथमेंत आहेत. हा समानाधिकरण बहुव्रीहि समास.

**व्यपदेश** [ सं० ] पु० १ कळविणें; जाहीर करणें; माहिती. २ नांव देणें. ३ नांव;संज्ञा. ४ व्यवहार; शब्दप्रयोग. ५ लपविणें; वस्तूचें खरें रूप झाकणें. ६ सबब; मिष. ७ कपट.

**व्यपेक्ष** [ सं० ] वि० १ वाट पाहाणारा. २ उत्सुक. ३ उदासीन; निरपेक्ष. **व्यपेक्षा** स्त्री० १ इच्छा. २ लक्ष्य; काळजी; आदर. ३ जरूरी; गरज. ४ अन्योन्यसंबंध. ५ विनियोग.

**व्यभिचरित** [ सं० ] वि० उल्लंघिलेला किं० मोडलेला ( नियम, क्रम ); अपवादामुळें रद्द झालेला.

**व्यभिचार, व्यभीचार** [ सं० ] पु० १ उल्लंघन; योग्य किं० विशिष्ट सरणीचें अतिक्रमण. २ परस्त्रीगमन; परपुरुषगमन. ३ निंद्य आचार. ४ अपवाद. ५ चुकीचें किं० सदोष अनुमान. ६ ( न्याय ) कार्यकारणभावाचा भंग; हेतु असून साध्य नसणें. ७ नसणें; अभाव. ❀ **व्यभिचारी** [ सं० व्यभिचारिन् ] वि० १ नियम किं०शिरस्त उल्लंघिणारा किं० मोडणारा. २ दुर्मार्गगामी. ३ जारकर्मी. ४ अपवादक; अनियमित. ५ (न्याय) व्यभिचारयुक्त; हेतु असून साध्य नसणें ह्या रूपाचा. ६ अस्थिर, अशाश्वत ( ऐहिक वैभव इ० ). ७ खोटें. ❀ **व्यभिचारिभाव** पु० ( साहित्य ) मागें 'विभाव' शब्दांत पहा. व्यभिचारिभाव एकंदर तेहेतीस आहेत.

**व्यय** [ सं० ] पु० १ नाश; विध्वंस. २ खर्च. ३ भलत्याच कामीं खर्च. ❀ **व्ययी** वि०खर्चीक.

**व्यर्थ** [ सं० ] वि० १ निष्फळ. २ भलत्याच कामीं योजलेला किं० खर्चलेला. क्रि० वि० विनाकारण; उगीचच्या उगीच.

**व्यलीक** [ सं० ] वि० खोटें. न० १ अप्रिय भाषण किं० गोष्ट. २ लबाडी; फसवणूक.

**व्यवकलन** [ सं० ] न० १ पृथक्करण. २ वजा करणें. ३ वजाबाकी.

**व्यवकलित** [ सं० ] वि० वजा केलेलें.

**व्यवक्रोशन** [ सं० ] न० १ निंदा. २ शिवीगाळ.

**व्यवच्छिन्न** [ सं० ] वि० १ पृथक् केलेला. २ ( न्याय ) नक्की ठरविलेला; विशिष्ट रूपांत घातलेला; नियंत्रित.

**व्यवच्छेद** [ सं० ] पु० १ पृथक्करण. २ भेद; तफावत; भिन्नता. ३ निर्णय. विशेषत्वें कथन.

**व्यवच्छेदक** [ सं० ] वि० स्पष्ट करणारा; नियंत्रणा घालणारा.

**व्यवधा** [ सं० ] स्त्री० १ झाकण; आच्छादन. २ पडदा. ३ गुप्तपणा.

**व्यवधान** [ सं० ] न० १ आड येणें. २ अडथळा. ३ लपविणें; झाकणें. ४ आच्छादन; पडदा. ५ मधलें अंतर किं० जागा. ६ आड येणारा कोणताही पदार्थ. ७ खंड पडणें.

**व्यवधायक** [ सं० ] वि० १ आड येणारा

२ झाकणारा; लपविणारा. ३ खोळंबा करणारा.

**व्यवसा, वेवसाव, वेवसाय, विवसा, वेवसा** [ सं० व्यवसाय ] पु० खालीं 'व्यवसाय' पहा. हे सर्व शब्द ' व्यवसाय ' बद्दल अशिक्षितांत रूढ आहेत.

**व्यवसाय** [ सं० ] पु० १ उद्योग. २ धंदा; व्यापार. ३ निश्चय; निश्चितता. ४ कृत्य; वर्तन; अनुष्ठान. ५ नेटानें चालविलेलें कांहीं कृत्य. ॐ **व्यवसायी** [सं० व्यवसायिन् ] वि० १ उद्योगी; तत्पर. २ दृढनिश्चयी.

**व्यवसित** [ सं० ] वि० १ केलेलें. २ ठरविलेलें; निश्चित केलेलें. ३ निश्चययुक्त. ४ कांहीं कार्याला उद्युक्त किं० प्रवृत्त. न० १ कृत्य; उद्योग. २ व्यवसाय.

**व्यवस्था** [ सं० ] स्त्री० १ मांडणी; रचना. २ निश्चितपणा. ३ स्थैर्य. ४ स्थिति. ५ सापेक्ष स्थिति. ६ ठराव; निकाल. ७ करार. ८ शास्त्रमर्यादा.

**व्यवस्थान** [ सं० ] न० १ योग्य सरणीची मांडणी किं० रचना. २स्वस्थता;स्वास्थ्य.३ स्थिरपणानें राहणें; चिकाटी; स्थैर्य. टीप,–ह्या तीन्ही अर्थी ' व्यवस्थिति ' स्त्री० सुद्धां.

**व्यवस्थापक** [ सं० ] वि० १ नियामक; व्यवस्था लावणारा. २ कारभारी;कांहीं कामाची जबाबदारी वाहणारा.

**व्यवस्थित** [ सं० ] वि० १ योग्य सरणीनें ठेविलेलें, मांडलेलें, किं०जुळविलेलें.२ योग्य क्रमानें चालत असलेलें. ३ निश्चित केलेलें. ४ ठरविण्यांत आलेलें. ५ नीटनेटका ( सामान्यतः ).

**व्यवहर्ता** [ सं० व्यवहर्तृ ] पु० १ व्यापारी. २ फिर्यादी; वादी. ३ न्यायाधीश. ४ कोणीही कोणत्याहि प्रकारचा व्यवहार करणारा.

**व्यवहार** [ सं० ] पु० १ कृत्य; वर्तन.२कामकाज; कारभार. ३ कोणताही धंदा किं०उद्योग. ४ व्यापार; सावकारी. ५ न्याय देणें; न्यायाचा निर्णय करणें किं० ठरविणें. ६ खटल्याची चौकशी. ७ फिर्याद; खटला. ८ करार. ९ चालरीत; समाजाची शिस्त किं० सरणी. १० क्रयविक्रय, देवघेव, इ० रूप कामें.११ विशिष्ट सरणीनें चाललेली कोणतीही क्रिया. ॐ **व्यवहारी** [सं० व्यवहारिन् ] पु०१ फिर्यादी.२ व्यापारी. ३देवघेव करणारा; सावकार. ४ धंदा करणारा.**व्यवहारी बस्तानी** स्त्री० बाजारांत पैशाची समृद्धि किं० तुटवडा किती आहे हें मनांत न आणतां रुपयाचे सोळा गंडे किं० सोळा आणे ह्या ठरावावर देणें, घेणें, इ० व्यवहार करण्याची रीति. **व्यवहारी** वि० कोणत्याही परिमाणाचे हवे तितके सारखे सारखे भाग पाडून त्या भागांपैकीं अमुक भाग घेतले हें दाखविण्यासाठीं घेतलेल्या भागांचा आंकडा रेषेच्या वर मांडणें आणि पाडलेल्या भागांचा आंकडा त्या रेषेखालीं मांडणें ह्या रूपानें सांगितलेलें जें परिमाण तें व्यवहारी ( अपूर्णांक ). ह्या रेषेच्या वर मांडलेला जो अंक त्याला ' अंश ' म्हणतात, रेषेच्या खालीं मांडलेला जो अंक त्याला ' छेद ' म्हणतात. मागें ' अंश ' आणि 'छेद ' हे शब्द पहा. व्यवहारी अपूर्णांकाचे सहा प्रकार करण्यांत आले आहेत;–सम,विषम,भागानुबंध,भागजाति,प्रभागजाति आणि मिश्र.ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षा लहान असतो त्याला ' सम अपूर्णांक' म्हणतात; उ० $\frac{3}{4}$.ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षां लहान नसतो तो ' विषम अपूर्णांक'; उ० $\frac{3}{2}$, $\frac{5}{5}$, $\frac{6}{4}$, इ०. 'भागानुबंध, ' 'भागजाति, ' 'प्रभागजाति' ह्यांच्या व्याख्या मागें ' भाग ' मध्यें पहा. मिश्र अपूर्णांकाची व्याख्या मागें ' मिश्र ' शब्दांत पहा. **व्यवहारासन** न० न्यायाधीशाचें स्थान,–ज्यावर बसून तो खटले, फिर्यादी, इ०ची चौकशी करतो. **व्यवहारज्ञ** वि० १ सोळा वर्षांहून ज्यास्त वयाचा ( कायद्याच्या दृष्टीनें ). २ज्याला समाजांत कसें वागावें, देणें, घेणें, बोलणें, चालणें, कसें करावें, व्यापार, उदीम, कसा करावा, इ० गोष्टी ज्याला चांगल्या समजतात तो; आणि ज्याला त्या समजत नाहींत त्याला ' व्यवहारशून्य ' म्हणतात.

**व्यवहार्य** [सं०]वि० १ प्रचारांतलें. २ एकत्र भोजन इ० संबंधास योग्य.३ आचरणांत आणतां येईल असें; शक्य कोटींतील. ४ समाजांत जें चालेल, किं० जें पथकरलें जाईल, किं० जें मान्य होईल असें ( नाणें, वर्तन, मनुष्य, इ० ).

**व्यवहित** [ **सं०** ] **वि०** १ वेगळें केलेलें. २ आच्छादित; झाकलेलें. ३ अडविलेलें. ४ पडदा, भिंत, इ० नीं दूर सारलेला किं० वेगळा केलेला. ५ ज्यांत मधून मधून आडथळे येत आहेत असें ( काम, अभ्यास, हकीगत, इ० ).

**व्यवहृत** [ **सं०**] **वि०** कामीं लाविलेला किं० योजिलेला; व्यवहारांत आणलेला किं० असलेला.

**व्यवाय** [ **सं०** ] **पु०** १ पृथक्करण. २आच्छादन. ३ पडदा. ४ अडथळा; हरकत; आड येणें. ५ मैथुन; स्त्रीसंभोग; रतिविलास.

**व्यष्टि** [ **सं०** ] **स्त्री०** १ वेगळेपणा. २ व्यक्ति. ३ ( **वेदान्त** ) जीव. ४ संघटित पदार्थाचे जे घटक भाग ते प्रत्येक; ( अवयवीच्या अपेक्षेनें ) अवयव. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' समष्टि '

**व्यसन** [ **सं०** ] **न०** १ अपाय; ऱ्हास. २ संकट; विपत्ति; दुःख. ३ दुर्दैव. ४ ( **ज्योतिष** ) अस्त. ५ आसक्ति; छंद; नाद. ६ ( **मराठींत** ) दारू पिणें, रांडा, भांग, गांजा, तंबाखू, तपकीर, अफू, इ०च्या सेवनाची किं० उपभोगाची कोणेकाला जडलेली जी संवय ती. ॐ**व्यसनी वि०** १ ज्याला तंबाखू, दारू, रांडा, इ० चा नाद आहे असा. २आसक्त. ३ दुर्वर्तनी.

**व्यसु** [ **सं०** ] **वि०** ज्याच्या देहांतून प्राण निघून गेला आहे असा; मृत; मेलेला.

**व्यस्त** [ **सं०** ] **वि०** १ इतस्ततः फेकलेलें, पडलेलें, किं० उडविलेलें; पसरलेलें. २ भिन्न; वेगवेगळें. ३ अस्ताव्यस्त. ४ प्रतिकूळ. ५ (**गणित**) उलट प्रमाणाचें. पांच माणसें जें काम करतात त्याच्या दुप्पट काम दहा माणसें करतील. येथें कामकरी आणि काम ह्यांच्यांत सम प्रमाण आहे. चार माणसांना कांहीं कामाला वीस दिवस लागतात तर आठ माणसांना दहा दिवस लागतील, येथें कामकरी आणि काल ह्यांच्यांत व्यस्त प्रमाण आहे. ॐ **व्यस्ताव्यस्त वि०** अस्ताव्यस्त. मागें ' अस्ताव्यस्त ' पहा.

**व्यक्षर** [ **सं०** ] **वि०**निरक्षर; अशिक्षित; ढ.

**व्याकरण**[**सं०**] **न०**१पृथक्करण. २व्यक्त रूपांत आणणें किं०येणें; व्यक्त करणें किं० होणें. ३(**वेदान्त**) नामरूपांनीं स्पष्ट अशी जगताची उत्पत्ति. ४शब्दशास्त्र; शिष्टसंमत रीतीनें शब्दांची निवड करणें, त्यांचीं रूपें बनविणें, तीं वाक्यांत योग्य स्थानीं घालणें आणि अशा रीतीनें विचार व्यक्त करणें, ह्या संबंधाचें शास्त्र. **व्याकरणकार पु०** व्याकरणावर ग्रंथ लिहिला आहे ज्यानें तो; उ० पाणिनि हा एकच व्याकरणकार पहिल्या दर्जाचा होऊन गेला. **व्याकरणी वि०** व्याकरण शास्त्रांत निष्णात किं० पारंगत.

**व्याकीर्ण** [ **सं०** ] **वि०** अस्ताव्यस्त पडलेलें किं० टाकलेलें.

**व्याकुल** [ **सं०** ] **वि०** १ गोंधळलेला; काय करावें हें ज्याला सुचत नाहीं असा; कर्तव्यमूढ. २ विव्हळ; ग्रस्त; जर्जर; कासावीस; उ० तहानेनें माझे प्राण व्याकुळ झाले आहेत; ह० शोकव्याकुल. ३ भयभीत. ४ विस्कटलेला. ५ कोणत्याही कामांत निमग्न झालेला किं० गढून गेलेला.

**व्याकृति** [ **सं०** ] **स्त्री०** १ रूपान्तर. २ पृथक्करण. ३ स्पष्टीकरण. ४व्याकरण. मागें'व्याकरण सर्व अर्थी पहा.

**व्याकोश, व्याकोष** [ **सं०** ] **वि०** प्रफुल्लित; विकसित ( फूल, कळी ). [ विलाप.

**व्याक्रोश** [ **सं०** ] **पु०** १ आरडाओरडा. २

**व्याख्या** [ **सं०** ] **स्त्री०** १ सांगणें. २ स्पष्टीकरण; विवरण. ३ पदार्थाचें शास्त्रशुद्ध लक्षण,—अव्याप्ति आणि अतिव्याप्ति ह्यांनीं अदूषित. ४ ( **मराठींत** ) गुप्त गोष्टींची परिस्फुटता किं० बोभाटा; कोणेकाच्या निंद्य गोष्टी जाहीर करणें.

**व्याख्यात** [ **सं०** ] **वि०** स्पष्ट करून सांगितलेलें; ज्याचें लक्षण करण्यांत आलें आहे तें; स्पष्टावलेलें; ज्याचें विवरण किं० विवेचन केलें आहे असें.

**व्याख्याता** [ **सं०** व्याख्यातृ ] **पु०** १एकाद्या विषयाचें किं०वाक्याचें स्पष्टीकरण करणारा किं० उलगडा करणारा. २सभादिकांत एकाद्या विषयाचें सांगोपांग विवरण किं० विवेचन करणारा. ३ टीका करणारा.

**व्याख्यान** [ **सं०** ] **न०** १ स्पष्टीकरण; विवेचन; निरूपण. २ सभेंत एकाद्या विषयाचें किं० मुद्याचें सांगोपांग आणि साधक बाधक गोष्टी विचारांत घेऊन केलेलें भाषण ( करणें, देणें ).

**व्याघात** [ **सं०** ] **पु०** १ तडाखा; प्रहार. २

विघ्न; प्रतिबंध; अडथळा. ३ खोळंबा. ४ क्षय; नाश. ५ विरोध. ६ असंबद्ध भाषण. ७ सत्तावीस योगांतलि तेरावा. ८ (साहित्य) ज्या साधनानें एक मनुष्य एखादें कार्य करतो त्याच साधनानें दुसरा मनुष्य त्या कार्याचा नाश करतो, किं० त्याच्या उलट कार्य करतो आणि वरचढ ठरतो, असें वर्णन केलेलें असते तेथें व्याघात हा अलंकार होतो. विशेष तपशील आणि उदाहरणें इ० आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा.

**व्याघ्र** [सं०] पु० १ वाघ,–एक जंगली पशु. २ **(समासांतीं)** श्रेष्ठ; उ० नरव्याघ्र, पुरुषव्याघ्र, इ०. **व्याघ्री** स्त्री० वाघीण. ‌‌ **व्याघ्रनख** न० १ वाघनख,–एक सुगंधी द्रव्य. २ निवडुंग. ३ वाघनख. मागें 'वाघ' मध्यें 'वाघनख,' सर्व अर्थीं पहा. **व्याघ्रमुख** न० १ आरंभीं फार कठिण आणि विद्यार्थ्याला भिवविणारें असें कोणतेंही शास्त्र किं० कोणताही विषय. २ कठिण किं० दुर्बोध असा श्लोक, वाक्य, वचन, इ०. **व्याघ्रांबर** न० वाघाचें कातडें,–जें बसावयासाठीं वापरतात. **व्याघ्रांबरी तंबाखू** स्त्री० जिच्या पानांवर वाघाच्या अंगावरील पट्ट्यांसारखे पट्टे असतात अशी तंबाखूची जात. ही तंबाखू फार तहख आणि अमली असते. मागें 'वाघ' मध्यें 'वाघी तंबाखू' पहा.

**व्याज** [सं०] न० १ कपट. २ लपविणें. ३ निमित्त; मिष; ढोंग. **व्याजोक्ति** स्त्री० **(साहित्य)** विरुद्धार्थ ध्वनित करणारें भाषण. एकाद्या वस्तूचें गुप्त असलेलें स्वरूप कोणत्या तरी कारणामुळें प्रकट झालें असतां तें स्वरूप कोणच्या तरी सबबीवरून पुन्हा छपवून टाकण्यासाठीं केलेलें जें भाषण त्याला 'व्याजोक्ति' म्हणतात. विशेष खुलासा आमचे 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. **व्याजस्तुति** स्त्री० स्तुति करण्याच्या मिषानें निंदा केली असतां किं० निंदा करण्याच्या मिषानें स्तुति केली असतां 'व्याजस्तुति' हा अलंकार होतो. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. टीप,–ह्या प्रतीकांतील 'व्याज' शब्दांतील 'ज' चा उच्चार तालव्य.

**व्याज** [सं० वृद्धि] न० कोणा सावकारापासून कांहीं रकम उसनी आणली असतां त्या रकमेचा वापर करण्याबद्दल त्या सावकाराला विशिष्ट ठरावाप्रमाणें मुदला बाहेर जें देय द्यावें लागतें तें. उसन्या रकमेला 'मुद्दल' म्हणतात. मागें 'मुद्दल' पहा. **व्याजकटावणी** स्त्री० कटमितीनें व्याजाचा आकार करण्याचा जो प्रकार तो. **व्याजखाऊ, व्याजखोर** वि० १ जीवर व्याज भरावें लागलें अशी (रकम). ह्याच्या उलट 'बिनव्याजी.' २ जबर व्याज घेणारा (सावकार). **व्याजफैलावण (–णी), व्याजाची फैलावणी** स्त्री० जमेच्या रकमांचें व्याज वेगळें करावें, आणि नांवांकडील व्याज वेगळें करावें, आणि कमी असेल तें अधिकांतून वजा करून बाकी काढावी, असें व्याज करण्याचा जो प्रकार तो. **व्याजबट्टा** पु० कर्जाऊ रकमा देणें किं० घेणें, व्याजें घेणें किं० देणें, इ० रूप धंदा किं० व्यवहार; सावकारी; सराफी. **व्याजभरी** वि० कर्जें ज्याला फार आहेत आणि ज्याची बहुतेक मिळकत किं० प्राप्ति व्याजें भरण्यांत खर्च होते असा (मनुष्य). **व्याजाऊ, व्याजाव, व्याजी, व्याजू** वि० जीवर व्याज द्यावें लागतें अशी (कर्जाची रकम). टीप,–ह्या प्रतीकांतील 'व्याज' ह्या शब्दांतील 'ज' दन्ततालव्य.

**व्याध** [सं०] पु० १ पारधी; शिकारी. २ 'व्याधि' शब्दाचा अपभ्रंश. खालीं 'व्याधि' पहा.

**व्याधि** [सं०] पु० १ रोग; आजार. २ फार दिवस अंगांत मुरलेला कांहीं रोग. ३ रक्तपीति हा रोग. ४ **(मराठींत)** उपद्रव किं० उपद्रवी माणूस; शुक्लकाष्ठ. टीप,–'व्याधि' हा शब्द मराठींत कधीं कधीं स्त्री० ही योजतात. **महाव्याधि** पु० रक्तपीति. **व्याधित, व्याधिष्ट, व्याधिग्रस्त** वि० रक्तपीति, क्षय, शूल, इ० मोठा व्याधि जडला आहे ज्याला असा (मनुष्य).

**व्याधूत** [सं०] वि० हालविलेलें (चामर, शेपूट, इ०).

**व्यान** [सं०] पु० सर्व शरीरांत फिरणारा वायु,–पंचप्राणांपैकीं एक. हे पंचप्राण,–प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान.

**व्याप** [ सं० ' व्यापन ' चा म० अपभ्रंश ] पु० १ देणें घेणें, संसाराची जबाबदारी, नोकरी, इ०रूप कोणेकाच्या कामांचा जो भार किं०पसारा तो; उ० माझ्या मागें अनेक व्याप आहेत, तुझ्या भाऊबंधकींत लक्ष्य घालण्यास मला फुरसुत नाहीं. २ आपणा मागें जरूरी नसतां लावून घेतलेलें लचांड; उपद्याप. ॐ **व्याप तितका संताप** जरूर नसतां जितकीं कर्तव्यें किं० जबाबदाऱ्या पथकराव्या तितका त्रास अधिक.

**व्यापक** [ सं० ] वि० १ सर्वत्र पसरणारा किं० पसरलेला; उ० खालीं वर, पुढें मागें, इकडे तिकडे व्यापक असा हरीचा महिमा आहे. २ ज्यास्त विस्तृत; अधिक मोठा; अधिक मोठ्या विस्तारास लागू होणारा ( सिद्धान्त, नियम, इ०); उ० 'मनुष्य मर्त्य आहे'ह्या वाक्यांत मर्त्यत्व व्यापक आहे कारण तें गाय, म्हैस, इ० वरही असतें. याच्या व्यावर्तकत्वें ' संकुचित '. ३ ( न्याय ) नित्यसंबंधानें जुळलेला.

**व्यापणें** [ सं० वि+आप् ] स० क्रि० आच्छादणें; झाकणें. अ० क्रि० पसरणें; शिरणें; घुसणें; उ० विष जंव सर्वांगीं व्यापलें नाहीं तंव इलाज केला पाहिजे. [ मृत.

**व्यापन्न** [ सं० ] वि० १ संकटानें ग्रस्त. २

**व्यापादन** [ सं० ] न० १ नाश; वध; ठार मारणें. २ दुसऱ्याचें अनिष्ट चिंतिणें.

**व्यापादित** [ सं० ] वि० ठार मारलेला; विध्वस्त.

**व्यापार** [सं०] पु० १ उद्योग; क्रिया. २ उपयोगांत आणणें; प्रयोग. ३ उपद्याप; खटपट. ४ ( मराठींत ) क्रयविक्रयरूप व्यवहार; जिनसा विकत घेणें आणि नफ्यानें विकणें ह्या रूपाचा धंदा. ॐ **व्यापारी** वर सांगितलेला अर्थ ४-चा धंदा करणारा.

**व्यापारणें** [ म० व्यापार ] स०क्रि० ( शस्त्र, हत्यार, इ० साधन ) उपयोगांत आणणें किं० चालविणें म्ह० त्या त्या कार्याकडे योजणें.

**व्यापी** [ सं० व्यापिन् ] वि० व्यापणारा; उ० परमेश्वर सर्वव्यापी आहे.

**व्यापृत** [ सं० ] वि० १ गुंतलेला; कांहीं कामांत गुंतलेला. २ कामीं लाविलेला; उपयोगांत आणलेला.

**व्याप्त** [ सं० ] वि० १ वेष्टिलेलें; झाकलेलें. २ व्यापलेलें; भरलेलें; उ०मेघांनीं त्या वेळीं आकाश व्याप्त होतें. ३ समाविष्ट झालेलें. ४ ( न्याय ) नित्यसंबद्ध.

**व्याप्ति** [ सं० ] स्त्री० १ व्यापणें ही क्रिया. २ सर्वव्यापित्व. ३ ( न्याय ) नित्य साहचर्य. धूम आणि अग्नि ह्यांच्यांतील संबंधाप्रमाणे जो स्वाभाविक संबंध, जो औपाधिक नव्हे, त्याला व्याप्ति म्हणतात.४सर्वसामान्य नियम.

**व्याप्य** [ सं० ] वि० १ व्यापलें जाणारें. २ कमी विस्तृत. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' व्यापक. ३ (न्याय) हेतु. ॐ **व्याप्यत्व** न० समाविष्ट होणें. **व्याप्यत्वासिद्ध** पु० ( न्याय ) हेत्वाभासविशेष. **व्याप्यकोटी** स्त्री० ( विद्या, शौर्य, इ० रूप जें अधिक मोठें सामर्थ्य त्याच्या अपेक्षेनें ) लहान सामर्थ्याच्या माणसांचा वर्ग; उ० पुढारीपण आम्हास कसें घेतां येईल ? आम्ही व्याप्य कोटींतील माणसें. **व्याप्यकोटयन्तर्गत, व्याप्यकोटिप्रविष्ट** वि० व्याप्य कोटींत बसण्याच्या किं० पडण्याच्या दर्जाचा( माणूस ); मध्यम किं० खालच्या दर्ज्याचा माणूस ).

**व्याम** [ सं० ] पुं० वांव ही लांबी. मागें ' वांव ' पहा.

**व्यामर्ष** [ सं० ] पु० १ उत्सुकता; घाई. २ घर्षण; घासून काढणें; खरडणें.

**व्यामिश्र** [ सं० ] वि० १ मिश्र; मिसळलेलें. २ संशयित; संदिग्ध. ३ कांहीं कामांत व्यग्र.

**व्यामिश्रक** [ सं० ] न० प्राकृतभाषामिश्रित रूपक विशेष. रूपक म्ह० एक प्रकारचें नाटक.

**व्यामोह** [ सं० ] पु० १. गोंधळ. २ भ्रम; अज्ञान; भ्रांतिष्ट स्थिति.

**व्यायत** [ सं० ] वि० लांब; दीर्घ. २ विस्तृत. ३ उद्योगी; व्यापृत. ४ जोरदार; बलिष्ठ.

**व्यायाम** [ सं० ] पु० १ ताणणें. २ ओढाताण. ३ गात्रें बळकट करण्यासाठीं केलेले श्रम,—जोर काढणें, जोडी फिरविणें, बैठक, धावणें, इ०. ४ युद्ध; झगडा. ५ वांव ही लांबी. मागें ' वांव '

पहा. ❀ **व्यायामशाला स्त्री०** व्यायाम (अर्थ३) करावयाची जागा. **व्यायामिक पु०** तालीमबाज.

**व्यायोग** [ **सं०** ] **पु०** वीररसात्मक एकांकी रूपक किं० नाटक.

**व्याल** [ **सं०** ] **पु०** १ सर्प. २ हत्ती. ३ हिंस्र पशु; श्वापद. ❀ **व्यालग्राह पु०** गारुडी.

**व्याली** [ **म०** विणें; व्यालेली ] **वि०** जी प्रसूत झाली आहे अशी (गाय, म्हैस, इ०, किं० क्वचित् मानवी स्त्री ); उ० व्यालीची वेदना व्यालीच जाणे. [ २ अस्ताव्यस्त.

**व्यालोल** [ **सं०** ] **वि०** १ चंचल; हालणारें.

**व्यावर्तक** [ **सं०** ] **वि०** वेगळें करणारें. ❀ **व्यावर्तकत्व न०** भिन्नपणा; विरोध.

**व्यावर्तन** [ **सं०** ] **न०** १ गरगर फिरविणें. २ वगळणें; वेगळें करणें. ३ एकाद्या पदार्थाचें केलेलें लक्षण त्याच पदार्थास लागतें, इतरांस लागत नाहीं, असें दाखविणें किं० सिद्ध करणें. ह्या अर्थी ' व्यावृत्ति ' सुद्धां.

**व्यावर्त्य** [ **सं०** ] **वि०** कांहीं विशेष धर्म मनांत आणून जे वगळणें किं० बाजूस सारणें योग्य किं० जरूर आहे असें.

**व्यावहारिक** [ **सं०** ] **वि०** १ व्यवहारासंबंधाचें. २ प्रचारांतील; नेहमींचा. ❀ **व्यावहारिक नांव न०** सर्व लोक ज्या नांवानें कोणेकास ओळखतात तें नांव; चालतें किं० वाहतें नांव.

**व्यावृत्त** [ **सं०** ] **वि०** १ परत फिरलेलें; पराङ्मुख. २ वेगळें केलेलें; बाजूस सारलेलें; वगळलेलें.

**व्यावृत्ति** [ **सं०** ] **स्त्री०** १ आच्छादणें. २ गाळणें; वगळणें. ३ पृथक् करणें. ४ ( **न्याय** ) अभाव; अत्यन्ताभाव. ५ ( **मराठींत** ) पंचाइतीची स्थिति. ६ ( **मराठींत** ) त्रास, उपद्रव. ७ ( **मराठींत** ) शंका; कचर.

**व्यास** [ **सं०** ] **पु०** १ विस्तार. २ रचना. ३ व्यवस्था करणारा; व्यवस्थित रूपांत मांडणारा. ४ कंदी. ५ ( **गणित** ) वर्तुळाच्या मध्यांतून जाणारी आणि परिघाला दोन्ही टोकांनीं स्पर्शिणारी सरळ रेषा. ६ पुराण सांगणारा. ७ वेद, पुराणें, इ० ची व्यवस्थित मांडणी करणारा.

**व्यासपीठ न०** पुराण सांगतांना पुराणिक ज्या चवरंग इ० रूप आसनावर बसतो तें आसन किं० ह्या वेळीं तो पोथी ज्या लाकडी आधारविशेषावर ठेवितो तो आधारविशेष. **व्यासपूजा स्त्री०** १ आषाढ शुद्ध पौर्णिमेस करतात ती गुरुपूजा. २ पुराणाच्या समाप्तीस करतात ती पुराणिकाची पूजा. ३ कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेस करतात ती पुराणिकाचा सत्कार. ४ आषाढी पौर्णिमेस आपल्या गुरूचा किं० कुटुंबांत होऊन गेलेल्या संन्याशाचा करतात तो सत्कार.

**व्यासक्त** [ **सं०** ] **वि०** १ कोणत्याही कामांत निमग्न किं० आसक्त. २ गोंधळलेला.

**व्यासंग** [ **सं०** ] **पु०** १ आसक्ति; एकाद्या विषयाचा नाद किं० त्या विषयावर मेहनत करणें किं० त्याचा अभ्यास करणें. २ आदर; एकनिष्ठता. ३ वेगळेपणा. ❀ **व्यासंगी वि०** १ एकादा विषय, शास्त्र, कला, इ० चा मनःपूर्वक अभ्यास करणारा. २ नेहमी कांहीं तरी उद्योगांत गुंतलेला.

**व्याहत** [ **सं०** ] **वि०** १ विह्वल. २ नष्ट, हत. ३ कुंठित झालेलें. ४ परतविलेलें. ५ पराभविलेलें. ६ गोंधळलेला. ❀ **व्याहतार्थता स्त्री०** काव्यरचनेंतील एक दोषविशेष. एकाद्या वस्तूचा चांगलेपणा किं० वाईटपणा प्रथम सांगून नंतर लागलीच पहिल्या अर्थाच्या विरुद्ध अर्थाचें प्रतिपादन केल्यास हा दोष होतो. [ आवाज.

**व्याहार** [ **सं०** ] **पु०** १ बोलणें; भाषण. २

**व्याहाळ न०** अरण्य; जंगल.

**व्याही** [ **सं०** विवाही; **हिं०** बिवाही ] **पु०** आपल्या मुलाचा किं० मुलीचा सासरा. ❀ **व्याहीभोज पु०, व्याहीभोजन न०** लग्नाच्या समारंभांत आपल्या व्याह्यास आपण दिलेली मेजवानी.

**व्याहृत** [ **सं०** ] **वि०** बोललेलें. **न०** भाषण.

**व्याहृति** [ **सं०** ] **स्त्री०** १ उक्ति; भाषण. विधान. २ मंत्रविशेष; भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, आणि सत्यं, हे शब्द.

**व्याळ** मागें ' व्याल ' पहा.

**व्याक्षेप** [ **सं०** ] **पु०** १ अस्वस्थता. २ अडथळा. ३ उशीर; विलंब. ४ फेकणें ही क्रिया.

**व्याक्षोभ** [ **सं०** ] **पु०** काम, क्रोध, दया,

इ० कारणांमुळें चित्तांत होते ती अस्वस्थता.

**व्युत्क्रम** [ सं० ] **पु०** १ अतिक्रमण; उल्लंघन. २ उलट किं० विपरीत क्रम. ३ अव्यवस्था.

**व्युत्थान** [ सं० ] **न०** १ उभें करणें; उठविणें. २ स्वतंत्र वर्तन. ३ विरोध; अडथळा. ४ विरुद्ध आचरण; बंड. ५ समाधि उतरणें.

**व्युत्थित** [सं०] **वि०** शास्त्रविरुद्ध वागणारा.

**व्युत्थिति** [ सं० ] **स्त्री०** वर 'व्युत्थान' पहा.

**व्युत्पत्ति** [ सं० ] **स्त्री०** १ उगम; उत्पत्ति. २ शब्दाच्या घटक अवयवांपासून शब्दाची घटना किं० उत्पत्ति किं० ह्यासंबंधाचें शास्त्र. ३ विद्वत्ता; एकाद्या विषयांत प्रावीण्य; पांडित्य.

**व्युत्पन्न** [ सं० ] **वि०** १ ( **व्याकरण** ) साधित ( शब्द ). २ विद्वान्; पंडित. ३ प्रवीण ४ उत्पन्न झालेला किं० केलेला ( पदार्थ ).

**व्युत्पादक** [ सं० ] **वि०** १ शास्त्रादिव्युत्पत्ति जेणें करून होते असा ( ग्रंथादि ). २ उत्पन्न करणारा. ३ शब्दांची उत्पत्ति घटक अवयवांच्या रूपानें सांगणारा.

**व्युदास** [ सं० ] **पु०** १ निराकरण; नाकारणें; त्याग. २ वगळणें. ३ नाश; वध; भंग. ४ औदासीन्य.

**व्युपदेश** [ सं० ] **पु०** निमित्त; सबब.

**व्युपरत** [ सं० ] **वि०** थांबलेलें; बंद पडलेलें; मागें हटलेला.

**व्युपरम** [ सं० ] **पु०** १ थांबणें. २ विश्रांति.

**व्युपशम** [ सं० ] **पु०** १ शांतीचा अभाव. २ न थांबणें.

**व्यूढ** [ सं० ] **वि०** १ विशाल; रुंद. २ व्यवस्थितपणें रचलेलें. ३ विवाहित.

**व्यूह** [ सं० ] **पु०** १ सैन्यरचना; विहू. २ सैन्य. ३ समुदाय. ४ तर्कशास्त्र. ५ तर्क. ६ ( **मराठींत** ) एकाद्याला गोत्यांत आणण्यासाठीं केलेली मसलत. ७ ( **मराठींत** ) मनोरथ; आरंभिलेलें मोठें कार्य; बेत. मागें ' विभु ' पहा.

**व्योम** [ सं० व्योमन् ] **न०** आकाश. ॐ **व्योमकेश पु०** शंकर. **व्योमचारी** [ **सं०** व्योमचारिन् ] **पु०** १ पक्षी. २ देव. ३ आकाशस्थ ज्योति. **व्योमयान न०** विमान.

**व्रज** [ सं० ] **पु०** १ समुदाय. २ गोठा. ३ निवासस्थान. ४ गवळ्यांची वसति; गवळवाडा. ॐ **व्रजांगना स्त्री०** गवळणि. **व्रजकिशोर पु०** श्रीकृष्ण. [ पर्यटन; भटकणें.

**व्रज्या** [ सं० ] **स्त्री०** १ भिक्षेसाठीं हिंडणें. २

**व्रण** [ सं० ] **पु०** १ जखम; क्षत. २ गळूं. ३ फोड, गळूं, जखम, इ० बरे झाल्यावर त्वचेवर जें त्यांचें चिन्ह राहातें तें; वण.

**व्रत** [ सं० ] **न०** १ संकल्पपूर्वक अनुष्ठान; पुण्यकर्म; पुण्यप्राप्तीसाठीं पथकरलेलें कांहीं कृत्य,-जप, प्रदक्षिणा, दान, पठन, इ० रूप. २ कोणेकाची वर्तनाची ठरलेली सरणी; उ० लोकांच्या घरीं चहा न पिणें हें माझें व्रत आहे. ३दृढनिश्चयानें चालविलेली कांहीं वर्तनाची सरणी, किं० स्वकारलेला कांहीं नियम; उ० ज्यांणीं खादीचें व्रत चालविलें आहे ते स्तुतीस पात्र होत. ४वचन; उ० सत्यव्रत. ५ ब्रह्मचर्य. ॐ **व्रतादेश, व्रतबंध पु०** मुंज हा संस्कार. **व्रतचर्य पु०** ब्रह्मचारी. **व्रतचर्या स्त्री०** ब्रह्मचर्य. **व्रतभिक्षा स्त्री०** मुंज झाल्यानंतर भिक्षा मागणें. **व्रतस्थ पु०** ब्रह्मचारी. **व्रतस्नातक पु०** अध्ययन संपविण्याच्या पूर्वी ब्रह्मचर्य व्रत ज्यानें संपविलें आहे असा. **व्रतवैकल्य न०** पथकरलेल्या व्रतांत झालेला भंग किं० खंड. **व्रती, व्रतिक पु०** ज्यानें कांहीं व्रत चालविलें आहे किं० स्वीकारलें आहे असा.

**व्रतति, व्रतती** [ सं० ] **स्त्री०** वेल; वल्ली

**व्रात** [ सं० ] **पु०** १ समुदाय. २ लढ्याचें वऱ्हाड.

**व्रात्य** [ सं० ] **पु०** १ उपनयन न झाल्यामुळें बहिष्कृत झालेला ब्राह्मण. २ शूद्र पति आणि क्षत्रिय पत्नी ह्यांचा पुत्र. **वि०** ( **मराठींत** ) द्वाड; वात्रट; खोडकर. ॐ **व्रात्यस्तोम पु०** बहिष्कार घालविण्यासाठीं केलेला यज्ञ. [ विनय.

**व्रीडा** [ सं० ] **स्त्री०** १ लज्जा; लाज. २

**व्रीडित** [ सं० ] **वि०** लाजलेला; शरमलेला.

**व्रीहि** [ सं० ] **पु०, स्त्री०** १ भात ( धान्य )-जोंधळा, बाटाणा, इ० धान्य. २ भातगोटा.

**व्हन पु०** एक सोन्याचें नाणें.

**व्हाळ पु०, व्हाळी स्त्री०** [ म० ओहोळ ] ओढा; नाला ( अशिक्षितांत रूढ ).

# श

**श** मराठी व्यंजनमालेतील तिसावें व्यंजन.

**शक** [ **फा०** ] **पु०** संशय; शंका. ❀ **बेशक, बेलाशक क्रि० वि०** न भितां; न कचरतां; संकोच न बाळगतां.

**शक** [ **सं०** ] **पु०** १ एक अनार्य जाति किं० त्या जातीचा कोणी इसम. २ वर्षगणना,–विशेषत: शालिवाहन शक; उ० शालिवाहन शके १८५२ वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर टिळक महाविद्यालयाची पहिली तुकडी मिठाच्या सत्याग्रहासाठीं निघाली. ३ वर्चस्व; श्रेष्ठता; अधिकार; उ० तुझा शक माझ्यावर कसा चालेल ? ❀ **शक गाजविणें** १ प्रख्यातीस चढणें; नामांकित होणें. २ कोणेकावर आपलें वर्चस्व स्थापिणें.

**शकट** [ **सं०** ] **पु०**, **न०** १ गाडी. २ गाडीचा तळ. ३ छकडा. **पु०** १ पाचरीच्या आकाराची सैन्यरचना. २ रोहिणी हें नक्षत्र,–ज्याचे पांच तारे गाडीच्या रूपानें आहेत. ३ कामांत आडथळा आणणारी कांहीं गोष्ट किं० कोणी माणूस. ❀ **शकटभेद पु०** १ रोहिणी नक्षत्राच्या पांच ताऱ्यांमधून चंद्र किं० कोणताही ग्रह गेल्यानें त्या शकटाचा होतो तो भेद. २ सैन्याच्या शकटाकार रचनेची शत्रूनें केलेली दाणादाण. ३ शत्रूची किं० प्रतिपक्षाची हिकमत निष्फल करणें. **शकटभेद पु० अ० व०** युक्त्या; हिकमती; कावे. **शकटव्यूह पु०** पाचरीच्या आकाराची सैन्यरचना.

**शकणें** [ **सं०** शक् ] **अ० क्रि०** कांहीं गोष्ट करण्याला समर्थ असणें किं० होणें; उ० हें मी करूं शकेन. **टीप**,–पूर्वी 'शकणें' हें उपयुक्त क्रियापद भाषणलेखनांत टाळलें जात असे. हल्लीं तें सरसहा योजण्यांत येतें.

**शंकणें** [ **सं०** शंक् ] **अ० क्रि०** १ कचरणें. २ साशंक होणें; शंकित होणें.

**शंकनीय** [ **सं०** ] **वि०** संशयित; शंकास्पद असलेलें.

**शंकर** [ **सं०** ] **वि०** १ सुखकर. २ शुभ; मंगल.–**पु०** कैलासनाथ; पार्वतीपति. ❀ **शंकरावास पु०** कैलास.

**शंकराचार्य पु०** अद्वैत वेदान्ताचा संस्थापक किं० त्याच्या गादीवरचा कोणीही आचार्य.

**शंकरकोरा पु०** एक पक्षी.

**शंकरपाळा** [ **फा०** शक्करपारह् ] **पु०** एक खाद्यविशेष.

**शंकरा, शंकराभरण पु०** एक रागविशेष.

**शकल** [ **सं०** ] **पु०**, **न०** १ तुकडा; खंड. २ मोठा ग्रंथ बाळगावयाला गैरसोयीचा होतो म्हणून त्याचे जे लहान लहान दोन, तीन, इ० भाग वेगळे वेगळे बांधलेले असतात ते प्रत्येक; उ० महाराष्ट्र ज्ञानकोशाचे पंचवीस शकल आहेत. देवापुढें नारळ फोडला असतां जीं दोन अर्धुकें होतात तीं प्रत्येक.

**शकल, शक्कल** [ **अ०** शक्ल ] **स्त्री०** युक्ति; हिकमत; कुंठित झालेलें काम पुन्हा चालू करण्यासाठीं योजलेली युक्ति किं० तोड. **स्त्री०**, **न०** काम, कारभार, इ० ची रूपरेषा किं० स्वरूप.

**शकस्त, शकस** पुढें 'शिकस्त' पहा.

**शंका** [ **सं०** ] **स्त्री०** १ संशय. २ काकूं करणें; कचर. ३ भीति. ४ भ्रम; भ्रांति. ५ (**न्याय**) हरकत; आक्षेप. ६ लघवी किं० शौचविधि ह्यांची भावना,–जी लोकांत स्पष्टपणें बोलून दाखविण्याला मनुष्य कचरतो. **लघुशंका स्त्री०** लघवी,–'दीर्घशंका' च्या अपेक्षेनें. **दीर्घशंका स्त्री०** १ शौचविधि. येथें 'दीर्घ' शब्द बहुधा गाळला जातो. २ मूर्खपणाची किं० कुत्सितपणाची शंका किं० संशय. **शंकाशील वि०** कचरण्याच्या स्वभावाचा; भितरा. **शंकित वि०** ज्याला कांहीं विषयांत शंका आहे असा.

**शंकासूर, संकासूर पु०** शेंगा ज्या झाडांना येतात त्यांच्या वर्गांतील एक झाड किं० त्या झाडाचें फूल.

**शंकु** [ **सं०** ] **पु०** १ भाला; बरची. २ गुरगुजा नांवाचें शस्त्र. ३ बाणाचें टोक. ४ खिळा; मेख. ५ खांब. ६ भूमितींतील आकृतिविशेष. ७ (**ज्योतिष**) बारा

अंगुळें लांब असा अणकुचीदार खिळा,–छायेवरून कालगणतीसाठीं योजतात तो. ८ (गणित) दहा कोटि ही संख्या. ९ खालची बाजू वर्तुळरूप असून वर गायदुमाप्रमाणें निमुळती होत गेलेली आकृति. शंकुच्छाया स्त्री० शंकूची (अर्थ ७) छाया.

**शकुन** [ सं० ] पु० १ पक्षी. पु० १ शुभाशुभसूचक चिन्ह. २ शुभ चिन्ह. ३ जोशाला विचारलेला पुढच्या गोष्टीसंबंधाचा प्रश्न किं० त्यावर जोशानें दिलेलें उत्तर. ॐ **शकुनगांठ बांधणें** पुढें होणाऱ्या गोष्टीची अटकळ मनांत करून ठेवणें. **टीप**–कोणी माणूस एकाद्या कार्याला निघाला असतां त्याला प्रथम जो शकुन होतो तो चांगला किं० वाईट असेल त्याप्रमाणें त्या कार्यांत त्याला यश किं० अपयश मिळेल अशी त्या माणसाला अटकळ बांधतां येते. त्या शकुनाची आठवण राहाण्यासाठीं तो पदराला गांठ बांधतो तिला ' शकुनगांठ ' म्हणतात. ही गांठ शुभाची किं० अशुभाची असते. ' शकुनगांठ ' याच्याबद्दल ' गांठ ' किं० 'खूणगांठ ' असेंही म्हणतात; उ० ह्या रामाची संगत तुझ्या नुकसानीस कारण होईल अशी मी दोन महिन्यांपूर्वी शकुनगांठ बांधून ठेविली होती ( म्ह० अशी मी अटकळ करून ठेविली होती किं० अशी माझी खातरी होऊन चुकली होती ). **शकुनवंती** स्त्री० शकुन पाहातांना जोशी लोक ज्या कोष्टकांवरून तर्क बसवितात त्या कोष्टकांची वही.

**शकुनउंडा** पु० एक पक्वान्नविशेष.

**शकुनि** [ सं० ] पु० १ पक्षी. २ गिधाड. ३ बवादिकरणांतील आठवें करण. ४ दुर्योधनाचा मामा. ॐ **शकुनिमामा** पु० नुकसानीचा उपदेश करणारा कोणीही दुष्ट माणूस.

**शकून** [ अ० सखुन्=शब्द ] पु० शब्द; भाषण; कांहीं विधान. ॐ **कोणेकाच्या शकुनांत असणें** ( किं० **चालणें** किं० **वागणें** ) त्याच्या इच्छेला सर्वथैव अनुसरून वागणें. **कोणेकाचा शकून घेणें** त्याची सल्लामसलत विचारणें. **कोणेकाचा शकून न घेणें** त्याच्या समागमें किं० संगतींत न राहणें.

**शकृत्** [ सं० ] न० विष्ठा.

**शके** [ सं० ' शक ' च्या सप्तमीचें ए०व० ] क्रि० वि० शकाच्या वर्षी; उ० हा कोश शके १८४९ ह्या वर्षी सुरू झाला.

**शंकेश्वर** मार्गें ' शंकासूर ' पहा.

**शक्त** [ सं० ] वि० १ समर्थ; लायक. २ शक्तियुक्त, अर्थबोधक ( शब्द ).

**शक्ति** [ सं० ] स्त्री० १ बळ; ताकद; सामर्थ्य; लायकी. २ राजाचें सामर्थ्य,–प्रभाव, उत्साह, आणि मंत्र ( म्ह० मसलत ) ह्या रूपाचें. ३ कर्तृत्वशक्ति. ४ (**साहित्य**) शब्दाची अर्थबोधकता. वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, आणि व्यंग्यार्थ, हे जे शब्दांचे तीन प्रकारचे अर्थ असतात ते त्या शब्दांना ज्या सामर्थ्यानें प्राप्त होतात त्याला ' शब्दशक्ति ' किं० ' वृत्ति ' म्हणतात. ५ (**साहित्य**) मुख्य अर्थ. ६ ईश्वराची जी योगमाया ती,–जिचे पार्वती, लक्ष्मी, इ० हे अवतार आहेत. तिच्या उपासकांना ' शाक्त ' म्हणतात. ७ युद्धांतील एक हत्यार किं० आयुध,–ज्याला 'सैति' किं० 'कासू' म्हणतात. ८ यज्ञादिकांच्या योगानें लढाईत उपयोगी पडणारें जें समर्थ आयुध प्राप्त करून घेतां येतें तें; उ० इंद्रजितानें लक्ष्मणावर एक शक्ति फेकली तिच्या योगानें लक्ष्मण मूर्च्छित झाला. ८ चैतन्य. ९ स्त्रीपुरुष हें जें मिथुन त्यांतील स्त्री. ॐ **शक्तिधर** पु० कार्तिकेय,–देवांचा सेनापति. **शक्तिनाथ** पु० शंकर. **शक्तिग्रह** पु० १ शब्दाचा अर्थ. २ अमुक शब्दाचा अर्थ अमुक आहे असें ठरविण्यास साधनभूत जी रूढि, कोश, व्याकरण, इ० त्यांच्या समुच्चयाचें सामर्थ्य. ३ ( **मराठींत** ) तर्क; समजूत; अनुमान; उ० त्याच्या वेषावरून तो साधु असावा असा माझा शक्तिग्रह झाला. ४ पदार्थमात्राच्या स्वरूपाचा बोध. **शक्तिग्राहक** वि० अमुक शब्दाचा अमुक अर्थ घ्यावयाचा असें ठरविण्यास साधनभूत ( रूढि, कोश, व्याकरण, इ० ). **शक्तिपात** पु० १ रोग, उपास, काळजी, इ० मुळें होतो तो शक्तीचा ऱ्हास. २ मंत्र इ० सामर्थ्य,–गुरूनें

शिष्यास दिलेलें. **शक्तिमंत, शक्तिमान्** वि० ज्याचे ठायीं शक्ति आहे असा; बळवान्; समर्थ. **शक्तिक्षीण, क्षीणशक्ति** वि० दुर्बळ; ज्याची कांहीं कारणानें शक्ति लोपली आहे असा. **शक्त्यनुसार, शक्त्यनुरूप** क्रि० वि० शक्तीप्रमाणें. **शक्तिचक्र** न० ( **वेदान्त** ) जग,–जें मायारूप आहे; माया. **शक्तित्रय** न० प्रभुत्व, उत्साह, आणि मसलत, हीं तीन सामर्थ्यें समुच्चयानें. वर ' शक्ति ' अर्थ २ पहा. **शक्तिपूजा** स्त्री० देवींची उपासना. मागें ' शक्ति ' अर्थ ६ पहा. **यथाशक्ति** क्रि० वि० सर्व शक्ति वेचून; सामर्थ्याप्रमाणें; आपल्या शक्तीप्रमाणें.

**शक्य** [ सं० ] वि० १ करतां येण्याजोगें. २ संभवनीय. ३ जें घडूं शकेल असें. ४ ( **साहित्य** ) मूळचा ( अर्थ ). ५ अमुक शब्दानें दर्शवितां येईल असा ( अर्थ ). ६ ज्या क्रियापदाच्या रूपांत कर्त्याच्या शक्तीचा अर्थ असतो तें शक्य ( क्रियापद ); उ० हें काम माझ्यानें करवतें. येथें ' करवतें ' हें शक्य क्रियापद होय.

**शक्र** [ सं० ] पु० १ इंद्र,–देवांचा अधिपति. ※ **शक्राणी** स्त्री० इंद्राची पत्नी,–शची.

**शंख** [ सं० ] पु० १ समुद्रादिकांत राहणारा एक जलजंतुविशेष. २ ह्या जलजंतूचें रहावयाचें घर,–हें शंकराची पूजा इ० प्रसंगीं वाजवितात. ३ ह्या द्वितीयार्थक शंखाच्या आकाराचें रेषारूप जें चिन्ह अंगुल्यादिकांवर असतें तें. ४ नवनिधींपैकीं एक. हें नवनिधि मागें ' निधि ' मध्यें पहा. ५ ( **गणित** ) दहा निखर्व ही संख्या. ६ कपाळाचें हाड. ७ कानशील. ८ ( **लाक्षणिक** ) मूर्ख किं० अडाणी माणूस. ९ ( **लाक्षणिक** ) अभाव; पूज्य; शून्य; उ० बुद्धीच्या नांवानें किं० अकलेच्या नांवानें शंख ( म्ह० बुद्धिहीन, बेअकली ). ※ **शंख करणें** बोंबलणें; ओरडणें; विलाप करणें. **एकाद्या पदार्थाचा शंख वाजणें** त्याचा तोटा येणें; तो न पुरणें, तो संपणें ( वात्रटपणांत ). **कोणेकाचा शंख वाजणें** तो पराभूत होणें ( वात्रटपणांत ). **परीक्षेंत कोणेकाचा शंख वाजणें** तो परीक्षेंत न उतरणें ( वात्रटपणांत ). **एकाद्याच्या नांवानें शंख करणें** त्याला दोष देणें किं० निंदणें; त्याच्यावर टपका ठेवणें. **शंखासारखें** वि० स्वच्छ, निर्मळ ( पाणी ). **शंखद्राव** पु० औषधासाठीं केलेला शंखाचा द्रव. **शंखध्मा** पु० १ पालखीपुढें, देवाच्या पूजेमध्यें, किं० युद्ध इ० प्रसंगीं मोठ्यानें शंख फुंकून ध्वनि काढणारा माणूस. २ शंखोबा; मूर्ख; बेअकली माणूस. **शंखध्वनि** पु० १ शंखांतून काढलेला ध्वनि. २ बोंबलण्याची क्रिया (करणें). **शंखमणि** पु० दिसण्यांत गोरा, गोमटा, सुंदर, पण विद्या, कला, इ० नीं विरहित असा माणूस. **शंखासुर** पु० एक दैत्यविशेष. **शंखिनी** स्त्री० १ कांहीं विशिष्ट लक्षणांनी युक्त अशी स्त्री.केश लांब, बांधा उंच, प्रकृति तापट आणि कामी, अशा लक्षणांची स्त्री. २ अगदीं थोडें दूध देणारी गाय. ३ गोगलगाय. **शंखक्षीर** न० ( **लाक्षणिक** ) अशक्य गोष्ट,–वंध्यापुत्र, शशशृंग, खपुष्प, इ० प्रमाणें. **शंखवणी** न० १ देवावर अभिषेक करण्यासाठीं शंखांत घातलेलें पाणी. २ स्वच्छ, निर्मळ पाणी. ३ फार पाणी घातल्यामुळें बेचव ( ताक, दूध, इ० ). **शंखाचें** न० बोंबलणें. **शंख्या** वि० १ मूर्ख. २ दुर्दैवी.

**शंखळा** पुढें ' शृंखला ' पहा.

**शट्कर्णी** पुढें ' षट्कर्णी ' पहा.

**शठ** [ सं० ] पु० १ ठग; धूर्त. २ ( **साहित्य** ) बाह्यात्कारी प्रेम दाखविणारा पुरुष. ※ **शठे शाठ्यं समाचरेत्** लबाडाशीं लबाडी करावी; लबाडाला लबाडीनें जिंकावें. **शठाई** स्त्री० लबाडी, लुच्चेगिरी.

**शंड, शंढ, षंढ** [ सं० ] पु० १ नपुंसक; ज्याचे ठायीं पुरुषत्व नाहीं असा. २ ( **लाक्षणिक** ) कर्तृत्वशून्य माणूस.

**शण** [ सं० ] न० ताग,–दोर्‍या करण्याकडे योजतात तो. ※ **शणसूत्र** न० तागाचा दोरा किं० दोरी.

**शत** [ सं० ] न० शंभर. ※ **शतांग** पु० रथ. **शतावरी** स्त्री० १ एक वनस्पति. २ इंद्रपत्नी. **शतकुंभ, शातकुंभ** न० सोनें हा धातु. **शतकोटि** पु० १ इंद्राचें वज्र. २ हिरा हें

रत्न. **शतक्रतु पु०** १ इंद्र. २ इंद्रपद प्राप्त होण्यासाठी करावे लागतात ते शंभर क्रतु (म्ह० यज्ञ). ३ (**मराठींत**) अचाट, दुर्घट, किं० मोठ्या पराक्रमाचें कांहीं कृत्य; उ० जन्मास आल्यापासून हें देऊळ मी बांधलें एवढा शतक्रतु केला; उ० घरचें काम होईना ते बाहेर जाऊन तुम्हीं काय शतक्रतु करणार आहां? **शतगुण वि०** शंभरपट. **क्रि० वि०** शंभरपटीनें. **शतधृत न०** (**वैद्यक**) शंभर वेळां पाण्यानें धुवून काढलेलें घृत (म्ह० तूप). **शतघ्नी स्त्री०** एक शस्त्र,–लोखंडी कांटे लाविलेला सोटा. **शतचिंध्या स्त्री० अ० व०** शंभर म्ह० पुष्कळ ठिकाणीं फाटलेलें वस्त्र, धोतर, अंगरखा, इ०; उ० ह्या शतचिंध्या नेसून तुम्हीं सभेला जाणार काय? **शतचूर्ण न०** अगदीं फुटलेपणाची स्थिति. वि० अगदीं भग्न. **शततारका स्त्री०** चोविसावें नक्षत्र. **शतपत्र न०** कमळ. **शतपथ पु०** शुक्लयजुर्वेदाचें ब्राह्मण. **शतच्छंदी वि०** हरएक प्रकारच्या लबाड्या, लुच्चेगिऱ्या, किं० भामटेगिऱ्या करण्यांत पटाईत. **शतंजीव उ० वा० अ०** (**शब्दशः**) शंभर वर्षें जग (म्ह० जिवंत रहा). कोणाला शिंक आली किं० येत असली म्हणजे ह्या शब्दानें त्याला आशीर्वाद देतात. 'शतं जीव शरदः शतं' ह्या वाक्याचें 'शतं जीव' हें तोकडें रूप आहे. **शतधौत वि०** औषधार्थ शंभर वेळां पाण्यांत धुतलेलें (तूप). **शतपदी स्त्री०** गोम किं० घोण हा किडा. **शतपाद न०** (**वैद्यक**) तैलविशेष. **शतमख, शतमन्यु पु०** इंद्र. **शतलोचन पु०** इंद्र. **शतशः क्रि० वि०** १ शेकडों. २ शंभर वेळां. **शतह्रदा स्त्री०** १ वीज. २ वज्र. **शतक न०** एक शेकडा; शंभरांचा समुदाय. **शती** [ **सं०** शतिन् ] **वि०** शंभराचा मालक. **शतकृत्य न०** मोठें पराक्रमाचें कृत्य. **शतपावली स्त्री०** भोजनानंतर अन्नाचा परिपाक योग्य प्रकारें व्हावा म्हणून घरांतल्या घरांत थोड्याशा फेऱ्या करणें (शब्दशः, शंभर पावलें चालणें). **शतंभीष्म पु०** शंभर भीष्म म्ह० भीष्माहून शंभरपटीनें पराक्रमी पुरुष; उ० अरे जा! तूं काय माझें वाकडें करणार आहेस? तुझ्यासारखे पुष्कळ शतंभीष्म मीं लोळविले आहेत! **शतमर्दी स्त्री०** पुढें 'शतंमर्दी' पहा. **शतमान वि०** शंभर आहे मोजदाद ज्याची असें (आयुष्य, दक्षिणा, इ०); शंभर. **शतमारी वि०** १ शंभर रोगांवर लागू पडणारें (औषध). २ शंभर (म्ह० सर्व) रोग बरे करणारा वैद्य. ३ शंभर रोगी मारण्यांत पटाईत (वैद्य) म्ह० ज्याच्या हाताला यश नाहीं असा (वैद्य). **शतमूर्ख वि०** अत्यन्त मूर्ख किं० अडाणी (माणूस). **शतवार्षिक वि०** १ शंभर वर्षांनीं करावयाचा (विधि, उत्सव, इ०). २ शंभर वर्षें टिकणारा, जगणारा, किं० चालणारा. ३ दर शंभर वर्षांनीं करावयाचा, व्हावयाचा, किं० होणारा. ४ शंभर वर्षें जगलेला (माणूस). **शतशाख वि०** शंभर प्रकारचा; शंभर पोटभाग ज्याचे आहेत असा; नानाविध. **शताधीश वि०** १ शंभर लोकांच्या टोळीचा नायक. २ शंभर रुपये हींच ज्याची सर्व संपत्ति आहे असा (मनुष्य). **शतायु, शतायुषी वि०** शंभर वर्षें वयाचा मनुष्य. **शताळशी वि०** भारी आळशी (माणूस).

**शतमी स्त्री०** करार,–विशेषतः गलबतासंबंधाचा. 'सतमी' **स्त्री०** ह्याच अर्थी.

**शत्रु** [ **सं०** ] **पु०** १ वैरी; दुष्मन्. २ प्रतिस्पर्धी राजा (शेजारी). ॐ **शत्रुंजय पु०** १ हत्ती. २ हिंदुस्तानांतील जैनांचें एक पवित्र स्थान. **शत्रुकात्रु वि०** नीच; हलकट; पाजी. **शत्रुपाचन न०** अन्नाचे वाईट आणि अपायकारक गुण नाहींसे करणारें (कांहीं औषध).

**शनि** [**सं०**] **पु०** १ सूर्याभोंवती फिरणारा एक ग्रह. ह्याची फिरण्याची कक्षा गुरु ह्या ग्रहाच्या बाहेर आहे. हिंदूंच्या नवग्रहांतील हा सातवा ग्रह आहे. शनीचा आकार भूमीच्या सातशें पट मोठा आहे. शनीला सूर्याभोंवतीं एक फेरा करावयाला सुमारें तीस वर्षें लागतात. हा काळ इतर ग्रहांच्या काळाहून अधिक आहे म्हणून शनीला 'शनैश्चर' (म्ह० सावकाश चालणारा) असेंही म्हणतात. हा ग्रह आपल्या राशीपासून द्वादश स्थानीं असल्यास तो फार पीडा देतो. ह्यावरून 'शनि,' किं० 'शनैश्चर' ह्याचा अर्थ

दुष्मान् किं० वाइटावर टपलेला किं० तगादेदार असा झाला आहे. २ नीलमणी हें रत्न. ३ उपद्रव देणारा जो सचिकार इ०कांच्या कडील तगादेदार तो. ४ मंद बुद्धीचा, उद्योग न करणारा, अभ्यासांत टंगळमंगळ करणारा पोरगा. ❀ **कोणेकाच्या उदरीं शनि येणें** तो श्रीमंत किं० समृद्ध किं० वैभवशाली होण्याचीं सर्व साधनें किं० कारणें त्याला अनुकूल होणें. **टीप,**– जन्मराशीला शनि हा ग्रह आला असतां वैभव प्राप्त होतें असा फलज्योतिषाचा सिद्धान्त आहे. **शनिवार, शनिवासर** आठवड्याचा एक वार,– शुक्रवाराच्या पुढचा आणि आदित्यवाराच्या मागचा. **शनीश्वर, शनेश्वर, शनैश्चर** पु०१शनि हा ग्रह. २ कोणहि उपद्रवी माणूस किं० तगादेदार. **शनिप्रिय, शनि** पु० नीलमणि किं० नीळ हें रत्न. **शनिप्रदोष** पु० शनिवारीं त्रयोदशी असतां जो प्रदोष तो. **शनीचा फेरा** पु० कांहीं दुर्दैवाचा आपात किं० आघात;मोठें संकट.

**शनैः, शनैः शनैः** [ सं० ] क्रि० वि०सावकाश; मंदगतीनें; हळूं हळूं; धीमेधीमे. ❀ **शनैर्मेह** पु० लघ्वी सावकाश आणि वेदनेनें होणें हा रोग. **शनैश्चर** पु० मागें ' शनि ' मध्यें पहा.

**शपणें** [ सं० शप् ] स०क्रि० ( कोणेकाला ) शाप देणें.

**शपथ** [सं०]पु० (संस्कृतांत); स्त्री०(मराठींत) १ मी अमुक करीन किं० अमुक करणार नाहीं अशा अर्थाची प्रतिज्ञा करणें ( घेणें, वाहणें, करणें, देणें ); उ० मी अशी शपथ घेतों कीं आजपासून हातसुताची आणि हातमागाची खादी मी वापरीन. २ कोणेकावर अमुक कर किं० अमुक करूं नको अशा अर्थाची आग्रहाची नियंत्रणा घालणें किं० सक्ती करणें; उ० तूं दारू पिऊं नको अशी मी तुला शपथ घालतों; उ० तूं परदेशी कापड वापरलेंस तर तुला माझी शपथ आहे. ❀ **शपथपूर्वक, शपथेवर, शपथपुरःसर** क्रि० वि० शपथ घेऊन; उ० मी शपथ घेऊन सांगतों कीं, तुला टोमणा मारावा असा माझा मुळींच उद्देश नव्हता. **शपथ वहायाला मोकळा होणें** ( किं० **असणें** ) १ मी जें म्हणतों तें खरें आहे असें कोणेकानें शपथ घेऊन सांगावयास सिद्ध असणें. २ आपण अमुक काम केलें नाहीं असा आपणावर कोणाला ठपका ठेवतां येऊं नये इतक्याच बेताचें तें काम करणें. **तुझ्या गळ्याची शपथ मी तें काम करीन** मी तें करीनच करीन. **टीप,**–जी वस्तु आपण अत्यन्त मूल्यवान्, प्रिय, किं० पूज्य समजतों त्या वस्तूचा उच्चार करून अशा प्रकारें शपथ घेतात.

**शपन** [ सं० ] न० १ शाप देण्याची क्रिया; शाप. २ शपथ. ३ निंदिणें.

**शंपा** [ सं० ] स्त्री० वीज.

**शपित, शप्त** [ सं० ] वि० ज्याला शाप दिला आहे असा.

**शफ** [ सं० ] पु०, न० पशूचा खूर; गेळें. उ० गाय, म्हैस, शेळी, इ० हे प्राणी द्विशफ किं० भग्नशफ आहेत; घोडा, गाढव, इ० हे प्राणी एकशफ किं० अभग्नशफ होत.

**शफर** पु०, **शफरी** स्त्री० [ सं० ] सहरी ह्या नांवाचा मासा.

**शबर, शवर** [ सं० ]पु०म्लेच्छांची एक जाति किं० त्या जातीचा कोणी माणूस.

**शंबर** [ सं० ] पु० १ सांबर हा प्राणी. २ एक दैत्यविशेष,–ह्याला मन्मथानें ठार मारिलें. **शंबरी** स्त्री० जादूगिरी; माया; हातचलाखी. **शंबर** न० एक बौद्धव्रतभेद. ❀ **शंबरारि** पु० मदन, मन्मथ.

**शबल** [ सं० ] वि० १ ठिपके असलेलें; ठिबकेदार; चित्रविचित्र रंगांचें. २ मिश्रणाचें; मिश्रित. **शबला, शबली** स्त्री० १ अनेक रंगांची गाय. २ कामधेनु. ❀ **शबलपृष्ठक** पु० मृगविशेष. **भावशबलता** स्त्री० ( **साहित्य** ) एकाचा उपमर्द करून दुसरा, दुसऱ्याचा उपमर्द करून तिसरा, असे एकामागून एक भाव उत्पन्न होऊन अन्याचे अंगभूत होतात तेथें भावशबलता होते.

**शंबल** न० संबळ नांवाचें वाजंत्र्यांचें एक वाद्य.

**शबिना** [ फा० षबीनाह् ] पु० १ नागें.

'छबिना' सर्व अर्थी पहा. [फा० षामियानाह्] मोठा डेरा किं० तंबू.

**शब्द** [ सं० ] पु० १ आवाज; ध्वनि; नाद; उ० पोपटाचा, गायीचा, चालतांना पावलांचा शब्द. २ अर्थबोधक वर्णसमूह; एकाद्या वस्तूचा किं० कल्पनेचा दर्शक किं० व्यंजक जो अक्षर-समूह तो; उ० व्याकरणांत शब्दांविषयीं विचार केलेला असतो. ३ दोष, टपका (येणें, लागणें, ठेवणें); उ० आपणाला गुरूचा शब्द न लागेल असें वर्तन ठेवावें. ४ आज्ञा; हुकूम. ॐ **शब्दातीत** वि० वर्णन करण्यास अशक्य. **शब्दाधिष्ठान** न०, **शब्दग्रह** पु० कान; कर्णेन्द्रिय. **शब्दताडन** न० शब्दांनीं कोणेकावर प्रहार करणें; रागें भरणें. **शब्दपारुष्य** न० भाषणाचा कठोरपणा; शब्दांचा झोंबरेपणा. **शब्दभेद** पु० १ दुसरा शब्द. २ केवळ शब्दाचा भिन्नपणा. **शब्दयोगी अव्यय** पु० जीं अव्ययें दुसऱ्या शब्दांपुढें येऊन त्यांचा वाक्यांतील इतर शब्दांशीं संबंध जोडतात तीं प्रत्येक; शब्दयोगी अव्ययांच्या योगानें मागल्या शब्दाचें सामान्य रूप होतें; उ० घरावर, कागदासाठीं, इ०. **शब्ददोष** न० वाक्याचा अर्थबोध होण्यापूर्वीच ज्यांचें ज्ञान होतें ते 'शब्ददोष' होत. शब्दांचा किं० वाक्यांचा अर्थ समजल्या नंतर जे ध्यानांत येतात व ज्यांच्या योगानें रसाचा परं-परेनें अपकर्ष होतो ते 'अर्थदोष' होत; आणि वाक्याचा संपूर्ण अर्थ समजल्यावर जे ध्यानांत येतात आणि ज्यांच्या योगानें रसाचा प्रत्यक्ष अपकर्ष होतो ते 'रसदोष' होत. शब्ददोष, अर्थ-दोष, रसदोष, त्यांचे विविध प्रकार, त्यांचीं उदाहरणें, इ० साठीं गणेश मोरेश्वर गोरे बी. ए. यांचें 'काव्यदोषदीपिका' हें पुस्तक पहा. **शब्दालंकार** पु० शब्द, शब्दांतील वर्ण, शब्दांची मांडणी, यांवरच केवळ अवलंबून अस-लेला जो अलंकार तो शब्दालंकार. शब्दालं-कारांचे अनुप्रास, यमक, श्लेष, आणि चित्र, असे मुख्य चार प्रकार आहेत. विशेष खुलासा आणि उदाहरणें आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. **शब्दाशब्द** पु० ए० व० १ योग्य किं० अयोग्य शब्द; उ० त्याला कांहीं शब्दाशब्द बोलूं नको, माझा निरोप त्याला सांग आणि परत ये. २ भलतेच शब्द; बोलाचाली; असभ्य भाषण; उ० चारचौघांत शब्दाशब्द बोलूं नये, चांगलेंच बोलावें. **शब्दानुशासन** न० व्याकरण. **शब्दा-डंबर** पु० पोकळ वक्तृत्व; शब्दपांडित्य; रिकामी बडबड. **शब्दपाती, शब्दवेधी** [सं० शब्दपातिन्, शब्दवेधिन् ] वि० नुसत्या आवाजाच्या धोरणानें नेम मारणारा. **शब्दप्रमाण** न० तोंडी पुरावा. **शब्दब्रह्म** [सं० शब्दब्रह्मन्] न० वेद. **शब्दविद्या** स्त्री०, **शब्दशासन, शब्दशास्त्र** न० व्याकरण. **शब्दसंग्रह** पु० कोश. **शब्दसंहति** स्त्री० अमुक विचार व्यक्त करावयाचा असतां अमुक शब्दांच्या शेजारीं अमुकच शब्द अमुकच रूपानें आणि अमुकच क्रमानें आले पाहिजेत ही जी भाषेची रूढि ( म्हणजे प्रचार ) तिला 'वाक्प्रचार' म्हणतात आणि अशा रीतीचा जो शब्दांचा समुदाय त्याला 'शब्दसंहति' म्हण-तात. **तुल्यकल्प शब्द** पु० अ० व० जे शब्द अर्थानें पुष्कळ अंशीं तुल्य किं० सम असतात आणि अगदीं अल्प अंशीं भिन्न असतात ते शब्द; उ० आकृति, आकार; ईश्वर, देव; इ०. विशेष खुलासा आमचे 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' ह्या पुस्तकांत लें० १३२९ पहा. **समस्तकल्प शब्द** पु० जो शब्दांचा समूह व्याकरणांत सामासिक शब्द म्हणून गणला जात नाहीं, परंतु जो अर्थानें सामासिक शब्दाप्रमाणें योजला जातो तो शब्दांचा समूह; उ० कर न-करीच बसा, कुतऱ्याचें शेपूट, अडणीवरचा शंख, पाप्याचें पितर, सतीचें वाण, इ०. विशेष खुलासा आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' ह्या पुस्तकांत लेखांक ९२९ ह्यांत पहा. **सिद्ध शब्द** पु० ज्या शब्दाची व्युत्पत्ति पंडितांच्या मतानें ठरलेली नाहीं किं० ज्या शब्दांच्या घटक अक्ष-रांची अर्थदृष्ट्या फोड करतां येत नाहीं तो शब्द; उ० लाकूड, धोंडा, इ०. **साधित शब्द** पु० जो शब्द दोन किं० अधिक शब्द किं० शब्दांश एकत्र होऊन घडला आहे तो; उ० मोडतोड, इ०. **सामासिक शब्द** पु० दोन किं० अधिक शब्द एकत्र येऊन त्यांचा मूळचा अर्थ व्यक्तिशः लुप्त होऊन त्यांच्या संयोगाला नवीन विशिष्ट अर्थ प्राप्त झाला असतां त्या संयोगानें उत्पन्न

झालेला शब्द; उ० अन्नवस्त्र, गंगातीर, साखरभात, चक्रपाणि, त्रिभुवन, पंचपाळें, यथाशक्ति, इ०. **कोणेकाला शब्द लावणें** त्याला दोष देणें; त्याच्यावर टपका ठेवणें. **एकाद्याचा शब्द खालीं पडूं न देणें** १ त्याच्या प्रत्येक शब्दास उत्तर देणें; त्याचा शब्द खोडून काढणें; त्याच्या उत्तरास प्रत्युत्तर देणें; वादविवादांत किं० भांडणांत माघार न घेणें. २ कोणी कांहीं काम सांगतांच ते करावयास सिद्ध होणें. **कोणेकाचा शब्द खालीं पाडणें** त्याच्या सांगण्याप्रमाणें न करणें. **कोणेकाचा शब्द झेलणें** त्याची आज्ञा तत्काळ पुरी करणें; त्याची इच्छा पुरविण्यास तयार असणें; त्याची आज्ञा झाल्याबरोबर ती बजावण्यास पुढे सरसावणें; उ० समर्थाचा शब्द झेलावयास मारीं माणसें तत्पर असतात. **शब्दाचा मार** पु० कोणेकाला कठोर शब्दांनीं ताडन करणें किं० रागें भरणें; उ० शहाण्यास शब्दाचा मार, मूर्खास टोणप्याचा मार.

**शाब्दित** [ सं० ] वि० बोलावलेला. न० आवाज; ध्वनि.

**शंभर** वि० शतसंख्याक; पन्नासाच्या दुप्पटी इतकें. **टीप,**—' शंभर ' च्या मागें एक, दोन, इ० विशेषणें लागलीं असतां एकशे, दोनशे, इ० शब्द योजण्यांत येतात. ॐ **शंभर बुड्या मारून अंग कोरडें दाखविणारा** जो अनेक प्रकारच्या लबाड्या करतो पण सापडत नाहीं असा; पक्का बिलंदर. **शंभर हातांत येऊं न देणें** प्रतिपक्ष्याला जवळ येऊं न देणें; प्रतिपक्ष्यापासून दूर असणें. **कोणेकाचीं शंभर वर्षें भरणें** त्याचा मरणकाळ किं० विनाशकाळ जवळ येऊन ठेपलेला असणें. **टीप,**—मनुष्याची आयुर्मर्यादा शंभर वर्षांची असें समजलें जातें. **शंभर नंबरी सोनें** न० १ बावनकशी म्ह० अगदीं चोख किं० निर्मळ किं० शुद्ध सोनें. २ ( **लक्षणेनें** ) अत्यन्त शुद्ध, पवित्र, विश्वासू ( माणूस ).

**शंभु** [ सं० ] वि० सुखकर. पु० १ शंकर. २ साधु. ३ जिन साधु. ४ आत्मा. ५ (**लाक्षणिक**) साधाभोळा माणूस.

**शम** [ सं० ] पु० १ शान्ति; मनाची निर्विकार स्थिति. २ मनोजय; मनोनिग्रह. ३ विश्रांति. ४ निवारण; प्रतिकार. ५ मोक्ष. ॐ **शम विषम** [ सं० सम+विषम; किं० म० शम+विशम ] न० १ बाजार भावांत चढउतार. २ आजार, मनोविकार, वारा, पाऊस, थंडी, इ० मध्यें कमीअधिकपणा. ३ हिशेब, हकीगत, इ० मध्यें थोडीशी तफावत. ४ दोन माणसांत थोडासा वेबनाव किं० विमनस्कता.

**शमणें** [ सं० शम् ] अ० क्रि० शांत होणें; क्षोभरहित होणें; बंद पडणें; कमी जोराचा होणें.

**शमन** [ सं० ] न० यम; यमराज. न० १ १ शांत करणें; शांत होणें. २ दवणें; नाहींसें होणें; लोपणें. ३ यज्ञांतील पशुवध. ४ ( **वैद्यक** ) सप्तोपचारांपैकीं एक; आग, क्षोभ, जळजळ, इ० शमविणारा उपचार; उ० पित्ताचें शमन सुंठसाखर. पाचन, रेचन, छेदन, शमन, मोहन, स्तंभन; आणि वर्धन, हे सप्तोपचार. ॐ **शमनस्वसा** [ सं० शमनस्वसृ ] स्त्री० यमुना नदी.

**शमल** [ सं० ] वि० पातकी. न० १ निष्ठा. २ गाळ. ३ पाप; अपराध.

**शमविषम** मागें ' शम ' मध्यें पहा.

**शमित** [ सं० ] वि० १ शांत केलेला; शमविलेला. २ नष्ट किं० विध्वस्त केलेला. ३ कमी जोरदार केलेला; दाबून, चेपून, किं० चिरडून टाकलेला.

**शमिना** [ फा० षामियानाह् ] पु० डेरा; मोठा तंबू.

**शमी** [ सं० ] स्त्री० १ एक कांटेरी वृक्ष. दसऱ्याच्या दिवशीं ह्याची पूजा करतात. २ शेंग. ३ बावची. ॐ **शमीधान्य** न० द्विदल धान्य,— पावटा, तूर, वाटाणा, इ०. **शूकधान्य** न० जव इ० कूंस असलेलें धान्य.

**शयन** [ सं० ] न० १ निजणें. २ बिछाना. ३ मैथुन. ४ बसणें, निजणें, इ० च्या उपयोगाचा पलंग, माचा, इ० रचनाविशेष. ॐ **शयनी, शयनी एकादशी** स्त्री० आषाढ शुद्ध एकादशी. ह्या दिवशीं श्रीविष्णु निजतो.

**शयनीय, शयनीक** [ सं० ] न० १ शयनगृह. २ बिछाना. [ लेला.

**शयालु** [ सं० ] वि० १ झोपाळू. २ निज-

**शय्या** [ सं० ] स्त्री० १ बिछाना. २ निजणें. ※ **मृतशय्या** स्त्री० ज्या गादीवर कोणेकाचें प्राणोत्क्रमण झालें ती गादी. **शय्यादान** न० ब्राम्हणाला मृतशय्या देणें. **सुखशय्या** स्त्री० १ ज्यावर विश्रांति घ्यावयाची ती गादी. २ आरामांत निजणें. **शय्याद्रि** पुढें ' सह्याद्रि ' पहा.

**शर** [ सं० ] पु० १ बाण; तीर. २ काश नांवाचें गवत. ३ बोरू; देवनळ. ४ पांच ही संख्या ( गणित, ज्योतिष, इ०च्या परिभाषेत ). ५ भरत नामक तारकापुंजांतील च, छ, घ ह्या तीन ताऱ्यांची रांग. ६ सूर्याधिष्ठित जो मार्ग त्यापासून चंद्रादि ग्रहांचें जें याम्योत्तर अंतर येतें तें. ※ **शरवृत्त** न०, **शरपात** पु० मागें ' याम्य ' मध्यें हे शब्द पहा. **पंचशर, पंचबाण** पु० मदन, मन्मथ. **शराभ्यास** पु० तिरंदाजी. **शरासन** न० धनुष्य. **शरकाण्ड** पु०, न० १ बाणाचा दांडा. २ बोरूची छडी. **शरजन्मा** [ सं० शरजन्मन् ] पु० कार्तिकेय; कार्तिकस्वामी. **शरधि** पु० बाणांचा भाता. **शरपंजर** पु० कोणेकाच्या अंगास असंख्य बाण टोचले असतां बाणांच्या टोकांनीं जी आकृति होईल ती किंवा जें आवरण होईल तें. भारती वीर भीष्म हा शरपंजरीं पडला होता. यावरून ' कोणेकानें शरपंजरीं पडणें ( किं० पडलेलें असणें )' म्हणजे त्याणें आजार, संकट, इ० मध्यें हताश स्थितींत पडणें ( किं० पडलेलें असणें ). **शरसंधान** न० बाणाचें लक्ष्य; बाणाचा नेम; बाण रोखणें ही क्रिया.

**शरट** [ सं० ] पु० १ सरडा,—एक सरपटणारा प्राणी. २ कुसुंबा.

**शरण** [ सं० ] वि० १ रक्षण करणारा. २ आश्रयास योग्य. न० १ रक्षण. २ आश्रय. ३ आश्रयस्थान. ४वाली; रक्षण करणारा. ५ स्थान; गृह; उ० अग्निशरण. ※ **कोणेकाला शरण जाणें** ( किं० **रिघणें** ) त्याचें वर्चस्व कबूल करून त्याची दया भाकणें; त्याची क्षमा मागणें. **कोणी कोणेकाला शरण असणें** तो त्याचा वाली किं० रक्षणकर्ता असणें. **शरणैषी, शरणापन्न, शरणागत, शरणार्थी** वि० आश्रयार्थ आलेला ( मनुष्य ). **शरणागतवत्सल** वि० आश्रयार्थ आलेल्यास प्रेमपूर्वक आश्रय देणारा. **शरणार्थ** पु० लिंगायत लोक हा शब्द उच्चारून एकमेकांस नमस्कार करतात. **शरण आल्यास मरण देऊं नये** आश्रय मागावयास आलेल्या माणसास टाकूं नये; त्याचें रक्षण करावें.

**शरण्य** [ सं० ] वि० १ रक्षण करण्यास योग्य; रक्षणीय. २ अनाथ. ३ रक्षण करावयास समर्थ; शरण जाण्यास योग्य; संरक्षक. न० १ रक्षण. २ आश्रयाची जागा; आसरा.

**शरद्, शरदा** [ सं० ] स्त्री० १ आश्विन आणि कार्तिक ह्या दोन महिन्यांच्या अवधीचा ऋतु. २ वर्ष; वर्ष हा कालावधि. ※ **शरत्काल, शरदृतु** पु० आश्विन आणि कार्तिक ह्या दोन महिन्यांचा अवधि.

**शरधि** मागें ' शर ' मध्यें पहा.

**शरबत, सरबत** [ फा० षरबत् ] न० लिंबाचा किं० चिंचेचा रस,—साखर इ० द्रव्यें घालून पिण्यासाठीं तयार केलेला. ※ **शरबतखोरी** स्त्री० वाङ्निश्चयाचा फलाहार.

**शरभ** [ सं० ] पु० १ हत्तीचा छावा. २ उंट. ३ टोळ,—पिकांची नासाडी करणारा एक क्षुद्र पक्षी. ४ चित्ता. ५ सिंहापेक्षां बळकट आणि आठ पायांचा एक कविकल्पित प्राणी.

**शरम** [ फा० शर्म् ] स्त्री० लाज; लज्जा.

**शरमणें** [ फा० शर्म्; म० शरम ] अ० क्रि० लज्जित होणें; लाजणें; ओशाळें होणें.

**शरमिंदा (–धा )** [ फा० शरमिंदाह् ] वि० लज्जित; लाजलेला; ओशाळा. ※ **शरमिंदगी** स्त्री० खजीलपणा.

**शरयतपन्हा** पु० इसलामी धर्मशास्त्रांत पंडित किं० वाकबगार.

**शरा** [ अ० षरअ ] पु० मुसलमानी धर्माचा कायदा; इसलामी धर्मशास्त्र किं० शास्त्रनिर्णय.

**शराईत, सराईत** [ सं० स्राव (?) ] वि० कांहीं काम किं० कृति करण्यांत पटाईत किं० अभ्यस्त किं० परिचित.

**शराकत** इ० पुढें ' सरकत ' इ० पहा.

**शराब** [ अ० शराब् ] पु० मद्य, दारू.

**शरायती** स्त्री० लिहितांना चुकून गळालेला

शब्द कोठें घालावयाचा हें दाखविणारी रेघ ( कारकुनांचा शब्द ).

**शराव** [ सं० ] पु० १ परळ; उथळ पात्र. २ कढई. ३ दोन कुडव हें धान्याचें माप.

**शरावी** [ सं० शराव ] स्त्री० परळ; उथळ भांडें.

**शरीक** [ अ० ] पु० १ वाटेकरी; पातीदार. २ साथीदार; दोस्त.

**शरीर** [ सं० ] न० १ देह; काया. २ घटक; अवयव. ३ देहाची शक्ति. ॐ **शरीरावरण** न० कातडें. **शरीरज** पु० १ रोग. २ मदन. ३ पुत्र. **शरीरदंड** पु० तप. **शरीरपतन** न० मृत्यु. **शरीरबद्ध** वि० मूर्तिमंत; देहधारी. **शरीरयष्टि** स्त्री० सडपातळ शरीर. **शरीरयात्रा** स्त्री० निर्वाह. **शरीरसंपत्ति** स्त्री० आरोग्य. **शरीरसंबंध** पु० लग्नाचा किं० विवाहाचा संबंध. **शरीरस्थिति** स्त्री० जगणें. **शरीरी** [ सं० शरीरिन् ] वि० १ मूर्तिमंत. २ जिवंत. पु० १ वस्तु. २ प्राणी. ३ मनुष्य. ४ जीवात्मा. **शरीरकळा, शरीरकांति** स्त्री० देहाची टवटवी; अंगकांति; नीरोगीपणाचा किं० भव्यपणाचा तजेला. **शरीरप्रकृति** स्त्री० आरोग्य. **शरीरभोग** पु० शरीरास होतात जे सुखाचे किं० दुःखाचे अनुभव ते प्रत्येक. **शरीराची दामटी वळणें** आजार, उपास, इ० मुळें शरीर थापटीसारखें होणें. **शरीराची ढगळ, शरीराची धलपी** स्त्री० हगवण, आमांश, इ० मुळें शरीरास आलेली कृशता. **शरीर वेचणें** परोपकाराच्या कृत्यांत देह कष्टविणें.

**शर्करा** [ सं० ] स्त्री० १ साखर. २ मुतखडा; लघवीतून साखर जाणें हा रोग. ह्यालाच ' शर्करामेह ' म्हणतात.

**शर्त, शर्थ** [ अ० षर्त ] स्त्री० १ अट; अमुक झाल्यास अमुक करावें अशा अर्थाचा ठराव. २ कसोशी; पराकाष्ठा; कमाल; उ० त्याचें मन वळविण्याची मी शर्त केली पण त्याचें मन वळलें नाहीं; उ० ह्या पोरांनीं दांडगाईची शर्त केली. ३ वैपुल्य; अतिशय. ४ शिरस्ता. ॐ **शर्तमर्दी, शर्तमर्दी** स्त्री० पराकाष्ठेचा प्रयत्न; प्रयत्नाची शिकस्त. **शर्तनामा** पु० तह; करारनामा. **शर्तेवशर्ते** क्रि० वि० पराकाष्ठेनें; शर्तीनें.

**शर्म, शर्मणें** इ० मागें ' शरम, ' ' शरमणें इ० पहा.

**शर्म** [ सं० शर्मन् ] न० सुख; कल्याण.

**शर्मा** [ सं० शर्मन् ] पु० ब्राह्मणाच्या नांवाला जोडावयाचा शब्द; उ० विष्णुशर्मा. क्षत्रियांच्या नांवापुढें ' वर्मा ' जोडतात; वैश्याच्या नांवापुढें ' गुप्त ' जोडतात; शूद्राच्या नांवापुढें ' पालित ' जोडतात.

**शर्यत** [ अ० ' षर्त ' चें अ० व० षरायत ] स्त्री० १ पैज. २ चुरशीची दौड; उ० घोड्यांची शर्यत, मुलांची शर्यत, इ०.

**शलक, शलख** [ अ० षल्ख ] स्त्री० वर्षाव; वृष्टि.

**शलगम** [ तुर्की ] पु० मुळा, कोबी, इ० च्या वर्गांतील एक झाड. ह्याच्या पानांची भाजी करतात.

**शलभ** [ सं० ] पु० १ टोळ. २ दिव्यावर झडप घालणारा एक क्षुद्र कीट.

**शलाका** [ सं० ] स्त्री० १ काडी; लहान काठी. २ वैद्याचें अणकुचीदार शस्त्रविशेष. ३ बाण. ४ भाला. ५ रंगाऱ्याची कुंचली. ६ प्रकाशाचें बारीक किरण. ॐ **शलाकापरीक्षा** स्त्री० मिटलेल्या ग्रंथांत हवी तेथें काडी घालून त्या पानांत विद्यार्थ्यांची तयारी कितपत आहे हें पाहाण्याची पद्धति. **शालकाप्रश्न** पु० मिटलेल्या ग्रंथांत काडी घालून ती ज्या वाक्यावर टेकेल त्या वाक्यावरून आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळविणें हा प्रकार.

**शल्य** [ सं० ] न० १ भाला. २ बाण. ३ वेळूची काठी. ४ खिळा; खुंटी. ४ टोचणारें कांहींही,—, कांटा, सुई, बाण, इ०. ६ शरीरांत सलणारी कांहींही वस्तु. ७ मनाला बोचणारी कोणतीही गोष्ट. ८ घर, देऊळ, इ० बांधतांना जमीन खणतांना हाड, कातडें, इ० जो अपवित्र पदार्थ सांपडतो आणि जो फेकून देतात तो. ९ स्त्रियांचा गर्भ शमल्यास पोटांत राहातो जो त्याचा अवशेष तो; सल. १० दुसऱ्यानें आपला केलेला अपमान जो मनांत

सलत राहिलेला असतो तो. ॐ **शल्यचिकित्सा स्त्री०** जखमांवर उपचार. **शल्यमृग पु०** खवलें मांजर.

शव [ सं० ] न० प्रेत. ॐ **शवयान न०, शवरथ पु०** तिरडी.

**शवळें न०** पुढें 'शेवाळें' पहा.

**शश** [ सं० ] **पु०** १ ससा. २ चंद्रावरील सशाच्या आकाराचें चिन्ह. ॐ**शशांक, शशधर, शशलांछन पु०**चंद्र.**शशादन,शशाद पु०**बहिरी ससाणा. **शशविषाण,शशशृंग न०**निसर्गांत अविद्यमान अशी कोणतीही वस्तु. **शशी** [**सं०**शशिन्] **पु०** चंद्र. **शशिकांत, शशिमणि पु०** चंद्रकिरण ज्यावर पडलें असतां ज्यांतून पाणी स्रवतें असा एक कविकल्पित मणि. **शशिशेखर पु०** शंकर. **शशिनी स्त्री०** चांदणी रात्र.

**शष्प** [ **सं०** ] **न०** १ कोंवळें गवत. २ दूर्वाविशेष. ३ ( **मराठींत** ) शिश्नावरील किं० योनीवरील केश.

**शंसक, शंसन, शंसना, शंसा, शंसनीय** इ० मागें 'प्रशंसक,' 'प्रशंसन,' इ० पहा.

**शस्त्र** [ **सं०** ] **न०** १ हत्यार. २ कांहीं कार्याचें उपकरण किं०साधन.३(**लाक्षणिक**)ज्या रोगादिकांचें नाशक जें औषध इ०तें त्या रोगाचें. ४दुसऱ्यास जिंकणें किं० त्याचा नक्षा उतरविणें इ० कामीं उपयोगी पडणारी कांहीं गोष्ट,रहस्य, इ०. ५ आपल्या उत्कर्षास किं० इष्ट हेतु साधण्यास उपयोगी पडणारा आपल्या अंगचा जो कांहीं गुण ( विद्या, शौर्य, वशीला, इ० ) तो. ६ प्रतिवाद्याला निरुत्तर करण्याचें कांहीं साधन ( खत, पत्र, साक्षीदार,वशीला, इ०). ॐ **शस्त्राजीव, शस्त्रवृत्ति पु०** योद्धा. **शस्त्रपूत वि०**युद्धांत मरण पावलेला. **शस्त्रभृत् पु०** शस्त्र धारण करणारा; हत्यारबंद. **शस्त्रमार्ज पु०** शिकलगार. **शस्त्रवैद्य पु०** शस्त्रानें रोग्याचें विशिष्ट गात्र कापून रक्त इ० काढून रोग बरा करणारा वैद्य. **शस्त्रक्रिया स्त्री०** गात्रविशेषांतलि रोग काढून टाकण्यासाठीं शस्त्राचा उपयोग करणें. **कोणेकानें कोणेकावर शस्त्र धरणें** (किं०उगारणें) त्याणें त्याला अरबेत ठेवणें किं०त्याच्यावर करडा अमल चालविणें.

**शह** [ **फा०** ] **पु०** १ राजा. २ बुद्धिबळांच्या डावांत प्रतिपक्ष्याच्या राजाला अडचणीची स्थिति ( देणे, येणें, उठणें, इ० ). ३ पेच; पंचाइतीची किं० अडचणीची स्थिति ( येणें, देणें ). ४ (**विनोदांत**) कायमचा मनुष्य आपल्या जागेवर परत आला असतां बदली मनुष्याचें निघून जाणें ( येणें,देणें,मिळणें ). ५ शब्दाचा मार;रागें भरणें;उ०शहाण्यास शह मूर्खास टोणपा. ६शत्रु, किल्ला, गांव, इ० कावर रोख धरून चाल करून जाणें किं० केलेली चाल. ७ आपले इष्ट साधण्यासाठीं लावून ठेवलेला वशीला किं०केलेलें संधान; उ० तो बखळ मला पांच हजारास मिळण्यासाठीं मी शह देऊन ठेविला आहे.ॐ**नाशह पु०**(बुद्धिबळांच्या खेळांत)अडचणीच्या स्थितींतून राजाची सुटका किं० बचाव ( करणें ). **शहानिशा करणें** चौकशी करणें;कांहीं गोष्टीत खऱ्याचा अंश किती आणि खोट्याचा अंश किती हें तपासून पाहाणें; एकाद्या गोष्टीची संदिग्धता नाहींशी करणें;भवति न भवति करणें. **शहनिशह पु०, स्त्री०** पूर्ण चौकशी; तपास;वाटाघाट;खऱ्याखोट्याचा निर्णय किं० निकाल. **कोणेकानें शहास गुंतणें** त्याणें परिस्थितीनें बांधलें गेलें असणें; बाहेर पडावयास मार्ग नाहीं अशा पेचांत तो अडकलेला असणें. **कोणेकाला शह देणें** त्याला हुसकावून लावणें.

**शहर** [ **फा०** ] **न०** मोठा गांव. ॐ **शहरगुंडा पु०** १ युक्त्या, लबाड्या, लुच्चेगिऱ्या, इ० मध्यें पूर्ण पटाईत आणि त्या ओळखणारा आणि त्या करणारा; अट्टल सोदा किं० भामटा. २ हुशार, धूर्त, आणि लटपट्या माणूस. **शहरपन्हा पु०** १ शहराचा तट; तटबंदी. २ शहराचे रखवालदार, चौक्या, पहारेकरी, गस्तवाले, इ० बंदोबस्ताचीं साधनें समुच्चयानें. **शहरबटाऊ पु०** अट्टल सोदा; पक्का बिलंदर. **शहरबाजार पु०** मोठें शहर,–तेथें हावी ती जिन्नस बाजारांत हावी तेव्हां मिळूं शकते ह्या दृष्टीनें; उ० असली वस्तु शहरबाजारांत मिळेल, ह्या गांवखेड्यांत मिळणें शक्य नाहीं.

**शहरा, शहारा पु०,शहारें न०** भयादि कारणानें अंगावर केश उभे राहिले आहेत अशी स्थिति ( येणे);रोमांच. ॐ **अंगावर शहारे येणें**

अथवा कारणांमुळें अंगावरील केश ताठ उभे राहाणें.

**शहा** उ० वा० अ० कान्होबा, भूत, पिशाच, इ० नीं पछाडलेला माणूस तोंडावाटें काढतो तो उद्गार.

**शहा** [ फा० षाह् ] पु० मुसलमान राजा किं० वडा गृहस्थ किं० त्याच्या नांवापुढें योजावयाचा बहुमानाचा शब्द. सावकार, श्रीमंत मनुष्य, पेढीवाला, जकातदार, पतीचा माणूस इ०कां संबंधानें पदवीप्रमाणें हा शब्द योजतात. ॐ **नेसेन तर शहाचें नाहीं तर नागवी बसेन** मी उंची वस्त्रें नेसणार; तीं नाहीं मिळालीं तर मी कांहींच नेसणार नाहीं. **शहाजादा** पु० मुसलमान राजपुत्र. **शहाजादी** स्त्री० मुसलमान राजकन्या. **शहाजोग** वि० १ प्रामाणिक माणूस; पतीचा मनुष्य,—जो कधीं खोटा व्यवहार करणार नाहीं. २ प्रामाणिक, चोख, सचोटीचा ( व्यवहार ). ३ खरें, उत्तम ( नाणें ). ४ ज्याबद्दल कोणी शंका काढणार नाहीं किं० तकरार करणार नाहीं असा ( देणें, घेणें, इ० बाबतीचा व्यवहार ); उ० मी तुमचें शहाजोग शंभर रुपये देणें आहे. **शहाजिरें** न० जिऱ्याची एक जात. **शहातूत** स्त्री० एक प्रकारची तुती. न० तिचें फळ. **शहाजोर** पु० १ खूप मोठा जोर; अचाट जोर किं० सामर्थ्य. २ उंची दर्जाचा; उत्तम; उत्कृष्ट; भव्य; टोलेजंग; अफाट. **शहामुसळी** स्त्री० काळी मुसळी ही वनस्पति. दुसरी जात सफेत मुसळी. **शहाजोग हुंडी** स्त्री० जी हुंडी दाखविल्याबरोबर ती दाखविणाऱ्याला तिचे पैसे ताबडतोब मिळतात अशी हुंडी.

**शहाडा** पु० १ डोंगराच्या ओळीची धार,—जिच्या दोन्ही कडच्या बाजू उतरत गेलेल्या आहेत. २ डोंगराच्या धारेवरून उतरत गेलेली अरुंद नागमोडी पायवाट. ३ हालार लोकांचें डफासारखें एक वाद्य किं० तें वाजविण्याची तऱ्हा. ४ मोठा वृक्ष.

**शहाडें** न० अगदीं कोंवळा नारळ.

**शहाणा, शाहणा, शाहाणा** वि० १ हुशार; धूर्त; चतुर. २ समंजस; विचारी. ३ ( मुलासंबधानें बोलतांना ) हट्ट न करणारा; सांगितलेलें ऐकणारा. ॐ **शहाणपण** न०, **शहाणपणा** पु०, **शहाणीव** स्त्री० १ चातुर्य; धूर्तपणा. २ समंजसपणा; समजूतदारपणा. **शहाणासुरता** वि० १ शहाणा आणि देखणा, चतुर असून सुंदर. २ ज्याच्या शाहाणपणाबद्दल कोणासही शंका येण्याचें कारण नाहीं असा; ज्याचा शहाणपणा सर्वांस मान्य आहे असा. **दीड शहाणा** वि० मागें ' दीड ' मध्यें पहा. **अति शहाणा** वि० फाजील शहाणा म्ह० अत्यन्त मूर्ख. **अतिशहाणा त्याचा बैल रिकामा** मागें 'अतिशाहाणा' मध्यें पहा. **शहाणा तुपाशीं, दीड शाहाणा उपाशीं, आणि अति शहाणा उपाशी** शहाण्याचा लाभ होतो, बेअकली माणसास क्षुल्लक लाभ होतो, आणि फाजिल शहाणा जो असतो त्याचें सर्वस्वी नुकसान होतें. **शहाण्याची बलाई दूर** मागें ' बलाई ' मध्ये पहा. **शहाण्याची खरवड** स्त्री० मूर्ख असून उपद्रवी.

**शहात्तर** [ म० सहा+सत्तर ] वि० सत्तरांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**शहानिशा** चौकशी मागें ' शहा ' मध्यें पहा.

**शहामत** [ अ० ] स्त्री० १ कर्तृत्व; करामत. २ धिटाई; पराक्रम; साहस.

**शहामृग** पु० एक पक्षी.

**शहांयशी** [ म० सहा+ऐंशी ] वि० ऐंशींत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका

**शहारें** पु० अ० व० मागें ' शहरा,' ' शहरें ' पहा.

**शहाळू** स्त्री० जोंधळ्याची एक जात.

**शहाळें** न० कोंवळा नारळ,—ज्यांतील पाण्याचें अद्यापि टणक खोबरें झालें नाहीं.

**शळी** स्त्री० १ सळई. २ साळईचें पीस.

**शाहदी** [ अ० षाहद ] पु० साक्षीदार. स्त्री० पुरावा; साक्षी.

**शाई** [ फा० सियाही ] स्त्री० १ लिहिण्यासाठीं केलेला काळ्या रंगाचा द्रव. २ लिहिण्याच्या उपयोगाचा कोणत्याही रंगाचा द्रव; उ० तांबडी शाई, हिरवी शाई, इ०. ३ मृदंग, तबला, इ० च्या कातड्यास लावतात तो लोखंडाच्या किटाचा काळा थर. ह्या काळ्या बाजूस ' शाईचा पुडा ' किं० ' शाईपुडी ' म्हणतात. ॐ **शाईदान** न०, **शाईदानी** स्त्री० दौत.

**शाई, शाही** [फा० षह्=राजा] **स्त्री० टीप**,-हा शब्द पुढील सर्व अर्थीं दुसऱ्या शब्दापुढें प्रत्ययाप्रमाणें योजला जातो. १ कोणेक राजा किं० अमलदार याची कारकीर्द किं० याच्या कारकीर्दीचा टापू किं० कालावधि किं० कारकीर्दीची तऱ्हा; उ० शिंदेशाई, होळकरशाई, इ०. २ तऱ्हा; सरणी; उ० सोदेशाई, शिनळशाई, इ०. ३ रचना, मांडणी; उ० बागशाई. ४ देश, प्रांत, इ० तलि राज्य किं० शासनपद्धति. वि० तऱ्हेचा, पद्धतीचा, काळचा, ठिकाणचा; उ० पुणेशाई म्ह० पुण्याच्या सरणीचा. ॐ **शाईशिरस्ता पु०** एकाद्या ठिकाणची जी जनरीति ती किं० जो वर्तनक्रम तो.

**शाऐंशी, शांयशी** [ म० सहा+ऐंशी ] वि० ऐंशींत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**शाक स्त्री०** झाडावर पाडास आलेला किं० गजरलेला आंबा.

**शाक** [ सं० ] **पु०** १ सप्तद्वीपांपैकीं सहावें. २ कालगणना करण्यासाठीं सुरू केलेला शक.

**शाक** [ सं० ] **स्त्री०** भाजी. ॐ **शाकभाजी स्त्री०** पाल्याची भाजी,-मेथी, आंबाडी, इ०. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' फळभाजी,-भोपळा, फणस, इ०. **शाकपाला पु०** भाजीच्या उपयोगाची झाडें किं० त्यांचीं पानें. **शाकाहार पु०** धान्यें, पानें, फळें, इ० चा आहार. याच्या व्यावर्तकत्वें ' मांसाहार.' **शाकव्रत न०** १ चातुर्मास्यांत भाजी, दहीं, दूध, आणि द्विदल, हे चार पदार्थ अनुक्रमें करून प्रतिमासीं वर्ज करणें ह्या रूपाचें व्रत. बायका करतात ते. ' शाक्ताव्रत ' हें ' शाकव्रत ' चें अपभ्रष्ट रूप. २ आषाढमासीं शाक न खाण्याचें व्रत.

**शाकंब (-भ-) री** [ सं० शाकंभरी ] **स्त्री०** १ दुर्गा. २ ( **मराठींत** ) दुर्गादेवीचे प्रीत्यर्थ पौषी पौर्णिमेचे दिवशीं अनेक प्रकारच्या शाकांचें भक्षण करण्याचें व्रत.

**शाकशेशाक, शकबंशक** [ फा० ] **पु०** १ शंकाकुशंका. २ ऊहापोह; चर्चा; वाटाघाट; खऱ्याखोट्याचा निर्णय ( काढणें, करणें ). ३ तफावत; फरक.

**शाकल** [ सं० ] **पु०** १ यज्ञविशेष. २ ऋग्वेदशाखाविशेष. ३ एक ऋषि. ॐ **शाकलद्वीप पु०, न०** शाकल ऋषीचें बेट.

**शाकार पु०** ऊन्ह, पर्जन्य इ० च्या निवारणार्थ घरावर कौलें, झापा, गवत, इ० घालणें ही क्रिया. **शाकारणी स्त्री०** घरावर कौलें, गवत, इ० पालण्याची क्रिया.

**शाकारणें स० क्रि०** १ वारा, पाऊस, ऊन्ह, इ० च्या निवारणासाठीं ( घराच्या ) माथ्यावर कौलें, झापा, गवत, इ० पसरणें. २ ( कौलें, गवत, झापा, इ० ) घराच्या माथ्यावर पसरणें ( पर्जन्य, ऊन्ह, वारा, इ० च्या निवारणासाठीं).

**शाकिनी** [ सं० ] **स्त्री०** १ भाजांचा मळा. २ दुर्गादेवींच्या दासींचा एक वर्ग. ३ पिशाची.

**शाकुनिक** [ सं० ] **पु०** पक्षी मारणारा पारधी. **न०** शकुन सांगण्याची विद्या; शकुन सांगणें. **वि०** १ शकुन सांगण्याची(विद्या, शास्त्र). २ भविष्यसूचक ( चिन्ह ).

**शाक्त** [ सं० ] **पु०** शक्ति देवीचा उपासक. **वि०** शक्ति देवीच्या उपासनेचा ( विधि, संस्कार, इ० ).

**शाक्य, शाक्यमुनि, शाक्यसिंह** [ सं० ] **पु०** गौतम बुद्ध.

**शाख** [ सं० शाक ] **स्त्री०** भाजी; भाजीपाला.

**शाख स्त्री०** पाडास आलेला आंबा.

**शाखा** [ सं० ] **स्त्री०** १ झाडाची फांदी. २ वेदाचा पोटभाग. ३ पोटभाग ( सामान्यतः ). ४ पक्ष; तट. ५ वड इ० ची पारंबी. ॐ **शाखाचंक्रमण न०** १ उडत उडत अध्ययन. २ भाषण, अध्ययन, इ० मध्यें एक मुद्दा, एक विषय, इ० सांगोपांग न शिकतां किं० न निरूपितां एकावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्यावर जाणें हा प्रकार: एका विषयाचा शेवट न करितां तो अर्धवट टाकून दुसरा हातीं घेणें, दुसरा अर्धवट टाकून तिसरा घेणें, अशी अध्ययन, भाषण, इ० ची तऱ्हा. **शाखानगर, शाखापुर न०** गांवाची वाडी. **शाखापित्त न०** हात, पाय, इ० ची आग किं० जळजळ. **शाखामृग पु०** वानर. **शाखाशिफा स्त्री०** वड इ० ची पारंबी. **शाखाचंद्रन्याय पु०** स्थूल दाखवून त्याच्या धोरणानें सूक्ष्माचें ज्ञान

करून देणें ही सरणी;चंद्र कोठें आहे हें सांगतांना ' त्या झाडाच्या शाखेवर चंद्र आहे ' असें सांगणें,–जरी त्या शाखेवर चंद्राचें अधिष्ठान नसले तरी. **शाखापाठी पु०** वेदाची शाखा पठन करणारा. **शाखी** [ **सं०** शाखिन् ] १ वृक्ष. २ वेद. ३ वेदाच्या विशिष्ट शाखेचा अनुयायी; उ० शाकलशाखी इ०.

**शाखोट** [ **म०** साख.] **वि०** १ विश्वासू; पताचा ( माणूस ). २ भरंवशास पात्र, खरी, विश्वसनीय ( हकीगत, इतिहास ).

**शागीर्त, शागिर्द, शागीर्द** [ **फा०** शागिर्द् ] **पु०** १ शिष्य; विद्यार्थी. २ गायन, वादन, नृत्य, इ० कला वस्तादजीजवळ शिकणारा.३ देवपूजेची तयारी करणें, पाणी भरणें, भोजनाचीं पानें मांडणें, यजमानाचीं धोतरें धुणें, इ० कामें करणारा श्रीमंताच्या घरांतील नोकर. ४ श्रीमंत माणसानें फुकट जेवूं घालून बाळगलेला विद्यार्थी. **टीप,**–शार्गीत, शागिर्त, इ० अपभ्रष्ट रूपें होत. ❀ **शागिर्दपेशा पु०** १ शागिर्द,–सर्व अर्थी. २ श्रीमंताच्या नोकरवर्गापैकीं कोणीही. **शागिर्दी स्त्री०** शागीर्दाचा धंदा, स्थिति, दर्जा, इ०.

**शाट, शाटणें, शाटाशाट** मागें 'छाट,' छाटणे,' 'छाटाछाट' पहा.

**शाट न०, शाटी स्त्री०** [ **सं०** ] १ नेसण्याचें किं० पांघरण्याचें वस्त्र. २ ( विशेषतः ) संन्याशाचें नेसण्याचें किं० पांघरण्याचें वस्त्र. ह्या अर्थी ' छाटी ' असाही शब्द आहे.

**शाठ्य** [ **सं०** ] **न०** १ फसविणें. २ लुच्चेगिरी किं० लुच्चेगिरीचें कांहीं कृत्य. ❀ **शठंप्रति शाठ्यं** [ **सं०** ] **न०** लबाडाशीं लबाडी करणें हा वर्तनक्रम.

**शाडवळ** [ **सं०**शाद्वल ] पुढें 'शाद्वल' पहा.

**शांडिल्य** [ **सं०** ] **पु०** १ अग्निविशेष. २ ऋषिविशेष. ३ रत्नागिरी प्रांतांतील ब्राह्मणांची एक जात.

**शाडू स्त्री०, पु०** एक प्रकारची पांढरी माती. ❀ **शाडवट वि०** शाडू जींत फार अशी ( जमीन ).

**शाडूळ** [ **सं०** शाद्वल ] **वि०** रानवट चालीचा; गांवढळ; असभ्य.

**शाण** [ **सं०** ] **वि०** तागाचें बनविलेलें (वस्त्र, दोरी, इ० ). **पु०** १ कसोटीचा धोंडा. शस्त्राला धार लावण्याचा धोंडा; निसणा. पाटा. ४ सहाण. ४ चार मासे हें वजन. **न०** तागाचें वस्त्र. ❀ **शाणाजीव पु०** हत्यारांना धार देण्याचा धंदा करणारा; शिकलगार.

**शाण्णव** [ **म०** सहा+नव्वद ] **वि०** नव्वदांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**शात** [ **सं०** ] **वि०** १ धार लाविलेलें. २ तीक्ष्ण.

**शांत** [ **सं०** ] **वि०** १ शमलेला; मूळच्या प्रकृतीवर परत आलेला (माणूस, पशु). २ विझलेला; मालवलेला (दिवा, अग्नि). ३ दूर सरलेला, थांबलेला ( विरोध, हरकत, विघ्न, वाऱ्याचा सोसाटा ). ४ मृत; मेलेला. ५ चलनवलनरहित; निष्क्रिय; निश्चेष्ट. ६ माणसाळलेलें ( जनावर ). ७ जेथें गडबड, कलकलाट, किं० गोंगाट नाहीं असे ( स्थळ ). ८ विकाररहित; शमयुक्त. **पु०** १ जितेन्द्रिय; यति. २ ( **साहित्य** ) एक रस. ❀ **शांतं पापं उ० वा०** अ० ईडापीडा टळो ! अनर्थ दूर सरो ! **शांतदांत वि०** शांत; सौम्य.

**शातकुंभ** [ **सं०** ] **न०** सोनें हा धातु.

**शांतवन** ' सांत्वन ' चा अपभ्रंश.

**शांतविणें** [ **म०** ] **स० क्रि०** शांत करणे.

**शांति** [ **सं०** ] **स्त्री०** १ चित्ताची स्वस्थता; चित्ताची निर्विकार स्थिति. २ काम, क्रोध, चिंता, इ० मनांत क्षोभ करणाऱ्या गोष्टींचा अभाव किं० इ० गोष्टींचें निरसन.३ विकारशून्यता. ४ वैराचें प्रशमन. ५ विघ्न निवारणारें कोणतेही धार्मिक किं० रूढीचें कृत्य: होम, जप, दान, इ०. ६ नवीन बांधलेलें घर सुखावह व्हावें म्हणून करतात तें कृत्य; वास्तुशांति. ७ आजाराचा जोर कमी होणें किं० आजाराला उतार पडणें किं० आजार अजीबात शमणें. ८ भूत, पिशाच, देवी, पटकी, इ० च्या निराकरणार्थ दिलेला बळी, इ०. ९ मरण. ❀ **शांतिक न०** अरिष्टाचें निवारण करावयासाठीं केलेलें कोणतेंही कर्म. **वि०** शमविणारें, आराम वाटविणारें औषध, खाद्य, खेळ, इ०; सौम्य इलाज, उपदेश, संभाषण इ०. **शांतिकपौष्टिक, शांतिकपुष्टिक न०** अरिष्ट निवारण किं० इष्टप्राप्ति यासाठीं जीं धर्मकृत्ये

केला जातात तो प्रत्येक. **शांतिपाठ पु०** १ प्रसूत स्त्रीला आणि तिच्या अर्भकाला भूतपिशाचांचा उपद्रव न व्हावा म्हणून म्हणतात ते मंत्र. २ अडचणी किं० विघ्नें यांचें निवारण करण्याचें चातुर्य. ३ ( विपरीत लक्षणेनें ) कोणेकावर एकसारखें चरफडणें. **शांतिब्रह्म न०** १ शांत, गरीब, साधुवृत्तीचा मनुष्य. २ वरून शांतवृत्ति दाखवून अंतःकरणांत वैराचें विचार चालविणारा. **शांतिरस पु०** ( साहित्य ) नवरसांपैकीं एक; शांत रस. मागें ' रस ' पहा.

**शाद स्त्री०, न०** शेवाळ.

**शाद** [ **फा०** ] **वि०** आनंदित; खूष. ꕥ **शादमानी स्त्री०** १ आनंद. २ खुशालीची खबर; कुशल वृत्त.

**शादियानें, शहाजणें** [ **फा०** शादयानाह् ] **न०** मंगलवाद्यांचा ताफा ( वाजविणें ).

**शादी** [ **फा०** ] **स्त्री०** ( मुसलमानांत ) लग्न, विवाह.

**शादूळ** [ **सं०** शाद्वल ] **न०** कोंवळें गवत.

**शाद्वल** [ **सं०** ] **वि०** गवतानें व्यापिलेला ( प्रदेश ). **पु०** कुरण; गवताळ जमीन.

**शान** [ **अ०** षान् ] **स्त्री०** प्रतिष्ठा; डौल. ꕥ **शानशौकत स्त्री०, शानशौक पु०** प्रतिष्ठा; थोरवी; डामडौल; भपका. **शानगुमान पु०** डौल; ताठा; नक्षा. ꕥ **कोणेकाची शानगुमान नाहीशी करणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याला जिरविणें; त्याची फजीती करणें.

**शानदार, शानदारी** मागें ' छान, ' ' छानदारी ' पहा. ꕥ **शानशुकी, शानशोकी स्त्री०** छाकटेगिरी; नखरेबाजी; ऐट; तोरा. **वि०** झोकदार किं० अकडबाज ( पुरुष किं० स्त्री ).

**शानिशा** मागें 'शह'मध्यें 'शहानिशा' पहा.

**शान, शाने, शानी क्रि० वि०** 'ऊन' प्रत्ययान्त धातूपुढें केवळ जोर देण्यासाठीं हा शब्द अशिक्षित योजतात; उ० करून शान म्ह० करून.

**शाप** [ **सं०** ] **पु०** कोणेकाचें अनिष्ट होवो अशा अर्थाचें उच्चारलेलें वाक्य ( देणें, जडणें, लागू होणें ). ꕥ **शापगुण पु०** शाप; शापाचा परिणाम किं० प्रभाव; उ० ब्राह्मणांनीं उलटें टांगून द्यावें असा त्यांस शापगुण आहे. **शापादपि शरादपि क्रि० वि०** शापापासून आणि शरापासून; शापानें आणि शरानें; शाप देऊन आणि बाण मारून. हा मूळचा अर्थ **क्रि० वि०** आहे. हल्लीं ' शापादपि शरादपि ' याचा अर्थ ' सर्व प्रकारें बलिष्ट किं० समर्थ ' असा घेण्यांत येतो; उ० त्रिविक्रमपंत आजकाल शापादपि शरादपि असा आहे.

**शापित** [ **सं०** ] **वि०** १ ज्याला शाप झाला असा. २ (कवितेंत) ज्याच्या कडून कांहीं प्रतिज्ञा करविण्यांत आली आहे असा.

**शाबर** [ **सं०** ] **वि०** १ रानटी. २ नीच. ३ पापी. ४ शबरस्वामिकृत. ५ शबर जाती संबंधाचें. ह्या अर्थी ' शाबरी ' सुद्धां. **न०** नजरबंदीची विद्या; गौडबंगाल.

**शांबरी** [ **सं०** ] **स्त्री०** १ इंद्रजाल; गारुड; गौडबंगाल. २ इंद्रजाल विद्येंत प्रवीण स्त्री.

**शाबान** [ **अ०** षअबान् ] **पु०** अरबी वर्षाचा आठवा महिना.

**शाबास** [ **फा०** षाबाष् ] **उ० वा० अ०** ठीक, उत्तम ! भले खाशी! वेष ! ꕥ **शाबासी, शाबासकी स्त्री०** स्तुति; प्रशंसा ( देणें ).

**शाबित** [ **अ०** साबित् ] **वि०** सिद्ध करण्यांत आलेलें. खालीं ' शाबूत ' पहा.

**शाबुडी स्त्री०** साबणी ह्या नांवाचें मुलांचें एक खाद्य.

**शाबूत(-द)** [ **अ०** [illegible], साबित् ] **वि०** अभग्न; न फुटलेलें; न मोडलेलें; न तुटलेलें. ' शाबीत ' आणि ' शाबूत ', हे दोन्ही शब्द एकाच अरबी शब्दापासून आलेले असून त्यांना आपण दोन अर्थ दिले आहेत. शाबूत म्ह० धड म्ह० न फुटलेला. शाबीत म्ह० पुराव्यानें सिद्ध केलेला किं० सिद्ध झालेला; प्रस्थापित. हा भेद विद्यार्थ्यांनें लक्ष्यांत ठेवावा. ꕥ **शाबिती स्त्री०** सिद्धता; प्रस्थापन. **शाबुती स्त्री०** सुरक्षितपणा; अभग्नपणा; धडपणा.

**शाब्द, शाब्दिक** [ **सं०** ] **वि०** १ तोंडी; केवळ तोंडातोंडीं झालेला; लेखी नव्हे असा. २ शब्दरूप; शब्दमय. ३ वरवरचा; अंतःकरणापासून नसलेला. ४ शब्दासंबंधाचा. ५ वस्तुतः एकच पण भिन्न शब्दांनीं दर्शविलेला किं०

सांगितलेला; दिसण्यांतच वेगळा असा. पु० वैयाकरण; व्याकरणकार. ॐ शाब्दिक (किं०शाब्द) सृष्टि स्त्री० गद्यकृति किं० पद्यकृति ( काव्य, नाटक, इ० ).

**शांभव** [ सं० ] वि० शंकरासंबंधाचें. पु० शैव; शिवोपासक.**शांभवी** स्त्री०१ गंगा.२पार्वती. ३ नील दूर्वा. ४ भांग,–अमली वनस्पतिविशेष.

**शाम** [ सं० ] पु० स्याम देश.

**शाम, शामल** इ० पुढें 'श्याम,' 'श्यामल' इ० पहा.

**शामक** [ सं० ] वि० शमविणारें, कमजोर करणारें ( औषध, खाद्य, उपचार, इ० ); उ० पित्तशामक.

**शामत** मागें ' शहामत ' पहा.

**शामदान** [ फा० षम्अदान् ] न० मेणबत्ती बसवावयाची रचना; मेणबत्तीची ठाणवई.

**शामाटें** [म० शम] न० थातुरमातुर; कामचलाऊ किं० तात्पुरती मांडणी किं० व्यवस्था; कशीतरी करून टाकलेली तोडजोड.

**शामाट्या** वि०१मूर्ख; अडाणी.२आडमुठ्या.

**शामाणा (–ना )** [ फा० शामीयानाह् ] पु० तंबूपुढें उभारलेलें वस्त्र; छत.

**शामील, सामील** [ अ० शामिल् ] वि० समाविष्ट; अंतर्भूत.

**शायदी, शाहिदी** [ फा० ] स्त्री० पुरावा; साक्षी. ॐ **शायदीदार, शाहिदीदार, शाहीद** पु० साक्षीदार; पुरावा सांगणारा किं० देणारा.

**शायी** [ सं० शायिन् ] वि० निजणारा. उपपद तत्पुरुष समासांत अंत्यपदीं ह्याचा उपयोग होतो; उ० शेषशायी म्ह० शेषावर निजणारा म्ह० विष्णु. जलशायी, भूशायी, सुखशायी, इ०.

**शारंग** खालीं ' शार्ङ्ग ' पहा.

**शारंग, शारंगी** पुढें ' सारंग, ' सारंगी ' [ पहा.

**शारंगी, सारंगी** [ सं० शार्ङ्ग ] स्त्री० एक तंतुवाद्य.

**शारद** [ सं० ] वि० १ शरदृतूसंबंधाचें; शरदृतूंत करावयाचें किं० व्हावयाचें. २ वार्षिक. पु० १ वर्ष. २ आश्विनमास.

**शारदा** स्त्री० वागिन्द्रियाची अधिष्ठात्री देवता; सरस्वती. **शारदी** स्त्री०कोजागरी. **शारदाया** स्त्री० शरदृतूंतील दुर्गापूजा. **शारदिक** न० शरदृतूंतील श्राद्ध. पु० १ शरत्काळचा रोग. २ शरत्काळचें ऊन्ह. ॐ **शारद** ( किं० **शारदीय** ) **नवरात्र** न० आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत जें नवरात्र तें.

**शारि** [ सं० ] पु० सोंगटी. स्त्री० मैना हा पक्षी. ॐ **शारिपट्ट** पु०, **शारिफल, शारिफलक** न० सोंगट्यांचा पट.

**शारिका** [ सं० ] स्त्री० १ मैना. २ तंतुवाद्य वाजविण्याची धनुकली. ३ द्यूत.

**शारी** स्त्री० सुताराचा सामता,–भोंक पाडण्याचें एक साधन.

**शारीर** [ सं० ] वि० १ शरीरासंबंधाचें. २ मूर्तिमंत. पु० जीवात्मा. न० १ शरीराच्या रचनेचें शास्त्र. २ विष्ठा.

**शारीरक** [ सं० ] वि० शरीरासंबंधाचें. न० १आत्म्याच्या स्वरूपाचा विचार.२ब्रह्मसूत्रभाष्य.

**शारीर, शारीरक** न० गातांना घेतात तो कंप किं० तो कंप घेण्याचें कौशल्य किं० तऱ्हा.

**शारीरिक** [ सं० ] वि० शरीरासंबंधाचें. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' मानसिक,' ' आध्यात्मिक.'

**शारे** पु० अ० व० मागें ' शहारे ' पहा.

**शार्ङ्ग** [ सं० ] वि० शिंगाचें बनविलेलें; शिंगासंबंधाचें. पु०, न० १ धनुष्य. २ विष्णूचें धनुष्य. ॐ**शार्ङ्गी** [सं० शार्ङ्गिन् ]पु० १तिरंदाज. २ विष्णु.

**शार्दूल** [ सं० ] पु० १ वाघ. २ चित्ता. ३ श्रेष्ठ; उ० नरशार्दूल, वीरशार्दूल, इ०.

**शाल** [ फा० षाल् ] स्त्री० लोकरीचें वस्त्रविशेष. ॐ **शालजोडी** स्त्री० शालीच्या दोन फर्दांची जोडी. **शालनामा** पु० बुटीदार शाल.

**शाल** [ सं० ] पु० १ एक वृक्ष. २ कुंपण; तट. ॐ **शालग्राम** पु० विष्णुमूर्तिविशेष; शालिग्राम. **शालनिर्यास** पु० राळ.

**शालक** पुढें ' श्यालक ' पहा.

**शालपर्णी** स्त्री० सालवण वृक्ष.

**शालभंजी, शालभंजिका**[सं०] स्त्री० मुलींची खेळावयाची बाहुली.

**शाला; शाळा** [ सं० शाला] स्त्री० १स्थान;

गोठा; पागा; उ० अश्वशाला म्ह० घोड्यांचा तबेला; गोशाला म्ह० गोठा. २ घराचा भाग; खोली; उ० होमशाला इ०. ३ सभागृह. ४ वृक्षाची मुख्य खांदी. ५ स्वयंपाक, वस्त्रें विणणें, नृत्य, गायन, व्यायाम, सुतारकी, लोहारकी,इ० जीं हरएक प्रकारचीं कामें त्यांच्या सोयीचीं गृहें किं०जागा प्रत्येक. ६विद्यार्थ्यांना पैसे घेऊन किं० फुकट जेथें शास्त्र, वाङ्मय, गणित, ज्योतिष, वैद्यक,वगैरे विषयांचें शिक्षण दिलें जातें ती संस्था. ७विशिष्ट कुटुंब,संस्था,मंडळी,इ०मध्यें राहिल्यानें जी वर्तनसरणी कोणेकाला लागते ती. ८ एक विशिष्ट पंथ,संप्रदाय,मत,आचार,इ०, किं०त्यांची संस्था. ॐ **शालाशुद्ध,साळसूद,शाळसूद** वि०१ सभ्य चालीरीतीचा. २ साधा; ज्याला छक्केपंजे ठाऊक नाहींत असा; प्रामाणिक. ३ शास्त्राला धरून असलेलें (गायन, वादन). **शालाबंधु** पु०त्याच किं० एकाच शाळेंतील विद्यार्थी परस्परांचे. **शाळेंतील** ( किं० **शाळेचें** ) **शिंगरूं**( किं० **लेकरूं** ) न० बदमाष बापाचा बदमाष पोरगा.

**शालि** [ सं० ] स्त्री० साळ; भात.ॐ**शालिहोत्र** पु० घोडा. **शाल्योदन** न० साळीच्या तांदुळाचा शिजवून केलेला भात.

**शालिग्राम, शाळिग्राम** [ सं० शाल ( एक नदी )+ग्रावन् ( धोंडा ) ] पु० १ गंडकी नदींतील काळा धोंडा,-ज्याची विष्णु म्हणून पूजा करतात. २( विनोदांत ) कांदा.

**शालिवाहन** [ सं० ] पु० एक मोठा शककर्ता. ह्याचा शक खिस्ती शकामागून ७८ वर्षांनीं सुरू झाला; उ० हा कोश शालिवाहन शके १८४९मध्यें सुरू झाला तो शालिवाहन शके १८५२मध्यें समाप्त होईल.

**शाली** [ सं० शालिन्=शोभणारा ] वि० ( उपपद समासांत उत्तरपदीं)शोभणारा;उ०विनयशाली, धैर्यशाली,इ०.**शालिनी** स्त्री० सुगृहिणी.

**शालीन** [ सं० ] वि० १ लाजरा. २ विनयशील; सभ्य चालीरीतींचा; नम्र.

**शालू** [ हिं० सालू ] पु० १ बायकांचें नेसण्याचें एक उंची वस्त्र. २ बैलाच्या मानेवर शोभेसाठीं लोंबत सोडतात तें वस्त्रविशेष.

**शाल्मल** पु०, **शाल्मली** स्त्री० [ सं० ] सांवरी हा वृक्ष.

**शाव** [सं०]पु०मूल;पिलूं;छावा. वि० प्रेतासंबंधी.ॐ**शावाशौच** न०१सुतकाचा विटाळ;सुतक. २ प्रेत वाहून नेल्यानें होतो तो विटाळ.

**शावक** [ सं० ] पु० छावा; पिलूं.

**शाश्वत, शाश्वतिक** [ सं० ] वि० कायमचें; टिकाऊ; क्षणभंगुर नव्हे तें. न० १ स्वर्ग. २ शाश्वत तत्त्व. ॐ **शाश्वती** स्त्री० १ टिकाऊपणा. २ भरंवशास पात्रता; खात्री.

**शासक** [ सं० ] वि० १अमल चालविणारा; नियंत्रणा लावणारा; नियमन करणारा. २ शिक्षा करणारा.

**शासणें** [ सं० शास् ] स० क्रि०१नियंत्रिणें; ( कोणेकावर ) अमल, हुकमत, किं० ताबा चालविणें किं० करणें. २ दण्डिणें;०चें पारिपत्य करणें.

**शासन** [ सं० ] न० १ शिकविणें. २अमल; ताबा;राज्य.३हुकूम;नियम; नियंत्रणा.४निवाडा. ५इनामपत्र. ६ करारपत्र. ७ शास्त्र.८दंड; शिक्षा; पारिपत्य. ॐ **शासनपट्ट** न० आज्ञापत्र; सनद. **शासनहर, शासनहारिन्** पु० दूत; जासूद.

**शासिता** [ सं० शासितृ ] पु० १ राज्य करणारा; अमल चालविणारा. २ शिक्षा करणारा; नियंत्रणा घालून देणारा.

**शास्ता** [ सं० शास्तृ ] पु० १ राजा. २बाप. ३ गुरु. ४ गौतम बुद्ध.

**शास्त्र** [ सं० ] न० १ आज्ञा; हुकूम. २ धर्मनियम; धर्मग्रंथ. ३ ज्ञान. ४ विद्येची शाखा. ५ विशिष्ट सरणीनें एकाद्या विशिष्ट विषयाचा ऊहापोह किं०चर्चा;उ० वेदान्तशास्त्र, व्याकरणशास्त्र. ॐ **शास्त्रास असणें**, किं० **शास्त्रापुरता असणें**, किं० **शास्त्राचा असणें** आहे म्हणण्या पुरताच असणें; अगदीं थोड्या प्रमाणांत किं०थोड्या अंशानें असणें;उ०ह्या पंचपाळ्यांत शास्त्रापुरती हळद आहे. **शास्त्रास नसणें** शास्त्राची आज्ञा भागविण्याइतकाही नसणें;अगदीं थोडा देखील नसणें;उ०माझ्या घरांत शास्त्रास चिमूटभर सुद्धां साखर नाहीं,मग शेरभर कोठून देऊं ? **हा चाकू शास्त्राला चाकू आहे** ह्याला चाकू म्हणतां येईल हें खरें,पण चाकूचें काम ह्यानें होणार नाहीं असा आहे म्ह० ह्याला

धार मुळींच नाहीं. **शास्त्री** [ सं० शास्त्रिन् ] पु० शास्त्र जाणणारा; धर्म, व्याकरण, वेदान्त, किं० अन्य कांहीं शास्त्र जाणणारा. **शास्त्रार्थ** पु० १ संदिग्ध स्थितींत काढलेला मार्ग. २ अमुक करावें किं० अमुक करूं नये ह्या संबंधानें निर्णायक जें कांहीं ठरविण्यांत येतें तें. **कोणेक गोष्टीचा शास्त्रार्थ करणें** ती गोष्ट यथाकथंचित् केलीशी करणें; ती थोडक्याच प्रमाणांत करणें; ती नांवाला करणें; केली असें म्हणावयाला जितकें थोडें चालेल तितकेंच करणें. **शास्त्रार्थ करणें** कांहीं गोष्ट उगाच नांवालाच करणें. **शास्त्रतः** क्रि० वि० १ शास्त्राप्रमाणें; शास्त्राच्या अनुरोधानें. २ वस्तुतः; खरोखरी. **शास्त्रीय** वि० शास्त्राला अनुसरून असलेलें; शास्त्राला संमत किं० ग्राह्य होईल असें; शास्त्राच्या परिभाषेला किं० पद्धतीला धरून असलेलें.

**शास्य** [ सं० ] वि० १ आटोक्यांत ठेवतां येईल असा; नियंत्रणेंत ठेवावयास पाहिजे असा. २ दंडास पात्र. ३ ज्याचें शासन केलें पाहिजे असा.

**शाह, शाहंगी, शाहजादा,** इ० मागें 'शहा,' 'शहांगी,' 'शहाजादा,' इ० पहा.

**शाहिदी** [ फा० ] स्त्री० साक्ष; पुरावा. **शाहिदी, शाहिदीदार, शाहीद** पु० साक्षीदार.

**शाहिरी** वि० शाहिरासंबंधाचा. स्त्री० कवित्व. खालीं 'शाहीर' पहा.

**शाहिरूखर्च** पु० सरकारी जमाखर्चाचें खातें.

**शाहीर** [ फा० शाइर ] पु० १ कवि. २ (मराठींत) समाजांत मोठ्यानें म्हणावयासाठीं लावण्या, पोवाडे, पदें, इ० रचणारा किं० स्वतां रचून स्वतां म्हणणारा किं० लोकांनीं रचलेलीं म्हणणारा. ॐ **शाहिरी** स्त्री० शाहिराचा धंदा. वि० शाहिराचा धंदा, वेष, इ०च्या संबंधाचा.

**शाळ** मागें ' शाला, शाळा ' पहा.

**शाळक, शालक** [ सं० स्यालक ] पु० बायकोचा भाऊ.

**शाळंकृत** पुढें 'सालंकृत' पहा.

**शाळसूद** मागें ' शाला ' मध्यें पहा.

**शाळा** मागें ' शाला ' पहा.

**शाळुंका (-खा )** स्त्री० महादेवाचें लिंग बसविण्यासाठीं पाषाणादिकांची योन्याकार करतात ती बैठक.

**शाळुंकी, शाळुंखी** स्त्री० एक पक्षी; साळुंकी.

**शाळू** पु० जोंधळ्याची एक जात. ह्या जातीचा जोंधळा हिंवाळ्यांत पिकतो आणि हिंवाळ्याचे दिवस लहान असल्याकारणानें 'शाळू' ह्याचा अर्थ अल्प मुदतीचा किं० थोडा वेळ टिकणारा असा विशेषणात्मक होऊन कांहीं शब्दामागें 'शाळू' शब्द योजला जातो. शाळूसोबती म्ह० थोड्याच अवधीपुरता आपल्या जवळ किं० आपल्या सहवासांत राहाणारा. शाळूसोबत म्ह० थोड्या वेळाची मैत्री. शाळू दिवस म्ह० आखूड किं० लहान दिवस. ह्याच सरणीनें शाळू संपत्ति, शाळू आयुष्य, इ० चे अर्थ जाणावे. **शाळूगवत** न० १ एक नाजूक जातीचें गवत. २ पावसाळ्याच्या कांहीं महिन्यांतच उगवून लवकरच संपणारें गवत.

**शाळें** न० अगदीं कोंवळा नारळ; शहाळें.

**शाळोत्री** [ सं० शालिहोत्र=घोडा ] पु० घोड्याचा वैद्य.

**शिऊळ, शिवळ** स्त्री० १ जोकडाला बैल इ० चीं मान अडकावण्यासाठीं जोकडाच्या कडेस भोकें पाडून त्यांत ज्या खुंट्या घालतात त्या प्रत्येक. २ ओठ दाबून तोंडानें वाजवितात ती शीळ.

**शिंक** [ सं० छिका, छिक्कण ] स्त्री० नाकांतून जोरानें सशब्द वायु निःसरतो तो.

**शिककई, शिकेकायी** [ कानडी ] स्त्री० एक झाड. याच्या शेंगा कढवून त्या काढ्यानें डोईचे केश धुऊन स्वच्छ करतात.

**शिकंजी** [ फा० शिकंजबीन् ] स्त्री० गुलाबाच्या वासाचें सरबत.

**शिकणाऊ, शिकाऊ** [ म० शिकणें ] वि० १ गुरुजी किं० वस्तादजी यांचेपासून शिकून घेतलेली किं० घ्यावयाची (कला, विद्या, ज्ञान, इ०). २ कांहीं कला, विद्या, इ० जो शिकत आहे तो.

**शिंकणी** [ म० शिंकणें ] स्त्री० १ एक झाड. याच्या पानांचें चूर्ण नाकानें ओढलें असतां अनेक शिंका येतात. २ शिंकणें ही क्रिया.

**शिंकणें** [ सं० छिका, छिक्कन ] अ० क्रि०

आंत वायूचा अनावर क्षोभ झाल्यामुळें नाकावाटें जोरानें वायु बाहेर सोडणें. ❀ **माशी शिंकणें** हरकत येणें; अडथळा होणें. थट्टेंत किं० उपहासांत ह्या वाक्प्रचाराचा उपयोग केला जातो; उ०तूं भाजी आणावयाला जाऊन आणली नाहींस, वाटेंत माशी शिंकली कीं काय ?

**शिकंदर** [ अ० सिकंदर् ] पु० १ म्यासिडोनियाचा एक मोठा पराक्रमी राजा. २ ( **लाक्षणिक** ) गांवचा पुंड; वात्रट किं० द्वाड माणूस. ❀ **शिकंदर नशीब न०** मोठ्या संकटांतून निभावून किं० बचावून नेणारें कोणेकाचें दैव. **शिकंदराची दिवाल स्त्री०** चिरस्थायी वस्तु. याजूज आणि माजूज नांवांच्या रानटी लोकांपासून संरक्षण व्हावें म्हणून शिकंदर बादशहानें एक अत्यन्त भक्कम आणि •बेलाग अशी भिंत ( दिवाल ) बांधली अशी दन्तकथा आहे. यावरून वरील ' चिरस्थायी वस्तु ' असा लाक्षणिक अर्थ झाला आहे; उ० तुझें साम्राज्य तूं शिकंदराची दिवाल समजतोस काय ? छिः ! तूं मूर्ख आहेस ! तुझ्या सद्दीचा जोर संपला म्हणजे तें साम्राज्य वावटळींत भुसासारखें उधळलें जाईल ! **शिकंदर ताले पु० अ० व०**१ शिकंदर बादशहाप्रमाणें उच्चीचे ग्रह. २समृद्धीचे नानाविध प्रकार. मागें ' ताल ' पहा.

**शिकरण** [ सं० शिखरिणी ] **स्त्री०** १ पिकलेलीं केळीं कुसकरून त्यांत दूध, साखर, इ० घालून भाकरी, पोळी, इ० बरोबर खावयाला करतात तें पातळ खाद्य. २ खरबूज इ० चें असेंच करतात तें पातळ खाद्य.

**शिकरणी** [ सं० शिक्य ]**स्त्री०** उंचावर पदार्थ ठेवण्यासाठीं टांगतां येण्याजोगी दोऱ्यांची रचना करतात ती.

**शिंकरणें** [ म० शिंक ] **स० क्रि०** नाकपुड्या कांहीं विशेष प्रकारें बोटांनीं दाबून नाकावाटें जोरानें वायु बाहेर सोडण्याच्या क्रियेनें ( शेंबूड इ० ) बाहेर काढून लावणें. ' नाक ' ह्यावरही कर्मता येऊं शकते;उ०त्यानें नाक शिंकरलें.

**शिकरा** [ फा० षिकराह् ]**पु०** बहिरीससाणा.

**शिकरी स्त्री०** पाणरहाटाच्या माळेला लोटे बांधावयाचे जे दोरीचे लहान लहान तुकडे ते प्रत्येक.

**शिकल** [ अ० सैकल ] **स्त्री०** १ चकाकी; झिलई. २ हत्याराला दिलेली धार. ३ कोणेकाची आबरू किं० प्रतिष्ठा किं० मान ( गमावणें, उडविणें, उतरणें ). ❀ **शिकलगार, शिकलकर पु०** हत्यारांना धार देणारा कारागीर.

**शिकवण, शिकवणी** [ म० शिकविणें ] **स्त्री०** १ शिकविण्याची तऱ्हा. २ कोणेकानें कोणेकाला केलेला बोध किं० लावून दिलेली वर्तनाची सरणी. ३ लहान मुलांना शिकविणें किं० शिकविण्याचा क्रम; उ० शाळेंतील काम संभाळून मी दररोज पांच शिकवण्या करीत असें.

**शिकविणें** [ म० ' शिकणें ' चें प्रयोजक ] **स० क्रि०**१(कोणेकाला)कांहीं विषय समजावून देणें किं० ( त्याला ) त्या विषयाचें ज्ञान करून देणें किं० ( त्याला ) तो विषय उलगडून सांगणें. **टीप**,–विषयावरही कर्मता येऊं शकते; उ० मी त्या जहागिरदाराचीं तीन मुलें शिकवितों; उ० मी नूतन मराठी विद्यालयांत साडे सहा वर्षें फ्रेंच शिकविलें. २ ( कोणेकाला ) कांहीं बदकर्मांची दीक्षा देणें किं०त्याला कांहीं व्यसन लावून देणें.

**शिकस्त** [अ० षिकस्त] **स्त्री०** १ पराकाष्ठा.२ पराकाष्ठेची खटपट किं०प्रयत्न;उ०मी नोकरीसाठीं शिकस्त केली पण मला नोकरी मिळाली नाहीं.

**शिकस्त** [ फा० षिकिस्ताह्=मोडलेला ]**स्त्री०** मोड; पराभव ( होणें, देणें ). **वि०** १ मोडलेला; फुटलेला; भग्न. २ पराभूत.

**शिका** पुढें ' शिक्का ' पहा.

**शिकाऊ** मागें ' शिकणाऊ ' पहा.

**शिकार** [ फा० षिकार् ] **स्त्री०** १ मृगया; पारध. २ अकल्पित असा कांहीं लाभ. ३ ज्यावर आपला मुळींच हक्क नाहीं असा प्राप्त झालेला कांहीं फायदा किं० पदार्थ. ❀ **शिकारखाना पु०** १ जेथें शिकार करावयासाठीं जनावरें ठेविलेलीं असतात अशी जागा.२शिकारींत जरूर अशा हत्यारांची जागा. **शिकारी वि०** शिकार करण्याच्या वेळीं ज्याचा उपयोग होतो असा (कुत्रा,घोडा,बंदूक,भाला,इ०).**शिकारबाज पु०**१ शिकार करणारा; शिकार करण्याचें व्यसन किं० नाद ज्याला आहे असा. २ शिकार करण्यांत पटाईत माणूस.

**शिंकारणी, शिंकरणी** [ म० शिंकें; सं० शिक्य ] स्त्री० तीन किं० चार दोऱ्यांवर लोंबत सोडलेला आधार,-टोपली, परडें, इ०.

**शिंकारणें** [ म० शिंकें ] स० क्रि० शिंक्यांत ( टोपली, मांडें, इ० )घालणें किं० ठेवणें.

**शिकारोखा** खालीं ' शिक्का ' मध्यें पहा.

**शिंकाळणें** [ म० शिंकें ] स० क्रि० ( मांडें इ० ) सोयीनें हातांत धेऊन चालतां यावें म्हणून त्याच्या गळ्याला किं० कांठाला दोरीच्या दोन किं० तीन पदरांचें लोंबतें वेष्टन करणें. अशा रीतीनें लोंबतें सोडावयाचें जे भांडें त्याला 'शिंकाळणें ' न० असा शब्द आहे.

**शिंकाळी, शिकाळी** [ म० शिंकें ] स्त्री० चालत जातांना भांडें सोयीनें लोंबत नेतां यावें म्हणून त्याच्या गळ्याला दोरीच्या दोन किं० तीन सरांचें जें बंधन आडकावितात तें.

**शिकी** स्त्री० गलबताचें शीड गुंडाळून काठीस बांधावयाच्या उपयोगी शिडास संबद्ध केलेले असतात जे दोरीचे तुकडे ते प्रत्येक.

**शिकील, शिकीलगार** मागें ' शिकल, ' ' शिकलगार 'पहा.

**शिंकें, शिकें** [ सं० शिक्य ] न० उंचावर पदार्थ सुरक्षित ठेवतां यावा म्हणून खुंटी, तुळई, इ० वरून लोंबता दोरीचा जो आधार केलेला असतो तो.

**शिकेकाई,शिकिकाई, शिकिकई, शिकिकै** मागें ' शिककई ' पहा.

**शिकेकटार** इ० खालीं ' शिक्का ' मध्यें पहा.

**शिकोरा** पु० चुलीवर कांहीं पदार्थ शिजावयाला ठेविलेल्या भांड्यावर झाकण ठेवावयाचें मृत्तिकापात्र किं० परळ.

**शिकोरी** स्त्री० ज्यांत तेल आणि वात घालून प्रकाशासाठीं ती वात पेटवावयाची तें मातीचें पसरट पात्र; पणती.

**शिक्कल, शिक्कलगार** मागें ' शिकल,' ' शिकलगार ' पहा.

**शिक्का, सिक्का** [ अ० सिकाह् ] पु० १ नाण्यावर आकृतिविशेष उमटविण्याचा ठसा. २ राजाच्या सहीचा किं० पसंतीचा कागद, सनद, दस्तऐवज, इ० वर शाई इ० नीं उमटविलेला ठसा. ३ छाप,-सामान्यतः. ४ कोणत्याही पदार्थावर कोणत्याही प्रकारची केलेली निशाणी किं० खूण. ५ देवी यावयासाठीं शरीरावर जो व्रण करून घेतात तो. ६ वैष्णव लोक शरीरावर घेतात ती तप्तमुद्रा किं० तिचें त्वचेवर उमटलेलें चिन्ह. ७ पोशेर नांवाच्या कमलाचा बीजकोश. ॐ **शिक्केकट्यार,शिकेकट्यार** स्त्री० १ मुद्रा, कट्यार, छत्र, इ० राजचिन्हें उमटावेण्याचा ठसा किं० त्या ठशानें उमटविलेली आकृति; अधिकाराचीं चिन्हें. २ स्मशानांत जाळावयाला प्रेत तिरडीवर घालून नेतांना ज्या तिकट्यावर अग्नीचें मडकें ठेवून नेतात तें तिकटें.**शिक्केनीस** पु० पत्रें,सनदा,इ०वर राजाचा शिक्का ठोकणारा कारकून. **शिक्केवरदार** पु० राजाचे हरएक कामाचे शिक्के ज्याच्या स्वाधीन असतात तो अधिकारी. **शिक्केशाई** स्त्री० शिक्क्यासाठीं जी शाई वापरतात ती.**शिकारोखा** पु० हुकमत, शिरजोरपणा, वर्चस्व ( मिरविणें, चालविणें, इ० [ लोखंड.

**शिक्केशाई लोखंड** न० एक प्रकारचें उंची

**शिक्थ** [ सं० शिक्थ, सिक्थ ] न० मेण,- मधमाशांच्या पोवळ्याचें.

**शिखंड, शिखंडक** [ सं० ] पु० १ डोक्यावरील झुलूप. २ डोक्यावरील शेंडी. ३ मोराचें पीस. ४ शोभेसाठीं करतात तो तुरा. ॐ **शिखंडी** [ सं० शिखंडिन् ] पु० १ मोर. २ कोंबडा. ३ बाण. ४ मोराचें पीस. **शिखंडिनी** स्त्री० लांडोर; मोराची स्त्री.

**शिखंडी** [ सं० शिखंडिन् ] पु० १ द्रुपदाचा पुत्र आणि भारतीय युद्धांतील एक राजा. हा मूळचा स्त्री असून पुढें पुरुष झाला होता. २ षढ; नपुंसक. ३ मोर हा पक्षी.

**शिखणाऊ, शिखणें** इ० मागें ' शिकणाऊ,' ' शिकणें , इ० पहा.

**शिखर** [ सं० ]न०१पर्वताचें टोक. २ वृक्षाचें अग्र.३ तुरा.४टोक,अग्र( सामान्यतः). ॐ **शिखरी** [ सं० शिखरिन् ] वि० टोकदार;अणकुचीदार; टोक असलेलें. पु० १ पर्वत. २ डोंगर. ३ किल्ला. **शिखरमणी, शिखरामणी** पु० कोणत्याही समुदायांत श्रेष्ठ किं०अग्रगण्य.**शिखरापुरीस जाणें** अत्यन्त मगरूर, गर्विष्ठ, किं० बेगुमान होणें किं० असणें.**शिखरिणी** स्त्री० १ सुंदर स्त्री. २केळीं इ० दूध, इ० मध्यें कुसकरून त्यांत साखर इ०घालून

केलेलें अर्धवट पातळ असें खाद्य. ३ एक अक्षर वृत्त. याच्या प्रत्येक चरणांत य, म, न, स, भ, हे गण असून अंतीं एक लघु आणि एक गुरु अशीं एकंदर सतरा अक्षरें असतात. सहाव्या अक्षरावर आणि पादान्तीं यति. **शिखरास जाणें** परमावधीस पोंचणें; पराकाष्ठेचें होणें. **शिखरीं काठ्या लागणें** आपलें उद्दिष्ट मिळविणें; ध्येय गांठणें. **टीप**,–खंडोबाचे भक्त खंडोबाच्या देवळाच्या शिखरास आपल्या काठ्या टेकतात ह्या परिपाठावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. **शिखरीं पोट लागणें** अधाशीपणानें फार जेवल्यामुळें पोट अगदीं कंठास लागणें.

**शिखरण स्त्री०** मागें ' शिखर ' मध्यें 'शिखरिणी ' अर्थ २ पहा.

**शिखा [ सं० ] स्त्री०** १ शेंडी. २ डोईचे केश. ३ तुरा. ४ मोराच्या डोक्यावरील पिसांचा झुबका. ५ वृक्षाचा शेंडा. ६ कोणत्याही पदार्थाचें वरचें टोक किं० अग्र. ७ लुगडें, धोतर, इ० वस्त्राचा पदर. ८ अग्नीची ज्वाळा. ९ झाडाची फांदी. १० झाडाची पारंबी. ‖ **शिखावल पु०** मोर. **शिखी [ सं० शिखिन् ] पु०** १ मोर. २ अग्नि. ३ वृक्ष. ४ पर्वत. ५ दिवा. **शिखाध्वज पु०** कार्तिकेय. **शिखानष्ट पु०** मुसलमान(निंदेंत). **शिखामणि पु०** १ मस्तकावर शोभेसाठीं धारण करावयाचा मणि. २ कोणत्याही भूषणांतील मुख्य हिरा इ० रत्न. ३ मुकुटमणि. **शिखासूत्र न०** शेंडी आणि जानवें,–द्विजत्वाचें लक्षण. **शिखासूत्रावर येणें** अत्यन्त रागावून शेंडी आणि जानवें तोडण्यास सिद्ध होणें.

**शिंग [सं०] न०** १ गाय, म्हैस, बैल, शेळी, इ० च्या डोक्यावर जे टणक अस्थिरूप अवयव असतात ते प्रत्येक. २ गाय, म्हैस, इ० च्या ह्या शिंगांच्या आकाराचें पितळेचें जें मुखवाद्य करतात तें. ‖ **शिंगट न०** १ शिंग ( तुच्छतेंत ). २ नळ्याप्रमाणें उडवावयासाठीं ज्यांत दारू ठासून भरली आहे असें शिंग. **शिंगडा पु०** बंदुकीची दारू ठेवावयाचें शिंग किं० शिंगाच्या आकाराची पितळ इ० ची नळी. शिकारी लोक शिंगडा कमरेस लटकावून जातात. **शिंगशिंगोटी स्त्री०** १ गाय, म्हैस, इ० चीं अस्ताव्यस्त पडलेलीं शिंगें समुच्चयानें. २ गाय, म्हैस, इ० गुरें समुच्चयानें. ३ गाय, म्हैस, इ० च्या खरेदीविक्रीवर सरकारचा कर. **शिंगाडी स्त्री०** १ गाडीच्या तबकडीला बसविलेलीं उभीं लाकडें प्रत्येक. २ चांभार लोक घट्ट जोडा सैल करावयासाठीं त्यांत खुपसतात तो ठोकळा,–जो मागें जाडी आणि पुढें बारीक असतो. **शिंगाळ वि०** शिंगांनीं मारण्याची ज्याला खोडी आहे असा ( पशु,–गाय, बैल, इ० ). **शिंगाळू वि०** १ ज्याला नुकतींच शिंगें फुटलीं आहेत असा ( पाडा, पाडी, इ० ). २ शिंगांनीं मारण्याची ज्याला खोडी आहे असा ( बैल, गाय, इ० ). ३ खूप लांब शिंगें असलेला ( बैल, गाय, इ० ). **शिंगाळें न०** बैलाच्या शिंगांना कपाळाजवळ त्यांना आवरण्यासाठीं बांधतात ती दोरी. **शिंगाळ्या वि०** ज्याला लांब लांब शिंगें आहेत असा( बैल इ० ). **शिंगी स्त्री०** कानफाटे गोसावी इ० वाजवितात तें लहान शिंग. **शिंगोटी स्त्री०** १ शिंग. २ शिंगांचा पशु,–गाय, म्हैस, इ०; उ० आमच्या गोठ्यांत आज एकही शिंगोटी उरली नाहीं. ३ गाय, म्हैस, इ० पशु विकत घेणाऱ्यावर सरकारी कर असतो तो. ४ बैलाच्या शिंगांच्या बुडाशीं बांधतात ती दोरी. मागें ' शिंगाळें ' पहा. ४ **म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत** आपलीं माणसें, आपला सरंजाम, इ० आपणास भारभूत होत नाहींत. **शिंगांवर घेणें** आलेल्या अडचणीला किं० संकटाला मर्दाईनें तोंड देणें म्ह० त्याचा प्रतिकार करावयास सिद्ध होणें. **आलें अंगांवर तें घेतलें शिंगांवर** त्याणें संकटाला धिटाईनें तोंड दिलें; तो डगमगला नाहीं. **शिंगें मोडून वासरांत शिरणें** १ जाणत्या माणसानें पोरकटपणा करणें. २ कांहीं गोष्ट ठाऊक असून ठाऊक नाहीं असें ढोंग करणें; मुद्दाम अडाणीपणाची बतावणी करणें. **शिंगें यावयाचीं असणें, शिंगें उरणें, आणखी शिंगें असणें, काय शिंगें असणें ?** विशेषसा काय उणेपणा किं० कमताई किं० न्यून आहे ? कांहीं नाहीं. **बाराला काय शिंगें उरलीं आहेत ? ( किं० राहिलीं आहेत ? )** बारा वाजलेच म्हणायाचे, फार तर दोन तीन मिनिटें कमी असतील.

शिंग्याला आणखी काय शिंगें असतात? भित्रा माणूस तो हाच; भित्रा काय वेगळा असतो? मिडवाईफला आणखी काय शिंगें असतात? मिडवाइफचा डिप्लोमा (मला, तिला, इ०) मिळाला नाहीं इतकेंच काय तें; मिडवाइफचें सर्व ज्ञान इ० (मला, तिला, इ०) आहेच.

**शिंगटणें, शिंगाटणें, शिंगाळणें** [म० शिंग] **स० क्रि०** गाय, बैल, इ० नीं (कोणेकाला) शिंगांनीं प्रहार करणें किं० शिंगांनीं उडवून देणें.

**शिंगडी स्त्री०** खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

**शिंगडी स्त्री०, शिंगडें न०** [म० शेंग] पावटा, तूर, इ० च्या वाळलेल्या शेंगांचा ढीग किं० रास.

**शिंगडी स्त्री०, शिंगा पु०** माडाच्या झावळीचा अग्रभाग.

**शिंगर न०** १ वेळूचा कांटा. २ पत्रावळ करण्यासाठीं बांबूच्या करतात त्या चोया प्रत्येक.

**शिंगरट** [म० शिंगरूं] **न०** घोडीचें अपत्य (प्रेमानें किं० तुच्छतेनें).

**शिंगरी स्त्री०** पानाची कळी; बाल्य दशेंतील पान किं० पानाची फांदी.

**शिंगरूं न०, शिंगा पु०** घोडी, गाढवी, किं० खेचरी, ह्यांचें अपत्य. ॐ **शिंगरूप वि०** अगदीं लहान वयाचा (घोडा, गाढव, खेचर).

**शिगलोट, शिगलोटा, शिगेलोट** [म० शीग+लोटणें] **वि०** आंतील धान्यादिकांची शीग (म्ह० शिखर) लोटून म्ह० शिगेचें धान्यादि खालीं पाडवून सपाट केलेलें (जें शेर इ० चें माप तें).

**शिंगळद्वीप, शिंगळद्वीप** [सं० सिंहलद्वीप] **न०** लंका हें बेट (अशिक्षितांत रूढ).

**शिंगा** वर 'शिंगरूं' पहा.

**शिगा पु०** मागें 'शिगडी' पहा.

**शिंगाटणें** [म० शिंग] **स० क्रि०** १ मागें 'शिंगटणें' पहा. २ (कोणेकाची) भोसडपट्टी काढणें. ३ (कोणेकाला) फसविणें किं० लुबाडणें.

**शिंगाडा** [सं० शृंगाट, शृंगाटक] **पु०** तळें इ० मध्यें वाढणारें एक झाड किं० त्याचें फळ. हें फळ उपासास पिठाच्या रूपें खातात.

**शिंगाडा पु०** गोड्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष.

**शिंगाडा, शिंगाड्या** [म० शिंग] **वि०** १ मिरवणुकीपुढें शिंग वाजविणारा (माणूस). २ लांब शिंगें असलेला (बैल इ०).

**शिंगाळ** मागें 'शिंग' मध्यें पहा.

**शिंगाळणें** मागें 'शिंगटणें,' 'शिंगाटणें' पहा.

**शिंगाळा पु०** खाऱ्या पाण्यांतील एक काळा मत्स्यविशेष.

**शिंगाळी केळ स्त्री०** एक प्रकारची केळ.

**शिंगाळें केळें न०** ह्या केळींचें फळ.

**शिंगी** 'शिंग' मध्यें पहा.

**शिगेलोट, वि०** मागें 'शिगलोट' पहा.

**शिंगोटी** 'शिंग' मध्यें पहा.

**शिग्रु** [सं०] **पु०** शेवगा हें झाड.

**शिजणें** [सं० श्री, श्रा=शिजविणें] **अ० क्रि०** १ (पाण्यांत घातलेला पदार्थ तांदूळ, डाळ, इ०) अग्निसंयोगानें पक्व होणें. २ (कांहीं गोष्ट) घडण्याच्या मार्गांत असणें किं० आणली जात असणें किं० तिच्याबद्दल बेत चाललेला असणें; घाटत असणें; उ० रानड्यांची चिंगी मोडकांच्या रामूला द्यावी असें शिजत आहे. **भा० क० प्र०** असह्य उष्मा होत असणें; उकडत असणें; उ० आज जणों शिजतें आहे. ॐ **शिजे तों धीर धरवतो निवे तों धरवत नाहीं** उत्कंठेनें इच्छिलेला भोग्य पदार्थ तयार होईपर्यंत मनुष्य वाट पाहूं शकतो, पण तयार झाल्यावर त्याला तो तावडतोब भोगावासा वाटतो, त्याला विलंब सहवत नाहीं.

**शिजवक** [म० शिजणें] **न०** सर्वांचीं भोजनें होऊन शिल्लक राहिलेलें रांधलेलें अन्न,—भात, भाजी, भाकरी, इ०.

**शिजवण** [म० शिजविणें] **न०, स्त्री०** जें शिजविलें तें; शिजविलेलें अन्न.

**शिजविणें** [म० 'शिजणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** अग्निसंयोगानें (भात, भाजी, इ०) पक्व करणें किं० रांधणें.

**शिजाळू** [म० शिजणें] वि० त्या जातीच्या इतर पदार्थांपेक्षां लवकर शिजणारें (डाळ, अळूं, इ०).

**शिझणें, शिझविणें, शिझाळू** इ० क० शिजणें 'शिजविणें' इ० पहा.

**शिट** स्त्री० पाऊस, तोंडांतील थुंकी, कारंज्याच्या धारा, इ० चे उडतात ते बिंदु व्यक्तिशः किं०समुच्चयानें ( उडणें, उडविणें, मारणें, इ० ).

**शिटणें** अ० क्रि० १ ( चिमणी इ० पक्ष्यानें) हगणें. २ ( आजारी मुलानें ) थोडथोडें हगणें.३ डीनें )बेफाम होऊन हाण्या त्या घोड्याकडून कामेच्छा तृप्त करून घेणें.

**शिटवा** [म० शिटणें] पु०वाघुळाची विष्ठा,- जिचें वांग्यांच्या झाडांना खत घालतात.

**शिटवा** [ म० शिटणें ] वि० १ जंगली घोड्यापासून घोडीला झालेल ( अपत्य). २ बदमाष, लफंगा ( माणसास शिवी देतांना ).

**शिटा** पु० पाणी, थुंकी, इ० चा शितोडा.

**शिटाऊ** [ म० शिटणें ] वि० १ जंगली घोड्यापासून घोडीला झालेलें ( अपत्य ). ह्या अपत्याला ' शिटाचें शिंगरूं ' म्हणतात. २ बदमाष, लफंगा ( माणूस ). ३ वात्रट किं० मात्रागमनी किं० कावेबाज ( पोर किं० माणूस ) ॐ**शिटाऊ बंदर** न०वात्रट,लफंगे, बदमाष अशा लोकांचा अड्डा.

**शिटावणें** [ म० शिटाणें ] अ० क्रि० वात्रट किं० बदमाष मार्गाला लागणें; उत्संखळ होणें.

**शिटी** स्त्री० १ शीळ २ शीळ वाजविण्याचें साधन.

**शिटी** वि० १ चिटाचा चिटाचा २ केलेला ( कपडा इ० ).

**शिडकणें, शिडकावणें** स०क्रि०(पदार्थावर) पाणी, रंग, इ० चे शिंतोडे उडविणें.

**शिडकाव, शिडकावा** [म० शिडकणें,शिडकावणें ] पु० पदार्थावर पाणी, रंग, इ० चे उडालेले किं० उडविलेले शिंतोडे समुच्चयानें.

**शिडंब** पु० एक जंगली वृक्ष.

**शिडशिडणें** अ० क्रि० जोरानें पण थोडका वेळच ( पाऊस ) पडणें.

**शिडशिडी** स्त्री० जोरदार पण अगदीं थोडा वेळ आलेली पावसाची सर.

**शिडशिडीत** वि० १ बारीक अंगाचा; सडपातळ. २ ज्याचीं शितें टणक आणि मोकळीं आहेत असा शिजलेला ( भात ).

**शिडा** वि० बायको, मुलें, इ० चा पसारा किं० परिवार ज्याच्या मागें नाहीं असा(माणूस). सडामांडा, सडासाठ, सडासोट, शिडासांटा, हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

**शिडाईत** न० आंबा इ० कांचे झाडावर दुसऱ्या आंबा इ० झाडाची ढाळी लावून करतात तें कलम.ॐ**शिडाइती** वि०शिडाईत केल्यानें झालेलें ( आंबा इ० झाड ).

**शिडी, शिढी** [ हिं० ] स्त्री० १ दोन बाजूंस दोन वांसे किं० फळ्या यांना जोडणाऱ्या आडव्या फळ्या किं० लाकडें यांची उंचावर चढण्यासाठीं करतात ती रचना; चढणी;दादर. २ डोंगरावरची अरुंद आणि कठिण अशी चढण.

**शिणक, शिणीक** स्त्री० गात्रामध्यें वायूच्या उपद्रवामुळें एकदम उठते ती कळ.

**शिणकणें** [ म० शिणक ] अ० क्रि० ( गात्रविशेषांत ) एकदम कळ किं० तिडीक उठणें; अशा तिडकीनें(गात्रविशेष) जर्जर झालेलें असणें.

**शिणगार, शिणगारणें** ' शृंगार,' शृंगारणें ' चे गांवढळ अपभ्रंश.

**शिणणें** [ म० शीण ]अ० क्रि० अगदीं श्रांत होणें; दमणें; खचणें.

**शिणवटा, शिणोटा** [म० शिणणें]पु० श्रांतपणाची स्थिति;अगदीं दमलेपणाची स्थिति(येणें).

**शिणशिणणें** अ० क्रि० ( दांत ) आंबणें.

**शिणारणें** स० क्रि० जमीनींत खांब पक्का बसविण्यासाठीं त्याच्या भोंवतीं ( दगड, माती, रोडे, इ० ) ठासणें.

**शिणीक, शिनीक** स्त्री० गात्रांत एकदम उठलेली कळ.

**शिणोटा** वर ' शिणवटा ' पहा.

**शिंतडणें, शिंतोडणें** अ० क्रि०लहान लहान शितोड्यांच्या किं०थेंबांच्या रूपानें(पाऊस)पडणें.

**शिंतडणें** पुढें ' शिंपडणें ' पहा.

**शिंतडा, शिंतोडा** पु० पाणी, शेणखळा, इ० चा उडालेला थेंब ( उडणें, उडविणें ).

**शितडी** [ म० शीत ] स्त्री० १ दहीं नासलें असतां त्यांत भाताच्या शितांसारख्या बारीक बारीक गोळ्या होतात त्या प्रत्येक किं० समुच्चयानें. २ नासलेली कढी, दूध, रक्त, इ०च्या अशाच झालेल्या गोळ्या.

**शितरणें** मागें ' चितरणें, ' 'चितारणें' पहा.

**शितरपाड** वि० तलख; चुणचुणीत; हुशार. ※ **शितरपाडी** स्त्री० तलखपणा; हुशारी; चुणचुणीतपणा.

**शितरी** स्त्री० लहान झोपडी; कोप; कोपी.

**शितवड** [ म० शीत ] स्त्री० १ जेवणाऱ्याचीं ताटाभोंवतीं उडालेलीं भाताचीं शितें समुच्चयानें. २ इकडे तिकडे उडालेलें किं० पसरलेलें खरकटें.

**शितळ** [ सं० शीतल ] वि० १ सौम्य; मंद; शांत ( स्वभाव, माणूस, हालचाल ). २ सौम्य ( डोंगराची चढण ). ※ **शितळचंद** पु० १ सौम्य आणि शांत प्रकृतीचा माणूस. २ धीमा, चेंगट, किं० सुस्त माणूस. **शितळशिमगा** पु० १ रंगपंचमीचे दिवशीं किं० वर्षप्रतिपदेस लहान मुलांना शिदकावी अंगडींटोपडीं, साखरेच्या गांठ्या, इ० देण्याचा करतात जो समारंभ तो. २ फाल्गुन वद्य प्रतिपदा,–ह्या दिवशीं होळीवर पाणी ओतून किं० शिंपडून होळी विझवितात. **शितळाई** स्त्री० १ हवेचा थंडपणा. २ प्रकृतीचें शैत्य. **शितळादेवी, शीतलादेवी** स्त्री० अंगावर देवी आल्या असतां त्या शमण्यासाठीं ज्या देवीला नैवेद्य, बळी, इ० अर्पितात ती देवी.

**शिता** पु० स्त्रियांच्या डोईवरील केशांचा भांग. २ कोष्टयाच्या मागांत ताण्याची एकत्राड सुतें वेगळीं ठेवणारी काठी.

**शिताप, शितापी** पुढें ' शिताब,' 'शिताबी' पहा.

**शिताफळ, शिताफळी** स्त्री० एक झाड. ह्याच्या फळास ' शिताफळ ' न० म्हणतात.

**शिताब, शिताबी, शितापी** [ फा० ] वि० १ त्वरित; घाईचा. २ तलख. ३ कुशळ. ४ सफाईदार. ५ उत्साही. स्त्री० त्वरा; चपळाई. २ कौशल्य; हिकमत. ३ कामाची सफाई. ※**शितापी, शिताबी, शिताफी** स्त्री० १ कामाची सफाई. २ खुबी; युक्ति; हिकमत. ३ तलखपणा. ४ काम करण्यांत उत्सुकता.

**शितारणें** मागें ' चितरणें ' पहा.

**शिती** स्त्री० एका विटेच्या जाडीची भिंत; पडदी; कूड.

**शितें** न० १ स्त्रियांच्या डोईवरील केशांचा

**शिता, सित्ता, सिता, शित्ता** [ अ० सित्त ] वि० सहा ही संख्या.

**शितैन, शित्तैन, सितैन, सित्तैन** [ अ० सित्तीन् ] वि० साठ ही संख्या ( फक्त मुसलमानी सनांत प्रयोग ).

**शितोडणें** [ म० शितोडा ] अ०क्रि० बारीक बारीक थेंबांच्या रूपानें ( पाऊस ) पडणें.

**शितोडा** पु० १ पाणी, थुंकी, इ०चा उडालेला थेंब किं० बिंदु. २ पावसाची लहान सर. ३ बांबूचे नवीन फुटलेले कोंब समुच्चयानें.

**शिथड** स्त्री० (कोष्टयाच्या मागांत)ओवीच्या बाहेर सांधीच्या कडांना असतात जे दोन तुकडे ते प्रत्येक.

**शिथिल** [ सं० ] वि० १ सैल; ढिलें. २ सोडलेलें; सैल केलेलें. ३ बिलबिलीत ( फळ इ० ). ४ घट्ट न बांधलेलें ( गांठोडें इ० ). ५ अर्धवट सुटलेली ( गांठ, बंधन, इ० ). ६ मंदपणानें चालविलेलें ( काम ). ७ थिलथिलीत ( पोट ).

**शिंद** [ हिं० ] स्त्री० १ खजुरीसारखें एक झाड. २ लाकडाच्या लहान लहान पट्ट्या जाळीसारख्या एकींत एक अडकावून करतात ती रचना ( भरणें, घालणें ). ह्या रचनेवर गिलावा करून अरुंद भिंत करतात. ३ अशा भिंतीसाठीं ज्या रिपा योजतात त्या समुच्चयानें.

**शिंदळ, शिनळ** वि० व्यभिचारी ( पुरुष किं० स्त्री ). ※ **शिंदळकी, शिनळकी** स्त्री० जारकर्म; परपुरुषगमन ( स्त्रीचें ); परस्त्रीगमन ( पुरुषाचें ). **शिंदळचार, शिंदळचाळे. शिंदळटेव** पु० अ० व० शिंदळकीचीं कृत्यें. **शिंदळवाडा (–वडा), शिंनळवडा (–वाडा)** पु० व्यभिचारी स्त्रिया आणि पुरुष जेथें जमतात ती जागा. **शिंदळ सोव** पु० अ० व० वात्रटपणा, लबाड्या, भोंदूगिरी, इ० प्रकारची वर्तनसरणी.

**शिंदा** [ हिं० ] पु० १ ठेवलेली दासी, रखेली, किं० रांड, ह्यांच्या पोटीं जन्मलेलें अपत्य. २ अशा अपत्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

**शिंदा** पु० मुलांचें एक खेळणें.

**शिदी, शिद्दी** पु० हबसाण माणूस.

**शिंदी, शिंधी** स्त्री० जंगली खजुरीचें झाड किं० त्यापासून काढलेलें अमली पेय.

**शिंदेशाई** [म० शिंदा + फा० शाही] स्त्री० पेशव्यांचे एक शिंदे ह्या आडनांवाचे सरदार होते त्यांचा मुलूख किं० त्यांची राज्यसरणी. वि० शिंद्यांच्या मुलखांत प्रचलित अशी (चाल, रीति, दागिन्याची घडण, पोशाख, भाषाशैली, इ०).

**शिदोरी, शिधोरी** [ सं० सिद्ध+म० दोरी] स्त्री० १ प्रवासांत खावयासाठीं दशम्या, लाडू, चटणी, भात, इ० पदार्थ फडक्यांत घालून दोरीनें बांधून केलेलें गांठोडें. २ चातुर्मास्यांत गरीब ब्राह्मणाला बायका दररोज शिजविलेल्या अन्नाचें ताट देतात तें.

**शिधा** [ सं० सिद्ध ] पु० १ भोजनाचे पदार्थ शिजवून, भाजून, उकडून, किं० तळून सिद्ध करावयासाठीं जमविलेली सामग्री किं० कोणा माणसास दिलेली सामग्री, किं० प्रवासांत बरोबर घेतलेली सामग्री. २ तांदूळ, डाळ, गूळ, भाजी, इ० घरीं नेऊन शिजवून खावयासाठीं कोणा गरीब माणसाला व्रत म्हणून दररोज दान करावयाची सामग्री. ❀ **शिधापाणी, शिधासामान** न० ए० व० रांधावयासाठीं घेतलेली तांदूळ, डाळ, पीठ, भाजी, इ०सामग्री.

**शिंधी** वर ‘ शिंदी ’ स्त्री० पहा.

**शिधोट** वि० सरळ ( रस्ता, नदीचा प्रवाह, पर्वताची रांग, इ० ).

**शिधोरी** मागें ‘ शिदोरी ’ पहा.

**शिनगारणें** [ म० शृंगारणें ] स० क्रि० शोभाविणें; भूषविणें.

**शिनळ, शिनळकी**, इ० मागें ‘ शिंदळ, ‘ शिंदळकी, ’ इ० पहा.

**शिना, शिनाना** वि० वेगळा; भिन्न.

**शिनीक** मागें ‘ शिणीक ’ पहा.

**शिने** मागें ‘ शाने ’ पहा.

**शिंप** [ हिं० ] स्त्री० १ कांहीं जलजंतु स्वतास राहाण्यासाठीं करतात जें घर त्याची जीं दोन अर्धुकें तीं प्रत्येक. २ लेखणीच्या बोरू, काठी, इ० चें टोक तिरकस आणि अर्धें तासून करतात ती उतरण ( मारणें, तोडणें, इ० ). ३ शिंपीच्या आकाराचा जमीनीचा टापू.

**शिपका** पु० १ पाणी, दूध, ताक, इ० हातांत घेऊन त्यांचा भाजी, पीठ, इ० वर केलेला वर्षाव किं० केलेली शिंपणी. २ रस्त्यांतील धूळ किं० घरांतील केर दबण्यासाठीं त्यांच्यावर शिंपडलेलें पाणी. ३ मूर्च्छित माणसाच्या तोंडावर पाणी जोरानें शिंपडणें ही क्रिया.

**शिंपट, शिंपटें** न०, **शिंपटी** स्त्री० पोफळीच्या झाडाला येतें जी पोफळांची फांदी तिचा अंकुर किं० तिची बाल्यदशा.

**शिपटी** स्त्री० १ झाडाची बारीक आणि लांब फांदी. २ पोफळीच्या झाडावरील पोफळांचा बाल्यदशेंतील घड. ह्या अर्थीं ‘ शिंपुट ’ न० सुद्धां.

**शिंपडणें** [ म० ‘ शिंपणें ’ चें एक रूप ] स० क्रि० १ ( पाणी, दूध, ताक, इ० ) झाडें, भाजी, तोंड, इ०वर टाकणें किं० जोरानें मारणें. २ पाणी, दूध, ताक, इ० ( झाडें, भात, भाजी, इ० वर ) फेकणें किं०मारणें.

**शिंपण** न०, **शिंपणी** स्त्री०[म०शिंपणें] पाणी इ० बिंदूरूपें पडेल अशा प्रकारें तें उडविणें. ❀ **शिंपण (-णे-) पंचमी** स्त्री० रंगपंचमी हा दिवस,–माघ महिन्याची पंचमी ही तिथि. **शिंपणीचा ऊस** पु० पाटाच्या पाण्यानें होणारा ऊस. ह्याच्या व्यावर्तकत्वें ‘ पुरणीचा ’ ऊस.

**शिंपणें** [ सं० सिंच् ] स० क्रि० १ थेंबांच्या रूपानें ( पाणी, दूध, ताक, इ० ) झाडें, जमीन, भात, भाजी, इ० वर जोरानें मारणें. २ ( झाडें, जमीन, भाजी, इ० वर ) पाणी मारणें.

**शिंपणें** [ म० शिंपणें ] न० १ (पाणी इ०) झाडें इ० वर थेंबांच्या रूपानें मारणें किं०टाकणें. २ (रंगाचें पाणी ) रंगपंचमीच्या दिवशीं चिरगुटांवर टाकणें.

**शिपतर, शिंपतर** न० बांबूच्या पातींचें परट उथळ पात्र. [ पहा.

**शिपला, शिंपला** पु० मोठी ‘शिंप’. मागें ‘शिप

**शिपली, शिंपली** स्त्री० १ लहान शिंप. मागें

' शिंप ' पहा. २ लहान सूप; सुपली.

**शिपा** पु० माशांचें तेल.

**शिंपा** पु० १ मोठी शिंप. २ माडास नारळ यावयाच्या पोगींतून बाहेर येतो तो अवयव.

**शिपाई** [ फा०सिपाही ]पु०१सैन्यांतील लढणारे गडी प्रत्येक. २ शहरांत बंदोबस्त ठेवणारे सरकारी नोकर प्रत्येक.३घराच्या देवडीवर पहारा करणारा कोणेकाचा नोकर. ४ पत्रें, निरोप, इ० नेणारा किं० आणणारा नोकर.५ पालखी,डोली, मेणा, इ०च्या दांड्यांचे जे आधार ते प्रत्येक. ६ गाडीच्या जोकडाला टेकण देतात तीं लाकडें प्रत्येक. ७ दिवटी,मशाल, इ० ठेवण्यासाठीं दोन लाकडें फुलीच्या रूपानें जोडून केलेला आधार. ८ मुलीच्या परकराचा पुढचा उभा पट्टा,–कांठ,इ० रूपाचा. ९ एक पक्षी. ॐ **शिपाईगिरी, शिपाइकी** स्त्री० शिपायाचा धंदा. वि० शिपायासंबंधाचा. **शिपाईप्यादा, शिपाईराणा** पु० शिपाई, खिजमतगार, जासूद, इ० लोकांच्या धंद्याचा माणूस. **शिपाईबाणा** पु० १शिपायाचा धंदा. २ शिपायाची धमकदारी. ३ शिपायाचा पोशाख, हत्यारें, इ० सरंजाम. **शिपुरडा** पु० शिपाई ( तुच्छतेंत ).

**शिपार, शिफार** स्त्री० होड्या, गलबतें, इ०च्या तळाला राळ इ० चा करतात तो लेप.

**शिपारशी, शिपारस** पुढें ' शिफारशी, ' ' शिफारस ' पहा.

**शिंपी** पु० लोकांचे कपडे शिवून देऊन चरितार्थ करणारांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. २ लोकांचे कपडे शिवून देऊन चरितार्थ करणारा कोणीही कोणत्याही जातीचा इसम. ३ शिंप,–जलजंतूचें रहावयाचें घर. वर ' शिंप ' पहा. स्त्री० १ उराच्या मध्यभागीं पोटाकडे उतरत गेलेली जी खळगी ती. २ एक प्रकारचें मऊ आणि पौष्टिक गवत. ॐ **शिंपीला पोट लागणें** फार जेवण झाल्यामुळें पोट भरून ते शिंपीस टेंकणें. वर'शिंपी'स्त्री०अर्थ १ पहा.

**शिंपुरडा** [म०शिंपी] पु०शिंपी (तुच्छतेंत).

**शिंपूट** न० पोफळीच्या झाडास फळांचा घड येतो तो ( बालदशेंतील ).

**शिफार** वर ' शिपार ' पहा.

**शिफारस** [ फा० सिफारिष् ] स्त्री० १ प्रशंसा; तारीफ. २ वशील्याचें पत्र. ३ प्रशंसा व्हावयाजोगें कोणी केलेलें कांहीं कृत्य. ॐ **शिफारशी** वि० समर्थाच्या कृपेनें किं० वशील्यानें मिळालेली ( नोकरी, अधिकार, बढती, इ० ). **शिफारशीचें तट्टू** न० सरकारी अधिकाऱ्यांची लाळ घोटून आणि अंगीं कांहीं गुण नसून आणि इतरांचे हक्क तुडवून मोठ्या पदावर चढलेला नादान माणूस.

**शिबंदी** [ अ० सिहबंदी ] स्त्री० १ वसुलीच्या कामासाठीं ठेविलेली फौज. २ किल्ला, शहर, इ० च्या रक्षणार्थ ठेविलेली फौज.

**शिबंदी** स्त्री० १ कागदाच्या रुंदाचे अर्धुक. २ दौलताबादी कागदाचें अर्धक.

**शिबाड** स्त्री० एक प्रकारचें गलबत.

**शिबाळी** स्त्री०, **शिबाळें** न० चुलीवर ठेविलेल्या उसाच्या रसाच्या काहिलींतील मळी काढावयासाठीं काठीला बांधलेली टोपली.

**शिबिका** [सं०] स्त्री० १ पालखी. २ प्रेत वाहून न्यावयाची तिरडी.

**शिबिर** [ सं० ] न० १ सैन्याची छावणी; तळ. २ राजगृह. ३ शिबिरांत राहणारें सैन्य. ४ (मराठींत ) तंबू.

**शिबुटलें** न० मागें ' शिपतर ' पहा.

**शिंबें** न० १ घोसाळें, दोडका, इ० फळें अति निबर झालीं असतां त्यांत जें तंतुमय जाळें उत्पन्न होतें तें. २ मनुष्याच्या अंगावर जे पांढरे किं० हिरवे डाग उत्पन्न होतात ते किं० त्यांचीं चिन्हें. ३ काहिलींत कढत असलेल्या उसाच्या रसाची मळी काढण्यासाठीं काठीला जें शिपतर बांधलेलें असतें तें. ४ पसरट आणि मध्याशीं खोलगट असें पात्रविशेष; वेळणी.

**शिबोळी, शिबोळें** वर ' शिबाळी, ' ' शिबाळें ' पहा.

**शिमगा** पु० १ फाल्गुन महिना ( बायकी शब्द ). २ फाल्गुन महिन्यांतील होळी. ॐ **शिमगा करणें** बोंबलणें. **शिमग्याचा मंत्र** पु० बोंबलण्याची क्रिया; बोंब; ( जपणें, म्हणणें, वाचणें ). **शिमगा जाई पण कवित्व राही**

शिमग्याचा सण जातो, शिमग्यांत केलेला वात्रटपणाही संपतो, पण शिमग्यांत केलेल्या वात्रटपणाचे परिणाम मागाहून सदैव पीडा करीत असतात.

**शिमटणें** [ म० चिमटी ] **स० क्रि०** चिमटीत धरणें किं० धरून जोरानें दाबणें किं० चेपणें. मागें ' चिमटणें ' पहा.

**शिमटी स्त्री०** १ झाडाची बारीक आणि लांब फांदी. मागें ' शिपटी ' पहा. २ एक झुडूप.

**शिमघडया, शिमशेजारी** [ म० शिव+शेजारी ] **पु०** आपल्या गांवाच्या हद्दीला लागलेल्या गांवांतील जो रहिवाशी तो.

**शिमरा वि०** १ चपटें ( नाक ). २ चपट्या नाकाचा ( मनुष्य ).

**शिमा, शींव** [ सं० सीमा ] **स्त्री०** गांव, देश, इ० ची हद्द किं० मर्यादा.

**शिया पु०** एका मुसलमानी धर्मपंथाचें नांव.

**शियारी स्त्री०** शहारा; रोमांच.

**शिर** [ सं० शिरस्; फा०सर ] **न०** १डोकें.२ डोक्याची कवटी. ३कोणत्याही वस्तूचा माथा;उ० झाडाचें किं०डोंगराचें किं० घराचें शिर. ४ श्रेष्ठ; प्रधान. ४सैन्याची आघाडी.६( घोड्यांची गणती करतांना ) व्यक्ति; उ० घोडा शिर चार ( म्ह० चार घोडे ). मागें ' रास, '' नफर, '' नग ' पहा. **टीप,**-पुढील वाक्प्रचारांत संस्कृत 'शिरस्', आणि फारशी ' सर् ' यांचे वाक्प्रचार आम्ही एकत्रित देणार आहों. ॐ **शिराग्र न०** शेंडा, टोक. **शिरोस्थि न०** डोक्याची कवटी. **शिरोग्रह पु०**डोकेंदुखी हा आजार.**शिरोगृह न०**१माडी. २ सज्जा.**शिरस्त्राण, शिरस्त्र न०** १ टोप; डोक्याचें कवच. २ पागोटें; मुंडासें; टोपी. ३ डोक्याची कवटी. **शिरोधर पु०** मान; गळा. **शिरोमणि पु०** श्रेष्ठ. **शिरोरत्न न०** डोक्यावरील रत्न. **शिरोरुह पु०** डोक्याचे केश. **शिरोवर्ती, शिरःस्थ पु०** मुख्य; चालक; पुढारी; अग्रेसर. **शिरःशूल न०** डोकेदुखी हा आजार. **शिरसिज पु०** डोक्यावरील केश. **शिरःकंप पु०, शिरःकंपन न०**१डोकें हालविणें(संमति किं० असंमति दर्शविण्यासाठीं ). २ डोके हालणें ( म्हातारपणामुळें किं० अशक्तपणामुळें ). **शिरखंड** [ म० शिर ( डोकें )+खंड ( चंदनाचें खोड ) ]**न०** चंदनाचें पेटींत लाविलेलें गंध ( अशिक्षितांत रूढ ); उ० आज तुम्ही शिरखंड लावून बादशहांना भेटावयास जाणार आहां कीं काय?**शिरगीर स्त्री०** कोंबड्याच्या डोक्यावरील तुरा. **शिरगोमी वि०** गोमीच्या आकाराची केशपंक्ति ज्याच्या कपाळावर आहे असा(घोडा). हा अशुभ लक्षणी समजला जातो. **शिरचश्मा** [फा० सर् ( डोकें ) चश्मा ( डोळा ) ]**पु०** आवडीचा पुरुष किं० जार ( लावणींतील शब्द ). **शिरश्छेद** [ सं० शिरस् ( डोकें ) + छेद ( कापणें )] **पु०** डोकें तोडणें; डोकें छाटून ठार मारण्याची शिक्षा. **शिरजोर** [**फा०**] **वि०** दांडजड माणूस; वरचढ. **शिरटोप पु०** थंडीवाऱ्यापासून निवारण व्हावयासाठीं डोक्याला घालतात ती टोपी. **शिरताज** [**फा०**]**पु०**१डोक्यावर घालावयाचा एक दागिना. २ (**लाक्षणिक**) कुटुंब, संस्था, गांव, इ० ना भूषणभूत असा माणूस. **शिरदाळी स्त्री०** घोड्याच्या डोक्यावर जो लगामाचा पट्टा असतो तो. **शिरपंच** [ **फा०** सर् पेच ] **पु०** पागोट्यावर खोवावयाचें जडावाचें एक भूषण. **शिरफाड्या वि०** भिक्षा न घातल्यास डोकें फोडून घेणारा भिकारी. **शिरसामान्य, शिरसावंद्य** [सं० शिरसा ( डोक्यानें ह्म० नम्रपणानें )+मान्य, वंद्य ] **वि०** अत्यन्त पूज्य. **शिरसाष्टांग नमस्कार** [सं०शिरसा (डोक्यानें) +अष्ट (आठ)+अंगें ( गात्रें )+नमस्कार ] **पु०** डोकें आणि आठ अंगें जमीनीला टेकून केलेला नमस्कार. पत्राच्या आरंभीं या शब्दाचा उपयोग केला जातो. **शिरोमणि पु०** १ मस्तकावर भूषण म्हणून धारण करावयाचा मणि म्ह० रत्न. २ कोणत्याही समूहांत श्रेष्ठ असा माणूस; उ० पंडितशिरोमणि, मूर्खशिरोमणि, निर्लज्जशिरोमणि,इ०.**शिर सुरी तुझ्या हातीं** मला मारणें किं० तारणें हें तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे;मी अपराध केला आहे खरा, आतां मला क्षमिणें किं० दंडिणें तुझ्याकडे आहे.**शिर हातावर घेणें** धाडसाचें कांही काम करावयास सिद्ध होणें.**कोणेकाचा शिरातुरा**

(किं० शिरा तोरा) असणें त्याच्यापेक्षां अधिक समर्थ अधिक चतुर किं० वाकबगार असणें; उ० चित्रकलेमध्यें रामू माझा शिरातोरा आहे. शिरातोरा (किं० शिरांतुरा) लावणें (किं० दाखविणें किं० मिरविणें) आपलें वर्चस्व दाखविणें किं० स्थापणें किं० गाजविणें; उ० सदोबाला पाटिलकी मिळाल्यापासून तो भारी शिरतोरा लावूं लागला आहे. एकाद्याच्या शिरीं (किं० शिरावर) असणें त्याचा रक्षक किं० त्राता किं० वाली ह्या नात्यानें त्याच्या जवळ असणें; उ० आपण शिरीं असल्यावर आम्हाला कोणाची भीति? कोणेकाच्या शिरावर जागें असणें (किं० राहणें) त्याच्या संरक्षणासाठीं किं० कल्याणासाठीं तत्पर असणें. शिरीं क्रि० वि० १ वेळीं किं० ऐन समयीं; उ० लग्नाच्या किं० कामाच्या किं० प्रसंगाच्या शिरीं. २ (रक्षक ह्या नात्यानें) जवळ किं० संनिधीस; उ० शिरीं असतां पंढरीनाथ चिंता किमपि न करावी. शिर सलामत तर पगड्या पंचांयशी आपण समर्थ किं० शाबूत असलों तर आपण हावें तें मिळवूं शकूं.

शिरकणें [म० 'शिरणें' चें एक रूप] अ० क्रि० जोरानें किं० यत्नानें किं० नेटानें प्रविष्ट होणें किं० प्रवेश मिळविणें वि० शिरणें; घुसणें.

शिरकणें [म० शिरकी] स० क्रि० १ सरक्या काढून (कापूस) स्वच्छ करणें. २ (कापूस, लोकर, इ० तील) केरकचरा काढून स्वच्छ करणें.

शिरकाविणें, शिरकाविणें [म० 'शिरणें' चें एक प्रयोजक रूप] स० क्रि० जोरानें आंत रेटणें किं० खुपसणें किं० ढकलणें.

शिरका, सिरका, शिर्का, सिका [फा० सिर्काह्] पु० आम्लासव. [नाश.

शिरकाण पु० १ शिरक्याचा मुलूख. २ सत्या-

शिरकाव [म० शिरणें, शिरकणें] पु० शिरकाव; प्रवेश.

शिरकी, सरकी स्त्री० कापसाच्या बोंडांतील बिया व्यक्तिशः.

शिरकुटी स्त्री० झाडाची बारीक आणि लांब काठी किं० छडी.

शिरकें न० शिंक्याच्या तळावर ठेविलेलें भांडें हालूं नये म्हणून शिंक्याच्या दोऱ्यांत भांडें घट्ट आडकून बसावें म्हणून जो फास दोऱ्यांवरून खालीं सरकावितात तो.

शिरखंड [स० श्रीखंड=चंदन] न० कपाळावर लाविलेलें चंदनाचें गंध (अडाण्यांत रूढ).

शिरगीर मागें 'शिर' मध्यें पहा.

शिरगोळा पु० जो कुटून रांगोळी करतात तो दगड.

शिरटी स्त्री० १ झाडाची लांब आणि बारीक फांदी. २ पोफळीचा नुकताच बाहेर पडलेला पोफळांचा घोंस.

शिरड स्त्री० रागाची उसळी (येणें). ॐ शिरडखोर वि० ज्याला लवकर राग येतो असा. मागें 'चिरड' पहा.

शिरड स्त्री० झाडाच्या तोडलेल्या फांद्या,— ओंबणासाठीं योजावयाच्या.

शिरडाविणें [म० शिरड] स० क्रि० शिरडीनें (कोणेकास) बडविणें किं० मारणें. पुढें 'शिरडी' पहा.

शिरडी स्त्री० १ झाडाची बारीक आणि लांब फांदी. २ एक प्रकारचा तांदूळ. ३ मुलीचें लहान लुगडें; चिरडी. मागें 'चिरडी' पहा.

शिरडें न० कुंपण, वेलाचा मांडव, इ० साठीं झाडाच्या तोडलेल्या फांद्या.

शिरणें अ० वि० जोरानें किं० खुबीनें घुसणें किं० प्रविष्ट होणे.

शिरद, शिरदें न० पावशेराचें माप; चिपटें.

शिरपुटणें [म० शिरपुटी] स० क्रि० झाडाच्या बारीक आणि लांब फांदीनें (कोणेकाला) मारणें.

शिरपुटी स्त्री० झाडाची बारीक आणि लांब फांदी.

शिरःफळ [सं० श्रीफळ] न० १ माडाचें झाड. २ नारळ.

शिरमिंदा (—धा) मागें 'शरमिंदा' पहा.

शिरवळ पु०, स्त्री० पुढें 'शिरोळ, *शिळावेळ' पहा.

शिरविणें [म० 'शिरणें' चें प्रयोजक] स० क्रि० खुपसणें; आंत सारणें. मागें 'शिरकविणें' 'शिरकाविणें' पहा.

**शिराशिरणें** [ म० शिरशिरी ] अ० क्रि० थंडी, वारा, ताप, इ० मुळें शरीर कंपित होणें.

**शिरशिरी** स्त्री० थंडी, ताप, इ०मुळें शरीराला सुटतो तो कंप.

**शिरशी** स्त्री० शिरसासारखें भाजीच्या उपयोगाचें एक झाड. ꙮ **शिरशेल, शिरसेल** न० शिरसांचें तेल.

**शिरस** [सं० सर्षप]पु०एक प्रकारची मोहोरी.

**शिरस्ता** [ फा० सर्‌रषताह् ] पु० वहिवाट; सरणी; नियम. ꙮ **शिरस्तेदार** पु० मामलतदार, न्यायाधीश, इ० च्या कचेऱ्यांतील जे कारकून त्यांचा वरिष्ठ. **शिरस्तेवाईक** वि० शिरस्त्याला अनुसरून असलेला.

**शिरळक** स्त्री० १ लाकडाच्या घलपीचें कुसळ ( पाय, हात, इ० त बोचणें, शिरणें ). २ पलावळ लावण्यासाठीं बांबू, कडब्याचें ताट,इ०च्या करतात त्या चोथा प्रत्येक. ३ शीळ ( वाजविणें, घालणें ). **शिरळका** स्त्री० अ० व० अंगांत उद्भवलेली कळ, तिडीक,किं०शिणीक (मारणें,भरणें).

**शिरा** [ सं० शिरा=रक्तवाहिनी; शीर ] स्त्री० १ रक्तवाहिनी शीर. २ झाडाच्या पानाच्या सांगाड्याचे तंतुरूप जे अवयव ते प्रत्येक. ꙮ **शिरागत** वि० हाडींमासीं खिळलेला (रोग, वेदना, इ०). **शिराळ** वि० जाडी जाडी आणि उठून दिसण्याऱ्या शिरा ज्यांवर आहेत असा( हात, पाय, दोडका, इ० ).

**शिरा** [ फा० षीराह् ] पु० १ गव्हाचा रवा तुपावर भाजून त्यांत साखर इ० घालून जें पकान्न करतात तें. २ रेवाचिनी, ज्येष्ठमध, इ० चा सत्त्वांश घेऊन त्यांचा औषधासाठीं रांधा करून ठेवितात तो. ३ खजुराच्या अंगचा जो द्रवांश साठविला असतो तो. ४ खडीसाखर करण्यासाठीं केलेल्या रांध्यांत खडीसाखर जमतां जमतां वेगळा द्रवांश निघतो तो. ५ झाडाचीं पानें, फळें, मुळें, इ० चा रस कढवून औषधासाठीं काढतात तो सत्त्वांश.

**शिरा** [हिं० सरा] पु० शेत,गांव, इ०ची हद्द.

**शिरा** [ अ० सिराह्=उत्तम ] वि० उत्तम; सर्वोत्कृष्ट. **टीप,**–हें विशेषण लिंगवचनांप्रमाणें फिरत नाहीं.

**शिराजी** [फा०] स्त्री० एक प्रकारचें खबूतर.

**शिराटा, शिरांटा** पु० झाडाच्या बारीक बारीक फांचा एका टोकाशीं तात्पुरत्या बांधून पानें, गवत, केरकचरा, इ० झाडण्यासाठीं करतात ती केरसुणी.

**शिरानी** स्त्री० ( कवितेंत ) आनंद; आवड; गोडी; समाधान.

**शिराणी** [ फा० षीरानी=गोडी, गोडपणा ] स्त्री० १ अपूर्व वस्तु; मूल्यवान किं० उत्कृष्ट पदार्थ. २ क्वचित् प्रसंगीं प्राप्त होणारी प्रिय, सोयीची, किं० आवडती कांहींही वस्तु, माणूस, संधी, इ०; कांहीं अपूर्व लाभ.

**शिरावळ** पु०, स्त्री० पुढें ' शिरोळ, ' ' शिळा वेळ ' पहा.

**शिराळ** वि० वर ' शिरा ' सं० मध्यें पहा.

**शिराळ** न०, स्त्री० ढगांची अंधेरी ( येणें, पडणें, जाणें ). (दोडका).

**शिराळ** [ म० शिरा ] वि० जाडी धारांचा

**शिराळशेट** पु० १ एक लिंगायत वाणी. ह्यानें दुर्गादेवीच्या दुष्काळांत महाराष्ट्राला धान्य पुरविलें त्याच्या सन्मानार्थ श्रावण शुद्ध षष्ठीस मोठा उत्सव अजून करण्यांत येतो. ह्यानें औट घटका राज्य केलें. २ सुखवस्तु, रंगेल, आणि कशाचीही चिंता न करणारा माणूस.ꙮ **शिराळशेटचें राज्य** न० अल्प काळ टिकणारें वैभव. **टीप,**–ह्या शिराळशेटासंबंधी माहिती आमचे ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' ह्या पुस्तकांत पहा.

**शिराळी** स्त्री० १ दोडक्याचा वेल. २ एक जंगली वेल. **शिराळें** न० दोडका.

**शिरिस्ता शिरिस्तेदार** वर ' शिरस्ता, ' ' शिरस्तेदार ' पहा.

**शिरी** [ म० शिर=डोकें ] स्त्री० हत्तीच्या किं० घोड्याच्या डोक्यावर जें वेलबुट्टीदार कापड शोभेसाठीं घालतात तें.

**शिरीद, शिरदें** न० पावशेर हें माप; चिपटें.

**शिरीम** पु०, न० पांढऱ्या ठिपक्याच्या रूपाची सौम्य प्रकारची रक्तपीति ( फुटणें, पसरणें ).

**शिरीस** [सं० शिरीष] पु०शिरस,–एक झाड

याचें फूल अति नाजूक असतें.

**शिरीस** [ सं० सर्षप ] पु० मोहोरीची एक जात.

**शिरें** न० १ पांजरण, कुंपण, इ० साठीं किं० पडवळ, दोडका, इ० च्या मांडवांवर पसरण्यासाठीं थायटी, निगडी, इ० झाडांच्या तोडलेल्या फांद्या किं० काटक्या प्रत्येक. २ शाई करण्यासाठीं नाचणी, बाजरी, इ० अर्धवट जाळून त्यांत पाणी घालून तयार करतात तो पातळ काढा. ह्या काढ्यांत काजळ घोटून काळीभोर शाई करतात. ३ आइळवि, बाळ, नारळाचा रस, इ० द्रव्यांचा बाळंतिणीसाठीं करतात तो औषधी पदार्थ.

**शिरोळ** [ म० शिळा+वेळ ] पु०, स्त्री० तिसऱ्या प्रहरानंतर सायंकाळपर्यंतचा थंड वेळ किं० मध्यरात्रीच्या पुढचा पहाटेपर्यंतचा थंडाईचा काळ. [पहा.

**शिरोळ, शिरोळें** मागें ' शिराळी,' ' शिराळें '

**शिल** [ सं० ] पु०, न० १ कापणीनंतर शेतांत राहिलेलें धान्य. २ हें धान्य वेचणें ही तपस्व्याची वृत्ति. ॐ **शिलोंच्छ** पु० १ शेताची कापणी झाल्यानंतर शेतांत पडलेलें धान्य वेचून निर्वाह करणें. २ अशा रीतीनें निर्वाह करणारा माणूस, तपस्वी, इ०. ३ ( लाक्षणिक ) अल्प संग्रह. ४ अव्यवस्थित किं० उडाणटप्पू धंदा. **शिलोंच्छवृत्ति** स्त्री० शेताची कापणी झाल्यानंतर तेथें पडलेलें धान्य वेचून त्यावर केलेला चरितार्थ. पु० असा चरितार्थ करणारा साधु, तपस्वी, इ०,

**शिलक, शिलख** [ अ० षिलूख् ] स्त्री० १ अनेक बंदुकांतून एकदम उडविलेल्या गोळ्यांचा वर्षाव. २ सरबत्ती. ३ तोफांची डागणी.

**शिलक, शिल्लक** [ अ० सिलूक ] स्त्री० १ कांहीं खर्च होऊन किं० दुसरीकडे जाऊन किं० घर, बारदान, पेटी, पिशवी, इ० त भरून अवशिष्ट राहिलेलें धान्य, पैसा, जनावरें, माणसें, इ० समुच्चयानें. २ पत्रावळ करतांना पानांस पानें जोडावयासाठीं योजितात ती बांबूची किं० कडब्याची काडी; चोय. ३ वायूच्या उपद्रवामुळें किं० लचकल्यामुळें गात्रांत भरते ती उसण किं० उठते ती तिडीक. ॐ **शिलकझाडा** पु० १ जमा आणि खर्च यांचा ताळा पाहाण्यासाठीं शिलकीचा काढतात तो झाडा. २ सर्व खर्च होऊन शिलकीची जी निःशेषता ती. **शिलकबंद** पु० ज्या कागदावर जमेच्या आंकड्यांची बेरीज आणि खर्चाच्या आंकड्यांची बेरीज यांची वजावाट करून शिलकीचा आंकडा काढलेला असतो तो कागद. **शिलकबाकी** स्त्री० शिलक; बाकी. **शिलकसांखळी** स्त्री० १ दर महिन्यास खर्च होऊन कमी कमी होत गेलेल्या शिलकीच्या आंकड्यांची सांखळी किं० परंपरा. २ रोजची जमा आणि रोजचा खर्च यांची वजावाट करून ठरलेला आंकडा. **शिलकी** वि० शिलक असलेला; बाकी उरलेला. **शिलकी डागिने** पु० अ० व० प्रसंगविशेषींच वापरावयाचे म्हणून बाजूस ठेविलेले दागिने.

**शिलकणें** [ हिं० सिलगना ] अ० क्रि० (बंदुकीचा तोडा, लाकडें, इ०) नीं पेटणें किं० प्रज्वलित होणें.

**शिलका** वि० उत्कृष्ट; सर्वोत्तम; नामी.

**शिलकावण (–णी )** [ म० शिलकाविणें ] स्त्री० १ पेटवण; पेटविणें. २ क्रोध चेतविणें किं० उद्दीप्त करणें. ३ कुळाकडून पैसे वसूल करण्यासाठीं सावकार किं० सरकार यांनीं पाठविलेला शिपायी स्वतासाठीं दर्शनीच घेतो जें द्रव्य तें ( घेणें ). ४ थकलेल्या बाकीबद्दल किं० हप्त्याबद्दल रोजच्या रोज जो दंड कुळावर बसविला जातो तो. ५ सरकारचा किं० सावकाराचा खाल्लेला पैसा कोणी अमलदार फेडीपर्यंत त्याच्यावर जो रोजच्या रोज दंड बसविला जातो तो.

**शिलकाविणें** [ म० ' शिलकणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ (लाकूड, बंदुकीचा तोडा, इ० )पेटविणें. २ ( कोणेकाला ) रागास आणणें किं० ( त्याला ) चेतविणें.

**शिलंगण** [ सं० सीमोल्लंघन ] न० दसऱ्याचे दिवशीं गांवांतील लोक गांवाची सीमा उल्लंघून जाऊन शमीची पूजा करण्याचा समारंभ करतात तो. ॐ **शिलंगणाचें सोनें हावें त्यानें लुटावें** सार्वजनिक उपयोगासाठीं म्हणून ठरविलेली वस्तु हावी त्यानें हावी तितकी वापरण्याची

त्याला परवानगी असते.

**शिलंगणें** [ हिं० सिलग्ना ] अ० क्रि० पेटणें; जळूं लागणें; प्रज्वलित होणें.

**शिलगावण (–णी), शिलगाविणें** मागें 'शिलकावण (–णी),' 'शिलकाविणें' पहा.

**शिलपट, शिळपट** [ म० शिळा+सं० वत् ( सारखा ) ] वि० पुचाट; नामर्द; कमजोर; निरुत्साह; मरतुकडा.

**शिळपुटी** स्त्री० नरिस किं० वाळलेली फांदी किं० काठी.

**शिलवंत** मागें 'चिलवंत' पहा.

**शिलशिला (–ल्ला), सिल्सिला (–ल्ला)** [ अ० सिल्सिलाह् ] पु० १ काम, व्यवहार, इ० ची मागपासून चालत आलेली सरणी किं० परंपरा. २ पंक्ति; ओळ; सरणी.

**शिला, शिळा** [ सं० शिला ] स्त्री० १दगड; मोठा फत्तर. २ सपाट पृष्ठभाग ज्याचा आहे असा दगड. ३ जातें. ४ पाटा,–चटणी, पुरण, इ० वाटावयाचा. ५ हत्याराला धार देण्याचा दगड; निसणा. ६ उंबरठा; दाराखालचें लाकूड. ※ **शिलोच्चय** पु० पर्वत. **शिलाजित्** स्त्री० एक औषधाच्या उपयोगाचें द्रव्य. **शिलाकुसुम, शिलाज, शिलापुष्प** न० दगडफूल,–मसाला इ० त घालावयाचें एक द्रव्य. **शिलाधातु** पु० १ खडू. २ काव. ३ शिलाजित. **शिलापट्ट** पु० चटणी, पुरण, इ० वाटावयाचा पाटा. **शिलापुत्र, शिलापुत्रक** पु० १ पाटा. २ जमीन चेपून सपाट करण्याचा रूळ. ३ वरवंटा. ४ खलाचा बत्ता. **शिलारस** पु० चिकासारखा एक सुगंधी पदार्थ. **शिलावर्त** पु० घोड्याच्या गुडघ्याजवळील केशांचा भोवरा.

**शिला** [ अ० सिलाह्=हत्यार ] पु० कवच; चिलखत. ※ **शिलेखाना** [ अ० सिलाह्+फा० खानाह् ] पु० चिलखतें, हत्यारें, इ० लढाईच्या उपयोगाच्या वस्तु ठेवण्याची खोली. **शिलेटोप** पु० १ चिलखत. २ शिरस्त्राण. ३ मूल, घोडा, हत्ती, इ० च्या अंगावर दागिने, वस्त्रें, इ० घालून त्यांना शृंगारण्याची क्रिया ( करणें ). 'जिरेटोप' ह्याच अर्थी. **शिलेदार** [ अ० सिलाह्दार् ] पु० स्वतःच्या खर्चानें स्वताचा घोडा बाळगून सरकारची लष्करी नोकरी करणारा राऊत. **शिलेदारी** स्त्री० शिलेदाराचा धंदा किं० दर्जा किं० हुद्दा. वि० उथळेपणाचा. २ डौली; भपकेदार. **शिलेजोर** पु० शस्त्रसामर्थ्य. **शिलेपोस (–स्त)** वि० १ चिलखती. २ हत्यारबंद. ३ सिद्ध; सज्ज; तयार; लढण्याला हत्यारांनीं सिद्ध असलेला ( शिपाई ); भरताड भरून समुद्रांत चालावयाला तयार ( गलबत ); पाठीवर सामान लादून प्रवासास सिद्ध केलेलें ( घोडें, बैल, इ० ). **शिलेभाले** पु० अ० व० लढाईचीं सर्व हत्यारें,–हत्येचीं किं० स्वसंरक्षणाचीं. **शिलेभाल्यानिशीं, शिल्याभाल्यांनिशीं** क्रि० वि० लढाईच्या सर्व हत्यारांनीं सिद्ध होऊन; लढण्याचीं सर्व हत्यारें घेऊन. **शिलेदारी ढंग** पु० १ भपका; थाटमाट. २ रंगेलपणाची किं० उथळपट्टीची राहाणी.

**शिलाई** स्त्री० अंगरखा, विजार, चोळी, इ० कपडे शिवण्याची तऱ्हा किं० शिवण्याबद्दलची मजुरी.

**शिलाण** न० चुलीवर शिजावयासाठीं चिरून आणि धुऊन ठेविलेली भाजी, शेंगा, इ०.

**शिलाणें** [ सं० शील ] न० स्वभाव; वृत्ति.

**शिली** [ सं० शिला ] स्त्री० दाराच्या दुहेरी चौकटीची जमीनीसरपट जीं दोन लाकडें असतात तीं प्रत्येक. अशा वरच्या लाकडांना 'घोडे' म्हणतात.

**शिलीक, शिलीकसांखळी** इ० वर 'शिलक' इ० पहा.

**शिलेमान, शिलेमणि** [ अ० सिलीमान् ] पु० अंगठी इ० च्या कोंदणांत बसवावयाचा एक प्रकारचा दगडाचा खडा. डोळे तळावले असतां हा खडा डोळ्यांत फिरवितात.

**शिलोंच्छवृत्ति** मागें 'शिल' मध्यें पहा.

**शिलोतरी, शिलोत्री** पु० जमीनीच्या इजारदाराचा हक्क किं० त्याला हक्क म्हणून जें द्यावें लागतें तें ( बिघ्याला एक मण ह्या प्रमाणांत ).

※ **शिलोतरदारी** पु० शिलोतरी हा हक्क ज्याचा किं० ज्याच्याकडे आहे तो.

**शिलोत्तरा पाटील** पुढें 'शीळ' मध्यें पहा.

**शिल्प** [**सं०**] **न०** १ कला; हुन्नर. २कौशल्य. ३ हातकाम; कळाकुसर. ७ **शिल्पकार, शिल्पी** [**सं०** शिल्पिन् ] **पु०** कारागीर. **शिल्पविद्या स्त्री०** हस्तकौशल्य. **शिल्पशाला स्त्री०** हस्तकौशल्याचीं कामें जेथें शिकविलीं जातात किं० केलीं जातात ती जागा किं० तो कारखाना. **शिल्पशास्त्र न०** घरें किं०पूल बांधणें,नावा किं० गलबतें बांधणें,नाना प्रकारचे कुशल कारागिरीचे पदार्थ करणें, इ० संबंधाचें शास्त्र.

**शिंव, शींव** [ **सं०** सीमा ] **स्त्री०** १ मर्यादा; हद्द. २ हद्दीची खूण. ३ किनारा. ४ परमावधि; पराकाष्ठा.५ मानेचा कांटा. ७ **शिंवकरी, शिंवथडी (–ड्या ), शिंवधडा, शिंवझडा, शिंवशेजारी, शिंवसोयरा पु०** आपल्या गांवाच्या हद्दीवर राहाणारा आपला शेजारी; आपल्या गांवाला लागून असलेल्या गांवचा रहिवासी. **शिंवघोंडा पु०** गांवाची हद्द दाखविण्यासाठीं पुरलेला धोंडा. **शींवपूजन न०** १ लग्नासाठीं आपल्या गांवीं येत असलेल्या वराच्या गांवाच्या हद्दीवर किं० देवळांत केलेला सत्कार. २ ज्येष्ठी पौर्णिमेस बारा बलुते गांवाच्या सीमेवर जातात तो समारंभ.

**शिव**[**सं०**]**वि०** १कल्याणप्रद; शुभ. २ मंगलकारक; सुखदायक.**पु०**१ शंकर. २ ( **ज्योतिष** ) अमृतसिद्धियोग,–एक शुभ समय.३मोक्ष. ४सत्तावीस योगांतील विसावा.**न०** १ मंगल; क्षेम. कल्याण.२मोक्ष.**शिवा**,**शिवानी स्त्री०** पार्वती.७ **शिवचतुर्दशी स्त्री०** महाशिवरात्र म्ह०माघ वद्य चतुर्दशी. **शिवरात्रि, शिवरात्र स्त्री०** १ प्रत्येक महिन्याच्या वद्य पक्षांतील चतुर्दशी ही तिथि.२ माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथि. **शिवदीक्षा स्त्री०** अंगाला भस्म लावणें, रुद्राक्षमाळा धारण करणें,इ० रूपें शिवाची आराधना. **शिवधातु पु०** १ पारा. २ स्फटिकविशेष. **शिवधार स्त्री०** जेवणारांना वाढलेलें अत्यल्प तूप ( थट्टेंत प्रयोग ). **शिवनिर्माल्य न०, पु०** शिवावर वाहिलेलीं फुलें,बेलाचीं पानें, इ० समुच्चयानें. **टीप**,–शिवाला अर्पिलेली वस्तु परत घेतली असतां किं० उपभोगिली असतां फार मोठें पातक लागतें. ह्यावरून ' शिवस्व ' किं० ' शिवनिर्माल्य' म्ह० जी घेतां किं० स्वीकारतां येत नाहीं अशी वस्तु; जिला स्पर्शदेखील करतां कामा नये अशी वस्तु; जी घेतल्यास ती घेणाऱ्याच्या डोक्यावर तें कर्ज म्हणून बोजा राहातो; उ० भाच्याची संपत्ति मी खाली असें तूं म्हणतोस, मी ती शिवस्व ( किं० शिवनिर्माल्य ) मानतों. **टीप**,–शपथ घेतांना ' शिवस्व ' किं० ' शिवनिर्माल्य ' ह्यांचा उपयोग केला जातो;उ० मी शिवस्वाशपथ तुझ्या उलट गेलों नाहीं. **शिवपुरी स्त्री०** काशी हें क्षेत्र. **शिवमुहूर्त पु०** सूर्योदयीं ज्याला आरंभ होतो तो मुहूर्तविशेष. **शिवयोग पु०** ( ज्योतिषांत ) वीसावा योग. **शिवरस पु०** कालवणासाठीं तयार केलेली भाताची पेज इ०. **शिवलग्न पु०** ( अडाण्यांत ) सीमोल्लंघन ( दसऱ्याच्या दिवशींचें ). **शिवलिंग न०** शिवाचें लिंग(पूजेच्या दृष्टीनें).**शिवशरणार्थ पु०**लिंगायत लोक आणि शैव लोक कोणामाणसास नमस्कार करतांना हा शब्द योजतात.**शिवशितळ** [**सं०**शिव ( शुभ )+शीतल (थंड,सौम्य) ] **वि०** हुशारी वाटविणारी (हवा, वारा,जागा,घर,इ०); चढावयाला सोपी ( घाटी, डोंगर ); शांत म्ह० भूतें, पिशाचें, इ० चा उपद्रव जेथें नाहीं असें ( स्थळ ); जेथें रोगराई नाहीं असा (गांव); जेथें चोरांचा किं० वन्य पशूंचा उपद्रव नाहीं असा ( रस्ता, वाट ); सौम्य ( स्वभाव, माणूस ); ह्याच्या उलट ' खष्ट,' 'खडतर; ' सौम्य ( दैवत, देव ); जिच्या बद्दल भूतांखेतांना योग्य बळी देण्यांत आला आहे अशी (खळ्यावरील धान्याची रास); अक्षुब्ध, शांत ( मन, वृत्ति ). **शिवामूठ स्त्री०** लग्नानंतर पहिल्या पांच वर्षी श्रावण महिन्याच्या प्रत्येक सोमवारीं मुली शिवाला तांदुळाची मूठ अर्पितात ती, किं० ही मूठ अर्पण करण्याचें व्रत. **शिवालय न०** १शंकराचें देऊळ.२स्मशानभूमि.**शिवालिखित न०** दिनमानाचे आणि रात्रिमानाचे आठ भाग धरून केलेलें शुभाशुभ वेळांचें शिवा ( म्ह० शंकरपत्नी ) हिनें रचिलेलें कोष्टक. पावणेचार घटका हें मध्यम प्रमाण आहे म्हणून दिनमानाप्रमाणें ह्या भागांचा काळ कमी ज्यास्ती होतो.

**शिव पु०** खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्य.

**शिवटणें** स० क्रि० निसण्यावर घासून ( सुरी, चाकू, तरवार, इ० ) तीक्ष्ण करणें.

**शिवडा** पु० गोड्या पाण्यांतील एक मत्स्य.

**शिवण** [ म० शिवणें; सं० सीवन ] स्त्री० १ वस्त्र इ० चे दोन तुकडे जोडावयाचे असतां दोहोंस एकत्रित करण्यासाठीं सुईंत ओंविलेल्या दोऱ्याचे टांके एका पुढें एक असे घालून होते ती ओळ. २ वस्त्रादि शिवण्याची क्रिया किं० कला. ३ गुदद्वारापासून शिश्नाच्या अग्रापर्यंतच्या कातडीवर रेषाकार उंचवटा असतो तो. न० १ शिवावयासाठीं घेतलेलें कापड किं० कापडें समुच्चयानें. २ घर इ० च्या माथ्यावर घालण्यासाठीं घेतलेलें गवत इ०. **शिवणकाम** न० शिवण्याचें काम; शिवण्याची कला.

**शिवण, शिवणी** स्त्री० एक झाड. याचें लाकूड पांढरें असून हलकें असतें.

**शिवणें** [ सं० सिव्=शिवणें, विणणें ] स० क्रि० १(अंगरखा, बंडी, जोडा,इ० चे दोन भाग) सुईंत ओंविलेल्या दोऱ्याच्या टांक्यांनीं किं० अन्य प्रकारानें संबद्ध करणें. २ अशा प्रकारच्या क्रियेनें ( अंगरखा, चोळी, जोडा, इ० ) तयार करणें. ३ पर्जन्यादिकांच्या निवारणार्थ(घराच्या) माथ्यावर गवत, झांपा, इ० विशिष्ट प्रकारें आंथरणें. ४ स्पर्शिणें; उ० दूर हो, मला शिवूं नको, विटाळ होईल. ५ ( पदार्थाला ) हात लावणें; ० मीच ह्या खांबाला प्रथम शिवलों. **शिवशिव शिमगा** [ म० शिवणें (स्पर्शिणें) +शिमगा ( फाल्गुन कृष्ण प्रतिपदा ) ] पु० होळीच्या दिवसाच्या पुढचा दिवस,–ज्या दिवशीं ब्राह्मणांनीं चंडाळाला स्पर्श करून स्नान करावयाचें असतें; शितळ शिमगा. **शिवूं-नयेशी** स्त्री० विटाळशी स्त्री; मासिक रजःस्रावामुळें अस्पृश्य स्त्री.

**शिवरा** [ म० शिवी ] वि० शिव्या देण्याची खोडी ज्याला आहे असा.

**शिंवरा** [ म० शिंपडणें ] पु० जमीन इ० कांवर पाणी इ० शिंपडणें किं० शिंपडण्याची क्रिया.

**शिवराई** [ म० शिव ( शिवाजी )+राय ( राजा ) ] पु० शिवाजीनें पाडलेलें पैसा हें तांब्याचें नाणें.

**शिवराभिवरा, शिवराभेवरा, शिवराबिवरा** [ म० शिना ( एक नदी ) + भीमा ( एक नदी ) ] पु० १ शिना आणि भीमा ह्या नद्यांच्या कांठचीं शेतें किं० त्यांतील पिकें. २कोणत्याही नदीच्या कांठचीं शेतें किं०त्यांतील पिकें; उ० यंदा शिवराभिवरा म्हणण्यासारखा पिकला नाहीं म्हणून आम्हाला धान्याची टंचाई पडली आहे.

**शिवशिवणें** अ० क्रि० ( दांत, कान, कांहीं गात्र, इ० ) शैत्यादि कारणांमुळें ठणकणें,दुखणें, किं० ठुसठुसणें, किं० त्यांना कंड सुटणें.

**शिंवसर** [ म० सिंह+सरणें ] पु० सिंह राशींत सूर्य सरला असण्याचा ( म्ह० प्रवेशला असण्याचा ) काळ; सिंहसंक्रान्ति. ह्या काळांत गाय व्याली असतां ती मालकाचें अनिष्ट सुचविते.

**शिंवसरणें** [ म० शिंवसर ] अ० क्रि० शिंवसर ह्या काळांत ( गाय ) विणें. वर ' शिंवसर ' पहा.

**शिंवसुरणें, शिंवसूर** वर ' शिंवसरणें, ' ' शिंवसर ' पहा.

**शिवळ** मागें ' शिऊळ ' पहा.

**शिवळणें** मागें ' शिवाशिवणें ' पहा.

**शिवळट, शिवळाटी** स्त्री० गाडीला जुंपलेल्या बैलाच्या गळ्याला बांधलेला असतो तो पट्टा. [ गोळा.

**शिवळवट** न०गव्हाच्या तिंबलेल्या कणकेचा

**शिवाय, शिवाई**[फा०सीवाय् ] श०यो०अ० १ खेरीज; वांचून; उ० तूं मला रुपये दिल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं. २ आणखी ज्यास्ती; उ० रामाशिवाय पांच मुलगे तेथें होते ( म्ह० एकंदर सहा ). टीप,–समासांत पूर्वपदीं ' शिवाय ' आला असतां ' ज्यास्तीचा, ' ' अधिक, ' ' अवांतर ' असा विशेषणात्मक अर्थ होतो; उ० शिवायजमा, शिवायमिळकत, इ०. **शिवायच्या दोऱ्या** स्त्री० अ० व० तंबूच्या खांबाच्या माथ्याला बांधलेल्या चार दोऱ्या,–ज्यांचा तंबू ठोकतांना उपयोग होतो.

**शिवार, शिंवार** [ म० शींव; सं० सीमा ] न०, पु० १ गांवाच्या भोंवतालची आणि गांवाच्या हद्दींत मोडणारी जमीन. २ रद्दी.

किं० निरुपयोगी झाडांचा प्रदेश.३ घर बांधण्यासाठीं गोळा केलेल्या तुळया,लाकडें,तक्ते,इ०समुच्चयानें.४सर्पण गोळा करण्यासाठीं रानांत केलेली फेरी.※ शिंवारपंडित पु० ज्याला अत्यल्प विद्या आहे आणि त्या विद्येवर जो पेट भिरवितो तो. शिंवारपाहणी स्त्री०गांवच्या जमीनींची पहाणी,—सान्याच्या दृष्टीनें सरकारनें केलेली. शिंवार सैंपाक पु० शेतांत बसून हुरडा, ओंब्या, इ० भाजून भोजनाच्या ऐवजीं खाणें हा समारंभ.

शिवाशीव [ म० शिवणें+शिवणें ] स्त्री० १ स्पर्शानें होतो तो विटाळ.२सुतकाचा विटाळ.

शिवाळ, शिवाळ स्त्री० वर ' शिवळ ' पहा.

शिवी स्त्री० कोणेकाला उद्देशून बोललेलें अपशब्द;अभद्र किं०अमंगळ शब्द,किं०त्यांचें उच्चारण ( देणें ). ※ शिवीगाळ [ म० शिवी + सं० गालि ( शिवी ) ] स्त्री० ए० व० कोणेकाला शिव्या देणें; एकमेकांनीं एकमेकांस शिव्या देणें किं० दिलेल्या शिव्या( करणें ). शिवेरा,शिव्येरा वि० लोकांना शिव्या देण्याची खोडी ज्याला आहे असा. मागें ' शिवरा ' पहा.

शिवूनयेशी स्त्री० विटाळशी. मागें 'शिवणें' मध्यें पहा.

शिवूळ स्त्री० मागें ' शिवळ ' पहा.

शिवेरा,शिव्येरा[म०शिवी]वि०मागें 'शिवरा' पहा. वर ' शिवी ' मध्यें हे शब्द पहा.

शिंशपा [ सं० ] स्त्री० १ शिसवा ( एक वृक्ष ). २ अशोक ( एक वृक्ष ). ※शिंशपाचोद्य [ सं० शिंशपा ( अशोक ) + सं० चोद्य ( प्रश्न किं० आक्षेप ) ] न० शिंशपा वृक्षासंबंधानें प्रश्न. रावणानें सीतेला शिंशपावृक्षाखालीं कां ठेविलें असा प्रश्न. जेव्हां एकादी गोष्ट करावयाचे अनेक अगदीं सारखे सारखे मार्ग असतात,आणि ती गोष्ट करावयाची असते,तेव्हां कोणच्या तरी मार्गाचा अवलंब करावा लागतो. अवलंबिलेल्या मार्गांत कांहीं विशेष हेतु असतो असें नव्हे.तेव्हां तूं अमूक मार्गानें ती गोष्ट कां केलीस असा प्रश्न विचारणें हा मूर्खपणा होय. यावरून ' शिंशपाचोद्य 'ह्याचा अर्थ रिकामटवळा प्रश्न; ज्याचें उत्तर कांहींही देण्यांत आलें तरी प्रश्न विचारणाऱ्याला कांहीं लाभ होत नाहीं असा प्रश्न.

शिशिर [सं०]पु०, न० दंव; बर्फ. पु० माघ आणि फाल्गुन ह्या दोन महिन्यांचा कालावधि. वि० १ थंड. २ ताप नाहींसा करणारा ( उपचार इ० ). ३ शिशिर ऋतूंतील. ※ शिशिरांशु पु० चंद्र.शिशिरापगम, शिशिरात्यय पु०वसंत ऋतु.

शिशी [ फा० शीशी ] स्त्री० लहान शिसा; कुपी.

शिशी [ सं० शिंशपा ] स्त्री० एक वृक्ष. ह्याचें लाकूड काळें असतें. ※ शिशावी, शिसवी वि० शिसूच्या लाकडाचा बनविलेला (पाट,चवरंग, देव्हारा, तुळई, इ० ).

शिशु [ सं० ] पु०१सात महिन्यापासून वर्षापर्यंतचें मूल. २ पिलूं. ३आठ किं०सोळा वर्षांच्या आंतला मुलगा. ४ शिष्य. ※ शिशुगंधी स्त्री० बटमोगरा. शिशुचांद्रायण न० एक व्रत. शिशुमार पु० एक जलचर प्राणी.

शिश्न [ सं० ] पु०,न० पुरुषाचें जननेंद्रिय. ※शिश्नदेव पु० विषयासक्त पुरुष. शिश्नोदरपरायण वि० मैथुन आणि मिष्टान्नें ह्यांची फाजिल आवड ज्याला आहे असा; आहार आणि मैथुन ह्यांत सदानिमग्न.

शिष्ट [ सं० ] वि० १शिलक;उरलेलें;राहिलेलें; उ० यज्ञशिष्ट, हुतशिष्ट, इ०. २ ज्याला शिकविलें गेलें आहे असा. ३ विद्वान्; सुशिक्षित. ४ श्रेष्ठ; सुसंस्कृत. ५ सभ्य चालरीतींचा. ※ शिष्टाचार पु० १ सद्वर्तन. २ सभ्यपणाचें वर्तन. ३ लग्न, मुंज, इ० प्रसंगीं यजमानास करतात तो आहेर(करणें).४ज्याला शास्त्रांत आधार नाहीं पण जें रूढीनें चालत आलें आहे तें कर्म,—ज्यांत वधूवरांनीं विड्या तोडणें,पायघड्या,नांवें घेणें, इ० रूप. शिष्टाचार करणें १ रूढीप्रमाणें कांहीं कृत्य करणें किं० कांहीं आचार पाळणें. २ सभ्य चालीरीतींचा भंग न होईल एवढ्या पुरतेंच कांहीं कृत्य करणें; वरपांगीचें करणें; फारसें मनापासून कृत्यविशेष न करणें; केलें म्हणण्यापुरतेंच करणें.यज्ञशिष्ट वि० यज्ञ होऊन शिलक राहिलेलें द्रव्य ( समिधा, तूप, इ० ). हुतशिष्ट वि० हवन

होऊन शिल्लक राहिलेलें(द्रव्य). **शिष्टागमने अनध्यायः** पु० संभावित मनुष्य किं० श्रेष्ठ दर्जाचा मनुष्य मेहमान आला असतां अध्ययन बंद ठेवावें आणि सुट्टी द्यावी. **शिष्टकंठाळ** स्त्री० ज्या मनुष्याशीं आपणास सभ्याचाराप्रमाणें वागावें लागतें, पण जो आपणास मनांतून जवळ नसावा असें वाटतें, असा मनुष्य. **शिष्टसंप्रदाय** पु० समाजांतील संमान्य म्हणून गणिलेल्या माणसांची चालरीति किं० वर्तनसरणी. **शिष्टसंभावना** स्त्री० लग्न, मुंज, इ० प्रसंगीं आलेल्या लोकांपैकीं कांहींना दक्षिणा, वस्त्र, इ० जें कांहीं देतात तें किं० तें देऊन त्यांचा इतरांहून अधिक सत्कार करतात तो. **शिष्टाइकी, शिष्टाई** स्त्री० १ शिष्टपणाचें वर्तन. २ दोन पक्षांत सलोखा घडवून आणण्यासाठीं बोधाच्या गोष्टी ह्यांना आणि त्यांना सांगणें; मध्यस्थी.

**शिष्टावणें** [ म० शिष्ट होणें ] अ० क्रि० आपण शिष्ट म्ह० वरच्या दर्जाचे आहों अशी आपली कल्पना करून घेऊन समाजांत वागणें; शिष्टांचा मान आपणास मिळावा अशी इच्छा करणें किं० अशी अपेक्षा बाळगणें ( उपहासांत प्रयोग ).

**शिष्य** [ सं० ] वि० शासन करण्यास किं० शिकविण्यास योग्य. पु० विद्यार्थी. **शिष्या** पु० १ शिष्य. २ श्रीमंताच्या घरीं असतात जे आश्रित ते प्रत्येक; शागीर्द. ३ यजमानाचीं किरकोळ कामें करून फावल्या वेळांत विद्या करण्यास राहिलेला मनुष्य. **शिष्यशाखा** स्त्री० मूळच्या गुरूपासून उपदेश घेतलेला शिष्य, ह्या शिष्यापासून उपदेश घेतलेला दुसरा शिष्य, ह्या दुसऱ्या शिष्यापासून उपदेश घेतलेला तिसरा शिष्य, अशा प्रकारें चालत आलेली सांखळी. **शिष्य प्रशिष्य** पु० अ० व० शिष्य आणि शिष्यांचे शिष्य. **शिष्यशाखा** स्त्री० कोणा गुरूचे शिष्य, त्या शिष्यांचे शिष्य, इ० समुच्चयानें; एका गुरूनें घालून दिलेल्या सरणीनें चालणारे त्याचे शिष्य आणि त्या शिष्यांचे शिष्य समुच्चयानें(त्या गुरूचा संप्रदाय विवक्षित असतां). **शिष्यसंप्रदाय** पु० एका विशिष्ट गुरूनें रूढ किं० प्रचलित केलेला पंथ.

**शिसकारी, शिसाटी** स्त्री० १ एखाद्या खाद्याविषयीं किं० पेयाविषयीं वीट, किळस, किं० अप्रीति; शिसारी. २ मळमळ.

**शिसव, शिंसव, शिसवा, शिंसवा** पु०, **शिसवी, शिंसवी** स्त्री० [सं० शिंशपा] एक वृक्ष. ह्याचें लाकूड फार काळें असतें. ॐ**शिसवी, शिंसवी** वि० शिसवाच्या लाकडाचा केलेला(पाट, देव्हारा, इ०). **शिंसवेल** न० शिसवाच्या लाकडाचें तेल.

**शिंसळ** [ सं० शीर्ष; म० शीस ] न० डोईचे केश चापून चोपून न बसविल्या कारणानें अस्ताव्यस्तपणें उडत असतात ते ( एकत्वाच्या दृष्टीनें ).

**शिसा** [ फा० षीषाह् ] पु० १ काचेची बरणी इ० बारदान. २ मधमाशा ज्यांत मध साठवितात ती रचना; मोहोळ. ह्या अर्थी 'शिंसा' सुद्धां.

**शिसा** [ सं० शिंशपा ] पु० एक वृक्षविशेष. ह्याचें लाकूड फार काळें असतें.

• **शिसाटी** मागें 'शिसकारी' पहा.

**शिसाबासा, शिसाभासा, शिंसाबासा, शिंसाभासा** [ म० शिळा + बासा ] पु० १ पदार्थांची मोडतोड किं० नासाडी. २ जनावरें, मनुष्यें, इ० ची दुखण्याबाण्याची स्थिति. ३ भूत, पिशाच, इ० ची बाधा.

**शिसारी, शिंसारी** स्त्री० १ पदार्थाचा आलेला वीट; खंती; किळस. २ एरंडेल, बोळ, इ० च्या भक्षणानें किं० घाणीनें वांति होईल अशी भावना होणें किं० उमळून येणें. ३ तापामध्यें थंडीची येते ती शिरशिरी (भरणें, बसणें).

**शिसें** [ सं० शीस ] न० कथलासारखा एक धातु.

**शिस्त** [ फा० ] स्त्री० १ बाण, धोंडा इ० चा लक्ष्यावर नेम; निशाण; रोख ( धरणें, बांधणें ). २ गांवांतील घरवाल्यांची यादी (घरपट्टी इ० वसूल करण्याचें कामीं अनुसरावयाची). ३ योग्य क्रम किं० सरणी; उ० तूं शिस्तीनें वागलास तरच तुला माझ्या घरांत मी ठेवून घेईन. ४ बंदोबस्त. वि० विवक्षित संप्रदायाला अनुसरून असलेला (व्यवहार, जाबसाल, इ०). ॐ **शिस्तवार** क्रि० पद्धतशीर; योग्य क्रमांत असलेला. क्रि० वि० योग्य क्रमानें किं० सरणीनें.

**शिळई** स्त्री० शीळ ( वाजविणें, घालणें ).

**शिळक** स्त्री० १ बांबूची किं० कडब्याच्या ताटाची बारीक काडी ( पत्रावळी लावण्याच्या कामीं योजावयाची ); चोय. २ शरीरांत एकदम उठलेली तिडीक; शिणीक. ह्या अर्थी ' शिळका ' असा अ० व० प्रयोग बहुधा होतो. क्रि० उठणें, भरणें, मारणें, इ०.

**शिळकबा, शिळकोपा** [ म० शिळा ] पु० १ दिवसाचा थंड वेळ,–तिसऱ्या प्रहराच्या नंतरचा. २ हवेचा हिंवसपणा. पुढें ' शिळोपा 'पहा.

**शिळट, शिळटी** स्त्री० १ हवेचा हिंवसपणा ( पडणें, लागणें ). २ पाऊस पडून गेल्यानंतर जमीनीला मारतो तो दम ( येणें ); उ० जमीनीला शिळट येऊं द्या मग पेरा.

**शिळटणें** [ म० शिळट ] अ० क्रि० १ हवेच्या हिंवसपणामुळें (भात इ० चीं रोपें) बिघडणें किं० नासणें. २ ( पाणी, खाद्य, इ० ) शिळें होणें किं० नीरस किं० बेचव होणें.

**शिळणधार, शिळंधार, शिळाधार** [म० शिळा ( धोंडा )+धार ] वि० जोराचा आणि जाडी जाडी थेंबांच्या रूपें पडलेला ( पाऊस ).

**शिळपट** [म० शिळा(मंद)+सं०वत(प्रमाणें)] वि० १ शिळा ( खाद्यादि पदार्थ ). २ नीरस; निःसत्त्व ( कोणताही पदार्थ ). ३ निर्वीर्य; पुळपुळीत; बुळा; पराक्रमशून्य; कर्तृत्वहीन. ४ ज्याची धार मंद झाली आहे असें ( हत्यार ).५ ज्याचेवरील आकृति झिजली आहे असें ( नाणें इ० ). ६ धिमेपणानें किं० सुस्ताईनें चाललेलें ( काम, कारभार ).

**शिळबुडा** वि० ज्याचा थंडपणा किं०गारपणा अग्न्यादिसंयोगानें किंचित् मोडला आहे असें (पाणी, खाद्य, इ०).

**शिळवट** स्त्री०, न०, **शिळवटी** स्त्री० [ म० ' शिवळ ' चे एक रूप ] १ जुंपलेल्या बैलाची मान अडकावण्याची चौकट.२बैलाच्या मानेच्या दोन बाजूंस जुंवांतून घालतात ज्या दोन खुंट्या त्या प्रत्येक.

**शिळवड, शिळवट, शिळःवट, शिळवण** स्त्री०, **शिळवें** न० [ म० शिळा ] शिळे म्ह० ताजे नव्हेत असे खाद्यपेयादि पदार्थ समुच्चयानें.

**शिळविणें** [ म० शिळा ] स० क्रि० (खाद्यें, पेयें, पाणी, वस्त्रें, इ०पदार्थ)उपयोगांत न आणतां तसेच ठेवून शिळे करणें.

**शिळा** वि० १ बासा; ताजा नव्हे तो; जो सिद्ध किं० तयार करून बराच काळ लोटला आहे असा ( खाद्य, पेय, पाणी, इ० पदार्थ ); जें काढल्याला पुष्कळ वेळ झाला आहे असें( दूध ); जीं तोडल्याला पुष्कळ वेळ झाला आहे अशीं ( फुलें, भाजी, पानें, इ० ). २ संथ, धिमा ( स्वभाव, माणूस, काम, इ० ).  **शिळापाका** वि० शिळा; शिळा म्हणून त्याज्य किं० नीरस किं० विसविशीत. **शिळा बाजार** पु० गांवचा आठवड्याचा बाजार ज्या दिवशीं भरतो त्याच्या दुसऱ्या दिवशीं जीं कांहीं थोडींशीं दुकानें निघून जावयाचीं राहिलेलीं असतात तीं समुच्चयानें. **शिळा बिब्बा** पु०अति सावकाश किं० मंद वेगानें किं० आळसटलेपणानें काम करणारा माणूस,गडी,इ०; मंद, धिमा,किं०चेंगट अधिकारी इ०. **शिळावट** स्त्री० शिळें खाद्य,–भात,आमटी, इ०. **शिळावळ** स्त्री० १शिळें अन्न. २ शिळें अन्न खाणें; शिळ्या अन्नाचें भोजन. ३ तिसऱ्या प्रहरानंतरच्या हवेंत येणारा थंडावा;उन्हाची तिरीप मंदावल्यानंतर हवेंत येतो तो गारवा. ह्या अर्थी ' शिळावेळ ' सुद्धां. **शिळा वेळ** पु०,**शिळावळ** स्त्री० १ तिसराप्रहरानंतरचा किं० मध्यान्ह उलटून गेल्यानंतरचा हवेंतील थंडपणा किं० गारवा. २ हवेंतील शीतळपणा ( सामान्यतः ). ह्या दोन्ही अर्थी ' शिळोपा, ' ' शिळोप्याचा वेळ. ' **शिळोप्याच्या गप्पा** स्त्री० अ० व० दिवसाचीं सर्व कर्तव्यें संपल्यानंतर संध्याकाळीं मित्रमंडळीसह मोकळ्या मनानें चालविलेल्या सुखदुःखाच्या गोष्टी किं०मारलेल्या गप्पा.

**शिळा** [ सं० शिला ] स्त्री० १ धोंडा. २ टांकी देऊन सपाट आणि साफ केलेला धोंडा. ३ निसर्गांत सपाट असलेला मोठा फत्तर.४पुरण, चटणी, इ० वाटावयाचा सपाट धोंडा; पाटा.  **शिळाधार** मागें ' शिळणधार ' पहा. **शिळाधार, शिळाधारा** [ म० शिळा ( धोंडा ) +धारा ( पाण्याची धार ) ] स्त्री० मोठमोठ्या

थेंबांनीं आणि जोरानें पडणारा पाऊस (पडणें, लागणें ). प्रयोग ए० व० किं० अ० व० होतो. उ० शिळाधार पडली, शिळाधारा पडल्या. **शिळा सप्तमी स्त्री०** श्रावण शुद्ध सप्तमी ही तिथि किं० ह्या तिथीस स्त्रिया पुत्रप्राप्त्यर्थ करतात तें व्रत. नदीच्या कांठीं एका शिळेवर ( म्ह० दगडावर ) स्त्रिया वाण ठेवितात. **शिळाबेत, शिळासेत** [ सं० शिला (दगड) + सेतु (पूल)] **पु०** रामानें समुद्रावर बांधलेल्या सेतूप्रमाणें सुसंघटित, व्यवस्थित, भक्कम घडणीचा, आटोपसर असा कोणताही पदार्थ,–घर, यंत्र, व्यूह,मसलत, दागिना, भांडें, इ०. [एक पदार्थ.

**शिळारस** [ सं० शिलारस ] **पु०** राळे सारखा

**शिळावर्त पु०** घोड्याच्या गुडघ्याजवळचा केशांचा भोंवरा. मागें ' शिलावर्त ' पहा.

**शिळी स्त्री०** १ वाजविलेली शीळ. २ ज्यांत वारा घातल्यानें आवाज निघतो असा पदार्थ; शिटी.

**शिळीक स्त्री०** १ कडब्याच्या ताटाची किं० बांबूची काडी (पत्रावळ लावणें इ० च्या उपयोगाची ); चोय. मागें ' शिळक ' पहा. २ शीळ, शिटी ( वाजणें, वाजविणें, फुंकणें ).

**शिळोत्तरा पु०** पुढें ' शीळ ' मध्यें पहा.

**शिळोपा पु०** मागें ' शिळा ' वि० मध्यें ' शिळा वेळ ' पहा.

**शिक्षक** [ सं०] **पु०** कोणतीही विद्या, कला, हुन्नर, इ० शिकविणारा किं० शिकविण्याचा धंदा करणारा.

**शिक्षण** [ सं० ] **पु०** १ शिकणें. २ विद्याभ्यास. ३ शिकविणें.

**शिक्षणीय** [ सं० ] **वि०** १ शिकविण्यास योग्य ( विद्यार्थी इ० ). २ दंड, पारिपत्य, किं० शिक्षा करण्यास पात्र.

**शिक्षणें, शिक्षिणें** [ सं० शिक्ष ] **स० क्रि०** १ ( कोणेकास ) शिकविणें किं० पढविणें. २ ( कांहीं विषय ) कोणेकास शिकविणें. ३ ( कोणेकाचें ) पारिपत्य करणें.

**शिक्षा** [ सं० ] **स्त्री०** १ शिक्षण; अभ्यास. २ कोणेकास पढविणें किं० उपदेशिणें. ३ कोणेकास केलेला उपदेश. ४ नम्रता. ५ वर्णोच्चाराचें शास्त्र,–वेदाच्या सहा अंगांपैकीं एक. ६ कोणेकाचें केलेलें पारिपत्य.

**शिक्षित** [ सं० ] **वि०** १ शिकविलेला ( विद्यार्थी ).२ शिकविलेला( विषय ). ३ शिकवून तयार केलेला ( घोडा इ० ). ४ ज्याचें पारिपत्य केलें आहे असा. ५ शिकलेला( विषय, शास्त्र, विद्या).

**शी स्त्री०** विष्टा ( मुलांच्या भाषेंत ).

**शी,शीक क्रि०वि०** हा प्रत्यय कालवाचकांस लागतो पण अर्थांत कांहीं फरक होत नाहीं. आतांशीं ह्म० आतां; मगशी ह्म० मग; मघाशीक म्ह० मघा.

**शीक, शीख, पु०** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम.

**शींक** [ सं० छिक्का ] **स्त्री०** नाकांतून एकदम बाहेर पडलेला सशब्द वायूचा प्रवाह; शिंक ( येणें ).

**शीग स्त्री०** १ धान्य, पीठ, माती, वाळू, इ० ची जमीन इ० वर रास केली असतां माथ्याशीं जो निमुळता आकार उत्पन्न होतो तो; राशीचें शिखर. २ धान्य इ० पदार्थ माप, पात्र, इ० त घातला असतां कांठाच्या वर जो चिंचोळा भाग उत्पन्न होतो तो. ३ अग्राकडे निमुळना होत गेलेला कोणताही उंचवटा ( सामान्यत: ). ॐ **मापांतील धान्याची शीग मोडणें** मापाच्या कांठाबरोबर धान्य ठेवून बाकीचें धान्य खालीं लोटून देणें. **शिगलोट वि०** विपुल; उ० एके काळीं ह्या शेटजींच्या जवळ शिगलोट दौलत होती. **स्त्री०** वैपुल्य; रेलचेल; उ० यंदा आमच्या गांवीं आंब्याची शीगलोट झाली; उ० शीगलोट आमदानी. **क्रि० वि०** वैपुल्यानें; खूप मोठ्या प्रमाणांत; उ० पंक्तींत शीगलोट लाडू वाढले तरी पांचशें उरले. **शीगलोटा पु०** ज्याची शीग लोटून खालीं पाडविली आहे असें धान्यादीचें माप. **शीगवर क्रि० वि०** विपुल प्रमाणांत; वैपुल्यानें. **शीगवर माप देणें** थोडेसें अधिकच देणें पण यत्किंचित् सुद्धां कमी न देणें.

**शीघ्र** [ सं० ] **वि०** १ त्वरित; जलदीचा. २ वेगवान. ॐ**शीघ्रचेतन पु०** कुत्रा. **शीघ्रवेधी**

[सं० शीघ्रवेधिन् ] पु० उत्तम तिरंदाज. **शीघ्रकोपी** वि० ज्याला लवकर राग येतो किं० अत्यंत क्षुल्लक कारणावरून राग येतो असा ( माणूस ). **शीघ्रकवि** पु० सभेंतील लोकांनीं विनंती करतांच जागच्या जागीं कवन ( पोवाडा इ० ) करून म्हणून दाखविणारा. **शीघ्रबुद्धि** स्त्री० कांहीं एका विषयाचें ताबडतोब आकलन करणारी बुद्धि. पु० ताबडतोब आकलन करणाऱ्या बुद्धीचा माणूस.

**शीट** स्त्री० १ चिमणी, राघू, इ० पक्ष्याची विष्टा. २ छीट किं० चीट हें कापड; छापलेलें कापड. ३ पाऊस, कारंजें, इ० चे तुषार (मारणें).

**शीड** न० १ गलबताचें अवजार. २ घोड्याच्या मानेचा झोकदार बाक. **शीडकाठी** स्त्री० अवजाराची काठी; डोलकाठी. **कोणेकाचें शीड उतरणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याची फजीती होणें. **कोणेकाचें शीड उभारणें** तो वैभवाच्या स्थितीस येऊं लागणें; त्याचा उत्कर्ष होत असणें. **कोणेकाचें शीड चढणें** त्याचा उत्कर्ष होणें; तो उन्नत पदावर चढणें.

**शीण** [ सं० क्षीण ] पु० १ थकवा; श्रांतपण; ग्लानि ( येणें, वाटणें ). २ खंती; दुःख; खेद; विषाद. ॐ **शिणीचें दुखणें** न० फार काम केल्यामुळें आलेला ताप. **शीणभाग** [ म० शीण+भागणें ] पु० फार कष्टामुळें अगदीं थकलेपणाची स्थिति; भोगवटा; (होणें, येणें).

**शीण** पु०, स्त्री० वय; उमर; उ० तुमचा रामू आणि आमचा गोपाळा हे दोघे एका शिणीचे आहेत. ॐ **कोणेकाचा शीणभीण फिटणें** त्याच्या वडीलपणाबद्दल आपल्या मनांतील आदर किं० पूज्यभाव नाहींसा होणें.

**शीत** न० १ शिजलेल्या भाताचा एक एक दाणा. २ गांवच्या भूतांखेतांना दर वर्षी अन्न, बकरा, इ० चा देतात तो बळी. ३ धनुष्याची दोरी; मौर्वी; ज्या; शिंजिनी. ४ कोष्ट्याच्या मागांतील ताण्याच्या तंतूंच्या दोन रांगा पृथक् ठेवणाऱ्या ज्या काठ्या त्या प्रत्येक. ॐ **असतील शितें तर मिळतील भुतें** आपल्या जवळ पैसा असला ह्मणजे आपणाला मित्रांची टंचाई नसते. **शितावरून भाताची परीक्षा** वस्तूच्या अत्यल्प भागावरून तिच्या समग्र स्वरूपाविषयीं अटकळ बांधतां येते. **शीतकण** पु० शिजलेल्या भाताचा एक एक दाणा.

**शीत** [ सं० ] वि० १ थंड ( हवा, पाणी, खाद्य, इ० ). २ मंद; आळशी. ३ मूर्ख. पु० १ हिंवाळा. २ कापूर. न० थंडी; गारवा. ॐ **शीतांशु, शीतकर, शीतकिरण, शीतरश्मि** पु० चंद्र. **शीताद्रि** पु० हिमालय पर्वत. **शीताश्मा** [ सं० शीताश्मन् ] पु० चंद्रकान्त मणि. **शीतकृच्छ्र** पु० एक प्रायश्चित्त. तीन तीन दिवस अनुक्रमें पाणी, दूध, आणि तूप पिणें आणि नंतर तीन दिवस उपोषण. **शीतगंध** न० चंदन. **शीतकाळ** पु० हिंवाळा; हेमंत आणि शिशिर या ऋतूंचा काळ. **शीतज्वर** पु० हिंवताप.

**शीत** [ अ० सित् ] वि० सहा,–अरबी साल सांगतांना.

**शीतल, शीतळ** [सं० शीतल] वि० १ थंड. २ पीडा न देणारें; सौम्य. **शीतला(–ळा)** स्त्री० देवी ह्या त्वग्रोगाची देवता. ह्या देवतेस 'शीतळा देवी,' असेंही म्हणतात. **शीतळाषष्ठी** स्त्री० माघ शुद्ध षष्ठी ही तिथि. ह्या तिथीस शिळें अन्न खातात. **शीतलासप्तमी** स्त्री० श्रावण शुद्ध सप्तमी ही तिथि. **शीतळ शिमगा** पु० मागें 'शितळ शिमगा' पहा.

**शीम** [ सं० सीमा ] स्त्री० मर्यादा; हद्द. ॐ **शीमधडा (–ड्या), शीमशेजारी, शीमसोयरा, शीमकरी** पु० आपल्या गांवाला चिकटून असलेल्या गांवांतील रहिवासी.

**शीर** [ सं० शिरा=रक्तवाहिनी ] स्त्री० १ शरीरांतील रक्तवाहिनी. २ वृक्षाचें पान इ० मध्यें पोषक रस पोंचविणारे तंतुरूप अवयव प्रत्येक. ३ दगड, लाकूड, इ० तील वेगळ्या रंगाची रेषा. ४ लाकडाची तुळई, घडविलेला चिरा, इ० ची रेषारूप कड किं० धार. ॐ **शिरा ( किं० शीर ) काढणें, तोडणें,** इ० रोगनिवारणार्थ शरीरांतील शिरा ( किं० शीर ) शस्त्रानें कापून रक्त बाहेर वाहविणें. **कोणेकाच्या शिरा निघणें** तो रोड झाल्यामुळें त्याच्या शरीराच्या शिरा स्पष्टपणें दिसूं लागणें. **कोणेकानें शिरा फुगविणें** तो फार

रागावून ओरडूं किं० चरफडूं लागणें. **म्हैस, गाय, मानवी स्त्री इ० ना शिर फुटणें** त्यांच्या स्तनांतून दूध वाहूं लागणें. **घोड्याला ( किं० पोराला ) शिर फुटणें** तो जोरानें वाढूं लागणें. **घोड्याच्या शिरा मळणें** त्याचें अंग रगडून आणि चेपून त्याच्या शिरा सईल करणें,–त्याच्या श्रमाचा परिहार होण्यासाठीं.

**शीर स्त्री०, न०** नारळीची विणलेली अर्धी झावळी.

**शीर** [ **सं०** सिरस्; **हिं०** शीर ] **न०** डोकें. ॐ **शीर सलामत तर पगड्या पंचाऐंशी** उपभोगण्याचें सामर्थ्य अंगीं असल्यावर उपभोगांचे पदार्थ हावे तितके मिळूं शकतील. **शीरदळ न०** १ रक्तवाहिन्यांचा समुच्चय. २ डोकें किं० रक्तवाहिन्यांचें कोणतेंही स्थान. **टीप,**–' शीर ' नें घटित शब्द, वाक्प्रचार, इ० मागें ' शिर ' मध्यें पहा.

**शीर्ण** [ **सं०** ] **वि०** १ फुटलेलें; फाटलेलें; मोडलेलें; भग्न. २ सुकलेलें; कृश; रोड; वठलेलें ( गात्र, शरीर, झाड ). ३ गळलेला.

**शील** [ **अ०** सिलह् ] **स्त्री०** १ हत्यार. २ चिलखत. मागें ' शिला ' [ अ० ] मध्यें सामासिक शब्द पहा.

**शील** [ **सं०** ] **न०** १ स्वभाव. २ वर्तणूक. चरित्र. ३ सुस्वभाव; सद्वर्तन. ॐ **दयाशील वि०** दया आहे स्वभावांत ज्याच्या असा म्ह० दयाळू. **अध्ययनशील वि०** अभ्यासाकडे ओढा आहे ज्याचा असा; अभ्यासी. ॐ **सुशील वि०** चांगल्या स्वभावाचा. याच सरणीनें दुःशील, कुशील, दानशील, इ० चें अर्थ जाणावे. **शीलवान्, शीलवंत वि०** १ सुस्वभावी (माणूस). २ चांगल्या म्ह० शुद्ध अवलादीचा ( घोडा ). खालीं ' शीळवंत ' पहा.

**शींव** [ **सं०** सीमा ] **स्त्री०** गांव, किल्ला, इ० ची हद्द. **शिंवाण स्त्री०** ह्याच अर्थी. ॐ **कोणेकाला शिंवाणीं उभा न करणें** त्याच्या पासून दूर असणें; त्याचा संपर्क न होऊं देणें; त्याला टाळणें. **शींवपूजन न०** सीमान्तपूजन.

**शीस** [ **स०** शीर्ष ] **न०** भोपळी, पडवळी, तोंडली, इ० च्या फुलाच्या मागें फळाचें जें अगदीं बालदशेंतील गोटीच्या आकाराचें रूप तें. ॐ **शीसफूल न०** १ फुलाच्या मागें जें फळ धरतें तें. २ स्त्रियांचें एक शिरोभूषण. **शीसफूल, शीसफूली वि०** ज्याला फळें येतात असें झाड; उ० पोपईचें स्त्रीझाड. पोपईचें नरझाड शीसफुली नव्हे.

**शीळ** [ **सं०** शिला ] **स्त्री०** १ दगड; धोंडा. २ सपाट धोंडा,–पाटा, धुण्याचा धोंडा, स्नानाचा धोंडा, निसणा, इ०.

**शीळ** मागें ' शिऊळ ' पहा.

**शीळ, शील** [ **सं०** शील ] **न०** स्वभाव; वर्तनसरणी. मागें ' शील ' पहा.

**शीळ न०** समुद्र हटवून जमीन करावयाची असतां जो बांध घालतात त्याला ज्या प्रथम मध्यें खिंडी ठेविलेल्या असतात त्या प्रत्येक ( बांधणें, भरणें, बुजविणें ). ह्या खिंडी मागाहून बंद करण्यांत येतात. ह्या खिंडी बुजविण्याच्या आणि हा बांध अभग्न ठेवण्याच्या कामावर नेमलेल्या अधिकाऱ्याला ' शिळोत्तरा पाटील ' असें म्हणतात, आणि त्याचा जो हुद्दा, दर्जा, किं० अधिकार त्याला ' शिळोत्तरा पाटीलकी ' म्हणतात. ह्या बुजविलेल्या खिंडींच्या जागीं कांहीं विधि करून जो धोंडा पुरतात त्याला ' पाटील ' म्हणतात. नदीचें पाणी आडवून आसपासचा प्रदेश जलमय आणि सुपीक करण्यासाठीं जी भिंत बांधतात त्या भिंतींत पांणी वाहाण्याला जो मार्ग ठेविलेला असतो त्यालाही ' शील ' असेंच म्हणतात.

**शीळवंत पु०** जंगम लोकांचा एक भेद.

**शुक** [ **सं०** ] **पु०** १ पोपट; राघू. २ व्यासाचा पुत्र. ३ ( **लक्षणेनें** ) कडकडीत ब्रह्मचर्य पाळणारा पुरुष. ॐ **शुकनासिक वि०** राघूच्या चोंचीसारखें नाक आहे ज्याचें असा.

**शुका, शुक्का** [ **अ०** षुकाह् ] **पु०** लहान पत्र; चिठ्ठी.

**शुकी, शुका** [ **अ०** ] **पु०** राजाज्ञेचें पत्र; फर्मान.

**शुकी** [ **सं०** ] **स्त्री०** स्त्रीपोपट. **शुकनासिका स्त्री०** राघूच्या चोंचीसारखें नाक.

**शुक्र उ० वा अ०** मांजराला हाकून देतांना हा शब्द उच्चारतात.

**शुक्र वि०** निर्जन; ओसाड. **न०** ओसाडपणा; उ० त्या वाड्यांत आज शुक्र आहे. ॐ **कोणेकाला शुक्र करणें** ( **किं० म्हणणें** ) त्याला स्थल-

विशेषों येण्याला किं० संचरण्याला प्रतिबंध करणें; तूं कोण, कोठला, येथें कशाला येत आहेस, अशी त्याची चौकशी करणें. **तेथें तुला कोणी शुक्र करणार नाहीं** ( किं० **म्हणणार नाहीं** ) तुला तेथें जाण्याला किं० संचरण्याला कोणी अडथळा करणार नाहीं. **शुकशुकाट** न० निर्जनता; ओसाडपणा; उ० मला सर्व वाड्यांत शुकशुकाट दिसला.

**शुक्ति, शुक्तिका** [ सं० ] स्त्री० १ शिंप; शिंपला. २ मोत्याची शिंप. ३ शंख.

**शुक्र, शुकर** [ अ० षुक्र् ] पु० आभार मानणें. ॐ**शुक्र गुजार** वि० आभारी; कृतज्ञ. **शुक्र-गुजारी** स्त्री आभारप्रदर्शन (करणें ).

**शुक्र** [ सं० ] वि० १ तेजस्वी. २ शुभ्र; निर्मळ. पु० १ शुक्राचीं चांदणी; सूर्यमालेंतील बुधाच्या बाहेर आणि भूमीच्या आंत फिरणारा ग्रह. २ शुक्राचार्य,–दैत्यांचा गुरु. न० पुरुषाचें वीर्य किं० रेत. **शुक्रशिष्य** पु० दैत्य. **शुक्रवार** पु० गुरुवारच्या पुढचा आणि शनिवारच्या मागचा आठवड्याचा दिवस. **शुक्राचार्य** पु० १ दैत्यांचा गुरु. २ ज्याला एकच डोळा आहे आणि दुसरा फुटला आहे असा माणूस किं० प्राणी. **शुक्री** वि० शुक्राच्या रंगाचें( मोती इ०).

**शुक्ल** [सं०] वि० १ पांढरें. २ शुद्ध; निर्दोष; निर्मळ. ३ महिन्याचा चंद्रप्रकाशयुक्त अर्धा भाग,–ज्यांत चंद्र दिवसें दिवस वाढत असतो. पु० १ पांढरा रंग. २ महिन्याचा शुक्ल पक्ष. ३ केवळ ब्राह्मणा-पासूनच भिक्षा घेऊन चरितार्थ करणारा ब्राह्मण. अशा चरितार्थाला ' शुक्लवृत्ति ' स्त्री० म्हणतात. ४ सत्तावीस योगांतील चोविसावा. न० डोळ्याचा एक रोग. ॐ**शुक्लकाष्ट** न० लचांड; झेंगट; त्रासदा-यक लटांबर. खालीं ' शुक्लकाष्ट ' स्वतंत्र प्रती-कांत पहा. **शुक्लपक्ष** पु० १ ज्यांत चंद्र दिवसें दिवस वाढत असतो असा महिन्याचा अर्धा भाग. २ कोणेकाच्या वैभवाचा किं० उत्कर्षाचा काळ. ३ एका जातींतील कोणी मनुष्य कांहीं पातक करतो तेव्हां त्याला प्रायश्चित्त देऊन पंक्तिपावन करून घ्यावें असें म्हणणारा जो पक्ष तो शुक्लपक्ष आणि त्याला पंक्तिपावन करणें शक्य नाहीं किं० पंक्तिपावन करून घेऊं नये असें म्हणणारा तो ' कृष्णपक्ष '. **शुक्लाष्टमी** स्त्री० ज्येष्ठ महिन्याच्या शुक्लपक्षांतील अष्टमी ही तिथि. ह्या तिथीस शुक्लादेवीची पूजा केली जाते.

**शुक्लकाष्ट** [म० शुष्क(सुकलेलें)+काष्ट(लांकूड)] न० १ वाळलेलें लाकूड. २ पुरुषाचें जननेंद्रिय. ३ लचांड; झेंगट; त्रासदायक लटांबर; लोढणें. **टीप,**–कुटुंबांतील कांहीं लाजिरवाणी गोष्ट कोणा स्त्रीनें परक्यास सांगितली म्हणून तिच्या नव-ऱ्यानें तिला लाकडानें मारलें ह्या दंतकथेवरून हा वाक्प्रचार रूढ झाला. **टीप,**–' शुष्क ' बद्दल ' शुक्ल ' हा अपभ्रंश रूढ झाला आहे,

**शुचा** [ सं० ] स्त्री० १ दुःख. २ शोक.

**शुचि** [ सं० ] वि० १ निर्मळ. २ शुद्ध; निर्मळ. ३ पांढरें. ४ चकचकीत. ५ पवित्र. शुद्ध. ६ प्रामाणिक. ७ निर्दोष. पु० १ पांढरा रंग. २ ग्रीष्म ऋतु. **शुचिर्भूत** वि० १ स्नान करून शुद्ध किं० सोवळा झालेला. २ निष्पाप (माणूस); पवित्र आचरणाचा ( माणूस ). **शुचिष्मान्, शुचिस्मंत** वि० शुद्ध; निष्पाप; सदाचारसंपन्न.

**शुंट, शुंठ** वि० निरक्षर; ढ.

**शुंठि, शुंठी** स्त्री०, **शुंठ्य** न० [ सं० ] सुंठ,– एक तिखट वनस्पति.

**शुंडा** [सं०] स्त्री० हत्तीची सोंड. ॐ**शुंडादंड** पु० हत्तीची सोंड. **शुंडायंत्र** न० किमयागाराचें एक यंत्र.

**शुतुरनाल** [ फा० षुत्र्नाल् ] स्त्री० उंटाव-रून न्यावयाची लहानशी तोफ.

**शुदामद, शुद्दामत** [ फा० ] स्त्री० चाल; वहिवाट; शिरस्ता.

**शुद्ध** [ सं० ] वि० १ निर्मळ, मलरहित. २ ज्यांत दुसऱ्या कशाचीही भेसळ नाहीं असा; उ० हें शुद्ध तूप आहे ( ह्म० यांत चरबी इ० कांहीं विजातीय पदार्थ नाहीं). ३ पांढरें. ४ निर्दोष; निरपराध; उ० त्याचें वर्तन शुद्ध आहे अशी माझी खातरी आहे. ५ नीटनेटका; असावा तसा. ६ निष्पाप. ७ प्रामाणिक. ८ पवित्र झालेला किं० पवित्र केलेला; उ० तो प्रायश्चित्त घेऊन शुद्ध झाला; उ० त्याला प्रायश्चित्त देऊन हिंदू संघटनेनें शुद्ध केलें. ९ एकटा; केवळ; फक्त; उ० तो शुद्ध वैदिक आहे ( ह्म० तो नुसता भिक्षुकी आहे म्ह० त्याला व्याकरण,

मीमांसा, इ० कांहीं अवगत नाहीं ); उ० तूं शुद्ध गाढव आहेस; उ० ही शुद्ध लबाडी होय. १० अमिश्र; बिनमिसळीचा. ११ ज्यांतलि चुका काढून टाकल्या आहेत किं० दुरुस्त केल्या आहेत असा ( लेख इ० ); उ० माझा लेख त्यांनीं शुद्ध करून आपल्या मासिकांत छापिला. १२ अनिष्ट-रहित ( मुहूर्त, समय ). १३ जातीसंबंधाचा ( उपजातीच्या व्यावर्तकत्वें ); उ० चातुर्मास्यांत कांदा भक्षूं नये असा नियम केला म्हणजे तांबडा कांदा भक्षूं नये असें वेगळें सांगण्याचें कारण राहात नाहीं, कारण शुद्धाचा निषेध विशिष्टावर जातोच जातो. १४ महिन्याच्या ज्या पक्षांत ( ह्म० अर्ध्यांत ) चंद्राच्या कला वाढत जातात असा ( पक्ष ); उ०शुद्ध पक्ष.१५ विद्ध नव्हे अशी (तिथि).**टीप**—शुद्ध हा शब्द समासांत उत्तर पद असतां पुढील प्रमाणें संयुक्त शब्द होतात. प्रमाणशुद्ध ह्म० ज्याचे घटक भाग किं० अवयव योग्य प्रमाणांत आहेत असा ( चेहेरा, अंगाचा बांधा, चित्र, इ० ). पायाशुद्ध म्ह० ज्याची उभारणी किं० रचना भक्कम किं०निर्दोष आधारावर करण्यांत आली आहे अशी ( मसलत, संस्था, इ० ). शालाशुद्ध किं० साळसूद म्ह० योग्य सरणीनें ज्याचें शील बनलें आहे असा; साधा; प्रामाणिक. संप्रदायशुद्ध म्ह० संप्रदायाला अनुसरून असलेला. याच सरणीनें आचारशुद्ध, वळणशुद्ध, बांधेसूद ( बांधा+शुद्ध )इ० चे अर्थ जाणावे. ₰ **शुद्धाद्वैत** न० ( **वेदान्त** )शुद्ध म्ह० मायाविरहित अशा जीवब्रह्मांचें ऐक्य आहे असें मत.**शुद्धान्त** पु० १अंतःपुर.२राजाची स्त्री.**शुद्धकोटि** स्त्री० काटकोन त्रिकोणाची बाजू. **शुद्ध कल्याण** पु०(संगीतांत) एक राग.**शुद्ध पक्ष** पु०महिन्याचा शुक्लपक्ष,—ज्यांत चंद्राच्या कला दिवसादिवसानें वाढत जातात. **शुद्ध समाचार** पु० खालीं ' शुद्धि ' मध्यें पहा. **शुद्ध स्फटिक** पु० १ अत्यन्त निर्द्रव्य माणूस. २ अत्यन्त अशिक्षित किं० अडाणी माणूस. ३ राजा, चोर, इ० -नीं पूर्णपणें नागविलेला माणूस. **शुद्धमुख** वि० ज्याणें कपाळावर गंध लाविलेलें नाहीं असा.

**शुद्धि, शुद्ध** [ सं० शुद्धि] स्त्री० १ स्वच्छता. २ शुभ्रपणा. ३ पवित्रता. ४ पवित्र करणें. ५ (वैर) तृप्त करून घेणें; ( सूड ) घेणें ही क्रिया. ६ ( कर्ज ) वारणें किं० फेडणें. ७ शोध; तपास; हुडकणें; शोधण्याची क्रिया. ८ चैतन्य; देहभान; उ० त्याच्या डोक्यावर धोंडा पडतांच त्याची शुद्धि गेली. ९ ग्रंथ, भाषण, लेखन, इ० तील दोष, चुका, इ०काढून टाकणें. ₰ **शुद्धिपत्र** न०, **शुद्धिसूचा** स्त्री० ग्रंथांतील अशुद्ध शब्द इ० ज्यांत शुद्ध करून दाखविलेले असतात तें पान. **कोणेकानें शुद्धीवर येणें** त्याणें बेशुद्ध स्थितीतून किं० मूर्च्छेतून मुक्त होऊन देहभानावर येणें. **कोणेकाला शुद्धीवर आणणें** तोंडावर पाणी मारून किं० कांदा हुंगावयास देणें इ० अन्य उपायांनीं मूर्च्छित माणसाला चैतन्य प्राप्त करून देणें. **शुद्धिसमाचार** पु० कोणेकाची प्रकृति, सुस्थिति, दिनचर्या, इ० संबंधाची वार्ता किं० हकीगत(कळणें, कळविणें). **शुद्धबुद्ध** [ सं० शुद्धि+बुद्धि ] स्त्री० ए० व० १ चैतन्य; देहभान.२ सावधपणा; वस्तुस्थितीची जाणीव; ज्ञान. [ कुतरी.

**शुन, शुनक** [ सं० ] पु०कुतरा.**शुनी** स्त्री०

**शुनासीर, शुनाशीर** [ सं० ] पु० इंद्र,—देवांचा अधिपति.

**शुन्य** [ सं० ] वि० १ रिकामें. २ ओसाड. न० १ अभाव. २ अभावदर्शक चिन्ह ० हें.

**शुपका** पु० मागें ' शिपका ' पहा.

**शुंभ** [ सं० ] पु० १ दुर्गादेवीनें मारलेला एक दैत्य. २ ( **मराठींत** ) दगडोबा; बैलोबा; अडाणी माणूस.

**शुभ** [ सं० ] वि० १ तेजस्वी. २ सुंदर. ३ कल्याणकारक. न० १ सुख. २ कल्याण. ३ लग्न, मुंज, इ० मंगल कृत्य. पु० तेविसावा योग. **शुभा** स्त्री० १ पार्वती देवी. २ देवी हा स्वर्योग. ३ सर्पणाची गोवरी. ₰ **शुभंकर** वि० मंगळ; कल्याणप्रद. **शुभकर्म, शुभकार्य** न० लग्न, मुंज, इ० मंगल कृत्य.**शुभकृत्य** न० मैथुन.**शुभचिन्ह, शुभलक्षण** न० मनुष्य, घोडा, इ० च्या अंगावर जन्मजात जीं चिन्हें ( तीळ, भोंवरा, शिंबें, इ० ) असतात त्यांपैकीं कल्याण सुचविणारीं चिन्हें प्रत्येक.**शुभवार्ता** स्त्री०आनंदाची बातमी.

**शुभ्र** [ सं० ] वि० १ तेजस्वी; उज्ज्वल. २ पांढरें. **शुभ्रा** पु० रुपाया हें नाणें (भिक्षुकांच्या भाषेंत ). ❀ **शुभ्रांशु** पु० चंद्र.

**शुमार,सुमार** [ फा० षुमार् ] पु० १ अजमास. २ मोजदाद. ३ मितपणा; परिमित प्रमाण. पुढें ' सुमार ' पहा.

**शुरवात,सुरवात** [अ०षुरूअ] स्त्री० आरंभ; [प्रारंभ.

**शुरू, सुरू** [ अ० षरूअ ] वि० आरंभिलेलें.

**शुरू, सुरू** [ फा० सर्व् ] पु० एक झाड. हें झाड सरळ, उंच, आणि सडपातळ असून माथ्याकडे निमुळतें होत जातें. हें सदा हिरवेंगार असतें. ❀ **शुरूदार, सुरूदार** वि० सुरूच्या झाडाच्या आकाराचा म्ह०उभा,सरळ,आणि अग्राकडे निमुळता ( पदार्थ,-समई, गुलाबदाणी, खांब, इ० ).

**शुरू, शुरूखुरू** [ फा० सुर्खुरू-तांबड्या तोंडाचा म्ह० टवटवींत चेहेऱ्याचा] वि०निर्लज्ज; बेशरम. पुढें ' सुरूखुरू ' पहा.

**शुल्क** [ सं० ] पु०, न० १ जकात.२ नफा. ३ किंमत. ४ बयाणा; सचकार. ५ मुलीबद्दल वराकडून घेतलेलें द्रव्य. ६ अहेर. ७ स्त्रीधन.

**शुश्रूषक** [ सं० ] पु० सेवक.

**शुश्रूषण** न०,**शुश्रूषणा, शुश्रूषा** स्त्री० [सं०] १ ऐकण्याची इच्छा. २ उपासना. ३ आजारी माणूस इ० ची सेवा किं० चाकरी.

**शुषिर** [ सं० ] न० १ विवर; भोक; खळगा. २ मुरली इ० वाद्य.

**शुष्क** [ सं० ] वि० १ सुकलेलें. २कृश; रोड. ३ पोकळ; खोटा; उ० शुष्क सबब. ४ निरर्थक, निष्फळ; लाभरहित; उ० शुष्क वाटाघाट, शुष्क वाद. ❀ **शुष्क काष्ठ** न० १ वाळलेलें लाकूड. २ आपल्या पाठीस लागलेलें लचांड. मागें ' शुक्र ' मध्यें ' शुष्ककाष्ठ ' पहा. **शुष्काशुष्की** क्रि० वि० व्यर्थ; विनाकारण; उगीचच्या उगीच; लाभावांचून. **शुष्केष्टि** [ सं० शुष्क+इष्टि(यजन) ]स्त्री०१श्रावणी, लग्न,मुंज,इ० विधि आपल्याला करतां येतात किंवा नाहीं हें आजमावण्यासाठीं नवशिके भिक्षुक आपल्याच घरांत बसून ते विधि आणि त्यांचे मंत्र, तंत्र, इ० करून पाहातात तें कृत्य.२टीप.-मागें 'शून्य'पहा. आपल्या घरीं कोणी बडा माणूस यावयाचा असला तर नोकराचाकरांनीं कसें आणि कोठें उभें राहावें, कोणी कसे नमस्कार करावे, कसे पोशाख करावे, इ० लटुपुटीचा विधि पूर्वी करतात तो. ३ आगामी प्रसंगाची रंगाची तालीम ( सामान्यतः ). **शुष्कोपचार** पु० अ० व० १ अंतःकरणापासूनचा नव्हे असा सत्कार, भाषण,आश्वासन, आतिथ्य, इ०.

**शूक** [ सं० ] पु०,न० १ जव इ० चें कुसळ. २ कांटा. ३ नांगी. ४ टोक; अग्र; शेंडा. ❀ **शूककीट** पु० १ विंचू. २ घुला, सुरवंट. **शूकधान्य** न० कुंस असलेलें जव इ० धान्य.

**शूकर** [सं०] पु० रानडुकर. **शूकरी** स्त्री० रानडुकरी.

**शूद्र** [ सं० ] पु० हिंदूंच्या ज्या चार मोठ्या जाति त्यापैकीं चवथी जात किं० त्या जातीचा इसम. **शूद्रा** स्त्री० शूद्र जातीची कोणीही स्त्री. **शूद्री** स्त्री० कोणा शूद्र माणसाची पत्नी. **टीप**,-हिरा, मोती, भांग, सबजी, पिंपळ, इ० ज्या जाति सांगावयाच्या असतां ' शूद्र ' शब्द काळसर जातीचा वाचक म्हणून योजला जातो. मागें 'वैश्य' पहा. ❀**शूद्रदोक** [सं०शूद्र+उदक; म्ह०शूद्राच्या स्पर्शानें विटाळलेलें पाणी ] न० १ शूद्राच्या स्पर्शानें विटाळलेला कोणताही पदार्थ,-पाणी, वस्त्र, खाद्य, पात्र, इ०. २ शूद्र लोक समुच्चयानें. **शूद्रमुखी** वि० १ गंध न लाविलेला ( ब्राह्मण ). २ पाय पांढरे असून ज्याचें कपाळ तेजस्वी नाहीं असा ( घोडा ). **शूद्रलोक** वि० वर 'शूद्रदोक' दोन्ही अर्थी पहा.

**शून्य** [ सं० ] वि० १ रिकामें; ज्यांत कोणी किं० कांहीं नाहीं असें ( बारदान, घर, इ० ). २ निर्जन, ओसाड ( गांव, देश, इ० ). ३ खिन्न; निरुत्साह ( मनुष्य, अंतःकरण ). ४ रहित; हीन; उ० ज्ञानशून्य, विद्याशून्य. ५ ज्यांत अर्थ कांहीं नाहीं असें ( भाषण ). ६ अमंगळ. ७अविद्यमान; नसलेलें. न० १ पोकळी. २ आकाश. ३ अभाव. ४ (गणित) संख्या किं० रकम किं० परिमाण मांडतांना ज्या स्थानीं कांहीं नाहीं तें स्थान किं० त्या स्थानीं मांडतात तें चिन्ह ० हें; उ०

८०३ ह्या संख्येंत दर्श हें स्थान किं०तेथें जें चिन्ह केलें आहे तें;उ०५रुपये, ०आणे,२पै.येथें आण्याचें स्थान किं० तेथील चिन्ह. ५ अनुस्वार,–अक्षराच्या डोक्यावरचा. ६ निर्जन किं० ओसाड स्थान. ॐ**शून्यहृदय** वि० १ अमिष्ट. २ खिन्न; विषण्ण (मनुष्य).**शून्यमय** वि० निष्फळ,निरर्थक. **शून्यवाद** पु० १ शून्यापासून सृष्टि झाली अशा मताचा एक बौद्धांचा पंथ. अशा मताचा जो तो 'शून्यवादी'. २ कांहीं नाहीं म्ह० केवळ जो अभाव तेंच काय तें ब्रह्म असें मत. **शून्याकार** वि० रिकामा;ओका.**शून्यमनस्क** वि० चालू विषयाकडे ज्याचें लक्ष्य नाहीं असा; खिन्न; उद्विग्न; विषण्ण. **शून्या** स्त्री० वांझ स्त्री. **शून्यस्थानीं पडणें** निष्फळ होणें; फुकट जाणें.**शून्यलब्धि** स्त्री० भाज्यापेक्षां मोठ्या रकमेनें भागिलें असतां उत्तर शून्य येणें.

**शूर** [ सं० ] वि० १ धीट; लढाई, वाद, शिकार, इ०मध्यें न कचरणारा; लढण्यांत बाका. २ कोणतेंही काम धाडसानें, दृढनिश्चयानें, किं० नेटानें करणारा; कोणत्याही कामांत माघार न खाणारा. दानशूर म्ह० मोठा दाता. वादशूर म्ह० वादविवादांत पटाईत. रणशूर म्ह० समरांगणांवर पराक्रम करणारा. भोजनशूर म्ह० १ आपला आहार मोठा आहे अशी बढाई मारणारा. २मोठा खादाड. आरंभशूर म्ह० कामाला नुसती सुरवात करून काम टाकून देणारा. आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः म्ह० दक्षिणी लोक एकाद्या कामाला सुरवात करून ठेवण्यांत पटाईत असतात; तें काम शेवटास नेण्याची त्यांना धमक नसते; ते उत्साहानें काम आरंभतात पण पुढें ते कंटाळतात.

**शूर्प** [ सं०] न० सूप,–पाखडण्याचें साधनविशेष. ॐ **शूर्पकर्ण** पु० १ हत्ती. २ गणपति. **शूर्पनखा, शूर्पणखा** स्त्री० १ रावणाची बहीण,–जिचें नाक आणि कान हीं रामाच्या आज्ञेवरून लक्ष्मणानें कापिलीं. २ कोणीही हिडिस्त किं० भांडरी स्त्री.

**शूळ, शूल** [ सं० शूल ] पु०, न० १ अस्त्रविशेष; भाला इ० टोंकदार शस्त्र. २ शंकराचा त्रिशूळ. ३ लोखंडी खिळा. ४ वधासाठीं उभारलेला अणकुचीदार स्तंभ. ५ वेदना; तिडीक. ६ मस्तक, इ० दुखणें कायमचा पोट, हा रोग; उ० पोटशूळ, मस्तकशूळ. ७ संधिवात. ८ मांस भाजावयाची सळई. ९ नववा योग. १० (लाक्षणिक) मत्सराचा उद्रेक; उ० मला बढती मिळाली म्हणून गोविंदरावाच्या पोटांत शूळ उठला. टीप,–मराठींत'शूळ'बहुधा पु०योजतात. **त्रिशूल** (–ळ ) पु०, न० शंकराचें आयुध. **शूलधर, शूलपाणि, शूलभृत्** पु० शंकर.

**शृंखला** (–ळा ) [ सं० शृंखला ] स्त्री० सांखळी.

**शृंग** [ सं० ] न० १ बैल, रेडा, गाय, इ०च्या डोक्यावर जे अस्थिरूप अवयव असतात ते प्रत्येक; शिंग. २ वाजवावयाचें शृंगाकार जें धातूचें साधन करतात तें. ३ पर्वत इ० चें अग्र किं० शिखर. ४ चंद्राची कोर. ५ कोणत्याही पदार्थाचें टोक. ६ पिचकारी; कारंजें. ७ (लाक्षणिक ) कुरापत; भांडणाचें मूळ. ॐ **शृंगऋषि** पु० एक ऋषि. अवर्षणाचे वर्षीं ह्या ऋषीची मृत्तिकामय आकृति पाऊस पडावा म्हणून पूजितात.**शृंगवेर** न० गंगेच्या उत्तर तीरावरील एक गांव,–हल्लींचें मीरझापूर. राम वनवासास गेला तेव्हां तेथें गुह हा निषादाधिपति राज्य करीत होता. **शृंगग्राहिका** स्त्री० समुदायाचें समुदायत्वें करूनच ग्रहण न करतां समुदायगत व्यक्तींचें प्रत्येकीं पृथक् पृथक् ग्रहण करावें असा जो समुदायाच्या उपादानाचा प्रकार तो. **शृंगी** [ सं० शृंगिन् ] वि० शिंगें ज्याला आहेत असा प्राणी ( गाय, बैल, इ० ). पु० १ पर्वत. २ बैल. ३ शंकराचा नंदी. ४ मेंढा. **शृंगिणी** स्त्री० गाय.

**शृंगार** [ सं० ] पु० (साहित्य)१ नवरसांपैकीं एक. 'अद्भुत' मध्यें हे नऊ रस पहा. स्त्रीपुरुषाचें प्रेम,त्याचा संयोग,वियोग,इ०च्या वर्णनांत शृंगाररस असतो. २ स्त्रीनें नानाविध चेष्टांनीं केलेलें प्रेमाचें आविष्करण. ३ नटणें; सजणें. ४ मैथुन. ५ हत्तीची सोंड रंगविणें. ॐ **शृंगारगळेसरी** स्त्री० स्त्रियांचे गळ्यांत घालावयाचें एक भूषण. **शृंगार चेष्टा** स्त्री० कामविकाराच्या उत्प-

त्यामुळें जे नानाविध हावभाव पुरुष किं० स्त्रिया एकमेकांपुढें करतात ते. शृंगारपट्टी स्त्री० घराच्या पुढच्या दाराच्या चौकटीच्या माथ्यावरील जी गणेशपट्टी तिच्यावरची नक्षीदार पट्टी. मागें ' गणेश ' मध्यें ' गणेश-पट्टी ' पहा. शृंगारमरालिका, शृंगारमराळी स्त्री० गोंडस आणि सुंदर स्त्री. शृंगारलज्जा स्त्री० स्त्रीनें पुरुषाच्या संनिधीस असतांना दाखविलेली ढोंगीपणाची लाज. शृंगारी वि० १ शृंगार रस वठविण्यांत किं०वर्णिण्यांत प्रवीण(शाहीर). २ शृंगाररस ज्याला फार आवडतो तो. ३ शृंगाररसानें परिप्लुत असें ( काव्य, श्लोक, नाटक, इ०). ४ घराच्या बांधणीचा एक प्रकार आहे त्या प्रकारचें बांधलेलें ( घर ).

**शृंगारणें** [ म० शृंगार ] स० क्रि० सजविणें; नटाविणें; सुशोभित करणें.

**शृगाल** [ सं० ] पु० १ कोल्हा. २ ठग; लबाड माणूस. शृगाली स्त्री०कोल्ह्याच्या जातीची स्त्री.

**शें** [ सं० शत; हिं० से ] वि० शंभर. याचा उपयोग संख्यावाचक विशेषणापुढें होतो; उ० एकशें, सव्वाशें, दीडशें, पाचशें, इ०. ॐ शेंसवाशें वि० सुमारें शंभर आणि सवाशें ह्यांच्या इतकें. ह्याच सरणीनें ' शेदीडशें, ' शेदोनशें ' चे अर्थ जाणावे.

**शेऊर** स्त्री० एक झाड.

**शेंएंशी** वि० ' शांयशी ' चें गांवढळ रूप.

**शेक** [ हिं० ] पु० १ अग्नीची धग किं० उष्णता. २ दुखरें गात्र गरम पाण्यानें किं० तापलेल्या गोळ्यानें उबावणें. ३ थंडीच्या निवारणार्थ आग्नि, शेकोटी, इ० ची ऊब किं०उष्णता( घेणें ). न० दुसऱ्याला आपलें जनावर नांगरणें इ० कामासाठीं उसनें दिलें असतां मोबदला जें द्रव्यादि घेतलें जातें तें. ॐ शेकशेगडी स्त्री० ए० व० बाळंतिणीला शेक देणें, तिचें अंग चोळणें, इ० उपचार समुच्चयानें.

**शेकचिल्ली, शेखचिल्ली** [ फा० शेख्=साधु; चिला=उपोषण आणि ध्यान ] पु० १ तपस्वी; अवलिया. २कोणाचा वचक न बाळगतां स्वताच्या लहरी प्रमाणें वागणारा माणूस.

**शेकट, शेगट, शेवगा, शेगवा** पु० एक झाड. याच्या शेंगांचे तुकडे कढी, पिठलें, इ० त घालतात. ॐ शेक (-ग-) टवणी न० शेवग्याच्या शेंगा किं० पाला यांचें करतात तें कालवण किं० सार.

**शेकडा** [ सं० शत; हिं० सेकडा ] पु० शंभरांचा समुच्चय. क्रि० वि० प्रत्येक शंभरास ( अमुक किंमत, अमुक व्याज, इ० ). ' दर शेकडा ' ह्याच अर्थी. ॐ शेकडों, शेकडोंशें क्रि० वि० कित्येक शेकड्यांनीं; अनेक शेकड्यांच्या रूपांत. शेकडों, शेकडोंशें वि० कित्येक किं० अनेक शेकड्यांनी मोजतां येण्याइतके.

**शेकडु** वि० किंचित् कडू(कारलें,औषध,इ०).

**शेकणें** [म० शेक; हिं० शेकना] स०क्रि० १ ( पदार्थ, गात्र, इ० ) सूर्याचें ऊन्ह, अग्नीची उष्णता, ऊन्ह पाण्यांत भिजविलेलें फडकें, इ० च्या योगानें कढत किं० उष्ण करणें. २ दुखरा डोळा, गात्र, गळूं, इ० पाण्याच्या वाफेनें किं० अन्य प्रकारें उबविणें किं० तप्त करणें,—आराम वाटण्यासाठीं. ३(व्यापार, धंदा, मसलत, उपदेश, इ० नीं ) कोणेकाची हानि करणें किं० कोणेकाला चाट बसविणें; उ० ह्या साबणाच्या धंद्यानें मला शंभर रुपयांस शेकणें. ४ (तव्यावर भाजलेली भाकरी, चपाती, इ० ) निखाऱ्याच्या प्रत्यक्ष उष्णतेनें पूर्णपणें भाजणें. अ० क्रि० १ तापणें; तप्त होणें. २ ( डोळा किं० शरीराचा दुखरा भाग) वाफ, ऊन्ह पाण्यांत भिजविलेलें फडकें,इ०नीं योग्य तितक्या प्रमाणांत उबावला जाणें. ३हानिकारक होणें. ॐ कोणेकाच्या अंगावर(किं० डोक्यावर)एकाद्या कारभाराची समिध शेकणें त्या कारभारामुळें त्याचें नुकसान होणें, किं० त्यामुळें त्याला चट्टा बसणें. **माझी मसलत माझ्याच अंगावर शेकली** तिच्यामुळें मला स्वतालाच चट्टा बसला किं० माझेंच नुकसान झालें. **रामूची संगत धरलीस तर ती तुझ्यावर शेकेल** त्याच्या संगतीमुळें तुझी मानखंडना होईल किं० अन्य कांहीं प्रकारें तुला त्रास होईल. **मी मधुकररावाला जामीन राहिलों पण ती जामिनकी मजवर शेकली** मला त्याचेबद्दल सारे पैसे भरावे लागले. लक्ष-

**कार्यांत सोंवळ्या ओंवळ्याची समिधच शेकलेली असते** त्या वेळीं सोंवळ्या ओंवळ्याकडे विशेषसें लक्ष्य देण्यांत येत नाहीं. **टीप,**–ज्या गृहस्थानें स्मार्ताग्नि ठेविला आहे त्याला त्यांत रोज यथाविधि आहुति द्याव्या लागतात. परंतु प्रवासादि कांहीं अडचण पुढें यावयाची असल्यास तो आपल्या स्मार्ताग्निवर एक मंत्र म्हणून एक समिध शेकून ठेवतो. मग अडचण दूर झाल्यावर कोणत्याही अग्नीवर ही समिध मंत्रपूर्वक अर्पण करतो. याचे योगें त्याचा स्मार्ताग्नि पुन्हा सिद्ध होतो आणि ह्या स्मार्ताग्नींत त्याला नेहमींप्रमाणें आहुति देतां येतात. समिध स्मार्ताग्नीवर शेकून घेतली म्हणजे त्या अग्नीचें वीर्य आणि पावित्र्य त्या समिधेच्या ठायीं येतें. समिध शेकणें ह्या विधीमध्यें अग्नीचें वीर्य आणि पावित्र्य त्यांतून काढून घेतलें जातें इतकाच अर्थ वरील सर्व वाक्प्रचारांत आधारभूत झाला आहे. कांहींतून ' समिध ' हा शब्दही गळून गेला आहे.

**शेकाटणें** [ म० ' शेकणें ' चें एक रूप ] स० क्रि० शेगडी,चूल,इ०च्या जवळ किं०उन्हांत बसून (अंग) तापवून घेणें.

**शेकाटा** [ म० शेकाटणें ] पु० शेगडी, चूल, इ० च्या जवळ बसून किं० उन्हांत बसून अंग तापवून घेणें ही क्रिया किं० असा घेतलेला ताप ( घेणें ).

**शेकाटा** [ म०शेकट ] पु०१ शेकटाच्या शेंगा, अगस्त्याचीं फुलें,इ०पिवळटून तोडून काढण्याच्या उपयोगाचा आणि टोकाला लोखंडाचा आंकडा असलेला लांब बांबू. २ कोणत्याही कामासाठीं योजावयाचा लांब बांबू ह्याच अर्थी ' शेकाटी ' स्त्री० असाही शब्द आहे.

**शेकाटी** [ म० शेकणें ] स्त्री० गवत, पानें, काटक्याकुटक्या, इ० ची शेकण्यासाठीं पेटविलेली रास.

**शेकार** पु० सूर्याचें उन्ह,वारा,पाऊस,इ० च्या निवारणार्थ घराच्या माथ्यावर घालावयाचें किं० घातलेलें गवत, झावळ्या, इ० समुच्चयानें.

**शेकारणी** [ म० शेकारणें ] स्त्री० पर्जन्य, सूर्याचें उन्ह, वारा, इ० च्या निवारणार्थ घरावर गवत, झावळ्या, इ० पसरण्याची क्रिया.

**शेकारणें** [ म० शेकार ] स० क्रि० सूर्याचें ऊन, वारा, पाऊस, इ० च्या निवारणार्थ ( घरावर ) गवत, झावळ्या, इ० पसरणें.

**शेकावणें** [ म० शेकणें ] अ० क्रि० १ होरपळलें जाणें; तापणें. २ हानि पावणें; नुकसानीस पात्र होणें; उ० त्या कारभारांत मी शंभर रुपयांस शेकावलों.

**शेकुटी, शेकोटी** [ म० शेकणें ] स्त्री० काटक्याकुटक्या, पानें, इ० पेटवून शेकावयासाठीं केलेली रास.

**शेख** [ अ० शैख् ] पु० पीर; वृद्ध; साधू. **शेखी** स्त्री० बढाई; प्रौढी. **शेखी शोखी** स्त्री० गर्वाचें वर्तन. [प्रतीक पहा.

**शेख चिल्ली** पु० मागें ' शेकचिल्ली ' स्वतंत्र

**शेखदार** [ फा० ] पु० कमावीसदाराच्या हाताखालचा कारकून गांवावर नेमिलेला असतो तो. त्याचा जो हुद्दा किं० अधिकार त्याला ' शेखदारी ' म्हणतात.

**शेखर** [ सं० ] पु० १ तुरा. २ डोक्यावर शोभेसाठीं घालतात तो गजरा इ०. ३ पर्वतादिकांचा माथा किं० शिखर. ४ कोणत्याही समुदायांत श्रेष्ठ ( माणूस, पदार्थ ).

**शेखी** [ फा० शैखी ] स्त्री० बढाई, ऐट, श्रेष्ठपणाचा गर्व ( मिरविणें, दाखविणें, करणें,इ० ).

**शेखीं** [ म० ' शिखरीं ' चें तोकडें रूप ] क्रि०वि० अंतीं; शेवटीं; परिणामीं; अखेरीस.

**शेंग** स्त्री० तूर, शेवगा, अगस्ता, इ० झाडांचें लांबोळ्या आकाराचें आणि आंत बीजें असलेलें फळ.

**शेंगट** पु०, न० शेवगा किं० शेगवा नांवाचें झाड. मागें ' शेकट ' पहा. ' शेगटवणी ' मागें ' शेकट ' मध्यें ' शेकटवणी ' पहा.

**शेगडी** स्त्री० शेक घेण्याच्या उपयोगाचें किं० पदार्थ भाजणें, तापविणें, शिजविणें, इ० च्या उपयोगाचें पात्रविशेष.

**शेगाडा** पु०, **शेगाडी** स्त्री० लांब आणि जाडी वेळू; वांसा.

**शेंगोळी** स्त्री०,**शेंगोळें** न०डाळीच्या पिठाचा तोंडीं लावण्यासाठीं करतात तो पदार्थविशेष.

**शेंघ** वर ' शेंग ' पहा.

**शेचाळ, शेताळ, शेचाळीस, शेताळीस,** [ म० सहा+चाळीस ] वि० चाळिसांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**शेज** [ सं० शय्या ] स्त्री० १ निजावयासाठीं भूमि इ० वर करतात तें वस्त्रादींचें आस्तरण. २ मुंजा मुलगा, नवरा मुलगा, नवरी मुलगी, इ० च्या कपाळावर गंध किं० कालविलेली पिंजर इ० चा लेप अक्षता चिकटावण्यासाठीं करतात तो ( करणें, लावणें ). ३ मोहरमाच्या सणांत मुसलमान लोक मखराच्या आकाराची करतात ती रचना. स्त्री०, न० रांग; पंक्ति; अनुक्रम. ॐ **शेज आरती, शेजारती** स्त्री० रात्रीं देव निजण्यासाठीं शय्येवर आडवे झाले असें कल्पून भक्तजन करतात ती आरती. **घोड्यानें शेजेस येणें** त्यानें निजण्यासाठीं जमनीवर आरामांत पडणें. **कांहीं काम शेजेस लागणें** तें सुरळीतपणें चालू लागणें. **माणसें इ० ची शेज लागणें** एकामागून दुसरा, दुसऱ्या मागून तिसरा, अशा रीतीनें त्यांनीं क्रमवार उभें राहणें किं० चालणें.

**शेजरें** न० १ बीजें पेरावयासाठीं बाजूस काढलेलीं कणसें बांधून ठेवण्यासाठीं केलेली गवताची लांबोडी गुंडाळी. २ खळ्यावर झोडपून काढलेल्या दाण्यांपैकीं बीजें म्हणून दाणे बाजूस काढण्यासाठीं केलेलें असतें जें लहान खळें तें.

**शेजा** [ म० सज्जा ] पु० दारावर किं० घराच्या माथ्यावर जी लहानशी खोली करतात ती.

**शेजार** [ म० शेज=रांग ] पु० सांनिध्य किं० संन्निधीचे लोक. ॐ **शेजारी** पु० संन्निधीस असलेला किं० राहणारा. **शेजारीण, शेजी** स्त्री० शेजारी राहणारी स्त्री; संन्निधीस असलेली स्त्री. **शेजारपाजार** पु० ए० व० १ शेजारचे लोक, घरें, इ० समुच्चयानें.

**शेजुटणें** [ म० शेज ] न० लग्नांत विड्या तोडणें, सुपाऱ्या लपविणें, नांवें घेणें, इ० पोरखेळ समुच्चयानें. [ इ० पहा.

**शेझार, शेझारी** इ० वर ' शेजार, '' शेजारी'

**शेट** [ सं० श्रेष्ठिन्=व्यापारी, कारागारि, इ० चा मुख्य ] पु० १ सोनार, कासार, इ० जातीचा कोणीही पुरुष किं० त्यांच्या नांवापुढें योजावयाचा शब्द; उ० गोविंदशेट इ०. २ पेढीवाला, सावकार. **शेटजी** पु० कोणी व्यापारी, कारागीर, इ० किं० त्यांच्या नांवापुढें बहुमानानें लावावयाचा शब्द; उ० दामू शेटजी. **शेटी** पु० कोणीही सावकार, पेढीवाला, इ०. **शेटशाई** स्त्री० डौल; मिजास ( करणें, मिरविणें, लावणें, इ० ). **शेटसावकार** पु० अ० व० श्रीमंतलोक, सावकार, पेढीवाले, व्यापारी, इ०. **शेटाई** स्त्री० शेटजीची मिजास ( निंदेंत किं० उपहासांत ). **शेटाणी** स्त्री० शेटजीची पत्नी. **शेटशाई** स्त्री० एक प्रकारची मोहोर. **शेट्या** पु० पेठ, बंदर, इ० व्यापाराच्या ठिकाणीं वजनें, मापें, इ० तपासणारा अमलदार.

**शेठ, शेठजी, शेठाणी,** इ० वर ' शेट, ' ' शेटजी, '' शेटाणी, ' इ० पहा.

**शेड** स्त्री० १ भोपळा, कलिंगड, फणस, इ० मोठ्या फळाची फाक. २ माड, सुरमाड, इ० च्या खोडांत जे तंतु असतात ते प्रत्येक. ३ वेली इ० च्या खोडाची लांब लचक साल,–जी मोळ्या, भाऱ्या, इ० बांधण्यासाठीं योजतात.

**शेडगांव पेडगांव** न० वाद, तंटा, कलह, इ० च्या प्रसंगीं चार चौघांनीं एकत्र जमून तात्पुरता केलेला निकाल किं० उभय पक्षांत घडवून आणिलेला सलोखा.

**शेंडफळ** न० खालीं ' शेंडा ' मध्यें पहा.

**शेडमाती** स्त्री० एक प्रकारची पिवळसर माती. खालीं ' शेडू ' पहा.

**शेडा** पु० १ लांबलचक आणि मजबूत दोरी –गलबत इ० तून जड सामान शेंदून वर घेणें किं० खालीं सोडणें इ० च्या उपयोगाची. २ कोणत्याही कामीं योजावयाची दोरी. ३ घड्याळ इ० कोट, जाकीट, इ० ला आडकावण्याची सोनें, चांदी, इ० धातूची सांखळी, गोफ, इ०. ४ गवत, लाकडें, इ० चा गठ्ठा बांधावयासाठीं काढलेली झाड, वेली, इ० ची साल.

**शेडा** पु० १ डुकर, रेडा, इ० चा काळसर पिवळट रंग. २ अंधक किं० अपुऱ्या प्रकाशामुळें किं० डोळ्याच्या अशक्तपणामुळें पदार्थाचें जें अस्पष्ट रूप दिसतें तें.

**शेंडा** [सं०शिखंड] पु०झाड,वांसा,बांबू,पान, इ०चें टोक.*शेंडागोंडा पु० ए० व० भाजीच्या उपयोगासाठीं तोडलेलीं पानें, फुलें, शेंगा, इ० समुच्चयानें; उ० तूं मळ्यांत गेला होतास तेथून कांहीं शेंडागोंडा कां नाहीं आणलास? **शेंड्यागोंड्यास येणें** १ (जोंधळा, बाजरी, इ० च्या ताटांनीं) कणसें उत्पन्न करण्याच्या स्थितीस येणें. २(कोणत्याही कार्याची किं० प्रयत्नाची) फलनिष्पत्ति बहुतेक पूर्ण झालेली असणें. **शेंडाबुडखा, शेंडामुंधा, शेंडाबुंधा** पु० ए० व० १ गोष्ट, वृत्तान्त, इ० चा सुरवातीचा कांहीं भाग आणि कांहीं शेवटचा भाग; अर्धवट किं० अपूर्ण स्वरूपांत ऐकिलेली किं० पाहिलेली हकीगत, गोष्ट, इ०. २ कांहीं गोष्टीची इत्थंभूत किं० तपशीलवार हकीगत; उ० त्या भांडणाचा शेंडाबुडखा मला सगळा ठाऊक आहे. **शेंडा बुडखा करणें** तुळई इ० साठीं झाडाच्या खोडाचा किं० फांदीचा हावा असेल तितका भाग राखून पुढचा भाग तोडून टाकणें. **शेंडा मोरा** पु० मुलाच्या टाळूवरचे केश,—जे कपाळावर लोंबतात म्हणून त्यांची गांठ मारतात. शेंडा मोरा बांधणें म्ह० ह्या केशांस गांठ देणें. शेंडामोरा सुटणें म्ह० ही गांठ सुटून केश कपाळावर येणें. **शेंडफळ, शेंडेफळ** [ म० शेंडा+फळ]न० १ भोपळा, काकडी, पडवळ, इ०चा बार सरल्यावर शेवटा खालीं येतात जीं फळें तीं प्रत्येक. २ ऋतु सरतां सरतां येतात तीं फळें प्रत्येक. ३ म्हातारपणचें अपत्य. ४झाडाच्या अगदीं माथ्याकडचें फळ. **शेंड्यावर बसून झाड तोडणें** ज्यांत आपलें धडधडीत नुकसान होणार तें करणें. **शेंडे छाट** [ म०शेंडा+छाटणें] पु० झाडांचे शेंडे किं० अग्रें तोडणें. **शेंडें धान्य** [ म० शेंडा+धान्य ] न० बाजरी इ० कित्येक धान्यांच्या रोपांना पहिलें पीक काढून घेतल्यानंतर पुनः जीं कणसें येतात त्यांतलि धान्य.

**शेडी, शेडू** स्त्री०एक प्रकारची पांढरी पिसळर माती; शाडू.

**शेंडी** [ सं० शिखंड ] स्त्री० १ हिंदू लोक डोक्यावर मध्यभागीं ठेवितात ते केश समुच्चयानें. २ मोर, कोंबडा, इ० पक्ष्यांच्या डोक्यावरील तुरा. ३ शेंडेंनक्षत्राचें शेपूट. ४ घोड्याच्या कपाळावरचे दोन कानांच्या मधले केश समुच्चयानें. ५ सोललेल्या नारळाच्या देठाकडच्या भागास जो काथ्याच्या तंतूचा समुदाय असतो तो. ६ तेल्याचा घाणा, उसाचा चरक, इ० च्या लाटावरील फळी किं० तक्ता. * **शेंडी फुटणें** १ एकाद्या कामांतून दुसरें एकादें बारीकसें नवीन काम निघणें. २ एकाद्या मोठ्या खर्चाबरोबर दुसरा एकादा लहानसा खर्च करण्याची जरूरी येणें. **एखाद्याची शेंडी सापडणें** ( किं० **हातांत येणें** )त्याला आपल्या कह्यांत आणण्याचें साधन आपणाला मिळणें. **एखाद्याची शेंडी गुंतणें** तो अडकलेल्या स्थितींत असणें. **एखाद्याच्या शेंडीला फुलें बांधणें** त्याला नटवून, सजवून, किं० त्याची खुशामत करून त्यांचें मन आपल्याला अनुकूल करून घेणें. **शेंडी तुटो कीं पारंबी तुटो** कसलाही प्रसंग आला तरी; कितीही अडचणी किं० संकटें आलीं तरी. **खर्चास शेंडी फुटणें** पूर्वीच्या आजमासापेक्षां खर्चाच्या अधिक बाबी किं०कलमें उत्पन्न होणें. **शेंडीस गांठी देणें** आपला गुरु, वरिष्ठ, उपकारकर्ता किं० त्राता ह्याचेवर कृतघ्नपणानें उठणें. **शेंडेपालवी शेंडी पालवी** स्त्री० १ अंबाडी, मेथी, कोथिंबीर, इ० झाडाच्या माथ्याकडचीं पानें, पल्लव, इ० ( येणें, तोडणें, फुटणें ). २म्हातारपणचें अपत्य. **शेंडी पालवीचें बोलणें**(किं०**करणें**)वरवरचें,केवळ दिखाऊ, मनापासूनचें नव्हे असें बोलणें ( किं० करणें ). **शेंडीशेंगी** स्त्री० घोड्याचें एक कुलक्षण,—घोड्याच्या कपाळावरील लांब केशांच्या खालचा भोंवरा. वि० असा भोंवरा ज्याच्या कपाळावर आहे असा( घोडा). **शेंडीधर्म** पु० हिंदूधर्म. **शेंडी शेपटी** स्त्री० ए० व० १ झाडाचा अगदीं वरचा भाग ( फळें इ० तोडण्याच्या संबंधांत बोलतांना ); उ० शेंडीं शेपटीकडचे आंबे मला तोडतां आले नाहींत, ते तुम्ही तोडा. २ बहुतेक संपत आलेल्या कामाचा अद्याप न संपलेला भाग ( राहणें ). **शेंडेनक्षत्र** [ म० शेंडी+नक्षत्र ] न० धूमकेतु.

**शेडू** स्त्री०एक प्रकारची पिवळसर माती;शाडू.

**शेडें** न० १ गवताची एक जात. २ भाताच्या

शेतावर पडतो तो एक रोग.

**शेंडेसलाम** पु० रस्त्यांत आढळलेल्या ओळखीच्या माणसाला नुसता केलेला म्ह० त्याची विचारपूस न करतां केलेला सलाम.

**शेण** न० १ गाय, म्हैस, बैल, इ० ची विष्ठा. २ (**लाक्षणिक**) फळ, पान, इ० चा कुजलेला किं० सडलेला भाग; कुजलेलें किं० सडलेलें फळ, पान, इ०. ३ (**लाक्षणिक**) कोणत्याही वस्तूची नासाडी किं० नासलेपणाची स्थिति. **स्त्री०** गोवरी. ॐ **शेण खाणें** चुकी करणें; जें करूं नये तें करणें किं० बोलणें. **शेणाचा दिवा लावणें** दिवाळें काढणें. **टीप**,–ज्याणें दिवाळें काढलें आहे तो खरोखरींच शेणाची पणती करून तींत तेलवात घालून बैठकीच्या जागीं दिवा लावतो. **शेण पडलें असतां माती घेऊन उठतें** १ आपल्यावर आलेला ठपका न्यायाधीशाच्या कचेरींत जरी पूर्णपणें नाशाबीत झाला, तरी कांहीं थोडी तरी बेआबरू होतेच होते. २ वाईट माणसाच्या संगतींत असतां आपण कितीही जपून वागलों तरी आपणास थोडा तरी चाट बसतोच बसतो. **शेणाचा पोहो** पु० १ गायी, म्हशी, इ० च्या शेणाची रास. २ (**लाक्षणिक**) सुस्त आणि आळशी माणूस; ज्याच्या अंगांत यत्किंचित् सुद्धां चपळाई किं० नल्खपणा नाहीं असा माणूस. **शेणामेणाचा** वि० अशक्त, कमकुवत,–जणों काय शेणानें आणि मेणानें बनविलेला. **शेणकई, शेणकाई, शेणकी स्त्री०** १ गुरांचें शेण गोवऱ्यासाठीं साठवून ठेवण्याचा खळगा. २ गुरांच्या शेणाची रास किं० ढीग. **शेणकला, शेणखळा पु०** १ अंगणांत सडा टाकावयासाठीं पाण्यांत कालवून पातळ केलेलें शेण. २ अशा शेणाच्या पाण्याचा सडा. **शेणकुंडा पु०** गोठ्यांतील शेण काढणें, गोठा साफ करणें, दळणकांडण, इ० रूप जें घरगुती काम तें. **शेणकूर, शेणकूट, शेणखंड, शेणखुंड न०** वाळलेलें शेण. **शेणकोंडा पु०** शेण आणि भात इ० चीं टरफलें यांचें गोवऱ्या लावण्यासाठीं केलेलें मिश्रण. **शेणखळी, शेणखाई, शेणगाईर स्त्री०** शेण साठविण्यासाठीं केलेला खळगा. **शेणखुंडी स्त्री०** वाळलेलें शेण. **शेणगोठा पु०** गोठ्यांतील शेण काढून गोठा साफ करणें इ० रूप कामें समुच्चयानें (करणें). **शेणगोळा पु०** शेणाचा गोळा,–खरकट्या जागेवर फिरवायासाठीं घेतलेला. **शेणगोळे घालणें** अव्यवस्थितपणें केलेल्या कामांतील दोष काढून टाकून त्या कामाला नीटनेटकेपणा आणणें. **शेणथाप्या, शेण थापणारा पु०** १ कुचकामाचा माणूस. २ षंढ, नपुंसक. **शेणप पु०** १ शेणाचा सडा (घालणें). २ नासकीं कुचकीं फळें समुच्चयानें. **शेणपा, शेणपोह, शेणपोहो, शेणपोव** १ शेणाचा पोहो,–गाय, म्हैस, इ० नीं एका वेळीं विसर्जिलेला. २ आळशी, सुस्त, किं० कर्तृत्वशून्य माणूस. **शेणपाणी न०** गोठा झाडणें, घरांत झाडलोट करणें, सडा घालणें, इ० रूप घरांतील कामें समुच्चयानें (करणें). **शेणपूजा, शेणमार स्त्री०** कोणा माणसावर शेण मारून त्याची केलेली अप्रतिष्ठा .(करणें). **शेणवड स्त्री०** होळीच्या दुसऱ्या दिवशीं शेणाच्या राशींत मुलें नाचतात ती रास. **शेणवणी न०** सडा घालण्यासाठीं पुष्कळ पाण्यांत थोडेंसें शेण कालवून तयार केलेलें पाणी. **शेणसडा पु०** १ शेण ज्यांत कालविलें आहे अशा पाण्याचा अंगण इ० वर केलेला सडा. २ (**लाक्षणिक**) कुजलेलीं फळें, फुलें, इ० चा समुदाय. ३ कोणा धनिकानें मंगल प्रसंगीं भिकाऱ्यांना औदार्यानें दिलेले पैसे, फळें, इ० ची खैरात. ४ युद्धभूमीवर जागोजाग मरून पडलेल्या वीरांचा खच. **शेणसाऊळ, शेणसावूळ स्त्री०** पावसाळ्याच्या प्रारंभीं पोफळीच्या बुडाशीं घालतात तें शेणाचें खत. **शेणसूप न०** गोठ्यांतील शेण गोळा करण्याचें सूप किं० सुपाच्या आकाराचें पात्र. **शेणामेणाचा वि०** अशक्त; निर्वीर्य, लेचापेचा, कमकुवत (माणूस, पशु, पदार्थ). **शेणामेणालोखंडाचा वि०** प्रथम पोकळ आणि निष्फळ असा दिसणारा पण पुढें जड, जोखमीचा, आणि फायदेशीर असा (धंदा, व्यवहार इ०). २ कांहीं भागीं अशक्त आणि कांहीं भागीं मजबूत असें (घर, पदार्थ, इ०). **शेणारा पु०** शेण, माती, यांच्या मिश्रणाच्या थरानें सुरक्षित करून ठेविलेली गोवऱ्यांची रास. **शेणी स्त्री०** गोवरी. **शेण्या पु०** गाय, म्हैस, इ० ची एका वेळची विष्ठा. **शेण्या डोळा**

पु० ए० व०,**शेणे डोळे** पु०अ०व०डोळे येणें ह्या विकृतींत ज्यांतून पू आलेला आहे किं० पू येतो असा डोळा किं० असे डोळे. ह्या विकृतींत डोळ्यांना कंड सुटते. मागें ' काटे डोळे ' पहा.

**शेणई** पु० महाराष्ट्रीय ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.पुढें'शेणवी'पहा.

ꕥ **शेणखुंड, शेणगंड** पु० शेणवी ( तुच्छतेंत ).

**शेणगा, शेणगी** पु० हवाल्दाराच्या हाताखालचा गांवकामगार.

**शेणणी, शेणणें** पुढें 'शेंदणी,' 'शेंदणें'पहा.

**शेणणें** [ म० शेण ] अ० क्रि० १ ( गाय, म्हैस, बैल, किं० रेडा यांणीं ) हगणें. २ ( डोळ्यांतून ) पू बाहेर येणें किं०आलेला असणें.

**शेणय, शेणवई** पुढें ' शेणवी ' पहा.

**शेणवी** पु० महाराष्ट्रीय ब्राह्मणांची एक जात किं०त्या जातीचा इसम.यांना अध्ययन,दान, आणि याजन, करण्याचे तीन अधिकार असून अध्यापन,प्रतिग्रह,आणि यजन हे तीन अधिकार नाहींत. यांना ' सारस्वत ' असेंही म्हणतात.

**शेत** [ सं० क्षेत्र ] न० १ ऊस, जोंधळा, भात, इ० चें पीक करावयाचा भूप्रदेश. २ ऊस, जोंधळा, बाजरी, इ० चें पीक. ३ शेतकीचीं कामें समुच्चयानें. ४ चैत्रांत गौरीपुढें शोभेसाठीं ठेवण्यासाठीं कुंडी इ०मध्यें तयार केलेला गहूं इ० च्या रोपांचा समुच्चय.५नोकरी,व्यापार,सावकारी, इ० रूप जें कोणेकाचें चरितार्थाचें साधन तें त्याचें शेत. ꕥ **शेतकरी** पु० १ शेताचा मालक. २ दुसऱ्याच्या शेतांत काम करून चरितार्थ करणारा. **शेत आडगरा** पु० नाचणीची एक जात. **शेतकामी ( -म्या )** वि० १ शेतांत काम करणारा. २ शेताच्या कामाला लायक. **शेतकी** स्त्री० कृषिकर्म; शेतासंबंधाचीं हरएक प्रकारचीं कामें समुच्चयानें. **शेतखण्या** पु० १ केवळ शेतांतच काम करण्याची ज्याची लायकी आहे असा, म्ह० निरक्षर, अडाणी, किं० गांवढळ माणूस. २ ब्राह्मणाला विद्या, पठन, पूजा, इ० जीं योग्य कामें तीं न करतां शेतांत कामें करणारा ब्राह्मण.**शेतखाना** पु०१शेतांत कूड घालून शौचासाठीं केलेली आडोशाची जागा.३घरांतील शौचास जावयाची जागा;संडास;शौचकूप.**टीप**,– सिह्हतखाना=आरोग्यगृह अशी एका पंडितानें व्युत्पत्ति केली आहे. **शेतगणा** पु० १ शेतकी खालची जमीन. २ गांवचीं शेतें समुच्चयानें. **शेतघर** न० शेतांत खपणाऱ्या नोकरांवर देखरेख करणें इ० कामासाठीं मालकानें शेतांत राहावयासाठीं बांधलेलें घर. **शेतजमीन** स्त्री० शेताच्या उपयोगाची जमीन. **शेतपोत** न० १ शेतें, मळे, बागा, इ० रूप कोणेकाची संपत्ति. २ शेतासंबंधाचीं हरएक प्रकारचीं कामें समुच्चयानें. **शेतभात** न० १ शेतें,मळे, इ० चरितार्थाचें साधन. २ शेतें, मळे,इ० संबंधाचीं कामें समुच्चयानें. **शेतवाडी** स्त्री०शेतें,बागा, इ०रूप संपत्ति. **शेतवारी** स्त्री०, **शेतवार पत्रक** न० एकाद्या गांवाचीं शेतें, बागा, मळे, इ० च्या तपशिलाचें कुळकर्ण्यानें तयार केलेलें पत्रक किं०केलेला तक्ता. **शेतसनदी** वि० सैन्यांतील किं० किल्ल्याच्या संबंधाची नोकरी करण्यासाठीं रोख पगार न देतां शेत बक्षीस देऊन सरकारनें ठेविलेला ( शिपाई ). **शेतसरी** स्त्री० १ गांवचीं शेतें समुच्चयानें. २ गांवच्या शेतांचें उत्पन्न; उ० यंदा शेतसरी चांगली पिकली: उ० शेतसरी आई हातीं धरील तर सर्व कांहीं होईल. **शेतसारा** पु० शेतावर सरकारनें बसविलेला सारा. **शेती, शेतीक** स्त्री० शेत नांगरणें, पेरणें, पिकविणें, धान्य गोळा करणें, इ० रूप धंदा किं० चरितार्थ; उ० उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी. **शेती पाऊस** पु० शेताच्या उपयोगाचा पाऊस. **शेतीभाती** स्त्री० शेतासंबंधाचीं कामें समुच्चयानें.पु० शेतांत काम करणारा; शेतकरी.**शेतवड** स्त्री०गांवांशेजारीं शेतें व्हावयाच्या उपयोगाचा भूमीचा प्रदेश. [ वाहातात.

**शेतवड** पु० एक झाड. याचीं फुलें शिवास

**शेतवढा, शेताड** पु० एक झाड.

**शेताळ, शेताळीस** [ म० सहा+चाळीस ] वि० चाळीसांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका ( अशिक्षितांत रूढ ); शेचाळीस.

**शेंद** स्त्री० १ नारळांतील खोबरें पोखरून काढून मीठ, मोहोऱ्या, इ० पदार्थ ठेवण्यासाठीं केलेलें बारदान. २ लांबोडा भोपळा इ० फळ.

**शेंदड, शेंदाड, शेंदणी** स्त्री० एक वेल.

**शेंदड, शेंदाड, शेंदणें** न० वरील वेलाचें फळ. हें फळ नारळाएवढें मोठें असून भारी ढिसूळ असतें आणि त्याला जरा धक्का लागला कीं तें फुटतें. ह्यावरून'शेंदाड शिपाई' म्ह० (१) प्रत्यक्ष मारामारींत रट्टे खाण्याची ज्याला ताकद नाहीं पण नुसती बढाई मारणारा असा शिपाई किं० माणूस.( २ ) भित्रा शिपाई किं० माणूस.

**शेंदणी** स्त्री० १ एक वेल. २ ह्या वेलीचें फळ.

**शेंदणी** [ म० शेंदणें ] स्त्री० विहिरींतून पाणी शेंदून काढण्याच्या पोहोऱ्याची दोरी.

**शेंदणें** स० क्रि० खालचा मजला, गलबताचा तळ, खड्डा, विहीर, इ० तून ( पेटी,पोतें, पोहोरा, धोंडा, इ० पदार्थ ) वर ओढून घेणें.

**शेंदणें** न० विहिरींतून पाणी वर शेंदून काढण्याचा दोरी लाविलेला पोहोरा.

**शेंदणें** [सं०छिद्]स०क्रि०कोयता इ०साधनानें (वृक्षाचें खोड इ०वर)टवके मारणें किं०वार करणें.

**शेंदरा, शेंदऱ्या, शेंदरी** वि० शेंदुराच्या रंगाचा ( आंबा, वस्त्र, गुलबास, इ० ).

**शेंदरी** स्त्री० १ एक प्रकारची आंधरी. २ एक प्रकारचा जोंधळा. वि० शेंदराच्या रंगाचा. ३ एक प्रकारचें लुगडें. ४ एक झाड.

**शेंदव** [ म० सैंधव ] पु० १ सैंधव नांवाचें मीठ. २ खारटपणाचा द्रवांश, जमीन, भिंत, इ० ची ओल,अंगांतून निघणारा घाम, इ०; उ० खाडीच्या पाण्याचा शेंदव येथपर्यंत मारतो म्हणून येथपर्यंतच्या विहिरींचें पाणी थोडेंसें खारट असतें.

**शेंदवणी** [ मु० शेंदणें ] स्त्री० पाणी इ०शेंदून काढण्याचा पोहोरा,घागर,इ०ला लाविलेली दोरी.

**शेंदाड** स्त्री० एक वेल. वर ' शेंदड ' पहा.

**शेंदूर** [ सं० सिंदूर ] पु० शिसें आणि आकसिजन यांच्या रासायनिक मिश्रणानें तयार होणारा एक जड आणि लालभडक पदार्थ. **& कोणेकानें कोणेकाचा शेंदूर उतरणें** त्याणें त्याचा नक्षा उतरणें; त्याची फजीती करणें; त्याची मानखंडना करणें.

**शेंदेलोण, शेंधेलोण, शेंदीलोण** [ सं० सैंधव+लवण ( मीठ, क्षार )]न० सैंधव हें मीठ.

**शेन, शेनी**[सं० श्येन,श्येनी]पुढें 'श्येन' पहा.

**शेन, शेनी** क्रि० वि० ऊन प्रत्ययान्त धातूपुढें अशिक्षित लोक हा प्रत्यय लावितात; उ० करून शेन किं० करून शेनी म्ह० करून.

**शेनिश्चय** [ म० सई+निश्चय ] पु० वादग्रस्त विषयाचा निकाल किं० निर्णय.

**शेली** स्त्री०१ एक वेल.२ह्या वेलीचें फळ. वर ' शेंदणी ' पहा.

**शेप** [ सं० शतपुष्पा; हिं० सोफ ] स्त्री० ओंव्यासारखें एक धान्य. **& शेपट** वि० शेपाच्या वासाचा ( आंबा इ० फळ ).

**शेप** [ सं० शेप=शेपूट ] स्त्री० पुच्छ; शेपटी; शेपूट. **&शेपकिडा** पु० पोटानें सरपटत जाणारा आणि लांब शेपटीचा एक पांढऱ्या रंगाचा किडा. **शेपखळी** स्त्री० प्रसूति व्हावयाच्या अगोदर गाय, म्हैस, इ० च्या शेपटीच्या दोहो बाजूंस ज्या दोन खळ्या पडतात त्या प्रत्येक.

**शेपट** [ म० शेप ] स्त्री० गाय, म्हैस, इ० ना पळावयास लावून त्यांच्या पाठीमागून धावत जाऊन त्यांना दमविणें. ' गोविंदानें त्या गायीचें शेपट काढलें ' असा प्रयोग होतो.

**शेपटणें** [ म० शेपट ] स० क्रि० ( गाय, म्हैस, इ० ना ) धावडवून ( त्यांना ) दमविणें.

**शेपटणें** [ म० शेपटी ] स० क्रि० झाडाच्या बारीक आणि लवचीक फांदीनें मारणें.

**शेपटा** (–डा ) [म० शेपूट ] पु० १ लांब आणि मोठी शेपटी.२मांजर,व्याघ्र,इ०ची रागानें पिंजारलेली शेपटी. ३ स्त्रीची वेणी ( विनोदांत).

**शेपटी, शिपटी** स्त्री० झाडाची बारीक आणि लवचीक फांदी.

**शेपटी** (–डी ) स्त्री०,**शेपूट** न० [ म० शेप ] १ गाय, म्हैस,इ०चें पुच्छ.२(लक्षणेनें)गाय,म्हैस, इ० प्राणी व्यक्तिशः; उ०गेल्या वर्षी गुरांवर रोग आला होता त्यानें माझ्या गोठ्यांत एक शेपूट राहिलें नाहीं ( म्ह० माझी सगळीं गुरें मेलीं ).

**शेपरणें, शेपारणें. शेफरणें, शेफारणें** अ० क्रि० १ कोणी आपली स्तुति केल्यानें अतिशय चढून जाणें ( निंदेंत ). २ योग्य वर्तनक्रम सोडून उत्संखळपणें वागूं लागणें.

**शेपाटणें** [ म० शेपटी ] स० क्रि० झाडाच्या बारीक आणि लवचीक फांदीनें ( माणूस, गुरें, यांना ) मारणें.

**शेपाळणें** [ म० शेप ] स० क्रि० १ बैल इ० ची शेपटी मुरगाळणें ( त्यानें जलद चालावें म्हणून ). २(कोणेकाला) मारणें किं० रागें भरणें.

**शेपाळ्या** [ सं० शेप=पुरुषाचें शिश्न ] वि० १ रांडबाज. २ फाजील स्त्रीलंपट ( पुरुष ).

**शेपाळू** वि० १कामी (स्त्री).२ परपुरुषलंपट (स्त्री).

**शेपू** [ सं० शतपुष्पा=बाळंतशेप; बडीशेप ] स्त्री० शेप धान्याचें झाड किं० त्याचें बीज.

**शेपूट** [ सं० शेप=शेपूट ] न० १ घोडा, गाय, म्हैस, इ० चें पुच्छ. २ ( लक्षणेनें ) समाप्तीचा किं० शेवटाकडचा भाग. ३ (लक्षणेनें ) मोठ्या कामांतून उत्पन्न झालेलें कांहीं लहानसें काम. ॐ **शेपूट घालणें, गांडींत शेपूट घालणें** भीतीनें मागें हटणें; कचरणें, डरणें. (भ्यालेलें कुत्रें इ० मागल्या दोन पायांत शेपूट वळवितें ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे ). **शेपूट अडकणें** बाहेर पडावयाला मार्ग नाहीं अशा पेचांत सापडणें; कांहीं हानि पत्करल्याशिवाय सुटका होणें शक्य नाहीं अशा अडचणींत पडणें. **शेपूट राहाणें** बहुतेक काम संपून अत्यल्प अंश करावयाचा राहिलेला असणें. **शेपूट ठेवणें** कांहीं कामाचा अत्यल्प अंश करावयाचा ठेवून देणें. **शेपूट लांबविणें** १ कांहीं काम विनाकारण लांबविणें. २ दाता उदार मनाचा भेटला असतां त्याच्या जवळ अधिक अधिक मागत सुटणें. **शेपूट हालविणें** स्त्रीनें कामचेष्टांनी पुरुषाला संभोगार्थ चेतविणें. **शेपूट कल्याणी** स्त्री० परपुरुषलंपट स्त्री. **शेपूट मोड्या** वि० १ज्याची शेपटी मुरगळल्याशिवाय जो चालत नाहीं असा ( बैल ). २ कोणतेंही काम न करणारा किं० मनापासून न करणारा ( माणूस ); चुकारतट्टू.

**शेफ** [ सं० ] पु० पुरुष, घोडा, गाढव, इ० चें जननेंद्रिय.

**शेफरणें, शेफारणें** मागें ' शेपरणें, ' ' शेपारणें ' पहा.

**शेंब, शेम** स्त्री० नाकांतील दाट मळ, शेंबूड. २ आमांशाच्या विकृतींत गुदद्वारें बाहेर पडणारा पांढरा चिकट पदार्थ. ३ घोड्याच्या नाकाला होतो तो एक रोग.

**शेंब,शेंबी** स्त्री० बैलांच्या शिंगांच्या टोकांना, काठीच्या टोकाला, किं० छत्री इ० च्या दांड्याच्या माथ्याला बसवितात तें पितळ, लोखंड, इ० चें टोपण. २ लोहांगीला बसवितात त्या कड्या प्रत्येक. मागें ' लोहांगी ' पहा.

**शेंबूड** पु० नाकांतून गळणारा घट्ट श्लेष्मा किं० मळ. शेंबूड नाकांत किं० नाकाबाहेर वाळला असतां त्याला ' मेकूड ' म्हणतात. ॐ **शेंबूड फेडणें** नाक शिंकरून शेंबूड बाहेर उडवून देणें. **शेंबडांत लोळणें** प्रपंचाच्या त्रासदायक उलाढालींत गुरफटलेलें असणें ( परमार्थाकडे मुळींच लक्ष्य न देतां ). **मी हसें लोकां शेंबूड माझ्या नाका** जो दुर्गुण आपल्या ठायीं आहे तो दुसऱ्याचे ठायीं असल्यास त्याला निंदिणें हा मूर्खपणा होय.

**शेम** वर ' शेंब, शेंबी ' पहा.

**शेमला** [ अ० षम्‌लाह् ] पु० पागोटें,कमरबंद, इ० चें टोक.

**शेमेजणें** अ० क्रि० घामानें ( अंग ) ओलें होणें.

**शेश्न** न० पुरुष, घोडा, इ० चें जननेंद्रिय.

**शेर** पु० एक झाड. याचा रस दुधासारखा पांढरा असतो. ॐ **शेरताटी, शेरताट, शेरताड** स्त्री० शेराच्या झाडांचें कुंपण किं० लांबच लांब ओळ.

**शेर** [ हिं० सेर ] पु० १ एक वजनाचें परिमाण; एक मापाचें परिमाण. हें परिमाण भिन्न प्रांतांत भिन्न असतें. २ कोणेकाला कांही कामाबद्दल दिलेलें धान्य, पीठ, इ० रूपाचें वेतन. ३ चरितार्थाचें साधन,—नोकरी, दलाली, व्यापार, इ०. ४ कोणेकाचा कांहीं कामांत किं० व्यवहारांत किं० प्रपंचांत ठरलेला सुखदुःखादिरूप किं० हानिलाभादिरूप भाग. ५ अन्नोदकांचा संबंध. ॐ **शेरास सव्वाशेर** प्रतिपक्ष्यापेक्षां वरच्या प्रतीचा प्रतिपक्षी; तो वस्ताद तर त्याच्याहून हा अधिक वस्ताद. **टका शेर भाजी टका शेर खाजा** घोडा आणि गाढव यांचा दर्जा सारखा समजणें हा प्रकार. **शेरका** वि० १ ज्यांत शेरभर धान्य, तूप, दूध, इ० मावेल असें (पात्र).२ शेर वजनाचा धोंडा,लोखंड(तराजूंत माप म्हणून घालावयाचा). **शेरपीठ** न०, **शेरशिधा** पु० कांहीं कामाबद्दल शिपाई, मजूर, इ० ना दिलेला शिधा. **शेरी** स्त्री० धान्याच्या रूपानें सरकारकडे आलेल्या साऱ्यांतून कमावीसदार किं० दुसरा

कोणी अंमल्दार किं० अडशेरीचें माप देणारा इसम स्वताचा सुमारें दोन शेरांचा भाग काढून घेतो तो. **शेरी जमीन स्त्री०** गांवांतील उत्तम जमीन,–जी सरकार किं० कोणी अधिकारी स्वताच्या खाजगीकडे ठेवितात ती. हीं जमीन करणारा तो ' शेरीकर (–री ) ' आणि हिचें उत्पन्न ' शेरीबाब '

**शेर स्त्री०** कावळा, चिमणी, इ० ची विष्ठा.

**शेर** [ **फा०** षेर् ] **पु०** १ वाघ. २ (लक्षणेनें) धाडसी माणूस; कर्तबगार मनुष्य. ३ (लक्षणेनें) कोणीही शिरजोर माणुस. ⊛ **शेरखोर वि०** पुंड; उन्मत्त. **शेरपणा पु०** जोरावरी; सामर्थ्य. **शेरबाजी, शेरबाजू स्त्री०** वर्चस्व; सरशी.

**शेरडावणें, शेरंडावणें अ० क्रि०** फाजिल ऐटीनें किं० तोऱ्यानें वागणें.

**शेरडी, शेरडुकी स्त्री०** शेळी. ⊛ **शेरडुक्या** शेळ्या चरविणारा किं० त्यांना संभाळणारा. **शेरडूं न०** १ शेळी,–नर किं० मादी. २ लहान शेळी,–नर किं० मादी. **शेरडूक न०** शेळी,– नर किं० मादी ( तुच्छतेंत ).

**शेरणी** [ **फा०** षीरीनी ] **स्त्री०** १ देवाला केलेला नवस फलद्रूप झाला म्हणजे देवळांत साखर, खोबरें, इ० रूप प्रसाद वाटतात तो; खिरापत. २ गुऱ्हाळांत देवाला जो गुळाचा खडा नैवेद्य म्हणून अर्पितात तो. ३ गुऱ्हाळांतून जे गुळाचे खडे गांवकामगारांना वाटतात ते प्रत्येक.

**शेरणी स्त्री०** एक झुडूप. [हगणें.

**शेरणें अ० क्रि०** कावळा, चिमणी, इ० नीं

**शेरा** [**अ०** षर्ह् ] **पु०** दर; सरासरीचें प्रमाण.

**शेरा** [ **अ०** षर्अ ] **पु०** १ कांहीं कामाची मागपासून ठरलेली सरणी; शिरस्ता. २ अर्जाला सरकारांतून देण्यांत आलेलें उत्तर. ३ कांहीं कामासंबंधाच्या सूचनांचें पत्रक. ४ अमुक काम चांगलें झालें, वाईट झालें, अमुक प्रकारें सुधारणा करणें जरूर आहे, इ० जें मत वरिष्ठ किं० यजमान देतो तें (मारगें, देगें). ५ अभिप्राय, टीका (सामान्यतः).

**शेरा** [ **सं०** शिरस् ] **पु०** १ शेवट. २ रस्ता, बोळ, इ० चा शेंवट. ३ गांवाची हद्द.

**शेरिया पु०** दोन थोक किं० आठ कळ्या किं० चोवीस फाळा इतकें रेशीम. मागें 'थोक' पहा. मागें 'कळी' अर्थ ८ पहा. मागें ' फाळा ' अर्थ ४ पहा.

**शेरी स्त्री०** १ गांवांतील अरुंद बोळ. २ दोन कुंपणांमधील अरुंद वाट. [व्यक्ति).

**शेलका वि०** समुदायांतील निवडक (पदार्थ किं०

**शेलणें, शेलनें, शेळणें न०** १ ओढा, डबकें, इ० चें पाणी वर उडवून शेजारच्या बागीं, मिरच्या, इ० च्या झाडांस घावयासाठीं लाकडाचें पात्र करतात तें. २ माशाचें शेपूट.

**शेलभेल स्त्री०** मिश्रण; मिसळ.

**शेला** [ **हिं०** सैला ] **पु०** प्रतिष्ठितपणें समारंभाच्या प्रसंगीं किं० मिरवणूकींत पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं अंगावर घ्यावयाचें एक उंची वस्त्र. ⊛ **शेलापागोटें न० ए० व०** कोणा माणसाला राजा इ० नीं संमानार्थ दिलेला शेला आणि पागोटें या रूपाचा नजराणा. **शेलापागोट्याचा प्रत्याहार पु०** कांहीं नाहीं; उ० त्या संस्थानिकाच्या लग्नांत आम्हांला कांहीं लाभ होईल ह्या आशेनें आम्ही दहा कोश जमीन तुडवून गेलों आणि आम्हाला मिळालें काय ? तर शेलापागोट्याचा प्रत्याहार ! मागें ' प्रत्याहार ' पहा. **शेलावाटी स्त्री० ए० व०** गांवांत लग्न झालें असतां पाटलाला शेला आणि वाटी ह्या रूपाचा देतात तो नजराणा.

**शेलारी स्त्री०** एक प्रकारचें उंची लुगडें.

**शेलारें न०** कोरफडीच्या झाडाला येतो तो तुरा.

**शेली** [ **नंदभाषेंत** ] **वि०** सहा ही संख्या.

**शेलू स्त्री०** एक झाड. **न०** त्याचें फळ.

**शेलें न०** १ गाडी इ० चें जू किं० जोकड. २ ( **लाक्षणिक** ) कामाचा भार किं० जबाबदारी. ३ युद्ध्यमान दोन पक्षांपैकीं एक; खेळाडूंची एक बाजू. [पहा.

**शेलेभाल्यानिशीं** मागें ' शिलेभाल्यानिशीं '

**शेव स्त्री०** एक झाड. **न०** त्याचें फळ.

**शेव स्त्री०** १ हरभरा इ० च्या पिठाच्या लाडू करण्यासाठीं तळलेल्या ज्या कळ्या त्या प्रत्येक. २ हरभऱ्याच्या पिठांत जिरें, तिखट, मीठ, इ० घालून झाऱ्यांतून त्या पिठाचे तंतु कढईत पाडून तळून करतात तें खाद्य. ३ माळवें विकणारे जे माळी इ० त्यांचेपासून हकीम, मोकाशी, इ० प्रतिदिवशीं थोडा थोडा भाजी-

पाला इ० रूपाचा हक्क म्हणून घेतात तो कर. ह्या कराला ' शेवसबजी ' असेंही म्हणतात.

**शेव** [ सं० सीमा ] पु० ताड, माड, इ० झाडांच्या पोगीच्या अग्राला मद्य काढण्यासाठीं जो छेद करतात तो ( घालणें ). पु० १ गांव, शेत, वस्त्र, इ० चा शेवट किं० शेवटाजवळचा किं० लगतचा प्रदेश. २ चोरी इ० चा माग किं० तपास करावयाचा असतां ,एका गोष्टीचा संबंध दुसऱ्या गोष्टीशीं जोडणारी कांहीं बाबत,-जेणें-करून पुराव्याची सांखळी अखंड बनवितां येते. ॐ **कोणेकाला शेव घालणें** लुगडें, उपरणें, इ० चे सोगे हालवून त्याला जवळ बोलावणें किं० कांहीं सूचना देणें किं० इशारत करणें. **आजाराला शेव घालणें** त्याचा जोर कमी करणें; तो हटविणें. **नदी, रोग, क्षुब्ध मनोविकार, इ० नीं शेव घेणें** त्यांनीं ओसरणें, दबणें, शमणें, किं० हटणें. **शेव देणें**(किं० **पोहोचविणें** )गाणाऱ्याच्या सुराची री ओढणें किं० त्याच्या जवळ बसून त्याच्या मागून सुरास सूर देणें.**कोणेकाला शेव लावणें** त्याच्या जवळ बसून त्याच्या कामांत त्याला मदत करणें;त्याला हात लावणें.

**शेवई,शेवय** स्त्री०गहूं,तांदूळ,इ०च्या पिठाचे लांब लांब तंतु खिरीसाठीं करतात ते प्रत्येक.

**शेवखंड, शेवकंड, शेवकुंड** न० हरभरा इ० च्या पिठाचें एक खाद्य.

**शेवगा** पु० १ एक झाड. याच्या शेंगा कढी, पिठलें, इ० मध्यें घालतात. २ शेवया, कुरडया, इ०करण्याचें एक सच्छिद्र पात्र.

**शेवट** [ म० शेव ] पु० १ समाप्ति;परिणाम; पर्यवसान. २ पदार्थांचें टोक किं० अग्र. ३ बंदूक इ० पेटविण्याचा तोडा. ४ मरण; अंत. ५ वादाचा निकाल किं० निर्णय. ॐ **सरतेशेवटीं** क्रि० वि० १ शेवटीं; अंतीं. २ सर्व गोष्टी,उपाय, यत्न, इ० केल्यानंतर. **शेवट घेणें** संपविणें;समाप्त करणें. **शेवटच्या बांधण्यास पाणी मोडणें** अगदीं शेवटीं आपलें हेकटपणाचें मत सांगून वादाचा निकाल लावणें. **शेवटच्या आदित्यवारीं** क्रि० वि० कधींच नाहीं. मागें 'कड' मध्यें ' कडच्या रविवारीं'पहा.**शेवटील** वि० शेवटचा.

**शेवटणें** [ म० शेवट ] स० क्रि० १(कुऱ्हाड, कोयता, सुरी, दाभण, इ० ) ठोकून किं० घासून त्यांना बारीक धार किं० टोक आणणें.२ (घोडा, बैल, इ० ना ) जलद चालण्याची इशारत करण्यासाठीं चाबूक, इ० च्या टोकानें स्पर्श करणें. ३ ( काम, वाद, व्यवहार, इ० ) संपवून शेवटास नेणें.४लक्ष्यावर मारलेला (धोंडा,तीर,इ०नीं) लक्ष्य मध्यावर न वेधतां लक्ष्याच्या कडेला स्पर्श करून जाणें. अ० क्रि० शेवटीं येणें, घडणें, किं० होणें. ॐ **शेवटता** क्रि० वि० बाण, धोंडा, इ० लक्ष्याला मध्यावर न वेधतां कडेला स्पर्शून म्ह० चाटून ( जाणें, लागणें ). **टीप**,--हें क्रि० वि० लिंगवचनांप्रमाणें फिरतें.

**शेवटा** [म०शेवट]पु० कुंभाराच्या चाकाच्या आंसाचें खालचें टोक ज्यावर फिरतें तो टेकू.

**शेवडा** पु० १ गोसाव्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणी इसम. २ भाजीपाल्यांवरची जकात वसूल करणारा.

**शेवडी** स्त्री० नदी, नाला, इ० च्या वाळवंटांत खोदलेली विहीर किं० खळगा.

**शेवती, शेवंती** [ सं० सेमन्ती ] स्त्री० एक फुलझाड. **शेवतें** न० १ ह्या झाडाचें फूल. २ ह्या फुलाच्या आकाराचें स्त्रियांचें एक शिरोभूषण. ३ दिव्याच्या ज्योतींत बिब्बा धरला असतां त्यांतून गळणाऱ्या तेलाचा थेंब. ४ असा थेंब ज्यांत पाडविला आहे असें दूध,--औषधासाठीं तयार केलेलें.

**शेवंती** [ सं० सीमान्त ]स्त्री०१गांवाची हद्द. २ लग्नासाठीं आलेल्या वराचा गांवच्या हद्दीवर केलेला सत्कार ( देणें ).ह्या सत्काराला ' शेंवंती पूजन'किं०'शेंवती पूजन'न०असाही शब्द आहे.

**शेवय** मागें ' शेवई ' पहा.

**शेवरा, शेवऱ्या** पु० एक झाड.

**शेवरी** स्त्री० एक झाड. याच्या बोंडांतील कापूस ( म्हाताऱ्या ) मऊ असून तो उशा, गाद्या, गिरद्या, इ० मध्यें भरतात.

**शेवल,शेवाल** पु०,न०,**शेवळ,शेवाळ** स्त्री०, न० [ सं० शैवाल ] पाण्यांत उगवणारी एक बुळबुळीत आणि तंतुरूप वनस्पति.

**शेवसबजी** मागें ' शेव ' स्त्री० मध्यें पहा.

**शेवसर, शेवसरणें** मागें ' शिवसर "शिवसरण ' पहा.

**शेवाळणें** [ म० शेवाळ ] अ० क्रि० १ शेवाळीनें व्याप्त होणें. २ ( दांत ) कुरसणें. ३ ( गाय, बैल, घोडा, माणूस, इ० ना ) पोटभर गवत, जेवण, इ०मिळत असल्या कारणानें त्यांनीं लठ्ठ आणि गुबगुबीत आणि तजेलेदार होणें.

**शेष** [ सं० ] वि० राहिलेलें;उरलेलें; अवशिष्ट. पु० अनंत हा सर्प; वासुकी.पु०, न० १ शिल्लक; बाकी. २ गाळलेला किं० वगळलेला भाग. पु० ( मराठींत )शिल्लक; उ० शेषऋण, रोगशेष, इ०. न० उरलेलें अन्न;प्रसाद. ॐ **शेषशायी** [सं०शेषशायिन् ] पु० श्रीविष्णु. **शेषपूरण** न०,**शेषपूर्ति** स्त्री०जें कमी असेल तें भरतीला घालून पूर्ण करणें.

**शेस** [ सं० शीर्ष ] स्त्री० दहीं आणि पिंजर ह्याचें मिश्रण,-जें मुंजा मुलगा, नवरा मुलगा, नवरी मुलगी,इ०च्या कपाळावर अक्षता चिकटावण्यासाठीं लावतात तें;शेज;(लावणें,भरणें). मागें ' शेज ' पहा. ॐ **शेसपाट** पु० दहीं आणि पिंजर ह्याचें मिश्रण कपाळाला थापून त्यावर तांदूळ चिकटावून केलेला पट्टा. **शेसफूल** न० मागें ' शीसफूल ' पहा.

**शेसगांठ, शेसरा** पु० १ सरकफास,-जो धागर इ० च्या गळ्याला हावा तितका सैल किं० घट्ट करून बसवितां येतो. २ सुरगांठ.

**शेसाळणें** अ०क्रि० १(मनुष्य, पशु, इ० नीं) कांहीं काम करावयाला अति उत्सुक झालेलें असणें. २ (गात्रविशेष) कांहीं काम करावयाला अत्यन्त उत्सुक किं० उत्कंठित झालेलें असणें,-मारामारीला बाहु, धावावयाला पाय, गावयाला कंठ, इ०. ३ रागानें किं० उत्कंठेनें बेफाम होणें. ४(सर्प, मांजर, माणूस,इ० नीं)रागानें फुसफुसणें.

**शेसाळा** [ म० शेसाळणें ] पु० आवेश;जोर; खुमखुमी; इसळो; त्वेष; क्षोभ.

**शेसुर, शेसुरणें** मागें 'शिवसूर,' 'शिवसुरणें' [ पहा.

**शेळ** स्त्री० १ शीळ घालणें किं० फुंकणें. २ सर्पादींचें फुसफुसणें.

**शेळ** स्त्री० जींत सदैव आर्द्रता असते अशी भातजमीन किं०अशा जमनिवर केलेलें भाताचें रोपे,-उपटून दुसरीकडे लावावयासाठीं. ॐ **शेळीचा तरवः** पु०भाताचीं रोपडीं करण्यासाठीं भाजून तयार केलेली शेळ जमीन किं० अशा जमीनीवर केलेलीं भाताचीं रोपडीं समुच्चयानें.

**शेळक्या,शेळडूं** मागें 'शेरडी ' मध्यें ' 'शेरडुक्या, ' ' शेरडूं ' पहा.

**शेळणें** न० मागें ' शेलणें ' पहा.

***शेळमेळ** स्त्री० मिश्रण; मिसळ.

'**शेळवंडी** स्त्री० सासरीं किं० माहेरीं आलेल्या मुलीवरून तांदूळ ओवाळून टाकणें हा विधि किं० ओवाळून टाकलेले तांदूळ.

**शेळसप्तमी** स्त्री० श्रावण शुद्ध सप्तमी ही तिथि किं०ह्या तिथीचें व्रत. मागें 'शिळा सप्तमी' पहा.

**शेळसभा** स्त्री० भांडणाऱ्या दोन पक्षांमध्यें सलोखा घडवून आणण्यासाठीं किं० तंटा मिटविण्यासाठीं उभयपक्षांची भरते ती सभा.

**शेळी** स्त्री०बकरी.ॐ **शेळी जाते जिवानिशीं आणि खाणार म्हणतो वातड** नोकरानें कितीही जीव तोडून काम केलें तरी त्याच्यावर कृतघ्न धनी चरफडतोच ! [विणें).

**शेळू** स्त्री०, पु०शीळ,शिळ ( घालणें,वाज-

**शेळोंदरा, शेळोंद्रा** वि० काळाकुट्ट.

**शैघ्र्य** [ सं० ] न० शीघ्रपणा;त्वरा; जल्दी.

**शैत्य** [ सं०] न० १ थंडी; सर्दी. २ गारवा; गारठा. ३ थंडीमुळें शरीरांत झालेली विकृति,-पडसें इ० रूप. ॐ **शैत्यपित्त** न० १ शैत्यामुळें शरीरांत झालेला पित्ताचा क्षोभ. २ शीत आणि उष्ण ह्या दोहोंचा प्रकृतींत एकदम झालेला क्षोभ.

**शैथिल्य** [ सं० ] न० १ सैलपणा; ढिलेपणा. २ दुर्लक्ष्य. ३ बिलबिलीतपणा, मऊपणा. ४ आळस; दीर्घसूत्रीपणा; चेंगटपणा.

**शैल** [ सं० ] पु० पर्वत. न० दगडफूल.वि० दगडी;डोंगराळ;शिलामय; खडकाळ. ॐ **शैलेन्द्र, शैलाधिप** पु० हिमालय पर्वत. **शैलज** न० दगडफूल.**शैलजा, शैलसुता,शैलकन्या** स्त्री०पार्वती. **शैलनिर्यास** पु० शिलाजित. **शैलसार** वि० पर्वताप्रमाणें घट्ट, टणक, आणि मजबूत. **शैलरंध्र** न० गुहा.

**शैली** [ सं० ] स्त्री० १ तऱ्हा; सरणी; पद्धति. २ टीका; व्याख्या. ३ कोणेकाची कांहीं काम करण्याची पद्धति किं० खुबी किं० कुशलता. ४ कोणेकाची लेखनाची किं० विषयाच्या प्रतिपादनाची तऱ्हा.

**शैलूष** [ सं० ] पु० १ नट; नर्तक. २ वाघें

वाजविणाऱ्यांचा मुख्य. ३ ताल धरणारा. ४ बजवय्या. ५ ठग; लुचा. **शैलूषी** **स्त्री०** नटी; नायकीण.

**शैल्य** [ **सं०** शल्य ] **न०** हात, पाय, इ० मध्यें शिरलेलें कुसळ, कांटा, इ०.

**शैव** [**सं०**] **वि०** शंकरासंबंधाचें.**पु०** शिवाचा भक्त किं० उपासक.

**शैवल, शैवाल** [ **सं०** ] **पु०** शेवाळ.

**शैशव** [ **सं०** ] **न०** बालपण; बाल्य.

**शैशिर** [ **सं०** ] **वि०** शिशिर ऋतूंतील.

**शोक** [ **सं०** ] **पु०** १ दुःख; खेद. २ विलाप; रडणें. ❀ **शोकाकुल, शोकग्रस्त** **वि०** दुःखानें व्याकुळ झालेला; दुःखी.

**शोकणें** [ **सं०** शुष् ] **अ० क्रि०** १ ( पान, फूल, इ० ) वाळणें किं० कोमेजणें. २ तहानेनें व्याकुळ झालेलें असणें. **स० क्रि०** ( फुल, पान, वस्त्र, चिखल, इ० ) उन्हानें किं० अग्निसंयोगानें वाळविणें किं० जलरहित करणें.

**शोख, शोखी** पुढें ' शौक, ' ' शौकी ' पहा.

**शोचणें** [**स०** शुच्] **स० क्रि०**( नाश, हानि, प्रियजनाचा वियोग, पराभव, निराशा, इ० बद्दल ) विलाप किं० दुःख करणें किं० रडणें.

**शोचनीय, शोच्य** [ **सं०** ] **वि०** ज्याचेबद्दल दुःख होत आहे असा; अनुकंपनीय; ज्याचे बद्दल दुःख होत आहे किं० होणें योग्य आहे असा.

**शोणित** [ **सं०** ] **वि०** तांबडा; तांबड्या रंगाचा. **न०** रक्त; रुधिर. ❀ **रक्तामय** **पु०** तांबडी आंव; रक्तमिश्रित आंव. **रक्तोपल** **न०** माणिक हें रत्न. [तांबडा रंग.

**शोणिमा** [ **सं०** शोणिमन् ] **पु०** तांबडेपणा;

**शोथ** [ **सं०** ] **पु०**गात्राची सूज किं० सुजलेपणाची स्थिति. [ पहा.

**शोदा, शोदेगिरी,** इ० पुढें ' सोदा ' इ०

**शोध** [ **सं०** ] **पु०** १ तपास; चौकशी; हुडकण्याची क्रिया. २ वस्तूच्या आंत शिरून तिच्या स्वरूप, गुण, इ० संबंधानें माहिती मिळविणें; परीक्षा. ३ तपासाअंतीं मिळालेली माहिती. ४ अज्ञात वस्तूसंबंधाचें मिळालेलें किं० मिळविलेलें ज्ञान. ५ लिहिण्यांत झालेली जी चूक तिची दुरुस्ती. ६ शुद्ध किं० पवित्र करणें. ७ ऋणाची फेड. ८ सूड. ❀ **शोध ठेवणें** कोणेक वस्तु किं० माणूस कोठें आहे, कोठें जाईल, केव्हां येईल, इ० माहिती मिळविणें किं० ती मिळविण्याचे उपाय चालविणें.

**शोधक**[ **सं०** ]**वि०**१चौकस (माणूस).२हुडकणारा; चौकशी करणारा. ३ दुरुस्ती करणारा. ४ चिकित्सक; अंतर्मुख; बुद्धिवान. **पु०** ( **गणित** ) वजा करावयाची संख्या.

**शोधणें** [ **सं०** शुध् ] **स० क्रि०** १ ( हरवलेली वस्तु किं० अज्ञात वस्तु किं० विषय यांच्या संबंधाचा ) तपास करणें किं० ज्ञान किं० माहिती मिळविणें. २ हुडकून काढणें. ३ जगांत असून लोकांना ठाऊक नसलेली वस्तु लोकांना माहीत करून देणें.४कांहीं वस्तूंची कांहीं विशेष प्रकारें संघटना करून कांहीं ( नवीन पदार्थ यंत्रादि ) निर्माण करणें. **टीप**,–३ आणि ४ ह्या अर्थी 'शोधून काढणें'सुद्धां.५(पदार्थांतील) मळ किं० त्याज्य भाग काढून टाकून (तो पदार्थ) पाहिजे तसा करून घेणें.६(लेख इ० तील चुका ) दुरुस्त करून (तो) निर्दोष किं० बिनचूक करणें.

**शोधणें** [ **म०** शोधणें ] **न०** पदार्थ गाळून किं० चाळून तो स्वच्छ किं० निर्मळ करण्याचें वस्त्र इ० साधन.

**शोधन** [ **सं०** ] **न०** वर 'शोध'चे आठही अर्थ पहा. ९ दोषांचें निवारण. १० जखम धुणें. ११ प्रायश्चित. १२ ( **गणित** ) वजाबाकी. १३ ( **वैद्यक** ) दावक; रेच करणारें औषध. १४ धातूतील मळ काढून टाकणें.

**शोधित** [ **म०** शोधणें ] **वि०** तपासलेलें; शोधलेलें; दुरुस्त किं० शुद्ध किं० निर्मळ केलेलें.

**शोध्य** [**सं०**] **पु०** १ आरोपी. २ (**गणित**) वजा करावयाची संख्या.

**शोप** [**हिं०**] **स्त्री०** ओव्यासारखें एक धान्य. ❀ **शोपट** **वि०** शोपाचा वास किं० रुचि असलेला ( आंबा इ० ). ' शोपा ' ' शोप्या ' ह्याच अर्थी.

**शोफ** [ **सं०** ] **पु०** गात्राला येते ती सूज.

**शोभणी, शोभनी** [ **सं०** शोभना ] **स्त्री०** गौरी देवीचें नांव.

**शोभणें** [ **सं०** शुभ् ] **अ० क्रि०** १ सुंदर

किं० टवटवीत किं० तजेलेदार दिसणें; उठून दिसणें; खुलणें; उ० तुला खादीचा सदरा फार शोभतो. २ कांहीं वर्तन किं०भाषण कोणेकाच्या विद्वत्तेला, दर्जाला, किं० शीलाला अनुरूप किं० साजेसें किं० योग्य असणें; उ०धाकट्या भावाच्या विवेकडे दुर्लक्ष्य करणें तुला शोभत नाहीं.

**शोभन** [ सं० ] वि० १ तेजस्वी. २ सुंदर. ३ मंगल; शुभ. पु० १ ( ज्योतिष ) ग्रह. २ शुभ कर्मांतील अग्निविशेष. ३ पांचवा योग. **शोभना** स्त्री० १ हळद. २ गोरोचन नांवाचा पिवळा रंग. ३ सुंदरी. **शोभन** न० १ सौन्दर्य. २ सजविणें; शोभायुक्त करणें; थाटमाट करणें. ३ लग्न, मुंज, इ० मंगल कार्य. ४ मैथुन; रतिसंभोग. **शोभनें** न० अ० व० १ लग्न, मुंज, इ० प्रसंगांत स्वयंपाकासाठीं आणलेलीं सर्पणाचीं लांकडें. ❀ **फळशोभन** न० गर्भाधान हा संस्कार.

**शोभनी** [ सं० ] स्त्री० १ गौरी; पार्वती. २ एक प्रकारची रोवळी. ३ व्यभिचारिणी स्त्री.

**शोभमान** [ सं० ] वि० शोभणारा; सुंदर; चकचकीत. [ दार; टवटवीत.

**शोभवणा** [ म० शोभा ] वि० सुंदर; तजेले-

**शोभविणें** [ म० ' शोभणें ' चें प्रयोजक ] शृंगारणें; सुंदर दिसेसें करणें.

**शोभा** [ सं० ] स्त्री० १ कांति; तेज. २ सौन्दर्य. ३ शोभा देणारा पदार्थ,—दागिना इ०; उ० विद्या ही पुरुषाची शोभा आहे. ४ (विपरीत लक्षणेनें ) बेआबरू; फजीती ( करणें, होणें ). ❀ **शोभांजन** पु० शेवगा; ह्याच्या शेंगा कढी, पिठलें,इ०मध्यें घालतात. **शोभिवंत** वि० सुंदर. **शोभायमान** वि० वर ' शोभमान ' पहा.

**शोष** [सं०] पु० १ वाळणें; सुकणें. २ आटणें, क्षयरोग. ३ ओल्या पदार्थांतून द्रवांश ओढून घेणें ही क्रिया किं० असा ओढून घेतलेला अंश. ४ विहीर, जमीन, इ० ची जलाभावानें झालेली शुष्कता किं० त्यांना आलेला कोरडेपणा किं० रखरखीतपणा. ५ अति तहान लागल्यामुळें घशाला आलेला कोरडेपणा; उ० मला शोष लागला आहे, अंगोदर गार पाणी दे. ६ हवेंत जलांश नसल्यानें हवेंत येतो तो कोरडेपणा किं० रूक्षपणा.

**शोषक** [ सं० ] वि० शोषण घेणारा.

**शोषण** [ सं० ] न० १ सुकणें; वाळणें. २ शोषून घेणें. ३ कृश होणें. ४ कृश करणें. ५ मदनाचा एक बाण.

**शोषणें** [ सं० शुष् ] स० क्रि० (जल, रस इ० ) ओढून किं० आकर्षून घेणें; उ० येथें पावसाचें पाणी पडलें होतें तें जमीनीनें तत्काळ शोषून घेतलें; उ० साखरेच्या गोळ्यावर घातलेलें दूध शोषिलें गेलें; उ० ओलें फडकें तेथें टाक म्हणजे तेथें सांडलेलें पाणी तें शोषून घेईल. २ खर्चणें; संपविणें; उ० ह्या लग्नानें माझी सर्व शिलक शोषिली. अ० क्रि० वाळणें; शुष्क किं० नीरस होणें, आटणें (जमीन, शरीर, फळ,पाणी,इ० ).

**शौक, शोक** [ अ० शौक् ] पु० १ आवड; नाद; छंद. २ विषयलांपट्य. ३ प्रेम; प्रीति. ❀ **शौकीन, शौकी,शोकी** वि०१रंगेल.२नादिष्ट. ३ गायन, वादन, इ० ची अभिरुचि ज्याला आहे असा. ४ विषयलंपट. ५ एकाद्या गोष्टीची किं० विषयाची विशेष गोडी ज्याला आहे तो त्या गोष्टीचा किं० विषयाचा.

**शौच** [ सं० ] न० १ स्वच्छता. २ पवित्रता. ३ धुणें. ४ शुद्ध करणें; प्रायश्चित्त. ५ सोयर, सुतक, विटाळ, इ० तून स्नानादिकांनीं आलेली शुद्धता. ६ गुदद्वारें मलविसर्जन. ❀ **शौचकूप** पु० मलविसर्जनार्थ केलेली आडोशाची जागा किं० खोली. **शौचविधि, शौचाचार** पु० गुदद्वारें मलविसर्जन.

**शौंड** [ सं० ] वि० १ मत्त; उन्मत्त. २ विख्यात. ३ दक्ष; निपुण; हुशार; उ० अक्षशौंड म्ह० फासे खेळण्यांत निपुण; दानशौंड म्ह० मोठा दाता, उदार.

**शौंडिक**[सं०]पु०मद्य करणारा किं० विकणारा.

**शौद्र** [ सं० ] वि० शूद्रजाती संबंधाचा. पु० शूद्र स्त्री आणि ब्राह्मण, क्षत्रिय, किं० वैश्य पुरुष ह्यांचा पुत्र.संपत्तीला वारस असे जे बारा प्रकारचे पुत्र धर्मशास्त्रांत सांगितले आहेत त्यांपैकीं बारावा. मागें 'द्वादश' मध्यें ' द्वादश पुत्र 'पहा.

**शौनक** [ सं० ] पु० एक ऋषि. यास सूतानें भारतादि इतिहास सांगितला.

**शौनिक** [ सं० ] पु० खाटिक; पशु मारून मांस विकण्याचा धंदा करणारा.

**शौरसेनी** [सं०] स्त्री० संस्कृतापासून उत्पन्न झालेली एक प्राकृत भाषा.

**शौरि** [सं०] पु० १ विष्णु. २ कृष्ण. ३ बलराम. ४ शनि हा ग्रह. [वीर्य.

**शौर्य** [सं०]न०१शूरपणा;धीटपणा.२ पराक्रम;

**श्मशान** [सं०] न० प्रेतें जाळण्याची किं० पुरण्याची जागा; मसण. ॐ **श्मशानकर्म** न०, **श्मशानक्रिया** स्त्री० और्ध्वदैहिक विधि. **श्मशाननिद्रा** स्त्री० मरण. **श्मशानभट** पु० और्ध्वदैहिक मंत्र सांगणारा ब्राह्मण; कारटा. **श्मशानवैराग्य** न० क्षणमात्र टिकलेलें किं० टिकणारें वैराग्य किं० संसाराविषयीं अप्रीति. **श्मशानसाधन** न० श्मशानांत बसून वेताळ इ० उग्र देवता वश करून घेण्यासाठीं केलेलें किं० करावयाचें अनुष्ठान. **श्मशानरोदन** न० निरुपयोगी किं० निष्फळ रोदन किं० रडणें.

**श्मश्रु** [सं०] स्त्री० १ दाढी. २मिशी.ॐ**श्मश्रु करविणें** न्हाव्याकडून हजामत करवून घेणें. **श्मश्रुल** वि० ज्याच्या मिशा, दाढी, कल्ले, इ० झुबकेदार किं० फार वाढलेले आहेत असा(पुरुष).

**श्याम** [ सं० ] वि० १ काळा; काळसर; सांवळा. २ काळा आणि निळा(ढग).पु० १ढग.२ तमाल वृक्ष.३ प्रयागांतलि एक विशिष्ट वड. ॐ **श्यामकंठ** पु० १ शंकर. २ मोर. **श्यामकर्ण** पु० अश्वमेधांतील घोडा. **श्यामांग** पु० बुध हा ग्रह. **श्यामकल्याण** पु० कल्याण रागाचा एक भेद. **श्यामशबल** पु० अ० व० १ यमराजाचे दोन कुत्रे. २ वाईट कृत्यें एकमेकांच्या मदतीनें करणारे दोन हलकट मित्र.

**श्यामक, श्यामाक**[ सं ]पु०सांवा हें धान्य.

**श्यामल** [सं०] वि० काळा; काळासांवळा.

**श्यामिका** [ सं० ] स्त्री० १ काळेपणा; काळसरपणा. २ धातूचा हिणकसपणा.

**श्याल, श्यालक** [सं०] पु० बायकोचा भाऊ.

**श्यालिका,श्याली** स्त्री०बायकोची बहीण;मेहुणी.

**श्येन** [ सं० ] पु० ससाणा हा पक्षी. **श्येनी** स्त्री० या पक्ष्याची स्त्री. ॐ **श्येनकपोतीय** न० आकस्मिक संकट. **श्येनपात** पु० उंचावरून घातलेली झडप.

**श्रद्धान** [ सं० ] वि० श्रद्धावान्; श्रद्धालु.

**श्रद्धा** [ सं० ] स्त्री० १ विश्वास; भरंवसा. २ धर्मांवर विश्वास; आस्तिक्य बुद्धि. ३ गुरुजनासंबंधानें आदर; वडील माणसें सांगतात तें सर्व खरें आहे किं० कल्याण करणारें आहे अशी बुद्धि. ४ मत; समजूत. ५ ( **मराठींत** ) अपान वायु. ॐ **श्रद्धाजाड्य** न० हेकटपणाचा भरंवसा; आपल्या मताच्या विरुद्ध कितीही बाध किं० आक्षेप दिसत असले तरी आपलें मत न सोडणें किं०आपलें मतच खरें आहे असा हटवादीपणा. **श्रद्धाभक्ति, श्रद्धापूर्वक भक्ति** स्त्री० ईश्वराच्या चांगुलपणाबद्दल पूर्ण खात्री असून जी ईश्वराची भक्ति कोणी मनुष्य करतो ती. **श्रद्धालु श्रद्धावान्** वि० १ विश्वास ठेवणारा. २ ईश्वरासंबंधानें पूर्ण श्रद्धा ज्याच्या मनांत आहे असा.

**श्रद्धेय** [ सं० ] वि० विश्वासाला पात्र.

**श्रम** [ सं० ] पु० १कष्ट; आयास. २ मेहेनत; व्यासंग. ३ थकवा. ४ शरीर बळकट व्हावें म्हणून करतात ती कसरत किं० व्यायाम. ५ खेद; विषाद; दुःख. ॐ **श्रम टाकणें** थकवा घालविणें; पुन्हा ताजेंतवानें होणें. **श्रमकर्म** न० कष्टाचें किं० जिकीरीचें काम. **श्रमी** [ सं० श्रमिन् ] वि० १ उद्योगी. २ थकलेला; श्रांत. **श्रमपरिहार** पु० थकवा नाहीसा होणें किं० होण्याचा उपाय.

**श्रमणें** [ सं० श्रम् ] अ० क्रि० दमणें; थकणें; फार कष्ट केल्यामुळें निर्वीर्य होणें किं० गळणें.

**श्रमण,श्रमणक**[सं०]पु०१संन्यासी. २तपस्वी. ३ भिक्षु;गोसावी. **श्रमणा,श्रमणी** स्त्री०जोगीण.

**श्रमाविणें** [ म० 'श्रमणें' चें प्रयोजक ] स० क्रि० दमविणें; कष्टविणें.

**श्रय** पुढें ' श्रेय ' पहा.

**श्रवण** [ सं० ] पु०, न० कान; ऐकण्याचें इंद्रिय. न० ऐकणें; कर्णेंद्रियानें जाणणें किं० अनुभविणें. पु० बाविसावें नक्षत्र. ॐ **श्रवणेंन्द्रिय** न० ऐकण्याचें इंद्रिय; कान. **श्रवणगोचर, श्रवणपथ, श्रवणविषय** पु० ऐकण्याचा टप्पा; ऐकण्याचा विषय. **श्रवणद्वादशी** स्त्री० श्रवण नक्षत्रानें युक्त जी भाद्रपद किं० फाल्गुन शुक्ल द्वादशी ती. **श्रवणाचें श्रवण** न० कर्णेंद्रियाची ऐकण्याची शक्ति.

**श्रवणीय** [ सं० ] वि० ऐकण्याजोगें; ऐकण्याला योग्य किं०लायक; जें ऐकलेंच पाहिजे असें.

**श्रविष्ठा**[सं०]स्त्री० (**ज्योतिष**) धनिष्ठा नक्षत्र.

**श्रांत** [ सं० ] न० दमलेला; थकलेला. पु० १ तपस्वी. २ जितेन्द्रिय.

**श्राद्ध** [ सं० ] **न०** मृत पितरांचे उद्देशानें पुत्रादिकांनीं ब्राह्मणांस जेऊं घालणें, पिंडदान करणें, इ० जीं कर्में तीं समुच्चयानें ( करणें ). ॐ वि० श्रद्धायुक्त; श्रद्धालु. **श्राद्धदेव पु०** १ यम. २ विश्वेदेव. ३ पितर.

**श्राप इ०** मागें ' शाप ' इ० पहा.

**श्रामक** [ सं० ] **वि०** विद्या, द्रव्य, कला, इ० संपादन करण्याविषयीं मेहेनत करणारा.

**श्राव** पुढें ' स्राव ' पहा.

**श्रावक** [ सं० ] **पु०** १ श्रोता; ऐकणारा. २ शिष्य. ३ बुद्ध साधु. ४ बुद्ध भिक्षु. ५ पाखंडी.

**श्रावडा पु०,श्रावड स्त्री०**एक वीत दोडवीत उंचीचें झुडूप. ह्याचें पांढरें पान मंगळा गौरीला मुली वाहतात. **श्रावड न०** ह्या झाडाचें पान.

**श्रावण** [ सं० ] **पु०** हिंदूंच्या बारा महि-न्यांपैकीं एक; आषाढाच्या पुढचा आणि भाद्र-पदाच्या मागचा महिना. ॐ **श्रावणपाटी स्त्री०** लग्न झाल्यानंतर पहिला जो श्रावण महिना येतो त्यांत नवऱ्याकडून नवरीकडे बाहुल्या, सागरगोटे, जातीं, इ० मुलींच्या खेळण्याच्या वस्तु पाटींत भरून समारंभानें पाठविल्या जातात त्या समुच्चयानें किं० ती पाटी. आषाढ महिन्यांत नवरीकडून नवऱ्याकडे खेळणीं भरून जी पाटी पाठविली जाते तिला ' आषाढपाटी ' किं० ' आखाडपाटी ' म्हणतात. मागें ' आषाढ,' ' आखाड ' पहा. **श्रावणा,श्रावणी वि०** श्रावण महिन्यांतील. **श्रावणसर, श्रावणसरी, श्राव-णपाहळी स्त्री०** श्रावण महिन्यांत येते ती थोडा वेळ टिकणारी पण जोराची पावसाची सर,–जी येऊन गेल्यानंतर लगेंच ऊन्ह पडतें. **श्रावणी स्त्री०**१श्रावण महिन्यांत नवीं जानवीं घालण्याचा विधि. २ श्रावण महिन्यांतील पौर्णिमा.

**श्रावणें** [ सं० स ] **अ० क्रि०** पाझरणें.

**श्राव्य** [ सं० ] **वि०** १ ऐकावयाचें; ऐकण्याजोगें; ऐकू येण्याजोगें; ऐकावयास योग्य. २ ( **साहित्य** ) काव्यभेद; उ० रघुवंश हें श्राव्य काव्य आहे.

**श्री** [ सं० ] **स्त्री**१संपत्ति; धनदौलत. २ लक्ष्मी देवी. ३ समृद्धि; वैभव; भरभराट. ४राजलक्ष्मी. ५ सौंदर्य; शोभा; कांति. ६ ( समासांत ) मंग-लरूप; उ० श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीसीता, श्रीक्षेत्र काशी, इ०. ७ धर्म, अर्थ, आणि काम, ही त्रयी. ८ स्त्रीधन. ९ दैवीशक्ति. १० सरस्वती. ११ कीर्ति. १२ वेदत्रयी; ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद, हे तीन समुच्चयानें. १३ हत्तीच्या डोक्यावर शोभेसाठीं घालतात तें उंचवस्त्र. ॐ **श्रीकंठ पु०** १ शंकर. २ भवभूति हा संस्कृत कवि. **श्रीकर वि०** कल्याणकारक.**श्रीकरण न०** लेखणी.**श्रीधर, श्रीनिवास,श्रीकान्त, श्रीपति, श्रीरंग पु०** विष्णु; कृष्ण. **श्रीखंड पु०, न०** १ चंदन. २ **न०** ( **मराठींत** ) दह्याच्या चक्क्यांत केशर, इ० द्रव्यें घालून करतात तें पक्वान्न. ३ भांगेंत साखर, वेलदोडे, इ० घालून करतात तें पेय. **श्रीगदित न०** ( **साहित्य** )एक प्रकारचें रूपक. **श्रीघन पु०** बुद्ध साधु. **श्रीद पु०** कुबेर. **श्रीवत्स पु०** १ विष्णु. २ विष्णूच्या छातीवरील पांढरा केशमय भोंवरा. ३ चोरानें भिंतीस पाडलेलें भोक. **श्रीमत् (-द्) वि०** मंगल, शुभ; उ० श्रीमद्भागवत, श्रीमद्रामायण, इ०. **श्रीवर्धन पु०** शंकर. **श्रीमान्, श्रीमंत पु०** १ ज्याच्या-जवळ पुष्कळ द्रव्य आहे असा. २ दैववान्. ३ प्रख्यात. ४ कोणीही थोर माणूस. ५ पुण्याच्या पेशव्यांची पदवी.**श्रीफळ न०**नारळ.**कोणेकाला श्रीफळ देणें** १ त्याला निरोप देणें. २ हाकलून लावणें. **श्रीकार पु०** १ श्री हें अक्षर. २ पत्र, यादी, इ० च्या सुरवातीस लिहितात तें ' श्री ' हें अक्षर. ३ देणें, घेणें, इ० व्यवहार करण्यास योग्य आणि पतीचा असा मनुष्य. ४ कोणीही वैभवशाली माणूस. **वीरश्री स्त्री०** वीर्य;पराक्रम; उत्साह. **जयश्री स्त्री०** जयाची देवता. **गृहश्री स्त्री०** १ घराचें वैभव. २ पत्नी. **श्रीमुख न०** मुख ( स्तुतींत किं० निंदेंत ). **कोणेकाच्या श्रीमुखांत लगावणें, कोणेकाचें श्रीमुख रंग-विणें** त्याच्या थोबाडींत मारणें. **श्रीमंतपूजन न०** मागें ' सीमा ' मध्यें पहा. **श्रीमंती, श्रीमं-तकी स्त्री०**धनधान्यादींनीं कोणेकाची जी वैभव-संपन्न स्थिति ती. **श्रीमंती वि०** भपकेदार; थाट-माटाची ( राहाणी, मेजवानी, इ० ). **श्रीमुद्रा स्त्री०** वैष्णव लोक गोपीचंदनानें अंगावर वठवि-तात ज्या शंख, चक्र, पद्म, गदा, आणि रामनाम ह्या पांच मुद्रा त्या प्रत्येक. **श्रीराग पु०** ( **संगीतांत** ) एक रागविशेष. **श्रीवैष्णव पु०** विष्णुभक्तांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणीही इसम. **श्रीवर्धन न०** कोंकणपट्टीचें एक शहर. पेशवे हे येथचे राहाणारे होते. येथील रोठ्यास ' श्रीवर्धनी रोठा किं० सुपारी ' म्हणतात.

**श्रुत** [ सं० ] वि० १ ऐकिलेलें. २ जाणलेलें. ३ प्रख्यात. ४ देईन म्हणून वचनानें दिलेलें; देऊं केलेलें. ५ वेदरूप; वेदांस मान्य. न० १ ऐकणें. २ ऐकिलेली गोष्ट. ३ विद्या, शास्त्र, इ० जें कोणेकानें संपादिलेलें आहे तें. ४ वेद. ॐ **श्रुतकीर्ति** वि० १ उदार. २ प्रख्यात. **श्रुतवान्** वि० १ विद्वान्. २ ज्यानें ऐकिलें आहे असा.

**श्रुति** [ सं० ] स्त्री० १ ऐकणें; ऐकण्याची क्रिया. २ कान; श्रवणेन्द्रिय. ३ बातमी; खबर; अफवा. ४ आवाज; ध्वनि. ५ कीर्ति; प्रख्याति. ६ वाणी; भाषण. ७ वेद; वेदाची संहिता. ९ वेदवाक्य. १० ब्रह्मप्रतिपादक वाक्य. ११ कोणेक कार्याचें फल. १२ ( **ज्योतिष** ) श्रवण नक्षत्र. १३ ( **गणित** ) कर्ण; काटकोन त्रिकोणांतील काटकोना समोरची बाजू. १४ ( **मराठींत** ) बातमीला आधार; कांहीं विधानाचा पुरावा. ॐ **श्रुत्यनुप्रास** पु० एक शब्दालंकारविशेष. कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्त्य, ओष्ठ्य, हीं जीं व्यंजनांची स्थानें आहेत त्यांपैकीं कोणत्याही एकाच स्थानची अनेक अक्षरें पुष्कळ वेळां आणि कोणत्याही क्रमानें आलीं असतां श्रुत्यनुप्रास होतो; उदाहरण आणि विशेष खुलासा आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकाच्या उपोद्घातांत पहा. **श्रुतिकटु** वि० १ कानाला कर्कश वाटणारा ( शब्द इ० ). २ ऐकण्याला दुःखकारक (बातमी इ० ). ३ ( **साहित्य** ) उच्चारावयास कठिण आणि ऐकण्यास कठोर अशा शब्दांचा कवितेंत उपयोग करण्यानें होणारा (दोष). विशेष माहिती गणेश मोरेश्वर गोरे ह्यांच्या काव्यदोषदीपिकेंत पहा. **श्रुतिपथ** पु० ऐकण्याचा टप्पा; उ० ही गोष्ट इतकी जुनी असून माझ्या श्रुतिपथावर कालच आली. **श्रुतिमान्** वि० वेदपारंगत. **श्रुतिविषय** पु० १ आवाज; ध्वनि. २ ऐकण्याचा टप्पा. **श्रुतिशिखर, श्रुतिशिर (श्रुतिशिरस्)** न० उपनिषद्, वेदांत.

**श्रूयमाण** [सं०] वि० जें ऐकिलें जात आहे तें.

**श्रेढी** [ सं० ] स्त्री० १ ( **गणित** ) कांहीं विशिष्ट नियमाला अनुसरून असलेली संख्यांची पंक्ति. २ कोणतीही पंक्ति; रांग; समुदाय. ॐ **श्रेढीफल** न० संख्यामालेची बेरीज.

**श्रेणि** [ सं० ] स्त्री० १ ओळ; रांग. ३ पंक्ति. २ समुदाय. ३ व्यापाऱ्यांची किं० कारागिरांची मंडळी किं० संस्था. ४ व्यूहरचना.

**श्रेधी** [ सं० ] स्त्री० १ पदार्थांची मालिका किं० परंपरा. २ ( **गणित** ) कांहीं नियमाप्रमाणें असलेली संख्यांची पंक्ति. ३ पर्यवसान.

**श्रेय** [ सं० श्रेयस् ] वि० १ अधिक चांगलें. २ उत्तम. ३ शुभ; कल्याणकारक. न० १ पुण्य. २ कल्याण. ३ शुभप्रसंग. ४ मोक्ष. ५ पुण्यसाधन. ६ वैभव; भरभराट; संपन्नपणाची स्थिति. ७ स्तुतिपात्रता; उ० मला औषध देऊन बरें केल्याचें श्रेय ह्या जोशी वैद्यांकडे आहे. ' श्रय ' हें अपभ्रष्ट रूप. ॐ **श्रेयस्कर** वि० १ मोक्षप्रद. २ स्तुत्य; अभिनंदनीय. ३ वैभवदायक. **श्रेयःसंपादन** न० १ पुण्य संपादणें. २ स्तुतिपात्रता. ३ दुसऱ्याकडून कांहीं पुण्यकर्म आपण पैसे देऊन आपणासाठीं करविलें असतां जें पुण्य आपणास लागतें तें. ४ आपण केलेल्या कृत्याचें पुण्यरूप किं० पापरूप जें फळ आपणास मिळतें तें. 'श्रेयसंपाद्य ' हें अपभ्रष्ट रूप. **श्रेयान्** [ सं० 'श्रेयस्' च्या प्रथमेचें पु० ए० व० ] वि० अत्यन्त उत्कृष्ट; सर्वोत्तम; उत्तमोत्तम. **श्रेयोर्थी** पु० १ आपला हितचिंतक. २ श्रेय मिळवूं पाहणारा. ३ पुण्यकर्में करून पुण्य संपादनार्थ झटणारा. **श्रेयोवान्** वि० वैभवशाली; संपन्न स्थितींत असलेला.

**श्रेष्ठ** [ सं० ] वि० अति उत्तम. ॐ **श्रेष्ठाश्रम** पु० गृहस्थाश्रम.

**श्रेष्ठी** [ सं० श्रेष्ठिन् ] पु० १ शेट; शेटजी. २ व्यापारी किं० कारागीर यांच्या संस्थेचा मुख्य.

**श्रैष्ठ्य** [ सं० ] न० श्रेष्ठपणा.

**श्रोणि, श्रोणी** [ सं० ] स्त्री० १ रस्ता. २ कंबर. ३ ढुंगण. ॐ **श्रोणीफलक** न० ढुंगणाचें फळें. **श्रोणिसूत्र** न० तरवार अडकविण्याचा कंबरपट्टा.

**श्रोतव्य** [ सं० ] वि० ऐकावयास पाहिजे असें; जें ऐकणें जरूर आहे तें; उ० अरे, आत्मा हा श्रोतव्य, मंतव्य, आणि निदिध्यासितव्य आहे.

**श्रोता** [ सं० श्रोतृ ] पु० १ ऐकणारा. २ शिष्य. पु० सभादिप्रसंगीं व्याख्यानादि ऐकावयास आलेला मनुष्य; उ० कालच्या सभेस वीस हजार श्रोते जमले होते.

**श्रोत्र** [ सं० ] न० कान; कर्णेन्द्रिय.

**श्रोत्रिय** [ सं० ] पु० १ वेदवेत्ता ब्राह्मण. २ अग्निहोत्री. टीप.–'श्रोतीय,' ' श्रोती,' 'श्रोत्री,' हीं अपभ्रष्ट रूपें होत.

**श्रौत** [ सं० ] वि० १ वेदासंबंधीं. २ यज्ञसंबंधी. ३ वेदांत करावें म्हणून सांगितलेलें(कर्म). न० १ वेदोक्त यज्ञादि कर्म. २ अग्निहोत्र. ३ करावयाचीं म्हणून वेदांत सांगितलेलीं जीं कर्में

त्यांच्या संबंधाचें शास्त्र किं० ग्रंथ. श्रौती म्हणजे श्रौतशास्त्रांत पारंगत.

**श्रथ** [ सं० ] वि० १सैल; ढिलें. २विसकटलेलें. अस्ताव्यस्त; विसकळीत. **टीप,**—ह्या दोन्ही अर्थी ' विश्लथ ' सुद्धां.

**श्लाघणें** [सं०श्लाघ्]स०क्रि०स्तविणें;प्रशंसिणें.

**श्लाघनीय, श्लाघ्य** [ सं० ] वि० स्तुत्य; प्रशंसनीय; स्तुतीस पात्र. [२ बढाई.

**श्लाघा** [ सं० ]स्त्री० १ स्तुति; प्रशंसा;तारीफ.

**श्लिष्ट** [ सं० ] वि० १ चिकटलेलें. २ आलिंगिलेला. ३ संयुक्त; संबद्ध; जुळलेला. ४ (**साहित्य**) अनेकार्थी ( शब्द, वाक्य, इ० ). ' चंद्रासि लागति कळा उपराग येतो ' इ० रघुनाथ पंडिताचा श्लोक पहा. ' तूं मलिन, कुटिल, नीरस, इ०,'ही मोरोपंतांची आर्यायांत श्लिष्ट पदें आहेत पुढें ' श्लेष ' पहा.

**श्लीपद** [ सं० ] न० पाय सुजणें हा रोग.

**श्लील** [ सं० ] वि० १ दैवी. २ सुंदर. ३ सभ्य. **अश्लील** न० असभ्य.

**श्लेष** [ सं० ] पु० १ आलिंगन. ' आश्लेष ' ह्याच अर्थी. २ चिकटणें. ३ समागम; संयोग. ४ (**साहित्य**) वाक्यांत एका शब्दाचे दोन अर्थ घेऊन त्या वाक्याचा अर्थ विवक्षित असल्यास तो शब्द ' श्लिष्ट ' आहे असें म्हणतात. श्लिष्ट शब्दाच्या जागीं पर्याय शब्द योजल्यानें श्लेषाला क्षति होत असेल म्हणजे बाध येत असेल तर तो शब्दश्लेष आणि क्षति होत नसेल म्हणजे बाध येत नसेल तर तो अर्थश्लेष. जेव्हां एकाच वाक्याचे अनेक अर्थ होतात आणि संदर्भादिकांच्या अभावामुळें त्या अर्थांतून कोणताही अर्थ घेणें शक्य असतें तेव्हां श्लेष हा अर्थालंकार होतो; उ० ' तूं मलिन, कुटिल, नीरस, इ०' ही मोरोपंतांची प्रसिद्ध आर्या अर्थश्लेषाचें प्रसिद्ध उदाहरण आहे. 'मी मयूर शुकाप्रमाणें बोलूं इच्छितों' ह्या वाक्यांत ' मयूर ' आणि ' शुक ' हे शब्द श्लिष्ट आहेत. हें शब्दश्लेषाचें उदाहरण. येथें हेच शब्द योजल्यास श्लेष होतो. ह्याच अर्थाचे अन्य शब्द योजल्यास श्लेषाची क्षति होते. विशेष तपशील आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

**श्लेष्मा** [ सं० श्लेष्मन् ] पु० १ कफ. २ पू.

**श्लोक**[सं०]पु०१स्तुति;स्तोत्र.२पद्य,–मालिनी, स्रग्धरा, मंदाक्रांता, इ०. ३ कीर्ति; उ०पुण्यश्लोक.

**श्व** [ सं० श्वन्=कुत्रा ] पु० कुत्रा. समासांत पूर्व पदीं 'श्व'हें रूप येतें. पुढील सामासिक शब्द मराठींत रूढ आहेत. ॐ **श्ववृत्ति** स्त्री० दुसऱ्याची सेवा किं० चाकरी. **श्वपच, श्वपाक** पु० १ क्षत्रिय पुरुष आणि उग्रा स्त्री यांचें अपत्य. २ चंडाळ. **श्ववृत्ति** स्त्री० स्वाभिमानशून्य अशी वरिष्ठाची सेवा. ' श्वानवृत्ति ' ह्याच अर्थी. **टीप,**–' श्वान ' हें मराठी रूप. ' श्वान ' शब्द पुढें यथास्थान पहा.

**श्वशुर** [ सं० ] पु० सासरा; बायकोचा बाप किं० पत्नीचा बाप.

**श्वश्रू** [ सं० ] स्त्री० सासू; बायकोची आई किं० पतीची आई.

**श्वसन** [ सं० ] पु० वायु. न० १ श्वासोच्छ्वास. २ सुसकारा.

**श्वान** [ सं०श्वन् ] पु०, न० कुत्रा; कुत्रें. ॐ **श्वानचेष्टा** स्त्री०अ० व० निंद्य खुशामत (करणें). **श्वाननिद्रा** स्त्री० अगदीं थोडी इशारत किं० आवाज होतांच नाहींशी होणारी झोप. **श्वानपुच्छ** न० जो कोणत्याही उपायानें सरळ होत नाहीं, जो आपलें स्वैर वर्तन कितीही बोध केला तरी सोडीत नाहीं असा माणूस. **श्वानमैथुन** न० आरंभीं सुखदायक परंतु अंतीं दुःखदायक असें कोणतेंही कृत्य. **श्वानवैखरी** स्त्री० ज्याच्या त्याच्यावर तोंड टाकणें; शिव्यागाळींचें भाषण. **श्वानशूरत्व** न० भिञ्यापुढें शौर्य आणि शूरापुढें भित्रेपणा दाखविणें हा गुण. **श्वानस्वभाव** पु० तिरसटपणाची वृत्ति. **श्वानी** [ सं० शुनी; म० श्वान=कुत्रा ] स्त्री० कुत्री.

**श्वापद**[सं०]पु०१वाघ.२कोणताही हिंस्र पशु.

**श्वास** [ सं० ]पु० नाकानें किं० तोंडानें आंत बाहेर येत जात असतो जो प्राणवायु तो; श्वासोच्छ्वास. २सुसकारा. ३वारा;वायु.४(**वैद्यक**)दमा; कफादि रोगानें लागतो तो दम किं० लागते ती धाप. ५ कष्टाच्या कामामुळें किं० धावणें इ०मुळें नाकातोंडांतून वायु जोरानें आंत येणें आणि बाहेर जाणें ही क्रिया; दम ( लागणें ). ॐ **श्वासोच्छ्वास** पु०ए०व० नाकानें किं० तोंडानें प्राणवायु शरीरांत शिरणें किं० शरीरांतून बाहेर पडणें ही क्रिया. **श्वासकुठार** पु० एक वैद्यकी रसायन. **श्वासावरोध** पु० दमा.

**श्वेत**[सं०]वि०पांढरें;शुभ्र.पु०शुक्र हा ग्रह.न० रूपें हा धातु.ॐ**श्वेतांबर,श्वेतपट** पु० जैन साधूंचा एक पंथ. **श्वेताद्रि, श्वेतपर्वत** पु० कैलास. **श्वेताश्व, श्वेतवाह, श्वेतवाहन** पु० अर्जुन,– धर्माचा धाकटा भाऊ. **श्वेतद्वीप** न० १ वैकुंठ. २ इंग्लंड हा देश. **श्वेतकृष्ण होणें** मरणें. **श्वेतकुष्ठ** न० पांढरें कोड.

# ष

**ष** मराठी व्यंजनमालेंतील एकतिसावें व्यंजन.

**षट्** [ सं० षष्=सहा ] **वि०** सहा. **टीप,**— स्वर आणि मृदु व्यंजनें यांच्या पूर्वी ' षष् ' चें ' षड् ' असें रूप होतें आणि कठोर व्यंजनांपूर्वी 'षट्'असें रूप होतें,आणि अनुनासिकापूर्वी 'षण्' असें रूप होतें.※**षट्क न०**सहा पदार्थांचा समुच्चय. **षडाष्टक न०** वैर; शत्रुत्व. मागें ' खडाष्टक ' पहा. **षडक्षर न०** ' कांहीं येत नाहीं ' ह्या सहा अक्षरांच्या रूपाची विद्या म्ह० अज्ञान. त्याला षडक्षर येतें किं० तो षडक्षरी विद्वान आहे ह्म० तो अगदीं अशिक्षित किं० निरक्षर आहे. **षड्ऋतु पु०** वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमन्त, आणि शिशिर, हे सहा ऋतु. मागें ' ऋतु ' मध्यें यांचे अवधि पहा. **षडंग न०** ए० व० १ दोन हात, दोन पाय, डोकें, आणि कंबर. हीं सहा अंगें किं० गात्रें समुच्चयानें ( मंत्रन्यासांत ). २ सहा वेदांगें,— शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष,आणि निरुक्त, हीं प्रत्येक किं० समुच्चयानें. **षट्पद, षडंघ्रि पु०** भुंगा. **षडभिज्ञ पु०** गौतमबुद्ध. **षडानन, षण्मुख पु०** कार्तिकेय; कार्तिकस्वामी. **षट्कर्ण पु०** सहा कान. **वि०** तिसऱ्यास कळलेलें; जाहीर झालेलें. **षट्कर्णी वि०** सहा कानांत शिरलेलें ह्म० अनेकांस कळलेलें; जगजाहीर. **षट्कर्णी क्रि० वि०** सहा कानांत म्ह० सर्व लोकांत. टीप,—एकाद्या गोष्टीचा विचार दोन माणसांनींच केल्यास तो गुप्त राहातो. तिसरा मनुष्य घेतला तर तो सर्व लोकांत प्रकट होतो. दोन कान म्ह० एक मनुष्य; चार कान म्ह० दोन मनुष्यें; षट्कर्ण म्ह० तीन मनुष्यें. **षटकर्णी करणें आणि घोटाळ्यांत पडणें** दोनच माणसांनीं कांहीं मसलत केली तर ती गुप्त राहाते. तीन माणसांनीं केलेली मसलत फुटते आणि काम बिनसतें. **षट्कर्मा** [ सं० षट्कर्मन् ] **पु०** ब्राह्मण. **षट्कर्मे न० अ० व०** ब्राह्मणाचीं अध्ययन दान, याजन, अध्यापन, प्रतिग्रह, आणि यजन हीं सहा कर्मे. **षट्कोण न०** १ वज्र. २ हिरा. ३ ( भूमिति ) सहा कोनांची आकृति. ह्या अर्थी ' षडस्त्र ' सुद्धां. **षड्गुण पु० अ० व०** राजव्यवहारांतील सहा गुण,— संधि, विग्रह, यान, आसन, संश्रय, आणि द्वैध. मागें ' गुण ' अर्थ १६ पहा. **षट्चरण पु०** भुंगा; भ्रमर. **षड्ज पु०** (संगीत) सात स्वरांपैकीं एक; ते सात स्वर हे:-सा,रे, ग, म, प, ध, नी. **षड्दर्शन न०** सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, आणि वेदान्त. ह्यांना सहा शास्त्रें म्हणतात आणि हीं सहा जाणणाऱ्याला ' षट् शास्त्री ' म्हणतात. **षड्गुणैश्वर्यसंपन्न वि०** ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान, आणि वैराग्य, ह्या सहा गुणांनीं संपन्न ( ईश्वर, साधु, किं० राजा ). **षड्रस पु०** मधुर, आंबट, खारट, तिखट, तुरट, आणि कडू, हे खाद्यपेयांचे सहा रस.**षट्प्रज्ञ पु०**चार पुरुषार्थ, व्यवहार, आणि तत्त्वज्ञान, हीं सहा जाणणारा. **षग्रही स्त्री०** सहा ग्रह एका राशींत येणें. **षण्मासिक वि०** सहा महिन्यांनीं व्हावयाचा किं० करावयाचा. **षड्वर्ग पु०** सहा पदार्थांचा समुदाय. **षड्वर्ग, षडरि पु०** काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे मनुष्याच्या अंत:करणांतील सहा शत्रु.

**षंड, षंडक**[सं०]**पु०** २ बैल. २पोळ.३नपुंसक. **पु०,न०** समूह; समुदाय; उ० तरुषंड म्ह० राई.

**षंढ**[सं०]**पु०**नपुंसक.**षंढतिळ पु०**पोचट तीळ.

**षष्टि** [ सं० ] **वि०** साठ; तासाच्या दुपटी इतकें.※**षष्टिक पु०**साठ दिवसांनीं पिकणारें भात.

**षष्ठ** [ सं० ] **वि०** सहावा. ※ **षष्ठांश पु०** उत्पन्नांपैकीं राजाला द्यावयाचा सहावा भाग. **षष्ठी स्त्री०** १ सहावी तिथि. २ ( व्याकरण ) **स्त्री०** १ चा, ची, चें, इ०प्रत्यय लागून होणारी विभक्ति. २ देवताविशेष; सटवी. बाळंतिणीच्या प्रसूतिनंतर सहाव्या दिवशीं हिची पूजा करतात. ह्या पूजेला ' षष्ठीपूजन ' नं०म्हणतात.

**षांद, षादमाने, षादमानी** मागें ' शाद, ' ' शादमान, ' ' शादमानी ' पहा.

**षोक, षोकी** मागें ' शौक, ' ' शौकी ' पहा.

**षोडश** [ सं० ] **वि०** सोळावा.

**षोडश** [ सं० षोडशन्=सोळा ] **वि०** सोळा. ※ **षोडशोपचार पु०** पूजेंतलि आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा, आणि मंत्रपुष्प, हीं सोळा अंगें. **षोडश संस्कार पु०** पुढें ' सोळा ' मध्यें ' सोळा संस्कार ' पहा.

# स

**स** मराठी व्यंजनमालेंतील बत्तीसावें व्यंजन.

**स** [ सं० सह, सम्, सम, तुल्य, एक, ह्या संस्कृत शब्दांच्या अर्थी समासारंभीं ] **उपसर्ग** युक्त, सहित; उ० सपुत्र म्ह० पुत्रासह; सभार्य म्ह० भार्येसहित; सकुटुंब म्ह० कुटुंबासहवर्तमान; सतृष्ण म्ह० तहानेनें युक्त म्ह० तान्हेला; सतीर्थ म्ह० त्याच गुरूचा शिष्य; सोदर म्ह० त्याच उदरांतून जन्मलेला म्ह० भाऊ.असे 'स' लागून झालेले सर्व शब्द मराठींत विशेषणें असतात. [लुप्त.

**स** [ म० ' सौदा ' चें आद्याक्षर ] पु० सौदा;

**सइलावणें, सईल** इ० पुढें ' सैलावणें, ' ' सैल, ' इ० पहा.

**सई, सही** [ अ० सहीह=निर्दोष् ] उ०वा० अ० १ होय, ठीक, कबूल, मान्य; उ० सई म्हणणें ( किं० करणें ) म्ह० कबूल करणें किं० मान्य करणें; संमति दर्शविणें; उ० हा करार मी सई करतो. **वि०१** जिंकलेला;कबज्यांत घेतलेला; पदरांत पाडून घेतलेला; गांठलेला; उ० तानाजीनें सिंहगड सई केला; उ० आपण संध्याकाळपर्यंत चिंचवड सई करूं. २ शेवटास नेलेलें. **स्त्रि०** १ संमति दर्शविणारें कागदावर केलेलें काहीं चिन्ह,–नांव, तुळशीपत्र, नांगर, शिक्का, इ० रूप. ३ प्रयत्न; खटपट; उ० माझ्या कार्याविषयीं तुम्ही मध्यस्थापाशीं सही करावी. ४ बरकत; पुरवठा; वाढ; शिल्क; उ० प्रत्येक ब्राह्मणास पावली पावली दक्षिणा देऊन सुद्धां तीन रुपयांची सई आली. ꣸ **तूं त्याच्या घरीं जा तर सई कीं मी तुला कुटून काढीन** म्ह० गेलास तर मी तुला शिक्षा करीन. **अगोदर जा तर सही, मग बक्षीसाबद्दल बोल** आधीं जा तर खरा मग इ०. **औषध घे तर सई मग गुणाविषयीं बोल** प्रथम औषध घे मग इ०. **सईसाक्ष** स्त्री० ए० व० रोखा, दस्तऐवज, करारपत्र, इ० कायदेशीर रीत्या पूर्ण व्हावयाला सह्या, साक्षी, इ० ज्या कांहीं जरूर गोष्टी त्यांचा समुच्चय; उ० ह्या कागदावर सईसाक्ष घालून घेतल्याशिवाय परत येऊं नको. **सईसुद** [ म० सई+शुद्ध ] वि० सही, साक्ष, इ० च्या योगानें कायदेशीर किं० बंधनकारक असा ( करार, खत, इ० ).

**सई, सय** [ सं० स्मृति ] स्त्री० १ स्मृति; स्मरणें; आठवण; उ० मला सई कर; उ० त्याला सय झाली तर तो तें काम करील. २ प्रेमानें मुलाच्या डोक्यानें आपल्या डोक्यावर प्रहार करून घेणें ( देणें ). ꣸ **सईसुमार, सयसुमार** पु० ए० व० १ अंदाज; अटकळ. २ तारतम्य; विचार; विवेकबुद्धि; उ० रागाच्या भरांत तो भलतेच बोलून जातो, त्याला सईसुमार राहात नाहीं.

**सई** [ सं० सखी ] स्त्री० सखी; मैत्रीण.

**सईम** वि० अखंड; सलग; मध्यें खंड नसलेलें; उ० येथून वडगांवपर्यंत पाटलाची सईम पांच शेतें आहेत.

**सईल** पुढें ' सैल ' पहा.

**सउमार** वि० पुढें ' सुकुमार ' पहा.

**सऊळ, सौळ** वि० किंचित् मचूळ ( पाणी, इ० ).

**सक** [ सं० षष्=सहा ] पु०, न० सहा ( फाशांवरच्या चिन्हांसंबंधानें बोलतांना ); उ० सकरेजा. क्रि० वि० सहा पटीनें; उ० तीन सक आठरा;आठ सक अठ्ठे चाळीस.

**संकट** [सं०] न० १ दुःख; आपत्ति; अडचण. २अनिष्ट गोष्ट;अप्रिय गोष्ट. **वि०**१अरुंद; संकुचित. २ दुर्गम. ३ गर्दी असलेला; पूर्णपणें व्यापिलेला. ꣸**संकटासमोर उभें राहाणें** येईल त्या संकटाला तोंड द्यावयाला छातीठोकपणें सिद्ध असणें. **संकटा** स्त्री० १ योगिनी. २ दुर्दैव आणणारी देवता ( येणें, गुदरणें, पडणें ); उ० यंदा आम्हावर संकटा आली आहे.

**सकट** वि० १ सहित; उ० पोशाखासकट ह्या पाटावर जेवावयास बसा; उ० पुढाऱ्यासकट ती टोळी पकडण्यांत आली. २ निवड किं० तारतम्य न करतां घेतलेला; दरोबस्त; उ० सकट घोडे बारा टके. ꣸ **सकटाई** स्त्री० सारखेपणा; भेद

अभेद न करणें. **सकटनिकट, सकटाखालीं, सकटांत, सकटामध्यें, सरसकट क्रि० वि०** चांगला वाईट असा भेद न करतां; निवड न करतां; एकंदरींत; उ० सकटांत पैशाला दहा कैऱ्या देईन, निवड करून घेणार असाल तर पैशाला पांच देईन. **सकट संक्रांत स्त्री०** गुन्हेगार, बेगुन्हेगार, इ० भेद न करतां सर्वांस सारखी केलेली शिक्षा ( बसणें, बसविणें ).

**सकटमळ, सगळमळ स्त्री०** कणसांसकट धान्यांचीं ताटें तुडवून धान्य काढणें. नुसती कणसें तुडवून धान्य काढणें हा दुसरा प्रकार.

**संकटा** मागें ' संकट ' मध्यें पहा.

**संकटीचतुर्थी, संकष्टी चतुर्थी, संकटी चौथ, संकष्टी चतुर्थी** [ **सं०** सकष्ट म्ह० देहाला कष्ट देऊन केलेलें ] **स्त्री०** प्रत्येक महिन्याच्या कृष्णपक्षांतील चतुर्थी ही तिथि ( व्रताविषयीं बोलतांना ). **विनायकी चतुर्थी स्त्री०** शुक्ल पक्षांतील चतुर्थी ( व्रताविषयीं बोलतांना ).

**सकडा** [ **म०** सहा; **सं०** षट्क ] **पु०** सहा फळांचा समुदाय.

**सकण** [ **सं०** स+कण ) **वि०** १ दाण्यांनीं ठासून भरलेलें ( कणीस ). २ कणसें ज्यांना आलीं आहेत अशीं ( जोंधळा इ० चीं ताटें ).

**सकणें** मागें ' शकणें ' पहा.

**संकथन न०, संकथा स्त्री०** [ **सं०** ] संभाषण.

**संकर** [ **सं०** ] **पु०** १ संयोग. २ मिश्रण; मिसळ; भेसळ. ३ जातींचें मिश्रण,–ब्राह्मण आणि अब्राह्मण इ०चीं लग्नें इ०रूप. ४(**साहित्य**) दोन किं० अधिक अलंकार एकाच पद्यांत असले तर संकर नामक अलंकार होतो. ह्याचे ( १ ) अंगांगिभावसंकर किं० मुख्यगौणभावसंकर; ( २ ) संदेहसंकर; आणि ( ३ ) एकप्रतिपाद्य संकर किं० एक वाचकानुप्रवेशरूप संकर असे तीन प्रकार मम्मटानें सांगितले आहेत. विशेष खुलासा आणि उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

**सकरकिडा** [ **म०** साखर + किडा ] **पु०** साखरच खाऊन राहाणारा किडा. ' साखर किडा ' असेंही ह्या किड्याला म्हणतात.

**संकरा, शंकरा पु०** ( **संगितांत** ) एक राग.

**सकराई, सकाराई** [ **हिं०** ] **स्त्री०** हुंडी सत्कारण्याबद्दल पेढीवाला किं० सावकार यांस द्यावें लागतें तें देय.

**सकरुण** [ **सं०** ] **वि०** दयाळू; प्रेमी.

**सकरेजा पु०** दुफाशी खेळांत फाशांवर पडलेलें एक दान. मागें 'रेजा' पहा.

**सकर्मक** [ **सं०**] **वि०** क्रियापदानें दर्शविलेली क्रिया करतो तो ' कर्ता. ' कर्त्याहून अन्य पदार्थावर ती क्रिया घडत असल्यास तो अन्य पदार्थ ' कर्म. ' ज्या क्रियापदाला असें कर्म असतें तें ' सकर्मक क्रियापद. ' रामा भगवद्गीता वाचतो ह्या वाक्यांत ' भगवद्गीता ' हें कर्म.

**संकर्षण** [ **सं०** ] **न०** १ एकीकरण. २ नांगरणें ही क्रिया. **पु०** १ बलराम २ शेष हा नाग. ३ जगाचा क्षय करणारा,–परमेश्वर.

**सकल** [ **सं०** ] **वि०** सर्व; संपूर्ण; दरोबस्त.

**संकलन न०, संकलना स्त्री०** [ **सं०** ] १ ढीग करणें; जमविणें; एकत्र जुळविणें. २ संचय. ३ संयोग; मिश्रण. ४ ( **गणित** ) बेरीज.

**सकलात (–द ), सखलात (–द )** [ **तुर्की** सखलात] **स्त्री०** एक प्रकारचें लोकरीचें उंची वस्त्र.

**संकलित** [ **सं०** ] **वि०** १ एकत्र केलेलें; मिश्रित; जुळविलेलें. २ थोडक्यांत सांगितलेलें; संक्षिप्त. ३ ज्यांची बेरीज केली आहे असा ( रकमा, संख्या, परिमाण ).

**संकल्प** [ **सं०** ] **पु०** १ इच्छा. २ हेतु; उद्देश. ३ मनाचा व्यापार; विचार; कल्पना. ४ निश्चित ज्ञान; निश्चयात्मक ज्ञान. ५ अंतःकरण. ६ निश्चय. ७ बेत. ८ कांहीं धर्मकृत्य करावयाचें असतां उपाध्याय यजमानाला सांगतो ते मंत्र, तंत्र, इ० रूप कर्म. ॐ **संकल्पबद्ध वि०** कांहीं धार्मिक कृत्य करावयाचा निश्चय केल्याकारणानें त्या कृत्याच्या समाप्तीपर्यंत अडकलेला( मनुष्य).

**संकल्पिणें** [ **सं०** ] **स० क्रि०** १ योजणें; कांहीं करावयाचें म्हणून मनानें ठरविणें किं० बेत करणें. २ ( **मराठींत** ) ( कांहीं काम किं० जबाबदारी ) कोणेकावर सोपविणें. ३( **मराठींत**) ( माणूस,पशु,पदार्थ, इ०)कोणेकाचे हवालीं करणें.

**संकल्पित** [ सं० ] वि० इच्छिलेलें; योजलेलें; करावयाचें म्हणून ठरविलेलें.

**सकल्या फणस** पु० जो कापाही नव्हे आणि बरकाही नव्हे अशा जातीचा फणस. मागें ' कापा, ' ' बरका ' पहा.

**सकवार** [ म० सकुमार ] पु० मधुर वास ज्याला येतो असा एक प्रकारचा तांदूळ. वि० नाजूक; मनोहर; सुंदर.

**सकष्ट** [सं० संकट ] पु०, न० अडचण; पेच. ( अशिक्षितांत रूढ ). मागें ' संकट ' पहा.

**सकष्ट, सकष्टित** [ सं० स ( सहित ) + कष्ट ] वि० १ कठिण, जिकीरीचें, पंचाइतीचें ( काम ). २ उद्योगी, मेहेनती ( माणूस ). ३ पंचाइतीची, अडचणीची (स्थिति). ॐ **संकष्टी चतुर्थी, संकष्टी** स्त्री० प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षांतील चतुर्थी ही तिथि ( व्रताविषयीं बोलतांना ). **विनायकी चतुर्थी** स्त्री० शुक्ल पक्षांतील चतुर्थी ( व्रताविषयीं बोलतांना ). ' संकष्ट ' हें ' सकष्ट ' चें अपभ्रष्ट रूप होय.

**सकस** [ सं० स ( सहित ) + म० कस ( वीर्य ) ] वि० मजबूत, कसदार, समर्थ, वीर्ययुक्त, सत्त्व असलेलें ( धान्य, दूध, तूप, गहूं, शरीर, लाकूड, इ० ). पोकळ, फोल, निःसत्त्व, पिसपिशीत, इ० च्या उलट.

**सकळ, सकळीक** मागें ' सकल ' पहा.

**सकळ** [ म० ' सुकाळीं ' चा अपभ्रंश ] क्रि० वि० १ सकाळीं. २ योग्य वेळीं; अगोदर. **सकळवेळीं** क्रि० वि०योग्य वेळीं;उ० तूं नोकरी सोडणार असलास तर मला सकळवेळीं सांग म्हणजे मी दुसरा नोकर पाहून ठेवीन.

**सकळीक** [ सं० सकल ] वि० सर्व.

**संकळीत** मागें ' संकलित ' पहा.

**सकाम** [ सं० ] वि० १ इच्छायुक्त; धन, पुत्र, वैभव, इ० ची ज्याला इच्छा आहे असा ( मनुष्य ). २ धन, पुत्र, वैभव, इ० च्या इच्छेनें प्रेरित होऊन केलेलें ( व्रत, धर्मकृत्य ). ३ कामविकारानें प्रेरित. ४ ज्याला प्रबळ कामविकार आहे असा ( पुरुष किं० स्त्री ).

**सकार** [ सं० स्वीकार किं० सत्कार ] पु० हुंडी पथकरणें किं० पथकरल्याची निशाणी.

**सकार** [ म० 'स' हें अक्षर ] पु० सोदा('स' ह्या अक्षरानें ' सोदा ' सुरूं होतो यावरून ). ॐ **सकारविल्हा** पु० सोद्यांचा वर्ग; उ० हा मनुष्य सकारविल्ह्यांतील आहे(म्ह०सोदा आहे ).

**सकारणें** [ म० सकार ] स० क्रि० ( हुंडी ) पथकरणें किं० मान्य करणें

**सकाराई** मागें ' सकराई ' पहा.

**संकासुर** मागें ' शंकासुर ' पहा.

**सकाळ** [ म० सुकाळ ] स्त्री० सूर्योदयापासून एक प्रहर हा काळ;प्रातःकाळ. ॐ **सकाळवणीं, सकाळवाणीं** क्रि० वि० योग्य वेळीं; उशीर न करतां ( अशिक्षितांत रूढ ). **सकाळ, सकाळां, सकाळीं** क्रि० वि० प्रातःकाळीं; सूर्योदयानंतर प्रहराच्या आंत.

**सकिरा, सकेरा** [सं० शर्करा=लहान खडा] पु०१पक्षी इ० मारण्यासाठीं बंदुकींत घालतात जे दगडाचे खडे ते प्रत्येक किं० घालतात ज्या धातूच्या गोळ्या त्या प्रत्येक. २ बारीक गोळी किं० गोटी.

**संकीर्ण** [ सं० ] वि० १ मिश्रित; सळमिसळीचा. २ विसकटलेलें; इकडे तिकडे पसरलेलें. ३ जेथें माणसें, पशु, पदार्थ, यांची खेचाखेच झाली आहे असें ( स्थान ). ४ ज्यांत नानाविध पदार्थ एकत्र केले आहेत असें.५ अस्पष्ट (शब्द, देखावा). ६ वर्णसंकर ज्यांत झाला आहे असें म्ह० जातीचें किं०रंगाचें मिश्रण झालें आहे असें(चित्र, संतति, इ० ). ७ व्याप्त. ८ आकुंचित केलेला. ९ नाशाच्या पंथास लागलेला; आसन्नमरण ( दिवा, माणूस, अग्नि ).

**संकीर्तन** न०, **संकीर्तना** स्त्री० [ सं० ] १ स्तुति; गौरव. २ ईश्वरनामाचें उच्चारण. ३ कोणा समर्थाची त्याच्या बगलबच्चानें केलेली स्तुति. [ लेला.

**संकीर्तित** [ सं० ] वि० स्तविलेला; प्रशंसि-

**संकुचित** [ सं० ] वि० १ आकुंचित; अघळपघळ किं० प्रशस्त नव्हे अशी ( जागा ). २ आखूड, लांडा, किं० तोकडा असलेला किं० झालेला. ३ संक्षिप्त; सारांशरूपांत असलेला किं० केलेला. ४ मिटलेलें ( फूल इ० ). ५ लाजलेला; ओशाळलेला; दबकलेला. ६ शंकित; कचरणारा.

**सकुटण (–न )** न० पदार्थाचे सुरी इ० नीं तुकडे पाडावयाचे वेळीं त्या पदार्थाखालीं ठेविलेला ठोकळा, दगड, इ०.

**सकुडी** [ म० स ( सहित )+कुडी ( देह ) ] क्रि० वि० देहासहवर्तमान ( स्वर्गास जाणें ); उ० तुकाराम महाराज विमानांत बसून सकुडी स्वर्गास गेले.

**सकुमार, सुकुमार** वि० नाजूक; कोमळ; मऊ ( मूल, शरीर, गात्र, इ० ). ❀ **सकुमाराची राशि** स्त्री० अत्यन्त नाजूक मूल, स्त्री, माणूस, इ०.

**संकुल** [ सं० ] वि० १ गोंधळलेला. २ पूर्णपणें व्याप्त. ३ मिसळीचें; मिसळलेलें; मिश्रित. ४ ठासून भरलेलें किं० व्यापिलेलें. ५ जेथें फार गर्दी किं० खेचाखेच झाली आहे असें ( स्थळ ). न० १ गर्दी; जमाव. २ हातघाईचें युद्ध. ३ असंबद्ध किं० विसंगत वाक्य; उ० मी मुका आहें;उ० मी वंध्येचा पुत्र आहें.

**सकुल्य** [ सं० ] वि० १ एकाच कुळांतील. २ लांबचा नातलग,–सात पिढ्यांच्या पलीकडचा.

**सकृत्** [ सं० ] क्रि० वि० १ एकदा; एक वेळां. २ एके काळीं; पूर्वी. ❀ **सकृद्ग्राही** वि० एकच वेळां पाहून किं० ऐकून ज्याला समजतें, पाठ होतें, किं० लक्ष्यांत राहातें असा. **सकृद्दर्शनीं** क्रि० वि० १ वरवर पाहिल्यास; बाह्य देखाव्यावरून; विषयांत खोल न शिरतां. २ पाहिल्याबरोबर; पाहातांक्षणीं; केवळ बाह्य देखाव्यावरून. ३ अगदीं आरंभींच; अगदीं सुरवातीसच.

**संकेत** [ सं० ] पु० १ खूण; सूचना; इशारा. २ करार; ठराव; बोली. ३ अट; शर्त. ४ प्रियकराच्या भेटीसाठीं ठरविलेला समय किं० ठरविलेली जागा. ५ ( न्याय ) ठराव; नियम. ६ अमुक खूण केली किं० अमुक पदार्थ दाखविला किं० अमुक शब्द उच्चारला म्हणजे अमुक मजकूर समजावा असा दोन माणसांनीं परस्परांत केलेला ठराव. ७ शब्दाची अर्थबोधक शक्ति. ❀ **संकेतार्थ** पु० अमुक केलें किं० झालें तर अमुक होईल असा क्रियापदाच्या विशिष्ट रूपावरून दाखविला जातो तो अर्थ; उ० पाऊस पडता तर जमीन भिजती. **संकेती** वि० ठरावाप्रमाणें वागणार किं० चालणारा.

**संकेतित** [ सं० ] वि० दोन माणसांनीं ठराव करून नेमलेलें ( स्थळ, काळ, इ० ).

**सकेरा** पु० मागें ' साकिरा ' पहा.

**सकेशा** [ सं० ] स्त्री० जिचें वपन झालें नाहीं किं० करण्यांत आलें नाहीं अशी विधवा.

**संकेश्वर** मागें ' शंकासुर ' पहा.

**संकोच** [ सं० ] पु० १ आकुंचन; आखूड होणें. २ संक्षेप. ३ अटकाव; रोध; कोंडणें. ४ फुलाचें किं० पानाचें मिटणें. ५ भीड; भिडस्तपणा; लाजाळूपणा; भीति; दबकणें. ६ शालीनता. ७ जागेचा आकुंचितपणा. ८ मनांत विचार दाबून ठेवणें किं० दाबून ठेवण्याची प्रवृत्ति. ❀ **संकोची** वि० संकोच बाळगणारा; भिडस्त; लाजाळू.

**संकोचणें** [ म० संकोच ] अ० क्रि० १ कचरणें; दबकणें; भिणें. २ आखूड होणें; आटणें. ३ लज्जित होणें.

**संकोचन** [ सं० ] न० १ आखूड होणें. २ दबकणें; कचर; भीति. [ पहा.

**संकोचित** [ सं० ] वि० वर ' संकुचित '

**संकोटण (–न )** न० वर ' सकुटण (–न ) ' पहा.

**सक्करनातें** [ म० साकर, साखर+नातें ] न० १ प्रेमाचें बंधन; साखरेसारखें गोड नातें; गोडीचा संबंध. २ बायकोच्या माहेरच्या कोणा माणसाशीं असलेला प्रेमाचा संबंध किं० घरोबा ( निंदेंत ).

**सक्कस** [ अ० सख्त् ] वि० मजबूत, टणक ( गात्र, लाकूड, इ० ).

**सक्त** [ सं० ] वि० १ चिकटलेला; संलग्न. २ घट्ट; स्थिर. ३ आसक्त; अनुरक्त. ❀ **सक्ति** स्त्री० १ स्पर्श. २ संयोग; संलग्नता. ३ प्रेम; प्रीति; आसक्ति; अनुराग.

**सक्त, सख्त** [ अ० सख्त् ] वि० १ कठिण; टणक; मजबूत. २ कठोर; कर्कश; निर्दयपणाचा; जुलमी. ३ निक्षून म्ह० स्पष्ट किं० असंदिग्ध शब्दांनीं दिलेली (ताकीद)किं० घालून दिलेली ( कामाची सरणी ). ४ ठराविक काम ठराविक अवधींत झालें पाहिजे अशी ताकीद देऊन कोणेकाकडून

करवून घ्यावयाची(मजुरी,-कैद्यावर लादलेली). ❀ **सक्तपाठ्याळ** पु०१ओझें वहावयाला ज्याची पाठ मजबूत आहे असा बैल किं०घोडा किं० मजूर. २ कामसू किं० कष्टाळू किं० मेहेनती बायको; उ० तुझ्या घरांत सक्तपाठ्याळ बायको आहे म्हणून तुला वेळेवर भाकर मिळते. **सक्त भीड** स्त्री० कोणेकाला कांहीं कार्य करण्यासाठीं घातलेली आग्रहाची भीड किं० केलेला फार आग्रह ( घालणें ). **सक्त रदबदली** स्त्री० कोणेकाबद्दल कोणेकापाशीं केलेली मध्यस्थी ( करणें ). **सक्ती, सख्ती** स्त्री०१कोणेकावर कांहीं कामाबद्दल केलेला जोर किं० लाविलेला नेट किं० तगादा. २ कठोरपणा; शिरजोरपणा; जोर. **सक्त**(किं०**सख्त**) **मजुरीची शिक्षा** स्त्री० ज्या शिक्षेमध्यें कैद्याला ठराविक काम दिवसाच्या ठराविक वेळांत करावें लागतें अशी शिक्षा.

**सक्तु** [ सं० ] पु०, न० १ सातू. २ भाजलेल्या धान्याचें पीठ.

**संक्रन्द** [ सं० ] पु० १ युद्ध. २ कोलाहल; आरडाओरडा; कलकलाट.

**संक्रन्दन** [ सं० ] पु० इंद्र. न० १ आरडाओरडा; कल्कलाट. २ समरांगणावर केलेली कत्तल. ३ हाहाकार. ४ कोणेकाशीं निर्दयपणाची वागणूक.

**संक्रम** [ सं० ] पु० १ जाणें; गमन. २ प्रवास. ३ स्थलान्तर. ४ ( **ज्योतिष** ) संक्रान्ति. पु०, न० १ तात्पुरता पूल; साकव,-ओढ्यावर तक्ते, झाडांचे बुंधे, इ० घालून पावसाळ्यापुरता केलेला पूल. २ जाण्याचें साधन. ३ जिना.

**संक्रमण** [ सं० ] न० १ कोणेकाबरोबर जाणें किं० चालणें. २ स्थलांतर. ३ प्रगति.४ (**ज्योतिष**) सूर्यादिकांचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें; संक्रान्ति; उ० मकरसंक्रमण ( म्ह० सूर्याचें मकरराशींत शिरणें). ५ मार्ग. ६ पृथ्वीहून स्वर्गलोकीं जाणें म्ह० मरण; मृत्यु. ७ दायरूपानें बाप, नवरा, इ० पासून स्त्रीला मिळालेलें धन.

**संक्रान्त** [ सं० ] वि० १ एकांतून दुसऱ्यांत गेलेला. २ दुसऱ्याला दिलेलें. ३ प्रतिबिंबित. स्त्री० ' संक्रान्ति ' चा अपभ्रंश.खालीं 'संक्रान्ति' पहा.

**संक्रान्ति** [ सं० ] स्त्री० १ एका स्थितींतून किं० सरणींतून दुसऱ्या स्थितींत किं० सरणींत जाणें; बदल; पालट. २ सूर्यादीचें एका राशीतून दुसऱ्या राशींत जाणें. ३ ( विशेषत: ) सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें; उ० मकरसंक्रान्ति, कर्कसंक्रान्ति, इ०. ४ सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जें गमन त्या गमनाची अधिदेवता. ही संक्रान्तिदेवता दरवर्षी ज्या कोणच्या वाहनावर बसून जात असेल त्या वाहनाचा नाश, ज्या कोणच्या दिशेस जात असेल त्या दिशेस नाश, ज्या कोणच्या पदार्थाकडे पाहात असेल त्या पदार्थाचा त्या वर्षी नाश फार होतो. यावरून 'कोणेकावर संक्रान्त बसणें' म्ह० त्याचा नाश होणें असा अर्थ होतो. ❀ **माझ्यावर तुझी कां संक्रान्त ?** तूं मला कां उपद्रव करतोस? **यंदा सावकार लोकांवर संक्रान्त बसली आहे** यंदा सावकार फार फार मरत किं० बुडत आहेत. **टीप**,-' संक्रान्ति' चा 'संक्रान्त' असा मराठींत अपभ्रंश झाला आहे.

**सख** [ सं० षष ] मागें ' सक ' पहा.

**सख** [सं० सखि=मित्र] पु० ( संस्कृत समासान्तीं ) मित्र; उ० मरुत्सख=अग्नि; गोपसख=कृष्ण.

**सखजिरे, संगजिरें** न०, **संगजिरा** पु० [ फा० संग्‌जिराहद ] एक खनिज पदार्थ;हा मऊ आणि गुळगुळीत असतो.

**सखत, सखती** वर ' सक्त ' [ अ० ] आणि त्याच प्रतीकांत ' सक्ति ' पहा.

**सखर निखर** वि० उंचसखल;उखीर वाखीर; विषम ( भूमीचा प्रदेश ).

**सखरेजा** पु०दुफाशी खेळांत फाशावरचें एक [ दान.

**सखल** वि० १ ठेंगणा; उंचीनें कमी. २ खोलगट, खोल गेलेला किं० असलेला ( भूमीचा प्रदेश ). न० खोलगट प्रदेश. ❀ **सखलवट** वि० १ किंचित्‌ ठेंगणा. २ किंचित्‌ खोल ( खळगा, विहीर, इ० ). न० खोलगट भूप्रदेश.

**सखलात** (-द ) इ० वर ' सकलात (-द )' इ०पहा.

**सखल्या फणस** वर ' सकल्या फणस ' पहा.

**सखा** [सं० सखि=मित्र; प्र०चें ए०व०सखा]

पु० मित्र. टीप,–संस्कृत समासान्तीं ' सख ' असें रूप होतें; उ० गोपसख म्ह० गुराख्यांचा मित्र किं० सवंगडी. **सखी** स्त्री०१मैत्रीण. २ शिमग्यांत म्हणतात तीं बीभत्स गाणीं प्रत्येक.**सखित्व** न० दोस्ती;मैत्री.**सखासोयरा,सगासोयरा** पु० मित्र किं०नातलग. **सखीका लाल** पु०अत्यन्त उदार माणूस; मोठा दाता; दानशूर ( बैरागी आणि गोसावी आशीर्वाद देतांना हा शब्द योजतात ). **सख्खा** वि० प्रत्यक्ष किं० अत्यन्त जवळचा ( भाऊ, बहीण,इ० ); चुलत, माऊस,आते,मामे, इ० विशेषणांवांचून असलेला (भाऊ,बहीण, इ०).

**सखोल** [ म० स+खोल ] वि० १ गूढ, दुर्बोध ( भाषण, ग्रंथ, विचार, अभिप्राय,इ० ). २ सहसा हुरळून न जाणारा ( मनुष्य ); शांत, गंभीर ( माणूस, प्रकृति ).

**सख्त, सख्ती** वर ' सक्त, " सक्ति'अ०पहा.

**सख्य** [ सं० ] न० स्नेह; मैत्री; घरोबा. ‌‌ॐ **समानशीलव्यसनेषु सख्यं** ज्यांचीं सुखें, दुःखें, चैनीचे प्रकार, स्वभाव, हीं अगदीं एकसारखीं आहेत अशा माणसांत मैत्रीचा किं० घरोब्याचा संबंध साहजिकपणेंच उत्पन्न होतो.

**संख्य** [ सं० ] न० युद्ध; लढाई; झटापट.

**संख्या** [ सं० ] स्त्री० १ मोजणें; गणणें ( करणें ).२मोजदाद; गणती. ३ ( **गणित**) एक, दोन, तीन, इ० अंकांनीं दर्शविली जाणारी पदार्थांची मोजदाद. ४ परिमाण; इयत्ता. ॐ **संख्यावान्** वि० विद्वान्; पंडित. **संख्याविशेषण** न० संख्या दाखविणारें विशेषण; उ०पांच,दहा, तेरा, इ०. **असंख्य, संख्यातीत** वि० ज्याची गणती किं० मोजदाद करतां येत नाहीं असा.

**संख्यात** [ सं० ] वि० गणिलेलें; मोजलेलें.

**संख्यान** [ सं० ] न० १ मोजणें; परिगणन. २ पदार्थांची किंमत ठरविणें.३ परीक्षा; ज्ञान. ४ प्रादुर्भाव.

**संख्येय** [ सं० ] वि० मोजतां येईल असें; मोजण्याजोगें; हिशेबांत घेतलें पाहिजे असें; जें विचारांत घेतलें पाहिजे असें.

**संग** [ सं० ] पु०१एकत्र येणें;जुळणें.२संयोग; संबंध. ३ मैत्री; सख्य; दळणवळण. ४ आसक्ति. ५ विनयासक्ति. ६ मैथुनार्थ स्त्रीपुरुषांची जुळणी.

**संगजिरें** न०, **संगजिरा** पु० एक अतिगुळगुळीत आणि पिठूळ खनिज पदार्थ.

**सगट, सगटनिगट, सगटाई** मागें 'सकट,' ' सकटनिकट, '' सकटाई ' पहा.

**सगडी** मागें ' शेगडी ' पहा.

**संगत** [ सं० संगति ] वि० १ समोर आलेला. २ भेटलेला. ३ एकत्र जमलेलें किं० जुळलेलें. ४ मिसळलेलें. ५ योग्य; अनुरूप; उचित. ६ परस्परांशीं जुळणारें; क्रमाला किं० शिरस्तीला धरून असलेलें. ७ युक्तीला धरून असलेलें. ८ मैथुनार्थ संलग्न किं० जुळलेला.

**संगत, संगति** [ सं० संगति ] स्त्री० १ संयोग. २ भेट; सहवास; साहचर्य; दोस्ती. ३ मैथुन. ४ योग्यपणा; अनुरूपता. ५ पूर्वापर संबंध; अविरोध. ॐ **संगतवार** वि० क्रमाला धरून असलेला; पूर्वापर संबंध अनुसरणारा. **संगतगुण** पु० कोणेकाच्या सहवासामुळें अंगीं येणारा ( चांगला किं० वाईट ) गुण. **संगतसोबत** स्त्री० ए० व० सहवास; बरोबर असणारीं किं० येणारीं माणसें समुच्चयानें. **संगतीं, संगतें** श० यो० अ० बरोबर; सह; संगतीनें; उ० मी कोणासंगतीं रानांत जाऊं ?

**संगती** [ सं० संगत ] पु० मित्र; दोस्त.

**संगनमत** [ सं० संगत ( जुळलेलें )+मत ] न० दोन किं० अधिक माणसांनीं अगोदर ठरवून ठेविलेला अमुक प्रसंगीं अमुक करावयाचें किं० बोलावयाचें ह्या संबंधाचा बेत. अशा बेतांत सामील जे कोणी ते ' संगनमती. ' .

**संगम** [ सं० ] पु० १ संयोग; भेट. २ संगति. ३ दोन किं० अधिक जलप्रवाहांचा किं० रस्त्यांचा संयोग. ४ मैथुन.

**संगमरवर** [ फा० संग्मर्मर् ] पु० एक प्रकारचा दगड. ॐ **संगमरवरी** वि० ह्या दगडाचा केलेला किं० घडविलेला (पुतळा, खांब,इ०).

**संगर** [ सं० ] पु० १ युद्ध.२करार; ठराव. ३ केलेली प्रतिज्ञा; दिलेलें वचन.

**संगर** न० १ धोतर, पातळ, इ० च्या कांठास पुढील रेशमाच्या आणि तव्याच्या मध्यें वेगळ्या रंगाचा जो बारीक पट्टा असतो तो.२डोंगरावरची नागमोडी अरुंद पायवाट.

**सगरकूप** [ सं० सगर+कूप ] पु० श्रीक्षेत्र काशी येथील एक विहीर.

**संगरणी** (अडाण्यांत रूढ) पुढें 'संग्रहणी' पहा.

**सगर्भ** [ सं० ] वि० १ गर्भयुक्त; गरोदर. २ हेतु दाखविण्यासाठीं योजलेलें ( विशेषण ). ३ गूढार्थ ज्यांत आहे असें ( भाषण, वाक्य, इ० ).

**सगलंकृत, सगळंकृत** [ म० सगळें+गिळंकृत ] वि० पूर्णपणें अपहार करून गिळलेलें म्ह० लाटलेलें ( लोकांचें द्रव्य इ० ). मागें ' गिळंकृत ' पहा.

**संगव** [ सं० ] पु० दिवसाचे ७ ते १२ घटका काळ ( दूध काढण्याची वेळ ); दिवसाच्या पांच विभागांपैकीं दुसरा.

**संगवई, संगवयी** [ म० संग+वय+ई ( प्रत्यय ) ] पु० १ लहानपणापासूनचे जे सोबती ते परस्परांचे. २ कांहीं काम करण्यांत जो जोडीदार किं० मदतनीस तो. ३ शरीरसंरक्षक किं० मार्गदर्शक ह्या नात्यानें बरोबर असतो तो माणूस.

**संगसंगा** [ म० संग+संग ] पु० १ दुसरा माणूस अमुक करीत नाहीं म्हणून मी तें करणार नाहीं, दुसरा अमुक करतो तर मी तें करणार, असा हेका धरून बसणें हा प्रकार किं० ही वर्तनसरणी. २ हटवादीपणा. क्रि० वि० मिळून; साहचर्यानें; सोबतीनें; साथीनें.

**सगळमळ** [ म० सगळा+मळणें ] स्त्री० कणसांसकट ताटें तुडवून धान्याचे दाणे काढणें हा प्रकार.

**सगळा** [ सं० सकल ] वि० सर्व; बाकी न राहूं देतां; समग्र. ⊛ **सगळाला** वि० सबंधचा सबंध; न कापलेला; न तोडलेला; न तुटलेला.

**सगा** [ म० सखा ] पु० आप्त; नातेवाईक. ⊛ **सगासोयरा** पु० नात्याच्या संबंधानें जो आपणाशीं जुळलेला आहे तो. **सगाई** स्त्री० नात्याचा संबंध; नातें.

**संगाती, संगती** [ सं० संगत ] पु० दोस्त; जोडीदार; साथीदार.

**संगातीं (-तें), संगीं** [ सं० संगत, संग ] श० यो० अ० सहवर्तमान; बरोबर; सह.

**सगी, सवागी, सुहागी** स्त्री० एक खनिज पदार्थ, डाग लावणे इ० कामीं योजण्यांत येतो तो.

**संगी** [ फा० संग्=दगड ] वि० दगडाचा. खालीं ' संगीन ' पहा.

**संगी** [ सं० संगिन् ] वि० कोणेकाच्या सहवासांत असणारा किं० असलेला; उ० साधुसंगी, सत्संगी. इ०.

**संगीं** [ म० संग ] श० यो० अ० मागें ' संगातीं ' पहा.

**संगीत** [ सं० ] न० १ गायनकला किं० गायनशास्त्र. २ चांगलें गायन. ३ वाद्य, नृत्य, आणि गीत. ४ वीणा, मृदंग, इ० वाद्यें, सूर देणारें, इ० साहित्य किं० साहित्यानें युक्त जें गायन तें.

**सगीन** [ म० स+घन ] वि० जड, अवाढव्य, उचलावयास किं० सरकावयास कठिण ( ओझें, गठ्ठा, दगड, इ० ). ह्या शब्दाची अडाण्यांत रूढि आहे.

**संगीन** [ फा० ] स्त्री० बंदुकीच्या अग्रभागीं बसवितात तें कट्यारीसारखें शस्त्र.

**संगीन, संगी** [ फा० संग्=दगड; संगीन्=दगडी ] वि० १ दगडांनीं बांधून पक्का केलेला ( किल्ला, भिंत, तट, हौद, इ० ) २ मजबूत, भक्कम, दृढ बांधणीचें ( घर इ० ). ३ पूर्ण विचार करून, साधक बाधक प्रमाणें हिशेबांत घेऊन सर्वांगांनीं परिपूर्ण असा ( विचार, बेत, ठराव, मसलत, इ० ). इ० ४ ज्याचे सर्व भाग, अवयव, सांधे, इ० यथास्थित आहेत असा (पदार्थ, यंत्र); कोणत्याही अंगानें किं० उपांगानें उणा किं० कमी नाहीं असा.

**सगुण** [ सं० ] वि० १ गुणांनीं युक्त. २ चांगल्या गुणांनीं युक्त. ३ संसारासंबंधाचा; सांसारिक; प्रापंचिक. ४ सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणांनीं युक्त. ५ ज्याला दोरी लावून सज्ज केलें आहे असें ( धनुष्य ).

**संगू** [ म० संग ] पु० सोंगट्या इ० च्या खेळांत एका बाजूचे जे गडी किं० खेळाडू ते एकमेकांचे. ' उलट पक्षाचे गडी ' याच्या व्यावर्तकत्वें. ⊛ **संगू मंगू** पु० अ० व० खेळाडू.

**संगृहीत** [ सं० ] वि० १ स्वीकारलेलें. २ संक्षिप्त रूपांत घातलेलें. ३ रास करून ठेविलेलें; गोळा केलेलें. ४ एकत्रित; समाविष्ट.

**संगें** [illegible] तृतीयेचें ए० व० ] श० यो० [illegible] ऽ्रर. ⊛ **संगें मंगें**

क्रि० वि० एकमेकांच्या संगतींत किं० सहवासांत किं० बरोबर; मिळून; उ० आम्ही दोघेजण हें काम संगेंमगें एका घटकेंत करून टाकूं.

**सगोत्र** [ सं० ] वि० एकाच गोत्राचे जे ते परस्परांचे; त्याच गोत्राचा.

**संगोपन** [ सं० ] न० काळजीपूर्वक मूल, पशु, इ० चें केलेलें रक्षण. 'संगोपान,' 'संगोपंगन' ही अशिक्षितांत रूढ रूपें आहेत. **संगोपित** वि० काळजीपूर्वक ज्याचें संरक्षण केलें आहे असें ( मूल, पशु, इ० ).

**संग्रह** [ सं० ] पु० १ पकडणें; काबीज करणें. २ स्वीकार; अंगीकार; ग्रहण करणें. ३ साठा; करून ठेविलेला संचय. ४ धान्य, तेल, तूप, इ० चा कांहीं काळाला पुरेसा करून ठेविलेला साठा किं० बेगमी. ५ यादी. ६ समावेश; अंतर्भाव. ७ सारांश; निष्कर्ष; तात्पर्य. ८ संक्षेप. ९ संक्षिप्त ग्रंथ. १० नियंत्रण; नियमन; निग्रह. ❀ **संग्रहीं असणें** १ पदरीं असणें. २ जवळ असणें.

**संग्रहण** [ सं० ] न० १ धरणें; पकडणें; कैदेंत किं० नियंत्रणेंत घालणें किं० ठेवणें. २ मैथुन. ३ व्यभिचार.

**संग्रहणी** [ सं० ] स्त्री० कांहीं दिवस शौचास मुळींच न होणें, कांहीं दिवस एकसारखे रेच होणें, हगवण लागणें, ह्या रूपाचा जो रोग तो.

**संग्रही** [ म० संग्रह+ई ( प्रत्यय ) ] वि० १ हरएक वस्तूंचा किं० चमत्कारिक वस्तूंचा संग्रह करून ठेवावा अशा स्वभावाचा माणूस. २ लोभी; चिक्कू.

**संग्राम** [ सं० ] पु० १ लढाई; मारामारी; युद्ध. २ वादविवाद. ३ वैरभाव.

**संग्राह** [ सं० ] पु० १ जबरीनें धरणें किं० पकडणें. २ मूठ. ३ मुठींत धरणें. ४ ढालीची मूठ. ५ घोड्याचें दुपायी येणें.

**संग्राहक** [ सं० ] वि० वर 'संग्रही' पहा.

**संग्राही** [ सं० संग्राहिन् ] वि० १ संग्रह करणारा; संग्रह करण्याच्या स्वभावाचा. २ मलाचा अवष्टंभ करणारें ( औषध इ० ).

**संग्राह्य** [ सं० ] वि[illegible]न ठेवण्यास योग्य ( माणूस, पशु, [illegible]

**संघ** [ सं० ] पु० १ समुदाय; ढीग. २ प्राण्यांचा समूह किं० कळप किं० जूट. ३ निकट संबंध. ४ विशिष्ट उद्देशानें काढलेली किं० स्थापिलेली संस्था किं० मंडळी. ❀ **संघशः** क्रि० वि० जमाव करून; जुटीनें; समूहाच्या रूपानें.

**संघजीवी** [ सं० संघजीविन् ] पु० मजूर.

**संघट्टणें** [ सं० सम्+घट्ट् ] अ० क्रि० १ जुळणें; एकत्रित होणें. २ मोती, हिरा, इ० जडणें; कोंदणांत बसणें. ३ भेटणें.

**संघट्ट** [ सं० ] पु० १ घासणें; घर्षण. २ टक्कर; आघात; प्रहार. ३ गांठ. ४ लढाई. ५ आलिंगन.

**संघट्टन** न०, **संघट्टना** स्त्री० [ सं० ] १ एकावर एक घासणें; घर्षण. २ आघात; तडाखा; टक्कर. ३ जडणें ही क्रिया; संयोग. ४ मल्लांची गांठ पडणें. ५ पतिपत्नींचें प्रेमालिंगन.

**संघष्टण** [ सं० संघट्टन ] न० घरोबा; दाट परिचय; दळणवळण.

**सघन** [ म० स+घन ] वि० दाट, खेचाखेचीनें भरलेलें ( वृक्ष, पानें, फुलें, ढग, इ० ).

**संघर्ष** पु०, **संघर्षण** न० [ सं० ] १ घासणें; घर्षण. २ चढाओढ; स्पर्धा. ३ बोलाचाली; भांडण.

**संघात** [ सं० ] पु० १ संयोग; जुळणी. २ संस्था. ३ गर्दी; दाटी; जमाव; टोळी. ४ विध्वंस; नासाडी; कत्तल. ५ शरीरांतील कफ, शेंबूड, इ०. ६ नरकांतील एक भाग.

**संघ्राणी** स्त्री० (आशिक्षितांत रूढ ) वर 'संग्रहणी' पहा.

**संच** [ सं० संचय ] पु० १ पदार्थांच्या सिद्धतेस जरूर अशा ज्या गोष्टी त्यांची जुळणी. २ एकजातीय किं० एककार्योपयोगी पदार्थांचा जमाव; उ० तबला, सतार, सारंगी, इ० उपकरणें हीं गायन, नर्तन, इ० चा संच होत. ३ एकांत एक बसणारीं ताटें, पातेलीं, वाट्या, चमचे, इ० चा समुदाय.

**सच** [ सं० सत्य ] पु० कोणेकाकडे सोपविलेल्या कामाबद्दल त्याला द्यावयाचें जें द्रव्यादि देय त्याचा अगोदर कांहीं भाग देतात तो; विसार. ❀ **सचकार** [ सं० सत्यकार ] पु० वकीलाला आपल्या कामांत गुंतविण्यासाठीं त्याला आगाऊ देतात तें देय.

**सचकित** [ म० चकित ] वि० आश्चर्याच्या भावनेनें आक्रान्त किं० दडपलेला.

**संचणी** स्त्री० शेत, मळा, बाग, इ० ची पाहाणी करून त्यांचेवर सरकार जो सान्याचा ठराव आकारतें तो.

**सचणी** स्त्री० आपल्या कुळांना किं० शेत-कऱ्यांना पुढील सालीं झटून मेहेनत करण्या-साठीं खोत देतात ती बक्षीशी. पोस्त ही पाव-साळ्याच्या तोंडी खोत देतो ती बक्षीसी.

**संचणें**[ सं० सम्+चि ] अ० क्रि० १ गोळा होणें; जमणें. २ राहणें. स० क्रि० १ जुळविणें. २ साठविणें.

**सचंत्र** [ म० स्वतंत्र ] वि० स्वच्छंदी, अनि-यंत्रित( अडाण्यांत रूढि ).

**संचय** [ सं० ] पु० १ सांठा;संग्रह. २ समूह; समुदाय. ॐ **संचयी** वि० १ पदार्थांचा संग्रह करून ठेवण्याच्या स्वभावाचा. २ चिक्कू; कंजूष.

**संचयन** [ सं० ] न० १ साठविणें. २ प्रेत-दहनानंतर अस्थि गोळा करणें.

**संचरणें** [ सं० सम्+चर् ] अ० क्रि० १ इतस्ततः भटकणें;हिंडणें; फिरणें.२ पदार्थांत(तेल, पाणी, विष, इ०) शिरून त्यांत पसरणें; भिनणें. ३ (एकादी कल्पना, विचार, मत, चाल, तऱ्हा, इ० समाज, देश. इ० मध्यें ) फैलावणें. ४ (भूत, पिशाच,इ०)कोणेकाच्या अंगांत शिरणें.५(अग्नि, वायु, पाण्याचा लोट, इ०) जोरानें वाढून इत-स्ततः पसरणें.

**संचरित** [ सं० ] वि० प्रविष्ट; भिनलेला; शिरलेला; ग्रासलेला.

**सचवटी** [ म० सचोटी; हिं०सचाहट् ]स्त्री० प्रामाणिकपणा; खरेपणा; पत.

**संचळ** [ सं० सौवर्चल ]न०पादेलोण नांवाचें मीठ; संचळखार.

**संचार** [ सं० ] पु० १ जाणें; हिंडणें; भट-कणें. २ मार्ग; वाट. ३ प्रवेश ( भूत, पिशाच, विष, वात, तेल, इ० चा ). ४ एकादें मत, टूम, चाल, इ० चा समाजांत फैलाव. ५ शिरकाव; कांहीं कामांत केलेली प्रगति. ६ वेदादि पठनांत चुकी होऊन भलतेंच जें म्हटलें जातें तें. ' कोणे-काचा संचार जाणें ' असा प्रयोग होतो.

**संचारक** [ सं० ] पु० १ वाटाड्या; मार्ग-दर्शक. २ पुढारी; अग्रणी; नेता. ३ उत्तेजक; कांहीं कामीं भर देणारा किं० चिथावणारा.

**संचारणें** [ म० ' संचरणें ' चें प्रयोजक; सं० सम्+चर् ] स० क्रि० १ आंत ढकलणें; खुपसणें. २ आंत भिनविणें किं० प्रविष्ट करणें. अ० क्रि० मागें ' संचरणें पहा.

**संचारिका** स्त्री० १ दूती. २ कुंटीण.

**संचारित** [ सं० ] वि० १ खुपसलेला; शिर-काविलेला. २ फैलाविलेला; पसरविलेला.

**संचिणें** [ सं० सम्+चि ]स०क्रि० १ साठ-विणें; जमविणें.२ गोळा करणें;ढीग करून ठेवणें. ३ शिल्कीस टाकणें.

**संचित** [ सं० ] वि० १ गोळा केलेलें; साठ-विलेलें. २ पूर्ण; व्याप्त. ३गोळा झालेलें; साचलेलें; साठलेलें. ४ निबीड. ५शिल्कीस टाकलेलें. न० १ पूर्वजन्मीं केलेलें जें पापपुण्य त्याचा साठा,—ज्याचें फळ ह्या जन्मीं भोगास येते.२कोणेक जन्मीं केलेलें पापपुण्यात्मक कर्म.

**सचिंत** [ सं० ] वि०१ ज्याला चिंता लागली आहे असा; चिंताग्रस्त.२ कांहीं विचारांत निमग्न झालेला.

**सचित्र** [ सं० स+चित्र ] वि० चित्रांनीं सुंदर किं० शोभिवंत केलेलें ( पुस्तक ).

**सचिव** [ सं० ] पु० १ मित्र; दोस्त. २ मद-तनीस; साहाय्यकर्ता. ३ राजाचा मंत्री.४शिवा-जीच्या अष्ट प्रधानांपैकीं एक.

**संची** स्त्री० पिशवी. मागें ' चंची ' पहा.

**सचेतन** [ सं० ] वि० चेतनायुक्त; जिवंत.

**सचेल, सचैल** [ सं० ]वि०ज्याच्या अंगावर वस्त्रें आहेत असा. ॐ **सचेलस्नान, सचैलस्नान** न० मोठ्या विटाळाबदल डोक्यावरून आणि वस्त्रानिशीं केलेलें स्नान; उ० अंगावर पाल पडली असतां सचैल स्नान करावें; उ० घामानें मला सचेल स्नान होत आहे; उ० त्या देशद्रोह्याचें नांव कानीं पडतांच मी सचैलस्नान करतों.

**सचेष्ट** [ सं० ] वि० १ ज्याला चलनवलन आहे असा; हालचाल करणारा. २ जिवंत.

**सचोटी** [ हिं० ] स्त्री० प्रामाणिकपणा. मागें ' सचवटी ' पहा.

**सच्चा** [ सं० सत्य; हिं० सच्चा ] वि० खरा; प्रामाणिक; न्याय्य.

**सच्चिद्, सच्चिदानंद, सज्जन** पुढें ' सत् ' मध्यें पहा.

**सज, साज** पु० मागें ' संच ' सर्व अर्थी पहा.

**सजगणी, सजगाणी** स्त्री० १ दोन पैसे समुच्चयानें. २ सहा रुके किं० तीस बिघे हें जमीनीचें क्षेत्रप्रमाण.

**सजगुरा** पु० बाजरी हें धान्य.

**सजण, सजणा** [ सं० सज्जन किं० सुजन ] पु० मित्र, नायक (लावणी ह्या काव्यांत उपयोग). **सजणी** स्त्री० प्रियकरीण ( लावणींत रूढ )

**सजणी** [ सं० सज्ज ] स्त्री० १ सजणें ही क्रिया. २ सिद्ध करणें. ३ शृंगारणें. ४ मृदंगादि वाद्य वाजवावयाला सिद्ध करणें.

**सजणें** [ सं० सज्ज=सिद्ध, तयार ] अ० क्रि० १ जरूर ती साधनसामग्री, हत्यारें, उपकरणें, कपडे, भूषणें, इ० च्या योगानें कांहीं कार्यार्थ तयार किं० सिद्ध होणें. २ कांहीं दस्तऐवज, अर्ज, विनंती, इ० चा कागद सर्व बाबी यथास्थानीं समाविष्ट केल्या जाऊन पूर्ण स्थितीस किं० दशेस येणें. ३ कांहीं पोशाख, रंग, वर्तन, भाषण, इ० कोणेकास अनुरूप किं० योग्य असणें किं० दिसणें; शोभणें; उ० काळें पागोटें तुम्हाला सजत नाहीं; उ० असला पोरकटपणा तुला सजत नाहीं. स० क्रि० १ साधनसामग्री, हत्यारें, कपडे, इ० नीं मनुष्य, पशु, किल्ला, मांडव, इ० कांहीं कार्यार्थ तयार करणें. २ दस्तऐवज, लेख, इ० सर्व बाबी यथास्थानीं घालून आणि चुका दुरुस्त करून तयार करणें.

**सजल** [ अं० सज्ल् ] स्त्री० १ सुव्यवस्था; योग्य रचना किं० मांडणी. २ युक्ति; तजवीज; हिकमत.

**सजल** [ सं० ] वि० पाण्यानें भरलेला, जलयुक्त ( मेघ, विहीर. नदी, इ० ).

**सजविणें** [ म० ' सजणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० ' सजणें ' स० क्रि० पहा.

**सजा** [ फा० सझा ] स्त्री० शिक्षा; पारिपत्य.

**संजाइती, संजाईत** वि० १ पसंत पडल्यास किंमत देऊन विकत घेऊं, पसंत न पडल्यास परत करूं, अशा बोलीनें दुकानदारापासून आणलेला माल. २ खपेल तितका खपवूं आणि किंमत तुम्हाला देऊं, आणि न खपेल तो परत आणून देऊं अशा बोलीनें दुकानदारापासून कोणी फिरस्ता व्यापारी घेतो तो माल.

**सजाति, सजातीय** [ सं० ] वि० एकाच म्ह० त्याच जातीचा; उ० आम्ही सजातीयांशींच रोटीबेटी व्यवहार करतों.

**संजाप, संजाफ, संजाब** [ फा० संजाफ् ] पु० १ नक्षीदार किं० रंगी बेरंगी असा धोतर, लुगडें, इ० चा कांठ; किनार; मगजी. २ शेंडीच्या सभोंवतीं राखतात तो घेरा. ३ पुरणपोळीचा कांठ,–ज्यांत पुरण शिरलेलें नसतें. ॐ **संजाप (–फ–ब,–) दार** वि० ज्याला संजाप आहे असें ( लुगडें, शेंडी, इ० ). **संजाबी विडा** पु० मेजवानीचे प्रसंगीं किं० दरबारांत वाटावयासाठीं केशर, लवंग, इ० मसाले घालून केळीच्या पानांत वेष्टन करतात ते विडे प्रत्येक.

**संजायत, संजायती, संजायीत** वि० मागें ' संजाइती ' पहा.

**संजखार, सज्जीखार** पु० एक क्षार.

**सजीव** [ सं० ] वि० चेतनायुक्त; जिवंत.

**संजीवन** [ सं० ] न० १ पुनरुज्जीवन. २ चौसोपी घर. ३ नरकविशेष.

**संजीवनी** स्त्री० मृताला जिवंत करणारें औषध, किं० जिवंत करण्याचा मंत्र, विद्या, इ०.

**संजुकता, संजुगता** [ सं० संयुक्त ] वि० लहान आणि आटोपसर, व्यवस्थित ( घर, संसार, संस्था, इ० ).

**संजोग** [ सं० संयोग ] पु० १ साठा; संचय; सामग्री. २ एकाद्या कामाला जरूर अशी सर्व साधनसामग्री. ३ व्यवस्था; मांडणी; टापटीप.

**संजोगणी** [ म० संजोग ] स्त्री० कांहीं कामाला जरूर अशी जी साधनसामग्री तिची उपस्थिति म्ह० ती सिद्ध किं० तयार असणें; किं० तिच्यांत कांहीं न्यून राहिलेलें नसणें.

**संजोगणें** [ म० संजोग ] स० क्रि० योग्य साधनसामग्रीनें कांहीं कार्य सुरूं होईल असें

करणें; सजविणें; मांड मांडणें; उभारणी करणें. अ० क्रि० साधनसामग्रीनें सिद्ध होणें किं०असणें; अनुरूप होणें किं० असणें; जुगणें; जुळणें.

**संजोगी** [ म० संजोग ] पु० अविवाहित राहाण्याचें व्रत न पाळणारा योगी.

**सज्ज** [सं०]वि०१तयार; सिद्ध.२शृंगारलेला.३ कवच घातलेला(वीर). ४लगाम,खोगीर,इ०घालून स्वारीसाठीं सिद्ध केलेला(घोडा).'५ घोडे जोडून सिद्ध केलेला (रथ). ६ दोरी ताणून तयार केलेलें ( धनुष्य ). ७ पोशाख घालून तयार झालेला ( मनुष्य ).

**सज्जणें** [ म० सज्ज ] अ० क्रि० कांहीं कामाला तयार किं० सिद्ध होणें किं० असणें.

**सज्जन** पुढें ' सत् ' मध्यें पहा.

**सज्जन** न०, **सज्जना** स्त्री० [ सं० ] १ बांधणें. २ कपडे घालून शोभविणें. ३ तयार किं० सिद्ध करणें.४शस्त्रास्त्रांनीं युक्त किं० सिद्ध करणें.५ शृंगारणें. ६ पोशाख; वेश. ७ हत्तीला सजविणें.

**सज्जा** पु० १ घराच्या गच्चीवर कठडा घालून आणि छत लावून तयार केलेली खोली किं० मांडव; चंद्रशाला. २ एकापुढें एक असलेल्या शेतांची रांग. ३ जकातीच्या बाबतींतील एक टापू; उ० पुणेंसज्जा, सातारासज्जा, नगरसज्जा, इ०.

**सज्जाखार, सज्जीखार** पु०एक क्षार.

**सट, सटी, सठी** [ सं० षष्ठी ] स्त्री० १ हिंदू महिन्याच्या शुक्लपक्षांतील किं० कृष्णपक्षांतील सहावी तिथि. २ षष्ठीची देवता. ३ मूल जन्मल्यावर सहाव्या दिवशीं पूजितात ती देवता किं० तिची पूजा. ॐ **सटींसामाशीं, सठींसामाशीं** क्रि० वि० वर्षांच्या सहा महिन्यांत एकदा म्ह० क्वचित् प्रसंगीं.

**सटकणें** अ० क्रि० १ जोरानें आणि वेगानें एकाद्या ठिकाणापासून(कोणी माणसानें, पक्ष्यानें, किं० जनावरानें) निघून जाणें.२वचन किं०करार ( कोणी मनुष्यानें ) मोडणें.

**सटका** पु० मागें ' झटका, झटकारा ' पहा.

**सटसट, सटसटां, सटांसटां** क्रि० वि० पाण्याचे थेंब, खडे, झाडावरचीं फळें, इ०वेगानें एकामागून एक अशा रीतीनें ( पडणें, लागणें, उडणें ).

**सटरफटर** न० अनेकविध पदार्थांचा एके ठिकाणीं झालेला जमाव; हरएक चिजांचा समुच्चय; किरकोळ पदार्थांचा साठा.

**सटल, सटली, सटाली** स्त्री० १ वचनभंग करणें ( खाणें ). २ झुकांडी देणें ( खाणें ). ३ हकीगत सांगतांना किं० देण्याघेण्याचा हिशेब करतांनां कांहीं हकीगत किं०रकमा ह्यांचे वरून मुद्दाम उडी मारणें किं० गाळणें ( मारणें ).

**सटवणी** [ म० सट ( सहावा दिवस )+ पाणी ] न० मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीस म्ह० चंपाषष्टीस किं० आलीकडे पलीकडे पडतो तो पाऊस.

**सटवणें, सटावणें** [ म० सट म्ह० सहावा दिवस ] अ० क्रि०(मूल)जन्मल्यानंतर तें सहाव्या दिवशीं मरणें किं० कांहीं बाधेनें विकृत होणें. हें सठी देवीच्या कोपामुळें होतें अशी अशिक्षितांची समजूत आहे.

**सटवाई, सटवी, सठवी, सठवाई** [ म० सट; सं० षष्ठी ] स्त्री० १ षष्ठीची देवता. २ मुलाच्या जन्माच्या सहाव्या दिवशीं पूजितात ती देवता. ३ स्त्रियांना शिवी म्हणून ' सटवी ' हा शब्द योजितात. ॐ **सट (–ठ–) वीचीं अक्षरें** न० अ०व०, **सट (–ठ–) वीचें लिखित** न० ए० व० कोणेकाचें नशीब,–जें षष्टी देवी प्रत्येक मुलाच्या कपाळावर लिहून ठेवितें असें समजण्यांत येतें. **खोटें बोलणें तुझ्या सठवीला पूजिलेलें आहे** तूं खोटें बोलणारा होशील असें तुझें नशीब षष्ठी देवीनें तुझ्या कपाळावर लिहिलेलें होतें म्ह० तूं अट्टल खोटें बोलणारा आहेस. **सटवीचें लिहिणें टळत नाहीं** नशीबीं असेल तसेंच घडतें. **सटवा** [ 'सटवी' चें पुल्लिंगी रूप] पु० अजागळ आणि मूर्ख माणूस. 'सटवा मल्हारी' ह्याच अर्थी. **सटवीपूजन** न० मूल जन्मल्यानंतर सहाव्या दिवशीं षष्ठी देवीची पूजा करतात ती.

**सटसटीत** वि० टणक ( भाताचीं शितें, डाळ, इ० ).

**सटारणा, सटारा** वि० बेढब दिसण्याइतका मोठा; अगडबंब.

**सटालणें** अ० क्रि० सुळुकिनी पडून किं० [निसटून जाणें.

**सटाळी** मागें 'सटल' पहा.

**सटावणी, सटावणें** मागें 'सटवणी,' 'सटवणें' पहा.

**सटीक** [सं०] वि० टीकेसहित ग्रंथ, वाक्य, इ०.

**सटीप** [सं० स+टीप (टीका)] वि० ज्यावर टीपा दिल्या आहेत असा (ग्रंथ, लेख, इ०).

**सटीसामाशीं** क्रि० वि० मागें 'सट' मध्यें पहा.

**सटीसावत्र** न० सवतींचें परस्परांत असतें तें [वैर.

**सटेंगोपाल** पु० मात्रागमनी माणूस; अटल सोदा; लफंगा माणूस.

**सट्टल, सट्टली, सट्टल्या** मागें 'सटल,' 'सटली' पहा.

**सट्टा** [हिं०] पु० १ बाजारांत विशिष्ट वेळीं मालाचा दर किं० भाव कांहींही असला तरी अमक्यानें अमुक माल अमक्याला अमुक दरानें पुरवावा असा ठराव व्यापारी कोणेकाशीं करतो तो. २ धाडसाचा सौदा. ३ एका जातीची हुंडी किं० नाणें देऊन किं० घेऊन दुसऱ्या जातीची हुंडी किं० नाणें दुसऱ्या व्यापाऱ्यापासून घेणें किं० त्याला देणें ह्या रूपाचा व्यवहार. ❀ **सट्टा बट्टा** पु० ए० व० सट्टयाचा व्यवहार

**सठ, सठी** [सं० षष्ठी] स्त्री० मागें 'सट' पहा.

**सठवणें** इ० मागें 'सटवणें' इ० पहा.

**सठी** [सं० सटि, सटी] स्त्री० आंबेहळद.

**सठीसामाशीं** क्रि० वि० मागें 'सट' मध्यें पहा.

**सड** पु० १ गाय, म्हैस, इ० चा आंचोळ. २ जोंधळा, सजगुरा, ऊस, बोरू, किं० जाडी गवत इ० कापून घेतल्यावर खालीं भूईवर जे त्याचे बुडखे राहातात ते प्रत्येक. ३ बैल किं० रेडा ह्यांचें शिश्न. ४ डुकर इ० च्या अंगावरचे जाडी, आणि राठ जे केश ते प्रत्येक. ५ लांब, सरळ, आणि ताठ (काडी गवत इ० ची).

**सड** स्त्री० १ कांहीं कामाची मागपासून चालत आलेली सरणी; चाल; परिपाठ. २ वहिवाटी संबंधाचा दोन पक्षांत कांहीं वाद असतां लेख, पत्र, वृद्धांची दन्तकथा, इ० जें कांहीं पुरावा म्हणून पुढें आणलें जातें तें. ३ खाच, चर.

**सड** [म० सडणें] स्त्री० तांदूळ इ० उखळ इ० मध्यें मुसळ इ० नीं कांडण्याची क्रिया.

**सडक** स्त्री० १ गट्ठा बांधणें, गाडीवर लादलेलें सामान आवळून बांधणें, इ० कामासाठीं योजतात ती जाडी आणि मजबूत दोरी. २ रस्ता, शेताची कड, इ० चा सरळपणा किं० वाकडेपणा पाहावयाचा असतां ताणतात ती दोरी. ३ घोड्याच्या खोगिरास लावितात ज्या दोऱ्या त्यांच्यावर सखलादीच्या तांबड्या किं० काळ्या पट्ट्या शोभेसाठीं गुंडाळलेल्या असतात त्या प्रत्येक किं० अशा दोऱ्या प्रत्येक. ४ ओझ्याच्या किं० बसावयाच्या गाड्या, माणसें, बैल, इ० च्या रहदारीसाठीं तयार केलेला असतो जो रस्ता तो. ५ सरळ पात्याची तरवार. ६ जो सरळ उभा चालतो म्ह० चालतांना ज्याची कंबर, पाठ, मान, गुडघे, इ० वाकलेले नसतात असा मनुष्य किं० अशा माणसाचें शरीर. ७ विरीद ह्या नात्यानें तरवार, कट्यार, पागोटें, इ० वरून लोंबत सोडलेला असतो जो रेशमी दोरीला बांधलेला गोंडा तो. ८ घोड्याच्या डोक्यावर वनगाय इ० च्या केशांचा तुरा खोविलेला असतो तो. वि० १ रोखठोक; भीडमुरवत न धरतां दिलेला (जबाब). २ सरळ (केश, वांबू, रस्ता, शरीर). क्रि० वि० भीति न धरतां; न कचरतां; मनसोक्त; यथेच्छ (दारु पिणें, मारणें, शिव्या देणें, जुगार खेळणें, रांडबाजी करणें, इ०). ❀ **सडकपातळ, सडपातळ, सडंबला** वि० लठ्ठ किं० जाडी किं० थिलथिलीत नव्हे असें (शरीर) किं० अशा शरीराचा (मनुष्य). **साती सडका** क्रि० वि० सर्व अंगें उपांगें ह्या सहवर्तमान; पूर्णत्वानें (कांहीं काम करणें).

**सडकणें** स० क्रि० १ दोरी, काठी, हात, लाथा, इ० नीं (कोणी माणूस, पशु, पदार्थ, इ० वर) रट्टे मारणें; उ० तुला सडकून काढल्याशिवाय तूं खरें सांगणार नाहींस. २ चिरगुटें धुतांना (तीं) दगडावर आपटणें. ३ वाकस, पटाशी, इ० नीं (लाकूड) तासणें. ४ ऐरणीवर ठेवून (लोखंड इ० वर) घणाचे घाव मारणें. ५ (कोणत्याही पदार्थाला) कोणत्याही कारणानें

जोराचे हिसके देणें. ६ तांदूळ, डाळ, इ० तून केरकचरा वेगळा करण्यासाठीं ते सुपांत घालून विशिष्ट प्रकारें त्यांना हिसके देणें. अ० क्रि० वेगानें, झपाट्यानें किं० रागानें एकाद्या स्थळापासून निघून जाणें.

**सडका** [ म० सडणें ] वि० रोगानें सडलेलें ( गात्र, फळ, पान, मनुष्य ).

**सडकोंव** [ म० सडकणें ] वि० ओबडधोबड रीतीनें केलेलें किं० घडविलेलें.

**सडकून, सडकावून** [ म० सडकणें, सडकावणें ] क्रि० वि० जोरानें; आवेशानें; तावातावानें; मोठ्या प्रमाणांत; अतिशय ( जेवणें, धावणें, मारणें, अभ्यास करणें, खेळणें, इ० ).

**सडकोळा** वि० किडकिडीत, रोड.

**सडगा** पु० सोडगा; जाडी काठी.

**सडघाण** [ म० सडणें+घाण ] स्त्री० ( अन्न, काम, बेत, इ० ची ) नासाडी, विचका, विघाड.

**सडण** [ म० सडणें ] न० १ कांडावयाचें काम. २ कांडावयासाठीं घेतलेली डाळ, तांदूळ, इ० जें कांहीं तें.

**सडणावळ** [ म० सडणें ] स्त्री० तांदूळ, डाळ, इ० सडण्याबद्दल दिलेली मजुरी.

**सडणी** [ म० सडणें ] स्त्री० कांडण्याची क्रिया किं० तऱ्हा.

**सडणें** स० क्रि० उखळ इ०मध्यें(तांदूळ,डाळ, राळा, वरी, इ० ) घालून मुसळ इ०नीं कांडणें.

**सडणें** अ० क्रि०(फळ,पान,जखम,इ०)कुजणें.

**सडधोपट** वि० पुढें ' सरधोपट ' पहा.

**सडपातळ, सडवला** मागें ' सडक 'मध्यें पहा.

**सडसाक्ष, सडसाक्षी** स्त्री० एकाद्या वादाच्या निर्णयासाठीं जरूर असे जे कागद, खतें, साक्षीपत्रें, इ० त्याचा समुच्चय.

**सडा** वि० १ बायको, मुलें, प्रपंच, इ० चें लटांबर ज्याच्या मागें नाहीं असा. २ दुसऱ्या कोणाची जबाबदारी ज्याच्यावरून कांहीं काळ नाहींशी झाली आहे असा. ३ प्रवासांत कोणी मनुष्य सोबतीला ज्याणें घेतला नाहीं असा. वरील तीन्ही अर्थी ' सडासोट ' ' सडेसोट ' असेही शब्द आहेत. ४ रिकामी म्ह० वाहातुकीला सिद्ध अशी गाडी किं० असें घोडें, इ०. ५ पतंग उडवितांना त्याला लाविलेली असते ती दोरी. ६ शेणाचें पाणी अंगणांत शिंपडतात तें. ७ झाडावरचीं फुलें, फळें, युद्धभूमीवर मेलेल्या शिपायांचीं शरीरें, इ० जमीनीवर इतस्ततः पसरलेलीं असतात तीं समुच्चयानें. ८ सपाट अशी डोंगराळ जमीन; कातळ; माळ. ꣸ **सडासंमार्जन, सडासारवण** न० ए० व० अंगण किं० जमीन झाडणें, त्यावर शेणाचें पाणी शिंपणें, रांगोळी घालणें, इ० जीं प्रातःकाळचीं बायकांचीं कामें तीं समुच्चयानें ( करणें ). **सडा कारभार** पु० धोपटमार्गी काम; प्रामाणिकपणाचा व्यवहार. **सडाधस** पु० १ कोणाचीही आणि कशाचीही पर्वा न करणारा माणूस; दांडगेश्वर. २ प्रापंचिक लटांबर ज्याचे मागें नाहीं असा माणूस. ह्याच अर्थी ' सडाफटिंग, ' ' सडेलधू, ' ' सडेसांट ' सुद्धां. **सडाफोक** पु० शरीरानें नीटनेटका आणि सुंदर असा माणूस. **सडामफर्लास** पु० बायकोमुलें ह्यांचें लटांबर ज्याचे मागें नाहीं असा आणि काबाडकष्ट करून पोट भरणारा माणूस. **सडी फौज** स्त्री० तोफा, बाजारबुणगे, इ० चें लटांबर जिच्या बरोबर नाहीं अशी लहानशा कामगिरीवर पाठविलेली फौज. **सडी सांड, सडी सांट** स्त्री० १ जिला मूल नाहीं अशी स्त्री. २ जिचीं मुलें मोठीं असल्यामुळें जिला त्यांची काळजी वहावी लागत नाहीं अशी स्त्री. **सडेल बोंबील, सडेलमदार** पु० हाडका, रोडका, आणि कुरूप असा माणूस. **सडेल भात** पु० १ ( लक्षणेनें ) सडत चाललेली जखम किं० क्षत. २ ( लक्षणेनें ) कुजक्या किं० हिरवट स्वभावाचा मनुष्य. **सडेसांट** (–ठ ) वि० ज्याच्या मागें बायको, मुलें, इ० प्रपंचाचा त्रास नाहीं असा. **सडेहुंपट, सडेहुप्या** पु० १ ज्यांत स्त्री नाहीं, ज्यांत सगळेच नरवानर आहेत अशा टोळींतील एक नर वानर. २ अविवाहित पुरुषांच्या समुदायापैकीं एक व्यक्ति. **टीप,**– ज्याचें लग्नाचें वय होऊन गेलेलें असून जो अद्यापि अविवाहित आहे त्याला ' मारुति ' ' हनुमान ' असें विनोदांत म्हणतात.

**संडा** वि०मजबूत आणि धिप्पाड (माणूस,पशु, पदार्थ ).

**सडाई** [ म० सडणें ] **स्त्री०** तांदूळ इ० सडण्याबद्दलची मजुरी.

**सडासांटा, सडासाटा, सडासाठ, सडासोट, सडेसोट वि०** एकटा; ज्याच्या मागें बायको,मुलें,सामानसुमान,इ० कांहीं नाहीं असा.

**सडाका पु०** १ पाऊस, गारा, इ० चा सड् सड् असा आवाज होऊन होतो तो वर्षाव. २ वाऱ्याचा सोसाट्याचा प्रवाह. ३ दोरी, काठी, इ० नीं प्रहार.

**संडास पु०** शौचाची खोली; शेतखाना.

**सडी** [ म० सडणें ] **स्त्री०** १ मनुष्य, पशु, इ० चें शरीर सडत जाणें हा रोग. २ क्षत,फोड, इ० वर माशा बसल्यामुळें त्यांत होते ती कृमींची उत्पत्ति किं० त्यामुळें होणारी सडण्याची किं० कुजण्याची क्रिया. मागें ' असडी,असडी ' पहा.

**सडी स्त्री०** लेखी किं० तोंडी पुरावा. ह्या अर्थी ' सड ' सुद्धां.

**सडी स्त्री०** अंगांत शिरलेलें लाकूड, गवत, इ० चें कुसळ किं० धस.

**सडींव** [ म० सडणें ] **वि०** कांडलेले (तांदूळ, सावा, जोंधळे, इ० ).

**सडीसाक्ष, सडीसाक्षी** मागें ' सडसाक्ष,' ' सडसाक्षी ' पहा.

**सडेतोड** [ म० सडणें+तोडणें ] **वि०** झटपट केलेलें ( काम ), दिलेलें ( उत्तर ), भीडमुरवत न ठेवतां केलेला ( हुकूम ) किं० दिलेलें ( मत ).

**सडेल** [ म० सडणें ] **वि०** सडलेला; कुजलेला; सडत चाललेला.

**सडेलधू, सडेसोट** मागें 'सडा' मध्यें ' सडा-धस ' पहा.

**सड्या** [ म० सडणें ] **वि०** १ रोगानें झिजत चालला आहे असा( माणूस,पशु ). २ चरत किं० सडत चाललेली ( जखम ).

**सढळ वि०** १ उदार; खर्चिक. २ अघळपघळ सामान पुरविणारा; उदारपणें वर्गणी देणारा किं० सार्वजनिक कृत्यांना देणग्या देणारा. ' सढळ हाताचा, ' ' हाताचा सढळ ' ह्या दोन्ही अर्थी.

**सँढाल पु०** सरकारनें एकाद्या गांवाच्या गांवकऱ्यांवर बसविलेल्या साऱ्याच्या किं० दंडाच्या रकमा जर गांवकऱ्यांच्या ऐपतीप्रमाणें नसल्या तर गांवकरी एकमेकांत गुण्यागोविंदानें नवीन आकारणी करून गांवावरचा सरकारी आंकडा भरून देतात ती पद्धति.

**सण** [ सं० क्षण= आनंद, उत्सव, फुरसत ] **पु०** १ उत्सव; उत्सवाचा दिवस,-दसरा,दिवाळी, गुढीपाडवा, गणेशचतुर्थी, इ०. २ कोणताही आनंदाचा दिवस. ३ अशा उत्सवाच्या प्रसंगींचीं पक्वान्नें, थाटमाट, रोषनाई, इ० समुच्चयानें. ४ भंगी, झाडूवाले, न्हावी, परीट, इ० ना अशा प्रसंगीं दिलेली वाढणी, शिधा, पोस्त, इ० (देणें). ५ अशा प्रसंगीं मित्र, नातलग, इ० एकमेकांस प्रेमपूर्वक देतात त्या देणग्या. **टीप,**—ह्या पांचही अर्थी ' सणवार ' हाही शब्द आहे. ❀ **ऋण काढून सण करणें** मागें 'ऋण' मध्यें पहा. **सणीं घुगऱ्या, अवदिशीं पुऱ्या** मागें 'अवदीस' मध्यें पहा. **सणकरी** गांवकऱ्याजवळ सणाचे दिवशीं पोस्त, शिधा, इ० मागत हिंडणारे कारू, बलुतेदार, इ० प्रत्येक. ह्या पोस्त शिधा, इ० ना ' सणवई ' म्हणतात.

**सण** [ सं० शण ] **पु०** ताग. हा शब्द संस्कृतांत **न०** आहे. ❀ **सणकाडी, सणकांडी स्त्री०** १ सणाच्या ताटांचे तंतु सोलून काढल्यावर राहातात तीं मेंडें प्रत्येक. अंबाडी, भेंडी. इ० चे तंतु सोलून काढल्यावर उरतात त्या मेंडांनाही 'सणकाड्या 'किं० 'सणकांड्या'च म्हणतात. २ सणाच्या काड्यांचे तुकडे गंधकांत बुडवून विस्तवावर टेकून ज्वाला उत्पन्न करण्यासाठीं योजतात ते प्रत्येक.

**सणक स्त्री०,सणका पु०** वायु इ० च्या विकृतीनें किं० मुंगी इ० च्या दंशानें शरीरांत एकदम उठते ती कळ किं० तिडीक.

**सणकणें अ० क्रि०** १ ( वाऱ्यानें ) सँ सँ असा आवाज करणें. २ (मुंगी इ०च्या दंशाची ) तिडीक शरीरांत उठणें.

**सणका पु०** वायु, विंचु,इ०चा दंश, इ०मुळें शरीरांत एकदम उठते ती तिडीक किं० वेदना.

**सणकाडी, सणकांडी** मागें' सण 'मध्यें पहा.

**सणंग, सनंग न०** लुगडें, धोतर, इ० विकत घ्यावयाचें किं० घेतलेलें वस्त्र.

**सणगर पु०**कांबळीं विणणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

**सणवार** पु० मागें ' सण ' मध्यें पहा.

**सणसणीत** वि० १ अति कढत ( पाणी, दूध, इ० ). २ अति तिखट ( कांहीं खाद्य ). ३ भक्कम, मजबूत ( शरीर, रचना, लाकूड, इ० ). ४ दडदडीत ( वस्त्र ). ५ भीड, मुरवत, संकोच न धरतां स्पष्ट शब्दांनीं दिलेलें ( उत्तर, मत ). ६ परीटघडीचा किं० कोरा असा चालतांना वाजणारा ( पेहरलेला कपडा, धोतर, इ० ). ७ नवें, कोरें, आणि भरपूर आवाज देणारें (नाणें, भांडें).

**सणसर** वि० १ भक्कम, मजबूत, बळकट. २ टणक, ताठर. ३ स्पष्ट; निर्भीडपणाचा. ४ धमकदारीचा; करारी; छातीठोक.

**सण सुदी** स्त्री०, **सण सुदीस, सणसूद** पु० [म० सण, सु, दीस ( दिवस ) ] सणाचा दिवस.

**सणाटा** पुढें ' सनाटा ' पहा.

**सणाणणें** अ० क्रि० सणसण असा आवाज करणें.

**सणी** स्त्री० १ दोन पैसे ह्या किमतीचें नाणें. २ दोन पैसे ही किंमत. ३ सहा रुके हें जमिनीचें माप.

**सत्** [ सं० ] वि० १ असणारें, होणारें. २ खरें. ३ चांगलें; योग्य; पूज्य; उ० सत्कुल, सदाचार, सज्जन, इ०. न० १ अस्तित्व. २ सत्यता. ३ सत्यवस्तु; ब्रह्म. पु० साधुपुरुष. पुढें ' संत ' स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सती** स्त्री० साध्वी. खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा. ॐ**सदंजन** न० जस्ताचें फूल **सदाचार** पु०, **सदाचरण** न० शिष्टसंमत आचार किं० वर्तन. **सत्कर्म** न०, **सत्क्रिया** स्त्री० १ पुण्य. २ प्रेताची क्रिया; और्ध्वदैहिक. ३ प्रायश्चित्त. ४ आतिथ्य. ५ शृंगारणें; भूषणादिकांनीं शरीर इ० शोभविणें. **सत्कार** पु० १ आतिथ्य. २ पूजन. ३ यथायोग्य मान देणें किं० सन्मान करणें. **सत्कार्यवाद** पु० १ ( वेदान्त ) विवर्तवाद. २ ( सांख्य ) परिणामवाद. **सचित्** न० परब्रह्म. **सच्चिदानंद** पु० अस्तित्व, चैतन्य, आणि आनंद, ह्यांचा समुच्चय म्ह० परब्रह्म. **सज्जन** पु० चांगल्या शीलाचा मनुष्य; नीतिमान् माणूस. **सद्गति** स्त्री० १ मोक्ष; मोक्षाची प्राप्ति. २ मराठींत ) इलाज; उपाय; पेंचांतून सुटका; उ० माफी मागितल्यावांचून मला सद्गति नाहीं. ह्याच अर्थी ' सद्गत ' हें अपभ्रष्ट रूपही योजण्यांत येते. **सत्तम** वि० अत्यन्त उत्तम. **सत्पथ** पु० १ चांगला मार्ग. २ चांगली वर्तनसरणी. **सत्प्रतिपक्ष** पु० ( न्याय ) एक हेत्वाभास. **सद्भाव** पु० १ अस्तित्व. २ भलेपणा. ३ वस्तुस्थिति. ४ प्राप्ति; मिळणें. **सद्वृत्त** वि० १ सद्वर्तनी. २ पूर्ण वाटोळें.

**सत** [ सं० सत्व ] न० सद्गुण; सदाचरण; नीतीची सरणी; सन्मार्ग. खरेपणा; उ० सत सोडणें, सतास जागणें, इ०. ॐ **कोणेकाचें सत घेणें** त्याच्या चांगुलपणाचा पूर्ण फायदा करून घेणें; त्याच्यावर फार भार घालणें. **सतपत** स्त्री० साखी; पत; व्यापारांत किं० व्यवहारांत कोणेकाचा खरेपणा किं० सचोटी.

**संत** [ सं० सत्=चांगला ] पु० साधु; प्रापंचिक लाभावरून ज्याचें चित्त निवृत्त झालें आहे असा माणूस. ॐ **संतकी** स्त्री० साधु पुरुषाची राहाणी. **संतडा** पु० साधु ( तुच्छतेंत ). **संतमालिका** स्त्री०, **संताळें** न० १ साधुपुरुषांचा समुदाय. २ भगवद्भक्तीचा उपदेश, आणि भगवन्नामाचा महिमा सामान्य जनांत पसरविणारे साधुपुरुष किं० कवि ह्यांची परंपरा किं० हे सर्व समुच्चयानें.

**संत** पुढें ' संथ ' पहा.

**सतका** पु० ओवाळून टाकलेला पदार्थ.

**सतंजय** [ सं० सत्य+जय ] न० खरेपणा; प्रामाणिकपणा. वि० खरा; प्रामाणिक; साखीचा ( माणूस ). हा शब्द अशिक्षितांतच रूढ आहे.

**सतत** [ सं० ] वि० नेहेमींचें; अखंड. क्रि० वि० सदासर्वदा; एक सारखें; न खळतां किं० न थांबतां. ॐ **सततगति** पु० वायु.

**संतत** [ सं० ] वि० १ विस्तीर्ण. २ न खळणारा; न थांबणारा; निरंतर; उ० पावसाची काल संतत धार लागली होती. ॐ **संततज्वर** पु० अंगातून न निघणारा ताप. **संततधार** स्त्री० १ मध्यें खंड न पडूं देतां देवावर अभिषेकार्थ पाणी, दूध, इ० ची धार धरतात ती. २ पावसाची एकसारखी होत असते ती वृष्टि(होणें, पडणें, लागणें). ३ उन्हाळ्यांत उकाड्यानें अंगातून घामाच्या धारा चालतात त्या समुच्चयानें. ४ अनेक पिढ्यां-

पासून चालत आलेली कोणतीही सरणी, चाल, किं० रूढि.

**संतति** [ सं० ] स्त्री० १ पसरणें. २ विस्तार. ३ परंपरा. ४ ओळ; रांग; पंक्ति. ५ कुळ; वंश. ६ कोणेकाची पुत्रपौत्रादि किं० कन्यादौहित्रादि वाढ. ७ समाजांत पुढें येणाऱ्या पिढ्यांतील माणसें समुच्चयानें.

**सततीस, सदतीस** [ म० सात+तसि ] वि० तीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्ये-इतका.

**सतंत्र** [ सं० स्वतंत्र ] वि० अनियंत्रित ( अडाण्यांत रूढ ).

**सत ना गत** [ म० सत्य+ना ( नाहीं )+गति ( मोक्ष, सुटका ) ] स्त्री० ए० व० पेचांतून किं० अडचणींतून मोकळीक किं० सुटका यांचा अभाव; उ० आम्हां बायकांना नवऱ्यांवांचून सत ना गत; उ० वरिष्ठ कितीही खाष्ट असला तरी आणखी सहा महिने नोकरी केल्याशिवाय सत ना गत.

**सतपत** मागें ' सत ' मध्यें पहा.

**संतप्त** [ सं० ] वि० १ तापलेलें. २ तापविलेलें. ३ पीडित;श्रांत. ४ रागानें बेफाम झालेला.

**सतम** [ फा० सितम्=जुलूम ] पु०,स्त्री०, न० १ जुलूम; कहर; अनर्थ. २ हल्ला. ३ जोर; आवेश. ४ पराकाष्ठा; अतिरेक. ५ वैपुल्य; अतिशयपणा; उ० दुष्ट अधिकाऱ्यानें ( किं० ढेकूण, पिसवा, डांस, पर्जन्य, ओरडणें, चोऱ्या, दरवडे, महागाई, शिव्या देणें, इ० नीं ) सतम केली आहे ( किं० केला आहे किं० केलें आहे ).

**संतमस** [ सं० ] न० १ सर्वव्यापी अंधार.२ २ महामोह.

**सतमी** मागें ' शतमी ' पहा.

**सतरंग,सतरंज** [ फा० षतरंज् ] पु० बुद्धिबळांचा खेळ.

**सतरंजी, सत्रंजी** [ फा० षत्रंजी ] स्त्री० रंगीबेरंगी पट्ट्यांची जाडी सुताची विणलेली बैठक. टीप,–' सतरंगी ' असाही ह्याच अर्थी शब्द योजण्यांत आहे.

**सतरा** [ सं० सप्तदशन् ] वि० दहा आणि सात ह्यांच्या बेरजेइतका. ❀ **सतरा पंधरा गोष्टी सांगणें** भलभलत्या सबबी सांगणें; असंबद्ध भाषण करणें; टाळाटाळीचीं उत्तरें देणें.

**संतर्पण** [ सं० ] न० तृप्त करणें.

**सतल, सतलें, सतेल, सतेलें** न० उथळ, रुंद, आणि पसरट असें धातूचें भांडें,–परीट लोक ज्यांत कपडे शिजवितात तें.

**सतवटी** मागें ' सचोटी ' पहा.

**सतवा** [ म० सातु; सं० सक्तु ] पु० जोंधळे, बाजरी, इ० च्या लाह्यांचें पीठ.

**सतशील** [ स० सत+शील ] वि० खरा; साधु वृत्तीचा; प्रामाणीक.

**सतलय** क्रि० वि० हारीनें; अखंड रांगेनें; एकाला लागून एक अशा प्रकारें.

**सतसल, सपसल, सपशेल** क्रि० वि० १ शंका न राहील अशा प्रकारें; पूर्णपणें; आडपडदा किं० कांहीं शर्त न घालतां; पूर्णपणें हातपाय ताणून; उ० त्याणें सपशेल माफी मागितली; उ०तो जमीनीवर सपशेल पडला; उ० तो सपशेल खोटें बोलला. २ मध्यें खंड न पडूं देतां.

**सताड** वि० उभा सरळ, ( माणूस, खांब, इ० ). क्रि० वि० पूर्णपणें उघडें किं० उघडलेलें ( दार, खिडकी ).

**संतान** [सं० ] न० १ विस्तार; वाढ. २ प्रवाह; परंपरा. ३ संतति; पुत्रकन्यादि अपत्य. ४ कुळ; वंश. ❀ **संतानगोपाल** पु० पुत्रप्राप्त्यर्थ जपावयाचा एक मंत्र.

**संतान, संतानक** [ सं० ] पु० स्वर्गीय वृक्षविशेष. मन्दार, पारिजातक, संतान, कल्प, आणि हरिचंदन, असे पांच स्वर्गीय वृक्ष आहेत.

**सताप** पु० खोकला इ० रोगावर ज्याच्या पानांचा उपयोग होतो असें एक झाड.

**संताप** [ सं० ] पु० १ दाह; आग. २ पेटणें. ३ वेदना; दुःख; क्लेश. ४ उद्वेग. ५ क्रोध, राग ( येणें ). ६ पश्चात्ताप; अनुताप. ❀ **संतापी** वि० रागीट; चिरडखोर.

**संतापणें** [ सं० सम्+तप् ] अ० क्रि० १ तापणें; तप्त होणें. २ रागावणें; क्रुद्ध होणें. ३ त्रस्त होणें; त्रासणें.

**संतापन** [ सं० ] न० १ जाळणें. २ संतप्त होणें; तापणें. ३ पीडणें. पु० मदनाचा एक बाण.

**सतार** [ फा० ] **स्त्री०** एक तंतुवाद्य.

**सताळ, सताळें** न० मागें ' सतल ' पहा.

**सतावणें, सताविणें** [ हिं० सताना; म० संताप ] स० क्रि० छळणें; उपद्रविणें; गांजणें.

**संताविणें** [ म० संथ; सं० शांत ] स० क्रि० शांत करणें; गोड गोड बोलून सांत्विणें.

**संतावें, संताळें** [ म० संत ] न० १ साधु-पुरुषांचा जमाव; यात्रेस निघालेले साधु समुच्चयानें. २ कोणा साधूच्या भजनीं किंवा नादीं लागणें; साधूची सेवा ( निंदेत ). ३ जग मिथ्या आहे, खरें काय तें ब्रह्म आहे, असें मत किंवा अशा मताचें विवरण.

**सती** [ सं० ] **स्त्री०** १ साध्वी स्त्री; पति हाच परमेश्वर म्हणून त्याची अनन्यभावें सेवा करणारी स्त्री. २ कोणीही सच्छील स्त्री. ३ मृत पतीच्या कलेवरासह स्वतास जाळून घेणारी त्याची पत्नी. सती जाणें असा प्रयोग होतो; उ० मोहित्यांची कन्या पुतळाबाई ही शिवाजीची तिसरी बायको होती, ती शिवाजीबरोबर सती गेली. ४ पार्वती,-शंकराची पत्नी. ❀ **सतीच्या द्वारीं बत्ती आणि शिंदळीच्या दारीं हत्ती** सत्पुरुष नेहेमीं हालअपेष्टा भोगतात आणि दुष्ट, देशद्रोही, चहाडखोर, विश्वासघातकी, थुंकीचाटे वैभवास चढतात. **सती जागविणें** सती ज्या चितेवर स्वतास जाळून घेणार असेल त्या चितेंत ती पूर्णपणें जळून खाक होऊन जाईपर्यंत कोल्हींकुत्रीं यांचा उपद्रव तिच्या गात्रांस न होऊं द्यावा म्हणून रक्षणार्थ बसणें. **सतीचा लाल** उ० उत्कृष्ट माणूस;मोठा दाता(गोसावी,आणि बैरागी आशीर्वादांत हा शब्द योजतात). **सतीचें वाण घेणें** न० येईल त्या संकटाला तोंड देऊन प्रतिज्ञा निस्तरणें. **टीप,**-फुलें, सुपाऱ्या, नारळ, हळदकुंकूं, तांदूळ, फणी, इ० पदार्थ सती जाणारी स्त्री हातांत घेऊन पतीच्या चितेवर चढत असे. ह्या पदार्थांना 'सतीचें वाण' म्हणत. हें वाण हातांत घेईपर्यंत तिला निश्चय मोडण्याची परवानगी असे,पण वाण हातांत घेतल्यावर तिला चितेवर चढणें अपरिहार्य असे.

**सतपत** मागें ' सत ' न० पहा.

**सतीर्थ, सतीर्थ्य** [ सं० ] पु० गुरुबंधु; एकाच गुरूचे किंवा आचार्यांचे जे अनेक शिष्य ते परस्परांचे.

**सतुवा** [ सं० सक्तु ] पु० जोंधळे, बाजरी, इ० च्या लाह्यांचें पीठ.

**सतुष** [ सं० ] वि० टरफलासकट ( तांदूळ, गहूं, इ० ).

**संतुष्ट** [ सं० ] वि० तृप्त; समाधान पावलेला.

**सतूप** [ म० स+तूप ] न० तोंडावर तकतकी दिसावी म्हणून नट, वेश्या, नखरेबाज स्त्रिया, इ० लावितात ती मवारी. मवारी म्ह० लोणी इ० स्निग्ध पदार्थ. [पहा.

**सतेल, सतेलें** न० मागें ' सतल, सतलें '

**सतोटी** स्त्री० मागें ' सचोटी ' पहा.

**सतोबा** [ म० सत्य+बोवा ] पु० चिक्कू माणूस; कृपण; कंजूष.

**संतोष** [ सं० ] पु० १ तृप्ति; समाधान. २ सुख; आनंद. ❀ **संतोषी** वि० समाधानी वृत्तीचा; मिळेल त्यांत तृप्ति पावणारा; अधिकाबद्दल न चडफडणारा. **संतोषपट्टी** स्त्री० आनंदाच्या किंवा उत्सवाच्या प्रसंगीं रयतेनें राजाला दिलेली देणगी किंवा दिलेला नजराणा.

**संतोषणें** [ सं० सम्+तुष् ] अ० क्रि० १ तृप्त होणें.२आनंदित होणें; आनंद किंवा समाधान पावणें.

**संतोषविणें** [ म० 'संतोषणें' चें प्रयोजक ] स० क्रि० १ तृप्त करणें. २ आनंदित करणें.

**सत्कण्या** [ म० सात+कण्या ] स्त्री० अ० व० भात किंवा तांदूळ कांडून विरून त्यांच्या होतात त्या कण्या.

**सत्कार** [ सं० ] पु० १ आतिथ्य. २ पूजन. ३ कोणेकाची केलेली संभावना. मागें ' सत् ' मध्यें पहा.

**सत्कारणें** [ म० सत्कार ] स० क्रि० (कोणेकाला ) योग्य तो मान देणें किंवा त्याचा गौरव करणें.

**सत्कृत** [ सं० ] वि० ज्याचा सत्कार करण्यांत आला आहे असा; पूजित.

**सत्तम** [ सं० ] वि० श्रेष्ठ, उत्तम; उ० नृपसत्तम, मुनिसत्तम.

**सत्तम** पु०,स्त्री०,न० मागें ' सतम ' पहा.

**सत्तर** [ सं० सप्तति ] वि० साठांत दहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्ता** [ सं० ] स्त्री० १ अस्तित्व. २ खरेपणा; चांगुलपणा. ३ ( न्याय ) व्यापक जाति. ४ ( मराठींत ) अधिकार; अमल. ५ ( मराठींत ) सामर्थ्य. ॐ **काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहीं** १ मोठ्या श्रीमंत आणि वजनदार माणसाचें सरकारच्या यःकश्चित शिपुरड्यापुढें कांहीं चालत नाहीं; सरकारी अधिकारानें उन्मत्त झालेला शिपाई थोर माणसाचा सुद्धां अपमान करूं शकतो. २ थोडक्याशा अधिकाराच्या जोरावर जें काम सहज होऊं शकतें तें पुष्कळ पैसे खर्चूनही होऊं शकत नाहीं. **सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं** ज्याच्याजवळ अधिकाराचें बल आहे त्याच्या पुढें शहाण्याचें कांहीं चालत नाहीं; दोन आणि दोन मिळून तीन होतात किं० पांच होतात असें कोणी अधिकारी म्हणाला तर तें खरें ठरतें आणि कोणी शहाणा दोन आणि दोन चार होतात असें म्हणाला तर तें त्याला गणिताची किं० प्रत्यक्षाची मदत घेऊनही सिद्ध करतां येत नाहीं. **सत्तेचें** वि० स्वताचें; स्वताच्या मालकीचें. **सत्तेचा** क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) आपला हक्कच आहे अशा समजुतीनें किं० असें गृहीत घेऊन; उ० हा कामाच्या वेळीं कधीं यावयाचा नाहीं पण जेवणाचे वेळीं तेवढा सत्तेचा येतो. **कोणेकावर सत्ता करणें** १ त्याच्यावर अमल किं० अधिकार गाजविणें किं० चालविणें. २ त्याच्यावर आपला हक्क सांगणें. **सत्ताधारी, सत्ताधिकारी, सत्ताधीश** पु० अधिकारी; अमलदार. **सत्तापुरुष** पु० १ मालक; धनी; स्वामी. २ अमलदार. **सत्तानिवृत्ति** स्त्री० कोणेक वस्तूवरचा आपला हक्क सोडून देणें. **सत्तामत्ता** स्त्री० ए० व० मालकीहक्क; पूर्ण स्वामित्व. **सत्तावान, सत्तावंत** पु० १ मालक; हक्कदार. २ अधिकारी पुरुष. **सत्तासाहेबी** स्त्री० मालकी; स्वामित्व; अधिकार. **सत्तेवाईक** वि० १ हक्कदार. २ आपल्या स्वताच्या पूर्ण मालकीचा.

**सत्ता** [ म० सात ] पु० फाशांच्या खेळांत फाशांवर पडलेला सात हा डाव.

**सत्तावन** [म० सात+पन्नास] वि० पन्नासांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्तीर्थ** [सं०] न० १ अत्यन्त पवित्र ठिकाण किं० क्षेत्र. २ मानास किं० पूजनास पात्र अशी वस्तु, माणूस, स्थळ, इ०.

**सत्तू** [ सं० सक्तु ] पु० १ सातू किं० सातूचें पीठ. २ लाह्यांचें पीठ.

**सत्तेचाळ, सत्तेचाळीस** [ म० सात+चाळीस ] वि० चाळीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्तोबा, सत्तोपंत** [ सं० सत्य ] पु० आपल्या खरेपणाची, प्रामाणिकपणाची, किं० सचोटीची बढाई मारणारा.

**सत्पात्र** [ सं० ] न० १ आपण दिलेलें दान घेण्याला योग्य असा माणूस. २ कोणेकाला कोणतीही क्रिया करण्याला योग्य असा विषय किं० पदार्थ; उ० घर्षणानें पैलू पाडावयाला हिरा सत्पात्र आहे, मातीचें ढिकूळ नाहीं; उ० हा मंत्र मी तुला शिकवितों, तूं सत्पात्र आहेस.

**सत्पाळ** वि० पुष्कळ दूध देणारी ( गाय, म्हैस, इ० ).

**सत्य** [ सं० ] वि० खरें; वस्तुस्थितीशीं जुळणारें. २ प्रामाणिक. पु० १ ब्रह्मदेव. २ ब्रह्मदेवाचा लोक; ब्रह्मलोक. न० १ खरेपणा; खरें. २ वचन; शपथ. ३ सिद्धान्त. ४ कृतयुग. ॐ **सत्याश्रम** पु० संन्यास. **सत्यानत** न० १ व्यापार; वाणिज्य. २ प्रपंचांतील हरएक कामें समुच्चयानें. **सत्यनारायण** पु० नारायणमूर्तिविशेष किं० ह्या मूर्तीची पूजा किं० ह्या पूजेचा विधि. **सत्यपुर** न० विष्णुलोक. **सत्यफल** पु० बेल. **सत्ययुग** न० कृतयुग; चार युगांपैकीं पहिलें. **सत्यवचन, सत्यप्रतिज्ञ, सत्यसंध** वि० बोलल्याप्रमाणें करणारा; वचन न मोडणारा. **सत्यसंध** पु० १ श्रीराम. २ भरत. ३ जनमेजय. **सत्यकार** पु० १ एकमेकांना आणाभाका देऊन कराराच्या शर्ती निश्चित करणें. २ केलेल्या करारावद्दल दिलेला किं० घेतलेला सत्-

कार; विसार. २ खरेपणा स्थापिणें; सिद्ध करणें; **सत्यनिष्ठ वि०** कांहींही संकट आलें तरी सत्य न सोडणारा. **सत्यसंकल्प पु०** १ प्रामाणिकपणाचा संकल्प करणारा. २ उच्च ध्येय डोळ्यापुढें ठेवून त्याचेसाठीं केलेला प्रयत्न. **सत्याग्रह पु०** १ आपल्या मतानें जें सत्य किं० योग्य किं० न्याय्य आहे त्याच्या सिद्धीसाठीं किं० प्राप्तीसाठीं किं० स्थापनेसाठीं धरलेला आग्रह. २ आत्मिक बळानें अन्यायाशीं झगडून आणि येतील तीं संकटें प्रतिक्रिया न करतां सोसून आपली सत्याची बाजू संभाळणें. **सत्यानास [ म० सत्य+नाश ] पु०** पूर्ण खराबी; पूर्ण विध्वंस; सर्वस्वाचा नाश. **सत्योत्तर न०** शपथपुरस्सर केलेलें कांहीं विधान. **क्रि० वि०** शपथपूर्वक; निश्चित रीतीनें; आणाभाका करून. ह्या अर्थी ' सत्योत्तरें ' सुद्धां.

**सत्या** [ सं० ] **स्त्री०** सत्यभामा.

**सत्या** [ म० सात ] **पु०** पत्त्याच्या खेळांतील सात ठिपक्यांचें पान.

**सत्याऐंशी, सत्त्यांयशी** [ **म०** सात+ऐंशी ] **वि०** ऐंशींत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्याण्णव** [ **म०** सात+नव्वद ] **वि०** नव्वदांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्याल, सत्त्येलें न०** मागें ' सतेल ' पहा.

**सत्याहत्तर** [ **म०** सात+सत्तर ] **वि०** सत्तरांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्तेचाळ, सत्तेचाळीस, सत्तेताळ, सत्तेताळीस** [ **म०** सात+चाळिस ] **वि०** चाळीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सत्र, सत्त्र** [ **सं०** सत्त्र ] **न०** १ यज्ञ. २ अनेक दिवस चालणारा यज्ञविशेष. ३ दान; दानधर्म. ४ धर्मकृत्य. ५ अन्नसत्र; जेथें आल्यागेल्याला किं० प्रवाशाला फुकट जेऊं घालतात अशी संस्था. ६ देव, थोर पुरुष, इ० च्या पराक्रमाचें सार्वजनिक रीत्या जें निरूपण तें किं० निरूपण जेथें होतें अशी संस्था किं० गृह. ꣸ **सत्रशाला स्त्री०** वर ' सत्र ' अर्थ ५ पहा.

**सत्रंग, सत्रंज** [ **फा०** सत्‌रंज् ] **पु०** बुद्धिबळांचा खेळ.

**सत्रंजी** [ **फा०** ] **स्त्री०** खूप जाडी सूताची [विणलेली बैठक.



**सत्राण** [ **सं०** त्राण ] **न०** १ म्हातारपणांत कोणेकाच्या अंगीं उरलेली ताकद, सामर्थ्य, किं० शक्ति. २ बहुत दिवस वापरलेल्या पदार्थाच्या अंगीं आणखीही कांहीं दिवस वापर सहन करण्याची जी ताकद अवशिष्ट राहिलेली असते ती. **सत्राण, सत्राणें क्रि० वि०** सर्व शक्ति वेचून; अंगीं असलेलें सामर्थ्य खर्चून; अतिशय जोरानें.

**सत्त्व** [ **सं०** ] **न०** १ सत्त्व, रजस्, आणि तमस्, हे जे मायेचे तीन गुण त्यांतील पहिला. ह्या गुणाच्या उत्कर्षानें शांति, क्षमा, दया, इ० गुणांची वृद्धि होते. २ अस्तित्व; उ० ब्रह्माचें सत्त्व दुर्ज्ञेय आहे. ३ पदार्थांचा कस म्ह० सारभूत अंश; गुण; गुणधर्म; उ० गव्हाचें सत्त्व पौष्टिक असतें; उ० गुळवेलीचें सत्त्व तापावर रामबाण आहे. ४ ज्या गुणावरून कोणेकाची प्रसिद्धि झालेली असते तो त्याच्या अंगाचा गुण; उ० हरिश्चंद्रानें अनेक दुखें सोशिलीं पण सत्त्व सोडिलें नाहीं. ५ मन; चित्त; बुद्धि. ६ चित्तस्थैर्य. ७ धैर्य. ८ जीवात्मा. ९ पंचमहाभूतें प्रत्येक; मूलतत्त्व. १० सद्गुण. ११ सत्य; खरेपणा. १२ बळ; हिम्मत; उत्साह. **पु०, न०** प्राणी. ꣸ **सत्त्वात्मा पु०** लिंगदेह. **सत्त्वस्थ पु०** योगी पुरुष. **कोणेकाचें सत्त्व घेणें ( किं० हरण करणें )** त्याचा बाणा किं० अभिमान सोडून द्यावयाला त्याला भाग पाडणें. **सत्त्वास जागणें** सत्त्व राखणें; अडचणीच्या प्रसंगींही सत्त्व न सोडणें. **कोणेकाचें सत्त्व पाहाणें** त्याची परीक्षा पाहाणें; तो परीक्षेंत कितपत टिकतो हें पाहाणें; उ० विश्वामित्रानें हरिश्चंद्राचे सत्त्व पाहाण्याचा भारी खटाटोप केला पण हरिश्चंद्रानें आपलें सत्त्व जाऊं दिलें नाहीं. **सत्त्वधीर वि०** धैर्यानें सत्त्वास जागणारा म्ह० सत्त्व न जाऊं देणारा. **सत्त्वरक्षण न०** आपले सत्त्व न ढळूं देणारा. **सत्त्वस वि०** १ ज्यांत पौष्टिक अंश पुष्कळ आहे असें (अन्न). २ शक्तिमान्. ३ चिवट. ४ कसदार. **सत्त्वशील वि०** सदाचारी; सन्मार्गानें चालणारा किं० वागणारा. **सत्त्वहरण न०** कोणेकाला सत्त्व सोडावयास भाग पाडणें; कोणेकाला सत्त्वापासून भ्रष्ट करणें किं० करण्याचा प्रयत्न करणें. **सत्त्वाची चांगुणा स्त्री०** साध्वी स्त्री; अत्यन्त सदाचरणी स्त्री. **सत्त्वाची सावित्री स्त्री०** अत्यन्त पति-

निष्ठ स्त्री. **सत्त्वान्न न०** सत्त्वस अन्न; ज्यांत पुष्कळ पौष्टिक अंश आहे असें अन्न. **सत्त्वा-सुंठी स्त्री०** १ बाळंतीणीसाठीं सुंठीचें एक औषध करतात तें. २ ( **लाक्षणिक** ) ज्याला सर्वदा कांहीं ना कांहीं तरी आजार येत असतात असें मूल किं० माणूस.

**सत्वर** [ **सं०** ] **वि०** त्वरायुक्त; जलदीचा. **क्रि० वि०** जलदीनें; ताबडतोब; लवकर. 'सत्वरीं,' ' सत्वर होऊन ' ह्याच अर्थी.

**सत्शूद्र** [ **सं०** सत् ( चांगला )+शूद्र ] **पु०** १ धर्मशील किं० धार्मिक वृत्तीचा कोणीही शूद्र. २ गुराखी. ३ न्हावी.

**सत्सष्ट** [ सप्त+षष्टि; **म०** सात+साठ ] **वि०** साठांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**संथ** [ **सं०** शांत] **वि०** १ मंद; सावकाश. २ धीमेधीमें काम करणारा. ३ खळबळ न करतां वाहणारें पाणी. ४ न ढवळलेलें; न हालविलेलें.

**संथळ**[ **सं०** सम+स्थळ ] **न०** सपाट जमीन; जो उखीरवाखीर नाही असा भूमीचा पृष्ठभाग.

**संथा** [ **सं०** संस्था ] **स्त्री०** १ एका एका हत्याला घोकावयाचा वेदादींचा पाठ,-जो गुरूजी शिष्याला उच्चार, आघात, इ० सह म्हणावयाला शिकवितो. २ गायन, व्याख्यान, इ० चा भागविशेष कसा म्हणावा किं० गावा किं० उच्चारावा हें गुरुजी स्वता अभिनयादि करून विद्यार्थ्याला शिकवितो तो. ३ प्रत्यहीं किं० एका खेपेस शिकावयाचा जो धडा तो.

**संथावणें** [ **म०** संथ ] **अ० क्रि०** शांत होणें; मंद किं० सौम्य होणें.

**संथाविणें** [**म०** संथ] **स० क्रि०** १ कोणेकाला संथ करणें; सांत्विणें; शांत करणें. २ रडत्या मुलाला थोपटून, गाणें म्हणून, किं० गोंजारून उगें करणें. ३ ( कोणेकाचा क्षोभ, राग, इ० ) निरसिणें किं० कमजोर करणें.

**संदक** [**अ०** संदूक ] **स्त्री०**. पेटी. ही बहुधा मोठी असून चाकांवर सरकाविण्याची असते.

**सदका, सतका, सतगा** [ **अ०** स्दका ] **पु०** १ कोणेकावरून ओवाळून टाकिलेला भात इ० पदार्थ; ओवाळणी; कुरवंडी. २ दानधर्म. ३ देवाला अर्पिलेला बळी. ꙮ **गाढवाचा सदगा पु०** अगदीं पाजी किं० नादान माणूस. **शाहाण्याचा सदका पु०** ( विपरीत लक्षणेनें ) अत्यंत मूर्ख माणूस. **टीप,**-१आजारी किं० भुतानें पछाडलेला माणूस बरा व्हावा म्हणून त्याच्यावरून कोंबडें, भात, बकरें, लिंबू, इ० ओवाळून टाकतात. त्या माणसाचा आजार किं० भूत हीं कोंबडा इ० मध्यें प्रविष्ट होतात अशी समजूत आहे. ह्यावरून वरील दोन्ही वाक्प्रचारांची उत्पत्ति स्पष्ट होण्यासारखी आहे. **टीप,**-२विशिष्ट समुदायांतील अतिश्रेष्ठ माणूस.ह्या अर्थी ' सदका ' चा निर्देत उपयोग केला जातो; उ० गवयाचा सदका म्ह० उत्तम गवई म्ह० गर्दभाप्रमाणें मंजुळ स्वर काढून गाणारा. धर्मशीलाचा सदका म्ह० अत्यंत कंजूष.

**सदट, सधट वि०** १ अखंड; अभग्न; सलग; लांबच लांब; उ० सदट किं० सधट वस्त्र, रस्ता, शेत, जंगल, इ०. २ धोपटमार्गी, सरळ, स्पष्ट, कोणाची भीडभाड न ठेवतां दिलेलें, केलेलें, बोललेलें, सांगितलेलें ( मत, भाषण, युक्ति, सल्ला, उत्तर इ० ).

**सदतीस, सततीस** [ **म०** सात + तीस ] तीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सदन** [ **सं०** ] **न०** घर; वास्तव्याची जागा.

**संदपड, संदपडीत, सनवातपडीत वि०** कित्येक वर्षें पडीत राहिलेली ( जमीन ). पुढें ' सनवात पडीत ' पहा.

**सदय** [ **सं०** ] **वि०** दयाळु; अनुकंपायुक्त.

**सदर** [ **अ०** सद्र् ] **स्त्री०** १ श्रेष्ठासन. २ राजसभा; मंडप. ३ वरिष्ठ न्यायाची कचेरी. ४ घराची देवडी. ५ घराची ओटी,-जेथें यजमान बसतो. **न०** १ व्याख्यान, निबंध, इ० चे विल्हे किं० पोटभाग प्रत्येक. २ वट्टहुकूम. **वि०** १ मुख्य, वरिष्ठ ( अमीन, हवालदार, नायक, जमादार, अमल ). २ अपवादरहित; विनशर्त; उ० सदर परवानगी. ꙮ **सदरबारगीर पु०** १ राजा इ० अधिकारी सदरेवर बसले असतां त्यांच्या रक्षणार्थ आजूबाजूस असतात जे शिपायी ते प्रत्येक. २ राजा इ० अधिकाऱ्याची सदर भरदार आणि शोभिवंत दिसावी म्हणून डौलदार पोशाख केलेलीं माणसें जीं सदरेवर बसविलेलीं असतात तीं प्रत्येक.

**सदरमुखी** वि० मागें ' शूद्र ' मध्यें ' शूद्र-मुखी ' पहा.

**सदरहजारी** पु० हजार शिपायांच्या टोळी-वरचा अधिकारी.

**सदरहू** [ अ० सद्राह् ] वि० वर सांगितलेला. क्रि० वि० वरच्याप्रमाणें.

**संदर्भ** [ सं० ] पु० १ गुंफणें; गुंफण्याची क्रिया. २ मिश्रण; एकीकरण. ३ सुसंगतपणा, पूर्वापरसंबंध. ४ ग्रंथ; प्रबंध; गोष्ट.

**संदल** न० आकारविशेषाचें धातूचें पात्र.

**संदला, संधला, सनला** [ सं० संधि ] पु० १ भिंतीच्या किं० फरसबंदीच्या दगड, विटा, इ० च्या दर्ज्यांत म्ह० सांध्यांत भरावयासाठीं विशेष प्रकारें कुटून केलेला चुना. २ अशा चुन्याचा भिंत, जमीन, इ० वर केलेला गिलावा.

**सदलाबदल** मागें ' अदलाबदल ' पहा.

**सदसत्** [ सं० सत् ( चांगलें ) + असत् ( वाईट ) ] वि० चांगलें आणि वाईट; उ० सदसताचा विवेक करून आपलें मत ठरवावें. ॐ **सदसद्विवेकबुद्धि** स्त्री० चांगलें काय आणि वाईट काय, खरें काय आणि खोटें काय, ह्यांचा फरक किं० भेद करूं शकणारी बुद्धि.

**सदसष्ट** [ म० सात+साठ ] वि० साठांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका. ' सदुसष्ट ' असेंही रूप ह्या शब्दाचें आहे.

**सदस्य** [ सं० ]पु०१सभासद. २ऋत्विग्विशेष ( कांहीं धर्मकर्मांत सर्व[illegible] देखरेख करणारा ).

**सदा** [ सं० ] [illegible] नेहमीं. ॐ **सदानंद** पु० १ शंकर. २ [illegible]. **सदागति** पु० १ वायु,–जो कधीं स्थिर नसतो. २ सूर्य,–जो कधीं थांबत नाहीं. ३ मोक्ष. ४ परमात्मा. ५ स्वर्ग. **सदातन** वि० शाश्वत. पु० परमेश्वर. **सदाशिव** पु० शंकर. **सदाफुली** स्त्री० एक फुलझाड. **सदासर्वदा** क्रि० वि० अक्षय्यीं; सर्वकाळ; नेहमीं. **सदाकदा, सदानकदा** क्रि०वि० नेहमीं; सर्वकाळ. **सदागुलाब** पु० गुलाबाची एक जात. [ पहा.

**सदाचरण, सदाचार** मागें ' सत् ' मध्यें

**संदान** [ सं० ] न० १ दोरी; दांवें. २ बेडी; बंधन. पु० हत्तीच्या गुडघ्याखालचा भाग.

**संदान, सदान** [ फा० ]स्त्री०, न० लोहाराची लहान ऐरण,–कल्या, कोयंडे, इ० घडवावयाची. मोठ्या ऐरणीला ' शिंगाडा ' म्हणतात.

**सदावर्त** न० जेथें आल्यागेल्यास रांधलेलें अन्न किं० कोरडा शिधा फुकट देण्यांत येतो अशी संस्था. [ पहा.

**सदाशिव, सदासर्वदा** वर ' सदा ' मध्यें

**संदाळणें** स० क्रि० जमीनींत पुरलेला खांब, खुंटा, इ० च्या भोंवतीं दगड, रोडे, इ० ठासून (तो खांब,खुंटा,इ०) पक्का म्ह० न हालेसा करणें.

**संदिग्ध** [ सं० ] वि० १ संशययुक्त; घोटाळ्याचें; संशयित. २ अस्पष्ट.

**संदिष्ट** [ सं० ] पु० दूत; जासूद. न० निरोप; बातमी. वि० सांगितलेलें; सांगून किं० बजावून ठेविलेलें; दाखवून दिलेला.

**संदिसा,संदेसा** क्रि० वि० ह्याच क्षणीं; आतांच.

**सदी, सद्दी** [ सं० सिद्धि ] स्त्री० कोणेकाचा वैभवाचा, उत्कर्षाचा, किं० लाभाचा काळ. **टीप**,–अणिमा, महिमा, इ० ज्या अष्टसिद्धि त्या ज्या काळीं कोणेकाला अनुकूल असतात तो त्याचा सद्दीचा काळ. ह्या अष्टसिद्धि मागें ' अष्ट ' मध्यें पहा.

**सदीं** [ सं० सदा ] क्रि० वि० सर्वकाळ; नेहमीं ( अशिक्षितांतच रूढि ).

**सदीस** [ म० सर्व + दिवस ] क्रि० वि० सारा दिवसभर(अशिक्षितांत ).

**सदुसष्ट** [ म० सात+साठ ] वि० साठांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका. मागें ' सतसष्ट ' पहा.

**संदूक** [ अ० ] स्त्री० मोठी पेटी,–जी सरकावण्यासाठीं खालीं बहुधा लहान लहान चाकें बसविलेलीं असतात.

**सदृढ** [ सं० सु + दृढ ] वि० १ भक्कम; मजबूत. २ सहसा न बिघडणारें (शरीर,प्रकृति).

**सदृश** [ सं० ] वि० १ सारखें; तुल्य; उ० आपण मला पित्यासदृश आहां.२ अनुरूप;योग्य.

**संदेश** [ सं० ] पु० १ बातमी. २ निरोप. ३ कोणेकाला केलेली आज्ञा. ॐ**संदेशहर** पु०दूत; जासूद.**संदेसा** पु० निरोप,बातमी(अशिक्षितांत).

**संदेसा क्रि० वि०** ह्याच क्षणीं; आतांच. मागें ' संदिसा ' पहा.

**संदेह** [ **सं०** ] **पु०** १ संशय; शंका. २ संकट; धोका. ३ ( **साहित्य** ) एक अलंकार. कांहीं सारखेपणावरून जेव्हां प्रकृत वस्तु ( म्ह० उपमेय ) कांहीं वेगळीच वस्तु ( म्ह० उपमान ) आहे कीं काय अशी शंका उत्पन्न झाल्याचें वर्णन असतें तेव्हां संदेह हा अलंकार होतो. ह्याला ' ससंदेह ' असेंही म्हणतात. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. ❀ **संदेही वि०** ज्याला कांहीं शंका आहे असा; ज्याच्या मनांत कांहीं किंतू आला आहे असा.

**सदैव** [ **सं०** स+दैव ] **वि०** दैववान्; नशीबाचा. ❀ **सदैवाची दशी आणि नरदैवाचा पालव लागावा** मागें ' दशा ' मध्यें ही म्हण पहा. मागें ' पालव ' अर्थ ४ पहा.

**सदैव** [ **सं०** सदा+एव ] **क्रि० वि०** सर्व काळ; नेहेमीं. ' सदोदित ' ह्याच अर्थी.

**संदोली** [ **फा०** ] **स्त्री०** पेटी.

**सदोष** [ **सं०** ] **वि०** दोषयुक्त; ज्यांत दोष आहे असा.

**संदोह** [ **सं०** ] **पु०** १ समुदाय. २ गाय, म्हैस, इ० चें दूध काढणें.

**सद्गत, सद्गती** [ **सं०** सत् ( चांगली ) + गति ] **स्त्री०** १ मोक्ष; मोक्षप्राप्ति. २ इलाज; उपाय. ३ सुटका. मागें 'सत्' मध्यें 'सद्गति' पहा.

**सद्गद, सद्गदित वि०** प्रेम किं० दया ह्या मनोविकारांच्या तीव्रतेमुळें व्याकुळ (अंतःकरण) किं० कंपित ( स्वर किं० भाषण ).

**सद्गुण** [ **सं०** सत् ( चांगला ) + गुण ] **पु०** चांगला गुण.

**सद्गुरु** [ **सं०** सत् ( चांगला ) + गुरु ] **पु०** १ श्रेष्ठ दर्जाचा गुरु. २ ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवून देणारा. ❀ **सद्गुरूची मेख स्त्री०** १ बिनतोड स्थिति; पेचाची स्थिति. २ प्रतिपक्षाला निरुत्तर करणारें कांहीं विधान किं० कोटी.

**सद्जबाब पु०** वादीचें किं० प्रतिवादीचें उत्तर.

**सद्दा** [ **अ०** षदा ] **पु०** मोहोरमाच्या उत्सवांत ताबुतांपुढें मुसलमान लोक मिरवितात तीं निशाणें प्रत्येक.

**सद्दी, सदी** [ **फा०** सद् ] **स्त्री०** शंभर; शतक. ❀ **दरसदे क्रि० वि०** दर शेकड्यास.

**सद्दी** [ **सं०** सिद्धि ] **स्त्री०** कोणेकाचा वैभवाचा काळ. मागें ' सदी ' पहा.

**सद्म** [ **सं०** सद्मन् ] **न०** १गृह; घर.२ स्थान.

**सद्यः** [ **सं०** सद्यस् ] **क्रि० वि०** १ आतां; ह्या वेळेस. २ आतांच्या आतां; ताबडतोब. ३ आज. **वि०** ताजें ( लोणी ); साजूक ( तूप ). ❀ **सद्यःकाल पु०** वर्तमान काळ. **सद्योजात पु०** १ शंकर. २ वांसरूं. **सद्यःपाती** [ **सं०** सद्यःपातिन् ] **वि०** क्षणभंगुर; नश्वर. **सद्यस्क वि०** १ नवीन; ताजें. २ आतांच आणलेला किं० तयार केलेला ( पदार्थ ). **सद्यःपक्ष पु०** १ वर्तमानकाळ; चालू काळ. ह्याच्या व्यावर्तकत्वें 'भविष्यकाळ' किं० ' आगामी काळ.' २ अनेक अंगें ज्यांत आहेत असें एकादें धार्मिक कर्म करावयाचें असतां ह्या अंगांपैकीं एक एक अंग भिन्न भिन्न वेळीं करून मुख्य कर्माचा अवशिष्ट भाग योग्य काळीं करणें असा जो पक्ष तो एक पक्ष. आणि त्या धार्मिक कर्माचीं सर्व अंगें एकदम योग्य काळीं करावयाचीं हा दुसरा पक्ष. हा जो दुसरा पक्ष तो सद्यःपक्ष. ३ पुढें करावयाचें जें कांहीं कर्म तें आपल्या सोयीच्या वेळीं अगोदर करणें हा प्रकार. **सद्यःपक्ष वि०** ताजा; नवा; शिळा किं० जुना नव्हे तो. **सद्यःकाल, सद्यस्कालीन वि०** वर ' सद्यस्क ' दोन्ही अर्थी [illegible] **सद्यस्तस, सद्यस्तब्द् वि०** अगदीं ताजें; आतांच लोणी कढवून केलेलें ( तूप ); आतांच तोडून आणलेली (भाजी, फुलें, इ० ); आतांच केलेला ( चहा इ० पेय ).

**सद्यां, सध्यां** [ **सं०** सद्यस् ] **क्रि० वि०** हल्लीं; ह्या काळीं; चालू काळीं.

**संध** [ **सं०** संधि ] **स्त्री०** १ मिलाफ; मिश्रण; २ सांधा. ३ शिवण. ४ फट; भेग; चीर. ५ मध्यंतरींचा कालावधि; अवकाश. ६ ऐन वेळ; अगदीं योग्य वेळ. ७ आणीबाणीची वेळ. ८ बेबनावानंतर पुन्हा झालेली मैत्री किं० सलोखा.

**सघट** [ **म०** घड ] **वि०** १ सबंध; अभग्न; अखंड; सलग; उ० त्याचें शेत येवून सघट टेंब-

काईच्या देवळापर्यंत आहे. २ सरळ, प्रामाणिक, उघडें ( वर्तन, भाषण, कारभार, इ० ).दिखाऊ, दुटप्पी, घरसोडीचें, याच्या उलट. **क्रि० वि०** १ न कचरतां; भीडभाड न धरतां. २ उद्धटपणें; उत्सृंखळपणें.

**संधन न०** जिनगर लोकांची ऐरण. लोहारांच्या ऐरणीस ' वटांग, ' ' खुरा ' म्हणतात.

**सधर्म** [ सं० ] **वि०** त्याच धर्माचा; त्याच गुणाचा. ❀ **सधर्मचारिणी, सहचर्मचारिणी स्त्री०** आपली पत्नी,—जी धर्माचरणाच्या कृत्यांत आपल्या बरोबर असावी लागते.पुढें'सह'मध्यें पहा.

**संधला** मागें ' संदला ' पहा.

**सधवा** [ सं० ] **स्त्री०** जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. जिचा पति मेला आहे तिला ' **विधवा** ' म्हणतात.

**संधा** [ सं० ] **स्त्री०** १ संयोग; जोडणी; मिलाफ; ऐक्य. २ निकट संबंध. ३ करार, वचन, प्रतिज्ञा. ४ मर्यादा. ❀ **सत्यसंध वि०** वचनाचा खरा; केलेला करार किंवा दिलेलें वचन पाळणारा.

**संधान** [ सं० ] **न०** १ जोडणें; संयोग. २ मिश्रण. ३ धनुष्याला बाण जोडणें. ४ लक्ष्यावर बाण रोखणें; नेम धरणें. ५ ऐक्य; मैत्री. ६ पदार्थाच्या दोन भागांचा सांधा. ७ योजलेली युक्ति किं० हिकमत. ८ बाणाचें लक्ष्य. ९ दारू गाळणें. १० सोमरस काढणें. ११ कांहीं इष्ट मिळविण्यासाठीं योजलेली हिकमत, लाविलेला वशीला, किं० घातलेली भीड. १२ कांहीं कामाच्या वेगवेगळ्या भागाची क्रमवार रचना. १३ लक्ष्य; अवधान; चाललेल्या विषयांचें किं० विवरणाचें मनानें अनुसरण. ❀ **संधानी, संधान्या, संधानवाल्या वि०** इष्ट हेतु साधण्यासाठीं वशीले बांधण्याच्या कामीं पटाईत.

**संधि** [ सं० ] **पु०** १ संयोग; जोडण्याची क्रिया. २ करार; ठराव. ३ मैत्री; सख्य; दोन माणसांत बेबनावानंतर झालेला सलोखा. ४ दोन राजांचा मैत्रीचा संबंध; तह. ५ शरीराचे जे वेगवेगळे भाग त्यांचा सांधा; उ० मांडी आणि नळी ह्यांचा गुडघा हा संधि आहे. ६ योजना; रचना; मांडणी. ७ मधलें अंतर; दोन कर्माच्या मधलें विश्रांतीचें स्थान. ८ पेन वेळ; योग्य समय. ९ ( **व्याकरण** ) दोन स्वर, दोन व्यंजनें, किं० एक स्वर आणि एक व्यंजन, हीं शेजारीं शेजारीं आलीं असतां एकाचा लोप होणें, किं० दोहोंचा लोप होणें, किं० त्यांच्याबद्दल तिसरें येणें, हा जो फेरफार किं० बदल होतो तो; उ० वस्त्र+अन्न=वस्त्रान्न;गुरु+आज्ञा=गुर्वाज्ञा; ककुभ् +प्रांत=ककुप्+प्रांत; इ०. १० दोन युगांच्या मधला काळ. ११ धोरण; साध्यावर नजर. १२ चोरानें घराच्या भिंत, जमीन, इ० ला पाडलेलें भोंक. ❀ **संधिवेला स्त्री०** रात्र आणि दिवस ह्या दोहोंमधला काळ. **संधिहारक, संधिचौर पु०** घरफोड्या चोर. **संधिग, संधिगत वि०** शरीराच्या सांध्यांतील ( रोग, बिघाड ). **संधिवात, संधिवायु पु०** ज्याच्या योगानें आमांशादिकांमुळें मनुष्याचे हातपाय इ० अवयवांचे सांधे धरतात, किं० आखुडतात तो वायु. **संधिप्रकाश पु०** सूर्योदयाच्या अगोदरचा किं० सूर्यास्तानंतरचा जो प्रकाश म्ह० उजेड तो. **संधिविग्रह पु०** शांतता आणि युद्ध; मैत्री आणि भांडण. **संधिवेळा स्त्री०** सायंकाळ.

**संधेवीं** [ **म०** संदेहीं ] **क्रि० वि०** १ मनाच्या संदिग्ध स्थितींत; संशयांत. **संधेवीं**[**म०**सध्या] **क्रि० वि०** २ आतांच; ह्या क्षणींच ( येणें,जाणें, करणें ). ( अशिक्षितांत ).

**संध्या** [ **सं०** ] **स्त्री०** १ ऐक्य. २ सांधा. ३ संधिप्रकाश; सूर्योदयाच्या अगोदरचा आणि सूर्यास्तानंतरचा प्रकाश किं० उजेड. ४ रात्र आणि दिवस यांच्या मधला काळ.५सायंकाळाची देवता.६प्रातःकाळ,मध्यान्हकाळ,आणि सायंकाळ हे प्रत्येक. ७ सायंकाळ ८ युगापूर्वीचा संधिकाळ ९ वचन; करार. १० संध्योपासना,—ब्राह्मणांनीं प्रतिदिनीं त्रिकाळ आचरावयाचें एक कर्म. ह्या अर्थी ' संध्यावंदन ' सुद्धां. ❀ **संध्याकाळ पु० स्त्री०** सूर्यास्ताच्या पूर्वीचा काळ. **संध्याकाळी स्त्री०** गुलबाशी हें फुलझाड. **संध्यापात्र न०** संध्या ( अर्थ १० ) करतांना पाणी सांडावयासाठीं घेतात तें पात्र; ताम्हण. **संध्या करणें संध्यावंदन न०, संध्योपासना, संध्योपस्ति स्त्री०** वर संध्या अर्थ १० मध्यें सांगितलेलें कर्म करणें.

**सध्या, सध्यां** [ सं० सद्यः ] **क्रि० वि०** आतां; हल्लींच्या काळीं.

**सन** [ अ० ] **पु०** खिरस्ती किं० मुसलमानी कालगणनेचें वर्ष.

**सनई** [ फा० सर्‌ना, सर्‌नाई ] **स्त्री०** वाजंत्र्याचें मुखानें वाजवावयाचें एक वाद्य.

**सनकाडी, सनकांडी स्त्री०** मागें ' सणकाडी ' पहा.

**सनंग न०** १ वस्त्र ( क्रयविक्रयादि प्रसंगीं ). २ घोडा, गाय, बैल, इ० ( क्रयविक्रयाच्या प्रसंगीं ). ३ समारंभाचे प्रसंगीं वापरावयाचें उंची वस्त्र ( रुमाल, उपरणें, मंदील, इ० ). ४ ( वात्रटपणांत ) रांड, रखेली. ५ ( लग्न ठरवितांना ) मुलगी. ६ हौसेनें वापरावयाचा ( पदार्थ, पशु, इ० ).

**सनगर पु०** बुरणूस करणारांची जाति किं० त्या जातीचा कोणी इसम.

**संनत** [ सं० ] **वि०** १ वाकलेला. २ नमलेला. ३ खिन्न; खचलेला. [ ध्वनि.

**संनति** [ सं० ] **स्त्री०** १ नमन; नमस्कार. २

**सनत्कुमार** [ सं० ] **पु०** १ सनकाचा भाऊ. सनक हा ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांपैकीं एक होता. सनत्सुजात ब्रह्मदेवाचा एक मानसपुत्र. २ ( **मराठींत** ) लहान वयांतील साधेपणा आणि निष्पाप वृत्ति ज्याची प्रौढ वयांतही कायम आहे असा माणूस.

**सनद** [ अ० ] **स्त्री०**कोणेकाला कांहीं अधिकार किं० हक्क दिल्याबद्दल सरकारांतून त्याला जें सहीशिक्क्यानिशी पत्र दिलें जातें तें; अधिकारपत्र; प्रमाणपत्र; राजपत्र.' सनदापत्र ' ह्याच अर्थी. ॐ **सनदी वि०** १ सनदशीर. २ ज्याचे संबंधानें सनद देण्यांत आली आहे असा ( व्यवहार किं० हक्क ) किं० असें( ठिकाण ).३ ज्याला कांहीं विशिष्ट सवलती सनदेनें देण्यांत आल्या आहेत असा ( नोकर, मक्तेदार,इ० ).४पैशाच्या रूपानें मोबदला न देतां ज्याला सनदेनें जमीन इ० दिली आहे असा ( शिपाई इ० ). **सनद असनाद** [ अ० सनद ( ए० व० )+असनाद् ( अ० व० ) ] **स्त्री० अ० व०** सनदा. **सनदी, सनदशीर वि०** कायद्याला धरून म्ह० कायदा पाळून चालविलेली (चळवळ, खटपट,इ०).**सनदी इनामदार पु०** नवीन सनद सरकारांतून मिळाल्यानें जो इनामदार झाला तो. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' जारी इनामदार. '

**संनद्ध** [ सं० ] **वि०** १ बांधलेलें; संलग्न. २ कवच ज्याचे अंगावर आहे असा;सज्ज; सजलेला. ३ युक्त; सहित. ४ जवळचा; निकटवर्ती.

**सनम्र वि०** मागें ' नम्र ' पहा.

**सनय, सनयी स्त्री०** मागें ' सनई ' पहा.

**सनला** मागें ' संधला, ' ' संदला ' पहा.

**सनवद्‌बाकी, सनवाद्‌ बाकी, सनवातबाकी**[अ०सन् ए०व०( वर्ष );सन्‌वात् अ० व० ( वर्षें )+बाकी ( उरलेलें ) ] **स्त्री०** अनेक वर्षें थकलेला वसूल किं० सारा.

**सनवात(-द-)पडीत, सनवद्‌पडीत** [ अ० सन्‌वात् ( वर्षें )+म० पडीत ( रद्द पडलेली ) ] **वि०** अनेक वर्षें लागवडींत नसलेली ( जमीन ).

**सनाटा पु०** १ झपाटा. २ तडाखा. ३ जोर. **वि०** १ जोरदार. २ आकारानें मोठा. ३ खूप, विपुल ( लाभ, पीक, वारा, पाऊस, इ० ).

**सनाटून क्रि० वि०** जोरानें; आवेशानें; विपुलपणें.

**सनातन** [ सं० ] **वि०** १ शाश्वत; अनादिसिद्ध. २ नेहेमीचा; चिरकाल टिकणारा. ३ निश्चल; अढळ. **पु०** १ ब्रह्मदेव.२विष्णु. ३ शंकर. ४ पितरांचा अतिथि. ५ ब्रह्मदेवाचा पुत्रविशेष.

**सनाथ** [ सं० ] **वि०** १ ज्याला रक्षण करणारा आहे असा. २ सहित; युक्त. **सनाथा स्त्री०** सुवासिनी स्त्री.

**सनाद** [ सं० ] **वि०**१ ध्वनियुक्त. २ ज्याला खणखणीत आवाज आहे असा ( रुपाया, भांडें, घंटा, इ० ).

**सनाभ** [ सं० ] **वि०** १ मध्यें मूळ ग्रंथ आणि बाजूस टीका आहे असा ( ग्रंथ ).२सख्खा ( भाऊ ).

**सनाभि** [ सं० ] **वि०** १ नात्याचा. २ सारखा. ३ प्रेमळ. **पु०** १ सख्खा भाऊ.२सपिंड.

**संनाह**[ सं० ] **पु०** १ कवच घालणें. २युद्धास हत्यारांनी सज्ज होणें. ३ कवच.

**संनिकर्ष** [ सं० ] **पु०** १ जवळ आणणें. २

सांनिध्य; शेजार. ३ निकट संबंध. टीप,-ह्या तीन्ही अर्थी 'विप्रकर्ष' ह्या उलट अर्थाचा शब्द आहे.

**संनिकर्षण** [ सं० ] न० वर 'संनिकर्ष' पहा.

**संनिकृष्ट** [ सं० ] वि० जवळचें; शेजारचें 'विप्रकृष्ट' म्ह० दूरचें; अंतरावरचें. न० सांनिध्य; शेजार; जवळपणा.

**संनिध** [ सं० ] वि० जवळचें; शेजारचें. क्रि० वि० ( मराठींत ) शेजारीं.

**संनिधान** [ सं० ] न० १ सांनिध्य.२ शेजारीं ठेवणें ही क्रिया; जवळ असणें. ३ एकीकरण; मिश्रण. ४ ठेव. ५ आश्रय.

**संनिधि** [सं० ] पु० १ ठेवणें;शेजारीं ठेवणें. २ सांनिध्य; शेजार. ३ समक्षता. ४ ठेव. ५ आश्रय.

**संनिपात** [ सं० ] पु० १ खालीं येणें किं० पडणें. २ जवळ येणें.३ सांनिध्य; जवळ असणें.४ भेट;गांठ; संगम.५ संयोग.६ मिश्रण.७ भिडणें;टक्कर. ८ युद्ध. ९ समुदाय. १० मैथुन. ११ ( वैद्यक ) तीन्ही दोषांचा एकदम प्रकोप किं० क्षय. १२ ( व्याकरण ) संबंध. १३ ( संगीत ) तालविशेष. १४ नाश. १५ मोह.

**संनिबद्ध** [ सं० ] वि० जोडलेलें; संबंध [ असलेलें.

**संनिभ** [ सं० ] वि० ( समासान्तीं ) सारखें: उ० मेघसंनिभ म्ह० मेघासारखें.

**संनियोग** [ सं० ] पु० १ मिलाफ; संयोग.२ नेमणूक.

**संनिविष्ट** [ सं० ] वि० १ गोळा केलेलें. २ स्थळविशेषीं राहणारा किं० राहिलेला. ३ जवळचा. ४ कांहीं कामांत किं० विचारांत गढून गेलेला. ५ कांहीं विद्येंत किं० कलेंत पटाईत किं० अभ्यस्त किं० परिचित.

**संनिवेश** [ सं० ] पु० १ एकाग्रता; एकाग्रतेनें कांहीं विषयाचें मनन किं० चिंतन किं० अध्ययन. २ समुदाय; जमाव. ३ जुळणी; रचना; संयोग. ४ स्थान; राहाण्याची जागा.५ सांनिध्य. ६ बसविणें; स्थापिणें; ठेवणें. ७ सैन्य इ० चा तळ किं० छावणी; मुक्काम किं० मुक्कामाची जागा. ८ समावेश करणें. ९ नगराबाहेरचें मैदान किं० पटांगण. १० झोपडी.

**संनिहित** [ सं० ] वि० १ जवळचें. २ ठेविलेलें. ३ हजर; उपस्थित. ॐ **संनिहितापाय** वि० क्षणभंगुर; नाशवंत.

**सन्मान, सन्मा .णें, सन्मानित** इ० पुढें ' संमान, ' ' संमानणें,' ' संमानित ' इ० पहा.

**सन्मार्ग** [ सं० ] पु० १ चांगला मार्ग; चांगली वाट. २ चांगली वर्तनाची किं० आचरणाची सरणी.

**सन्मुख** पुढें ' संमुख ' पहा.

**संन्यसन** [ सं० ] न० १ टाकणें; सोडणें. २ स्वाधीन करणें.

**संन्यस्त** [ सं० ] वि० १ त्यागिलेला; वर्जिलेला. २ ठेविलेला. ३ अर्पिलेला.

**संन्यास** [ सं० ] पु० १ सोडून देणें; त्याग. २ प्रपंचाचा आणि वैभवाचा पूर्ण त्याग करून ब्रह्माच्या चिंतनांत मग्न होणें. ३ काम्य कर्मांचा त्याग.४चवथा आश्रम. मागें'आश्रम' पहा. ५ठेव.

**संन्यासणें** [ म० संन्यास ] स० क्रि० १ सोडून देणें; अजीबात टाकून देणें. २ (प्रपंचाचा) त्याग करणें.

**संन्यासी** [ सं० संन्यासिन् ] पु० १ त्याग करणारा. २ चतुर्थाश्रमांत गेलेला.मागें 'आश्रम' पहा.

**संप** पु० १ जूट; एकी. २ आपलीं गाऱ्हाणीं वरिष्ठाकडून दूर करवून घेण्यासाठीं अर्ज,विनंत्या, प्रार्थना, मध्यस्थ्या, इ० मार्ग निष्फळ झाल्यावर संस्था, कारखाना. इ० तील कामकरी काम बंद पाडण्यासाठीं करतात ती जूट(करणें,मिटणें,इ०).

**सपक** वि० नीरस; बेचव; पाणचट.

**सपखल, सपकल, सबखल** मागें 'चबकल' पहा.

**संपच्छनवार,संपत्शनवार** [ म० श्रावण+शनिवार ] पु० श्रावण महिन्यांतील शनिवार.

**संपच्छुक्रवार, संपत्शुक्रवार** [ म०श्रावण+शुक्रवार ] पु० श्रावण महिन्यांतील शुक्रवार.

**सपटोळी, सापटोळी** स्त्री० एक विषारी सर्पाची जात.

**संपणें** [ सं० सम्+आप् ] अ० क्रि० १ समाप्त होणें. २ खलास होणें; शिल्लक न राहाणें. ३ पूर्ण होणें. ४ शेवटास जाणें. ५ मरणें.

**संपत्ति** [ सं० ] स्त्री० १ द्रव्य. २ भरभराट;

उत्कर्ष; वैभव. ३ वैपुल्य; रेलचेल. ४ प्राप्ति; सिद्धि. ५ योग्य स्थिति. ꣸ **शरीरसंपत्ति स्त्री०** कोणेकाची निकोप प्रकृति किं० आरोग्य. **संपत्तिमान वि०** श्रीमंत. **इष्टफलसंपत्ति वि०** जें इच्छिलें तें मिळणें.

**सपत्न** [ सं० ] पु० वैरी; शत्रु.

**सपत्नी**[सं०]**स्त्री०** आपल्या नवऱ्याची दुसरी बायको; सवत. ꣸ **सपत्नीक वि०** भार्येसहित.

**संपद्** [सं०]**स्त्री०** १ संपत्ति; द्रव्य.२ वैपुल्य; समृद्धि. ३ वैभव; उत्कर्ष; भरभराट. ४ सिद्धि.

**संपन्न** [ सं० ] **वि०** १ श्रीमंत;संपत्तिमान्. २ समृद्ध, ३ वैभवशाली. ४ युक्त; सहित; उ० एकेकाळीं हिंदुस्थान धनधान्यसंपन्न होता; उ० वेदशास्त्रसंपन्न. ५ निष्णात.

**संपत् शनवार, संपत् शुक्रवार** वर ' संपच्छनवार, ' ' संपच्छुक्रवार ' पहा.

**संपदा** [सं० संपद् ] **स्त्री०** वर ' संपद् 'पहा.

**सपरिवार** [ सं० ] वि० परिवारासह; इष्टमित्र, आश्रित, नोकरचाकर, यांचेसहित.

**संपर्क** [ सं० ] पु० १ मिश्रण. २ संयोग; संगम. ३ स्पर्श. ४ सहवास. ५ मैथुन. ६ स्पर्शानें होणारा विटाळ. ꣸ **ह्या मसलतीचा त्याला संपर्क नाहीं** त्याला ही मसलत मुळींच ठाऊक नाहीं. **मला विडिचा संपर्क नाहीं** मी विडी मुळींच ओढीत नाहीं.

**संपविणें** [ म० ' संपणें ' चें प्रयोजक ] **सं० क्रि०** समाप्त करणें; शेवटास नेणें; बंद करणें; खलास करणें.

**सपशेल (-लां), सपशैल(-लां) क्रि० वि०** १ प्रशस्तपणें; ऐसपैस; अघळपघळ रीतीनें ( बसणें, हात पाय ताणून निजणें, इ० ). २ अस्ताव्यस्तपणें ( ढीग, रास, घर, इ० ढासळणें किं० कोसळून पडणें ). ३ धडधडीत; संशय न राहील अशा प्रकारें; संकोच न बाळगतां ( खोटें बोलणें, शिव्या देणें).

**सपसप, सपसपां क्रि० वि०** १ घाईघाईनें; झपाट्यानें. २ संकोच न बाळगतां; बेधडक; उ० लोकांच्या घरांत स्वयंपाकघरापर्यंत तूं सपसप जातोस हें वाईट आहे. ३ मर्यादा सोडून, आपला दर्जा मनांत न घेतां ( बोलणें ).

**सपसला(-लां), सपसेल(-लां), सपसैल (-लां)** वर ' सपशेल ' पहा.

**सपक्ष** [ सं० ] **वि०** १ एका पक्षाचें. २ सदृश. पु० १ कैवारी; अनुयायी. २ भाऊबंद. ३ ( **न्याय** ) ज्यांत साध्य निश्चयानें असतें असें उदाहरण. मागें ' विपक्ष ' मध्यें ' साध्य, ' ' पक्ष, ' ' सपक्ष, ' ' विपक्ष ' हे शब्द पहा.

**सपाट वि०** १ समतल; उखीर वाखीर नाहीं किं० उंचसखल नाहीं असा ( पृष्ठभाग ). २ ( **मराठींत** ) पाटानें युक्त, जविर पाट आहे अशी (जमीन); उ० पाट कशाला आणतां ? ही जमिन सपाटच आहे. ३ जिचेवर कांहीं इमारत किं० बांधकाम किं० रचना नाहीं किं० उरली नाहीं अशी ( जमीन ); ४विध्वस्त. ५ विसरलेली ( विद्या,ज्ञान, इ० );उ० पुढें पाठ मागें सपाट. ꣸ **सपाट सुपली स्त्री०** चपटें नाक किं० चपट्या नाकाचा माणूस. [पहा.

**सपाटणें, सपाटा** मागें 'झपाटणें,' 'झपाटा'

**सपाटी** [ म० सपाट ] **स्त्री०** १ सपाट प्रदेश. २ सपाटपणा.

**संपात** [ सं० ] पु० १ उतरणें; उडी. २ संयोग; भिडणें. ३ टक्कर; धडक. ४ पक्ष्याची एक गतिविशेष. ५ तडाका; प्रहार; रट्टा. ६ गर्दी; दाटी. ७ प्रादुर्भाव; दृष्टोत्पत्तीस येणें. ८ पतन; पडणें. ९ दोन नद्यांचा संगम. १० ( **ज्योतिष** ) दोन रेषांचा छेदबिंदु. ११ दोन वर्तुळांचे जे दोन छेदबिंदु ते प्रत्येक. १२ ( **ज्योतिष** ) क्रांतिवृत्त आणि विषुववृत्त हीं दोन वर्तुळें ज्या बिंदूंत परस्परांस छेदितात ते बिंदु प्रत्येक. मागें ' याम्य ' मध्यें ' संपात, ' ' संपातरेषा ' पहा.

**संपादक** [ सं० ] पु० १ मिळविणारा; साधणारा. २ जुळणी करणारा. ३ संशोधक. ४ वर्तमानपत्र किं० मासिक इ० चालविणारा. ५दुसऱ्याचा लेख तपासणारा किं० तपासून छापणारा.

**संपादकीय वि०** संपादकानें लिहिलेला (लेख), केलेला ( फेरफार ), दाखविलेली ( अक्कल ).

**संपादणी, संपादणूक** [ म० संपादणें ] **स्त्री०** १ प्राप्ति; मिळविणें; इच्छिलेली वस्तु मिळविणें किं० साध्य करून घेणें. २ अंगीकारलेल्या भूमिकेला साजेल असें भाषण, वर्तन, पोशाख, हाव-

भाव,इ० करणें. ३ खोटा पक्ष खरासा भासविणें. ४ गोष्ट, हकीगत, कथा, इ० हावभाव, भाषणशैली, दाखले, इ० च्या योगानें मनोहर करून श्रोत्यांच्या मनांत ठसविणें. ५ काम यथायोग्य प्रकारें शेवटास नेणें.

**संपादणें** [ सं० सम्+पद्, पाद् ] स० क्रि० १ मिळविणें; साध्य करून घेणें. २ (कांहीं कार्य) शेवटास नेणें; ( कांहीं हेतु, उद्देश, बेत ) सफळ करून घेणें. ३ ( अंगीकृत पक्ष ) खरासा भासविणें. ४ ( अंगीकृत भूमिका ) हावभाव इ० नीं उत्तम रीतीनें वठविणें. ५ ( दुसऱ्याचा ग्रंथ, लेख, इ० ) तपासणें किं० सुधारणें किं० नीटनेटक्या रूपांत घालणें.

**संपादन** [ सं० ] न० १ मिळविणें. २ साध्य करणें. ३ शुद्ध करणें; तपासणें.

**संपादित** [ म० संपादणें ] वि० १ मिळविलेला; साध्य केलेला. २ वठविलेली( भूमिका ). ३ खरासा भासविलेला ( पक्ष ). ४ मनोरंजक किं० चित्ताकर्षक केलेली ( हकीगत, कथा, वृत्तान्त, इ० ).५ शेवटास नेलेलें ( काम ); सफळ केलेला ( बेत, उद्देश ).

**सपासप** क्रि० वि० १ जोरानें, आवेशानें. २ एका मागून दुसरा अशा क्रमानें,त्वरेनें,आणि न थांबतां.

**सपिठी** स्त्री०, **सपीठ** न० गव्हाचें अत्यंत बारीक पीठ; गहूं ओलवून, दळून, आणि चाळून बारीक केलेलें पीठ.

**सपिंड** [ सं० ] पु० सात पिढ्यांपर्यंतचा भाऊबंद; मूळ पुरुषापासून सात पिढ्यांपर्यंत जी संतति तिच्यांतील जे लोक ते परस्परांचे; एका कुटुंबांतील पिंडाला पात्र असा जो कोणी तो. ✿ **सपिंडी** स्त्री० मृत मनुष्याचें बहुधा बाराव्या दिवशीं जें त्याच्या प्रीत्यर्थ पारलौकिक कर्म करतात तें. ह्यालाच ' सपिंडीकरण, ' ' सपिंडीश्राद्ध ' न० म्हणतात.

**सपीठ** न० वर ' सपिटी ' पहा.

**सपीति, संपीति** [ सं० ] स्त्री०सहपान.

**सपील** [ म० सर्व+पिणें ] वि० आपल्या मातेचें सर्व दूध प्यावयास सोडलेलें ( गाय,म्हैस, इ० चें वासरूं ). क्रि० वि० मातेचें सर्व दूध प्यावयास ( वासरूं सोडणें ); मातेचें दूध पूर्णपणें ( वासरानें पिणें ). वासरूं सपील सोडणें, वासरानें सपील पिणें, असे प्रयोग होतात.

**संपुट** [ सं० ] पु० १ पेटी, बारदान, इ० चें पूड किं० कप्पा. २ द्रोण. ३ अंतर्गोल किं० आंतून पोकळ अशा दोन अर्धुकांच्या रूपाचें बारदान, डबा, इ०. ४ उताण्या तळहातावर पालथा तळहात ठेवून मध्यें झालेली पोकळी. ५ करंडा; संबळीं; संपुष्ट. ✿ **संपुटीकरण** अंतर्गोल किं० आंतून पोकळ अशा दोन पदार्थांच्या पोकळींत कांहीं पदार्थ पकडणें किं० धरून ठेवणें.

**सपुट** वि० १ जिवंत ( लीख ),–केशांतील कीटविशेष. ह्याच्या उलट ' पोली. ' २ दाण्यांनीं भरलेली ( शेंग ). मागें ' पोल, ' ' पोला, ' ' पोली ' पहा.

**सपुरता** [ म० पुरता ] वि० पूर्ण; पुरता; ज्या कामाला पदार्थविशेष जितका पाहिजे तितका; भरपूर; अघळपघळ.

**संपुष्ट** [ सं० संपुट ] पु० १ पेटी. २ डबा. ३ देवांच्या पूजेच्या उपकरणांतील एक आकारविशेषाचें लहान पात्र. **टीप,**–संपुष्ट हें पूजेंतील पात्र लहान असल्या कारणानें त्यांत घातलेला किं० असलेला पदार्थ अर्थात् थोडाच असावयाचा. यावरून ' संपुष्टांत येणें ' याचे पुढील तीन अर्थ झाले आहेत. १ आकारमानानें, संख्येनें, विस्तारानें, किं० महत्वानें कमी होणें. २ आटोक्यांत येणें. ३ कबज्यांत येणें किं०तावडींत सांपडणें. ' गोकर्णांत येणें, ' ' गोकुळांत येणें ' हेही ह्या तीन्ही अर्थाचेच वाक्प्रचार आहेत. मागें ' गोकर्ण, ' ' गोकुल ' हे शब्द पहा.

**सपूत** [ सं० सुपुत्र ] पु० आज्ञाधारक आणि कर्तव्यतत्पर पुत्र किं० मुलगा.

**संपूर्ण** [ सं० ] वि० १ सर्व; समग्र; बिनबाकी. २ अखण्ड. ३ शेवटास गेलेला; अर्धवट न राहिलेला. न० व्रत, पारायण, इ० विधि संपल्यावर उद्यापन, ब्राह्मणभोजन, इ० रूप कर्म करतात तें. ह्या अर्थी ' संपूर्ण ' हा बायकी अपभ्रंश. ✿ **संपूर्णता** स्त्री० १ समाप्ति; शेवट. २ व्रत, नेम, इ० ची सांगतासिद्धि किं० यथासांग समाप्ति. संपूर्ण **कलावंतीची खाण** स्त्री० हर-

हुन्नरी माणूस. हाव्या त्या कामांत घालतां किं० योजतां येईल असा माणूस.

**सपेल, सपेली, सफील, सफेलं, सफेली**[अ० फसील] स्त्री० १ किल्ल्याच्या तटबंदीच्या आंतील ओटा किं० गच्ची. २ विहिरीच्या सभोंवारची फरशी. ३ घराच्या माथ्यावरची गच्ची किं० फरशी.

**सपोट, सपोटी** [म० स ( सह ) + पोट ] **क्रि० वि०** नोकराच्या पोटाला लागणारा खर्च समाविष्ट करून ( नोकराचा पगार ठरविणें ). **वि०** यजमानानें नोकराला जेवूं घालून शिवाय पैशाच्या रूपानें पगार द्यावा अशा शर्तीवर ठरविलेली ( नोकरी ).

**सपोत** [ म० स+पोत ] **वि०** उत्तम किं० नाजूक पोताचें ( वस्त्र ). मागें 'पोत' [हिं०]पहा.

**सपोळा पु०** कागदाचा आकाशांत उडवावयाचा एक प्रकारचा पतंग.

**सप्त** [ सं० सप्तन् ] **वि०** चारांत तीन मिळवून होणाऱ्या संख्येइतका; सात. ❀ **सप्तांशु, सप्तार्चिस्, सप्तरुचि** पु० अग्नि. **सप्ताश्व** पु०सूर्य. **सप्तोपचार** पु० पाचन, रेचन, क्लेदन, शमन, मोहन, स्तंभन, आणि वर्द्धन, हे वैद्यांच्या उपचारांचे सात प्रकार. **सप्ताह** पु० आठवडा. **सप्ताह, सप्ताहा** पु० सात दिवस चालविलेलें पुराण, प्रवचन, इ०. **सप्तऋषि, सप्तर्षि** पु० अ० व० १ मरीचि, अत्रि, अंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु, आणि वसिष्ठ, हे सात ऋषि. २ ह्या नांवाचे उत्तर ध्रुवाजवळचे सात तारे. **सप्तशैल, सप्तकुलाचल, सप्तपर्वत** पु० महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, गंधमादन, विंध्य, आणि पारियात्र, हे सात पर्वत. **सप्तगोदावरीतीर** पु० गोदावरीच्या नदीच्या सात शाखांनीं सुपीक प्रदेश. **सप्तग्रही** स्त्री० सात ग्रह एका विशिष्ट समयीं एका राशींत येणें. **सप्तचैतन्यें** न० अ० व० एक मुख्य शाश्वत चैतन्य आणि ब्रह्म, ईश, जीव, प्रमाण, प्रमातृ आणि प्रमेय, हीं सहा मायिक चैतन्यें मिळून एकंदर सात चैतन्यें. **सप्तच्छद, सप्तपर्ण** पु०सातवीण हा वृक्ष. **सप्तदश** वि०सतरा. **सप्तजिह्व, सप्तज्वाल** पु० अग्नि. **सप्ततंतु** पु० यज्ञ. **सप्तद्वीपा** स्त्री० पृथ्वी.–जीवर जंबु, कुश, प्लक्ष, शाल्मली, क्रौंच, शाक, आणि पुष्कर, अशीं सात द्वीपें आहेत. **सप्तधातु** पु० अ० व० रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, आणि वीर्य, हे शरीरांतील सात पदार्थ. **सप्तपदार्थ** पु० पदार्थांचे वैशेषिक मताप्रमाणें जे सात वर्ग ते. मागें ' पदार्थ ' पहा. **सप्तपदी** स्त्री० लग्नाच्या विधींत वधूवरांनीं तांदुळाच्या राशीवरून सात पावलें बरोबर चालणें. ह्याच अर्थी 'सप्तपदीक्रमण' न०. **सप्त प्रकृति** स्त्री० राजा, अमात्य, दोस्त, देश, दुर्ग, सैन्य, आणि खजिना, हीं राज्याचीं सात अंगें. **सप्तमृत्तिका** स्त्री० अ० व० घोडे बांधतात तेथील, हत्ती बांधतात तेथील, चवाठ्यावरील, वारुळाची, इ० ठिकाणच्या मृत्तिका,–ज्या कांहीं विशिष्ट धर्मकृत्यांत लागतात त्या. **सप्तकोण, सप्तास्र** पु० सात समान कोण किं० बाजू जिला आहेत अशी आकृति. **सप्तस्कंद** पु० आवह, प्रवह, उद्वह, संवह, वैवह, पश्चापरा, आणि परिवाह, हे जे वायूचे सात प्रदेश ते. **सप्तपाताल** न० अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, आणि पाताल, हे सात लोक. **सप्तमातृका** स्त्री० अ० व० ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, आणि चामुंडा, ह्या सात देवता. **सप्तराशिक** न० सात राशींचें गणितकृत्यविशेष. मागें ' पंच ' मध्यें ' सप्तराशिक ' पहा. **सप्तलोक** पु० अ० व० भूर्, भुवर्, स्वर्, महर्, जनर्, तपर्, आणि सत्य किं० ब्रह्मन्, हे सात लोक. **सप्तशती** स्त्री० १ सातशे ही संख्या. २ सातशे श्लोक समुच्चयानें. ३ सातशे श्लोकांचा ग्रंथ. **सप्त समुद्र** पु० क्षार, क्षीर, दधि, घृत, इक्षुरस, मध, आणि स्वादुजल, यांचे सागर प्रत्येक. **सप्तसप्ति** [ सं० सप्तन्+सप्ति ( घोडा ) ] पु० सूर्य,– ज्याच्या रथाला सात घोडे आहेत. **सप्तस्वर** पु० ( **संगीत** ) सा, री, ग, म, प, ध, आणि नी, हे गाण्यांतील सात स्वर.

**सप्तक** [ सं० ] न० सात एकजातीय पदार्थांचा समुच्चय.

**सप्तति** [ सं० ] स्त्री० सत्तर ही संख्या.

**सप्पा, सफ्फा** पु० १ रट्टा; प्रहार. २ पूर्ण नाश किं० विध्वंस.

**संप्रचीत, सप्रचीत** [ सं० स+प्रतीति ] **वि०** अनुभवानें कळलेलें किं० प्राप्त झालेलें (ज्ञान).

**संप्रति** [ सं० ] **क्रि० वि०** आतां; हल्लीं.

**सप्रतिबंधदाय**[सं०]पु० कांहीं शर्तीवर कोणे-काळा मिळावयाचा वडिलोपार्जित संपत्तीचा भाग; उ० चुलता निपुत्रिक मेला तर मिळतो तो त्याचा भाग हा सप्रतिबंधदाय.

**संप्रदान** [ सं० ] **न०** १ देणें. २ प्रीतिपूर्वक जें दान ते; आहेर इ०. ३ ( व्याकरण ) चतुर्थीचा अर्थ; उ० त्यानें ब्राह्मणाला गाय दिली.

**संप्रदाय** [ सं० ] **पु०** १ गुरुपरंपरागत उपदेश. २ चाल; रीति. ३ धर्माचा एक भेद किं० विशिष्ट प्रकार; पंथ. ४ ( व्याकरण ) भाषेची रूढीनें ठरलेली सरणी; उ० तोंड काळें करणें, डोळ्यांत तेल घालून, इ० रूप. ꠶ **संप्रदायशुद्ध वि०** भाषेंतलि किं० समाजांतील किं० धर्मपंथांतील रूढ जी चाल किं० रीति तिला अनुसरून असलेलें.

**सप्रयोजन** [ सं० ] **वि०** १ ज्याची जरूरी आहे असें. २ ज्यांत कांहीं उद्देश किं० हेतु आहे असें.

**सप्रवर, संप्रवर** [ सं० ] **वि०** ज्या कुटुंबांचा मूळ पुरुष एकच आहे अशीं कुटुंबें ( लग्नाची योजना करतांना ).

**संप्रसारण** [ सं० ] **न०** (संस्कृत व्याकरण) य्,र्, ल्, आणि व् , ह्यांचे बद्दल इ,ऋ, लृ,आणि उ येणें हा बदल.

**संप्राप्त** [ सं० ] **वि०** १ ओघानें किं० क्रमानें आलेलें. २ आलेला; उपस्थित झालेला. ३ भोगास आलेला. ४ पूर्ण किं० समाप्त केलेला किं० झालेला.

**संप्राप्ति** [ सं० ] **स्त्री०** १ पूर्णता. २ सिद्धीस जाणें. ३ उपस्थित होणें; येणें; घडणें. ४ भोगास येणें.

**सप्रेम** [ सं० ] **वि०**१प्रेमळ; प्रेमयुक्त; प्रेमानें परिप्लुत. २ प्रेम व्यक्त करणारें.

**सफ** [ अ० ] **पु०** १ एका मागून एक अशा अखंड क्रमानें मरणें किं० मारणें. २ पूर्ण संहार किं० विध्वंस; सत्यानाश.

**सफई स्त्री०** खालीं ' सफाई ' पहा.

**सफर** [ अ० ] **न०** मुसलमानांच्या वर्षांतील दुसरा महिना.

**सफर** [ अ० ] **स्त्री०** १ प्रवास. २ कोणेक ठिकाणीं जाणें किं० जाऊन येणें. ३ जलमार्गानें केलेला प्रवास. ४ जलमार्गानें केलेल्या फेरीबद्दल गलबताच्या मालकास किं० खलाशास दिलेलें भाडें. ꠶ **सफरनामा पु०**प्रवासांत घडलेल्या किं० पाहिलेल्या वस्तूंचें वर्णन. **सफर साधणें** ज्या कामासाठीं फेरा केली किं० खेप घातली तें काम साध्य होणें किं०सफल होणें.**सफरी पु०**१खलाशी, नाखवा. २ जलमार्गानें प्रवास ज्याणें केला आहे असा किं० जलप्रवासास निघालेला. ३ दर्यावर्दी.

**सफल** [ सं० ] **वि०** १ ज्याला फळें आली आहेत किं० येत आहेत असे ( झाड ).२ फळें देणारें ( झाड ). ३ यशस्वी किं० पूर्ण झालेला किं० साध्य झालेला ( प्रयत्न, मनोरथ, हेतु, उद्देश, इच्छा, धंदा, इ० ); फायदेशीर.

**सफाई** [ अ० साफ्; सफा ] **स्त्री०** १ ( पाणी इ० चो ) शुद्धता किं० स्वच्छता. २ कारागिरीच्या पदार्थांचा नीटनेटकेपणा किं० सुबकपणा. ३ गुळगुळीतपणा. ४ तीच गोष्ट सतत करीत असल्याकारणानें साधते ती हातोटी किं०येतो तो सहजपणा; अभ्यासानें किं० परिचयानें कामांत येणारी जलदी किं० चपळाई. ५ चकचकीतपणा; तकाकी. ६ न आडखळतां सारख्या वेगानें बोलणें, लिहिणें, इ० कामांतील कौशल्य. ७ वैमनस्यानंतर पुन्हां झालेली मैत्री; दिलजमाई. ८ हिशेबांतील गुंतागुंतीच्या बाबींचा निकाल. **क्रि० वि०** अगदीं; पूर्णपणें; सर्वथैव ( बुडणें, जळणें, नष्ट होणें ). ꠶ **सफाईदार वि०** गुळगुळीत; चकचकीत; झोकदार; इ०. **सफागिरी, सफाईदारी स्त्री०** चकाकी; तकाकी; गुळगुळीतपणा; इ०. वर ' सफाई ' चे सर्व अर्थ पहा.

**सफाशी** [ म० स+फासा ] **वि०** फासा, अडकण, किं० कोयंडा ज्याला आहे असा (दागिना, मोहोर, पुतळी, किं० कोणताही पदार्थ ) .

**सफील, सफेला** मागें ' सपेली ' पहा.

**सफेजंग,सफेजंगी** [ अ०सफ्फ् ( शिपायांची रांग )+जंग् (लढाई) ] **स्त्री०** १ घनघोर लढाई; तुमुल युद्ध. २ युद्ध, दरोडा, टोळधाड, इ० मुळें देश, गांव, इ० ची नासाडी, विध्वंस,किं०खराबी. ३ सामग्री, बेगमी, पैसा, इ० अगदीं संपून जाणें किं० त्यांची निःशेषता.

**सफेत, सफेद्** [ **फा०** ] **वि०** पांढरा. ※ **पांढरा सफेत (-द् )** **वि०** अगदीं पांढरा. **सफेत (-द-) मुसळी स्त्री०** मुसळी नांवाच्या वनस्पतीची पांढरी जात. मागें ' मुसळ ' मध्यें ' मुसळी ' पहा.

**सफेता** **पु०** १ खडीसारखा पांढरा रंग. २ ( **लाक्षणिक** ) कांहीं वाईट कर्माला दिलेलें चांगलेपणाचें रूप. **सफेती स्त्री०** १ पांढरेपणा. २ भिंत इ० ना दिलेला पांढरा रंग. ३ ( **लाक्षणिक** ) वाईट कृत्याला दिलेलें चांगलेपणाचें रूप.

**सफेली** मागें ' सपेल, *सफील'पहा.

**सफोल** [ **म०**स+फोल ]**वि०**व्यर्थ; निष्फल.

**सफ्फर, सफ्फरी** मागें 'सफर,*सफरी' पहा.

**सबकल, सबखल** मागें ' चबकल ' पहा.

**सबजा** [ **फा०** ] **पु०** तुळशीच्या जातीची एक सुगंधी वनस्पति.

**सबजी** [ **फा०** ] **स्त्री०** १ हिरवेपणा; हिरवळ. २ टवटवी. ३ पालेभाजी. ४ भांगेचें पेय. ५ भांग.

**सबतुटी** [ **हिं०** सब् ( सर्व )+तुट्ना (तुटणें)] **स्त्री०** सर्व सोंगट्या मरून शिल्लक राहिलेली सोंगटी ( नरद ). मागें ' नरद ' पहा. ※ **सबतुटी आणि भलताच कुटी** ज्याला कोणी वाली राहिलेला नाहीं त्याला हावा तो छळतो.

**सबंद, सबंध** [ **सं०** स+बंध ] **वि०** १ सर्व; दरोबस्त. २ एकत्रित; संघटित. ३ अखंड; न फोडलेला; न कापलेला; न तोडलेला; अभग्न. ※ **सबंधवहीत वि०** सर्व भागीं लागवडींत असलेली किंवा आणलेली ( जमीन ).

**संबद्ध** [ **सं०** ] **वि०** जोडलेला; बांधलेला; जुळलेला.

**संबंध** [ **सं०** ] **पु०** १ संयोग; जोडणें. २ संसर्ग; स्पर्श. ३ नातें. ४ विवाहविधीनें झालेला किंवा होणारा संयोग. ह्यालाच ' शरीरसंबंध ' म्हणतात. ५ स्नेह; दोस्ती. ६ कांहीं कार्यांत कोणेकाचें जें अंग तें. ७ गुंतलेपणाची स्थिति. ८ नातलग. ९ ( **व्याकरण** ) षष्ठीचा अर्थ. १० योग्यपणा; उचितता; अनुरूपता. ११ मृत ब्राह्मणाचें भूत किंवा पिशाच. ह्या अर्थी ' समंध ' अधिक रूढ आहे. ※ **संबंधी पु०** नातलग; सोयरा. **संबंधीक वि०** १ संबंधाचा. २ उग्र किंवा तामसी स्वभावाचा; तामसी. ३ समंधाचा ( उपद्रव, पीडा, बाधा ).

**सबनिशी** खालीं ' सबनीस ' मध्यें पहा.

**सबनीस** [ **फा०** सुबाह् नवीस ] **पु०** दरकदाराचा कारकून,-शिबंदी, कामगार, इ० चे पगार आदा करणारा. ※ **सबनिशी स्त्री०** सबनिसाचा हुद्दा, दर्जा, अधिकार, किंवा वेतन.

**सबब** [ **अ०** ] **स्त्री०** १ कारण; निमित्त. २ खोटें कारण किंवा निमित्त; बहाणा. **उभयान्वयी अ०** या कारणास्तव; म्हणून.

**सबर वि०** गरोदर ( घोडी, गाढवी, किंवा खेचरी ).

**सबर, सबुर** [ **अ०** सब्र् ] **स्त्री०** धीर(करणें); थांबणूक; वाट पाहाणें. ※ **सबुरी स्त्री०** दम धरणें; वाट पाहाणें; धीर धरणें; उतावळी न करणें; तहकुबी; शांतपणा.

**सबल, सबळ** [ **सं०** सबल ] **वि०** १ बळकट; भक्कम. २ यथार्थ ( कारण, सबब ).

**सबसणीस क्रि० वि०** धक्का लागला असतां किंवा हालविण्याचा प्रयत्न केला असतां न हालणारा म्ह० पक्का बसविलेला किंवा पुरलेला ( खांब, धोंडा, इ० ).

**सबसब (-बां ), सपसप (-पां ) क्रि० वि०** संकोच न बाळगतां किंवा वारंवार किंवा दुसऱ्याला उपद्रव होईल अशा प्रकारें ( स्थळविशेषीं येणें, जाणें ).

**संबळ,सबळ पु० स्त्री०** एक प्रकारची पहार.

**संबळ पु०** गोंधळी, वाजंत्री, इ० चें एक चर्मवाद्यविशेष. ※ **संबळ्या पु०** संबळ वाजविणारा.

**संबळी स्त्री०** देवपूजेचीं उपकरणीं ठेवण्याची बांबू, वेत, गवत, इ० ची ल्हानशी पेटी.

**सबा, सब्बा** [ **अ०** सब्अ ] **वि०** सात; ( मुसलमानी वर्षांत ).

**सबाध** [ **सं०** स+बाधा ] **वि०**१ बाधायुक्त; उपद्रव पावलेला. २ दोषयुक्त, चुकीचा, अपवाद ज्याला आहे असा ( मुद्दा, वाद, मत, इ० ).

**सबाह्य** [**सं०**] **वि०** १बाहेरच्या बाजूसहित.२ आंतल्या आणि बाहेरच्या बाजूंसहित.※**सबाह्या-**

भ्यंतर क्रि० वि० १ आंतून आणि बाहेरून; पूर्णत्वानें (पवित्र, शुचि). २ मनानें आणि कृतीनें(प्रार्थना किं०विनंती करणें).न०ए०व०मन आणि आचरण ही जोडी किं० ह्यांची एकवाक्यता; उ० ह्या गृहस्थाच्या सबाह्याभ्यंतराबद्दल मी खात्री देतों.

संबुद्ध [ सं० ] पु० बुद्धावतार.

संबुद्धि [ सं० ] स्त्री० १ ज्ञान; पूर्ण जाणीव. २ कोणेकाला हाक मारणें. ३ ( व्याकरण ) संबोधनाचें एकवचन.

सबुरी, सबूर, सबोरी, सबुराई [ अ० सब्र् ] स्त्री० धीर ( करणें ); थांबणूक;सावकाशी; तह्कुबी; घाई न करणें; उ० ह्या लग्नसराईत लुगडें घेऊं नका, महाग पडेल, दोन महिने सबुरी करा. ॥ सबुऱ्या वि० शांत; दम किं० धीर धरण्याच्या स्वभावाचा. सबूर उ० वा० अ०थांबा ! घाई करूं नका !

सबैन, सब्बैन [ अ० सब्ईन् ] वि० सत्तर ( अरबी सालांत ).

संबोखणें [ म० संबोधणें ] स० क्रि० ( कोणेकाला ) हाक मारणें किं० बोलाविणें.

संबोध [ सं० ] पु० १ ज्ञान. २ उपदेश;बोध.

संबोधणें [ सं० सम् + बुध् ] स० क्रि० ( कोणेकाला ) हाक मारणें; ( कोणेकाला ) उद्देशून बोलणें.

संबोधन [ सं० ] न० १ उपदेश किं० बोध करणें. २ हाक मारणें. ३ ( व्याकरण ) हाक मारण्याची विभक्ति. ४ हाक मारतांना योजलेलें नांव. ५ ( मराठींत ) कोणेकाच्या वर्णनाचे म्ह० स्तुतीचे किं० निंदेचे शब्द; कोणेकाची स्तुति; कोणेकाची निंदा; उ० तो सुज्ञ आहे, तो तो धीट आहे, तो थोर आहे, हीं इतकीं संबोधनें त्याला कशाला देतां ? तो कसा आहे, हें मला पूर्णपणें ठाऊक आहे; उ० तो लुच्चा आहे, व्यभिचारी आहे, अशी लोक त्याला संबोधनें देतात, त्याच्याशीं तुम्ही स्नेह ठेवूं नका.

संबोधित [ सं० ]वि० १ज्याला हाक मारली आहे तो; ज्याला बोलाविलें आहे तो.२ ज्याला बोध केला आहे तो.

सब्बा, सब्बैन वर ' सबा, ''सबैन ' पहा.

सब्रह्मचारी [ सं० सब्रह्मचारिन् ] पु० १ सहाध्यायी. २ समान स्थितीतील.

सभय [ सं० ] वि० १ भ्यालेला. २ भय वाटविणारा; भयावह; भयंकर.

सभर [ सं० स+भर (भार) ] वि० गरोदर ( घोडी, गाढवी, किं० खेचरी ). क्रि० वि० सर्व भार किं० जोर किं० वजन यांचेसहित ( कोसळणें, ढासळणें, पडणें, रट्टा बसणें, तडाखा मारणें ); उ० ह्या वड्याळावर तुझा सभर पाय पडला मग तें फुटलें यांत नवल काय ?

सभराभरी क्रि० वि० जिकडे तिकडे.

सभराभरीत वि० पूर्णपणें भरलेले किं० व्यापिलेलें.

सभर्तृका [ सं० ] स्त्री० १ जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री; सुवासिनी.२ जिच्यासह भर्ता आहे अशी स्त्री.

संभव [ सं० ] पु० १ जन्म; उत्पत्ति. २ उत्पत्तिस्थान. ३ हेतु; कारण. ४ शक्यता; शक्य होणें किं० असणें; रंग; कांहीं तर्क किं० अटकळ करावयाला आधार किं० जागा; उ० आज पाऊस पडण्याचा संभव आहे; उ० तो वशीला घालील असा संभव आहे. ५ मिश्रण; एकीकरण. कांहीं उपयुक्त समास पुढें दिले आहेत. कुंभसंभव म्ह० घागरीपासून जन्मलेला म्ह० अगस्त्य ऋषि. पद्मसंभव म्ह० कमळापासून जन्मलेला म्ह० ब्रह्मदेव. अयोनिसंभव म्ह० योनीतून न जन्मलेली म्ह० सीता. पित्तसंभव म्ह० पित्तापासून उत्पन्न झालेला ( रोग इ० ).

संभवणें [सं०सम्+भू ]अ०क्रि०१शक्य होणें किं० असणें; अटकळीत किं० तर्कांत येणें. २ उद्भवणें; जन्मणें; उत्पन्न होणें. ३ कोणेक स्थळीं सोयीनें राहूं किं० असूं शकणें; उ० येवढ्याशा घरांत किं० जागेंत दोन कुटुंबें संभवत नाहींत.

सभंवतां, सभंवताला, सभंवतीं,सभोंवतीं श० यो० अ०, क्रि० वि० सर्व बाजूंनीं; भोंवतालीं; उ० त्याणें घरासभंवतां तुळशी लाविल्या आहेत.

सभा [ सं० ] स्त्री० १ कांहीं विषयाच्या चर्चेसाठीं किं०विचारविनिमयासाठीं एके स्थळीं जमलेले लोक समुच्चयानें किं० हें स्थळ. २ धर्म-

शाळा. ३ न्यायमंदिर. ४ द्यूत. ५ जुगाऱ्यांचा अड्डा. ६ राजाचा दरबार. ꣸ **सभापति** पु० सभेचा अध्यक्ष. **सभामंडप** पु० १ सभेसाठीं उभारलेला तात्पुरता मांडव. २ देवळापुढें कथा, पुराण,प्रवचन,भजन, इ० साठीं कायमची दगड, विटा,चुना,इ०ची रचना असते ती.**सभासद** पु० १एकाद्या संस्थेच्या नियमाला अनुसरून चालणारा जो मनुष्य तो त्या संस्थेचा सभासद. २ एकाद्या संस्थेचीं जीं विविध कामें तीं करणारीं जीं माणसें तीं प्रत्येक. ३ एकाद्या मंडळीची किं० संस्थेचीं जीं घटक माणसें तीं प्रत्येक. ४ एकाद्या खटल्याचा किं० वादग्रस्त विषयाचा निकाल करण्यासाठीं नेमिलेली जीं माणसें तीं प्रत्येक. **सभाकंप** पु० चार मंडळींत किं० सभेंत जावयाला किं० बोलावयाला किं० कांहीं गाणें म्हणावयाला कोणेकाला भीति वाटून गात्रांना कंप सुटतो तो. ज्या माणसाला अशी भीति वाटत नाहीं त्याला ‘ सभाधीट ’ म्हणतात आणि ह्या गुणाला ‘ सभाधीटपणा ’ म्हणतात. **सभागृह** न० सभा भरविण्याची जागा. **सभाचातुर्य, सभाकौशल्य,सभापाटव** न० सभेमध्यें शिष्ट चालीरीतींना अनुसरून वागण्याचा किं० बोलण्याचा जो गुण तो.**सभाजन** पु०अ०व०सभेंत जमलेले लोक. **सभाजय** पु० आपला पक्ष खरा आहे असें सभेंत सिद्ध करून देऊन मिळविलेला जय; आपल्या मताची सभेंत करून दाखविलेली सिद्धता. **सभादीप** पु० १ श्रावणीचे दिवशीं सभेंत ब्राह्मण, अग्नि, ह्यांचे सन्निध ब्राह्मणांस स्त्रिया दान देतात जो दिवा तो. २ सभेमध्यें गुणविशेषानें भूषणभूत जो मनुष्य तो. ३ श्रावणीचे दिवशीं धान्याचें पीठ, हळद, इ० चें दान स्त्रिया स्त्रियांस देतात तें किं० तें दान देण्याचा विधि. **सभाध्यक्ष, सभाधिकारी** पु० सभेचा चालक,– ज्याचे हुकूम तेथें जमलेल्या लोकांना पाळावे लागतात. **सभाधीट** वि० सभेंत किं० चार मंडळींत बोलावयाला किं० गावयाला जो कचरत नाहीं तो. **सभाधूर्त** वि० सभेमध्यें आपल्या पक्षाचें मंडन आणि प्रतिपक्ष्याचें खंडन करण्यांत जो पटाईत तो.

**सभाजन** [ सं० ] न० १ सत्कार. २ सेवा; पूजन. ३ स्वागतपर संभाषण; अभिनंदन.

**संभार** [ सं० ] पु० १ संग्रह; गोळा करणें. २ समुदाय; रास; ढीग. ३ सामग्री; कार्यविशेषाला लागणारें सामानसुमान; साहित्य. ४ पालनपोषण; रक्षण; जोपासना.

**संभावना** स्त्री०, **संभावन** न० [ सं० ] १ विचार; समजूत. २ तर्क; कल्पना. ३ संभव. ४ योग्यता. ५ लायकी. ६ सन्मान. ७ कोणी शास्त्री, पुराणिक, दशग्रंथी, गवई, इ०ना त्यांचे गुणाबद्दल देतात तें पारितोषिक (करणें). ८(**साहित्य**) उपमेय हें उपमानच असावें असा उत्कट संदेह व्यक्त करणें. ९ ( **विपरीत लक्षणेनें** ) कोणेकाला शिव्या देणें किं० त्याचा बोऱ्या उडाविणें.

**संभाविणें** [ म० संभावना ] स० क्रि० ( अतिथि, थोर माणूस, इ०ना ) योग्य मान देणें किं० त्यांचा उचित सत्कार करणें.

**संभावित** [ सं० ] वि० १ कल्पिलेलें; तर्किलेले. २ ज्याला मान देण्यांत आला आहे असा. ३ सन्मान्य; पूज्य. ४ अनुरूप. ५ संभवनीय. ६ अपेक्षिलेलें; अटकळींत आलेलें.

**संभाव्य** [ सं० ] वि० १ मानण्याजोगें; कल्पनेंत येण्याजोगें किं० आणतां येईल असें. २ संभवनीय. ३ शक्य कोटींतील.

**संभाषण** [ सं० ] न० १ मंडळींत बसून एकमेकांशीं बोलणें किं० विचारविनिमय करणें; गप्पा मारणें; उ० सभेंत उत्तम भाषण करणारे लोक संभाषण करण्यांत चतुर असतातच असें नव्हे.

**संभाळ** [ सं० संभार ] पु० १ कोणेकाचें केलेलें पालनपोषण; प्रतिपाळ. २ रक्षण. ꣸ **कांहीं वस्तु कोणेकाच्या संभाळीं करणें** ती रक्षणार्थ त्याच्या जवळ देणें किं० त्याच्या हवालीं करणें.

**संभाळणें** [ सं० सम्+भृ ] स० क्रि० १ रक्षिणें; जतन करणें. २ अन्नवस्त्र इ० कोणेकाला देऊन त्याचा प्रतिपाळ करणें. ३ (शिस्त,नियम, कायदा, आचार, इ० ) पाळणें म्ह० न उल्लंघिला जाईल अशाबद्दल जपणें. अ० क्रि० १ त्वगिंद्रियानें जाणणें; उ० त्याचें उजवें अंग बधिर

झालें आहे, त्याला चिमटा घेतला किं० सुई बोचली तरी संभाळत नाहीं. २ जपून असणें; उ० संभाळ, भलता शब्द तोंडावाटें काढू नको.

**सभिक, सभीक** [ **सं०** ] **पु०** जुगाराच्या अड्ड्याचा मालक; द्यूतगृहाचा मालक.

**सभीज** [ **म०** स+भिजणें ] **क्रि० वि०**पूर्णपणें ( वस्त्र इ० पाणी इ० मध्यें भिजणें).

**संभूत** [ **सं०** ] **वि०** १ उत्पन्न झालेला; जन्मलेला. २ जोडलेला. ३ योग्य; अनुरूप. ४ युक्त; सहित. **संभूत स्त्री०** ( **मराठींत** ) गंधवार्ता सुद्धां ( नसणें ); अगदीं देखील संभव किं० शक्यता ( नसणें ); उ० ह्या गांवांत सर्पाची संभूत नाहीं, मग तुला सर्प डसेल कोठून ? ह्याच अर्थी ' संभूत वार्ता ' **स्त्री०**; उ० तुमच्या रामूचें लग्न होणार आहे ह्याची आम्हाला संभूत वार्ता ठाऊक नव्हती.

**संभूति** [ **सं०** ] **स्त्री०** १ जन्म. २ संयोग; समागम; मिलाफ. ३ योग्यता; अनुरूपता. ४ विभूति. ५ वैभव. ६ शक्यता; संभव.

**संभूय** [ **सं०** ] **क्रि० वि०** एकत्र. ॐ **संभूय समुत्थान न०** पातीचा धंदा.

**संभृत** [ **सं०** ] **वि०** १ जमविलेलें; एकत्रित केलेलें; जुळविलेलें. २ संपादित. ३ सज्ज किं० सिद्ध केलेलें. ४ पूर्ण. ५ युक्त; सहित.

**संभेद** [ **सं०** ] **पु०** १ संगम; नद्याचा संगम. २ मिश्रण. ३ घोटाळा. ४ फितुरी; विश्वासघात.

**संभोग** [ **सं०** ] **पु०** १ वापरणें; भोगवटा. २ सुख; विलास. ३ उपभोग्य वस्तु. ४ मैथुन. ५ ( **साहित्य** ) शृंगाराचा एक प्रकार. यांत नायक आणि नायिका यांची गांठ पडली असल्याचें वर्णन असतें. संभोगशृंगाराच्या व्यावर्तकत्वें 'विप्रलंभ शृंगार.' मागें ' विप्रलंभ ' पहा.

**संभोगणें** [ **सं०** सम्+भुज् ] **स० क्रि०** १ भोगणें; अनुभविणें; वापरणें; ( कोणेक वस्तूचा) उपभोग घेणें किं० तिच्या उपभोगाचें सुख घेणें. २ ( **स्त्रीला** ) मैथुनविषय करणें.

**संभोगी** [ **म०** संभोग ] **वि०** १ भोगणारा; वापरणारा; भोग घेऊन तृप्त झालेला. २ नानाप्रकारच्या विलासांत रमणारा.

**सभोंवतां, सभोंवताला, सभोंवतीं, सभोंवर, सभोंवार क्रि० वि०** सर्व बाजूंनीं ( वेढणें, गराडणें, असणें, राहाणें, इ० ); उ० आम्ही घरा सभोंवार देवकापशींचीं झाडें लाविलीं आहेत.

**सभ्य** [ **सं०** ] **वि०** १ सभेसंबंधी. २ सुसंस्कृत. ३ संभावित. **पु०** १ सभासद; कोणत्याही संस्थेतील एक एक व्यक्ति. २ सज्जन.

**संभ्रम** [ **सं०** ] **पु०** १ वाटोळें फिरणें; चक्राकार गति. २ त्वरा; घाई; लगबग. ३ भयानें उडालेली धांदल. ४ धामधूम; दंगा. ५ चित्तक्षोभ. दबावचळलेपणाची स्थिति; गोंधळ; घोटाळा. ७ उद्वेग; चिंता. ८ भ्रम; भ्रमिष्टपणा. ९ आदर; संमान; पूज्यबुद्धि. १० चुकी. ११ ( **मराठींत** ) छाकटेगिरीचे प्रकार; नटवेगिरी किं० छानछुकी; उ० चक्रीदार पागोटें घालावें, गंध रेखून लावावें, डौलानें चालावें, मिशांना पीळ भरावा, असे हा दिवसभर आपल्या जिवाचे संभ्रम करीत असतो.

**संभ्रांत** [ **सं०** ] **वि०** १ भ्यालेला. २ भयचकित; भांबावलेला. ३ घोटाळ्यांत पडलेला.

**सम्** [ **सं०** ] **उपसर्ग** ह्याचे पुढें दिल्याप्रमाणें कांहीं अर्थ आहेत. १ सहित; बरोबर; उ० संभाषण, समागम. २ पूर्णपणें; पुष्कळ; अतिशय; उ० संतुष्ट; संताप; समुत्सुक. ३समोर; उ० समक्ष ( म्ह० डोळ्यापुढें ).

**सम** [ **सं०** ] **वि०** १ तेंच. २ तुल्य; सदृश; सारखें. ३ सपाट, सरळ ( पृष्ठभाग ). ४(**गणित**) दोहोंनें निःशेष भागिली जाणारी ( संख्या ); उ० ८, १२,२४,इ०.५निःपक्षपाती. ६प्रामाणिक. ७ सद्गुणी. ८ सामान्य. ९ मध्यम. १० योग्य. ११ ( **गणित** ) कांहीं गणितकृत्यांत एक परिमाण ज्या प्रमाणांत कमी किं० अधिक होईल त्याच प्रमाणांत दुसरें परिमाण कमी किं० अधिक होत असेल तर त्या परिमाणाचें पहिल्या परिमाणाशीं जें प्रमाण तें सम(प्रमाण); उ०पांच माणसें जें काम कांहीं काळांत करतात त्याच्या दुप्पट काम दहा माणसें तितक्याच काळांत करतील.येथें माणसामाणसांत जें प्रमाण आहे तेंच कामाकामांत आहे म्हणून हें सम प्रमाण. मागें ' व्यस्त ' मध्यें ' व्यस्त प्रमाण ' पहा. **न०** १ सपाट प्रदेश किं०

पृष्ठभाग. २ (संगीत) तालविशेष. ३ (साहित्य) परस्परांस योग्य किं० अनुरूप अशा दोन चांगल्या किं० दोन वाईट वस्तूंचा संयोग झाल्याचें वर्णन असल्यास 'सम' हा अलंकार होतो. विशेष खुलासा आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. ॐ **समवर्ती** [ सं० समवर्तिन् ] **वि०** निःपक्षपाती. **पु०** यम. **सम अपूर्णांक पु०** ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षां लहान असतो तो सम अपूर्णांक; उ० $\frac{२}{५}$, $\frac{३}{८}$, इ० **समकक्ष वि०** सारखा; तुल्य परिमाणाचा; बरोबरीचा. **समकालीन वि०** एकाच वेळचे; एकाच वेळीं हयात असलेले; एकाच कालीं घडलेले (प्रकार इ०). **समकेंद्र वि०** ज्यांचा मध्यबिंदु तोच किं० एकच आहे अशीं ( वर्तुळें ). **समकोण(-न) वि०** जिचे सगळे कोन सारख्याच अंशाचे आहेत अशी ( आकृति ). **समगुणन न०** एका संख्येस त्याच संख्येनें गुणणें. **समघर न०** घराचा मध्यभाग किं० मध्यभागाची खोली. **समचतुरस्र वि०** जिचे चारी कोन सारख्या सारख्या अंशाचे आहेत अशी (आकृति). **समचित्त वि०** १ निःपक्षपाती. २ शांत आहे चित्तवृत्ति ज्याची असा. ३ कशाचीही पर्वा न करणारा; बेफिकीर. **समच्छेद वि०** तोच किं० एकच आहे छेद ज्यांचा असे ( अपूर्णांक ); उ० $\frac{१}{३}$, $\frac{५}{७}$ हे अपूर्णांक समच्छेद केले असतां $\frac{७}{२१}$ आणि $\frac{१५}{२१}$ असे होतात. **समचतुरस्र, समचौरस वि०** ज्याचे चारी कोन काटकोन आहेत अशी आकृति. **समतोल, समतुक वि०** १ सारख्याच वजनाचें. २ एकमेकांस तोलून धरणारें. ३ गुण, धर्म, बल, विद्या, इ० नीं बरोबरीचे किं० समान. **क्रि० वि०** सर्व बाजूंस सारखाच भार घालून; उ० होडीमध्यें समतोल बसावें म्हणजे होडी कलंडत नाहीं. **समतोल बुद्धि स्त्री०** निःपक्षपाती बुद्धि. **समथळ वि०** सपाट ( प्रदेश ). **समदर्शी वि०** सर्व प्राणिमात्रांकडे आपलेपणाच्या बुद्धीनें पाहणारा. **समत्रिभुज पु०** ज्याच्या तीन्ही बाजू सारख्या आहेत असा त्रिकोण. **समरस पु०** १ ऐक्य; तादात्म्य. २ ब्रह्मानंद. **वि०** १ सर्वांशीं मिळून राहणारा. २ दुसऱ्याच्या चित्तवृत्तीशीं एकरूप झालेला; उ० जो कवींशीं समरस होऊं शकेल तोच ह्यपूर्ण काव्य आस्वादूं शकेल. **समरसता स्त्री०** मानसिक वृत्तींची एकरूपता; तल्लीनता. **समरास स्त्री०** १ शेतांतील पिकाची अविभक्त रास. २ अविभक्त मालमत्ता. **समवयस्क, समवयी वि०** सारख्याच वयाचे. **समसमान वि०** अगदीं सारखे,-ज्यांत मुळींच भेद किं० तफावत नाहीं असें. **समविषम न० ए० व०** १ कमी जास्ती; अधिक उणें. २ किरकोळ चुका; उ० मी बोललों त्यांत कांहीं समविषम असल्यास क्षमा करावी.

**समई स्त्री०** मध्यें स्तंभ असून खालीं वर चाडीं असलेला धातूचा केलेला एक पदार्थ. वरच्या चाड्यांत तेल घालून वातेऱ्यांनील वात पेटवावयाची असते.

**समईक, समाईक** [ सं० सामयिक ] **वि०** १ अनेकांच्या मालकीचें असून अविभक्त असें ( घर, शेत, उत्पन्न, इ० ). २ सर्कत, पाती, इ० शर्तींवर चालविलेला ( धंदा, व्यापार, इ० ).

**समकणें, संवकणें अ० क्रि०** कांहीं एका गोष्टीची गोडी किं० चटक कोणेकाला लागल्याकारणानें त्याणें ती गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याकडे कललेलें असणें किं० करण्याला प्रवृत्त होणें किं० तिच्याबद्दल उत्सुक झालेलें असणें.

**समग्र** [ सं० ] **वि०** १ आरंभापासून शेवटपर्यंत असलेलें. २ सर्व; अखिल.

**समज** [ म० समजणें ] **पु०, स्त्री०** १ अमुक वस्तु अमुक स्वरूपाची आहे असा ग्रह किं० असें मत. २ एकाद्या विषयाची गुंतागुंत नाहींशी होऊन तिच्याबद्दल जी स्वच्छ, स्पष्ट, किं० असंदिग्ध कल्पना आपल्या मनांत येते ती. ३ सदसद्विवेकबुद्धि. ४ कोणी कांहीं शहाणपणाचा विचार सांगितला असतां तो ऐकण्याकडे प्रवृत्ति. **समज स्त्री०** धाकदपटशा, धमकी ( देणें ). ॐ **समजउमज स्त्री० ए० व०** १ विषयाचें ग्रहण करण्याची ताकद; आकलनशक्ति. २ सारासारविचार. **समजदार वि०** शहाणा; कोणी केलेला बोधाचा विचार मान्य करणारा; हेकट नव्हे तो.

**समजणें** स० क्रि० १ बुद्धीनें ग्रहण करणें; जाणणें. २ मानणें. ३ कल्पिणें. अ० क्रि० १ज्ञात होणें; कळणें. २ रुसवा टाकून देणें; ताळ्यावर येणें. ३ बेबनाव नाहींसा होऊन पुन्हां दोस्त होणें. ॐ **समजून उमजून** क्रि० वि० १ जाणूनबुजून; सर्व गोष्टी विचारांत घेऊन. २ मुद्दाम; बुद्धिपुरःसर.

**समजाविणें, समजाविणें** [ म० ' समजणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० १ कोणेकाला ( कांहीं विषय ) स्पष्ट करून सांगणें. २ ( कोणेकाचा ) राग, रुसवा, घोटाळा, किं० भ्रम निरस्त करणें.

**समंजस** [ सं० ] वि० १ योग्य. २ बिनचूक; सुसंगत. ३ शाहाणपणाचा; समजूतदारपणाचा. ४ सुबोध. ५ सद्गुणी; न्यायी; दोन्ही बाजू विचारांत घेणारा; निःपक्षपाती.

**समजस** [ म० समजणें ] वि० समजूतदार; शहाणा; हेकट नव्हे तो.

**समजावण, समजावणी, समजाविशी, समजावशी, समजावीस, समजी** [ म० समजणें, समजाविणें ] स्त्री० १ कोणेकाचा राग किं० रुसवा घालविणें. २ कोणेकाला बोध करणें किं० वस्तुस्थिति स्पष्ट करून सांगणें. ३ कोणेकाचें मन वळाविणें किं० त्याला ताळ्यावर आणणें. ४ स्पष्टीकरण; उलगडा.

**समजीक, समजीस** [ म० समजणें ] वि० १ शाहाणा. २ समजूतदार. ३ न्यायी; निःपक्षपाती.

**समजूत** [ म० समजणें ] स्त्री० १ मनाचा ग्रह; मत. २ उलगडा; संदिग्धता नाहींशी होऊन एकाद्या विषयाची आलेली खरी कल्पना. ३ रुसव्याचें निरसन; राग घालविणें; उ० त्या मुलाची समजूत करण्याचा तुमचा प्रयत्न फुकट जाईल. ॐ **समजूतदार** वि० १ शाहाणा; दुसऱ्याचा बोध ऐकून हेकटपणा सोडणारा. २ चांगलें काय आणि वाईट काय हें ठरवून वागणारा.

**संमत** [ अ० सम्त् ] स्त्री० दिशा; तरफ; रोख; उ० मौजा कातरज, संमत पुणें.

**संमत** [ सं० ] वि० १ पसंत; मान्य; कबूल; उ० शास्त्रसंमत, आचारसंमत, इ०. २ पूज्य; आदरास पात्र. ३ सदृश.

**समंत** [ सं० ] वि० १ विश्वव्यापी. २ पूर्ण; समग्र. पु० मर्यादा; सीमा. ॐ **समंततः** क्रि० वि० सर्व बाजूंनीं; सभोंवार. **समंतात्, आसन्** क्रि० वि० सभोंवार.

**संमति** [ सं० ] स्त्री० १ पसंती; मान्यता; रुकार ( देणें, असणें ). २ परवानगी; अनुज्ञा; कबूली. ३ सत्यज्ञान; आत्मज्ञान. ४ संमान; सत्कार. ॐ **संमतिपत्रक** न० पंचांच्या निर्णयाचा कागद.

**समतुक, समतोल** मागें ' सम ' मध्यें पहा.

**समंत्र, समंत्रक** [ सं० ] वि० मंत्र म्हणून केलेलें कांहीं कर्म ( पूजा, प्रेतदहन, इ० ).

**समथळ, समदर्शी** मागें ' सम ' मध्यें पहा.

**संमद** [ सं० ] पु० हर्ष; अति आनंद.

**समंध, संमंध** [ सं० ] पु० भूत; पिशाच.

**समधात, समधातू** [ सं० समधातु ] वि० फारच शांत किं० उष्ण नव्हे असें, फारच तिखट किं० मळमळीत नव्हे असें (औषध, खाद्य, हवा, इ०).

**समन्वय** [ सं० ] पु० १ संबंध. २ उदाहरणाचा लक्षणाशीं म्ह० व्याख्येशीं संबंध जोडून दाखविणें; उदाहरणानें व्याख्येचें स्पष्टीकरण करून दाखविणें. ३ परंपरेचा संबंध.

**समन्वित** [ सं० ] वि० १ युक्त. २ जुळलेला; संबद्ध. ॐ **समन्वित लय** पु० (संगीत) ताल.

**समभिव्याहार** [ सं० ] पु० १ एकत्र उल्लेख. २ शब्दसान्निध्य. ३ ज्याचा अर्थ स्पष्ट आहे त्याच्या शेजारीं संदिग्ध शब्दाचें असणें.

**समभिहार** [ सं० ] पु० १ पुन्हां पुन्हां करणें. २ आधिक्य.

**समय** [ सं० ] पु० १ वेळ; तंतोतंत वेळ. २ योग्य वेळ; संधी; अवसर; सोयीची वेळ. ३ हंगाम; वैपुल्याचा काळ. ४ रूढि; आचार; ठरलेला परिपाठ. ५ ठराव; करार; वचन. ६ प्रतिज्ञा. ७ अट; शर्त; बोली. ८ संकेत; खूण. ९ नियम; कायदा. ॐ **कोणेकावर समय येणें** ( किं० **पडणें** ) त्याच्यावर कांहीं संकट कोसळणें. **समयविशेषीं** क्रि० वि० विशिष्ट प्रसंगीं. **समयाचें शिरीं** ( किं० **समयास**, किं० **समयीं**) **उपयोगास येणें** अडचणीच्या वेळीं किं० ऐन वेळीं उपयोगास येणें किं० उपयोगीं पडणें किं० अडचण दूर करणें. **समयवेत्ता, समयज्ञ** पु० १ कोणेका कार्याला योग्य वेळ कोणता हें जाणणारा. २ योग्य वेळीं योग्य गोष्ट करणारा. **समयशीर** क्रि० वि० योग्य वेळीं; ठरलेल्या वेळीं; वक्तशीरपणें. वि० ठरलेली वेळ

पाळणारा. **समयसूचक** वि० १ विशिष्ट वेळीं योग्य (उत्तर, युक्ति, इ०).२ ऐन समयाला सुचलेलें(उत्तर,युक्ति, इ०).३प्रसंगाला जें योग्य तें करणारा( माणूस ). **समयानुसार** क्रि० वि० १ प्रसंगाला अनुसरून.२ कदाचित.।वि० प्रसंगाला योग्य.

**समर** [ सं० ] पु०,न० लढाई. ॐ **समरधीर** वि० लढाईंत न कचरणारा. **समरभूमि** स्त्री०, **समरांगण** न० लढाईची जागा. **समरविजयी** वि० लढाईंत ज्यानें जय मिळविला आहे असा.

**समरस** [ सं० ] वि० १ सर्वांशीं सारख्या रीतीनें वागणारा. २ दुसऱ्याच्या चित्तवृत्तींशीं एकरूप होणारा. पु० १ ऐक्य; तादात्म्य. २ ब्रह्मानंद. मार्गे ' सम 'मध्यें ' समरस ' पहा.

**समरसणें** [म० समरस] अ० क्रि० १ एकरूप होणें; तादात्म्य पावणें. २ कांहीं विषयांत गढून गेल्यामुळें स्वत्वाची जाणीव गमावून बसणें.

**समर्थ** [सं०] वि०१ बलिष्ठ.२ योग्य;उचित. ३ अधिकारी; अंमलदार; उ० स्वाभिमानशून्य लोक समर्थांची थुंकी घ्यावयाला उत्सुक असतात. ४ पैसा, अधिकार, किं० वशीला, यांचें पाठबळ ज्याला आहे असा. ५सार्थ; यथार्थ; विशिष्ट अर्थ व्यक्त करूं शकणारा ( शब्द ).

**समर्थन** [सं०] न० १ सिद्ध करणें. २ कोणेकाचें कांहीं वर्तन किं० भाषण किं० मत योग्य आहे असें सिद्ध करणें. ३ कोणेकाचा पक्ष घेणें. ४ परीक्षा; तत्त्वनिर्णय. ५ सार्थकता. **समर्थना** स्त्री० ह्या पांची अर्थी.

**समर्थनीय** [ सं० ] वि० जें योग्य,उचित, किं० बरोबर आहे असें सिद्ध करून दाखवितां येईल असें; पुराव्यानें सिद्ध करतां येईल किं० खरें म्हणून ठरवितां येईल असें.

**संमर्द** [ सं० ] पु० १ तुडविणें; चुरगळणें; कुसकरणें. २ घर्षण. ३ गर्दी; खेचाखेच; दाटी. ४गर्दीचें युद्ध; हातघाईची मारामारी.

**समर्पक** [ सं० ] वि० असावें तसें, बरोबर लागू पडणारें ( उत्तर ); प्रतिपक्ष्याला निरुत्तर करणारें ( विधान, उत्तर, कोटी, इ० ).

**समर्पण** [ सं० ] न० १ देऊन टाकणें; हवालीं करणें. २ कायमचें देणें. ३ देव, ब्राह्मण, इ० ना देणें किं० अर्पिणें किं० वाहणें.

**समर्पिणें** [ सं० सम्+अर्प् ] स० क्रि० १ देणें, देऊन टाकणें. २ देव, ब्राह्मण, इ० ना देणें.

**समर्पित** [ सं० ] वि० जें दिलें किं० देऊन टाकलें तें.

**समर्याद** [ सं० ] वि० १ मर्यादित; ज्याला नियंत्रणा घालण्यांत आली आहे असें; ज्याच्या विस्ताराला अडथळा आहे असा. २ समीपस्थ. ३ विस्तार, अधिकार, कर्तृत्व, अमल, यांना नियंत्रणा किं० प्रतिबंध असलेला.

**समला, सम्ला** [ फा० षम्लाह् ] पु० फेट्याचा किं० मुंडाशाचा पाठीवर सोडलेला पदर. ॐ **समलेदार** वि० ज्याचा पदर पाठीवर सोडलेला आहे असा ( फेटा किं० मुंडासें ).

**समवाय** [ सं० ] पु० १ संयोग; संबंध. २ समागम. ३ एकोपा; जूट. ४ साहाय्य. ५ समुदाय; समूह. ६ ( **न्याय** ) गुण आणि गुणी, क्रिया आणि क्रियावान्, जाति आणि व्यक्ति, यांचा जो परस्पर संबंध तो. ॐ **समवायी** [सं० समवायिन् ]वि० निकटसंबंधी. **समवायिकारण** न० घटकद्रव्य; ज्यावरसमवाय संबंधानें कार्य उत्पन्न होतें त्या कार्याचें तें समवायिकारण.

**समवेत** [ सं० ] वि० १ गोळा झालेलें. २ मिश्रित.३संबद्ध.श०यो०व० (**मराठींत** )सह;बरोबर;सहवर्तमान;उ०भार्येसमवेत मी काशीस गेलों.

**समशेर** [फा० षम्षेर् ]स्त्री० तरवार.ॐ**समशेर बहादू (–द–)र** वि०१तरवारीच्या लढाईंत. कुशल.२युद्धांत पटाईत.पु०१गंजिफांतील आठवा रंग. पु०१ श्रीमंत गायकवाडांचा किताब. २ मस्तानीच्या मुलाचें नांव. ३ कोणीही दांडगेश्वर. **समशेरासमशेर** स्त्री० तरवारीनीं रणावर केलेली कापाकापी. **समशेरी** वि० १ ज्या पुतळीच्या दोहों अंगच्या बाहुल्यांचीं किं० आकृतींचीं डोकीं एका दिशेकडे होतात अशी झालेली ( पुतळी ). २ समशेर म्हणून जो गंजिफांतील रंग तत्संबंधी ( पान, तलब, इ० ).

**समष्टि** [ सं० ] स्त्री० १ समुदाय. २ समग्रता. ३ हिरण्यगर्भ. ४ घटक भागांनीं संघटित जो पदार्थ तो ( घटक भागांच्या अपेक्षेनें). मार्गे ' व्यष्टि ' पहा.

**समसका** [ म० सा( सहा )+मास(महि

वि० सहा महिने दूध देऊन दरवर्षी विणारा ( पशु ). **समसकें न०**असें विणारें गुरूं. **समसकी स्त्री०** अशी विणारी(गाय, म्हैस,इ०).पुढें '**समां-समीना** [सं०] **स्त्री०** दरवर्षी विणारी गाय'पहा.

**समसीम** [ सं० सम+सीमा ] **वि०** ज्यांच्या हद्दी एकमेकींना चिकटलेल्या आहेत असे ( गांव, देश, इ० ).

**समस्त** [ सं० ] **वि०** १ एकीभूत; एकत्रित; एके ठिकाणीं आणलेलें किं० ठेविलेलें. २ सर्व; दरोबस्त. ३ ( **व्याकरण** ) समास झालेलें (पद); समासांत अडकलेलें पद.

**समस्या** [ सं० ] **स्त्री०** १ वाक्य, श्लोक, इ० चा कांहीं भाग देऊन उरलेला भाग कोणेकास भरावयास सांगणें ( घालणें ). २ असा अर्धवट दिलेला भाग ( घालणें ). वाक्य, श्लोक, इ० पूर्ण करून सांगणें झाला'समस्या पुरविणें'म्हणतात.'तर्क शकस्य दुर्लभम्'ही समस्या सर्वांस ठाऊक आहेच.

**समळ, समळ्या, समळी** मागें ' संबळ, ' ' संबळ्या, " संबळी ' पहा.

**समक्ष** [ सं० ] **श० यो०अ०** समोर; देखत; उ० गोविंदरावासमक्ष मी हा निरोप त्याला सांगितला. **क्रि० वि०** स्वतः; उ० तूं त्याला समक्ष भेटून काय सांगावयाचें तें सांग. ॐ **समक्षता स्त्री०** कोणेकाचें स्थलविशेषीं हजर असणें; हजेरी; उ० त्याची समक्षता येथें जरूर आहे ( म्ह० तो येथें हजर असणे जरूर आहे ); उ० तुमच्या समक्षतेंत त्यानें ही दांडगाई केली काय ? ( म्ह० तुमच्या देखत ). **समक्षा स्त्री०** देवानें किं० साधुपुरुषानें प्रत्यक्ष पुढें येऊन उभें राहाणें ( भक्तांस साहाय्य करण्यासाठीं ). **समक्षासमक्ष क्रि० वि०** दोहों पक्षाचें लोक हजर असतां. **स्त्री०** दोन माणसांची प्रत्यक्ष गांठ ( होणें ); दोन माणसें एकाच समयीं एके ठिकाणीं ( हजर असणें ).

**समा पु०** १ एक प्रकारचें भूत किं० पिशाच. २ समुद्रास येते त्या भरतींची पूर्णावस्था. ३ फळें, पिकें, इ० चा वैपुल्यानें येण्याचा किं० पिकण्याचा काळ; उ० हा आंब्याचा समा आहे तों पोटभर आंबे खाऊन घ्या. ४ ऐक्य; एकोपा; अविरोधाची स्थिति.

**समा** [ सं० ] **स्त्री०** वर्ष; संवत्सर.

**समाईक** मागें ' समईक ' पहा.

**समाकुल** [ सं० ] **वि०** १ गोंधळलेला; व्यग्र झालें आहे मन ज्याचें असा. २ व्याप्त; भरलेला; युक्त. **समाकुल,समाकुळ वि०**१सर्व; दरोबस्त.२ एकवटलेले किं०जमलेले (गांवकरी, गांवकामगार, कुटुंबांतील माणसें, जातींतील माणसें, इ० ). ॐ **समाकुल पांढर स्त्री०** १ कांहीं एका उद्देशानें एकत्र जमलेले गांवकामगार, गांवकरी, संस्थेचे सभासद, इ० समुच्चयानें. २ एका संस्थेचे किं० धंद्याचे सर्व लोक समुच्चयानें.

**समाक्रान्त** [ सं० ] **वि०** १ व्यापिलेलें. २ जिंकिलेलें. ३ कबज्यांत घेतलेलें.

**समागत** [ सं० ] **वि०** १ आलेला; येऊन पोंचलेला. २ जुळलेला; एकत्रित. ३ सहित; युक्त. **न०** गांठ; भेट.

**समागम पु०, समागति स्त्री०** [ सं० ] १ येणें; आगमन. २ संयोग; संगम. ३ सहवास. ॐ **सत्समागम पु०** चांगल्या लोकांची किं० साधुपुरुषांची भेट, गांठ, किं० सहवास.

**समाचार** [ सं० ] **पु०** १ वर्तन; आचरण. २ सद्वर्तन. ३ बातमी; वार्ता; कोणेक ठिकाणीं घडलेल्या गोष्टी; कोणेकाचें आरोग्य, सुस्थिति, इ० संबंधाची खबर; उ० आपला समाचार बरेच दिवसांत कळला नाहीं तो पत्र पाठवून कळवावा. ॐ **शुद्धसमाचार, शुद्धिसमाचार पु०** एकादें गांव, कुटुंब, किं० कोणी माणूस, यांच्या संबंधाची तपशीलवार माहिती किं० खबर. मागें ' शुद्ध ' मध्यें ' शुद्ध समाचार ' पहा.

**समाज** [ सं० ] **पु०** १ मेळा; जमाव; समुदाय. २ सभा. ३ सभागृह; अड्डा. ॐ **समाजशास्त्र न०** मानवी समाजाची उत्पत्ति, घटना, रचना, उत्क्रांति, सुधारणा, इ० संबंधाचे नियम, विवेचन, इ० चें शास्त्र. **सामाजिक वि०** समाजासंबंधाची(सुधारणा इ०) **सामाजिक बहिष्कार पु०** समाजानें कोणेकावर घातलेला बहिष्कार.

**समाधान** [ सं० ] **न०** १ जोडणें; एकत्र ठेवणें किं० आणणें. २ एकाग्रता. ३ मनन. ४ चित्ताची शांति; तृप्ति; संतोष; इष्ट वस्तु मिळाल्यानें वाटतो तो आनंद.५शंका किं० संशय यांचें निरसन; शंका फिटणें. ६ शरीरास किं० मनास

दुःखदायक जी गोष्ट ती तिचें निरसन होतांच वाटतो तो आराम किं० आनंद. ७ एकाद्या विधानावर आलेल्या आक्षेपाचें खंडन. ꙮ **समाधानी वि०** थोडक्यांत तृप्ति पावणारा; ज्यास्तां मिळालें नाहीं किं० मिळूं शकत नाहीं म्हणून चरफडत न बसणारा.

**समाधि** [ **सं०** ] **पु०**१ चित्ताची एकाग्रता; ध्यान; लय. २ केंद्रीभवन. ३ मौन; न बोलतां बसणें. ४ भक्ति. ५ चित्ताची शांतपणाची वृत्ति. ६ संतोष. ७ संयोग; अनेक पदार्थ एकत्रित करून नवीन पदार्थ करणें. ८ भांडण मिटविणें; तोडजोड करणें. ९ करार; वचन. १० परब्रह्माच्या चिंतनांत पूर्णपणें गढल्याची स्थिति,–योगाच्या अष्ट अंगांपैकीं शेवटचें. ११ धान्यसंचय; बेगमी. १२समर्थन. १३ (**साहित्य**) एका कारणानें होणारें कार्य दुसऱ्या एका किं० अनेक आकस्मिक कारणांमुळें सुकर किं० सोपें झाल्याचें वर्णन केलेलें असल्यास समाधिनामक अलंकार होतो. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. १४ संन्याशानें केलेलें प्राणविसर्जन. १५ संन्यासी मेला असतां त्याला जलांत टाकणें किं० जमीनीत पुरणें हा विधि. १६ संन्याशाला जेथें पुरलें आहे तेथें तुळशीवृंदावन इ० बांधतात तें. **टीप**:–' समाधि ' शब्द मराठींत वरील सर्व अर्थी बहुधा **स्त्री०** वापरतात. ꙮ **समाधिस्थ वि०** १ ज्याणें समाधि लाविली आहे असा. २ मेलेला ( संन्यासी ). **समाधिस्थ होणें** ( संन्यासी ) मरणें.

**समान** [ **अ०** ] **वि०** आठ (अरबी सालांत)

**समान** [**सं०**] **वि०** १ तेंच, एकच.२ सारख्या प्रमाणाचें, किंमतीचें, किं० महत्वाचें. ३ सारखा; तुल्य. ४ सपाट, नितळ ( पृष्ठभाग ). **पु०** पंचप्राणांपैकीं एक. प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान, हे पंचप्राण. ꙮ **समानाधिकरण न०** १ दोन शब्दांची एकच विभक्ति असणें. ' नीलांबर ' ( बलराम ) ह्यांत ' नील ' आणि ' अंबर ' ह्यांची एकच म्हणजे प्रथमा विभक्ति आहे. २ सामान्य गुण. ३ एक अर्थ. **समानोदक पु०** सातव्या पिढीपुढचे आप्त ( जन्म आणि नांव माहीत असलेले ). **समानोदर्य पु०** सख्खा भाऊ. **समानोदर्या स्त्री०** सख्खी बहीण. **समानकक्ष वि०** सारख्याच योग्यतेचा किं० दर्जाचा. **समानकालीन वि०** त्याच काळचा; एके काळीं असलेला, घडलेला, किं० झालेला. **समानवयस्क वि०** त्याच किं० एकाच वयाचे. **समानशील वि०** त्याच स्वभावाचा किं० वृत्तीचा; ज्यांच्या आवडी सारख्याच आहेत असे; उ०समानशीलव्यसनेषु सख्यम्. **समानस्कंध वि०** सारख्याच उंचीचे (मजूर, बैल, हमाल, इ० ). **समानार्थ, समानार्थक वि०** त्याच अर्थाचे ( शब्द इ० ). [सालांत ).

**समानीन** [ **अ०** ] **वि०** ऐंशीं ( अरबी

**समापत्र** [ **म०** संमतिपत्र ] **न०** संमतीचें म्ह० कबूलीचें पत्र.

**समापत्ति** [ **सं०** ] **स्त्री०** १ भेटणें; भेट; गांठ. २ यदृच्छा; कर्मधर्मसंयोग. [२ वध.

**समापन** [ **सं०** ] **न०** १ संपविणें; समाप्ति.

**समापन्न** [ **सं०** ] **वि०** १ युक्त; सहित. २ प्रवीण. ३ समाप्त.

**समापित** [ **सं०** ] **वि०** संपविलेलें.

**समाप्त** [ **सं०** ] **वि०** १ संपलेलें; शेवटास गेलेलें. २ श्रांत; दमलेला; थकलेला.

**समाप्ति** [ **सं०** ] **स्त्री०** १ शेवट. २ पूर्णता. ३ दमलेपणाची स्थिति. ४ मरण; नाश; विध्वंस.

**समाम्नात** [ **सं०** ] **वि०** एकत्र सांगितलेलें.

**समाम्नाय** [ **सं०** ] **पु०** १ परंपरा. २ परंपरागत ग्रंथ. ३ पठन. ४ वेद. ५ समुदाय.

**समायत** [ **सं०** ] **वि०** १ पसरलेला. २ लांबरुंद; विस्तीर्ण.

**समायुक्त** [ **सं०** ] **वि०** १ युक्त; ( सर्व अर्थी ). २ सज्ज केलेलें ( धनुष्य इ० ). ३ एकाग्र ( चित्त ).

**समायुत** [ **सं०** ] **वि०** १ जोडलेलें. २ सहित. ३ युक्त. ४ एकत्रित; गोळा केलेलें.

**समारंभ** [ **सं०** ] **पु०** १ करणें. २ कर्म; कृत्य; उद्योग. ३ ( **मराठींत** ) थाटमाट. ४ ( **मराठींत** ) लग्न, मुंज, मेजवानी, पानसुपारी, ब्राह्मणभोजन, इ० प्रसंग, किं० ह्या प्रसंगीं लागणारीं भांडींकुंडीं, लोड, सतरंज्या, पाट, इ० जरूर अशा वस्तूंचा समुच्चय.५ (**मराठींत** )कोणे-

काला दिलेला मान किं त्याची ठेवलेली प्रतिष्ठा किं० बरदास्त.

**समाराधन** न०, **समाराधना** स्त्री० [सं०] १ आनंदविण्याचें साधन. २ सेवा. ३ ब्राह्मण-भोजन.

**समारोप** पु०, **समारोपण** न० [ सं० ] १ स्थापणें; स्थापना; ठेवणें. २ ( झाड ) लावणें. ३ विषय, विवरण, चर्चा, इ० चा उपसंहार किं० मुख्य मुद्यांचें संक्षिप्त वर्णन.

**संमार्जन** [ सं० ] न० १ झाडणें; साफ करणें. २ धुऊन स्वच्छ करणें. ◈ **संमार्जनी** स्त्री० केरसुणी. **सडासंमार्जन** न० ए० व० घर, अंगण, इ० झाडणें, जागोजाग शेणाचा सडा घालणें, सारविणें, रांगोळी घालणें, इ० स्वच्छतेचीं कामें समुच्चयानें.

**समावणें** [ सं० सम्+आ+विश् ]अ०क्रि० १ पेटी, पोतें, बारदान, भांडें, इ० मध्यें (कांहीं पदार्थ) घातला, ओतला, किं० भरला असतां त्यांत तो राहूं शकणें; मावणें; उ० ह्या पोत्यांत आर्धा पल्ला तांदूळ सहज समावतील. २ (एक पदार्थ, माणूस, पशु, इ०)दुसऱ्या पदार्थ, माणसें, पशु, इ० च्या समुदयांत सुखानें, अडचण किं० गैरसोय इ० न करतां, ठेवतां, घालतां, किं० बसवितां येणें; उ० ह्या खोलींत बारा माणसें राहातात त्यांत अकरावा समावेल;उ० वीसांच्या भोजनांत एकवीसावा समावतो. ३ खपणें; उघडकीस न येणें; उ० दोन शेर दुधांत पावशेर पाणी समावतें. [ मुंज.

**समावर्तन** [ सं० ] न० १ परत येणें. २सोड-

**समाविष्ट** [ सं० ] वि० १ आंत राहिलेलें. २ अंतर्भूत झालेलें; आंत घातलेलें; आंत भरलेलें. ३ पिशाचानें ग्रस्त (माणूस).

**समावृत्त** [ सं० ] वि० १ सोडमुंज झालेला ( मुलगा ). २ एकत्र जमलेलें.

**समावेश** [ सं० ] पु० १ प्रवेश. २ आंत राहाणें; अंतर्भूत होणें; अंतर्भाव. ३ आंत भरणें, कोंबणें, खुपसणें, ठासणें. ४ पिशाचबाधा.

**समाश्रय** [ सं० ] पु० आधार, टेका, रक्षण, ( देणें, मिळणें ).

**समाश्रित** [सं०] वि० १ज्याला आधार किं० संरक्षण मिळालें आहे किं० दिलें गेलें आहे असा. २ कोणेकाच्या आश्रयास राहिलेला (मनुष्य इ०).

**समास** [ सं० ] पु० १ एकीकरण; संयोग. २ समुदाय. ३ पूर्णता. ४ सारांश; संक्षेप. ५ सलेखा करणें. ६ लिहिलेल्या किं० छापलेल्या कागदाच्या कडांना जी रिकामी जागा सोडतात ती. ७ ( **व्याकरण** ) दोन शब्दांचा संयोग होऊन एक नवा शब्द नव्या विशिष्ट अर्थानें उत्पन्न होणें, किं० ह्या दोन घटक शब्दांचा परस्परांशीं जो संबंध तो. समासानें बांधलेला किं० समासांत अडकडेला जो शब्द तो'समस्त शब्द'.नवा निर्माण झालेला जो शब्द तो सामासिक शब्द. सामासिक शब्द मोडून घटक पदांच्या रूपांत घालून अर्थ करणें ह्याला ' विग्रह करणें'म्हणतात.द्वंद्व,तत्पुरुष, अव्ययीभाव, आणि बहुव्रीहि, हे मुख्य तीन समास असून प्रत्येकाचे पोटभेद पुष्कळ आहेत. **टीप**,-द्वंद्व समासांत मात्र दोहोंपेक्षां अधिक पदें असूं शकतात.

**समासक्त** [ सं० ] वि० १ ठेविलेला. २ सांधलेला; जोडलेला. ३ समाविष्ट. ४ लंपट.

**समासक्ति** स्त्री०, **समासंग** पु० [ सं० ] १ संयोग; जुळणी. २ अंतर्भाव. ३ प्रेम; आवड; गोडी; लंपटपणा.

**समांसमीना** [ सं० ] स्त्री० दरवर्षी विणारी गाय. मागें ' समसका ' पहा.

**समासंजन** [ सं० ] न० १ संयोग. २ चिकटणें. ३ लंपटपणा.

**समासर्जन** [ सं० ] पु० १ पूर्ण त्याग. २ हवाली किं० स्वाधीन करणें.

**समासादन** [ सं० ] न० १ संपादन; मिळविणें;गांठणें;प्राप्ति. २ स्थळविशेषीं जाऊन पोंचणें.

**समासाद्य** [ सं० ] वि० मिळण्याजोगें.

**समाहरण** [ सं० ] न० एकीकरण; एकत्रित करणें; जुळविणें; गोळा करणें.

**समाहार** [ सं० ] पु० १ समुदाय. २ ( **व्याकरण** ) द्वंद्व आणि द्विगु ह्या समासांचा एक प्रकार; उ० भाजीपाला हा समाहार द्वंद्व; पंचपाळें हा समाहार द्विगु.

**समाहार** [ सं० सम ( सारखा )+आहार ( खाणें ) ] वि० सारखा आहे आहार ज्यांचा असों ( माणसें, गुरें, इ० ).

**समाहित** [ सं० ] वि० १ कबूल किं० मान्य केलेलें. २ विहित; ठरविलेले. ३ शेवटास नेलेलें. ४ स्वाधीन किं० हवालीं केलेले. ५ एकाग्र; समाधिस्थ. ६ शांत; समाधान पावलेला.

**समिति** [ सं० ] स्त्री० १ संयोग. २ सभा. संस्था. ४ जमाव; समुदाय; टोळी. ५ युद्ध.

**समिध, समिधा** [ सं० समिध् ] स्त्री० १ होमांत ज्याची आहुति द्यावयाची तें काष्ठ. २ सर्पण; इंधन ( सामान्यत: ). मागें ' शेकणें ' मध्यें ' समिध शेकणें ' पहा.

**समिना, समीना** [ फा० शामीयानाह्] पु० मोठा डेरा किं० मांडव.मागें 'शामियाना ' पहा.

**समीकरण** [ सं० ] न० १ एकसारखें करणें. २( **गणित** ) अपूर्णांकांना समच्छेद रूप देणें. ३ ( **बीजगणित** ) दोन राशींची समता दर्शविणारी मांडणी.

**समीचीन** [ सं० ] वि० १ चांगलें.२ योग्य; यथार्थ. ३ सत्य; बिनचूक; दोषरहित.

**समधि** मागें ' समिध्, समिधा ' पहा.

**समीप** [ सं० ] वि० जवळचें. क्रि० वि० संनिधीस; जवळ; शेजारीं. ❀ **समीपता** स्त्री० १ शेजार; सांनिध्य. २ चतुर्विध मुक्तींपैकीं एक,—जीमध्यें ईश्वराचें भक्ताला सांनिध्य घडतें. सायुज्यता, सलोकता, समीपता, आणि सरूपता, ह्या मुक्तीच्या चार अवस्था मानल्या गेल्या आहेत. मागें ' मुक्ति ' पहा.

**समीर, समीरण** [ सं० ] पु० वारा; वायु.

**समीक्षण** न०, **समीक्षा** स्त्री० [ सं० ] १ न्याहाळून पाहाणें. २ तपासणें. ३ पूर्ण विचार. ४ विषयाचा साधकबाधक प्रमाणांनीं विचार करणें.

**समीक्षित** [ सं० ] वि० पूर्णपणें विचारांत घेतलेलें किं० परीक्षिलेलें. [ वाचाळ.

**समुख** [ सं० ] वि० १ वक्ता. २ बडबड्या;

**संमुख** [ सं० ] वि० १ समोर असलेलें. २ अनुकूल. क्रि० वि० ( **मराठींत** ) समक्षांत; समोर; उ० माझ्या संमुख येऊं 'या त्याला कीं काढतों त्याची भोसडपट्टी. [ अनुकूल.

**संमुखीन** [ सं० ] वि० १ समोर असलेलें. २

**समुचित** [ सं ] वि० योग्य; असावें तसें.

**समुच्चय** [ सं० ] पु० १ समूह; ढीग; रास. २ ( **व्याकरण** ) परस्परनिरपेक्ष अशा शब्दांचा एकत्र अन्वय. ३ समुदाय किं० वर्ग विचारांत घेऊन त्यांतील एकाद्या व्यक्तीच्या संबंधानें ठरविलेला निर्णय. ४ ( **साहित्य** ) एकादा परिणाम घडवून आणावयाला एक कारण पुरेसें असतां आणखीही कांहीं कारणें उपस्थित आहेत असें सांगितलें असतें तेथें ' समुच्चय ' ह्या अलंकाराचा एक प्रकार होतो. दोन गुण किं० दोन क्रिया, किं० एक गुण आणि एक क्रिया, यांचा एकदम प्रादुर्भाव झाल्याचें वर्णन असल्यास दुसऱ्या प्रकारचा ' समुच्चय ' अलंकार होतो. ह्या दोन्ही प्रकारच्या समुच्चयाचीं उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. [नाश.

**समुच्छेद** [ सं० ] पु० नाश; विध्वंस; समूळ

**समुछ्रय** [ सं० ] पु० १ ढीग; रास. २ उंचपणा; उन्नति. ३ युद्ध. ' समुछ्राय ' ह्याच अर्थी.

**समुच्छ्रित** [ सं० ] वि० अतिशय उंच.

**समुच्छ्वासित** न०, **समुच्छ्वास** पु० [सं०] सुसकारा.

**समुच्छ्वासित** [ सं० ] वि० प्रत्युज्जीवित; शुद्धीवर आणलेला; मूर्च्छेंतून उठविलेला.

**समुज्जंभण**[सं०]न० १उसळणें. २ वरयेणें. ३ झटणें;यत्न करणें.४वाढणें. [ परित्यक्त.

**समुज्झित** [ सं० ] वि० सोडलेला;टाकलेला;

**समुत्कट** [ सं० ]वि० अतिशय;अत्यंत तीव्र.

**समुत्कर्ष** [ सं० ] पु० श्रेष्ठता; उत्कर्ष.

**समुत्थान** [ सं० ] न० १ वर होणें. २ दीर्घोद्योग. ३ व्यवसाय; धंदा. ४ हल्ला. ५ बंड.

**समुत्पत्ति** [ सं० ] स्त्री० १ घडणें; घडून येणें. २ वृत्तान्त.

**समुदय, समुदाय** [ सं० ] पु० १ वर येणें. २वाढ;उत्कर्ष. ३ढीग;रास; जमाव; टोळी.४उत्पन्न; वसूल.५ साकल्य. ६ युद्ध. ७ ( **ज्योतिष** ) लग्न.

**समुदित** [ सं० ] वि० १ उत्पन्न झालेला, उगवलेला. २ उदय पावलेला. ३ एकत्र झालेला. ४ उत्कर्ष पावलेला.

**समुदीरित** [ सं० ] वि० १ बोललेलें; उच्चारलेलें. २ प्रेरित; प्रेरिलेलें.

**समुद्र** [ सं० ] वि० आच्छादनयुक्त. पु० १

पुडा; करंडा; डबा. २ पेटी, पिशवी, इ० चा कप्पा किंवा पूड; पाळें.

**समुद्गक** [ सं० ] पु० १ पुडा; करंडा; डबा. २ ( साहित्य ) पद्याचें एक अर्ध आणि दुसरें अर्ध हीं अगदीं समान असल्यास 'समुद्गक यमक' होतें; अशा ठिकाणीं समग्र पद्यच यमकमय होतें. याचें प्रसिद्ध उदाहरण मोरोपंताची प्रसिद्ध आर्या 'अनलसमीहितसाधी इ०.'

**समुद्गम** [ सं० ] पु० १ उत्पत्ति. २ अधिकपणा. [ तें; ओक.

**समुद्गिरण** [ सं० ] न० ओकणें; जें ओकलें

**समुद्गीत** [ सं० ] वि० मोठ्यानें गायिलेलें.

**समुद्गीर्ण** [सं०]वि०ओकलेलें;बाहेर टाकलेलें.

**समुद्धत** [ सं० ] वि०१धीट.२उद्धट.३गर्विष्ठ.

**समुद्धरण** [ सं० ] न० १ उद्धार. २ उपटून काढणें.३वर किंवा बाहेर काढणें;उचलणें.४ओकणें.

**समुद्भव** [ सं० ] पु० उत्पत्ति; उगम; उ० कुंभसमुद्भव ( म्ह० घटापासून जन्मलेला म्ह० अगस्त्य ऋषि ).

**समुद्भूत** [ सं० ] वि० उत्पन्न झालेला.

**समुद्यत** [ सं० ] वि० १ उचललेला. २सज्ज; सिद्ध; उद्युक्त. ३ शेवटास नेलेलें.

**समुद्यम** [ सं० ] पु० १ दीर्घ प्रयत्न. २ काम; कार्य. ३ गुरूनें शिकविलेला विषय आपणास समजला आहे किंवा नाहीं हें आजमावण्यासाठीं विद्यार्थी प्रश्न सोडविण्याचा करीतो तो प्रयत्न.

**समुद्र** [ सं० स ( सहित )+मुद्रा (शिक्का)] वि० मोहोरबंद; ज्यावर शिक्का करण्यांत आला आहे असा.

**समुद्र** [ सं० ] पु० १ सागर; उदधि. २ ( संकेतानें ) चार ही संख्या. ३ ( लक्षणेनें ) अफाट, अमर्याद, किंवा अमोज असा साठा किंवा संग्रह. ४ ( लक्षणेनें ) अगम्य, दुर्ज्ञेय, किंवा गहन विषय किंवा विद्या; ॐ **समुद्राची दांडी** स्त्री० किनाऱ्यावर आपटणाऱ्या समुद्राच्या लाटांची जमीनीवरची मर्यादारेषा. **समुद्रिय, समुद्र्य** वि० समुद्रासंबंधाचा. **समुद्रकांठ, समुद्रकांठा, समुद्रकिनारा** पु०, **समुद्रतीर** न० समुद्राच्या लगतचा भूप्रदेश. **समुद्रशोक (-शोष,-सोक,-सोख )** पु० एक वेल. **समुद्रस्नान** न० ग्रहणाच्या पर्वणीस किंवा अन्य प्रसंगीं समुद्रांत जाऊन केलेलें स्नान. **समुद्रकफ, समुद्रफेन (-ण ), समुद्रफेस** पु०, **समुद्रमाणकी** स्त्री० समुद्रांतील एका जलचर प्राण्याचें अंग,-समुद्राच्या कांठावर लाटांनीं ढकललें जाऊन येऊन पडतें तें. हें पांढरें आणि भुसभुशीत असून औषधाच्या उपयोगाचें असतें. **समुद्रमेखला, समुद्ररसना** स्त्री० पृथ्वी,-जिच्या भोंवतीं कंबरपट्ट्याप्रमाणें समुद्र पसरलेला आहे. **समुद्रवलयांकित** वि० समुद्ररूपी वलयानें वेढिलेली ( पृथ्वी म्ह० सर्व पृथ्वी ). **समुद्रशोक (-शोष)** पु० एक वेल. **समुद्रास दुखणें आणि शिंपींत औषध** जेथें फारच मोठ्या प्रमाणांत एखाद्या वस्तूची गरज किंवा जरूरी आहे तेथें अत्यल्प वस्तु मिळाल्यानें काय होणार ? **समुद्राचें अर्घ्य समुद्रास** उदार दात्यानें दिलेल्या मोठ्या देणगींतीलच अत्यल्प भाग दात्याला परत नजर करणें. **समुद्राचें मीठ आणि डोंगराचे आवळे ह्यांची गांठ पडणें** अत्यंत विजातीय आणि दूरच्या स्थळांतील पदार्थ, किंवा माणसें, ह्यांचा सुखदायक संयोग, भेट, किंवा संबंध. **साता समुद्रांपलीकडे** क्रि० वि० १ अत्यंत दूर. २ हातीं न येण्याच्या स्थितींत ( पदार्थ जतन करून ठेवणें ). ३ कांहीं पदार्थ अत्यंत मूल्यवान समजून ( तो रक्षिणें ). **समुद्रांत जाऊन ( किंवा पडून ) कोरडा ( किंवा सुका )** १ लाभ होण्याची अनुकूलता असतां किंवा परिस्थिति जुळून आली असतां ज्याला कांहीं लाभ झाला नाहीं असा दुर्दैवी किंवा कर्तृत्वशून्य ( माणूस ). २ पापांत नखशिखांत बुरलेला असून जो पवित्रपणाची बढाई मारतो असा ( मनुष्य,-उपहासाचा विषय ). **समुद्रांत सुई शोधणें ( किंवा पाहाणें )** खूप मोठ्या राशींत हरवलेला अति लहान पदार्थ त्या राशींत हुडकीत बसणें( हा मूर्खपणा होय ).

**समुन्नत** [ सं० ] वि० १ उंच. २ प्रौढ. ३ गर्विष्ठ. ४ ठळक.

**समुन्नति** [ सं० ] स्त्री० १ उंची. २ मोठेपणा. ३ वैभव; उत्कर्ष; समृद्धि. ४ गर्व; ताठा.

**समूर, समोर** [सं० संमुख ] क्रि० वि०,शा० यो० अ० पुढें, अग्रभागीं, नंतर ( स्थलासंबंधानें किंवा कालासंबंधानें ).

**समूल** [सं०] क्रि०वि०मुळासकट. ꙮ**समूलघात** पु० मुळासकट विध्वंस.

**समूह** [सं०]पु०१समुदाय;ढीग;रास.२कळप.

**समृद्ध** [ सं० ] १ वृद्धिंगत. २ वैभवशाली; भरभराटलेला; धनधान्यादींनीं संपन्न.३ युक्त;पूर्ण.

**समृद्धि** [सं०] स्त्री० १ वाढ. २ ऐश्वर्य;वैभव; भरभराट. ३ वैपुल्य; उ० पाण्याची, धान्याची, किं० पैशाची समृद्धि.

**समेट** [ सं० समेत ] पु० सलोखा; ऐक्य; बेबनावानंतर झालेली दिलजमाई.

**समेटणें** [ म० समेट ] स० क्रि० १ ( वाद, तंटा, बेबनाव, इ० ) मिटविणें, संपविणें, किं० समाप्त करणें. २ ( दोन भांडणाऱ्या माणसांत ) सलोखा घडवून आणणें किं० त्यांच्यांत दिलजमाई करून देणें. अ० क्रि० १ पुन्हा मित्र होणें.२ वाद,बेबनाव, किं०तंटा,समाप्त होणें किं० मिटणें.

**समेत** [ सं० ] वि० १एकत्र आलेलें; भेटलेलें. २ जवळ आलेलें. ३ युक्त; सहित; उ० भार्येसमेत तो गांवास गेला. ꙮ **समेतबाबती** क्रि० वि० गांवकामगार इ० ना द्यावयाचे जे अंश ( ज्यांना ' बाबती ' म्हणतात ) ते धरून म्ह० त्यांचा समावेश करून; उ० त्या शेतास समेतबाबती पांच मण भात पडतें. मागें ' देखील ' मध्यें ' देखील बाबती ' पहा.

**संमेलन** [ सं० ] न० १ एकत्र जुळणें. २ कांहीं कार्यासाठीं एकत्र जमलेली मंडळी; कांहीं उद्देशानें एके ठिकाणीं जुळलेली मंडळी.३एकाद्या संस्थेतील किं० शाळेतील जीं मुलें, माणसें, इ० त्यांचा ठरावीक प्रसंगीं विचारविनिमयार्थ किं० परिचयार्थ किं० विनोदार्थ एकत्र जुळण्याचा समारंभ ( भरणें, भरविणें ).

**समेसमान, समसमान** [सं० सम+समान] वि० अगदीं सारखा; पूर्णपणें सारखा; उ० ही सतरंजी आणि ती सतरंजी अगदीं समेसमान आहेत.

**समेळ** पु० एक वाद्य. मागें ' संबळ ' पहा.

**समोर** मागें ' समूर ' पहा.

**संमद** [ सं० ] पु० हर्ष; अति आनंद.

**सम्राट्** [ सं० सम्राज् ] पु० १ सार्वभौम राजा. २ एक ते दहा कोटि ज्याचें उत्पन्न आहे असा राजा.

**सय** स्त्री० आठवण; स्मरण.

**सय** [ सं० सखी ] स्त्री० मैत्रीण.

**संयत** [ सं० ] वि० बांधलेला. पु० कैदी. ꙮ **संयतात्मा** [ सं० संयतात्मन् ] पु० ज्याचे मनोविकार नियंत्रणेंत आहेत असा मनुष्य;तपस्वी.

**संयम** [ सं० ] पु० १ निग्रह; दाब; बंधन; निरोध. २ मनोनिग्रह. ३ एकाग्रता. ४ तपश्चर्या. ꙮ **संयमी** [ सं० संयमिन् ] वि० जितेंद्रिय. पु० मुनि;तपस्वी.

**संयमन** [ सं० ] न० १ आवरणें. २ बांधणें. ३ अडथळा; अटकाव; प्रतिबंध.४बांधणें. ५ मनोनिग्रह. ६ चौसोपी घर. ७ व्रत. ꙮ **संयमनी** स्त्री० यमपुरी. **आत्मसंयमन** न० पापापासून मन निवृत्त करणें.

**सयर** [ अ० सैर् ] स्त्री० सहल; हिंडणें.

**सयसद्** क्रि० वि० मध्यें खंड न पडतां. मागें ' सतसय ' पहा.

**सयसुमार** मागें ' सईसुमार ' पहा.

**सया** [ अ० ] पु० महमदाचा जांवई अली याच्या पंथांतील इसम. सुनी म्ह० महमदाच्या नंतरचे चार अनुयायी मानणारा मुसलमान.

**संयात्रा** [ सं० ] स्त्री० परद्वीपास जाणें.

**संयान** [ सं० ] पु० सांचा. न० १ हिंडणें; पर्यटन. २ कोणेकाच्या बरोबर जाणें. ३ दहनार्थ स्मशानांत प्रेत वाहून नेणें.

**सयार** पु० जादूगिरी; चेटूक. ꙮ **सयारीण** स्त्री० चेटकीण.

**संयाव** [ सं० ] पु० १ सांजा,–एक खाद्य. २ चुरमा,–एक खाद्य.

**संयुक्त** [ सं० ] पु० १ जोडलेला; बांधलेला. २ रत; आसक्त. ३ संबंधी; आप्त.

**संयुग** [सं०]पु० १संयोग. २ सांनिध्य.३युद्ध.

**संयुत**[सं०]वि० जोडलेलें;जुळलेलें;जुळविलेलें.

**संयुति** [ सं० ] स्त्री० १ संयोग; जुळणी. २ मैथुन संभोग.

**संयोग** [ सं० ] पु० १ जोडणें,संबंध;मिलाफ. मिश्रण. २ जवळ असणें. ३ ( गणित ) बेरीज. ४ राजा आणि प्रजा यांचा एकोपा. ५ (व्याकरण) जोडाक्षर. ६ मैथुन. ꙮ **संयोगपृथक्त्व** न०

(मीमांसा) एकत्र कर्म नित्य आणि अनित्य असणें. **संयोगविधि पु०** जीव आणि ब्रह्म ह्यांचें ऐक्य प्रतिपादणारा वेदान्त. **संयोगी पु०** ज्यानें लग्न केलें आहे असा गोसावी किं० बैरागी. **संयोगभूमि, संयोगी भूमि स्त्री०** दोन मोठ्या भूप्रदेशांना जोडणारा भूमीचा अरुंद पट्टा.

**संयोजक** [ सं० ] वि० १ जोडणारा; मिलाफ करून देणारा; मध्यस्थ. २ सुरळीत मांडणी किं० रचना करणारा. ३ आपुकमाएुकांची गांठ घालून देणारा. [ २ मैथुन.

**संयोजन** [ सं० ] न० १ मिलाफ; जुळणी.

**संयोजित** [सं०] वि० जोडलेला; जुळविलेला.

**सय्यद** [ अ० सय्यिद् ] पु० बिबी फातमा हिच्या वंशांतील मनुष्य; महमदाच्या पांचव्या पिढींतील मनुष्य.

**सर** [ सं० ] पु० १ हार. २ मणि, मोती, फुलें, इ० एकजातीय पदार्थ ज्यांत ओविले आहेत असें सूत्र. २ इमारती इ० कामासाठीं तासून चौरस केलेली तुळई, वांसा, दांडा, इ०. ३ मांडव इ० च्या उपयोगाचा लांब, सरळ, आणि जाडी वांसा. ४ मुसळ करावयाच्या उपयोगाचें जाडी, जड, आणि सरळ लाकूड; मुसळसळई. ५ बेंदूर किं० पोळा ह्या उत्सवांत बैलांच्या शिंगाभोंवतीं बांधतात ती दोरी.

**सर** [ फा० सर=डोकें ] पु० १ अनेक अधिकारी किं० कामगार यांच्यावरचा मुख्य; उ० ह्या सर्वांवर हरीपंत सर आहेत. २ कोणेक संस्था, मंडळी, किं० टोळी, ह्यांचा मुख्य. ३ वरच्या दर्जाचा. ह्या अर्थी 'सर' हा शब्द गांवकामगाराच्या आणि अधिकाऱ्याच्या वाचकशब्दा मागें लावितात; उ० सरदेशमुख, सरदेशपांड्या, सरसुभेदार, सरनायक, सरकमावीसदार, इ०. ४ (गायी, म्हशी, इ० च्या परिगणनाच्या प्रसंगीं) व्यक्ति; उ० गाय सर एक; म्हैस सर दोन. मागें 'नफर' अर्थ ४, 'नग' अर्थ ४ पहा.

**सर, सरी स्त्री०** १ बरोबरी; तुल्यता; सारखी योग्यता (येणें, पावणें). २ (गंजिफांच्या खेळांत) तलफ. ३ पाण्याचा पाट. ४ झाडांची ओळ.

**सर** [ सं० सरा, सरी=धबधबा ] स्त्री० १ पावसाची मध्यें खंड न पडतां झालेली वृष्टि; उ० आज सरीमागून सरी येत आहेत. 'पावसाची सर' ह्याच अर्थी. २ इसळी; झपाटा; उद्रेक; उ० रागाची, मत्सराची, वेडाची, रडण्याची, तापाची, हिंवाची, पिशाचाची, किं० हसण्याची सर येणें. टीप,–वरील दोन्ही अर्थी 'सरकट' न० हें तुच्छतादर्शक रूप. सरकट म्ह० लहान सर. ॥ सर करणें जिकणें; कबज्यांत घेणें.

**सर प्रत्यय** १ किंचित्; कांहीं अशा ह्या अर्थी; उ० काळसर, पिवळसर, कडसर. २ पूर्ण मर्यादा भरून किं० गांठून किं० ओलांडून ह्या अर्थी; उ० नदी वरसर (किं० कांठसर) भरून चालली; उ० भांडें वरसर (किं० तोंडसर) भर.

**सरई स्त्री०** तासून बांधकाम, रचाई काम, इ० साठीं तयार केलेली तुळई, खांब, वासा, इ०.

**सरकटणें** [ म० 'सरकणें' चें एक रूप ] अ० क्रि० १ सरणें; स्थानभ्रष्ट होणें. २ (विणलेल्या वस्त्राचे तंतु सरून) खिडी किं० भोकें पडणें. ३ बुळबुळीत जमीन इ० वर (पाय इ०) निसरणें किं० घसरणें; सरकणें. [ळीत.

**सरकटा** [ म० सरकणें ] वि० निसरडा; बुळबु-

**सरकटें** [ म० सरकणें ] न० १ बुळबुळीतपणा. २ बुळबुळीत पृष्ठभाग.

**सरकणें** [ सं० सृ ] अ० क्रि० १ (विशिष्ट ठिकाणीं ठेविलेलें पाऊल, पदार्थ, इ०) त्या ठिकाणापासून स्थानभ्रष्ट होणें किं० दूर जाणें. २ इच्छापूर्वक दूर होणे, दूर बसणें, किं० बाजूस जाणें; उ० थोडे पलीकडे सरकून बसा म्हणजे आम्हाला येथें नीट बसतां येईल. ३ (रांगेनें स्थित जे पदार्थ किं० माणसें त्यांनीं) क्रमानें आपल्या जागा सोडून पुढच्या जागांवर स्थित होणें. ४ जोरानें किं० वेगानें पुढें जाणें. ५ सैन्य इ० शत्रु इ० वर हल्ला करावयास निघणें.

**सरकत** [ अ० शिर्कत ] स्त्री० १ भागीदारी; वाटणी; हिस्सा. २ एकमेकांनीं एकमेकांस मदत करणें हा प्रकार. ॥ **सरकतदार पु०** भागीदार; पातीदार. **सरकतनामा पु०** भागीदारांच्या शर्तींचा कागद किं० करारपत्रक. **सरकतवाटणी स्त्री०** (गणित) सरकतीनें केलेल्या व्यापारांत प्रत्येक भागीदाराचा नफानुकसानीचा हिस्सा

किं० असा हिस्सा काढण्याची रीति. ह्या रीतीचे 'एकेरी सरकत,' आणि 'दुहेरी सरकत' असे दोन प्रकार आहेत. **सरकती (-त्या) पु०** सरकतींतील जे भागीदार ते प्रत्येक. **सरकती वि०** १ सरकतीनें केलेला (व्यापार, धंदा). २ ज्यांत इतर भागीदार आहेत असा (गांव,वतन, हक्क, इ०).

**सरकन, सरकर, सरदिनीं, सरदिशीं क्रि० वि०** वेगानें, झपाट्यानें, घाईनें.

**सरकफास [म० सरकणें + फास] पु०** घागर इ० च्या गळ्याला घालावयाचा दोरीचा फास,-जो हवा तितका मोठा किं० लहान करतां येतो.

**सरकविणें, सरकाविणें [म० 'सरकणें' चें प्रयोजक] स० क्रि०** पुढें ढकलणें, लोटणें, किं० सारणें.

**सरकांडी** मागें 'सणकांडी' पहा.

**सरकानूगो [फा० सर कानून् गो] पु०** खानदेशाच्या प्रांतांतील विशिष्ट कामावर नेमिलेला एक अमलदार किं० अधिकारी.

**सरकार[फा०] न०** १ राज्ययंत्र चालविणारे अधिकारी समुच्चयानें.२ राजानें किं०सत्ताधिकाऱ्यांच्या संस्थेनें नेमिलेला कोणीही अधिकारी. ३ कोणा नोकराचा यजमान किं०स्वामी किं०मालक. ॐ **सरकार खराब वि०** वतनदार इ० कोणाच्या दुमाल्यास न लागतां सरकारांतच राहिलेली पडीत (जमीन). **सरकारमहशूर** सर्व जनतेस ठाऊक असलेली (कांहीं गोष्ट किं० वृत्तान्त). **सरकारी वि०** सरकारासंबंधाचा. **सरकारी अमल्ल पु०**सरकारांत कोणेकाला असलेली नोकरी.

**सरकावणें [सं० स; म० सरकणें] स० क्रि०** पुढें किं० बाजूस सारणें किं० ढकलणें.

**सरकाळ (-ळी) स्त्री०, सरकाळें न०** १ जोंधळ्याच्या किं० बाजरीच्या ताटाचा शेंडा. २ बोथट बाण. ३ सूत गुंडाळावयाची कांडी.

**सरकी स्त्री०**कापशीच्या बोंडांतील ज्या बिया त्या प्रत्येक.**सरक्या स्त्री०अ०व०**पाण्याच्या दमामुळें किं०दुसऱ्या कांहीं कारणानें नासल्यामुळें ढेपेसारखे झालेले जोंधळा, बाजरी, इ०धान्याचे दाणे.

**सरखत [फा० ] न०** अनेक वेळां ग्ह० हप्त्याहप्त्यांनीं सरकारांत भरलेल्या पैशाची पावती एकाच कागदावर दिली जाते ती.

**सरखत, सरखतदार, इ०** वर 'सरकत,' 'सरकतदार,' इ० पहा.

**सरखेल [फा०] पु०** १ स्वारांच्या तुकडीचा अधिपति. २ राजानें कोणा सरदाराला दिलेली बहुमानाची पदवी. ॐ **सरखेल स्त्री०** सरखेलाचा हुद्दा किं० दर्जा. [मळा.

**सरगड पु०, न०** नुकतांच लाविलेला पान-

**सरगरम [फा० ] वि०** १ कोंबट; साधारण तापलेलें. २ अनिश्चित; संदिग्ध.३ आवेशाचें किं० उत्साहाचें नव्हे असें (भाषण, वर्तन). ४ तत्पर; उद्युक्त.

**सरगा पु०**खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्य.

**सरगावडा पु०** हलक्या दर्जाचा एक गांवकामगार. हा धनगर जातीचा असे.

**सरचश्मा, सरचष्मा [फा० सर्चश्माह्] पु०**१ झऱ्याचा उगम. २ एकाद्या मंडळीचा किं० संस्थेचा मुख्य, अध्यक्ष, किं० अग्रगण्य माणूस.

**सरजा [फा० सराचाह] पु** १ बायकांच्या नथेला मुख्य मोत्यांच्या वर गाळ्याला जीं लांबोडी मोतीं लाविलेलीं असतात तीं समुच्चयानें. अशीं मोतीं ज्या नथेला लाविलेलीं आहेत तीं 'सरजेदार नथ.' २ बंदुकीस तोडा अडकावावयाच्या उपयोगाचा जो लोखंडाचा आंकडा असतो तो. ३ बैलांच्या जोतांतील धिप्पाड बैल.

**सरजा [फा० ]पु०** सिंह.

**सरंजाम [फा० ] पु०** १ कार्यविशेषास लागणारी साधनसामग्री. २ किल्ल्याचें रक्षण करणें,सरकारी कामावर जावयासाठीं फौज बाळगणें, सरकारनें संमानार्थ दिलेली पालखी, हत्ती, घोडा, इ० बाळगणें, ह्यासाठीं होणारा खर्च भागविण्यासाठीं त्या माणसास सरकार गांव, शेत, इ० बक्षीस देतें तें इनाम. ह्या गांव, शेत, इ० ना 'सरंजामी गांव, शेत,' इ० म्हणतात. सरंजाम दोन प्रकारचा असतो,-जात सरंजाम आणि फौज सरंजाम. हे शब्द मागें 'जात' आणि 'फौज' मध्यें पहा. ॐ **सरंजामी फौज स्त्री०** सरकारच्या कामगिरीसाठीं कोणेकानें ठेविलेली फौज. स्वताच्या उपयोगाची जी फौज

ती ' खाजगी फौज.' **सरंजामी वि०** १ सरकारांतून ग्रामादिरूप सरंजाम ज्यास देण्यांत आला आहे असा( मनुष्य ). २ सरंजाम म्हणून बक्षीस दिलेला( गांव ). **सरंजामी पद्धति स्त्री०** जातीचीं वतनें आणि इनाम गांवें यांशिवाय फौजेच्या खर्चासाठीं आणखी कांहीं नेमणूक आणि मुलूखगिरीसाठीं प्रांत तोडून देण्याची चाल.

**सरट, सरड, सरडा, सरडोका, सरढा** [सं० सरट ] **पु०** पालीच्या जातीचा एक प्राणी. ॐ **सरड्याची धाव कुंपणापर्यंत** मागें ' कुंप, कुंपण, कुपण ' मध्यें पहा.

**सरण न०** प्रेत जाळण्यासाठीं रचितात ती लाकडें, गोंवऱ्या, इ० ची रास.

**सरणि** [ सं० ] **स्त्री०** १ मार्ग; वाट. २ पद्धति; रीति. ३ रांग; ओळ; पंक्ति. ४ शिकविणें, लिहिणें, बोलणें, निरूपण करणें, ह्या संबंधाची कोणेकाची जी तऱ्हा किं० धाटणी ती.

**सरणें** [ सं० सृ ] **अ० क्रि०** १ पुढें, मागें, बाजूस, किं० वर जाणें; सरकणें; घसरणें. २ संपणें; खलास होणें; खर्चलें जाणें. ३ योग्य किं० उचित असणें, दिसणें, किं० होणें; उ० तुमच्या दर्जाला हा पोरकटपणा सरत नाहीं. ४ भागणें; निभणें; चालणें; उ० पैशावांचून कोणाचें सरत नाहीं; उ० कांहीं तरी उद्योग असल्यावांचून माझें सरत नाहीं( म्ह० मला चैन पडत नाहीं, माझें भागत नाहीं ); उ० शेजीवणि सरेना आणि घडीभर पडेना. ५ गुदद्वारें ( वायु ) बाहेर पडणें. ॐ **कांहीं काम, कर्तव्य, इ० सरोसरोसें होणें** तें केव्हां एकदा संपेल असें होणें; त्यामुळें अति त्रासून जाणें; त्यामुळें अगदीं जर्जर होणें.

**सरता** [ म० सरणें ] **वि०** १ सरण्याच्या पंथास लागलेला. २ शेवटाकडचा; शेवटचा; कडेचा. ॐ **सरता पालव पु०** १ ऋतु संपत चालला असता वेलीला जीं शेवटचीं पानें येतात तीं समुच्चयानें. २ शेवट; शेवटचा पल्ला; समाप्तीचा काळ; उ० तुम्ही लग्नाच्या सरत्या पालवीं आलां ( म्ह० लग्नाचा समारंभ सरतां सरतां ). ३ आयुष्याची चरमावस्था; म्हातारपण; उ० हा माझा मुलगा सरत्या पालवीचा आहे म्हणून तो मला प्राणाहून प्रिय आहे; उ० दिवसाचा सरता पालव ( म्ह० संध्याकाळ ); उ० उत्कर्षाचा सरता पालव ( म्ह० अपकर्ष सुरू होण्याचा समय ). **सरता पुरता वि०** पूर्णपणें झालेलें किं० करून टाकलेलें. **सरते रात्र (-रात ), सरती रात्र (-रात ) क्रि० वि०** सर्व रात्रभर. **सरते शेवटीं क्रि० वि०** अगदीं शेवटीं; अखेरीस.

**सरद स्त्री०** पुढें ' सरहद्द ' पहा.

**सरद** [ फा० ] **वि०** १ थंड; गार; शीत. २ पाण्याच्या वाफेनें भरलेली ( हवा ). ॐ **सरदी स्त्री०** १ जमीन, भिंत, मीठ, साखर, इ० मध्यें शिरलेला हवेंतील जलांश किं० अशा जलांशानें त्या पदार्थांत झालेली विकृति. २ शरीरांत झालेला शैत्याचा विकार. ३ खाद्यपदार्थ, औषध, इ० चा शरीरांत शैत्य उत्पन्न करण्याचा गुण. ४ पडसें इ० रूप शैत्याची बाधा. **सरद होणें** (किं० **मनांत सरद होणें**) असंतुष्ट किं० नाखूष होणें; मनाजोगी गोष्ट झाली नाहीं म्हणून रुसणें. **सरदगरमी स्त्री०** सरदीनें मिश्रित जी गरमी ती किं० अशा गरमीमुळें शरीरांत जी विकृति होते ती.

**सरदणें, सरदावणें, सरद्रेणें** [ म० सरद ] **अ० क्रि०** १ ( जमीन, मीठ, वस्त्र, इ० मध्यें ) जलांश भिनणें किं० शिरणें. २ गारठणें. ३ थंडिच्या अतिशयामुळें ( शरीरास ) बाधा होणें.

**सरदार** [ फा० ] **पु०** १ बडा अधिकारी. २ श्रीमंत आणि कुलीन मनुष्य. ३ सरकारनें कोणा मनुष्याला दिलेली बहुमानाची पदवी. ४ मोठा योद्धा. ५ फौजेचा मुख्य. ॐ **सरदारगिरी, सरदारी, सरदारकी स्त्री०** सरदाराचा हुद्दा, दर्जा, किं० अधिकार; सरदार ही पदवी.

**सरदारी** [ **फा०** सर्दवाल्=डोक्याचा पट्टा ] **स्त्री०** लगामाचा घोड्याच्या डोक्यावरून जाणारा पट्टा.

**सरदावणें, सरद्रेणें** वर ' सरदणें ' पहा.

**सरदावरदी** [ फा० सर्आवुर्द ] **स्त्री०** १ मध्यम प्रमाण किं० सरासरी; स्थूलमान. २ भिन्न भिन्न गुणधर्मांच्या पदार्थांच्या मिश्रणांत जे नवे गुणधर्म उत्पन्न होतात ते समुच्चयानें. मागें ' वरावर्द, ' ' वरावर्दी ' अर्थ ३ आणि ४ पहा.

**सरदी** वर ' सरद ' मध्यें पहा.

**सरदणें** वर ' सरदणें ' पहा.

**सरदेशपांड्या** पु० मुख्य देशपांड्या.

**सरदेशमुख, सरदेसाई** पु० मुख्य देशमुख. ❀ **सरदेशमुखी** स्त्री० उत्पन्नाचा दहावा अंश घेण्याचा मराठ्यांनीं मुसलमानी राज्याकडून मिळविलेला हक्क.

**सरधोपट** [ म० धोपट ] वि० १ सरळ किं० साधी अशी ( वर्तनसरणी, भाषण ). २ ज्यांत वळणें किं० अडचणी नाहींत अशी (वाट, मार्ग). ३ जिला वळणें नाहींत अशी( नदी ). क्रि०वि० न अडखळतां, न थांबतां ( लिहिणें, वाचणें, पुराण सांगणें, इ० ).

**सरनिखर** क्रि० वि० सरसकट; निवड न करतां.

**सरनौ(-नो-)बत(-द )** [फा०]पु०१ हवालदाराच्या हाताखालचा एक अधिकारी. २सेनापति. ३ डंक्यावरील मुख्य अधिकारी.

**सरपट** स्त्री० १ साप, आळी, इ० चें चालणें किं० त्यांच्या चालण्याचा जमीनीवर उठलेला मार्ग. २ कोणताही पदार्थ, पशु, किं० माणूस जमीनीवरून ओढीत नेल्याने जमीनीवर जो पट्टा उठतो तो.

**सरपट** श० यो० अ० १ पृष्ठभागाला स्पर्श करीत करीत ( जाणें, ओढणें, इ० ); उ० जमीनीसरपट तो ओंडा ओढीत आण, उचलून आणूं नको. २ जमीन इ० ला चिकटून; उ० विंचू जमीनीसरपट बसला आहे.

**सरपटणें** अ०क्रि०१जमीन इ०च्या पृष्ठभागाला चिकटून ( जाणें, सरणें, इ० ). २ ढुंगणानें पुढें सरकत जाणें.

**सरपण** न० जाळण्यासाठीं गोळा केलेलीं किं० साठविलेलीं लाकडें, गोवऱ्या, इ०.

**सरपागा** (-ग्या,-गे ) पु० पागेवरील मुख्य अधिकारी.

**सरपाटील** [ फा० सर+पाटील ]पु०तरफेचा मुख्य पाटील; अनेक गांवांच्या पाटलांचा मुख्य.

**सरपोस** [ फा० सर् (डोकें)+पोस् (झाकण); पोषीदन् ( झाकणें ) ] पु० १ आच्छादन. २ चादर; पलंगपोस. ३ ( लाक्षणिक ) गुप्तपणा; रहस्य.

**सरफराज** [ फा० ] १वि० मान पावलेला.२ मानास चढविलेला; बहुमान ज्याचा करण्यांत आला आहे असा.❀**सरफराजी** स्त्री० १ बहुमान. २ बढती; उन्नति. ३ शिफारस; तारीफ.

**सरफळा** स्त्री० १ सर्पाच्या आकाराचें मुलांच्या कमरेस बांधावयाचें एक भूषण. २ सुवर्णादिधातूंची आकारविशेषाची दागिना म्हणून गळ्यांत घालावयाची सांखळी.

**सरफा, सरिफा** [अ० सर्फाह्] पु० फायदा; नफा. ❀ **सरफेवार, सरफेवाईक** वि० फायदेशीर.

**सरफास, सरकफास** [ म० सरणें+फास ] पु० घागर इ० च्या गळ्याला घालावयाचा दोरीचा फास,-जो गरज पडेल त्याप्रमाणें लहान किं० मोठा करतां येतो.

**सरबडणें** अ० क्रि० (पदार्थाच्या पृष्ठभागाला) स्पर्श करीत करीत जाणें; पदार्थाला स्पर्श करून किं० चाटून जाणें. ❀ **सरबडता गोळा** पु० जमीनीला स्पर्श करीत करीत जाणारा तोफेचा गोळा. उंचावरून हवेंतून जाणाऱ्या गोळ्याला ' अधांतरींचा गोळा ' म्हणतात.

**सरबत** [ अ० षर्बत् ] न० लिंबू, आंबा, चिंच, इ० चें साखर, वेलदोडे, इ० द्रव्यें घालून केलेलें पेय. ❀ **सरबतखाना** पु० बड्या लोकांच्या घरांत सरबतें करण्याची किं० साठवून ठेवण्याची जी खोली असते ती.

**सरबत्ती** स्त्री० १ बंदुका, तोफा, इ० तून एकदम सोडलेल्या गोळ्यांचा वर्षाव.२(लाक्षणिक) कोणेकावर केलेला शिव्यांचा वर्षाव.

**सरबर, सरबरा** [ फा० सर्वर्=मुख्य ] स्त्री० स्पर्धा; चढाओढ; बरोबरी.

**सरबरा** [ फा० सर्बराह् ] पु० काम, कारभार, इ० करणें किं० चालविणें. पुढें ' सरभरा ' पहा. ❀ **सरबराई** स्त्री० बड्या माणसाची किं० पाहुण्याची किं० अधिकाऱ्याची व्यवस्था,-त्याला जरूर तें धान्य, गाड्या, गवत,इ०पदार्थ पुरविणें.

**सरबरीत** वि० पातळसर ( भात, चुना, शेण, चिखल, इ० ).

**सरबसर, सरबासर** [ फा० सर्बसर् ] वि० किंचित भिन्न दर्जाचे, गुणाचे, किं० किंमतीचे

(पदार्थ). क्रि० वि० १ मिश्र करून; भिन्न जातींच्या किं० गुणधर्मांच्या पदार्थांची मिसळ करून. २मध्यम प्रकारें; साधारणपणें.३एकंदरीनें.

**सरभरा, सरबरा** [ फा० सर्बराह् ] स्त्री० अंगानें, पैशानें, किं० अन्य प्रकारें कोणेकास केलेलें साहाय्य किं० मदत.

**सरम, सरमड, सरमाड** न० बाजरीच्या ताटांचा समूह. ॥ **सरमडी, सरमाडी, सरमाडा** वि० १ बाजरी लावण्याच्या उपयोगाची (जमीन). २ जीच्यावर बाजरी लाविली आहे अशी (जमीन). ३ बाजरीच्या शेतांत केलेला (हरभरा इ०).

**सरम** मागें 'शरम' पहा.

**सरमिसळ** स्त्री० मिश्रण. वि० मिसळीचा.

**सररहा** [ फा० सर् राह् ] क्रि० वि० अडथळा न येतां; मोकळेपणानें; सुरळीत रीतीनें.

**सरराास** [ फा० सर् (डोकें) + म० रास (ढीग)] वि० श्रेष्ठ; अग्रगण्य; मुख्य. क्रि० वि० निवड न करतां; सरसकट; चांगला वाईट, उंची निंची, असा भेद न करतां; उ० त्यानें हे आंबे सरराास रुपायाला दीडशे घेतले.

**सरल, सरळ** [ सं० सरल ] वि० १ वाकडा नव्हे तो; उजू. २ निष्कपट, प्रामाणिक (वर्तन, भाषण). ३ थेट समोर असलेला. पु० देवदार वृक्ष. ॥ **सरलद्रव** पु० सरल ह्या वृक्षाचा चीक.

**सरवट** [ म० सरवा ] न० १ एक प्रकारचा तांदूळ. २ सरवा करावयाच्या उपयोगाची जमीन. खालीं 'सरवा' पहा. ३ पावसाची लहानशी सर.

**सरवळा** पु० बेरजेचा ताळा पाहाण्याची एक [रीति.

**सरवा** [ म० सरणें ] पु० १ नुकतेंच कापलेलें शेत,–ज्यांत कणसें, दाणे, ताटें, इ० इतस्ततः पडलेलीं आहेत. २ फळें, भाजीपाला, मिरच्या, हळद, इ० तोडून किं० काढून नेल्यानंतर त्या जमीनीवर पडलेला अवशेष,–जो गरीब लोक वेचून नेतात. ३ प्रथम वर्षी भाजून तयार केलेलें जें डोंगराळ जमीनीवरील शेत त्यास पुढें दोन वर्षे 'सरवा' म्हणतात.

**सरवा** [ म० सर ] पु० पावसाची सर.

**सरशी** [ म० सरस ] स्त्री० १ श्रेष्ठपणा; वरचढपणा. २ जय. ३ चलती, उत्कर्ष, भरभराट.

**सरशेवट** [ म० सरणें+शेवट ] पु० अगदीं अंत किं० अखेर. ॥ **सरशेवटीं, सरते शेवटीं** क्रि० वि० अगदीं अखेरीस.

**सरस** [ फा०सरीष् ] पु०प्राण्यांचीं नखें किं० शिंगें, यांपासून काढलेला एक प्रकारचा डिंक.

**सरस** [ सं० ] वि० १ रसयुक्त (पान, लाकूड, फळ, इ०). २ वरच्या प्रतीचा किं० दर्जाचा; अधिक चांगला किं० मूल्यवंत. ३ हृदयंगम; अंतःकरणास वेधणारा. **टीप**,–'सरस' हें अकारान्त विशेषण असून 'गोड' प्रमाणें कधीं कधीं आकारान्त होतें; उ० गोडें पाणी, गोडें वरण, सरशी डाळ, सरसे आंबे, सरसें मोती, इ०. ॥ **सरसाई** स्त्री० १ सरस असण्याचा गुण. २ वरचढपणा; श्रेष्ठता; वरचरव. ३ मनोहरपणा; मोहकपणाचा गुण.

**सरसकट, सरसगट** क्रि० वि० निवड न करतां; चांगला वाईट असा भेद न करतां.

**सरसंदा, सरसोंदा** वि० त्याच किं० बहुतेक त्याच उंचीचा, वयाचा, सामर्थ्याचा, किं० जोराचा (बैल, मित्र, साथीदार, पतिपत्नी,इ०).

**सरसपाट** वि० अगदीं सपाट (जमीन). ॥ **सरसपाटी** स्त्री० जमीनीची सर्व भागीं सारखी सपाटी.

**सरसरणें** अ० क्रि०सर सर असा शब्द होईल अशा रीतीनें (चालणें, सर्पादीचें जाणें, वारा किं० पाणी वाहणें, इ०).

**सरसा** [ सं० सदृश ] वि० सारखा; तुल्य; उ० नांवासरशी तुझी करणी नाहीं. श० यो० अ० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) १ शेजारीं; चिकटून; जवळ; जवळून; उ० भिंतीसरसे पाट मांड. २ त्याच समयीं; उ० चाराच्या ठोक्यासरसा मी जागा झालों. ३ वेगानें, जोरानें, प्रयत्नानें; उ० त्याणें एका बुक्कीसरसा नारळ फोडला.

**सरसाल** [ फा० सर+साल् (वर्ष) ] न० सबंध वर्ष; उ० यंदाच्या सरसालांत माझें एकही इरकली लुगडें विकलें गेलें नाहीं. क्रि० वि० १ सबंध वर्षांत; सर्व वर्षभर; उ० तो सरसाल ग्वालेरीसच आहे, दक्षिणेंत मुळींच आला नाहीं. २ दरवर्षास; उ० आम्हाला सरसाल चार पल्ले

तांदूळ लागतात. टीप,–ह्या दोन्हीं अर्थीं 'सरसालां' सुद्धां. ꣸ सरसाला, सरसाली, सरसालिना वि० सबंध वर्षाचा; सर्व वर्षासंबंधाचा.

**सरसावणें** [ म० ' सरणें ' चें एक रूप ] अ० क्रि० १ पुढें होणें किं० पुढें जाणें. २ वेगानें सरणें; आवेशानें चाल करून जाणें. ३ जोरानें किं० उफाड्यानें वाढणें किं० उंच होणें; उ० लग्न झाल्याबरोबर ही मुलगी सरसावली आणि पोवत बाईसारखी दिसूं लागली. ४ बरोबरच्या लोकांना मागें टाकून पुढें सरणें किं० पुढें जाणें.

**सरसाविणें** [ म० ' सरसावणें ' चे प्रयोजक ] स० क्रि० १ पुढें लोटणें, ढकलणें, रेटणें, किं० सारणें. २ कोणेकाला भर देणें किं० उत्तेजन देणें.

**सरसी** वर ' सरशी ' पहा.

**सरसुंदा** वर ' सरसंदा ' पहा.

**सरसुभा** पु०, **सरसुभेदारी** स्त्री० [ फा० सर; अ० सुबाह् ] सुभेदाराचें कार्यक्षेत्र, हुद्दा, किं० अधिकार. **सरसुभेदार** पु० मामलतदाराच्या वरचा सरकारी अधिकारी. **सुभा** [ अ० सुबाह् ] पु० प्रांत, परगणा.

**सरसुमार** पु० १ सारासार विचार. २ भाषण, वर्तन, इ० कांवर आळा किं० नियंत्रणा.

**सरसून** [ म० सरसा ] क्रि० वि० लगटून; चिकटून; शेजारून.

**सरसोंदा** वि० १ वयांत आलेला; प्रौढ वयाचा. २ त्याच वयाचा किं० वाढीचा किं० सामर्थ्याचा ( माणूस, पशु ).

**सरसोंवरशीं** [ म० सरसावणें ] क्रि० वि० जोरानें, नेटानें, धमकदारीनें, उत्साहानें ( चाल करून जाणें, हल्ला करणें, शिव्या देणें ).

**सरस्वती** [ सं० ] स्त्री० १ विद्येची देवता. २ भाषण. ३ सुंदर स्त्री. ४ नदी. ५ नदीविशेष,–जी कांहीं मार्ग जमीनीतून जाऊन पुढें गंगा आणि यमुना ह्यांना आलाहाबादेस मिळते. ६ गाय. ७ सरस्वतीचें चित्र,–जें अक्षरें शिकणारीं मुलें पाटीवर काढून पूजितात. ८ बोलण्यांत चतुर आणि विद्वान स्त्री. ९ वेद, पुराणें, इ०-रूप भाषेचें वाङ्मय. १० कोणा जाड्या पंडिताला किं० मोठ्या साधूला देतात ती पदवी; उ० नृसिंहसरस्वती. ꣸ **सरस्वती अनध्याय** पु० आश्विन महिन्याच्या शुक्लपक्षांत मूळ नक्षत्रीं सरस्वतीचें आवाहन करतात त्या दिवसापासून श्रवण नक्षत्रापर्यंत जें अनध्ययन तें. **सरस्वतीपूजन** न० आश्विनमासीं मूळ नक्षत्रावर पोथ्या, पुस्तकें, इ० वर सरस्वतीचें आवाहन करून दुसऱ्या दिवशीं तिचें पूजन करतात तें. **सरस्वतीदान** न० कोणेकापासून द्रव्यादि घेऊन किं०एरव्हींच म्ह०फुकट त्यास जें खत इ०दस्तऐवज करून देतात तो ( देणें, लिहून देणें ).

**सरहद्द** [ फा० सरहद् ] स्त्री० गांव, प्रान्त, देश, इ० ची मर्यादा किं० अगदीं शेवटाकडची सीमेची रेषा; सीमा; शीव. मागें ' सरद ' पहा.

**सरळ** [ सं० सरळ ] वि० १ वाकडें नव्हे असें; एका रेषेंत किं० त्याच दिशेंत असलेलें; नीट ( नदीचा प्रवाह, रस्ता, इ० ). २ ज्यांत लबाडी, छक्केपंजे, किं० दुटप्पी शब्दरचना नाहीं असें (भाषण, व्यवहार, वर्तन, इ०). ꣸ **सरळव्याज** न० मूळच्या मुद्दलावरच आकारलें जाणारें व्याज. मुद्दल आणि त्याच्यावरचें व्याज ह्या दोहोंवर आकारलेलें जें व्याज तें ' चक्रवाढ व्याज '.

**सरळ** स्त्री० भाताचीं ताटें; भातेण.

**सरळणें** [ म० सरळ ] अ० क्रि० १ वाद, भांडण, मारामारी, कुस्ती, इ० मध्यें भाग घ्यावयाला पुढें येणें किं० सरसावणें. २ कांहीं कामाचा पुढारीपणा पत्करणें. ३ ( मूल, माणूस, झाड, किं० ) जोरानें वाढणें किं० फोफावणें.

**सरळी** [ म० सरळ ] स्त्री० पाण्यांत प्रथम खूप वेगानें घुसून नंतर अंगांत आलेल्या वेगानें आणि हात पाय मुळींच न हालवितां पुढें सरळ रेषेंत तरंगत जाणें ( मारणें ).

**संरक्षक** [ सं० ] वि० १ रक्षण करणारा. २ पालक; पालनपोषण करणारा. ३ कैदी, घर, किल्ला, इ० वरचा रखवालदार. ४ देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं त्याच जातीच्या परदेशी मालावर बसविलेली ( जकात ).

**संरक्षण** [ सं० ] न० १ रक्षण; जोपासना; पालनपोषण. २ चोर, दरवडेखोर, इ० पासून बचाव, किं० बचाव करण्याची तजवीज किं० व्यवस्था.

**संरक्षिणें** [ सं० सम्+रक्ष् ] स० क्रि० १

(कोणेकाचें) पालन, पोषण, किं० जोपासना करणें. २ जतन करून ठेविणें; राखणें; शाबूत ठेवणें.

**सरा** पु० १ लांब आणि सरळ बांबू. २ विणलेल्या कापडाचीं विरळ विरळ झालेलीं किं० असलेलीं जीं सुतें तीं प्रत्येक; दुस्ता. ३ खटारा गाडीच्या चौकटीचीं पुढची आणि मागचीं जीं दोन लाकडें तीं प्रत्येक. चौकटीच्या उजव्या आणि डाव्या बाजूच्या दोन लाकडांना 'घोडीं' म्हणतात. मागें 'घोडें' अर्थ २ पहा. ४ सुतें, लाकडाचीं धसकटें, इ०चीं टोकें प्रत्येक.

**सरा** [सं० सुरा] पु० ताड, माड, किं० इतर झाडें यांपासून काढलेली दारू.

**सराई** स्त्री० १ फळें, धान्यें, इ०चीं वैपुल्यानें उत्पन्न होण्याची किं० पिकण्याची वेळ. २ लग्नें, मुंजी, इ० विधि मोठ्या प्रमाणांत म्ह० पुष्कळ होण्याचा जो काळ तो; उ० लग्नसराईमध्यें (किं० लगीनसराईमध्यें) सणंगें महाग होतात.

**सराई** [फा० सराय्] स्त्री० धर्मशाळा; मुसाफरखाना.

**सराईत** [म० सराव; हिं० सरायत] वि० पोहोणें, गाणें, घोड्यावर बसणें, निशाण मारणें, कुस्त्या खेळणें, इ० कांहीं काम करण्यांत पटाईत किं० अभ्यस्त किं० वहिवाटलेला.

**सराटा** पु० १ एक औषधी झुडूप किं० त्याचें फळ. २ माड, पोफळी, इ० झाडांचे जे हिरके ते प्रत्येक किं० त्यांचीं धसकटें जीं तीं प्रत्येक (गात्रांत बोचण्याचे संबंधानें प्रयोग). ३ गायनांत घेतलेली सकंप लांब तान (घेणें, वाजणें, वाजविणें).

**सराफ** [अ० सर्रोफ्] पु० १ हुंड्या, हरएक देशाचीं नाणीं, रोकड, इ० ची देवघेव करून चरितार्थ चालवितो तो. २ (**लाक्षणिक**) चिकू, कंजूष, किं० लोभी माणूस. ※ **सराफकट्टा** पु० सराफ लोक जेथें धंदा करावयाला बसतात ती आळी. **सराफकाटा, सराफा** पु० धंद्यासाठीं बसलेले जे सराफ लोक त्यांची ओळ किं० पंक्ति. **सराफहट्टा** पु० १ गांवांतलि सराफांची आळी. २ धंद्यासाठीं बसलेले सराफ समुच्चयानें. **सराफी** स्त्री० सराफाचा धंदा. **सराफी कावा** पु० १ सराफ लोकांची गिऱ्हाइकांना फसविण्याची कुशलता. २ संसारांत फाजिल चिकूपणा किं० काटकसर.

**सराब, शराब** [फा० शराब्] पु० दारू; मद्य.

**सराय** मागें 'सराई' पहा.

**सराव** [सं० स्राव] पु० कांहीं काम पुष्कळ दिवस करीत असल्यानें प्राप्त होणारी सफाई किं० कुशलता.

**सरावलें** न० मातीचें परळ किं० ताट (भाकरी भाजणें, जेवणें, इ० च्या उपयोगाचें).

**सरासरी** [फा०] स्त्री० मध्यम प्रमाण; उ० सात, अकरा, आणि चोवीस, ह्यांची सरासरी चवदा. **टीप,**—अनेक सजातीय संख्यांच्या बेरजेस त्या संख्यांच्या गणनेच्या अंकानें भागून सरासरी येते. **वि०** साधारण बरा; फारसा उंची नव्हे असा; उ० कालचें गोविंदरावांचें व्याख्यान सरासरी होतें; उ० तो हरिदास सरासरीच आहे. ※ **सरासरीं, सरासरीनें, सरासरीस क्रि० वि०** १ साधारणतः; वरवर पाहून. २ अंदाजानें. ३ सरसकट; आवड निवड न करतां. ४ यथाकथंचित्; कसेंबसें.

**सराळी** स्त्री० पोहोण्याची एक तऱ्हा. मागें 'सरळी' पहा.

**सरिखा** [सं० सदृश] वि० सारखा (कवितेंत).

**सरिगम** [सं० षड्ज, ऋषभ, गांधार, आणि मध्यम, ह्या सुरांचीं आद्याक्षरें] स्त्री० गायनांतील सा, रि, ग, म, प, ध, नी, हे जे सात सूर त्यांचें मिश्रण करून गायिलेला राग.

**सरित्, सरिता** [सं० सरित्] स्त्री० नदी.

**सरिफा** [अ० सर्फाह्] पु० नफा; लाभ; प्राप्ति. ※ **सरिफेवार** वि० फायदेशीर; लाभदायक.

**सरिफी** स्त्री० बंदुकीचा काना.

**सरिरास** [फा० सर् ओ रास] क्रि० वि० १ अखंड प्रवाहानें; मध्यें न थांबतां. २ व्यत्यय किं० अडथळा न होतां.

**सरी** [सं० सर] स्त्री० १ कोणत्याही धातूची तार. २ स्त्रियांचा गळ्यांत घालावयाचा एक दागिना. ३ बांबूची किं० वेत पिंजून लांबलचक काढलेली पट्टी. ४ बागेंतलि पाण्याचा पाट. ५ अशा पाटाचें पाणी ज्यांना लाविलें

आहे अशा झाडांची ओळ. ६ विणलेल्या वस्त्राचे तंतु दूर सरून मध्यें ज्या लांबट फिडी पडतात त्या प्रत्येक; दुस्ता. ७ भिंतीचा माथा. ८ खांबांच्या माथ्यावरचें लाकूड; लग. ९ जात्याची वरची तळी जड करण्यासाठीं जें दगडाचें किं० मातीचें कडें तिच्यावर ठेवितात तें. ह्याला 'पेंड' असेंही म्हणतात. १० गळ्याचे पुढें आलेलें हाड. ११ बागेंतील वाफ्यांचे विभाग करण्यासाठीं जे लहान लहान बांध घातलेले असतात ते प्रत्येक.

**सरी, सर** [ सं० सदृश् ] स्त्री० बरोबरी; साम्य; उ०मुरकुटाला गरुडाची सरी कशी येईल?

**सरीक** [ फा० षरीक ] पु० १ मित्र. २ पातीदार; भागीदार;सकर्ता.

**सरीसर्वत्र** [ सं० सर्वत्र ] क्रि० वि० सर्व ठिकाणीं; जागोजाग; इकडे तिकडे.

**सरू** [ सं० त्सरु ] पु० तरवार, कोयता, इ० ची मूठ. मागें ' थरू ' पहा.

**सरू, सुरू** [ अ० ] पु० एक झाड,–हें सरळ, उंच, आणि अग्राकडे निमुळतें होत गेलेलें असतें. ❀ **सरूचा, सरूदार** वि० सुरूच्या झाडासारखा उभा, सरळ; आणि निमुळता ( पदार्थ,–समई, गुलाबदाणी, इ० ).

**सरूप** [सं०] वि० १ दिसण्यांत सारखा. २ सुंदर. ❀ **सरूपता** स्त्री० १ दिसण्यांत सारखेपणा. २ सौन्दर्य. ३ चार मुक्तींपैकीं एक. सायुज्यता, सलोकता, समीपता, आणि सरूपता, ह्या चार मुक्ति. सरूपता मुक्तीमध्यें ईश्वराचें रूप मुक्ताला प्राप्त होतें.

**सरेकरी** [ सं० सुरा; म० सरा ] पु० दारू विकणारा. मागें ' सरा ' पहा.

**सरेसाल** [ फा० सर्+साल् ( वर्ष ) ] क्रि० वि० सर्व वर्षांत; सबंध वर्षभर.

**सरोज** [सं०] न० कमळ. ❀**सरोजिनी** स्त्री० १ कमळाची वेली. २ कमळांचें वन.

**सरोता** [ हिं० सरवता ] पु० सुपारी फोडण्याचें हत्यार,– आडकित्ता.

**सरोदा** पु० हात किं०पत्रिका पाहून भाकित सांगणारा; डाकोचा. मागें ' डाकोचा, ' ' डाकोता ' पहा.

**सरोदा** पु० एक तंतुवाद्य.

**संरोध** [ सं० ] पु० १ प्रतिबंध. २ विघ्न. ३ कैद. ४ वेढा; गराडा.

**संरोधन** [ सं० ] न० १ कैदेंत टाकणें. २ आडथळा करणें. ३ विघ्न उपस्थित करणें. ४ वेढणें.

**सरोबरी** [ फा० सर्वरी=वर्चस्व ] स्त्री० १ सारखें प्रमाण; सारख्या प्रमाणांत असणें; उ० ह्या गव्हांत सरोबरीनें हरभरे मिसळले आहेत ते निवडावयाला फार वेळ लागेल. २ स्पर्धा; चढाओढ.

**सरोरुह** [ सं० ] न० कमळ.

**सरोवर** [ सं० ] न० तळें; उ० मानस सरोवर हिमालयांत आहे. ❀ **सरोवर न्हाणें** सती जाऊं इच्छिणारी स्त्री यथाविधि स्नान करते तें.

**सरोसर** [ फा० सरासर ] स्त्री०, पु० १ डोक्यावर घालण्याचा एक दागिना. २ घोड्याच्या तोंडावर आणि डोक्यावर घालावयाचा पट्टा. ह्याचे ' कपाळपट्टा ' आणि ' मुखपट्टा ' असे दोन अवयव असतात. मागें ' मुख ' मध्यें ' मुखपट्टा ' आणि ' कपाळ ' मध्यें ' कपाळपट्टा ' पहा.

**सरोळा** पु० बेरजेचा ताळा पाहाण्याची एक रीति. मागें ' सरवळा ' आणि पुढें ' सारोळा ' पहा.

**सर्ग** [सं०] पु० १ जन्म; उत्पत्ति. २ जगाची उत्पत्ति. ३ सृष्टि, जग. ४ स्वभाव; जन्मजात धर्म. ५ निश्चय; हट्ट. ६ उत्सर्जन; त्याग. ७ रघुवंश इ० ग्रंथांचा एक भाग. ❀ **सर्गबंध** पु० महाकाव्य.

**सर्ज** [ सं ] पु० १ साल नांवाचा वृक्ष. २ राळ. ❀**सर्जगंधा** स्त्री० रास्ना. **सर्जरस** पु० राळ.

**सर्जि, सर्जी, सर्जिका** स्त्री०, **सर्जिक्षार** पु० सज्जीखार.

[ पहा.

**सर्द, सर्दार** इ० मागें ' सरद, ' ' सरदार '

**सर्प** [ सं० ] पु० १ सरपटत जाणें. २ साप. ३ वाकडी गति. ❀ **सर्पारि** पु० १ गरुड हा पक्षी. २ मोर हा पक्षी. ३ मुंगुस हें जनावर. **सर्पराज** पु० वासुकी. **सर्पविद्या** स्त्री० गारुड. **सर्पसत्र** न० सर्पांचा नाश करण्यासाठीं जनमेजयानें केला जो यज्ञ तो.

**सर्पमणि** [सं०] पु०सापाच्या डोक्यांत असतो म्हणून कल्पिलेला मणि.

**सर्पिणी, सर्पीण** [सं०]स्त्री० सर्पजातीची स्त्री.

**सर्पटणें** मागें ' सरपटणें ' पहा.

**सर्पोस** मागें ' सरपोस ' पहा.

**सर्व** [ सं० ] वि० १ सगळें; अशेष. २ पूर्ण. पु० शिव. ॐ **सर्वांगीण** वि० १ सर्व अंगास व्यापिणारें. २सर्व अंगास लाविलेलें (चंदन इ०). **सर्वार्थसिद्ध** पु० गौतमबुद्ध. **सर्वंकष** वि० १ सर्वनाशक. २ सर्वव्यापक. पु० ठग; पापी. **सर्वकालीन** वि० १ सर्व काळीं सारखेंच लागू पडणारें ( तत्त्व).२सर्व काळ टिकणारें. **सर्वग** पु० परमात्मा.**सर्वज्ञ** वि०सर्व जाणणारा.पु० १ परमेश्वर.२ शंकर. ३बुद्ध. **सर्वजनीन** वि० १ सर्वांस सारखें लागू पडणारें. २ सर्व लोकांसंबंधाचें. ३ सर्वांना हितकर. **सर्वथा, सर्वथैव** क्रि० वि० १ सर्व प्रकारें. २ एकंदरीत. ३ पूर्णपणें. ४ अगदीं. **सर्वदा** क्रि० वि० नेहेमीं; सदैव. **सर्वनाम** न० नामाचा उच्चार वारंवार होऊं नये म्हणून नामाच्या बद्दल योजतात तो शब्द.**सर्वमंगला** स्त्री० पार्वती. **सर्वंसहा** स्त्री० पृथ्वी. **सर्वंसह** वि० अत्यन्त सहनशील. **सर्वस्व** न० १ सर्व मालमत्ता. २ तत्त्वांश; सार. **सर्वस्वीं** क्रि० वि० पूर्णपणें; अगदीं.**सर्वतः** क्रि० वि०सर्व बाजूंनीं; सभोंवार; सर्व ठिकाणीं; पूर्णपणें. **सर्वतोभद्र** पु० १ विष्णूचा रथ. २ चक्राकार व्यूहरचना. ३ उलटें सुलटें वाचलें तरी ज्याचा अर्थ सारखाच होतो असें वाक्य, श्लोक, इ०; उ० ' रामाला भाला मारा ' हें वाक्य. ४ ( ज्योतिष ) शुभाशुभ जाणण्यासाठीं काढतात तें चक्र. ५चारी बाजूंनीं आणि समोरासमोर दरवाजे असलेला अनेकमजली राजवाडा किं० देवालय.**सर्वशः** क्रि० वि०१ पूर्णपणें. २ सर्व बाजूंनीं. **सर्वदा** पु० १ भाकितें सांगण्याचा धंदा करणारा.२पंचांगें करणारा.**सर्वघन** न० ( गणित ) श्रेणींतील पदांची बेरीज. **सर्वन्यास** पु० ऐहिक वस्तूंचा सर्वथैव परित्याग. **सर्वपित्री अमावास्या** स्त्री० भाद्रपद महिन्याची अमावास्या. **सर्वभक्ष** पु० १ अग्नि. २ कावळा.३ज्याला खावयाला हावें तें चालतें,-मग तें चांगलें असो किं० वाईट असो,-असा माणूस.

**सर्वसाक्षी** [ सं० सर्वसाक्षिन् ] पु० कांहीं पाहातो तो म्ह० ईश्वर. **सर्ववल्लभा** वेश्या.**सर्वशाक** (-ख) स्त्री० अनेक पालेभाज... मुळे,इ०च्या मिश्रणाची भाजी. **सर्वांची मेहुणी** स्त्री० १ खंडोबाला वाहिलेली मुलगी. २ अजागळ पोरगी.**सर्वात्मना** क्रि० वि०१अंतःकरणपूर्वक.२ पूर्णपणें; अगदीं. ३ मुळींच ( अकरणरूपी प्रयोगांत); उ० माझे हातून ही गोष्ट सर्वात्मना घडावयाची नाहीं; उ० घरांत सर्वात्मना एक पैसा उरला नाहीं.

**सर्षप** [ सं० ] पु० १ मोहोरी. २ मोहोरीच्या दाण्याइतका कांहीं पदार्थ. ३ एक वजन.

**सल** [ सं० शल्य ] पु०, न० १ स्त्रीच्या पोटांत न वाढतां आणि बाहेर न पडतां राहिलेला गर्भ.२लाकूड इ०चें अंगांत शिरून राहिलेलें कुसळ.३(लाक्षणिक)मनांत डवचत असलेले दुसऱ्यानें बोललेले अपशब्द किं०केलेलें वर्तन.४उपद्रवकारक माणूस. ५ वाळून गेलेलें झाड. ६ तरवारीच्या म्यानाला कंबरपट्ट्याशीं जोडणारा बंध.७ गुरांना होतो तो एक रोग. ॐ **कोणी स्त्री सलीं लागणें** पोटांत सल राहिल्यामुळें स्त्री जर्जर झालेली असणें. [ तिडीक.

**सल, सलक** [सं० शल्य] स्त्री० सांधिवाताची

**सलक** (-ख ) स्त्री० १ पावसाची जोराची सर. २ तोफांची किं० बंदुकांची सरबत्ती.

**सलकडें** न० १ दुःखनिवारणासाठीं हातांत घातलेलें मंतरलेलें लोखंडाचें कडें. २ सोनें, चांदी, इ० चें मणगटांत भूषण म्हणून घातलेलें कडें.

**सलग** [ सं० संलग्न ] वि० १ मध्यें खंड नसलेलें. २ ज्याचे तुकडे पाडलेले नाहींत असें (वस्त्र, लाकूड, इ०).३ एकाला एक असीं लागून असलेलीं(घरें, झाडें, इ०).ॐ **सलगी** स्त्री० मैत्री; दोस्ती; घरोबा. **सलगी** पु० पाठीराखा; यजमानाच्या बरोबर सदैव असणारा. [ टलेलें.

**संलग्न** [ सं० ] वि०जुळलेलें; जोडलेलें; चिक-

**सलटनगर** पु० कातडीं रंगाविणारांची किं० कमावणारांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**सलणें** [सं० शल्य] अ० क्रि० १ (कांटा,धस, दुसऱ्यानें बोललेला अपशब्द,केलेला अपमान,इ०)

०मनांत बोचत असणें. २ (लाक्षणिक) होणें किं० असणें; असह्य झालेला असणें; तो मनुष्य माझ्या डोळ्यांत सलतो.३ (आपण ल्या दुष्कृत्याचें स्मरण)मनाला दुःख देत असणें.

**सलतन, सलतनत** स्त्री०, **सलतान** न०, **सलतना** पु० [ अ० ] सर्व सामानसुमान, तोफा, बंदुका, दारूगोळा, हत्यारें, इ० नीं सज्ज किं० सिद्ध झालेली फौज. **सलतनत** स्त्री०, **सलतना** पु० सुलतानाची राज्यसरणी किं० अमल.

**सलद** पु० पेटी; संदुक.

**सलद** स्त्री०, **सलदें** न० घर, परसूं, इ० च्या हद्दीचें काटक्याकुटक्याचें दार.

**सलम** [ अ० सल्म् ] वि० १ अखंड; शाबूत स्थितींत असलेलें. २ सईल ( कपडा गठ्ठा, गांठोडें, इ० ).

**सला, सल्ला** पु० १ हितोपदेश. २ कांहीं काम करण्याची कोणेकानें कोणेकास सांगितलेली किं० लावून दिलेली सरणी; बोध; उपदेश; ताकीद. उ० वा० अ० बरें ! ठीक ! योग्य ! तुमचें म्हणणें कबूल !

**सलाबत** [ अ० ] स्त्री० १ वैभव; थोरवी.२ अधिकाराचा दरारा. ३ ऋद्धिसिद्धींची अनुकूलता. ॐ**सलाबतपणा** पु० १दरारा;अधिकाराचा जोर किं० दट्टया. २ दैवशालित्व; ऋद्धिसिद्धींची अनुकूलता.

**सलाम** [अ०] पु० १मुसलमान लोक कोणाची गांठ पडली असतां हा शब्द 'नमस्कार' ह्या अर्थी योजतात. २ मुसलमानास हिंदू इ० ह्या शब्दानें नमस्कार करतात. ॐ **सलामी** स्त्री० १ एकमेकांनीं एकमेकांस सलाम करणें ही सभ्यपणाची चाल किं०ह्या चालीला अनुसरून केलेले सलाम. २ गांठ पडली असतां एकमेकांनीं एकमेकांस सलाम करण्याइतका परिचय म्ह०साधारण ओळख. ३ स्वामित्वाबद्दलचें अत्यल्प देय, सारा, इ०. ४ पहिली भेट; नमस्कारचमत्कार. ५ प्रतिपक्ष्यांची पहिली झटापट किं० झटापटीची सुरवात. वि० कललेला ( खांब, भिंत, घर, इ० ). **सलामीचा हात** पु० दांडपट्टा, कुस्ती, इ० करणाऱ्यांचे पाहिले पवित्रे. **सलामत** [ अ० ] क्रि० वि० १ सुरक्षितपणाच्या स्थितींत; उ० शरीर सलामत तर पगड्या पंचाऐंशीं (ह्या० उपभोग घेणारा सुस्थितींत असला तर उपभोग्य पदार्थ हावे तितके मिळतील).२कांहीं विघ्नें किं०हरकती नयेतां; कांहीं नाश किं० नुकसान न होतां.ॐ**कार मोर खाई तर तारूं सलामत जाई** आपण हाताचे सढळ असलों तर आपलीं सर्व कामें सुरळीतपणें चालतात म्ह० आपल्या मार्गांत विघ्नें, हरकती, इ० येत नाहींत.

**सलामालकी** [ अ० सलाम् अलीक् ] स्त्री० तोंडओळख; साधारण परिचय.

**सलिता,सलिदा** [ हिं० सलीदाह् ] पु०उंटाचे पाठीवर लादलेलें ओझें आवळावयाचा पट्टा.

**सलील** [ सं० ] वि० लीलायुक्त; नखरेबाज; रंगेल. क्रि० वि० अनायासानें; सहज; खेळांत जणों काय.

**सलील** [ अ० सहल् ] वि० सोपें; सुकर.

**सलींव** वि० १ सईल ( कपडा ); घट्ट न बांधलेलें (ओझें). २ अघळपघळ; पोकळ.

**सलीस** [ अ० ] वि० १ मध्यम प्रतीचा किं० दर्जाचा. २ फारशी जड नव्हे अशी ( सारा, वर्गणी, इ०ची रकम). ३फारसें जिकीरीचें,कष्टाचें, त्रासाचें,किं० जोखमीचें नव्हे असे; सुसह्य(काम).

**सलुका(-खा),सलूक(-ख),सलोका(-खा), सलोगा** [ अ०सलूक् ] पु० १ परिचय;ओळखीचा संबंध.दोस्ती; मैत्री. २ युध्यमान प्रतिपक्ष्यांनीं वैर किं० चढाईचें धोरण बंद पाडून केलेली दोस्ती.

**सलोकता** [ सं० ] स्त्री०चार मुक्तींपैकीं एक. मागें ' सरूपता,' ' समीपता ' पहा. सायुज्य हा मुक्तीचा चवथा प्रकार.

**सलोगा** वर 'सलुका (-खा )' पहा.

**सल्ला** पु०बोटांत घालावयाची पैलूदार अंगठी.

**सल्ला** [ अ० सलाअ ] पु०, स्त्री० १ बोध, हिताची गोष्ट ( कोणी कोणास सांगितलेली ). २ युद्ध, भांडण, वाद, इ० संपवून केलेली दोस्ती. ॐ **सल्ला मसलत** स्त्री० ए० व० कोणी कोणास सांगितलेली युक्ति, हिकमत, किं० योजना ( करणें, सांगणें, देणें ).

**सल्लास** [ अ० ] वि०तीन(अरबी सालांत).ॐ **सल्लाशीन, सल्लासैन** वि०तीस(अरबी सालांत).

**सव** [ म०; सं० सव्य ] स्त्री० उत्तर दिशा (अशिक्षितांत रूढ). ❀ **सवचा, सवेचा** वि० उत्तरेकडचा.

**सव** [ म० चव ] स्त्री० पदार्थाची चव किं० रूचि ( अशिक्षितांत रूढ ).

**सव** [ सं० ] पु० १ सोमरस काढणें. २ समंत्रक याज्ञिय स्नान. ३ दारू गाळणें. ४ यज्ञ. ५ संतति.

**संव, सव, सवई, सवय** स्त्री० कांहीं गोष्ट नियमित प्रकारें करणें किं० अशा नियमित प्रकारें करण्यानें अंगीं जडलेला परिपाठ किं० ती करण्यानें तिच्या विषयीं उत्पन्न झालेली प्रवृत्ति किं० आसक्ति. 'खोड,' 'व्यसन' हे शब्द याच अर्थाचे असून ते वाईट गोष्ट दर्शविणारे आहेत; उ० त्याला प्रातःस्नानाची संवय लागली; उ० मला उपास करण्याची संवय आहे; उ० त्याला दारूचें व्यसन (किं० खोड) आहे.

**सवकणें, सवकावणें, सोकावणें, सोकणें** अ० क्रि० कांहीं गोष्टीपासून लाभ होतो असें दिसून आलें असतां ती गोष्ट वारंवार करण्याकडे आकृष्ट किं० प्रवृत्त होणें किं० तिची चट किं० चटक लागणें; उ० ह्या मांजराला रोज रोज दूध घालूं नका, तें सवकेल.

**सवंग** वि० १ अल्प किंमतीस मिळणारा ( माल ); नेहेमीपेक्षां किं० अपेक्षेपेक्षां कमी किंमतीस मिळणारा किं० मिळालेला ( पदार्थ ); स्वस्ता. २ अल्प श्रमानें मिळणारी किं० साध्य होणारी ( वस्तु ). ❀ **सवंग सवदा हगवण लावी** स्वस्त मिळणारा पदार्थ बहुधा वाईट असतो, आणि म्हणून तो प्रकृतीला अपायकारक होतो. **सवंगाई** स्त्री० स्वस्ताई.

**सवंगडी, सवंगडा** [ सं० सह; म० सवें+गडी ] पु० जोडीदार; साथीदार.

**सवंगणें** [ म० सवंग ] अ० क्रि० ( धान्यादि पदार्थ) स्वस्त होणें किं० त्यांच्या किंमती उतरणें.

**सवंगणें, संवगणें** स० क्रि० ( शेतांत पिकलेलें धान्य ) कापणें.

**सवंगाई** स्त्री० स्वस्ताई. वर 'सवंग' पहा.

**सवघड** [ सं० सु+घट् ] वि० १ करावयास सोपें ( काम ), २ करतां येण्याजोगें ( काम ). ३ अर्थ करावयाला किं० समजावयाला सोपा ( ग्रंथ, रचना, इ० ). टीप,-सर्व अर्थी उलट अर्थाचा शब्द ' अवघड. '

**सवच, संवच** पुढें' सवें, सवंच, सवेंची' पहा.

**सवड** [ सं० सु+वेला ] स्त्री० १ सोयीचा किं० फुरसतीचा वेळ. २ जागेचा प्रशस्तपणा; उ० तेथें इतकी दाटी होती कीं एक अधिक मनुष्य बसण्यास सवड नव्हती. ३ कठिण पेचांतून निसटण्याची कांहीं युक्ति किं० हिकमत किं० सोय; उ० धन्याची परवानगी मिळाल्यास येईन अशी नाहीं म्हणावयाला सवड राखून ठेव. ४ दिलेल्या वचनांतून किं० केलेल्या प्रतिज्ञेतून निसटावयाला सबब. ५ कोणेकाची कांहीं विनंति अमान्य करण्याला पुरेशी सबब. ६ ( बायकी भाषेंत ) स्त्रीच्या पोटांत राहातो तो गर्भाचा सल. मागें ' सल ' पहा.

**सवड, सवडे, सवड्यां** क्रि० वि० समक्ष; कोणेकाच्या पुढें किं० देखत किं० समक्षांत(अशिक्षितांत).

**सवडणें, सवणणें** स० क्रि० ( दळण, कांडण, स्वयंपाक, इ० जीं स्त्रियांचीं घरगुतीं कामें तीं ) करून टाकणें किं० उरकून घेणें. ह्या शब्दाची बायकांत रूढि आहे.

**संवत्** [ सं० ] पु० वर्ष; विक्रमानें सुरू केलेला शक. हा इसवी सनापूर्वीं ५७ वर्षें सुरूं झाला.

**सवत** [ सं० सपत्नी ] स्त्री० एका पतीच्या ज्या बायका परस्परांच्या सवती. ❀ **सवत (-ती-) मत्सर** पु० १ सवतीसवतीमध्यें जो मत्सर किं० द्वेषभाव असतो तो. २ एकाच संस्थेतील किं० कुटुंबांतील जीं अनेक माणसें त्यांचा परस्परांविषयीं असतो जो मत्सर किं० द्वेषभाव तो. **सवतवळा** स्त्री० एकाच नवऱ्याच्या अनेक बायका समुच्चयानें. **सवतळा, सवताळा** पु० एकाच स्त्रीशीं किं० रखेलीशीं संभोग करणारे जे जार ते प्रत्येक.

**सवतवणी माघवणी** [ म० सटवणी+माघवणी ] न० फार जोरदार नव्हे अशी पावसाची सर.

**सवता** वि० वेगळा; भिन्न. ❀ **सवता सुभा** पु० दुसऱ्यापासून अलग ठेविलेला किं० केलेला ( व्यवहार ); पृथक् मांडणी; स्वतंत्र योजना.

**संवत्सर** [ सं० ] पु० १ वर्ष. २ एक विशिष्ट

मोडणीचें वर्ष; विक्रमाचें वर्ष. मागें' संवत् ' पहा. ३ संवत्सराभिमानी देवता ( प्रजापति ).**टीप**,–संवत्सर साठ आहेत. त्यांचीं नांवें प्रभव, विभव, शुक्ल,इ० अशीं आहेत.⁂**संवत्सर प्रतिपदा स्त्री०** चैत्र शुक्ल प्रतिपदा,–ज्या दिवशीं चांद्र संवत्सराचा आरंभ होतो. [ भूप्रदेश.

**संवथळ** [ **सं०** सम+स्थल ] **न०** सपाट

**संवदर** [ **म०** सोंड+दोर ] **पु०** मोटेच्या सोंडेला बांधलेली दोरी.

**संवदर** [ **सं०** सुंदर ] **वि०** सुंदर (कवितेंत).

**संवदर फळ** [ **सं०** समुद्रफळ ] **न०** एक औषधोपयोगी फळ.

**सवदा, सौदा** [ **फा०** ] **पु०** १ विकणें किं० विकत घेणें ह्या रूपाचा व्यवहार; क्रय किं० विक्रय. २ विकत घेतलेला पदार्थ. ३ विकलेला पदार्थ. ⁂ **सवदागर, सवदागीर पु०** व्यापारी. **सवदागरी,सवदागिरी,स्त्री०**व्यापार;व्यापाऱ्याचा धंदा. **सवदासूत न०,पु०** व्यापारविपार; व्यापारी मालबील.

**सवन** [ **सं०** ] **न०** १ सोमरस काढणें. २ यज्ञ. ३ आहुति. ४ मंत्रपूर्वक यज्ञिय स्नान. ५ काळ, वेळ. ६ प्रसवणें; प्रसूति.७ स्वराचा प्रकार. **टीप**,–संगीत शास्त्रांत मंद्र, मध्य, आणि तार, अशीं तीन सवनें म्ह० स्वरांचे प्रकार आहेत. हीं सवनें चढत्या क्रमानें उंच होत गेलेल्या स्वरांचीं सप्तकें आहेत. यावरून ' तिसरें सवन ' म्ह० अत्यन्त उंच स्वराचें सप्तक. तिसऱ्या सवनावर येणें ( किं० जाणें ), तिसरें सवन काढणें म्हणजे अत्यन्त उंच स्वर काढणें; उ० हें मूल इतका वेळ हळूं हळूं रडत होतें, पण मी त्याची समजूत करावयाला गेलों त्या बरोबर तें एकदम तिसऱ्या सवनावर गेलें ( म्ह० तें मोठमोठ्यानें रडूं लागलें ); उ० तो वक्ता रागाच्या भरांत तृतीय सवनावर गेला ( म्ह० मोठमोठ्यानें ओरडून बोलूं लागला ).

**सवय** मागें ' सव, '' सवई ' पहा.

**सवरणें, संवरणें** क्रियापदाचा अर्थ व्यापक किं० पूर्ण करणारें हें क्रियापद असून क्रियापदाचा जो काळ,वचन, रूप, तोच ' सरसावणें ' ह्याचा काळ, वचन, रूप, इ० असतो;उ० लिहिणें सवरणें, खाऊन सवरून, जेवतां सवरतां,बोलेल संवरेल, इ०. **टीप**,–माजीबिजी, टेबल बिबल, इ० शब्दांतील जसा अंत्य भाग तसा क्रियापदाच्या रूपाचा अंत्यभाग 'सवरणें' ह्या क्रियापदानें केला जातो; त्याला स्वकीय असा कांहींच अर्थ नाही.

**सवर्ण** [ **सं०** ] **वि०** १ एकाच रंगाचें. २ एकाच जातीचें. ३ तुल्यरूप. [ देणें.

**सवर्णन** [ **सं०** ] **न०** (गणित) समच्छेदरूप

**सवर्णित** [ **सं०** ] **वि०** ( **गणित** ) समच्छेद रूपांत घातलेला.

**संवर्त** [ **सं०** ] **पु०** १ नाश. २ प्रलय; प्रलयकाळ. ३ प्रलयकाळचा बहूदक मेघ. ४ समूह. ५ आकुंचन.

**संवर्तक** [ **सं०** ] **पु०** १ प्रलयाग्नि.२ वडवानळ. ३ बळरामाचा नांगर.

**संवर्तिका** [ **सं०** ] **स्त्री०** १ कमळ इ० चें कोंवळें पान.२ दिव्याची ज्योत.

**संवर्धक** [ **सं०** ] **वि०** १ वाढविणारा. २ सत्कार करणारा.

**संवर्धन** [ **सं०** ] **न०** १ वाढणें.२वाढविणें. ३ पालनपोषण; संगोपन;जोपासना.४ बढती करणें.

**सवलत, सोहलत** [ **अ०** सुह्लत् ] **स्त्री०** १ सवड; सोय. २ सौम्यपणा. ३परवानगी.४ सूट; सोडवणूक. ५ माफी.

**सवसांज स्त्री०** सायंकाळ. ⁂ **सवसांजचा क्रि० वि०** ( लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) संध्याकाळच्या वेळीं; उ० सवसांजचा तू जंगलांतून जात जाऊं नको.

**सवा, सव्वा** [ **अ०** सपाद=चतुर्थांशासह ] **वि०** चतुर्थांशासहित; ज्यांत पाव अधिक आहे असा; उ० सव्वाशे म्ह० शंभर आणि पावशंभर म्ह० एकशे पंचवीस; उ० सवा रुपाया म्ह० एक रुपाया अधिक रुपायाचा चतुर्थांश म्ह० एक रुपाया चार आणे. ⁂ **सवाई वि०** चतुर्थांशानें अधिक; उ० कोंकणच्या मापापेक्षां देशचें माप सवाई आहे. **सवाई स्त्री०** १ सवा पट; चतुर्थांशानें अधिक असें परिमाण. २ तंबूच्या माथ्याला बांधून जमीनीला खुंट्या, मेखा, इ०ला बांधलेल्या ज्या दोऱ्या त्या प्रत्येक.ह्या अर्थी 'सवाईची दोरी' सुद्धां. **सवाईसूट, सवाईवजा,सवाईबाद स्त्री०**

शेतकरी, कूळ, इ० ना सरकार, सावकार इ०नीं दिलेली उत्पन्नाच्या किं०कर्जाच्या पंचमांशाची सूट किं०माफी. **सवाईजमा** स्त्री०शेतकरी आणि इतर गांवकरी यांचेकडून सरकारनें घेतलेला जादा कर. **सवाकी,सवायकी** स्त्री०,**सवायकें** न०एक,दोन, तीन,इ० शंभरापर्यंत जे अंक त्यांच्या सवापटींची पंक्ति,–जी मुलांकडून पाठ करवितात ती; उ० एक सवें सवें, बे सवें आडीच, तीन सवें पावणे-चार, इ० पासून शंभर सवें सवाशे येथपर्यंतची श्रेणी.

**सवाई** स्त्री० मागें ' संवय ' पहा.

**सवाई** स्त्री० एक प्राकृत छंद.यांत सात भगण असून शेवटीं एक गुरु अक्षर असतें. ह्या छंदांचे अनेक प्रकार आहेत.

**सवागी** [ हिं० ] पु०, स्त्री० एक क्षार.

**सवाणणें** स० वि० ठासणें; ठासून भरणें; खांब, खुंटी, दारू, इ० जमीन, भिंत, बंदूक, इ० मध्यें आंत खुपसून पक्कें करणें. खांब किं० खांबाचा दरा,दारू किं०बंदूक,यांचेवर कर्मता असुं शकते; उ० खांब सवाणला; खांबाच्या दऱ्यांत माती सवाणली; दारू सवाणली; बंदूक सवा-णली; इ०.
[ हत्यार.

**सवाणा** पु० सोनारांचें चिमट्यासारखें एक

**संवाद** [ सं० ] पु० १ संभाषण. २ वाद-विवाद; चर्चा. ३ सादृश्य; मेळ; सारखेपणा. ४ जमणें; जुळणें; जुळणी. ५ मतैक्य. ६ बातमी. ॐ **संवादी** वि० मेळांत असलेलें; जुळणारें; सारखें; जाबदार; सदृश.

**सवायकी, सवायकें** मागें 'सवा' मध्यें पहा.

**सवार, स्वार** [ फा० सवार् ] पु० १ घोड्या-वर बसलेला किं० आरूढ झालेला. २ घोड्यावर बसून लढणारा. ३ घोड्यावर बसून टपाल, बातम्या, इ०ची नेआण करणारा. **सवारी, स्वारी** स्त्री० १ प्रवास, गमन, इ० प्रसंगीं घोडा, गाडी, उंट, इ० वाहनांवर बसणें किं० बसणारी व्यक्ति किं० बसलेपणाची स्थिति; उ० ह्या टांग्यांत दोन स्वाऱ्या नेण्याचा हुकूम आहे; उ० हें स्वारींचें घोडें आहे, ओझ्याचें नव्हे. २ राजा किं० कोणी बडा अधिकारी किं० बडा माणूस शिकारीस किं० प्रवासास किं० फिरावयास निघाला असतां त्याच्याबरोबर जीं माणसें, गाड्या, घोडे, इ० सरंजाम असतो तो. ३ ( गौरवानें ) यजमान; घराचा मालक; कोणी-ही माणूस; उ० मी मामलेदाराच्या भेटीस गेलों तेव्हां स्वारी निजली होती(म्ह० मामलेदार);उ० आपली स्वारी आतां कोणीकडे निघाली ? (म्ह० आपण ) ४ घोडेस्वारांची टोळी. ५ लढाईचें धोरण धरून देश, किल्ला,इ० वर केलेला हल्ला. ६ कुस्तींतील एक पेंच.

**संवार** [ सं० ] पु० १ झाकणें. २ आकुंचन. ३ संगोपन. ४ (व्याकरण) वर्णांचा बाह्य प्रयत्न-विशेष.
[ तीचा परमावधि.

**संवारी, सवारी** ( स्त्री० ) समुद्राच्या भर-

**सवारी** पु० गानांतील तालाचा एक भेद. वि० ह्या जातीचा ( ख्याल ).

**सवाल, सव्वाल** [अ०] पु० प्रश्न; चौकशी.

**सवाल** [ अ० ] पु० मुसल्मानी वर्षाचा दहावा महिना. पुढें ' साबान ' पहा.

**सवाशा** [ म० सवाशें=१२५ ] पु० ब्राह्म-णांची एक जाति किं० त्या जातीचा कोणी इसम. टीप,–दक्षिणेच्या लोभानें अपवित्र अन्न खाल्ल्या-मुळें सव्वाशे ब्राह्मण भ्रष्ट झाले, ते आणि त्यांची संतति सवाशे ही एक वेगळी जात झाली.

**सवाशीण, सवाष्ण, सवाष्णी** [ सं० सुवा-सिनी ] स्त्री० १ जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. २ मंगल किं०अन्य प्रसंगीं जेवावयास बोला-वलेली सुवासिनी स्त्री. ॐ **ब्राह्मण सवाशिण** स्त्री० ए० व०, **सवाशिण ब्राह्मण** पु०ए० व० कांहीं धार्मिक विधीसाठीं जेवावयास बोलाव-लेला ब्राह्मण आणि सुवासिनी.

**संवास** [ सं० ] पु० १ सहवास. २ मैथुन. ३ रहावयाचें किं० वसतीचें घर. ४ माळ, मैदान.

**संवाह** पु० पुढें ' संवाहन ' पहा.

**संवाहक** [ सं० ] पु० अंग चेपणारा किं० रगडणारा सेवक.

**संवाहन** न०, **संवाहना** स्त्री० [ सं० ] १ वाहणें; नेणें; वाहून नेणें. २ अंग चेपणें किं० रगडणें किं० मर्दिणें.

**सवाहाती** [ म० सवा हात ] स्त्री० बकरी इ० ची मलविसर्जनाची नळी,–जी सुमारें सवा हात लांबीची असते ( खाटिक लोकांत रूढ ).

**सविकल्प, सविकल्पक** [ सं० ] वि० १ इच्छेवर अवलंबून असलेलें; ऐच्छिक. २ संशयित; ज्याचें संबंधानें संशय आहे असा. ३ भेद करणारा; भेदयुक्त. ४ ( **योगशास्त्र** ) ज्ञाता आणि ज्ञेय ह्यांच्यांतील भेदाच्या ज्ञानानें युक्त(समाधि).

**सविता** [सं०सवितृ] पु० १ सूर्य. २ परमेश्वर. वि०उत्पादक. **सवित्री** स्त्री० १ आई.२गाय.

**संवित्ति** [ सं० ] १ अनुभव. २ ज्ञान. ३ बुद्धि. ४ ओळखणें.५अंगीकार.६चेतना. ७जाणीव. ८ ( **मराठींत** ) घरोबा.९( **मराठींत** ) एकोपा.

**सविध** [ सं० ] वि० १ सजातीय. २ जवळचें. न०सांनिध्य. [ सामग्री.

**संविधा** [ सं० ] स्त्री० व्यवस्था; तयारी;

**संविधान** [ सं० ] न० १ मांडणी; रचना; व्यवस्था. २ तजवीज; योजना. ३ उपाय.

**संविधानक** [ सं० ] न० १ नाटक, कादंबरी, गोष्ट, इ०तील मजकुराची मांडणी,जुळणी, किं० रचना. २ अघटित गोष्ट. [ लवार.

**सविस्तर** [ सं० ] वि० १ साद्यंत.२ तपशी-

**सविस्मय** [ सं० ] वि० आश्चर्यचकित; विस्मित. [ धुंडाळणें.

**संवीक्षण** [ सं० ] न० १ न्याहाळणें. २

**संवृत** [ सं० ] वि० १ झाकलेलें; गुप्त. २ वेष्टित; व्याप्त. ३गराडलेला; वेढलेला.न० एकान्त.

**संवृति** [ सं० ] स्त्री० १ झाकणें; लपविणें. २ गुप्त बेत.

**संवृत्त** [ सं० ] वि० घडून आलेलें; झालेलें.

**संवृद्धि** [ सं० ] स्त्री० १ वाढ. २ वैपुल्य. ३ वैभव; उत्कर्ष; भरभराट. [ पहा.

**सवे, सव** स्त्री० सवय; खोड. मागें ' सवई '

**सवें** श० यो० अ० बरोबर; सहवर्तमान ( कवितेंत ).

**सवें, सवेंच, सवेंचि** [ सं०स्वयमेव ] क्रि० वि० १ स्वतां; स्वयंस्फूर्तीनें; आपण होऊन. २ तात्काळ;विलंब न लावतां. [ नाशवंत.

**सवेच** [ म० वेचणें ] वि० संपून जाणारें;

**सवेण्या** [ म० स (सहित )+विहीण ]स्त्री० अ०व० लग्नांतील रासन्हाणी म्हणून जो समारंभ तो.वरपक्षाकडील स्त्रियांना न्हाऊं घालणें, त्यांना चांगल्या भरणें,ह्या रूपाचा हा समारंभ असतो.

**सवेसांजचा** [ म० समय+सांज ( संध्याकाळ) ] क्रि० वि० सायंकाळीं.

**सव्य** [ सं० ] वि० १ डावा. २दक्षिण दिशेकडचा. ३ प्रतिकूल; उलट.४( **मराठींत** ) उजवा.

* **सव्यसाची** [ सं० सव्यसाचिन् ] पु० १ अर्जुन,-जो उजव्या आणि डाव्या हातानें सारख्याच कौशल्यानें बाण सोडूं शकत होता. २ जो एकादें काम डाव्या हातानें आणि उजव्या हातानें सारख्याच सफाईनें करूं शकतो तो. ३ ( **मराठींत** ) उत्तम गद्यरचना आणि उत्तम पद्यरचना करणारा. ४ ( **मराठींत** ) भाषणांत आणि संभाषणांत सारखाच पटाईत. **सव्यापसव्य** [ सं० सव्य+अपसव्य ] न० ब्रह्मयज्ञ, पितृतर्पण, श्राद्ध, इ० धार्मिक विधींमध्यें जानवें कांहीं वेळां उजव्या खांद्यावरून (अपसव्य),आणि कांही वेळां डाव्या खांद्यावरून ( सव्य ),लोंबत सोडावें लागतें. ह्या कमाला ' सव्यापसव्य ' म्हणतात. ह्यावरून ' सव्यापसव्य ' ह्याचा अर्थ,' व्यर्थ सोसावा लागणारा त्रास ' किं०' जाणूनबुजून अंगावर ओढून घेतलेला उपद्रव ' असा वात्रटपणानें करण्यांत आला. **विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करीत बसणें** मागें ' विकत ' मध्यें पहा. **सव्यक्त** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

**सव्यक्त**[सं०सुव्यक्त]वि०स्पष्टपणें दिसण्याच्या स्थितींत असलेला किं० अगदीं स्पष्ट दिसणारा ( पदार्थ ).

**सव्याज** [ म० स+व्याज ] वि० १ व्याजासहित ( मुद्दल ).२ व्याजाच्या शर्तीवर दिलेली किं०घेतलेली कर्जाची रकम.टीप,-ह्या शब्दांतील ' ज ' चा उच्चार दंततालव्य आहे.

**सव्याज** [ सं० ] वि० कपटी; ढोंगी;लबाड. टीप,-'सव्याज' यांतील'ज'चा उच्चार तालव्य.

**सव्वा, सव्वाई, सव्वाकी** इ० मागें 'सवा,' ' सवाई,' ' सवाकी,' इ० पहा.

**सव्वाल** मागें ' सवाल ' पहा.

**सव्वीस** [ म० सहा+वीस ] वि० वीसांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सशक्त** [सं० सुशक्त ] वि० प्रकृतीनें चांगला असून बळकट.

**संशय** [ सं० ] पु० १ शंका; अनिश्चय. २

भय; धोका; संकट. ❀ **संशयालु, संशयी** वि० संशयखोर; कुत्सित शंका काढीत बसणारा. **संशयवाईक** वि० नसते संशय काढीत बसणारा. **संशयात्मक** वि० संदिग्ध; ज्याचे संबंधानें संशय किं० शंका आहे असा; संशयास पात्र. **संशयनिवृत्ति** स्त्री० शंकेचें निवारण. **संशयापन्नमानस** वि० ज्याच्या मनांत कांहीं शंका आली आहे असा.

**सशाची अंधेरी** स्त्री० पुढें 'ससा' मध्यें पहा.

**संशुद्ध** [ सं० ] वि० १ धुऊन टाकलेला. २ दोषमुक्त. ३ ऋणमुक्त.

**संशुद्धि** [ सं० ] स्त्री० १ पूर्णपणें धुणें; धुऊन स्वच्छ करणें. २ शुद्धपणा. ३ निष्पापपणा. ४ ऋणापासून मुक्तता.

**संशोधक** [ सं० ] वि० १ दुरुस्त करणारा; तपासणारा. २ चौकस बुद्धीचा. ३ शोधून किं० हुडकून काढणारा.

**संशोधन** [ सं० ] न० १ शुद्ध करणें; दुरुस्त करणें; मलरहित करणें. २ ग्रंथ बारकाईनें पाहून तपासून त्यांतील चुका, दोष, इ० काढून टाकणें. ३ कर्जाची फेड करणें. ४ वैर शमवून घेणें; सूड घेणें. ५ खनिज धातु इ० शुद्ध करणें.

**संशोधित** [ सं० ] वि० तपासलेला; दुरुस्त केलेला ( ग्रंथ, खनिज पदार्थ, इ० ).

**संश्लिष्ट** [ सं० ] वि० १ कवटाळलेला; आलिंगिलेला. २ निकट संबंधानें जुळलेला.

**संश्लेष** [ सं० ] पु० १ आलिंगन. २ स्पर्श. ३ संयोग.

**संश्लेषण** न०, **संश्लेषणा** स्त्री० [ सं० ] १ जोडणें. २ आलिंगन. ३ बांधणें; बंधन.

**सष्टम** [ सं० सत्तम ] वि० मोठा, ठसठशीत, सणसणीत, दडदडीत ( दागिना, भांडें, वस्त्र, किं० कोणताही पदार्थ ).

**ससकर** [ सं० शर्करा; म० साखर ] पु० १ केरकचरा ज्यांत फार आहे असा धान्य, डाळ, साखर, इ० पदार्थ. २ दोन धान्यें, डाळी, इ० चें मिश्रण. वि० १ मिसळींचें ( धान्य, इ० ). २ केरकचऱ्यानें भरलेलें ( धान्य इ० ).

**ससकार** पु० विसार. मागें 'सचकार' पहा.

**संसक्त** [ सं० ] वि० १ चिकटलेला. २ बांधलेला. ३ मिश्रित. ४ जवळचें; निकट किं० शेजारीं असलेलें. ५ आसक्त; अनुरक्त. ६ युक्त; सहित. ७ अविच्छिन्न; अखंड.

**संसक्ति** [ सं० ] स्त्री० १ चिकटणें. २ निकट संबंध; दाट परिचय. ३ आसक्ति.

**ससगणी, ससगाणी, सजगणी** स्त्री० ढब्बू,—दोन पैसे किमतीचें एक नाणें.

**ससंबंधिक, ससंबंधी** [ म० स+संबंधी ] वि० दुसऱ्याच्या अपेक्षेनें असलेला किं० ध्यावयाचा किं० जाणावयाचा; उ० सेव्य आणि सेवक हे एकमेकांचे ससंबंधी आहेत.

**संसरण** [ सं० ] न० १ गमन; जाणें. २ उत्पत्ति; जन्म. ३ संसार; प्रपंच. ४ युद्धाचा आरंभ. ५ सैन्याचें निर्बंध गमन किं० चाल. ६ राजमार्ग. ७ नगराबाहेरचें विश्रांतीचें स्थान. ८ वाऱ्याचें किं० पाण्याचें वाहाणें.

**संसरणें** [ सं० सम्+सृ ] अ० क्रि० जन्ममरणाच्या फेऱ्यांतून जाणें.

**संसर्ग** [ सं० ] पु० १ संबंध; संपर्क. २ सहवास. ३ स्पर्श. ४ सांनिध्य; शेजार. ५ परिचय. ६ आसक्ति; व्यसन. ७ मैथुन. ८ वाटण्या झाल्यानंतरचें भाऊबंदांचें सलोख्यानें एकत्र राहाणें. ❀ **संसर्गी** [ सं० संसर्गिन् ] वि० १ संबंध असलेला. २ वाटण्या झाल्यानंतर एकत्र राहाणारा.

**संसर्जन** [ सं० ] न० १ त्यागणें; सोडणें. २ मिश्रण. [ अधिक मास.

**संसर्प** [ सं० ] पु० १ सरपटत जाणें. २

**ससा** [ सं० शश ] पु० एक भित्रा प्राणिविशेष. ❀ **सशाची अंधेरी** स्त्री० आपल्यावरच्या संकटाकडे केलेलें दुर्लक्ष्य किं० दुर्लक्ष्य करून ( म्ह० तें न पाहातां ) स्वस्थ आणि आरामांत राहाणें. **ससेधोकें** न० अतोनात भीति किं० भितरेपणा; क्षुल्लक कारणावरून फारच घाबरणें; कारण नसतां कारण कल्पून भिणें.

**ससाणा** [ सं० श्येन ] पु० एक क्रूर आणि मोठ्या आकाराचा आणि शक्तिमान् पक्षी.

**संसार** [ सं० ] पु० १ जन्ममरणाचा फेरा. २ ऐहिक जीवित; जीवनाचा प्रकार; प्रपंच. ३ प्रवाह; मार्ग. ४ ( सांख्य ) विश्व. ५ विस्तार. ६ आयुष्यांत सोसाव्या लागणाऱ्या अडचणी अपमान, खटपटी, त्रास, जबाबदाऱ्या, इ०

चा समुच्चय. ७ कुटुंबांतील माणसें, त्यांच्या-संबंधाचीं आपलीं कर्तव्यें, इ० समुच्चयानें. ८ घरांतील भांडींकुंडीं, सामानसुमान, इ० समुच्चयानें. **॥ संसार करणें** ( किं० **हाकणें** ) बायको, मुलें, आश्रित, इ० ची जबाबदारी वाहून आयुष्य-क्रमण करणें. **कोणेकाच्या संसाराची माती होणें** ( किं० **करणें** ) त्याचे बेत, योजना, प्रयत्न, आशा, इ० ची माती होणें ( किं० करणें ). **संसारसाक्षी पु०** परमेश्वर. **संसाराचा गाडा पु०** संसाररूपी ओझ्याचा गाडा ( ओढणें ). ओझ्याची गाडी ओढणाऱ्या बैलाच्या स्थितीवरून वैतागांत हा शब्द योजला जातो. **संसाराचें जोकड न०** संसाराची त्रासदायक जबाबदारी. **संसारी वि०** बायको, मुलें, इ० ची जबाबदारी ज्याच्या शिरावर आहे किं० ज्याणें पत्करली आहे असा माणूस ( योगी, संन्यासी, इ० च्या व्यावर्तकार्थें ).

**ससाक्ष** [ म० स + साक्ष ] **वि०** ज्यावर साक्षी घातल्या आहेत असा ( दस्तऐवज इ० ).

**संसिद्धि** [ सं० ] **स्त्री०** १ पूर्ण होणें; शेवटास जाणें. २ प्राप्ति; ध्येय गांठणें किं० मिळविणें. ३ फळ; परिणति. ४ मोक्ष. ५ स्वभाव. ६ परिपूर्णता.

**संसृति** [ सं० ] **स्त्री०** १ संसार. २ गति. ३ भूलोकवास. **टीप,**–वर ' संसार ' सर्व अर्थीं पहा.

**संसृष्ट** [ सं० ] **वि०** १ ग्रस्त; उपद्रविलेला; बाधा पावलेला. २ युक्त; सहित. ३ मिश्रित. ४ उत्पन्न केलेला किं० उत्पन्न झालेला **॥ संसृष्टत्व न०** १ संयोग. २ प्राप्ति. ३ कायदेशीर रीतीनें विभक्त झाल्यानंतर पितापुत्र, भाऊ भाऊ, इ० चें पुन्हा सलोख्यानें एकत्र राहाणें.

**संसृष्टि** [ सं० ] **स्त्री०** १ संयोग. २ पाती; भागी; भागीदारीचा व्यवहार. ३ एकत्र वास; सहवास. ४ समूह. ५ मिश्रण. ६ (*साहित्य*) परस्परांवर अवलंबून नसलेले असे कोणतेही दोन किं० अधिक अलंकार एकाच पद्यांत आले तर ' संसृष्टि ' हा अलंकार होतो. ह्या अलंकाराचे प्रकार, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

**ससेधोंकें न०** मागें ' ससा ' मध्यें पहा.

**ससोरा पु०** गळा, नरडें ( धरणें, चेपणें ).

**संस्कर्ता** [ सं० संस्कर्तृ ] **पु०** १ शिजविणारा. २ कोणताही संस्कार करणारा.

**संस्कार** [ सं० ] **पु०** १ पूजा करणें. २ घासणें, शिजविणें, वाळविणें, पुटें देणें, इ० क्रियांनीं पदार्थांत कांहीं नवा गुण किं० धर्म उत्पन्न करणें. ३ उजळणें; स्वच्छ करणें. ४ शिक्षण. ५ सज्ज करणें. ६ भूषविणें. ७ शिजविणें. ८ कार्य; परिणाम. ९ कर्मांचा मनावर राहाणारा परिणाम; वासना. १० अनुभव. ११ विचार; भावना; संकल्प. १२ गर्भाधान, उपनयन, इ० जे विधि ते प्रत्येक. हे संस्कार सोळा आहेत. १३ उपनयन. १४ शुद्धता. १५ ठसा; छाप. १६ देहशुद्धीसाठीं केलेलें कोणतेंही कर्म.

**संस्कारणें** [ म० संस्कार; सं० संस्कार ] **स० क्रि०** ( कोणा मनुष्यावर किं० पदार्थावर ) कांहीं संस्कार करणें.

**संस्कृत** [ सं० ] **वि०** १ संस्कारानें शुद्ध किं० पवित्र किं० निर्मल केलेला. २ पूर्ण केलेलें. ३ पक्व; शिजविलेलें. ४ घडविलेलें. ५ उत्तम; वरच्या दर्जाचा. ६ निष्कलंक. ७ शिक्षित, प्रौढ ( बुद्धि, विचार, मन ). ८ दागिने, पोशाख, इ० नीं शोभविलेला. ९ शास्त्रोक्त लक्षणांनीं युक्त. १० मलरहित केलेला. **पु०** १ व्याकरणशुद्ध (शब्द). २ पंडित. **न०** हिंदुस्तानांत आलेल्या आर्यांची बोलावयाची भाषा,–जिच्यापासून पैशाची, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, ह्या मुख्य चार प्राकृत भाषा उत्पन्न झाल्या.

**संस्कृति** [ सं० ] **स्त्री०** १ संस्कार. २ विवाहसंस्कार. ३ कोण्या एका समाजांतील लोकांचे अनुभव, त्यांच्यावर होणारे आघात, त्यांचा धर्म, त्यांचीं ध्येयें, हवापाणी, संनिधीच्या लोकांचा संसर्ग, इ० च्या समुच्चयाच्या परिणामानें त्या समाजाला जें दृढमूल वैशिष्ट्य प्राप्त होतें तें; उ० पौरस्त्य संस्कृतींत विश्वबंधुत्व, सत्य, पावित्र्य, इ० गुण प्रमुखत्वानें दृष्टीस पडतात; पाश्चात्य संस्कृतींत ऐहिक वैभवाची हाव, परस्वाचा अपहार करण्याची प्रवृत्ति, इ० गुण प्रामुख्यानें दृष्टीस पडतात.

**सस्त, स्वस्त, सस्ता, स्वस्ता** [ हिं० ] **वि०** सवंग; नेहेमींपेक्षां किं० अपेक्षित किमतीपेक्षां कमी किमतीस मिळणारा ( पदार्थ ). ' महाग

याच्या उलट. ❀ **सस्ताई, स्वस्ताई स्त्री०**सवंगपणा. ' महागाई 'च्या उलट. **सस्तासुकाळ, स्वस्तासुकाळ पु०**पदार्थांचें वैपुल्य आणि स्वताई.

**संस्तर** [ सं० ] पु० १ विस्तार. २ रचना. ३ अनुष्ठान. ४शय्या.५स्थंडिलाची रचना.६ थर.

**संस्तव** [ सं० ] पु० १ स्तुति; परिचय. २ मतैक्य.

**संस्ताव** [ सं० ] पु० १ स्तुति. २ वेदघोष.३ यज्ञांत विप्रांनीं देवादींचीं स्तोत्रें म्हणण्याची जागा.

**सस्तावणें, स्वस्तावणें** [ म० सस्त, स्वस्त ] अ० क्रि० ( पदार्थांची ) किंमत उतरणें.

**सस्ताविणें, स्वस्ताविणें** [ म० सस्त, स्वस्त] स० क्रि० ( पदार्थांची ) किंमत उतरविणें किं० कमी करणें.

**संस्तुत** [ सं० ] वि०१अतिशय वाखाणलेलें. २ नेहेमीचें; परिचयाचें.

**संस्थ** [ सं० ] वि० विशिष्ट स्थळीं असलेला; उ० प्राक्संस्थ म्ह० पूर्वेकडील; वृक्षसंस्थ म्ह० वृक्षावर बसलेला.

**संस्था** [ सं० ] स्त्री० १ सभा. २ रचना. ३ आकार; स्वरूप. ४ अवस्था; स्थिति. ५ व्यवस्था. ६ मुद्दत; करार. ७ योग्य मार्ग; न्याय्य मार्ग. ८ समाप्ति; नाश. ९ मृत्यु; मरण. १० ( मराठींत ) सर्व गोष्टींचें आनुकूल्य असल्याची स्थिति. ११ विशिष्ट उद्देश किं० ध्येय साधण्यासाठीं किं० विशिष्ट कार्य करण्यासाठीं कांहीं नियमांनीं बांधलेल्या लोकांची मंडळी किं० जूट. १२ शिकणाऱ्या विद्यार्थ्याला स्वर, उच्चार, इ० मोडणी सांगून पाठ (म्ह० धडा) नेमून देणें. ह्या अर्थी 'संथा' हें अपभ्रष्ट रूप.

**संस्थान** [ सं० ] न० १ समुदाय. २ स्थिति. ३ वासस्थान. ४ सांनिध्य. ५ ठेवण; रचना; मांडणी; नेम धरणें, कुस्ती, न्याहाळणें, आश्चर्य, दुःख, आनंद, इ० प्रसंगीं शरीराच्या गात्रांची जी विशिष्ट प्रकारची ठेवण होते ती. ६ आकृति; वेष. ७ शरीर. ८ मरण. ९ चवाठा. १० (मराठींत ) राजाचा राजकीय व्यवहार जेथें मुख्यत्वें करून होतो असें शहर. ११(मराठींत) देवालय, साधु, विद्वान्, मांडलिक, इ० च्या खर्चासाठीं राजा किं० सरकार ह्यांनीं तोडून दिलेला गांव, शेत, इ०. १२ ( मराठींत ) प्रसिद्ध देवस्थान किं० कोणा साधूच्या निवासाचें स्थान. १३ ( मराठींत ) जेथें कांहीं दैवी चमत्कार घडतो असें स्थान. १४ (मराठींत) कोणत्याही कारणानें आदराला, वंदनाला, किं० पूजेला पात्र असें स्थान. १५ ( मराठींत ) सार्वभौम राजाच्या अंकित जे लहान लहान राजे त्यांच्या अधिकाराचें क्षेत्र. ❀ **संस्थानी वि०** संस्थानांतील किं० संस्थानासंबंधाचा (खटला, गांव, खर्च, प्रजा, इ० ). **संस्थानिक पु०** सार्वभौम राजाच्या हाताखालचे जे बारकेसारके राजे ते प्रत्येक. **सांस्थानिक वि०** समानदेशीय.

**संस्थापक** [ सं० ] पु० धर्मपंथ, संस्था, सभा, शाळा, अन्नसत्र, तालीमखाना, वर्तमानपत्र, मासिक पुस्तक, इ० स्थापणारा किं० सुरू करणारा माणूस.

**संस्थापणें** [ सं० सम्+स्था, स्थाप् ] स० क्रि० ( सभा, पंथ, अन्नसत्र, इ०ची ) मांडणी, सुरवात, किं० व्यवस्था करणें.

**संस्थापन न०, संस्थापना स्त्री०** [ सं० ] १ स्थापण्याची क्रिया. २ जमविणें. ३ ठरविणें. ४ प्रचारांत आणणें. ५ निग्रह; नियमन.

**संस्थित** [ सं० ] वि० १ राहाणारा. २ जवळचा. ३ संपलेलें. ४ मृत; मेलेला. ५ बांधेसूद. ६ स्थिर.

**संस्थिति** [ सं० ] स्त्री० १ सांनिध्य. २ स्वस्थ राहाणें. ३ कायमचें स्थान. ४ आधार. ५ जमाव; ढीग. ६ टिकून राहणें. ७ शेवट; समाप्ति. ८ मृत्यु. ९ एकाग्रता.

**संस्पर्श** [ सं० ] पु० संबंध; संपर्क.

**सस्मित** [ सं० ] वि० ज्याच्या मुखावर हास्य आहे असा. **क्रि० वि०** हसत; हसून.

**सस्य** [ सं० ] न० १ धान्य. २ फळ. ❀ **सस्यमंजरी स्त्री०** कणीस.

**सह** [ सं० सह ] वि० ( **समासान्तीं** ) सोसणारा; सोसेल असा; सोसण्याजोगा; उ० दुःसह, सुसह. पु० मार्गशीर्ष महिना.

**सह** [ सं० ] **उपसर्ग, श० यो० अ०** बरोबर; सहवर्तमान; उ० रामासह मी विठ्ठलवाडीस जाणार आहें. ❀ **सहाध्यायी** [ सं० सहाध्यायिन् ] पु० एकाच गुरूपाशीं शिकणारे विद्यार्थी

प्रत्येक. **सहायन न०** सांनिध्य; सहवास. **सहोक्ति स्त्री० ( साहित्य )** जेव्हां एकाद्या वस्तूसंबंधानें कांहीं विधान केलेलें असतें आणि त्याच विधानांत त्याच वस्तूशीं ' सह ' किं० ' सह ' ह्या अर्थाचा शब्द योजून दुसरी एकादी वस्तु गोंविलेली असते तेव्हां सहोक्ति हा अलंकार होतो; उ० छाया मृगांसह बसे तरुच्या बुडास. ह्या अलंकाराचें विशेष निरूपण, खुलासा, उदाहरणें, इ० आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. **सहोढ, सहोढज पु०** लग्नाच्या वेळीं गरोदर असलेल्या स्त्रीचा पुत्र. **सहोदर पु०** सख्खा भाऊ. **सहकार पु०** १ आंबा. २ रसाळ आंबा. ३ संघटित प्रयत्न; अनेक माणसांनीं एकजुटीनें चालविलेली खटपट. याच्या उलट ' असहकार. ' **टीप,**—अर्थ ३ बद्दल ' सहकारिता ' असाही शब्द आहे. ह्याच्या उलट अर्थाचा शब्द ' असहकारिता. ' **सहकार्य न०** १ अनेकांनीं जूट करून आणि एकोप्यानें आणि भेदभाव विसरून कांहीं कार्य करणें. २ मदत; साहाय्य. **सहकारी [ सं० सहकारिन् ] पु०** मदतनीस; साहाय्यकर्ता. **सहगमन, सहमरण न०** मृत पतीबरोबर त्याच्या पत्नीनें स्वतास जाळून घेणें; सती जाणें. **सहचर पु०** १ सोबती. २ मदतनीस. ३ मित्र. ४ नवरा. ५ सेवक. ६ प्रतिबिंब. **सहचरी स्त्री०** १ पत्नी. २ सखी. **सहचार पु० ( न्याय )** सामानाधिकरण्य. **सहज वि०** १ स्वाभाविक २ जन्मसिद्ध. **पु०** १ सख्खा भाऊ. २ जातिस्वभाव. **सहधर्मचारी, सहधर्मी [ सं०** सहधर्मचारिन्, सहधर्मिन् **] पु०** पति. **सहधर्मचारिणी, सहधर्मिणी स्त्री०** पत्नी. **सहपांशुकिल, सहपांशुलिक, सहपांशुनिक पु०** आपणाबरोबर धुळींत खेळलेला म्ह० लंगोटीयार. **सहभोजन न०** एकत्र भोजन. **सहपान न०** एकत्र पान. **सहवर्तमान वि०** जवळ किं० शेजारीं असलेला किं० राहाणारा. **क्रि० वि०** बरोबर; उ० तो पुत्रासहवर्तमान पुण्यास आला. **सहवास पु०** १ परिचय; सांनिध्यास राहाणें. २ एकत्र राहाणें. **सहवासी पु०** परिचित; दुसऱ्याच्या बरोबर स्थलविशेषीं राहाणारा; शेजारी. **सहवासाखालीं पडणें** (कांहीं काम) परिपाठाचें होणें; सोयीनें किं० अल्प कष्टानें होऊं लागणें; अंगवळणीं पडणें. **सहज** ' ज ' चा उच्चार दंततालव्य खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

**सहज [ सं०** सह+जन् **] वि०** पैशावांचून किं० कष्टावांचून होणारें किं० साधणारें; उ० काशीस जाणें कांहीं सहज नाहीं. **क्रि० वि०** १ श्रमाशिवाय; कांहीं त्रास न होतां; अल्प अवधींत; उ० दहा लाडू मी सहज खाईन. २ विशेषसें कांहीं कारण नसतां; उ० मी इकडे सहज आलों. ॐ **सहजगत्या, सहजगतीनें, सहजरीत्या, सहजांत, सहजासहजीं क्रि० वि०** १ अल्प श्रमानें; फारसा त्रास न होतां. २ विशेषकारण नसतां. **सहजाखालीं क्रि० वि०** १ श्रमावांचून; त्रास न पडतां; सोप्या रीतीनें. २ अंगवळणीं (पडणें); परिपाठांत( येणें ).

**संहत [ सं० ] वि०** १ एकवटलेलें. २ जोडलेलें; बांधलेलें. ३ एकमत किं० एकजूट झालेला. ४ घट्ट; दृढ; आटोपशीर. ॐ **संहतजानु, संहतजानुक वि०** चालतांना ज्याचे गुडघे एकमेकांवर आपटतात असा.

**संहति [ सं० ] स्त्री०** १ निकटसंबंध. २ ऐक्य. ३ घट्टपणा. ४ जूट; एका कार्यासाठीं जुळलेली मंडळी. ५ समूह.

**सहदेव [ सं० ] पु०** १ पांच पांडवांपैकीं एक. २ एक शूद्र ज्योतिषी. ॐ **सहदेवमत न०** सहदेव ह्या शूद्र ज्योतिष्यानें शेतकरी लोकांच्या उपयोगासाठीं केलेले आडाखे समुच्चयानें. सहदेवाची बायको ' भाडळी ' हिनेंही असेच अनेक आडाखे केले आहेत.

**सहन [ सं० ] न०** १ सोसणें. २ क्षमिणें. **वि०** १ सोसणारा. २ क्षमाशील. ॐ **सहनशील वि०** सोसण्याच्या स्वभावाचा; अपमान, त्रास, कष्ट, इ० न चरफडतां सोसणारा. **सहनशक्ति स्त्री०** कष्ट करण्याची किं० अपमान सोसण्याची किं० भार वाहण्याची कोणेकाची ताकद.

**संहरण [ सं० ] न०** १ गोळा करणें; एकत्रित करणें. २ नियमन; नियंत्रण. ३ अस्त्र परत घेणें. ४ विध्वंस. ५ अपहार; लुबाडणें; लुटणें.

**संहर्ष पु०, संहर्षण न० [ सं० ]** १ आनंद. २ स्पर्धा.

**सहल [ अ० सैर् ] स्त्री०** १ घराच्या बाहेर मोकळ्या हवेंत केलेला फेरफटका ( करणें ).

२ घोड्याला मोकळ्या हवेंत हिंडविणें.ॐ सहल-शिकार स्त्री० १ सैरशिकार. २ मर्दानी खेळ.

**सहल** [ सहल् ] वि० सोपें; सहज होण्याजोगें; सुकर. क्रि० वि० सोयीनें; श्रम किं० कष्ट न पडतां.

**सहवर्तमान, सहवास, सहवासी** मागें ' सह ' मध्यें पहा.

**सहवासणें** [ म० सहवास ] स० क्रि० १ ( कोणी मनुष्य, पशु, इ० शीं ) सहवास किं० परिचय किं० घरोबा करणें ( तो कसा आहे, कोणच्या गुणांचा आहे, कोणच्या स्वभावाचा आहे, इ० जाणतां येईल अशा प्रकारें ). २(स्थळविशेषीं ) वास्तव्य करणें, ( त्यांतील सोयी, गैरसोयी, इ० समजतील अशा रीतीनें ).

**सहसा** [ सं० ] क्रि० वि० १ जबरीनें. २ अविचारानें. ३ ( **मराठींत** ) एकाएकीं; बहुतकरून; परिपाठाच्या सरणीनें; कारणावांचून. ह्या सर्व अर्थी अकरणरूपी प्रयोग होतो; उ० तो सहसा साप मारावयाला पुढें सरसावत नाहीं; उ० मी सहसा कोणाच्या घरीं जात नाहीं; तो सहसा खोटें बोलत नाहीं.

**सहस्र** [ सं० ] वि० हजार. ॐ **सहस्रांशु, सहस्रकर, सहस्रकिरण** पु० सूर्य. **सहस्राक्ष** पु० इंद्र. **सहस्रपत्र** न० कमळ. **सहस्रबाहु, सहस्रभुज** पु० १कार्तवीर्य. २बाणासुर. **सहस्ररश्मि** पु० सूर्य. **सहस्रघृत** न० ( **वैद्यक** ) हजार वेळां धुतलेलें तूप. **सहस्रनाम** न० ए० व० विष्णु, शिव, इ० देवांचीं हजार नांवें समुच्चयानें किं० त्यांचा पाठ. **तुळशींचें, बिल्वपत्रांचें,** किं० **फुलें, इ० चें सहस्रनाम वाहाणें** त्या त्या देवाचें एक एक नांव घेऊन तुळस, बेल, इ० चीं पानें किं० फुलें त्यांना पूजेंत वाहणें. **सहस्रभोजन** न० हजार ब्राह्मणांस पुण्यार्जनार्थ जेवूं घालणें. **सहस्रशः** क्रि० वि० हजारों; हजारोंनीं.

**सहा** [सं० षष्] वि०तीन ह्या संख्येच्या दुपटी इतका.ॐ **सहा महिन्यांची जांभई** स्त्री० आळसानें, चुकारतट्टूपणानें, किं० रेंगाळत काम करणारा जो सुतार,सोनार,इ०कारागीर त्याचें काम किं०त्यानें काम पुरतें करण्याला लाविलेला उशीर; उ० ह्या विठ्ठलशेट सोनाराकडे कांहीं दागिना करावयाला दिला कीं सहा महिन्यांची जांभई.

**सहाकार, सहाकारी** मागें ' सह ' मध्यें ' सहकार ' अर्थ ३ आणि ' सहकारी ' पहा.

**सहाण** [ सं० शाण ] स्त्री० १ चंदन, रवा, इ० गंधासाठीं किं० सुंठ इ० औषधासाठीं उगाळतात ज्यावर असा कुरुंद इ०चा सपाट धोंडा. २ हिरा इ० रत्नें पैलू पाडण्यासाठीं ज्यावर घासतात तो धोंडा. ३ शस्त्रांस धार लावण्यासाठीं योजतात जो धोंडा तो.

**सहाध्यायी** मागें ' सह ' मध्यें पहा.

**सहानक, सहानकी** पुढें 'सानक,' 'सानकी' पहा.

**सहाय** [ सं० ] पु० १ बरोबर जाणारा किं० असणारा. २ जोडीदार. ३ मित्र. ४ साहाय्य करणारा. ५ सेवक. ॐ **सहायक** पु० मदतगार. **सहायता** स्त्री० १मदत. २ मित्र, जोडीदार, इ० चा समुदाय. **साहाय्य** न० मदत.

**संहार** [ सं० ] पु० १ गोळा करणें; जुळविणें. २ संचय. ३ संक्षेप. ४ अस्त्र परत घेणें. ५ विध्वंस; नाश. ६ प्रळय; जगाचा नाश.

**संहारक** [ सं० ] वि० नाश किं० विध्वंस करणारा.

**संहारण** [ सं० ] न० नाश; विध्वंस.

**संहारणें** [ सं० सम्+हृ ] स० क्रि० १ नष्ट किं० विध्वंस्त करणें. २ आवरणें. ३ परत घेणें. ४ संक्षिप्त करणें.

**सहासष्ट** [ म० सहा+साठ ] वि० साठांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**संहित** [ सं० ] वि० १ गोळा केलेलें; एकत्र जुळलेलें. २ जवळ आलेला किं० ठेविलेला. ३ धनुष्यावर ठेविलेला किं० जोडलेला ( बाण ). ४ युक्त; सहित. ५ नेमलेला; योजिलेला.

**सहित** [ सं० ] वि० १ युक्त. २ बरोबर असलेला. ३ सहवर्तमान असलेला. श० यो० अ० ४ ( **मराठींत** ) सह; उ० मी आपल्या चारी भावांसहित काशीयात्रेस जाणार आहें.

**संहिता**[सं०] स्त्री० १ संयोग. २ (**व्याकरण**) वर्णसंयोग. ३ मंत्रात्मक जो वेदाचा भाग तो.

इतर भाग ' ब्राह्मणें, ' 'उपनिषदा,' इ०. ४ मन्वादिप्रणीत धर्मशास्त्र.

**सहिलावणें, सहलावणें** [ म० सईल, सहील ] स० क्रि० सईल किं० ढिलें करणें; पोकळ करणें.

**सहिष्णु** [ सं० ] वि० १ सहनशील; सोशिक. २ क्षमाशील. ॐ **सहिष्णुता** स्त्री० १ सहन करण्याची ताकद. २ क्षमा. ३ क्षमा करण्याकडे प्रवृत्ति.

**सही, सहीसाक्ष, सहीसूद** मागें 'सई,सही' मध्यें पहा.

**सहील, सैल** वि० १ पोकळ ( अंगरखा, बंडी, चोळी, इ० ). २ दृढ नियंत्रणेंत नसलेला ( माणूस, पशु ). ३ फारसें घट्ट बांधलेलें नाहीं असें (गांठोडें इ० ). [ओरडणें.

**सहूति** [ सं० ] स्त्री० पुष्कळांनीं एकदम

**सहृत** [ सं० ] वि० १ संकुचित. २ आवरलेलें. ३परत घेतलेलें. [३ विध्वंस.

**संहृति** [ सं० ] स्त्री० १ संक्षेप. २ नियंत्रणा.

**सहृदय** [ सं० ] वि० १ मार्मिक; दर्दी; काव्यादिरचनेचा अंतर्मुख होऊन आस्वाद घेण्याची ताकद ज्याला आहे असा. २ सौम्य दृष्टीनें किं० दयार्द्र अंतःकरणानें अनाथ किं० गरीब माणसांकडे पाहाणारा; कनवाळू. ३ चांगल्या मनाचा; प्रेमळ. ४ विद्वान्.

**सहेली** [ अ० सैर् ] स्त्री० १ व्यायामासाठीं किं० आरामासाठीं फिरणें किं० रपेट करणें. २ मैत्रीण; स्त्रीसहचरी. ३ फकीर लोक गळ्यांत घालतात ती माळ.

**सहोक्ति** मागें ' सह ' मध्यें पहा.

**सहोढ, सहोदर** मागें ' सह ' मध्यें पहा.

**सह्य** [ सं० ] वि० १ सोसण्याजोगें. २ लायक. पु० एक पर्वत,—ज्याला 'सह्याद्रि' म्हणतात. हा हिंदुस्तानांतील सात मोठ्या पर्वतांपैकीं एक आहे. ह्या पर्वतांना ' कुलपर्वत ' म्हणतात. त्यांचीं नांवें ' कुल ' मध्यें पहा.

**सळ** [ म० सल ] पु० १ तरवारीचें म्यान कंबरपट्ट्याला बांधावयाचा पट्टा किं० बंध. २ वस्त्र, कागद, इ० ची घडी घातल्यानें पडते ती दुमडीची रेषा. [ तेंत ).

**सळ** [ सं० छळ ] पु० छळ; गांजणूक ( कवि-

**सळई** [ सं० शलाका; हिं० सलाई ] स्त्री० १ बांबू, धातूची तार, लाकूड, इ० ची लांब आणि बारीक काडी. २ मुसळाचा दांडा ( विडी बसविण्याच्या पूर्वीचा ). ३ जनानी मुगट्यावर ज्या उभ्या रेषा असतात त्या प्रत्येक. ४ सर्पणाच्या मणांची किं० गवताच्या पेंढ्यांच्या शेकड्यांची मोजदाद करणें असतां दर शेकड्यास किं० दर मणास जी एक एक लाकडाची अथवा एक पेंढीची खूण बाजूस काढून ठेवतात ती.

**सळक** स्त्री० पावसाची सर. ॐ **सळकधार पाऊस** पु० एकामागून एक अशा येणाऱ्या सरींच्या रूपाचा पाऊस.

**सळकणें** अ० क्रि० दुलक्दिशीं, आवाज न करतां निसटणें, निघून जाणें, बाहेर पडणें, किं० पळून जाणें.

**सळका** पु० हिरड्या शिवशिवत असतां उठतात त्या वेदना प्रत्येक.

**सळणें**[सं० छल्]स० क्रि० १ गांजणें; सतावणें; उपद्रविणें(कवितेंत ). २ पाणी कढत होऊन त्याला बुडबुडे येऊं लागणें. ह्या अर्थीं 'सळसळणें' अधिक रूढ आहे.

**सळनळीत, सळनळ** वि० सरळ आणि ताठ. ॐ **सळनळीत उभा** पु० अगदीं नम्र स्थितींत ताठ उभा राहिलेला ( माणूस ).

**सळंप, सळप** न०, स्त्री० लाकडाची लांबलचक धलपी.

**सळमिसळ** [ म० मिसळणें ] स्त्री० मिश्रण.

**सळय, सळयी** स्त्री० मागें ' सळई ' पहा.

**सळसळणें, सळाळणें** अ० क्रि० १ ( आधणाचें पाणी इ० नीं ) सळसळ असा आवाज करणें. २ वेदनेच्या लहरींनीं( गळूं, जखम, फोड, इ०) जर्जर होणें. ३ ( खावयाला तोंड, मारावयाला हात, चालावयाला पाय, इ० ) अति उत्कंठित झालेलें असणें.

**सळा** पु० मागें ' सळई ' पहा.

**सळाथी** [ म० सड ] स्त्री० केरसुणी.

**सळाळणें** मागें ' सळसळणें ' पहा.

**सळी** स्त्री० मागें ' सळई ' पहा.

**संक्षय** [ सं० ] पु० १ नाश; विध्वंस. २ जगाचा अंत; प्रळय. ३ मृत्यु.

**संक्षिप्त** [ **सं०** ] **वि०** १ कमी केलेलें. २ थोडक्यांत केलेलें (विवरण इ०). ३सारांशरूपांत असलेलें;थोडकें.

**संक्षेप** [ **सं०** ] **पु०** १ थोडक्यांत आणणें; छाटाछाट. २ सारांश. ३ अपहार. ४ संहार. ५ (**गणित**) अंश आणि छेद यांच्यांतून समान गुणक काढून टाकणें ही क्रिया ( देणें, जाणें ); उ० २४/३६ या अपूर्णांकाला १२ चा संक्षेप दिला असतां २/३ हें रूप होतें. ६ गाळणें; अजीबात सोडून देणें; टाळणें; उ० आज मला कचेरींत लवकर जावयाचें होतें म्हणून जेवणांत मी भाकरीला संक्षेप दिला ( म्ह० भाकरी मुळींच खाल्ली नाहीं ). ꣸ **संक्षेपतः क्रि० वि०** संक्षिप्त रूपांत; सारांशानें; थोडक्यांत.

**संज्ञा** [ **सं०** ] **स्त्री०** १ शुद्धि; चेतना;चैतन्य. २ ज्ञान. ३ बुद्धि. ४ बेशुद्ध स्थितींतून पुन्हा देहभानावर येणें.५हात, डोळा,इ० नीं कोणेकाला केलेली इशारत किंं० खूण. ६ संकेत; सांकेतिक भाषा. ६ नांव; पदवी. ७ ( **व्याकरण** ) विशेषनाम. ८ पारिभाषिक नांव किं० शब्द. ९ गायत्रीमंत्र. १० विश्वकर्म्याची कन्या,–सूर्याची पत्नी. हिला यम, यमुना, वैवस्वत, आणि अश्विनी कुमार, अशीं अपत्यें होतीं. ꣸ **संज्ञावान् वि०** सचेतन; चैतन्ययुक्त; मूर्च्छेतून उठलेला. **संज्ञी** [ **सं०** संज्ञिन् ] **वि०** ज्याला संज्ञा देण्यांत आली आहे असा ( कोणताही पदार्थ ).

**संज्ञान** [ **सं०** ] **न०** १ चैतन्य. २ बेशुद्ध स्थितींतून शुद्धीवर येणें.

**संज्ञापन** [ **सं०** ] **न०** १ शिकविणें. २ कळविणें.

**संज्ञु** [ **सं०** ] **वि०** १ फेंगडा. २ चालतांना ज्याचे गुडघे एकमेकांवर आपटतात असा.

**सा** [ **म०** सहा ] **वि०** सहा ( कवितेंत ).

**सा** [ **म०** असा ] **वि०** असा; उ० मोठासा; उ० पाऊस येईलसा रंग दिसतो.

**साइला पु०** १ जंगली जनावर. २ देवास बळी द्यावयाचा जंगली प्राणी,–शिकारींत मारून आणलेला.

**साई, साय स्त्री०** १ दूध तापविलें असतां त्याचेवर जो स्निग्ध अंशाचा थर जमतो तो. २ कोणत्याही पदार्थावर जमतो तो तवंग किं० थर. ३ छाया ( कवितेंत ).

**साई** [ **सं०** स्वामिन् ] **पु०** गोसावी; बोवा.

**साईर** [ **सं०** स्वैर ] **स्त्री०** १ मुंग्या, मुंगळे, इ० चीं चालती रांग. २ पक्ष्यांची उडती पंक्ति ३ वानर, डुकर, इ० ची चालती रांग. ४ समुदाय; थवा ( सामान्यतः ).

**साईर,सायर** [**अ०**] **न०**१ सामान, व्यापारी माल,इ०वरची जकात.२ही जकात घेण्याचें ठिकाण किं० चौकी किं० नाकें. ꣸ **साईर बाब, सायर बाब स्त्री०** सामानसुमान, व्यापारी माल, इ० वरच्या जकातीचें खातें किं० ह्या जकातीसंबंधाचा वसूल.

**साईल पु०** वर ' साइला ' पहा.

**साउली, सावली** [**सं०**छाया] **स्त्री०** १ प्रकाशाला प्रतिबंध करणाऱ्या पदार्थांची जमीन,भिंत, इ० वर उमटते ती आकृति. २ पाणी, आरसा, इ० वर पदार्थांचें पडतें तें प्रतिबिंब.

**सांउळा,सांवळा**[**सं०** शामल] **वि०** काळसर; किंचित् काळा. ꣸ **काळासांवळा वि०** काळसर वर्णाचा; फारसा गोरा किं० पांढरा नव्हे तो.

**साऊ, साव पु०** १ सावकार. २ पेढीवाला.

**साऊळ स्त्री०, न०** नारळ, पोफळ, इ० झाडांची फांदी. अशी फांदी विणली असतां तिला ' कडण ' म्हणतात. मागें ' झावळी ' ' कडण, कडणें ' पहा.

**साक स्त्री०** खोलगट केलेला तळहात ( पाणी पिणें, पदार्थ घेणें, इ० साठीं ).

**साक** [ **सं०** साक्ष ] **स्त्री०** १ येणारीं जाणारीं माणसें, जनावरें, चोर, इ० वर ठेविलेली पाळथ किं० नजर ( बसविणें, ठेवणें, राखणें ). २ पाळथ किं० नजर ठेवणारीं माणसें किं०त्यांची सांखळी.

**साक, साख** [ **सं०**साक्ष्य ] **स्त्री०** व्यापारांत कोणेकाची सचोटी किं० पत. ꣸ **साक (–ख–) सुरत** [ **म०** साख+सुरत ( चेहेरा ) ] **क्रि०वि०** राजरोस; उघडपणानें;सर्वांच्या समक्ष. **साकपाक स्त्री०** पत; सचोटी.

**सांकटण (–णें ) न०** पदार्थांचा हत्यारानें तुकडा तोडतांना पदार्थाखालीं ठेवितात तो ठोकळा.

**सांकटणें** स० क्रि० १ ( पदार्थांचे ) हत्यारानें तुकडे पाडणें. २ ( सैन्यांतील शिपायांची ) कत्तल उडविणें.

**सांकड, सांकडा** [ सं० संकट ] वि० १आकुंचित;अडचणीचें;अघळपघळ किंवा प्रशस्त नव्हे असें. २ तंग किंवा घट्ट, बसणारा ( कपडा ).

**सांकड, सांकडें** [ सं० संकट ] न० संकट; दु:ख; अडचण.

**साकडा** पु० खटारा गाडीची तबकडी,-कठडा असलेली किंवा नसलेली.

**सांकण** न०, स्त्री० खटारा गाडीचा आंख आणि जूं यांना जोडून बांधणारी दोरी.

**सांकणें, सांखणें** अ० क्रि० रक्त, दूध, इ० गोठणें किंवा घट्ट होणें.

**साकर** [ सं० शर्करा ] स्त्री० उसाचा रस, इ० पासून जो गोड पदार्थ तयार करतात तो. 'साकर' पूर्वपदीं येऊन जे संयुक्त शब्द होतात ते पुढें 'साखर'शब्दांत पहा.

**सांकर** पु० १ पाणी वहावयाच्या पाटांत सांचलेली माती, गाळ, कचरा, इ० चा समुच्चय. २ गातांना, बोलतांना, किंवा घोकतांना उच्चार साफ न होऊं देणारा जो घशांत कफरूप मळ सांचतो तो.

**सांकल्पिक** [सं०] वि० संकल्प किंवा निश्चय करून जें ठरविलें किंवा पथकरलें तें ( व्रत इ० ).

**साकल्य** [ सं० ] न० समग्रता; पूर्णता.

**सांकव, सांकू** [ हिं० सांखव् ] पु० ओढ्यावर केलेला तात्पुरता पूल.

**सांकविणें** [ म० ' सांकणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० दूध, दहीं, पाणी, इ० गोठविणें किंवा घट्ट करणें किंवा थिजविणें.

**सांकशी** स्त्री० गवत, वेत, बांबूच्या काड्या, इ० ची बनविलेली लहानशी पेटी.

**साकसुरत** मागें ' साक, साख ' मध्यें पहा.

**सांकळ, सांखळ** [ सं० शृंखला ] स्त्री० १ सांखळी. २ ( दांतांची ) पंक्ति किंवा ओळ. ॐ **सांकळरीति** स्त्री० एक गणितकृत्य; किमतीनें सारख्या अशा अनेक परिमाणांच्या जोड्यांत कांहीं विशिष्ट सरणीनें समीकरणें बसवून दिलेल्या परिमाणाची किंमत काढण्याची रीति. **सांकळकर** पु० भिक्षेकऱ्यांचा एक पंथ किंवा त्या पंथाचा कोणीही भिक्षेकरी. हे भिक्षेकरी लोकांकडून पैसे उकळण्यासाठीं स्वतास सांकळीनें बडवून घेतात. **सांकळदंड, सांखळदंड** पु०लांबलचक सांखळी; जाड सांखळी.

**सांकळणें, सांखळणें** [ म० सांकळी ] स० क्रि० १ सांखळीनें बांधणें. २ नियंत्रिणें; आवरणें; आडविणें.

**सांकळणें** अ० क्रि० १(दूध, पाणी, रक्त,इ०) गोठणें किंवा घट्ट होणें. २ ( कोठा ) बद्ध होणें,-ज्यामुळें शौचास साफ होत नाहीं.३(तूप, साखरेचा पाक, इ० ) नीं कण्यांचें किंवा कणांचें रूप पावणें.

**सांकळा, साकळा** पु० १ रक्त, दूध, पू, इ० ची गोठलेपणाची स्थिति. २ गोठलेलें रक्त, दूध, इ०.

**सांकळी, सांखळी** [ सं० शृंखला ] स्त्री० धातूच्या तारेचे तुकडे कांहीं विशिष्ट प्रकारें वळवून एकांत एक अडकवून जी लांबलचक दोरीसारखी रचना करतात ती.

**साकळी** स्त्री० गाय इ० च्या गळ्याखालीं लोंबत असते ती पोळी; साखा.

**सांकळी, साकळी** स्त्री० पावसाळ्यांत नदीचें पाणी आसपासच्या नाल्यांत किंवा ओढ्यांत जोरानें भरतें तें ( भरणें, फुटणें, पडणें ).

**साका, सांका** पु० १ दागिन्यांना डाग लावावयासाठीं तांबें आणि सोनें यांचें करतात तें मिश्रण. २ दागिन्यांतील सोनें चोरून सोनारानें त्याच्या भारंभार घातलेला हीण धातु. ३ नदी, नाला, इ० च्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला आणि कांठावर जमलेला गाळ, गवत, पानें, इ० समुच्चयानें.४ गाळ (सामान्यत:).

**सांकाटा** पु० घर, होडी,पडवी, मांडव, इ० ची मुख्य रचना किंवा उभारणी.

**साकार** [ सं० स ( सह )+आकार ] वि० ज्याला आकार किंवा विशिष्ट आकार आहे किंवा देहधारी आला आहे असा ( ईश्वर इ० ).

**साकांक्ष** [ सं० ] वि० १ इच्छाशील. २ उत्सुक. ३ संशयित. ४ श्रद्धाळू.

**साकी, साख, साखी** स्त्री० व्यापारांत

कोणेकाची जी पत ती; प्रामाणिकपणा; सचोटी.
**साकीबाकी** स्त्री० ह्याच अर्थी.

**साकी** स्त्री० एक प्राकृत वृत्तविशेष, हें वृत्त आर्येप्रमाणें मात्रांच्या गणतीनें रचलेलें असतें.

**सांकुळणें** मागें ' सांकळणें ' पहा.

**सांक्रू** मागें ' सांकव, सांक्रू ' पहा.

**सांकूळ** न० पाटाच्या पाण्याच्या प्रवाहाला प्रतिबंध करणारा गाळ, कचरा, इ०.

**साकें, सांकें** न० दागिन्याला डाग -लावण्यासाठीं सोनार करतात तें मिश्रण. मागें 'साका, सांका ' पहा.

**सांकेणें** अ०क्रि०(दूध, रक्त, इ०) गोठणें किं० घट्ट होणें. मागें ' सांकणें, सांखणें ' पहा.

**सांकेतिक** [ सं० ] वि० १ खुणेचें. २ संकेत करून ठरविलेलें ( स्थल, शब्द, इ० ).

**सांकेरा, सांकोरा** पु० मागें ' सांकर ' पहा.

**सांक्रामिक** [ सं० ] वि० संसर्गानें किं० स्पर्शानें उत्पन्न होणारा किं० पसरणारा ( रोग, विटाळ, इ० ).

**साख** [ सं० साक्ष्य=पुरावा ] स्त्री० व्यापारांत कोणेकाची पत; प्रामाणिकपणा. ꙳ **साखबाज** वि० पतीचा ( माणूस ); प्रामाणिकपणाचा ( व्यवहार ).

**साखणें** अ० क्रि० गोठणें. मागें ' सांकणें ' [ पहा.

**साखर** [सं० शर्करा; फा० षक्र्] स्त्री० १ उसाचा रस इ० पासून जो एक गोड पदार्थ तयार करतात तो. २ लघवीच्या बरोबर जो पांढरा पदार्थ बाहेर पडतो,—ज्याला मुंग्या येतात तो. ꙳ **साखर पसरणें ( किं० पेरणें )** गोड गोड बोलून एकाद्याचें मन वश किं० अनुकूल करून घेणें. **साखरेचा खाणार त्याला देव देणार** ज्याच्या नशीबीं साखर खाणें आहे ( म्ह० सुख भोगणें आहे ) त्याला साखर ( म्ह० सुखोपभोगाचीं साधनें ) देवच पुरवितो; भाग्यवंताला कशाचीही उणीव पडत नाहीं. **साखरेची सुरी** स्त्री० आपला दुष्ट हेतु प्रकट न होऊं देतां गोड गोड भाषण करून दुसऱ्याचा नाश करणारा माणूस किं० त्याचें गोड गोड भाषण किं० त्यानें रचिलेलें कारस्थान. **हातावर साखर आणि मानेवर कातर** प्रेमाच्या पांघरुणाखालीं दुसऱ्याचा सत्यानाश करणें किं० त्याला लुटणें. **साखरेची साल काढणें** कोणेकाचा सरळ आणि साखीचा जो व्यवहार त्यांत कांहीं दुष्ट हेतु आहे किं० कपट आहे असें गृहीत धरून त्याच्या व्यवहारावर कुत्सितपणानें टीका करणें. **कोणेकाचें तोंड साखरेनें भरणें किं० त्याचें तोंड भरून साखर घालणें** त्यानें कांहीं चांगली गोष्ट केली किं० चांगली बातमी सांगितली म्हणून त्याला बक्षिसादाखल साखर खावयास देणें. **साखरकिडा** पु० साखर खाऊनच राहाणारा एक कल्पित कीट किं० किडा. **साखरगोटी** स्त्री० आकारानें लहान पण अतिगोड आंबा. **साखरजांब, साखरजांभ** पु० आंतून आणि बाहेरून तांबूस असा जांब म्ह० पेरू. **साखरझोप** स्त्री० पहाटेस लागलेली झोंप. **साखर नातें** न० १ प्रेमळपणाचें नातें; प्रेमाचा संबंध. २ बायकोच्या माहेराकडून झालेला जो संबंध तो ( निंदेंत ). मागें ' सक्कर नातें ' पहा. **साखर निंबू (–लिंबू )** न० गोड लिंबाची एक जात. **साखरनिंबी (-लिंबी )** स्त्री० वरील फळ ज्या झाडावर येतें तें झाड. **साखरपाणी** न० १ लिंबाचा रस, साखर, इ० द्रव्यें घालून करतात तें पेय. २ अल्प उपहार ( सामान्यतः ). **साखरपारा**( फा० षक्र् पाराह् ) पु० सपीटांत तूप आणि साखर घालून मंद अग्नीवर भाजून करतात तें खाद्य. **साखरपुडा** पु० वधूवरांचें लग्न ठरलें म्हणजे त्या भावी वधूच्या हातांत जो साखर, पेढे, इ० चा पुडा देतात तो किं० असा पुडा देण्याचा विधि. **साखरपेंढ्यांचा खेळ** पु० भाद्रपद आणि आश्विन महिन्यांत शेतकऱ्यांचीं मुलें गव्ताच्या पेंढ्या इ० नीं खेळ खेळतात तो. **साखरफुटाणा** पु० साखरेच्या पाकानें मढविलेला फुटाणा किं० वेलदोड्याचा दाणा. **साखरफेणी** स्त्री० साखरेच्या पाकाचा बत्तासा,—जो आकारानें मोठा आणि आंत बऱ्याच भागीं पोकळ असून फारी हलका असतो. **साखरबोंड** न० कणीक इ० पिठांत साखर मिश्र करून त्यांचे तळून काढलेले गोटे. **साखरभात** पु० साखर, केशर, वेलदोड्यांचें चूर्ण, बेदाणा, इ० द्रव्यें आंत घालून केलेला भात,—एक पक्कान्न. **साखररंगी** वि०

गुळीसाखरेच्या रंगाचें ( वस्त्र, कागद, इ० ). **साखरलाडू** पु० डाळीच्या पिठांत साखर घालून केलेला लाडू,–एक पक्वान्न. **साखरवळी** स्त्री० एक साखरेचें पक्वान्न. **साखरी गोडांबी** स्त्री० साखरेच्या पाकानें मढविलेली काजूबी.

**साखसुरत** [ फा० षाख् सूरत् ] वि० १ गोंडस; बांधेसूद; प्रमाणशुद्ध (माणूस, पशु, पदार्थ). २ नीटनेटका, यथास्थित, असावा तसा (पोशाख, लेख, भाषण, इ० ). क्रि० वि० उघडपणें, उजळमाथ्यानें, स्पष्टपणें, सर्वांच्या समक्ष, राजरोस. मागें ' साकसुरत ' पहा.

**सांखळ, साखळ, दांतांची सांखळ, साखळकर,** इ० मागें ' सांकळ, ' ' साकळ ' इ० पहा. [ पहा.

**साखी** स्त्री० व्यापारांत पत. मागें ' साख '

**साखेय** [ सं० ] वि० मित्रासंबंधाचें; मित्रत्वाचें; प्रेमळपणाचें.

**साख्य** [ सं० ] न० मैत्री; दोस्ती.

**सांख्य** [ सं० ] वि० १ संख्येसंबंधाचें. २ तर्कांत प्रवीण. ३ ज्ञानवान्. पु० सांख्य शास्त्र जाणणारा. न० सर्व जग परमाणूंपासून झालें आहे असें मत. ह्या मताप्रमाणें पंचवीस तत्त्वें आहेत.

**साग** [ हिं० ] पु० इमारत कामाच्या उपयोगाचा एक वृक्ष. ह्याला सागवान, साय, अशींही नांवें आहेत.

**सांग** [ हिं० ] स्त्री० लोखंडी मुठीचा भाला.

**सांग** [ सं० ] वि० सर्व अंगांसहित; पूर्ण. ※ **सांगोपांग** वि० अंगें आणि उपांगें ह्यांसहित; तपशीलवार; सर्वांगांनीं पूर्ण. **सांग संपूर्ण** वि० सर्व अंगांनीं आणि उपांगांनीं पूर्ण किं० समाप्त झालेला ( विधि, उद्देश, ध्येय, विवेचन, इ० ).

**सांग** [ म० सांगणें ] पु० सांगण्याची क्रिया; ताकीद; हुकूम ( सांगणें ); (अशिक्षितांत रूढि).

**सांगकाम्या** [ म० सांगणें+काम ] वि० सांगावें तितकेंच काम करणारा,–स्वताच्या बुद्धीनें काम योजून ज्याला करतां येत नाहीं असा.

**सांगट्या** वि० ज्याच्या हाताला किं० पायाला सहा बोटें आहेत असा.

**सांगड** [ सं० संघट्ट ] पु०, स्त्री० १ एकत्र संबद्ध असे दोन पशु, दोन माणसें, दोन होड्या, दोन भोपळे, इ० ची जोडी. २ कातान्याची चौकट,–जिच्यांत सळयांवर कातावयाचें लाकूड धनुकलीनें फिरविण्यांत येतें. ※ **सांगड घालणें** १ संबंध जोडून देणें; उ० रामा आणि विनायक ह्यांची सांगड घालून द्या म्हणजे ते एकमेकांना अभ्यासांत मदत करतील. २ दोन गोष्टींची किं० विधानांची एकवाक्यता; दोन गोष्टी किं० विधानें ह्यांच्यांतील भासमान विरोधाचा परिहार. **सांगडीस धरणें** कोणेकाला कांहीं कामांत दुसऱ्या माणसाचा जोडीदार करणें. **सांगडबाहुली** स्त्री० मुलींची खेळण्याची कळसूत्री बाहुली.

**सांगडणें** [ म० सांगड ] स० क्रि० (कोणी माणूस, पशु, फळ, होडी, इ० ना ) दुसरा माणूस, पशु, फळ, होडी, इ० शीं कांहीं कामीं जोडणें किं० संबद्ध करणें.

**सांगणें** [ म० सांगणें ] स्त्री० १ ताकीद; बोध; कोणेकाला म्हणणें, पाठ करणें, कांहीं कृति करणें, इ० बाबतींत घालून दिलेली शिस्त. २ पुराण, कथेंत निरूपण, इ० मध्यें हरिदास, पुराणिक, इ० ची विषयाच्या प्रतिपादनाची जी हातोटी, शैली, किं० सरणी ती. ※ **सांगणीची मुलगी** स्त्री० कांहीं द्रव्य न घेतां वराला मुलीच्या बापानें किं० पालकानें देऊं केलेली मुलगी. अशा प्रकारचें जे लग्न तें ' सांगणीचें लग्न '

**सांगणें** [ सं० शंस् ] स० क्रि० १ (आपला विचार, मत, हेतु, इ० ) दुसऱ्यास शब्दादि द्वारा कळविणें. २ विद्यार्थ्याला ( वेदादींचा पाठ ) देणें किं० स्पष्टावणें. ३ भाविक लोकांपुढें (पुराणादि ग्रंथांतील भगवल्लीलांचें) निरूपण करणें. ४ ( संकल्प किं० यथोचित मंत्रतंत्र इ० ) उपाध्यायानें यजमानाकडून ऐकविणें आणि तदनुसार कृति करविणें. ५ कोणेकाला ( कांहीं काम ) करावयाला विनंती किं० आज्ञा करणें. ६ कथिणें; निवेदिणें; निरूपिणें; स्पष्टावणें. ७ कोणेकाला जेवावयाचें आमंत्रण करणें; उ० दर द्वादशीला मी एक ब्राह्मण सांगतों. ८ ( कांहीं काम ) कोणेकाच्या माथीं मारणें किं० ( कामाची जबाबदारी ) कोणेकाकडे देणें. अ० क्रि० दृष्टोत्पत्तीस येणें, आढळून येणें, ठरणें, परिणामीं दिसून येणें; उ० हें दुखणें कठिण ( किं० अवघड किं० जड ) सांगतें म्ह० हें दुखणें

टेल असा संभव दिसत नाहीं. ❀ **सांगितल्या कामाचा आणि दिल्या भाकरीचा** यजमान सांगतो तें काम मुकाट्यानें आणि आपली अकल न लढवितां करणें आणि पोटाला देईल ती भाकरी तकरार न करतां खाणें ( अशी नोकराची वर्तनाची सरणी असावी ). **मुलगी सांगून येणें** मुलीच्या बापानें किं० पालकानें आमची मुलगी स्वीकारा अशी मुलास किं० मुलाच्या बापास किं०पालकास विनंती करणें; उ० आमच्या मुलाला पुष्कळ मुली सांगून आल्या पण त्या परगांवच्या होत्या म्हणून आम्ही त्या नाकारल्या.

**सांगता** [ सं० ] स्त्री० १ व्रत, पूजा, वाती लावणें, इ० जीं धर्मकृत्यें त्यांची सर्व अंगांनीं पूर्णता. २ ( **मराठींत** ) ह्या पूर्णतेसाठीं घातलेलें ब्राह्मणभोजन किं० दिलेली दक्षिणा.

**सांगतीं, सांगतें** क्रि० वि० मागें 'संगतीं,' ' संगतें ' पहा.

**सागर** [सं०] पु० १ समुद्र; उ० हिंदी महासागर. २ चार ही संख्या. ३ (**लाक्षणिक**) मोठा साठा किं० संचय; उ० गुणसागर, विद्यासागर, शांतिसागर, इ०. ❀ **सागरांबरा** स्त्री० पृथ्वी. **सागरालय** पु० वरुण. **सागरगोटा** पु० सागरगोटी नांवाच्या झाडाचें फळ. **सागरगोटी** स्त्री० एक कांटेरी वेल.

**सागलाग** [ म० लागणें ] पु० १ उद्देश; हेतु. २ धोरण; ध्येय; नेम; लक्ष्य. ३ इष्ट किं० उद्दिष्ट फळ.

**सागली** [ म० साग ] वि० सागाच्या लाकडाचा; सागासंबंधाचा.

**सागवली** स्त्री० लागवडींत असलेली जमीन.

**सागवान** [ हिं० ] पु० १ एक झाड,-याचें लाकूड इमारती कामें, गलबतें, इ० साठीं योजतात. २ घर बांधणें इ० कामासाठीं गोळा केलेलें खांब, तुळया, इ० रूप सामान. न० सागांच्या झाडांचे जंगल.

**सांगशी** स्त्री० मागें ' सांकशी ' पहा.

**सांगसरभरा** [ म० सांगणें+फा० सरबराह् ( मदत ) ] स्त्री० १ कोणेकाची शिफारस करून, त्याचेबद्दल वशीला घालून, किं० रदबदली करून; किं० अंगें मेहेनत करून त्याला मदत करणें; उ० तुम्ही सर्व जणांनीं माझी सांगसरभरा केली म्हणून माझें गरीबाचें लग्न झालें. २ शिफारस किं० रदबदली करणें. ३ कोणेकाला हरएक प्रकारें केलेली मदत. मागें ' सरभरा ' पहा.

**सांगसुगरण, सांगसुग्रण** [ म० सांगणें +सुगरण; सं० सुगृहिणी ] स्त्री० आपण स्वता कांहींच काम न करतां लोकांना कामें सांगण्यांत किं०असें करावें तसें करावें असा बोध करण्यांत पटाईत स्त्री ( निंदेंत किं० उपहासांत प्रयोग ). ❀ **सांगसुगराई(-सुग्राई)** स्त्री०आपण स्वता कांहीं न करतां दुसऱ्याला सूचना करण्यांत मात्र पटाईतपणा ( उपहासांत प्रयोग ).

**सागळ** [ सं० छागल=बोकड ] स्त्री० बकऱ्याचें कमावलेलें किं० रंगविलेलें कातडें ( जोडा इ० च्या उपयोगाचें ).

**सांगळ्या** [म० सा (सहा)+अंगुळी (बोट )] पु० ज्याच्या हाताला किं० पायाला सहा बोटें आहेत असा माणूस. मागें ' सांगळ्या ' पहा.

**सागा**[सं०छाग]पु०मेंढरें,बकरीं,इ०चा कळप.

**सांगाडा** पु० १ घर, गाडी, पलंग, नाव, छत्री, इ० पदार्थांच्या रचनेंतील जीं मुख्य खांब, तुळया, वांसे, लाकडें, तक्ते, काड्या, इ० अंगें तीं यथायोग्य प्रकारें खिळवून किं० जोडून जी उभारणी होते ती; अशी रचना किं० मुख्य उभारणी झाल्यावर भिंती, तक्तपोशी, वस्त्राच्छादन, इ० यथास्थानीं घातल्यानें तो पदार्थविशेष परिपूर्ण रूपांत येतो; ठोकळ उभारणी; खोका; पिंजरा; सापळा. २ प्राण्याच्या शरीरांतील हाडांची जोडणी,-मांस, चर्म, इ० वगळून. ❀ **हाडांचा सांगाडा** पु०अति किडकिडीत माणूस,-ज्याचीं हाडें मांसानें आच्छादित नाहींत.

**सांगाडी** स्त्री० कातान्याची चौकट,-जीमध्यें दोन खिळ्यांच्या अडकणांत कसणीनें लाकूड इ० फिरविलें जातें.

**सांगाती** [ सं० संगत ] पु० जोडीदार; साथीदार; दोस्त. मागें ' सगती ' पहा.

**सांगातीं, सांगातें** [ सं० संगत ] श० यो० अ० सह; बरोबर. मागें ' संगत, संगति ' मध्यें ' संगतीं, संगतें ' पहा.

**सांगावांगी, सांगासांगी, सांगीवांगी, सांगोवांगी, सांगोसांगी** [ म० सांगणें ] स्त्री०

उडत उडत ऐकिलेली, केवळ एकानें दुसऱ्याला, दुसऱ्यानें तिसऱ्याला सांगितल्यावरून कळलेली, विशेषसा आधार जिला नाहीं अशी गोष्ट, खबर, बातमी, इ०. **टीप,**– या शब्दांचा बहुधा अप्रथमा विभक्तींत प्रयोग होतो; उ० ही गोष्ट सांगोवांगीची नाहीं, मी ती प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली आहे. ❀ **सांगोसांगी आणि वडाला वांगीं** प्रवासी इ० लोकांनीं केलेलीं वर्णनें अत्यन्त मूर्खपणाचीं किं० अतिशयोक्तींनीं भरलेलीं असतात.

**सांगी** [ म० सांगणें] स्त्री० कोणेकाला कांहीं कामीं दिलेली इशारत किं० दाखवून दिलेली सरणी किं० केलेला उपदेश किं० सोडलेला हुकूम; ताकीद; उ० माझ्या सांगीप्रमाणें चाललास तर त्यांत तुझें कल्याण आहे.

**सागुती, सागोती** [ हिं०;सं० छाग ] स्त्री० भक्षणार्थ शिजवून तयार केलेलें बकरा इ०चें मांस.

**सांगुळणें** अ० क्रि० दूध, दही, रक्त, तूप, इ० गोठणें किं० घट्ट होणें; सांकळणें.

**सागू** [ हिं० ] पु० १ ताडाच्या जातीचें एक झाड,–ज्याच्या मगजाच्या पांढऱ्या गोळ्या होतात. २ ह्या झाडाच्या मगजाच्या ज्या गोळ्या होतात त्या प्रत्येक पुण्यास ह्या गोळ्यांना ' साबूदाणे, ' ' साबूचे तांदूळ, ' अशीं नांवें आहेत.

**सांगूळ, सागूळ** स्त्री० फणसाच्या चारखंडावरील जी चार ती.

**सागोती** [हिं०;सं०छाग] स्त्री० बकरा इ० चें शिजविलेलें मांस. वर ' सागुती ' पहा.

**सांगोपांग** [ सं० ] वि० अंगें आणि उपांगें ह्यांसहित ( विवेचन, वर्णन, व्याख्यान, इ० ).

**सांगोवांगी, सांगोसांगी** वर 'सांगावांगी' पहा.

**साग्या, सांग्या** [सं० संग ]पु०(वाईट कृत्यांत) दोस्त; जोडीदार; साथीदार.

**साग्यालाग्या** [म०सागलाग] वि० १ युक्त्या, हिकमती, डावपेच, इ० करण्यांत पटाईत. २ बदमाषपणाचीं कृत्यें करण्यांत पटाईत.

**साग्र** [ सं० स+अग्र ( टोक ) ] वि० १ ज्याचें टोक बारीक किं० निमूळतें आहे असा ( खुंटा, सुई, दाभण, सळई, इ० ). २ समग्र; साद्यंत; पूर्ण; उ० साग्र संगीत शाकुंतल.

**सांग्रामिक** [ सं० ] वि० लष्करी; लढाऊ. पु० सेनापति. न० युद्धाची सामुग्री.

**सांच** [ सं० संचय ] पु० आंत घालावयाचा किं० भरावयाचा पदार्थ राहाण्याला पात्रादींतील जो अवकाश तो; उ० ही होडी फार लहान आहे, हींत इतकीं पोतीं राहावयाजोगा सांच नाहीं.

**साच** [ सं० सत्य ] वि० खरा; प्रामाणिक; यथार्थ; वास्तवीक. **टीप,**–' साच ' ह्या शब्दाचें 'साचा' हें आकारान्त रूप लिंगवचनांप्रमाणें फिरणारें असून कवितेंत ह्याचा उपयोग केला जातो. कित्येक प्रसंगीं तो शब्द पादपूरक ह्या नात्यानें-ही योजला जातो.

**सांचणें** [ सं० सम्+चि ] अ० क्रि० थोडथोड्या प्रमाणांत भरती होऊन किं० भर पडून (पदार्थ विशेष ) पुष्कळ होणें किं० सांठणें; उ० ह्या खळग्यांत पाणी सांचलें आहे, आतां घागर भरून घ्या; उ० धोतर विकत घेण्याइतके पैसे सांचले म्हणजे मी धोतर विकत घेणार आहें.

**सांचल, साचल** स्त्री०, पु० माणूस, पशु, साप, इ० च्या चालण्याचा किं० सरपटण्याचा आवाज ( लागणें, येणें, इ० ); चाहूल; उ० मला चोरांच्या पावलांची सांचल लागतांच मी सोटा घेऊन अंगणांत गेलों.

**सांचवणी** [ म० सांचणें+पाणी] न० सांचलेलें पाणी.

**सांचविणें** [म० ' सांचणें 'चें प्रयोजक] स० क्रि० थोडथोड्या प्रमाणांत भरती घालून पैसा, धान्य, इ० पदार्थांचा संचय किं० साठा वाढविणें किं० मोठा करणें; उ० मी बायकोच्या नथेसाठीं दरमहा पांच पांच रुपये बाजूस काढून तीनशे रुपये सांचविणार आहे.

**सांचा** [ हिं० ] पु० १ अगदीं एकसारखे अनेक पदार्थ, चित्रें, इ० अल्पश्रमानें करावयाचे असतां चिखल इ० द्रव्य ज्या विशेष प्रकारें कोरलेल्या लाकूड इ० मध्यें चेपून भरतात तें लाकूड इ०; ठसा, छाप, नमुना. २ कुंभार ज्या आधारावर मडकें इ० करण्यासाठीं कमावलेली माती ठेवतो तो आधार. ❀ **एका सांच्यांतील** वि० अगदीं सारखीं ( माणसें, चित्रें, भांडीं, इ० ).

**साचार** [ सं० ] वि० १ योग्य आचार किं०

सरणी पाळणारा ( माणूस ). २ योग्य शिस्त पाळून केलेलें कोणतेंही ( कर्म ). **क्रि० वि०** खरोखरीं; निश्चयें करून.

**साचिव्य** [ **सं०** ] **न०** १ प्रधानाचा दर्जा किं० अधिकार; प्रधानाचें काम. २ मैत्री;साहाय्य.

**सांचींव** [ **म०** सांचणें ] **वि०**१ थोडथोडी भर पडून किं० भर घालून जें जमलें किं० सांठलें तें. २ज्यांत वेळोवेळीं भरती होत नाहीं असें (पाणी, संपत्ति, इ० ).

**सांचोल पु०, स्त्री०, सांचोला पु०** चालणें, बोलणें, इ० चा दूरून आलेला म्ह०कानीं पडलेला आवाज; कानोसा; चाहूल ( ऐकणें, भासणें ).

**साज** [ **सं०** सज्ज ] **पु०** १ कांहीं काम करण्यांत जीं नानाविध साधनें, हत्यारें, उपकरणीं, इ० जरूर लागतात तीं समुच्चयानें; साधनसामग्री. २ नर्तकी स्त्रिया, गवई, हरिदास, तमासगीर, इ० चीं कामें चाललीं असतां सारंगी, तबला, इ० संच आवश्यक असतो तो.३ नाटकांतील पात्रें इ० चे पोशाख, दागिने, इ० सरंजाम. ४ मृदंग; पखवाज. ❀ **साजकरी पु०** गवई, वाजंत्री, इ० च्या ताफ्यांतील एक एक व्यक्ति. **साजसरंजाम पु०** 'साज' अर्थ १, २, ३ पहा.

**साज न०** गवताची एक जात. ❀ **साजारा पु०** अशा गवताचा भारा.

**सांज** [ **सं०** संध्या ] **स्त्री०** १ सूर्यास्ताचा समय. २ संध्याकाळीं देवापुढें लाविलेला दिवा. ह्या दिवा लावण्याला 'सांजवात करणें किं० सांजवात लावणें' म्हणतात.

**सांज** [ **सं०** सत्य; **म०**साच ] **स्त्री०** १ भुतांखेतांना अर्पण केलेला नवीन धान्याचा नैवेद्य. २ एकाद्या शेतांत दरवर्षी अमुक धान्य निघत आलें तितकें यंदाही निघेल अशी अटकळ. ३ जमीनीच्या उत्पन्नाबद्दल केलेला आजमास.

**साजक** [ **सं०** श्यामक ] **पु०** सावा हें धान्य.

**साजण** [ **सं०** सज्जन ] **पु०** प्रियकर; दोस्त; यार. **साजणी स्त्री०**१ प्रियकरीण; रांड; रखेली. २ मैत्रीण.

**सांजण, सांदण न०** तांदुळाच्या पिठाचें एक पकान्न. ❀ **सांजणपात्र, सांदणपात्र न०** सांदण हें पकान्न करण्याचें पात्र.

**साजणें** [ **सं०** सज्ज ] **अ० क्रि०** १ कोणेकाला ( कांहीं गोष्ट, वर्तन, भाषण ) शोभणें किं०योग्य असणें; उ० हे असले पोरकट चाळे तुला साजत नाहींत. २ खपणें; उघडकीस न येणें; पचणें; उ० दोन शेर दुधांत छटाक पाणी सहज साजेल. ३ समाविष्ट होऊं शकणें.

**साजरा, साजिरा** [ **म०** साजणें ] **वि०** १ सुशोभित; भूषणादिकांनीं अलंकृत किं० उठावदार. २ सुंदर; नीटनेटका. ३ फलद्रूप; सार्थ; व्यर्थ न गेलेला; फुकट न घालविलेला; उ० आज दसरा आहे, घरांत तीन माणसें आजारी आहेत, पण दिवस साजरा केला पाहिजे म्हणून मुठीचें पुरण केलें. ❀ **फुटका डोळा काजळानें साजरा करावा** आपल्या ठायीं जो कमीपणा असेल तो यथाशक्ति भरून काढावा.

**सांजवणें, सांजावणें, सांजळणें** [ **म०**सांज] **अ० क्रि०** किं० **भावकर्तरी** संध्याकाळ होणें; उ० मला विठ्ठलवाडीस सांजावलें.

**सांजवरी, सांजोरा** [ **म०** सांजा ] **स्त्री०** पोटांत सांजा घालून तळून काढलेली पुरी,–एक पकान्न.

**सांजळणें** वर ' सांजवणें ' पहा.

**सांजा** [ **सं०** संयाव=सांजा, चुरमा ] **पु०** १ कणकेंतील रवाळ अंश. २ चाळावयाच्या अगोदरचें दळलेल्या गव्हाचें रूप. ३ कणकेंतील रवाळ अंशांत तूप, दूध, साखर, इ० द्रव्यें घालून शिजवून करतात तें पकान्न.

**साजात्य** [ **सं०** ] **न०** सजातीयपणा; एकाच जातीचें असणें.

**साजारा पु०** साज नांवाच्या गवताचा भारा. ' साज ' **न०** पहा.

**सांजावणें** मागें ' सांजवणें ' पहा.

**साजिंदा** [ **फा०** ] **पु०** १कोणीही बजवय्या. २ नर्तकीच्या मागें उभा राहून सारंगी इ० वाद्य वाजवितो तो. ❀ **साजिंदगी स्त्री०** साजिंद्याचें कर्तव्य किं० धंदा. **साजिंदी स्त्री०** १ देहविक्रयानें द्रव्य मिळविणारी स्त्री; वेश्या; कुलटा. २ नर्तकी स्त्रीच्या मागें वाद्य वाजविणारी स्त्री.

**साजिरा पु०** इमारती लाकडें ज्यापासून मिळतात असा एक वृक्षविशेष.

**साजिरा** मागें ' साजरा ' पहा.

**साजीखार** पु० मागें ' संजिखार ' पहा.

**साजूक** [ सं० सद्यस् ] वि० ताजें ( तूप, पाणी, कांहीं खाद्य किं० पेय, इ० ).

**सांजें** [ म० साच; सं० सत्य ] न० १ देवाला केलेला नवस ( करणें ). २ कांहीं धार्मिक नियम पथकरणें ( धरणें ). ३ अमुक जमीनींत अमुक धान्यादि उत्पन्न होईल अशी अटकळ किं० अशा अटकळीनें ठरविलेलें धान्यादींचें परिमाण. मागें 'सांज ' [सं०सत्य; म०सच]अर्थ२आणि३पहा.

**सांजें** [ म० सांज; सं०संध्या ] न० कोणेकावरून दृष्टिबाधा इ० च्या निरसनार्थ संध्याकाळीं ओवाळून टाकलेला भात, मीठ, मोहोऱ्या, इ० पदार्थ ( टाकणें ).

**सांजें, सांझें** [ सं० संध्या ] क्रि० वि० संध्याकाळीं; सायंकाळीं; तिन्ही सांजा.

**सांजोरी** [ म० सांजा ] स्त्री० पोटांत सांजा घालून तळून काढलेली पुरी.

**सांझ** [ सं० संध्या ] स्त्री० संध्याकाळ;सायंकाळ.

**सांझळणें** मागें ' सांजळणें ' पहा.

**सांझें** [ सं० संध्या ] क्रि० वि० सायंकाळीं; सूर्यास्ताच्या समयीं. वर ' सांजें, सांझें ' पहा.

**सांट, सांठ** [ म० सांठणें ] पु०, स्त्री० पोतें, घर, बारदान, गलबत, इ० मध्यें पदार्थ भरणें, ठेवणें, इ० ची जागा किं० अवकाश.

**साट** न० फणस,आंबा, इ० चा रस] ताटांत घालून वाळवून केलेला पातळ पोळीसारखा जो पदार्थ तो.

**साट** पु० १ बांबूच्या चिरफळ्या, काठ्या, इ० एकीशीं एक बांधून जी माळा, गलबत, इ० मध्यें बसणें, निजणें,इ०साठीं करतात ती सपाटी किं० पृष्ठभाग. २ अशा प्रकारचा घराच्या छपराखालीं केलेला माळा.

**साटकाविटका**[ म०विटणें ]वि०विटाळलेला, शिळा झालेला, किं० नासलेला ( खाद्यादि पदार्थ).

**साटगी** स्त्री० लहान साटा. खालीं ' साटा, सांठ्या ' पहा.

**साटणें** [ म० साटें ] स० क्रि० ( बाजारांत विकावयास आलेला माल ) एकदम आणि एका राशीच्या रूपानें विकत घेणें,–त्या मालाची किरकोळीनें विक्री करून नफा मिळविण्याच्या उद्देशानें.

**सांटणें,सांठणें**[सं०सम्+चि]अ०क्रि०१क्रमाक्रमानें भरती होऊन पदार्थ मोठ्या परिमाणाचा होणें; संचित होणें. २ बारदानांत पदार्थविशेष भरला जाणें किं० राहाणें किं० मावणें.

**सांटपा** [म० सांटणें ]पु० १ पदार्थांचा संचय किं० बेगमी. २ पदार्थ साठविण्याची किं० भरण्याची जागा किं० बारदान. ३ जमा केलेलें सामानसुमान; हरएक पदार्थांचा संग्रह.

**साटभाऊ, साडभाऊ, साडू** पु० आपल्या पत्नीच्या बहिणीचा पति. पुढें ' साडू ' पहा.

**साटमार** पु०,**साटमारी** स्त्री० [ हिं०सांठा+म० मारणें ]माजलेल्या हत्तीला रंगणावर मोकळा सोडून त्याला खिजविण्याचा एक खेळ. ह्या खेळांत हत्तीशीं झुंजणारा जो पहिलवान त्याला 'साटमाऱ्या,' ' साठमाऱ्या,' किं० ' साठ्या ' म्हणतात.

**साटल्यामोटल्या** [ म० मोटली=गांठोडें ] स्त्री० अ० व० १ संसारांतील सामानसुमानाचीं बोचकीं किं० गांठोडीं. २ प्रवासास निघालेला मनुष्य बरोबर घेतो तीं चिरगुटें, भांडीकुंडीं, इ० चीं बोचकीं.

**साटवण, साटवणी** इ० पुढें ' साठवण, ' ' साठवणी, ' इ० पहा.

**साटा** पु० पाणी इ० चा शिंतोडा किं० थेंब.

**साटा, साट्या** पुढें ' साठा,' 'साठ्या' पहा.

**साटा** पु० १ करंजी, मोदक, इ० च्या गर्भांत जें खोबरें, पुरण, इ० भरतात तें; सारण. २ घडीची पोळी, चिरोटा, इ० चे पदर सुटे राहावे म्हणून घडी घालतांना लावतात तें तेल,तूप, इ०.

**सांटारा** [ म० सांटणें ] पु० खूप मोठा ढीग किं० रास.

**साटारणा, साटारा** पु० मागें ' सटारणा ' पहा.

**साटी** स्त्री०खटाऱ्याचा तळ,-जो तक्ते,वांसे,इ० एकमेकांशीं जोडून किं०बांधून बनविलेला असतो.

**साटीं** श० यो० अ० करितां; ह्या उद्देशानें; मुळें ( कवितेंत ).

**साटें** [ सं० संचय ] न० १ कोणी व्यापाऱ्यानें बाजारांत विकावयास आणलेला सर्व माल.

२ असा सर्वचा सर्व माल एकदम दुसऱ्या व्यापाऱ्यानें विकत घेणें ह्या रूपांचा सौदा. ॐ साटेखत, साटेपत्र न० माल विकणारा आणि विकत घेणारा ह्यांच्या दरम्यान जो ठरावासंबंधानें कच्चा कागद करतात तो. गिऱ्हाइकानें सर्व पैसे विकणाराला दिल्यानंतर पक्कें खरेदीखत होतें.

**साटेंलोटें** [ म० साटें+लोटणें ] न० १ दोन्ही पक्षांना सोयीवार असा अदलाबदलीचा व्यवहार. २ एका कुटुंबांतील मुलगी दुसऱ्या कुटुंबांत देणें, आणि त्या दुसऱ्या कुटुंबांतील मुलगी आपण आपल्या कुटुंबांत करून घेणें, ह्या रूपाची लग्नें ठरविण्याचा प्रकार.

**साटोप** [ म० स+आटोपणें ]वि० १ संसार, धंदा, व्यापार,इ०ची जबाबदारी अंगावर घेण्याला समर्थ असा ( माणूस ); कर्तबगार. २ आटोपसर, विशेष त्रासाशिवाय चालवितां येण्याजोगा ( धंदा, व्यापार, कारभार, इ० ).

**साटोरी** स्त्री० जिच्या पोटांत नारळ इ० चें सारण घातलें आहे अशी पुरी हें खाद्य.

**साड्या** वर ' साटमारी ' मध्यें ' साटमाऱ्या ' पहा.

**साड्या करवत, साड्या करवत** पु० चौकटींत बसविलेली करवत.

**साठ** पु० बांबूच्या काड्या, तक्ते, इ० ची तक्तपोशी. मागें ' साट ' पु० पहा.

**साठ** [ सं० षष्टि ] वि० पन्नासांत दहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

**सांठ** [ सं० सम्+चि ] पु० १ पदार्थ भरण्याला किं० ठेवण्याला अवकाश. २ संचय; बेगमी. ह्या अर्थी 'सांठा' अधिक रूढ आहे. ३ क्षमा,-दुसऱ्याचा अपराध पोटांत सांठविण्याची प्रवृत्ति.

**सांठपा** पु० मागें ' सांटपा ' पहा.

**साठमार, साठमाऱ्या, साड्या,** इ० मागें ' साटमार ' इ० पहा.

**साठवण** [ म० सांठविणें ] न० १ धान्य, पाणी, इ० पदार्थ सांठविण्याची क्रिया. २ सांठविलेले धान्य, पाणी, इ० पदार्थ समुच्चयानें. ३ धान्य, पाणी, इ० पदार्थ सांठविण्याचें बारदान.

**सांठवणी** [ म० सांठणें+पाणी ] न० १ सांठलेलें किं० सांठविलेलें पाणी.

**सांठवणी,सांठवणूक** [म० सांठविणें] स्त्री० धान्यादि पदार्थांची बेगमी किं०संचय करून ठेवणें.

**सांठविणें** [ म० ' सांठणें ' चें प्रयोजक ] स० क्रि० धान्य, पैसा, इ० पदार्थ संचित करून ठेवणें किं० जमवून किं० गोळा करून किं० जुळवून ठेवणें किं० त्यांची बेगमी करून ठेवणें.

**साठळणें** [ म० साठ ] अ० क्रि० १ ( कोणी माणूस )साठ वर्षें वयाचें होणें. २ ( कोणेकाला ) म्हातारचळ लागणें किं० लागलेला असणें.

**साठा, सांड्या** पु० १ मखर, डोला (ताबूत), छत्री, घर, टेबल, गाडी, मेणा, इ० च्या मुख्य मुख्य अवयवांची मांडणी किं० जोडणी;सांगाडा. २ माणूस, प्राणी, इ० च्या शरीरांतील हाडांचा पिंजरा किं० सांगाडा ( मांस, कातडीं, इ० च्या विरहित शरीर ).

**सांठा** [ सं० संचय ] पु० १ संग्रह; बेगमी; शिलकींत पडलेला किं० पाडलेला कोणताही पदार्थ. २ रास; ढीग; संचय. ॐ सांठ्याचा वि० सणाच्या दिवशीं किं० प्रसंगविशेषीं वापरावयाचें (वस्त्र, दागिना, इ० ).

**साठी** [ म० साठ ] स्त्री० १ साठ वर्षें वय; उ० साठी बुद्धि नाठी(म्ह०साठ वर्षांचें वय ज्याचें उलटून गेलें आहे त्याला बुद्धिभ्रंश होतो ).२ एक प्रकारचें भात,-जें साठ दिवसांत पिकून तयार होतें.साठी स्त्री०गाडीचा तळ;घराच्या माळ्याचा पृष्ठभाग; होडींत घातलेले बसावयाचे तक्ते; छपराचें ओंवण. ह्या सर्व अर्थीं'साटी'सुद्धां. ॐ साठी बुद्धि स्त्री० म्हातारपणचा बुद्धिभ्रंश किं० विवेकशून्यता.

**साठीं** श०यो०अ० करितां;०च्या उद्देशानें;उ० मी बायकोच्या चंद्रहारासाठीं पांचशे रुपये बाजूस काढून ठेविले आहेत.

**साठेरा,साठेरी**[ म० साठ]वि०साठ दिवसांत पिकणारें (भात किं० नाचणी ).

**साठोरी** स्त्री० जिच्या पोटांत पुरण भरलें आहे अशी पुरी. मागें ' साटोरी ' पहा.

**साड्या करवत** पु० चौकटींत बसविलेली करवत. मागें ' साड्या करवत ' पहा.

**साड** [ सं० सार ] पु० १ कडब्याचें ताट, झाडाचें खोड,इ० च्या गर्भांतील मऊ भाग किं० गाभा. २ चंदनाच्या पोटांतील गाभा.

**सांड** [ सं० षंड=बैल, पोळ ]पु० १ देवाच्या नांवानें मोकळा सोडलेला बैल. २ ( **लाक्षणिक** ) धिप्पाड माणूस.

**सांड** [ हिं० ] स्त्री० उंटाची स्त्री. ह्याच अर्थी 'सांडणी' सुद्धां.

**सांड** [ म० सांडणें ] स्त्री० १ धक्का, बंधारा, इ० तून ज्यादा पाणी वाहून जाण्यासाठीं ठेविलेलें भोक. २ हातांत घेतलेला पदार्थ सांडणें किं० गळूं देणें अशी अजागळपणाची कोणेकाला खोड असते ती. ३ कांहीं गोष्ट स्मरणांतून गळणें किं० विसरणें अशी कोणेकाला असते ती खोड. ३ एकाद्या गोष्टीची उपेक्षा किं० अनास्था; उ० मुलांच्या विद्येची ( किं० विद्येविषयीं ) अशी सांड करणें तुम्हाला शोभत नाहीं. ५ कांहीं गोष्टीकडे केलेलें दुर्लक्ष्य किं० तिच्या संबंधानें बेपरवाईची वृत्ति. ६ नवऱ्यानें टाकून दिलेली बायको. न० कोणेकाच्या हातांतून गळून पडलेली वस्तु; हरवलेली वस्तु. वि० कोणेकाच्या मालकीचा रस्त्यावर गळून पडलेला ( पदार्थ ). ꙮ **पदार्थाची ( किं० माणसाची ) सांड करणें, पदार्थाला ( किं० माणसाला ) सांड देणें** त्याची हेळसांड किं० उपेक्षा करणें; त्याचेकडे दुर्लक्ष्य करणें; त्याच्या संबंधानें बेफिकीर असणें. **अपराधाची सांड करणें** तो क्षमिणें किं० माफ करणें. **पदार्थाची (किं०माणसाची) सांड करणें** त्याला सोडून देणें; तो वर्ज करणें किं० त्यागणें.

**सांडई** स्त्री० तांदुळाच्या पिठाचें एक तोंडीं-लावणें.

**सांडखत** न०, **सांडचिठी** स्त्री०[म०सांडणें+चिठी; अ० खत ] बायको, गुलाम, घर किं० कांहीं पदार्थ, यांवरचा हक्क,ताबा, किं०स्वामित्व आपण सोडून दिलें आहे अशा अर्थाचें पत्र.

**सांडगा** पु० १ भोपळा, कोहळा, मेंढ्या, इ० पदार्थ एकत्र ठेचून त्यांचे ठेच्यांत तिखट, मीठ,इ०मसाला घालून त्याच्या पोफळाएवढ्या गोळ्या करून उन्हांत वाळवितात त्या प्रत्येक.ह्या गोळ्या तळून तोंडींलावणें म्हणून भोजनांत खातात. २ हरभऱ्याच्या पिठाच्या अशाच गोळ्या तोंडीं लावण्यासाठीं करतात त्या प्रत्येक.

**सांडण, सांडणी** [ हिं० ] स्त्री० उंटाची स्त्री. हिच्यावरच्या स्वाराला 'सांडणीस्वार' म्हणतात.

**सांडणी** [ म० सांडणें ] स्त्री० १ सांडण्याची क्रिया. २ स्मृतींतून सांडण्याची म्ह० गळण्याची क्रिया; विस्मृति; विसरणें. ꙮ **कांहीं गोष्ट सांडणीस पडणें** ती विसरली जाणें; ती स्मरणांतून गळणें.

**सांडणें** अ० क्रि० १ भांडें किं० बारदान ह्यांत (ठेविलेला पदार्थ) धक्का लागून किं० त्याला भोक पडून(तो)बाहेर पडणें.२पात्रादींत कांठोकांठ पदार्थ भरल्यावर तो पदार्थ आणखी त्यांत घालूं गेल्यास (तो) त्या पात्रादींत अवकाश नसल्या-कारणानें बाहेर पडणें. ३ विशिष्ट ठिकाणीं ठेविलेला पदार्थ तेथून नाहींसा झाल्यामुळें तो पुन्हां न सापडणें; हरवणें. स० क्रि० १ पात्रादींत ठेविलेला पदार्थ त्या पात्रादींतून आपल्या निष्काळजीपणानें बाहेर पडेलसा करणें. २आठवण न राहिल्याकारणानें आपण विशिष्ट ठिकाणीं ठेविलेला पदार्थ आपणास सापडूं नये असा करणें; गमावून घेणें. ३ गर्व, ताठा, अभिमान, इ० त्यागणें किं० सोडून देणें.

**सांडपत्र** न० मागें 'सांडखत' पहा.

**साडभाऊ, साडू** [ सं० श्याली ( बायकोची बहीण )+वोढृ ( पति ) ] पु० आपल्या बायकोच्या बहिणीचा पति.

**सांडभोळा** [ म० सांडणें+भोळा ] वि० आठवण न राहिल्यामुळें पदार्थ गमावून घेणारा; विसरभोळा.

**सांडरा** [ म० सांडणें ] वि० १ आपण पदार्थ कोठें ठेविला याची ज्याला आठवण राहात नाहीं म्हणून ज्याचे पदार्थ वेळेवर मिळत नाहींत अशा स्वभावाचा; ज्याचे पदार्थ नेहेमीं हरवत असतात असा.२पदार्थांची उधळपट्टी करण्याच्या स्वभावाचा; उधळ्या.

**सांडरांड** [ म० सांडणें+रांड ] स्त्री० नवऱ्यानें टाकून दिलेली बायको.

**सांडरूं** [ म० सांड ] न० १ उंटाची स्त्री

( तुच्छतेंत ). २ नवऱ्यानें टाकून दिलेली बायको ( तुच्छतेंत ).

**सांडलवंड** [ म० सांडणें+लवंडणें ] स्त्री० पदार्थ सांडणें, लवंडणें, इ० रूप नाश, किं०हानि.

**सांडवणें** [ म० साडणें ] अ० क्रि० आजार, चिंता, उपास, इ० कारणामुळें रोड किं० किडकिडीत होणें.

**सांडवा**[ म०सांडणें]पु० १धरण,धक्का,बंधारा, इ० नीं आडविलेल्या पाण्यापैकीं जादा पाणी बाहेर सोडण्यासाठीं ठेविलेलीं जीं भोकें किं० दारें तीं प्रत्येक. २ पाण्याच्या प्रवाहासाठीं दगड,विटा, चुना, इ० नीं बांधून काढलेला पाट.

**सांडशी** [सं०संदंश हिं०] स्त्री०एक प्रकारचा चिमटा,–भांडें किं० कोणताही पदार्थ घट्ट धरण्याच्या उपयोगाचें साधन.

**सांडस**[सं०संदंश]पु०सोनार,लोहार,इ०कारागिरांचा आकारविशेषाचा चिमटा किं० पक्कड.

**सांडसूट** [ म० सांडणें+सुटणें ] स्त्री० सावकार, सरकार, इ०नीं कुळें किं०रयत यांना कर्ज, सारा,इ०च्या रकमेंतील.माफ,केलेला किं०सोडलेला अंश;दिलेली सूट; माफ केलेला पैसा किं० ऐवज.

**साडा** [ सं० शाटी; म० साडी ] पु० साडे हा जो लग्नांतील विधि त्या विधींत नवऱ्यामुलीला दिलेली साडी.

**साडा** [ सं० स+अर्ध ] पु० अर्धा अंश ( अंकानें परिमाण दाखवितांना ); उ० तुम्ही लुगडयाची किंमत साडेसात रुपये सांगतां,त्यांतील साडा सोडा(म्ह०सात रुपये किंमत सांगा ). वि० अर्ध्यासहित; उ० साडे आठ रुपये ( म्ह० अर्ध्या-रुपयासहित आठ रुपये. टीप,–ह्या अर्थी 'साडा' चें ' साडे ' हें रूप होतें.

**साडादिडा** [ म० साडा+ दीड ] वि०कांहीं विशिष्ट सरणी न अनुसरतां वस्त्र, पागोटें, लुगडें, इ० ची घातलेली ( घडी ); सर्व मार्गी जी एकेरी नव्हे, किं० दुहेरी नव्हे, किं० तिहेरी नव्हे अशी वस्त्र, दोरी, इ०ची घडी.

**सांडावा** पु० बांध, बंधारा, इ० तून जादा पाणी वाहून जाण्यासाठीं राखिलेलें भोक. मागें ' सांडवा ' पहा.

**साडी** [ सं० शाटी ] स्त्री० मुलीचें नेसावयाचें लुगडें; लहान लुगडें.

**सांडी स्वार** पु० मागें ' सांडणी ' मध्यें ' सांडणीस्वार ' पहा.

**साडू** [ सं० श्यालीम्=बायकोची बहीण; वोढृ= नवरा ] पु० आपल्या बायकोच्या बहिणीचा पति. ह्याच अर्थी ' साडभाऊ,' ' साडू भाऊ ' सुद्धां.**ॐसोयऱ्यांत साडू,भोजनांत लाडू,आणि हत्यारांत माडू** नातलगांत साडू हा मैत्रीला उत्तम, पकान्नांत खावयाला लाडू उत्तम, आणि हत्यारांत चालवावयाला माडू हें हत्यार उत्तम.

**साडे, साढे** [ म० ' साडा, ' ' साढा ' चें अ० व०.] पु० अ० व० लग्नाच्या समारंभाच्या अखेरीस ऐरणीपूजनाच्या वेळीं नवरीमुलगी, नवरामुलगा, इ० ना वस्त्रें देण्याचा विधि. ॐ **कोणेकाचे साडे करणें** १ त्याला कामावरून काढून टाकणें; त्याला हाकलून देणें. २ त्याची मानखण्डना करणें; त्याची छीथू करणें.

**साडे** [ म० साडा, सं० सार्ध ] वि० अर्ध्यासहित. अर्ध्यासहित एकाला 'दीड,' अर्ध्यासहित दोहोंना'आडीच'म्हणतात.एक, दोन, यांच्या पुढें ' साडे ' हें विशेषण योजतात; इ० साडेतीन म्ह० अर्ध्यासहित तीन; साडेचार म्ह० अर्ध्यासहित चार; इ०. टीप,–१ ' साडेतीन ' ह्या शब्दाबद्दल ' औट ' हा पर्याय शब्द आहे. टीप,–२ ' दीड शाहाणा' ह्या शब्दांतलि 'दीड ' प्रमाणें ' साडे ' चा उपयोग ' अत्यन्त इंलकट, फारच वाईट,' ह्या अर्थी निंदाप्रसंगीं करतात; उ० साडेशिनळीचा, साडे हरामी; साडे मात्रागमनी, इ०. ॐ **साडेतीन** वि० तीन आणि अर्धा इतक्या परिमाणाचें; उ० साडेतीन रुपये म्ह० छपन्न आणे. **साडेतीन मुहूर्त** पु० अ०व० दसरा, बलिप्रतिपदा, आणि वर्षप्रतिपदा. हे तीन अत्यन्त उत्कृष्ट मुहूर्त आणि अक्षय तृतीया ( किं० कित्येकांच्या मतें नागपंचमी ) हा साधारणपणें उत्कृष्ट ( म्ह०अर्धवट उत्कृष्ट ) मुहूर्त असे एकंदर साडेतीन मुहूर्त. **साडेतीन शाहाणे** पु० अ० व० १ सखाराम बापू फडके, विठ्ठल सुंदर, देवराव हिंगणे, हे तीन पुरते शाहाणे. २ आणि नानाफडणीस हा अर्धा शहाणा असे एकंदर साडेतीन शाहाणे पेशवाईत होऊन गेले. ३ मूर्ख शाहाणे. ४ मूर्ख आणि बढाईखोर माणूस; उ० तुम्ही मोठे साडेतीन शाहाणे आहां. **साडे-**

**सात** वि० सात पूर्ण आणि एक आर्धा ह्या परिमाणाचा; उ० साडे सात शेर म्ह० पंधरा आच्छेर. **साडेसाती** स्त्री०, **साडेसातीचा फेरा** पु० दुर्दैवाचा फेरा; कोणेकाचा आपत्काळ; उपद्रव. **टीप,**–एकाद्या माणसाच्या जन्मराशीपासून शनि १२, १, आणि २ ह्या राशींत असतां ' त्या माणसास साडेसाती आली आहे ' असें म्हणतात. ह्या तीन राशि क्रमण्यास शनीला साडेसात वर्षे लागतात. ह्या साडेसात वर्षांच्या मुदतींत त्या माणसाला अतोनात दुःखें भोगावीं लागतात. **साडेभावार्थी** वि० दिसण्यांत साधाभोळा पण अंतःकरणांत मत्सरी आणि कपटी असा ( माणूस ). **साडेसातकी** स्त्री० साडेसात बिघे विस्ताराची जमीन.

**सांडोसांड** [ म० सांडेणें+सांडणें ] क्रि०वि० कांठोकांठ ( पात्र, बारदान, पोतें, इ० भरणें ).

**साढू** मागें ' साडू ' पहा.

**साढे** पु० अ० व० मागें ' साडे ' पहा.

**साण** स्त्री० होलिका देवी ( किं० होळीची देवता ) हिच्या पालखीची योग्य जागा.

**साण** [ सं० शाण ] स्त्री० १ गंध उगाळणें, चटणी वाटणें, इ० च्या उपयोगाचा टांकी दिलेला धोंडा. २ हत्यारांना धार देण्याचा धोंडा. **टीप,**–ह्या दोन्ही अर्थी 'सहाण' हा शब्द अधिक प्रचलित आहे. **&साणपट्टी** स्त्री०, **साणा** पु० वर ' साण ' चे दोन्ही अर्थ पहा.

**साणा** पु० नदी किं० खाडी ह्यांच्या पलीकडे उतारू किं० सामान होडीनें जेथून वाहून नेलें जातें ती जागा.

**साणा** [ सं० शाण ] पु० वर ' साण ' सं० सर्व अर्थी पहा.

**साणा** [ म० शाहाणा ] पु० पिकलेलें शेत, गुऱ्हाळ, इ० चीं कामें चाललेलीं असतां मालक किं० भागीदार हे माल चोरीस जाऊं नये म्हणून आपल्या वतीचा जो रखवालदार तेथें बसवून ठेवितात तो.

**साणीलाणी** स्त्री० खडक इ० वर कोरलेली शेत इ० च्या मर्यादेची खूण.

**सात्तें** न० माळवदी घराच्या किं० कौलारू घराच्या माथ्याला जें धूर बाहेर जावा म्हणून किं० स्वच्छ हवा आंत यावी म्हणून ठेवितात तें भोक.

**सात** [ सं० सप्तन् ] वि० १ चारांत तीन मिळून होणाऱ्या संख्येइतका. २ पुष्कळ; अनेक; उ० सात ताड उंच ( म्ह० फारच उंच); उ० सात लबाड (म्ह० फार लबाड); उ० सात आळशी (म्ह० अत्यन्त आळशी). **&सातपांच करणें** एकदा एक बोलणें आणि नंतर दुसरें बोलणें; ज्या बोलण्यांत ताळमेळ नाहीं असें बोलणें बोलणें; विसंगतपणाचें भाषण करणें. **साता समुद्रांपलीकडे ठेवणें** फार जपून ठेवणें; कोणास न दिसेल अशा ठिकाणीं किं० अशा बंदोबस्तानें ठेवणें. **सातासायासांनीं** क्रि०वि० फार श्रमांनीं; कष्ट सोसून; काळजी वाहून; खटाटोप करून. **सातपानी** वि० उगवल्यापासून सात पानें आलीं म्हणजे ज्याला फूल येतें अशा जातीचा ( दुधभोपळी, काकडी, इ० चा वेल ). **सातपुती** स्त्री० १ सात आहेत पुत्र जिला अशी स्त्री; उ० एकपुती रडे सातपुती रडे. मागें ' एक ' मध्यें 'एकपुती' पहा. २घडघोसाळी नांवाची वनस्पति. ह्याच्या फळास ' सातपुतें ' न० म्हणतात. **सातें** न० १ सात दिवस सतत एकाच दिशेनें वाहणारा वारा किं० सात दिवस सतत पडत असलेला पाऊस किं० सात दिवस टिकून राहिलेलें हवेचें मान. २सात दिवस सौम्य हवेचे होऊन गेल्यावर पडलेली हिंवस हवा. ३ भोजनें, कीर्तनें, जलसे, पुराणें, व्याख्यानें, खेळ, इ०चा सात दिवस चाललेला कार्यक्रम. ४ सात दिवस घेतलेलें किं० घ्यावयाचें औषध. ह्या अर्थी ' सात्रक ' न० सुद्धां. **सातपुडी** स्त्री० प्राण्याच्या शरीरांतील एक आंतडें. **सातपुडी गलांड** न० एक प्रकारचें गळूं. **सातवण, सातवीण** [सं० सप्त+पर्ण]पु०, स्त्री०, न० एक वृक्ष,–ज्याच्या एका एका पानांत सात सात पोटपानें असतात. **सातवार** पु० सहा लहान लहान लाटा येऊन गेल्यावर सातवी जी मोठी लाट येते ती ( खलाशांचा शब्द ). **सात सडका** स्त्री० अ० व० उन्मत्त हत्तीच्या गंडस्थळांतून स्रवणाऱ्या पाण्याचे सात पाट किं० ओघळ. **सात लबाड** वि० अत्यंत लबाड. **सात लाजा** स्त्री० अ० व० जनलज्जा, मनोलज्जा,

वयोलज्जा, धर्मलज्जा, कर्मलज्जा, जातिलज्जा, आणि कुललज्जा, अशा सात प्रकारच्या लज्जा किं० लाजा; उ० हा सात लाजा पदरीं बांधून देशद्रोहाला प्रवृत्त झाला आहे. **सात लाजा पदरीं बांधणें** अत्यन्त निर्लज्ज किं० बेशरम होणें किं० असणें. **सातवडा पु०** १ सात दिवसांचा अखंड अवधि. २ सात दिवसांचा हिशेब, खर्च, इ०. **सात सवाई, सात सवाईनें क्रि० वि०** सातपटीपेक्षां आधिक्यानें; पुष्कळ पटीनें ( अधिक जोरदार, लबाड, पटाईत, इ०); उ० तुमच्या घोड्यापेक्षां आमचा घोडा सातसवाईनें चांगला आहे. **सात सायास पु० अ० व०, सात साया स्त्री० अ० व०** अनेक कष्ट किं० खटपटी किं० प्रयत्न; उ० साता सायासांनीं बांधलेलें माझें घर जळून गेलें. **कोणेकाच्या सातसाया करणें** त्याच्या बद्दल भारी कष्ट किं० झीज सोसणें; त्याचे फार फार लाड करणें; त्याच्या तालेवाऱ्या चालविणें. **साता गुणांचा खंडोबा पु०** १ ज्याला नेहेमीं कांहींना कांहीं तरी दुखणीं येत असतात असा माणूस. २ ज्याला अनेक व्यसनें आहेत असा माणूस. ३ ज्याने ठायीं अनेक दुर्गुण आहेत असा माणूस. **सातारें न०, सातवळा, सातोळा पु०** गर्भधारणानंतर सातच महिन्यांनीं जन्मलेलें मूल. **साताळशी वि०** अत्यन्त आळशी. **साती, सत्ते क्रि० वि०** सात पटीनें; उ० आठी सत्ते छप्पन. **सातेरूं न०** सात पुडांचें मोहोळ; या मोहोळांत सात पुडे किं० कप्पे असून ह्यांत मध साठविलेला असतो. **सातेरें न०** सात अहोरात्र पडत असलेला पाऊस किं० पडलेली हवा किं० एकाच दिशेनें वाहणारा वारा. ह्याच प्रतीकांत वर ' सातें ' पहा.

**सात, साथ स्त्री०** सहवास; सोबत; साहचर्य; उ० आम्ही हें काम साथीनें एका दिवसांत करूं.

**सात, साथ स्त्री०** १ हिंवताप, पटकी, कावीळ, इ० कांहीं रोगांचा एकाद्या गांवांत एकदम होतो तो उद्रेक. २ कोणत्याही गोष्टीचा कोणेक स्थळीं किं० काळीं जो विपुलपणा तो.

**सात, सांत स्त्री०** एक मत्स्यविशेष.

**सांतडें न०** १ माणूस किं० पशु ह्याचें कातडें खरचटून निघालेलें किं० सोलून काढलेलें. २ झाडाची साल किं० त्वचा ( सोलून काढणें किं० निघणें ).

**सातत्य [ सं० ] न०** सततपणा; अखंडित क्रम किं० सरणी; चालत आलेली परंपरा.

**सांतपन [ सं० ] न०** एक प्रायश्चित्तविशेष.

**सांतर [ सं० स+अंतर ] वि०** १ ज्याला किं० ज्यांत मध्यें मध्यें फटी किं० खिंडी आहेत असें; विरळ ( वस्त्र, दन्तपंक्ति, बसलेले लोक, इ० ). २ व्यवधानसहित. ३ अट किं० शर्त असलेलें ( वचन, करार, हक्क ). ※ **सांतर स्पर्श वि०** ज्यांच्यामध्यें थोडेंसें अंतर आहे असे ( शेजारीं असलेले पदार्थ ).

**सांतरणें [ सं० सम्+स्तृ ] अ० क्रि०** (वृक्ष, एकादी संस्था, धंदा, इ० ) सर्व बाजूंनीं विस्तार, उत्कर्ष, किं० भरभराट पावत असणें.

**सातरस, सातरवारा पु०** ईशानी दिशेकडून वाहातो तो वारा.

**सांतवन, शांतवन न०** पुढें ' सांत्वन ' पहा.

**सांतविणें** पुढें ' सांत्विणें ' पहा.

**सातळणी, सांतळणी [म० सातळणें] स्त्री०** कढई, तवा, इ० वर थोडेंसें तेल किं० तूप घालून त्यावर हरभरे, डाळ, मिरच्या, दाणे, इ० पदार्थ भाजून काढण्याची क्रिया.

**सातळणें, सांतळणें [ म० तळणें ] स० क्रि०** १ कढई, तवा, इ० वर तेल किं० तूप घालून भुईमुगाचे दाणे, मिरच्या, इ० पदार्थ भाजून काढणें. २ ( कांहीं खाद्य, जमीन, इ० ) सरदणें.

**सातारा [ म० सातरणें ] वि०** सर्व बाजूंनीं शाखा आणि पानें ह्यांनीं समृद्ध ( वृक्ष ); गेंदासारखें वाढलेलें ( झाड ).

**सातारी स्त्री०** जेथें मुंग्याचीं अनेक वारुळें आहेत अशी जागा किं० अशा जागीं बांधलेलें नागोबाचें देऊळ.

**साती, साथी पु०** जोडीदार; दोस्त.

**साती स्त्री०** मोठ्या प्रमाणावर कोणेक स्थळीं झालेला देवी, पटकी, आमांश, इ० चा फैलाव.

**सातू [ सं० सक्तु ] पु०** १ जव, गव्हासारखें एक धान्य. २ जोंधळा, बाजरी, इ० च्या लाह्यांचें पीठ.

**सातेरा वि०** मागें ' सातारा ' पहा.

**सातेरूं** न० मागें 'सात' मध्यें पहा.

**सातेरें, सातोळा** मागें 'सात' मध्यें पहा.

**सात्रक, सात्रक चाल** स्त्री० घोड्याची एक प्रकारची चाल.

**सात्वत[सं०]** वि० १ वैष्णव. २ भक्त. पु० १ कृष्ण. २ बलराम. ३ यादव. ४ सप्तर्षिप्रणीत धार्मिक ग्रंथविशेष किं० त्यांत सांगितलेला विधि. ५ हिंदूंची एक संकर जात.

**सात्वती** [सं०] स्त्री० एक प्रकारची काव्यरचना.

**सांत्वन** न०, **सांत्व** पु०, **सांत्वना** स्त्री०[सं०] १ शांत करणें; दुःखाचें निरसन. २ सौम्य उपाय. ३ कुशल प्रश्न. ॐ **सांत्ववाद** पु० सहानुभूतीचे शब्द बोलून कोणेकाच्या दुःखाचें किं० निराशेचें निरसन करणें.

**सात्विक** [सं०] वि० १ खरें. २ स्वाभाविक. ३ सद्गुणी; निष्पाप. ४ जोमदार. ५ मानसिक. ६ प्रामाणिक. ७ सत्त्वगुणी; सत्त्वगुण ज्यांत फार आहे असा. ८ सौम्य (खाद्य). ९ पौष्टिक (गहूं, दूध, इ० पदार्थ). ॐ **सात्विक चंडाळ** पु० दिसण्यांत साधाभोळा पण खरोखरीं लुच्चा, कपटी, किं० दुष्ट असा (माणूस).

**साथ** [हिं०] स्त्री० १ सोबत; सहवास. २ पार्ती; संकेत. ॐ **साथकरी** पु० गाणारा किं० वजवय्या ह्यांच्या सुराशीं आपला सूर जोडणारा किं० री ओढणारा. **साथी, साथीदार** पु० १ जोडीदार; दोस्त. २ आपला भागीदार किं० सरकत्या. ३ री ओढणारा.

**साद** [सं०] पु० १ खचणें. २ थकवा. ३ थांबणें. ४ कृशता. ५ नाश; शेवट.

**साद** [सं० शब्द] पु०, स्त्री० १ शब्द; आवाज. २ हाक मारणें; आरोळी. ३ पडसें किं० फार बोलणें इ० मुळें कांहीं काळापुरता घोगरा झालेला किं० बसलेला आवाज. ४ कोणी कोणा दूर असलेल्या माणसास मारलेली हाक किं० त्यानें दिलेलें उत्तर. ॐ **सादपरका, सादपरता** [म० साद (आवाज)+परका (वेगळा); परता=(परतलेला)] वि० फणस इ० फळ पक्व होत चाललें असतां तें फळ दिवसा दिवसांनीं टिचकी मारल्यावर बदललेल्या आवाजाचें (होणें, वाटणें). **कोणेकाला साद घालणें** त्याला मोठ्यानें हाक मारून जवळ बोलावणें.

**सांदण, सांदणें** न० तांदुळाचें एक पक्वान्न. हें पक्वान्न ज्यांत करतात त्याला 'सांदणपात्र' न० किं० 'सांदण ताटली' स्त्री० म्हणतात.

**सादपरतणें** [म० साद+परतणें] अ० क्रि० (पिकत चाललेला फणस इ० फळ) दिवसादिवसांनीं भिन्न आवाजाचें होणें. हा भिन्न आवाज त्या फळावर टिचकी मारल्यानें उत्पन्न होतो. मागें 'साद' मध्यें 'सादपरका' पहा.

**सादपरता** मागें 'साद' मध्यें 'सादपरता' पहा.

**सादर** [सं०] वि० १ पूज्यतेच्या भावनेनें प्रेरित; आदरयुक्त; कोणेकासंबंधानें मनांत आदर बाळगणारा. २ सज्ज; सिद्ध; तयार; तत्पर. क्रि० वि० बहुमानानें; आदरानें; पूज्यताबुद्धीनें.

**सादर** [अ०] वि० १ आलेला; येऊन पोचलेला; दाखल झालेला. २ सोडलेला (हुकूम); केलेली (आज्ञा). ॐ **सादर करणें** १ कोणेकाकडे पाठविणें; कोणेकाला देणें किं० नजर करणें. २ कोणेकाला कांहीं माहिती, जबाब, इ० देणें.

**सादवणें, सादविणें, सादाविणें** [म० साद; सं० शब्द] स० क्रि० (कोणेकाला) मोठ्यानें किं० दूरून हाक मारणें किं० बोलावणें.

**सादळणें** [सं० सार्द्र=जलयुक्त] अ० क्रि० (पदार्थ, जमीन, भिंत, इ०) हवेंतील जलांशानें युक्त होणें म्ह० सरदणें.

**सादापत** न० साधनपत्र (अशिक्षितांचा शब्द).

**सादि** [सं०] पु० १ योद्धा. २ सारथि.

**सादित** [सं०] वि० १ जेरीस आणलेलें. २ विध्वंसिलेलें.

**सादिरवारिद, सादिलवार (-री)** [अ० सादिर् वारिद्] स्त्री० गांवाच्या संबंधाचे जे मुख्य खर्च त्याशिवाय जो किरकोळ खर्च (फकीर, गोसावी, उरूस, उत्सव, गांवजेवण, इ० करितां होणारा) तो भागविण्यासाठीं गांवकऱ्यांवर जी पट्टी बसवितात ती किं० सरकारांतून जी रकम दिली जाते ती. ॐ **सादिलवार, सादिलवारी** वि० वर सांगितलेली जी पट्टी किं० सरकारांतून

आलेली रकम तिच्यासंबंधाचा (हिशेब, जमा, इ०).

**सादी** [ सं० सादिन् ] वि० वर बसणारा; उ० अश्वसादी ( घोडेस्वार ); गजसादी (महात). पु० १ घोडेस्वार. २ हत्तीवरचा स्वार. ३ रथावर बसणारा. ४ सारथि.

**सांदी, सांदीकोंदी, सांदीचा, सांदोसांदी,** इ० पुढें ' सांधी, ' ' सांधी कोंदी, ' 'सांधीचा,' ' सांधोसांधीं, ' इ० पहा.

**सादृश्य** [ सं० ] न० सारखेपणा; तुल्यरूपता.

**साद्यंत** [सं० स+आदि+अंत] वि० आरंभापासून शेवटपर्यंत जें अखण्ड तें; समग्र. क्रि० वि० आरंभापासून शेवटापर्यंत ( हकीगत इ० ).

**सांद्र** [ सं० ] वि० १ निबिड, दाट (जंगल). २ अति विपुल. ३ जोरदार. ४ घट्ट; गोळा झालेलें. ॐ **सांद्र मेह पु०** घट्ट लघवी; घट्ट लघवी होणें हा रोग.

**सांध, सांद** [ सं० संधि ] स्त्री० १ सांधा; एक पदार्थ जेथें दुसऱ्या पदार्थाला जोडलेला आहे ती जागा. २ दोन पदार्थांना जोडणारा तिसरा पदार्थ. ३ चीर; भेग; फट; खिंड. ४ बोटाच्या दोन पेरांचा संयोग. ५ हातमागांतील ताण्याचा तिडा. ॐ **सांधींत** ( किं० **सांदीत** ) **पडणें** १ अज्ञात स्थितींत राहाणें किं० असणें. २ वरिष्ठाची खुशामत करण्याचा गुण अंगीं नसल्याकारणानें कोणी मनुष्यानें कोपऱ्यांत पडणें किं० त्याच्या गुणाचें चीज न होणें. **सांधकाम** न० पदार्थाचे भिन्न भिन्न भाग किं० अवयव जोडणें किं० जोडण्याची तऱ्हा किं० कुशलता. **सांदकोंद, सांधकोंद** स्त्री० १ फट, भेग, चीर. २ कोनाकोपरा; फारसा वहिवाटींत नसलेला किं० अडचणींतला घराचा भाग. **सांदींतला, सांदीकोंदीचा, सांदीचा** वि० कोपऱ्यांतील; अप्रसिद्ध; बाजूस टाकलेला किं० पडलेला.

**सांधण, सांधणपात्र, सांदन ताटली** मार्गे ' सांदण ' इ० पहा.

**सांधणी** [ म० सांधणें ] स्त्री० १ जोडण्याची किं० जुळविण्याची क्रिया. २ मागावरील ताण्याच्या तंतूना जोड देणें किं० नवीन धागे जोडणें ही क्रिया. ३ हीं सुतें जोडण्याचें एक हत्यार.

**साधणूक, साधणी** [म० साधणें] स्त्री० १ कांहीं ध्येय, उद्देश, इष्ट वस्तु, इ० मिळविणें किं० प्राप्त करून घेणें. २ मिळविलेलें ध्येय; सफळ झालेला उद्देश. ३ इष्ट वस्तु मिळविण्याची तऱ्हा किं० युक्ति.

**साधणें** [ सं० साध् ] अ० क्रि० १ सिद्धीस जाणें; फलद्रूप होणें. २ प्राप्त होणें. स० क्रि० १ मिळविणें; प्राप्त करून घेणें. २ सिद्धीस नेणें. ॐ **संधि साधणें** अनुकूल समयाचा फायदा करून घेणें.

**सांधणें** [ सं० सम्+धा ] स० क्रि० ( दोन लाकडें कुसूं आणि विंधी या योगें किं० खिळा ठोकून, दोन धातु डागानें, कपड्याचे दोन तुकडे शिवून, दोन कागद डिकानें किं० अन्य प्रकारें ) जोडणें, जुळविणें, किं० खिळविणें. अ० क्रि० (एक पदार्थ) दुसऱ्याशीं चिटकणें किं० जोडला जाणें.

**सांधणें** न० तांदुळाचें एक पक्वान्न.

**साधन** [ सं० ] न० १ संपादणें; मिळविणें. २ सिद्धीस नेणें. ३ सिद्धीस जाणें. ४ इलाज; उपाय; इष्ट वस्तु मिळविण्याचा मार्ग किं० युक्ति. ५ कांहीं वस्तु बनविण्याला लागणारें हत्यार किं० यंत्र. ६ कांहीं कामची उपकरणें समुच्चयानें. किं० सामग्री. ७ (न्याय) हेतु; प्रमाण. ८ सैन्य. ९ मदत. १० मोह पाडणें. ११ जारणमारण. १२ पुरुषाचें जननेंद्रिय. ॐ**साधन द्वादशी** स्त्री० आधल्या दिवशीं एकादशीचा उपवास करून दुसऱ्या दिवशीं द्वादशी कांहीं राहाते त्यांत पारणा साधणें अशी विवक्षा असतां त्या द्वादशीस ' साधन द्वादशी ' म्हणतात. पहाटेस थोडा वेळ द्वादशी असून पुढें त्रयोदशी लागते तेव्हां त्या थोड्या वेळांत एकादशीचा उपास सोडण्याची व्यवस्था करून ती द्वादशी साधावी लागते असा दिवस. **साधनचतुष्टय** न० ब्रह्मप्राप्तीचे मुख्य चार उपाय समुच्चयानें,–वस्तुविवेक, वैराग्य, शमादि ( शम, दम, दया, तितिक्षा, उपरति, समाधान ), आणि मुमुक्षुत्व. **साधनपत्र** न० खत, दस्तऐवज, इ० रूप पुरावा.

**साधनिका** [ सं० ] स्त्री० १ करणें, रचणें, गुंफिणें, इ० क्रिया करण्याची रीति किं० तऱ्हा. २ वाक्याचे घटक भाग वेगवेगळे करून त्यांचा परस्परांशीं संबंध दाखविणें.

**साधनी** [ म० साधन+ई ( प्रत्यय ) ] वि० १ आपलें उद्दिष्ट नानाविध हिकमतींनीं मिळविण्यांत पटाईत. २ कांहीं उद्दिष्ट साधण्याच्या उपयोगाचा ( दस्तऐवज, पुरावा, हत्यार, वशीला, इ० ). स्त्री० १ गवंडी, सुतार, इ० चा ओळंबा किं० पाणसळ. २ नक्षीदार कंगोरा.

**सांधप** [ म० सांधणें ] न० दोन पदार्थ किं० पदार्थांचे दोन भाग किं० अवयव जोडणें किं० जोडण्याची तऱ्हा.

**सांधमोड** पुढें ' सांधा ' मध्यें पहा.

**साधर्म्य** [ सं० ] न० समान गुण किं० धर्म यामुळें येतें किं० होतें जे सादृश्य तें.

**साधलाध, साधलाद** [म०साधणें+लाधणें] स्त्री० दैवानें होतो तो हानिलाभ किं० नफानुकसान; दोन माणसांचे प्रयत्न किं०अंगचे गुण सारखे असून त्या दोघांना भिन्न प्रकारचीं फळें मिळणें हा जो दैवयोग तो; दैवगति; नशीब.

**साधा** [ फा० सादाह् ] वि०१त्या त्या पदार्थाची किं० माणसाची शोभा, कर्तृत्व, वक्तृत्व, इ० गुणाचा उत्कर्ष करणारें जें कांहीं तें ज्याच्या ठायीं नाहीं असा ( पदार्थ, माणूस ).२ मोकळ्या मनानें बोलणारा किं० वागणारा(मनुष्य).३छानछोकी न करणारा, छाकटेगिरी न करणारा, छक्केपंजे न करणारा.४बोलण्यांत अलंकार न योजणारा (माणूस).५ नक्षी नसलेला ( पदार्थ ).६पुरण जींत नाहीं अशी ( पोळी ). **टीप**,-विशेष्याच्या अनुरोधानें ' साधा ' शब्दाचा अर्थ विद्यार्थ्याला वरील सरणीनें करतां येईल. ॐ **साधाभोळा, साधासिधा** वि० १ सरळ वर्तनाचा माणूस. २ अजागळ. **साधापिधा** वि०गुटगुटीत शरीराचा; भरदार अंगाचा आणि चेहऱ्याचा. **साधाभाद्दा** वि० वयोतीत असून सरळ वर्तनाचा; छक्केपंजे न करणारा वयोतीत ( माणूस ).

**सांधा** [ सं० संधि ] पु० १ दोन वस्तूंचा जोड; दोन वस्तु जोडण्याची क्रिया किं० तऱ्हा. २ दोन वस्तूंना जोडणारी तिसरी वस्तु. ३ एकादी वस्तु कमी पडल्यास तिला भरतीसाठीं जो तुकडा जोडतात तो; पुरवणीचा पदार्थ; पुरवणी; घातलेली भर. ॐ **एकाद्या व्यवहाराचा सांधा बसणें** ( किं० जुळणें ) तो सुरळीतपणें चालू लागणें. **सांधमोड** स्त्री० भिंतीच्या रचाईंत खालच्या थराच्या दोन विटांतील सांध्यावर वरच्या थरांतील वीट येईल अशी रचना.

**साधारण** [ सं० ] वि० १ सामायिक; अनेकांचें. २ मध्यम प्रतीचा; फार उंची नव्हे किं० फार निंची नव्हे असा. ३ समान, सारखा. ४ सर्वांस सारखा लागू असणारा किं० लागू पडणारा; सामान्य; समूहांतील सर्व व्यक्तींत असणारा ( गुण, धर्म ).५ सर्वोपयोगी. ६ ( **न्याय** ) एक हेत्वाभासविशेष. न० १ सामान्य नियम. २ सामान्य गुण. **साधारणा** स्त्री० वेश्या.

**साधित** [ सं० ]१साध्य केलेलें; मिळविलेलें.२ सिद्ध, तयार, किं० सज्ज केलेलें.ॐ**साधित शब्द** पु०एका शब्दाला दुसरा शब्द किं०प्रत्यय जोडून झालेला शब्द; उ० लाकूडतोड्या, दगडफोड्या, इ०. सिद्ध शब्द म्हणजे जो स्वयंसिद्ध शब्द तो किं० ज्याचा घटक अंगें दाखवितां येत नाहींत असा शब्द; उ० दगड, घोडा, इ०.

**सांधित** [ म० सांधणें ] वि० जोडलेला; सांध्यानें बांधलेला, जोडलेला, किं० जुळविलेला.

**सांधी, सांदी** [ म० सांधा, सांद, सांदी ] स्त्री० १ सांधा. २ फट, चीर, भेग. ॐ **सांधीकोंदी, सांदिकोंदी** [ म० सांध+कोंद ] स्त्री० अ० व० १ घर, पेटी, बारदान, इ० तील कोपरे किं० फारसे उपयोगांत नसलेले भाग; उ० तो सांदीकोंदींत पडलेला आणि मी कोठें म्हणून शोधूं ? २ समाजांतील अप्रसिद्ध भाग किं० व्यवसाय किं० कार्यक्षेत्र; उ० मूर्ख राजाच्या कारकीर्दीत विद्वान माणसें सांधिकोंदींत पडून राहातात; थुंकीचाटे मूर्ख असून अधिकाराच्या जागीं बसतात. **सांदिकोंदीचा माणूस** पु० माणूसघाण्या; एकलकोंडा. **सांदीकोंदीचा** वि० समाजाला फारसा ठाऊक नसलेला(माणूस,पदार्थ);अज्ञात. **सांदींतला व्यवहार** पु० चोरटा किं० गुप्त कारभार.**सांदोसांदी** क्रि० वि० कोपऱ्यांत किं० अप्रसिद्ध ठिकाणीं.

**साधु** [ सं० ] वि० १ चांगलें. २ योग्य. ३ गुणी; पुण्यशील. ४ सद्वर्तनी. ५ प्रिय; रम्य. ६ कुलीन. ७ निर्दोष, शुद्ध, यथार्थ (शब्द,विधान). पु० १ निष्पाप माणूस; सरळ वर्तनाचा माणूस;

सज्जन. २ ईश्वरचिंतनांत काळ घालविणारा आणि संसार ज्यानें त्यागिला आहे असा माणूस. ३ व्यापारी. ४ सावकार. **साध्वी स्त्री०** १सत्त्वशील स्त्री. २ पतिव्रता. ॐ **साधुकार पु०** स्तुति; प्रशंसा; तारीफ. **साधुसंत पु० अ० व०** संसार टाकून मोकळे झालले, ईश्वरभजनांत निमग्न असे लोक,–फकीर, तपस्वी, इ०.

**सांधोरी** [ सं० संधि ] **स्त्री०** १ मोठा किं० बोजड सांधा. २ मोठी भेग, चीर, किं० फट. ३ गांवांतील अरुंद रस्ता;बोळ.ॐ**सांधोरी कोनदोरी वि०** मागें ' सांधी,सांदी 'मध्यें 'सांधीकोदी' पहा.

**साध्य** [ **सं०** ] **वि०** १ होण्याजोगें; शक्य.२ मिळण्याजोगें; मिळेल असें. ३ बरा होण्याजोगा ( रोग ). ४ सिद्धीस नेतां येईल असा ( प्रयत्न, खटपट ). ५ प्राप्त झालेलें; मिळालेलें; सफळ. **पु०** देवविशेष. हे बारा आहेत. **न०** १ संपादन; संपादणें. २ सिद्ध करावयाची गोष्ट. ३ ( **न्याय** ) ज्यावर जो कांहीं धर्म आहे असें सिद्ध करावयाचें तो पक्ष आणि जो कांहीं धर्म तो साध्य; उ० ' पर्वत हा धूमवान् आहे म्हणून पर्वत हा अग्निमान् आहे ' ह्या वाक्यांत ' पर्वत ' हा पक्ष आणि 'अग्निमत्व हें साध्य'. मागें' पक्ष ' अर्थ १२ पहा. ४ प्रतिपाद्य विषय. ५ सत्तावीस योगांतील बावीसावा योग. ॐ **कष्टसाध्य वि०** कष्टानें मिळवितां येईल असें. याच सरणीनें श्रमसाध्य, सुखसाध्य, भक्तिसाध्य, ज्ञानसाध्य, इ० चे अर्थ जाणावे. [ सकाळचें.

**सांध्य** [ **सं०** ] **वि०** १ संध्याकाळचें. २

**साध्वी स्त्री०** वर ' साधु ' मध्यें पहा.

**सान, साना वि०** लहान.

**सानक** [ **हिं०** सह्नक्; **अ०** सहन् ] **स्त्री०** १ ताटली; तबक. २ कोणेकाला चरितार्थासाठीं सरकारनें बक्षीस दिलेली जमीन, शेत, इ०. अशा जमीन, शेत, इ० ला ' सानकी जमीन, ' ' सानकी शेत, ' इ० म्हणतात.

**साना वि०** लहान. मागें ' सान ' पहा.

**सांनिध्य** [ **सं०** ] **न०** १ जवळ असणें; शेजार. २ स्थलविशेषीं हजर असणें.

**सांनिपातिक** [ **सं०** ] **वि०** वात, पित्त, आणि कफ, ह्या तीन दोषांच्या विकारानें उत्पन्न झालेला ( रोग ).

**सान्नें, सान्यें** [ **म०** सांड + अन्न ] **न०** ज्याच्या अंगांत भूतसंचार झाला आहे अशा माणसावरून ओवाळून टाकलेला भात, कोंबडें, इ० ( उतरणें, देणें, टाकणें ).

**साप** [ **सं०** सर्प ] **पु०** सरपटत जाणारा एक प्राणी. सापाच्या असंख्य जाति असून कांहीं निर्विष असतात. कोकणांत नागाला ' साप ' म्हणतात आणि घांटावर ज्याला ' साप ' म्हणतात त्याला कोकणांत विशिष्ट नांवें आहेत. फुरसें, मण्यार, घोणस, आधेलें, धामण, जोगी, नानोटी, शेण्या, इ०. ॐ **साप साप म्हणून भुई धोपटणें** १ कोणेकावर खोटें बालंट घेऊन त्याला शिक्षा करणें किं० निंदिणें. २ जेथें भीतीला मुळींच कारण नाहीं तेथें तें कल्पून मोठा कांगावा किं० बोभाटा करणें.

**सांपई स्त्री०** कुबट किं० दमट ( घाण ).

**सापका, सावका पु०** व्यापारांत पत; व्यवहारांत कोणेकाची जी सचोटी ती.

**सापका पु०** कोणेकावर गुदरलेला संकटाचा प्रसंग ( पडणे ); उ० हल्लीं त्याच्या जिवाशीं ( किं० प्राणाशीं ) मोठा सापका पडला आहे.

**सापका** [ **सं०** स्वप्न ] **पु०** झोपेंत किं० जागृतावस्थेंत कोणेकाला पडलेलें स्वप्न किं० झालेला दृष्टांत ( पडणें ).

**सांपट, सापट स्त्री०** लाकूड, भिंत, खडक, सांधा, इ० तील फट, चीर, किं० भेग.

**सापट वि०** कुबट किं० दमट(जमीन); (सरदलेलें धान्य, इ० ).

**सापटणें** पुढें ' सापडणें ' पहा.

**सापटोळी स्त्री०**एका जातीचा विषारी साप.

**सापड** [ **म०** सापडणें ] **पु०** दोरीचा फास, हाताचीं बोटें, इ० च्या पकडींत अडकलेला जो पक्षी, उंदीर, साप, इ०च्या शरीराचा भाग तो ( घेणें ).

**सांपड पु०, स्त्री०** शेताची लावणी, बेणणी, कापणी, इ० कामें करावयाला अनेक गडी एकदम प्रवृत्त झाले असतां त्यांच्या श्रमाच्या परिहारार्थ कांहींनीं गाणे गाणें, कांहींनीं ' भलेरे

दादा, ' ' भले रे भले, ' इ० आरोळ्या ठोकणें, इ० रूप जी उत्तेजनपर कृति केली जाते ती ( घालणें ).

**सापड, सापूड** स्त्री० झाडाची बारीक आणि लवचीक फांदी किं० साल,-भारा किं० मोळी बांधणें ह्या कामासाठीं योजतात ती.

**सापडणें, सापटणें** [ सं० सम्+पद् ] अ० क्रि० १ हरवलेली वस्तु पुन्हा आढळणें किं० मिळणें. २आपण शोधीत आहों तो पदार्थ मिळणें किं०दृष्टीस पडणें. ३चोर,मांजर,पक्षी,इ०आपल्या तावडींत येणें किं०आपल्या कबज्यांत येणें.४लपून बसलेला चोर, भामटा, इ० अधिकाऱ्याच्या दृष्टीस पडणें. ५ कर्मधर्मसंयोगानें अडचणींत गुंतणें किं० अडकणें; उ० मी कालच्या गर्दींत सापडलों आणि पोलिसच्या पांच लाठ्या खाल्ल्या. ६ ( संधी ) मिळणें किं० दिसणें. ७ मिळणें ( सामान्यतः ); उ० फुरसत सापडणें, इ०.

**सापडा** [ म० सापडणें ] पु० १ बांबूच्या काठ्या, झाडाच्या बारीक फांद्या, इ० ताटी,कूड, मांडव, इ०साठीं केलेल्या त्या प्रत्येक.२ माळ्यावर अशाच काठ्या आंथरून करतात ती जमीन. ३ मुकटे, धोतरें, भांडीं, इ० पदार्थ ठेवण्यासाठीं टांगतात ती ताटी; मंडपी. ४ घराच्या छपरावर घातलेलें गवत इ० उडून न जावें किं० सरकूं नये म्हणून खालीं आणि वर काठ्या बांधतात त्या प्रत्येक.

**सांपडी** स्त्री० झाडाची लवचीक फांदी किं० साल,-मोळ्या किं०भारे बांधावयासाठीं योजावयाची.

**सापत्न** [सं०] वि० १ सवतीचा. २ शत्रूचा; शत्रुपक्षाकडचा. ३ शत्रूसंबंधाचा.

**सापत्न्य, सापत्नक** [ सं० ] पु० १ शत्रु. २ सावत्र भाऊ. न० १ सवतपणा. २ शत्रुत्व.

**सांपसारणें** [ म० संपविणें+सारणें ] स० क्रि० १ (अव्यवस्थितपणें इतस्ततः पडलेली चिरगुटें, भांडींकुंडीं, पुस्तकें,इ०) गोळा करून पुन्हा व्यवस्थित रीतीनें ठेवणें. २ ( अनेकांचीं भाषणें, विधानें, उलट सुलट मुद्दे, प्रमाणें, इ० चा विचार करून ) समारोप करणें किं० मत ठरविणें. ३ ( एखाद्या विषयाचा ) उपसंहार करणें.

**सापसुरळी,सापसोळी** स्त्री० चोपई नांवाचा प्राणी.

**सापळा** [ म० सापडणें ] पु० १ वाघ, उंदीर, घूस, इ० ना पकडण्यासाठीं लाकूड, लोखंड, कामट्या, इ० साधनांनीं जी रचना करतात ती. २ (लाक्षणिक) अत्यंत किडकिडीत किं० रोड असा जो मनुष्य, जनावर, इ० प्राणी तो. ३ अस्थिपंजर. ❀ **कोणेकाचा सापळा वळणें** आजार, उपवास, चिंता, इ० कारणांमुळें तो अतिशय रोड होणें किं० त्याची हाडें दिसतील अशी त्याची दशा होणें.

**सापालें** [ म० साप; सं० सर्प+आलय (जागा) ] न० जेथें मनुष्यवसति नाहीं असे पडकें घर,-जेथें जीवजिवाणूं असण्याचा संभव आहे.

**सापिका** स्त्री० १ अर्धा पैसा ह्या किंमतीचें एक प्राचीन काळचें तांब्याचें नाणें.२ साडे सात बिघे किं० दीड रुका हें जमीनीच्या मोजदादीचें माप.

**सापिंड** मागें ' सपिंड ' पहा.

**सापिंड्य** [ सं० ] न० सपिंड असण्याचा गुण.

**सापीण** [ म० साप ] स्त्री० सर्पाच्या जातीची स्त्री.

**सांपूड** स्त्री० बारीक असून लांब असा वेलीचा तुकडा किं० झाडाची साल,-गवताचा भारा, लाकडें, इ० बांधावयासाठीं योजावयाची.

**सापेजणें** अ० क्रि० ( जमीन, भिंत, धान्याचे दाणे, इ० ना ) कुबट घाण येणें.

**सापेक्ष** [ स० ] वि० १ अपेक्षा बाळगून केलेलें किं० ठरलेलें; तुलनेनें ठरलेलें किं० ठरविलेलें;तौलनिक. २ अवलंबणारे;संबद्ध. पु० कृपादृष्टि ठेविणारा; पक्षपाती. **सापेक्ष** स्त्री० (**मराठींत** ) इच्छा, गरज, जरूरी.

**सांप्रत** [ सं० ] क्रि०वि० १ हल्लीं; वर्तमान काळीं. २ योग्य तऱ्हेनें.

**सांप्रदाय** पु० मागें ' संप्रदाय ' पहा. 'सांप्रदाय' हें ' संप्रदाय ' चें अपभ्रष्ट रूप.

**सांप्रदायिक** [ सं० ] वि० परंपरागत; संप्रदाय असल्यामुळें जें रूढ किं० प्रचलित झालें आहे तें; संप्रदायाला अनुसरून करावयाचें असें.

**साफ** [ अ० ] वि० १ स्वच्छ; मलरहित

( पदार्थ ). २ सपाट; खळगे किं० उंचवटे नसलेला ( पृष्ठभाग ). ३ अंधक किं० गढूळ नव्हे अशी ( दृष्टि ). ४ ज्यांत घोटाळा किं० गुंतागुंत नाहीं अशी( कल्पना, युक्ति,विचार).५दोषरहित; पापरहित. ६ ज्यांत कांहीं लबाडी नाहीं असा ( व्यवहार, सौदा ). ७ ज्यांत आडपडदा नाहीं असें ( भाषण, कथन ). ८ ज्यांत कांहीं शंकास्थळें राहाणार नाहींत असें (स्पष्टीकरण,विवरण, इ० ). क्रि० वि० १ स्पष्टपणें; आडपडदा न ठेवतां; संकोच न बाळगतां; न कचरतां. २थेट, मध्यें वळणें नसलेला ( रस्ता, वाट ). ३ पूर्णपणें; सर्वथैव; उ० मी पावसानें साफ भिजलों. ४ न कुथतां,पातळ नव्हे असें(शौचास म्ह०परसाकडे होणें). ५ स्पष्टपणें ( दिसणें ). ६ उघडपणें. ❀ **साफसुफी, साफसफाई स्त्री०** स्वच्छता करणें; नीटनेटकी मांडणी करणें; पदार्थाला उजळा देणें, घासणें, पुसणें, इ० क्रिया समुच्चयानें. **साफसफा वि०** स्वच्छ; स्पष्ट; नीटनेटका; यथास्थित. **साफी स्त्री०** १ साफ असण्याचा गुण. वर सर्व अर्थी ' साफ ' पहा. २ औषधें,भांग,इ० गाळावयाचें वस्त्र.

**साफळा पु०** मागें ' सापळा ' पहा.

**सांब** [ सं० ] **पु०** १ शंकर.२ अजागळ किं० भोळा माणूस,–ज्याला सहज फसवितां येईल.

**साबक** पुढें ' साबीक ' पहा.

**साबका पु०** कोणी माणसानें एकाद्या प्रसंगीं कांहीं विशेष गोष्ट केल्यामुळें त्याची त्या संबंधानें लोकांत जी कीर्ति किं० बदनामी होते ती; कांहीं कारणामुळें कोणेकाचा समाजांत होतो तो लौकिक ( चांगल्या किं० वाईट गुणासंबंधानें ) ( असणें, पडणें, होणें ); उ० तो साप मारणारा असा त्याचा साबका आहे.

**साबडा वि०** साधा; भोळा; अजागळ. ❀ **साबडाभावडा वि०** साधाभोळा; अजागळ; ज्याचे ठायीं छक्केपंजे मुळींच नाहींत असा.

**साबण, साबुण, साबू** [ अ० साबून् ] **पु०** अंग,कपडे,किं०कोणताही पदार्थ स्वच्छ करण्याचा एक रांधा.

**साबणी स्त्री०**मुलांचें गुळाचें एक खाद्य.साबणी पांढरी स्वच्छ असून हलकी असते.

**सांबता, सामता पु०** लाकडाला भोक पाडण्याचें सुताराचें एक हत्यार. हें लोह आणि त्यांत बसविलेलें फळ ह्या रूपाचें असून तें कसणीनें फिरवावयाचें असतें.

**सांबर** [ सं० शंबर ] **पु०, न०** एक चतुष्पाद जनावर,–हरिणाच्या जातीचें; याच्या शिंगांस अनेक फाटे असतात. **सांबरी स्त्री०** १ चकमक, सुई, बिब्बा, नाचकण, इ० विविध पदार्थ ठेवण्यासाठीं सांबराच्या कातड्याची आणि कंबरपट्ट्यांत आडकावावयाची पिशवी. २ सांबराचें आसनार्थ बनविलेलें कातडें. **सांबर भोवली स्त्री०** एक वेली,–जिचा पाला सांबराची पोटदुखी बंद करतो. **सांबरशिंग न०** सांबराचें शिंग,–जें उगाळून कपाळ दुखत असतां त्याचा लेप करतात.

**सांबर, साबर** [ सं० शांबरी ] **न०** इंद्रजाल; जादू; गौडबंगाल.

**साबरमीठ, सांबरमीठ, सांबरीमीठ न०** मातीपासून काढतात तें एक प्रकारचें ' मीठ. ' ह्यालाच ' मेंगळमीठ, ' ' मेंगें मीठ ' असें म्हणतात. [ पहा.

**साबळा, साबळाभाबळा** मागें ' साबडा '

**साबान** [ अ० षअबान् ] **पु०** मुसलमानी वर्षाचा आठवा महिना. मोहोरम, सफर, रविलावल, रविलाखर, जमादिलावल, जमादिलाखर, रज्जब, साबान, रमझान, सव्वाल, जिल्काद, आणि जिल्हेज, हे मुसलमानांचे बारा महिने.

**सांबार, सांबारें** पुढें ' सांभार, ' ' सांभारें ' पहा.

**साबीक** [ अ० ] **वि०** पूर्वीचा. **क्रि० वि०** पूर्वी; अगोदर.

**साबीत** [ अ० ] **वि०** १ अभग्न; अखंड; समग्र. २ सिद्ध केलेलें; सिद्ध झालेलें.

**साबू, साबूण** [ अ० साबून् ] **पु०** मागें ' साबण ' पहा.

**साबू** मागें ' सागू ' पहा.

**साबूत (–द )** मागें ' साबीत ' पहा.

**साबोटी, साबोट्या** [ म० सा ( सहा )+ बोट ] **वि०** ज्याच्या हाताला किं० पायाला सहा बोटें आहेत असा ( मनुष्य ).

**साभडा, साभळा** वि० मागें ' सावडा ' पहा.

**साभण, साभूण** वर ' साबण ' पहा.

**साभणी** वर ' साबणी ' पहा.

**साभार** [ म० स ( सह )+आभार ] क्रि० वि० कृतज्ञतापूर्वक; आभार प्रदर्शित करून ( स्वीकार ).

**सांभार** [ सं० संभार ] पु० तयार करून ठेविलेला मसाला.

**साभारी** पु० १ आश्रयदाता. २ मदतनीस.

**सांभारें** [ म० सांभार ] न० ताकांत काकडी, मुळे, इ० च्या फोडी घालून फोडणी देऊन केलेलें पातळ तोंडीलावणें.

**सांभाळ, सांभाळणें** मागें ' संभाळ, ' ' संभाळणें ' पहा.

**साम** [ सं० सामन् ] न० १ सांत्वन. २ ( राजनीति ) सलोखा; तह; गोडीगुलाबीचें भाषण. ३ सौम्यपणा. ४ स्तोत्र. ५ सामवेद. ६ सुरावर म्हटलेली ऋचा. ० **साम दान दण्ड भेद** पु० अ० व० कोणेकाला वश करून घेण्याचे चार उपाय; ( १ ) गोड भाषण; सलोख्याची वागणूक; ( २ ) दान, पैसे देणें; ( ३ ) पारिपत्य करणें; जबरदस्तीचे उपाय योजणें; ( ४ ) त्याचे नोकरचाकर, मित्र, इ० मध्यें फूट पाडून त्यांपैकीं कांहीं आपणाला अनुकूल करून घेणें, हे चार उपाय राजनीतींत सांगितले आहेत. **सामदाम** [ सं० सामदान ] न० ए० व० (मराठींत) गोडीगुलाबीचे उपाय समुच्चयानें.

**साम** [ सं० स+आम ] वि० शरीरांत न पचलेला जो अन्नांश त्याचेमुळें उत्पन्न झालेला ( रोग इ० ). ह्याचे उलट ' निराम. '

**सामका** [ सं० संमुख ] क्रि० वि० ( लिंगवचनांप्रमाणें फिरणारें ) पुढें, समोर; उ० माझ्या सामका उभा राहू नको.

**सामग्री** [सं०] स्त्री०१कांहीं काम करावयाला जीं साधनें किं० उपकरणें लागतात तीं समुच्चयानें. २ माल; द्रव्य.

**सामग्र्य** [ सं० ] न० १ पूर्णता; पूर्णपणाची स्थिति. २ परिवार. ३ सामग्री; साधनें आणि उपकरणें समुच्चयानें.

**सामंजस्य** [सं०] न०१ योग्यपणा; औचित्य. २ बिनचूकपणा. ३ शाहाणपणा.

**सामंत** [ सं० ] वि० जवळ राहाणारा. पु० १ शेजारच्या देशाचा राजा. २ मांडलिक राजा. ३ शेजारी. ४ सेनापति. ५ एक ते तीन लक्ष इतक्या उत्पन्नाचा राजा. ० **सामंतवासी** वि० शेजारीं राहणारा.

**सामता** पु० लाकडाला भोक पाडावयाचें सुतारलोकांचें एक हत्यार.

**सामदस्तक, सामदस्तखत, सामदस्कत** [ सं० स्व; फा० दस्त ( हात )+अ० खत ] न० सावकाराच्याच चोपडीवर कुळानें घेतलेल्या कर्जाची पावती दिली असते ती.

**सामदान** वर ' साम ' मध्यें पहा.

**सामना** [ हिं० ] पु० १ शत्रूच्या समोर धिटाईनें युद्धास उभें राहणें; युद्ध; लढाई. २ स्पर्धेनें कोणेकाशीं बरोबरी करण्यासाठीं उठणें.

**सामयिक** [ सं० ] वि०१ ठरावाचें; ठरलेलें; ठरावाला अनुसरून असलेलें. २ रूढ. ३ केलेला करार पाळणारा. ४ समयाला योग्य; प्रसंगाला उचित किं० साजेसें. ५ नियतकालिक; विशिष्ट समयीं करावयाचें म्हणून ठरलेलें. ६ तात्पुरतें; सध्याची नड भागविणारें. [ पहा.

**सामर, सामरी** वर ' सांबर, ' ' सांबरी '

**सामरिक** [ सं० ] वि० युद्धांत उपयोगा पडणारें किं० उपयोगांत आणावयाचें ( वाद्य, शस्त्र, इ० ).

**सामर्थ्य** [ सं० ] न० १ शक्ति. २ तेज. ३ पराक्रम. ४ कर्तव्य. ५ वीर्य. ६ ( व्याकरण ) अपेक्षा; अन्वय. ७ ( व्याकरण ) विशिष्ट अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची शक्ति; शब्दाची अर्थबोधकता किं० अर्थव्यंजकता. ८ शब्दांचें एकार्थत्व.

**सामलात** [ अ० ' षामिल ' चें अ० व० षामिलात् ] स्त्री० १ सामिल होणें. २ कट. ३ भागीदारी; कांहीं काम, धंदा, व्यापार, इ० मध्यें कोणेकाची जी वाटणी ती. ० **सामलाती** वि० भागीदारीचा; कोणेकाच्या मदतीनें केलेला किं० चालविलेला.

**सामवर्णे** अ० क्रि० मावणें; समाविष्ट होणें. मागें 'समावर्णे' पहा.

**सामवायिक** [ सं० ] वि० समवाय संबंधानें जुळलेला किं० जुळविलेला. मागें 'समवाय' पहा. पु० मंत्री; प्रधान.

**सामवेद** मागें 'साम' मध्यें पहा.

**सामसूम** न० स्त्री० शांतता; गडबड, गलबला, इ० चा पूर्ण अभाव; निःशब्दता. क्रि०वि० आवाज न होईल अशा प्रकारें ( निजणें, बसणें, कोंहीं काम करणें, इ० ).

**सामक्षा** [ सं० समक्ष ] स्त्री० १ देव, साधुपुरुष, इ० चें दर्शन.२ देव किं० साधु पुरुष यांनीं भक्ताला दिलेला दृष्टान्त किं० साक्षात्कार.

**सामाईक** मागें 'समाईक' पहा.

**सामाजिक** [ सं० ] वि० १ समाजाचा; समाजासंबंधाची ( सुधारणा ); समाजानें कोणेकावर घातलेला ( बहिष्कार ).२ समाजांत रूढ. पु० १ सभासद; पंच. २ पंचाचा निवाडा ऐकावयास बसलेला कोणीही माणूस.

**सामादस्तक, सामादस्तखत,सामादस्तकी** मागें 'सामदस्तक' इ० पहा.

**सामान, सामायन** [फा०सामान्] न०१घर बांधणें किं०पलंग, खुर्ची, देव्हारा, इ०कांहीं पदार्थ बनविणें, ह्या साठीं जरूर जे लाकूड,दगड, चुना, इ० पदार्थ ते समुच्चयानें. २ कारागिराचीं हत्यारें किं० साधनें समुच्चयानें. ३ संसार, कारखाना, इ० तील भांडींकुंडीं, उखळ, मुसळ, जातीं, पेट्या, कपडे,इ० पदार्थ समुच्चयानें. ॐ **सामानसुमान** न० ए० व० सामानविमान.

**सामान मोहोरा** खालीं 'सामान्य' मध्यें पहा.

**सामानाधिकरण्य** [ सं० ]न० १ (न्याय ) एकदेशीत्व; एक कालिकत्व. २ एकार्थत्व. ३ ( व्याकरण ) दोन पदें एका विभक्तींत असणें; उ० 'नीलोत्पल' ( निळें कमळ ) ह्या सामासिक शब्दांत 'नील' आणि 'उत्पल' ह्या दोन पदांची विभक्ति एक म्ह० प्रथमा आहे.

**सामान्य** [ सं० ] वि० १ सर्वांस साधारण किं० सारखेंच लागू पडणारें; समुदायांतील बहुतेक व्यक्तींना लागू पडणारा (गुण, धर्म,नियम), 'अपवाद' च्या व्यावर्तकत्वें.२ सारखें. ३ मध्यम प्रतीचा; फारसा उंची किं० उत्तम नव्हे असा. न० १ सार्वत्रिक नियम. २ साधारण धर्म. ३ जाति; वर्ग. ४ तुल्यता. ५ ( साहित्य ) प्रस्तुत वस्तु अप्रस्तुत वस्तूशीं अगदीं सदृश असल्यामुळें त्या दोहोंतील भेद लक्ष्यांत येत नाहीं, अशा अर्थाच्या वर्णनाला 'सामान्य' म्हणतात. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' या पुस्तकांत पहा. ॐ **सामान्या** स्त्री० वेश्या. **सामान्यनाम** न० जातिवाचकशब्द,-ज्यांत त्या जातीचा धर्म प्रत्येक व्यक्तीवर असतो; उ० झाड, मनुष्य,घर, जनावर, इ०. **विशेषनाम** न० एका एका व्यक्तीचें वाचक जें नाम तें;उ०हिंदुस्तान,महात्मा गांधी,गंगा,इ०. **सामान मोहोरा** पु० सामान्य दर्जाचा माणूस; उत्कृष्ट प्रतीचा नव्हे असा इसम; उ०रामभाऊला कोणी विचारीत नाहीं, ह्या गांवात तो सामान मोहोरा समजला जातो;उ०महात्मा गांधी सामान मोहोरा नव्हे. हा वाक्प्रचार अशिक्षितांत रूढ आहे.**सामान्य नियम** पु०समुदायांतील व्यक्तींना किं० बहुतेक व्यक्तींना लागू पडणारा नियम; याच्या व्यावर्तकत्वें 'विशेष नियम.' **सामान्यरूप** न० ( व्याकरण ) विभक्तीचे प्रत्यय किं० शब्दयोगी अव्यय हीं नामाला लावावयाचीं असतां त्या नामाचें जें रूप होतें तें; उ० 'घर' याचें 'घरा' हें सामान्य रूप होऊन 'घरावर,' 'घराखालीं,' 'घराला,' अशीं रूपें होतात.**सामान्य पक्ष** पु० मध्यम पक्ष; ह्याही टोकाचा नसलेला आणि त्याही टोकाचा नसलेला.**सामान्य सर्वनाम** न०ज्या सर्वनामाचा सामान्यें करून अर्थ होतो तें सामान्य सर्वनाम; उ० कोणी, अमका, सर्व, अवघा, कित्येक, इ०. **सामान्यतः** क्रि० वि० बहुतकरून; सर्वसाधारणपणें.

**सामायन** न० वर 'सामान' पहा.

**सामावणें, सामेणें** वर 'समावणें' पहा.

**सामाशी, सामासकी** [ म० सा ( सहा ) + मास ( महिना ) ] स्त्री० १ दर सहा सहा महिन्यांनीं विणारी गाय. मागें 'समस्की' पहा.

२ मृत मनुष्याच्या प्रीत्यर्थ मरणानंतर सहाव्या महिन्यांत जो जेवण इ० रूप विधि करतात तो ( शूद्रांत ).

**सामाशी** [ म० सा ( सहा )+मासा ( आठ गुंजा हें वजन )] सहा वि०मासे वजनाचें ( वळें, चांदी, सोनें, इ० ).

**सामाशी, सामासिक** [ म० सा ( सहा ) +मास ( महिना ) ] वि० दर सहा सहा महिन्यांनीं करावयाचा ( विधि, अहवाल, तपासणी, इ० ).

**सामाशें, सामासें** [ म० सा ( सहा )+ मास ( महिना ) ] न० मृत मनुष्यांच्या मरणानंतर त्याच्या प्रीत्यर्थ सहाव्या महिन्यांत करावयाचा विधि ( शूद्रांत ).

**सामासिक** [ सं० ] वि० १ समासानें उत्पन्न झालेला ( शब्द ); उ०'चक्रपाणी' ( विष्णु ) हा सामासिक शब्द आहे. २ संक्षिप्त.

**सामिलात** स्त्री० सरकत; भागी. वर 'सामलात ' पहा.

**सामीप्य** [ सं० ] न० १ समीपता; जवळपणा; शेजार. २ एक प्रकारची मुक्ति. मागें ' समीपता ' सर्व अर्थीं पहा.

**सामील** [ अ० षामिल् ] वि० १ अंतर्भूत; समाविष्ट केलेला; आंत घेतलेला. २कांहीं कृत्यांत कोणी कोणेकाला जो मदत करतो तो; एकाद्या कृत्यांतील मदतनीस. ३ गुंतलेला; आडकलेला. ४ मिश्रित; मिसळलेला.

**सामुग्री, सामोग्री** स्त्री० मागें 'सामग्री'पहा.

**सामुदायिक** [ सं० ] वि० समुदायांतील सर्व व्यक्तींनीं एकदम केलेला किंवा आरंभिलेला ( प्रयत्न, चळवळ ); समुदायांतील सर्व व्यक्ति ज्यांत भाग घेत आहेत असा ( कायदेभंग इ० ).

**सामुद्र** [ सं० ] वि० समुद्रासंबंधाचा. पु० समुद्रावरचा व्यापारी. न० १ मीठ. २समुद्रफेस. ३ शुभाशुभ सुचविणाऱ्या हात इ० गात्रावरच्या रेषा समुच्चयानें. ॐ **सामुद्रधुनी** स्त्री० दोन जलाशयांना जोडणारा जलाचा अरुंद पट्टा.**सामुद्रक** [सं०] पु० १ खलाशी. २ जलमार्गानें प्रवास करणारा. **सामुद्रिक** [सं०] वि०समुद्रासंबंधाचें; समुद्रांतील.पु०हात,पाय,इ०कांवरील रेषा पाहून भविष्य सांगणारा. न० हात,पाय, इ०वरील रेषा पाहून भाकितें सांगण्याचें शास्त्र.

**सामेणें** मागें ' समावणें ' पहा.

**सामोग्री** मागें ' सामग्री ' पहा.

**सामोपचार, सामोपाय** [ सं० सामन् ( दोस्तीचें वर्तन )+उपचार, उपाय ] पु० १ सौम्य उपचार; सौम्य उपाय.२ गोड बोलणें किंवा सौम्य वर्तन करणें ह्या रूपाचा इलाज कि०उपाय.

**सामोरा** [ म० समोर ] वि० १कोणेकाच्या भेटीसाठीं पुढें झालेला, आलेला, किं० गेलेला.२ पुढें असलेला किं० आलेला.

**साम्य** [ सं० ] न० १ सारखेपणा; सादृश्य. २ एकरूपता; तादात्म्य. ३ तुल्यता; बरोबरी. ४ एकोपा. ५ समवृत्ति.

**साम्राज्य** [ सं० ] न० १ सार्वभौमत्व. २ एकच्छत्री राज्य. ३ दशलक्ष गांवाचें आधिपत्य. ॐ **साम्राज्यतृष्णा** स्त्री०आपल्या देशानें दुसऱ्या देशास पादाक्रान्त करून त्यांतील लोकांवर राज्य करावें किं० स्वामित्व मिरवावें अशी इच्छा.

**साय** [ सं० शाक ] पु० साग हा वृक्ष.ह्याचें लाकूड तुळया,खांब,इ०करण्या साठीं किं०होड्या, गलबतें, इ० बांधण्यासाठीं योजतात. 'सायवान,' 'सागवान' ह्याच अर्थी. **सायवान** न० सागाच्या झाडांचें रान.

**साय** [ सं० सार ] स्त्री० १ दूध, उसाचा रस, इ० पदार्थांवर अग्निसंयोगानें किं० अन्य कारणांनीं कांहींसा दाट किं० घट्ट जो थर जमतो तो.२मोरींतील रद्दी पाणी,सांचलेलें पाणी,इ० वर जो मळाचा थर जमतो तो.

**सायक** [ सं० ] पु० १ बाण. २ खड्ग. ॐ **सायकासन** न० धनुष्य.

**सायकाल (-ळ )** [ सं० सायम्+काल ] पु० १ संध्याकाळची वेळ. २ दिनमानाच्या पांच विभागांपैकीं शेवटचा विभाग.ॐ**सायंकाळी** स्त्री० एक फुलझाड,-ज्याला संध्याकाळीं फुलें येतात. **सायंकाळें** न० ह्या झाडाचें फूल.

**सायटी** स्त्री०, **सायटें** न०[म० साय]पातळ साय. मागें ' साय ' [सं०सार] सर्व अर्थीं पहा.

**सायंतन** [ सं० ] वि० संध्याकाळचा;संध्याकाळीं करावयाचा.

**सायतुळव स्त्री०** खटारा गाडीचा एक अवयवविशेष.

**सायन** [ सं० ] **न०** अयनांशयुक्त ग्रहगणितविशेष. याच्या व्यावर्तकत्वें ' निरयण. ' ꙮ **सायनपंचांग न०** सायनपद्धतीनें तयार केलेलें पंचांग. **सायनपद्धति स्त्री०(ज्योतिष)**ग्रहाचें स्थान मोजतांना अयनगति हिशेबांत घेण्याची पद्धति. **सायनसौरवर्ष न०** संपातापासून सूर्य निघाल्यापासून पुन: तो तेथें येण्यास लागणारा काळ. ( ३६५ दिवस १४ घटका ३२ पळें ). **सायनखेट, सायनग्रह पु०** ( **ज्योतिष** ) ग्रहाचा रेखांश.

**सायर स्त्री०** मुंग्यांची रांग; माशा, पक्षी, इ० चा थवा. मागें ' साईर ' सर्व अर्थी पहा.

**सायर** [ अ० ] **न०** गुरेंढोरें, सामानसुमान, इ०च्या रहदारीवर जकात किं० अशा जकातीचें नाकें. ꙮ **सायरबाब स्त्री०** वाहतुकीच्या पदार्थांवरची जकात. याच्या व्यावर्तकत्वें ' जमीनबाब '.

**सायरा पु०** पाण्यावर किं० डोळ्यावर येतो तो तवंग किं० मळाचा थर.

**सायरी स्त्री०** एक झाड. **सायरेल,सायऱ्येल न०** ह्या झाडाचें तेल.

**सायल** मागें ' साइला ' पहा.

**सायला** [**सं०**शाक] **पु०**सागाचें झाड; सागाचें लाकूड. ꙮ **सायली, सायवानी वि०**सागाच्या झाडाचा किं० झाडासंबंधाचा.

**सायवान, सागवान** [ **सं०** शाक ] **पु०** सागाचें झाड. **न०**.सागाच्या झाडांचें जंगल.

**सायवान** [ **फा०** ] **पु०** १ छप्पर. २ हत्तीवरच्या अंबारीचा माथा किं० ह्या माथ्याचें छत. ३मांडवाची पडवीच्या आकाराची उतरती बाजू.

**सायसंगीत** [ **म०** संगीत ] **वि०** १ जुळणारा; मेळांत असलेला. २ तंतोतंत; बरोबर. ३ जितक्यास तितका. ४ सायसंगीन.खालीं ' सायसंगीन ' पहा.

**सायसंगीन** [ **म०** संगीन ] **वि०** सर्व अंगें आणि उपांगें ह्यांनीं युक्त; सर्वांगसंपूर्ण.

**साया** [ **सं०** शाक ] **पु०** साग नांवाचें झाड. ꙮ **साया वृक्षांचा राया** सर्व वृक्षांत सागाचा वृक्ष मूल्यवान् किं० उपयुक्त असतो.

**सायास** [ **सं०** स+आयास ] **पु०** प्रयास; खटपट; कष्ट. ꙮ **सायासीं न घडे तें सहज घडे** मोठ्या प्रयासानें जें होत नाहीं तें कधीं कधीं दैववशात् आपोआप घडून येतें.

**सायाह्न** [ **सं०** ] **पु०** संध्याकाळ.

**सायाळ** [ **सं०** शल्य ] **स्त्री०** साळई हा प्राणी. याच्या अंगावर दाभणासारखे असंख्य अवयव असतात. या प्राण्याला 'साळू,' 'सारसई,' ' साळशिंदर ' अशीही नांवें आहेत.

**सायीर** मागें ' साईर ' पहा.

**सायुज्य** [ **सं०** ] **न०** १ सारखेपणा. २ एकरूपता,–चार मुक्तींपैकीं एक. मागें ' सलोकता, ' ' समीपता, ' ' सरूपता ' हे शब्द पहा.

**सायुध** [ **सं०** स ( सह )+आयुध( शस्त्र ) ] **वि०** आयुध म्ह० शस्त्रें घेऊन सज्ज किं० सिद्ध झालेला ( वीर, योद्धा ).

**सार** [ **सं०** ] **पु०, न०** १ अर्क; तत्त्वांश; सत्त्व. २ मुख्य भाग; गाभा. ३ तात्पर्य. ४ बळ; सामर्थ्य. ५ शौर्य; धैर्य. ६ कठिणपणा; टणकपणा. ७ संपत्ति. ८ दूध, दहीं, इ०वर येते ती साय. ९ लोणी. १० ( **साहित्य** ) एकाद्या वस्तूचा उत्कर्ष किं० अपकर्ष चढत्या पायऱ्यांनीं किं० उतरत्या पायऱ्यांनी झाला आहे असें वर्णन असल्यास ' सार ' नांवाचा अलंकार होतो. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **न०(मराठींत)**चिंच,आमसोल, आंबा, इ० आंबट पदार्थ पाण्यांत कोळून त्यांत मीठ, हिंग, इ० घालून जें कालवण करतात ते. **टीप**,–'सार' हा शब्द सर्व अर्थीं मराठींत **न०** योजण्यांत येतो. ꙮ **सारवान् पु०** १ संपन्न; श्रीमंत. २ सत्त्वस; सत्त्वांशयुक्त. **सारलोह** [ **सं०** सार (कठिण, टणक)+लोह(लोखंड)]**न०**पोलाद. **सारगंध पु०** चंदन. **सारद्रुम पु०** खैर. **सारज न०** लोभ. **सारभोक्ता** [ **सं०** सारभोक्तृ ] **पु०** दुसऱ्याच्या श्रमाचें फळ आयतेंच जो भोगतो तो. **सारांश पु०** सारभूत अंश; तात्पर्य; गोळाबेरीज. **क्रि० वि०** एकंदरींत. **सारासारविचार पु०** १ ग्राह्य काय, अग्राह्य काय, ह्या संबंधाचा विचार. २ व्यवहारचातुर्य. ३ विवेक.

**सार न०** होडी, गलबत, इ०चीं अवंजारें

डोलकाठीला ज्या दोरीनें किं० पट्टयानें आवरून बांधतात ती दोरी किं० तो पट्टा.

**सार** [ सं० सार=बुद्धिबळ, सोंगटी ] पु० १ सोंगटी. २ बुद्धिबळाच्या खेळांतील मोहोरें किं० प्यादें. ३ ( लाक्षणिक ) जुगारीचा खेळ; द्यूत. ॐ **टार, गार, नार, सार, ह्या चार वस्तु एका वर्गांतील होत** मागें ' टार ' मध्यें पहा.

**सार** मागें ' साईर ' पहा.

**सारक** [सं०] वि०रेचक;ढाळक. पु० जेपाळ.

**सारक** न० १सुरमाडाची झावळी.२ह्या झावळीचा बुडखा.३ह्या बुडख्याचें पाणी शिंपण्याचें साधन करतात तें. ४ सुरमाडाला फळें ज्या लोंगरासारख्या अवयवाला येतात तो अवयव. ॐ **सारकी** स्त्री०, **सारक,सारूक** न० सुरमाडाच्या झावळीच्या बुडख्याचें जें पाणीशिंपणें करतात तें.

**सारखा** [ सं०सदृश ] वि० १ सदृश;समान; तुल्य; रूप, गुण, आकार, किंमत, योग्यता, इ० बाबतींत बरोबरीचा.२उंचसखल किं०उखीरवाखीर नव्हे असा ( पृष्ठभाग); नितळ ( जमीन, भिंत, इ० ). ३ सर्व मार्गी एकाच गुणधर्माचा. ४ सर्वांशीं एकरूप असें ( वर्तन ). ५ निःपक्षपाती; समभाव. ६ अनुरूप; योग्य; उ० तो वळण्यासारखा मनुष्य आहे; उ० कारलेकराची सरकस पाहण्यासारखी आहे.क्रि०वि०(लिंगवचनांप्रमाणें फिरणारें ) अखंड क्रमानें; न थांबतां;न खळतां; उ० हें पोर सकाळपासून सारखें रडतें आहे; उ० कालपासून पाऊस सारखा पडतो आहे. **सारखवट** न०,स्त्री०, **सारखवटा** पु० [ म० सारखा +वट ( प्रत्यय ) ] सारखेपणा; सादृश्य; साम्य.

**सारखाविणें** [ म० सारखा ] स० क्रि० १ सपाट,नितळ, एकरूप, किं० सदृश करणें.२एकाच किमतीचें किं० महत्त्वाचें किं०परिमाणाचें करणें.

**सारंग, सारण** स्त्री० तोडलेले किं० पाडविलेले आंबे भरावयाचें जाळें.

**सारंग** [ सं० ] वि० चित्रविचित्र. पु० १ काळवीट हा जंगली पशु. २ हरिण. ३ भ्रमर. ४ हत्ती. ५ चातक. ६ एक राग. ॐ **सारंगी** स्त्री० एक तंतुवाद्य. **सारंगा** वि० घोड्याचा एक रंग,–तांबड्यांत काळसर छटा आहे असा.**सारंगिक** पु० पारधी. **सारंग्या** पु० सारंगी वाजविण्याचा धंदा करतो तो.

**सारंगपाट** [ सं० शारिपट्ट ] पु० सोंगट्या, फासे, पट, ह्या साधनांनीं खेळावयाचा एक खेळ.

**सारजा** [ सं० शारदा ] स्त्री० सरस्वती ही विद्येची देवता.

**सारडूळ** न० एक जंगली वृक्ष.

**सारढेकर** पु० आंबट किं० करपट ढेकर.

**सारण** [ सं० ] पु० ( वैद्यक ) संग्रहणी; अतिसार. **सारणी** स्त्री० पंचांग करण्याचें कोष्टक किं० अशीं कोष्टकें समुच्चयानें.

**सारण** [ सं० ] न० सारणें; ढकलणें; लोटणें.

**सारण, सारणि, सारणी** [ सं० ] स्त्री० १ कालवा; पाण्याचा पाट.२ओढा.३पाण्याचा नळ.

**सारण** स्त्री० १ बांबू पिंजून त्याची काढलेली पट्टी. २ आंबे गोळा करावयाचें किं० भरावयाचें जाळें.

**सारण** [ म० सारणें ] न० पुरी, करंजी, गुरवळी, साटोरी, कचोरी, इ०च्या पोटांत भरतात तें गुळखोबरें, खवा, पुरण, इ०.

**सारणिक** [सं०]पु०प्रवासी;पांथस्थ;मुशाफर.

**सारणी** [ सं० ] स्त्री० १ पंचाग करतांना योजतात तीं कोष्टकें समुच्चयानें किं० व्यक्तिशः. २ हीं कोष्टकें लागू करण्याची क्रिया किं० सरणी. ३ पाण्याचा कालवा, पाट, किं० नळ. ४सांडपाणी बाहेर काढून लावण्याची मोरी. ५ आंबे गोळा करावयाचें किं० भरावयाचें जाळें. ६ मोटेचे बैल जीवरून चालतात ती उतरण ( किं० चढण ).

**सारणें** [ सं० 'सृ' चें प्रयोजक; म० 'सरणें' चें प्रयोजक ] स० क्रि० १ बाजूस किं० पलीकडे किं० दूर लोटणें किं० ढकलणें. २ संपवून किं० खर्चून टाकणें; उडविणें. ३ ( काम, कर्तव्य, धंदा, इ० ) करणें, निस्तरणें, संपविणें, पार पाडणें, किं० आवरणें.

**सारथि** [ सं० ] पु० १ घोडे इ० हाकणारा. २ रथ हाकणारा. ३ मदतनीस. ४ कांहीं कामांत मार्गदर्शक; अग्रणी; पुढारी; चालक. ५ वाली; आश्रयदाता.

**सारथ्य** [ सं० ] न० गाडी हाकणें किं० रथ चालविणें हें काम किं० ह्या कामांतील कौशल्य.

**सारपा, सालपा** [ म० साल ] पु० लाकूड तासलें किं० फोडलें असतां निघतात त्या धलप्या व्यक्तिशः किं० समुच्चयानें.

**सारफा, सारफेवार** मागें 'सरफा,' ' सरफेवार ' पहा.

**सारभुंकन** वि० ज्याच्या नाकपुडींत पांढरा ठिबका आहे असा ( घोडा ). असा घोडा अशुभलक्षणी समजला जातो.

**सारभोक्ता** [ सं० सारभोक्तृ ] पु० दुसऱ्याच्या श्रमाचें फळ ज्याला कांहीं कष्ट न करतां म्ह० रिकामें बसून भोगावयास मिळतें असा (माणूस). मागें ' सार ' मध्यें ' सारभोक्ता ' पहा.

**सारमंडल** न० बत्तीस तारा ज्याला असतात असें एक तंतुवाद्य. [ इ० तील.

**सारल्य** [सं०] न० सरळपणा,–भाषण,वर्तन,

**सारवण** [ म० सारविणें ] न० १ शेण, माती, पाणी, इ० द्रव्य जें जमीन, भिंत,इ०सारविण्यासाठीं घेतात तें. २ ह्या द्रव्यानें जमीन, भिंत, इ० वर जो संस्कार करतात तो. ꕥ **धुळीवर सारवण** न० निष्फळ प्रयत्न; जिचा परिणाम फार वेळ टिकत नाहीं अशी कृति.

**सारवत** न० १ नागवेलीवर पडतो तो एक रोग. २ नागवेलीचें जून पान.

**सारवला** पुढें ' सारोळा ' पहा.

**सारवान** [ फा० सार्‌बान् ] पु० उंट हाकण्याचा धंदा करणारा.

**सारविणें** स० क्रि० १ ( जमीन, भिंत, इ० ) शेण, माती, पाणी, रंग,इ०नीं माखणें. २जमीन, भिंत, इ०(शेण, माती, पाणी,रंग,इ०नीं) माखणें.

**सारस** [ सं० ] वि० सरोवरासंबंधाचें. पु० १ एक पक्षी. २ हंस. न० कमळ. **सारसी** स्त्री० सारस पक्ष्याची स्त्री. ꕥ **सारसक** पु० चक्रवाक पक्षी. **सारसिका** स्त्री० चक्रवाक पक्ष्याची स्त्री.

**सारस** पु० १ सुरमाडाच्या झावळीच्या बुंध्याकडचा जो पन्हळासारखा भाग असतो तो.हा भाग वांगीं, मिरच्या,इ० वर पाणी शिंपडण्याचे कामीं योजतात. २ माडाच्या झावळीचा कांहीं भाग विणून असेंच जें पाणी शिंपडण्याचें साधन करतात तें.

**सारसई** स्त्री०१ साळू हा प्राणी.२ह्याचें पिस.

**सारसी** [ सं० ] स्त्री० सारस पक्ष्याची स्त्री. मागें ' सारस ' [ सं० ] मध्यें पहा.

**सारसुसर** स्त्री०, न० १ प्रवासांत बरोबर घेतलेलें सामानसुमान. २ संसारांतील सामानसुमान; सटरफटर; चीजवस्त.

**सारस्थ** ' स्वारस्थ ' चें अशिक्षितांत रूढ रूप. पुढें ' स्वारस्य ' पहा.

**सारस्वत** [ सं० ] वि० सरस्वती संबंधाचें. पु० महाराष्ट्रांतील पंचगौड ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. न० १ वक्तृत्व. २ भाषेंतील वाङ्मय.

**सारा** [ सं० सर्व ] वि० सगळा; अशेष; समग्र; बिनबाकी. ꕥ **सारासुदीस** क्रि० वि० सबंध दिवसभर.

**सारा** पु० १ शेत, वाडी, इ० संबंधानें सरकारला जें देय द्यावें लागतें तें. सारादोरा म्ह० अशा प्रकारचीं हरएक देयें समुच्चयानें. २नेत्रावर येतो तो मळाचा किं० पुवाचा थर. ꕥ **सारेकरी** पु० सरकारांत सारा देतो तो.

**सारांश, सारासारविचार** मागें ' सार ' मध्यें पहा.

**सारि, सारी** [ सं० ] स्त्री० १ सोंगटी. २ बुदबळ. ꕥ **सारिपाट,सारीपाट,सारिंगपाट** पु० सोंगट्यांचा किं० बुदबळांचा पट किं०पाट.

**सारिका, सारी** [ सं० ] स्त्री० एक पक्षी.

**सारिखा** वर ' सारखा ' पहा.

**सारिंगपाट, सारिपाट** वर ' सारि, सारी ' मध्यें पहा.

**सारिगम** मागें ' सरिगम ' पहा.

**सारिफा, सारिफेवार** मागें ' सरिफा, ' ' सरिफेवार ' पहा.

**सारी** वर ' सारिका, सारी ' पहा.

**सारीख, सारूक** न० मागें ' सारक ' न० मध्यें पहा.

**सारूप्य** [ सं० ] न० १ समानरूपता. २ सादृश्य. ३ चार मुक्तींपैकीं 'सरूपता' ही मुक्ति. मागें ' सलोकता, ' ' सरूपता, ' ' सायुज्य, ' हे शब्द पहा. [ मध्यें पहा.

**सारेकरी** पु० सारा देतो तो. मागें ' सारा '

**सारोख, सारूख** [ म० राख+रोख ] वि०

१ पतीचा किं० चांगल्या लौकिकाचा ( माणूस, व्यापारी ). २ प्रामाणिक ( व्यापार, व्यवहार). ३ मूल्यवान; किमतीचा.४खरा,वजनदार (पदार्थ, माणूस ). ५ लबाड्या, लुच्चेगिऱ्या, किं० अन्य दुष्कर्में करून तीं लपविण्यांत आणि आपण साधुवृत्तीचे आहों असें लोकांना भासवून देण्यांत पटाईत ( वाईट अर्थानें ). स्त्री० १ पत; चांगला लौकिक. २ व्यापारांत सचोटी. ३ बाह्यणा; कांगाव; नसत्या पावित्र्याचा देखावा.**॥ सारोखी. सारुखी स्त्री०** चोरी, लबाडी, इ०पापकर्म करून आपण त्यापासून अगदीं अलिप्त आहों असें लोकांना भासविण्याची जी कोणेकाची कुशलता किं० सफाई ती. **सारोखिच्या गोष्टी सांगणें** अलिप्तपणाचा बहाणा करणें;खोट्या सबबी सांगणें.

**सारोळा** [ गुजराथी सर्वाळा ] पु० बेरजेचा ताळा पाहाण्याची एक रीति.बेरजेच्या रकमांतून एक रकम बाजूस काढून बाकीच्या रकमांची बेरीज करून त्यांत ही बाजूस काढून ठेविलेली रकम मिळवून पहिल्या इतकी बेरीज आली तर मिळवणी खरी आहे असें ठरविणें ह्या रूपाचा ताळा.

**सार्थ**[सं०स+अर्थ]वि०१अर्थयुक्त.२उपयुक्त.३ श्रीमंत; धनसंपन्न. ४ उद्दिष्ट मिळवून देणारा किं०हेतु सफळ करणारा ( प्रयत्न ). ५ योग्य; वाजवी; यथान्याय. पु० व्यापारी, प्रवासी, इ० चा तांडा; पशु, पक्षी, इ० चा कळप. **॥ सार्थवाह पु०** व्यापारी.

**सार्थक** [ सं० स+अर्थ+क ( प्रत्यय)] वि० १ अर्थयुक्त. २ महत्त्वाचें. ३ उपयुक्त. ४ उद्दिष्ट मिळवून देणारा ( प्रयत्न ). न० १ (मराठींत) योग्य प्रयत्न. २ ( मराठींत ) फलद्रूपता; योग्य विनियोग; साफल्य; उ० माझा भाचा बी. ए. च्या परीक्षेंत पास झाला, त्याच्या विद्येवर मी जो पैसा खर्च केला त्याचें सार्थक झालें. **टीप,–** ह्या तीन्ही अर्थी'सार्थक'हें मराठी रूप 'सार्थक्य' ह्या शब्दाचें अपभ्रष्ट रूप होय. **॥ सार्थकीं लागणें** प्रयत्न, खर्च, इ० फळास येणें किं० फलद्रूप होणें; उद्दिष्ट सफळ करून देणें.

**सार्थक्य** [ सं०] न० १ सफलता; फलद्रूपता; उद्दिष्टाचें साफल्य. २ अर्थयुक्तता.

**सार्द्र** [ सं० आर्द्र ] वि० जलयुक्त; ओला.

**सार्ध** [ सं० स+अर्ध ] वि० अर्ध्यानें युक्त. 'सार्ध 'याचें मराठी अपभ्रष्ट रूप ' साडा, ' ' साडे, ' असें आहे; उ० साडे आठ इ०. **॥ सार्धशत न०**अर्ध्या शेकड्यानें सहित असा एक शेकडा म्ह० दीडशे.

**सार्प, सार्प्य** [ सं० ] पु० आश्लेषा हे नक्षत्र.

**सार्प** [ सं० ] वि० सर्पासंबंधाचें.

**सार्व** [ सं० ] वि० १ सर्वोपयोगी. २सर्वांसंबंधाचा. **॥ सार्वकामिक वि०** सर्व इच्छा पुरविणारा ( प्रयत्न, विधि, इ० ). **सार्वकालिक वि०** सर्व काळीं किं०सर्व काळांस लागू पडणारें. **सार्वजनिक वि०** १ सर्वांना हितकर. २ सर्वांना लागू पडणारा. ३ सर्व लोकांनीं केलेला ( प्रयत्न, मागणी, इ० ).**सार्वजनीन वि०** १ सर्व लोकांना विदित. २ सर्व लोकांसंबंधाचा. **सार्वधातुक न०** ( **व्याकरण** ) धातूंना लागणारे प्रत्ययविशेष. **सार्वभौतिक वि०** पंचमहाभूतांच्या संबंधाचें. २ प्राणिमात्रांचें. **सार्वभौम वि०**विश्वासंबंधी.**पु० १** चक्रवर्ती राजा;पन्नास कोटी उत्पन्नाचा राजा.२उत्तर दिशेचा अधिष्ठाता हत्ती. मागें'दिग्'मध्यें'दिग्गज' पहा. **सार्वलौकिक वि०** १ सर्वांना विदित. २ सार्वत्रिक. **सार्ववेदस पु०** यज्ञांत सर्वस्वाचें दान करणारा. **सार्ववेद्य पु०** चारही वेद म्हटलेला ( ब्राह्मण ). **सार्वत्रिक** [ सं० ] वि० १ सर्व ठिकाणीं चालू. २ सर्व ठिकाणांस सारखाच लागू पडणारा. ३ सर्व ठिकाणच्या लोकांनीं सारखाच केलेला, आचरलेला, पुकारलेला, रूढ केलेला, ( आचार, बहिष्कार, हरताळ, इ० ).

**सार्ष्टि, सार्ष्टिता स्त्री०, सार्ष्ट्य न०** [ सं० ] पांच प्रकारची मुक्ति मानिली असतां चवथा प्रकार. ह्या प्रकारांत ईश्वराचें सामर्थ्य, सर्वज्ञत्व, वैभव, इ० गुण प्राप्त होतात.

**साल** [ सं०छल्लि,छल्ली=झाड किं०वेली यांची साल] स्त्री० १ झाड,वेली, इ० च्या खोडावरील किं०काष्ठावर जी त्वचा ती. २ फणस, पपनस, इ० फळांची जी जाडी त्वचा ती. न० १ धान्याचे दाणे इ० वरचा जो पातळ पापुद्रा तो. २ प्राण्याच्या शरीराची त्वचा किं० कातडी. ३ प्राण्याच्या शरीरावर दगड, लाकूड, इ० चें घर्षण झाल्यानें निघून जातें तें कातडें. ४ राता-

ण्याचें वाळविलेलें जें बाहेरचें आच्छादन तें. ५ भातशेत नांगरल्यावर त्यांतील केरकचरा इ० गोळा करण्याची फळी. ॐ **सालखाद्या** वि० केवळ नफ्यावर दृष्टि ठेवून कोणतेंही काम करणारा किं० चालविणारा. **सालभेंडा, सालभेंडी** वि० जाड सालीचें ( फळ, झाड, इ० ).

**साल** [ सं० ] पु०१सालई वृक्ष.२कुंपण. ३तट ( सर्व अर्थीं ). ॐ **सालग्राम** पु० शालिग्राम. **सालभंजिका** स्त्री०मुलीची खेळण्याची बाहुली. **सालरस** पु० राळ.

**साल** [ अ० ] न० वर्ष,–बारा महिन्यांचा काळ. ॐ **बहुसाल** वि० दीर्घायुषी. **सालबंदी** स्त्री० १ कौल, हप्ते, इ० अमुक वेळीं अमुक परिमाणाचे शेतकरी, कुळें, इ० नीं सरकारांत भरावे अशा तपशीलाचा ठराव किं० अशा तपशीलाचा ठराव ज्यावर लिहिलेला असतो तो कागद. २ पुजारीपणा, कुलकर्णपणा, इ० जी समाईक वृत्ति तिचा अमक्या सालीं अमक्यानें भोगवटा घ्यावा असा ठराव किं० अशा ठरावाचा कागद. **सालमजकूर** न० चालू वर्ष; ह्लीचें साल. **सालवारी** स्त्री० १ दरवर्षीं घडलेल्या गोष्टींची नोंद. २ अमुक वर्षी अमक्यानें अमुक करावें ह्या संबंधाची नोंद. **सालबोली** स्त्री० एका वर्षापुरता किं० एका वर्षासंबंधाचा ठराव.**सालगुदस्त** [अ० साल्–ए–गुझस्ताह्]न० मागलें वर्ष; गत वर्ष. क्रि० वि० गेल्या वर्षीं; मागल्या सालीं. ह्या अर्थीं ' सालगुदस्ता ' सुद्धां. **सालकरी** पु० जोसपणा, पुजारीपणा, कुलकर्णपणा, इ० वृत्तीचे जे अनेक विभागी त्यांपैकीं ज्या कोणाकडे एका विशिष्ट वर्षाची वृत्ति आली आहे तो त्या वर्षाचा सालकरी. **सालोसाल, सालबसाल, सालदरसाल** क्रि० वि० प्रतिवर्षी. **सालहाल** न० चालू साल. **सालाबाद** [ अ० साल् बअद्=वर्षानंतर ] क्रि० वि० दरवर्षी. ' सालाबाज ' ह्याच अर्थी. **सालाबादप्रमाणें** क्रि० वि० दरवर्षी होतें, पडतें, किं० केलें जातें त्याप्रमाणें किं० त्या सरणीनें.**सालिना,सालीना, सालाना** [ अ०सालियानाह् ] वि०वार्षिक;दरवर्षाचा.**सालहाल, हालसाल** क्रि० वि० दरवर्षी.

**सालजाब** मागें ' जाब 'मध्यें'जाबसाल' पहा.

**सालंकृत** [ म० स+अलंकृत ] वि० अलंकारांनीं शोभविलेली (लग्नांत दान केलेली वधू). **टीप**,–' सालंकृत ' हें मराठी संस्कृत रूप. ॐ **सालंकृत कन्यादान** न० मुलीच्या अंगावर दागिने घालून आणि दोन्ही मांडवांचा खर्च करून कोणा वराला लग्नाच्या विधीनें मुलगी देणें. 'शालंकृत' हें रूप अशिक्षितांत रूढ आहे.

**सालखादें** [ म० साल ( अंगावरील त्वचा ) +खाणें ] न० दंश करणारी एक माशी.

**सालट** [ म० साल ] न० १ थोडेसें साल किं० टरफल ज्यांवर आहे असें (डाळ इ०धान्य). २ दाणे काढून घेतल्यानंतर राहिलेलें शेंगेचें टरफल. अशी जीं टरफलें त्यांना'सालटें'न० अ० व० म्हणतात.

**सालट**[म०साल]वि०ज्यांत कोंडा,टरफलें, इ० अवशिष्ट राहिलीं आहेत असे (तांदूळ,डाळ,शेंगा, इ० ).

**सालटी, सालडी** स्त्री०, **सालटें, सालडें** न० [ म० साल ] १ मनुष्य किं० जनावर ह्यांच्या शरीरांवरील आवरणभूत जें सबंध चर्म तें. २ घर्षणानें मनुष्य किं० जनावर यांचें निघालेलें कातडें.

**सालढोल, सालफळी** [ सं० सल्लकी ] स्त्री० सालई वृक्ष. **सालढोल, सालफळ** न० ह्या झाडाचें फळ.

**सालदाटा, सालमोटा, सालमोठा** [ म० साल ] वि० ज्याच्यावरील साल जाडी आहे असा ( आंबा, केळें, वृक्ष, इ०).**सालदाटी** स्त्री० जिच्या केळ्याचें साल फार जाडी असतें अशी केळीची एक जात.

**सालदोडा** [ म० साल ] पु० १ जाड सालाचा आंबा. २ जाड सालाचें शेंदाड.

**सालपट** [ म० साल ] न० झाडाची, प्राण्याच्या अंगाची, लाकडाची, किं० धान्याच्या दाण्याची त्वचा.

**सालपा** [ म० साल ] पु० लाकडाच्या भलप्या, तास, इ० समुच्चयानें. मागें ' सारपा ' पहा.

**सालफळ, सालफळी** मागें ' सालढोल ' [ पहा.

**सालबंदी, सालबोली, सालमजकूर,**

**साळवारी** मागें 'साल' [ अ० ] मध्यें पहा.

**सालंमिश्री, सालमिश्री** स्त्री० एका झाडाचें मूळ. हें फार पौष्टिक असतें.

**सालमोटा** (–ठा) मागें 'साळदाटा' पहा.

**सालवणी, सोलवणी** [ म० साल+पाणी ] न० आमसुलाचें पाणी,–भाजी इ० मध्यें घालावयासाठीं कोळून तयार केलेलें.

**सालस** [ सं० शाला; शालाशुद्ध; म० साळसूद ] वि० निष्पाप आणि साध्या वर्तनाचा, गरीब ( माणूस, पशु ). ॐ **सालसाई, सालशी** स्त्री० गरीबपणाची आणि साधी वर्तणूक.

**साला** [ सं० श्यालक ] पु० १ बायकोचा भाऊ. २ बहिणीचा नवरा. ३ शिवीप्रमाणें हा शब्द योजतात. **साली** स्त्री० बायकोची बहीण.

**सालाधाला** [ म० धाला=तृप्त ] वि० १ अल्पसंतोषी; अल्पसंतुष्ट. २ निष्पाप; साधा.

**सालोक्य** [ सं० ] न० मागें 'सलोकता' पहा.

**साव** [ हिं० साह् ] पु० १ गहाण ठेवून किं० हातावर किं० पतीवर कर्ज देऊन व्याजावर चरितार्थ चालवितो तो; सावकार. २ पेढीवाला. ३ धनाढ्य माणूस. ४ प्रामाणिक; सरळ; छक्केपंजे न करणारा. **सावकार** पु० १ गहाणाचा व्यापार करून किं० कर्ज देऊन व्याज मिळवून चरितार्थ करतो तो. २ जो कोणाला कर्ज देतो तो. ३ कोणीही श्रीमंत व्यापारी. टीप,–'सावकार' ह्या शब्दाची विनोदी व्युत्पत्ति वस्त्र, वपु, विद्या, विनय, वाणी, आणि वित्त, ह्या सहा वकारांनीं संपन्न माणूस अशी आहे. उंची कपडे, भव्य शरीर, शास्त्रादींत परिचय, नम्रपणा, गोड भाषण, आणि पैसा, हीं सहा ज्याच्यापाशीं आहेत तो. **सावकारी, सावकारकी** स्त्री० सावकाराचा धंदा किं० दर्जा. **सावकारा** पु० १ सावकार लोक समुच्चयानें. २ एकाद्या गांवचे सर्व सावकार समुच्चयानें. ३ कोणा सावकाराच्या देवघेवीचा पसारा किं० विस्तार किं० व्याप. **सावकाराचा नातू** पु० गरीब किं० दरिद्री असून जो मिजास फार करतो तो. **सावसावकारा** पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा.

**साव, सांव** [ सं० स्नायु ] स्त्री० १ बकरा इ० च्या आंतड्याचा जो लांब तंतु काढलेला असतो तो. हा तंतु पिंजाऱ्याच्या यंत्राला किं० सारंगी इ० वाद्यांना लावतात. २ मनुष्य इ० प्राण्याची शीर किं० स्नायू ( शेकणें, फुगणें, दुखणें, चोळणें, इ० ).

**सावकाश** [ सं० स+अवकाश ] वि० १ अघळपघळ; प्रशस्त ( घर, स्थळ ). २ फुरसतीचें. क्रि० वि० १ घाई न करतां; संथपणानें. २ मोकळेपणानें ( बसणें, निजणें, इ० ). ॐ **सावकाशी** स्त्री० सावकाशपणा; मंदपणा; संथपणा. **सावकाशीवर येणें** घाई न करणें; संथपणें कांहीं काम चालविणें.

**सावकें सेवकें** क्रि० वि० टोमणे मारून; घालून पाडून, टोचून, वर्मी लागेल अशा प्रकारें ( बोलणें ); ( बायकांत रूढि ).

**सावचित** [ म० सावध+चित्त ] वि० जागता; जागरूक; सर्व बाजूंकडे लक्ष्य देणारा; सावधान.

**सावज** [ सं० श्वापद ] न० जंगली जनावर. ॐ **सावज पाडणें** वाद, कुस्ती, इ० मध्यें प्रतिपक्ष्याला चीत करणें.

**सावाजिरा** पु० मागें 'शंखजिरें' पहा.

**सावजी** [ म० साव+जी ( प्रत्यय ) ] पु० सावकार; पेढीवाला ( बहुमानांत ).

**सावट** [ म० सावली; सं० छाया ] न०, स्त्री० १ वांगीं, मिरच्या, फुलझाडें, इ० च्या वाढीला अपायकारक अशी जवळच्या एकाद्या वृक्षाची छाया किं० सावली; उ० वडाच्या सावटाला हीं रोपें लावूं नका. २ (लाक्षणिक) अपायकारक किं० बाधक असें सांनिध्य; उ० इंग्रजांच्या सावटाला देशी भाषांना प्रगल्भ दशा कधींच प्राप्त होणार नाहीं. न० समुद्रांत अंतरावर दिसणारें गलबत. ॐ **सावटी** वि० सावलींतील शेत, मळा, बाग, किं० जागा.

**सावड** स्त्री० एकमेकांच्या गरजेच्या वेळीं एकमेकांनीं एकमेकांस बैल, नांगर, इ० उसने देणें किं० उसने देण्याची चाल. मागें 'आवड सावड,' 'इरजीक' पहा.

**सावडणें, सांवडणें** स० क्रि० १ ( इतस्ततः पडलेले पदार्थ ) नीट गोळा करून व्यवस्थितपणें ठेवणें. २ सावरणें.

**सावत्र** [ सं० सापत्न्य ] वि० आपल्या

आईच्या सवतीचा; उ० सावत्र भाऊ, सावत्र बहीण, सावत्र आई. ❀ सावत्र मामा पु०सावत्र आईचा भाऊ. सावत्र चुलता पु०सावत्र आईचा चुलता. सावत्र भाव पु० १ सवतीसवतींचा एकमेकींशीं विरोध. २ पक्षपातबुद्धि.

**सावत्राई** स्त्री० घराच्या बांधणीचा एक प्रकार. घराच्या बांधणीचे इतर प्रकार एकघई, दुघई, तिघई, चौसोपी, शृंगारी, इ०.

**सांवत्सर, सांवत्सरिक** [ सं० ] वि० दरवर्षी होणारें, व्हावयाचें,किं० करावयाचें,(कर्म,—श्राद्ध इ० ). टीप,—'प्रतिसांवत्सारिक ' ह्या अर्थीं.

**सावद** न० जंगली पशु. मागें' सावज ' पहा.

**सावध** [ सं० सावधान ] वि० १ दक्ष;जागरूक. २ आपल्या भोंवतीं काय घडत आहे याची जाणीव ज्याला आहे असा. ३ मूर्च्छेतून देहभानावर आलेला ( होणें ). ४ निद्रेंतून उठलेला; जागा झालेला. ५ आपल्याविरुद्ध शत्रु काय डावपेच करीत आहे ह्याची माहिती ज्याला आहे असा. ६ दारिद्र्यांतून, संकटांतून, आजारांतून, किं०बदनामींतून बाहेर पडून पूर्वींसारखा झालेला. ❀ सावधगिरी स्त्री० १ जागरूकता; दक्षता. २ खबरदारी.

**सावधान** [ सं० ] वि० १ लक्ष्य देणारा; लक्ष्य जो देत आहे असा. २ सावध. ३ दक्ष. ४ जागरूक. ५ ( मराठींत ) लग्न; विवाहविधि. ❀ शुभ मंगल सावधान न० लग्न, मुंज,इ०विधींत अंत:पट काढून टाकतांना भिक्षुक लोक हे शब्द उच्चारतात. ह्यावरून ' कोणेकाचें शुभ मंगल सावधान होणें' म्ह०त्याचें लग्न होणें किं० त्याची मुंज होणें.

**सावधि, सावधिक** [ सं० ] वि० १ मर्यादित; नियंत्रित; गणलेले; गणण्याजोगें; मोजतां येण्याजोगें. २ ( व्याकरण ) क्रियापदाच्या ज्या रूपावरून त्याचा काळ, लिंग, वचन, इ० चा बोध होतो तें ( रूप ) किं० त्या रूपांत असलेलें (क्रियापद). ' बायका गेल्या ' ह्या वाक्यांतील ' गेल्या ' ह्या रूपावरून भूतकाळ,स्त्रीलिंग,अनेकवचन, इ०चा बोध होतो. हें सावधिक क्रियापद. ' जाणें, '' जाऊन, ' जातांना ' हीं रूपें निरवधिक. ३ जें घडावयाला अद्यापि अवकाश किं० विलंब आहे असें; उ० तुमच्या मुलीचें लग्न सावधि आहे,इतक्यांतच मांडव कशाला घालतां? ४ ज्याची मर्यादा अद्यापि संपली नाहीं असा ( भोगवटा, वतन, हक्क ). ५ दूर असलेला (गांव, पल्ला ); उ० रामाचें देऊळ अजून सावधि आहे. ६ तुलनेनें घ्यावयाचें; तुलनात्मक. ७ असाधारण.

**सावन** [ सं० ] पु० १ यज्ञ करणारा. २ यज्ञाची समाप्ति. वि०सौरमानाचें ( वर्ष,महिना, इ० ).

**सावपा** वि० मूर्च्छेंतून उठलेला.

**सावयव** [ सं० ] वि० १ अवयवांनीं युक्त. २ मूर्तिमंत. ३ ( गणित ) अपूर्णांकानें युक्त (पूर्णांक);उ०३$\frac{1}{2}$हा सावयव पूर्णांक.ह्यांत३ हा पूर्ण अंक आणि $\frac{1}{2}$ हा अवयव.

**सांवर** [ सं० शाल्मली ] स्त्री० एक वृक्ष. ह्याच्या फळांत जे तंतु असतात त्यांना 'म्हातान्या' म्हणतात.

**सावर** न०, स्त्री० शीर; स्नायु. प्रयोग बहुधा अ० व०; उ० सावरें धरतात (किं०ओढतात,वळतात, इ० ).

**सावर** [ म० सावरणें ] पु० दारिद्र्याची, आजारीपणाची, किं० अपकर्षाची स्थिति जाऊन पूर्वीची श्रीमंती, आरोग्य, किं० वैभव, यांची कोणेकाला झालेली प्राप्ति; उ० पाटीलबोवांचा आश्रय मिळाल्यापासून गोविंदपंतानें सावर घेतला.

**सावरणें** स० क्रि० १ ( अस्ताव्यस्त पडलेला पदार्थ किं० लोंबत असलेला पदर इ० ) पुन्हा यथास्थानीं ठेवणें. २ ( डळमळणाऱ्या किं० कललेल्या पदार्थाला ) टेका किं० आश्रय देऊन तो पक्का किं० स्थिर करणें. ३ ( कोणेकाचा बसत चाललेला जो धंदा, व्यापार, इ० त्याला ) गिऱ्हाईक, मांडवल, इ० पुरवून पूर्वींसारखा जोरांत चालेल असें करणें. ४ ( ज्याचा तोल गेला आहे असा माणूस, पशु, इ० ना ) हात देऊन पडूं न देणें. ५ पौष्टिक खाद्यें किं० औषधें देऊन ( कोणेकाची ढासळलेली प्रकृति ) पूर्वीप्रमाणें नीरोगी करणें. ६ (बोलतांना झालेली चुकी किं० लिहितांना झालेली चुकी ) नंतर सुधारणें किं० सुधारून घेणें. ७ ( मर्यादा,

नियम, व्रत, इ० ) उल्लंघिलें न जाऊं देणें म्ह० तें पाळणें. ८ काळजीपूर्वक जपणें किं० जोपासणें किं० पाळणें. अ० क्रि० १ ( बिघडलेल्या प्रकृतीनें ) पूर्वीप्रमाणें नीरोगी होणें. २ ( ढासळलेल्या व्यापारानें किं० धंद्यानें ) पूर्वीप्रमाणें वैभवशाली होणें. ३ ( वाईट मार्गास लागलेल्या माणसानें ) पुन्हा सद्वर्तनी होणें. ४(ज्याचा तोल गेला आहे अशा माणसानें ) पुन्हा स्थिर होणें. ५ ( बिनसलेलें काम ) मार्गावर येणें. **टीप.**–ह्याच सरणीनें ' सावरणें ' ह्या क्रियापदाचे इतर अर्थ संदर्भावरून विद्यार्थ्यांनें जाणावे.

**सांवरी** [ **सं**०शाल्मली ] **स्त्री**० मागें 'सांवर' पहा.

**सावर्ण्य** [ **सं**० ] **न**० वर्णांची समता; रंग किं० जाति एक असणें.

**सांवऱ्या** [ **म**० सांवरी ] **पु**० घरावर घालण्यासाठीं तोडलेला सांवरीचा वांसा.

**सांवली** [ **सं**०श्यामलिका ] **स्त्री**० १ छाया; अकाशाला एकाद्या पदार्थाचा अडथळा झाला असतां त्या पदार्थाची जमीन, भिंत, इ० वर पडते ती आकृति. २ ( **लाक्षणिक** ) संबंध, संपर्क ( पडणें ); उ० नवव्या महिन्याची सांवली पडल्यावर स्त्री बाळंतीण झाली असतां मुलाला भय नसतें. ꙮ **एकाद्याच्या सांवलीस उभें न राहाणें** त्याची संगत न धरणें; त्याचा संबंध टाळणें. **कोणेकाची कोणेकावर सांवली पडणें** त्याचे गुण त्याच्या अंगीं येणें; उ० गोविंदाची सांवली तुझ्यावर पडली खास, कारण तूंही गोविंदासारखाच आळशी होत चालला आहेस. **पायाखालीं सांवली येणें** मध्यान्ह होणें. **सांवल्या जाणें** सायंकाळ होणें.

**सावलें** **न**० १ एक प्रकारचें लुगडें. २ स्त्रियांचें कोणतेंही वस्त्र.

**सावशेष** [ **सं**० ] **वि**० ज्यांत मागल्याचा कांहीं अवशेष आहे असा.

**सावसावकारा** [ **म**० साव + सावकारा ] **पु**० **ए**० **व**० व्यापारी लोक आणि त्यांच्या धंद्याचा पसारा समुच्चयानें.

**सावळ** **न**०, **स्त्री**० ताड, माड, सुरमाड, किं० पोफळी ह्यांची फांदी.

**सावळणें** [ **म**० वळणें ] **अ**० **क्रि**० ताप, देवी, कांजिण्या, इ० कमजोर होणें किं० कमजोर होऊं लागणें किं० हटूं लागणें.

**सांवळणें** [ **म**० सांवळा ] **अ**० **क्रि**० १ ( देवी, गळूं, इ० ) काळसर होणें किं० कमजोर होणें. २ ( लांबच्या प्रवासाहून परत आलेलें काळवंडलेलें माणूस ) पूर्ववत् गोरें होऊं लागणें.

**सांवळा** [ **सं**० श्यामल ] **वि**० १ काळसर रंगाचा ( माणूस, अंगवर्ण, इ० ). २तांबूस काळसर ( गाय, बैल, वासरूं ). ꙮ **सांवळा गोंधळ पु**०, **सांवळगोंदें** (–**धें** ), **सांवळें गोंधळें न**० १ काम, कारभार, जमाखर्च, हिशेब, इ० मध्यें जो पराकाष्ठेचा गोंधळ तो किं०जी अव्यवस्था ती. २ सोंवळ्या ओंवळ्याचें मिश्रण किं० त्याचेकडे दुर्लक्ष्य करून जें भोजन तें. ३ स्पृश्यास्पृश्यांचें मिश्रण. ४ कोणत्याही प्रकारची अव्यवस्था; भलत्या वस्तूंचें मिश्रण.

**सावळी** **स्त्री**० १ पोफळीची झावळी किं० फांदी. २ ताड, माड, सुरमाड, किं० शिंदी, यांची झावळी.

**सांवा** [ **सं**० श्यामाक ] **पु**० एक तृणधान्य. ꙮ **सांव्याण न**० सावा धान्याचें तृण किं० पेंढा. **सांवाबीवड स्त्री**०सावा किं०तीळ लावावयासाठीं ढेखळें फोडून जमीन तयार करणें ही क्रिया.

**सावा** **पु**० मागें ' साग, ' ' सागवान ' पहा.

**सावारें** **पु**० **अ**० **व**० शिरा किं० स्नायु ( ओढणें, वळणें, तुटणें ).

**सावित्री** [ **सं**० ] **स्त्री**० १ पार्वती. २गायत्रीमंत्र. ꙮ **सावित्रीव्रत न**० वटपौर्णिमेचें व्रत. **सावित्रीसूत्र न**० यज्ञोपवीत; जानवें.

**सावीज** (–**द** ) मागें ' सावज ' पहा.

**सांव्याण** **न**० वर ' सांवा ' मध्यें पहा.

**साव्वी, सावी** [ **म**०सहावी ] **स्त्री**० स्त्रीच्या प्रसूतीनंतर सहाव्या दिवशीं षष्ठीदेवतेची करतात ती पूजा.

**साशंक** [ **सं**० ] **वि**० १ शंकित; शंकायुक्त. २ चिकित्सेखोर.

**सांशयिक** [ **सं**० ] **वि**० १ अनिश्चित. २ संशययुक्त; ज्याच्या संबंधानें कांहीं शंका आहे

असें. ३ संशयखोर ( माणूस ). न० अनिश्चित कृत्य.

**साष्टांग** [ सं० ] वि० आठ अंगें जमिनीवर टेकून केलेला ( नमस्कार, प्रणाम ). क्रि० घालणें.

**सासपणें** मागें ' चाचपणें ' सर्व अर्थी पहा.

**सासर, सासरें** [ सं० श्वशुरगृह ] न० नवऱ्याचें किं० नवऱ्याच्या बापाचें घर,-' माहेर ' च्या व्यावर्तकत्वें. ॐ **सासरेवाट, सासुरवाट** स्त्री० मागें ' माहेर ' मध्यें पहा. **सासुरवास, सासरेवास** पु०मुलीचें नवऱ्याच्या बापाच्या घरीं वास्तव्य म्ह० राहाणें. २ कोणेकाला कोणेकाच्या सहवासापासून किं० संसर्गापासून होतो तो छळ किं० उपद्रव किं० गांजणूक. **सासुरवाशीण, सासुरवाशी** स्त्री० १ लग्न झाल्यानंतर मुलगी ज्या घरांत जाते तेथील ती सासुरवाशीण आणि पूर्वीच्या घरची ती माहेरवाशीण. २ (**लाक्षणिक**) कोणा समर्थाचा जो आशंकित थुंकीचाटया तो.

**सासरा**[सं०श्वशुर] पु०१बायकोचा बाप.२नवऱ्याचा बाप. ॐ **आजेसासरा** पु० १ नवऱ्याचा आजा. २ बायकोचा आजा. **मामेसासरा** पु० १ आपल्या नवऱ्याचा मामा. २आपल्या बायकोचा मामा.**चुलतसासरा** पु० १ बायकोचा चुलता. २ नवऱ्याचा चुलता.**सासुरवड, सासुरवाडी** स्त्री० बायकोचें माहेर.

**सासू, सासूस** [ सं० श्वश्रू ] स्त्री० १ बायकोची आई. २ नवऱ्याची आई.

**सासूर** न० मागें ' सासर, सासरें ' पहा.

**सांस्थानिक** मागें ' संस्थान ' मध्यें पहा.

**सास्ना** [ सं० ] स्त्री० गाय किं० बैल ह्यांच्या गळ्याखालीं जें चर्म लोंबत असतें तें.

**साहकार, साहकारी, साहाकार** मागें 'सह' मध्यें ' सहकार, '' सहकारी ' पहा.

**साहचर्य** [ सं० ] न० १ सहवास; एकत्र असणें किं० राहणें. २ उल्लेख.

**साहजिक** [ म० सहज ]वि०१ सुसाध्य;सोपें; सुकर. २ ओघानें प्राप्त झालेलें किं० होणारें. ३ निसर्गाच्या नियमाप्रमाणें होणारें किं० घडणारें.

**साहटें** मागें ' सायटी, '' सायटें ' पहा.

**साहणें** [ सं० सह् ] स० क्रि० १ सोसणें; सहन करणें; दुःख, पीडा, चिंता, इ० ना पात्र होणें. २ क्षमिणें; माफ करणें; निमूटपणें किं० न चरफडतां कांहीं अप्रिय गोष्ट पथकरणें. ॐ **साहत साहत** क्रि० वि० १ मोठ्या कष्टानें. २ त्रास सोसून. **साहून पाहून** क्रि० वि० थोडीशी घस किं० हानि किं० तोटा पथकरून; थोडीशी हार खाऊन.

**साहणें** न०धूर जाणे,हवा खेळणें, किं०प्रकाश येणें, यांसाठीं घराच्या माथ्याला ठेविलेलें असतें तें भोक.

**साहन, सहान** वि० लहान. 'लहानसहान' ह्या वाक्प्रचारांत किं० कवितेत मात्र रूढि.

**साहनक** मागें ' सानक ' पहा.

**साहनट, साहनवट** स्त्री० गांवांतील रिकामी किं० ओसाड जागा किं० पटांगण.

**साहरा** [ म० सहकार ] पु० मदत, साहाय्य ( अशिक्षितांत रूढि ).

**साहरा** पु० थर. मागें ' सायरा ' पहा.

**साहरी,साहरेल** मागें'सायरी,*सायरेल'पहा.

**साहस** [ सं० ] न० १ धाडस; पराकाष्ठेचा धीटपणा; मूर्खपणाचें धैर्य. २ अविचार. ॐ **साहसिक** वि० फाजील धाडसाचें; अविचारीपणाचें;फाजील धीटाईचें. **साहसी** वि०साहसाचें कृत्य करणारा.

**साहस्र** [ सं० ] वि० १ हजाराचें.२ हजारपट.'पु०एक हजार शिपायांच्या फौजेचा नायक.

**साहा** [ सं० षष् ] वि० तिहीच्या दुपटीइतका. मागें ' सहा ' पहा.

**साहाय्य, साहायक, साह्य** [ सं० ] न० १ स्नेह. २ मदत.

**साहित्य** [सं०] न० १ कोणत्याही कामाला जरूर अशी जी साधनसामग्री ती. २ एकोपा; ऐक्य. ३ मदत; साहाय्य. ३ जूट. ४ काव्यें, नाटकें, त्यांची रचना, त्यांचे अलंकार किं० गुणदोष, इ० संबंधाचें शास्त्र.

**साही** [ म० सहा ] वि० १ सहापट; उ० एकी साही सहा. २ सहाचे सहा; सगळे सहा.

**साहुकार, साहुकाराचा नातू,** इ० मागें ' सावकार, '' सावकाराचा नातू ,' इ० पहा.

**साहून पाहून** क्रि० वि० मागें ' साहणें ' मध्यें पहा.

**साहेब** [ अ० साहिब् ] पु० १ मालक; यजमान; स्वामी.२कोणीही युरोपी टोपीवाला.३बहुमानार्थक शब्द; उ० तात्यासाहेब; रावसाहेब; ताईसाहेब; बाईसाहेब; इ०. **टीप**,–स्त्रियांच्या नांवापुढें ' साहेब ' आला असतां **स्त्री० अ० व०** किं० **न० अ० व०** होतें; उ०बाईसाहेब आल्या, ताईसाहेबें आलीं. ※ **साहेबनौबत स्त्री०** राजा इ० बड्या माणसाच्या स्वारीपुढें हत्तीच्या पाठीवर घालून वाजवीत जातात ती नौबत.

**साहोत्रा** [ म० सहा+उत्तर ] पु० १ दरसाल ( किं० दरमहा )शेंभरास सहा हा व्याजाचा दर. २ कोणेक गांवाच्या उत्पन्नांत जो कोणेकाचा शेकडा सहा प्रमाणें उत्पन्न घ्यावयाचा हक्क असतो तो किं० अशा हक्कानें घेतलेली रकम.

**साह्य न०** मागें ' साहाय्य ' पहा.

**साह्यटें, साह्यरा,** इ० मागें ' सायटें, ' ' सायरा, ' इ० पहा.

**साह्या पु०** इमारती लाकडाचा एक वृक्ष. मागें ' साग, ' ' साय ' पहा.

**साळ** [ सं० शाला ] **स्त्री०** शाळा ( अशिक्षितांत रूढि ). मागें ' शाळा ' पहा. ※ **साळसूद वि०** मागें ' शाळा ' मध्यें पहा. **टांकसाळ स्त्री०** नाणीं पाडण्याचा सरकारी कारखाना. **साळ घालणें** जितकें लांब सणंग विणावयाचें असेल तितक्या अंतरावर जमीनीवर खुंट्या ठोकून त्यांचे भोंवतीं सूत किं० रेशीम गुंडाळून इष्ट मापाचा ताणा करणें. **साळ मांडणें** तात्या-पंतोजीनें शाळा काढणें किं० स्थापणें.

**साळ** [ सं० शालि ] **स्त्री०** १ भाताची एक जात.२ टरफलासहित भात.

**साळई** [ सं० शल्य ] **स्त्री०** दाभणासारखे केश किं० पिसें ज्याच्या अंगावर असतात असा एक प्राणी. ह्या केशांना किं० पिसांना व्यक्तिशः ' साळपीस, ' ' शाळशीत, ' ' साळशीद, ' ' साळशीट ' म्हणतात.

**साळकेंगोळके पु० अ० व०, साळकाया माळकाया स्त्री० अ० व** कोणी तरी माणसें,–ज्यांचीं नांवें गांवें सांगण्याचें महत्त्व नाहीं; उ० चार साळके गोळके ( किं० साळकाया माळकाया ) एके ठिकाणीं जमल्यानें असलीं मोठीं कामें कधींही होत नसतात.

**साळकोजी माळकोजी पु०** कोणीतरी माणूस,–ज्याचें नांव सांगण्याची जरूरी नाहीं; एक माणूस,–मग तो कोणी कां असेना. मागें ' गोमा ' मध्यें अशा जातीचे इतर शब्द पहा.

**साळखादें न०** एक प्रकारची माशी.

**साळजिवाद न०** मागें ' साळई' पहा.

**साळढाळ वि०** साधा, धोपटमार्गी ( माणूस, व्यवहार ).

**साळणें** [ म० साल=त्वचा, कातडें ] **स० क्रि०** १ गुळगुळीत किं० साफ करण्यासाठीं (लाकूड इ०) तासणें. २ (झाडाची) खची करणें. ३ (झाड, प्राणी, इ० चीं) साल किं० कातडें सोलून काढणें.

**साळपीस न०** मागें ' साळई ' मध्यें पहा.

**साळमाळ** [ म० माळ ( जमीन ) ] **वि०** खूपच लांब; लांबलचक; अतोनात विस्तीर्ण ( घर, शेत, कारखाना, इ० ).

**साळवट, साळवटी, साळवी** [म० साळी=विणणारा ] **वि०** साळयानें विणलेला ( धोतरजोडा, लुगडें, इ० ). ह्याच्या व्यावर्तकत्वें 'कोष्टी' किं० ' कोष्टाऊ. '

**साळवण (-न )** [ सं० शाली+तृण ] **न०** भाताचें तृण; भातेण.

**साळवाडा** [ म० साळी + वाडा ] **पु०** गांवांतील साळी लोकांच्या वसतीचा मोहल्ला.

**साळशीत (-द, -ट )** मागें ' साळई ' मध्यें पहा.

**साळसुदकी** खालीं ' साळसूद ' मध्यें पहा.

**साळसूद (-ध )** [ सं० शाला+शुद्ध ] **वि०** साध्या वर्तनाचा; छक्केपंजे न करणारा; सरळ; प्रामाणिक. ※ **साळसुदकी, साळसुधकी स्त्री०** वर्तनाचा साधेपणा किं०सरळपणा;प्रामाणिकपणा.

**साळहोत्री, साळोत्तरी, शालिहोत्री** [ सं० ] [शालिहोत्र=घोडा; सं० शालिहोत्रिन्=घोड्यांचे गुणधर्म जाणणारा ] **पु०** १ घोड्याच्या जाति, गुणधर्म, इ० संबंधाच्या शास्त्रांत प्रवीण. २ घोडवैद्य. [पहा.

**साळा पु०** बायकोचा भाऊ. मागें ' साला '

**साळॉऊ** मागें ' साळवट ' पहा.

**साळाभोळा** [ **म०** शाला+भोळा ] **वि०** साधा; सरळ वर्तनाचा; छक्केपंजे न करणारा.

**साळिंदर, साळिंद्र न०** १ साळू किं० साळई नांवाचा प्राणी. २ ह्या प्राण्याचें पीस.

**साळी** [ **सं०** शालि ] **स्त्री०** न सडलेला तांदूळ.

**साळी** [ **सं०** शाल ] **स्त्री०** एक जंगली वृक्ष.

**साळी पु०** रेशमाचीं किं० कापसाचीं वस्त्रें विणणाऱ्या हिंदूंची एक जात किं० ह्या जातीचा कोणी इसम. ꕥ **साळीमाळी पु० अ०** व० अशिक्षित असे धंदेवाले लोक. **साळ्याची गाय आणि माळ्याचें वासरूं** १ एकाद्या कार्याच्या सिद्धतेसाठीं भिन्न भिन्न ठिकाणांहून सामग्री गोळा करणें हा प्रकार.२ विजोड जुळणी; परस्परांशीं सुसंगत नसलेल्या पदार्थांची किं० माणसांची जुळणी ( निंदेंत ).

**साळी** [ **सं०** श्याली ] **स्त्री०** बायकोची बहीण. [ सायाळ.

**साळी** [ **सं०** शल्य ] **स्त्री०** एक जंगली प्राणी;

**साळुंकी, साळुंखी, साळोंकी, साळोंखी स्त्री०** एक पक्षी,-मंजुळ वाणी बोलणारा.

**साळू** [ **सं०** शल्य ] **स्त्री०** सायाळ किं० साळई हा प्राणी. [ पहा.

**साळेंगोंदें (-धें ) न०** मागें ' सावळें गोंधळें'

**साळोंका (-खा ) स्त्री०** मागें ' शाळुंका (-खा ) ' पहा.

**साळोत्तर, साळोत्र** [सं० शालिहोत्र=घोडा] **न०** घोड्यांच्या जाति, त्यांची निपज, त्यांचीं लक्षणें, त्यांचे रोग,इ० संबंधाचें शास्त्र. ꕥ**शाळोत्तरी पु०** घोड्यांचा वैद्य.

**साळ्या वि०** पावसाळ्याच्या नंतर पिकणारा ( तीळ ). प्रयोग ' साळे तीळ ' असा बहुधा **अ०** व० होतो. गोडे तीळ म्ह० पावसाळ्यांत पिकलेले तीळ.

**साक्ष** [ **सं०** साक्ष=पुरावा ] **पु०** ज्याणें कांहीं वृत्तान्त डोळ्यांनीं पाहिला आहे असा माणूस. **स्त्री०** १ पुरावा. २ पुरावा देणाऱ्या माणसाची जबानी. ३ साक्ष. पुढें ' साक्षा ' पहा. ꕥ **साक्ष घालणें** एकादा दस्तऐवज आपल्या समक्ष झाला आहे अशा अर्थाची कोणेकानें त्या दस्तऐवजावर घातलेली आपली सही. **साक्षमोज्यानें, साक्षमोझ्यानें क्रि० वि०** पुराव्यावरून; पुराव्यानें.

**साक्षर** [ **सं०** ] **वि०** १ सुशिक्षित. २ ज्याला लिहितां वाचतां येतें असा;अगदींच अडाणी नव्हे असा. ३ ( **थट्टेंत** ) अगदीं ढ; अगदीं अशिक्षित; मूर्ख. **टीप,**-' कांहीं येत नाहीं ' हीं सहा अक्षरें ज्याच्या संबंधानें योजतां येतील असा.

**साक्षा** [ **सं०**साक्ष्य=पुरावा ] **स्त्री०** १ देवाचें दर्शन, औषधाचा गुण, मंत्राचा परिणाम,जोशानें सांगितलेलें भाकित, इ० प्रत्यक्ष अनुभवास किं० दृष्टोत्पत्तीस किं० प्रतीतीस येणें. २ पुरावा;कांहीं गोष्ट सिद्ध करणारा पदार्थ, कागद, खूण,वृत्तान्त, इ०.

**साक्षात्** [ **सं०** ] **क्रि० वि०** १ स्वता; उ० तुम्ही साक्षात् जाऊन पहा, दुसऱ्या कोणास पाठवूं नका. २ प्रत्यक्षपणें; उ० साक्षात् दृष्ट. ३ मूर्तिमंत; उ० माझ्या पुढें ईश्वर साक्षात् उभा ठाकला. ४ उघडपणें; राजरोस. **श० यो० अ०** कोणेकाच्या देखत किं०समोर;कोणी हजर असतां; उ० माझ्या साक्षात् असें बोलणें तुला शोभत नाहीं. ꕥ **साक्षात्कार पु०** १ प्रत्यक्ष ज्ञान; स्वताचा अनुभव; प्रतीतीस येणें; दृष्टान्त.२ देव, साधुपुरुष, इ० चें आपल्यापुढें स्वप्नांत किं० आपल्या जागृतावस्थेंत येणें किं० त्यांणीं येऊन सांगितलेली गोष्ट(होणें, दाखविणें). **साक्षात्कारी वि०** ज्याला देवाचें किं० साधूचें दर्शन स्वप्नांत किं० जागृतावस्थेंत होतें किं० झालें आहे असा. **साक्षातूकृत वि०** १ स्वता अनुभविलेला किं० पाहिलेला किं० जाणलेला. २ स्वता केलेला किं० रचिलेला ( ग्रंथ, श्लोक, इ० ).**साक्षात्संबंध पु०** प्रत्यक्ष झालेला किं०घडलेला संबंध.याच्या व्यावर्तकत्वें 'परंपरेनें झालेला, आलेला, किं० घडलेला संबंध. ' **साक्षाद्द्रष्टा पु०** ज्याणें कांहीं गोष्ट स्वताच्या डोळ्यांनीं पाहिली आहे असा.

**साक्षी** [**सं०** साक्षिन्] **वि०** पाहणारा. **पु०** १ साक्षीदार. २ परमात्मा. ꕥ **साक्षीदार पु०** न्यायाच्या कचेरींत कांहीं गोष्ट खरी म्हणून सांगणारा किं० कांहीं विधान करणारा. **साक्षी**

स्त्री० न्यायाच्या कचेरींत कोणी खरी म्हणून सांगितलेली गोष्ट किं० केलेलें विधान. **साक्षी मोज्या पु०** साक्षीदार; कांहीं गोष्टीला पुरावा देणारा. **कांहीं लेखावर साक्षी(किं०साक्ष)घालणें** लेख आपल्या देखत लिहिला आहे असें म्हणून त्या लेखावर सही करणें.

**साक्षेप** [सं०] पु० १ एकादी गोष्ट करण्याविषयीं किं० साधण्याविषयीं जो कोणेकाचा दृढनिश्चय किं० प्रयत्न तो. २ कोणेकाला कांहीं गोष्टीचा जो पराकाष्ठेचा नाद तो किं० जी आवड ती; उ० त्याला सतारीचा भारी साक्षेप आहे. ३ कांहीं कृत्य नियमितपणें आणि न चुकतां करण्याकडे प्रवृत्ति किं० ओढा; उ० तो साक्षेपानें संध्याकाळच्या वेळेस निजतो; उ० कथाकीर्तनास जाण्याचा त्याचा साक्षेप आहे. ꣸ **साक्षेपानें क्रि० वि०** मुद्दाम; जाणून बुझून; न चुकतां; निश्चयपूर्वक. **साक्षेपी वि०** कांहीं गोष्ट न चुकतां करणारा; निश्चयी. 'साक्षाप,' 'साक्षोपी' हीं रूपें ह्याच अर्थी अशिक्षितांत रूढ आहेत.

**साक्ष्य** [ सं० ] **वि०** दृश्य. **न०** १ पुरावा; साक्ष. २ कांहीं लेख आपल्या देखत झाला आहे म्हणून त्यावर घातलेली सही. ३ साक्षीपत्र.

**सिकंजी** [ फा० सिकंजीन् ] **स्त्री०** लिंबाचें सरबत.

**सिकता** [ सं० ] **स्त्री०** १ वाळू. २ मुतखडा हा रोग. ꣸ **सिकतातैल न०** अशक्य किं० असाध्य गोष्ट. **सिकतामेह पु०** लघ्वींतून रेव जाणें हा रोग.

**सिकंदर** मागें ' शिकंदर ' सर्व अर्थी पहा.

**सिक्त** [ सं० ] **वि०** १ शिंपडलेलें ( पाणी, तूप, दूध, इ० ). २ ज्यावर पाणी इ० शिंपडण्यांत आलें आहे असा ( सांजा, गाजी, इ० पदार्थ ).

**सिंचणें** [ सं० सिच् ] **स० क्रि०** ( पाणी, दूध, तूप, इ० ) शिंपडणें म्ह० थेंबांच्या रूपानें ओतणें, फेकणें, मारणें, इ०. २ पाणी, दूध, इ० चा ( पदार्थावर ) शिडकाव करणें.

**सिंचन** [ सं० ] **न०** पाणी, दूध, गुलाबपाणी, इ० शिंपडणें ही क्रिया.

**सित** [ सं० ] **वि०** शुभ्र; पांढरा. **पु०** हिंदू महिन्याचा शुक्लपक्ष.

**सिता स्त्री०** १ साखर. २ खडीसाखर. ३ चांदणें. ४ पौर्णिमा. ꣸ **सितधातु पु०** खडू.

**सिताब, सिताबी** मागें 'शिताब,' 'शिताबी' पहा.

**सिती** मागें ' शिती ' पहा.

**सितैन** [ अ० ] **वि०** साठ. मागें ' शितैन ' पहा.

**सिंदूर** [ सं० ] **पु०** १ शेंदूर. २ एक वृक्ष.

**सिद्ध** [ सं० ]. **वि०** १ पूर्णतेस पोंचलेलें, शेवटास गेलेलें; साध्य केलेलें. २ पुराव्यानें किं० प्रमाणानें खरें किं० योग्य किं० न्याय्य म्हणून ठरलेलें. ३ ज्याचा निकाल किं० निर्णय झाला आहे असा ( वाद, तंटा, खटला). ४ ठरविण्यांत आलेला निश्चित ( नियम, कायदा ). ५ शिजवून, भाजून, उकडून, किं० तळून तयार केलेला ( खाद्य, पेय, औषध, इ० पदार्थ). ६ कांहीं काम करण्यास तयार किं० सज्ज झालेला किं० केलेला ( माणूस, गाडी, घोडा, इ० ). ७ रसायन, किमया, मंत्रतंत्र, इ० मध्यें वाकबगार झालेला ( माणूस ); तज्ञ; पटाईत; निष्णात. ८ ( **व्याकरण** ) ज्या शब्दाचे घटक अवयव सांगतां येत नाहींत असा ( शब्द ). याच्या व्यावर्तकत्वें ' साधित. ' ९ प्रख्यात. १० लागू पडणारा ( नियम, कायदा, मंत्र, इ० ). **पु०** १ उपदेव. २ साधु; ऋषि ( व्यास इ० ). ३ त्रिकालज्ञानी. ४ मांत्रिक. ५ ज्याला अष्टसिद्धि मिळाल्या आहेत तो. ६ ज्याला मोक्ष मिळाला आहे तो. ७ एकविसावा योग. ꣸ **सिद्धान्त पु०** १ तर्कानें ठरविलेला नियम. २ निश्चित मत. ३ उपपत्तियुक्त ग्रंथ. **सिद्धासन न०** योग्याचें एक आसन. **अनुभवसिद्ध वि०** अनुभवानें किं० प्रत्यय आल्यावरून खरें, योग्य, किं० न्याय्य म्हणून ठरलेलें. **शास्त्रसिद्ध वि०** शास्त्रावरून ठरलेलें; ज्याला शास्त्रांत आधार आहे असें. **अनादिसिद्ध वि०** पूर्वीपासून चालू असलेलें, स्थापित झालेलें, रूढ, किं० प्रचलित. मागें 'अनादि' मध्यें पहा. **टीप**,–धातूच्या 'ऊन' प्रत्ययान्त रूपापुढें ' सिद्ध ' शब्द लाविल्यानें ती क्रिया करून पूर्ण किं० तयार झालेला असा अर्थ होतो; उ० करून सिद्ध, अनुभवून सिद्ध, इ०. **सिद्धसाधक पु० अ० व०** एकमेकांस पाठबळ

किं० दुजोरा देऊन कोणेकाला फसवूं इच्छिणारे दोन भामटे किं०लुचे. **सिद्धवत्** वि०गृहीत कृत्य किं०ठरलेला सिद्धान्त ह्या दृष्टीनें स्वीकारावयास पाहिजे असा. **सिद्धसाधनदोष** पु०जें ठरलेलें किं० निश्चित झालेलें आहे तें ठरवीत किं० निश्चित करीत बसणें हा दोष. **सिद्धस्थाली** स्त्री० ज्या स्थालींतून हावा तो इष्ट पदार्थ इच्छा केल्याबरोबर प्राप्त होतो अशी स्थाली ( म्ह० परात, ताट, इ० ). **सिद्धाई** स्त्री० आणिमा, महिमा, इ० ज्या अष्टसिद्धि त्यांची प्राप्ति ( अशिक्षितांचा शब्द ).

**सिद्धि** [ सं० ] स्त्री० १ अणिमा, महिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशिता, वशिता, कामावसायिता, ह्या ज्या अष्टसिद्धि त्या प्रत्येक. २ कांहीं अद्भुत गोष्ट करण्याचें सामर्थ्य (सामान्यत: ). ३ तप, ईश्वरसेवा, ध्यान, कांहीं विधि, कर्म, इ० चें जी सफळता ती किं० जें फल तें.४ कोणत्याही ध्येयाची सफलता किं० प्राप्ति. ५ वादाचा निकाल; तंट्याचा निर्णय. ६ तयारी; सज्जता; कोणतीही गोष्ट करावयाला सिद्ध असण्याची स्थिति. ७ औषधी रांधा, कांहीं खाद्य किं० पेय, इ० वर अग्न्यादि संस्कार होऊन जी पूर्णता ती. ८ मोक्ष. ९ वैभव; समृद्धि.१० सत्तावीस योगांतील सोळावा. ११ संपादणें; मिळविणें. १२ पुरावा. १३ सत्यता. १४ कर्जाची फेड. १५ पूर्ण ज्ञान. ॐ **सिद्धीस जाणें** सफल होणें.

**सिद्दी** पु० हबसाणांतील कोणीही माणूस.

**सिंधु** [ सं० ] पु० १ समुद्र. २ हत्ती. ३ हत्तीचा मद. ४ पंजाबांतील नदीविशेष; सिंधुनद. ॐ **सिंधुवार** पु० जातिवंत घोडा. **सिंधुपुष्प** न० शंख.

**सिनीवाली** [ सं० ] स्त्री० अमावास्येचा पूर्वभाग ( चंद्रयुक्त ); अमावास्येच्या आधला दिवस,-ज्यांत चंद्राची अत्यल्प कला दृग्गोचर असते.

**सिंह** [ सं० ] पु० १ मृगांचा अधिपति. २ ( ज्योतिष ) बारा राशींपैकीं पांचवी रास. ३ ( समासाच्या उत्तरपदीं ) श्रेष्ठ; उ० पुरुषसिंह, पंडितसिंह, रघुसिंह, इ०. **सिंही** स्त्री० १ सिंहाच्या जातीची स्त्री. २ राहूची माता. **सिंहावलोकन** न० आपण करावयाला घेतलेलें काम किती झालें किं०कसें झालें, हे पाहाण्यासाठीं आपण कांहीं वेळ काम थांबवून झालेल्या कामाकडे नजर फेकतों तें; झालेल्या कामाचे निरीक्षण किं०आढावा. **टीप**,—कांहीं मार्ग चालून गेल्यावर सिंह मागें वळून पाहातो ह्या त्याच्या वर्तनावरून 'सिंहावलोकन' ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति. **सिंहावलोकनन्याय** पु०झालेल्या कामाचें वेळोवेळीं निरीक्षण करणें ही सरणी. **सिंहासन** पु० राजाचें दरबारी आसन. **सिंहतल** पु०एकाला एक असे जोडलेले तळहात. **सिंहनाद** पु० १ सिंहाची गर्जना. २ रणांगणावर वीर करतात ती गर्जना. ३ शंकर. ४ देवळाच्या गाभाऱ्यांत शांतता असली म्हणजे जो एक बारीक नाद ऐकूं येतो तो.५गुहेंत एकदम वारा शिरल्यानें होतो तो ध्वनि. **सिंहयाना, सिंहरथा** स्त्री० पार्वती. **सिंहस्थ** पु०१ सिंहराशींत असलेला गुरु हा ग्रह. २ सिंहराशींत गुरु हा ग्रह असण्याचा काळ. **सिंहकटी** स्त्री० सिंहाच्या कंबरेसारखी बारीक कंबर जिची आहे अशी स्त्री. **सिंहद्वार** न० राजवाड्याचा, किल्ल्याचा, किं०देवळाचा अगदीं पुढचा दरवाजा. **सिंहावतार** पु० क्रोधानें मनुष्याचें होतें तें उग्र रूप ( धारण करणें, होणें, दाखविणें).

**सिंहल, सिंहलद्वीप** [सं०] न० लंका हें बेट.

**सिंहिका** [ सं० ] स्त्री० राहूची आई. मागें 'सिंह' मध्यें 'सिंही' अर्थ २ पहा.

**सिंहीण** [ म० सिंह ] स्त्री० सिंहाची स्त्री; सिंही.

**सीता** [ सं० ] स्त्री० १ नांगराचें तास. २ नांगरलेली जमीन. ३ रामाची पत्नी; जानकी. ॐ ४ स्वर्गांतून गंगा भूतलावर पडली तेव्हां तिच्या प्रवाहाचे जे चार फाटे झाले त्यांपैकीं पूर्वेकडचा फाटा. ५ फळें, धान्यें, इ० ची अधिष्ठात्री देवता. ६ ( भिक्षुकांच्या सांकेतिक भाषेंत ) अधेली; अर्धा रुपाया ही दक्षिणा. ह्या अर्थी 'सीताबाई' सुद्धां. भिक्षुकांच्या भाषेंत 'राम' म्हणजे रुपाया. मागें 'राम' अर्थ ३ पहा. ॐ **सीतादेवी** स्त्री० १ शेतकापणीचे वेळीं महाराचा हक्क म्हणून राखून ठेविलेला कोपरा. २ खळ्यावरील

धान्य तेथून मालकानें उचलून नेल्यावर तेथें जो धान्याचा अवशेष राहिलेला असतो तो. हा महाराचा हक्क समजला जातो. **सीतेचा पोल्हारा पु०** मोठ्या आकाराची आणि तपकिरी वर्णाची कवडी. **सीताफळ न०** खवलेदार त्वचेचें एक फळ. हें रामफळाच्या वर्गांतील फळ आहे. त्याला 'शिताफळ ' असेंही व्यवहारांत म्हणतात.

**सीत्कार पु०, सीत्कृति स्त्री०** [ सं० ] थंडी, दुःख, इ०मुळें तोंडांतून निघणारा सशब्द वारा.

**सीम फा०** [ सिव्वुम्=तिसरा ] **वि०** १ तिसरा. २ तिसऱ्या म्ह० अगदीं हलक्या प्रतीची ( जमीन ).

**सीमंत** [ सं० ] **पु०** १ हद्द. २ हद्दीची खूण. ३ डोईवरील केशांचा भांग. ॐ **सीमंतोन्नयन न०, सीमंतोत्सव पु०** गर्भिणी स्त्रीच्या चवथ्या, सहाव्या, किं० आठव्या महिन्यांत करावयाचा एक संस्कार. **सीमंतिनी स्त्री०** स्त्री.

**सीमा** [ सं० ] **स्त्री०** १ हद्द; मर्यादा. २ हद्दीची खूण. ३ किनारा. ४ यत्न, दुःख, इ० ची पराकाष्ठा. ५ मानेचा कांटा. ६ आचारमर्यादा. ॐ **सीमांतपूजन न०** लग्नापूर्वीचें वरपूजन. 'श्रीमंतपूजन' हें अपभ्रष्ट रूप. **सीमोल्लंघन न०** दसऱ्याच्या दिवशीं गांवाची हद्द ओलांडण्याचा समारंभ करतात तो. ' शिलंगण ' हें अपभ्रष्ट रूप. **सीमासूत्र न०** ( भूमिति ) आकृतीच्या हद्दीच्या लांबीचें परिमाण;घेर;परीघ.

**सीर** [ सं० ] **पु०** नांगर. ॐ **सीरपाणि, सीरी** [ सं० सीरिन् ] **पु०** बलराम. **सीरध्वज पु०** जनक राजा,–सीतेचा पालक पिता.

**सींव** [ सं० सीमा ] **स्त्री०** गांवाची हद्द. ॐ **सींवशेजारी पु०** आपल्या गांवाच्या हद्दीला लागून असलेल्या गांवचा रहिवासी. मागें 'शिम' मध्यें हा शब्द पहा.

**सीवन** [ सं० ] **न०** शिवणें ( सुई, दोरा, इ० साधनानें ).

**सीस, सीसक** [ सं० ] **न०** शिसें हा धातु.

**सु** [ सं० ] **उपसर्ग** १ चांगलें; उ० सुगंध, सुजन, सुविध, इ०. २ सुंदर; उ० सुकेशी इ०. ३ पूर्णपणें;उ० सुदृढ, सुव्यक्त, सुशिक्षित, इ०. ४ अनायासें; उ० सुकर, सुसाध्य, सुलभ, इ०. ५ अति, अगदीं, अत्यन्त; उ० सुदीर्घ, स्वच्छ ( सु +अच्छ म्ह० निर्मल ); स्वल्प ( सु+अल्प म्ह० थोडें ). ६ योग्य रीतीनें. ७खुषीनें. ॐ **सूक्त न०** १चांगलें भाषण;सुभाषित.२स्तोत्र;उ० पुरुषसूक्त. **सुकर्म न०** १ चांगलें कृत्य. २ पुण्य. **सुकर्मा पु०** सत्तावीस योगांतील सातवा योग. **सुकाल, सुकाळ पु०** समृद्धीचा, वैभवाचा, किं० स्वस्ताईचा काळ. खालीं ' सुकाळ ' स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सुक्तासुक्त** पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सुकुमार वि०** मृदु; नाजूक. **सुकृत् वि०** १ पुण्यवान्. २ दैववान्. **सुकृत न०** १ सत्कृत्य, पुण्य. २ तप. ३ सुदैव. **वि०** संपविलेलें; तडीस नेलेलें. **सुकृति स्त्री०** १ सद्वर्तन. २ पुण्य. **सुकृती** [ सं० सुकृतिन् ] **वि०** पुण्यवान्. **सुगत पु०** १ बुद्धसाधु. २बुद्धधर्मीय. **सुगंध न०** चंदन. **सुगंधि वि०** सुवासिक. **सुगंधी पु०** (मराठींत)उदबत्त्या, अरगजे, रवे, अत्तरें, तेलें, इ० करणारा किं० विकणारा. **सुजात वि०**१कुलीन. २ सुंदर. ३ सुकुमार; नाजूक. **सुतराम् क्रि० वि०** १ अतिशय. २अर्थात्; जास्तच. **सुतल पु०, न०** सप्तपातालांपैकीं एक. **सुदर्शन वि०** सुंदर. **पु०** मेरु पर्वत. **न०, पु०** १ विष्णूचें चक्र. २ ( **मराठींत** ) पाठीस लागलेलें शुष्ककाष्ट. **सुधन्वा** [ सं० सुधन्वन् ] **वि०** उत्तम धनुर्धर. **सुधर्मा स्त्री०** देवांची सभा. **सुधी पु०** विद्वान्; शाहाणा. **सुपर्ण पु०** गरुडपक्षी. **सुप्रतीक पु०** ईशान्य दिशेचा दिग्गज. **सुभग वि०** १ दैववान्. २ सुंदर. **सुभाषित न०** चटकदार वचन किं० विधान. **सुभिक्ष न०** सुकाळ; स्वस्ताई. **सुमेरु पु०** मेरु पर्वत. **सुयोधन पु०** दुर्योधन. **सुरंग पु०, सुरंगा स्त्री०** १ खडक फोडण्यासाठीं लाविलेला सुरुंग. २ भुयार. ३ भिंतीला पाडलेलें भोक. **सुरंग पु०** नारिंग हें फळ. **सुरत न०** मैथुन. **सुरस वि०** १ स्वादिष्ट; रुचकर. २ मनोरंजक; चित्तवेधक. **सुलभ वि०** मिळण्यास सोपें. **सुवह वि०** सुखानें म्ह०अल्प श्रमानें वाहून नेतां येईल असा; सोसतां येईल असा. **सुवासिनी स्त्री०** १ माहेरीं राहणारी तरुण विवाहित स्त्री. २ धर्मकृत्याच्या सांगतासिद्ध्यर्थ जेवावयास बोलाविलेली सवाशीण. ३ जिचा पति जिवंत आहे अशी कोणीही स्त्री.

**सुवृत्त** वि० १सद्वर्तनी. २गरगरीत वाटोळा; अगदीं वाटोळा. **सुस्थ** वि० १ सुखी; संतुष्ट. २ नीरोगी. **सुस्थित** वि० आरामांत स्वस्थ बसलेला. **सुहृद्** वि० चांगल्या अंतःकरणाचा. पु० मित्र. **सुहृदय** वि० प्रेमळ; कनवाळू.

**सुई** [ सं० सूचि, सूची ] स्त्री० १ वस्त्र, कातडें, इ० शिवण्याचें साधनविशेष. याचें एक टोंक अत्यंत बारीक असून दुसऱ्या टोंकाच्या छिद्रांत ( म्ह० नेढ्यांत ) दोरा ओंविलेला असतो. २ माड, पोफळ, केळ, गहूं, इ० कांच्या झाडाच्या गर्भातून नुकतेंच बाहेर पडलेलें पान,—विकसण्याच्या पूर्वावस्थेंतील. ह्या अर्थी ' सुइरा, ' ' सुइटा, ' पु० आणि ' सुइटी ' स्त्री० सुद्धां. **सुइरा** पु० कोणत्याही झाडाचें कोंवळें पान,—कळीच्या रूपांतील.

**सुईण, सुवीण** [ म० सु+विणें ] स्त्री० १ प्रसूत होत असलेल्या स्त्रीस हरएक प्रकारें सूचना करणारी आणि तिचें मूल सुलभ रीतीनें बाहेर यावें म्हणून तजवीज करणारी स्त्री. २ हीच स्त्री किं० दुसरी कोणी स्त्री जी नंतर बाळंतिणीच्या अंगास तेल लावणें, न्हाहूं घालणें, इ० कामें करते ती. ॐ **सुईणपण** न० सुइणीचें काम, धंदा, किं० कर्तव्य.

**सुएर** पुढें ' सुवेर ' पहा.

**सुकट** [ म० सुका ] स्त्री० वाळविलेला बोंबील हा मासा. ह्या माशाच्या मुग्धाला ' सुकटी ' स्त्री० म्हणतात. वि० १ (लाक्षणिक) रोग, चिंता, इ० कारणांमुळें कृश झालेलें (शरीर). २ वाळलेलें, सुकलेलें ( पान, फूल, इ० ).

**सुकटणें** [ म० सुका होणें ] अ० क्रि० वाळणें; नीरस होणें; कोमेजणें.

**सुकटा (–ट्या )** [ म० सुकणें ] वि० वाळलेला; वाळून कृश झालेलें ( शरीर; गात्र, इ० ).

**सुकटी** स्त्री० वर ' सुकट ' स्त्री० मध्यें पहा.

**सुकड, सुकडी** [ म० सुका ] स्त्री० जून होऊन वाळलेला जो चोंडासकट नारळ तो; पूर्ण वाळलेला असोल्या नारळ.

**सुकड** [ म० सुकणें ] वि० शुष्क किं० रूक्ष ( शरीर, त्वचा ).

**सुकडा** [ म० सुकणें ] वि० आजार, चिंता, इ० कारणांमुळें रोड किं० कृश झालेला (माणूस, पशु ).

**सुकडी** वर ' सुकड, सुकडी ' पहा.

**सुकणावळ** [म० सुकणें] स्त्री० सुकणें, वाळणें, आटणें, उडून जाणें, इ० कारणांमुळें पदार्थाच्या परिमाणांत कमीपणा येणें किं० आलेला कमीपणा.

**सुकणें, सुखणें** [ सं० शुष्=वाळणें ] अ० क्रि० १ ( पदार्थ ) कोरडा किं० नीरस होणें; ( पदार्थांतील ) जलांश वाऱ्यानें किं० उष्णतेनें किं० उन्हानें नष्ट होणें. २आजार, उपवास, चिंता, इ० कांमुळें ( माणूस इ० ) रोड किं० किडकिडीत होणें. ३ श्रमानें ( मुख ) निस्तेज होणें. ४ (नदी, ओढा, खाडी, इ० तील पाणी ) नाहींसें होणें किं० आटणें किं० ओहोटणें. ५ ( गात्रविशेषाला ) योग्य तें काम करण्याची संधि न मिळाल्यामुळें तें निर्बल किं० निर्वीर्य होणें.

**सुकतळ** [ म० सुकणें+तळ ] न० १ तळपायाचा घाम शोषून घेण्यासाठीं जें पातळ कातडें जोड्यांत घालतात तें. २ घोड्याच्या पाठीवर घाम शोषून घेण्यासाठीं जो बुरणूस इ० चा तुकडा खोगिराखालीं घालतात तो. ३ अंगरखा, बंडी, इ० कपड्यांच्या खाकांच्या जागीं जें घाम शोषून घेण्यासाठीं वस्त्रादि शिवलेलें असतें तें.

**सुकताव, सुकाताव** [ म० सुका+ताव ] पु० १ सोनें, रुपें, इ० च्या पदार्थांना अग्नींत घालून तापवून मग पाण्यांत न बुडवितां तसेंच ठेवून निवविणें ही क्रिया ( देणें ). २(लाक्षणिक) फार भूक लागली असतां पोटांत पडते ती आग; भुकेची आग. ३ ( लाक्षणिक )शुष्क पाहुणचार; वरपांगी आदरातिथ्य; कोरडा सत्कार. ४(लाक्षणिक ) भीड मुरवत न ठेवतां कोणेकाच्या विनंतीला किं० मागणीला दिलेला साफ नकार; सडेतोड नकार. ५ ( लाक्षणिक ) कोणेकाची काढलेली भोसडपट्टी किं० खरडपट्टी.

**सुकती** [ म० सुकणें ] स्त्री० समुद्र, खाडी, इ० च्या पाण्याची ओहोटी किं० ओहोटीचा काळ. ॐ **सुकती भरती** स्त्री० ए० व० १ ओहोटणें आणि भरणें ह्या समुद्राच्या पाण्याच्या दोन अवस्था जोडीनें. २( लाक्षणिक )चढउतार; उत्कर्ष अपकर्ष; प्रापंचिक परिवर्तनें समुच्चयानें.

**सुकर, सुकर्म, सुकर्मा** मागें 'सु' मध्यें पहा.

**सुकलें** न० नाक, कान, इ० ना भोकें पाडून त्यांत सोनें, रुपें, इ० चें जें बारीक वलय शोभेसाठीं घालतात तें.

**सुकवण** [ म० सुकणें ] न० १ वाऱ्यावर किं० उन्हांत वाळावयासाठीं घातलेलें धान्य, मीठ, इ० जें कांहीं तें. २ मनुष्याची उमेद, उत्साह, इ० खचणें; निर्वीर्यता. ३ सुकलेपणाची स्थिति.

**सुकवत** [ म० सुकणें+पत्र ] न० द्रोण इ० करावयासाठीं उन्हांत किं० विस्तवाशेजारीं ठेवून सुकविलेलें केळीचें पान.

**सुकवशी, सुखवशी** [ म० सुकणें ] स्त्री० १ अपुरें खाणें, रोग, चिंता, इ० कारणामुळें शरीराला येतो तो कृशपणा किं० असा कृशपणा आल्याची स्थिति ( येणें, लागणें ). २ वृक्षादींना जलाच्या अभावीं येतो तो कृशपणा.

**सुकवें** [ म० सुकणें ] न० शेतें, बागा, पिकें, इ० ची वाळलेपणाची स्थिति.

**सुकळास** [ म० सु + क्लेश ] क्रि० वि० सोयीनें, वेदनेशिवाय, त्रासाशिवाय, सरळ मार्गानें ( अशिक्षितांत रूढि ).

**सुका, सुखा** [म० सुकणें, सुखणें; सं० शुष्क; शुष्=वाळणें] वि० १ कोरडा, वाळलेला, वाळविलेला (मेवा, केळें, अंजीर, इ० ). २ (**लाक्षणिक**) ज्यांत फायदा, लाभ, फळ, वीर्य, इ० नाहीं असा ( धंदा, कष्ट, काम, इ० ). ॐ **सुक ताव, सुका ताव** पु० वर स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सुकाटणक, सुकाठणक** वि० अगदीं कोरडा; ठणठणीत कोरडी किं० सुकी (जमीन इ०). **सुकादुकळ, सुकादुकाळ** पु० अवर्षणामुळें पडलेला दुष्काळ किं० झालेली महर्घता. **सुका लफडा** पु० १ रिकामी पंचाईत; पाठीस लागलेलें लचांड; शुष्ककाष्ठ. २ निरर्थक कष्ट किं० यातायात. **सुकें केळें** न० सोलून वाळविलेलें केळें. **सुकी खरूज, सुक्खरूज** स्त्री० जींतून लस गळत नाहीं आणि जिला एकसारखी कंड सुटत असते अशी खरूज.

**सुकाकुलमिश्री** [ फा० षुकाकुल्; हिं० मिस्री ] स्त्री० एक फलविशेष.

**सुकाड** [ म० सुकें+काष्ठ ] पु० पाखरें, गुरें, इ० नीं शेताला उपद्रव करूं नये म्हणून जें बुजगावणें उभारतात तें.

**सुकाण, सुकाणूं** [सं० सुकर्ण; अ० सुकान्] न० होडी, गलबत, इ० ना विशिष्ट गति द्यावयासाठीं मागल्या बाजूस जें साधन केलेलें असतें तें. ॐ **सुकाणदार, सुकाण्या** पु० १ होडी, गलबत, इ० चें सुकाणूं जो फिरवितो तो इसम. २ ( **लाक्षणिक** ) मार्गदर्शक; पुढारी; नेता.

**सुका ताव** मागें 'सुक ताव' पहा.

**सुका दुकळ, सुका लफडा** वर 'सुका' मध्यें [पहा.

**सुकाळ** [ सं० सु ( चांगला )+काल ] पु० समृद्धीचा किं० वैपुल्याचा काळ. याच्या व्यावर्तक त्वें 'दुकाळ'. ॐ **सुकाळपुरा** पु० १ फळें, पिकें, व्यापारांत नफा, बाजारांतील पदार्थ, इ० ची समृद्धि किं० वैपुल्य. २ वारा, पाऊस, चिखल, धूळ, केरकचरा, इ० ची रेलचेल, अतिरेक, किं० पराकाष्ठा. **सुकाळ सौदा** पु० फारच स्वस्त मिळालेला पदार्थ ( असा पदार्थ बहुधा वाईट आणि अपायकारक असतो अशा दृष्टीनें ); उ० सुकाळ सौदा आणि हगवणीस काळ.

**सुकाळा** (-ळ्या ) पु० १ जबरदस्त कामविकार आहे ज्याला असा पुरुष. २ गुदमैथुन करणारा किं० करून घेणारा. **सुकाळी** स्त्री० जबरदस्त कामविकार आहे जिला अशी स्त्री.

**सुकुमार** वि० मृदु; नाजूक. मागें 'सु' मध्यें पहा.

**सुकृत, सुकृति** मागें 'सु' मध्यें पहा.

**सुकेड** [ म० सु+कड ] स्त्री० कोरडें स्थळ; उ० ह्या ओलींत बसूं नको, तिकडे सुकेडीस जाऊन बैस.

**सुक्का** [ फा० षुकाह् ] पु० लहानसें पत्र; [चिट्ठी.

**सुक्का** मागें सर्व अर्थी 'सुका' पहा.

**सुक्खरूज** मागें 'सुका' मध्यें पहा.

**सुक्तासुक्त** [ सं० सु+उक्त ( चांगलें बोललेलें )+अ+सु+उक्त ( वाईट बोललेलें ) ] न० बरें वाईट जें कोणी माणूस बोललें असेल तें; उ० तो लहान मुलगा तुम्हाला जें कांहीं सुक्तासुक्त बोलला असेल तें मनावर घेऊं नका. 'सूक्तासूक्त' हें शुद्ध रूप.

**सुख** [ सं० ] वि० १ सुखी. २ सुखदायक.

३ सोपें, सुलभ. न० १ आनंद. २ आराम, स्वस्थता. ३ कल्याण. ४ आरोग्य. ॐ **सुखात्मा** [ सं० सुखात्मन् ] पु० १ परमात्मा. २ ब्रह्म. **सुखद, सुखावह** वि० परिणामीं सुख देणारें; सुखकर. **सुखास पडणें** ( किं० **वाटणें** किं० **येणें** ) १ चैन पडणें; आराम वाटणें. २ आवडणें. **सुखढाळ** पु० फारसा त्रास न देणारें रेचक किं० जुलाब करणारें औषध. **सुखनिद्रा** स्त्री० स्वप्नें न पडतां आलेली किं० घेतलेली झोप. **सुखप्रसव** पु० कांहीं त्रास न होतां स्त्रीचें बाळंत होणें. **सुखभाक्, सुखभागी** वि० सुखाला पात्र किं० विषय जो तो; सुखाचा आस्वाद किं०अनुभव घेणारा. **सुखमांस** न०बेताचें काम आणि पोटभर अन्न यांचे योगानें अंगावर चढतें तें गुटगुटीतपणाचें मांस. **सुखरीण** [ म० सुख+ऋण ] न० १ आपल्या सोयीला येईल तेव्हां फेडावयाचें कर्ज; ज्या कर्जाबद्दल सावकाराकडून तगादा होत नाहीं किं० व्हावयाचा नाहीं असें कर्ज. २ फारशी जरूरी नसतां काढलेलें कर्ज. **सुखरूप** वि० १ खुशाल; चिंता, आजार, इ० ज्याला नाहींत असा. २ज्याला किं० ज्यांत कांहीं त्रास किं० कोणत्याही प्रकारचा उपद्रव नाहीं किं०झाला नाहीं असा(माणूस,प्रवास, इ० ).क्रि० वि० बेलाशक; शंका न बाळगतां;उ० तुम्हीं तसें करणार असला तर सुखरूप करा, माझी कांहीं हरकत नाहीं. **सुखवस्तु** वि०ताबेदारी, नोकरी, उद्योग, धंदा, इ० प्रकारचे कष्ट न करतां संग्रहीं असलेल्या संपत्तीवर सुखानें राहिला आहे तो; उ० आज पुणें शहरांत पन्नास पाऊणशे पेक्षां अधिक सुखवस्तु कुटुंबें उरलीं नाहींत. क्रि० वि० कष्ट न करतां सुखांत राहाण्याच्या स्थितींत ( असणें ); उ० मी चिंचवडास सुखवस्तु राहिलों आहें. **सुखवस्ती, सुखवस्तु** वि० ज्या गांवांत कोणेकाचें शेत, वतनवाडी, व्यापार, इ० कांहीं नाहीं आणि जो केवळ सुखासाठीं किं० चैनींत त्या गांवीं राहिला आहे असा. **सुखशयन** न०, **सुखशय्या, सुखशेज** स्त्री० १ जिच्या योगानें आराम वाटतो अशी झोप (विनोदांत). २ चैनींत घेतलेली झोप ( विनोदांत ). **सुखासंतोषानें** क्रि० वि० न चरफडतां; सुकाट्यानें; तकरार न करतां;आपखुषीनें; राजीखुषीनें.**सुखासमाधानानें** क्रि० वि० बलात्कार करण्याचा प्रसंग न येतां. **सुखसोहाळा** पु० लग्न, मुंज, मिरवणूक, मेजवानी, इ० रूप आनंदाचा प्रसंग. **सुखाचा प्राणी** पु० १ ज्याला कसलीही चिंता नाहीं आणि ज्याला खावयाला भरपूर आहे असा माणूस.२ ज्याला कष्ट न करतां खावयास भरपूर मिळतें असा सुदैवी माणूस.**सुखाचा जीव** पु० काळजीकांटा नसल्यामुळें सुखांत जें राहाणें तें किं० सुखांत राहाण्याची शक्यता. **सुखाचा जीव दुःखांत घालूं नये** नसत्या लचांडांत पडूं नये आणि दुःख भोगीत बसूं नये. **सुखाची आईबाई** स्त्री० आपल्या वैभवकाळीं मात्र आपल्याशीं प्रेमानें वागणारी ( आपत्काळांत आपल्या उपयोगीं न पडणारी स्त्री ). **सुखाचा भाकर** स्त्री० फारसे कष्ट न करतां चाललेला जो चरितार्थ तो. **सुखाचें शरीर** न० चिंता नसल्याकारणानें किं० कष्टाशिवाय पोट भरत असल्यामुळें लठ्ठ, गुटगुटीत, आणि तेजस्वी झालेलें शरीर. **सुखाड** वि० सुखदायक. **सुखदुःखाचा सोबती** पु० १ नवरा; पति. २ खरा आणि प्रेमळ मित्र. **सुखदुःखाची सोबतीण** स्त्री० १ आपली पत्नी. २ प्रेमळ मैत्रीण. **सुखानंद** पु० चैनी, विलास, नाचरंग, इ० मध्यें काळ घालविणारा ( निंदेंत ). **सुखावा** पु० आराम; काळजीकांटा नसणे ही स्थिति. **सुखापुरी** वि० कशाचीही काळजी न करतां किं० कोणत्याही प्रकारचे कष्ट न करतां ज्याचें आयुष्य सुखांत जात आहे असा. **सुखावा, सुखोपा** पु० सुख; आराम; निश्चिंतपणाची स्थिति. **सुखासुखीं** क्रि० वि० १ उगीचच्या उगीच; चरफडण्याला कांहीं कारण नसतां. २ सहजपणें; विशेष कांहीं कारण नसतां ( कोणेक स्थळीं जाणें, येणें, कोणेकाला भेटणें, इ० ). **सुखी** वि० आनंदी; संतुष्ट.

**सुखा** वि० वाळलेला; कोरडा. वर ' सुका ' सर्व अर्थीं आणि सर्व वाक्प्रचारांतर्गत पहा.

**सुखांगणें** [ म० सुख+अंग ] अ० क्रि० १ खाणें, पिणें, सुखोपभोग, इ० मनाप्रमाणें मिळत असतां आणि काळजी नसतां ( मनुष्य ) गुटगु-

टीत आणि तेजस्वी होणें. २ निरस्तरलेल्या संक्रटानंतर आराम पावणें; चिंता नष्ट झाली आहे अशा स्थितींत असणें.

**सुखाडणें, सुखांडणें** [ म० सुख ] अ० क्रि० आनंदित होणें; सुख पावणें.

**सुखाडी** [ म० सुकणें, सुखणें ] स्त्री० शेतें, बागा, इ० ची पाण्याच्या अभावामुळें शुष्कपणाची स्थिति.

**सुखारुखा**[ म० सुका+रूक्ष ] वि० कोरडें; भाजी, तूप, दूध, इ० पदार्थ ज्यांत नाहींत असें ( जेवण ).

**सुखावणें** [ म० सुख ] अ० क्रि० १ आनंद पावणें; संतुष्ट किं० तृप्त होणें. २ संकटाच्या स्थितींतून बाहेर पडून सुखी होणें.

**सुखाविणें, सुखविणें** [ म० सुख ] स०क्रि० (कोणेकाला) संतोष, सुख, किं० आनंद देणें किं० वाटविणें.

**सुगड** [ सं० सु+घट ] न० आकारविशे- [ षाचें मृत्तिकापत्र.

**सुगड** [ म० सुघड ] वि० चतुर; हुशार.

**सुंगणें** [ सं० सु+घ्राण ] अ० क्रि० हुंगणें; ०चा वास घेणें.

**सुगंध** [ सं० ] पु० चांगला वास. ⊛ **सुगंधिक, सुगंधक, सुगंधी** वि० चांगला वास ज्याला येत आहे असा ( कोणताही पदार्थ,— अरगजा, अत्तर, इ० ). मागें ' सु ' मध्यें पहा.

**सुगंधी** [ म० सु+गंध+ई ( प्रत्यय ) ]पु० अत्तरें, उदबत्त्यां, मसाल्याचीं तेलें, इ० करणारा किं० विकणारा. मागें ' सु ' मध्यें पहा.

**सुगम**[सं०]वि०समजण्यास,शिकण्यास,साध्य करण्यास,जाण्यास सोपा (ग्रंथ, रस्ता,गांव,इ०).

**सुगर, सुगरण, सुगरीण,** इ० खाली 'सुगृहिणी ' मध्यें पहा.

**सुगरीण** स्त्री० एक जंगली झाड.

**सुगावणें** [ म० सुख ] अ० क्रि० कांहीं कृत्य उत्साहानें, हौसेनें,किं० आनंदानें करण्यास तत्पर किं० सिद्ध होणें; कांहीं कृत्य करावयास आढेवेढे न घेतां सरसावणें.

**सुगावा, सुदावा** [ म० सु+गावणें ] पु० आपण शोधीत आहों त्या वस्तूचा किं० माणसाचा तपास किं० ठावठिकाण कळण्याला साधनभूत अशी कांहीं गोष्ट; तपासाला उपयोगी पडणाऱ्या ज्या गोष्टी त्यांच्या सांखळींतील शेवटचा दुवा ( लागणें, काढणें, निघणें, इ० ).

**सुगी** स्त्री० पिकें, फळें, इ० च्या वैपुल्याचा किं० हंगामाचा किं० स्वस्ताईचा ऐन काळ.

**सुगुण** [ सं० ] पु० चांगला गुण.

**सुगृहिणी** [ सं० ] स्त्री० गृहकृत्यांत तत्पर आणि चतुर स्त्री. ' सुगृहिणी ' चीं अपभ्रंष्ट रूपें ' सुग्रण, ' ' सुग्रीण, ' इ० होत. यांच्यापासून साधलेले शब्द ' सुग्राई, ' 'सुग्रणपणा,'सुंग्रावा,' इ०. यांचे अर्थ सहज कळण्यासारखे आहेत.

**सुग्रास** [ सं० सु ( चांगलें )+ग्रास ( घास, जेवण) ] पु० उत्तम प्रकारचें आणि चांगलें शिजविलेलें जें अन्न तें; उ० खाणावळींत सुग्रास अन्न (किं० जेवण) कसचें मिळणार? ⊛ **सुग्रास जेवण** ( किं० **भोजन** ) न० चमचमीत, चांगलें शिजविलेलें, नानाविध भाजीपाले, चटण्याकोशिंबिरी, इ० चें जेवण किं० भोजन.

**सुग्रीव** [ सं० ] पु०रामाचा एक वानरमित्र.

**सुघटित** [ सं० ] वि० १ चांगला केलेला किं० बनविलेला ( कोणताही पदार्थ ). २ गोंडस किं० बांधेसूद ( शरीर ). ३ करावयास सोपें. ४ ज्याचें जडकाम किं० सांधकाम बळकट किं० शास्त्रशुद्ध आहे असा ( दागिना, पात्र, इ० ). ५ सर्व अंगें आणि उपांगें ज्याचीं नीट जुळविलीं आहेत असा ( बेत, योजना, युक्ति, मसलत, इ० ).

**सुघड** [ सं० सुघट ] न० एक प्रकारचें मृत्तिकापात्र.

**सुचणें** [ सं० सूच् ] अ० क्रि० १ एकदम स्मरणांत येणें किं० आठवणें. २ योग्य किं० अनुकूल मार्ग किं० सरणी अकस्मात् मनांत येणें. ३ योग्य वेळीं ( उत्तर, कोटी, इ० ) मनांत येणें किं० आठवणें; स्फुरणें.

**सुचना** पुढें ' सूचना ' पहा.

**सुचविणें** [ म० ' सुचणें ' चें प्रयोजक ] स० क्रि०१ कोणेकाला (कांहीं गोष्ट) सांगणें किं०दाखवून देणें किं० करावयाला सांगणें. २ कोणेकाला (आठवत नसलेल्या गोष्टीचें,द्यावयाच्या उत्तराचें, किं० अनुसरावयाच्या सरणीचें ) स्मरण करून देणें. ३ (कांहीं कर्तव्यसरणी, मत, इ०) कोणेका-

पुढें विचारासाठीं ठेवणें किं० मांडणें किं० सभा इ० प्रसंगीं उपस्थित करणें.

**सुचित** [ सं० सुचित्त ] वि० १ उपद्रव-रहित; शांत; स्वस्थ. २ सावधान चित्त आहे ज्याचें असा.

**सुचिंत** [सं० सु+चिंता ]वि० ( मराठींत ) निश्चिंत;आरामांत असलेला;ज्याला काळजीकांटा कांहीं नाहीं असा.

**सुचिन्ह** [ सं० ] न० चांगल्याची द्योतक अशी कांहीं गोष्ट; शुभसूचक असें कांहीं लक्षण.

**सुचें** [ म० सुचणें ] न० कोणेकाला सुचवि-लेली किं० सांगितलेली कांहीं गोष्ट; सूचना.

**सुजट, सुजकट** [ म० सुजणें ] वि० किंचित् सुजलेला किं० फुगलेला.

**सुजणें** [ सं० श्वि= सुजणें, फुगणें, वाढणें ] अ० क्रि० १ शरीराचा विकृत (भाग ) किं० रट्टा लागलेला ( भाग ) तेथें रक्त जमल्यानें फुगणें. २ कांहीं पदार्थ मिळण्यासाठीं रागावून बसणें किं० हेका धरणें;उ०मी तुझ्या पेढ्यासाठीं कांहीं सुजलों नाहीं. ॐ **सुजलें भूत कोडबुळयास राजी** जेथें कांहींच मिळण्याचा संभव नाहीं तेथें अत्यल्प मिळालें तरी क्षुद्र वृत्तीचा मनुष्य संतुष्ट होतो.

**सुजनी** स्त्री० १ एक प्रकारचें गर्भसुती रेशमी वस्त्र. २ दुलई; लेप.

**सुजमरणें, सुजमिरणें** [म० सुजणें]अ०क्रि० (शरीराचें गात्र)शैत्यादि कारणांनीं किंचित् सुजणें.

**सुजमीर** [ म० सुजमिरणें ] वि० किंचित् सुजलेलें किं० फुगलेलें ( गात्र ).

**सुजरा** [ म० सुजणें ] वि० १ सुजलेला; फुगलेला. २ कांहीं पदार्थासाठीं हट्ट घेणारा. ॐ **सुजरें भूत** न० कांहीं पदार्थासाठीं रागावून बसणारा किं० बसलेला.

**सुजाण** [ म० सु+जाणणें ] वि० बरेंवाईट ज्याला समजतें किं०समजण्याची ज्याला पात्रता आहे असा.

**सुजीर** [ म० सुजणें] वि० सुजलेला; किंचित् सुजलेला किं० फुगलेला ( शरीराचा विशिष्ट भाग ). [ निसटून जाणें.

**सुटकणें** अ० क्रि० झटकन् निघून किं०

**सुटका**[म०सुटणें ]स्त्री० नियंत्रणेंतून,कैदेंतून, संकटांतून, किं०पेचांतून मोकळें होणें किं०मोकळें झाल्याची स्थिति.

**सुटगांठ** [ म० सुटणें+गांठ ] स्त्री० ज्या गांठीचें एक टोक ओढलें असतां सुटते ती गांठ. ' सरगांठ, ' ' सुरगांठ ' ह्याच अर्थी.

**सुटणूक** [ म० सुटणें ] स्त्री० सुटका. वर ' सुटका ' पहा.

**सुटणें** अ० क्रि० १ (दोरी इ० ची गांठ) उक-लणें किं० मोकळी होणें; विमुक्त होणें. २ बंध-नांतून किं० कोणत्याही प्रकारच्या पकडींतून किं० नियंत्रणांतून मोकळें होणें; उ० तुझ्या हातांतील टोंक घट्ट धर तें सुटलें तर धोतर चिख-लांत पडून मळेल. ३(आडकावून ठेविलेलें माणूस, जनावर, पक्षी, इ०) तुरुंग, घोडा, पिंजरा,कोंड-वाडा, इ० तून निसटून पळून जाणें. ४ बंधांतून मोकळें केलें जाणें; उ० आज पांच कैदी सुटले ( म्ह० त्यांना सोडून देण्यांत आलें ). ५ ज्याच्याशीं (जो पदार्थ) गांठ, डीक, डाग, दोरी, इ० साधनांनीं चिकटाविलेला, जोडलेला, जडवि-लेला, खिळविलेला, किं० बांधलेला आहे त्यापा-सून ( तो ) वियुक्त होणें; उ० कोंदणांतून हिरा, सांध्यांतून कुसूं, खोप्यांतून वेणीचें टोंक, इ० सुटणें. ६ ( बंदूक, तोफ, इ० ) उडविली जाणें. ७ ( वारा, हिंवस किं० उष्ण हवा, इ० ) सुरू होणें. ८ ( जाहीरनामा, हुकूम, ताकीद, नियम, इ० ) जाहीर केला जाणें. ९ ( दोंद, पोट, इ० ) आरामाच्या किं० सुखाच्या राहाणीमुळें वाढणें; उ० विठोबानें मलईचा खुराक सुरू केल्यापासून त्याचें पोट फार सुटलें आहे. १० ( कंड, खाज, घाम, इ० ) गात्रांत भासमान होणें किं० सुरू होणें. ११ सईल पडणें, शिथिल होणें ( सामा-न्यत: ). १२ (सांधा, जोड,गांठ, अडकण, इ० ) निखळणें, उचकटणें, इ०.१३ सुरू होणें ( सामा-न्यतः ). टीप,–१ धातूच्या 'त' किं० 'ईत' प्रत्य-यान्त रूपापुढें ' सुटणें ' क्रियापद आल्यास त्या धातूच्या क्रियेचा सततपणा किं० अखण्डितपणा दर्शविला जातो; उ० तो त्या माणसाला शिव्या देत सुटला म्ह० एकसारख्या शिव्या देऊं लागला. करीत सुटणें, बोलत सुटणें, इ० चे अर्थ ह्याच सरणीनें जाणावे. टीप,–२' सुटणें ' ह्याचे अर्थ

जवळच्या शब्दावरून भिन्न भिन्न छटांनीं वेगळे वेगळे आहेत असें दिसतें पण वस्तुत: ते एकाच मूळच्या अर्थावर आधारलेले असतात. **शाळा सुटणें** त्या दिवसाचा कार्यक्रम समाप्त होऊन मुलांना घरोघर जाण्यास परवानगी मिळणें. **लोणच्याला खार सुटणें** त्यांतून मीठ इ० पदार्थ पातळ होऊन त्यांत तिखट, हिंग, इ० कालविलें जाणें. **तोंडाला पाणी सुटणें** १ कांहीं रुचकर किं० चमचमीत खाद्य पदार्थ दृष्टीस पडला असतां तोंडांत लाळ जमूं लागणें. २ कांहीं लाभ आपणाला होईल ह्या आशेनें किं० व्हावा ह्या इच्छेनें उल्हसित होणें किं० आनंद पावणें किं० आकृष्ट होणें. **एकाद्याचें तोंड सुटणें** तो शिव्या देऊं लागणें; तो चरफडूं लागणें; तो अद्वातद्वा बोलूं लागणें; त्याच्या तोंडाचा पट्टा सुरू होणें. **ह्या औषधानें कफ सुटेल** ह्या औषधाच्या सेवनानें कफ मोकळा होऊन तो तोंडाबाहेर थुंकून टाकितां येईल.

**सुटरूं, सुंठरूं, सुंठर** न० ज्यांत पूं उत्पन्न झाला आहे असें गळूं किं० उठाणूं.

**सुटसुटीत, सुडसुडीत** [ म० सुटणें ] **वि०** १ थोडक्या विस्ताराचा (संसार, धंदा, व्यापार). २ चलाख, चपळ ( शरीर ). ३ ज्यांत गुंतागुंत, घोटाळा, इ० नाहीं असा ( कार्यक्रम ). ४ ज्यांत फारसे पदार्थ करावे लागत नाहीं असा ( स्वयंपाक, घरकाम, इ० ). ५ ज्यांत फारशी जबाबदारी किं० जिकीर नाहीं असें (कोणतेंही काम).

**सुटा** [ म० सुटणें ] **वि०** १ मोकळा; न अडकलेला; न गुंतलेला ( सामान्यत:). २ स्वतंत्र रूपांत असलेला; दुसऱ्याच्या पोटांत नसलेला. ३ मांडणी, रचना, इ० तून वियुक्त झालेला किं० मोकळा पडलेला; संघटनेंत न गेलेला; बंधनांत नसलेला. ४ अंतरा अंतरावर असलेलीं ( झाडें, खुर्च्या, दांत, माणसें, इ० ). ❀ **सुटा रुपाया** पु० नोट मोडून तींतून घ्यावयाचा नव्हे असा रुपाया. **सुटा पैसा** पु० एकच पैसा हें नाणें,—चवली, पावली, रुपाया, इ० मोठें नाणें बदलून त्यांतून घ्यावयाची जरूर नाहीं असा पैसा. **लोभाचा सुटा** वि० लोभ ज्याला नाहीं असा. याच सरणीनें इतर वाक्प्रचारांचे अर्थ जाणावे.

**सुंटारा** पु० घाणा, चरक, राहाट, इ० फिरवावयाला शिकवावयाचा जो बैल, त्याला वाटोळें फिरावयाला शिकविण्यासाठीं जे मध्यावर खांब किं० खुंटा पुरलेला असतो तो.

**सुटावणें** [ म० ' सुटणें ' चें एक रूप ] अ० क्रि० १ मोकळें होणें; सईल पडणें; ढासळणें; सांध्यांतून, मांडणींतून, रचनेंतून, किं० संघटनेंतून अल्प प्रमाणांत किं० सर्व प्रमाणांत निखळणें, निसटणें, किं० बाहेर पडणें. २ ( भिंत, जमीन, इ० मध्यें ) पाणी इ० शिरल्यामुळें पोपडे धरणें, पदर सुटणें, किं० गिलावा सईल पडणें. ३ सुखाच्या आणि आरामाच्या राहाणीमुळें (पोट, शरीर, इ०) वाढणें किं० गुबगुबीत किं० थिलथिलीत होणें. ४ बांध, बंधारा, दरड, इ० ची रचना खिळखिळी होऊन ढासळण्याच्या स्थितीस आलेली असणें. ५ ( बांधलेलें गाठोडें, गवताचा भारा, लाकडाची मोळी, इ० ) सईल होणें किं० सईल पडणें.

**सुटी** [ म० सुटणें ] **स्त्री०** १ मोकळीक; परवानगी; रजा. २ शाळा, कचेरी, कारखाना, इ० तील कामें बंद होऊन विद्यार्थी, कारकून, मजूर, इ० ना आरामांत काळ घालविण्याला मिळते ती मोकळीक.

**सुट्यो** [ म० सुटणें ] **न०** हिशेब, देणें घेणें, इ० चा करून टाकलेला निकाल; निरवानिरव; उ० कापडवाल्याचा हिशेब करून त्याचें देणें निघालें तें देऊन टाकून त्याचें सुट्यो करून टाकलें. उ० **वा० अ०** मुलांचा लपंडाव इ० खेळांत कोणेकावर जी कांहीं बाबतींत आडकाठी असते ती काढून टाकली आहे ह्या अर्थाचा हा उद्गार आहे.

**सुंठ** [ सं० शुंठी ] **स्त्री०** एक वनस्पति. आल्यावर वाळविणें इ० संस्कार करून जो पदार्थ बनवितात तो. ❀ **साठा वर्षी सुंठ फुलणें** अकस्मात् कांहीं आनंदकारक गोष्ट घडून येणें. **सुंठीचें फूल** न० क्वचित् प्रसंगीं घडणारी कांहीं चांगली गोष्ट. **टीप**,—सुंठीच्या झाडाला साठ वर्षांनीं फुलें येतात या समजावरून ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति झाली आहे.

**सुंठवडा** पु० १ बाळंतिणीला सुंठ, गूळ,

आणि कांहीं औषधीं द्रव्यें यांचें मिश्रण खावयाला देतात तें. २ कथा, पुराण,रामनवमी, इ० रूप उत्सव ह्यांच्या समाप्तीस सुंठ आणि साखर ( किं० गूळ ) ह्यांचें श्रोत्यांना वाटतात तें मिश्रण. **सुंठवणी** न० सुंठीचा काढा किं० पाणी. **सुंठसाखर** स्त्री० ए० व० सुंठ आणि साखर ह्यांचें मिश्रण पोटदुखी, पित्त, इ० च्या प्रतिकारासाठीं घेतात तें.

**सुंठरूं, सुंठरें, सुंठर, सुंठार** [ म० सुंठ] न० गाडूं किं० उठाणूं,–जें स्पर्शाला सुंठीच्या कुड्यासारखें टणक लागतें.

**सुडका** पु०, **सुडकें** न० १ चिंधी. २ वस्त्राचा चाभाडा. ३ लुगडें, धोतर, पंचा, इ० (तुच्छतेंत). ४ ( लाक्षणिक ) हलकट किं० पाजी माणूस. ५ ( लाक्षणिक ) व्यभिचाराचें अपत्य.

**सुडबुड** स्त्री० १ उंदीर, घुशी, इ० चा अंधारांत संचार किं० वावर. २ लहान मुलांचे उपद्रवकारक व्यवसाय किं० कारभार.

**सुडसुडीत** मागें ' सुटसुटीत ' पहा.

**सुडावणें** [ म० सुड=शोध ] अ० क्रि० येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याच्या इराद्यानें कांहीं मूर्खपणाचें, साहसाचें, दांडगाईचें, किं० अनीतीचें कृत्य करावयाला सरसावणें.

**सुडी** [ सं० शंड=रास ] स्त्री० १ जोंधळा, बाजरी, इ० ची रचून ठेविलेली जीं कणसांसकट ताटें तीं समुच्चयानें. २ गवताचा भारा.

**सुढाळ** [म० सु+ढाळ (रचना)]वि०१गोंडस बांध्याचा; गुटगुटीत आकाराचा. २ तेजस्वी, पाणीदार, टवटवीत ( चेहरा, रत्न, रंग, इ० ).

**सुणें** [ सं० श्वन्=कुत्रा ] न० कुत्रा ( कवितेंत ).

**सुणा, सुना** [ सं० शून्य ] वि० १ शून्य; ओसाड ( गांव, घर ). २ विरहित; रहित. ३ जेथें जो पदार्थ असावयास पाहिजे तेथें तो नसल्यामुळें विशोभित किं० ओका.

**सुत** [ सं० ] पु० १ पुत्र. २ सोमरस. **सुता** स्त्री० कन्या. ※ **सुती** [ सं० सुतिन् ] वि० पुत्र आहे किं० आहेत ज्याला असा. **सुतिनी** स्त्री० आई.

**सुतक** [ सं० सूतक ] न० १ जन्म देणें; प्रसवणें. २ सुवेर; जाताशौच. ३ कोणत्याही प्रकारचें अशौच. ४ ( मराठींत ) कुटुंबांत कोणी मनुष्य मेल्यानें येतो तो विटाळ ( येणें, धरणें, पाळणें, फिटणें ). ※ **सुतकतुला, सुतकाळा (–ळ्या ), सुतकी, सुतकीळ** वि० सुतक आल्यामुळें जो अस्पृश्य झाला तो.

**सुतकी** स्त्री० पाथरवटांचें एक हत्यार.

**सुतरनाल (–ळ )** [ फा० शुत्रनाल् ] स्त्री० उंटाच्या पाठीवर घालून रणावर न्यावयाची तोफ.

**सुतरस्वार** [ फा० शुत्र् सवार् ] पु० १ उंट हाकणारा. २ उंटावरून पत्रें, निरोप, इ० नेणारा किं० आणणारा. ३ सांडणीस्वार.

**सुतरा** [ हिं० ]वि० १हुशार; तल्लख. २कावेबाज.

**सुतराम्** [ सं० ] क्रि० वि० १ अतिशय. २ अर्थात्; ज्यास्तच; उ० शिवी देणें हें निंद्य, आणि आईवरून शिवी देणें हें सुतराम् निंद्य. ३ सर्वथैव; उ० सुतराम् वाईट, मूर्ख, लबाड, त्याज्य, इ०. ४ अगदीं; बिलकूल ( निषेधीं प्रयोग ); उ० मजकडून ही गोष्ट सुतराम् घडावयाची नाहीं; उ० आज सुतराम् पाऊस पडला नाहीं; उ० मजजवळ सुतराम् एक पैसा नाहीं.

**सुतल** [ सं० ] न०, पु० सात पाताळांपैकीं एक. अतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल, आणि पाताल हीं सात पाताळें.

**सुतवाच, सुतवाच्य** [ सं० सूतः ( सूत )+ उवाच ( बोलला ) ] न० १ सुरवात; प्रारंभ. २ एकाद्या गोष्टीचें अंधुक वर्णन किं० दिग्दर्शन. ※ **एकाद्या गोष्टीला सुतवाच्य करणें** ती आरंभिणें. **एकाद्या गोष्टीचें सूतवाच्य करणें** तिची अंधुक कल्पना सांगणें किं० देणें. **टीप,**–सर्व पौराणिक कथा सूतानें शौनकास सांगितल्या आहेत म्हणून प्रत्येक कथेच्या आरंभीं ' सूत उवाच ' असे दोन शब्द येतात. त्यांचा अर्थ सूत बोलला. ' सुतवाच ', ' सुतवाच्य ', ' सुतौवाच ' हीं मराठींतील अपभ्रष्ट रूपें. पुढें ' सुतौवाच ' पहा.

**सुतविणें, सुतिवणें** [ म० सूत ] स० क्रि० ( संक्रांतीचीं मडकीं, रुखवताचे लाडू, पिंपळाच्या झाडाचें खोड, इ० ना ) सुत वेढणें किं० गुंडाळणें किं० सुताचें लपेटे देणें.

**सुतळी, सुतळ** [ सं० सूत्र ] **स्त्री०** ताग किं० अंबाडी यांची वळलेली बारीक दोरी. ॐ **सुतळ्या लगाम** पु० एक प्रकारचा लगाम,- घोड्याच्या तोंडांत घालतात तो.

**सुता** [ सं० ] **स्त्री०** कन्या.

**सुंता** [ अ० सुन्नत ] पु० पुरुषाच्या शिश्नाचें लाल बोंड झाकणारें जें निसर्गजन्य चर्म तें यहुदी, मुसलमान, इ० धर्मीयांत कापतात तो विधि किं० संस्कार. मागें ' बोंड ' अर्थ ८ पहा.

**सुताडा** [म० सूत; सं० सूत्र] **पु०** १ जाड्या भरड्या सुताचें जमीनीवर आंथरावयाचें किं० पांघरावयाचें वस्त्र. २एक प्रकारचें नागपुरी लुगडें. ३ जाडेंभरडें लुगडें, धोतर, किं०उपरणें (निंदेत).

**सुताडें** [ म० सूत; सं० सूत्र ] **न०** वर ' सुताडा 'चे दोन्हीं अर्थ पहा.३ अनेक कुटुंबें परस्परांशीं लग्नाच्या नात्यानें जुळल्यानें होतो जो संबंध तो; उ० तुम्ही आम्ही एकाच सुताड्यांतले आहों. **सुताडें गोताडें, सुताडगुताड, सुताडें-गाताडें न०** १ एकमेकांशीं कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेला संबंध. २ कोणेकाच्या उद्योग-धंद्याचा विस्तार किं० पसारा. ३ गुंतागुंत. ४ दोन माणसांचें सख्य किं० दोस्ती ( निंदेत ).

**सुतार** [ सं० सूत्रकार ] **पु०** १ लाकडाचे पदार्थ ( चवरंग, पाट, देव्हारे, इ० ) बनविणारे किं० घरबांधणीसाठीं तुळया, खांब, इ० तासून यथास्थानीं बसविणारे जे कारागीर त्यांची जात किं० त्या जातीचा इसम. २ असलीं कारागिरीचीं कामें करणारा अन्य जातीचा कोणीही इसम. ३ एक पक्षी,-जो झाडावर चोंचीचे आघात करून ढलप्या पाडून आंत लपलेले किडे खातो. ॐ **सुतारकाम न०** १ घर बांधणें इ० रूप अनेक कारागिरांच्या साहाय्यानें करावयाचें जें काम त्यांपैकीं खांब, तुळया, पाटणी, इ० रचना करणें हें जें सुताराचें काम तें. २ सुताराची कारागिरी. **सुतारकी स्त्री०** सुताराचा धंदा किं० कारागिरी. **सुतारडा** पु० सुतार ( निंदेत ).

**सुतारनाळ स्त्री०** मागें ' सुतरनाळ ' पहा.

**सुतारा** [ म० सूत ] पु० कोष्ट्याच्या मागांतील एक अवयवविशेष.

**ताळ स्त्री०** भाताची एक जात.

**सुती** [ म० सूत+ई ( प्रत्यय ) ] **वि०** १ सुताचा बनविलेला ( दोरी, वस्त्र, इ० पदार्थ ).२योग्य रेषेंत, प्रमाणांत, ओळंब्यांत, किं० पातळींत असलेला ( खांब, तुळई, तक्तपोशी, रस्ता, इ० ). ॐ **एकसुती, दोनसुती,** इ० एका सुतानें, दोन सुतांनीं, किं० अधिक सुतांनीं बनविलेला ( दोरी इ० पदार्थ ). **गर्भसुती वि०** रेशीम आणि कापसाचें सूत यांच्या मिश्रणानें विणलेलें ( लुगडें, मंदील, इ० ).

**सुतींव** [ म० सूत+ईव ( प्रत्यय ) ] **वि०** वर ' सुती ' अर्थ १ आणि २ पहा.

**सुतेरा** [ सं० सूत्रकार ] **पु०** १ कोळी ह्या नांवाचा एक क्षुद्र किडा,-जो आपल्या अंगांतून बारीक सूत्र काढून त्याचें स्वतास राहाण्यासाठीं आणि माशा इ०खाद्य पकडण्यासाठीं जाळें करतो. २ह्या किड्यानें केलेलें जाळें किं०अशा जाळ्यांचा घर इ० मध्यें जमलेला हिडिस समुदाय.

**सुतोवाच, सुतवाच, सुतवाच्य** [ सं० सूतः उवाच=सूत बोलला ] **न०** १ कांहीं गोष्ट सांगावयाला सुरवात ( करणें ). २ कांहीं कामाचें दिग्दर्शन ( करणें ). ३ कांहीं गोष्टीची अंधुक कल्पना देणें ( करणें ). मागें ' सुतवाच्य ' पहा.

**सुत्रा, सुत्री, सूत्रा, सूत्री, सूत्रक** [ सं० सूत्र=दोरा ] १ सुतांत म्ह० ओळंब्यांत किं० पाणसळींत किं० पातळींत असलेला ( पदार्थ,- खांब, तुळई, भिंत, रस्ता, इ० ). २ योग्य सरणीनें किं० शिस्तीनें काम करणारा (कारागीर). ३ नियमित; वक्तशीर; नियमानें चालणारा ( माणूस ) किं० केलें जाणारें ( काम ).

**सुथारणें** [ सं० सुस्थिर ] **स० क्रि०** ( बिघडलेलें यंत्र, काम, संस्था, कारभार, इ० ) शिस्तविर आणणें किं० सुरळीतपणें चालेल असें करणें; दुरस्त करणें; ( चुकलेलें भाषण, विधान, इ० ) सुधारणें.

**सुंदडणें, सुंदणें स० क्रि०** १( शेण, चिखल, चुना, इ० ) पायाखालीं तुडवून कमावणें किं० मळणें. २ ( पदार्थाची ) तुडवून नासाडी करणें.

**सुदणें** [सिव्=विणणें, शिवणें, जोडणें] **अ० क्रि०** शिरणें; घुसणें; बसणें; जडणें; घातलें जाणें. **स० क्रि०** घालणें; शिरकाविणें; जडविणें; बांधणें.

**सुंद्णें** मागें 'सुंदडणें' पहा.

**सुंदम** [ सं० ] वि० नियंत्रणेंत किं० कह्यांत ठेवतां येण्याजोगा.

**सुंदर** [ सं० ] वि० देखणा; रमणीय. **सुंदरी, सुंदरा** स्त्री० मनोहर किं० रमणीय स्त्री.

**सुंदरी** स्त्री० सतार, रुद्रवीणा, इ० वाद्यांस विवक्षित स्वरानुसंधानानें त्याच्या दांडीस जे बंध बांधतात ते प्रत्येक.

**सुदर्शन** [सं०] वि० सुंदर; दिसण्यांत मोहक. पु०, न० १ विष्णूचें चक्र. मागें 'सु' मध्यें 'सुदर्शन' पहा. २ शालिग्राम शिळा फुटली असतां तिचें जें चक्रविशिष्ट शकल निघतें तें. **सुदर्शन** न० ( **मराठींत** ) कोणेकाचे पाठीस लागलेलें लचांड; शुक्ककाष्ठ. ह्या अर्थी 'सुदर्शन चक्र' सुद्धां. ॐ **सुदर्शनचूर्ण** न० ( **वैद्यक** ) कांहीं विशिष्ट द्रव्यें एकत्र कुटून जें एक विशिष्ट औषध करतात तें.

**सुदविणें** [ सं० सिव्=शिवणें ] स० क्रि० आंत ढकलणें; खुपसणें; कोंबणें.

**सुदामत** [ फा० मुदामद्=झालें आहे, आलें आहे] स्त्री० १ चाल; प्राचीन वहिवाट; रूढि. २ सलोखा. वि० सुरक्षित; निर्भय. क्रि० वि० सरळपणें; बिनहरकत; निर्भय रीतीनें; उ० काचेच्यीं भांडीं कावडींत घालून पाठवा म्हणजे तीं सुदामत पोंचतील; उ० ही गाय सुदामत दूध देईल तर तिला भाला घालण्याचें कारण पडणार नाहीं. मागें 'भाला' अर्थ २ पहा.

**सुदामा** [ सं० सुदामन् ] पु० १ कृष्णाचा एक अत्यन्त दरिद्री गुरुबंधु. २ ( **लाक्षणिक** ) अत्यन्त किडकिडीत माणूस. ॐ**सुदामपुरी** स्त्री० अत्यन्त दरिद्री लोकांची वसति किं० गांव किं० गांवाचा मोहल्ला. **सुदामदारिद्र्य** न० पराकाष्ठेचें दारिद्र्य. **सुदामदरिद्री** वि० अत्यन्त दरिद्री माणूस. **सुदामदेवाचें वस्त्र** न० अत्यन्त जीर्ण किं० फाटकें तुटकें असें वस्त्र. **सुदामदेव** पु० अत्यन्त रोडका आणि फाटकीं वस्त्रें पेहेरलेला मनुष्य. **सुदामपोहे** पु० अ० व० कोणेकाला दिलेला नजराणा,-जो अति हलक्या दर्जाचा कल्पून देणारा शालीनतेनें आपणाकडे कमीपणा घेतो. **सुदामे** पु० अ० व० पोहे. **टीप**,-सुदाम्यानें कृष्णाला पोहे भेट म्हणून दिले त्यावरून ही रूढि.

**सुदावा** पु० तपासाचें साधन. मागें 'सुगावा' पहा.

**सुदिन** न०, पु०, **सुदिवस** पु० [ सं० ] १ व्यतिपात, भद्रा, इ० दोषांनीं रहित दिवस. २ सणाचा दिवस. ३ मित्राची भेट होणें, व्यापारांत मोठा लाभ होणें, अरिष्ट टळणें, सुवार्ता कानीं पडणें, इ० रूप कोणत्याही कारणानें जो कोणेकाचा आनंदाचा दिवस तो. **टीप**,-वरील सर्व अर्थी 'सुदीस' हा गांवढळ अपभ्रंश.

**सुदीस, सदीस** [ म० सर्व+दिवस ] क्रि० वि० सर्व दिवसभर; सारा दिवस.

**सुदुर्लभ** [ सं० ] वि० मिळावयाला अति कठिण.

**सुदुश्चर** [ सं० ] वि० १ मंदचालीचा(पशु). २ करावयास किं० चालवावयास कठिण ( तप, व्रत, नेम, इ० ).

**सुदुस्सह** [ सं० ] वि० सोसावयास किं० भोगावयास कठिण.

**सुदुस्तर** [सं०] वि० तरून जावयास किं० पार पाडण्यास कठिण (नदी, प्रतिज्ञा, व्रत, काम, इ०).

**सुदृढ** [ सं० ] वि० १ खूप बळकट, भक्कम, किं० पक्का. २ नीरोगी ( प्रकृति, शरीर, इ० ).

**सुद्ध बुद्ध** [ सं० शुद्धि बुद्धि ] स्त्री० १ जाणीव, माहिती, ज्ञान. २ मूर्च्छेतून उठल्याची स्थिति. **टीप**,-दोन्ही अर्थी अशिक्षितांतच रूढि.

**सुद्धां** [ सं० सत्रा=बरोबर; सह; खरोखर ] क्रि० वि० १ सकट; उ० जोड्यासुद्धां येऊं कां ? उ० कपड्यासुद्धां फराळास बसूं कां ? २ देखील; उ० माझ्या बोलावण्यानें रामभाऊ येतील यांत नवल काय ? तात्यासाहेब त्याचे वडीलसुद्धां येतील.

**सुद्धा** [ सं० शुद्ध ] वि० निर्भेळ; खरेंखुरें; उ० हें दूध म्हणजे सुद्धें पाणी; उ० हें सोनें अगदीं सुद्धें आहे; उ० ही सुद्धी लबाडी आहे. **टीप**,-ह्या शब्दाची अशिक्षितांतच रूढि.

**सुधडणें, सुधणें** मागें 'सुंदडणें,' 'सुंदणें' पहा.

**सुधरणें** पुढें 'सुधारणें' पहा.

**सुधर्ष** [ सं० ] वि० १ नियंत्रणेंत, कह्यांत, किं० दाबांत ठेवतां येण्याजोगा. २ ज्याच्याजवळ जातां येईल असा ( माणूस, स्थळ, इ० ). ह्या दोन्ही अर्थी उलट शब्द ' दुर्धर्ष '.

**सुधा** [सं०] स्त्री० १ अमृत,-देवांचें खाद्य. २ भिंत इ०ना देतात तो चुना;सफेता.३विड्याच्या पानाला लावतात तो चुना. ४ फुलांतील मध. **#सुधारस** पु० साखरेच्या पाकांत लिंबाचा रस, वेलदोड्याचें चूर्ण,केशर, इ० द्रव्यें घालून पोळी इ० बरोबर खावयास करतात तो पदार्थ.

**सुधा** [सं० शुद्ध]वि०१सन्मार्गानें चालणारा; आडमुठा किं० हट्टी नव्हे तो.२सरळ(सर्व अर्थी); उ० सुधा माणूस, रस्ता, वर्तन, भाषण, व्यवहार, इ०.

**सुधारणा, सुधारणी, सुधारणूक** [ सं० सु+धारण ( किं० धारणा ) ] स्त्री० १ उत्कर्षाची स्थिति; अधिक चांगलेपणाची स्थिति. २ लेख,भाषण,अभ्यास, इ०मध्यें प्रगति.३बिघडलेली प्रकृति, वाईट मार्गाला लागलेला माणूस, किं० बिनसलेलें काम पुन्हां चांगल्या स्थितीस येणें. ४ वाइटाचा अंश कमी होऊन किं० अजीबाद नष्ट होऊन अधिक चांगल्या दशेप्रत येणें.

**सुधारणें** [ सं० सु+धृ, धारय् ] अ० क्रि० १ बिघडलेलें किं० बिनसलेलें जें कांहीं तें चांगलें किं० पूर्वीप्रमाणें चांगलें होणें. २ भलत्याच मार्गाला लागलेला मनुष्य चांगल्या मार्गावर येणें. स० क्रि० १ चांगलें करणें; सुव्यवस्थित करणें; सन्मार्गाला लावणें; चांगल्या पायावर स्थापिणें. २ निर्दोष करणें; बिनचूक करणें; काम, पदार्थ, मांडणी, इ० तील चांगल्याचा अंश वाढविणें.

**सुधी** [ सं० ] वि० १ विद्वान्. २ शहाणा. स्त्री० चांगली किं० तल्लख बुद्धि.

**सुधीर** [ सं० ] वि० नेटदार; गंभीर.

**सुनका, सुना, सुणा** [ सं० शून्य ] वि० नग्न; उघडा; रिकामा;ओका; विरहित;रिकामा; लाभरहित; उ० बांगड्यांवांचून हात सुना; उ० मार खाल्यावांचून त्याचा एक दिवस सुना जात नाहीं; उ० ह्या सुन्या वाड्यांत मला एकट्याला रहावयाची भीति वाटते.

**सुनत, सुनता** मागें ' सुंता ' पहा.

**सुनबहिरी** [ हिं० ] स्त्री० स्पर्शज्ञान ज्यांत नाहींसें होतें असा एक रोग.

**सुनावणें, सुनाविणें** [ सं० श्रु=ऐकणें; श्रावय्=ऐकविणें, सांगणें ] स० क्रि० स्पष्ट करून सांगणें; सांगणें; (तकरार, खटला, वाद, पुरावा, इ०) न्यायाधीशाच्या नजरेस आणून देणें किं० त्याच्या पुढें मांडणें.

**सुनी, सुन्नी** [अ०] पु० मुसलमानांतील एक धर्मपंथ. दुसरा पंथ ' शिया. ' मागें ' शिया ' पहा. सुन्नी लोक पहिल्या तीन खलिफांना चवथ्या खलिफाइतकाच मान देतात आणि उलट पक्षीं शिया लोक पहिल्या तिघांचा तीव्र निषेध करतात आणि चवथा खलिफा हझरत अली याला आणि त्याच्या वंशजांस फार पूज्य मानतात.

**सुपक** [ सं०सुपक ]वि०१उत्तम प्रकारें शिजलेलें किं० भाजलेलें (खाद्य). २ खमंग वास आणि रुचि येईल अशा प्रकारें भाजलेली (पोळी इ०).

**सुपडें** न०, **सुपली** स्त्री० [ म० सूप; सं० शूर्प ] १ लहान सूप,-धान्य पाखडणें इ० च्या उपयोगाचें. २ सूप ( तुच्छतेंत ).

**सुपतळ** न० घाम टिपून घेण्यासाठीं जोड्यांत किं० घोड्याच्या पाठीवर घालतात तें कातडें, बुरणूस, इ०. मागें ' सुकतळ ' पहा.

**सुपती** स्त्री० पाथरवटाचा हातोडा.

**सुपरीत** [ म० 'विपरीत' ला जाबदार आणि उलट अर्थाचा घडविलेला शब्द]वि०१न बदललेला; न चळलेला.२सुलटा. ३खरा. ४ नियमाला धरून असलेला. ५ अनुकूल. ६ शास्त्र, रूढि, इ० शीं जुळणारा. टीप,-जें ' विपरीत ' नव्हे तें ' सुपरीत '. मागें 'विपरीत' पहा.

**सुपली, सुंपली** स्त्री० मागें ' सुपडें ' पहा.

**सुपात्र** [ सं० ] न० देणगी, आश्रय, विद्या, संस्कार, उपदेश, इ० चें ग्रहण करावयास योग्य आहे असा मनुष्य, पशु, पदार्थ.

**सुपानी** स्त्री० स्त्रिया नाकांत किं० कानांत घालतात तें सुकलें.

**सुपारी** स्त्री० १ पोफळीच्या झाडाचें फळ; पोफळाची साल काढून आंत जी गोटी राहाते

ती. सुपारी विड्यांत खातात.सुपारीच्या शेकडों जाति आहेत. २ पोफळीचें झाड. ॐ ब्राह्मणाला अनुष्ठान,लग्न,मुंज,इ०साठीं सुपारी देणें त्याला अनुष्ठान चालविण्याला किं०लग्न, मुंज,इ० संस्कार करण्यास निश्चित करणें. याच सरणीनें वाजंत्री, गोंधळी, बढाई, सुतार, इ०स सुपारी देणें म्ह० त्यांना त्या त्या कामीं निश्चित करणें किं० ठरविणें. टीप,–' सुपारी' हा शब्द एका व्यक्तीचा वाचक असून शिवाय समुदायाचाही वाचक आहे; उ० यंदा सुपारी चांगली पिकली. टीप,– 'सुपारी'शब्दाच्या वरील दोन अर्थांवरून 'सगळ्या गलबतांत अर्धी सुपारी माझी ' असा झोंडपणा दाखीवणारा श्लेषमूलक वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. चिकणी, बरडी, रोठी, श्रीवर्धनी, कापी, लवंगचूर, दगडी, खाडी, पांढरी, ओली, इ० सुपारीचे शेकडों प्रकार बाजारांत विकावयास येतात. ॐ सुपारीघाटी मोती इ० न० सुपारीच्या घाटाचे मोती इ०.

**सुपिंड** [ सं० सु+पिंड ] वि० धष्टपुष्ट किं० गोटीदार शरीराचा ( घोडा, माणूस, इ० ).

**सुपीक** [ म० सु+पीक ] न० पर्जन्यादिकांच्या अनुकूलतेमुळें जें विपुल पीक येतें तें.

**सुपुर्त, सुपुर्द** [ फा० सुपुर्द्=देणें ] वि० दान केलेलें, हवाली केलेलें, बक्षीस दिलेलें (करणें). टीप,–' सुपुर्द ' स्वतंत्रपणें योजण्यांत येत नाहीं. ' सुपुर्द करणें ' असा प्रयोग होतो;उ० पुढें शाहूमहाराज यांनीं पेशव्यांस सर्व राज्याधिकार सुपुर्त केला.

**सुपेती** [ सं० स्वपिति=तो निजतो ] स्त्री० निजावयाची गादी.

**सुप्त** [ सं० ] वि०१ निजलेला; झोपलेला; निद्रित. २ बधिर झालेलें ( गात्र ). ३ प्रगल्भ दशेंत न आलेली ( बुद्धि, कल्पकता, वाचा, गुण, कौशल्य, चातुर्य, इ० ).

**सुप्ति** [ सं० ] स्त्री० १ झोप; निद्रा. २ बेशुद्धि. ३ स्वप्न. ॐ सुषुप्ति स्त्री० १ गाढ निद्रा. २ ज्ञानशून्य जीवावस्था. ३ अज्ञान.

**सुप्रभात** [ सं ] न० १ फटफटीत दिवस उजाडणें. २ अगदीं पहाटे. ॐ सुप्रभा, सुप्रभातें क्रि० वि०अगदीं पहाटेस; मोठ्या पहाटेस

**सुप्रयुक्त** [ सं० ] वि० उत्तम प्रकारें किं० शास्त्रशुद्ध रीतीनें योजलेला किं० कामीं लाविलेला. क्रि० वि० १ खराबी किं० नासाडी न होईल अशा रीतीनें किं० अशा प्रकारानें. २ सुसंघटित रीतीनें. [संतुष्ट.

**सुप्रसन्न** [सं०] वि० अत्यन्त आनंदित किं०

**सुफराटा** [ म० सुपरीत ] वि० योग्य दिशेस किं० दिशेकडे वळविलेला किं० चाललेला; योग्य प्रकारें-म्हणजे सुलट रीतीनें बांधलेला, ठेविलेला, वापरलेला, किं० पेहेरलेला.

**सुफल** न० सुई, दाभण, बाण, इ०ना पाडलेली खाच किं० भोक.

**सुफल** [ सं० ] वि० १ ज्याला चांगली किं० विपुल फळें येतात असें( झाड ). २ ज्याचा योग्य किं० इष्ट परिणाम झाला आहे असा ( प्रयत्न, खटपट, किं० कोणतेंही कर्म ). ३ फायदेशीर ( व्यापार, धंदा, इ० ).

**सुंब, सुंभ** न०, पु०, **सुंबाडी**, **सुंभाडी** स्त्री०१नारळाच्या कवचीचे म्हणजे सोडणाचे तंतु किं० ह्या तंतूंची वळलेली दोरी. २ ताग, आंबाडी, मोळ,इ०च्या तंतूंची वळलेली दोरी. ॐ सुंबखंड न०, सुंबखंडी,सुंभखंडी स्त्री०, सुंभखंड न० सुंभाचा तुकडा. सुंभ जळे पण पीळ न जळे हट्टी माणसाचें नुकसान झालें तरी तो आपला हट्ट सोडीत नाही.

**सुंब** [ हिं० सूम् ] पु० घोडा, गाढव, किं० खेचर यांचा खूर. ॐ सुंबतराष [ फा० सुंब्+तराष्; तराषीदन्=कापणें, तासणें ] पु० घोड्याचे खूर तासण्याचा धंदा करणारा. सुंबतराषी स्त्री० हा धंदा.

**सुबक** [ फा० ] वि० घाटांत, डौलांत, घडणींत, किं० रचनेंत सुंदर, नीटनेटका, किं० आटोपसर (दागिना, देव्हारा, कपडा,भांडें, इ०).

**सुबकणें** स० क्रि० धुवावयाचें वस्त्र पाण्यांत भिजवून दोन्ही हातांत धरून दगडावर अनेकवार हापटणें; चुबकणें. मागें ' चुबकणें ' पहा.

**सुंबणें, सुंभणें** [ म० सुंब, सुंभ ] स० क्रि० ( बाज, पलंग, माचा, इ० ) सुंभाच्या दोरीनें विणणें.

**सुबत्ता** [ हिं० सुभता ] स्त्री० देश, गांव

इ० ची वैभवाची, समृद्धीची, किं० वैपुल्याची स्थिति; सुखशांतीचा काळ.

**सुंबा, सुंभा** पु० १ खडक किं० मोठा फत्तर फोडावयाचें एक आउत. २ तोफ ठासावयाचा गज. ३ घोडा, गाढव, खेचर, इ० चा खूर.

**सुबा, सुबेदार** इ० पुढें ' सुभा, ' 'सुभेदार,' इ० पहा.

**सुबाईक** [ म० सुभिक्ष ] न० समृद्धीचा किं० सुखशांतीचा काळ.

**सुंबाडी, सुंभाडी** स्त्री० मागें ' सुंब, सुंभ ' मध्यें पहा.

**सुबारा** [ म० सु + बारा ] पु० १ सोंगट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. २ झुकांडी देणें; पळून जाणें.

**सुंबी** वि० चार जाड आऱ्यांचें ( चाक ).

**सुबुद्ध** [ सं० ] वि० १ जाणता; ज्ञानी; समंजस. २ सुशिक्षित.

**सुबोध** [ सं० ] वि० १ आकलन करावयास किं० शिकावयास सोपें. २ शिकविण्यास सोपा किं० सोयीचा ( विद्यार्थी ). ३ ज्याचा सहज उलगडा करतां येईल असा ( प्रश्न, विधान, श्लोक, ग्रंथ, व्याख्यान, इ० ). पु० चांगला उपदेश.

**सुंभ** मागें ' शुंभ ' सर्व अर्थी पहा.

**सुभक** मागें ' सुबक ' पहा.

**सुभग** [ सं० ] वि० १ दैववान्. २ सुंदर. ३ मधुर; रम्य. ४ प्रिय. ५ सुखदायक. **सुभग** न० सुदैव; चांगलें नशीब. **सुभगा** स्त्री० १ प्रिय पत्नी. २ सुवासिनी.

**सुभट** [ सं० ] पु० उत्तम योद्धा.

**सुभट** वि० १ चांगल्या घडणीचें. २ आटोपसर. ३ मोठा; भव्य; टोलेजंग.

**सुभा** [ अ० सूबाह् ] पु० १ प्रांत; परगणा. २ विशिष्ट प्रांत किं० परगणा यांचा अधिकार. ३ सुभ्याकर अमल करणारा अधिकारी. **सुभेदार** पु० १ सुभ्यावर अमल करणारा अधिकारी. २ मल्हारराव होळकराचें टोपण नांव. **सुभेदारी** स्त्री० सुभेदाराचा अधिकार, दर्जा, किं० कार्यक्षेत्र. **सुभां** क्रि० वि० सुभ्याकडे, सुभ्यामध्यें, सुभ्याच्या ताब्यांत ( नमूद करणें ). **सुभपेटा** पु० सुभ्याचा पोटभाग.

**सुभाज** [ म० सु+भाजणें ] वि० चांगली भाजलेली (पोळी, भाकरी, हरभरे, पापड, इ०).

**सुंभाडी** स्त्री० मागें ' सुंब, सुंभ ' मध्यें पहा.

**सुभावणा** [ सं० शुभ ( सुंदर )+म० वाणा ( सारखा ) ] वि० सुंदर, देखणा, गोंडस ( माणूस, पशु, पदार्थ ).

**सुभाषित** [ सं० ] न० १ चटकदार वाक्य किं० वचन. २ म्हण. वि० उत्तम प्रकारें बोललेलें, योग्य, अनुरूप ( उत्तर, कोटि, इ० ). मागें ' सु ' मध्यें पहा.

**सुभित्ता** स्त्री० मागें ' सुबत्ता ' पहा.

**सुभिक्ष** [ सं० ] न० सुकाळ; पिकें, स्वस्ताई, पाणी, इ० संबंधानें जो सुखाचा काळ तो. वि० स्वस्ताईचा, समृद्धीचा, वैपुल्याचा (काळ, देश ).

**सुभेदार, सुभेदारी** मागें 'सुभा' मध्यें पहा.

**सुमंत** [ सं० सु + मंत्र+इन् ( प्रत्यय ) ] पु० शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकीं एक.

**सुमधुम** वि० १ सरळ; वाकडा नव्हे तो ( रस्ता, नदीचा प्रवाह ). २ स्वच्छ, स्पष्ट, बिनचूक, आरशासारखा ( हिशेब, जमाखर्च ). ३ धोपटमार्गी ( वर्तन ).

**सुमन** [ सं० ] पु० १ गहूं. २ धोत्रा.

**सुमना** [ सं० ] स्त्री० जाई,–सुवासिक आणि नाजुक फुलांची एक वेल.

**सुमना** [ सं० सुमनस् ] वि० प्रसन्न मनाचा. पु० १ देव. २ पंडित. ३ गहूं. **सुमना** स्त्री० फूल. **सुमन** न० ( मराठींत ) फूल. **सुमनस्क** वि० १ प्रसन्न आहे मन ज्याचें असा. २ शांत. ३ प्रामाणिक, निष्कपट ( माणूस ).

**सुमसाम** मागें ' सामसूम ' पहा.

**सुमार** [ फा० शुमार् ] पु० १ गणती. २ अंदाज; अजमास; तर्क. ३ गमनाचा रोख; दिशा; उ० दख्खनचा सुमार धरून फौज निघाली. ४ साधारणपणें खरें किं० नक्की स्थल, काळ, मुदत, संख्या, परिमाण, अवधि, इ०; उ० ह्या सुमारास वडगांव असणार; उ० चाराच्या सुमारास आपण मुंबईस पोहोचूं. ५ बंदूक, बाण, इ० चा धरलेला रोख किं० नेम. ६ ( मराठींत ) बेतबात, योग्य मर्यादा, सभ्य चाल, रीति, किं० शिरस्त; उ० गुरुजनांशीं सुमारानें बोलावें; उ० तो रागावला

म्हणजे त्याला सुमार राहात नाहीं. ॐ **सुमाराचें** **वि०** मध्यम प्रतीचें. **सुमारमाफक वि०** मध्यम प्रतीचा; साधारण दर्जाचा किं० गुणाचा. **सुमारी स्त्री०** गणती, मोजदाद; उ० खानेसुमारी; शेतसुमारी. **सुमारें क्रि० वि०** आजमासें. **सुमारी स्त्री०** आजमास.

**सुमारणें** [ म० सुमार ] **अ० क्रि०** १ अटकळींत येणें. २ ( धान्यें, पिकें, मसलत, बेत, इ० ) बऱ्याच रंगारूपास येणें. ३ ( काम, खटपट, प्रयत्न, इ० ) बऱ्याच पल्ल्यापर्यंत गेलेला असणें.

**सुमेधा** [ सं० सु+मेधस् ] **वि०** १ शाहाणा. २ बुद्धिमान्.

**सुमेरु** [ सं० ] **पु०** मेरु पर्वत. ह्याचीं अन्य नांवें मेरु, हेमाद्रि, रत्नसानु, सुरालय, इ० आहेत.

**सुयटा पु०, सुयटी स्त्री०** माड, पोफळ, केळ, गहूं, इ० झाडांच्या पोटांतून नुकतेंच बाहेर पडलेलें साग्र पर्ण,–विकसित व्हावयाच्या पूर्व स्थितींतील.

**सुयंत्र** [म० सु+यंत्र] **न०** ( शब्दशः )उपयुक्त यंत्र; सुस्थितींत असलेलें यंत्र. **क्रि० वि०(मराठींत)** विघ्नें, हरकती, निराशा, किं० थांबणूक न येतां ( विद्या, अभ्यास, काम, प्रवास, इ० चालणें ).

**सुयरणें, सुयारणें** [ म० सुई ] **अ० क्रि०** (केळ, माड, पोफळ, इ० झाडें) कांहीं रोगामुळें सुयटा बाहेर न पडण्याच्या स्थितींत येणें किं० असणें.

**सुयेर, सुयेरणें** पुढें ' सुवेर, ' ' सुवेरणें ' पहा.

**सुर** [ सं० ] **पु०** देव. ॐ **सुरांगना स्त्री०** अप्सरा. **सुराधिप, सुरेंद्र, सुरेश्वर पु०** १ इंद्र. २ विष्णु. **सुराचार्य पु०** बृहस्पति. **सुरालय पु०** १ मेरु पर्वत. २ स्वर्ग. ३ देऊळ. **सुरर्षि पु०** देवर्षि. **सुरगुरु पु०** १ बृहस्पति. २ विष्णु. **सुरज्येष्ठ पु०** ब्रह्मदेव. **सुरधनु** [सं० सुरधनुस् ] **न०** इंद्रधनुष्य. **सुरतरु पु०** कल्पवृक्ष. **सुरदीर्घिका, सुरनदी, सुरसरित् स्त्री०** गंगा; स्वर्गातील नदी. **सुरद्विषू पु०** १ राहु. २ राक्षस. **सुरपति पु०** इंद्र.

**सुरई वि०** १ उकडे नव्हेत असे ( तांदूळ ). २ लवंगा, वेलदोडे, जायफळ, जायपत्री, इ० रूप उंची मसाल्याचीं किं० बाळंतिणीस द्यावयाचीं ( औषधें ).

**सुरई** [ हिं० सुर्‌वही ] **स्त्री०** कट्यारीसारखें एक हत्यार.

**सुरई** [ सं० सुरा ] **स्त्री०** जस्ताचें, उंच गळ्याचें, चिवळ तोंडाचें, आणि आकारविशेषाचें पात्र,–पाणी ठेवणें, सरबतें ठेवणें, इ०च्या उपयोगाचें.

**सुरकंडी, सुरकांडी, सुरकुंडी स्त्री०** १ मागें ' सरळी ' पहा. २ डोकें पुढें कलवून दाटींत घुसणें. **सुरकंडी, सुरकांडी स्त्री०** पिचकारींतून किं० तोंडांतून जोरानें उडविलेली पाणी इ० ची धार.

**सुरकणें अ० क्रि०** १ जोरानें किं० वेगानें उडणें किं० निसटणें. २ मंडळींतून हळूंच निघून किं० निसटून जाणें.

**सुरकुतणें अ० क्रि०** ( वस्त्र, चर्म, कागद, पान, इ० चें) अनियमित प्रकारें आकुंचन झाल्याकारणानें त्यांचा सपाटपणा भंग पावणें.

**सुरकुती स्त्री०** वस्त्र, चर्म, कागद, पान, इ० च्या पृष्ठभागाचा सपाटपणा आकुंचनादि कारणांनीं किं० अव्यवस्थितपणें घडी घातल्यामुळें नष्ट होऊन जे मध्यें मध्यें उंचवटे उत्पन्न होतात ते प्रत्येक.

**सुरक्या** [ म० सूर ] **पु०** १ वाजंत्र्यांच्या ताफ्यांतील सूर धरणारा माणूस. २ आट्यापाट्या ह्या खेळांत मधल्या उभ्या रेषेवर काम करतो तो गडी. ह्याला ' सुरदुंग्या ' असेंही म्हणतात.

**सुरक्या, सुरख्या** [ म० सुरू=प्रारंभ ] **पु०** गंजिफांच्या खेळांत ज्या चित्रापासून खेळाचा प्रारंभ होतो तें चित्र.

**सुरखाई** [ म० सुरेख ] **स्त्री०** सुंदरपणा; दिसण्यांत मोहकपणा.

**सुरखाई, सुरखी**[ फा० सुरखी=तांबडा, तांबडा रंग] **स्त्री०** १ चटकदार दिसणारा असा वस्त्र, चेहरा, इ० चा तांबूसपणा किं० तांबडेपणा. २ औषधाच्या किं० अमली पदार्थांच्या सेवनानें तोंडावर किं० डोळ्यांना येतो तो तांबडेपणा. ३ फुलें, झाडें, इ० वर येतो तो टवटवीतपणा किं० तजेला.

**सुरखुती स्त्री०** मागें ' सुरकुती ' पहा.

**सुरख्या पु०** गंजिफांच्या खेळांत ज्या चित्रापासून खेळाचा प्रारंभ होतो तें चित्र.

**सुरंग, सुरुंग** [ सं० सुरंग, सुरंगा ] पु० १ खडक, किल्याचा तट, इ० ढासळावा म्हणून त्याला खालीं जें भोक पाडून त्यांत दारू ठासून त्या दारूला बत्ती लावितात तें भोक ( पाडणें, उडविणें ). २ भुयार. ३ भिंतीला चोरांनीं पाडलेलें भोक. ४ भूगर्भांत प्रवेशासाठीं किं० वाट करण्याठीं माती खोदून केलेला रस्ता. ५ दोन डोंगरांच्या मधील अरुंद वाट.

**सुरंग, सुरंगी** [ सं० सुरंगी ] स्त्री० एक झाड. याचें लाकूड तांबडें किं० तांबूस असतें.

**सुरंग** [ सं० ] पु० चटकदार रंगाचा; तजेलेदार. ❀ **सुरंग धातु** पु० गेरू; काव.

**सुरगांठ** स्त्री० मागें ' सरगांठ ' पहा.

**सुरंगी** [ सं० सुरंग ] स्त्री० १ खडक, किल्याचा तट, इ० फोडण्यासाठीं आणि दारू ठासण्यासाठीं भोक पाडावयाची पहार. २ कोणत्याही कामीं भोक पाडावयाची पहार. [पहा.

**सुरंगी** स्त्री० एक झाड. मागे ' सुरंग, सुरंगी'

**सुरंज** पु० सुरंजी नांवाच्या झाडाचें मूळ. ह्याचा तांबडा रंग होतो.

**सुरंजी** स्त्री० एक झाड. याच्या मुळापासून तांबडा रंग होतो. वि० ह्या रंगानें रंगविलेला ( कपडा ).

**सुरंट, सुरट** पु०, न० एक प्रकारची केसाळ आळी. ह्याचे केश अंगाला लागले असतां भारी कंड सुटते. ' सुरवंट ' हा शब्द. अधिक प्रचलित ' घला ' हाही ह्याच प्राण्याचा वाचक शब्द आहे.

**सुरण** [ सं० शूरण ] पु० एक कंद. हा खाजरा किं० गोडा असतो. ह्याची भाजी करतात. मुळव्याधीवर याचा उपयोग होतो.

**सुरत** [ सं० ] न० मैथुन.

**सुरत** [ अ० सूरत ] स्त्री० १ चेहेऱ्याची ठेवण; चेहरा; दर्शन. ❀ **खूबसूरत** वि० सुंदर; मोहक. **सुरतपाक** [ अ० सूरत+फा० पाक् ( स्वच्छ ) ] वि० टवटवीत; दिसण्यांत चटकदार; मोहक.

**सुरत्या** [ म० सूर ] पु० सूर धरणाराचा जोडीदार किं० मदतनीस. पुढें 'सूरकरी' पहा.

**सुरदार** वि० मागें ' सुरूदार ' पहा.

**सुरनदी** मागें ' सुर ' मध्यें पहा.

**सुरनीस, सुरनवीस** [ फा० सुरूअ+नवीस् ( लेखक ); नविष्तन्=लिहिणें ] पु० सरकारांतून देण्यांत येणाऱ्या सनदा, वराती, आणि कौलनामे, इ० वर सुरू, सुद, आणि बार ह्या तीन शब्दांचा शिक्का मारणारा अधिकारी. यालाच पुढें ' सचिव ' म्हणूं लागले.

**सुरनीस** [ म० सूर+फा० नवीस् ] पु० १ देवळांत वाजंत्र्यांच्या ताफ्यांत सनई वाजविणारा इसम. २ हरिदास इ० च्या मागें सूर लांबविणारा इसम.

**सुरपणें** अ० क्रि ( सांठवून ठेविलेलें भात ) आंत भुरली पडल्यामुळें फोलासारखें हलकें होणें. मागें ' भुरलें ' पहा.

**सुरपाटी** स्त्री० आट्यापाट्यांच्या खेळांत दोन्ही बाजूंनीं पाट्या ( चौकटी ) पाडलेल्या असून मध्यें एक उभी थेटपर्यंत जाणारी रेघ असते ती. हिला ' सुरदुंग पाटी ' असेंही म्हणतात. मागें ' सुरदंग, सुरदुंग ' पहा.

**सुरपारंबी** स्त्री०, **सुरपारंबा** पु०, **सुरपारंब्या** स्त्री० अ० व० झाडावर सरसर चढावयाचें, सरसर उतरावयाचें, आणि एक काठी (जिला ' सूर ' म्हणतात ती) फेकावयाची ह्या रूपाचा मुलांचा एक खेळ ( खेळणें ). ❀ **कोणेकाशीं सुरपारंब्या करणें** त्याला वात्रटपणें उडवाउडवीचीं उत्तरें देणें.

**सुरफाक** पु० गायनांतील एक ताल.

**सुरफाटणें, सुरफाटा** मागें ' सुफराटणें, ' ' सुफराटा ' पहा.

**सुरबंद** [ सं० शूल+म० बंद ] स्त्री० पोटदुखी, जंत, इ० बंद किं० नष्ट करण्यासाठीं ज्याचा उपयोग होतो असें एक झाड.

**सुरभि** [ सं० ] वि० १ रमणीय; सुंदर. २ सुवासिक. ३ सुखदायक. पु० १ सुवास; सुगंध. २ वसंत. ३ चंपक; बकुल. **सुरभि,सुरभी** स्त्री० १ कामधेनु. २ गाय.

**सुरमा** [ फा० ] पु० १ शिबें हा शरीराच्या त्वचेवर वेगळ्या रंगाचे डाग पाडणारा एक रोग. २ डोळ्यांत घालावयाचें एक अंजन.

**सुरमाड** पु० एक प्रकारचा माड. याला 'भेरळ,' 'भेरला माड,' 'भेरली माड,' 'भेरळी माड' अशीं अन्य नांवें आहेत. मागें हे शब्द पहा.

**सुरमी** स्त्री० १ फार जेवण झाल्यामुळें अंगांत येते ती सुस्ती. २ एक मत्स्यविशेष. ह्या अर्थी 'सुरमई' सुद्धां. ३ एक त्वग्रोग.

**सुरय, सुरयी** स्त्री० १ एक प्रकारची तरवार. २ एक प्रकारचें भांडें.मागें 'सुरई' पहा.

**सुरवंट** [ म० सड ( केश )+वंत ( युक्त ) ] एक सरपटत जाणारा आळीसारखा प्राणी. मागें 'सुरट,' 'सुरट' पहा.

**सुरवा** पु० माड, केळ, इ० झाडांची सुई.

**सुरवाडा** पु० पोवाड्याच्या चालीवरचें देवाचें स्तोत्र.

**सुरवात** [ अ० शुरूआत् ] स्त्री० प्रारंभ.

**सुरवार** [ फा० शुल्वार् ] स्त्री० एक प्रकारची विजार.

**सुरवारी** वि० एक प्रकारचा ( हिरडा ).

**सुरवेंट** मागें 'सुरवंट' पहा.

**सुरस** [ सं० ] वि० १ गोड, रुचकर, चवदार. २ मनोरंजक ( कादंबरी, भाषण, इ० ).

**सुरसन, सुरुसन** [ अ० शुहूर्=महिने; सन्=वर्ष ] पु०,न० हिजरी शकानंतर सातशे पंचेचाळीस वर्षांनीं म्हणजे इसवी सन १३४४ सालीं सुरू झालेला मुसलमानी शक.

**सुरसा** पु० लाकडाच्या दोन फळ्या कडांनीं संबद्ध करण्यासाठीं दोन्ही टोकांकडे जे निमुळते खिळे योजतात ते प्रत्येक.

**सुरसाबीज** न० सबज्याचें बीज.

**सुरसुर** स्त्री० अंगाला मुंग्या येणें हा विकार.

**सुरसुरी** स्त्री० १ उडवावयाच्या दारूचा म्ह० आतिषबाजीचा एक पदार्थ. २फार जेवणामुळें येतें तें मांद्य. ३कांहीं काम करण्याची उत्कट [illegible]ा ( येणें ). [ हें तंतुवाद्य.

**[illegible]रेसोटा** पु० सोटयाच्या आकाराचा वीणा-

**[illegible]रळी** स्त्री० १ कागद, कातडें, वस्त्र, इ०ची [illegible]ळा किं० वळकटी. २ एक प्रकारचें रेशमी किं० लुगडें.३ह्या प्रकारच्या वस्त्राची चोळी.

**सुरळीत** [ म० सरळ ] वि० मध्यें विघ्नें, अडचणी, थांबणूक, इ०न येतां चाललेला (प्रवास, काम, अभ्यास, वाचन, वर्तन, इ०).

**सुरक्षित** [ सं० ] वि० चोर, नाश, अपहार, अव्यवस्था, इ० मुळें न बिघडलेला; पूर्वींच्याच स्थितींत असलेला; यथास्थित.

**सुरा** [ अ० सूरा ] पु० कुराणाचा खंड.

**सुरा** [ सं० छुरी ] पु० १ कापण्याचें शस्त्रविशेष. लहान जो सुरा त्याला 'सुरी' म्हणतात. २ एक प्रकारचा खंजीर.

**सुरा** [ सं० ] स्त्री० १ मद्य; दारू. २ पाणी अत्तर, तेल,इ० ठेवण्याचें आकारविशेषाचें पात्र; सुरई. ॐ **सुराप** वि० दारूचें व्यसन असलेला; दारू पिणारा. **सुरापान** न० दारू पिणें. **सुरामंड** पु० मद्याची साय.

**सुराख** [ म० सु (चांगली)+राखणें ]स्त्री० चांगली टेहळणी किं० देखरेख.

**सुराखार, सुऱ्याखार** पु० सोरा ह्या नांवाचा क्षार. [ मध्यें पहा.

**सुरांगना, सुराचार्य, सुरालय** मागें 'सुर'

**सुरी** [ सं० छुरी ] स्त्री० पदार्थ कापावयाचें शस्त्रविशेष; लहान सुरा.

**सुरुंग** मागें 'सुरंग' पहा.

**सुरुवात, सुरुवात** [ अ० 'शुरूअ' चें अ० व० शुरूआत ]स्त्री० प्रारंभ; आरंभ.

**सुरूं** [ अ० शुरूअ ] वि० १ आरंभिलेलें. २ चालू असलेलें ( काम ). ॐ **सुरूघोडा** पु० प्रजोत्पादनार्थ ठेविलेला घोडा; वळू घोडा. **सुरूतहकूब** वि० एकदा सुरूं करून पुढें बंद केलेलें किं० बंद टाकलेलें ( काम ).

**सुरू** [ फा० सर्व् ] पु० एक प्रकारचें झाड. हें सदा हिरवें, उंच, सरळ, आणि माथ्याकडे निमुळतें होत गेलेलें असतें. फारशी कवि स्त्रीच्या शरीराला ह्या झाडाची उपमा देतात. ॐ **सुरूचा, सुरूदार** वि० सुरूच्या झाडासारखी ( गुलाबदाणी, समई, इ० ).

**सुरूख** मागें 'सुरख्या, सुरख्या' पहा.

**सुरूखुरू, सुर्खरू, सुरूखरू** [ फा० सुर्ख् ( तांबडा )+रू ( चेहरा ) ] वि०१( शब्दशः ) तांबड्या तोंडाचा. २ ( लाक्षणिक ) तजेलेदार

३ उजळ तोंडाचा. ४ (लाक्षणिक) अंगावर आलेल्या दोषारोपापासून मुक्त झालेला. ५ (लाक्षणिक) पाप करून आपण निष्पाप आहों असें निर्लज्जपणानें सिद्ध करूं पाहणारा; निर्लज्ज; बेशरम. [सुंदर.

**सुरूप** [ सं० सु ( चांगलें ) + रूप ] वि०

**सुरेख** [ सं० सु+रेखा ] वि० सुंदर; रेखींव आकृतीचा. ❀ **सुरेखाई, सुरखाई, सुरेखी** स्त्री० सुंदरपणा; मोहकपणा.

**सुऱ्या** पु० कुरड्या, चकल्या, इ० करण्याचें सच्छिद्र पात्र.

**सुऱ्या** [ म० सूर ] पु० गवयाशीं सूर धरून साथ करणारा. पुढें 'सूरकरी' पहा.

**सुऱ्या खार** [ सं० सूर्य+म० खार ] पु० एक क्षार.

**सुलखणी** [ म० सुलखणें ] स्त्री० सोनें पारखण्याची एक क्रिया. पुढें 'सुलाख' पहा.

**सुलखणें** स० क्रि० संस्कारविशेष करून (सोनें) पारखणें. पुढें 'सुलाख' पहा.

**सुलटणें** [ म० सुलटा ] अ० क्रि० सुलटा होणें. स० क्रि० सुलटा करणें.

**सुलट, सुलटा** वि० १ इष्ट किं० योग्य किं० अनुकूल दिशेस असलेला किं० चाललेला. २ ज्याची आंतली बाजू आंत आणि बाहेरची बाजू बाहेर आहे असा. ३ नेहेमींच्या रीतीनें किं० क्रमानें करावयाचें (काम); क्रमवार; शिस्तवार. **टीप,**– सर्व अर्थी 'सुलटा' ह्याच्या व्यावर्तकत्वें 'उलटा'.

**सुलतान** [ अ० सुल्तान् ] पु० १ पादशहा. २ अनियंत्रित रीतीनें किं० जुलमानें राज्य करणारा राजा किं० अंमलदार. ❀ **सुलतान हवा** पु० १ हवा. २ अत्यन्त धाडसी पुरुष. **सुलताना** स्त्री० १ महाराणी. २ सुलतानाची पत्नी. **सुलतानी** स्त्री० १ अधिराज्य. २ जुलमी राजसत्ता. **अस्मानी सुलतानी** [फा० आस्मान्=आकाश; सुलतान्=बादशहा ] स्त्री० दुर्दैवामुळें किं० राजाच्या दुष्टपणामुळें अंगावर कोसळलेलीं संकटें समुच्चयानें; हरएक प्रकारचीं संकटें समुच्चयानें. **सुलताना** स्त्री० द्राक्षाची एक जात. **सुलतानी कोस** पु० टिपू सुलतानानें रूढ केलेला कोस; हा सुमारें पांच मैल लांबीचा असतो.

**सुलभ** [ सं० ] वि० मिळवावयास किं० करावयास सोपें. मागें 'सु' मध्यें पहा.

**सुलक्षण** [ सं० ] न० १ शुभ लक्षण; शुभ सुचविणारें कांहीं चिन्ह. २ सद्गुण. ३ शोभादायक चिन्ह. ❀ **सुलक्षण, सुलक्षणी** वि० १ चांगल्या किं० शुभ लक्षणांनीं युक्त (माणूस, पशु). २ सद्गुणी.

**सुलाख** [ म० सूराग् ] पु० १ भोक (सामान्यतः). २ अग्नींत घालून तापवून कस पाहाण्यासाठीं सोनार लोक सोनें, रुपें, इ० ना जी खळगी पाडतात ती (घालणें, पाडणें, टाकणें).

**सुलाखणें** [ म० सुलाख ] स० क्रि० सुलाख घालून (सोनें, रुपें, इ०) पारखणें. वर 'सुलाख' पहा. ❀ **सुलाखणी** स्त्री० सुलाख घालणें हा संस्कार.

**सुलाखणें** [ म० लाख ] अ० क्रि० दागिन्याच्या पोटांत घातलेली लाख ( दागिना झिजल्यामुळें ) उघडी पडणें.

**सुलूक, सुलूख, सुलह्** [ अ० सुल्क् ] पु० सख्य; दोस्ती.

**सुवरा** मागें 'सुयरा' पहा.

**सुवर्ण** [ सं० ] वि० १ चांगला आहे वर्ण ( किं० तेज ) ज्याचा असा. २ सोनेरी. ३ तेजस्वी. ४ सुंदर. ५ उत्तम जातकुळीचा. न० १ सोनें. २ द्रव्य. ३ नागचांफा. ❀ **सुवर्णकदली** स्त्री० सोनकेळ. **सुवर्णकार** पु० सोनार. **सुवर्णकेतकी** स्त्री० सोनकेवडा. **सुवर्णवर्णा** स्त्री० हळद. **सुवर्णकीटक** पु० काजवा. **सुवर्णमालिनी वसंत** पु० एक औषधी रांधा. **सुवर्णाभिषेक** पु० लग्नाच्या विधींत वधूवरांवर करतात तो जलांचा अभिषेक. ह्या जलांत सुवर्ण घातलेलें असतें.

**सुवह** [ सं० ] वि० सोसावयास किं० वहावयास सोपा. [ ण्याची ).

**सुवा** [ म० सुई ] पु० मोठी सुई ( शिव-

**सुवाच्य** [ सं० ] वि० वाचावयास सो[illegible] आणि स्पष्ट असें लिहिलेलें ( अक्षर, पत्र).

**सुवारा** [ म० सु+वारा ] पु० १ अ[illegible] सुखसंबंध किं० सहवास; उ० मला नव[illegible] कधीं सुवारा नाहीं. २ गंधवार्ता; अत्यल्प सुगा

किं०तपास; उ० हरवलेल्या चंद्रहाराचा तुम्हाला सुवारा लागल्यास आम्हाला कळवा.

**सुवार्ता** [ सं० ] स्त्री० आनंदाची खबर किं० बातमी.

**सुवाशीण (-न)** [ सं० सुवासिनी ] स्त्री० जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. मागें 'सवाशीण' पहा.

**सुवासिक** [ म० सु+वास ] वि० सुगंधी.

**सुवासिनी** वर 'सुवाशाण' पहा.

**सुवाळा** पु० शंभर दीडशे खंडींची वाहतूक करणारी फत्तेमारी (म्ह० एक प्रकारचें गलबत).

**सुवाळीमवाळी** [ म० मवाळी ] स्त्री० मृदु आणि गोड भाषण.

**सुविद्य** [ सं० ] वि० १ सुशिक्षित; चांगला शिकलेला; विद्वान्. २ समंजस; चांगला शहाणा.

**सुवीण** [ म० सु+विणें ] स्त्री० प्रसूतिसमयींचीं कामें करणारी स्त्री. मागें 'सुईण' पहा.

**सुवेत** [ म० सु+वेत, विणें ] न० न अडतां सुरळीत रीतीनें स्त्रीची प्रसूति होणें.

**सुवेर** [ म० सु+वेला ] पु० कुटुंबांत कोणा मुलाचा जन्म झाल्यानें येतो तो विटाळ; जाताशौच. याच्या व्यावर्तकत्वें 'मृताशौच' किं० 'सुतक.' ॐ **सुवेरतुला** वि० सुवेराच्या विटाळाचा.

**सुवेरणें** [ म० सुवेर ] अ० क्रि० कुटुंबांत मुलाचा जन्म झाल्यामुळें विटाळाच्या स्थितींत असणें; सुवेरानें युक्त होणें.

**सुवेळ** [ म० सु+वेळ ] स्त्री० शुभ समय; चांगली वेळ.

**सुशक, सुशक्य** [ म० सु+शकणें ] वि० सहज किं० सुलभ रीतीनें करतां येईल असें (काम).

**सुशिक्षित** [ सं० ] वि०१चांगला शिकलेला. २ योग्य शिस्तीनें वागणारा.

**सुशी** [ हिं० सूसी ] स्त्री० रेशमाचे रुंद रुंद पट्टे ज्याच्या विणींत आहेत असें कापसाचें वस्त्र.

**सुशी** स्त्री० लहान मुलांच्या पोटांत होतो तो एक रोग. 'सुसें' न० ह्याच अर्थी.

**सुशील** [ सं०सु(चांगलें)+शील] वि०चांगलें आहे शील म्ह०वर्तन (किं०स्वभाव)ज्याचें असा.

**सुशोभित** [ सं० सु+शोभित ] वि० उत्तम प्रकारें शोभविलेला;शोभायुक्त;उठावदार केलेला.

**सुश्रांतणें** [ म० सु ( फार ) + श्रांतणें ] अ० क्रि० अगदीं दमणें किं० थकणें.

**सुश्राव्य** [ सं० ] वि० ऐकण्यास योग्य; कानाला गोड वाटणारें ( भाषण, गायन, पुराण, निरूपण, इ० ).

**सुषमा** [ सं० ] स्त्री० उत्तम शोभा.

**सुषुप्त** [ सं० ] वि०गाढ झोप ज्याला लागली आहे असा.

**सुषुप्ति** [ सं० ] स्त्री० गाढ झोप; जींत स्वप्नें पडलीं नाहींत अशी निद्रा. जागृति,स्वप्न, आणि सुषुप्ति, अशा देहाच्या तीन अवस्था आहेत.

**सुषुम्ना** [ सं० ] स्त्री० शरीरांतलि एक नाडी,-इडा आणि पिंगला ह्यांच्या मधील. मागें 'इडा,' 'पिंगला' पहा.

**सुष्ट**[सं०'दुष्ट'ह्या शब्दाच्या उलट मराठींत बनलेला शब्द] वि०दुष्ट नव्हे असा;सुशील; सद्वर्तनी.

**सुसकार, सुसकारा** नाकांतून जोरानें श्वास सोडणें ( टाकणें, सोडणें ).

**सुसत** क्रि० वि० सुसू असा आवाज करून.

**सुसंबद्ध** [ सं० ] वि० योग्य प्रकारें जुळणारें; संवादी; ज्याचे सर्व भाग किं० अवयव योग्य प्रकारें जुळलेले किं० जुळविलेले आहेत असें.

**सुसर** स्त्री० एक जलचर प्राणी; नक्र.

**सुसर** [ सं० सु+सर ( चालणारा ) ] वि० बोध करून किं० शिक्षा करून पुन्हा सद्वर्तनी करण्यांत आलेला ( मनुष्य, पशु ).

**सुसह, सुसह्य**[सं०]वि० सोसतां येईल असा.

**सुसा** पु० १ गुरांचा एक रोग. २ सोनार लोकांचें झारीसारखें एक भांडें.

**सुसाट, सुसाट** क्रि० वि० जोरानें, झपाट्यानें, किं०आवाज करून ( वारा वाहणें, घोडा धावणें, पक्षी उडणें, इ० ). पु० आवेश, झपाटा, सोसाटा.

**सुसाध्य** [ सं० ] वि० सहज मिळवितां येईल असा; विशेष श्रमांवांचून साध्य करतां येईल असा.

**सुसासा** पु० वर 'सुसकारा' पहा.

**सुसूत्र** [ सं० ] वि० १ नियमित; नियंत्रित.

२ योग्य मार्गानें चाललेलें ( काम, भाषण, वर्तन, अभ्यास, इ०). ३ सरळ रेषेंत असलेले. क्रि० वि० योग्य मार्गानें; कांहीं विघ्नें न येतां किं० अडथळा न होतां.

**सुसें** न० लहान मुलांच्या पोटांत होतो तो एक रोग. वर' सुशी ' पहा.

**सुस्कार, सुस्कारा** पु० मागें ' सुसकार, ' ' सुस्कारा ' पहा.

**सुस्त, सुस्ता** [ फा० ] वि० १ आळशी. २ फार जेवण झाल्यामुळें ज्याची हालचाल मंदावली आहे असा. ३ रेंगाळत काम करणारा( माणूस ). ४ फाजिल सावकाशीनें चाललेलें ( काम ). ॐ **सुस्ताई, सुस्ती** स्त्री० १ आळस. २ मांद्य. ३ संथपणा; दिरिंगाई.

**सुस्तावणें** [ फा०सुस्त ] अ० क्रि० आळसावणें. २ मंदावणें. ३ दिरिंगाईवर पडणें किं० टाकलें जाणें.

**सुस्थ** [ सं० ] वि० १ सुस्थितींत असलेला. २ ज्याला काळजी किं० विवंचना नाहीं असा. ३ नीरोगी.

**सुस्थित** [ सं० ] वि० आरामांत किं० शांतपणांत बसलेला किं० असलेला.

**सुस्थिति** [ सं० ] स्त्री० १संपन्नपणाची किं० समृद्धीची स्थिति; खाऊनपिऊन सुखी असण्याची स्थिति; चार पैसे संग्रहीं असण्याची स्थिति. २ आरोग्य.

**सुस्नात** [ सं० ] वि० १ यथाशास्त्र ज्यानें स्नान केलें आहे असा. २ यज्ञापूर्वीचें किं० नंतरचें स्नान.

**सुहागी** [ हिं० ] स्त्री० एक क्षार.

**सुहींण** स्त्री० मागें ' सुईण, ' 'सुवीण' पहा.

**सुहृत् (-द्)** [ सं० ] वि० १चांगल्या अंतःकरणाचा. २ ममताळू. पु० मित्र.

**सुहृदय** [ सं० ] वि० १ प्रेमळ. २ रसिक.

**सहेर, सुहेरणें, सुहेरतुला** मागें ' सुवेर, ' ' सुवेरणें, ' ' सुवेरतुला ' पहा.

**सुळकंडी** इ० मागें ' सुरकुंडी ' इ० पहा.

**सुळका** पु० १ एकदम उंच झालेलें डोंगर, टेकडी, इ० चें शिखर. २ अणकुचीदार पदार्थ किं० पदार्थाचा अणकुचीदार भाग. ३ फारशा शाखा ज्याला नाहींत असा उंच वृक्ष. ४ दुहेरी चौकटीच्या दाराच्या आंतल्या चौकटीचें उभें लाकडें प्रत्येक. ह्या लाकडांवरची जी आडवी पट्टी तिला ' सुळकेपट्टी ' म्हणतात.

**सुळकी** स्त्री० पदार्थाचें अणकुचीदार टोंक.

**सुळकुंबा, सुळकंबा, सुळखांब, सुळखुंबा** [ म० सूळ+खांब ] पु० १ बैलरहाटाच्या कणेकडाखालीं आंत तुंब भरून जो सूच्यग्र स्तंभ फिरावयाजोगा उभा केलेला असतो तो. २ सुळका.

**सुळकेपट्टी** वर ' सुळका ' मध्यें पहा.

**सुळसुळाट** पु० १ मुलें, उंदीर, घुशी, इ०चें कोणेक स्थळीं धावपळ, लगबग, किं० गोंधळ. २ ढेकूण, पिसवा, माशा, इ० चें कोणेक स्थळीं वैपुल्य. ३ एकाद्या कुटुंबांत पडतो तो पाहुण्यांचा धबडगा.

**सुळसुळीत** वि० निसरडी ( जमीन ); घट्ट न नेसलेलें (धोतर); घट्ट न आवळलेलें (गांठोडें).

**सुळा** [ सं० शूल; म० सूळ ]पु०१अणकुचीदार दांत. २ अणकुचीदार खांब, खुंटा, खडक, दगड, इ०. ३गायी, म्हशी, इ० च्या अंगावर गोचिडासारखा चिकटून बसून रक्त शोषण करणारा एक कृमि. ४ कसई किं० कशेट नांवाच्या गवताचें बीज. ५ मोटेचें चाक ज्या आडव्या लाकडावर बसविलेलें असतें त्या लाकडाखालीं जे दोन उभे खांब असतात ते प्रत्येक. ६ शेकोटीसाठीं केलेला खळगा.

**सुज्ञ** [ सं० ] वि० १ विद्वान्. २ समंजस; जाणता; समजूतदार.

**सू** [ म० सुई ] स्त्री० शिवण्याची सुई ( अडाण्यांचा शब्द).

**सूं** क्रि० वि० १ वेगानें; जोरानें. २ सूं असा आवाज करीत ( बाण, धोंडा, इ० सुटणें ). ॐ **सूं बाल्या हाकणें** जोरानें आणि वेगानें पळून जाणें.

**सू** [ सं० सु=प्रसवणें ] वि० ( उपपद तत्पुरुषाच्या अंतीं ) जन्म देणारी; उ० वीरसू.

**सूक** [ सं०शुक्र ] पु० शुक्राची चांदणी; शुक्र हा ग्रह. हा ग्रह बुध आणि पृथ्वी यांच्या मध्यें सूर्याभोंवतीं फिरतो.

**सूकर** [ सं० ] पु० डुकर.

**सूक्त** मागें ' सु ' मध्यें पहा.

**सूचक** [ सं० ] वि० १ सुचविणारा; दर्शक; बोधक. २ चहाडखोर; निंदक. पु० १ हेर; दूतविशेष. २ शिक्षक. ३ सूत्रधार. न० १ चिन्ह; खूण. २ इशारा.

**सूचन** न०, **सूचना** स्त्री०[सं०] १कोणेकाला कांहीं गोष्ट सुचविणें,कळविणें,किं०त्याच्या नजरेस आणून देणें. २ कोणेकाला जें कांहीं सुचविलें, सांगितलें, किं० कळविलें तें. ३ कोणेकाला विचार करण्यासाठीं त्याच्यापुढें आणलेली कांहीं गोष्ट.४ टोचणें; रोवणें. ५ अप्रत्यक्षपणें कथन. ६ इशारा. ७ गुप्त बातमी काढणें. ८ चहाडी.

**सूचिका, सूची** [ सं० ] स्त्री० १ टोचणें.२ सुई. ३ सळई. ४ पान, फूल, इ० च्या कळीचें टोक. ५ ( **रणांगण** ) सुईच्या आकाराची शिपायांची रचना. ६ ( **भूमिति** ) खालीं जाडी आणि वर बिंदुरूप टोक असलेली आकृति; शंकु. ७ ग्रंथाची अनुक्रमणिका. ८ ग्रंथांतील विषयांची यादी. ९ ग्रंथाचा उपोद्घातरूप भाग. १० ग्रहणांत पृथ्वीची वर्तुलाकार छाया किं० ह्या छायेचा एक भाग.११कोणताही निमुळता पदार्थ किं०आकृति.**क्ष्सूचिभेद्य** वि० गहन,निबिड(अंधकार). **सूचीकटाहन्याय** पु०लहान आणि लवकर संपवितां येईल असें काम ( सुई करण्यासारखें ) मागून निघालेलें असलें तरी तें अगोदर करून टाकून अगोदरचें मोठें काम ( कढई घडविणें यासारखें ) मागून करावें ही वर्तनाची अनुसरणीय रीति.

**सूचित** [सं० सूच्=कळविणें]वि० १ टोचलेलें; वेधलेलें; भोक पाडलेलें. २ सुचविलेलें; दिग्दर्शित केलेलें. न० जें सुचविलें तें. [सं०सु+उचित]वि० फार योग्य.

**सूची** [ सं० सूचिन् ] वि०(समासांतीं) सुचविणारें;दर्शविणारें;उ० हर्षसूची,दारिद्र्यसूची,इ०.

**सूज** [ सं० श्वि=सुजणें ] स्त्री० शरीर किं० शरीराचें हस्तपादादि गात्र यांवर शैत्यादि कारणानें किं० रक्ताच्या दोषामुळें उत्पन्न होतो तो फुगवटा.

**सूंझ्या** [ म० सूं ( वेगानें)+झ्या (घोड्याला हाकण्याचा शब्द ) ] स्त्री० पळून जाणें;पलायन.

**सूट** [ म० सुटणें ] स्त्री० १ बंधनापासून किं० नियंत्रणेंतून मुक्तता. २ सावकार, सरकार, ह्यांनीं कुळें, रयत, किं० मक्तेवाले ह्यांना माफ केलेली रकम. ३ गुलाम,नोकर, इ०ना मालकानें दिलेलें स्वातन्त्र्य. ४ दोन पदार्थांतील अंतर; मधली रिकामी जागा; उ० पाट मांडतांना एका वितीची सूट बस्स होईल. **क्ष सूट मोकळ** स्त्री० १ कांहीं काळापुरती कोणेकाला दिलेली मोकळीक. २ कर, सारा, व्याज, इ० बाबतींत दिलेली माफी. **सूटसाट, सूटसांड,सूटतूट** स्त्री० कर, सारा, व्याज, इ० बाबतींत सोडलेली किं० माफ केलेली रक्कम.

**सूड** [ सं० शुध् ] पु० १ चौकशी; तपास; पत्ता. २ गुंतागुंतीचा किं० घोटाळलेला हिशेब दुरुस्त करून यथास्थित करणें. ३ गांवखतावणींतून काढलेला किं० घेतलेला उतारा. ४ ढोल इ० वाद्य वाजविण्याची एक फेर( झाडणें, मारणें ). ५ कांहीं कामीं मारलेला एक तडाखा किं० एकदमानें केलेला भाग. **क्ष सूडबंद** पु० १ चौकशी, तपास, किं०शोध करून टांचणें किं० टिपणें ज्या कागदावर केलीं आहेत असा कागद.२ गांवखतावणींतील उताऱ्याचा कागद.**सूड घेणें** अपकाराची फेड करणें; वैर उगवून घेणें. ' सूड घेणें ' ह्याच अर्थीं.

**सूत** [ सं० सूत्र ] न० १ कापूस, रेशीम, लोकर, इ० चा धागा किं० दोरा. २ सोनें, रुपें, इ०ची बारीक तार. ३ लाखेची काढलेली तार.४ एका माणसाचा मैत्री, परस्पर साहाय्य करणें, इ० बाबतींत जो दुसऱ्याशीं संबंध असतो तो. ५ कोणेकाचें कोणेकाशीं असतें जें संधान तें. ६ मैत्री; सख्य; सलोखा. ७ दोन माणसांचा एका विचारानें चालण्याचा जो क्रम तो. ८ वशील्याची सांखळी ( बांधणें ). ९ फळें, लोणचें,इ० कुजलीं असतां त्यांत जें सुताच्या आकाराचें प्राणी पडतात ते प्रत्येक.१० विणलेल्या वस्त्राची वीण. **क्ष दोघांचें सूत असणें** त्यांच्यांत निकट मैत्रीचा संबंध असणें. **कोणेकाचें कोणेकाशीं सूत नसणें** त्याचा त्याच्याशीं मैत्रीचा किं०सलोख्याचा संबंध नसणें.**सुतानें सूत लागणें** एक गोष्ट शोधून काढल्यामुळें दुसरी समजणें; थोडासा सुगावा लागून एकादी गुप्त गोष्ट क्रमानें आणि ओघानें समजत

किं० उकलत जाणें. **सुतास लागणें, सुती लागणें**, किं० **सुतींपातीं लागणें** सुरळीतपणें चालूं लागणें; उ० माझ्या मुलाला मी मास्तर ठेविल्यापासून त्याचे सर्व अभ्यास सुतास लागले. **सुतानें चंद्राला ओवाळणें** महिन्याच्या शुद्ध द्वितीयेला वस्त्राचें सूत काढून तें चंद्राला अर्पण करून त्याचेपाशीं वस्त्राची समृद्धि मागणें. **सुतानें स्वर्गास जाणें** ( किं० **चढणें** ), **सुतानें स्वर्ग गांठणें** वस्तूचा यत्किंचित् सुगावा लागतांच वस्तूचें सर्व स्वरूप तर्कानें जाणणें. **कोणेकाच्या नाकीं सूत धरलेलें असणें** तो अगदीं मरणाच्या अवस्थेस पोंचलेला असणें. **टीप,**–प्राण जाण्याचा समय ठेपलेला असतां श्वासोच्छ्वास अति मंद चालतो. श्वासोच्छ्वास चालला आहे किं० नाहीं हें ठरविण्यासाठीं त्याच्या नाकपुडीपुढें सूत धरतात. तें हाल्ल्यास श्वास चालत आहे आणि न हालल्यास प्राण गेला असें अनुमान करतात. **सुतानें स्वर्ग गांठणें** देशांतील प्रत्येक मनुष्यानें आपल्या पुरतें चरका, टकली, इ० साधनानें कापसापासून सूत काढल्यास तो देश स्वतंत्र होऊं शकेल म्ह० गुलामगिरींतून मुक्त होऊं शकेल. **सुताचा तोडा, सुतळीचा तोडा पु०** अत्यल्प किं० यत्किंचित् सुद्धां भाग ( निषेधीं प्रयोग ); उ० हा माझा प्रपंच माझ्या स्वताच्या कमाईचा आहे, यांत वडिलोपार्जित असा सुतळीचा तोडा नाहीं. **सुतास** ( किं० **सुतीं** किं० **सुतींपातीं** ) **चालणें** सुरळीतपणें चालूं लागणें. **सूत बांधणें** वशीला लागणें. **कोणेकाला मूठभर सूत बांधणें** ( किं० **देणें** ) त्याला संमानपूर्वक पागोट्याचा नजराणा देणें. **सूतपाड पु०, न०** किंमत, विणकर, इ० बाबतींत वस्त्राचा दर्जा किं० योग्यता. **सूतपात, सूतपोत पु०** वस्त्राची वीण, सूत, सफाई, इ० गुण समुच्चयानें.

**सूत** [ सं० ] **पु०** १ सारथि. २ सुतार. ३ स्तुतिपाठक. ४ संजय. ५ क्षत्रिय पति आणि ब्राह्मण जातीची बायको यांचा पुत्र. **पु०, न०** पारा हा धातु. ꙮ **सूतपुत्र, सूतज पु०** १ कर्ण,–अर्जुनानें ज्याला रणांत वधिलें. २ संजय. **सूतराज पु०** पारा,–एक धातु. ( स्त्री ).

**सूत** [ सं० ] **वि०** १ जन्मलेला. २ बाळंत झालेली.

**सूतक** [ सं० ] **न०** १ प्रसवणें; जन्म देणें. २ सुवेर,–कुटुंबांत मूल जन्मल्याचा विटाळ. ३ ग्रहणादिकांचें अशौच.

**सूतशेखर** [ सं० ] **पु०** एक औषधी मात्रा.

**सूता, सूतका, सूतिका** [ सं० ] **स्त्री०** बाळंतीण. ꙮ **सूतागार, सूतिकागृह न०** बाळंतिणीची खोली.

**सूति, सूती** [ सं० ] **स्त्री०** १ प्रसवणें; जन्म देणें. २ जन्म. ३ संतति. ४ उत्पत्तिस्थान. ५ धान्यादींचें उगवणें. ६ सोमरस काढण्याचें स्थळ. ꙮ **सूत्याशौच न०** सोयर; सुवेर.

**सूत्र** [ सं० ] **न०** १ दोरा; सूत; धागा. २ तंतु. ३ तार. ४ जानवें; यज्ञोपवीत. ५ कमरबंध. ६ संक्षिप्त, स्पष्टार्थक, आणि व्यापक असा नियम. ७ कांहीं काम किं० व्यवहार करण्याची सरणी किं० ठरलेला नियम. ८ व्याकरण, मीमांसा, वेदान्त, इ० विषयांवरील जे ग्रंथ त्यांतील अत्यन्त संक्षिप्त रूपांत घातलेलीं जीं वाक्यें तीं प्रत्येक. ह्या सूत्रांत मजकूर अति ठासून भरलेला असतो म्हणून त्यांवर भाष्यें, टीका, इ० ची जरूरी असते. ९ बाहुल्या इ० ची हालचाल दाखविण्यासाठीं जे दोरे गुप्तपणें ओढावयाचे असतात ते प्रत्येक. १० कांहीं काम करण्याची गुप्त खुबी किं० युक्ति. ११ नियम, सरणी ( सामान्यतः ). ꙮ **सूत्रक वि०** १ बिनचूक किं० कळाशीदार काम करणारा (कारागीर). २ पाणसळ, ओळंबा, ह्यांत बरोबर ( खांब, तुळई, भिंत, इ० ). ३ यथास्थित, नीटनेटकें, बिनचूक, असावें तसें (सामान्यतः). **सूत्रधार पु०** १ नाटकांतील पात्रांची जुळणी करणें, पात्रांचीं कर्तव्यें ठरविणें, इ० कामें ज्याच्या आज्ञेनें चालतात तो मनुष्य. २ कोणत्याही कामाला सरणी लावणारा; कोणत्याही कामाची किं० संस्थेची जबाबदारी वाहणारा; शिस्त लावून देणारा. ३ बाहुल्यांच्या खेळांत गुप्त दोऱ्या ओढून बाहुल्यांच्याकडून हालचाली करविणारा इसम. **टीप,**–अर्थ २ आणि ३ मध्यें 'सूत्रधारी' सुद्धां. **सूत्रा, सूत्री वि०** १ टापटिपीचा; टापटिपीनें काम करणारा; कळाशीनें काम करणारा. २ कुशल; चतुर. ३ काम करण्यांत तरबेज.

**सूद कल्याण पु०** गायनांतील एक राग.

**सूदणें** [ सं० सूद ] **स० क्रि०** ठार मारणें; वधिणें ( कवितेंत रूढि ).

**सूदणें** मागें ' सुदणें ' पहा.

**सूदन** [ सं० ] **न०** ठार मारणें; वधिणें ( कवितेंत ).

**सून** [ सं०सूना=मुलगी ] **स्त्री०** १ आपल्या मुलाची पत्नी. २ पुत्रस्थानीं असलेला जो पुतण्या त्याची बायको. ३ दिराच्या मुलाची बायको.॥ **सूनमुख, सुनमुख न०** लग्नाचा विधि संपून वरात घरीं आल्यावर सासूनें सुनेचें मुख पाहणें हा समारंभ.

**सूनृत** [ सं० ] **वि०** १ सत्य आणि प्रिय ( भाषण ). २ शुभ; मंगल. **न०** सत्य असून प्रिय असें भाषण.

**सूप** [ सं० शूर्प ] **न०** १ धान्य पाखडणें इ० च्या उपयोगाचें वेळूच्या पातींचें पसरट असें पात्र. २ वांगीं, मिरच्या, इ० च्या झाडांना ओढा इ० चें पाणी देण्याचें खोलगट आकाराची पाटी इ०. साधन. ॥ **भरल्या गाड्यास सूप जड नाहीं** ज्याला पुष्कळ भार वाहण्याचें सामर्थ्य आहे त्याला मर्यादेच्या भाराहून थोडासा अधिक भार वाहण्याचा प्रसंग आला तर तो खचत नाहीं किंवा डगत नाहीं. **सूप फडफडणें** लग्न, मुंज, इ० मंगल कार्य समाप्त होणें. सर्व विधि आटोपला म्हणजे उपाध्या खरोखरींच एका समिधेनें सुपावर थापट्या मारून फडफड असा त्यांतून आवाज काढतो. **कोणेकाचें सुपाएवढें काळीज होणें** इष्ट वस्तु मिळाल्यामुळें तो अत्यन्त आनंदित होणें; मनोरथ सफल झाल्यामुळें त्याला परमावधीचा संतोष होणें.

**सूप**[सं०]**पु०**१भोजनांत,आमटी,इ०पातळ असें कांहींही तोंडीलावणें. २ आचारी; स्वयंपाकी.॥ **सूपकार पु०** आचारी. **सूपशास्त्र न०** भोजनाचे विविध पदार्थ कसे करावे हें ज्यांत सांगितलें आहे असा ग्रंथ.

**सूय** [ सं० सूचि; म० सुई ] **स्त्री०** १ सुई,- शिवण्याचें एक साधन. २ केळ, माड, इ० झाडांचें नवें कोंवळें पान.

**सूर** [ सं० ] **पु०** १ सूर्य. २ पंडित.३ योद्धा.

**सूर** [ सं० स्वर ] **पु०** १ अखंड चाललेला मंजुळ ध्वनि. २ कोणताही अखंड आणि एकसारखा चालत असलेला आवाज. ३ कंठाचें किंवा वाद्याचें गायन किंवा वादन चाललेलें असतां त्याच्याशीं साथ करण्यासाठीं जो एकसारखा आणि अखंड ध्वनि चालवितात तो ( धरणें ). ४ मुलानें रडण्याला केलेली सुरवात ( काढणें ). ५ विशिष्ट समयीं उजव्या किंवा डाव्या नाकपुडींतून श्वासोच्छ्वास चालत असणें ( वाहणें, लागणें, इ० ). ६ कांहीं कामाला योग्य असा समय; कांहीं काम करण्याची प्रेरणा किंवा इच्छा;प्रवृत्ति; कल; उ० आतां बाहेर पडण्यास माझा सूर लागत नाहीं; उ० माझा सूर लागेल तेव्हां मी तुझें काम करीन. ७ तर्क; अटकळ ( वाहणें ); उ० तुझा सूर काय वाहतो ? आज रामभाऊ येतील किंवा नाहीं येणार ? **टीप**-विशिष्ट समयीं विशिष्ट नाकपुडींतून श्वास चालत असल्यास तो कांहीं संकल्पित कार्याला अनुकूल किंवा प्रतिकूल समय मानण्यांत येतो. यावरून ' सूर ' चे वरीलप्रमाणें ६आणि७हे दोन अर्थ व्यवहारांत रूढ झाले आहेत.८वाजंत्र्यांचें एक मुखवाद्य.यांतून एकच सूर साथ करण्यासाठीं काढला जातो.॥**सूर धरणें** १ गाणाऱ्या किंवा वाद्य वाजविणाऱ्या माणसाच्या सुराशीं साथ करणें.२सूर देणें.**सूर देणें** री ओढणें. **(पडसें, शैत्य, इ०मुळें) नाकाचे सूर बंद होणें** नाक चोंदणें.**सूर वाहाणें** शैत्यादि बरें झाल्यानंतर पूर्वीसारखा अनियंत्रितपणें श्वासोच्छ्वास चालू लागणें.**सूर वाहणें**१तर्कांत येणें;संभवनीयता किंवा शक्यता असणें; रंग दिसणें; उ० मला नोकरी मिळण्याचा सूर वाहात नाहीं. २ प्रवृत्ति होणें;उ० मला मदत करावयाला तुझा सूर वाहात नाहीं काय ? **सूरकरी, सूरदास, सूरनीस पु०**रीं ओढणारा; गायक किंवा वादक यांच्याशीं साथ करणारा. ह्या साथीला ' सूरभरणा ' पु०, ' सूरभरणी ' स्त्री० म्हणतात. **सूरभरणी स्त्री०** अनेक वाद्यांच्या किंवा गायकांच्या सुरांची एकवाक्यता किंवा संवाद. **सूरज्ञान न०** गायन किंवा वादन ह्यांतील सुरांचें म्ह० स्वरांचें ज्ञान.

**सूर** [ सं० सुरा ] **स्त्री०** दारू; मद्य.

**सूर पु०** सुरपारंब्या ह्या खेळांत जी काठी

मुळें फेकतात ती. मागें 'सुरपारंबी (-बा,-ब्या)' पहा.

**सूरण** [ सं० शूरण ] पु० मागें ' सुरण ' पहा.

**सूरपारंब** (-बा,-ब्या ) मागें ' सुरपारंबी (-बा,-ब्या ) ' पहा.

**सूरमर्द** [ म० शूर + फा० मर्द् ( माणूस ) ] पु० धाडसी किं० साहसी पुरुष.

**सूर्य** [ सं० पु० १ आकाशांतील एक गोल,-ज्याच्या भोंवतीं बुध, शुक्र, भूमि, मंगळ, गुरु, शनि, इ० ग्रह फिरतात. सूर्याच्या उदयास्तां-वरून दिवस आणि रात्र हे कालभाग पडतात. २ हा गोल,-देवत्वच्या भावनेनें. ॐ **सूर्यउजेडीं** क्रि० वि० सूर्य प्रकाशत असतां; सूर्याच्या प्रका-शांत; दिवस मावळण्याच्या अगोदर. **सूर्यकन्या, सूर्यतनया** स्त्री० यमुना नदी. **सूर्यतनय** पु० राम. **सूर्यद्वार** न० उत्तरायण. **सूर्यपुत्र, सुर्यसुत** पु० १ सुग्रीव. २ कर्ण. ३ यम. ४ शनिग्रह. **सूर्यसारथि** पु० अरुण. **सूर्यकन्या** स्त्री०भाकरी. टीप,-' भास्कर ' ( म्ह० सूर्य ) ह्या शब्दांतील व्यंजनें' भाकरी 'ह्या शब्दांत असल्यावरून विनो-दांत 'सूर्यकन्या' हा शब्द भाकरीला लावतात. **सूर्यकमळ** न० एक फुलझाड किं० त्याचें फूल. **सूर्यकांत** पु०उन्हांत धरला असतां ज्यांतून ठिणगी पडते असा एक पदार्थविशेष. **सूर्यग्रहण** न०सूर्यास लागतें तें ग्रहण,-पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्यें चंद्र हा सूर्याच्या आड आल्यानें उत्पन्न होतो तो देखावा. **सूर्यनक्षत्र** न०सूर्य ज्या नक्षत्रांत विशिष्ट-समयीं असतो तें नक्षत्र. **सूर्यनारायण** पु० सूर्य ( देवत्वाच्या भावनेनें ). **सूर्यपर्व** [सं० सूर्यपर्वन्] न० सूर्यग्रहण, व्यतिपात, सूर्यसंक्रांति, अमा-वास्या, इ० जीं पर्वें तीं प्रत्येक. **सूर्यपुट** न० सूर्याच्या उन्हांत कांहीं औषध कांहीं काळ ठेवणें हा वैद्यकी संस्कार. **सूर्यापुढें काडवात** स्त्री०, **सूर्यापुढें काजवा** पु० मोठ्याशीं लहानाची तुलना (हा मूर्खपणाचा प्रकार). **सूर्याचे घोडे** ( किं० पिलें किं० हरिणें ) दाखविणें मुलाचे कान धरून त्याला उंच उचलणें; मुलाच्या दोन कानशिलावर दोन तळहात दाबून त्याला हवेंत उंच उचलणें. **हा सूर्य आणि हा जयद्रथ** एकादें विशिष्ट कार्य घडावयाला ज्या दोन गोष्टींची अनुकूलता असावी लागते ती आतां आहे; कार्य घडावयाला आतां कांहीं अडथळा राहिला नाहीं. **सूर्योपोटीं शनैश्चर** पु० भाग्यशाली आणि पराक्रमी बापाचा मूर्ख आणि नादान मुलगा. **सूर्यवंशी** वि० सूर्य उगवल्यानंतर बऱ्याच वेळानें निजून उठणारा. **सूर्यवंशी क्षत्रिय** पु० हिंदूंची एक जात किं०त्या जातीचा इसम. **सूर्यमाला** स्त्री० सूर्याभोंवतीं फिरणारे ग्रह,-बुध,शुक्र,भूमि,मंगल, गुरु,शनि,इ०आणि धूमकेतु इ० समुच्चयानें. **सूर्यसं तान** न० १नीतिमान् बापाच्या पोटीं जन्मलेले मूर्ख मूल. २भाकरी. मागें 'सूर्यकन्या' वरील टीप पहा. **सूर्यवंश** पु० रघु,राम,इ०पुरुष ज्या कुळांत झाले तें कुळ. **सूर्यसूर** पु० उजव्या नाकपुडींतून सोडलेला श्वास. डाव्या नाकपुडींतून सोडलेल्या श्वासाला ' चंद्रसूर ' म्हणतात. **सूर्येन्दुसंगम** पु०दर्श;अमा-वास्या,-जेव्हां सूर्य आणि चंद्र हे दोन्ही पृथ्वीच्या एकाच बाजूस असतात. दोहोंच्यामध्यें पृथ्वी असतां पोर्णिमा असते.

**सूळ** [सं० शूल] पु० १ फाशीं देण्याचा खांब. २ चढण्यास कठिण असा डोंगर किं० पर्वताचा कडा. ३अगदीं उभें आणि चढण्यास कठिण असें झाड. ४ डोकें, पोट, सांधा, किं० कोणतेंही गात्र ह्यांत उठते तीं बराच वेळ टिकणारी वेदना किं० अशा वेदना सतत उठत असण्याची व्यथा; पोट-शूळ,मस्तकशूळ,इ०.५ भाल्यासारखें एक शस्त्र.६ मांस विस्तवावर भाजावयाची लोखंडाची सळई. ॐ **सुळीं द्यावयाची वेळ** स्त्री०ऐन मध्यान्हाचा समय,- जेव्हां सूर्याच्या उन्हाचा ताप अत्यन्त असह्य असतो. ॐ **सूळघेणा (-ण्या )** वि० करावयाला अति कठिण किं० त्रासदायक किं० जिकीरीचें ( काम ). **सूळबांध** पु० चढणीची आणि अरुंद पायवाट.

**सूक्षमना** स्त्री०एक नाडी.मागें'सुषुम्ना'पहा.

**सूक्ष्म** [ सं० ] वि० १ बारीक. २ लहान. ३ अत्यन्त बारीक; अणकुचीदार. ४ अति बारीक म्हणून दिसावयास किं० समजावयास कठिण. ५ नाजूक; तलम ( वस्त्र, सूत ). ६ अत्यन्त थोडा किं० लहान. पु० १ परमाणु. २ निवळीचें बीज. न० १ परब्रह्म. २ अध्यात्म. ३ ( साहित्य ) एक अर्थालंकार. दुसऱ्याचा गूढ अभिप्राय नेत्र,

मुद्रा, इ० चिन्हांवरून जाणून जर कोणी आपल्या मनांतील अभिप्राय अशाच चिन्हांनीं व्यक्त केला तर सूक्ष्म हा अलंकार होतो. विशेष तपशील, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. ॐ सूक्ष्मदर्शी [ सं० सूक्ष्मदर्शिन् ] वि० १ अति बुद्धिमान्. २ ज्याला पदार्थांचे अति गूढ किं० बारीक गुणधर्म समजतात तो. ३ दुसऱ्याच्या कारभारांत लक्ष्य घालणारा ( निंदेंत ). ४ फाजिल बारकाईनें गुणदोष पाहात बसणारा ( निंदेंत ). सूक्ष्मदेह पु०, सूक्ष्मशरीर न० लिंगदेह. मागें 'लिंग' अर्थ १४ पहा. मागें 'लिंग' मध्यें 'लिंगदेह,'' लिंगशरीर ' पहा. सूक्ष्ममान न० अत्यन्त तंतोतंत असें काल, विस्तार, इ० चें माप किं० परिगणन. सूक्ष्मवाद पु० आत्मा एकाद्या परमाणूच्या रूपाचा आहे असें मत. याच्या व्यावर्तकत्वें ' स्थूलवाद. ' सूक्ष्मबुद्धि स्त्री० तल्लख बुद्धि. वि० तल्लख बुद्धीचा ( मनुष्य ).

सृजणें [ सं० सृज्=उत्पन्न करणें ] स० क्रि० उत्पन्न करणें ( कवितेंत उपयोग ).

सृष्ट [ सं० ] वि० निर्मित; उत्पन्न केलेलें. ॐ सृष्टपदार्थविज्ञान न० सृष्टांतील पदार्थांचे गुणधर्म इ० संबंधाचें शास्त्र.

सृष्टि [ सं० ] वि० १ जगांतील सर्व पदार्थ समुच्चयानें. २ जगाची उत्पत्ति. ३ जन्म. ४ उत्पन्न करण्याची क्रिया. ५ संतान. ६ देणें. ७ त्याग. ॐ सृष्टिक्रम पु० जगाची राहाटी; ऐहिक जीवन. स्वप्नसृष्टि स्त्री० स्वप्नांत पाहिलेला देखावा; स्वप्नांत जें दिसलें तें.

सेक [ सं० ] पु० १ पाणी, दूध, इ० शिंपडणें. २ जें शिंपडलें तें. ३ वीर्योत्सर्ग. ॐ सेकपात्र न० १ झारी. २ पोहोरा. [ इ० पहा.

सेक, सेकडा, इ० मागें ' शेक, '' शेकडा, '

सेचन [ सं० ] न० १ पाणी इ० शिंपडणें ही क्रिया. २ ठिबकणें; पाझरणें. सेचनी स्त्री० पोहोरा; बाल्दी. [ इ० पहा.

सेचाळ, सेज, इ० मागें ' शेचाळ, '' शेज, '

सेतु [ सं० ] पु० १ बांध; धरण; बंधारा. २ पूल. ३ हद्दीचा दगड. ४ खिंड. ५ नीति, धर्म, इ० ची मर्यादा किं० नियंत्रणा. ६ ओंकार. ७ रामेश्वरास आहे तो सेतु. ॐ सेतुबंध पु० रामानें लंकेस जावयासाठीं समुद्रावर बांधला तो पूल.

सेंदाड इ० मागें ' शेंदाड ' इ० पहा.

सेना [ सं० ] स्त्री० १ फौज; सैन्य; लढणारे शिपायी, त्यांचीं शस्त्रास्त्रें, त्यांचें सामान, घोडे, हत्ती, इ० समुच्चयानें. २ मुंगें, मुंग्या, माशा, इ० चा चालता किं० स्थिर समुदाय. ॐ सेनासंवेश पु०, सेनासंवेशन न० लष्करी ठाणें. सेनांग न० सैन्यांतील हत्ती, घोडे, रथ, आणि पायदळ, हीं प्रत्येक. सेनाध्यक्ष, सेनाधिपति पु० सैन्याचा मुख्य अधिकारी. सेनापत्य, सेनाधिपत्य न० सेनापतीचा अधिकार, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र. सैनिक वि० लढाऊ; सैन्यासंबंधाचा. पु० लढणारा शिपाई. सेनानी, सेनानायक, सेनापति पु० सैन्यावरचा मुख्य अधिकारी. सेनांगचतुष्टय न० हत्ती, घोडे, रथ, आणि पायदळ, हीं सैन्याचीं चार अंगें समुच्चयानें. सेनाचर पु० सैन्याच्या बरोबरचे बिन लढवय्ये लोक ते व्यक्तिशः किं० समुच्चयानें. सेनाभार पु० सैन्य; फौज. सेनाखासखेल [ सं० सेना+अ० खास्+अ० खेल् ] पु० गायकवाड सरकारचा किताब. सेनासरखेल पु० पेशव्यांनीं आंग्रे ह्यांना दिलेला किताब.

सेप, सेपकिडा, सेपूट, इ० मागें ' शेप, ' ' शेपकिडा,' ' शेपूट, ' इ० पहा.

सेवक [ सं० ] पु० सेवा करणारा; चाकर; नोकर. २ देव, साधु, इ० चा भक्त, किं० अनुयायी, किं० चाहता.

सेवणें [ स० सेव ] स० क्रि० १ ( कोणेकाची ) सेवा, भक्ति, उपासना, नोकरी, इ० करणें. २ (ओषध, पाणी, अन्न, इ०) खाणें किं० भक्षिणें. ३ (मार्ग, सरणी, बोध, इ०) अनुसरणें किं० अवलंबिणें.

सेवन [ सं० ] न० १ चाकरी; नोकरी; सेवा. २ भक्ति. ३ पूजा; उपासना. ४ आचरणें. ५ उपभोग. ६ आसक्ति. ७ एकाद्या ठिकाणीं वारंवार जाणें. ८ पाणी, अन्न, ओषध, इ० खाणें किं० भक्षिणें. ९ तंबाखू, गांजा, इ० चा उपभोग. १० सुई, दोरा, इ० नीं शिवणें. ११ मानवी शरीरांतील सात बंध किं० शिवणीं प्रत्येक,—गुदापासून शिश्नापर्यंतची एक, जिभेखालची एक, आणि इतर ठिकाणच्या पांच.

**सेवनीय** [ सं० ] वि० १ भोगण्यास किं० खाण्यास योग्य ( औषध, पाणी, खाद्य, इ० ). २ अनुसरावयास योग्य ( मार्ग, उपदेश, शिस्त, इ० ). ३ नोकरी करून घेण्यास योग्य.

**सेवा** [ सं० ] स्त्री० १ नोकरी; चाकरी. २ भक्ति; उपासना. ३ खुशामत. ꣱ **देशसेवा** स्त्री० आपल्या देशाचा उत्कर्ष, संपत्ति, इभ्रत, इ० वाढविणें आणि टिकविणें ह्या संबंधाचें जें आपलें कर्तव्य तें. **सेवाधर्म** पु० दुसऱ्याची नोकरी करणें. **सेवेकरी** पु० खंडोबा, नरसोबा, इ० ची सेवा करण्यासाठीं त्या त्या देवस्थानीं जाऊन राहिलेला भक्त. [ इ० पहा.

**सेवाळ, सेवाळणें**, इ० ' शेवाळ, 'शेवाळणें, '

**सेवित** [ सं० ] वि० अवलंबिलेला, अनुसरलेला ( मार्ग ); खाल्लेलें ( औषध, अन्न, पाणी, इ० ); सेवा ज्याची केली आहे असा (यजमान); योजलेला ( उपाय ); कोणत्याही इंद्रियानें उपभोगिलेला ( पदार्थ ).

**सेव्य** [ सं० ] वि० ज्याची सेवा करावयाची तो ( देव, यजमान, स्वामी ). सेवा करणारा तो जो सेवक.

**सैतान** [ स० चैतान् ] पु० १ देवाचा शत्रु. २ ( लाक्षणिक ) कोणीही भयंकर कृत्यें करणारा माणूस. ३ अत्यंत मोठा, अवाढव्य, जगडव्याळ असा कोणताही पदार्थ.

**सैती** न० फेकून मारावयाचें एक शस्त्र. या शस्त्राला दोरी बांधलेली असून तें परत ओढून घेऊन पुन्हां शत्रूवर फेकतां येतें.

**सैदोन** [ फा० ] पु० एक प्रकारचा नगारा.

**सैंधव** [ सं० ] वि० १ सिंधुनदीसंबंधाचें. २ समुद्रासंबंधाचें. पु० १ जयद्रथ हा भारती युद्धांतील वीर. २ घोडा. पु०, न० शेंदेलोण नांवाचें मीठ.

**सैंधवी** स्त्री० ( संगीतांत ) एक रागिणी.

**सैनाधिपति, सैनाध्यक्ष, सैनापत्य, सैनिक**, इ० मागें ' सेना 'मध्यें पहा.

**सैन्य** [ सं० ] न० १ फौज. २ पहारेकरी. ३ ( लाक्षणिक ) मुलें, माकडें, गुरें, इ० चा समूह. ꣱ **सैन्याध्यक्ष** पु० सैन्यावरचा मुख्य अमलदार.

**सैंपाक** [ सं० स्वयंपाक ] पु० भात, भाकरी, भाजी, इ० भोजनार्थ सिद्ध करणें किं० अशा रीतीनें सिद्ध केलेले पदार्थ समुच्चयानें. **सैंपाकघर** न० घराच्या ज्या भागांत भोजनार्थ पदार्थ सिद्ध करण्यांत येतात तो भाग. **सैंपाकी** पु० सैंपाक करणारा. **सैंपाकीण** स्त्री० सैंपाक करणारी स्त्री.

**सैफ** [ अ० ] पु० १ तरवार. २ कट्यार.

**सैयद** [ अ० सय्यिद ] पु० बिबी फातिमेच्या वंशांतील इसम. मागें ' सयद ' पहा.

**सैर** [ अ० ] स्त्री० आरामासाठीं किं० स्वच्छ हवा खाण्यासाठीं उघड्या हवेंत हिंडणें (करणें).

**सैर** पु० चोरी करणें हाच ज्यांचा चरितार्थाचा धंदा अशा लोकांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

**सैर** [ सं० स्वैर ] क्रि० वि० मोकळेपणानें; अनियंत्रितपणें; स्वच्छन्दानें. ꣱ **सैरावैरा** क्रि० वि० आकस्मिक भयामुळें अव्यवस्थितपणें अनेकांनीं अनेक दिशांस एकदम ( पळत सुटणें ). **सैरट, सैराट** वि० १ स्वच्छंदी; अनियंत्रितपणें वागणारा. २ मूर्ख; अजागळ; बावळट.

**सैरंध्री** [ सं० ] स्त्री० १ अंतःपुराची दासी. २ परगृहीं काम करणारी स्वतंत्र स्त्री.

**सैरिक** [ सं० ] वि० १ नांगर चालविणारा (माणूस). २ नांगर ओढणारा ( बैल ).

**सैल** [ सं० शिथिल ] वि० कमी घट्ट (बंधन); ढिली झालेली ( गांठ); सुलक्ष ( शिस्त, कायदा, नियम ); मोकळा, अनियंत्रित ( पशु, माणूस ); खिळखिळा झालेला ( सांधा, जोड ). ꣱ **कोणेकाला सैल सोडणें** त्याला स्वच्छंदानें वागूं देणें; त्याच्यावरची कडक नियंत्रणा कमी कडक करणें.

**सैलावणें** [ म० सैल ] स० क्रि० ( घट्ट जें बंधन तें ) कमी घट्ट करणें; ( कडक जी शिस्त ती ) कमी कडक करणें; ( गांठोडें इ० ला मारलेली गांठ) ढिली करणें. अ० क्रि० कमी होणें; कमी कडक होणें; ढिला किं० खिळखिळा होणें.

**सैली** [ हिं० ] स्त्री० फकीर इ० गळ्यांत माळेप्रमाणें घालतात तो खाल, नाडी, इ० सारखा पदार्थ.

**सैंवर** [ सं० स्वयंवर ] न० स्वताला स्वताचा पति ठरविणें ( अशिक्षितांत किं० कवितेंत ). ' स्वयंवर ' चा अपभ्रंश.

६५ **वंशस्थ**; गण ज, त, ज, र; अ० सं०१२; यति पादान्तीं; उ०श्मशानवैराग्य न मानवें खरें.

६६ **भुजंगप्रयात**; गण य, य, य, य;अ०सं० १२;यति पादान्तीं; उ०श्रियाळें दिला पुत्र खाया द्विजाला.

६७ **द्रुतविलंबित**; गण न, भ, भ, र; अ० सं० १२; यति पादान्तीं; उ० वरुनि साधुपरी दिसतो खल.

६८ **जलोद्धतगति**; गण ज, स, ज, स; अ० सं० ६+६; उ० सदा करित जा पशूंवरि दया.

६९ **तामरस**; गण न, ज, ज, य; अ० सं० १२;यति पादान्तीं; उ० त्यजुनि कुमार्ग सुमार्गि असा हो !

७० **प्रभा**; गण न, न, र, र; अ०सं०७+५; उ० निटिललिखित तें मिळे मानवा.

७१ **मालती**; गण न, ज, ज, र; अ० सं०१२ यति पादान्तीं; उ० विभव अशाश्वत हें मनीं स्मरा.

७२ **प्रियंवदा**; गण न, भ, ज, र;अ०सं०१२; यति पादान्तीं; उ०सतत ये यश असें न निश्चित.

७३ **मणिमाला**; गण त, य, त, य; अ० सं० ६+६; उ० प्रामाणिक जो तो पावे सुख अंतीं.

७४ **स्रग्विणी**; गण र,र,र,र;अ० सं०६+६; उ० बिंदुनें बिंदुनें होतसे सागर.

७५ **प्रमुदितवदना**, गण न, न, र, र; अ० सं० १२; यति ७+५; उ० श्रमसहानिं कधीं न साधू हटे.

७६ **कुसुमविचित्रा**; गण न, य, न, य; अ० सं०६+६; उ० प्रणय असावा मनिं सकलांच्या.

७७ **ललिता**; गण त, भ, ज, र; अ० सं० १२; यति पादान्तीं किं०४+८; उ० बोलावया नवस जीभ बोलकी.

७८ **नवमालिनी**; गण न, ज, भ, य; अ० सं०५+७; उ० कृति कविची न कालभय जाणे.

७९ **विभावरी**; गण न, भ, ज,ज,ग;अ०सं० १३; यति पादान्तीं; उ० विभव शाश्वत म्हणे नर तो फसे.

८० **कलहंस**; गण स, ज, स, स, ग; अ० सं०१३;यति पादान्तीं किं०५+८;उ०करिते नरा स्तुतिस पात्र न सत्ता.

८१ **क्षमा**; गण न, न, त, त, ग; अ० सं० ७+६; उ० विधि न वळविजे हा कधीं मानवें.

८२ **चंद्रिका**; गण न, न, त, र, ग; अ० सं०८+५;उ० अगुण भुवनिं कांहीं न वस्तु आहे.

८३ **प्रहर्षिणी**; गण म, न, ज, र, ग; अ० सं० ३ + १०; उ० आलें तें सहन करा प्रशांत चित्तें.

८४ **मंजुभाषिणी**; गण स, ज, स, ज, ग; अ० सं०१३;यति पादान्तीं; उ० सुखरूप एकचि असे महीवरी.

८५ **मत्तमयूरी**; गण म, त, य, स, ग; अ० सं०५+८;उ० साधूला पापी हसती मूर्ख म्हणून.

८६ **प्रभावती**; गण ज, भ, स, ज, ग; अ० सं० ४+९; उ० न आळसा अक्सर या क्षणावधी.

८७ **रुचिरा**; गण ज, भ, स, र, ग; अ० सं० ४+९; उ० त्यजूं असे निज मत कोणी न सिद्ध.

८८ **चंचरीकावली**; गण य, म, र, र, ग; अ० सं० ६+७; उ० न वर्षांची संख्या पात्र मानास होई.

८९ **उर्वशी**; गण न, त, त, त, ग;अ०सं०१३; यति पादान्तीं किं० ४+३+३+३; उ० स्थिर मनें मर्त्य अन्यायही सोशितो.

९० **मत्तहासिनी**; गण ज, त, स, ज, ग;अ० सं० ५+८; उ०नका करूं हा ! गुरुजनांवहेलना.

९१ **अपराजिता**; गण न, न, र,स, ल,ग;अ० सं०७+७; उ० खलवचन खरें म्हणून फसूं नका.

९२ **कमलिनी**; गण स, ज, स, स, ल, ग; अ०सं०५+९ किं० यति पादान्तीं;उ०बहुधा बुधा अवकरीं स्थल लाभतें.

९३ **पथ्या**; गण स, ज, स, य, ल, ग; अ० सं० ५+९; उ० पतिता त्यजूनि पळती नरा मित्र ते.

९४ **मध्यक्षामा**; गण म, भ, न, य, ग, ग; अ० सं० ४+१०; उ० शांती लाधे, अतुल न कनकें कोणाही.

९५ **असंबाधा**; गण म, त, न, स, ग; अ० सं०५+९; उ० धिक् लक्ष्मीपुत्रा ! धन न वितरि दीना जो.

९६ **घनमाला**; गण स, भ, स, ज,ग, ग;अ०

सं० ४+१०; उ० खल झाकी अघ मनिचें अहो! उपायें.

९७ **प्रहरणकलिता**; गण न, न, भ, न, ल, ग; अ० सं० ७+७; उ० अघपथ धरुनी खल धन मिळवी.

९८ **प्रमदा**; गण न, ज, भ, ज, ल, ग; अ० सं० ५+९; उ० प्रकट करा सदैव नरहो! तरता.

९९ **वसंततिलका**; गण त, भ, ज, ज, ग, ग; अ० सं० १४; यति पादान्तीं; उ० वैश्वानरें त्वरित पारखिजे सुवर्ण.

१०० **लोला**; गण म, स, म, भ, ग, ग; अ० सं० ७+७; उ० पापानें मिळतें तें देहातें धन जाळी.

१०१ **रुक्मिणी**; गण ज, भ, स, ज, ग, ग; अ० सं० ४+१०; उ० धरोनियां नयपथ साधु दुःख साहे.

१०२ **वासंती**; गण म, त, न, म, ग, ग; अ० सं० ५+९; उ० आली आपत्ती अनुभवि ज्याचा तो लोकीं.

१०३ **इंदुवदना**; गण भ, ज, स, न, ग, ग; अ० सं० १४; यति पादान्तीं; उ० गूळ न दिला तरि गुळापरि वदावें.

१०४ **चामर किं० तूणक**; गण र, ज, र, ज, र; अ० सं० १५; यति पादान्तीं; उ० आपुल्या रहा स्थितींत सर्व सोडुनी भय.

१०५ **लीलाखेल**; गण म, म, म, म, म; अ० सं १५; यति पादान्तीं; उ० विद्वत्तेच्या पासंगाला श्रीमंती ती लागेना.

१०६ **शशिकला**; गण न, न, न, न, स; यति पादान्तीं किं० ८+७; उ० व्रत मरणभावें न सुजन विसरतो.

१०७ **रमा**; गण न, ज, न, र, य; अ० सं० ५+१०; उ० जन नमती बघुनि गुणाढ्य पुरुषास.

१०८ **मालिनी**; गण न, न, म, य, य; अ० सं० ८+७; उ० अतिपरिचययोगें स्नेह जातो लयास.

१०९ **सद्दला**; गण स, ज, न, न, स; अ० सं० १५; यति पादान्तीं; उ०
सुपथा धरोनि सुजन शमसुख लहे.

११० **रुक्मवत्या**; गण म, ज, स, स, स; अ० संख्या ३+६+६ किं० ३+१२; उ० सत्याच्या परीक्षणि न लोक सुळीं भ्रम घे.

१११ **प्रभद्रक**; न, ज, भ, ज, र; अ० सं० ५+६+४. उ० भरवसतो धनाउपरि तो पुढें फसे.

११२ **स्वर्णाक्षी**; गण म, ज, स, स, य; अ० सं० ३+६+६; उ० स्वर्गाचीं न हेम झकली कधिही कपाटें.

११३ **शशिकला**; गण न, न, न, न, स; अ० सं० ८+७; किं० यति पादान्तीं; उ० व्रत मरणभावें न सुजन विसरतो.

११४ **कुमुदिनी**; गण न, भ, ज, स, न, ग; अ० सं० ४+४+४+४ किं० ८+८; उ० मलिनता शिरे न धा तनुमनःकृतिमधीं.

११५ **माल्यवती**; गण भ, र, न, भ, भ, ग; अ० सं० ४+१२; उ० चिंतुनियां सुकर्म मनिं आरंभि तें सुजन.

११६ **चित्र**; गण र, ज, र, ज, र, ल; अ० सं० १६; यति पादान्तीं; उ० स्वामिला न जें रुचेल तें न भाट संस्तवील.

११७ **वाणिनी**; गण न, ज, भ, ज, र, ग; अ० सं० ५+६+५; उ० बुडविल जो स्वदेश नर तो न शांति लाहे.

११८ **सुरा**; गण त, म, य, र, त, ग; अ० सं० ४+४+४+४; उ० भूमीवरी चालावया नौकेमधें शक्ती नसे.

११९ **पंचचामर**; गण ज, र, ज, र, ज, ग; अ० सं० १६; यति पादान्तीं; उ० असत्य बोलणें असे अतीव घोर पातक.

१२० **अतिशायिनी**; गण स, स, ज, भ, ज, ग, ग; अ० सं० १०+७; उ० परि योग्य करी कृती तथा भय न ये मनांत.

१२१ **नर्दटक**; गण न, ज, भ, ज, ज, ल, ग; अ० सं० ५+६+६; उ० विधिरचना अतर्क्य, कवणासहि ती चुकलें.

१२२ **पृथ्वी**; गण ज, स, ज, स, य, ल, ग; अ० सं० ८+९; उ० यशास मळ लागल्यावरि न होइ तें निर्मळ.

१२३ **मन्दाक्रान्ता**; गण म, भ, न, त, त, ग, ग; अ० सं० ४+६+७; उ० क्रोधा ज्ञानी पुरुष म्हणती अल्पकालीन वेड.

१२४ **हरिणी**; गण न, स, म, र, स, ल, ग;

अ० सं० ६+४+७; उ० रुचिकर गमे सारें अन्न क्षुधा असतां नरा.

१२५ शिखरिणी; गण य, म, न, स, भ, ल, ग; अ० सं० ६+११; उ० कुऱ्हाडीच्या दांड्या! अधम तुजसा तूंच भुवनीं !

१२६ कुसुमशर; गण न, न, न, न, न, ग, ग; अ० सं०; १७ यति पादान्तीं; उ० करुनि उपकृति मनुज निजहितचि साधी.

१२७ वंशपत्रपतित; गण भ, र, न, भ, न, ल,ग;अ० सं० १०+७किं०४+६+७; उ० उच्च पदीं अनर्ह दिसती नर बहु बसले.

१२८ कुसुमितलतावेल्लिता; गण म, त, न, य, य, य; अ० सं० ५+६+७; उ० साधूच्या नाशा खल बहु झटे गूढ युक्त्या करून.

१२९ चित्रलेखा; गण म, भ, न, य, य, य; अ० सं० ४+७+७; उ० होओ राज्यक्षय परि न शिवे ग्रंथकारास काल.

१३० नंदन; गण न, ज, भ, ज, र, र; अ० सं० ११+७; उ० जंव अनुकूल काल तव घ्या स्वहेतुतें साधुनी.

१३१ नाराच; गण न, न, र, र, र, र;अ० सं० ७+११; उ० न धन न यश वा श्रमावांचुनी मानवा लाभतें.

१३२ शार्दूलललित; गण म, स, ज, स, त, स; अ० सं० १२+६; उ० कस्तूरी कळते स्वयें परिमळें लोकां सुखकरें.

१३३ विबुधप्रिया; गण र, स,ज, ज, भ, र; अ० सं० १८; यति पादान्तीं किं०हावी तेथें; उ० मिळता न कळे खरी जंव ती कसास न लागली.

१३४ सुमधुरा; गण म, र, भ, न, म, न,ग; अ० सं० ७+६+६; उ० जो आहे सुस्वभावी सकरुण मृदू त्याला छळि जन.

१३५ सुरसा; गण म, र, भ, न, य, न, ग; अ० सं० ७+७+५; उ० ध्येयें जो दोन ठेवी पुरुष हृदयीं तो अन्तिं फसतो.

१३६ शार्दूलविक्रीडित; म, स, ज, स, त, त, ग; अ० सं० १२+७; उ० गेला प्राण निघून काय मग ती कामास येई सुधा ?

१३७ मेघविस्फूर्जित; गण य, म, न, स, र, र, ग; अ० सं० ६+६+७; उ० तिथें आला स्वर्ग क्षितिवरि असे कां न वाटो जनाला !

१३८ प्रतानिनी; गण ज, भ, र, स, ज, ज, ग; अ० सं० १९; यति पादान्तीं किं० हावी तेथें; उ० सदैव सौम्य धरोनि वृत्ति जनाचियां सुख दे मना.

१३९ गीतिका; गण स, ज, ज, भ, र, स, ल, ग; अ० सं० २०; यति पादान्तीं किं० हावी तेथें; उ० उपयोग दोन जगामधें करिजेति सर्वहि वस्तुंचे.

१४० सुवदना; गण म, र, भ, न, य, भ, ल, ग; अ० सं० ७+७+६; उ० तेथें सांडावयाला जलकणहि न तो आवश्यक असे.

१४१ मत्तेभविक्रीडित; गण स, भ, र, न, म, य, ल, ग; अ० सं० १३+७; उ० अनुकंपा कवि ती खरी न गणि जी कांहीं न दावी फळ.

१४२ पंचकावली; गण न, ज, भ, ज, ज, ज, र; अ० सं० ५+६+१०; उ० निजराचित कर्मीं भरंवसा असतो अपुला दृढ स्थिर.

१४३ स्रग्धरा; गण म, र, भ, न, य, य, य; अ० सं० ७+७+७; उ० दारें कारागृहाचीं असुनिहि मिटलीं लोक जातात आंत.

१४४ मदनसायक; गण न, भ, न, भ, न, भ, र; अ० सं० ६+६+६+३; उ० विभव शाश्वत टिकुनि राहिल जर पथा वृष देईल.

१४५ कनकलता; गण न, न, न, न, न, न, स; अ० सं० २१; यति पादान्तीं; उ० क्षणिकसुखद दुरितसरणिस कधिहि न च भुलतो.

१४६ हंसी; गण म, म, त, न, न, न, स, ग; अ० सं० ८+१४. उ० वेडा झाला वेडा शब्द श्रवणीं पडुनि नर असुनि शहाणा.

१४७ अमृतध्वनि; गण त, भ, य, ज, स, र, न, ग; अ० सं० ४+७+७+४; उ० धिक् त्या नरा ! स्वशिर नीचाचिया चरणीं वित्तार्थ जो नमवितो.

१४८ अश्वधाटी; गण त, त, त, त, त, त, त, ग; अ० सं० ११+११ किं०४+६+६+६; उ० मोठ्या वयांतील खोटीच मैत्री, जरी तरी स्वरूपें खरी वाटली.

१४९ उमा; गण म, म, म, म, भ, भ, म, ग; अ० सं० १२+१०; उ० तो फळले वचनें स्वमनोरथ धन्यमनि धीर अखंड बसे.

231579

१५० मदिरा; गण भ, भ, भ, भ, भ, भ, भ, ग,ग; अ० सं० १२+११; उ० ग्रंथसमान खरे स्थिर मित्र न या भुवनीं मिळती मनुजास.

१५१ सवाई; गण भ, भ, भ, भ, र, न, भ, ग, ग; अ० सं० १२+११; उ० प्रेम नरा स्वजनीं कृति वाटवि निंद्य गर्वी असतां स्तवपात्र.

१५२अद्रितनया; गण न, ज,भ,ज,भ, ज, भ, ल, ग; अ० सं० ५+६+१२; उ० करित असे दुजा अघ म्हणोनियां तुम्हि करूं नका अघ कधीं.

१५३ तन्वी; गण भ, त, न, स, भ, भ, न. य; अ० सं० १२+१२; उ० आयु तयाला द्विगुणित मिळतें, तो शकतो करुं बहुविध कामें.

१५४ क्रौंचपदा; गण भ, म, स, भ, न, न, न, न,ग; अ० सं० ५+५+८+७; उ० संसृति-मार्गीं त्रस्त न होतो, मग नर अतितम शमसुख बघतो.

१५५ बंधुर; म, न, न, न,स, भ, भ, भ, भ; अ० सं० १५+१०; उ० हितपरिणतिकर अवसर मिळतां साधुनि घे हित तूं अपुलें.

१५६ कामकला; गण स, स, स, स, स, स, स, स, ग; अ० सं० १४+११; उ० सुख दुःख समान मिळे सकलांप्रति हेंच दिसे बहुधा विबुधांतें.

१५७ भुजंगविजृंभित; गण म, म, त, न, न, न, र, स, ल,ग; अ० सं० ८+११+७; उ० लक्ष्मीच्या उन्मादें दीना सतत तुडवि अकरुण सो पडे नरकामधीं.

१[illegible] [illegible]तुधा; गण ज, स, न, भ, ज, स, न, भ, ल, ग; अ० सं० १४+१२; उ० घडी गत पुन्हा नच तुम्हा मिळुं शके बहुधनार्पण करूनिहि अहा !

१५९ दंडक; गण न, न, र, र, र, र, र, र, र, र; यति ७+५+६+६+६; उ०परुषतम मनें जना वाकडीं कुत्सितें भाषणें बोलणें हें न साजे कधीं मानवा.

## अर्धसमवृत्तें.

१ अपरवक्र; विषम चरणीं न, न, र, ल, ग; सम चरणीं न, ज, ज, र; उ० मजवरि करिसी न कां कृपा, विसरुनि जा मम मंतु हा नृपा !

२ सुंदरी किंवा वियोगिनी; विषम चरणीं स, स, ज, ग;सम चरणीं स, भ, र, ल ग; उ० मनिं भाषणिं वर्तनीं असे शुचि तो वंद्य जनास होतसे.

३ पुष्पिताग्रा; विषम चरणीं न, न, र, य; समचरणीं न,ज, ज, र, ग. उ० नृपजन नगरींत सोय पाहा, नृपभजना त्यजुनी घरीं न राहा.

४ हरिणीप्लुता; विषम चरणीं स, स,स, ल, ग; सम चरणीं न. भ, भ, र; उ० कृश अंग तिचें अति निर्मल प्रिय निरंतर भाषण कोमल.

५ माल्यभारा; विषम चरणीं स, स, ज, ग, ग; सम चरणीं स, भ, र, य. उ० निजकाव्यरसेंच तृप्त होती, पण काव्यें परकीय साधु गाती.

६ वेगवती; विषम चरणीं स, स, स, ग; सम चरणीं भ, भ, भ, ग, ग. उ० असतां परतंत्राचि देश भोगिति लोक न वैभवलेश.

७ अनुष्टुभ्; हें वृत्त जरी सम वृत्तांत समाविष्ट केलें जातें तरी तें अर्धसमवृत्तांत येण्याच्या लायकीचें आहे. ह्या वृत्ताचे चार चरण असून प्रत्येकांत आठ आठ अक्षरें असतात; कोणत्याही चरणाच्या आरंभीं नगण किंवा भगण येऊं शकत नाहीं. पहिल्या आणि तिसऱ्या चरणांत पांचवें अक्षर बहुधा लघु आणि सहावें गुरु असतें; कधीं कधीं पांचवें अक्षर गुरु आणि सहावें लघु असतें. सातवें अक्षर सर्वदा गुरु असतें पण जर शेवटचीं चारी अक्षरें लघु असलीं तर हा नियम उल्लंघिण्यास मोकळीक असते. आठवें अक्षर लघु किंवा गुरु असणें हें लक्ष्यांत घेण्याचें कारण नाहीं. दुसऱ्या आणि चवथ्या चरणांत पांचवें अक्षर आणि सातवें अक्षर हीं निरपवाद लघु असावीं लागतात आणि सहावें आणि आठवें अक्षर हीं निरपवाद गुरु असावीं लागतात. ह्या अनुष्टुभ् वृत्तासंबधानें आणखीही कांहीं किरकोळ बंधनें आहेत तीं येथें आम्हीं देत नाहीं;उ० अष्ट सिद्धींत दारिद्र्य नववी सिद्धि मानिजे.

## विषमवृत्तें.

उद्गता; याचे चारी चरण परस्परांपासून भिन्न असतात. प्रथम चरण स, ज, स, ल; द्वितीय चरण न, स, ज,ग;तृतीय चरण भ, न, ज, ल,ग; चतुर्थ चरण स, ज, स, ज, ग; उ० जर तूं मनांत